तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

• स म ग्र वा ङ् म य •

खंड-९

लेखसंग्रह (संकीर्ण)

संपादक
डॉ. सुनीलकुमार लवटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय

खंड - ९

लेखसंग्रह

(संकीर्ण)

संपादक

डॉ. सुनीलकुमार लवटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
सन २०२४

वाय १८१-१

पुस्तकाचे नाव : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय
खंड - ९ लेखसंग्रह (संकीर्ण)

संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे

आयएसबीएन : ९७८-८१-९६८२६८-८-८

प्रथमावृत्ती - २०२४

प्रकाशक :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदीर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी मार्ग,
प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

© प्रकाशकाधीन :

मुद्रक :

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

मुखपृष्ठ : गौरीश सोनार

किंमत : रुपये ४४७/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः संपादकाची व लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

अध्यक्षीय मनोगत

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे संस्थापक अध्यक्ष होत. त्यांच्या कार्यकाळात (१९६० ते १९८०) मराठीत विविध विषयांचे ग्रंथ तयार करून प्रकाशित करण्यात आले. तसेच वैश्विक अभिजात साहित्य ग्रंथ भाषांतरित करून घेऊन ते प्रकाशित करण्यात आले. महत्त्वाच्या नियतकालिकांना प्रकाशन सातत्यार्थ अनुदान देण्यात आले. शिवाय समग्र वाङ्मय प्रकाशनाचा प्रारंभ झाला. आज मंडळ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकाशित करत आहे, याचा आनंद होत आहे. हा मंडळाचा महत्त्वपूर्ण व महत्त्वाकांक्षी प्रकल्प होय. तो सिद्ध केल्याबद्दल या प्रकल्पाचे संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे मंडळ ऋणी आहे, आणि त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते.

प्रकल्प संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय १८ खंडात संपादित करून प्रकाशनार्थ सादर केले आहे. सुमारे अकरा हजार पृष्ठांचे हे वाङ्मय वैविध्यपूर्ण आहे. यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित मराठी विश्वकोश नोंदी, भाषणे, लेख, मुलाखती, प्रबंध व चरित्रे (मराठी आणि संस्कृत), ग्रंथ प्रस्तावना, पुस्तक परीक्षण, पत्रे, संस्कृत हस्तलिखित ग्रंथ विवरण सूची, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतर यांचा समावेश आहे. शिवाय या प्रकल्पात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनावर आधारित स्मृती व गौरव लेख आणि यांच्या साहित्यावरील समीक्षात्मक लेख अंतर्भूत करण्यात आले आहेत. प्रकल्पाच्या अंतिम खंडात तर्कतीर्थांच्या अप्राप्त साहित्याची सूची देण्यात आली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची सूची नसताना संपादकांनी हे वाङ्मय संकलित करून त्यांचे साहित्य प्रकार, स्वरूप, विषयाधारित वर्गीकरण करून सादर केले आहे. प्रत्येक खंडास स्वतंत्र व विस्तृत प्रस्तावना असल्याने तर्कतीर्थ वाङ्मयाची पीठिका प्रारंभीच वाचकास कळते. सर्व साहित्याचे पूर्वसंदर्भ देण्यात येऊन त्यांची क्रमागत प्रकाशन सूची प्रत्येक खंडाच्या शेवटी

देण्यात आली आहे. परिशिष्टात ऋणनिर्देशांतर्गत साहित्य संकलनास साहाय्यभूत ठरणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आला आहे. शिवाय तर्कतीर्थ जीवन परिचय, तर्कतीर्थ साहित्य व संदर्भग्रंथसूची, संपादक परिचय प्रत्येक खंडाच्या शेवटी देण्यात आला आहे. या अर्थाने व अंगांनी हा प्रकल्प परिपूर्ण व उपयुक्त बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्रकाशित, संपादित व भाषांतरित ग्रंथ, आणि चरित्रे यापूर्वी वेळोवेळी प्रकाशित झाली होती. पण यात त्यांचे समग्र वाङ्मय संकलित नव्हते. या प्रकल्पात त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न संपादकांनी केला आहे. यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समग्र जीवन, कार्य, विचार जिज्ञासू वाचक, अभ्यासक, संशोधकांना एकत्र उपलब्ध झाले आहे. तो या प्रकल्पाचा उद्देश होता. तो पूर्णत्वास गेल्याचा मंडळास आनंद आहे. प्रकल्पाच्या अठराव्या खंडाच्या शेवटी प्रकल्प परिचय पुस्तिका अंतर्भूत असून त्यामुळे समग्र प्रकल्प एका दृष्टिक्षेपात समजणे सुलभ झाले आहे. हा प्रकल्प जिज्ञासूंना उपयुक्त होईल अशी अपेक्षा आहे.

दि. ८ मार्च, २०२४
जागतिक महिला दिन

डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

संपादकीय

‘तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय’ प्रकल्पातील हा खंड- ९ लेखसंग्रह (संकीर्ण) असून यात तर्कतीर्थलिखित शोधनिबंध, परिसंवादात व्यक्त केलेल्या मतांचा संग्रह, व्यक्तिलेख, आत्मपर लेख, वृत्तांत व प्रवासवर्णनपर लेख शिवाय भाषांतरित लेखांचा समावेश करण्यात आला आहे. तशा अर्थाने हा लेखसंग्रह विविध रंग, रूप, गंध, आकारांच्या फुलांनी सजलेल्या फुलदाणी (Flower Pot) सारखा चित्ताकर्षक आहे. यात विचार, शैली, प्रचार, वाद यांचे वैविध्य आहे, पण त्यातही माळेतील एकसूत्रता आहे. या प्रकल्पात तर्कतीर्थलिखित एकूण सुमारे २०० लेख संग्रहित असून ते तीन खंडांत विभाजित करून संपादित करण्यात आले आहेत. खंड- ७ मध्ये तात्त्विक व राजकीय लेख आहेत तर खंड- ८ मध्ये सांस्कृतिक. या नवव्या खंडातही सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, कला, इतिहास व साहित्यविषयक लेखांचे वैविध्य आपणांस आढळेल. यात शंभरहून अधिक लेख संग्रहित आहेत.

शोधनिबंधात तर्कतीर्थ संशोधन पद्धतीची शिस्त पाळताना दिसतील. परिसंवाद असतो मतमतांचा गलबला. त्यात सुंदोपसुंदी असते तशी कुरघोडीही. तर्कतीर्थ आपल्या परिसंवादांमधून इतर सहयोगी विचारकांपेक्षा नेहमी वेगळी मांडणी करताना तुम्हांस दिसतील. परिसंवादांची सविस्तर मांडणी प्रस्तावनेत करण्यात आली असून खंडात जरी फक्त तर्कतीर्थांची मते देण्यात आली असली तरी प्रस्तावना विवेचनात सहयोगी विचारकांच्या मताची नोंद घेत परिसंवादाचा आढावा सादर करण्यात आला आहे. यामुळे तर्कतीर्थांची मते अन्य सहयोगी वक्त्यांच्या संदर्भासह देण्यात आल्याने वैचारिक तुलना करणे शक्य झाले आहे. व्यक्तिलेखांमध्ये राजकारण, समाजकारण, धर्मकारण, इतिहास, शिक्षण, साहित्य चित्रकला, योग व अध्यात्म, पत्रकारितेसारख्या विविध क्षेत्रांतील सुमारे चाळीस दिग्गजांची अल्पचरित्रे एका दृष्टिक्षेपात वाचण्यास उपलब्ध झाली आहेत. अनुक्रमणिकेतील या मान्यवरांची नामावली वाचली तरी तर्कतीर्थांचे व्यक्तिमत्त्व कोणाच्या सान्निध्यात घडले

ते लक्षात येते. या खंडात जे अकरा आत्मपर लेख आहेत, त्यातून तर्कतीर्थांचे छोटेखानी आत्मचरित्र साकारण्यास साहाय्य होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपले स्वतंत्र असे आत्मचरित्र लिहिले नसले व त्यांचे स्वतंत्र शास्त्रोक्त चरित्र उपलब्ध नसले तरी त्याची काही अंशी भरपाई या आत्मपर लेखांमधून होताना वाचकांस अनुभवास येईल.

याव्यतिरिक्त सदर खंडात काही परिषदा व विदेश प्रवासाचे वृत्तांत देणारे लेख आहेत. यातून आंतरराष्ट्रीय पातळीवरील धर्म, तत्त्वज्ञान, प्राच्यविद्या क्षेत्रातील तर्कतीर्थांचे स्थान व अधिकार समजण्यास मदत होते. भाषांतरित लेखांमधून इंग्रजी भाषा आकलनाचा तर्कतीर्थांचा वकुब उच्च कोटीचा असल्याचे जाणवते.

समग्रतः हा नववा खंड लेख स्वरूपांच्या दृष्टीने संकीर्ण असला तरी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू अधोरेखित करत तो त्यांचे समग्र व्यक्तिमत्त्व चित्रित करतो. तर्कतीर्थ संशोधक, वक्ते, विचारक, चरित्रकार, वेदांती, मार्क्सवादी, गांधीवादी, रॉयवादी, प्राच्यविद्याविशारद, भाषांतरकार, पर्यटक असल्याचे या लेखांमधून उमजते. त्यातून त्यांचा व्यासंग जसा स्पष्ट होतो, तशी जीवनातील आस्वादकताही. तर्कतीर्थ केवळ विचारवंत नव्हते तर कर्मयोगी होते, हे त्यांच्या भारतीय स्वातंत्र्यलढा, धर्मकोश व मराठी विश्वकोश निर्मितीतून सिद्ध होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्राचीनता आणि आधुनिकतेचा संगम होता, हे जसे 'वैदिक संस्कृतीचा विकास'सारख्या ग्रंथातून स्पष्ट होते, तसे या खंडातील भाषांतरित लेखांमधूनही. सुरटी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारानंतरच्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवाचे पौरोहित्य करून ते धर्मशास्त्र पंडित असल्याचे सिद्ध करतात, तर दुसरीकडे हे मंदिर हरिजनांना खुले होणार म्हणून पुढाकार घेत आपण शंकराचार्याप्रमाणे सनातनी नाही हे सिद्ध करतात. त्यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे तर्काधारित व्यवहार करणारे सुधारक पंडित म्हणून त्यांचे जे मोठेपण पुढे येते, ते काळास पुढे नेणारे असते. त्यांच्या समग्र वाङ्मयाचे हे संपादन वाङ्मयीन कर्मकांड नसून चिकित्सक उपक्रम होय. तो तुम्हांस तर्कतीर्थांच्या जीवन, कार्य विचारांचे नवनवे संदर्भ प्रस्तुत करत साकल्याने विचार करण्याची दिशा व शिस्त देईल असा विश्वास वाटतो. तर्कतीर्थनामक एका विचारशिल्पकाराची समग्र प्रतिमा यातून अनुभवास येईल.

दि. १४ नोव्हेंबर, २०२१ **- डॉ. सुनीलकुमार लवटे**
नेहरू जयंती **संपादक**

अनुक्रमणिका

- प्रस्तावना : वैविध्यपूर्ण लेखप्रकारांची फुलदाणी ..... तेरा

अ) शोधनिबंध

1) Material, Culture and Social Basis of Vedic Philosophies.....1
2) The Cosmic State and Collective Kingship of Vedic Gods.....24
- (मराठी भाषांतर - वैश्विक व्यवस्था आणि वैदिक देवतांचे सामूहिक राज्य)....३३

ब) परिसंवाद मतसंग्रह

३) १९४८ सालातील आपले भवितव्य काय? ४३
४) जगातील दुष्टपणा व अन्याय आणि ईश्वरवादी विचारसरणी..... ४७
५) वेदांतातील काही प्रश्न ४९
६) आम्हा सुशिक्षितांच्या जीवनात ईश्वर अजून का रेंगाळत आहे? ५३
७) साहित्य, साहित्यकार आणि सरकार..... ५८
८) उद्याचा महाराष्ट्र ६१
९) भारताचे ऐक्य धोक्यात आहे काय?..... ६७
१०) महाराष्ट्राची नीतिमत्ता ७१
११) अश्लील लेखन : मतप्रदर्शन..... ७७
१२) आजचा विद्यार्थी ७९
१३) धर्मदास्य, लोकशाहीविवेक आणि दलितमुक्ती..... ८१
१४) प्राचीन भारतीयांचा कामविषयक दृष्टिकोन ८५
१५) अस्पृश्यतेचे सामाजिक तपमान ८८
१६) क्रांती..... ९१
१७) प्रबोधनाची शोकांतिका : उपोद्घात आणि उपसंहार १०३

१८) महाराष्ट्राची नवी अस्मिता ११४
१९) विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि महात्मा फुले (प्रतिक्रिया) ११६
२०) भारताचे महासंघाद्वारा पुनर्एकीकरण ११९

क) व्यक्तिलेख

❍ राजकारण

२१) जागतिक कीर्तीचे पहिले हिंदी क्रांतिकारक : कॉम्रेड मानवेंद्रनाथ रॉय..... १२७
२२) पंडित जवारलाल नेहरू यांचे थोर व्यक्तिमत्त्व..... १३४
२३) स्टॅलिन : कम्युनिस्ट क्रांतीचा कारागीर..... १४१
२४) जुन्या जगाची बंधने तोडणारा तत्त्वद्रष्टा : मानवेंद्रनाथ रॉय १४९
२५) मानवेंद्रनाथ रॉय..... १५३
२६) गुरुवर्य श्री. विनोबा यांच्यासंबंधी स्मृतिशेष १७६
२७) ध्येयवादी विचारवंत : आचार्य शंकरराव जावडेकर..... १८८
२८) साठीच्या उंबरठ्यावरील तरुण : माधवराव बागल १९१
२९) वेदवेत्ते टिळक..... १९८
३०) समतोल, समंजस राज्यकर्ता : यशवंतराव चव्हाण..... २०५
३१) किसन वीर : खरा स्वातंत्र्यवीर २१५
32) First Philosopher of Modern India : M. N. Roy 219
३३) प्रशांत आश्रमातील तपस्विनी : एलन रॉय..... २२१
३४) राजकीय सहयात्री : यशवंतराव चव्हाण..... २२७
३५) कै. श्री. मारोतराव कन्नमवार २३३
३६) दिवंगत लालबहादूर शास्त्री..... २३५
३७) स्वातंत्र्यवीर सावरकर..... २४४
३८) 'दास कॅपिटल'चा जनक : कार्ल मार्क्स..... २५१
३९) आत्मबलसंपन्न वीर : किसन वीर..... २५८
४०) अनेक तेजस्वी पैलू असलेले व्यक्तिमत्त्व : भाऊसाहेब बांदोडकर..... २६०
४१) कै. किसन महदेव वीर..... २६३
४२) भारतीय आदर्शवादाचा नवा अवतार : सेनापती बापट..... २६७
४३) वऱ्हाडचे टिळक : लोकनायक बापूजी अणे २७०
४४) शुद्ध चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी : यशवंतराव चव्हाण २७३
४५) तत्त्वचिंतक राजकारणी : यशवंतराव चव्हाण २८०
४६) यशवंतराव चव्हाण : संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आदर्श..... २८४
४७) द्रष्टा क्रांतिकारक : स्वातंत्र्यवीर सावरकर..... २८९

४८) मानवेंद्रनाथ रॉय : तत्त्वज्ञ आणि राजकीय द्रष्टे..... २९२
४९) आदर्शाच्या प्रकाशात विकसित व्यक्तिमत्त्व : यशवंतराव चव्हाण २९७
५०) यशवंतराव चव्हाण : आधुनिक महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान ३११
५१) क्रांतिकारक समादेशक : स्वातंत्र्यवीर सावरकर..... ३१५
५२) समाजभूषण बाबूराव घोरपडे ३१७
५३) जनसेवक श्री. बाबुराव धारवाडे..... ३१९
५४) तत्त्वचिंतक : रा. ना. चव्हाण..... ३२१

❍ **समाजकारण**

५५) भारतरत्न अण्णासाहेब कर्वे ३२७
५६) मानव्याचा सेवक व संस्कृतीचा तत्त्वज्ञ : डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर ३२९
५७) विश्वधर्माचा प्रज्ञावंत प्रवक्ता : कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे ३३९
५८) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : काही आठवणी..... ३४५

❍ **धर्मकारण**

५९) ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती यांचे आत्मनिष्ठ व्यक्तिमत्त्व ३४९
६०) थोर धर्मसुधारक : कै. महादेवशास्त्री दिवेकर..... ३५७
६१) कै. वासुदेवशास्त्री कोनकर ३६१

❍ **इतिहास**

६२) प्रा. नरहर रघुनाथ फाटक..... ३६५
६३) इतिहास संशोधक : कै. वि. का. राजवाडे..... ३७४
६४) इतिहास संशोधक व साहित्यनिर्माते कै. न. र. फाटक..... ३८९
६५) प्रा. न. र. फाटक : सार्वजनिक जीवनाशी एकरूप झालेला विद्वान..... ३९४

❍ **शिक्षण**

६६) माझे थोर मित्र : कै. प्रा. गोवर्धनदास पारीख ४०३
६७) मूलगामी मानवतावादी विचारक : प्रा. अ. भि. शहा..... ४१५

❍ **साहित्य**

६८) बंगाली कवी व तत्त्वज्ञ : सुधीन्द्रनाथ दत्त..... ४२१
६९) मायावादी भाष्यकार, आचार्य पुरुषोत्तम : पु. ल. देशपांडे..... ४२५

❍ **चित्रकला**

७०) युरोपातील कीर्तिशाली थोर चित्रकार : फ्रान्सिस्को जोशे द गोया ४३१

❍ **योग व अध्यात्म**

७१) महायोगी अरविंद..... ४३९

❍ पत्रकारिता

७२) वृत्तपत्र संपादक कै. श्रीपाद शंकर नवरे ४५३

ड) आत्मपर लेख

७३) मी रॉयवादी का झालो? ४६१

७४) कृष्णातीरावरील प्राज्ञमठात मी ४६८

७५) माझ्या शब्दात मी ४७६

७६) माझी पत्नी सौ. सत्यवतीची जीवनयात्रा ४८२

७७) महत्त्वाकांक्षा प्रशंसनीय नाही असे कोण म्हणेल? ५०३

७८) माझी आयुष्याची संध्याकाळ ५०६

७९) माझी तीन प्रेरणास्थाने ५१०

८०) साहित्य संस्कृती मंडळ व मी ५१६

८१) ऐ गोरख, तूने मच्छिंद्र को भी जीता है ५१९

८२) स्वातंत्र्य चळवळीतील माझा कारावास ५२१

८३) बालपणीचं माझं वेदवाचन ५२३

इ) प्रवासवर्णनपर लेख

८४) रंगून सांस्कृतिक स्वातंत्र्य परिषद ५२९

८५) मास्को प्राच्यविद्या विशारद विश्वपरिषद ५३३

८६) मास्को दर्शन (भाग १) ५४२

८७) मास्को दर्शन (भाग २) ५४८

८८) रशियातील सर्वधर्म परिषद ५५४

८९) आमची अमेरिकेची यात्रा : १. दैनंदिनी ५६०

९०) आमची अमेरिकेची यात्रा : २. दैनंदिनी ५७२

९१) आमची अमेरिकेची यात्रा : ३. दैनंदिनी ५८१

९२) आमची अमेरिकेची यात्रा : ४. दैनंदिनी ५९२

फ) भाषांतरित लेख

९३) नवमानवतावादाची बावीस सूत्रे - मानवेंद्रनाथ रॉय ६०१

९४) गिंपेलची गोष्ट – आयझॅक बेहावीस सिंगर ६०८

९५) श्वाइट्झरचे संस्कृतीविषयक तत्त्वज्ञान - निसिम ईझेकील ६२३

९६) मानवतावादी राजकारण - मानवेंद्रनाथ रॉय ६३२

९७) भारतीय नवजीवनाची चळवळ - मानवेंद्रनाथ रॉय ६३९

९८) मार्क्सवादाच्या पुढे! - फिलीप स्प्रॅट ६४६

९९) आंतरराष्ट्रीय सद्भावनांचे साधन : विज्ञान - वर्नर हाइसेनबर्ग ६५३
१००) मार्क्सवादाची जादू - डॉ. मायकेल पोलॅनी ६६३
१०१) भ्रातृभाव (रशियन राज्यक्रांतीच्या संदर्भात) - फिलीप स्प्रॅट ६७७

ग) वृत्तांत व विचार

१०२) काशी येथील अखिल भारतवर्षीय ब्राह्मण महासम्मेलन ६९३

- **लेखांची संदर्भ सूची** ७२१
- **परिशिष्टे**
  - १) ऋणनिर्देश ७२९
  - २) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परिचय ७३३
  - ३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा ७३७
  - ४) संपादक परिचय ७४७

प्रस्तावना

वैविध्यपूर्ण लेखप्रकारांची फुलदाणी

‘तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय’ प्रकल्पातील हा नववा खंड वाचकांच्या हाती सुपुर्द करताना मला आनंद होत आहे. या प्रकल्पात लेखसंग्रहाचे तीन खंड करण्यात आले आहेत. लेखसंग्रहाचा पहिला खंड (खंड- ७) हा तात्त्विक व राजकीय लेखांचा संग्रह आहे, तर दुसरा (खंड - ८) सांस्कृतिकविषयक लेखसंग्रह होय. हा खंड- ९ तिसरा लेखसंग्रह असून, हा विविध प्रकारच्या लेखांचा संग्रह असल्याने वर्गवारीत त्याचे शीर्षक ‘संकीर्ण’ करण्यात आले आहे. बहुविध विषयांवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेल्या लेखांचा संमिश्र असा हा लेखसंग्रह असल्याने संकीर्ण (Miscellaneous) ठरतो. यात शोधनिबंध, विविध परिसंवादातील तर्कतीर्थांच्या मतांचा संग्रह आहे. तसेच त्यांनी लिहिलेले व्यक्तिलेख, आत्मपर लेख, प्रवासवर्णनपर लेख, भाषांतरित लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. सदर लेख विषय, प्रकार इ.च्या अंगांनी बहुजिनसी (Hetrogeneous) असले, तरी विचारसूत्र पाहता त्यात सातत्य व एकजिनसीपणा (Homogeneousness) दिसून येतो. प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे असे तार्किक विचारविश्व व सूत्र असते. ते आयुष्याच्या विविध वळणांवर आलेल्या अनुभवांवर आधारित असते, शिवाय माणसाची स्वतःची म्हणून एक विचारधारा वा प्रकृती असते. त्यात परिवर्तने शक्य असतात. तथापि, एकदम घूमजाव अपवादाने दिसते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी राष्ट्रवाद, गांधीवाद, मार्क्सवाद, रॉयवाद, काँग्रेसवाद अशी वाटचाल करीत अंतिमतः मानवतावाद व गांधीवादाचा पुरस्कार करताना दिसतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्राज्ञपाठशाळा, वाई येथील गुरुकुलात आले, ते मुळात संस्कृत शास्त्री, पंडित होण्यासाठी. इथे ते वेदविद्या, धर्मशास्त्र, दर्शन, व्याकरण, साहित्य, साहित्यशास्त्र शिकले. न्याय, वेदांताचा पूर्वोत्तर पक्ष पूर्ण केला. अलंकारशास्त्र, वाक्यमीमांसा पूर्ण केली. या शास्त्रार्थसंचारानंतर पदवीधर होण्यासाठी ते काशीला गेले. नंतर कलकत्त्यास

जाऊन त्यांनी 'तर्कतीर्थ' ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. त्यामुळे न्याय, मीमांसा आणि वेदांतावर त्यांनी प्रभुत्व संपादन केले. ते परत येऊन प्राज्ञपाठशाळेत शिक्षक झाले. सन १९२३ ते १९३० या काळात तर्कतीर्थांनी प्राज्ञपाठशाळेत अलंकारशास्त्र न्याय, वेदांताचे अध्यापन केले. हाच काळ त्यांच्या बहुआयामी वाचनाचाही होता. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील अनेक ग्रंथांचे वाचन झाले ते याच काळात.

या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थांच्या सामाजिक कार्याचा आणि लेखनाचा प्रारंभ धर्मसुधारणेने झाला. त्यांनी जे लेखन केले ते अधिकांश वैचारिक व प्रबोधनमूलक आहे. ते नव्या सुधारणा आणि विचारांची मांडणी करणारे असल्याने प्रागतिक सिद्ध झाले आहे. तात्त्विक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा स्वरूपांत तर्कतीर्थांनी लिहिलेले लेख याचीच साक्ष देतात. याशिवाय त्यांनी विविध आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे, परिसंवाद इ.मध्ये शोधनिबंध सादर केले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातील दिवाळी अंकांमध्ये सन १९८५ पर्यंत विविध विषयांवरील परिसंवाद योजले जात. त्यांमध्ये या विषयांतील तज्ज्ञांना आमंत्रित केले जात असे. हे परिसंवाद संभाषणाऐवजी लेखनाद्वारे संयोजित केले जात असत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सदर काळात सुमारे २० परिसंवादांमधून लेख लिहून त्या त्या विषयांवर आपले मत व्यक्त केले होते. त्यातून तर्कतीर्थांचा दृष्टिकोन समजून घेण्यास मदत होते. तर्कतीर्थ व्यक्ती म्हणून सर्वसंचारी व मनुष्यसंग्रही गृहस्थ होत. राजकारण, समाजकारण, धर्मकारण, इतिहास, शिक्षण, कला, पत्रकारिता इ. क्षेत्रातील थोरामोठ्यांचा त्यांना सहवास लाभला, शिवाय अशा विविध क्षेत्रीय जाणकारांमध्ये त्यांची नित्याची ऊठबस असे. अशा संबंधांतून शिवाय पूर्वसुरींबद्दल असलेल्या आदरामुळे तर्कतीर्थांनी रौप्यमहोत्सव, अमृतमहोत्सव, जन्मशताब्दी, मृत्यू इ. निमित्ताने अनेक व्यक्तींच्या जीवन, कार्य, विचारांवर प्रकाश टाकणारे सुमारे चाळीसएक व्यक्तिलेख लिहिले. त्यातून तर्कतीर्थांची गुणग्राहकता, निरीक्षणकौशल्य अधोरेखित होते. हे व्यक्तिलेख सर्वसामान्य कार्यकर्ते तद्वतच असामान्य व्यक्तित्वांवर बेतलेले आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आत्मचरित्र असे स्वतंत्र लेखन केले नाही तरी त्यांनी आत्मपर असे अकरा लेख लिहिले. त्यांनी रेडिओ, वृत्तपत्रे, नियतकालिके यांना दिलेल्या तेवढ्याच मुलाखतीही आढळतात. या सर्वांचा एखादा ग्रंथ कुणी संपादित केला, तर ते त्यांचे जीवन, कार्य, विचार प्रतिबिंबित करणारे आत्मचरित्रच ठरेल, तीच गोष्ट प्रवासवर्णनांची. त्यातूनही त्यांचे व्यक्तिमत्त्व स्पष्ट होते. तर्कतीर्थांनी भाषांतरित केलेले अधिकांश लेख मानवेंद्रनाथ रॉय, फिलिप स्प्रॅट, बर्नर हाइसेनबर्ग, डॉ. मायकेल पॉलनी, अल्बर्ट श्वाइट्झर प्रभृतींचे आहेत. ते एका अर्थाने रॉयवाद, मार्क्सवाद, नवमानवतावाद इ. विचारांवर आधारित आहे. या सर्व संकीर्ण स्वरूपांच्या लेखांचा हा संग्रह म्हणजे विविध लेखांचा गुच्छच!

अ) शोधनिबंध

विशिष्ट विषयावरील गद्यबंध म्हणजे निबंध. नि + बंध या विग्रह व्युत्पत्तीतूनही हेच स्पष्ट होते. विस्तृत विवेचनातून निबंध साकारतो. विशेषतः शोधपर निबंध हे सर्वसामान्य विषयांवरील निबंधांपेक्षा प्रकृती, रचनेच्या दृष्टींनी भिन्न असतात. शोध निबंधकार आपले मत इतरांच्या मतांचा आढावा घेत त्या विषयावर नवा दृष्टिकोन व्यक्त करत नवमतांची मांडणी करण्याचा प्रयत्न करत असतो. हे करताना तो अनेक उदाहरणे, प्रमाणे (पुरावे, उद्धरणे इ.) देत विवेचन, विश्लेषण करत असल्याने अशा निबंधांची शैली खंडनमंडनाची होते. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः'नुसार शोधनिबंध हा नवा तत्त्वबोध असतो. निबंध ही गद्याची कसोटी मानली जाण्यात त्याच्या रचनाबंधाचे श्रेष्ठत्व सामावलेले आहे. प्रस्तावना, विषयविस्तार आणि उपसंहार अशा त्रिपदींतून शोधनिबंध नव्या आशयाची प्रस्तुती करत असतात. विहंगमावलोकन, विश्लेषण व नवमत प्रस्थापना हे शोधनिबंधाचे सूत्र असते. त्यामुळे तो विस्तृत असणे हे ओघाने आलेच. विषयाचे सर्वंकष आकलन होण्याची क्षमता असा विशेष शोधनिबंधात असणे अपेक्षित असते व अनिवार्यही! त्याची स्वतःची अशी एक वैज्ञानिक लेखन पद्धती व बैठक असते. ज्ञानविस्तार हे अशा लेखनाचे उद्दिष्ट असते. व्याख्या, व्युत्पत्ती, संज्ञापन, संकल्पना, विश्लेषण, विवेचन, निष्कर्ष या कसोट्यांतून शोधनिबंध अवतरत असल्याने शोधनिबंधकाराचा स्वाध्याय व स्वतंत्र विचार यात कळीचा मुद्दा असतो. विषयाचे परिष्कृत रूप म्हणून वाचक अशा निबंधांकडे पाहात असल्याने लेखक जबाबदारीने लिहितो. हे लेखन जोखीम असते खरे! नवमत मांडणी वा शोध याची पूर्वअट असते. चर्चासत्रे, परिसंवाद, संशोधनपत्रिका इत्यादींचे केले जाणारे हे लेखन, ते सप्रमाण, तार्किक व निकष, निष्कर्षकेंद्री असते ही त्याच्या स्वीकारार्हतेची पूर्वपरीक्षा वा कसोटी! तुम्ही काय मांडता हे जितके महत्त्वाचे, तितकेच कसे मांडता तेही! त्यामुळे आशय आणि अभिव्यक्ती अशा दोन्ही अंगांनी शोधनिबंधांकडे पाहणे अगत्याचे असते. भूतकाळाची पीठिका, वर्तमानाचे आकलन आणि भविष्याचा वेध घेत लिहिलेला शोधनिबंध म्हणजे सर्वग्राही शोधबंध होय. पूर्वाभ्यास, तुलना, विश्लेषण, समयोचित संदर्भ विवेचन इत्यादींनी युक्त शोधबंध पूरिपूर्ण लेखन ठरते. त्यासाठी निबंधकाराचा व्यासंग सर्वांगीण असणे आवश्यक असते. असे शोधलेखन हे योगदान करणारे व नवनिर्मितीचे उदाहरण म्हणून पाहिले जाते.

1) Material, Culture and Social Basis of Vedic Philosophies

'वैदिक तत्त्वज्ञानांचे भौतिक, सांस्कृतिक आणि सामाजिक आधार' शीर्षक शोधनिबंध तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'Historical Models In The Study of Tradition and Change In India' या विषयावरील चर्चासत्रात सादर केला होता. ते इंग्रजी चर्चासत्र १३ ते २६ ऑक्टोबर, १९६९ अशा आठवडाभराच्या कालावधीचे होते. त्यात अनेक

मान्यवर सहभागी होते. सदर चर्चासत्र भारतीय प्रगत अध्ययन संस्था (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडी), सिमला येथे संपन्न झाले होते.

भारतातील परंपरा आणि परिवर्तनाचे ऐतिहासिक प्रतिदर्श (Models) विषयावर विचार करीत असताना तर्कतीर्थांनी वैदिक तत्त्वज्ञानांचे भौतिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संदर्भाच्या आधारे वैदिक तत्त्वज्ञाने कशी बदलत गेली, त्यांत कशी परिवर्तन होत गेली हे विशद केले आहे. भारतीय संस्कृती सप्तसरितांच्या काठांवर विकसित झाली. या नद्यांची खोरी (Valleys) समृद्ध होती. येथील जीव, वनस्पतिसृष्टी वैविध्यसंपन्न होती. आर्य भारतात येण्यापूर्वी शेती व पशुपालन करीत. इथे येऊन ते सिंधू, रावी, सतलज, यमुना, गंगा, ब्रह्मपुत्रा इ. नद्यांच्या खोऱ्यात स्थायिक झाले. समृद्धीच्या अपेक्षेने यज्ञयाग करू लागले. त्यांनी दैनंदिन कार्यासाठी धातूची अवजारे व हत्यारे बनविली. समाजात गुणकर्मश: श्रमविभाजन झाले. त्यातून चातुर्वर्ण्य व्यवस्था अस्तित्वात आली. प्राचीन वेदकाळात 'उपनिषद्' (वेदांत), 'सांख्ययोग', 'न्यायवैशेषिका'सारखे साहित्य निर्माण झाले. हे साहित्य वैदिक तत्त्वज्ञानाची आद्यरूपे होत. ऋग्वेद ऋचा हे या तत्त्वज्ञानांचे मूळ होय. संन्यास, योगसारखे विचार वैश्विक व्यापकतेतून आलेले दिसतात. 'पुरुषसूक्त', 'हिरण्यगर्भसूक्त', त्वस्रृसूक्त', 'नासदीयसूक्त' 'अथर्वनब्रह्मसूक्त' आणि सायनाचार्यांचे 'तैंतरीय ब्राह्मण' व 'शतपथब्राह्मण' यांतून ध्यान, योगसंबंधी कर्मकांडांची निर्मिती झाली; पण उपनिषदांमुळे त्यांमध्ये प्रागतिकता येऊन बदल झाले. उपनिषदांमधून 'तैंतरीय', 'छांदोग्य', 'बृहदारण्यक' 'काठक' इ. निर्मिती झाली. त्यामुळे भौतिक सुखापेक्षा आंतरिक शुद्धीचे महत्त्व अधोरेखित झाले. 'स्व' आत्म्याचे विसर्जन पुढे परमेश्वरस्वरूपी विश्वात्म्यात होणे महत्त्वाचे मानले जाऊ लागले. हा तत्त्वज्ञानातील मूलभूत बदल होय. या बदलाने मानवी समाजाची परिमाणे बदलण्याचे, जीवनाचे अग्रक्रम बदलण्याचे कार्य केले.

उपनिषदांना वेदांत म्हटले जाते. कारण, ती वेदकाळाच्या शेवटी रचली गेली. त्यांत वेदांच्या अत्युच्च ध्येयांचे वर्णन आहे. यातील काही ग्रंथ गद्यशैली, तर काही गद्य-पद्यमिश्रित शैलीत लिहिली गेली आहेत. यांत दु:खवाद, निराशावादाचा लवलेशही आढळत नाही. त्यांत विश्वाविषयीची सकारात्मकता पसरलेली आढळते. मोक्ष संकल्पनेचा उदय हा वेदोत्तरकालीन होय. 'पुरुषसूक्त', 'ब्रह्मसूक्त' आणि 'उपनिषदे' इ.तून जीवात्म एकतेचा विचार प्रसृत होताना दिसतो. ब्रह्मांडांत नि पृथ्वीवर चातुर्वर्ण्याची रुजवणही वेदोत्तरकालीन समाजजीवनाचे अपत्य होय. वेदोत्तर काळातच भौतिक व सामाजिक शास्त्रांची निर्मिती झाली. उपनिषदांतून बौद्धिक जग उदयाला आले. ज्योतिषशास्त्र, व्याकरणशास्त्र, छंदशास्त्र, आयुर्वेद इ. भौतिक विज्ञाने आणि दंडनीती, धर्मसूत्रे इ.सारखी समाजाविज्ञाने ही वेदोत्तरकालीन आयुर्वेदनिर्मिती होय. जातिशब्द, गुणशब्द, कर्मशब्द, द्रव्यशब्द इ. निर्मितीही याच काळात झाली. सामान्य, विशेष, गुण, कर्म संकल्पनांचा उदयही वेदोत्तर काळातला आहे. हे या काळातील साहित्य व

भाषा अध्ययनातून स्पष्ट होते. वैदिक तत्त्वज्ञानांवर वेदपूर्व काळ नि संस्कृतीचा मोठा प्रभाव दिसून येतो. ब्रह्मचर्य, गृहस्थ संन्यास आणि वानप्रस्थ आश्रम विचारातून समाजपरिवर्तन लक्षात येते. हे सर्व विचार उपनिषदांनी आपल्या प्रारंभीच्या काळात कल्पिले. पुढे त्यांचा विस्तार नि विकास झालेला आढळतो. योग संकल्पना उपासनेचे उन्नत रूप म्हणून पाहता येते. हे विचार आहेत, तशीच ती तत्कालीन जीवनशैली म्हणून दिसून येते. 'सत्त्व' हे जीवनाचे असते. ते हरविले की दुःख निर्माण होते. हेच धर्माचे मूळ सूत्र होय. 'आनंद' हे वेदांताचे मूळ उद्दिष्ट होय.

वेदोत्तरकालीन प्रस्थानत्रयी (श्रीमद्भगवतगीता, ब्रह्मसूत्र व उपनिषद)तून निर्माण तत्त्वदर्शन यांचा आधार वेदपूर्व व वेदकालीन भौतिक, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थिती होय. तिच्यात जसजसे बदल होत गेले, तसे समाजजीवन, रीतिरिवाज, विचार बदलले, हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या शोधनिबंधातून दाखवून दिले आहे, म्हणजे एका अर्थाने सिद्धच केले आहे. सदर शोधनिबंधात त्यांनी जागोजागी वेद, वेदांतातील उद्धरणे देऊन आपल्या मतांना बळकटी आणली आहे. त्यामुळे हे विवेचन परिणामकारी होण्यास मोठी मदत झाली आहे.

2) The Cosmic State And Collective Kingship of Vedic Gods

उपर्युक्त शीर्षकाचा एक इंग्रजी शोधनिबंध तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी १६ ते २२ जुलै, १९७३ मध्ये पॅरिस (फ्रान्स येथे संपन्न २९व्या प्राच्यविद्याविशारद आंतरराष्ट्रीय परिषदेत (International Congress of Orientalist) सादर केला होता. त्या वेळी त्यांच्याबरोबर प्रा. रा. ना. दांडेकरही उपस्थित होते. हा शोधनिबंध या परिषदेचे इतिवृत्त संग्रहित असलेल्या 'Actes du XXIXe Congres international des orientalistes' या फ्रेंच ग्रंथात प्रकाशित झाला आहे. त्याचे इंग्रजी भाषांतर करायचे झाल्यास ते 'Proceedings of the 29th international Congress of Orientalists' असे करता येईल. हा मूळ फ्रेंच ग्रंथ L'Asiathege या फ्रेंच प्रकाशनातर्फे १९७३ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. या परिषदेच्या निमित्तानेच सुरू झालेल्या या प्रकाशनगृहाचे हे पहिले प्रकाशित पुस्तक होय.[1]

वेदकाळाच्या प्रारंभीचा मनुष्य निसर्गासच सर्जक म्हणून पुजायचा. वायू, द्यौ, मरुत, गंधर्व, अश्वनी, रिभु, अप्सरा, रूद्र, उषा, अदिती, पुषण, पृथ्वी, अरण्यानी, सरस्वती इ. देव-देवतांची चर्चा वैदिक वाङ्मयात आढळते. ऋग्वेदात 'धाता', 'विश्वकर्मा', 'भूतपती' इ. नामावलीने ईश्वर रूपवर्णन आढळते. ऋग्वेदात अनेकदेववाद आहे. तथापि, साऱ्या विश्वाचे एकच ईश्वरतत्त्व त्यात स्वीकार मानण्यात आले आहे. 'ब्रह्म', 'आत्मा' स्वरूप व संबंध चर्चा वैदिक वाङ्मयात आहे. ईश्वर संकल्पनेची तात्त्विक उपपत्ती मात्र वेदांतांत (उपनिषद) आढळते. ईश्वर व विश्व संबंधांची चर्चा नंतरच्या वैदिक वाङ्मयात करण्यात आली आहे; पण याचे मूळ रूप निसर्गातच सांगितले आहे. ईश्वर चर, अचर दोहोंत आहे, या विचारांती

सृष्टीच्या सजीव- निर्जीव स्वरूपांचा संदर्भ आहे. स्वानुभवप्रमाण सार्वत्रिक व सामूहिक राज्य कल्पना ईश्वर व निसर्ग एकत्वाचेच रूप स्पष्ट करते. विभिन्न दर्शन याच्या विभिन्न रूप व संबंधांची चर्चा करतात; पण मुळात ईश्वरीय रूप मनुष्य व निसर्ग संबंधांत आहे.

शोधनिबंधांची मीमांसा

चर्चित दोन्ही शोधनिबंधांचा गाभा घटक संस्कृती होय. संस्कृती इतकी व्यापक संकल्पना आहे की, तीत सारे मानवी जीवन आणि विश्व अंतर्भूत होते. दोन्ही शोधनिबंधांचा चर्चाविषय वेद साहित्य, वेदकाल, वेद संस्कृती असाच आहे. तर्कतीर्थांनी या निबंधांपूर्वी 'वैदिक संस्कृतीचा विकास' (१९५१) लिहिला आहे. प्रस्तुत निबंध त्याचीच चर्चा सूक्ष्मात जाऊन इथे करताना दिसतात. वैदिक तत्त्वज्ञानाचे आधार केवळ ग्रंथसंभार नसून, तत्कालीन भौतिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात विखुरलेले आहेत, याकडे तर्कतीर्थ या निबंधांमधून आपले लक्ष वेधतात. या निबंधांचा उद्देश विकास दिग्दर्शन असल्याने विविध क्षेत्रांतील साधनांद्वारे ते विकास व परिवर्तनाच्या पाऊलखुणा अधोरेखित करू पाहात असल्याचे लक्षात येते. वेदांची आधारभूमी सप्तसरितांचा प्रदेश होय. या प्रदेशांतील संस्कृती आद्यरूपे नि साधने उत्खननातील वस्तू जशा आहेत, तसेच तत्कालीन ग्रंथही. संस्कृती स्रोत मूर्त-अमूर्त, प्रगट-अप्रगट असतात. आधार तत्त्वांचा विचार त्याआधारेही येणे आवश्यक असते. वैदिक काळातील विकासवेध घ्यायचा, तर वेदांत त्याचा मूलाधार बनून राहतो. त्यांची सविस्तर चर्चा म्हणजे पहिला निबंध.

दुसरा निबंध वैश्विक अवस्था (Cosmic State) आणि वैदिक देवतांचे सामूहिक नाते वा समग्र विचार (Collective Kinship of Vedic Gods) असा आहे. वेदकाळ हा मानवी विकासाच्या संदर्भात आद्यकाळ होय. या काळातील मानवी जीवन हे प्रारंभिक अवस्था (Primitive Stage) विशद करणारे राहिले आहे. ते आजच्या तुलनेने अधिक निसर्गदत्त होते नि निसर्गाधारीही. निसर्ग स्रष्टा, विकासक नि विनाशक अशा त्रिविध रूपात समोर होता नि मनुष्य यापुढे हतबल! विश्व रहस्य त्या वेळी मनुष्याच्या हाती-माथी नव्हते म्हणून निसर्गच याचे साध्य नि साधन बनून होते. अशा काळातील विश्व आणि ईश्वरीय संकल्पनांचा शोध व उभयतांतील सहसंबंधांचा बोध या शोधनिबंधाचे विचारसूत्र होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यवसायितेची बैठक (विश्वविचारित अधिष्ठान) प्राचीन साहित्य आणि तत्त्वज्ञान आहे. ते सर्व तर्काधारित चिंतन होय. म्हणून ते तर्कतीर्थ. तर्कतीर्थ ही पदवी नसून, ती त्यांच्या व्यक्तिमत्त्व विशेषाची बिरुदावली होय. ती त्यांनी मिरविली नाही, तर लोकांनी तर्कतीर्थांपासून लाभलेल्या व्यासंगपूर्ण मार्गदर्शनातून वारंवार त्यांना चिकटविली. हे तर्कतीर्थांचे योगदान ते या दोन्ही निबंधांमधून प्रखरपणे स्पष्ट होते.

ब) परिसंवाद मतसंग्रह

व्यक्त होणं ही मानवाची सहज वृत्ती होय. आदिमानव जंगल, गुंफात राहायचा, तेव्हापण तो शेकोटी पेटवून तत्कालीन हावभाव, स्वर, उच्चारण इ.द्वारे व्यक्त व्हायचा. भाषा विकसित झाली, तसं त्याचं व्यक्त होणं नेमकं झालं. गप्पांची जागा गोष्टींनी घेतली. चर्चेचं रूपांतर वादविवाद, खंडनमंडनात होत बौद्धिक रूप आलं. अलीकडे चर्चासत्र, परिसंवाद, संगोष्ठी होतात, ते या सर्व पूर्वव्यवहारांचं वर्तमान रूप. माहिती, तंत्रज्ञानाच्या विद्यमान युगात आंतरजालीय व्याख्याने, चर्चासत्रे (ऑनलाईन) त्यांचे आधुनिकतम रूप होय.

सुसंवादाचे बौद्धिक, परिष्कृत रूप म्हणजे परिसंवाद, वार्तालाप, परिचर्चा, संगोष्ठी, चर्चासत्र, परिषद यांतून वादविवाद, खंडनमंडन होत राहते. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' या उक्तीत अशा चर्चांचे उद्दिष्ट स्पष्ट आहे, ते म्हणजे तत्त्वबोध, नवज्ञान शोध, निरंतर जिज्ञासा इ. विचारांबद्दलच्या विचार प्रक्रियेत जिज्ञासा सातत्य सामावलेले आहे. त्यातच परिसंवादाची फलश्रुती, योगदान शोधायचे असते. परिसंवाद शब्द परि-सम वद (बोलणे)+घञ अशा व्युत्पत्तीतून समजावला जातो. ती व्युत्पत्ती एका विषयावरील अनेकांचे तर्कसंगत, विचारपूर्ण वादविवाद सूचित करते. एखाद्या विषयावर चर्चा योजून परिसंवादातून जिज्ञासू (वाचक, श्रोते, प्रेक्षक, अभ्यासक, संशोधक, शिक्षक, व्यावसायिक, तंत्रज्ञ इ.) व्यक्तींचे शंकानिरसन, शंकासमाधान, आकलन, ज्ञान, ज्ञानाचा विस्तार, एका प्रश्नाची दुसरी बाजू वा अन्य पक्ष, पैलू, अंगे समजावून दृष्टिकोन बदल व विकासकार्य साधले जाते. यातून सामूहिक परिवर्तन आणण्याचे काही साधत असते. व्यवसाय, उद्योग, व्यापार, कंपनी, संस्था इ.चा वापर प्रशिक्षण, विपणन, ग्राहक संवर्धन इ.साठी करतात. वर्तमानात त्यासाठी संगणक, आंतरजाल, प्रक्षेपक, दूरसंवाद साधने, दूरसंवाद, दृक्-श्राव्य चर्चा, बैठका योजतात. हे सारं परिसंवादाचंच रूपांतर होय.

मराठी साहित्य, पत्रकारिता, नियतकालिके इ. क्षेत्रांत स्वातंत्र्योत्तर काळात मुद्रित साधने महत्त्वाची होती. त्या काळात वर्तमानपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके, वार्षिके (दिवाळी अंक) यांमधून विशिष्ट विषयांवर त्या क्षेत्रातील विभिन्न दृष्टिकोन, विचारधारेच्या तज्ज्ञांची लिखित मते आमंत्रित करून संपादक, संयोजक त्यांची प्रस्तावना, उपोद्घात, चर्चा, समारोप इ. क्रिया मुद्रित वा व्याख्यान रूपात करीत असत. सन १९५० ते १९८० या तीन दशकांत मराठी भाषा, साहित्य, संस्कृती जगतात, परिसंवाद ही विचारपर्वणी होती. आज ती दृक्-श्राव्य माध्यमाने व दूर संसाधनांनी साधली जाते.

३) १९४८ सालातील आपले भवितव्य काय?

१५ ऑगस्ट, १९४७ साली ब्रिटिशांनी तत्कालीन हिंदुस्थानचे विभाजन भारत आणि पाकिस्तान अशा दोन संघराज्यांमध्ये केले व दोन स्वतंत्र राष्ट्रे जगाच्या नकाशावर उदयास

आली. भारतीय जनता स्वातंत्र्यानंतर लगेचच देश उभारणीच्या कार्यास लागली. सन १९४८ जानेवारी हा काळ म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अवघा चार-साडेचार महिन्यांचा काळ. देशाचे नियोजन, भाषावर प्रांतरचना, संस्थानांचे विलीनीकरण, निर्वासितांच्या पुनर्वसनाची चिंता, लोकशाही, जात-धर्माधारितसमाज व प्रांत वास्तव अशा गुंतागुंतीच्या स्थितीत देशाची पुनर्घटना वा पुनर्रचना कशी करावी, हा चिंतेचा प्रश्न होता. 'किर्लोस्कर' मासिकाच्या संपादकांनी या संदर्भातील चौदा समस्यांवर आधारित एक प्रश्नपत्रिका महाराष्ट्रातील समाजधुरीण, राजकारणी व विचारवंतांना पाठविली होती. त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचाही अंतर्भाव होता. त्यांच्याशिवाय ही प्रश्नपत्रिका सर्वश्री डॉ. मुकुंदराव जयकर, ना. म. जोशी, ॲड. ए. ए. खान, डॉ. वा. का. किर्लोस्कर, भास्करराव जाधव, गंगाधरराव देशपांडे, शं. शा. मोरे, अ. बा. लठ्ठे, कॉम्रेड बी. टी. रणदिवे, ग. त्र्यं. माडखोलकर, पां. वा. गाडगीळ, पु. ल. देशपांडे, ना. ग. गोरे, शं. रा. दाते, आचार्य शं. दा. जावडेकर, प्रिन्सिपॉल वा. रा. कोल्हटकर, दा. वि. गोखले, वि. स. खांडेकर, प्रिन्सिपॉल दोंदे, रंगनाथ दिवाकर, आप्पासाहेब पंत, डॉ. ग. श्री. खैर, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, के. गो. गोखले, राणी लक्ष्मीबाई राजवाडे, गो. स. सरदेसाई, द.व्यं. वळवी, डॉ. रा. ह. भडकमकर, एस. एन. अंगडी, दि. व. जोशी, सौ. चंद्रकलाबाई हाटे, श्री. प्र. ओगले आणि स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर अशा विविध क्षेत्रांतील चौतीस मान्यवरांना पाठवून जनमतसंग्रह करण्यात आला होता. ही मते 'किर्लोस्कर' मासिकाच्या जानेवारी आणि फेब्रुवारी, १९४८ च्या अंकात प्रकाशित करण्यात आली होती. जी मते आली होती, त्यात फारशी मतभिन्नता आढळून आली नसल्याचे निरीक्षण संपादक महोदयांनी या अंकात नोंदवून ठेवले आहे. ते महत्त्वाचे आहे. ते देशाच्या तत्कालीन अखंडतेचे सूचन होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी १४ पैकी १० प्रश्नांनाच उत्तरे दिली होती. २, ४, ११, १४ अशा ४ प्रश्नांची उत्तरे येथे आढळत नाहीत. त्याचे कारण समजून येत नाही.

जी उत्तरे दिली आहेत ती सुस्पष्ट असून, देशाच्या दीर्घजीवी विकासाच्या व अखंडतेच्या दृष्टींनी महत्त्वाची वाटतात. विशेष म्हणजे या मतांचे, त्यातील दूरदृष्टी नि चिंतेचे प्रतिबिंब सन २०२३ च्या भारताच्या वर्तमान स्थितीत प्रत्ययास येते. त्यानुसार तर्कतीर्थ देशाचे विभाजन अपरिहार्य असल्याचे सांगतात. कारण, तत्कालीन परिस्थिती तणावपूर्ण होती. विभाजनास ते हिंदू आणि मुसलमान समाजाच्या गत ५० वर्षांतील समाजकारण व राजकारणास समानपणे जबाबदार मानतात. देशाची उभारणी 'हिंदुत्व'सारख्या धार्मिक निकषावर होणे हे भेद करणारे, विषम आणि समानबंधुत्व भावनेच्या विरोधी असल्याचे नोंदवितात. वर्तमान संदर्भात हे अधिक प्रस्तुत ठरते. 'हिंदुत्व' तत्त्वावर भर दिल्यास "आज अस्तित्वात असलेल्या प्रांतिक राज्यांतूनही राष्ट्रे उत्पन्न होतील आणि बाराखंड हिंदुस्थान होईल अखंड नव्हे," हे मत लक्षवेधी व वर्तमानास अंतर्मुख करणारे ठरते. तर्कतीर्थ देश उभारणीत नियंत्रण

आवश्यक मानतात. 'नियंत्रणे काढल्यास गरीब जनतेच्या हलाखीत आणखी भयंकर भर पडेल,' हे सांगण्यास ते विसरत नाहीत. सर्वांगीण राष्ट्रीय पुनर्रचना ही सांस्कृतिक आणि आर्थिक नियोजन तत्त्वांवर व्हावी, असे तर्कतीर्थांचे मत होते. इथे विकास म्हणजे केवळ भौतिक नव्हे, त्याचा चेहरा मानवी हवा, असे ते सुचवू इच्छितात. भारताने 'ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स'चे सदस्य राहावे, त्यात गैर काहीच नाही. इंग्लंड हे लोकसत्तावादी राष्ट्र आहे, याकडे लक्ष वेधत ते लोकतांत्रिक राज्यपद्धतीचे समर्थन करतात. भारत आणि पाकिस्तानातील तणाव लक्षात घेता भविष्यकाळात युद्धाची शक्यता तर्कतीर्थ नाकारत नाहीत; पण युद्ध होऊ नये यासाठी उभय देशांत सहिष्णू नि उदारता हवी. प्रसंगी काश्मीर द्यावे, पण युद्ध नको यात देशहित भावना आहे. युद्धाच्या विध्वंसापेक्षा गरिबांचा विकास आणि निर्वासितांचे पुनर्वसन ते महत्त्वाचे मानतात, यात तर्कतीर्थांचा नवमानवतावादी तत्कालीन विचार डोकावतो. (याच वेळी त्यांनी रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाचे विसर्जन करून नवमानवतावादाची २२ सूत्रे मांडण्यास प्रारंभ केला होता. हिंसा, क्रांतीकडून शांती आणि सद्भाव समर्थक असा तर्कतीर्थांचा वैचारिक प्रवास व परिवर्तन सुरू असल्याचेच हे निदर्शक होते.) केंद्र सरकारचे पुरोगामी धोरण असण्यात देशहित सामावल्याची भावना या मतांमधून स्पष्ट होते.

४) जगातील दुष्टपणा व अन्याय आणि ईश्वरवादी विचारसरणी

विषय चर्चेचा काळ आजच्या सुमारे सात दशकांपूर्वीचा. त्या काळी आजच्यापेक्षा देव, देवाधीनता समाजात अधिक होती. आजच्याइतके विज्ञान, तंत्रज्ञान प्रचार, प्रसार, प्रबोधन त्या काळी झालेले नव्हते. या पार्श्वभूमीवर या परिसंवाद चर्चेकडे पाहणे आवश्यक आहे. मिरज निवासी वि. ज. सहस्रबुद्धे यांनी सन १९५३ च्या उत्तरार्धात सर्वश्री, आचार्य श. द. जावडेकर, इस्लामपूर; तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई; आचार्य स. ज. भागवत, गारगोटी; ना. गो. चाफेकर, बदलापूर; दि. के बेडेकर, पुणे; शं. दा. पेंडसे, श्री. ना. बनहट्टी नागपूर; कृ. के कोलटकर, पुणे - ही सर्व मंडळी तत्कालीन समाजकारण, राजकारण, साहित्य, समीक्षा इ. क्षेत्रांतील सार्वजनिक व्यक्तिमत्त्वे होती. त्यांना वि. ज. सहस्रबुद्धे यांनी पत्र लिहून विचारणा केली होती की, श्रीकृष्ण चरित्रात पुतना, कंस इ. दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तींचे निधन हे 'सद्गती' मानण्यात, रंगवण्यात आले आहे. केवळ देवाच्या हाती मरण आल्याने दुष्टाला सद्गती लाभल्याच्या वर्णनाने सुष्ट-दुष्ट अंतर संपले. शिवाय अप्रत्यक्षरीत्या दुष्टास मान्यता वा त्याचे गौरवीकरण होते. विरोधाभास वा विरोधभक्ती समर्थनाचा भाग नाही का? त्यावर वरील मान्यवरांनी व्यक्त केलेली मते उपर्युक्त चर्चा, परिसंवाद 'नवभारत' मासिकात प्रसिद्ध झाला होता. कर्मविपाक सिद्धांतानुसार दुष्टास शासन होणे, समाजस्वास्थ्यासाठी आवश्यकच नसून, अनिवार्य असल्याचा विचार या शंकानिरसनाच्या हेतूने घडलेल्या परिसंवादामागे होता असे वाटते.

या परिसंवादात ज्या मान्यवरांनी भाग घेतला, ते सर्व ईश्वरावर व पुराणकथांवर विश्वास ठेवणारे आहेत; पण या कथा नि चरित्रसंबंधी त्यांच्या वेगवेगळ्या धारणा आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी तीन उपपत्तींची मांडणी करीत या विषयासंबंधीचा आपला दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. त्यांच्या मतानुसार, पुराणकथांतून सुसंगत अर्थ निर्माण होतात, असे सर्वथा दिसत नाही. कथा रचनांची संगती ही कथाकाराच्या वासनांशी (इच्छा, आकांक्षा) निगडित असते. दुसरे असे की, देवांचा सामना करणे. जे दुष्ट असतात, तेही देवांप्रमाणे दैवी गुणांनी (दिव्य शक्ती, चमत्कार इ.) युक्त असतात. त्यांना दंड झाला, तरी दैवी गुण त्यांच्यात राहतातच. दुष्टही पापपुण्याने युक्त असतात. पापाने प्रायश्चित्त मिळते, तसे पुण्याने मोक्ष (मुक्ती) मिळतो, हे लक्षात घ्यायला हवे. तर्कतीर्थांचे हे मत पुराणकथांसंबंधीच्या त्यांच्या आकलनावर आधारित असले, तरी ते पुराणकथांवर विश्वास व्यक्त करणारे आहे, हे नाकारता येत नाही.

या परिसंवादातील अन्य सहभागींपैकी आचार्य शंकरराव जावडेकर यांच्या मतानुसार, जगात चांगले, वाईट दोन्ही असते. वाईटामुळे चांगल्याचे महत्त्व पटते. जगात, नाटकात नायक-खलनायक, देव-दैत्य असतातच. सत्-असत्याच्या पलीकडे अनिर्वचनीय तत्त्व असते. ते जग नियंत्रित करते कर्म विपाक सिद्धांताचे. या दोन्ही प्रकारच्या प्रवृत्तीच्या अस्तित्वामुळे महत्त्व लक्षात येते. आचार्य जावडेकर स्वतःस अध्यात्मवादी मानतात, त्यामुळे निर्णय न्यायनिष्ठेवरून करतात. पापपुण्य, पूर्वजन्म, पुनर्जन्म, कर्मफल इ. कल्पनांना मान्यता देऊनच अन्याय, विषमता, भेद, शोषण जन्मतात. त्यामुळे पुराणपंथी विचारसरणी सोडली पाहिजे, असे त्यांचे मत आहे. आचार्य स. ज. भागवतांच्या मतानुसार, या कथांत अर्थवाद आहे म्हणजे सत्यांश नगण्य व अतिशयोक्ती, कल्पना अधिक. ना. गो. चाफेकरांचे मतही असेच आहे. दि. के. बेडेकर यांचे म्हणणे असे की, जगात जे चालते आहे ते सर्व कर्मतत्त्वावर. बालकृष्ण-पुतना, कृष्ण-कंस, राम-रावण, भीम-दुर्योधन इ. सर्व कथांत सुष्ट-दुष्ट द्वंद्व आहे. यात अर्थवाद नसून कर्मवाद आहे, तो त्यांनी शिकारी-सावज उदाहरणातून स्पष्ट केला आहे. तर शं. दा. पेंडसेंचा विचार हा नामस्मरणाचे महत्त्व अधोरेखित करणारा आहे. नामस्मरणाचे महत्त्व भक्तीत असते. फलनिष्पत्ती हा निष्ठापूर्वक भक्तीचा परिणाम होय. श्री. ना. बनहट्टी यांची धारणा अशी की, या कथा श्रद्धेवर उभ्या आहेत, त्यांचा विचार त्याच संदर्भात होणे सयुक्तिक. कृ. के. तथा बाबा कोल्हटकरांचा दृष्टिकोन असा आहे की, अंतःकाली ईश्वरस्मरण झाल्यास ईश्वरी प्रभावानं वासनाक्षय होतो. पाप-पुण्याच्या आधारे पूर्वजन्म संचित लक्षात घेऊन फलश्रुती ठरते. मुक्ती अनेक प्रकारची असते, ती ज्याच्या-त्याच्या कर्मावर ठरते.

प्रस्तुत परिसंवाद सात एक दशकांपूर्वीचे समाजमन, धारणा, श्रद्धा कळण्यास पुरेसा आहे. त्या वेळी अंधश्रद्धा निर्मूलनाचा प्रचार-प्रसार नव्हता. विज्ञाननिष्ठाही आजच्याइतकी प्रभावी

व परिणामकारक नव्हती. त्यामुळे वरील परिसंवादात भाग घेणारे सर्व ईश्वरवादी होते. कारण, त्यांची घडण व आजूबाजूचा समाज धर्मश्रद्ध होता. वेद अपौरुषेय मानण्याच्या काळातील ही मते. त्यात कोणीही ईश्वर नाकारत नाहीत. कर्मवाद, दैववाद पुरस्कारणारे हे सर्व 'बाबा वाक्यं प्रमाणम्' राहतात. विशेष म्हणजे तर्कतीर्थ मार्क्सवाद, रॉयवाद समजून घेतल्यावरही ईश्वरवाद नाकारत नाहीत. दुष्टपणाचे निर्दालन ईश्वर करत नाही, हेही ते मांडताना दिसत नाहीत, याचे आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही.

५) वेदांतातील काही प्रश्न

मिरज (जि. सांगली) निवासी छंदशास्त्र व्यासंगी आणि तल्लख जिज्ञासू वि. ज. सहस्रबुद्धे यांनी उपनिषद्तीर्थ जोग, पुणे यांनी लिहिलेल्या 'पंचदशी' ग्रंथावर आधारित वेदांतातील शंकांचे निरसन करण्यासाठी काही प्रश्न अभ्यासकांना पाठविले होते. अशा अभ्यासक, व्यासंगीत सर्वश्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई; ज. स. करंदीकर, पुणे; दत्तात्रेय कवीश्वरशास्त्री, पुणे; शं. वा. दांडेकर, पुणे यांचा अंतर्भाव होता. श्री. सहस्त्रबुद्धे यांनी त्यांना पुढील प्रश्न विचारले होते- १) ब्रह्म हे जगताचे कारण असे शंकराचार्य म्हणतात, परंतु हे ब्रह्म शुद्धब्रह्म की शबलब्रह्म (मायायुक्त) हे ते स्पष्ट करीत नाहीत. 'एकोऽहम बहुस्याम् प्रजायेत सोऽकामयत' हे स्फुरण अथवा कामना कोणाला झाली? २) शंकराचार्य 'जगताचे कारण' ब्रह्म मानतात. ते ब्रह्म शुद्ध की शबल? ३) शुद्ध ब्रह्माचे शबलब्रह्म कसे झाले? ब्रह्म, परब्रह्म, ईश्वर, परमेश्वर असे शब्द वापरले जातात. 'ब्रह्मसूत्र' शांकरभाष्यात हे शब्द एकार्थक आहेत की भिन्नार्थक आहेत?

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे या संदर्भात म्हणणे असे आहे की, १) मूळ शब्दब्रह्मात 'एकोऽहम बहुस्याम् प्रजायेत सोऽकामयत' हे स्फुरण अथवा इच्छा नाही. व्यवहारात किंवा विश्वाचे अस्तित्व गृहीत धरूनच वरील इच्छा संभवते. युद्धब्रह्म हे सर्वकाली शुद्धच; म्हणजे ते निर्विकल्प निरिच्छ असते. २) शंकराचार्य जगताचे कारण 'ब्रह्म' असे म्हणतात, तेव्हा त्याचा अर्थ 'मायायुक्त ब्रह्म' असाच आहे. 'ब्रह्म' शब्दाचा किंवा कोणत्याही या अभिप्रायाने (ब्रह्म शब्दाचा पर्याय म्हणून) वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा 'शुद्धब्रह्म' हा अर्थ वाच्यार्थ होऊच शकत नाही. शबल (मायायुक्त) ब्रह्म वा ईश्वर हा सर्व पर्यायांचा वाच्यार्थ होय. ब्रह्म शब्दाचा निरूढ लक्ष्यार्थ 'शुद्ध ब्रह्म' होय; 'ईश्वर' शब्दाचा 'शुद्ध ब्रह्म' हा रूढ लक्ष्यार्थ नाही; असा 'ईश्वर' व 'ब्रह्म' शब्दाचा फरक आहे. (३) शबलब्रह्म म्हटले म्हणजे नंतर 'शुद्धब्रह्म' ही कल्पना आलीच पाहिजे हे खरे. परंतु, मूळ शुद्धब्रह्माचे शबलब्रह्म बनत नाही, त्या दोहोंत पौर्वापर्य (मागचा-पुढचा संबंध, क्रम) नाही. शुद्धब्रह्म त्रिकालाबाधित, कालातीत आहे. शांकरभाष्यात मायायुक्त ब्रह्म म्हणजेच ईश्वर असा आचार्यांनी स्वतःच सांगितला आहे. ही उत्तरे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी आधीप्रमाणे (पुरावे) विशद करून नंतर सूत्ररूपाने सांगितली असल्याने ती वादातीत ठरतात.

ज. स. करंदीकरांच्या मतानुसार, शंकराचार्य हे 'ब्रह्म' आणि 'आत्मा' शब्दात भेद मानत नाहीत. शुद्धब्रह्माचेच रूपांतर शबलब्रह्मात झाले आहे. ब्रह्म, परब्रह्म, ईश्वर शब्द आपण व्याकरणदृष्ट्या वापरत नाही. ते एकमेकांचे पर्याय म्हणून वापरले जातात ते चूक आहे. प्रत्येक शब्दात (अर्थाचा) फरक आहे. दत्तात्रेय कवीश्वरांच्या मतानुसार, शुद्धब्रह्माहून कोणीच भिन्न नाही. 'ब्रह्मसूत्र' भाष्यात शंकराचार्य 'बहुस्याम' शब्दाचा वापर करतात. 'आत्मन:' शब्द 'शबलात्मन:' नाही. कवीश्वरही शब्दांचे पौर्वापर्य मानत नाहीत. शं. वा दांडेकर यांचे म्हणणे वरील तीन व्यासंगी व्यक्तींइतके स्पष्ट, प्रश्नोत्तर रूप नाही. संदर्भानुसार अर्थग्रहणाचे मत दिसते.

शंकराचार्यांच्या मायावादाचा विचार करता लक्षात येते की, ब्रह्मच परमार्थ सत्य होय. सत्, चित्, आनंद रूप ब्रह्म असते. ते सर्व विश्वाचे विवर्तोपासनकारण (बदलाचे) होय. ब्रह्म अथवा माया उपादान कारण (उपादनं) (Matter) होय. ब्रह्म हे श्रुतिसाध्य आहे, तर्कसाध्य नाही. प्रत्येक वस्तु ब्रह्मचैतन्ययुक्त आहे. ब्रह्माशिवाय कशाचेही स्वतंत्र अस्तित्व नाही. जीव व ब्रह्म एकच अद्वैत होय. म्हणून शंकराचार्यांचे विचार अद्वैतवाद म्हणून परिचित आहेत. आचार्यांच्या मतानुसार, ब्रह्म हे नित्य, शुद्ध, बुद्ध आणि मुक्त आहे. ते सर्वव्याप्त आहे. ते वेगळे प्राप्त करता येत नाही- असतेच (सजीव, निर्जिवात). ज्ञानच मोक्षाचे साधन आचार्यांनी मानले आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान व कार्य या विषयांतर्गत सन १९९१ मध्ये मुंबईत तीन व्याख्याने दिली होती. तत्पूर्वी सन १९८७ मध्ये नागपूर येथेही एक व्याख्यान दिले होते. ही चारही व्याख्याने या 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पातील खंड - २ (भाषण संग्रह : व्यक्ती आणि विचार)मध्ये अंतर्भूत आहेत. यातही या विषयावर तर्कतीर्थांनी आपले विचार सप्रमाण आणि सविस्तार मांडले आहेत. ते जिज्ञासूंनी अभ्यासावे, म्हणजे शंकराचार्य विचार हा तर्कतीर्थांच्या चिंतन-मननाचा अविभाज्य भाग होता, त्यावर भाष्य करण्याचा अधिकार त्यांनी वेदाध्ययनातून प्राप्त केला होता, हे स्पष्ट होईल. शंकराचार्य अभिप्रेत ब्रह्म, माया, जीव, जगत् संबंधी तर्कतीर्थांच्या विचारातील स्पष्टता हे त्यांच्या विद्या व्यासंगाचे प्रमाण होय.

६) आम्हा सुशिक्षितांच्या जीवनात ईश्वर अजून का रेंगाळत आहे?

'किर्लोस्कर' मासिकाने आपल्या नोव्हेंबर, १९५६ च्या दिवाळी अंकात एक परिसंवाद प्रसिद्ध केला होता. त्याचा विषय होता, 'आम्हा सुशिक्षितांच्या जीवनात ईश्वर अजून का रेंगाळत आहे?' या विषयावर संपादकांनी आपले प्रतिनिधी श्री. य. गो. नित्सुरे यांच्यामार्फत प्रत्यक्ष गाठून, प्रश्न विचारून बुद्धिजीवी वा बुद्धिवादी महानुभावांची मते जाणून घेतली होती. पैकी एक होते पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे. त्यांना विचारलेल्या विविध प्रश्नांच्या उत्तराचा गोषवारा सांगायचा झाला तर म्हणता येईल की,

"बुद्धिवाद्यांना ज्या परिस्थितीशी लढावे लागत आहे, ती परिस्थिती अत्यंत प्रतिकूल आहे. बुद्धीचा वापर न करता परंपरागत मूल्यांना श्रद्धास्थाने बनवून भावनांच्या आहारी जाऊन जीवन जगणे, ही अधिक सोपी गोष्ट आहे. बुद्धिवादी निष्ठा बनवून घेण्यास कष्ट पडतात. व्यक्तीला अधिक निर्भय व्हावे लागते. विद्यापीठांतून शिक्षण घेतलेल्या मनुष्याचा बौद्धिक विकास किती झाला असेल, विज्ञानावर त्याची श्रद्धा किती जडली असेल, यावरच तो बुद्धिवादी जीवन जगू शकेल की नाही, हे अवलंबून असते. वैज्ञानिक दृष्टिकोन बाणवून न घेता विज्ञानाचा अभ्यासक्रम पुरा करणारा विद्यार्थी ईश्वरवादी व दैववादी राहण्याचा धोका असतो.

दुसरे बुद्धिवादी होते राईट रेव्हरंड डब्ल्यू. क्यू. लॅश. हे इंग्रजी गृहस्थ. इंग्लंडमध्ये त्यांची जडणघडण, शिक्षण झालेले. त्यांना भारताचा परिचय कमी. त्यांनी इंग्लंडमधील सुशिक्षितांच्या ईश्वरवादी विश्वासासंदर्भात भाष्य केले आहे. पूर्व नि पश्चिम असा शिक्षण, संस्कृती, राजकारण इ. अंगांनी फरक असेल असे वाटले होते; पण ते स्वतः धर्मोपदेशक असल्याने त्यांचे ईश्वरवादाचे समर्थन स्वाभाविक म्हणावे लागेल. कारण ते ईश्वरवादी होते; पण इंग्लंडच्या सन १९४४ च्या शिक्षण धोरणात धर्मशिक्षणाचा अंतर्भाव असणे, तेथील सिनेटवर (संसद) धर्म संस्थांचे प्राबल्य असणे आणि लोकानुनय वृत्तीमुळे राजकारण्यांकडून होणारे धर्म समर्थक निर्णय हेच सांगातात की, प्रबोधन पर्वानंतरही (Renaissance Period) पश्चिमी जग पूर्णपणे विज्ञाननिष्ठ, विवेकवादी, ईश्वरमुक्त (नास्तिक वा निधर्मी) होऊ शकले नाही.

या पार्श्वभूमीवर तिसरे बुद्धिवादी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मत वा दृष्टिकोन जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. तत्पूर्वी संपादकांनी प्रारंभी प्रस्ताविकाच्या रूपाने समोर ठेवली आहे, ती अधिक महत्त्वाची असल्याने अगोदर समजून घेणे आवश्यक आहे.

ईश्वर विश्वास ही एक श्रद्धा आहे. शिक्षणाने विज्ञान व बुद्धिवादाचा विकास होतो. (तसा होणे गृहीत असते!) पण सुशिक्षित विवेकवादी, अंधश्रद्धामुक्त, विज्ञानवादी, निधर्मी, नास्तिक झाल्याचे अपवादाने दिसते. शिक्षण जर जाणिवा, दृष्टिकोन बदलायचे साधन मानतो, तर मग असे का घडते? त्याचे उत्तर माणसाची घरी, दारी, समाजी नि शिक्षणातून होणारी घडण वेगळी असत नाही. कारण, शिक्षण विज्ञान शिकविते; पण वैज्ञानिक, विवेकवादी दृष्टिकोन देत नाही. विज्ञाननिष्ठा रुजविण्याचे काम शिक्षण व समाज करीत नाही हेच आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या परिसंवादातील आपल्या मतात विशद केले आहे की, महाराष्ट्रीय सुशिक्षित धार्मिक असला तरी कमी कर्मकांड करतो. सुशिक्षितांचे मन अजून बऱ्याच प्रमाणात देववादी व दैववादी आहे. नास्तिकता आणि बुद्धिवाद दोन स्वतंत्र गोष्टी होत. बुद्धिवाद ही शिक्षणाची, तर नास्तिकता ही विवेकवादाची परिणती होय. अशी रोखठोक भूमिका घेणारे सुशिक्षित अपवाद. अज्ञेयवाद आणि अनीश्वरवादात अंतर

आहे. माणसांवरील बालपणी होणारे संस्कार महत्त्वाचे असतात. कारण, घडण त्यातून होत असते. शिक्षणातून हे शक्य आहे; पण आपले शिक्षण माहिती पुरविणारे आहे, घडण करणारे नाही. नास्तिकवाद शिकविता येईल; पण घडण ही व्यक्तिपरत्वे भिन्न होत असते, हे लक्षात घेतले पाहिजे. जीवनात योगायोग असतात. ते चांगले नि वाईट असतात. त्यांची कारणमीमांसा करताना परिस्थिती हा महत्त्वाचा घटक दुर्लक्षून चलणार नाही. तथापि, बुद्धिवादाने योगायोगाची कारणमीमांसा शक्य असते. ती करावी व मग निष्कर्षाप्रत पोहोचावे. बुद्धीला न सुटणारे प्रश्न असतात, ते कालांतराने कारणमीमांसेने स्पष्ट होत जातात. 'पिंडे पिंडे मतिर्भिनः'मध्ये जे वैविध्य असते, त्यांचा संबंध पाप-पुण्याशी नसून गर्भधारणा, अनुवंश, परिस्थितीशी आहे. ईश्वर आहे की नाही, याचा शोध व्यक्तीने स्वतःच्या श्रद्धेवर व मनोरचनेनुसार करावा.

७) साहित्य, साहित्यिक आणि सरकार

प्रा. रा. भि. जोशी यांनी लिहिलेला 'साहित्य, साहित्यिक आणि सरकार' शीर्षक लेख साहित्यकलेचे स्वरूप व कार्य विशद करणारा होता. तो विविध दृष्टिकोन असणाऱ्या टीकाकार, लेखक व वाचकांकडे पाठवून त्यांची मते 'सत्यकथा' मासिकाने मागविली होती. निमित्त होते भारतीय स्वातंत्र्याच्या दशकपूर्तीचे. भारतातील लोकशाही सरकार आपले कर्तव्य ओळखून साहित्यकारांना 'आश्रय' देऊ लागलेले आहे. सरकारने साहित्य अकादमीसारखी संस्था स्थापून त्या संस्थेने विविध पुरस्कार देण्यास प्रारंभ केला आहे. अनेक समित्या, पदे इ.वर साहित्यकारांची नियुक्ती, वर्णी लावण्यात येत आहे. काही साहित्यकार शासकीय सेवेत दाखल होत आहेत. साहित्यिकांचे शासनाच्या वळचणीस जाण्यातून मिंधेपण येते. त्यामुळे साहित्यकाराचे स्वातंत्र्य संपुष्टात येत आहे. लेखक, कलाकाराचे स्वातंत्र्य हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अंगभूत भाग असल्याने साहित्यकारांनी शासकीय आश्रयास जावे का? शासनाचे साहित्यिक धोरण साहित्यिकांना उपकृत करणारे ठरते आहे का? यावर विचार करण्यासाठी उपर्युक्त लेखाच्या अनुषंगाने मागविलेल्या मतांतून जो परिसंवाद घडवून आणला, त्यात प्रा. रा. भि. जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. अनंत काणेकर, प्रा. स. शि. भावे, प्रा. मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष, दि. के. बेडेकर, प्रा. वसंत बापट सहभागी झाले होते.

प्रा. रा. भि. जोशी यांच्या मूळ बीज लेखाच्या अनुषंगाने मत व्यक्त करीत तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे की, साहित्य निर्मिती ही व्यक्तिगत असते. व्यक्तिस्वातंत्र्य हे व्यक्तिमत्त्व परिपोषणाचे कारण होय, बंधन हे ऱ्हासाचे. साहित्य ही साक्षर समाजाची सांस्कृतिक गरज आहे. ज्या समाजात साहित्यकारास व्यापक लोकाश्रय लाभतो, त्याचे क्षेत्र विस्तृत होते. भारत सरकार साहित्यकारांची विचारपूस करते. काळजी घेते. ही प्रक्रिया नुकतीच सुरू झाली आहे, तोवर त्यावर आक्षेप घेणे धाडसाचे कार्य होय. केंद्र व राज्य सरकारे साहित्य

व साहित्यकार विकासाच्या विविध योजना आखत आहेत. यातून साहित्यिकास मिंधेपण येत असेल, तर तो व्यक्तिदोष होय. त्यास सरकारला जबाबदार धरता येणार नाही. प्रबुद्ध आत्मशक्ती बंधन जुमानत नाही. असे साहित्यकार सत्य सुरक्षित ठेवून लोकांमध्ये प्रतिष्ठित आहेत. अशा साहित्यापुढे लोक, राजे व राज्ये अखेरीस नमतात, हे विसरून चालणार नाही.

अनंत काणेकरांनी परिसंवादात मत व्यक्त करीत म्हटले आहे की, स्वातंत्र्य हा कोणत्याही साहित्याचा किंवा कलेचा आत्मा आहे. कोणत्याही सरकारी नियंत्रणाने वा उत्तेजनाने या स्वातंत्र्यास बाधा येऊ नये. एखाद्या साहित्यकाराने शासकीय योजनेचा लाभ घेण्यात गैर नाही; पण त्या अनुषंगाने प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष बंधन स्वीकारू नये. पुरस्कार, कर सवलत इ.पेक्षा अशा साहित्य, कला, नाटक यांच्या संवर्धनासाठी वातावरण निर्मिती व पूरक भूमिका घेणे सरकारचे खरे कार्य होय. स. शि. भावेंचे म्हणणे होते की लेखक, लेखन स्वातंत्र्य हा महत्त्वाचा विषय आहे. शासनाने त्यास 'उत्तेजन' द्यावे. हेतू चांगला असला तरी व्यवहारात प्रत्यक्षात काय घडते, ते पाहणे महत्त्वाचे ठरते. सरकार 'प्रजेच्या कल्याणासाठी' म्हणत केलेल्या गोष्टींतून स्वातंत्र्याचा संकोच होऊ नये. 'कल्याणकारी राज्य' व अंतिमत: 'अहिंसात्मक समाज' निर्मितीतून सुजाण नागरिक घडायला हवा. नागरिक सरकार घडवते, त्यामुळे नागरिक (लेखक) स्वतंत्र राहणे अधिक महत्त्वाचे. ते कार्य त्याचेच आहे. दि. के. बेडेकरांनी विशद केले आहे की, ब्रिटिश अमदानीत मराठीवर घातुक डोळा होता. आता देश स्वतंत्र आहे. साहित्य निर्मिती, तीस लोकाश्रय व उत्तेजन लाभणे योग्य. इतिहासाचार्य राजवाडे यांचे उदाहरण समोर आहे. प्रोत्साहन हवे; पण बंधन नको. त्यासाठीची यंत्रणा निर्दोष हवी. मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांनी मत व्यक्त करीत म्हटले आहे की, अलाहाबादच्या 'परिमल' संस्थेने आपल्या साहित्यिक मेळ्यात या परिसंवादासारखाच सूर आळवला होता. हुकूमशाहीत अभिव्यक्ती व व्यक्तिस्वातंत्र्याची जी गळचेपी होते. ती लोकशाहीत होता नये. वसंत बापट यांनी करातून साहित्य वृद्धीसाठी निधी उभारून सरकारने हे कार्य स्वायत्त रीतीने होऊ द्यावे, असे सुचविले आहे.

हिंदीतील प्रख्यात साहित्यिक व नाटककार विष्णू प्रभाकर यांनी आपल्या 'साहित्य क्या है?' शीर्षक ग्रंथात 'सत्ता के गलियारे में संस्कृति' शीर्षक लेख लिहिला आहे. त्याचे मराठी भाषांतर माझ्या 'साहित्य आणि संस्कृती' ग्रंथात आहे. त्यात त्यांनी स्पष्ट केले आहे की, "हे कलाकाराने ठरवायचे की, तो कुणाशी जुळवून राहून, वळचणीत राहून कला साधना करणार की, स्वतंत्र राहून मुक्त अभिव्यक्तीचा आनंद लुटत राहणार. दुःख सहन करण्याची क्षमता आत्मसात केल्याशिवाय मात्र सृजन अशक्य असते हे खरे! सत्तेची उपजत प्रवृत्ती खरेदी करण्याची, विकत घेण्याची असते. कलाकाराच्या निर्णयावर त्याचे विकाऊ होणे, न होणे अवलंबून असते."[२]

८) उद्याचा महाराष्ट्र

'मौज' साप्ताहिकाने सन १९६० च्या आपल्या दिवाळी अंकात एक परिसंवाद (चर्चा) योजला होता. विषय होता 'उद्याचा महाराष्ट्र'. भारत स्वतंत्र झाल्यानंतर तत्कालीन केंद्र सरकारने भारतातील त्या वेळच्या राज्यांच्या प्रशासनात सुसूत्रता यावी म्हणून पुनर्रचनेचे धोरण स्वीकारले. त्यानुसार भाषावार प्रांतरचनेस प्रारंभ झाला.

मराठी भाषेचे स्वतंत्र राज्य स्थापन करावे, अशी मागणी सन १९४६ पासून जोर पकडत गेली. १७ जून, १९४७ रोजी भाषावर प्रांतरचनेसाठी नेमलेल्या दार आयोगाने १० डिसेंबर, १९४८ रोजी आपला अहवाल प्रसिद्ध केला. त्यात मराठीसाठी स्वतंत्र राज्याची अपेक्षा फोल ठरली. नंतरच्या त्रिसदस्य समितीनेही स्वतंत्र मराठी राज्य मान्य केले नाही. सन १९५३ च्या न्यायमूर्ती फाजल अली समितीने मराठी-गुजराती द्वैभाषिक राज्याची शिफारस केली. त्यानुसार बी. जी. खेर, मोरारजी देसाई द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले; पण दरम्यानच्या काळात 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन होऊन स्वतंत्र मराठी राज्य मागणीचा जोर वाढला. त्यात एका चळवळीत १०६ आंदोलक हुतात्मे झाले. त्यात मोरारजी देसाई यांना द्वैभाषिक मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला व सन १९५६ साली यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. त्यांनी अहिंसेचा पुकारा करीत राज्य चालविण्याची हमी काँग्रेसच्या वतीने मराठी भाषिकांना दिली, तरी रोष थंडावला नाही. ३० नोव्हेंबर, १९५७ रोजी भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या आश्वारूढ पुतळा अनावरण समारंभास आले, तेव्हा संयुक्त महाराष्ट्र समितीने उग्र निदर्शने करून लोकभावना प्रभावीपणे व्यक्त केली. हा रोष लक्षात घेऊन १ मे, १९६० रोजी स्वतंत्र मराठी राज्य स्थापन झाले.

या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर सदर परिसंवादाकडे पाहिले पाहिजे. सन १९५६ नंतर सतत वाढत गेलेल्या विरोधी जनमताचा पुरावा काँग्रेसला सन १९५७च्या सार्वत्रिक निवडणुकीत मिळाला. या निवडणुकीत काँग्रेसला लोकसभेच्या ४४ पैकी २१, तर विधानसभेत २६४ पैकी १३५ ठिकाणीच विजय मिळविता आला. हा निकाल महाराष्ट्रीय जनतेचा स्वतंत्र मराठी भाषिक राज्य निर्मितीचा कौल मानला गेला नि स्वतंत्र राज्य निर्मितीचा विचार जोर धरत गेला. या परिसंवादाची ही पार्श्वभूमी होय.

या परिसंवादार्थ 'मौज' साप्ताहिकाच्या संपादकांनी ज्या नामवंत व्यक्तींना आपले विचार व्यक्त करण्यासाठी आमंत्रित केले होते, त्यांच्या विचारार्थ परिसंवादाची 'भूमिका' विशद करणारे एक निवेदन पाठविले होते. ते या खंडात प्रसिद्ध केले आहे. परिसंवादात सर्वश्री साथी श्री. म. तथा एस. एम. जोशी, कॉम्रेड श्री. अ. तथा एस. ए. डांगे, स्वामी रामानंद तीर्थ, साथी ना. ग. गोरे, दलित नेते बा. चं. तथा बी. सी. कांबळे, ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीचे नेते शं. शा. तथा शंकरराव मोरे, गांधीवादी विचारवंत पु. ह. पटवर्धन, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

जोशी, प्रा. दत्तो वामन पोतदार, पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू र. पु. परांजपे यांचे विचार आमंत्रित करण्यात आले होते. त्यापैकी इथे विस्तार भयापोटी केवळ तर्कतीर्थांचेच विचार उद्धृत आहेत. शेवटी संपादक समारोप आहे. चर्चेचा सार कळावा म्हणून तोही येथे देण्यात आला आहे.

परिसंवादात तर्कतीर्थांचे मत होते की, केंद्र सरकारने स्वतंत्र महाराष्ट्र निर्मितीस हिरवा कंदील दाखविण्यामागे त्यांना इथे कम्युनिझमचा धोका वाटतो. द्वैभाषिक राज्य विसर्जनाचा केंद्र सरकारचा विचार हा निश्चितच जागृत जनशक्तीच्या प्रभावी मागणीचा विजय होय. ते लोकचळवळ व लोकशाही सरकारचे संयुक्त फळ होय. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सर्वच गोष्टी विवेकाच्या झाल्या नाहीत. या चळवळीने जातिवादाचे प्रस्थ तात्पुरते का असेना कमी झाले. संकल्पित महाराष्ट्रात भाषिक अल्पसंख्याकांच्या हितरक्षण झाले पाहिजे. नव्या राज्यात वैरभावास थारा देता कामा नये. राज्याचे ऐक्य साधण्यासाठी विदर्भ विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. एकसंध मराठी समाज निर्मितीकडे लक्ष पुरविले पाहिजे. मराठी राज्याचे आर्थिक धोरण व विकासाचा विचार देशाच्या संदर्भात करायला हवा. हे राज्य पुरोगामी होण्यासाठी जमीन मालकीप्रश्नी प्रागतिक दृष्टिकोन (मूळ कायदा) हवा. पंचवार्षिक योजनांमध्ये नियोजन आणि अंमलबजावणी दोन्ही स्तरांवर काटेकोरपणा असणे आवश्यक. मुंबईच्या आर्थिक नेतृत्वाकडे लक्ष दिले पाहिजे. सर्व भाषिक, प्रांतिकांना हा प्रांत आपला आहे असे वाटले पाहिजे. तसे आपले धोरण हवे. संयुक्त महाराष्ट्र समिती विसर्जनाचा निर्णय केरळचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून करावा. लोकशाहीचे राजकीय शिक्षण रुजले पाहिजे.

तर्कतीर्थ काँग्रेस समर्थक असले, तरी उद्याच्या महाराष्ट्राबाबतचा त्यांचा दृष्टिकोन पक्षीयतेपेक्षा राज्यहिताचा विचार करणार असल्याने अनुकरणीय ठरतो.

९) भारताचे ऐक्य धोक्यात आहे का?

'किर्लोस्कर', 'स्त्री', 'मनोहर'सारखी मासिके सन १९६० च्या दरम्यान महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे अभिन्न अंग होती. या नियतकालिकांनी महाराष्ट्राच्या नवशिक्षित स्त्रिया, तरुण, प्रौढ एकंदरीतच महाराष्ट्र समाजाची सांस्कृतिक जडणघडण केली. पैकी 'किर्लोस्कर' मासिक स्थापन झाल्यानंतर ५०० महिने पूर्ण होत असताना (सुमारे चार दशकानंतर) आपला ५०० वा अंक ऑगस्ट, १९६१ मध्ये प्रसिद्ध केला. त्यात एक परिसंवाद होता. त्याचा विषय होता 'भारताचे ऐक्य धोक्यात आहे का?' असा प्रश्न संपादक महोदयांनी उपस्थित करण्यामागची परिस्थिती अर्थातच तत्कालीन होती. तेव्हाचा भारत देश पंथ, धर्म, भाषा, जाती इ. भेदांनी ग्रासलेला होता. भारताचे ऐक्य धोक्यात आल्यासारखी परिस्थिती होती. संपादक महोदयांनी या स्थितीवर विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, प्रा. दि. के. बेडेकर, पत्रकार नि संपादक अनंत गोपाळ शेवडे यांच्या मतसंग्रहाने हा परिसंवाद यशस्वी केला. तो विचारांना चालना देणारा ठरला. कारणमीमांसा करीत

या विचारकांनी स्पष्ट केले होते की, भारताने लोकशाहीची पुरेशी मशागत केलेली नाही. राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्याच्या प्रयत्नांची स्वतंत्र्योत्तर काळात वानवा दिसते. शिक्षणाची आखणी तशी केली नाही म्हणून फुटीर वृत्ती बळावली.

तर्कतीर्थांनी आपले मत 'प्रक्षोभक वेदनांच्या युगांत' शीर्षकांतर्गत व्यक्त करीत म्हटले होते की, स्वातंत्र्यपूर्व काळात आपणापुढील आव्हान पारतंत्र्याचे होते. आता राष्ट्रबांधणीचे आव्हान आपणासमोर आहे. सद्यःस्थिती ही विलक्षण गुंतागुंतीची आहे. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक असे विविध धोके आहेत. इथे भाषाभिन्नता आहे नि प्रत्येक भाषेस आपला अभिमान आहे. राष्ट्रभाषेचा एकात्म विचार इथे रुजला नाही. उत्तर विरुद्ध दक्षिण अशी भाषिक स्थिती आहे. धार्मिक वैविध्यात अहंकार आहे. सामंजस्य व सहिष्णुतेचा अभाव आहे. जातगत भेदांनी विषमता ठेवली आहे, असे असले तरी भारतीय संघराज्य एक व अभिन्न आहे. इथल्या इतिहास नि भूगोल यांच्यामुळे देशात हितसंबंधांची एकी (Organic Relationship) आहे; पण आता विध्वसंक शक्ती डोके वर काढत आहेत. भारताचे ऐक्य पंचप्राणाप्रमाणे अबाधित राहायला हवे. आज राष्ट्रीय मन गोंधळलेले (Ambivalent) दिसते. आर्थिक नियोजनात असमतोल वाढत आहे. जागतिक युद्धाचे ढग जमलेले आहेत; पण आपले शिक्षण व संस्कार, संस्कृती एक आहे. ती धर्मातीत (Secular) आहे. तिच्यापुढे भाषा, पंथ, जात, धर्म, भेद गळून पडतील व भारत विपरीत स्थितीतही एकसंध राहील, असा आशावाद तर्कतीर्थांनी व्यक्त केला आहे.

१०) महाराष्ट्राची नीतिमत्ता

सन १९५८ चा काळ महाराष्ट्र जनमानसावर 'शब्दरंजन' शब्दकोड्यांचा होता. जयंत साळगावकरांनी प्रसिद्ध साहित्यिकांच्या साहित्यिक अवतरणांचा उपयोग करीत शब्दरंजन शब्दकोड्याची स्पर्धा महाराष्ट्रात यशस्वी करून दाखविली व त्यातून त्यांना धनलाभही झाला. निर्माण व संघटित झालेल्या मराठी वाचकांसाठी नंतरच्या काळात 'शब्दरंजन' दिवाळी अंक सुरू केला. त्याचे संपादक होते मराठी वाल्मिकी, गीत रामायणकार, कवी ग. दि. माडगूळकर. सन १९६२ च्या दिवाळी अंकासाठी गदिमांनी 'महाराष्ट्राची नीतिमत्ता' या विषयावर परिसंवाद योजला. त्यासाठी त्यांनी समाजशास्त्रज्ञ डॉ. गोविंद सखाराम घुर्ये, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, इतिहास संशोधक प्रा. त्र्यंबक शंकर शेजवलकर, रॉयवादी विचारक प्रा. गोवर्धन पारीख, महामहोपाध्याय सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, 'किर्लोस्कर'चे संपादक शंतनुराव किर्लोस्कर, समाजशास्त्री डॉ. सुमंत मुरंजन, 'मौज'चे संपादक विष्णू पुरुषोत्तम भागवत यांना लिहिण्यास भाग पाडून महाराष्ट्र समाजापुढे नीतिमत्ता विषयावर विचारमंथन घडवून आणले.

या परिसंवादात तर्कतीर्थांनी 'राजकीय क्षेत्रातील नीतिमत्ता' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. ते लिहितात की, राज्य व्यवहाराची प्रेरकशक्ती राजनीती असते. 'राज्य' नि

'राज्य'मध्ये फरक आहे. राजाचे राज्य नि प्रजेचे राज्य असा तो फरक होय. राजनीतीला नीतिमत्तेचे बंधन असावे की नसावे, हा वादाचा प्रश्न असून तो पूर्वापार आहे; पण माझे मत राजकारणात नीतिमत्ता असावी असे आहे. राजकारणाचा संबंध मानवी जीवनाशी असतो. नीतिमत्तेशिवाय मानवी जीवनाच्या मूल्य अधिष्ठानास अर्थ राहात नाही. जर राजकारण लोककल्याणकारी असेल तर ते नीतीआधारितच राहायला हवे. महाराष्ट्राची राजकीय स्थिती व्यासवर्णित अहिंसा, सत्य, अस्तेय, अक्रौर्य इ. तत्त्वांवर उभारली गेली पाहिजे. कौटिल्य, व्यास आणि महात्मा गांधी असा विचार करता 'साधनशुचिता' वर्तमान महाराष्ट्राच्या राजनीतीची आधारशीला बनली पाहिजे. महात्मा गांधींचे शिष्य सध्या राजकारण चालवत असल्याने ते आवश्यक तर आहेच शिवाय अनिवार्यही आहे; पण वर्तमानातले राजकारणातील उणेपण मी जाणून आहे. राजनीतीने लोकांचा विश्वास व प्रेम संपादन केले पाहिजे. महाराष्ट्राची राजनीती या निकषावर निर्धोक उतरेल, असे माझे मत आहे.

११) अश्लील लेखन : मतप्रदर्शन

सन १९६६-६७ दरम्यान चिं. त्र्यं. खानोलकर यांचे 'अजगर' आणि उद्धव शेळके यांचे 'बाईविना बुवा' ही पुस्तके प्रसिद्ध झाली होती. या दोन पुस्तकांवर अश्लीलतेचा आरोप वाचक व समीक्षकांकडून करण्यात आला होता. या अनुषंगाने उठलेल्या वैचारिक वादळावर विचार करून निर्णय घेण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेने एक त्रिसदस्यीय समिती नेमलेली होती. त्या समितीत सर्वश्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. पु. ह. ऊर्फ रावसाहेब पटवर्धन आणि प्राचार्य त्र्यं. कृ. टोपे यांचा अंतर्भाव होता. सदर समिती सदस्यांनी उपरोक्त पुस्तके वाचून अश्लीलतेसंबंधी आपले मत महाराष्ट्र साहित्य परिषदेस सादर केले होते. त्यातील तर्कतीर्थांचे मत या लेखसंग्रहात समाविष्ट करण्यात आलेले आहे. ते 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका'च्या एप्रिल-मे, १९६७च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. यानुसार तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे की, सदर पुस्तकांमध्ये कामुकता उत्तेजित करण्याचा उद्देश कोठेही आढळत नाही. रूढ शिष्टमर्यादेचा भंग कलेच्या उद्देशाने करणाऱ्या कलाकारांवर बंधन घालू नये. कारण, शिष्टमर्यादांच्या रूढ कल्पना या कालानुसार बदलत असतात. या लेखकांनी परंपरागत बंधने ओलांडली असली, तरी त्याचा अर्थ अनैतिक होतो असे मला वाटत नाही. कारण, चित्रित गलिच्छ जीवन काल्पनिक नाही. त्यामुळे त्यांना अश्लील ठरविता येत नाही, असा सार तर्कतीर्थांच्या मतप्रदर्शनाचा लक्षात येतो.

१२) आजचा विद्यार्थी

वाई, जि. सातारा येथे दुर्गम नि छोट्या गावात उच्चशिक्षणाची सोय करून देण्याच्या उद्देशाने प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या पुढाकाराने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९६३

मध्ये कला व वाणिज्य महाविद्यालय सुरू केले. त्या महाविद्यालयातर्फे 'कृष्णाई' नावाचे वार्षिक नियतकालिक प्रकाशित केले जात असे. ते शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अनेक वर्षे पुरस्कारप्राप्त ठरले होते. त्या नियतकालिकाच्या सन १९६९च्या अंकात 'आजचा विद्यार्थी' या विषयावर परिसंवाद प्रसिद्ध झाला होता. त्या परिसंवादात पालक, प्राध्यापक, विद्यार्थी यांची मते प्रसिद्ध करण्यात आली होती. तर्कतीर्थांनी पालक म्हणून या परिसंवादात आपले मत व्यक्त केले होते.

त्यांच्या मतानुसार आजकालचा पालकवर्ग हा विद्यार्थी वर्तनाबद्दल उदासीन आहे. हा उदासीनपणा पालकांवर परिस्थितीने लादलेला आहे. पालक जीवनसंघर्षात व्यग्र असतात. त्यांना पाल्याकडे लक्ष देण्याची उसंत, इच्छा असूनही लाभत नाही. विद्यार्थिवर्गात पूर्वीपेक्षा अधिक बेशिस्तपणा आलेला आहे, असे १० ते २० टक्के विद्यार्थी असतात; पण ते उर्वरित ८० टक्के विद्यार्थ्यांना प्रभावित करतात. आजचा विद्यार्थी उच्छृंखल बनत आहे. त्याचे कारण पालकांचा कमी होत चाललेला धाक आहे, तसेच विद्यार्थ्यांचा ध्येयवादही कमी होत आहे. गेल्या नि चालू पीढीत, शहरी नि ग्रामीण विद्यार्थ्यांत फरक आहे. जुन्या रूढी, चालीरिती, आचारविचार झपाट्याने बदलत आहेत. भारतीय समाजावर पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव वाढत आहे. करमणूक व उपयोगाच्या साधनांचा विस्तार होत आहे. वेशभूषांसह सर्वभूषा (जीवनशैली) बदलत आहे. बदलत्या परिस्थितीवर मात करण्याची शक्ती तरुणवर्गात राहिलेली नाही. ती परिस्थितिशरण होत आहे. असे असले तरी शिक्षण घेऊन बदलणारे गुणसंपन्न विद्यार्थी निष्ठा आणि कळकळीच्या जोरावर परिस्थितीवर मात करतील.

तर्कतीर्थ परिसंवादामध्ये नेहमीच त्या त्या विषयांची वस्तुनिष्ठ मांडणी व चिकित्सा करतात. परिस्थितीचे सम्यक मूल्यांकन व विश्लेषण त्यांच्या आशय विस्ताराचा अविभाज्य भाग असतो. परंतु, समारोप हा सकारात्मक व आशादायी करण्याकडे त्यांचा कल असतो.

१३) धर्मदास्य, लोकशाही विवेक आणि दलितमुक्ती

मराठी साहित्याचा विसाव्या शतकातील साठोत्तर काल हा दलित साहित्य प्रवाहाचा प्रभावकाळ म्हणून ओळखला जातो. कारण, या काळात मोठ्या संख्येने दलित आत्मकथा प्रकाशित होऊन या आत्मकथांनी मराठी साहित्यात दलित साहित्य केंद्रीभूत केले. 'अस्मितादर्श' मासिकाने या पार्श्वभूमीवर सन १९७२ च्या दिवाळी अंकात 'धर्मदास्य, लोकशाहीविवेक आणि दलितमुक्ती' विषयावर परिसंवाद योजून चर्चा घडवून आणली होती. या परिसंवादात सर्वश्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. दि. के. बेडेकर, प्राचार्य म. भि. चिटणीस, प्रा. श्री. के. क्षीरसागर, श्री. ग. वि. केतकर, प्राचार्य दिनकर संदानशिव, प्रा. या. वा. वडस्कर यांनी भाग घेऊन आपला या विषयाच्या संदर्भातील दृष्टिकोन स्पष्ट केला होता.

प्रस्तुत विषयासंदर्भात आपले मत मांडत तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुसलमान, यहुदी इत्यादी धर्मांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे सामाजिक विषमता आणि दास्य यांची तळी उचलली आहे. या धर्मांनी मानवी समतेचा पुरस्कार केला, तरी हिंदू धर्माने सामाजिक विषम रचना, उच्च-नीच भाव, आणि दलित वर्गाचे दास्य स्थिर करायचा प्रयत्न केला आहे. ख्रिश्चन व इस्लाम धर्मांनी धर्मप्रसारार्थ इतर राष्ट्रांवर आक्रमण केले आहे. तलवारीच्या बळावर धर्मप्रसार व धर्मांतरे घडवून आणली आहेत. वरील सर्व धर्मांनी समान मानवी हक्कांचा पुरस्कार केलेला नाही. स्वधर्माचे समर्थन व अन्य धर्मीयांवर अन्याय हे सूत्र अनेक धर्मांत दिसले. धर्मातील पाप-पुण्याची कल्पना व विषमता यांत सख्य आढळते. शिवाय धर्मप्रमाणतेमुळे सर्व धर्म पारंपरिक राहात आले आहेत. धर्मात उच्च नीतितत्त्वे असतात; पण आचरण विपरीत होते. या विसंगतीतून विषमता, दास्यता जन्मते. धर्मातील पारलौकिक तत्त्व हे लोकशाहीविरोधी आहे. धर्मग्रंथ प्रामाण्यता, परलोक भय, पाप-पुण्य भीती हे दास्यतेचे आधार होत. धर्मसंस्था व धर्मग्रंथ विचारस्वातंत्र्याचे शत्रू असतात. हिंदू धर्मात विषमता व व्यवसाय यांत सख्य आढळते. चातुर्वर्ण्य, जातिभेद त्याचे पुरावे होत. ते जोवर अस्तित्वात असतील, तोवर लोकशाही विवेकावर आधारलेले समाजजीवन अशक्य आहे. भारतीय लोकशाहीचे भवितव्य या सामाजिक स्थितीवर अवलंबून आहे. धर्मश्रद्धा मुक्तीतूनच लोकशाही विवेक व दलितदास्यमुक्ती शक्य आहे. तर्कतीर्थांनी धर्मातून निष्पन्न सामाजिक दास्यतेसाठी लोकशाही विवेकाधारित समाजनिर्मिती आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे.

प्रा. दि. के. बेडेकरांचे म्हणणे असे की, विषमता, पिळवणूक यांवर आधारित समाजरचना इथली हजारो वर्षांची परंपरा आहे. जातिव्यवस्था मोडल्याशिवाय दलित दास्यमुक्ती अशक्य. ती मिळाली, स्वातंत्र्य लाभले तरी दलित समाजाने अन्य समाजांशी सौहार्द निर्माण करायला हवे. आज लोकशाहीविवेक अशक्य आहे. दलितमुक्तीचे अंतिम लक्ष्य निश्चित हवे. मतभेदात ते विसकटता कामा नये. प्राचार्य म. भि. चिटणीस यांनी आपले मत एका पद्यबंधाद्वारे व्यक्त करून नवा इतिहासच रचला आहे. ते म्हणतात की, आपल्या घरी-दारी सनातन अडगळ भरून राहिल्याने नव्या वस्तूंना (विचारांना) जागाच उरली नाही. घरोघरी जुन्या-पुराण्या चिजा, रद्दी, मोडतोडीच्या वस्तू विकत घेणारा सौदागर येतो. त्याला जुने देऊन आपण नवे घेतो. तो व्यवहार जरी आपण पाळला असता, तर आपला समाज आधुनिक बनला असता. आपण वेदांतही नीट स्वीकारला नाही. यज्ञसंस्कृतीचे आगमन झाले नि हिंदू धर्मात बळी, कर्मकांड, हिंसा आली. मांसाहार, सोमरस इ.चे सेवनही देवांच्या नावे करून पुरोहितांनी पुरातन पवित्र धर्म भ्रष्ट केला. त्याचीच परिणती पुढे चातुर्वर्ण्य, जातिभेद, विषमता, अन्याय, शोषणाची परंपरा श्रेष्ठ-कनिष्ठ भावनेच्या आधारे समाजात रुजविण्यात आली. अशी अनेक उदाहरणे या पद्यबंधात कवीने देऊन बदलाची अपेक्षा व्यक्त केली आहे नि प्रबोधनाचे

(तेहेतीस)

वैयर्थ स्पष्ट केले आहे. ही पद्यात्मक प्रतिक्रिया जितकी अभिनव तितकीच प्रभावी. प्रा. श्री. के. क्षीरसागरांच्या मते, या चर्चा गेल्या अनेक दिवसांच्या दलितांवरील अत्याचारकारक घटनांची पार्श्वभूमी आहे. पूर्वी ब्राह्मण अत्याचार करीत. आज बहुजन अत्याचार करीत आहेत. समाजसुधारणा कायद्याने होत नाही. वर्तमान अत्याचार गांधीवादापुढचे आव्हान आहे. हिंदुत्ववाद्यांनीच यासाठी खेड्यात बदल घडवून आणले पाहिजेत. श्री. ग. वि. केतकरांच्या विचारानुसार, अत्याचाराचा निषेध पुरेसा नाही. ती तात्कालिक प्रतिक्रिया म्हणून ठीक आहे. दलितोद्धाराचा उपाय समाजात 'नांदा व नांदू द्या' वृत्ती रुजविणे हाच आहे. त्यासाठी खेडे केंद्र करून विधायक परिवर्तनाचे कार्य करणे आवश्यक आहे. बहिष्कार नष्ट करण्याचा तोच उपाय आहे. प्रा. या. वा. वडस्कर यांच्या म्हणण्यानुसार, दलितांचे शोषण दुहेरी नसून अनेकांगी आहे. प्रतिष्ठित अनेक युक्त्या योजून पूर्वस्थिती ठेवू पाहात आहे. दलित सर्वांगीण शोषित व महत्तम शोषित असल्याने दलितमुक्तीचा लढासुद्धा सर्वांगीण व अत्यंत प्रखर हवा. वर्तमान सत्ता लोकांची नसून शोषकांची आहे. सत्ताधारी लोकशाही राज्यपद्धती अंगीकारतात; पण ती त्यांची जीवनशैली बनते का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. वर्तमान दलित अत्याचाराचे केंद्र ग्रामीण भारत आहे. तिथे एकात्मता हवी. यासाठी अनेक आघाड्यांवर कार्य करणे गरजेचे आहे. दलितेतरांमधील अंतर्विरोध व विसंगती नष्ट होणे आवश्यक आहे. हे आव्हान पेलणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेतृत्व आज दिसत नाही. प्रामाणिक प्रयत्नांची शिकस्तच त्यावरचा उपाय आहे. प्राचार्य दिनकरराव संदानशीव यांच्या मतानुसार, 'एक शक्ती एक मूल्य' हे समतादर्शक तत्त्व होय. अनेक सुधारणांमुळे धर्मदास्याच्या शृंखला निखळू लागल्या आहेत. दलितमुक्तीसाठी लोकशाही जीवनमार्गच योग्य. सार्वजनिक नीतिमत्ता जास्त महत्त्वाची झाली आहे. लोकशाही विवेकच रामबाण उपाय आहे. समता त्यामुळेच शक्य आहे.

वरील विविध मते म्हणजे, ज्याचा त्याचा दृष्टिकोन हे जरी खरे असले, तरी लोकशाही विवेकानेच धर्मदास्यमुक्ती व दलित अत्याचारमुक्ती शक्य आहे. खेडे केंद्र करून भविष्यकाळात समतामूल्य जीवनशैलीचा अंगभूत भाग बनेल, तरच हे स्वप्न सत्य होईल. ही कायद्याने अमलात येण्याची गोष्ट नाही.

१४) प्राचीन भारतीयांचा कामविषयक दृष्टिकोन

प्रस्तुत परिसंवादाच्या प्रास्ताविकेत 'मोहर' मासिकाचे संपादक मधुसुदन वैराळे यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, साहित्यात काम आणि कामक्रीडा कोणत्या मर्यादेत असाव्यात, याबद्दल पूर्वापार मतभिन्नता आढळून येते. या विषयाची पूर्व आणि उत्तर मीमांसा ही पाश्चात्त्य नीतिशास्त्रावर आधारित असते. यावर भारतीय दृष्टिकोनातून ऊहापोह कराण्याच्या उद्देशाने हा परिसंवाद योजण्यात आला होता. त्यात सर्वश्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. गो. के. भट, अ. ज. करंदीकर आणि बाळाचार्य खुपेरकर यांनी भाग घेतला होता. त्यांच्या

विवेचनातून स्पष्ट होणारी महत्त्वाची गोष्ट अशी लक्षात येते की, 'काम' आणि 'पाप' यांची सांगड ख्रिश्चन नीतिशास्त्रांनी ज्याप्रमाणे घातली होती, प्राचीन भारतीयांनी ती कधी मांडली नव्हती. भारतीय पूर्वसुरींनी 'काम' वर्णन नैसर्गिक म्हणून स्वीकारले होते. ते संयमित व सूचक होते. कालिदासांची नाटके त्याचे प्रमाण होय.

प्राचीन भारतीयांच्या कामविषयक दृष्टिकोनावर प्रकाश टाकत तर्कतीर्थ या परिसंवादात म्हणतात की, इसवी सन पूर्व पाचव्या, सहाव्या शतकात धर्म, अर्थ, काम ही तीनच माणसाची उद्दिष्टे स्वीकृत होती. मोक्षाचा अंतर्भाव नंतर करण्यात आला. ही जीवन उद्दिष्टे स्पष्ट करण्यासाठी प्राचीन भारतीयांनी धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, कामशास्त्र व मोक्षशास्त्र विकसित केले. प्राचीन वाङ्मयात वर्णित विविध चरित्रे ही उपर्युक्त पुरुषार्थांचे आदर्श म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यातील काही योगी, भोगी तर काही संयमी आहेत. एकपत्नीत्व, बहुपत्नीत्व प्राचीन कथांत आढळते; पण आदर्श एकपत्नीत्व स्वीकृत आहे. राम, कृष्ण, धर्म, अर्जुन, युधिष्ठिर इ. चरित्रे विविध पुरुषार्थ द्योतक म्हणून समोर येत असली, तरी विष्णु-लक्ष्मी, ब्रह्मा-सरस्वती, शिव-पार्वती, राम-सीता इ. युग्मे आदर्श म्हणून पुढे येतात. आयुर्वेदात ब्रह्मचर्याचाही विचार आहे. गृहस्थ, संन्यस्त, वैराग्य, मोक्ष कल्पनांचा आणि 'काम' भावनेचा, तिच्या स्वरूपांचा विस्तृत विचार आहे. समतोल पुरुषार्थ साधना ही प्राचीन भारतीयांची शिकवण 'काम' संयत रूपात स्वीकारते. परस्त्रीगमन निषेध, संभोगस्वातंत्र्य इत्यादींचा ऊहापोह प्राचीन भारतीय वाङ्मयात असला, तरी अंतिमत: 'काम' तत्त्व अध:पतित नसावे, याची मांडणी पायाभूत आहे. तर्कतीर्थ या सर्वांची विवेचना आपल्या निवेदनात करतात.

या परिसंवादात सहभागी डॉ. गोविंद केशव भट यांनी वाङ्मयीन कृतींच्या आधारे प्राचीन भारतीयांच्या कामविषयक दृष्टिकोनाचा मागोवा घेतला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, ऋग्वेदात देव-देवतांचे वर्णन आहे. त्यात कामचित्रण आहे. प्राचीन वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या डॉ. फिलिप यांनीपण आपल्या संशोधनातून यास दुजोरा दिला आहे. यम-यमी संवादात प्रणयाराधन आहे. यज्ञविधी वर्णन करणाऱ्या ब्राह्मण ग्रंथात सामवर्णन सहजपणे येते. तात्त्विक चर्चेतही कामवर्णन बृहदारण्यक उपनिषदात दिसून येते. गो. के. भट्ट यांनी अशा अनेक उदाहरणांमधून प्राचीन भारतीयांच्या कामविषयक वर्णनाची प्रमाणे प्रस्तुत केली आहेत. बाळाचार्य खुपेरकर यांच्या मतानुसार, अनर्थकारक विषयवासनेकडे मानवाची स्वाभाविक मनोवृत्ती ही धाव घेत राहिल्याने त्याचा तोल रहात नाही. तो सतत पतन पावायाच्या बेतात येतो. अशा पतन पावणाऱ्या मानवास त्या पतनातून सावरून धरणारा जो धर्म होय, तो श्रेष्ठ. वात्स्यायनाच्या कामसूत्रात या सर्वांचा ऊहापोह आहे. कामसूत्राचा मूळ उद्देश कामोत्तेजन नसून, ब्रह्मचर्यव्रत धारण करून लोकयात्रा सुरक्षित ठेवणे आहे. अ. ज. करंदीकर यांच्या धारणेनुसार, प्राचीन वाङ्मय वर्णनात सुमेरू देवमंदिरातील साल्मे व शर्मशीतुसारख्या दासींची आख्याने, कथा, उल्लेख आहेत. या देवदासी होत.

त्यांचे कामसंबंध असत; पण त्यांना संतती अधिकार नसे. परंतु, शर्मशीतु दासी पतिअधीन असत. ते देव असायचे. त्यांना संतती अधिकार लाभत असे. काही देवदासी या निष्काम वैवाहिक जीवन जगत, श्रीकृष्णाला सुचलेला निष्काम कार्मयोग त्यातून सुचला असावा. आर्य संस्कृती वर्णनात 'आर्यावर्तः पुण्यभूमि:'चा उल्लेख आहे. तिथे पापाचरणास पायबंद होता. पापाचारासाठी म्हणजे कामसंबंधासाठी देशांतर करावे लागे. सुभद्रेने अभिमन्यूविषयी विलाप करताना म्हटले आहे की, 'स्वपत्नीवर संतुष्ट राहणाऱ्या व इतर स्त्रियांना माता, भगिनी मानणाऱ्या पुरुषांना सद्गती लाभते, ती तुला लाभो' यातही कामाचे पावित्र्य स्पष्ट झाले आहे.

प्रस्तुत परिसंवाद प्राचीन वाङ्मयाच्या आधारे तत्कालीन भारतीय समाजजीवनातील कामाचारावर प्रकाश टाकतो. हे वर्णन देव-देवतांचे असले तरी मूलतः मानवी संबंधांचेच प्रतिबिंब होय. त्यात कामाचाराच्या नैतिक-अनैतिक, संगत-स्वैर संबंधांचे उल्लेख आहेत, तसेच एकनिष्ठ संबंधांचेही वर्णन आहे. कामसंबंधांचे यथार्थ चित्र त्यात आहे नि आदर्शाचे सूचनही यात आढळते. पूर्व नि पश्चिम संस्कृतीतील कामसंबंधविषयक दृष्टिकोन फरक इथे तुलनेने लक्षात येण्यासारखा असा आहे, तसा तो घेण्यासारखाही आहे. कामसंबंधांचे यथार्थ चित्र त्यात आहे नि आदर्शाचे सूचनही त्यात आढळते. पूर्व नि पश्चिम संस्कृतीतील कामसंबंधविषयक दृष्टिकोन फरक इथे तुलनेने लक्षात येण्यासारखा असा आहे, तसा तो घेण्यासारखाही आहे. संगत वैध, एकनिष्ठ काम हा भारतीय संस्कृतीचा स्थायीभाव आहे.

१५) अस्पृश्यतेचे सामाजिक तपमान

स्वातंत्र्याचा लाभ होऊन पाव शतक उलटले. आपण स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव साजरा करीत आहोत. (१९७२) तरी समाजातून अस्पृश्यतेचा पुरातन ज्वर हटलेला नाही, ही चिंतेची बाब आहे. यावर विचार करण्यासाठी 'धरती' मासिकाने योजलेल्या या परिसंवादात सर्वश्री शांताबाई दाणी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, दि. के. बेडेकर, बाबा आढाव, केशव मेश्राम, शंकरराव खरात यांनी भाग घेतला होता. यांपैकी सर्वांनी सामाजिक, राजकीय, साहित्यिक, शैक्षणिक क्षेत्रात कार्य करीत अस्पृश्यता निर्मूलनाचे समर्थन केले आहे. अस्पृश्यता निवारण कायदा, प्रचार, उन्नती, आर्थिक विकास अशा सर्वांगांनी प्रयत्न होऊनही अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन होत नाही, याचा शोध घेणे भविष्यकालीन वाटचालीसाठी आवश्यक आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या परिसंवादात आपले मत मांडत स्पष्ट केले आहे की, हिंदू समाजमनात जोवर अस्पृश्यतेची भावना वस्ती करून आहे, तोवर अस्पृश्यता निर्मूलन अशक्यप्राय गोष्ट आहे. उच्चनीच भेदाभेद भारतीयांत वेद, इतिहास काळापासून वसलेला आहे. त्यामागे कर्मविषयक सिद्धांत आहे. त्यानुसार वर्तमान जन्म मागील जन्मावर ठरतो, तो पाप-पुण्यावर ठरतो, पापाधारित शूद्रता चांडाळादी जातीत जन्मते, महापातकामुळे अस्पृश्य जातीत जन्म होतो, हे विचार अस्पृश्यतेचे मूळ आहेत. त्या विचार, परंपरेतून मुक्तीचे आव्हान

आपणांसमोर आहे. विवाहसंबंधी कायदे पूर्वी नव्हते. संविधान आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना मान्यता देणारे असल्याने यातून अस्पृश्यभाव भविष्यात जाऊ शकतो. 'विटाळ-चांडाळ'सारखे शब्दभाव समाजमनात भय निर्माण करतात. महात्मा फुले यांच्यापासून ते महात्मा गांधींपर्यंत अनेकांनी प्रयत्न करूनही भारतातील पाच लाख खेड्यांपैकी एक खेडेही आपण स्पृश्य-अस्पृश्य एका वस्तीत असलेले दाखवू शकत नाही. सरकारी यंत्रणा सुस्त आहे. उच्चशिक्षित अधिकारी निष्क्रिय आहेत. ते यांत्रिक, निर्जीव पद्धतीने प्रशासनाचा गाडा हाकतात. स्पृश्य वर्गात संवेदी नेतृत्वाचा अभाव आहे. यासाठी दलितवर्गातही जागृती व संघटन मजबूत हवे. तर्कतीर्थांनी केवळ विचारांतून नाही तर आपल्या कृतीतून हे विचार सार्थ केलेले त्यांच्या चरित्रातून दिसून येते. दलित विद्यार्थ्यांस संस्कृत शिकवणे, महात्मा गांधींचे अस्पृश्यता निर्मूलन सल्लागार, आंतरजातीय विवाहाचे पौरोहित्य, सोमनाथ मंदिर हरिजनांना खुले होणार म्हणून प्राणप्रतिष्ठा महोत्सवाच्या नेतृत्वातून या विषयाच्या काया, वाचा, मने अद्वैत स्पष्ट होते.

समाजसेविका शांताबाई दाणी यांच्या मतानुसार, अस्पृश्यतेचे सामाजिक तपमान एवढे तीव्र झाले आहे की, ते मोजायला नीतीचे, कायद्याचे माणुसकीचे तपमापकच उरलेले नाही. अस्पृश्यतेचा पारा इतका उंचावला आहे की, पारा चढून तपमापक यंत्र फुटेल की काय, अशी साधार भीती वाटते. आपल्या या लेखात वर्तमानातील अनेक उदाहरणे देऊन हे स्पष्ट केले आहे. शिवाय 'साधना' विशेषांकाचे उदाहरण देऊन या प्रश्नीची पत्रकारितेची भूमिका अधोरेखित केली आहे. यासाठी त्या अस्पृश्यता बंदीच्या वेगळ्या खात्याची व स्वतंत्र बौद्ध स्थानाची मागणी करीत या प्रश्नाविषयीची तीव्रता व तळमळ स्पष्ट करतात. दि. के. बेडेकरांच्या मते, अस्पृश्यता निर्मूलनाची वाट बिकट असून, हा लढा दीर्घकाळ लढावा लागणार असल्याचे वास्तवही त्यांनी स्पष्ट केले आहे. समाजातील विषमता, गुलामी पुरातन आहे. समाजात 'द्रौपदी' अद्याप अदृश्य झाली नाही, तर मग ही धग संपणार तर कशी नि केव्हा, असा त्यांनी केलेला प्रश्न वाचकास अंतर्मुख करतो. दलित राष्ट्रध्वजाचा अपमान का करतात - त्यामागील अत्याचारांचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. माणुसकीचे शहाणपण रुजण्यातच अंतिमतः सर्वांचे भले आहे, हे बेडेकर परोपरीने आपल्या विवेचनातून स्पष्ट करतात. डॉ. बाबा आढाव सकारात्मक परंतु यथार्थता समजावत सांगतात की, जोवर आपण कपबशीच्या विटाळाचा विचार करतो, तोवर हे शक्य नाही. डॉ. बाबा आढावही स्वानुभूत उदाहरण देत समाजवास्तव आपल्यापुढे ठेवतात. मदत करणारा कृष्ण आज कुठे लपून बसला आहे? आपली सर्वांची आई (भारतमाता) एक, तर आपण भिन्न कसे? याचा विचार व्हायला हवा. केशव मेश्राम यांनी आपल्या विवेचनातून शाळेतील रोजची 'प्रतिज्ञा'- भारत माझा देश आहे... फोल ठरत असल्याची खंत व्यक्त केली आहे. आजची नवी दलित पिढी बदलाची आरोळी दूरवर पोहोचवतील, असा विश्वासही ते व्यक्त करतात. शंकरराव खरात

यांनी आपल्या निवेदनातून दलित स्वाभिमानाने वागू पाहतात म्हणून सवर्ण त्यांच्यावर अत्याचार करतात, हे स्पष्ट केले. हा संघर्ष अहंकार आणि आत्मभानाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. स्वतंत्र खेडी निर्माण करा, दलितांचे शहरीकरण करा, अशी त्यांची आलेली मागणी पूर्वानुभवाधारित आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

परिसंवाद समाजवास्तवावर टाकलेले 'क्ष' किरण होय. तर्कतीर्थांसह सर्व संवादक हे सक्रिय अस्पृश्यता उद्धारक असल्याने प्रत्येकाने वास्तव मांडत बदलाचा केलेला आग्रह विचारणीय आहे. तथापि, वेगळी वस्ती समाजमनातून उठणे, हाच याचा खरा उपाय होय.

१६) होय, आम्हाला क्रांती हवी आहे

१९७५ ते १९७७ असा दोन वर्षांचा काळ भारतीय राजकीय इतिहासाच्या स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महत्त्वाचा काळ होय. या काळात १५ जून, १९७५ रोजी लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी पाटणा (बिहार) येथील सभेत देशातील भ्रष्टाचार संपविणे, बेरोजगारी दूर करणे यासाठी शिक्षणात क्रांती करणे, अशा त्रिविध उद्देशाने 'समग्र क्रांती'ची (Total Revolution) घोषणा केली. ही घोषणा देशाच्या सार्वभौमतेस आव्हान व राष्ट्रीय सुरक्षेस धोका असल्याचे सांगत तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या सरकारच्या शिफारशीवरून तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी आणीबाणी जाहीर केली (दि. २५ जून, १९७५). ती २९ मार्च, १९७७ पर्यंत लागू होती. या काळात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच झाला होता. अनेकांना तुरुंगात डांबण्यात आले होते. सन १९७७-७८ हे लोकनायक जयप्रकाश नारायण यांचे अमृत महोत्सवी वर्ष (जन्म ११ ऑक्टोबर, १९०२) होते. या सर्व पार्श्वभूमीवर 'पूर्वा' मासिकाचे संपादक दिनकर साक्रीकर यांनी सन १९७७ च्या दिवाळी अंकासाठी एक विशेष परिसंवाद योजला होता. त्याचा विषय होता, 'होय, आम्हाला क्रांती हवी आहे.' या परिसंवादासाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना 'बीजलेख' लिहिण्याची विनंती संपादकांनी केली होती. तर्कतीर्थांनी त्यानुसार 'क्रांती' शीर्षक दीर्घ लेख लिहिला होता. त्यात त्यांनी आजवर जगात झालेल्या विविध क्रांत्यांचे समालोचन केले होते. त्या पार्श्वभूमीवर या परिसंवादात प्रा. गंगाधर पानतावणे, प्रा. केशव मेश्राम व सौ. छाया दातार या समीक्षक, साहित्यिक, समाजसेवकांनी आपला क्रांतीविषयक दृष्टिकोन व्यक्त केला होता.

तर्कतीर्थांनी आपल्या बीजलेखात क्रांतीचे स्वरूप स्पष्ट करीत प्रारंभी तिची व्याख्या केली आहे. मौलिक परिवर्तन म्हणजे क्रांती होय. क्रांती आणि प्रतिक्रांती अशा दोन संकल्पना राजकीय इतिहासात रूढ आहेत. क्रांतीने राजकीय परिवर्तन झाल्यावर नवी राजवट अस्तित्वात येते. काही काळानंतर पुन्हा प्रस्थापित राजवटीविरुद्ध बंड होते व प्रस्थापित सत्ता उलथवून नवी सत्ता अस्तित्वात येते. ती प्रतिक्रांती होय. सत्ताधारी वर्गाची अकार्यक्षमता, दुर्बलता, आर्थिक पेचप्रसंग, युद्ध, जनतेचा कंगालपणा इ. गोष्टी या क्रांतीचे प्रेरक घटक वा

कारण असतात. राजकीय क्रांती कधी सशस्त्र असते, तर कधी निःशस्त्र. भारताला स्वातंत्र्य मिळाले ते सत्याग्रहासारख्या निःशस्त्र, अहिंसक लढ्यातून. ती निःशस्त्र क्रांती होय. ती अपवादाने होते. जगात अधिकतर सशस्त्र क्रांत्याच झालेल्या दिसतात. १४ जुलै, १७८९ ची फ्रेंच राज्यक्रांती, २५ ऑक्टोबर, १९१७ ला झालेली रशियातील बोल्शेव्हिक क्रांती, सन १९४९ ला झालेली चीनची लाल क्रांती या सर्व सशस्त्र क्रांती होत. क्रांती युद्ध हे एका परीने यादवी युद्धच असते. उठावातून होणारी क्रांती असं तिचं स्वरूप असतं. आधुनिक क्रांतीचे युग अठराव्या शतकात फ्रेंच राज्यक्रांतीच्या रूपाने सुरू झाले. या क्रांतीने स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्यत्रयी जगास दिली. त्यातून मूलभूत मानवी हक्कांचा विचार रुजला. जॉन लॉक, झां झाक रूसो, कार्ल मार्क्स, गोंडविन, प्यॉटर क्रपॉटकियन, प्रुदा प्रभृतींनी विश्वमानव संकल्पना आपापल्या विचार व तत्त्वज्ञानांनी रुजविण्याचा प्रयत्न केला. 'निसर्गाचे राज्य' (State of Nature) पासून ते मानवाधिकार नि मानवी मूल्य विकासाची वाटचाल हीपण वैचारिक क्रांतीच होय. 'पुष्कळांचे पुष्कळ हित' या कल्पनेतून मूलतः राज्यसत्ता उदयाला आली. या कल्पनेमुळे प्रजेने राजास कल्याणाचे अधिकार प्रदान केले; पण सर्व राजांनी काही हे तत्त्व पाळले नाही. ते निरंकुश राजे बनले. त्यातून अन्याय, अत्याचार, हिंसा वाढली. त्यांच्या अतिरेकाची प्रतिक्रिया म्हणून लोकांचे बंड, क्रांती, उठाव, युद्ध उद्भवले. मार्क्सला अभिप्रेत क्रांती कधीच झाली नाही. क्रांतीनंतर व्यक्तिस्वातंत्र्याचे स्वप्न स्वप्नच राहिले. एकोणिसावे शतक हे तत्त्वज्ञानाचे शतक ठरले. हेगेलने मांडलेल्या विचारात परिवर्तन करून मार्क्सने मांडलेल्या विचारात भौतिकतेचाच विचार झाला. त्यामुळे ती क्रांती अंतिम ध्येय गाठू शकली नाही. उलटपक्षी क्रांतीची समर्थक राष्ट्रेच एकमेकांचे प्रतिस्पर्धी बनली व समाजवादी क्रांती अपयशी ठरली. विश्वशांती, विश्वमानव या घोषणा कल्पनाच बनून राहिल्या.

प्रा. गंगाधर पानतावणे यांनी 'तुफान सुरू झाले आहे' शीर्षक लेखातून या परिसंवादांतर्गत दलित, शूद्र, स्त्रिया यांचे तृणवत जीवन चित्रित करून ते बदलण्यासाठी सामाजिक क्रांती आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मतानुसार, समाजात दलितांचे जीवन गुलामीचे आहे. ते 'मनुस्मृति'अधीन समाजरचनेमुळे निर्माण झाले आहे. त्यामुळे समाजात शोषक व शोषित संघर्ष अटळ आहे. दलितांचे जग अंधारमय काळोखाचे आहे. कसलीही आशा त्यांच्यापुढे नाही, हे सत्य आहे. सत्य हे धारदार पात्यासारखे असते. गुलामीची जाणीव या समाजास महात्मा फुले, मार्टिन ल्यूथर किंग, व्हॉल्टेअर, मोझेस यांच्या जीवन, कार्य नि विचारांतून झाली आहे. 'धिक्कारूनि टाका मनुमत'ची प्रेरणा दलितांना यांच्या साहित्यातून मिळाली आहे. मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी क्रांती अटळ असते. माल्कम एक्स (दहावा माल्कम)ला क्रांतिमूल्य गवसले ते त्याच्या जीवनातूनच. तसेच ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही गवसले होते, त्यामुळे आजचा दलित क्रांतिपुत्र होऊन सज्ज

झाला आहे. 'हे तुफान सुरू झाले आहे' अशा शब्दांत प्रा. पानतावणे यांनी क्रांतियुगाचे सूचन केले आहे.

प्रा. केशव मेश्राम यांच्या म्हणण्यानुसार, स्वातंत्र्योत्तर काळात क्रांती शब्दाचा वारेमाप वापर झाला; पण प्रत्यक्षात हिरवळीचे वाळवंट झाले, त्यामुळे क्रांती येथे प्रतीक्षित आहे. दलितांची अभिधाने बदलली, स्थिती मात्र जैसे थे आहे. डॉ घुर्ये, जे. एस. हटन, कर्वे, पां. वा. काणे यांच्या परस्परविरोधी मतांची चर्चा इथे अप्रस्तुत आहे. तीच गोष्ट फोईबर, लुई ड्युमा, ॲबे दुबाईची. म्हणूनच जातीच्या दुष्टचक्रातून सुटका व्हायची, तर क्रांतीला पर्याय नाही, त्यामुळेच दलितांना मान, प्रतिष्ठा शक्य आहे. 'मनुस्मृति'वत प्राचीन साहित्य पुरोहितांची लबाडी आहे. फुले, शाहू, आंबेडकर, ढाले यांची पोटतिडीकच क्रांती आणण्यास सक्षम आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षणाचे प्रयत्न आणि प्रयोग ही क्रांती यशस्वी करेल. आम्हाला उपकृत करणारे दान नको, क्रांतीचे वरदान हवे आहे.

छाया दातार यांनी स्पष्ट केले आहे की, माझी न्याय संकल्पना संविधान संमत आहे. समाज संस्था चौकटीत स्त्री अद्याप शोषित, पीडित आहे. आर्थिक विकासात तिचा वाटा नगण्य आहे. विषमता दिवसेंदिवस वाढतच आहे. काळा पैसा वाढतो आहे. राजकीय क्षेत्रात समानतेचे मूल्य अद्याप गळी उतरलेले नाही. लोकांक्षेचे प्रतिबिंब विकासात दिसत नाही. जातिआधारित मतदानामुळे अपेक्षित परिणाम होत नाही. या पार्श्वभूमीवर स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व प्रत्यक्षात अमलात येत नाही. त्यासाठी समाजपरिवर्तनाच्या चळवळी आवश्यक आहेत; पण त्या चालविणे आता अशक्य झाले आहे. संपूर्ण समाजपरिवर्तन म्हणजेच क्रांती, हेच समीकरण मनात ठेवून कार्य केले पाहिजे.

वरील परिसंवादात तर्कतीर्थांनी विशद केलेले क्रांतीचे स्वरूप आणि भारतातील जात व विषमता वास्तव लक्षात घेता, इथे क्रांतीपेक्षा परिवर्तन स्वीकार्ह होताना दिसते. भारतीय समाजमानस मूलतः संयमी व मर्यादाशील राहिले आहे. इथे कालानुरूप बदल झाले; पण त्यांची गती कासवाचीच राहिली आहे. इथे जे समाजसुधारक झाले, त्यांनीही क्रांतीपेक्षा परिवर्तन स्वीकारले. त्याची मुळे इथल्या स्थितिशील समाजव्यवस्थेत रुतलेली आहेत.

१७) प्रबोधनाची शोकांतिका : उपोद्घात आणि उपसंहार

भारताला १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा आपण स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवी मूल्यांचा फ्रान्सप्रमाणे आपल्या घटनेत समावेश केला. त्या मूल्यांचा विविधांगी प्रचार, प्रसार व प्रबोधन केले; पण आपण स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वाटचालीनंतरही समाजातील सवर्ण नि दलित यांतील दरी मिटवू शकलो नाही, याची खंत नि शल्य मनी धरून 'पूर्वा' मासिकाचे संपादक दिनकर साक्रीकर यांनी सन १९८० च्या दिवाळी अंकातील परिसंवादासाठी विषय मुक्रर केला होता- 'प्रबोधनाची शोकांतिका.'

या परिसंवादाचे प्रास्ताविक स्वतः संपादकांनी लिहीत वरील खंत व्यक्त केली होती. या परिसंवादाचा उपोद्धात आणि उपसंहार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना लिहिण्यास सांगण्यात आले होते. सदर परिसंवादात सर्वश्री शरद पाटील, प्रभाकर वैद्य, बाळासाहेब पाटील, रा. ग. जाधव यांच्यासारख्या समाज, क्रीडा, पत्रकारिता, वाङ्मय क्षेत्रातील दिग्गजांनी आपली मते व्यक्त केली होती.

हा परिसंवाद योजण्यामागे एक घटना कारण होती. ती म्हणजे, मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन. त्याची पार्श्वभूमी अशी होती की, सन १९५० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. उद्देश हा होता की, निजामशाहीत मराठवाड्याकडे दुर्लक्ष झाले. परिणामी, तिथला दलित समाज विकासवंचित राहिला. त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या इराद्याने डॉ. आंबेडकर यांनी हे महाविद्यालय सुरू केले होते. तेव्हा तेथील समाजधुरीण गोविंदभाई श्रॉफ, संपादक अनंतराव भालेराव, माणिकचंद पहाडिया प्रभृतींनी डॉ. आंबेडकर यांच्याकडे महाविद्यालय चालेल का, अशी शंका उपस्थित केली होती. तेव्हा डॉ. आंबेडकर असे म्हणाले होते की, हा भाग इतका शिक्षणवंचित आहे की, येथे एखादे विद्यापीठ खरे तर सुरू केले पाहिजे. त्यानुसार डॉ. आंबेडकरांच्या पाठपुराव्यातून सन १९५८ मध्ये औरंगाबाद येथे विद्यापीठ सुरू झाले. तेव्हा ते जरी मराठवाडा विद्यापीठ म्हणून सुरू झाले, तरी त्याला कोणते नाव द्यावे, याबाबतच्या पर्यायांबद्दल सतत चर्चा, आंदोलने होत राहिली. सन १९७६ ते १९९४ असे १८ वर्षे आंदोलन सुरू होते. प्रादेशिक अस्मिता, दलित जागृती व संघटन, सवर्ण-दलित संघर्ष असे अनेक पदर या आंदोलनामागे होते. दलितांची मागणी विद्यापीठास 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ' असे नाव द्यावे अशी होती तर नामांतरविरोधी गट आहे ते नाव ठेवावे, या मताचा होता. त्यामागे प्रादेशिक अस्मिता कार्यरत होती; पण प्रत्यक्षात या आंदोलनास दलित विरुद्ध सवर्ण असे रूप येत गेले. दोन्ही सभागृहांचा ठराव (विधानसभा व विधान परिषद) होऊनही नामांतर होत नाही, याची तिडीक दलित समाजामध्ये होती. असे आंदोलन पुरोगामी महाराष्ट्रात होणे, उभे राहणे हीच येथील आजवरच्या प्रबोधनाची शोकांतिका होती.

उपोद्धात : (स्वातंत्र्यपूर्व काल) प्रबोधनाची शोकांतिका

परिसंवादाच्या उपोद्धातात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले आहे की, पूर्व-पश्चिम हा संगम आहे, तसाच संघर्षही. यामुळेच इथे सामाजिक परिवर्तन सुरू झाले. ते आंतरिक होते, तसे बाह्यही. आंतरिक परिवर्तनाचा संबंध आध्यात्मिकतेशी असून, ते भान विश्वावर परिणाम करते. बाह्यपरिवर्तनाचा संबंध विज्ञान, भौतिकतेशी असून, त्यांचा परिणाम बौद्धिक विश्वावर होतो. भावना आणि विचार यांचा संगम अवघड नि संघर्ष अटळ असतो. भारतीय समाजावर भावनेचा प्रभाव आहे, तर युरोपवर बुद्धीचा. त्यामुळे तिथे प्रबोधनपर्व,

पुनरुज्जीवनपर्व अगोदर आले. आपल्याकडे ते ब्रिटिश आगमनाद्वारे आले. भारताचे पहिले प्रबोधक राजा राममोहन रॉय होत. महाराष्ट्रात लोकहितवादी, महात्मा फुले यांनी ते कार्य केले. शिक्षण हे समाजसुधारणेचे साधन मानून लोकमान्य, आगरकर, चिपळूणकर, कर्वे प्रभृतींनी कार्य केले. आर्थिक, उद्योग, व्यापारात दादाभाई नवरोजी, रमेचचंद्र दत्त, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे प्रभृतींनी जागृती केली. धार्मिक, सामाजिक सुधारणांचे कार्यही या काळात झाले. समाजविकासाची उन्नत स्थिती आपणांस राज्यसंस्थेत पाहण्यास मिळते. महात्मा गांधींनी संसदीय लोकशाहीचा आग्रह धरला. स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रबोधन युगाचा उत्तरार्ध म्हणजे विसाव्या शतकाचा पूर्वार्ध होय. या काळात जगाबरोबर भारतावरही साम्यवादी आणि समाजवादी विचारांचे गारुड होते. त्याचे कारण पश्चिमी शिक्षणाचा प्रभाव हेच होते. स्वातंत्र्यपूर्व काळ हा सर्वांगीण प्रबोधनाचा होता. प्रबोधन म्हणजे आंतरिक वैचारिक परिवर्तन होय. स्वातंत्र्यपूर्व काळात जीवन धर्मकेंद्रित होते. शिक्षण व धर्मसुधारणांमुळे यात परिवर्तन घडून आले. जातिसंस्थेचे वर्चस्व संपले नसले, तरी पूर्वीइतके ते कर्मठ राहिले नाही. रोटी-बेटी व्यवहार उदार झाले. भारतात राजेशाहीच्या जागी लोकशाही रुजणे, ही प्रबोधनाचीच किमया; पण हे सर्व वरवरचे बदल होते. समाजव्यवहारातून जातिभेद समूळ नष्ट न होणे, स्त्री-पुरुष समानता न येणे, अंधश्रद्धामुक्त समाज निर्माण न होणे, ही स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रबोधनाची शोकांतिका होय.

उपसंहार : (स्वातंत्र्योत्तर काळ) विमोचक शक्ती व बंधक शक्ती यांचा प्रखर संघर्ष

भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरंजामी सत्ता लोप पावून तिची जागा लोकसत्तेने घेतली. स्वातंत्र्यपूर्व प्रबोधनाचे हे फलित होय. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही रुजली; पण तिचा पाया डळमळीत व भुसभुशीत राहिला. ग्रामीण व नागरी भागातील चित्र भिन्न राहणे, हे आपल्या विकासाचे अपयश होय. सामाजिक जीवनातील विषमता आपण मिटवू शकलो नाही. ४० ते ५०% जनता दारिद्र्यरेषेखाली असणे, हे नियोजन फसल्याचेच लक्षण होय. धार्मिक सद्भावही आपण रुजवू शकलो नाही. स्वातंत्र्योत्तर काळात पुरोहितशाहीचा प्रभाव कमी झाला; पण आपण कर्मकांडमुक्त होऊ शकलो नाही.

आता प्रबोधनाशी लढणारी शक्ती जातिसंस्थेची पोलादी चौकटच आहे. तिची मुळे समाजात खोल रुजलेली आहेत. जातमुक्त विचारांचे लोक बुद्धिजीवी असून, ते समाजात अल्पसंख्य आहेत. कार्ल द्वंद्वविरोधी भाषेत बोलत. त्या भाषेत सांगायचे तर 'संख्या गुणात व गुण संख्येत परिवर्तन पावतो.' याचा अर्थ असा की, विशिष्ट संख्यात्मक परिवर्तन झाले, तरच गुणात्मक परिवर्तन होते. प्रबोधनाचे नेतृत्व ब्राह्मणांच्या हाती होते. परंतु, प्रबोधन विचार कधीच ब्राह्मण्यसूचक नव्हता. प्रबोधनाचा जो प्रभाव पसरला, तो विकृत बनला. विसाव्या शतकातील ब्राह्मणेतर चळवळीमुळे ब्राह्मणांचे महत्त्व कमी झाले हे खरे; पण जात संस्था, अस्पृश्यतेची संस्था सुरक्षित, जागृत व लढाऊ ठेवणारा समाज मुख्यतः ब्राह्मणेतरच

होय. आधी राजकीय की आधी सामाजिक, या वादात लोकमान्य टिळकांचा विचार खरा होता, असे वर्तमानावरून सिद्ध होते. आजचे राजकारण जातीच्या आधारे खेळले जाते, तो समाजसुधारणेस गौणता दिल्याचाच परिणाम होय.

सर्व नागरिकांचे समान आर्थिक हितसंबंध निर्माण करणाऱ्या मोचक शक्ती या विशिष्ट संबद्ध जात-पात-धर्माच्या बंधनापलीकडे जाणारा कार्यक्रम घेऊन बंधक शक्तीशी लढू लागल्या, तरच सामाजिक क्रांती ही गतिमान होईल. आज बंधक शक्तीचे उग्र आव्हान मोचक शक्तीपुढे उभे आहे.

'प्रबोधनाची शोकांतिका' परिसंवादातील तर्कतीर्थ विचार म्हणजे परिस्थितीची वस्तुनिष्ठ मीमांसा होय. ती कटू वाटली, तरी स्वीकारण्यास पर्याय नाही.

१८) महाराष्ट्राची नवी अस्मिता

'किर्लोस्कर' मासिकाच्या स्थापनेस साठ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून संपादकांनी 'हीरकमहोत्सवी अंक' ऑगस्ट, १९८१ मध्ये प्रसिद्ध केला होता. त्यात संपादकांनी 'महाराष्ट्राची नवी अस्मिता' या विषयावर परिसंवाद योजून प्रसिद्ध केला होता. त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. गं. बा. सरदार, साथी ना. ग. गोरे, प्रा. वि. म. दांडेकर, प्रा. नरहर कुरुंदकर, श्री. राजाभाऊ गवांदे, प्रा. रावसाहेब कसबे यांनी आपले विचार मांडले होते.

या परिसंवादाची पार्श्वभूमी विशद करीत संपादकांनी म्हटले होते की, स्वातंत्र्यानंतर आपणांस सर्व मिळाले असे कोणीही विचार करणारा माणूस म्हणणार नाही. उलटपक्षी स्वतंत्र्यपूर्व काळातील समाजसुधारणा, धर्मसुधारणा, राष्ट्रवाद विकासाचे प्रश्न व स्वप्न अपूर्णच राहिले, असे स्वातंत्र्य व स्वराज्य (प्रजासत्ताक) प्राप्तीच्या तीन दशकांनंतरही प्रत्ययास येते. दलित-सवर्ण संघर्ष संपलेला नाही. मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीतून तो प्रकर्षाने पुढे आलेला आहे. स्त्रीवरील पुरुषवर्चस्व कमी झालेले नाही. शिक्षणाचा केवळ प्रचार, प्रसार झाला. शिक्षणाने माणूस बदलल्याचे चित्र दिसत नाही.

या संदर्भात प्रस्तुत परिसंवादात तर्कतीर्थांचे म्हणणे असे दिसून येते की, दलितांचा पर्याप्त विकास झाला असे चित्र नाही. सवर्णांवत दलित सर्वत्र स्थापित, शिक्षित दिसत नाही. राखीव जागा आरक्षणानंतरचे हे चित्र क्लेशकारक आहे. सवर्णांची आत्मवंचना या सामाजिक नग्नतेस कारणीभूत आहे. स्त्रीशिक्षणाचा विस्तार न झाल्याने तिच्या विकासाचा परीघ छोटाच राहिला आहे. हुंडा पद्धत संपलेली नाही. स्त्री-पुरुष समानता वैचारिक झाली. ती व्यवहारात प्रतिबिंबित झालेली दिसत नाही. समाजात बुद्धिवाद रुजला नाही. अंधश्रद्धेचा विळखा पूर्ववत आहे. शिक्षितवर्ग यास अपवाद बनताना प्रत्ययास येत नाही. अजून लोक रोगराई, मानसिक ताणतणावाचा निरास शास्त्रोक्त पद्धतीने व वैज्ञानिक दृष्टिकोनाने न करता तंत्र, मंत्र, गुंडेदोरे, बुवाबाजीच्या आहारीच जातात, असे दृश्य आहे. यासाठी समाजप्रबोधनाद्वारे नव्या अस्मिता महाराष्ट्र माणसात रुजण्याची गरज आहे.

तर्कतीर्थांनी ही मांडणी वास्तवाधारित करीत वर्तमानाची जी समीक्षा केली आहे, ती अंतर्मुख होण्यास भाग पडते. विचार जोवर कृतीत उतरत नाही, तोवर परिवर्तन अशक्य हेच खरे!

१९) विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि महात्मा जोतिबा फुले

मराठी नियतकालिकात दिसून येणारी परिसंवाद परंपरा ही प्रश्न, समस्या, संबंध, दृष्टिकोन, विचारकेंद्रित राहिली आहे. हा परिसंवाद त्या दृष्टींनी वेगळा आहे. तो व्यक्तींच्या तुलनात्मक आकलनास समर्पित करून संपादकांनी नवी वाटचाल केली आहे. आजवरच्या परिसंवादात एक भूमिका, बीजविचार विशद करून त्यावरच्या विविध दृष्टिकोनांची मांडणी केली जाते. फार कमी परिसंवादात उपसंहार, निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला जातो. इथे तसा तो करण्यात आल्याने अनुकरणीय ठरतो.

१७ मार्च, १९८२ या दिवशी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निर्वाणाला १०० वर्षे पूर्ण झाली. विष्णुशास्त्री चिपळूणकर (१९५० - १९८२) हे मराठीतील निबंधकार, लेखक, पत्रकार, देशभक्त म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या हयातीत त्यांचे नि महात्मा फुले यांचे मतभेद झाले होते. ते लक्षात घेऊन उभयतांचे तौलनिक आकलन हावे म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांनी चरित्रकार व समीक्षक द. न. गोखले यांचे 'विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि महात्मा जोतिबा फुले' या विषयावर व्याख्यान योजले होते. नंतर सदर व्याख्यान टंकित करून ते काही मान्यवरांकडे पाठवून त्यांची मते मागविण्यात आली. त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ग. वा. बेहरे व ना. ग. गोरे यांचा समावेश होता. हे तिघेही योगायोगाने तत्कालीन मान्यवर नियतकालिकांचे (अनुक्रमे मासिक 'नवभारत', साप्ताहिक 'सोबत' व साप्ताहिक 'साधना') संपादक होते. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका'च्या एप्रिल-मे-जून, १९८२ च्या अंकात द. न. गोखले यांचे मूळ व्याख्यान, त्यावरची उपर्युक्त मान्यवरांची मते व त्यास द. न. गोखले यांनी दिलेले उत्तर वा खुलासा प्रकाशित करण्यात आला होता. एका अर्थाने हा अनौपचारिकपणे घडून आलेला परिसंवादच होता.

द. न. गोखले यांनी आपल्या विवेचनातून विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि महात्मा जोतिबा फुले यांचे तौलनिक आकलन करण्याच्या दृष्टीने उभयतांच्या गुणदोष, कार्य, विचार, महात्मता यांच्यावर प्रकाश टाकला आहे. त्यानुसार विष्णुशास्त्री चिपळूणकर हे राष्ट्रवाद, देशाभिमानाचे पुरस्कर्ते होते, तर महात्मा फुले समाजसुधारक, समतावादी सत्यशोधक होते. दोघांनी एकमेकांवर उपरोधिक टीका केली होती. त्याची समीक्षा अनेकांनी केली आहे. त्यानुसार दोघांची विचारसरणी परस्पर विरुद्ध होती. दोघे एका अर्थाने जातसमर्थक राहिले. दोघांनी व्यापक विधायक गोष्टींकडे दुर्लक्ष करून संकीर्ण विषयांवर आपली टीका केंद्रित केली. खरे तर दोघेही चरित्र म्हणून श्रेष्ठच होते. दोघांची कार्यक्षेत्रे भिन्न असली, तरी उद्देश महान होते. दोघे समकालीन असल्याने परस्परपूरक राहिले असते, तर आजच्या देश व

राज्याचे चित्र वेगळे असते, असे या भाषणाचे सूत्र होते. ते व्याख्यात्यांनी साधार मांडल्याने दोघांची महत्ता अधोरेखित झाली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी उपर्युक्त विचारांसदर्भात मांडणी करीत म्हटले आहे की, सामाजिक बदलांशिवाय देशाभिमान, राष्ट्रवाद भावना व्यर्थच म्हणायला हवी. राष्ट्रवादाचा विचार भारतात इंग्रजांच्या आगमनाने निर्माण झाला. युरोपात राष्ट्र संकल्पना केवळ भौगोलिक नाही, तर ती भाषा, संस्कृती, इतिहासावर उभी आहे. आपल्याकडे धर्म भावना दुबळी राहिल्याने परकीय आक्रमणे झाली व आक्रमकांनी सत्ता निर्माण केली. देशाभिमानाइतकीच सामाजिक सुधारणा तितकीच महत्त्वाची. कारण, यातून एकसंध समाज, राष्ट्र शक्य होते. ग. वा. बेहेरे यांनी या भाषणाने एका अर्थाने विष्णुशास्त्री चिपळूणकरांवर आजवर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन झाल्याचे मत मांडले आहे. ना. ग. गोरे, द. न. गोखले यांच्या व्याख्यानास उपस्थित होते. शिवाय त्यांनी हे टंकित भाषण वाचले होते. त्यांच्या धारणेनुसार, द. न. गोखले यांनी दोन्ही महापुरुषांची सम्यक चिकित्सा केली आहे. यांच्या म्हणण्यानुसार, भारतातील जातिभेद, धर्मभेद भावना काही इंग्रज घेऊन आलेले नव्हते. ते भेद इथले होते. महात्मा फुले यांना इंग्रजांचा राजकीय व आर्थिक साम्राज्यवादी दृष्टिकोन उमगला नाही, तद्वत चिपळूणकरांना जातिभेदाचा चिवटपणा व विषारीपणा लक्षात आला नाही. यानंतर द. न. गोखले यांनी या मान्यवरांच्या मतांची आपल्या परीने मीमांसा केली आहे.

हे मात्र खरे की, मते ही व्यक्तिसापेक्ष असतात. कोण बरोबर, कोण चूक, अशा निवाड्यापेक्षा परिसंवादांतून एका विषयाचे अनेक पैलू वा दृष्टिकोन श्रोते, वाचक, प्रेक्षकांपुढे येत असतात. दृष्टिकोन परिष्करण ही अशा परिसंवादांची खरी उपलब्धी असते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची विचारधारा वा धारणा ही नेहमीच समाज, धर्म, साहित्य अशा अंगांनी सांस्कृतिक राहिली आहे. यात परंपरा परिष्करणाचा प्रयत्न असतो. ते व्यक्ती, विचार, वाद इ.संदर्भात नेहमीच चिकित्सक राहिले आहेत. परंपरेस नवे रूप देण्याची त्यांची वृत्ती त्यांना आधुनिक ठरवत आली आहे. 'जुने ते सोने' असा रूढ दृष्टिकोन नाही. नव्या-जुन्यातील वैयर्थ वगळून जे अंतिम मानवी हिताचे त्याचेच ते समर्थक राहिले आहेत. इथेही तीच दृष्टी आहे.

२०) भारताचे महासंघाद्वारा पुनर्एकीकरण

सदर परिसंवादापूर्वी 'पूर्वा' मासिकाचे संपादक दिनकर साक्रीकर यांनी 'भूमिका' लिहून विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट केली आहे. यानुसार ३ जून, १९४७ रोजी ब्रिटिशांनी हिंदुस्थानच्या फाळणीची घोषणा केली. मुस्लीम लीगने ब्रिटिशांकडे स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केली होती. फाळणीच्या घोषणेनंतर सुरू झालेल्या दंगली थांबाव्यात म्हणून काँग्रेसने फाळणीस होकार दिला, तरी महात्मा गांधी, जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, खान

अब्दुल गफारखान प्रभृतींचा त्यास विरोध होता. महात्मा गांधींची या फाळणीसंदर्भात अशी भूमिका होती की, ब्रिटिश अगोदर भारत सोडतील. फाळणीचा निर्णय हिंदुस्थान करेल. प्रत्यक्ष फाळणीनंतर मात्र सर्वांनी ती स्वीकारली तरी समाजवादी पुनर्एकीकरण वा महासंघ निर्मितीची स्वप्ने बाळगून होते, याची शक्यता किती? असे पुनर्एकीकरण वा महासंघ निर्मिती इष्ट किती? याची चर्चा स्वातंत्र्यानंतर बरीच वर्षे होत राहिली. हा परिसंवाद त्याचा पुरावा होय.

या परिसंवादात सर्वश्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. राम जोशी, स्वतः संपादक दिनकर साक्रीकर यांच्याशिवाय जॉर्ज फर्नांडिस यांनी भाग घेतला होता. अनुक्रमे काँग्रेसी, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार व समाजवादी असलेले हे मान्यवर या विषयाशी पक्ष, विचारधारा म्हणून जवळचे होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना महासंघ कल्पना अनिष्ट व अशक्य वाटली ती वस्तुस्थिती लक्षात घेऊन. त्याचे स्पष्टीकरण त्यांनी आपल्या मांडणीत केले आहे. त्यांच्या मतानुसार, सन १९४७ मध्ये फाळणीनंतर भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे होती. सन १९७२ मध्ये पाकिस्तानचे विभाजन होऊन बांगलादेश स्थापन झाला. भारतात लोकशाही स्थिर आहे. पाकिस्तान व बांगलादेशात लष्कराचे वर्चस्व आहे. २०० वर्षांच्या समाजसुधारक प्रबोधनामुळे भारत धर्मनिरपेक्ष बलशाली देश बनला. उर्वरित दोन देशांचे इस्लामीकरण झपाट्याने झाले आहे. या तीनही राष्ट्रांच्या स्थापनाप्रेरणा भिन्न आहेत. आजची तीनही राष्ट्रांची स्थिती भिन्न आहे. आज भारत धर्मनिरपेक्ष लोकशाही देश आकाराला आला तो फाळणीमुळे. फाळणी न होती, तर हे अशक्य होते. भारताच्या आजच्या घडणीस सन १९१७ ते १९४७ अशी तीन दशके महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली जे लढे, सत्याग्रह, चळवळी झाल्या, त्यातून आजच्या भारताची घडण झाली आहे. ही परंपरा उर्वरित दोन राष्ट्रांना फाळणीनंतर लष्करशाहीमुळे राहिली नाही.

प्रा. राम जोशी यांच्या म्हणण्यानुसार, भारत-पाकिस्तान फाळणी मान्य नसलेले लोक महासंघ ना पुनर्एकीकरणाचे स्वप्न बाळगून होते नि आहेत. प्रश्न येतो की, असा विचार करणारे लोक पाकिस्तान व बांगलादेशात असतील का? विद्यमान लष्करी राजवट लक्षात घेता हे अशक्य वाटते. पुनर्एकीकरण व्हायचे तरी तशी लोकेषणा तिन्ही राष्ट्रांत हवी. अमेरिकेत महासंघ आकाराला आला तो लोकांक्षेमुळेच. स्वातंत्र्योत्तर काळात या सर्व राष्ट्रांतील सौहार्द क्षीण आहे. पुनर्एकीकरण अनुकूलताही धूसर आहे. जर्मन, कोरिया, व्हिएतनामची फाळणी नि भारत फाळणी यांत फरक आहे. तो लक्षात होता महासंघ दूरचा पल्ला ठरतो. संपादक दिनकर साक्रीकरांनी प्रारंभीच हे स्पष्ट केले आहे की, जगातील अन्य राष्ट्रांच्या फाळण्या लादण्यात आल्या. संमतीने झालेली फाळणी म्हणून भारत-पाकिस्तानकडे पाहावे लागते. दोन वा अधिक राष्ट्रांचे पुनर्एकीकरण व्हायचे, तर लोकमत अनुकूल असावे लागते. अमेरिका, रशिया, चीन असे पुनर्एकीकरण होऊ देतील, याची सुतराम शक्यता नाही.

फाळणीनंतरच्या अनपेक्षित दंगली व नंतरचे या राष्ट्रांतील संबंध लक्षात घेता सध्यातरी महासंघ कल्पना ही अशक्य कोटीतील गोष्ट वाटते. कारण या राष्ट्रांच्या घटना, राज्यपद्धती भिन्न असल्याने मूलभूत परिवर्तन स्वप्नच! जॉर्ज फर्नांडिस हे फाळणीनंतर सन १९८० व ८४ मध्ये पाकिस्तानात जाऊन आलेले आहेत. त्यांच्या मतानुसार, सध्या भारतास परमाणू युद्धाचा धोका आहे. महासंघ कल्पनेस भारतातील विरोध मोठा आहे. आज ज्या जागतिक महासत्ता आहेत, त्या असा महासंघ वा पुनर्एकीकरण कदापि होऊ देणार नाहीत. असे असले तरी प्रयत्न करण्यास हरकत नाही.

वरील सर्व मते लक्षात घेता, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मत अधिक ठोस व वस्तुस्थितीवर अधिक आधारित वाटते. एकतर ते स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय होते. भारताच्या पारंपरिक इतिहासाची व वर्तमान यथार्थ जे जाणतात. सर्वच मान्यवर पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्या निर्मितीनंतरचे वास्तव डोळेझाक करीत नाहीत. मुळात आज तिन्ही राष्ट्रे ज्या स्वतंत्र प्रश्नांना घेऊन वाटचाल करीत आहेत, ती लक्षात घेता अशी आशा करणे केवळ स्वप्नरंजन ठरते. धर्म, संस्कृती, भाषा, राज्य पद्धती, घटना व लोकमत यांतील अंतर लक्षात घेता सदिच्छापूर्ण विचार (Wishful Thinking) यापलीकडे महासंघ निर्मिती व पुनर्एकीकरणाची शक्यता केवळ अशक्य. जर्मनी, व्हिएतनाम, अमेरिका यांची उदाहरणे या तीन राष्ट्रांना लागू होत नाहीत.

परिसंवाद मतसंग्रह मीमांसा

या परिसंवाद मतसंग्रहात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी इतर विविध क्षेत्रीय मान्यवरांबरोबर आपली मते मांडली आहेत. त्या त्या नियतकालिक संपादकांनी तर्कतीर्थांना मत मांडण्यासाठी बहुतेक वेळा अग्रक्रम दिलेला दिसून येतो. काही परिसंवादात तर ते उपोद्धात नि उपसंहार लिहिताना दिसतात, तर काही ठिकाणी परिसंवादात भूमिका वा बीजलेख लिहिण्याची जबाबदारी संपादक महोदयांनी तर्कतीर्थांवर सोपविलेली आढळते. यातून महाराष्ट्राच्या प्रबोधन जगतात तर्कतीर्थांचं अग्रगण्य स्थान अधोरेखित होते.

'जगातील दुष्टपणा व अन्याय आणि ईश्वरवादी विचारसरणी' शीर्षक परिसंवादाचा काळ आहे सन १९५४. सुमारे सत्तर वर्षांपूर्वीचे भारतीय समाजमन हे आजच्या तुलनेने पुराणपंथी होते. त्यामुळे अधिकांश मत व्यक्त करणारे मान्यवर हे ईश्वर, दैत्य, पुराणकथांचा अभ्यास करणारे व त्यावर विश्वास ठेवणारे दिसतात. तर्कतीर्थ यास अपवाद नाहीत. त्यांनी आपल्या उत्तरायुष्यात आपल्या देवश्रद्ध पत्नी सत्यवती जोशी यांच्या आग्रहावरून वाईच्या कृष्णा नदीत आपल्या घरातील सारे देव, टाक इ. मूर्ती विसर्जित करून देवपूजेचे कर्मकांड सोडून दिले व ते 'मानसपूजा' करू लागल्याची नोंद त्यांनी पत्नी निधनानंतर लिहिलेल्या एका लेखात करून ठेवली आहे.[३] 'पुराणकथा' शीर्षक नोंद 'मराठी विश्वकोश' (खंड-९)मध्ये आढळते. त्यात डॉ. आ. ह. साळुंखे यांनी म्हटले आहे की, ''प्राचीन काळी पुराणकथांतील

घटना हे परिपूर्ण सत्य आहे, अशी लोकांची धारणा असल्यामुळे पुराणकथांचा जनमानसावर कमालीचा प्रभाव होता. मानवी विचारांना हवे ते वळण देण्याचे वा त्यांत आमूलाग्र बदल करण्याचे सामर्थ्य या पुराणकथांत होते. पुराणकथांच्या प्रभावामुळेच मानवी जीवन व संस्कृती यांना विशिष्ट आकार प्राप्त झाला आहे.''[४] याच नोंदीत त्यांनी मार्शा ईलिआ (Mircea Eliade) यांचे मत नोंदले आहे. त्यानुसार "आधुनिक मानवाचे मन जसे फ्रेंच राज्यक्रांतीसारख्या घटनांनी बनले आहे, तसे प्राचीन मानवाचे मन पुराणकथांनी बनले होते."[5] सदर परिसंवादात मत व्यक्त करताना स्पष्ट केलेली एक गोष्ट तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आपल्या लक्षात आणून देतात, ती अशी की, देव आणि दैत्य उभयता अलौकिक शक्तीने युक्त होते. उभयता पाप-पुण्य करीत. उभयता शाप-वरदानयुक्त होते, त्यामुळे ते उभयता मोक्षास पात्र असत. यातून कर्मविपाक सिद्धांत केवळ मानवास नाही, तर देव-दैत्यांनाही लागू असल्याचे स्पष्ट होते. यातून धर्म सर्वांना लागू होता हेही स्पष्ट होते.

यापूर्वीचा परिसंवाद वि. ज. सहस्त्रबुद्धे यांच्या शंका-समाधानातून निर्माण झाला होता, तसाच 'वेदांतांतील काही प्रश्न' शीर्षक संवादही. हा परिसंवाद 'ब्रह्म' संकल्पनेची चिकित्सा करणारा आहे. ब्रह्म स्वरूप, ब्रह्म जगत्कारण, शुद्ध ब्रह्म शबल ब्रह्म होते का? अशा तीन प्रश्नांवर तो केंद्रित आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची मते परिसंवाद चर्चेत आपण या पूर्वी पाहिली आहेत. आद्य शंकराचार्य यांच्या जीवन, कार्य, विचारांवर तर्कतीर्थांनी भाषणे, मुलाखती, लेख यांतून आपली मते वारंवार स्पष्ट केलेली आहेत. याचा उद्देशही सदर परिसंवाद चर्चेत झाला आहे.

'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापर:।' ब्रह्म सत्य आहे नि जगत् व्यर्थ ही शंकराचार्यांची धारणा मानवी जीवनातील ब्रह्मतत्त्वाचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे. जीवनानंद म्हणजेच ब्रह्म असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. ('आनंदमयोभ्यासात'). 'अथाऽतो ब्रह्मजिज्ञासा' उक्तीत ब्रह्मविषयक सर्वस्वता शंकराचार्यांनी स्पष्ट केली आहे. मायावादाने ब्रह्म व विश्व (जात) या संबंधांतील काही प्रश्न सोडविले जातात व काही नव्याने उत्पन्न होतात, अशी धारणा तर्कतीर्थ शंकराचार्यांच्या संदर्भात व्यक्त करतात. "ब्रह्माचे जगत्कारणत्व हे अज्ञान किंवा अध्यासामुळे असते व तो अध्यास (एका वस्तूत दुसऱ्याचे ज्ञान उदा. दोरीलाच साप समजणे) ब्रह्ममिश्रित मायेचा प्रभाव असतो. माया म्हणजे अज्ञानमूलक खऱ्याखुऱ्या ज्ञानाला विरोध होय. ती मिथ्याज्ञानाची जनक आहे,"[६] असे तर्कतीर्थांनी शंकराचार्यांच्या ब्रह्मविषयक भाषणात स्पष्ट केले आहे.

'साहित्यिक आणि सरकार' हा परिसंवाद मूलतः सत्ता नि साहित्यिक असाच आहे. इतिहासकाळात जेव्हा राजेशाही होती, तेव्हा राजाच्या दरबारात आश्रित कवी, कलाकार, नृत्यांगना, साहित्यिक, चरित्रकार असत. ते राजकवी, राजनृत्यांगना, राजचित्रकार म्हणून ओळखले जात. ते सरळ सरळ आश्रित असत; पण आधुनिक काळात राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया

गतिशील झाल्यानंतर राजेशाही जाऊन लोकशाही, हुकूमशाही, अध्यक्षीय राज्यपद्धती यांच्यासह संघीय सरकारे निर्माण झाली. हे सत्तेचे वेगवेगळे तोंडावळे होत. यात कमी-जास्त प्रमाणात सत्तासमर्थक व सत्ताविरोधी कवी, साहित्यिक, कलाकारांचे वर्ग तयार झाले. काही तटस्थ कलाकारही जन्माला आले. तथापि, प्रत्येक सत्तेचा कल अनुकूल जनमत व जनप्रतिनिधी तयार वा वश करण्याचा असतो. या परिसंवादाची ही पूर्वपीठिका लक्षात घेता तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मत विचारणीय ठरते. त्यांच्या मतानुसार, साहित्य ही व्यक्तिगत निर्मिती असते. व्यक्तिस्वातंत्र्य हे ज्याचे त्याने जपायचे, जोपासायचे असते. काही साहित्यिक स्वतंत्र बाण्याचे असतात. त्यांना कोणाचेच मिंधेपण स्वीकारणे पटत नसते. असे साहित्यिक, कलाकार 'स्वान्त:सुखाय' साधनेत समरसून जगतात व समाधानी असतात. लौकिक प्रलोभनांचे आकर्षण असणारीपण माणसेच असतात. ती पद, प्रतिष्ठा, पैसा, प्रसिद्धी नि पुरस्कार अशा पंचकार वृद्धीसाठी सत्तेचा आश्रय, समर्थन, लांगुलचालन, वळचणीला जाणे, सत्तेचे हस्तक वा स्तुतिपाठक बनणे असे भौतिक संपन्नतेचे खुश्कीचे मार्ग चोखाळतात. अशी मान्यता वा समृद्धी क्षणिक काळासाठी तुमच्या लौकिकात भर जरूर घालते; पण काळ हा असा न्याय्य असतो, तो मूल्य, नीतिमत्ता, सचोटी, तटस्थता, स्वान्तसाधना यांचे मूल्यमापन व मूल्यांकन करून व्यक्ती वा व्यक्तिमत्त्वाचे कालातीत श्रेष्ठत्व ठरवत असतो, त्यामुळे सापेक्ष गोष्टींपलीकडे व्यक्तीस निरपेक्ष व नि:पक्ष राहता आले, तर तो साहित्यिक, कलाकार खरा समाजहितकारी मानायला हरखत नाही, हेच अन्वय नि आशयाच्या अंगाने तर्कतीर्थ मांडताना दिसतात. भारतात गेल्या शतकाच्या उत्तरार्धात सन १९७५-७७ च्या दरम्यान राजकीय आणीबाणी जाहीर झाली, तेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्य लोपले. या काळात काहींनी आणीबाणीचे समर्थन केले. काहींनी विरोध केला. काही तटस्थ राहिले. काही तुरुंगात गेले. या सर्व व्यक्तीच होत. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' हे जरी खरे असले, तरी अंतिमतः मूल्यांकन होते ते तुमच्या प्रवृत्तीवरच, हे विसरता येणार नाही. कारण, साहित्य आणि सत्तेपलीकडे 'सत्य' नावाची गोष्ट असते. 'राजा तू चुकलास' हे सांगायचं धारिष्ट्य स्वतंत्र साहित्यिकच करू शकतो. सॉक्रेटिस, गॅलिलिओ इतक्या वर्षांनंतरही चिरस्मरणीय, प्रात:स्मरणीय राहतात. कारण त्यांच्या चित्र, चरित्र, चारित्र्याची मूल्यवत्ता हेच त्याचे परिमाण ठरते. परिणामांचा मुलाहिजा न ठेवता स्वविवेकाच्या कसोटीवर कलासाधना करणारा कलाकार केव्हाही श्रेष्ठच. हा परिसंवाद मूलतः या विचाराकडे अंगुली निर्देश करणारा आहे.

या परिसंवाद मतसंग्रहात हे असे काही परिसंवाद विषय आहेत की, जे विषय, आशय आणि विचार यांच्या दृष्टींनी परस्परपूरक म्हणता येतील. 'धर्मदास्य, लोकशाहीविवेक आणि दलितमुक्ती' (अस्मितादर्श, १९७२), 'अस्पृश्यतेचे सामाजिक तपमान' (धरती, १९७२) आणि 'प्रबोधनाची शोकांतिका' (पूर्वा, १९८०) हे सर्व परिसंवाद दिवाळी अंकातील

असल्याने त्या त्या समकालीन घटनांचे प्रतिक्रियात्मक वा प्रतिसादात्मक संदर्भमूल्य आहे. या सर्व परिसंवाद मत अभिव्यक्तींमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जो दृष्टिकोन मांडला आहे, तो ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करत. धर्मदास्य हे सर्व धर्मांमध्ये आढळते, शिवाय सामाजिक विषमताही. धर्मप्रसारात हिंसेचा वापर वैश्विक आहे. याला अपवाद धर्म आहेत. विषमता जी धर्मातून निर्माण होते. तिच्या मागे सत्ताकारण, स्वार्थ असतो. पाप-पुण्य, पूर्वजन्म-उत्तरजन्म, कर्मविपाक सिद्धांत, मोक्ष प्रलोभन, अलौकिकाचे आकर्षण, कर्मकांड कर्मठता, धर्मगुरू वर्चस्व, धर्मग्रंथ प्रमाणता इ. कारणांतून धर्मदास्य निर्माण होते, रुजते नि धर्माच्या अपरिवर्तनतेतून मूळ धरून टिकून राहते. या सर्वांचे फलित व परिणाम अस्पृश्यता, उच्च-नीचता, वंशश्रेष्ठत्व सिद्धांत यांची निर्मिती होत राहते. लोकशाहीपेक्षा एकाधिकार राज्यपद्धतीत यांचे स्थिरीकरण होते. लोकशाहीतपण धर्मश्रद्ध पक्ष संघटन वा एकाधिकार वृत्तीची सत्ता निरंकुश होते, तेव्हाही दास्यतेचा धोका असतो. ही दास्यता राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक स्वरूपाची असू शकते. चातुर्वर्ण्य, जातिभेद हे लोकशाहीविवेशील शासन व्यवस्थेत धर्म व समाजसुधारणांना मिळणाऱ्या अवकाशातून क्षीण होत निर्मूल होण्याची शक्यता असते. म्हणून धर्मदास्य, दलितमुक्ती इ. विषमता निरासाचा मार्ग हा लोकशाहीविवेकच, हे तर्कतीर्थांचे म्हणणे अधिक कालसंगत ठरते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची वैचारिक वाटचाल वेदांती, गांधीवादी, रॉयवादी, नवमानवतावादी, काँग्रेसी अशी राहिली तरी अंतिमतः ते मानवाधिकार समर्थकच राहिले आहेत.

'अस्पृश्यतेचे सामाजिक तपमान'मध्ये त्यांनी हे स्पष्ट केले आहे की, हिंदू समाज मनात जोवर अस्पृश्यतेचा भाव वसून राहील, तोवर अस्पृश्यता निर्मूलन अशक्य आहे. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहातूनच जातीयता व धार्मिक कट्टरपणा सौम्य होत नामशेष होईल. यासाठी प्रबोधन ही सामाजिक औपचारिकता न राहता, तो कृतिशील वस्तुपाठ ठरणे आवश्यकच नाही, तर अनिवार्य आहे.

'प्राचीन भारतीयांचा कामविषयक दृष्टिकोन' (धरती १९७२) परिसंवादात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कामविषयक पूर्वापार धारणा विशद करीत सांगतात की, भारतात धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे पुरुषार्थ, ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यस्त यांचा क्रम लक्षात घेता, तो संयत कामभावनेचे समर्थन करणारा आहे, शिवाय प्राचीन वाङ्मय, सामाजिक परंपरा, धार्मिक नैतिकता यांचा विचार करता परस्त्रीगमन निषेध समाजमान्य संभोग पद्धती (विवाह), विवाहबाह्य संबंधांना अमान्यता. यातूनही भारतीयांचा कामविषयक दृष्टिकोन हा नैतिकता समर्थक राहिला आहे. अध:पतित कामसंबंध, कामसंबंध अतिरेक व अत्याचार यांना मान्यता नसली, तर त्यांचा आढळ भारतात सर्वकालिक दिसून येतो. भारतात विसाव्या शतकात झालेले कायदे हे कामविषयक दृष्टिकोनांची आधुनिकता सिद्ध करतात, तसेच कामसंबंधांचे बळी ठरलेल्या स्त्री-पुरुष व त्यांची अपत्ये यांना समाज संरक्षण व अधिकार

(समाजमान्यता) देणारे आहेत, हे लक्षात घेता वर्तमान भारतीयांचा कामविषयक दृष्टिकोन आधुनिक व सुधारणावादी असल्याचे सिद्ध होते.

'होय, आम्हाला क्रांती हवी आहे' (पूर्वा, १९०७) परिसंवादाचा बीजलेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिला आहे. त्याचा सारसंक्षेप यापूर्वीच्या परिसंवादविषयक विवेचनात आला आहे. याची द्विरुक्ती न करता आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, 'क्रांती' या विचार, कृतीशी काही काळ तर्कतीर्थांची भूमिका समर्थनाची व समर्थकाची राहिली आहे. तारुण्यकाळात प्राज्ञपाठशाळेत त्यांचे सहकारी आणि शिक्षक क्रांती व राष्ट्रवादी वृत्तीचे राहिल्याने सशस्त्र क्रांतिकारक म्हणून त्यांनी काही काळ कार्य केले. ते शस्त्र बाळगत नसले, ते चालविण्याचे तंत्र त्यांना अवगत नसले, तरी शस्त्र पुरवठ्यास त्यांनी साहाय्य केले आहे. जंगल सत्याग्रहात ज्या आदिवासी, कोळी, शेतकरी मजुरांचा सत्याग्रह योजला होता, त्यातील सत्याग्रही सशस्त्र होते, (धनुष्य-बाण, विळा-कोयता!) याच्या नोंदी आढळतात. ब्रिटिशांनी त्यांच्या सत्याग्रहास केलेला विरोध सशस्त्रच (गोळीबार, अश्रुधूर) होता. नंतर त्यांची वाटचाल राष्ट्रवादीकडून रॉयवादी विचारसरणीकडे झाली. तो विचार क्रांतिसमर्थकच राहिला आहे. या काळात त्यांनी केलेली गांधीवादावरील टीका क्रांतिसमर्थक, आक्रमक राहिली आहे. भारतीय जनमानस सशस्त्र क्रांती वा उठावास अनुकूल नसल्याची नोंद घेत तर्कतीर्थांच्याच अध्यक्षतेखाली डिसेंबर, १९४८ मध्ये रॉयवादाचे रूपांतर नवमानवतावादात होणे व नंतर तर्कतीर्थांचे पुन्हा काँग्रेसवादी होणे आणि अंतिमत: जयप्रकाश नारायण यांच्या समग्र क्रांतीला विरोध नसला, तरी सन १९०५ च्या कराड (जि. सातारा) येथे संपन्न अखिल भारतीय साहित्य संमलेनाच्या ५१ व्या अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून केलेले भाषण[७] हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य संरक्षणाची री ओढणारे या अर्थांनी आणीबाणीविरोधी व अप्रत्यक्षरीत्या समग्र शांततापूर्ण क्रांतीचे मौन समर्थनच होते. सन १९९३ मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अरुण शेवते यांना यशवंतराव चव्हाण यांच्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रासंदर्भात दिलेल्या मुलाखतीत स्पष्टोक्ती करीत म्हटले होते की, ''मी शुद्ध सत्याग्रहवादी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालो आणि माझे मत असे आहे की, मी सशस्त्रवादाला जो पाठिंबा दिला, ती माझ्या आयुष्यातील एक महत्त्वाची चूक आहे, असं मी म्हणतो. कारण, सशस्त्र लढाया यापुढे जगामध्ये माणसाला नाशाकडे नेतील असं माझं मत आहे. म्हणून मी आता पूर्ण गांधीवादी आहे. जगात शस्त्रवाद नकोच.''[८] या संदर्भातील अधिक तपशिलांसाठी जिज्ञासूंनी 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' (खंड-७) - लेख संग्रह (तात्त्विक व राजकीय) ची 'गत वारशावर जगण्याचा काळ सरला' शीर्षक प्रस्तावना वाचावी.

'विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि महात्मा जोतिबा फुले' परिसंवादात बीजभाषक द. न. गोखले यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांना देशाभिमानी, तर महात्मा जोतिबा फुले

यांना समाजसुधारक रूपात चित्रित केले आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी देशाभिमानाइतकीच समाजसुधारणा महत्त्वाची असल्याचे विशद करून दोघांप्रती समान भाव व्यक्त केला आहे. तर्कतीर्थांनी 'ज्योती निबंध' (भाषण - १९४७) व 'ज्योतिचरित्र' (१९९२) लिहून महात्मा जोतीराव फुले यांच्याबद्दलचा आदर व्यक्त केला आहे. चरित्राच्या उपसंहारात त्यांनी म्हटले आहे की, 'सामाजिक समता, बुद्धिप्रामाण्यवाद आणि मानवी एकता या आधुनिक विश्वमानवी समाजाला एकरूपता देणाऱ्या मूल्यांचा महामेरू जोतिराव फुले होते.'[९] तर्कतीर्थांची 'केसरी'चे पंचानन' शीर्षक एक मुलाखत आहे. त्यात त्यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांबद्दल आदरभाव व्यक्त करीत म्हटले आहे की, "अवघ्या ३२ वर्षांच्या जीवनामध्ये राजकारण, मराठी साहित्य व भाषा, नियतकालिकातील व्यवसाय, इतिहासदृष्टी या क्षेत्रात प्रभावी कर्तृत्वाच्या विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यासारख्या व्यक्ती महाराष्ट्राच्या इतिहासात फारच थोड्या सापडतील"[१०] ही दोन्ही मते मूळ परिसंवादातील मतांशी सुसंगतच आहेत.

'भारताचे महासंघाद्वारे पुनर्एकीकरण' (पूर्वा, १९८५) परिसंवादात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना हे स्वप्न अनिष्ट व अशक्य वाटण्यात त्यांचा गेल्या सुमारे सहा दशकांतील (१९२५ ले १९७५) सक्रिय राजकीय सहभाग व अनुभव कारणीभूत आहे. तो एक प्रकारचा त्यांचा निर्णय नि निष्कर्षही होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी राजकीय विषयांवर भाषणे दिलीत, मुलाखती दिल्यात, तसेच लेखही लिहिलेत. 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पातील संबंधित विविध खंडांमध्ये जिज्ञासू वाचकांना वाचण्यास ते उपलब्ध आहेत. हे लेखन राज्यपद्धती, राजकारणी व्यक्ती राजकीय पक्ष, राजकीय विचारप्रणाली असे वैविध्यपूर्ण आहे. भारतीय संघराज्य स्थापनेची कल्पना सन १९३५ च्या 'भारत सरकार कायदा' अन्वये प्रथमतः सुचविण्यात आली होती. या कायद्यान्वये भारतात प्रांतिक सरकार अस्तित्वात आले. यात काँग्रेसचे वर्चस्व होते; पण ब्रिटिश सरकारशी मतभेद होऊन या सरकारांनी सन १९३७ मध्ये राजीनामे दिले. संघराज्य संकल्पनेस मुस्लीम लीगने प्रथमपासूनच विरोध दर्शविला होता. याची अंतिम परिणती भारत-पाकिस्तान फाळणीमध्ये आपणास पाहावयास मिळते. तर्कतीर्थ या सर्व उलाढालींत, राजकारणात सक्रिय होते व ते त्या काळात गांधीसमर्थक असल्याने संघराज्य कल्पना समर्थकही होते. मुस्लीम लीगच्या संघराज्य (फेडरेशन) विरोधी भूमिकेवर 'मुस्लीम लीगचे नवे तंत्र'[11] शीर्षकलेखही लिहिल्याचे दिसते.

या सर्व मतसंग्रहातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा विविधविषयक दृष्टिकोन जसा व्यक्त होतो, तसाच त्यांचा विविध क्षेत्रीय संचार, कार्य, विचारासंबंधी व्यासंगही स्पष्ट होतो. यातून दिसून येणारे तर्कतीर्थ हे स्वातंत्र्योत्तर काळातील पुरोगामी प्रबोधक म्हणून पुढे येतात. साहित्य, राजकारण, समाजकारण अशा सर्व क्षेत्रांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी संयत, समन्वयी परंतु सुधारक वृत्तीची राहिली आहे. त्यांच्याबरोबर परिसंवादात भाग घेणारे

विचारवंत आपापल्या क्षेत्रातील विशेषज्ञ होते खरे; पण तर्कतीर्थांसारखे बहुआयामी चिंतन, मनन, कार्य फार कमी व्यक्तींमध्ये आढळते. ही बहुश्रुतता व व्यक्तिमत्त्वाचे अष्टपैलुत्व त्यांचे वेगळेपण सिद्ध करते. यातूनच प्रत्येक विषयाकडे पाहण्याची व तो मांडण्याची त्यांची स्वतंत्र शैली व दृष्टिकोन त्यांना अन्य समकालीनांपेक्षा वेगळा प्रज्ञावंत माणूस सिद्ध करतो.

क) व्यक्तिलेख

व्यक्तिलेख लिहिण्याची वैश्विक साहित्यातील परंपरा इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापासून आढळते. चीनमध्ये सर्वप्रथम असे लेख लिहिले गेले. नंतर ग्रीक, रोमन भाषेत असे व्यक्तिलेख आढळतात. इंग्रजीत व्यक्तिलेखास 'Biographical sketch' अशी संज्ञा प्रचलित आहे. समाजाच्या सांस्कृतिक जीवनात मोलाची भर घालणाऱ्या व्यक्तीची माहिती वा योगदान समजावून सांगण्यासाठी समाजहितैषी व्यक्ती वा साहित्यकार अशा प्रकारचे लेखन करतात. मराठी साहित्येतिहास वा साहित्यशास्त्राचा विचार करता असे लेखन 'ललितगद्य' सदरात अंतर्भूत होते.[१२] व्यक्तिलेख सर्वसाधारणपणे व्यक्तीला आलेल्या अनुभव, प्रचितीवर आधारित असतात. मराठीत 'व्यक्ती आणि वल्ली', 'सगे-सोयरे', 'जिगसाँ'सारखे व्यक्तिचित्र संग्रह उपलब्ध आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेले व्यक्तिलेख सांस्कृतिक महत्त्वाचे असून ते राजकारण, समाजकारण, धर्मकारण, इतिहास, शिक्षण, साहित्य, चित्रकला, योग व अध्यात्म, पत्रकारिता क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांवर आधारित असून, त्यांच्याप्रती आदर, कृतज्ञताभाव व्यक्त करण्याच्या उद्देशाने ते लिहिले गेले आहेत. सुमारे ५० असे लेख त्यांनी लिहिलेले संदर्भ आढळतात. ते सर्व या खंडात संग्रहित आहेत. त्यांचा काळ सन १९३९ ते १९९३ असा ५४ वर्षांचा आहे.

व्यक्तिलेख चरित्रलेखनाचेच संक्षिप्त रूप होय. चित्रकलेतील व्यक्तिचित्राशी (Portrait) त्याचं साम्य सांगता येईल. त्यात बाह्य चित्रण असते. व्यक्तिलेखात जीवन, व्यक्तिमत्त्व, कार्य, विचार, योगदान या सर्वांचा समावेश असतो. व्यक्तिलेख लिहिणारी व्यक्ती ज्याच्याबद्दल लिहिते, त्या व्यक्तीच्या अनेक अप्रकाशित पैलूंवर लिहिण्याचा प्रयत्न असतो. जिज्ञासूंसाठी असे लेख कुतूहलवर्धक राहिले आहेत. अशा लेखनातून त्या व्यक्तीच्या सांस्कृतिक मूल्यमापनाचा प्रयत्न असतो.

"A Biographical Sketch is an account of the life and activities of a person. It would include information about the person his/her name, place of residence, education, occupation, life and activities, as well as other important details. It is the story person, always written by someone else and never by the person about whom it is written"[13]

मराठी साहित्यात असे विपुल व्यक्तिलेख लिहिले गेले आहेत. वि. स. खांडेकरांचे व्यक्तिलेखसंग्रह 'साहित्यशिल्पी', 'जीवनशिल्पी', 'समाजशिल्पी' उपलब्ध आहेत. तर्कतीर्थांचे व्यक्तिलेख याच पठडीतील आहेत.

❍ राजकारण

राजकारणातील राष्ट्रीय काँग्रेस, गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद, रॉयवादसारख्या राजकीय पक्ष आणि विचारधारांशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा निकटचा संपर्क नि सक्रिय सहयोग राहिला आहे. अशा क्षेत्रांतील कॉ. मानवेंद्रनाथ रॉय, पंडित जवाहरलाल नेहरू, स्टॅलिन, विनोबा, यशवंतराव चव्हाण, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकनायक बापूजी अणे प्रभृती मान्यवरांबद्दल लिहिलेले तर्कतीर्थांचे व्यक्तिलेख प्रसिद्ध आहेत.

२१) जागतिक कीर्तीचे पहिले हिंदी क्रांतिकारक : कॉम्रेड मानवेंद्रनाथ रॉय

मानवेंद्रनाथ रॉय यांच्यावर १) जागतिक कीर्तीचे पहिले हिंदी क्रांतिकारक : कॉम्रेड मानवेंद्रनाथ रॉय (साप्ताहिक अग्रणी, पुणे, १८ डिसेंबर, १९३९- पृ.१० ते १२), २) मानवेंद्रनाथ रॉय (मासिक नवभारत, वाई, एप्रिल; १९५४- पृ. १ ते १५), ३) First Philosopher of Modern India M. N. ROY : Philosopher Revolutionary by Sibhabayah Bay, Renaissance Publisher, Culcutta,1, 1959), ४) मानवेंद्रनाथ रॉय : तत्त्वज्ञ व राजकीय द्रष्टे (साप्ताहिक साधना, पुणे, २१ मार्च १९८७ - पृ. ९ ते १४) असे चार व्यक्तिलेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी लिहिलेले आहेत.

या पहिल्या लेखात तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे की, मानवेंद्रनाथ रॉय आंतरराष्ट्रीय पातळीवरचे राजनीतिज्ञ होते. सन १९३१ मध्ये ते चीन, रशिया, जर्मनी, स्पेन, मेक्सिको येथील क्रांत्यांनंतर कम्युनिस्ट पक्षाशी मतभेद झाल्यानंतर भारतात परत आले. इथे त्यांना कानपूर खटल्यात अटक होऊन ६ वर्षे तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगातून सुटून आल्यावर त्यांचा नि तर्कतीर्थांचा परिचय झाला. चार वर्षांच्या अल्प परिचयावर आधारित हा लेख प्रामुख्याने मानवेंद्रनाथ रॉय यांचे साहित्य व सहवास, साहचर्य यावर आधारित आहे. त्यात मानवेंद्रनाथ रॉय यांचे जीवन, कार्य, शिक्षण, विद्वत्ता इत्यादी बाबींची चर्चा करीत त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव तर्कतीर्थांवर कसा पडला, याची चर्चा या लेखात आहे. त्यानुसार मानवेंद्रनाथ जगभर अनेक मोठ्या नेत्यांच्या संपर्कात कसे होते, ते लक्षात येते. मानवेंद्रनाथ रॉय यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक होते. संपर्कात येणाऱ्या प्रत्येकावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मोहिनी पडत असे. मानवेंद्रनाथ रॉय यांचे उत्तरायुष्य अत्यंत खडतर परिस्थितीत गेले. या काळात त्यांची पत्नी एलन रॉय यांनी त्यांना जी साथ दिली, ती अवर्णनीय असल्याची नोंद तर्कतीर्थांनी या लेखाच्या शेवटी केली आहे.

२२) पंडित जवाहरलाल नेहरू यांचे थोर व्यक्तित्व

'पंडित जवाहरलाल नेहरू यांचे थोर व्यक्तित्व' शीर्षक लेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९४९ मध्ये नेहरूंच्या षष्ट्यब्दीपूर्तीच्या निमित्ताने लिहिला होता. यात नेहरूंच्या समर्पणपर व्यक्तित्वाचा ऊहापोह करण्यात आला आहे. तर्कतीर्थांच्या मनात नेहरूंबद्दल असलेला प्रेमादर स्पष्ट होतो.

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे उच्च शिक्षण विदेशात झालेले असल्याने तेथील संस्कृतीचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव होता. दुसरीकडे भारतीय संस्कारांचा पगडाही त्यांच्यावर होता. म्हणूनच त्यांनी भारतीय पद्धतीची विवाहपद्धती मान्य करून कमलादेवींचा स्वीकार केला. त्यांना आरोग्याचे वरदान नव्हते. तरी पितृभक्ती व पितृऋण स्वीकारून त्यांनी संसार केला. त्यांच्या घरात लक्ष्मी नि सरस्वतीचा संगम होता. ते पहिल्या देशव्यापी राजकीय चळवळीतून जनतेपुढे आले. त्यांच्या समर्पणवृत्तीने सर्वांना आकर्षित केले. त्यांच्या आकर्षणाचे आणखी एक कारण नवपाश्चात्त्य संस्कृतीचे वैचारिक पडसाद लखनौ काँग्रेससमोर दिलेले भाषण त्याचे अप्रतिम उदाहरण होय. स्वराज्यप्राप्तीनंतर ते कार्यकर्त्यांचे पंतप्रधान झाले. 'समरधीर वीर' म्हणून ते भारतीय जनतेस सामोरे गेले. काश्मीरप्रश्नी त्यांच्या राष्ट्रीयत्वाची परीक्षा झाली. त्यात ते उत्तीर्णही झाले. समाजवादी क्रांतीचे स्वप्न घेऊन ते भारत घडविताना दिसून येतात. वर्गहीन समाजनिर्मितीची ग्वाही त्याची साक्ष देते. ते परंपरेविरुद्ध बंड करण्यास कितपत तयार होतात, यावर त्यांचे स्वप्न सत्यात उतरणे अवलंबून आहे. सध्याचा काळ त्यांच्या अग्निपरीक्षेचा आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

समर्पणपर व्यक्तिमत्त्वात एक प्रकारची संकुचित राष्ट्रभक्ती असते. हिंदुस्थानच्या शांततेचा प्रश्न नाजूक आहे. समर्पणपर व्यक्ती असावधानपणे परिस्थितीचा अर्थ लक्षात न घेता काम करण्याचा संभव असतो. या सर्व विवेचनातून तर्कतीर्थ नेहरूंचे व्यक्तिमत्त्व समजावत साशंकता व्यक्त करतात. त्यामागे तर्कतीर्थांचे रॉयवादी मत आहे. ते रॉयवादातून बाहेर पडले, तरी काँग्रेसबद्दलची सावध भूमिका या लेखात सर्वत्र दिसते. "उच्च ध्येयवादाच्या स्वप्नमय स्वर्गातून उतरून या भूलोकीच्या क्षणभंगुर राजकीय डावपेचांत ते न सापडो" ही व्यक्त केलेली सदिच्छा षष्ट्यब्दीपूर्तीप्रसंगी अधिक महत्त्वाची ठरते. त्यातून व्यक्ती व देश या दोन्हींबद्दलची तर्कतीर्थांची प्रीती प्रत्ययास येते.

२३) स्टॅलिन : कम्युनिस्ट क्रांतीचा कारागीर

जोसेफ स्टॅलिन हा रशियन क्रांतीनंतर सन १९२७ पासून रशियाचा मुख्य सत्ताधीश होता. ५ मार्च, १९५३ रोजी त्याचा मृत्यू झाला. यानिमित्त तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेला लेख. मानवेंद्रनाथ रॉय काही काळ स्टॅलिनचे सहकारी म्हणून रशियात कार्यरत होते. कम्युनिस्ट इंटरनॅशनलशी त्यांचा संबंध होता. मानवेंद्रनाथ रॉय यांचा सहवास तर्कतीर्थांना सन १९३६ ते १९५४ असा १८ वर्षांचा लाभला. यातून व वाचन, चिंतन,

मननातून आणि विशेषतः मार्क्सवाद, रॉयवादामधून बाहेर पडून तर्कतीर्थ नवमानवतावादी बनल्यानंतरचा हा व्यक्तिलेख असल्याने त्याला मूल्यांकन व राजकीय आकलनाची बैठक आहे.

स्टॅलिनने १९०२ ते १९१७ या कालखंडात रशियन क्रांतीस साहाय्य केले. सन १९१७ नंतरच्या रशियाच्या उभारणीत स्टॅलिनचा सिंहाचा वाटा होता. लेनिननंतरचे स्टॅलिनचे कर्तृत्व म्हणजे त्यांनी पूर्व युरोप कम्युनिस्ट केला. रशियाच्या उभारणीसाठी स्टॅलिनने शेती व उद्योगाची सांगड घातली. श्रमिकांना किमान वेतन देऊन राष्ट्रीय संपत्ती वाढविली. रशिया एक बलाढ्य राष्ट्र बनविले. विरोधकांचे त्यांनी शिरकांड केले. या लेखात तर्कतीर्थ करीत असलेली विभूतिपूजा ही मानवेंद्रनाथ रॉय नि स्टॅलिन मैत्रीचा प्रभाव होय.

विसाव्या शतकाचा मध्यकाळ हा कम्युनिझमच्या वर्चस्व आणि मोहिनीचा होता. शोषण व विषमतेस तेच एक उत्तर, अशी वैश्विक धारणा होती; पण व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप व शोषण करणारी एक राजसत्ता जाऊन दुसरी आली, याचे जगास भान व्हायला फार उशीर झाला. सदर लेखात स्टॅलिनची तुलना रामचरित्राशी करून तर्कतीर्थांनी आपल्या एकांगीपणास अधोरेखित केले आहे. लेखाच्या शेवटी भले तर्कतीर्थ मानवतावादी मूल्यांना दुय्यम स्थान देण्याच्या कम्युनिस्ट वृत्तीस दूषणे देत असले, तरी या व्यक्तिलेखाचा भर स्टॅलिनच्या गौरवीकरणावर आहे, हे कोण नाकारेल? मार्क्सवाद, क्रांती, हिंसा यांचं गारूड असण्याच्या काळातलं हे लेखन होय. त्याचं समर्थन होऊ शकत नाही. मतांतराच्या काळातलं हे लेखन त्यांच्या प्रांतीच्या अंध भक्तीचं उदाहरण होय. तर्कतीर्थांना स्टॅलिनमध्ये 'मनुष्यत्व' आढळले, यावर कोण विश्वास ठेवणार?

२४) जुन्या जगाची बंधने तोडणारा तत्त्वद्रष्टा : मानवेंद्रनाथ रॉय

मानवेंद्रनाथ रॉय यांचे २५ जानेवारी, १९५४ रोजी डेहराडून येथे निधन झाल्यानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पित करीत लिहिलेला हा अभिवादन लेख. तो मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिक 'मौज'च्या ३१ जानेवारी, १९५४ च्या अंकात लगोलग प्रसिद्ध झाला होता.

मानवेंद्रनाथ रॉय यांचे भारतीय प्रजासत्ताकाच्या चौथ्या वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येस (२५ जानेवारी) निधन झाले. त्यांनी या प्रजासत्ताक स्थापनेसाठी संघर्ष केला होता. या संघर्षात ते वयाच्या १४ व्या वर्षी सामील झाले होते. ज्येष्ठ क्रांतिकारक जतिंद्रनाथ दास यांची त्यांना प्रेरणा होती. सन १९१२ मध्ये ते सशस्त्र क्रांतीच्या प्रेरणेने सक्रिय झाले. नंतर त्यांनी चिनी नेते सन यत् सेन यांच्या प्रभावाने देशांतर करून सशस्त्र क्रांतीत सहभाग घेतला. क्रांतीचा गांभीर्याने अभ्यास केला. मार्क्सवाद अभ्यासला; पण त्यास ते शरण गेले नाहीत. स्वतंत्र विचार हे त्यांचे प्रथमपासून व्यक्तिमत्त्व बनून राहिले. लेनिन व स्टॅलिनविरोध या स्वतंत्र

बाण्यातूनच आला. त्याची परिणती पुढे रशियन कम्युनिस्ट राज्यकर्ते व जागतिक कम्युनिस्ट संघटनांच्या दुराव्यात झाली. परिणामी, ते भारतात परतले. सन १९३७ साली भारतीय राजकारणात त्यांनी सक्रिय सहभागास आरंभ केला. काँग्रेसशी मतभेद होऊन त्यांनी सन १९४० मध्ये 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी' स्थापन केली, ती १९४८ पर्यंत सक्रिय राहिली. आपल्या पक्षाचे विसर्जन करून त्यांनी नवमानवतावाद अंगीकारला. 'मानवी सृष्टीचे जीवन दृष्टी हे आहे' असे रॉय मानत. भारतीय मानस वेदान्तातून मुक्त होऊ शकले नाही. मात्र, रॉय मुक्त झाले. त्यांची स्वतंत्र प्रज्ञा हेच त्यांचे बौद्धिक सामर्थ्य होते. भारतीय स्वतंत्र्यातील दोषांचे निराकरण आणि नवमानवतावादाची प्रस्थापना हे त्यांचे शेवटचे स्वप्न होते.

तर्कतीर्थांनी या व्यक्तिलेखात मानवेंद्रनाथ रॉय यांचे समग्र जीवन, विचारप्रवास संक्षेपाने चित्रित केला आहे. ते रॉय यांचे निकटवर्ती सहकारी व सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांच्या विचार, आचारांचा तर्कतीर्थांवरील प्रभाव म्हणजे त्यांचे पुरोगामी होणे होय.

२५) मानवेंद्रनाथ रॉय

मानवेंद्रनाथ रॉय यांच्यावर लिहिलेला दुसरा लेख हा पंधरा वर्षांनंतरचा. त्यांच्या निधनानंतर लिहिलेला हा श्रद्धांजलीपर लेख. दरम्यानच्या काळात मानवेंद्रनाथ रॉय यांच्या संपर्कात तर्कतीर्थांना येऊन दोन दशकांचा काळ उलटून गेलेला. एव्हाना तर्कतीर्थ मानवेंद्रनाथ रॉय यांनी स्थापन केलेल्या 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी'त सक्रिय पदाधिकारी होऊन कार्यरत झालेले. त्यातून ते मानवेंद्रनाथांचे निकटवर्ती बनले. त्यातून लक्षात आलेली गोष्ट अशी की, मानवेंद्रनाथ रॉय आजीवन क्रांतिकारी म्हणूनच जगले. चीन, जपान, इंडोनेशिया, फिलिपाईन्स, अमेरिकेसारख्या देशांमधून संघटन उभारून, संधान बांधून सशस्त्र उठावाचे प्रयत्न केले; पण त्यांना यश आले नाही. नंतरच्या काळात ते अमेरिका, मेक्सिको, जर्मनी, चीन, रशिया इ. ठिकाणी क्रांतीचे प्रयत्न करीत राहिले. लेनिन व स्टॅलिनशी त्यांचे मतभेद झाले व त्यांना भारतात येणे भाग पडले. भारतात येऊन त्यांनी काँग्रेस पक्षात कार्यरत राहून आपली विचारसरणी रुजवायचा प्रयत्न केला. परंतु नेहरू, पटेल, राजेंद्र प्रसाद प्रभृतींनी त्यांना आपल्यात वैचारिक मतभेद असल्याची जाणीव करून देऊन बाहेरचा रस्ता दाखविला. रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी त्यांनी सन १९४० ते १९४८ पर्यंत चालवून पाहिली. 'रॅडिकल ह्यूमॅनिस्ट'साररखी नियतकालिके, वृत्तपत्रे चालविली. (दै. संग्राम) आपल्या मत प्रचार-प्रसारार्थ सिमला येथे 'रेनायसान्स इन्स्टिट्यूट' काढली; पण भारतीय समाजमन हे क्रांती व हिंसा स्वीकारत नाही, हे लक्षात आल्यानंतर त्यांनी आपला पक्ष विसर्जित करून 'नवमानवतावाद' मांडला. आयुष्यभर विपुल लेखन केले. साम्यवादी विचाराचे बुद्धिजीवी हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख राहिली.

२६) गुरुवर्य श्री. विनोबा यांच्यासंबंधी काही स्मृतिशेष

आचार्य विनोबा भावे यांची षष्ट्यब्दीपूर्ती सन १९५५-५६ मध्ये होती. त्यानिमित्त एक गौरवग्रंथ प्रकाशित होणार होता; पण काही कारणाने तो अप्रकाशित राहिला. पुढे 'नवभारत' मासिकात ऑक्टोबर, २००० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. नंतर २७ जानेवारी २००१ मध्ये 'नवभारत'च्या 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक'मध्ये तो पुनर्प्रकाशित करण्यात आला होता.

या व्यक्तिलेखातील आठवणींनुसार नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती यांनी सन १९१६ मध्ये प्राज्ञपाठशाळेची स्थापन आपल्या अंतेवासी शिष्यांच्या साहाय्याने सुरू केल्यानंतर प्रस्थानत्रयी (उपनिषद्, श्रीमद्भागवत व ब्रह्मसूत्र) श्रवणार्थ आले होते. इथे त्यांनी 'शांकरभाष्य'चे अध्ययन केले. त्यावेळी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व इतिहासकार ग. ह. खरे यांचे सहाध्याही होते. प्लेगच्या साथीच्या काळात प्राज्ञपाठशाळा वाई गावाबाहेर कृष्णातीरावर उभारण्यात आलेल्या राहुट्यांत स्थलांतरित झाली; पण विनोबा कोटेश्वर मंदिरात त्या काळात राहात. तेथेच राहून ते ये-जा करीत. विनोबा पठन-पाठन उत्कृष्ट करीत. भाषणेही चांगली करीत. त्यांची दिनचर्या प्रखर तपस्व्याची असे. स्वाध्याय ते नियमित करीत. आहारात मीठ-मसाले पदार्थ वर्ज्य होते. पोशाख खादीचा होता. प्रभावी प्रार्थना करीत. "गीर्वाणवाणीचे इतके सुंदर उच्चारण ऐकले म्हणजे ही देववाणी आहे, असे प्रत्ययास येते" म्हणत गुरुजी त्यांची प्रशंसा करीत. वाक्पटुतेत हे इतरांना नामोहरम करीत. तशी विचक्षण प्रज्ञा त्यांच्यामध्ये होती. ते स्वभावाने एकांतसेवी होते. आरोग्य उपचारात ते निसर्गोपचारावरच भर देत असत. अध्यात्मविद्या आणि विविध भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. वाईस येण्यापूर्वी त्यांनी 'ज्ञानेश्वरी', 'गीतारहस्य'ची अनेक पारायणे केली होती. विनोबांच्या टिपणवह्या संदर्भाच्या दृष्टीने संग्राह्य असत.

सन १९१७ मध्ये विनोबा बडोद्यास परतल्यानंतर त्यांच्या नि त्यांच्या वडिलांकडे इंग्रजी शिकण्यासाठी काही महिने गेले होते. सन १९३१ च्या कायदेभंग चळवळीत अटक करून तर्कतीर्थांना धुळे तुरुंगात ठेवण्यात आले होते. तिथे विनोबांची नि त्यांची पुनर्भेट झाली. याच काळात त्यांनी दिलेली 'गीताप्रवचने' साने गुरुजींनी लिहून घेतली होती. ती पुढे प्रकाशित झाली. विनोबांशी त्यांचे वाद होत; पण वाद जिंकण्याची ईर्ष्या तर्कतीर्थांनी न कधी बाळगली कधी न कधी दाखविली.

२७) ध्येयवादी विचारवंत : आचार्य शंकरराव जावडेकर

आचार्य शंकरराव जावडेकर हे स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेस कार्यकर्ते. त्यांचे निधन १० डिसेंबर,१९५५ रोजी झाले. मासिक 'नवभारत'ने जानेवारी, १९५६ च्या अंकात आचार्यांबद्दल विशेष मजकूर प्रसिद्ध केला होता. सर्वश्री शंकरराव देव, आचार्य स. ज. भागवत, महामहोपाध्याय द. वा. पोतदार प्रभृतींबरोबर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीही या विशेष भागात लिहिले होते. तो हा व्यक्तिलेख होय.

आचार्य शंकरराव जावडेकर सन १९२० पासून गेली पस्तीस वर्षे राजकारण, समाजकारण, साहित्यक्षेत्रात सक्रिय होते. ते अजातशत्रू कार्यकर्ते होते. सर्व वादविचारांचा त्यांचा व्यासंग होता. समाजवाद, गांधीवाद, साम्यवादाचे अभ्यासक असलेल्या आचार्यांचा ओढा मात्र गांधीवादाकडे होता. स्वातंत्र्य चळवळीत वेळोवेळी चार वर्षांहून अधिक काळ ते तुरुंगात होते. ते अनेक दैनिक व नियतकालिकांचे संपादक होते. जन्मतः ते 'दग्ध किल्बिश' (दोषमुक्त) राहिले. 'मनुष्याणाम सहस्रेषु' असं त्यांचं वर्णन शंकरराव देव यांनी केलं होतं. आचार्य जावडेकर स्वतंत्र प्रज्ञेचे गृहस्थ होते. सर्वोदय नि मार्क्सवाद असा समन्वयी समाजवाद त्यांना अपेक्षित होता. सन १९२० ते १९३७ हा दोन महायुद्धांमधील काळ टिळक नि गांधी संप्रदाय विग्रहाचा होता. आचार्यांची अशी धारणा होती की, 'टिळकांच्या राजकारणाचा खराखुरा वारसा हा गांधीजींच्याच वाट्यास आला आहे. टिळकांच्या जीवनाचे साफल्य गांधीजींच्या राजकारणातच उजळून दिसेल.' महात्मा गांधींच्या यतिधर्माचे (संयम) ते समर्थ उपासक होते. सन १९४९ मध्ये पुण्यात संपन्न ३२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. आपल्या भाषणातून त्यांनी क्रांतिरसाचे दर्शन घडविल्याचे तर्कतीर्थांनी या व्यक्तिलेखात नमूद केले आहे.

'आधुनिक भारत', 'राजनीतिशास्त्र परिचय', 'राज्यशास्त्र मीमांसा' हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांचे खासगी व सार्वजनिक चारित्र्य शुद्ध होते. त्यांचा मोठा चाहता वर्ग होता. 'विवेकदीप मंदावला' अशा सार्थ शब्दांत त्यांना मृत्यूनंतर वाहिली गेलेली श्रद्धांजली त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा उचित गौरव होता. निर्विकार, निरपेक्ष, प्रज्ञायुक्त स्नेही म्हणून असलेला त्यांचा लौकिक व त्यांना लाभलेली सत्शील पत्नी यामुळे आचार्यांचे जीवन व व्यक्तिमत्त्व अनुकरणीय ठरत आले आहे.

२८) साठीच्या उंबरठ्यावरील तरुण : माधवराव बागल

प्रसिद्ध लेखक, चित्रकार, कोल्हापूर संस्थानातील प्रजा परिषदेचे नेते भाई माधवराव बागल यांचा जन्म २८ मे, १८९५ चा. त्यांची षष्ठ्यब्दीपूर्ती सन १९५६ ला कोल्हापुरात झाली. ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचे स्नेही. त्यांच्या साठीपूर्तीप्रीत्यर्थ तर्कतीर्थांनी 'मौज' साप्ताहिकाच्या २७ मे, १९५६ च्या अंकात लिहिलेला हा गौरव लेख.

साठीपूर्तीबद्दल भाई माधवराव बागल यांचे अभीष्टचिंतन करीत तर्कतीर्थ या व्यक्तिलेखात लिहितात की, त्यांचे मन नि शरीर साठी ओलांडली तरी ताठ आहे. ते संयुक्त महाराष्ट्र निर्माण समितीचे आघाडीचे जोमदार नेते होते. त्यांचे आणि माझे ऋणानुबंध गेल्या पंचवीस वर्षांचे. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात त्यांना विशिष्ट असे स्थान आहे. ते कोल्हापूरच्या राजकीय व सामाजिक चळवळीचे धडाडीचे नेते. त्यांचे वडील खंडेराव बागल सत्यशोधक. हा वारसा त्यांना पैतृक परंपरेनेच लाभाला. स्वातंत्र्य चळवळ, असंतोष आंदोलन, प्रजा

परिषद, काँग्रेस, संयुक्त महाराष्ट्र चळवळ अशांशी त्यांचा निकटचा संबंध राहिला. यांतून त्यांचे नेतृत्व उदयाला आले. नंतरच्या काळात त्यांनी काँग्रेसशी फारकत घेतली. ते क्षुब्ध जनसमुदायाचे अनभिषिक्त नेते म्हणून कार्यरत राहिले. 'राष्ट्रीय निष्ठा म्हणजेच महाराष्ट्र निष्ठा' हा विचार त्यांनी आपल्या कृतीने रुजविला. त्यांनी व्यक्तींबद्दल मते बनविताना घाई केली. अशी मते कालौघात खरी तर बनायला हवीत. त्यासाठी संयम हवा.

भाई माधवराव बागल यांच्या विचारसरणीवर आंतरराष्ट्रीय समाजवाद, मानवतावादाचा प्रभाव दिसून येतो. परंतु, मानसिक संस्कार 'मी अस्सल मराठा आहे' या अभिमानावर उभे आहेत. एक व्यापक विचारसरणी त्यामुळे झाकाळून जाते. अशी अनेक व्यक्तिमत्त्वे महाराष्ट्रात आहेत. राजकारण, समाजकारणापलीकडचे माधवराव खंदे वक्ते, मनस्वी लेखक व संवेदी चित्रकार आहेत. गेली तीन दशके वृत्तपत्रीय लेखन करून खंबीर पत्रकार म्हणून त्यांची प्रतिमा उदयाला आली आहे. या लेखनाच्या मुळाशी समाजसुधारणा, दलितोद्धाराची भावना आहे. ते जातिभेदास स्वराज्याचा शत्रू मानत. 'कला नि कलावंत' हे त्यांचे व्यवच्छेदक लेखन होय. ते निसर्गप्रेमी चित्रकार आहेत. त्यांच्या चित्रात नद्या, डोंगर, मंदिरे, कृषी संस्कृती आहे. त्यांना सरस्वती प्रसन्न होती, तशी लक्ष्मी नाही. कौटुंबिक स्वास्थ्य अपवाद लाभले. तरी ते हिमतीने व जोमाने जगत आहेत. त्यांना दीर्घ जीवन लाभो.

२९) वेदवेत्ते टिळक

लोकमान्य टिळक हे भारतात इंग्रजी शिक्षण सुरू झाल्यानंतर पहिल्या एक-दोन पिढीतील मान्यवरांपैकी एक होत. त्यांची जन्मशताब्दी सन १९५६ ला साजरी करण्यात आली. या निमित्ताने मराठी ग्रंथसंग्रहालय, हैदराबादमार्फत प्रकाशित होणाऱ्या 'प्रतिष्ठान' मासिकाने 'लोकमान्य टिळक विशेषांक' प्रकाशित केला होता. त्यातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा हा व्यक्तिलेख.

लोकमान्य टिळकांचा भारताला असलेली ओळख ही स्वातंत्र्यलढ्यातील प्रखर नेते, आक्रमक पत्रकार, संपादक म्हणून अशी आहे, तशी 'गीतारहस्य'मुळे तत्त्वज्ञानी मीमांसक म्हणूनही आहे; पण या प्रचलित ओळखीपेक्षा लोकमान्यांची नवी ओळख 'वेदवेत्ते' म्हणून तर्कतीर्थ येथे करून देतात. लोकमान्य टिळकांनी वेद वाङ्मयावर आधारित तीन मूलभूत स्वरूपाच्या ग्रंथांचे लेखन केले होते, हे फार कमी लोक जाणत असावेत. ते तीन ग्रंथ होते. १) मृगशीर्षकाल अथवा वेदकालनिर्णय. (The Orion or Researches into the Antiquities of the Vedas) २) वैदिक कालानुक्रम व वेदांगज्योतिष (Vedic Chronology and Vedang Jyotisha) ३) आर्यांचे उत्तर ध्रुव प्रदेशातील मूलस्थान (Arctict Home in the Vedas). पैकी पहिल्या दोन ग्रंथांत गणित ज्योतिष, खगोलशास्त्र व तुलनात्मक पुराणकथाशास्त्र यांच्या आधारे भारतीय आर्यांच्या अतिप्राचीन कालाची गणना निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. या ग्रंथांनुसार हा काळ इ. स. पूर्व सहा हजार

वर्षे ठरविण्यात आला आहे. तर तिसऱ्या ग्रंथाच्या आधारे लोकमान्य टिळकांनी भूस्तरशास्त्र व मानवजातीचा पाश्चात्त्यांनी शोधलेल्या इतिहासाचे साहाय्य घेऊन वेदांतील व जगातील प्राचीन धर्मग्रंथसंग्रह व पुराणे यांच्यातील कथांचा तुलनात्मक अभ्यास करून आर्यांचे मूल उगमस्थान निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर ग्रंथांची तुलना याकोबी आणि विंटरनिट्झ यांच्या लेखनाशी करता येते. लोकमान्य टिळकांच्या या संशोधनाची भारतीय पंडितांनी केलेल्या उपेक्षेबद्दल सदर लेखात तर्कतीर्थ नाराजी व्यक्त करतात, ती योग्यच आहे. 'गीतारहस्य'इतकेच वरील ग्रंथ नवी मांडणी करणारे आहेत. लोकमान्य टिळक आपल्या सार्वजनिक सामाजिक कार्यातून संशोधनास कसा नि कधी वेळ काढत, हाच मुळी संशोधनाचा विषय होऊन राहतो.

३०) समतोल, समंजस राज्यकर्ता : यशवंतराव चव्हाण

स्वातंत्र्यचळवळीत यशवंतराव सक्रिय झाले तेच मुळी मिठाच्या सत्याग्रहसंबंधीची तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रखर भाषणे ऐकून. सातारा जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यात उभयतांचा सहभाग होता. मध्यंतरी वैचारिक मार्ग भिन्न होऊन दोघे दोन पक्षांत कार्य करीत राहिले, तरी उभयतांमधील स्नेह कायम होता. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात काँग्रेसचा पक्ष घेऊन दोघे हिरिरीने लढले. द्वैभाषिक आणि स्वतंत्र महाराष्ट्र स्थापना काळात तर्कतीर्थ यशवंतराव चव्हाण यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. अशा संबंधांतून समजलेले, उमजलेले नामदार यशवंतराव चव्हाण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अनेक व्यक्तिलेखांतून चित्रित केले आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९५७ ते १९८४ अशा सुमारे तीन दशकांच्या काळात यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन, कार्य, विचारांचा वेध घेणारे चार लेख लिहिल्याचे आढळते. १) समतोल, समंजस राज्यकर्ता : यशवंतराव चव्हाण (मौज साप्ताहिक, मुंबई, ७ फेब्रुवारी, १९५७), २) राजकीय सहभागी : यशवंतराव चव्हाण (अभिनंदन ग्रंथ, १२ मार्च, १९६१), ३) शुद्ध चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी : यशवंतराव चव्हाण (नवभारत, मार्च, १९८५), ४) आदर्शाच्या प्रकाशात विकसित झालेले व्यक्तिमत्त्व : यशवंतराव चव्हाण (मराठी मातीचे वैभव : यशवंतराव चव्हाण स्मरण ग्रंथ, जुलै, १९८९).

'समतोल, समंजस राज्यकर्ता : यशवंतराव चव्हाण' हा लेख तर्कतीर्थांनी लिहिला तो नामदार यशवंतराव चव्हाण द्वैभाषिक महाराष्ट्राचे सन १९५६ ला मुख्यमंत्री झाले त्या निमित्ताने. त्या काळचा विचार करता वयाच्या मानाने त्यांना मुख्यमंत्री होण्याची संधी अवघ्या ४३ व्या वर्षी लाभली; पण स्वातंत्र्यलढा व स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील कार्याचा विचार करता निरंतर २६ वर्षांच्या दीर्घ कार्यानंतरच त्यांना हा बहुमान लाभल्याचे स्पष्ट होते. तर्कतीर्थांप्रमाणेच यशवंतराव चव्हाण यांचा वैचारिक प्रवास काँग्रेस- रॉयवाद- काँग्रेस असाच राहिला असला, तरी आयुष्यभर ते काँग्रेसीच राहिले. मिठाचा सत्याग्रह कायदेभंग

चळवळ, भारत छोडो आंदोलनात एक स्वातंत्र्यसैनिक म्हणून जसे ते सक्रिय होते, तसे राजकारणात जिल्हा, राज्य अशी चढती कमान दिसते. द्वैभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा त्यांना लाभलेला सन्मान त्यांच्या संघटनकौशल्य व मनुष्यसंग्रहाचे फलित होय. असे असले तरी पक्षनिष्ठेपोटी त्यांना वेळोवेळी मोठी मानहानी सहन करावी लागली, हे विसरता येणार नाही.

नामदार यशवंतराव चव्हाण यांचे २५ नोव्हेंबर, १९८४ रोजी अल्पशा आजारानंतर निधन झालं. त्यानंतर येणाऱ्या पहिल्या जन्मदिनाचे औचित्य (१२ मार्च, १९८५) साधून महाराष्ट्र शासनाने आपले मुखपत्र असलेल्या लोकराज्याचा 'यशवंतराव चव्हाण स्मृती अंक' प्रकाशित केला. माझ्या आठवणीप्रमाणे तो मराठी, हिंदी, इंग्रजीत प्रकाशित करण्यात आला होता. ह्यातील हिंदी अंकात त्यांच्या 'कृष्णाकाठ' आत्मकथेवर समीक्षा व अन्य काही लेखन केल्याचे स्मरते. मराठी विशेषांकात 'शुद्ध चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी' शीर्षक श्रद्धांजलीपर व्यक्तिलेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिला आहे. हा लेख म्हणजे यशवंतराव चव्हाण यांच्या समग्र जीवन व कार्याचे मूल्यमापन आहे. यातला नवा पैलू त्यांच्या संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री, उपपंतप्रधान, विरोधी पक्षनेते, आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष, गृहमंत्रिपद, पत्नीवियोग यांचे ओझरते उल्लेख असले, तरी ते या लेखास समग्रलक्षी बनवितात.

३१) किसन वीर : खरा स्वातंत्र्यवीर

किसन महादेव वीर हे सातारा जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक, यशवंतराव चव्हाण यांचे खंदे समर्थक. यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे ते स्नेही व सहकारी. त्यांच्यावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दोन व्यक्तिलेख लिहिले आहेत. पैकी पहिल्याचा काळ व संदर्भ उपलब्ध नसला, तरी तो मजकूर लक्षात घेता सन १९५६ ते ५८ च्या दरम्यानचा असावा हे लक्षात येते. शिवाय तो निवडणूक प्रचार, प्रसिद्धीसाठी लिहिल्याचे आशयावरून समजते. दुसरा लेख हा श्रद्धांजली लेख असून, तो मासिक 'नवभारत'च्या जानेवारी, १९८०च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे.

पहिल्या व्यक्तिलेखाचे शीर्षक 'श्री किसन महादेव वीर : खरा स्वातंत्र्यवीर' आहे. किसन वीर हे मूळचे सातारा जिल्ह्यातील कवठे येथील रहिवासी. आकर्षक व्यक्तिमत्त्व, प्रखर देशभक्त म्हणून परिसरात त्यांचा लौकिक. सन १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीपासून स्वातंत्र्यलढ्यात व स्वातंत्र्यानंतर राजकारणात काँग्रेसी म्हणून सक्रिय. ग्रामीण भागात लोकशाही रुजविण्याचे त्यांचे कार्य वाखाणण्यासारखे. समाजवादी समाजरचनेतून समता आणण्याचा ध्यास व स्वप्न त्यांच्या लोककल्याणकारी वृत्तीची निजखूण. क्रांतिसिंह नाना पाटील यांचाही त्यांच्यावर प्रभाव होता. शुद्ध चरित्र नेता म्हणून लोक त्यांना मानत. वाई तालुक्याचे आमदार, खासदार म्हणून त्यांनी प्रतिनिधित्व केले; पण कायम पदमुक्त राहून

पक्ष संघटनेसाठी समर्पित राहिले, हे त्यांचे खरे मोठेपण. म्हणून ते खरे स्वातंत्र्यवीर! त्यांना भरघोस मतांनी निवडून द्यावे म्हणून लिहिलेला हा लेख असला, तरी तो वास्तवाधारित आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक क्षितिजावर स्वातंत्र्यपूर्व काळात अशी अनेक नररत्ने जन्माला आली की, ज्यांनी स्वार्थत्याग करून परार्थासाठी जीवन वेचले. ती परंपरा स्वातंत्र्योत्तर काळात लोप का पावली, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. नैतिकता नि स्वार्थत्याग या दोन मूल्यांचा मनुष्यघडणीत मोठा वाटा असतो नि असायलाच हवा. ही मूल्ये स्वातंत्र्यपूर्व काळातच बलवत्तर का होती? तर आजूबाजूस अनुकरणीय चरित्रे होती. शिवाय 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती'चे आकर्षण होते. आज आसपास अनुकरण करावे, अशा चारित्र्यांचा लोप ही आपली सामाजिक दिवाळखोरी होय. राजकारणात घराणेशाहीचे आपण स्तोम माजवू दिले ते व्यक्तिपूजेच्या प्रेमाने. समाजमन व्यक्तिनिरपेक्ष होऊन विचार व मूल्याधारित समाजव्यवहाराचा अंगीकार करू लागेल, तो सुदिन समजावा. स्वातंत्र्यपूर्व काळ हा धर्मप्रभावी, जातिवादी होता; पण स्वार्थनिरपेक्ष होता. आता सारीच पावले उलटी चालू लागल्याने समाज दिंडी देवाच्या आळंदीऐवजी चोराच्या आळंदीकडे वाट चालू लागला आहे. किसनवीर यांचे चरित्र आपणास या संदर्भात अंतर्मुख करते.

32) First Philosopher of Modern India : M. N. Roy

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्यावरील स्मृतिग्रंथात सन १९५९ मध्ये लिहिलेला संक्षिप्त लेख इंग्रजीत असून, त्यात त्यांनी रॉय यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अचूक वर्णन करताना म्हटले आहे की, "Every important stage of the public life of M. N. Roy was inspired by one or the other of leading idea of the modern world. Nationalism and communism are outstanding modern ideals elevated to secular religions. And Roy dedicated his thougsts and activities to these, until his acute intelligence and profound understanding could find the way to a new, noble and liberating philosophy. Roy is one of the greatest champions of reason of our times a symbol of nationalism."[14]

३३) प्रशांत आश्रमातील तपस्विनी : एलन रॉय

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या पत्नी एलन रॉय यांची सिमला येथील घरात अज्ञातांनी हत्या केली. त्यांचे वर्णन तर्कतीर्थांनी त्यांच्यावर लिहिलेल्या लेखशीर्षकात 'प्रशांत आश्रमातील तपस्विनी' असे केले, ते सार्थच म्हणावे लागेल. कारण, त्यांनी एखाद्या योगिनीप्रमाणे मानवेंद्रनाथ रॉय यांना साथ दिली. त्यांचे समर्पण हा रॉय यांच्याप्रती असलेला प्रेमभाव होता, त्यापेक्षा एका समाजहितैषीसाठी जीवन वेचण्याचा त्याग त्यांनी जीवनभर निभावला. तसा हा श्रद्धांजलीपर व्यक्तिलेख. यात त्यांनी एलन रॉय यांचे लेखन, कार्य, व्यक्तिमत्त्व

यांचा विस्तृत धांडोळा घेतला आहे. तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, एलनच्या ठायी अत्यंत सुसंस्कृत व समर्पित अशा स्त्रीत्वाच्या उत्कर्षाने सीमा गाठली होती. एलन विदेशी विदुषी, पण त्या पतीमुळे मनाने पूर्ण भारतीय झाल्या होता.

३४) राजकीय सहयात्री : यशवंतराव चव्हाण

नामदार यशवंतराव चव्हाण स्वतंत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून १ मे, १९६० रोजी पदारूढ झाले. १२ मार्च, १९६६ रोजी त्यांनी वयाची ४८ वर्षे पूर्ण केली. त्याचे औचित्य साधून एका गौरवग्रंथाचे संपादन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. त्यात त्यांनी 'राजकीय सहयात्री' शीर्षक व्यक्तिलेख यशवंतराव चव्हाण यांच्यावर लिहिला. या लेखात तर्कतीर्थांनी त्यांचा राजकीय आलेख रेखाटला असला, तरी राजकारणातले आपले सहकारी, सहयात्री म्हणून केलेल्या नोंदी निरीक्षण म्हणून महत्त्वाच्या ठरतात. अल्पवयात यशवंतराव चव्हाण यांच्यामध्ये प्रौढ समंजसपणा दिसून येतो. सहकाऱ्यांबरोबर राजकीय, वैचारिक मतभेदाचे प्रसंग त्यांच्या जीवनात आले; पण स्नेहात त्यांनी मनभेदाची भिंत कधी उभारू दिली नाही. संघटना आणि राज्यघटना यांच्याशी अविचल निष्ठा सिद्ध करून त्यांनी आपली राष्ट्रीयता जपली. लोकशाही मूल्यांवर अढळ श्रद्धा स्पष्ट करीत सर्वसामान्य माणसासाठी सत्तेच्या उपयोगाचा जपलेला, जोपासलेला विवेक अनुकरणीय ठरतो. एकाच वेळी धीरोदात्तपणा आणि माधुर्य यांचे अपवाद मिश्रण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विकसित पावलेले दिसते. या नोंदी एका निकटवर्ती स्नेही, सहकार्याच्या असल्याने त्यामागे अनुभवजन्य वस्तुनिष्ठताही दिसून येते.

३५) कै. श्री. मारोतराव कन्नमवार

नामदार यशवंतराव चव्हाण यांना पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी सन १९६२ च्या चीन युद्धातील नामुश्की दूर करण्यासाठी म्हणून संरक्षण मंत्रिपदी नियुक्त केल्याने महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदी मारोतराव कन्नमवार यांची निवड झाली. त्यांचे देहावसान २४ नोव्हेंबर, १९६३ रोजी झाले. त्याप्रसंगी मासिक 'नवभारत'मध्ये लिहिलेला हा श्रद्धांजलीपर व्यक्तिलेख. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या लेखात त्यांच्या कर्तृत्वाचा व योगदानाचा आढावा घेतला आहे.

नामदार मारोतराव कन्नमवार हे मूल (जि. चंद्रपूर)चे. मूल-मरोडा परिसर मी सोमनाथ श्रम छावणीच्या निमित्ताने सन १९६७-६८ ला पाहिल्याचे आठवते. जंगलाने वेढलेला हा विकासवंचित प्रदेश. तिथे मारोतराव कन्नमवारांनी स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य आंदोलन संघटित केले होते. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी विदर्भात 'लोकसेवक' (१९३४), 'नवसंदेश' (१९४८), 'ग्रामसेवक' (१९५३)सारखी वृत्तपत्रे चालवून लोकजागरण केले. स्वतः अल्पशिक्षित असताना उच्चशिक्षित सहकारी मंत्रिमंडळात एकोपा निर्माण करून

त्यांनी आपले नेतृत्व सर्वसमावेशक असल्याचे दाखवून दिले. सत्तास्पर्धेत महत्त्वाकांक्षी सहकाऱ्यांची कमी नसते.

गटातटांचे राजकारण आणि कुरघोडीतून विकासाचा राजशकट हाकणे कठीण असते खरे; पण तेही नामदार कन्नमवार यांनी करून दाखविले, असे या लेखात तर्कतीर्थांनी नमूद केले आहे. राजमाता जिजाऊ स्मारक शिंदखेड राजा येथे उभारून कन्नमवार यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचे स्मारक अमर केले. नामदार यशवंतराव चव्हाण मंत्रिमंडळात ते आरोग्यमंत्री असतानाही त्यांनी आपली कार्यक्षमता सिद्ध केली. नामदार कन्नमवार यांचे मुख्यमंत्री होणे हे महाराष्ट्राच्या प्रादेशिक न्याय समतोलत्वासाठी आवश्यक होते. त्यामुळे विदर्भवादी शांत व थंड होण्यास साहाय्य झाले. ही राजकीय प्रगल्भता राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक असते. मुख्यमंत्री म्हणून बरोबर एक वर्षाचाच कार्यकाळ नामदार कन्नमवार यांना लाभला. परंतु, अल्पकाळातही यथाशक्य कार्य करून त्यांनी महाराष्ट्राच्या त्यांच्यावरील ऋणाची अल्पांशाने उतराई केली. प्रादेशिक समतोल राखत त्यांनी चालविलेले महाराष्ट्र शासन त्यांच्या प्रशासनिक कौशल्याची चुणूक दाखवून गेली. तर्कतीर्थांनी स्मारक सूक्ष्म निरीक्षणातून त्यांचे स्थूल चरित्र रेखाटले आहे.

३६) दिवंगत लालबहादूर शास्त्री

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र भारताचे पंतप्रधान म्हणून धुरा स्वीकारली. १५ ऑगस्ट, १९४७ ते २७ मे, १९६४ असा मृत्यूपर्यंतचा सुमारे १८ वर्षांचा कालखंड त्यांना पंतप्रधान म्हणून कार्य करण्यास लाभला. या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवरही ते शांतिदूत म्हणून ओळखले गेले. त्या काळातच त्यांचे उत्तराधिकारी कोण, अशी चर्चा सुरू होती; पण नेहरूंच्या अचानक निधनाने अनपेक्षितपणे लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. सन १९६५ च्या भारत-पाक युद्धात 'जय जवान, जय किसान' घोषणा देत त्यांनी भारत एकसंध केला. नेहरूंना १८ वर्षे कार्य करता आले. लालबहादूर शास्त्रींना अवघे १८ महिने लाभले. सन १९६५ च्या भारत-पाक युद्धानंतर समेटाची चर्चा रशियातील ताश्कंदमध्ये सुरू असताना ११ जानेवारी, १९६६ रोजी त्यांचे अचानकपणे निधन झाले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्यांना श्रद्धांजली वाहत लिहिलेल्या 'नवभारत' (फेब्रुवारी, १९६६)च्या अंकातील व्यक्तिलेखात 'दिवंगत लालबहादूर शास्त्री'मध्ये यांचे सार्थ चित्र उभे केले आहे.

ऑक्टोबर, १९०४ रोजी लालबहादूर शास्त्रींचा जन्म झाला. त्यांचे वडील शारदाप्रसाद प्राथमिक शिक्षक होते. वाराणसीत लालबहादूर शास्त्री शिकले. ऐन तारुण्यातच त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली. लाला लाजपतराय यांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांच्या 'सर्व्हंट्स ऑफ दि पीपल्स' सोसायटीचे कार्यकर्ते झाले. सन १९३५ च्या सार्वत्रिक निवडणुकीत स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविला. भारताच्या पंतप्रधानपदी विराजमान झाल्यावर एक मनमिळावू व शालीन नेता म्हणून आपली प्रतिमा

देशाच्या जनतेच्या मनी-मानसी रुजवली. सन १९६५ चे पाक आक्रमण देश चेतवून परतवून लावले. हिंदू-मुस्लीम ऐक्याची भावना निर्माण करून एकात्म भावना वृद्धिंगत केली. त्यामुळे 'अमृतपुत्र' अशी सार्थ पदवी त्यांनी त्यांच्या सत्शीलतेतून संपादली. ते नेहरूंचे उत्तराधिकारी म्हणून आले; पण कार्य व विचाराने त्यांचे वारसदार बनले. 'लहान मूर्ती, थोर कीर्ती' असे त्यांच्या व्यक्तित्वाचे सार्थ वर्णन त्या काळात प्रचलित होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी श्रद्धेने लिहिलेला हा व्यक्तिलेख. त्यातील शब्दाशब्दांत शास्त्रींबद्दल असणारा आदर ओसंडत आहे, असे वाचताना लक्षात येते. 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती, तेथे कर माझे जुळती' अशी अनुभूती देणारा हा लेख बा. भ. बोरकरांचे शब्द सत्य सिद्ध करणारा!

३७) स्वातंत्र्यवीर सावरकर

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या तरुणपणाचा काळ लक्षात घेता ते प्रखर राष्ट्रवादी, क्रांतिकारक, चळवळे गृहस्थ होते. मार्क्सवाद आणि रॉयवाद प्रभावाचा त्यांच्या जीवनातील १९३६ ते १९४८ हा कालखंड आणि तत्पूर्वी स्वातंत्र्य चळवळीतील महात्मा गांधी प्रभावाची सन १९३० पासूनचा स्वातंत्र्यलढ्यातील सक्रिय सहभाग यांचा विचार करता स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल त्यांना आकर्षण वाटणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. तर्कतीर्थांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांवर तीन व्यक्तिलेख लिहिलेत- १) 'स्वातंत्र्यवीर सावरकर' ('नवभारत', एप्रिल, १९६६), २) 'द्रष्टा क्रांतिकारक' (स्वातंत्र्यवीर सावरकर दर्शन प्रतिष्ठान, पुणे-२१ जुलै, १९८६), ३) सावरकरांचा क्रांतिकारी समादेश ('मी पाहिलेले सावरकर', वीर गौरव समिती, पुणे- १६ मे, १९९०)

यातील हा पहिला लेख श्रद्धांजलीपर व्यक्तिलेख होय. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे निधन २६ फेब्रुवारी, १९६६ रोजी ११ वाजून १० मिनिटांनी मुंबई मुक्कामी झाले. त्यानंतर लिहिलेला हा लेख. स्वातंत्र्यवीरांनी प्रायोपवेशन करून आपली इहलोक जीवनयात्रा संपविल्याचे तर्कतीर्थांनी प्रारंभीच स्पष्ट केले आहे. सशस्त्र राष्ट्रीय क्रांती व निधर्मी हिंदू राष्ट्रवाद या दोन कल्पनांमध्ये त्यांच्या जीवनाचा समग्र अर्थव्यक्त होतो. इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनीचा आध्यात्मिक राष्ट्रवाद (Mystic Nationalism) त्यांनी स्वीकारला होता. '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हे पुस्तक त्या वेळच्या तरुणांची प्रेरणा ठरले होते. या ग्रंथाने विसाव्या शतकाचे नवे स्वातंत्र्यसमर निर्माण केले. आपल्या 'अभिनव भारत' संघटनेतर्फे त्यांनी क्रांतिकार्य चालविले. सन १९१० साली स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांना ५० वर्षांची जन्मठेपेची शिक्षा झाली. या काळाचे वर्णन त्यांच्या 'माझी जन्मठेप' या आत्मचरित्रात करण्यात आले आहे. नंतरच्या काळात सावरकरांनी सनातन पोथीनिष्ठेवर आघात करून विज्ञाननिष्ठेचा पुरस्कार केला व उपयुक्ततावादी नीतिशास्त्र अंगीकारले. राष्ट्र संवर्धनार्थ विज्ञान व तंत्रज्ञानाधारित यंत्रयुगाचा त्यांनी स्वीकार केला.

(सहासष्ट)

या लेखात तर्कतीर्थांनी स्वातंत्र्यवीरांच्या जीवनाचा संक्षिप्त आढावा प्रस्तुत करीत त्यांच्या विचार व दृष्टिकोनाची मीमांसा केली आहे. त्यांच्या विचारधारेत कालसंगत आधुनिकता दिसून येते.

३८) 'दास कॅपिटल'चा जनक : कार्ल मार्क्स

कार्ल मार्क्सलिखित जगप्रसिद्ध ग्रंथ 'दास कॅपिटल'ची जन्मशताब्दी सन १९६७ साली साजरी झाली. त्या निमित्ताने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दैनिक 'महाराष्ट्र टाइम्स', मुंबईच्या दि. १३ ऑगस्ट, १९६७ च्या अंकासाठी लिहिलेला हा लेख. तो एका ग्रंथाच्या निमित्ताने लिहिला असला, तरी त्या लेखाचे एकंदरित स्वरूप व्यक्तिलेखाचेच आहे. यात कार्ल मार्क्सच्या समग्र जीवनाचे सिंहावलोलन आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास युरोपमध्ये झालेले लोकशाही व समाजवादी विचारांचे उठाव ज्या कुणाला समजून घ्यावयाचे आहेत, त्यांना मार्क्स विचार अभ्यासाची पूर्वअट लागू होते. टॉमस पेन, रूसो, वॉल्टेयर इ. विचारकांची परंपरा कार्ल मार्क्सने सशक्तपणे विकसित केली. वृत्तकार, संपादक, साहित्यिक म्हणून केलेल्या कार्यामुळे कार्ल मार्क्सने एक तृतीयांश विश्व सामाजवादी विचारांचे बनविले. अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ म्हणून आज जग कार्ल मार्क्सकडे पाहात आहे. त्याचे विचार कितीही प्रखर व मानवी कल्याणाचे असले, तरी तत्कालीन सत्ताधीशांच्या दृष्टीने ते गैरसोयीचे होते, म्हणून कार्ल मार्क्सला नित्य एका देशातून दुसऱ्या देशात आश्रयासाठी स्थलांतरित व्हावे लागले. फ्रान्स, बोल्जिअम, जर्मनी, अमेरिका असे स्थानांतरित होत शेवटी इंग्लंडमध्ये विसावला. तिथेच त्याने आपल्या 'दास कॅपिटल' या जगश्रेष्ठ ग्रंथाची निर्मिती आयुष्याच्या संध्याकाळी केली. आपला शेवटचा श्वास त्याने सोडला तोही इंग्लंडमध्येच. १८६४चे कम्युनिस्ट इंटरनॅशनल त्याने गाजविले. वर्तमान समाजवादी विचारांचे जग ही कार्ल मार्क्सनिर्मित सृष्टी होय.

कार्ल मार्क्सची साहित्यशैली सूक्ष्म, भेदक व उपरोधक असल्याने ती विरोधकांना नामोहरम करते नि जुन्या विचारांचे (बुर्जुआ) बुरूज उद्ध्वस्त करते. मानवी इतिहासाला कलाटणी देण्याचे कार्य कार्ल मार्क्सच्या विचारांनी केले. भांडवलशाही जगातील शोषणास पायबंद घालण्याचे ऐतिहासिक कार्य कार्ल मार्क्सने केले. जगातील शोषितांना शोषकांविरुद्ध संघटित करून संघर्ष करण्याचे तत्त्वज्ञान मार्क्सने दिल्यानेच जगातील शोषित वर्ग एक होऊ शकला. तर्कतीर्थांच्या मतानुसार, भावनेपेक्षा विचाराने मार्क्सने जग साकारले.

३९) आत्मबलसंपन्न वीर : किसन वीर

'कृष्णाई' नियतकालिकाच्या 'खासदार किसन वीर दर्शन' विशेषांक (१९६७) मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेला व्यक्तिलेख. यात ते म्हणतात की, आम्ही दोघे वाईचेच; पण स्नेह उशिरा जुळून आला. ही मैत्री ३५ वर्षांपूर्वी व्हायला हवी होती. ती २५

वर्षांतीलच. त्यांचा नि माझा पहिला परिचय गुप्त क्रांतिकारक म्हणून झाला. आम्ही उभयता क्रांतिकारक गटांशी संबंधित पण दूर रहात असू. किसन वीर रायफल व रिव्हॉल्व्हरमधील नेमबाजीत प्रवीण. या गुप्त क्रांतिकारी गटाचे त्या वेळी संबंध सुदूर कलकत्त्यापर्यंत पोहोचलेले होते.

किसन वीरांची महात्मा गांधींवर अपार श्रद्धा होती; पण ते गांधीवादी न राहता प्रारंभी समाजवादी व नंतर काँग्रेसी झाले. प्रतिसरकारचे ते समर्थक. त्यांचा सशस्त्र क्रांती विचार गांधीवादात न बसणारा होता. सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकार चळवळीतील किसन वीर हे सक्रिय नेते होते. स्वातंत्र्योत्तर काळात ते काँग्रेसी झाले. त्यांचा नि माझा ऋणानुबंध या काळात जुळून आला.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेसकडे सत्ता आली. या सत्तेच्या मोहात अनेक नेते वाहून गेले. टिकले ते किसन वीर. कारण, त्यांनी पदमोह कधी बाळगला नाही. ते यशवंतराव चव्हाण यांचे खंदे समर्थक राहिले. सत्ता नि पदांपासून दूर राहिलेले किसन वीर हे आत्मबलसंपन्न वीर होते. त्यांचा गृहप्रपंच व संसार मोठा होता. त्यांना दैनंदिन विवंचना असे; पण लोकहितार्थ मग्न राहून ते चिंतामुक्त होत. ते समर्पित काँग्रेस कार्यकर्ते होते. अशा कार्यकर्त्यांचे समर्पण हीच काँग्रेसला तारून नेणारी खरी तरुण शक्ती होती.

या लेखातून तर्कतीर्थांनी किसन वीर यांचे अंतरंग चरित्र शब्दबद्ध केले आहे. त्यांच्या प्रसिद्धीविन्मुख व पदवैरागी व्यक्तिमत्त्वाने तर्कतीर्थ नेहमीच प्रभावी राहिले. तो आदर तर्कतीर्थांच्या अनेक भाषणे, पत्रे, मुलाखती, लेखांमधून सतत व्यक्त नि प्रतिबिंबित होत आला आहे. त्यांचे अनुकरण करतच तर्कतीर्थ हे यशवंतराव चव्हाण यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. काही माणसांची भूमिगत कार्यवृत्ती त्यांचे अढळपद असते. ते किसन वीर यांनी आपल्या शालीनतेतून संपादले होते. ते मोहक होते. त्याची मोहिनी तर्कतीर्थांवर खचितच होती.

४०) अनेक तेजस्वी पैलू असलेले व्यक्तिमत्त्व : भाऊसाहेब बांदोडक

गोवा, दमण व दीव या केंद्रशासित प्रदेशाचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे प्रमुख म्हणून दयानंद बाळकृष्ण बांदोडकर परिचितांमध्ये 'भाऊसाहेब' म्हणूनच ओळखले जात. त्यांचा नि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा स्नेह जमून आला तो मुख्यतः सन १९३८-४८ च्या दशकात. तेव्हा तर्कतीर्थ रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाचे महाराष्ट्राचे चिटणीस व प्रवक्ते म्हणून कार्यरत होते. त्या काळात रॉयवादी विचार प्रबोधन शिबिरे चालत. भाऊसाहेब बांदोडकर मुंबईतील अशा शिबिरांना उपस्थित रहात; पण तर्कतीर्थांचा नि भाऊसाहेबांचा स्नेह जुळून आला तो गोवा मुक्ती संग्रामानंतरच.

भाऊसाहेब बांदोडकर हे मूलतः श्रीमंत शेतकरी. समुद्र किनाऱ्यावर त्यांच्या नारळी, पोफळीच्या अनेक बागा. ते शेतकऱ्यांचे नेते म्हणून उदयाला आले. त्या काळात ते

(अडुसष्ट)

शेतकरी परिषदा भरवत. अशा एका परिषदेस त्यांनी तर्कतीर्थांना पहिल्यांदा आमंत्रित केले. आतिथ्य, अगत्याने स्नेह दृढ झाला, तो कायमचा. ते गोवा मुक्ती संग्रामात सक्रिय होते. त्यात त्यांना तुरुंगवासही घडला होता. स्वतंत्र गोवा महाराष्ट्रात यावा म्हणून ते प्रयत्नशील होते. स्नेहबंधाचे हेही एक कारण होते. भाऊसाहेब श्रीमंत होते; पण महात्मा गांधींचा विश्वस्त विचार अंगीकारून ते समाजहितार्थ आपल्या साधनांचा वापर करीत. शेतकरी, कोळी वर्गाचे ते प्रतिनिधी होते. ते उत्सवप्रिय व धार्मिक वृत्तीचे गृहस्थ होते. गोमंतकांच्या बहुजन वर्गाचे ते लोकप्रिय नेते होते. स्वभावाने ते सरळवृत्तीचे गृहस्थ होते. त्यांनी सत्ताधीश बनून माया जमविली नाही. ते रसिक वृत्तीचे होते. खेळ, शिकारीचा त्यांना छंद होता. बहुजन समाजाच्या उन्नतीचा त्यांना ध्यास होता. साहित्याबद्दल त्यांना आवड होती. ते साहित्य संमेलनांचे आयोजन करीत. त्या निमित्तानेही तर्कतीर्थांचे भाऊसाहेबांकडे येणे-जाणे होते.

हा व्यक्तिलेख एका सार्वजनिक चरित्रनायकाचा असला, तरी त्याला व्यक्तिगत संबंधांची डूब व किनार आहे. तर्कतीर्थ स्वतःही मनुष्यसंग्रही होते. समानशीलतेतूनही या उभयतांचा स्नेह जुळून आला होता. भाऊसाहेब बांदोडकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक तेजस्वी पैलूंनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना प्रभावित किले होते. त्यातून चित्रित झालेला हा व्यक्तिलेख.

४१) कै. किसन महादेव वीर

किसन वीर यांची प्राणज्योत २७ डिसेंबर, १९७९ रोजी मालवली. त्यांना ७३ वर्षांचं आयुष्य (१९०६-१९७९) लाभलं. बालपणी संत साहित्य वाचनातून त्यांची घडण झाल्याने ते जीवनभर सत्शील राहिले. गड-कोट पायी तुडविण्याचा त्यांना छंद. त्यातून त्यांचे इतिहासप्रेम या भटकंती, भ्रमणातून लक्षात यायचे. कधी काळी मुंबईत असलेला कापड व्यवसाय गुंडाळून ते पूर्णवेळ समाजसेवक झाले. स्वातंत्र्य चळवळीतील तुरुंगवास काळात तुरुंगातून पलायन करून आपल्या शौर्याचं त्यांनी केलेलं प्रदर्शन ब्रिटिशांना आव्हान देणारं होतं. स्वातंत्र्योत्तर काळात योग्यता असून, पदमुक्त राहून त्यांनी पदाशिवाय लोकसंघटन व लोकसेवा करता येते, हे दाखवून दिले. अत्यंत धाडसी स्वभाव, अजोड संघटनचातुर्य, मनुष्यपारखी व्यक्तिमत्त्वामुळे त्यांची सार्वजनिक जीवनावर पकड होती. यशवंतराव चव्हाणांच्या संदर्भात त्यांनी निष्काम मित्रप्रेमाची दिलेली प्रचिती अनुकरणीय होती. बहुजन समाजातील गरीब शेतकऱ्यांबद्दल त्यांच्या मनात अकृत्रिम कळवळा होता. परिसरातील अनेक सहकारी, शैक्षणिक, साहित्यिक संस्थांशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. त्यांना मर्दानी खेळाची आवड होती. कला, क्रीडा, तरुण मंडळात ते रमत नि त्यांचे आश्रयदाते बनून राहात. ग्रामीण भागातील सण, उत्सवात, गावजगात सहभागी होत लोकनेते बनून जात. त्यांचा मित्रपरिवार जात, धर्माचा परीघ ओलांडणारा मनुष्यधर्मी होता. स्वातंत्र्यपूर्व काळात असलेलं क्रांतीचं आकर्षण स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक परिवर्तनात प्रतिबिंबित करून

बदलाबद्दलची बांधिलकी त्यांनी जीवनभर जपली. म्हणूनही तर्कतीर्थांना त्यांच्याबद्दल आदर होता. तो या श्रद्धांजलीपर लेखातून ओसंडून वाहताना दिसतो.

४२) भारतीय आदर्शवादाचा नवा अवतार : सेनापती बापट

पांडुरंग महादेव बापट हे 'सेनापती बापट' या नावानेच अधिक परिचित आहेत. सन १९८१ हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. त्याचे औचित्य साधत महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र असलेल्या 'लोकराज्य' पाक्षिकाने आपला १ मार्च ते १६ मार्च, १९८१ चा अंक 'सेनापती बापट जन्मशताब्दी' अंक म्हणून प्रसिद्ध केला होता. त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'भारतीय आदर्शवादाचा नवा अवतार : सेनापती' शीर्षक व्यक्तिलेख प्रकाशात आणला होता.

या लेखानुसार, सेनापती बापट सन १९०४ मध्ये बी.ए. उत्तीर्ण होऊन उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. तेथून फ्रान्सला जाऊन त्यांनी बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण प्राप्त केले. भारतात ते परत आल्यानंतर क्रांतिकारी गटात सामील झाले. त्यांच्या गटात क्रांतिकारी अरविंद घोष यांचा समावेश होता. १९०८ मध्ये त्यांनी बंगालमधील क्रांतिकारकांना बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. त्यानंतर काही काळ ते भूमिगत राहिले. सन १९१२ ला स्वतः ते पोलिसांत हजर झाले. अटक करून त्यांना तुरुंगात पाठविण्यात आले. २८ जानेवारी, १९१३ ला तुरुंगातून त्यांची सुटका झाली. तेथून ते आपल्या मूळगावी पारनेर येथे आले. तिथे त्यांनी लोकशिक्षण सुरू केले. दोन वर्षांनंतर ते लोकमान्य टिळकांच्या 'मराठा' या इंग्रजी दैनिकात संपादक म्हणून रुजू झाले. या काळात त्यांनी इंग्रजीत विपुल लेखन केले. सन १९२१ च्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी पुण्याजवळील मुळशी सत्याग्रहाचे नेतृत्व केले. त्यात त्यांना ७ वर्षांची शिक्षा होऊन दीर्घ तुरुंगवास सोसावा लागला. त्यानंतर २४ मे, १९३१ रोजी त्यांची तुरुंगातून सुटका झाली. २८ जून, १९३१ ला सेनापती बापट महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष झाले. या काळात त्यांनी आत्मशुद्धीचे आवाहन प्रसिद्ध केले होते. त्यात त्यांनी म्हटले होते की, "महात्मा गांधींनी ठरविलेल्या आत्मशुद्धीपर रचनात्मक कार्यक्रमाच्या द्वारा आत्मशुद्धी केलेल्या आणि आत्मशुद्ध्यर्थ अविरत प्रयत्न करीत राहिलेल्या एक लाख भारतीयांचा नितांत शांतिमयपूर्ण अहिंसात्मक प्राणयज्ञ भारताच्या स्वातंत्र्यार्थ घडून आल्यास त्याचा आम्हाला स्वातंत्र्यप्रीत्यर्थ विशेष उपयोग होईल." या आत्मयज्ञ आवाहनाचा तर्कतीर्थांनी स्वतंत्र लेख लिहून पुरस्कार केला होता."[१५]

४३) वऱ्हाडचे टिळक : लोकनायक बापूजी अणे

माधव श्रीहरी अणे हे 'लोकनायक बापूजी अणे' या नावाने परिचित होते. ते लोकमान्य टिळकांचे सच्चे अनुयायी होते. त्यांनी लोकमान्य टिळकांचे सार्वजनिक गणेशोत्सव, शिवजयंतीसारखे उत्सव प्रचलित केले. म्हणून त्यांना वऱ्हाडचे टिळक म्हणूनही ओळखले

जात असे. त्यांची जन्मशताब्दी सन १९८१ मध्ये साजरी करण्यात आली. याप्रीत्यर्थ 'ओंजळ' नावाचा कृतज्ञतापर गौरवग्रंथ प्रकाशित करण्यात आला होता. शांताराम कवडे आणि माधव सरपटवार संपादित या ग्रंथात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'वऱ्हाडचे टिळक' शीर्षक व्यक्तिलेख लिहून त्यांचे कार्य अधोरेखित केले होते.

टिळक युगात वाढले, घडलेले लोकनायक अणे गांधी युगात लोकनायक म्हणून प्रसिद्धीस आले. सनातनी कुटुंब वातावरणात जन्मूनही त्यांनी नव्या विचारांचा स्वीकार केला. सन १९३४ मध्ये लोकनायकांचा परिचय तर्कतीर्थांशी वाराणसी येथे मदनमोहन मालवीयांच्या घरी सनातन धर्मपरिषदेच्या निमित्ताने घडून आला. बापूजी अणे संस्कृतचे उत्तम पंडित होते. ते धर्ममीमांसक होते. ते राष्ट्रीय एकतेसाठी जाती, धर्माची एकता आवश्यक मानत. महात्मा गांधींच्या असहकार चळवळींशी त्यांचे मतभेद होते. स्वविवेकाच्या कसोटीवर मत मांडण्याचा प्रघात पाळून त्यांनी आपले स्वातंत्र्य अबाधित राखले होते. काँग्रेस-ब्रिटिश विरोध काळात ते व्हाइसरॉय कौन्सिलचे सदस्य होते. त्या काळी या पदास मंत्र्यांचा दर्जा होता. पूजापाठ, कर्मकांड नियमित करत. ते त्यांच्यासाठी ऊर्जेचे स्रोत होते.

'विदर्भाचे लोकनायक' म्हणून त्यांचा सन्मान होता. 'लोकमत' आणि 'हरिकिशोर'सारख्या तत्कालीन साप्ताहिक वृत्तपत्रांमधून त्यांनी विपुल लेखन केले होते. ते 'अक्षर माधव'मध्ये संचलित आहे. त्यास तर्कतीर्थांनी प्रस्तावना लिहिली होती. बापूजी अणे हे रवींद्रनाथ टागोर यांच्या शिक्षण पद्धतीचे अभ्यासक होते. ते वेदशास्त्र परिषदेचे अध्यक्षही होते. प्राचीन परंपरांचा त्यांना अभिमान होता व त्यांचे ते समर्थकही होते. लोकनायक अणे अजातशत्रू व्यक्ती होते. विदर्भातील अनेक मान्यवरांवर लोकनायकांनी व्यक्तिलेख लिहिले आहेत. संस्कृत भाषा प्रचाराची त्यांची भूमिका होती. तर्कतीर्थांनी लोकनायक अणे यांच्या सर्वांगांचा या लेखात परामर्श घेतला आहे.

४४) शुद्ध चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी : यशवंतराव चव्हाण

'लोकराज्य' हे महाराष्ट्र राज्याचे मुखपत्र होते. ते पूर्वी पाक्षिक रूपात चालायचे. नंतरच्या काळात ते मासिक झाले. या मुखपत्राचा मार्च १९८५ चा अंक 'यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक' म्हणून महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केला होता. त्यात सदर शीर्षकाने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या प्रज्ञावंत राजकारण्याचे असलेले शुद्ध चरित्र अधोरेखित केले आहे. तर्कतीर्थ आणि यशवंतराव चव्हाण हे एकमेकांचे अनेक वर्षांचे राजकीय सहकारी व सन्मित्र होते. यशवंतराव चव्हाण यांचे जीवन तर्कतीर्थांनी अत्यंत जवळून पाहिलेले होते. त्यांच्या समग्र जीवनाचे ते साक्षीदार होते, असे म्हटले तर अतिशयोक्त होणार नाही. या साक्षीचे प्रतिबिंब या लेखात आहे. यात त्यांनी त्यांची घरची परिस्थिती, कार्यकर्ता म्हणून उदय, स्वातंत्र्यचळवळीतील योगदान,

सन १९४२च्या 'भारत छोडो' चळवळीतील कार्य सविस्तर चित्रित केले आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कारकिर्दीचा प्रारंभ बहुभाषिक मुंबई राज्याच्या पार्लमेंटरी सेक्रेटरी होण्याच्या घटनेतून सुरू होतो. १४ एप्रिल, १९४६ रोजी ते पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. या पदावरचे त्यांचे कार्य वाखाणण्यासारखे होते. सदर पदावर त्यांनी दशकभर तरी कार्य केले. त्यानंतर ते १ नोव्हेंबर, १९५६ साली द्वैभाषिक मुंबई राज्य निर्माण झाल्यानंतरच्या सरकारात राज्यमंत्री म्हणून प्रवेशित झाले. या काळात संयुक्त महाराष्ट्र समितीचा लढा मराठी भाषिक स्वतंत्र राज्य निर्मितीच्या आग्रहाने अधिक आक्रमक झाला. तत्पूर्वी द्वैभाषिक मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री नामदार मुरारजीभाई देसाई यांना त्यांच्या कार्यकाळात संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चळवळीस वाढते हिंसक रूप नियंत्रित करण्यासाठी गोळीबार करावा लागला होता. त्यात शंभराहून अधिक हुतात्मा झाले होते. त्यामुळे महाराष्ट्रात असंतोष चरमसीमेला जाऊन पोहोचला. त्याची परिणती नेतृत्व बदलात होऊन महाराष्ट्राच्या द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्याकडे राष्ट्रीय काँग्रेसने जबाबदारी सोपविली. त्या वेळी द्वैभाषिक राज्य अधिक काळ चालणार नाही, याची जाणीव यशवंतराव चव्हाण यांनी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना करून दिली. त्यातून १ मे, १९६० रोजी यशवंतराव चव्हाण मराठीभाषी स्वतंत्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. सन १९६२ पर्यंतच्या त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी महाराष्ट्राची घडी मराठी भाषिक राज्य म्हणून बसविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. या सर्व प्रयत्नांचा आढावा या लेखात आहे. नंतर चिनी आक्रमणामुळे त्यांना संरक्षणमंत्री व्हावे लागले. सन १९६२ ते १९७७ ते केंद्र सरकारच्या विविध मंत्रिपदांचा भार खांद्यावर घेत राहिले; पण १९७७ च्या लोकसभेच्या निवडणुकीत इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्ष पराभूत झाला. या काळात यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेस सोडून स्वतंत्र मार्ग पत्करला. सन १९८० पर्यंत त्यांच्यात आणि इंदिरा गांधींमध्ये दुरावा राहिला. १९८१ मध्ये ते इंदिरा काँग्रेसमध्ये पुनःप्रवेशित झाले. १ जून, १९८३ रोजी त्यांच्या सविद्य पत्नी वेणुताई निवर्तल्या. या सर्व उलाढालींचे साक्षीदार तर्कतीर्थ होते, हे सदर लेखातून स्पष्ट होते.

४५) तत्त्वचिंतक, राजकारणी : यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नि भारताचे अनेक खात्यांचे मंत्री झालेले यशवंतराव चव्हाण यांनी उपपंतप्रधानपदापर्यंत आपल्या कर्तबगारीची मजल गाठली. त्यांचे निधन २५ नोव्हेंबर, १९८४ रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ७१ व्या वर्षी दिल्लीत झाले. २५ नोव्हेंबर, १९८५ हा त्यांचा प्रथम स्मृतिदिन. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी त्यांचे निकट सहकारी व सुहृद मित्र. प्रथम स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येस लिहिलेला हा अभिवादन लेख म्हणजे जुन्या ऋणानुबंधाला दिलेला उजाळा. तो दैनिक 'सकाळ', पुणेच्या 'साहित्य, कला, विचार, क्रीडा' पुरवणीत रविवार दि. २४ नोव्हेंबर, १९८५ रोजी प्रसिद्ध झाला होता.

तर्कतीर्थांच्याच शब्दात सांगायचं, तर यशवंतराव चव्हाण स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यसैनिक होते, तर स्वातंत्र्योत्तर काळात उत्कृष्ट प्रशासक व राजकारणी. त्यांनी वक्तृत्व कमावलं होतं. ते त्यांना तत्त्वचिंतक राजकारणी सिद्ध करणारं होतं. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतील त्यांची भाषणं पुरावा म्हणून सांगता येतात. (आता ती 'सह्याद्रीचे वारे', 'भूमिका', 'माझ्या विद्यार्थी मित्रांनो'सारख्या व 'ऋणानुबंध'मधील भाषण संग्रहात वाचण्यास उपलब्ध झाली आहेत). ती साहित्य संमेलने, पुस्तक प्रकाशन, विद्यापीठ दीक्षांत सोहळे, साहित्यिक गौरवप्रसंगी दिलेली भाषणे होत. यशवंतरावांचे वाचन विद्यार्थिदशेपासूनच प्रगल्भ होते. (ते 'कृष्णाकाठ' वाचताना लक्षात येतं). ललितासह वैचारिक वाचनाने त्यांना प्रगल्भ, सुजाण बनविलं. कृषी-औद्योगिक महाराष्ट्राची उभारणी त्यांच्या तत्त्वचिंतनाचा कृतिशील वस्तुपाठ. त्यांनी तंत्रज्ञानावर विकसित होणारा महाराष्ट्र व भारत घडविला. त्याचे प्रत्यंतर त्यांचा 'युगांतर' भाषणसंग्रह (१९६२ ते १९६९) वाचताना येते. त्यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन आधुनिक होता. त्यांनी आपल्या जीवन, कार्य, विचारात भूत, वर्तमान व भविष्याचा मेळ घातला. त्यांचा स्वतःचा मोठा ग्रंथसंग्रह होता. तत्त्वचिंतन व राजकारणाचा मेळ घालणारे जीवन अपवादांना लाभते. त्यात यशवंतराव चव्हाण होते. त्यांचे 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले खरे; पण नियोजित 'सागरतीर' आणि 'यमुनाकाठ' लिहायचे राहून गेले. तरी त्याची वानगी 'कृष्णाकाठ' देते आहे.

हा लेख म्हणजे ललित स्मरणरंजनाची मार्मिक समीक्षाच!

४६) यशवंतराव चव्हाण : संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आदर्श

यशवंतराव चव्हाण यांच्या प्रथम स्मृतिदिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी एक स्मृतिग्रंथ प्रकाशित केला होता. त्याचे शीर्षक होते 'यशवंतराव : राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व.' तो भा. कृ. केळकर यांनी संपादित केला होता. त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेला हा अभिवादन लेख.

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च, १९१३ चा, गरीब शेतकरी कुटुंबातला. वडील बळवंतराव हे यशवंतराव पाच वर्षांचे असताना निवर्तले. त्यांचा सांभाळ आई विठाबाईंनी केला. प्रारंभिक शिक्षण कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्ये झालं. शाळकरी वयातच त्यांनी शाळेवर तिरंगा फडकविला व ते तुरुंगात गेले. पुढे सन १९३० च्या नि १९३२ च्या कायदेभंग चळवळीत सक्रिय राहिले. यात त्यांना परत १८ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. सन १९३४ मध्ये ते शालांत परीक्षा उत्तीर्ण झाले. सन १९३० ते १९४५ हा त्यांच्या स्वातंत्र्यसैनिकी जीवनाचा कालखंड. १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनातून ते नेते बनले. सन १९४० मध्ये ते वकील झाले. 'भारत छोडो' आंदोलन काळातच त्यांचा विवाह वेणुताईंशी झाला.

स्वातंत्र्योत्तर काळात प्रथम मुंबई द्वैभाषिक राज्याचे पुरवठामंत्री, नंतर दोनदा मुख्यमंत्री.

महाराष्ट्र राज्य स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा राहिला. यशवंतराव चव्हाण हे दूरदर्शी राजकारणी होते. त्यांच्या दूरदर्शितेत मुत्सद्दीपणा दडलेला होता. पंडित नेहरूंनी सन १९६२ मध्ये त्यांना भारताचे संरक्षणमंत्री म्हणून आमंत्रित करीत त्यांच्या प्रशासकीय कौशल्यास राष्ट्रीय मान्यताच बहाल केली.

हा अभिवादन लेख म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी यशवंतराव चव्हाण यांचं लिहिलेलं अल्पाक्षरी चरित्रच म्हणावं लागेल. तर्कतीर्थांची भाषणे ऐकून यशवंतराव स्वातंत्र्यचळवळीत अधिक सक्रिय झाले होते, याची नोंद त्यांनी आपल्या 'कृष्णाकाठ' आत्मचरित्रात आवर्जून करून ठेवली आहे. शास्त्राचे रूपांतर शस्त्रात करण्याची शिकवण त्यांनी शास्त्रीजींकडूनच संपादली असल्याची कबुली त्यांनी आपल्या एका शास्त्रीजींच्या गौरव लेखात करून ठेवली आहे. उभयतांमधील संबंध जिव्हाळ्याचे असल्याचे या त्यांच्यामधील पत्रव्यवहार सिद्ध करतो.

४७) द्रष्टा क्रांतिकारक : स्वातंत्र्यवीर सावरकर

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांवर तर्कतीर्थांनी लिहिलेला दुसरा लेख आहे, 'द्रष्टा क्रांतिकारक' शीर्षकाचा. स्वातंत्र्यवीरांची जन्मशताब्दी सन १९८३-८४ च्या दरम्यान साजरी करण्यात आली. त्यानिमित्त सावरकर दर्शन प्रतिष्ठान, पुणेच्या वतीने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून 'स्वातंत्र्यवीर' शीर्षक विशेषांक प्रकाशित करण्यात आला होता. २१ जुलै, १९८६ रोजी प्रकाशित या अंकाचे संपादक 'किर्लोस्कर'चे मुकुंदराव किर्लोस्कर होते. त्यात सुधीर फडके, पु. ल. देशपांडे, बाळासाहेब देवरस, डॉ. जयंत नारळीकर, प्रा. ग. प्र. प्रधान, बॅ. विठ्ठलराव गाडगीळ, डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, बिंदुमाधव जोशी प्रभृती मान्यवरांबरोबर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीही लिहिले होते. या लेखानुसार स्वातंत्र्यवीर अनेक बाबतीत द्रष्टे होते. इंग्रजांना भारत सोडायची जाणीव करून देणाऱ्या अनेक क्रांतिवीरांपैकी सावरकर एक होते. '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हे त्यांचे लेखन त्या काळच्या समाजमनावर गारूड करणारे व प्रेरक ठरले होते, अशी नोंद तर्कतीर्थांनी या लेखात आवर्जून करून ठेवली आहे. स्वातंत्र्यवीर प्रेरक कवी होते. त्यांचे 'जयोस्तुते श्री महन्मंगले' समरगीत आजही तितकेच ऊर्जस्वल वाटते. भारतीय इतिहासाचा स्वातंत्र्यवीरांचा व्यासंग खोल होता. ते हिंदुधर्माभिमानी होते; पण त्यास त्यांनी वैज्ञानिक दृष्टीची जोड दिली होती. रत्नागिरीस त्यांनी 'पतितपावन मंदिर' उभारून अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. जातिभेद हे रोटीबेटी व्यवहारातून नष्ट होतील, या महात्मा गांधींच्या विचारांशी ते सहमत होते. धर्मांतर केलेल्यांच्या शुद्धीकरण व 'घरवापसी'चे ते समर्थक होते इत्यादी घटना, प्रसंगांचे उल्लेख, विवेचन करीत तर्कतीर्थांनी या व्यक्तिलेखात स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या विविधांगी द्रष्टेपणावर प्रकाशझोत टाकला आहे.

४८) मानवेंद्र रॉय : तत्त्वज्ञ आणि राजकीय द्रष्टे

मानवेंद्रनाथ रॉय यांची जन्मशताब्दी सन १९८८ मध्ये साजरी करण्यात आली. या अनुषंगाने साप्ताहिक 'साधना'मधील लेखात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेल्या व्यक्तिलेखात मानवेंद्रनाथ रॉय यांच्या तत्त्वज्ञान व राजकीय द्रष्टेपणावर प्रकाशझोत टाकला आहे. त्यात त्यांनी स्पष्ट केले आहे की, रशियन राज्यक्रांतीनंतर खरीखुरी लोकशाही येईल अशी आशा ध्येयवादी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या मनात होती; पण त्यांचा अपेक्षाभंग झाला. व्यक्तिप्रधान भांडवलशाहीच्या ठिकाणी राज्यच भांडवलदार बनून कामगारांचे शोषक बनले. या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर मानवेंद्रनाथ रॉय यांनी नवमानवतावाद या नव्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. नैतिक आदर्शाकडे जाणारा स्वतंत्र मानवाचा विश्वव्यापी समाज ते निर्माण करू इच्छित होते. रॉय हे एकच असे भारतीय आधुनिक तत्त्ववेत्ते आहेत की, ज्यांनी बुद्धिप्रामाण्यवादाच्या आधारे आधुनिक ज्ञान-विज्ञानाच्या पार्श्वभूमीवर तर्कशुद्ध पद्धतीने नवमानवतावादाची स्थापना केली.

४९) आदर्शाच्या प्रकाशात विकसित व्यक्तिमत्त्व : यशवंतराव चव्हाण

प्रा. उत्तम सूर्यवंशी संपादित यशवंतराव चव्हाण स्मरणग्रंथाचे शीर्षक आहे, 'मराठी मातीचे वैभव'. जुलै, १९८९ मध्ये प्रकाशित या ग्रंथात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा 'आदर्शाच्या प्रकाशात विकसित झालेले व्यक्तिमत्त्व' नावाचा व्यक्तिलेख आहे. लेखात यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनाचा धांडोळा अन्य लेखांप्रमाणे आहेच. नवी गोष्ट त्यांच्या विचार व साहित्यावर प्रकाश टाकणारी चर्चा आहे. दरम्यानच्या काळात यशवंतराव चव्हाण यांचं समग्र साहित्य प्रकाशित झालं होतं. आत्मकथा, भाषणे तर आहेतच; पण त्यांच्यावर अनेक चरित्रे प्रकाशात आली. त्यांच्या जीवन, कार्य, विचारांवर दोन वस्तुसंग्रहालये नाशिक व कराड येथे आकारली. पैकी नाशिकच्या यशवंतराव चहाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात तर मला देखणे व प्रेरक वस्तुसंग्रहालय उभारता आले. ती त्यांच्याप्रती माझी कृतज्ञताच! या लेखात 'युगांतर' या भाषणसंग्रहातील काही भाषणांचे संदर्भ आहेत. 'सह्याद्रीचे वारे', 'ऋणानुबंध', 'कृष्णाकाठ', 'भूमिका' इ. ग्रंथांचे उल्लेख आहेत. यातला महत्त्वाचा भाग असा की, राजकीय व्यक्ती म्हणून ते श्रेष्ठ होतेच; पण साहित्य, संस्कृती प्रांताशी असलेली त्यांची ओढ नि आस्था त्यांना सुसंस्कृत बनविणारी लक्षात येते. त्यांचं परदेश पर्यटन नि प्रवास, त्यांचं लेखन, वाचन, वक्तृत्व हे पैलू त्यांना अपवाद आदर्श व्यक्ती बनवितात. साहित्यिकांचा सहवास त्यांची श्रीमंती खरी! स्वतःचा असणारा ग्रंथसंग्रह नामदार यशवंतराव चव्हाण यांना सुशिक्षितांच्या कोटीत नेऊन बसवितो. म्हणूनही ते आदर्श, अनुकरणीय वाटतात. 'माणसाचं मोठेपण पदात नसून, कमावलेल्या सुसंस्कृत प्रतिष्ठेत असतं,' हे वाक्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं सार्थ वर्णन म्हणून सांगता येईल. प्रत्येक

प्रवासात पुस्तकं खरेदी करणारे यशवंतराव चव्हाण भौतिकात कधीच रमले नाही. सुसंस्कृत गृहस्थ म्हणून त्यांच्या कितीतरी आठवणी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करणाऱ्या म्हणून लोक तोंड भरून सांगतात. यात आप्तस्वकीय, स्नेही, सोबती, सहकारी असतातच; पण जनसामान्य, पत्रकार, कलाकार, सैनिक, कवीही असतात. हे नुसतं बेरजेच्या राजकारणातून आलेलं नव्हतं. त्यामागे माणसांचं मोहोळ निर्माण करण्याचा त्यांचा छंद जगण्याची गरज होती, हे लक्षात येऊन गलबलायला होतं.

५०) यशवंतराव चव्हाण : आधुनिक महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान

यशवंतराव चव्हाण यांच्या पाचव्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दैनिक 'सकाळ', पुणेच्या दि. २५ नोव्हेंबर, १९८९ च्या विशेषांकासाठी लिहिलेला हा अभिवादन लेख.

स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राचा इतिहास हा यशवंतराव चव्हाण यांच्या प्रज्ञा नि प्रतिभेचा आहे. म्हणूनही तो स्फूर्तिस्थान वाटतो. याचं कारण शोधू लागू तर ते त्यांच्या दीर्घदर्शी आणि दूरदर्शी धोरणात तुम्हाला दिसेल, असे सांगत तर्कतीर्थ या लेखात चरित्र सांगत यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वातील एक एक पैलू अधोरेखित करीत राहतात. यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक नागरी संस्कृतीच्या प्रकाशात स्वतःस अंधश्रद्धामुक्त केलं. हिंदू प्रतिगामी संस्कारांना नाकारत ते सत्यशोधक बनले. भारतीय राष्ट्रवाद त्यांना कायमचा आकर्षक वाटत राहिला. महात्मा गांधींच्या प्रभावांनी आणि पंडित नेहरूंच्या निकट संपर्कांनी त्यांनी लोकमान्य टिळक, एम. एन. रॉय समजून घेत आपला विकास केला नि ते प्रागतिक झाले. त्यांचे वक्तृत्व जनमानसाशी हितगूज नि हृदयस्थ संवाद करणारे असायचे. एक निष्ठावान शिक्षक व लोकशाहीचा प्रेषित बोलतो असा भास व्हायचा. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळेच सत्ता त्यांच्याकडे चालून आली. त्यांनी महाराष्ट्राच्या अनेक प्रश्नांचा उलगडा शिताफीने केला. भारतीय राजकारणात ते एक नवा प्रज्ञावंत नेता, दूरदर्शी राजकारणी म्हणून झळकले. त्यांचे संरक्षणमंत्री होणे त्यांच्या प्रशासकीय कुशलतेस लाभलेली राष्ट्रीय दाद व मान्यता ठरली. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात ते अजातशत्रू म्हणून आजीवन मिरवत राहिले. त्यांनी आयुष्यात अनेक राज्य व केंद्रीय खाती सांभाळली. महसूल, पुरवठा, संरक्षण, अर्थ, परराष्ट्र अशी खाती सांभाळत त्यांनी आपला कुशलतेचा आलेख उंचावत नेला. त्यांचं आकस्मिक निधन ही राज्य नि राष्ट्राची मोठी हानी. महाराष्ट्राला त्यांचा वारसा लाभल्याने ते या आधुनिक महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान बनले. राजकीय आकलनात कुशाग्र बुद्धिमत्ता, प्रशासकीय नैपुण्य, विद्वत्ता, सुसंस्कृतपणा यांचा दुर्मीळ मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. हा लेख म्हणजे यशवंतराव चव्हाण यांचे सुंदर शब्दशिल्पच होय. तर्कतीर्थांनी ते आदराने साकारले आहे.

५१) क्रांतिकारक समादेशक : स्वातंत्र्यवीर सावरकर

तर्कतीर्थांचा हा लेख 'सावरकरांचा क्रांतिकारक समादेश' आठवणींवर आधारित आहे. 'मी पाहिलेले सावरकर' या रा. स. भट यांनी संकलित केलेल्या आणि वीर गौरव समिती, पुणेमार्फत स्वातंत्र्यवीरांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त (१६ मे, १९९०) लिहिल्या गेलेल्या आठवण संग्रहातून तो येथे उद्धृत करण्यात आला आहे. सन १९३१ मध्ये तर्कतीर्थ कायदेभंग चळवळीत सक्रिय होण्यापूर्वी 'धर्मकोश' संपादन कार्यात व्यग्र असत. स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकसभेचे पहिले सभापती दादासाहेब तथा गणेश वासुदेव मावळणकर हे धर्मकोश मंडळाचे अध्यक्ष होते. कागदपत्रांवर मावळणकरांच्या स्वाक्षऱ्या हव्या होत्या म्हणून तर्कतीर्थ रत्नागिरीस गेले होते. तेव्हा मावळणकर सड्यावर (रत्नागिरीतील एक भाग) राहात होते. या वेळी स्वातंत्र्यवीर रत्नागिरीतच राहत्या घरात स्थानबद्ध होते. दुपारी तर्कतीर्थ स्वातंत्र्यवीरांना भेटण्यास गेले असता त्यांनी तर्कतीर्थांना 'धर्मशास्त्र व अस्पृश्यता निवारण' विषयावर पतितपावन मंदिरात भाषण देण्याची विनंती केली. त्या भाषणाचे अध्यक्षपद स्वातंत्र्यवीरांनी भूषविले होते, अशी हृद्य आठवण या लेखात नोंदवली आहे. याच भेटीत सावरकर यांनी स्वातंत्र्यवीरांची हत्या करणाऱ्या कलेक्टर नाईटचा बंदोबस्त करण्याचा समादेश दिला होता. तर्कतीर्थ आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांची दुसऱ्यांदा भेट झाली ती मुंबईस. तर्कतीर्थ सन १९५१ मध्ये ज्योतिर्लिंग सोमनाथ मंदिर (सुरटी सोमनाथ/प्रभासपट्टण, वेराळ, गुजरात) प्राणप्रतिष्ठा महोत्सवानंतर परतताना मुंबईत आपल्या बंधूंकडे शिवाजी पार्क, दादर येथे ते मुक्कामास होते. जवळच स्वातंत्र्यवीर सावरकरांचे निवासस्थान होते. स्वातंत्र्यवीरांच्या निरोपावरून तर्कतीर्थ त्यांना भेटण्यास गेले. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी त्यांचे पुच्छगुच्छ देऊन अभिनंदन केले. तर्कतीर्थांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'चरण वंदन' केल्याची नोंद या लेखात आहे.

या घटनेमागचा सामाजिक संदर्भ लक्षात घेतल्याशिवाय या अभिनंदनाचा उलगडा होणार नाही. सन १९४७ च्या कार्तिक महिन्यातील शुद्ध प्रतिपदेला (४ नोव्हेंबर, १९४७) प्रभासपट्टणच्या समुद्रकिनारी तणावमुक्तीसाठी विरंगुळा म्हणून गेले होते. तत्पूर्वी काठेवाड (गुजरात) मधील जुनागड संस्थानाच्या नबाबाने आपण पाकिस्तानात सामील होणार असे जाहीर केले होते. नबाबाला सुविचार सुचावा, हृदय परिवर्तन व्हावे म्हणून सरदार पटेलांनी मुत्सद्देगिरी केली होती; पण ती निष्फळ ठरली होती. सरदार पटेलांनी शेवटी लष्कराला पाचारण करून जुनागड संस्थान खालसा केले. प्रजेने याचे समर्थन केले. त्याचा विजय दिन साजरा करून सरदार पटेल व काकासाहेब गाडगीळ विमानाने प्रभासपट्टणला विश्रांतीसाठी आले. दोघे फिरत सोमनाथ मंदिराच्या जीर्ण अवशेषांपाशी आले. हे मंदिर अल्लाउद्दीन खिलजी, औरंगजेब इ. आक्रमकांनी स्वारी करून अनेकदा उद्ध्वस्त केले होते. काकासाहेब तथा न. वि. गाडगीळ यांनी मंदिराच्या जीर्णोद्धाराची कल्पना मांडली. सरदार पटेलांना

ती पटली. पटेल आल्याचे कळल्यावर अनेक लोक जमले. त्यांच्यापुढे भाषण करत उभयतांनी जीर्णोद्धाराचा संकल्प व्यक्त केला. जनतेने या संकल्पाचे सहर्ष स्वागत केले. महात्मा गांधींनी सरकारऐवजी लोकसहभागातून जीर्णोद्धाराची दुरुस्ती सुचविली. लोकांनी ती सक्रिय नि सढळ साहाय्याने उचलून धरून संकल्प सिद्धीस नेला. हे मंदिर हरिजनांसह सर्वांना खुले राहील, असे ठरविले म्हणून तत्कालीन शंकराचार्यांनी प्राणप्रतिष्ठा करण्याचे नाकारले. सरदार पटेल व डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी ही जबाबदारी तर्कतीर्थांवर सोपविली. ती त्यांनी यशस्वी पार पाडली. स्वातंत्र्यवीर सावरकरकृत तर्कतीर्थ अभिनंदनामागे हा धार्मिक व सामाजिक संदर्भ होता.[१६]

५२) समाजभूषण बाबूराव घोरपडे

सातारा जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्ते बाबूराव घोरपडे यांच्या सन्मानार्थ २० जून, १९९० रोजी 'देशभक्त बाबूराव घोरपडे गौरव ग्रंथा'चे प्रकाशन करण्यात आले. त्यात हा चर्चित व्यक्तिलेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेला आढळतो.

सातारा जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये बाबूराव घोरपडे यांचे स्थान महत्त्वाचे होते. ते स्वातंत्र्यचळवळीत सहभागी होते. त्यात त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. या काळत भूमिगत राहून त्यांनी काही काळ क्रांतिकार्य केले होते. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी चालविलेल्या प्रतिसरकारात त्यांनी न्यायाधीश म्हणून कार्य करीत मोलाचे निवाडे दिले होते. त्यांनी त्या काळात किसन वीर यांच्याबरोबरीने कार्य केले. 'स्वातंत्र्य' हा एकच ध्रुवतारा त्यांच्या मनात होता. तर्कतीर्थ आणि बाबूराव घोरपडे यांचे चार दशकांचे जुने व प्रदीर्घ ऋणानुबंध असल्याचे या लेखातून दिसून येते. त्यांचे वक्तृत्व सुश्राव्य असे. आपल्या भाषणात ते अभंग, ओव्यांचा वापर करीत. प्राचीन साहित्याचा त्यांचा दांडगा व्यासंग होता. सातारा काँग्रेस कमिटीचे अध्यक्षपद, जिल्हा परिषद अध्यक्षपद, सातारा जिल्हा सहकारी बँक अध्यक्षपद भूषवत ते विधानसभेचे सदस्य झाले होते. त्यांना इतिहासाचे वेड होते. बाबूराव घोरपडे यांनी आपल्या घराण्याचा शास्त्रोक्त इतिहास लिहून आपली संशोधनवृत्ती सिद्ध केली होती. त्यांचा हा ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केला आहे. ते वि. का. राजवाडे संशोधन मंडळाचे सदस्य होते. स्वातंत्र्य चळवळीतील 'चले जाव आंदोलन' त्यांनी लिहिले आहे. एक नेता म्हणून ते सर्वांना घेऊन कार्य करीत व सर्वांना समान बुद्धीने वागवत. लोकशाहीमूल्य व कार्यपद्धतीवर त्यांचा विश्वास होतो. त्यांच्या कार्यपद्धतीत प्रतिबिंबित होत असे. सामाजिक कार्यात त्यांची वृत्ती विधायक व सकारात्मक असे. ते खऱ्या अर्थाने 'समाजभूषण' होते. तर्कतीर्थ सातारा जिल्हा काँग्रेसचे अनेक वर्षे सक्रिय कार्यकर्ते राहिल्याने त्यांचा बाबूराव घोरपडे यांच्याशी असलेला संबंध राजकीय, सामाजिक, साहित्यिक असा त्रिविध स्वरूपाचा होता. सातारा जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला असतानाच्या काळात बाबूराव घोरपडे यांनी केलेले पक्षनेतृत्व लोकाश्रयी होते.

५३) जनसेवक बाबूराव धारवाडे

कोल्हापूरचे काँग्रेस कार्यकर्ते बाबूराव धारवाडे यांच्या एकसष्ठी समारंभाच्या निमित्ताने सन १९९१ मध्ये एक स्मरणिका प्रकाशित करण्यात आली होती. त्यांचा नि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा परिचय असल्याने त्यांनी एक छोटा लेख त्या स्मरणिकेत लिहून बाबूराव धारवाडे यांचे जनसेवक रूप वाचकांपुढे ठेवले आहे.

बाबूराव धारवाडे कोल्हापूरच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक चळवळीत आघाडीवर होते. चार दशके त्यांनी नेतृत्व केले. सामाजिक क्षेत्रात त्यांनी अनेक लोककल्याणकारी उपक्रम राबविले. कोल्हापूर शहरातील अनेक आंदोलनांचे त्यांनी नेतृत्व केले. दरवाढविरोधी आंदोलनात ते आघाडीवर असत. भाई माधवराव बागल यांच्या कार्यस्मरणार्थ त्यांनी 'भाई माधवराव बागल विद्यापीठ' ही लोकशिक्षण संस्था स्थापून तिच्याद्वारे प्रबोधनपर उपक्रम हाती घेतले. मेजर दादासाहेब निंबाळकर, 'पुढारी'कार ग. गो. जाधव, नानासाहेब गद्रे, रवींद्र सबनीस प्रभृती मान्यवरांबरोबर कार्य करत त्यांनी आपल्या सहकाऱ्यांचे कार्य विविध उपक्रमांद्वारे अमर केले. राजर्षी शाहू छत्रपतींचे कार्य चिरस्मरणीय व्हावे म्हणून आयुष्यभर झटले. राजर्षी छत्रपती शाहू स्मारक ट्रस्टचे विश्वस्त म्हणून केलेले कार्य चिरस्मरणीय आहे. ते विधान परिषदेवर निवडून गेले होते. काँग्रेस कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरे चालवून त्यांनी जिल्ह्यात कार्यकर्त्यांची फळी उभी केली होती.

याशिवाय बाबूराव धारवाडे पत्रकार होते. 'जनसारथी' नावाचे साप्ताहिक ते चालवत. 'जनसेना' नावाच्या आपल्या युवक संघटनेतर्फे ते लोकोपयोगी उपक्रम हाती घेत. अनेक पुरस्कार, परिषदा, शिबिरे, व्याख्याने इ.द्वारे पुरोगामी विचारांचा त्यांनी व्यापक प्रचार, प्रसार केला. त्यांना 'शाहू पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले होते. कोल्हापूर गॅझेटियर दुरुस्ती व प्रकाशनात त्यांचा मोठा वाटा होता. संसदेच्या प्रांगणात शाहू पुतळा उभारण्यातही ते आघाडीवर होते. शाहूप्रेमी अशी त्यांची ओळख राहिली. गंगाराम कांबळे स्मारक स्तंभ उभारून बाबूराव धारवाडे यांनी समतेचा विचार दृढ केला. सर्वसामान्यांसाठी झटणारा पुरोगामी विचारांचा लढवय्या नेता म्हणून त्यांची उभी राहिलेली प्रतिमा कार्य व विचारसुसंगत होती.

५४) तत्त्वचिंतक रा. ना. चव्हाण

रा. ना. चव्हाण हे बहुजन समाज कार्यकर्ते नारायणराव चव्हाण यांचे सुपत्र. सन १९३४ मध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुढाकाराने वाईत ब्राह्मो समाजाची स्थापना केली, तेव्हा रा. ना. चव्हाण यात आघाडीवर होते. विचाराने पुरोगामी असलेले रा. ना. चव्हाण सत्यशोधक समाजाचेही कार्यकर्ते होते. जातीवर आधारित संघटना असू नये असे त्यांचे मत होते. तथापि, मागासवर्गीयांच्या उन्नतीचे ते समर्थक होते. तर्कतीर्थांनी रा. ना. चव्हाण यांच्या आग्रह व साहाय्यानेच 'ज्योतिनिबंध' रचला. तर्कतीर्थांनी रा. ना. चव्हाण यांना

मदतीस घेऊन लिहिलेला 'बहुजन समाज इतिहास' अद्याप गहाळ आहे, अन्यथा तो एक ऐतिहासिक दस्तऐवज ठरला असता. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर व्हावे असे त्यांचे मत होते. रा. ना. चव्हाण यांच्यावर वडिलांच्या विचार, कार्याचा ठसा होता. वाईसारख्या ब्राह्मणबहुल गावी रा. ना. चव्हाण यांनी आपल्या लोकसंग्रही वृत्तीतून बहुजनकेंद्री सांस्कृतिक चळवळ रुजविली. पारंपरिक धार्मिक कर्मकांडांऐवजी चित्तशुद्धी महत्त्वाची अशी त्यांची धारणा होती. काळ पालटतो; पण सद्गुण कालातीत होत नाहीत, असे त्यांचे मत होते. रा. ना. चव्हाण यांचे विपुल साहित्य असून, त्यांचे चिरंजीव रमेश चव्हाण यांनी ते संपादित करून प्रकाशित केले आहे. ही ग्रंथसंख्या आता ४० च्या घरात गेली असून, त्यातून रा. ना. चव्हाण 'तत्त्वचिंतक' म्हणून आपणापुढे येतात. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा विचारांचा पगडा त्यांच्या लेखनावर स्पष्टपणे दिसून येतो. ते 'दलितमित्र' पुरस्कारांनी सन्मानित होते.

तर्कतीर्थांनी रा. ना. चव्हाण यांच्या विचारांच्या ज्या कक्षांची चर्चा केली आहे, त्यानुसार सनातनी धर्म, परंपरा, आचरणास फाटा देऊन ब्राह्मो, प्रार्थना, सत्यशोधक समाजांना अभिप्रेत अमूर्त ईश्वरोपासना ते करत. यामागे आचार-विचार शुद्धी व सदाचार ते श्रेष्ठ मानत असे दिसते. रा. ना. चव्हाण हे एक 'तत्त्वचिंतक' असल्यामुळे त्यांना धार्मिक जीवनाने तत्त्वशुद्धी येते, असा अनुभव येत असे. धर्म म्हणजे नैतिक आचरण यावर ते दृढ होते. धर्मसुधारणांचे ते समर्थक होते. चातुर्वर्ण्यविरोधात ते आघाडीवर असत. काया, वाचा, मने आचार-विचार शुद्धता हे त्यांच्या व्यक्तित्वा सार होते.

❍ समाजकारण

समाजातील वंचित, उपेक्षित वर्गाच्या विकास आणि सबलीकरणाचा विचार म्हणजे समाजकारण. समाजकारण वैचारिक असते, तद्वतच कृतिशीलही. काया, वाचा, मने ज्या विभूतींनी हे कार्य केले, अशा महर्षी व्यक्तिमत्त्वांची भलामण एक प्रकारची गुणग्राहकताच होय. ती तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यामध्ये रोमरोमात भिनलेली दिसते. त्यातून तर्कतीर्थांनी महर्षी धोंडो केशव तथा अण्णासाहेब कर्वे, मानवसेवक व तत्त्वज्ञ डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यावर लिहिलेल्या व्यक्तिलेखांचा इथे परामर्श करण्याचा मानस आहे.

५५) 'भारतरत्न' अण्णासाहेब कर्वे

हा गौरव लेख होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी आपल्या आयुष्याची शंभर वर्षे १८ एप्रिल, १९५८ रोजी पूर्ण केली. याप्रीत्यर्थ मुंबई मुक्कामी त्याच दिवशी संपन्न समारंभात भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान त्यांना प्रदान केला. या निमित्ताने लिहिला गेलेला हा व्यक्तिलेख 'नवभारत' मासिकाच्या मे, १९५८ च्या अंकात प्रकाशित झाला होता.

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समाः।
एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥

ईशावास्योपनिषदातील या दुसऱ्या मंत्रात म्हटल्यानुसार, माणसास सत्कर्म करीत शंभर वर्षे जगण्याची महत्त्वाकांक्षा पाहिजे, त्यामुळे मग त्याला अन्य दुष्कर्माचा स्पर्शही होऊ शकत नाही. महर्षी कर्वे यांनी आयुष्यभर महिलाश्रम आणि महिला विद्यापीठाद्वारे अबलांना विविध मार्गांनी सबल करण्यासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांनी आपल्या जीवनकार्याद्वारे भारतीय समाजापुढे एक आदर्श कर्मयोग प्रस्तुत केला. तो अनुकरणीय ठरतो. स्त्री-पुरुष समानतेचा विचार स्त्रियांना सबल बनविण्यात आहे. दीडशे वर्षांपूर्वीचा उदारमतवाद त्यांनी आचारसंहिता बनवून सिद्ध केला. विधवा विवाह, परित्यक्ता पुनर्वसन, स्त्री शिक्षण इ.द्वारे त्यांनी आपले ध्येय कार्याने सिद्ध केले. सनातनी विचारकांनी व समाजांनी केलेल्या टीका नि अवमानतेकडे दुर्लक्ष करून त्यांनी आपले जीवनध्येय गाठले. 'भारतरत्न' पदवी त्या भोगलेल्या वेदनांचे गौरव रूपांतरण होय. 'रोमेल मिथ' महर्षींनी आपल्या कृतीतून साकारले व नव्या पिढीपुढे आदर्श ठेवला.

५६) मानव्याचा सेवक व मानवी संस्कृतीचा तत्त्वज्ञ : डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर

डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर यांना सन १९५२ साली आफ्रिकेतील निग्रोंसाठी केलेल्या कार्याची नोंद घेऊन शांततेचे नोबेल पारितोषिक देऊन गौरविण्यात आले होते. ते तत्त्वज्ञान, धर्मविद्या, संगीत आणि वैद्यकशास्त्राचे जाणकार होते. ५२ वर्षे निरंतर सेवाकार्यात आयुष्य खर्चल्यानंतर ९०व्या वर्षी दि. ५ सप्टेंबर, १९६५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या जीवन व कार्याचा आलेख रेखाटणारा एक दीर्घ लेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'नवभारत' मासिकाच्या ऑक्टोबर, १९६५ च्या अंकात लिहिला आहे. श्रद्धांजलीच्या रूपात लिहिलेल्या या लेखात त्यांच्या समग्र जीवनाचा प्रमाण आढावा आहे नि लेखन सूचीही.

डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर यांनी 'भारतीय विचारसरणी व तिचा विकास' शीर्षक प्रबंध लिहिला असून, त्यात त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाची चिकित्सा केली आहे. त्यांचा हा प्रबंध विश्वसंस्कृतीच्या तत्त्वसमीक्षेत भर घालणारा आहे. या प्रबंधात त्यांनी वैदिक काळापासून ते रवींद्रनाथ टागोर यांच्यापर्यंतच्या विचारांचे मूल्यमापन केले आहे. असाच प्रबंध त्यांनी पाच निबंधांच्या रूपात जर्मन महाकवी गटे (Goethe)वर लिहिला आहे. आपल्या सर्वच लेखनांतून डॉ. श्वाइट्झर मानवी संस्कृतीचे चिंतन, मनन व मूल्यमापन करताना दिसतात.

डॉ. श्वाइट्झर आपले सर्व वैभव, सुख, मान इ.चा त्याग करून आफ्रिकेत गेले. तिथे त्यांनी ओगोवे नदीच्या तीरावर रुग्णालय बांधून वंचित कृष्णवर्णीय समाजाची अविरत सेवा केली. त्यांचे म्हणणेच होते की, युरोपिअन श्वेतवर्णियांच्या पेयपान व रोगांचा संसर्ग आफ्रिकनांना झाला आहे. खरे सुसंस्कृत म्हणवून घेणारे लोकच बिघडलेले आहेत. त्यांचा

उपद्रव अविकसित समाजास होतो आहे. या जाणिवेने डॉ. श्वाइट्झर यांनी तरुणपणीच वानप्रस्थ, वैराग्य स्वीकारून आपले जीवन पूर्णतः सेवेला समर्पित केले. ते जीवनार्थ प्रेरणेस विश्वदृष्टी मानत. धर्म दुबळा आहे म्हणून युद्ध संस्था प्रबळ झाली आहे, अशी त्यांची धारणा होती. धर्म, संगीत, संस्कृती, सेवा, तत्त्वज्ञान, साहित्य, वैद्यक इ. सर्व क्षेत्रांत त्यांचा संचार असे. नोबेल पारितोषिक रचनेतून त्यांनी नवे रुग्णालय विकसित केले. त्यांनी डझनभर ग्रंथांचे लेखन केले आहे. ते सर्व क्षेत्रांत कार्यरत होते. तर्कतीर्थ त्यांच्या कार्याने प्रभावित होतो.

५७) विश्वधर्माचा प्रज्ञावंत प्रवक्ता : कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

सन १९७३ हे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. त्यानिमित्त शतकमहोत्सवी जन्मदिनाच्या पूर्वसंध्येस 'महाराष्ट्र टाइम्स' दैनिकाच्या 'साहित्य, कला, राजकारण' शीर्षक पुरवणीत २२ एप्रिल, १९७३ रोजी लेख प्रसिद्ध झाला होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या स्मृतिलेखात त्यांना अभिवादन करीत सहवासाचे क्षण चित्रित करतात.

'एकला चलो रे' म्हणत समाजसुधारणा करणारे वैज्ञानिक गॅलिलिओ, धर्मसंस्थापक येशू ख्रिस्त, समाजक्रांतिकारक कार्ल मार्क्स, समाजसुधारक राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, महात्मा गांधींचे महाराष्ट्रातील वारसदार म्हणजे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे होय. ते अस्पृश्यता निवारण कार्यात विश्वकुटुंबवादी म्हणून कार्यरत राहिले. ते संकीर्णताविरोधी उदारमतवादी विचारांचे राष्ट्रवादी होते. ते सामाजिक सुधारणांचे खंदे पुरस्कर्ते होते. वैचारिक विरोधाची त्यांनी कधी तमा बाळगली नाही. बांधिलकी, प्रतिबद्धता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होता. विरोध-विकासात ते कार्ल मार्क्सचे अनुयायी होते. सामाजिक क्रांतीच्या झंझावाताशी दोन हात करीत त्यांनी आपलं आयुष्य पणाला लावलं. त्यांचं विपुल लेखन हे जातिवादाचा बीमोड करणारं आहे. कोणत्याही पवित्र धर्मग्रंथावरील श्रद्धा ही वर्तमान, आधुनिक, वैज्ञानिक नि बुद्धिवादी धारणांच्या विरोधी आहे. याबाबात त्यांचं मन स्वच्छ व स्पष्ट होतं. तथापि, कर्मवीर शिंदे हे विश्वमांगल्याचे पुरस्कर्ते होते. मानवी समानता हेच विश्वशांतीचे खरे ते उपकरण मानत. व्यापक नैतिकतेवर आधारित वर्तन हाच खरा धर्माचार मानणारे कर्मवीर पूजा, धर्मसेवेच्या रूपात पाहात. सामाजिक क्रांती आणि धर्मक्रांती एकच मानत. धर्मास कर्मकांडमुक्त करीत मानवी रूपाचार देण्याकडे त्यांचा कल होता. जुन्या विचारांची बीजे जोवर कायम राहतात, तोवर समाजपरिवर्तन प्रयत्न विफल राहतात, हे कर्मवीर शिंदे जाणत असल्याने प्रार्थना समाज, ब्राह्मो समाज, सत्यशोधक समाजाशी त्यांनी स्वतःस जोडले होते.

तर्कतीर्थ आणि कर्मवीर शिंदे यांना एकमेकांचा वाईमुक्कामी दीर्घ सहवास लाभला. स्वातंत्र्यचळवळीत ते समांतर सक्रिय होते. मतभेदपूर्ण मैत्र, तत्त्वनिष्ठा, प्रतिज्ञाबद्धता अशा अनेक गुणांमुळे हे उभयता एकमेकांचे चाहते राहिले.

(ब्याऐंशी)

५८) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : काही ठळक आठवणी

आठवणींमधूनही माणूस समजतो, समजावता येतो, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे हा व्यक्तिलेख. तो 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन (भाग-२)', या रा. ना. चव्हाण यांच्या ग्रंथातून येथे उद्धृत करण्यात आलेला आहे. त्याचे संपादक रमेश चव्हाण आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सदर व्यक्तिलेखात विशद केले आहे की, ते दिवंगत विठ्ठल रामजी शिंदे यांना अनेक वर्षांपासून ओळखत होते. त्यांची अनेक भाषणे सभा, समारंभांमधून तर्कतीर्थांनी ऐकली होती. त्यांची ओळखच येरवडा जेलमध्ये महात्मा गांधींना ते भेटायला आले असता सर्वप्रथम झाली. ते वर्ष होते १९३२. महात्मा गांधी अस्पृश्यता निवारणासंबंधी विचार विनिमयार्थ अनेकांशी चर्चा करीत. महर्षी शिंदे यांनी या चर्चेत फारसे यश येणार नाही, असे मत व्यक्त केले होते. परंतु, महात्मा गांधी आशावादी होते.

त्यानंतर कालांतराने महर्षी शिंदे वाईस ब्राह्मो समाजकार्यार्थ आले असता तर्कतीर्थांना हरिजन विद्यार्थ्यांना शिकवत असल्याचे व त्यांच्यासह भोजन करीत असल्याचे पाहून महर्षी शिंदे यांनी भरसभेत तर्कतीर्थांची प्रशंसा केली होती. इतकेच नव्हे, तर त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आश्वासन दिले होते. पुढे ब्राह्मो समाज व प्राज्ञपाठशाळा यांच्यामध्ये कार्यात्मक सौख्य घडून आले, ते उभयपक्षी सहयोग आणि सहभागामुळे.

रा. ना. चव्हाण संपादित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : काही आठवणी' शीर्षक ग्रंथास तर्कतीर्थांची छोटी प्रस्तावना आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, ''विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारखे समर्पित जीवन जगलेल्या परमार्थी व्यक्ती थोड्याच असतात... आयुष्याच्या अखेरच्या कालखंडात शिंदे यांनी वाई हेच कार्यक्षेत्र विशेष करून निवडले. ही निवड फार मार्मिकपणे त्यांनी केली. वाई हा मूळचा कर्मठ, रूढीनिष्ठ, सनातनी लोकांचा बालेकिल्ला. हा बालेकिल्ला सर करणे ही गोष्ट धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या प्रगतीस आवश्यक होय, असे त्यांनी मानले.'' ही तर्कतीर्थांची निरीक्षणे बोलकी असून, त्यातून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वावर मार्मिक प्रकाश टाकला गेला आहे. महर्षी शिंदे यांनी आयुष्यभर उपेक्षेची पर्वा न करता कार्य केले. ही त्यांची बांधिलकी त्यांना 'महर्षी' पदास पोहोचविते.

❍ धर्मकारण

अलौकिक शक्तीवर माणसाची श्रद्धा असते. त्या शक्तीवर आधारित वैयक्तिक वा सामाजिक आचारपद्धती रूढ होत जाते. यातून धर्म निर्माण होतो. या धर्मासंबंधी धारणा, क्रियाकलाप, पूजाविधी इ.तून व्यक्ती वा समूहजन्य व्यवहार निर्माण होतात. त्या व्यवहारातून विशिष्ट असे हितसंबंध निर्माण होतात. त्याच्या समर्थन, प्रचार, प्रसारातून निर्माण होणारा अनुकूल, प्रतिकूल, विरोधी असा बहुविध संघर्ष समाजात निर्माण होतो. त्यातून घडून येणाऱ्या घटना, प्रसंग, चर्चा इ.तून धर्मकारण आकारते. अशा विषयसंबंधी, बहुधा धर्मश्रद्ध

वा धर्मप्रवण व्यक्तींवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी काही व्यक्तिलेख विविध प्रसंगांनी लिहिले आहेत.

५९) ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती यांचे आत्मनिष्ठ व्यक्तिमत्त्व

नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे गुरू. त्यांनी आपल्या गुरूंवर वारंवार लिहिले आहे. गौरवपर भाषण, संक्षिप्त चरित्र, मुलाखत असे त्या लेखनाचे स्वरूप आहे. तर्कतीर्थ ब्रह्मदेश दौऱ्याहून परतल्यावर स्वामी केवलानंद सरस्वती यांचे १ मार्च, १९५५ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यानंतर तर्कतीर्थांनी 'नवभारत' मासिकाच्या एप्रिल, १९५५ च्या अंकात लिहिलेला हा श्रद्धांजली लेख. त्यात त्यांनी आपल्या गुरूंच्या व्यक्तिमत्त्वाची मीमांसा केली आहे.

स्वामी केवलानंद सरस्वती यांनी आपले स्वामी गुरू प्रज्ञानंद यांच्याकडून वयाच्या बाविसाव्या वर्षी अनुग्रह प्राप्त करून घेतला. त्यांनी आपल्या जीवनारंभी ऐकान्तिक नैष्ठिक ब्रह्मचर्याची दीक्षा घेतली. तिचे त्यांनी आयुष्यभर पालन केले. ते जीवनभर ब्रह्मनिष्ठ मुनी म्हणून जगले. त्यांना एकांत खूप मानवला होता. कारण, ते आत्मनिष्ठ होते. तसे एकांत मानवणे सहसा कठीण असते. त्यांच्यात निरोगिता, तेजस्विता व चित्ताची प्रसन्नता चिरकाल निरंतर झळकत होती. त्यांना भरदार, रेखीव शरीरयष्टी लाभली होती. स्वतः ब्रह्मचारी राहिले तरी त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना गृहस्थाश्रमाची मुभा दिली होती. आजीवन त्यांनी निवृत्त मनोवृत्तीने जीवन कंठले, तरी त्यांचे मनोआरोग्य सुस्थितच राहिले. त्यांच्या जीवनात संन्यासनिष्ठा व धर्मयोग यांचा सुंदर मिलाफ होता, त्यामुळे ते धर्मसुधारणा, अध्यापन, कोशनिर्मिती इ. कार्यात आयुष्यभर मग्न राहिले. आत्मतृप्त जीवन जगत वृद्धापकामुळे १ मार्च, १९५५ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली.

६०) थोर धर्मसुधारक : कै. महादेवशास्त्री दिवेकर

मूळचे वि. गो. विजापूरकर यांच्या तळेगाव दाभाडे येथील समर्थ विद्यालयाचे जे विद्यार्थी शिक्षक, ती शाळा राष्ट्रविरोधी ठरवून ब्रिटिशांनी बंद पाडली. त्यातील राष्ट्रप्रेमींपैकी महादेवशास्त्री दिवेकर एक होते. ८ ऑगस्ट, १९७१ रोजी त्यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. तर्कतीर्थांनी त्यांचे जीवन व व्यक्तिमत्त्व चित्रित करीत लिहिलेला हा कृतज्ञता लेख 'नवभारत' मासिकाच्या सप्टेंबर, १९७१ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता.

महादेवशास्त्री दिवेकर यांचा जन्म ५ फेब्रुवारी, १८८२ रोजी कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील उगार खुर्द या सीमाभागात झाला. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या लोकमान्य टिळकांच्या चतुःसूत्रीवर स्थापित समर्थ विद्यालयात ते राष्ट्रीय शिक्षण घेत होते. ती शाळा ब्रिटिशांनी बंद केल्यानंतर जे विद्यार्थी प्राज्ञपाठशाळा, वाई येथे नारायणशास्त्री मराठे यांच्याकडे दाखल झाले, महादेवशास्त्री दिवेकर त्यांपैकी एक होत. येथे येऊन ते गुरुवर्यांकडे शांकरभाष्य, पाणिनीय व्याकरणावरील काशिकावृत्ती शिकले.

शाळेतील उत्सव, समारंभ, कीर्तन, प्रवचनात ते भाग घेत. सन १९१६ मध्ये नारायणशास्त्री मराठेंनी प्रज्ञपाठशाळा विधिवत स्थापन केली. त्यात महादेवशास्त्री दिवेकर संस्थापक होते. प्राज्ञपाठशाळेस आर्थिक स्थैर्यार्थ निधी संकलनात महादेवशास्त्री दिवेकर यांचा सिंहाचा वाटा होता. त्यासाठी ते विशाल महाराष्ट्र दौरा करीत. कीर्तन करून निधी जमवीत. पुढे या शाळेचे रूपांतर राष्ट्रीय शिक्षण संस्थेत झाले.

महादेवशास्त्री दिवेकर यांनी शुद्धीकरण, धर्मसुधारणा, ब्राह्मण जातीचे एकीकरण अशी अनेक कार्ये केली. त्यासाठी विपुल लेखन केले. सन १९२६ मध्ये प्राज्ञपाठशाळेचा राजीनामा देऊन विवाहबद्ध होऊन मिरजेत स्थापित झाले. त्यांनी बुवाबजीविरुद्ध दंड थोपटले होते. त्यांच्यावर खटले गुदरले गेले. परंतु, ते त्यातून निर्दोष मुक्त झाले. त्यांना दीर्घायुष्य लाभले. कीर्तनात ते राजकारण टाळून केवळ धार्मिक, सामाजिक विचारांचा पुरस्कार करीत असत. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांच्यावर त्यांची नितांत निष्ठा होती. धर्मप्रवक्ता म्हणून अनेक धर्मसभा, परिषदा इ.मधून ते सुधारवादी विचार मांडत व ठराव करून घेत. सन १९२७ च्या अकोला धर्मपरिषदेत त्यांनी 'सर्व मानव समान' तत्त्व स्वीकृत करून घेतले. शुद्धीकरणास मान्यता मिळून हरिजन मंदिर प्रवेश स्वीकृती मिळविली. जातिभेद निर्मूलन मान्य करून घेतले. जातिविवाह मान्यता मिळविली. ८ ऑगस्ट, १९७१ रोजी सोलापूर येथे त्यांचे निधन झाले.

६१) कै. वासुदेवशास्त्री कोनकर

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई या संस्थेचे आजीव सेवक, माजी विद्यार्थी, संचालक, प्रचारक, सचिव अशा अनेकविध भूमिकांतून त्या संस्थेच्या विकासार्थ आजीवन कार्यरत असलेल्या वासुदेवशास्त्री कोनकर यांचे निधन वृद्धावस्थेत २५ नोव्हेंबर, १९७६ रोजी रात्री ८.३० वाजता विलेपार्ले, मुंबई मुक्कामी झाले. त्यांचे जीवन समजाविणारा एक व्यक्तिलेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिला. त्याचे स्वरूप अर्थातच मृत्युलेखसदृश होते. तो 'नवभारत' मासिकाच्या जानेवारी, १९७७ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. मृत्युसमयी ते ७५ वर्षांचे होते. ते त्यांचे अमृतमहोत्सवी वर्ष होते.

वासुदेव विष्णु कोनकर त्यांचे पूर्ण नाव. त्यांचा जन्म १३ मे, १९०२ रोजी कुलाबा जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील पालीजवळ असलेल्या सिद्धेश्वर या छोट्या गावी झाला होता. त्यांचे वडील विष्णुशास्त्री व चुलते कृष्णशास्त्री उभयता कीर्तनकार होते. ही त्यांची घराण्याची परंपरा होती. वासुदेव कोनकरांचे चुलतभाऊ कीर्तनकार होते. वासुदेवशास्त्री वयाच्या ३१ व्या वर्षी वेद व संस्कृत शिकण्यासाठी म्हणून प्राज्ञपाठशाळेत आले. ३ वर्षे यांनी 'ऋग्वेद' अभ्यास केला. पुढे त्यांनी याज्ञिकीचे, विविध कर्मकांडांचे शिक्षण घेतले. नंतरच्या काळात संस्कृतकाव्ये, व्याकरण, वेदांत व धर्मशास्त्राचा अभ्यास केला. 'रामायण' आणि 'महाभारत'ची पारायणे केली; पण गळा नसल्याने ते कीर्तनकार झाले नाहीत.

शिक्षण पूर्ण झाल्यावर वासुदेवशास्त्री कोनकर यांनी स्वत:स प्राज्ञपाठशाळेस वाहून घेतले. निधी संकलनाचे मोठे कार्य केले. ते उत्तम व्याख्याते होते. 'प्रवचन'पटू म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांनी काही काळ 'धर्मकोश' संपादनाचे कार्य केले. दिवेकर शास्त्रींप्रमाणेच कोनकरांनी धर्मसुधारणा कार्यात सहभाग घेतला होता. त्यांनी अनेक आंतरजातीय विवाहांचे पौरोहित्य केले होते. प्राज्ञ प्रेस सन १९०० साली सुरू झाल्यावर त्याची मुख्य जबाबदारी वासुदेवशास्त्री कोनकर यांच्यावरच होती. शेवटची १६ वर्षे ते प्राज्ञपाठशाळा कार्यार्थ मुंबईत राहिले. ध्येयनिष्ठा, सौजन्य, मधुर स्वभाव ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ठळक वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वतींच्या अनेक विश्वासू सहकाऱ्यांपैकी ते एक होते. विविध जबाबदाऱ्या वेळोवेळी वासुदेवशास्त्री कोनकर यांच्यावर स्वामींनी टाकल्या. त्या सर्व त्यांनी सेवाभाव व कर्तव्यपरायणतेने पूर्ण केल्या. संस्था ऊर्जितावस्थेत येते, ती अशा समर्पित कार्यकर्त्यांमुळे. अशांचे जाणे संस्थेची न भरून येणारी हानी व पोकळी असते.

❍ इतिहास

इतिहास भूतकालीन घटना, प्रसंग, व्यक्ती अभ्यासाचे शास्त्र असून, ते प्रामुख्याने वस्तुनिष्ठपणे वास्तविक पुराव्यांवर आधारित भूतकाळाचा अभ्यास व धांडोळा घेत असते. हे कार्य इतिहासकार करतो. त्याच्या लेखनअभ्यासाची पद्धती वैज्ञानिक असते. इतिहासातील सर्व घटना, प्रसंग, व्यक्ती इ.चे पुरावे मिळतातच असे नाही. अशा वेळी इतिहासकार संभाव्य सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा काही मराठी इतिहासकारांच्या व्यासंग, कार्य, व्यक्तिमत्त्वावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी व्यक्तिलेख लिहिले आहेत.

६२) प्रा. नरहर रघुनाथ फाटक

१५ एप्रिल, १९६३ रोजी इतिहासकार प्रा न. र. फाटक यांनी आपल्या वयाची ७० वर्षे पूर्ण केली. त्यानिमित्त तर्कतीर्थांनी लिहिलेला हा गौरव लेख. तो 'नवभारत' मासिकाच्या मे, १९६३ च्या अंकात प्रकाशित आहे. तर्कतीर्थांनी प्रा. न. र. फाटक यांच्यावर 'नवभारत' जानेवारी १९८०च्या अंकात लिहिलेला दुसरा लेख स्मृतिलेख आहे.

पहिल्या लेखानुसार प्रा. न. र. फाटक यांचा जन्म १५ एप्रिल, १९९३ रोजी तत्कालीन भोर संस्थानातील जांभळी या खेडेगावात झाला. परंतु, उमेदीचा काळ उत्तर हिंदुस्थानात वडिलांच्या नोकरीमुळे गेला. त्यामुळे त्यांचे शिक्षण राजस्थान, माळवा, उत्तर प्रदेशात झाले. मराठी, संस्कृत, हिंदी, इंग्रजी, उर्दू असे विविधभाषी शिक्षण लाभल्याने बहुभाषी वाचनाची बैठक लाभली. 'रामविजय', 'दासबोध' वाचन झाले. उमेदीच्या काळात मान्यवर इतिहाकारांचे साहचर्य लाभले. त्यामुळे ते भारत इतिहास संशोधन मंडळाकडे आकर्षित झाले. शालेय वा महाविद्यालयीन काळात गुणात्मक प्रगतीपेक्षा व्यासंगी विकासाकडे त्यांचे अधिक लक्ष असे. त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुमुखी होते. ते पत्रकार, शिक्षक व व्यासंगी म्हणून

सर्वपरिचित राहिले. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. समीक्षात्मक लेखनात त्यांचा हातखंडा होता. संत रामदास, छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ इ.वरील त्यांचे लेखन मान्यताप्राप्त झाले. सप्रमाण विवेचन शैलीतून त्यांनी लेखनातील, साहित्यातील दोषदिग्दर्शन करून अचूक इतिहास लेखन पद्धती रूढ केली. चरित्रकार म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांनी महिला विद्यापीठ व रामनारायण रुईया महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केले. निर्भीड, प्रखर टीकाकार, इतिहासकार म्हणून ते प्रसिद्ध होते. त्यांची राहणी साधी असे. अनेक सार्वजनिक संस्थांशी त्यांचा संबंध होता. अशी साद्यंत माहिती तर्कतीर्थांचा हा व्यक्तिलेख पुरवितो.

६३) इतिहास संशोधक व साहित्यनिर्माते : कै. वि. का. राजवाडे

इतिहासकार कै. वि. का. राजवाडे यांची जन्मशताब्दी सन १९६३ की १९६४ मध्ये असा संभ्रम निर्माण झाल्याच्या काळात त्यावर प्रकाश टाकण्याच्या प्रस्तावनेसह तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेला सदर लेख मूलत: व्यक्तिलेखच आहे. तो 'नवभारत' मासिकाच्या ऑगस्ट, १९६४ मध्ये प्रकाशित झाला होता.

झाले असे की, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९६४ मध्ये अमेरिकेस गेले होते. ११ जुलै, १९६४ रोजी अमेरिका दौऱ्यावरून मायदेशी परतले. पाहतात तो कै. वि. का. राजवाडे जन्मशताब्दीनिमित्त वृत्तपत्रे आणि नियतकालिकांमधून रकानेच्या रकाने भरून कै. वि. का. राजवाडे यांच्यावर मजकूर प्रकाशित होत होता. तत्पूर्वी, तर्कतीर्थांनी सन १९५८ मध्ये साहित्य अकादमीसाठी 'राजवाडे लेखसंग्रह' संपादित करून प्रकाशित केला होता. तेव्हा कै. वि. का. राजवाडे यांच्या जन्मतिथीचे उल्लेख त्यांचे चरित्र नोंदलेल्या सर्वश्री महामहोपाध्याय प्रा. दत्तो वामन पोतदार, साने गुरुजी, भा. वा. भट यांनी वेगवेगळी नोंदविल्याचे लक्षात आल्यावरून शहानिशा करून साने गुरुजीप्रणित जन्मतिथी आषाढ शुद्ध अष्टमी, शके १७८५ म्हणजे म्हणजे २४ जून १८६३ येते, ती मान्य करणे सयुक्तिक असल्याचा अभिप्राय येथे आहे. (मात्र मराठी विश्वकोश खंड - १४ पृ. ७१७ वर सदाशिव आठवले लिखित नोंदीत मात्र १२ जुलै, १८६४ च आहे.) असो.

उर्वरित व्यक्तिलेखानुसार वि. का. राजवाडे यांचे बालपण व शिक्षण वडगाव, जि. पुणे येथे झाले. उर्वरित शिक्षण पुण्यात झाले. मॅट्रिक (मुंबई विद्यापीठ) पुण्यातून तसेच बी.ए. १८९० मध्ये डेक्कन कॉलेज, पुणेमधूनच झाले. महाविद्यालयीन शिक्षण संपल्याबरोबर त्यांचा विवाह झाला. सन १८९५ मध्ये त्यांनी 'भाषांतर' मासिक सुरू केले. ते ३७ महिने चालले. मराठ्यांचा इतिहास, मराठी भाषेचे व संस्कृतचे ऐतिहासिक व्याकरण, जुन्या मराठी वाङ्मयाचा इतिहास, हिंदू समाजाच्या इतिहासाची समाजशास्त्रीय मीमांसासारख्या विषयांवर इतिहासकार राजवाडे यांचे लेखन आजही प्रमाण मानले जाते. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' (२२ खंड) या कार्याची प्रस्तुत लेखात विस्तृत मीमांसा करण्यात आली असून,

ती मुळातूनच वाचायला हवी. वि. का. राजवाडे हे इतिहास ही विज्ञानाप्रमाणे वस्तुनिष्ठ ज्ञानशाखा मानत असत. तर्कतीर्थांचा हा लेख म्हणजे इतिहासकार वि. का. राजवाडे यांच्या लेखनपद्धतीची विस्तृत मीमांसा होय. इतिहासलेखन पद्धतीची यात विस्तृत चर्चा आहे. यात चरित्रापेक्षा साहित्यास महत्त्व देण्यात आले आहे.

६४) इतिहास संशोधक व साहित्यनिर्माते : कै. न. र. फाटक

हा लेख स्मृतिलेख असून, तो श्रद्धांजलीपर लेख होय. प्रा. न. र. फाटक मराठ्यांचा इतिहास आणि मराठी साहित्य अशा विषयांवर विपुल लिहून गेले. लेखनाची त्यांची बैठक संशोधकाची राहिली आहे. संत आणि समाजसेवक यांची वस्तुनिष्ठ चरित्रे लिहिल्याने ते चरित्रकार इतिहास लेखक म्हणून आपल्यापुढे येतात. सन १९१८ ते १९३५ या कालखंडात न. र. फाटक हे 'इंदुप्रकाश' या नेमस्तांच्या नियतकालिकात संपादक म्हणून कार्यरत होते. नंतर नाटकसम्राट खाडिलकरांच्या 'नवा काळ'मध्ये ते उपसंपादक म्हणून रुजू झाले. या वृत्तपत्रांमधून न. र. फाटक यांनी 'आलमगीर', 'सत्यान्वेषी', 'फरिश्ता' अशा टोपण नावांनी विपुल लेख केले. सन १९३५ मध्ये ते प्राज्ञपाठशाळा मंडळाचे संचालक झाल्यावर तर्कतीर्थांचा-त्यांचा निकट परिचय व स्नेह जळून आला.

महाविद्यालयीन अध्यापनातून निवृत्त झाल्यावर महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या नियुक्तीनुसार त्यांनी 'महाराष्ट्र राज्याचा स्वातंत्र्योत्तर इतिहास' समितीवर कार्य केले. त्यांच्या 'आदर्श भारत सेवक गोपाळ कृष्ण गोखले' चरित्रास सन १९७१ चे साहित्य अकादमी पारितोषिक लाभले होते. त्यांचे '१८५७ ची शिपाईगर्दी' पुस्तक गाजले. प्रा. न. र. फाटक फटकळ परंतु गुणग्राहक असल्याची नोंद प्रस्तुत लेखात तर्कतीर्थांनी करून ठेवली आहे. न. र. फाटक संगीताचे चांगले जाणकार होते. ते विष्णु दिगंबर पलुस्करांचे शिष्य होते. गिर्यारोहण, पर्यटन छंद त्यांच्या इतिहासलेखनाचा पाया ठरला.

प्रा. ना. र. फाटक यांचे वयाच्या ८७व्या वर्षी २१ डिसेंबर, १९७९ रोजी वृद्धावस्थेत निधन झाले. आज इतक्या वर्षांनंतरही त्यांचे इतिहास आणि समीक्षालेखन आदर्श म्हणून प्रशंसले जाते. ते त्यांच्या तटस्थ लेखनशैलीमुळे. ते आपल्या लेखनातून चरित्रनायकांचे नवनवे पैलू उजेडात आणण्यासाठी प्रसिद्ध होते. सप्रमाण लेखन पद्धतीने त्यांनी पूर्वसुरी इतिहास लेखनातील विसंगती लक्षात आणून दिल्या होत्या. काहींनी त्याची दखल घेऊन दुरुस्ती केली, तर काहींनी दुर्लक्षित केले. तरी आज साक्ष निघते ती मात्र प्रा. न. र. फाटक यांच्याच लेखनाची. ते प्राध्यापक झाले ते व्यासंगी लेखनाच्या आधारावरच. प्रा. न. र. फाटक यांनी अनेक व्यासंगी विद्यार्थी तयार केले. त्यांच्या इतिहास व समीक्षा लेखनास तत्त्वज्ञानाची डूब असे. त्यामुळे ते लेखन विचारणीय ठरले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा हा श्रद्धांजली लेख त्यांचे योगदान समर्पक शब्दांत व्यक्त करणारे छोटेखानी, संक्षिप्त चरित्र होय.

६५) प्रा. न. र. फाटक ः सार्वजनिक जीवनाशी एकरूप झालेला विद्वान

प्रा. न. र. फाटक हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे स्नेही व सहकारी. या ऋणानुबंधांमुळे तर्कतीर्थांनी 'नवभारत'मध्ये प्रा. न. र. फाटक यांच्या सत्तरीनिमित्ताने लिहिलेला एक लेख व दुसरा श्रद्धांजली लेख होता. प्रा. न. र. फाटक यांचे निधन २१ डिसेंबर १९७९ ला मुंबई मुक्कामी झाले. प्रस्तुतचा लेख तेव्हाचा वा त्या संदर्भाचा असला तरी तो प्रसिद्ध झाला 'साहित्य' दिवाळी वार्षिकाच्या १९८२ च्या अंकात.

या लेखात तर्कतीर्थांनी प्रा. न. र. फाटक यांचा प्राज्ञपाठशाळा, मुंबई साहित्य संघ, भारत इतिहास संशोधक मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठी विश्वकोश मंडळ इत्यादी संस्थांशी निकटचा नि वर्षोन् वर्षांचा संबंध असल्याचे स्पष्ट करून ते सार्वजनिक चरित्र असल्याचे स्पष्ट केले आहे. या बरोबरीने तर्कतीर्थांना प्रा. फाटकांच्या पत्रकार नि संपादक म्हणून केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला आहे. न. र. फाटक मराठीचे प्राध्यापक होण्यापूर्वी 'विविध ज्ञानविस्तार', 'नवाकाळ', 'विविध वृत्त', 'मौज' इत्यादी दैनिक व नियतकालिकांत नियमित लेखन करीत. त्यांचे लेखन स्तंभ विविध टोपण नावांनी- 'आलमगीर', 'सत्यान्वेषी', 'फरिश्ता' इत्यादी प्रसिद्ध होत असे, तर काही स्वनामे! तर्कतीर्थांनी या स्मृतिलेखात त्यांचे व्यक्तिमत्त्व, स्वभाव, वृत्ती इत्यादी अंगांनी व्यक्ती म्हणून प्रा. फाटक चित्रित केले आहेत. तसेच इतिहास संशोधक म्हणून केलेले ऐतिहासिक कार्य रेखांकित केले आहे. प्राध्यापक, संशोधक, पत्रकार, संपादक, लेखक म्हणून प्रा. न. र. फाटक यांचे मराठी भाषा व साहित्यातील योगदान असाधारण होते, हे या लेखातून स्पष्ट होते. व्यक्ती म्हटली की गुणदोष आलेच. पण समग्रतः प्रा. न. र. फाटक एक व्यासंगी इतिहासकार होते. समर्थ रामदास, लोकमान्य टिळक, गोपाळ कृष्ण गोखले यांची प्रा. फाटकलिखित चरित्रे म्हणून पुराव्यांवर आधारित चरित्र लेखनाचा वस्तुपाठ होय. ते एकांगी नव्हते. गडकोट, संगीत, मित्रमंडळ, खानपान यांतून त्यांची रसिक वृत्ती ही तर्कतीर्थांनी या लेखात शब्दबद्ध केली आहे. त्यामुळे हा स्मृतिलेख त्यांचे छोटेखानी चरित्र बनले आहे.

❍ शिक्षण

शिक्षण म्हणजे अध्ययन आणि अध्यापनाचा समन्वय. ज्ञान, मूल्ये, कौशल्य इ.द्वारे शिक्षण व्यक्तिविकास घडवून आणते. प्राचीन काळापासून औपचारिक तसेच अनौपचारिकपणे माणूस शिकत आला आहे. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं सारं शिक्षण गुरुकुल पद्धतीने झाले. ते पुढे स्वत: आचार्य, पंडित, तर्कतीर्थ होत समाजशिक्षिक, प्रबोधक झाले. या काळात शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर विद्वानांशी त्यांचा संबंध आला. मैत्र जडले. अशांपैकी प्रा. गोवर्धनदास पारीख आणि प्रा. अ. भि. शहा यांचा निकट परिचय घडून आला, तो

रॉयवादाच्या वैचारिक घडणीमुळे. त्यांच्याबद्दल तर्कतीर्थांनी लिहिलेले व्यक्तिलेख हे सुहृदांचं जीवन समजावणारं आहे.

६६) माझे थोर मित्र : कै. प्रा. गोवर्धनदास पारीख

'नवभारत' मासिकाने प्रा. गोवर्धनदास पारीख यांच्या पहिल्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने 'कै. गोवर्धन पारीख विशेषांक' डिसेंबर, १९७७ मध्ये प्रकाशित केला होता. त्यात 'माझे थोर मित्र गोवर्धन पारीख' शीर्षकाचा एक स्मृतिलेख तर्कतीर्थांनी लिहिला आहे.

प्रा. गोवर्धनदास पारीख आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा परस्परांशी सन १९३७ ला परिचय झाला तोच मुळी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या व्याख्यानमालेमुळे. तेव्हा पारीख महाविद्यालयीन विद्यार्थी होते. पुढे पारिखांचे अनेक मित्र तर्कतीर्थांचे स्नेही झाले. मैत्रीचा धागा वैचारिक साम्य हाच होता. या काळात मानवेंद्रनाथ रॉय यांचे काही काळ पुण्यात वास्तव्य होते. पारीख पुण्यालाच शिकत होते. पुण्यातूनच ते एम.ए. झाले. त्या काळात पुण्यात साम्यवादी मंडळींनी अभ्यासवर्ग सुरू केले होते, तर गोवर्धनदास पारीख यांनी मार्क्सवादाचे स्वतंत्र अभ्यासवर्ग सुरू करून या विचारांवरील आपली निष्ठा जाहीर केली. या अभ्यासवर्गातूनच इंदुमतींचा नि त्यांचा स्नेह जुळून आला. त्या त्यांच्या जीवनसंगिनी बनल्या. हा त्यांचा आंतरजातीय विवाह होता. पारीख यांना उपजतच वाक्चातुर्य नि तर्कबुद्धीची देणगी लाभलेली होती. त्या आधारावर ते मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'इंडिपेंडंट इंडिया' या साप्ताहिकात 'तिवारी' या टोपण नावाने लेखन करीत असत.

सन १९४० मध्ये मुंबईच्या रामनारायण रुइया महाविद्यालयात गोवर्धनदास पारीख अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. एव्हाना त्यांची ओळख रॉयवादी म्हणून दृढ झालेली होती. ते रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षात सक्रिय सहभागी असत. त्या वेळी यशवंतराव चव्हाणही रॉयवादी झाले होते. व्यक्तिगत जीवनातील त्यांचा व्यवहार जात, धर्मनिरपेक्ष होता. त्यांच्या मुलाचा विवाह आंतरधर्मीय होता. मानवेंद्रनाथ रॉय यांनी आपल्या 'रॅडिकल डेमॉक्रेटिक पार्टी'साठी चालविलेल्या 'क्वेस्ट' नियतकालिकाचे प्रा. अ. भि. शहा संपादक होते. आणीबाणीच्या काळात सरकारविरोधी नियतकालिक म्हणून बंदी आली म्हणून मग 'न्यू क्वेस्ट' सुरू करण्यात आले होते.

सन १९७० मध्ये 'मुस्लीम सत्यशोधक समाज' कै. हमीद दलवाई यांनी स्थापन केला, तर प्रा. अ. भि. शहा त्याचेही आधारस्तंभ बनले. सर्वधर्मीय सुधारणांचे ते समर्थक होते. प्रा. अ. भि. शहा यांनी विपुल लेखन केले. 'ट्रेडिशन अँड मॉडर्निटी', 'चॅलेंजेस टू सेक्युलॅरिझम', 'सेक्युलॅरिझम इन इंडिया' हे त्यांचे ग्रंथ बुद्धिजीवी समाजात बहुचर्चित राहिले. त्यांनी पंडिता रमाबाईंच्या पत्रांचे संपादन करून त्यास विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे.

डॉ. जे. पी. नाईक यांनी सेवानिवृत्तीनंतर पुण्यात चालविलेल्या 'इंडियन इंस्टिट्यूट ऑफ एज्युकेशन' संस्थेचे ते संचालक होते.

प्रा. अ. भि. शहा यशस्वी अध्यापक होते. त्यांना उच्च शिक्षणातील विविध प्रश्न व समस्यांची चांगली जाणीव होती. मानवी भवितव्याची त्यांना निरंतर चिंता दिसे. ते प्रज्ञावंत होते. प्रज्ञावंतास साजेसे धैर्यही त्यांच्यात होते. त्यामुळे लोकप्रिय विचारांचा अनुनय न करता लोकहितवादी विचाराचेच ते पक्षधर बनून राहिले. मित्रांना प्रा. अ. भि. शहा मोठा आधार वाटत असे. ते प्रबोधक म्हणून प्रसिद्ध होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे प्रा. गोवर्धनदास पारीख व प्रा अ. भि. शहा यांचे मित्र, सहकारी होते तसे मार्गदर्शकही होते; पण आपल्या मित्रांना मोठेपण देण्याची उदारता त्यांच्यात होती. विचारस्वातंत्र्य हे मूल्य म्हणून तर्कतीर्थांनी स्वीकारलेले असल्याने त्यांनी 'मैत्र' नि 'विचारभिन्नता' यांत कधी संघर्ष शिरू दिला नाही. म्हणून ही सर्व मंडळी अनेक संस्थांमध्ये एकत्र कार्य करीत होती. प्रत्येकाचे विषय, आवड भिन्न असली तरी ते एकमेकांस पूरक व साहाय्यक बनून कार्य करीत राहिले. परंतु, त्यांनी काँग्रेस पक्ष सोडला नाही. पुढे यशवंतराव चव्हाण द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी प्रा. गोवर्धनदास पारीख यांची नियुक्ती मुंबई विद्यापीठाच्या सचिवपदी (रेक्टर) केली. त्यांनी मुंबई विद्यापीठात चांगले कार्य केले. परंतु, प्रा. गजेंद्रगडकर मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाल्यानंतर त्यांना हे पद सोडावे लागले. त्यातच त्यांची प्रकृती ढासळली व पुढे प्राणोत्क्रमण झाले.

प्रा. गोवर्धनदास पारीख तर्कतीर्थांचे सहकारी म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे सदस्य म्हणून कार्यरत होते. बेनेट कोलमन अँड कंपनी आणि बँक ऑफ इंडियाचे संचालक म्हणूनही त्यांनी कार्य केले. ते मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अनेक वर्षे उपाध्यक्ष होते. ते संस्थांच्या समस्यांमधून भार्ग काढण्यामध्ये मोठे वाकबगार होते. अनेक प्रसंगांत प्रा. गोवर्धनदास पारीख आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यात मतभेद असे; पण तो त्यांनी कधी मैत्रीत येऊ दिला नाही. या पूर्ण लेखात अशा प्रसंगांची संख्या काही कमी नाही. हा लेख गोवर्धनदास पारीख यांच्या अनेक जीवनपैलूंवर प्रकाश टाकणारा आहे.

६७) मूलगामी मानवतावादी विचारक : प्रा. अ. भि. शहा

प्रा. अ. भि. शहा यांना श्रद्धांजली वाहत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेला हा लेख 'नवभारत', नोव्हेंबर १९८१ च्या अंकात आहे. प्रा. अ. भि. शहा यांचे १५ ऑक्टोबर, १९८१ रोजी दुःखद निधन झाले होते. ते ६२ वर्षांचे होते.

प्रा. अ. भि. शहा हे कर्ते सुधारक म्हणून सर्वपरिचित होते. त्यांचा जन्म २ सप्टेंबर, १९२० रोजी गुजरातमध्ये झाला. मॅट्रिक परीक्षेत ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. त्यांनी पुणे, जळगाव, मुंबई येथील विविध महाविद्यालयांत अध्यापन केले. गणित त्यांचा अध्ययन, अध्यापनाचा विषय होता. मुंबईच्या एस.आई.इ.एस. महाविद्यालयाचे ते काही काळ प्राचार्यही होते. 'काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम' या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या आशिया

विभागाचे ते संचालक होते. आणीबाणीच्या काळात प्रा. अ. भि. शहा यांनी लोकनायक जयप्रकाश यांच्या तुरुंगातील दैनंदिनीचे मराठीत पु. ल देशपांडे यांच्याकडून करून घेतलेले भाषांतर 'स्वगत' त्या वेळी खूप गाजले नि खपले. सन १९४० च्या दशकात ते मानवेंद्रनाथ रॉय यांचे सहकारी म्हणून सक्रिय होते. या काळात प्रा. अ. भि. शहा यांनी 'इंडियन सेक्युलर सोसायटी'चा पाय घातला.

❍ साहित्य

साहित्याची परंपरा शिक्षणासारखी प्राचीन. भारतासारख्या उपखंडसदृश देशात भाषा नि साहित्याचे जे वैविध्य दिसून येतं, त्याची बरोबरी केवळ निसर्गच करू जाणे! त्यामुळे भारतीय भाषांतील कोणताही साहित्यिक प्रथम भारतीय असतो नि नंतर त्या भाषा वा प्रांताचा. ही उदारता जगात रुजविली गटेंनी आणि भारतात रवींद्रनाथ टागोर यांनी. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विश्वयात्री होते, तसे भारतयात्रीही. ते त्यांच्या लेखनातून स्पष्ट होते. व्यक्तिलेखातही सदरचं 'आंतरभारती' रूप स्पष्ट होतं.

६८) बंगाली कवी व तत्त्वज्ञ : सुधीन्द्रनाथ दत्त

सुधीन्द्रनाथ दत्त हे बंगालीतील प्रख्यात कवी, कलाकार. ते रवींद्रनाथ टागोर यांचे स्नेही व मानवेंद्रनाथ रॉय यांचे प्रेमी. पंडित, पत्रकार, संपादक, तत्त्वज्ञ म्हणून त्यांनी केलेले कार्य बंगालमान्य होते. २५ जून, १९६० रोजी त्यांचं निधन झाल्यानंतर बंगालमध्ये अनेक विशेषांक प्रकाशित झाले. 'नवभारत' मासिकाच्या ऑगस्ट १९६० च्या अंकात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी श्रद्धांजलीपर व्यक्तिलेख लिहून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उजेडात आणले.

सुधीन्द्रनाथ दत्त यांचा जन्म ३० ऑक्टोबर, १९०१ रोजी बंगालमध्ये झाला. कलकत्ता येथील प्रसिद्ध सॉलिसिटर हितेंद्रनाथ दत्त हे त्यांचे वडील. त्यांचे घराणे श्रीमंत व सुसंस्कृत. सुधीन्द्रनाथ दत्त यांचे प्राथमिक शिक्षण बंगालमध्ये, तर माध्यमिक शिक्षण बनारसमध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी कलकत्त्याच्या स्कॉटिश चर्च कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सन १९२२ मध्ये ते तेथून बी.ए. झाले.

त्यांच्यावर कविवर रवींद्रनाथांच्या काव्याचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे सुधीन्द्रनाथ दत्त साहित्याकडे आकर्षित झाले. रवींद्रनाथांच्या ते निकट संपर्कात आले नि काव्याबरोबर कला, संगीतात त्यांना रुची व गती लाभली. रवींद्रनाथ १९२९ मध्ये जपान, अमेरिका दौऱ्यावर गेले होते, तेव्हा ते सुधीन्द्रनाथ दत्त यांना आपल्याबरोबर घेऊन गेले होते. सुधीन्द्रनाथ दत्तांनी काही काळ युरोपमध्ये राहून तेथील साहित्य आणि संस्कृतीचा अभ्यास केला. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व उदारवादी बनले.

सन १९३० मध्ये सुधीन्द्रनाथ दत्त यांनी 'परिचय' नावाचं साहित्यिक त्रैमासिक सुरू केले. ती त्यांची वाङ्मयीन वाटचाल ठरली. यातून एक मोठा मित्रपरिवार उभा राहिला. पुढे

'स्टेट्समन'चे उपसंपादक झाले. वृत्तपत्रीय लेखनातून त्यांनी साहित्यावकाश विस्तारला. युरोपिअन कवींच्या कवितांचे त्यांनी भाषांतर केले. त्यातून सुधीन्द्रनाथ दत्तांचा 'प्रतिध्वनी' हा भाषांतरित कवितासंग्रह पुढे आला. सुधीन्द्रनाथ दत्त यांनी 'दामोदर व्हॅली कार्पोरेशन'मध्ये वृत्ताधिकारी म्हणून कार्य केले. नंतर ते बंगालमधील जाधवपूर विद्यापीठात तुलनात्मक साहित्यविद्या विभागाचे प्रमुख होते.

सुधीन्द्रनाथ दत्त यांची बुद्धिमत्ता अफाट होती. ते आतिथ्यशील होते. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. त्यात मानवेंद्रनाथ रॉयपण होते. ते त्यांचे जीवश्चकंठश्च मित्र होते. एक थोर मानवतावादी कवी म्हणून सुधीन्द्रनाथ दत्त प्रसिद्ध होते.

बंगाल प्रांत हा प्रारंभिक काळापासून साहित्य, कला, संगीत, संस्कृतीचा प्रांत राहिला आहे. तेथील कुटुंबांत बालपणापासूनच मुलांना बहुविध कलांमध्ये पारंगत केले जाते. तेथील जीवनशैली कलास्वादकच म्हणायला हवी. निसर्गपूरक जीवन हे त्याचं खरं रहस्य म्हणून सांगता येईल. बंगालला समृद्ध निसर्ग लाभला. नद्यांची विस्तृत पात्रे, जलसंपन्नतेमुळे घरोघरी तळी, सरोवरे, लोककथा, लोककविता, लोककलांचा समृद्ध वारसाही बंगालला प्रथम निसर्गाने बहाल केला; पण माणसांनी कलात्मकतेने आत्मसात करत तो जोपासला. संस्कृतीसमृद्धी त्यांनी भौतिक समृद्धीपेक्षा नेहमीच श्रेष्ठ मानल्याने जीवन जगणे काय असते, हे त्यांना कळत आले. साहित्यिक, संगीतकार, कलाकारांचा आदर करावा बंगाली माणसांनीच. वाचन, श्रवण, लेखन असा त्रिविध फेर धरत बंगाली स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित नि समृद्ध बनवत राहतो. चित्रपट, चित्रकला, छायाचित्रण अशा सर्वच क्षेत्रांतील बंगाली माणसांनी आपली छाप जगावर सोडली आहे. बंकिमचंद्र, शरतचंद्र, रवींद्रनाथ अशी मोठी परंपरा इथे लाभल्याने बंगाली साहित्य भारतीय साहित्यात श्रेष्ठ समजले जाते. सत्यजित राय इथेच जन्मतात नि मन्नाडेंसारखे संगीतकारही. उपजत सौंदर्य लाभलेला हा प्रांत येथील माणसांनी तो आपल्या कलासाधनेने समृद्ध बनविला. सुधीन्द्रनाथ दत्त याच परंपरेतले.

६९) मायावादी भाष्यकार आचार्य पुरुषोत्तम : पु. ल. देशपांडे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे बहुआयामी गृहस्थ होते. संस्कृत पंडित, स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारी, राजकारणी, विचारवंत, वक्ता, साहित्यिक, संस्कृती अभ्यासक, भाषांतरकार, संपादक अशी अनेक रूपं धारण करणारे तर्कतीर्थ राजकारणी, समाजधुरीण, साहित्यिक, संगीतकार यांच्यात समरसतेने सहभागी होत. पु. ल. देशपांडे, कुमार गंधर्व, मानवेंद्रनाथ रॉय, प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. अ. भि. शहा, यशवंतराव चव्हाण त्यांचे अंतरंग मित्र होते नि ते महात्मा गांधी, डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे सहकारी व स्नेही होते. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे मुखपत्र असलेल्या 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'ने आपला जुलै-डिसेंबर, १९७४ चा षण्मासिक अंक हा 'पु. ल. देशपांडे विशेषांक' म्हणून प्रसिद्ध केला होता. 'फुलराणी', 'व्यंगचित्रे' गाजण्याचा हा काळ. या अंकातील तर्कतीर्थांचा हा गौरव लेख आहे.

काव्य, कला, संगीत, नाटक, व्यंग, हसवणूक, विदुषकी, विद्वत्ता, प्रतिभा, प्रज्ञा यांचा सुरेख संगम म्हणजे पु. ल. देशपांडे. 'तुझे आहे तुझपाशी, परि जागा चुकलाशी' असं गांभीर्याने सांगणारे पु. ल. मायावादी भाष्यकार, आचार्य, पुरुषोत्तम असे सर्वकाही होते, हे सांगणारा हा आगळावेगळा लेख. नैसर्गिक सत्याची ओढ हा पु. लं.च्या साहित्याचा स्थायी भाव आहे, असे तर्कतीर्थ इथे सांगतात. त्यांच्या साहित्यात सत्य हे नैतिक होतं. 'व्यक्ती आणि वल्ली', 'गणगोत' या त्यांच्या साहित्यरचना त्यांना व्यक्तिचित्रकार साहित्यिक सिद्ध करतात. कानाडोळा करणाऱ्या समाजाकडे 'काणा' डोळा करायचं (तिरकस) कसब हे पु. लं.च्या लेखणीचं कौशल्य, तिच्यात कुंचल्याचं सौंदर्य निर्माण करणारं ठरलं. पु. लं.मध्ये एक 'आचार्य' दडलेला होता. तो कल्पित नि वास्तवाच्या तर्काने मेळ घालत हास्याची कारंजी फुलवायचा. पु.लं.नी मराठी विनोदाची कोल्हटकर परंपरा (कोटीबाज!) उच्चकोटीस नेली. त्यांचं समग्र साहित्य याची साक्ष देत उभे आहे. बहुरूपी ते बहुआयामी असा त्यांचा व्यापक चरित्रपट आयुष्य समृद्ध करणारा. त्यांचं आयुष्य झाकली मूठ होतं. उघडली तर ती फुकाची कधीच झाली नाही. उलटपक्षी झाकली माणकं झाकली राहात समृद्ध होत गेली.

पु. लं., कुमार गंधर्व, तर्कतीर्थ हे त्रिकूट त्यांच्या प्रतिभासाधनेत एकमेकांचे साथीदार होते नि साक्षीदारही!

❍ चित्रकला

कलेचा इतिहास मानवी इतिहासाइतकाच प्राचीन आहे. प्राचीन वाङ्मयात ६४ कलांचा उल्लेख आढळतो. असे असले तरी अद्याप मनुष्य कलेची परिपूर्ण व्याख्या करू शकलेला नाही. तथापि, कलेत अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो, ज्या करण्यासाठी कौशल्य अपेक्षित असते. 'अभिव्यिक्त की कुशल शक्ति ही तो कला है' असे हिंदी कवी मैथिलीशरण गुप्त यांनी आपल्या 'साकेत' या काव्यात म्हटले आहे.

७०) युरोपातील कीर्तिशाली थोर चित्रकार : फ्रान्सिस्को जोशे द गोया

'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी'ची स्थापना मानवेंद्रनाथ रॉय यांनी केल्यानंतर पक्षाच्या तत्त्वज्ञानाच्या प्रचार, प्रसारार्थ विविध भाषांत वृत्तपत्रे, नियतकालिके चालविली. इंग्रजीत 'क्वेस्ट', 'इंडिपेंडंट इंडिया' ही नियतकालिके प्रकाशित होत, तसेच मुंबईतून मराठीत 'संग्राम' दैनिक चालवले जायचे. त्याचे संपादक द्वा. भ. कर्णिक होते. सन १९४२ च्या दरम्यान ते प्रकाशित होत, असे संदर्भ आढळतात.[१७] या दैनिकात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'युरोपातील कीर्तिशाली थोर चित्रकार' शीर्षक लेखमाला लिहिली होती, ती 'संग्राम' दैनिकाच्या रविवारीय परिशिष्टात प्रकाशित होत असे. त्यात तर्कतीर्थांनी "मायकेल अँजेलो,

गोमा, राफेल, पॉल सेझाने, रेनॉयर वगैरे विख्यात कलावंतांचे चित्रकलेतील प्रावीण्य, त्यांची शैली, त्यांच्या विषयांमधील आशय आणि त्यांच्या अविस्मरणीय कलाकृती यांविषयी शास्त्रीजींनी जे लेख 'संग्राम'मध्ये लिहिले ते रविवारच्या अंकांचे भूषणच मानले जात असे. ललितसाहित्याचा कसच त्यांमध्ये प्रगट होत असे. कारण, शास्त्रीजींच्या विदग्ध लेखणीचे सारे कसब त्यात सामावलेले असे. दुर्दैवाने 'संग्राम'च्या अस्तित्वावरच घाला पडल्यामुळे हे अविस्मरणीय ठरणारे साहित्यही आज पडद्याआड झाले आहे."[18] 'युरोपातील कीर्तिशाली थोर चित्रकार'मालेतील एकच लेख उपलब्ध असून, तो फ्रान्सिस जोशे गोयांवर बेतलेला आहे. शितावरून भाताची परीक्षा या न्यायाने या लेखावरून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची कलाक्षेत्रातील जाण लक्षात येते, तसाच व्यासंगही! ही मालिका सचित्र असे हे या प्राप्त लेखानावरून स्पष्ट होते. 'संग्राम'चा काळ १९४२ ते १९४६ होता, असे स्वत: संपादक द्वा. भ. कर्णिक यांनीच 'चित्ती असो द्यावे समाधान' शीर्षक आपल्या आत्मकथेत स्पष्ट केले आहे.[१९] प्राप्त लेखाचा काळ / तिथी अनिश्चित आहे. तथापि, ती १९४२ ते १९४६ मधील निश्चित.

या व्यक्तिलेखानुसार फ्रान्सिस्को जोशे द गोया हा अठराव्या शतकातील (सन १७४६-१८२८) अद्वितीय स्पॅनिश चित्रकार. एकेकाळी पिरिनिज पर्वतराजीमध्ये स्पॅनिश भूमीवर असलेल्या पारंपरिक चित्रकलेस गोयाने त्या कलेचे पुनरुज्जीवन केले. गोयाचा जन्म ३० मार्च, १७४६ मध्ये स्पेनमधील फ्यूएनडेटॉड्स (ॲरॅगॉन) येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. तो १०-१२ वर्षांचा असताना मेंढरं हाकीत मेंढरांची चित्रं काढू लागला. एका हौशी चित्रकाराच्या हे लक्षात आले. त्याने त्याची कला पारखून १४ व्या वर्षी त्यास सारागोसा येथे पुढील शिक्षणासाठी धाडले. तिथे तो तरुण झाला. आकर्षक व्यक्तिमत्वामुळे अनेक मुली त्याच्या प्रेमात पडत. त्यातून भांडणे होत. अशा एका मारामारीत त्याने सारागोसा सोडले नि तो स्पेनची राजधानी असलेल्या माद्रिद शहरात आला. इथेही आपल्या जुन्या अंगवळणी पडलेल्या सर्वार्थामुळे तो टिकू शकला नाही. तिथून पळून तो इटलीत आला. इथे एका रात्री त्याने योगिनींच्या आश्रमात (नन्स हॉस्टेल) प्रवेश करून धुमाकूळ घातला. इथे तो फासावर लटकणार; पण एका योगिनीच्या मदतीने शिताफीने तो परागंदा होऊ शकला. शेवटी २६ व्या वर्षी मायदेशी परतला.

आता तो सभ्य जीवन जगू लागला. विवाहित होऊन त्याने राजदरबारात प्रवेश मिळविला. परत तोच प्रताप. एका ड्यूकची पत्नी माजाची त्याने नग्न चित्रे रंगविली. ड्यूक पाहायला येणार म्हणून ती सवस्त्र केली. माजाची ती चित्रे म्हणजे तारुण्याचे भाषांतरच होते. गोया ज्या राजदरबारात होता, तिथे उतरती कळा आली. गोयाने पुढे राजघराण्याची कुटुंबचित्रे (Group Portraits) काढली. ही चित्रे पुढे इतिहास व अभ्यासाची साधने म्हणून प्रसिद्धीस आली. नंतर त्याने धर्मक्षेत्रातील ऐतखाऊ धर्मगुरू पुरोहितांची चित्रे रंगविली.

त्यातून त्याने मरणोत्तर अमरत्व आणि स्वर्गप्राप्तीचे खंडन केले. NADA - 'इकडे सगळे शून्य आहे' असा संदेश मिळून इहलोकी तत्त्वज्ञान त्याने आपल्या चित्रकलेतून रूढ केले व तो जगप्रसिद्ध चित्रकार झाला. नंतर यापेक्षा सूक्ष्म नि श्रेष्ठ चित्रे गोयाने चितारली. मानवी जीवनाची श्रेष्ठता गोयाने चित्रकलेद्वारे रुजवली. नंतर दरबारी जीवनास विटून त्याने राजदरबाराचा परित्याग केला. वृद्धावस्थेत गोयाने जीवनाचे घृणित रूप जगासमोर आणले. स्पेन सोडून तो फ्रान्समध्ये आला. दृष्टी गेलेली, कान उठलेले, तशाही अवस्थेत त्याची कलासाधना सुरू होती. भविष्यावरचा विश्वास गोयाने ढळू दिला नाही. त्याचे शेवटचे चित्र पृथ्वीतलावरील काळोखी जीवनाचे होते.

❍ योग व अध्यात्म

योग एक पूर्वापार चालत आलेली आध्यात्मिक प्रक्रिया आहे. शरीर, मन, आत्मा इ. संकल्पनांच्या आधारे धर्म विकसित होत आला आहे. अनेक धर्म कालौघात कर्मकांडाच्या अधीन होतात नि मग धर्माच्या मूळ स्वरूप नि उद्देशासच हरताळ फासला जातो. मूलतः धर्मव्यवहार हा व्यक्तीपासून सुरू होतो नि मग त्याचे लोण समुदाय, समूह, समाजापर्यंत पोहोचत राहते. मूलत: व्यक्तीच्या शुद्ध, पवित्र, नैतिक आचरणाने व्यक्ती सदाशयी, सद्प्रवृत्त व सदाचारी बनते. योग त्याचे साधन होय. अशा जीवनव्यवहाराचे प्रतीक बनलेल्या व्यक्तीबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना आकर्षण दिसते ते माणूस हिंसेकडून अहिंसेकडे मार्गक्रमण करतो याचे. त्याची मुळे जितकी वेदान्तात आहेत, तितकीच ती गांधीवादात नि योग, आध्यात्मात दिसून येतात.

७१) महायोगी अरविंद

सन १९७२ हे योगी अरविंदांचे जन्मशताब्दी वर्ष होते. यानिमित्त लिहिलेला हा व्यक्तिलेख. यातील चरित्र भाग हा कै. सदानंद सुंठणकर यांच्या 'अरविंददोहन- धार १ ली- अध्यात्म विकास'मधून उद्धृत करण्यात आला आहे. तशी सूचना संपादकांनी लेखारंभी तळटीपेत दिलेली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तुत लेखात चरित्राशिवाय त्यांच्या कार्य, विचारांचे विवेचन केले आहे.

अरविंद घोष यांचा जन्म १५ ऑगस्ट, १८७२ रोजी कलकत्त्यात झाला. त्यांचे घराणे सुशील, सुविद्या व प्रगतिप्रवण होते. त्यांचे वडील डॉ. कृष्णधनबाबू लोकप्रिय सिव्हिल सर्जन होते. ते बंकिमचंद्र चटर्जींच्या साहित्याचे वाचक होते. त्यांच्या कुटुंबात भारत नि युरोपिअन संस्कृतीचा मिलाफ होता, म्हणून त्यांच्या कुटुंबाचा उल्लेख 'सुएझ कॅनॉल' असा होत असे. डॉक्टर वडिलांनी आपल्या तिन्ही मुलांना पाश्चात्त्य शिक्षण दिले. सन १८७९ ला अरविंद बाबू सात वर्षांचे असताना डॉक्टरांनी सहपरिवार इंग्लंडला प्रयाण केले. तिथे ग्रीक, लॅटिन या गीर्वाण (देववाणी) भाषांतील प्रावीण्यामुळे सालिना ८० पौंड शिष्यवृत्ती मिळाली.

वयाच्या अठराव्या वर्षी अरविंद घोष यांनी आय.सी.एस. परीक्षा उत्तीर्ण केली; पण त्यांनी ब्रिटिश सेवा नाकारून बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्याकडे एक तप नोकरी करीत सेक्रेटरी झाले. नंतर काही काळ तिथेच फ्रेंच व इंग्रजीचे प्राध्यापक बनले. हंगामी प्रिंसिपॉल म्हणूनही ते तिथे काही काळ कार्यरत होते. बडोद्यातील महाराष्ट्रीय लोकांच्या सान्निध्यातून त्यांच्यात वाङ्मयाविषयी ओढ नि गोडी निर्माण झाली. प्लेटो, एपिक्टेट्स, एपिक्युरस वाचून ते तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झाले. स्वामी विवेकानंद वाचून त्यांची वृत्ती आध्यात्मिक बनली. बडोद्यात ते पाश्चात्त्य भाषांबरोबर भारतीय भाषांचा अभ्यास करू लागले. 'जुन्याऐवजी नवे दिवे' अशी इंग्रजी लेखमाला त्यांनी १८९४ मध्ये 'इंदुप्रकाश' या मुंबईच्या वृत्तपत्रासाठी लिहिली. संस्कृत नाटकांवर विपुल लिहिले.

सन १९०६ मध्ये अरविंद घोष यांनी राजकारणात प्रवेश केला. सन १९१० मध्ये ते 'वंदे मातरम्', 'युगांतर', 'नवशक्ती'मध्ये लिहीत. ते सरकारविरोधी लेखन असे. त्यांच्या लेखनाची धार लोकमान्य टिळकांसारखी प्रखर होती. त्यांच्या लेखणीचा दाह ब्रिटिशांना सोसला नाही. ब्रिटिशांनी त्यांना 'अलिपूर बाँब केस'मध्ये गोवले. त्यांच्यावर खटला उभारून अलिपूर तुरुंगात बंदी बनविले गेले. बाबू चित्तरंजन दास त्यांचा खटला चालवत. तुरुंगात त्यांनी योगाभ्यास केला. तुरुंगातून सुटून आल्यावर 'कर्मयोगिनी' आणि 'धर्म'नामक साप्ताहिक सुरू केले. काही काळानंतर राजसंन्यास स्वीकारून ते योगी बनले.

४ एप्रिल, १९१० रोजी ते पाँडेचरीला आले. सन १९०४ पासून हळूहळू त्यांची वृत्ती आध्यात्मिक बनत गेली. विष्णु भास्कर लेले यांच्याकडून त्यांनी योगाचे प्राथमिक धडे घेतले होते. पुढे योग हेच त्यांचे जीवन बनून गेले. कर्म, भक्ती व ज्ञान यांच्या आधारे त्यांनी समग्रयोगतंत्र (Integral Yoga) विकसित केले. याआधारे ते समग्र मानवजातीस परात्मपुरुष (Super Mental Being) बनवू पाहात होते. श्रीयुत आणि श्रीमती रिचर्ड दाम्पत्याच्या साहाय्याने त्यांनी 'आर्य' मासिकातून विपुल लेखन केले. 'लाईफ डिव्हाइन' हा ग्रंथ त्या सर्व वाङ्मयाचे समग्र रूप होय. त्यांनी नंतर 'सावित्री' काव्य रचले.

अशा प्रकारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सदर गौरव लेखातून संपूर्ण जीवन रेखाटले आहे. ते वाचत असताना लक्षात येते की, माणूस उपजत सद्विचारी असेल, तर त्याची निरंतरता त्याला संतपदापर्यंत पोहोचविते. संतपद म्हणजे शुद्धाचरणाची चरम परिणती होय.

❍ पत्रकारिता

आधुनिक जीवन माहिती व तंत्रज्ञान आधारित असे विकसित जग आहे. या जगात माध्यमांचं महत्त्व वाढलं आहे. गेल्या शतकात वृत्तपत्र सृष्टीचं वर्चस्व होतं. याची जागा एकविसाव्या शतकात इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी घेतली आहे. माध्यम कुठलंही असलं तरी मूळ सूत्राधार बातमी नि वृत्तच आहे. पत्रकारिता ही वर्तमानाचा श्वास आहे. बातमी मिळवणं,

संपादित करणं नि ती प्रकाशित करण्याचे कार्य पत्रकारिता करते. संपादक, वार्ताहर, छायाचित्रकार यांच्या समन्वयाने गेल्या शतकात पत्रकारितेचं कार्य चालत असण्याच्या काळात संपादकाचे महत्त्व असाधारण होते. अशा द्वा. भ. कर्णिक, श्री. श. नवरे, गोविंदराव तळवलकर प्रभृती मान्यवरांशी रॉयिस्ट म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा निकटचा संबंध होता.

७२) वृत्तपत्र संपादक : कै. श्रीपाद शंकर नवरे

श्रीपाद शंकर नवरे हे तर्कतीर्थांचे स्नेही व सहकारी. त्यांचं निधन ६ डिसेंबर, १९७८ रोजी शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथील 'रामदास भुवन' या त्यांच्या निवासस्थानी झालं. आपल्या या स्नेह्याच्या आठवणी जागवत लिहिलेला हा श्रद्धांजली लेख 'नवभारत' मासिकाच्या फेब्रुवारी, १९७९ च्या अंकात प्रकाशित झाला होता. सुमारे तीन दशकांहून अधिक काळ श्री. शं. नवरे तर्कतीर्थांबरोबर प्राज्ञपाठशाळा मंडळाचे सदस्य व तत्पूर्वी विद्यार्थी म्हणून संलग्न होते.

श्रीपाद शंकर नवरे यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९०० रोजी झाला. मुंबईच्या विल्सन महाविद्यालयातून त्यांनी आपलं पदवीचं प्रथम वर्ष शिक्षण सुरू केलं होतं; पण प्रथम वर्ष पूर्ण होताच महात्मा गांधींच्या बहिष्कार आंदोलनाला प्रतिसाद देत इंग्रजी शिक्षण सोडून ते राष्ट्रीय शिक्षण घ्यायचे म्हणून प्राज्ञपाठशाळा, वाई येथे धर्म नि वेदांताच्या अभ्यासार्थ दाखल झाले. पुढे ते प्रज्ञपाठशाळेत शिक्षकही झाले. इतिहास, निबंध, साहित्य, कविता, मैदानी खेळ ते माध्यमिक विभागात शिकवीत असत. शिस्तीचे शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक होता. हिंदू धर्म सुधारणेचे ते समर्थक होते. सन १९२४ मध्ये त्यांनी प्राज्ञपाठशाळा सोडली. सन १९२७ मध्ये ते मुंबईत येऊन स्थायिक झाले. 'लोकमान्य', 'प्रभात', 'गोमंतवाणी' इ. वृत्तपत्रांचे ते संपादक झाले. त्या काळात तर्कतीर्थ या वृत्तपत्रात लेखन करीत असत. गांधीवादी पत्रकार म्हणून त्यांचा लौकिक होता.

श्रीपाद शंकर नवरे यांचा पिंड सामाजिक कार्याचा होता. अनाथ, निराधार, परित्यक्तांचा सांभाळ व पुनर्वसन करणाऱ्या मुंबईतील माटुंगा उपनगरातील 'श्रद्धानंद महिलाश्रम'चे संस्थापक सदस्य होते. त्या संस्थेचे कार्यवाह म्हणून १९२७ ते १९६९ असे चार दशकांहून अधिक काळ कार्य केले. ती संस्था समाजमान्य बनविली. मुंबई मराठी पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मराठी साहित्य मांडळ अशा कितीतरी संस्थांमधून मूलभूत स्वरूपाचे कार्य व योगदान देऊन त्यांनी स्वतःचा समाजसेवी पिंड सिद्ध केला. हे फार कमी लोक जाणत असावेत की संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची मुहूर्तमेढ मराठी साहित्य संमेलनाद्वारे श्रीपाद शंकर नवरे यांनी रोवली व पुढे अनेक वर्षे त्याचा पाठपुरावा केला. श्री. शं. नवरे आंतरजातीय विवाहाचे

पुरस्कर्ते होते. त्यांनी स्वत:चा विवाह पोटजातीत केला. आपल्या मुलांचे विवाहही नवरे यांनी असेच केले हे विशेष. तर्कतीर्थ त्यांना 'पंत' म्हणून संबोधीत.

उपर्युक्त व्यक्तिलेखाशिवायही श्रीपाद शंकर नवरे यांचे लेखन क्षेत्रातील कार्य मोठे आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेच्या इतिहास लेखनाचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले, तसेच सेनापती बापट चरित्र 'सेनापती' (१९०६) लिहिले. 'संपादक हा वकील नसून न्यायाधीश आहे' अशा भूमिकेतून ते संपादन कार्य करीत राहिले. मृत्युलेखांचे लेखन ही त्यांची खासियत होती.

व्यक्तिलेखांची मीमांसा

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेले व्यक्तिलेख अधिकांशत: गौरवपर वा स्मृतिपर श्रद्धांजली लेख आहेत. त्यात चरित्रपर माहिती देत प्रशंसेचा, श्रद्धेचा वा कृतज्ञतेचा भाव दिसून येतो. हे लेख समकालीनांचे अधिक आहेत. स्टॅलिन, मार्क्स, डॉ. श्वाइट्झर, गोया, महर्षी अरविंद यांचा अपवाद वगळता बाकी सर्वांचा तर्कतीर्थांना सहवास वा साहचार्य लाभले होते. माणसाच्या सहवासात आल्यानंतर त्याचे गुणदोष आपणास आपसूकच लक्षात येत असतात. तर्कतीर्थांचे सदर लेखन हे सकारात्मकतेने झालेले असल्याने त्यात मूल्यांकन असले, तरी दोषदिग्दर्शन नाही. त्यामुळे या लेखनास हे वास्तव असले, तरी वस्तुनिष्ठ म्हणता येत नाही. सर्वांच्या कसोटीवर ते एकपक्षीयच राहते. कॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांच्यावर लिहिलेल्या लेखांचे उदाहरण घेऊन बोलायचे झाले, तर म्हणता येईल की तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्व नि कार्याचे मूल्यमापन सुयोग्य असेच वाटतात; पण प्रश्न उरतो की, आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट पार्टीच्या संस्थापकांपैकी एक, अनेक दिशांच्या क्रांत्यांचे भागीदार, भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील क्रांतिकारक असताना त्यांना यश कायम गुंगारा का देत आले, याची ते चर्चा करीत नाहीत .

कॉ. मानवेंद्रनाथ रॉय आधुनिक विचारवंत होते. पठडीबाहेर विचार करण्याची त्यांची स्वत:ची अशी तर्कशुद्ध विचारपद्धती होती. कम्युनिस्ट वा काँग्रेस पक्षात असताना ते अंधानुकरणाने पक्ष विचार वा कार्यक्रमांचे अनुसरण करीत नसत. म्हणून तर त्यांचे नि स्टॅलिन, पंडित नेहरू, सरदार पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याशी मतभेद झाले. महात्मा गांधी व मानवेंद्रनाथ रॉय दोघेही मानवतावादी होते, तर भारतीय जनमानसाने त्यांना का स्वीकारले नाही? असा प्रश्न उभा असतो. त्याचं उत्तर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या बुद्धिवादी व्यक्तिमत्त्वात दिसून येतं. कम्युनिस्ट वा काँग्रेस पक्षाच्या सत्ताधारी धोरणाशी रॉय यांची कधीच सहमती झालेली दिसत नाही. समाजमानस बुद्धिवादापेक्षा व्यवहारवाद पसंत करत असते. त्यामुळे रॉय हे संघर्ष काळात अल्पमतात रहात आले. आदर्शवाद हा नेहमी सत्तासंघर्षात पराभूत होत आला आहे, हे विसरता येणार नाही.

अगदी अलीकडे मानवेंद्रनाथ रॉय यांच्या सन २०२० च्या १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने केलेल्या मूल्यांकनात अनुराग भारद्वाज यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांचं वर्णन आपल्या एका लेखात 'An Unmatched Political Phylosopher' असे केलं होतं, ते खरंच आहे. त्याची कारणमीमांसा करीत ते म्हणतात की, "Roy held the view that each ideology is based on already available knowledge that is bound to pre-determind goal and urged people to develop scientific temperament and rationality. In his discourse on material philosophy, he surmised that nothing is permanent, sacrosanct or eternal and that man, to change the world, must change himself in the process"[20]

जवाहरलाल नेहरूंवरील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांचा व्यक्तिलेख पष्ट्यब्दीपूर्तीप्रीत्यर्थ लिहिलेला गौरवलेख असला तरी यात तर्कतीर्थ नेहरूंचे थोरपण हात राखूनच करताना दिसतात. नेहरू परंपरेविरुद्ध बंड करू शकतील का याबाबत तर्कतीर्थ साशंक आहेत. या लेखात तर्कतीर्थ म्हणतात, "समाजवादी क्रांतीच्या अद्भुतरम्य कल्पनांशी क्रीडा व प्रेमलाप करताना ते अजूनही दिसतात, नाही असे नाही. उदाहरणार्थ, त्यांनी वर्गहीन समाजरचनेचे मार्क्सवादी ध्येय नुकतेच काँग्रेसतर्फे पुकारले आहे. परंतु, या कल्पनांना प्रत्यक्ष सृष्टीत आणून त्याच्याशी संसार करण्यास ते तयार आहेत, असे म्हणणे मोठेच धारिष्ट्य ठरेल. कारण त्यांचे व्यक्तिमत्त्व सनातनी राष्ट्रीय परंपरेला नकळत समर्पित झाले आहे, अशी शंका येते." ही शंका एकतर पूर्वग्रहदूषित असून, ती अकाली आहे. भारत स्वतंत्र होऊन अवघी दोन वर्षे झाली. जे गेल्या वर्षात होऊ शकले नाही, त्याची अपेक्षा दर वर्षात करणे केवळ अनाठायी व अन्यायाचे ठरते. पुढे ते असेही म्हणतात की, "हे अशा प्रकारचे व्यक्तिमत्त्व परंपरेविरुद्ध बंड करण्यास सिद्ध होईल का? समाजवाद हे परंपरेविरुद्ध असलेले प्रचंड बंड आहे." या साशंकतेला इतिहासाची एक किनार आहे. तर्कतीर्थ रॉयवादी होते. मानवेंद्रनाथ रॉय सन १९३६ मध्ये कानपूर खटल्यातील तुरुंगवास भोगून परतल्यानंतर ते काँग्रेसमधील समाजवादी गटात सामील झाले होते. कम्युनिस्टांनी रॉय यांना अव्हेरले होते व काँग्रेसने 'रॉय यांचा मार्ग व काँग्रेसचा मार्ग यात मौलिक तफावत आहे' सांगत दूर केले होते.

जवाहरलाल नेहरू यांच्या समाजवादावर शंका घेणारे तर्कतीर्थ स्टॅलिनवरील लेखात मात्र विभूतिपूजेत मग्न झालेले आढळतात. तर्कतीर्थ यांचे स्नेही व पत्रकार असलेले श्री. शं. नवरे 'लोकमान्य'मधील दि. १५ डिसेंबर, १९४४ च्या अंकातील 'शास्त्रीबुवांची मतांतरे व वेषांतरे'मध्ये नवे वाङ्मय आणि विचार आल्यानंतर तर्कतीर्थांच्या जीवनात झालेली दिशांतरे नि देशांतरे अधोरेखित केली आहेत. ती लक्षात घेतली की या 'घूमजाव'चे रहस्य लक्षात येते.

आचार्य विनोबा भावे, आचार्य शंकरावर जावडेकर लोकमान्य टिळक, सेनापती बापट

प्रभृती मान्यवरांवर लिहिलेल्या व्यक्तिलेखातील आदरभाव त्या व्यक्तींची महती सांगणारा आहे, तर स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील लेखांत त्यांच्या क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वाचं असलेलं आकर्षण स्पष्ट होतं. यशवंतराव चव्हण, किसनवीर, बाबूराव घोरपडे, रा. ना. चव्हाण प्रभृती मान्यवरांवरील लेखन जुन्या स्मृतींना उजाळा जसा आहे, तसा यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचे विवेकी मूल्यांकनही आहे. "आदर्शाच्या प्रकाशात विकसित झालेले व्यक्तिमत्त्व", 'शुद्ध चारित्र्याचा प्रज्ञावंत'सारख्या लेखशीर्षकांतून ते प्रतिबिंबित होत राहते. आचार्य विनोबा भावे यांच्या स्मृतिशेषमधील विषयवासना आणि नैतिकता या द्वंद्वाविषयीची चर्चा केवळ वाचनीय नसून ती वाचकास अंतर्मुख होण्यास भाग पाडते. स्वतः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा वेदवाङ्मयाचा अभ्यास पराकोटीचा होता. त्या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थ जेव्हा 'वेदवेत्ते टिळक' असा लेख लिहितात, तेव्हा ते एक प्रकारे लोकमान्यांच्या वेद व्यासंगास दादच देत असतात. या लेखात वेदांवर आधारित लोकमान्यांचे 'मृगशीर्षकाल अर्थात वेदकालनिर्णय', 'वैदिक कालानुक्रम व वेदांगज्योतिष' आणि 'आर्याचे उत्तरध्रुव प्रदेशातील मूलस्थान' शीर्षक लेखत्रयीची मीमांसा उभयतांच्या वेदप्रेम नि वेदव्यासंगाची निजखूण ठरते. 'वेदाप्रमाणेच वेदांताचे टिळकांचे अध्ययन गंभीर, सूक्ष्म व तत्त्वग्राही होते,' हे नोंदवायला तर्कतीर्थ विसरत नाहीत. 'लोकमान्यांचे 'गीतारहस्य' शीर्षक आकाशवाणी भाषण याचेच निदर्शक होय.'[२१] अन्य काँग्रेसी लालबहादूर शास्त्री, मारोतराव कन्नमवार यांच्यावर लिहिलेले व्यक्तिलेख- त्यातून तर्कतीर्थांचं क्राँग्रेस प्रेम स्पष्ट होतं.

वरील राजकीय व्यक्तिमत्त्वांशिवाय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी समाजकारण, धर्मकारण, इतिहास, दक्षिण, साहित्य, चित्रकला, योग व अध्यात्म, पत्रकारितासारख्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांवर वेळोवेळी व्यक्तिलेख लिहिले आहेत. त्यात भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, स्वामी केवलानंद सरस्वती, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, प्रा. न. र. फाटक, स्नेही प्रा. गोवर्धनदास पारीख तथा प्रा. अ. भि. शहा, चित्रकार गोया, महायोगी अरविंद प्रभृती मान्यवरांचा अंतर्भाव आहे. हे सर्व लेख एखादा अपवाद वगळता स्नेही, सुहृदांवर बेतलेले आहेत. त्यात आत्मनिष्ठा आहे नि आत्मीयताही! महर्षी कर्वे यांच्याबद्दल तर्कतीर्थांनी आपल्या लेखात म्हटले आहे की, 'अण्णासाहेब म्हणजे मानव्याला जगविणाऱ्या व जागविणाऱ्या सहानुभूतीचा शंभर वर्षे तेवत राहिलेला नंदादीप होय.' आपले गुरू स्वामी केवलानंद सरस्वतींबद्दल त्यांनी लिहिले आहे की, 'मधुपानात निमग्न असलेल्या कमलकोशातील भृंगाप्रमाणे ईश्वरभक्ती मौनात व्यक्त होत असे. ईश्वराचे निरंतर साक्षित्व त्यांच्या शुद्ध वर्तनानेच व्यक्त होत होते.' इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे श्रेष्ठत्व अधोरेखित करत तर्कतीर्थांनी सांगितले आहे की,' पाश्चात्त्य देशांत गेली दोन शतके इतिहासत्त्वाची समीक्षा सुरू आहे, इतका अत्यंत

खोलात जाऊन त्यामध्ये भाग घेणारा पहिला इतिहासंशोधक भारतीय म्हणजे राजवाडे हेच होत.' आंतरराष्ट्रीय योरोपीय चित्रकार गोयाचे योगदान स्पष्ट करीत तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, गोयाची चित्रे धर्मभ्रम दूर करतात नि धर्मज्ञानाचा वास्तविक प्रकाश दाखवितात. डॉ. अल्बर्ट श्वाइट्झरनी एक श्वेतवर्णीय म्हणून कृष्णवर्णीय निग्रोंची केलेली सेवा उपकार नव्हते, हे स्पष्ट करीत तर्कतीर्थांनी लेखात विशद केले आहे की, "आपण व आपली संस्कृती यांच्यावर ऋणाचा भार आहे. या लोकांवर (कृष्णवर्गीय) आपण उपकार करायचे की नाहीत, यासंबंधी आपणास स्वातंत्र्य मुळीच नाही; ते आपले कर्तव्य आहे. त्यात आपले औदार्य नसून, ते एक कृतकर्माचे प्रायश्चित आहे. आपण आपल्या शक्तीप्रमाणे जी काही सेवा करू तेवढ्याने हे प्रायश्चित पुरे होणार नाही. आपण केलेल्या महापातकाची निष्कृती सहस्त्रांशानेही होणार नाही. येथील दुःखनिवारणाकरिता जे काही करायचे, त्याचा ही जाणीव पाया होय." अशा वैचारिक संदेशांनी हे सारे व्यक्तिलेख भरलेले नि भारलेले आहेत, ते मुळातूनच सर्व वाचले पाहिजेत.

ड) आत्मपर लेख

आत्मपर लेख म्हणजे अशंत: असलेली आत्मकथाच. आत्मकथनात्मक निबंध, आत्मकथनात्मक लेख (Autobiographical Essay) हे आत्मकथेप्रमाणेच प्रथम पुरुषी, एकवचनी कर्ता कथनाच्या रूपात लिहिले जातात. यात जीवनाच्या एका घटना, प्रसंग, पक्षाचं, पैलूचं वर्णन आठवणीच्या रूपात विशद केलं जातं. जीवनाभुव कथन अशा लेखनाचा उद्देश असतो. लेखक याद्वारे आपल्या जीवनाच्या अज्ञात बाबींची माहिती देऊन वाचकांच्या आपल्याविषयी असलेल्या जिज्ञासा, शंका, उत्कंठांचं समाधान करण्याचा प्रयत्न करीत असतो. माझं बालपण, शिक्षण, वाचन, संस्कार, मित्र इ.विषयी सांगणं यात येतं, तसं माझा दृष्टिकोन, विचार, कार्य इ.पण.

या साहित्य प्रकाराची परिभाषा करीत सांगितलं गेलं आहे की, "An autobiographical essay is a short account of some aspect of writer's life. It may include brief description of writer's experiences, hobbies, interests and some memorable events. Another term for an autobiographical essay is narrative essay."[22] अशा प्रकारच्या लेखात सत्यकथन अपेक्षित असतं. गतकालाचं हे स्मरणरंजन असतं, तसंच विस्मृतीत गेलेल्या आठवणींना अशा लेखनातून उजाळा मिळत असतो. चरित्र, आठवणींची यात सरमिसळ संक्षिप्त व अंशिक रूपात केली जात असते. म्हणून अशा लेखनास इंग्रजीत 'Retrospective Narrative' म्हणून संबोधलं जातं. स्मरणीय व्यक्तिगत निबंधाच्या रूपात लिहिले जाणारे हे लेख कधी-कधी लेखक शृंखलाबद्ध पद्धतीनेपण लिहितो. वि. स. खांडेकरांनी आपल्या साहित्य, संस्कृती क्षेत्रातील पहिले भाषण, कथा, कविता, रूपककथा, लघुनिबंध, कादंबरी लेखन 'पहिली पावलं' शीर्षकांनी

विविध लेखांतून विशद केलं होतं. मी ते संपादित करून वि. स. खांडेकरांचं साहित्यिक आत्मकथन प्रकाशित केल्याचं (सन २००७) आठवतं. असंच त्यांचं आणखी एक आंशिक आत्मकथन 'सशाचे सिंहावलोकन' (२००७) त्यासोबत संपादित करून प्रसिद्ध केलं होतं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची आत्मपर भाषणे, मुलाखती आहेत, तसेच पत्र, प्रवास वर्णने आणि लेखही. त्यांच्या संपादनातून तर्कतीर्थांनी लिहायचं राहून गेलेलं आत्मकथन साकारू शकेल, असा मला विश्वास वाटतो. 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पात सर्वत्र प्रकाशन काल हा अनुक्रम पाळला आहे. इथे अपवादस्वरूप जीवनक्रम ठेवला आहे.

७३) मी रॉयवादी का झालो?

"मी रॉयवादाचा स्वीकार केला ही गोष्ट प्रवाह प्राप्त म्हणून झालेली नाही किंवा योगायोगानेही घडलेली नाही. त्याकरिता मला फार मोठा वैचारिक झगडा अनेक वर्षे करावा लागला. मी लहानपणापासून किंवा जन्मत:च म्हटले तरी चालेल - सनातनधर्मी होतो. माझा सनातन धर्म मात्र रुढीवादी नव्हता. तो तात्त्विक स्वरूपाचा होता. सनातनधर्मी, वेदान्ती, वेदशास्त्राच्या पठडीत वाढलेल्या मनाचा मानव्यवादी, सर्वगामी चिकित्सकतेने भरलेल्या अशा वैज्ञानिक दृष्टीशी तो झगडा होता," अशी प्रांजळ स्वीकृती तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'धनुर्धारी'च्या ऑक्टोबर, १९४६च्या दिवाळी अंकात लिहिलेल्या 'मी रॉयवादी का झालो?' शीर्षक लेखाच्या प्रारंभीच दिली आहे.

हे वैचारिक परिवर्तन आपल्यात कसे घडले, ती प्रक्रियाही सदर लेखात एका ठिकाणी नमूद करीत तर्कतीर्थांनी लिहिले आहे की, "मूलत:च विरोधी असलेली विचारसरणी माझ्या विचारण्यात आल्याबरोबर क्षोभ उत्पन्न करून मला विचारास प्रवृत्त करते, असा माझा फार जुना अनुभव आहे."

तर्कतीर्थांचे स्नेही व सहकारी श्रीपाद शंकर नवरे यांनी 'शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे' शीर्षक एक लेख 'लोकमान्य वृत्तपत्राच्या' १५ डिसेंबर, १९४४ च्या अंकात यापूर्वीच या विषयावर प्रकाश टाकला आहे. तोही वाचनीय आहे.

'आता स्थैर्य किंवा समाधी यांचा मार्ग दृष्टीच्या पथांत राहिला नाही, आता नित्य जागरणच असते' या लेखातील अत्यंत महत्त्वाचे विधान आहे. ते तर्कतीर्थांच्या जीवनाचे सूत्रविधान म्हणून पाहता येण्यासारखे आहे.

मानवेंद्रनाथ रॉय १९३६ ला कानपूर खटल्यातील शिक्षेतून सुटून तुरुंगाबाहेर आल्यानंतर त्यांनी काँग्रेसची कास धरली. तर्कतीर्थ सन १९३६ ते १९४८ रॉयवादी होते. त्यानंतर ते आयुष्यभर काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते राहिले. मानवेंद्रनाथ रॉय यांना जबलपूर (म. प्र.) स्थित तिलवारा घाट हा जवळ असलेल्या त्रिपुरी काँग्रेसमध्ये (१९३९) मांडलेल्या उपसूचनेवरून 'बुनियादी फरक' असल्याचे कारण सांगत पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, पटेल

प्रभृतींनी बाहेरची वाट दाखवली. तेव्हा मानवेंद्रनाथ रॉय यांनी स्थापन केलेल्या 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी' मध्ये तर्कतीर्थ सामील झाले ते मतांतर नि दिशांतर होऊनच.

रॉयवादाचा अंगीकार आपण का केला याची कारणमीमांसा करताना एक शब्द वापरला आहे- 'मौलिक विलक्षणता'. वेदांत आणि काँग्रेस यांच्यापेक्षा समाजवादी क्रांतीचा विचार तर्कतीर्थांसारख्या आजवर पठडीत विचार करणाऱ्या पंडितास 'मौलिक विलक्षण' वाटावा असे अनेक विचार क्रांती, समाजवाद-मार्क्सवाद यांमध्ये होतेच, आजवरचे तर्कतीर्थांचे कार्य समाज आणि संस्कृतीच्या परिघातील होते. त्यात देशभक्ती व राजकारणाची भर पडली. आजवर वेदान्तानंतर गांधीवादी तत्त्वज्ञान फारच रम्य, वंद्य दिसत होते. त्यापेक्षा रॉयवाद कितीतरी वेगळा नि विलक्षण होता. त्याची कबुली देत तर्कतीर्थांनी या लेखात स्पष्ट केले आहे की, 'सनातन धर्माची पारमार्थिक, नैतिक व सामाजिक तत्त्वेच परिस्थितीप्रमाणे उजाळा देऊन महात्मा गांधींनी स्वीकारल्यामुळे त्यांच्या संप्रदायात किंवा नेतृत्वात सत्य संशोधनापेक्षा किंवा बौद्धिक मीमांसेपेक्षा आंदोलनच स्वाभाविकरीत्या महत्त्व प्राप्त झालेले मी पाहिले. 'यातून गांधीवादाच्या दोषांचे जसे दिग्दर्शन होते, तसेच रॉयवादाच्या बलस्थानाचेही' या मुद्द्याचा विस्तृत परामर्श सदर लेखात आहे.

तर्कतीर्थांनी रॉयवादाचा पुरस्कार डोळसपणे केला होता. रॉय जर मास्कोच्या मार्क्सवादाचे सांप्रदायिक समर्थक असते, तर आपण रॉयवाद स्वीकारला नसता, हेही तर्कतीर्थ इथे स्पष्ट करतात. तर्कतीर्थांच्या दृष्टींनी मानवेंद्रनाथ रॉय हे Non Conformist Marxist होते. मार्क्सवादावरील अभिप्रेत मानवतावादाचे रॉय उपासक होते, म्हणून त्यांनी अंतिमतः 'नवमानवतावाद' (New Humanism)चा पुरस्कार केला होता.

सदर लेखात तर्कतीर्थांनी रॉयवादाची वैशिष्ट्ये अधोरेखित करीत सांगितले आहे की, या वैशिष्ट्यांमुळे मी रॉयवाद स्वीकारला- १) हिंदी जनतेच्या स्वतंत्र्याचा लढा लोकलढा व्हावा, २) हिंदी समाजरचना बदलून नवी समाजरचना अस्तित्वात यावी, ३) फॅसिझम विरोध] ४) हिंदुस्थानात मूलभूत हक्कांच्या लढ्याचा विकास व्हावा, ही ध्येये रॉयवादाची होती. त्याच्याशी सहमत होऊन आपण रॉयवाद स्वीकारल्याचे तर्कतीर्थांनी या लेखात स्पष्ट केले आहे.

रॉयवादाच्या मूलगामी दृष्टीचे तर्कतीर्थांना खरे आकर्षण होते. ते वैचारिक आदर्शवादाचे होते.

७४) कृष्णातीरावरील प्राज्ञमठात मी

'सत्यकथा' मासिकाच्या सप्टेंबर, १९६० च्या अंकात (वर्ष २०, अंक ११, पृ. ३३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी उपरोक्त शीर्षकाचा लेख लिहिला आहे. त्यात दोन उपशीर्षकांत मजकूर प्रकाशित आहे. १. आश्रमीय जीवन २. माझे गुरू

१. आश्रमीय जीवन

प्रथम भागात तर्कतीर्थ म्हणतात, माझ्या वडिलांनी वयाच्या ८ व्या वर्षापासूनच मला आश्रमीय जीवनाची सवय लावली. म्हणजे प्रातः स्नान, प्रातः स्रोतपठन, संध्योपासन इ.चे संस्कार बालपणीच झाल्याने आश्रमीय जीवनाचे मला प्रथमपासूनच आकर्षण होते. मी १४ व्या वर्षी प्रज्ञपाठशाळा गुरुकुल, वाईत प्रवेश केला. कृष्णातीरावर नारायणशास्त्री मराठे त्यांच्या वयाच्या २२व्या वर्षापासून हा प्राज्ञमठ चालवत. इथे समर्थ विद्यालय, तळेगावचे राष्ट्रीय शाळेचे विद्यार्थी-शिक्षक होते. ते स्वधर्म, स्वदेश उपासक अपरिग्रही जीवन जगत. वाईत त्या काळी अशा अनेक शाळा अनेक मठांत चालत. इथे काही काळानंतर विनोबा दाखल झाले. 'सहनाववतु सहनौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै। तेजस्विनावधीतमस्तु, मा विद्विषावहै।' इथलं जीवन होतं. गुरू-शिष्य एकत्र राहात. २४ तास बांधलेलं जीवन. मी स्वतःस अपवादभूत समजून वागे. म्हणून टीकेस पात्र असे. सन १९२१ साली गांधीजींच्या बारडोली आश्रमात काही काळ होतो. तेव्हा गांधीजींनी मला 'वाईच्या आश्रमात असेच करता का?' म्हणून विचारले होते. 'जुलमाचा रामराम करण्याची मला सवय लागली नाही,' असे उत्तर दिले होते. या अपवाद गोष्टी (उशिरा उठणे) सोडता मी परिपाठाचे पालन करीत असे. आमच्या आश्रमात ब्रह्मचर्याला केवळ धार्मिक नव्हे तर राष्ट्रीय महत्त्व होते. त्यावरही आश्रमात वादविवाद होत असे.

"आश्रमीय जीवनात मला प्रामुख्याने काय दिसले? याचे उत्तर असे की, राष्ट्रसेवेच्या दीक्षेची आतुरता व आध्यात्मिक जीवन जगण्याची महत्त्वाकांक्षा हे आमच्या आधुनिक आश्रमीय जीवनातील प्रभावी मनोभाव होय. परंतु यातील आत्मसंयमाच्या प्रयत्नांच्या मुळाशी नकळत दंभ किंवा आत्मवंचनाही काही प्रमाणात दिसून आली." तर्कतीर्थांचे या आत्मपर निवेदनातील आत्मचिंतन त्यांच्यातील समीक्षकाने केलेली आत्मटीका म्हणून स्वीकारावी लागेल.

२. माझे गुरू

मी तेरा-चौदा वर्षांचा असताना कांगडी (उत्तराखंड) येथील आर्य समाज गुरुकुलात जावे, असे वाटत असताना वडिलांनी मला त्यांच्या एका मित्राच्या माहितीवरून प्राज्ञपाठशाळा, वाई येथे पाठविले. तिथे दूरचा अनेक मार्गी प्रवास करून पोहोचलो. गुरुदर्शन झाले. गुरू प्रसन्न, आरोग्यसंपन्न होते. गुरूंचे गांभीर्य कळण्याचे वय नव्हते; पण गुरुगृह साधे परंतु पावित्र्याने भरलेले होते. पुढे पन्नास वर्षे ते त्यांच्या खोलीत राहिले. त्यांच्या उपकरणांत (भांडी, कुंडी इ.) न वाढ झाली, ना घट. फक्त वस्त्रांचा रंग बदलला. शुभ्र होती ती भगवी झाली. अर्थात् संन्यास घेतल्यावर.

मी वसतिगृहात राहात असे. गुरूंचे अध्यापन आठ तास चाले. या गतीत माझ्यासह आणखी एक-दोनच टिकले. बाकी मागे पडले. श्री. केवलानंद सरस्वतींची विद्यार्थ्यांवर निरंतर देखरेख असे. मी त्यांच्याकडे संस्कृत पांडित्य संपादनार्थ आलो. ते इतर शास्त्री पंडितांपेक्षा वेगळे

होते. त्यांचा ओढा दक्षिणेकडे कधीच नसे. दीक्षा-शिक्षा प्रमाण. परनिंदावर्जन, अमात्सर्य व अपरिग्रह याचे उदात्त प्रतीक म्हणजे स्वामीजींचे जीवन. भजन-पूजनाचा डामडौल नव्हता. परंतु, निरंतर सोहंच्या अजपाजपामध्ये त्यांचे मन निमग्न असायचे. ते स्वतः वक्तृत्वसंपन्न नव्हते. परंतु, वक्तृत्व व वाक्चातुर्य शिकविण्यात त्यांचा हातखंडा होता. ते वादपंडित का झाले नाहीत, याचे उत्तर त्यांच्या जीवनमूल्य कल्पनेत सापडले. ते आजन्म ब्रह्मचारी होते. मोक्ष मार्गाचे ते साधक होते. मौन त्यांची साधना होती. संन्यासाश्रम काळातही ते कर्मयोगीच राहिले. 'मीमांसाकोश' निर्मितीत ते व्यग्र होते. त्यांच्या दैनंदिन वर्तनात अहिंसा, सत्यादी महाव्रतांचे विवेचन सापडत होते. निर्मम, निर्भय, अपरिग्रही संन्यासी, परंतु कर्मयोगी. ते आचार्यपदाचा अस्सल आदर्श होते.

गुरुस्वामींना शास्त्रीय गायन अवगत होते. ते शास्त्रीय संगीतात अनेक राग आळवत. 'गुरोस्तु मौनं व्याख्यानम्'चा आदर्श यांनी आजीवन जपला. देवपूजेचा पसारा त्यांनी कधीच मांडला नाही. दक्षिणा, फळे, वस्त्रे कशाचा मोह त्यांना नव्हता. लगेच सारे वाटून मोकळे होत. न्याय, व्याकरण, मीमांसा, वेदांत, साहित्य यात ते पारंगत होते. परंतु, त्यांची अहंता त्यांनी कधी बाळगली नाही.

७५) माझ्या शब्दात मी

पाक्षिक 'रुद्रवाणी'चे संपादक श्री. जीवन किर्लोस्कर यांनी अनेक क्षेत्रांतील मान्यवरांची चरित्रे, आत्मकथने आपल्या पाक्षिकाद्वारे वाचकांपुढे सादर केली. २७ जानेवारी, १९०१ हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जन्मदिन. १९७२ च्या २७ जानेवारीस ते सत्तरी पूर्ण करणार होते. त्याचे औचित्य साधून संपादकांनी त्यांना 'माझ्या शब्दात मी' विषय देऊन आत्मकथनच लिहायला भाग पाडलं, ते सत्तरीच्या अंकात म्हणजे १५ जानेवारी, १९७२ ला.

तसं तर्कतीर्थांनी अनेक प्रसंगांनी आत्मसाक्षात्कारी लेखन केलं आहे. इथे ते म्हणतात की, माझे यथार्थ वर्णन मला समोरून जो वर्षोनवर्षे पाहात आला आहे, तोच करू शकेल. मी मला दिसतो ते पाण्यात किंवा आरशात. अनेकांनी आपली आत्मचरित्रे लिहिलीत; पण त्यात त्यांचा आत्मा नाही दिसत. आत्मचरित्र लिहिणं साहसाचं काम आहे. असे साहस ज्यांच्यात असते, त्यांच्यात 'वाङ्मयीन महात्मता' असावी लागते, तर ते स्मरणीय ठरतं.

माझं जन्मगाव पूर्वीच्या बागलाण साम्राज्यात होतं. जहागीराने याचं वर्णन लिहून ठेवलं आहे. 'राष्ट्रौढवंशकाव्यम' नाव असून, ते 'गायकवाड ओरिएंटल सेरिज'मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी प्रकाशित केल्याचा महत्त्वाचा संदर्भ तर्कतीर्थांनी या आत्मपर लेखात दिला आहे.

पुढे त्यांनी या लेखात प्राज्ञपाठशाळेत केलेल्या अध्ययनाची तपशीलवार माहिती आहे. अनेक लेख, मुलाखतींमधूनही या पूर्वी स्पष्ट झाली आहे. आपणाला युरोपिअन तत्त्वज्ञान

व सामाजिक शास्त्रे यांच्या अध्ययनाची गोडी हर्बर्ट स्पेन्सरच्या मराठी अनुवाद ग्रंथांनी लावल्याचे नमूद केले आहे.

महात्मा गांधींना अस्पृश्यता निवारण व हरिजनांच्या मंदिर प्रवेशासंबंधी आधार प्राचीन वाङ्मय नि इतिहासातून हवे होते. तर्कतीर्थांनी ते पुरविले नि महात्मा गांधींचे हृदयपरिवर्तन झाले. ते कसे हे स्पष्ट करीत या लेखात तर्कतीर्थ लिहितात, "हिंदू धर्माचे मूलभूत तत्त्वज्ञान अहिंसा, सत्य व मानवी समता यांच्यावर आधारलेले असले, तरी प्रत्यक्ष शास्त्रवचने परस्पर विरोधी व यामुळे त्यात गोंधळ असल्यामुळे शास्त्रवचनाच्या आधारे अस्पृश्यता निवारण व अस्पृश्यांचा देवालय प्रवेश समर्पित करता येत नाही. मी दिलेल्या शास्त्राधारांना त्यांनी खूप महत्त्व दिले. मी अशी बाजू मांडली की, शैवसिद्धांत व वैष्णवसिद्धांत हे मूलतः समतावादी आहेत. जातिभेद व अस्पृश्यता मानवाच्या प्राचीन स्पृश्य पंडितांनी शैवसिद्धांत व वैष्णवसिद्धांत आपल्या जातिभेदाने कलंकित केला आहे. महात्मा गांधींनी असे मत मांडले की, मनुष्य मूलतः शुद्ध आहे व असा सिद्धांत धरूनच हरिजन आंदोलन चालविले पाहिजे. परंतु, शैव व वैष्णव सिद्धातांप्रमाणे ईश्वरभक्तीनेच सर्व मानवांना शुद्धता व समता येते."

जन्मभर अविवाहित व पवित्र राहण्याचा माझा विचार होता. परंतु, गुरुवर्यांनी मला हा विचार सोडून देण्याचा सल्ला दिला. म्हणून मी विवाहित झालो. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे', अशा वृत्तीने पत्नी सौ. सत्यवतीने संसार चालविला.

माझ्या सार्वजनिक आयुष्यामुळे मला थोरामोठ्यांचा सहवास लाभला. आचार्य विनोबा भावे, महाराज सयाजीराव गायकवाड, आचार्य काका कालेलकर, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, महादेवभाई देसाई, कर्नाटक गांधी गंगाधरराव देशपांडे, मानवेंद्रनाथ रॉय, प्राचार्य मणिशंकर ध्रुव, सरोजिनी नायडू, बाबू भगवान दास, स्वातंत्र्यवीर सावरकर, मंगलाचार्य भाई, घन:श्यामदास बिर्ला, दादासाहेब मावळणकर, महामहोपाध्याय पांडुरंग वामन काणे, लक्ष्मणशास्त्री द्रविड, रामेश्वरशास्त्री द्रविड, इ. व्यक्तींचा जवळून परिचय झाला.

सन १९३० सालापासून मी राजकारणाच्या रिंगणात उतरलो. या वर्तुळातून कधीच बाहेर पडू शकलो नाही. काँग्रेस, रॉयवाद, मार्क्सवाद प्रवासात विचार व आध्यात्मिक भावना यांचा संग्राम झाला. विचारांची बाजू मी पकडली. बुद्धिवाद व आध्यात्मिक अनुभव यांचा अंतर्विरोध मिटणे अशक्य असते. १९५० साली मी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. माझी जीवनदृष्टी ही बुद्धिवाद आणि आध्यात्मिक अनुभव यांनी घडलेली आहे.

या लेखात तर्कतीर्थांनी जन्मापासून सत्तरीपर्यंतचा प्रवास शब्दबद्ध केला आहे. यात अनेक नवी संदर्भस्थळे आहेत, तसेच नवे विश्लेषण व मूल्यांकनही आहे.

७६) माझी पत्नी सौ. सत्यवतीची जीवनयात्रा

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पत्नी सौ. सत्यवती जोशी यांचे निधन १२ ऑगस्ट,

१९७८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता झाले. त्यांना श्रद्धांजली वाहणारा एक लेख 'सौ. सत्यवतीची जीवनयात्रा' नावाने तर्कतीर्थांनी लिहिला. तो 'नवभारत' मासिकाच्या सप्टेंबर, १९७८ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. म्हटलं तर हा लेख व्यक्तिलेख आहे, तसाच तो आत्मपरही आहे. सौ. सत्यवती जोशींच्या आठवणी उलगडत तर्कतीर्थांनी आपले गृहस्थ नि सार्वजनिक उलगडले आहे.

तर्कतीर्थांचा विवाह मुल्हेर निवासी कावेरी पंडित यांच्याशी जून, १९२६ मध्ये मुल्हेर मुक्कामी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव वासुदेवबुवा पंडित. सन १९२७ मध्ये तर्कतीर्थांनी वाईत आपले बिऱ्हाड थाटले तेव्हा ते पत्नीच्या वृद्ध वडिलांना घेऊन आले. तिचे सासरचे नाव सत्यवती. पहिला मुलगा मधुकर तिला 'सती' म्हणू लागला. ती सर्वांसाठी 'सतीकाकू' झाली. त्याच्या अनेक आठवणी म्हणजे तर्कतीर्थांच्या जीवनाचे एक एक पैलूच.

सत्यवतीचा जन्म १९३२ सालचा. नाशिक जिल्ह्यातील मुल्हेरमध्ये झाला. तिच्या आईचे नाव भागिरथी. सत्यवतीचे शिक्षण पाचवीपर्यंत झालेले. विवाह झाला तेव्हा तिचे वय १४ नि माझे २५ वर्षे होते. १५ व्या वर्षी संसार थाटला. सन १९३० च्या कायदेभंग सत्याग्रहात मी तुरुंगात असताना माझे वडील निवर्तले. ते ७८ वर्षांचे होते. तुरुंगवास काळात माझे थोरले बंधू वेणीमाधव यांनी माझ्या कुटुंबाचा सांभाळ केला.

तुरुंगातून सुटून आल्यावर काही काळ महात्मा गांधींच्या सहवासात गेला. सत्यवतीलाही १९३४ ला गांधींचा सहवास लाभला. महात्मा गांधींच्या आदेशानुसार, नंतर मी हरिजन आंदोलनात प्रयाग बिहार येथे देवघर इ. तीर्थक्षेत्री अस्पृश्यतेच्या शास्त्रार्थाकरिता पुराणमतवादी पंडितांनी आव्हान देऊन भरविलेल्या सभेत वाद केले. इकडे सत्यवती वाई मुक्कामी तेच कार्य करीत असे. ती स्त्री स्वातंत्र्यवादी होती. मुलांबरोबर मुलींना शिकविण्याच्या मताची होती. धार्मिक असून आचार-विचाराने पुरोगामी होती. घरी कामासाठी हरिजन स्त्री ठेवून त्या काळातील शिवाशिव मोडून काढली. घरच्या पंक्तीत जातिभेद केला नाही. पुढे तर तिने मला देव कृष्णार्पण करायला भाग पाडून कर्मकांड सोडले. विधवा, परित्यक्तांविषयी सतीच्या मनात कणव होती. त्यांनाही ती मदत करी. ती आतिथ्यशील होती. घरी येणाऱ्या-जाणाऱ्यांचा राबता असे. सर्वांचे आतिथ्य करी. मराठी विश्वकोश कार्यालय सुरू झाल्यावर अभ्यागतांचे आतिथ्य तिने वर्षानुवर्षे न थकता, न कंटाळता सांभाळले. मी घरी नसताना कोणी आले तर ती माझी अनुपस्थिती जाणवू देत नसे. स्त्रियांच्या भेदप्रथा तिने व्यवहारातून मोडल्या.

सज्जन, दुर्जन या सर्वांबद्दल तिला सहानुभूती होती. व्यवहारात ती भेद करीत नसे. माझ्या पश्चात मराठी विश्वकोश कार्यालय कर्मचारी, अभ्यागत, विद्यार्थी, शिक्षक, कामगार (प्रेस), सर्वांच्या हलचालींवर तिचे आपलेपणाचे लक्ष असे. सर्वांचे गुणदोष तिला माहीत असत. ते ती बोलून दाखवे; पण भेदव्यवहार नाही. आम्ही १९३७ ला कै. वा. गो. परांजपे

यांच्या आर्य संस्कृती मुद्रणालयात धर्मकोशाच्या पहिल्या खंडाची छपाई सुरू केली. धर्मकोशासाठी पुण्यात बिऱ्हाड थाटले. पुण्याच्या टिळक पथावरील चिमणबागेतील आपटे यांच्या वाड्यात त्या काळी आमचे बिऱ्हाड होते. या काळात माझी वेषभूषा डोक्यावर शेंडी, खांद्यावर उपरणे, कमरेस धोतर, पायात वाहाणा अशी होती. एव्हाना मी मार्क्सवादी, रॉयवादी झालो होतो. एम. एन. रॉय या काळात सपत्निक, मित्रपरिवारासह भोजनास आले होते. घरचे वातावरण, पत्नी, माझा वेष सर्वांचे या साऱ्यांना आश्चर्यमिश्रित कौतुक वाटले होते. पुणे मुक्कामी माझ्या घरी क्रांतिकारकांशी संबंध असल्यावरून धाड पडली होती; पण पोलिसांच्या हाती काहीही सापडले नाही. अशा नि अन्य कठीण प्रसंगी सत्यवती जराही गडबडली नाही. उलट खंबीरपणे माझ्या पाठीशी उभी राहिली.

सन १९४० ला आम्ही परत वाईस आलो. त्या काळात दुसरे महायुद्ध सुरू होते. विद्यार्थी वसतिगृहास अन्नाचा तुटवडा पडू नये म्हणून सतीने मोठे प्रयत्न केले. १९४६ च्या निवडणुकीत मी रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी उमेदवार विठ्ठलराव जगताप यांचा प्रचारक होतो. त्या काळात मानहानी, मारहाण सहन केली. तीच गोष्ट संयुक्त महाराष्ट्र लढ्यातही. कळायला लागल्यापासून माझं गेल्या ४५ वर्षांतील जीवन प्रवाशाचंच होतं. सतीने कधी तक्रार केली नाही. ती निवर्तली तेव्हा तिच्यावर अग्निसंस्कार कनिष्ठ पुत्र वासुदेवने केले. (१२ ऑगस्ट, १९७८). निधनानंतर अनेकांनी अनेक प्रकारे सतीच्या सतीत्वाचा, सत्त्वशीलतेचा गौरव केला.

७७) महत्त्वाकांक्षा प्रशंसनीय नाही असे कोण म्हणेल?

'पुस्तक पंढरी' या साहित्य प्रसारार्थ समर्पित मासिकाच्या दिवाळी, १९८१ च्या अंकात वरील शीर्षकाचा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा छोटासा लेख आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे विभाजन नोव्हेंबर, १९८० मध्ये झाले. त्यामागे अनेक कुरबुरी, कुरघोड्यांची किनार होती. हे विभाजन तर्कतीर्थांच्या इच्छेविरुद्ध झालेले होते. या लेखास त्या शल्याची एक किनार आहे. तर्कतीर्थांनंतर डॉ. सुरेंद्र बारलिंगे मंडळाचे अध्यक्ष झाले. त्यांनी अनेक नव्या योजना जाहीर केल्या. त्यासंबंधींची प्रतिक्रिया म्हणून या आत्मपर लेखाकडे पाहावे लागते.

माझ्या अध्यक्षतेखाली साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना १९ नोव्हेंबर, १९६० रोजी झाली. त्या वेळचे मुख्यमंत्री मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी राज्य स्थापनेवेळी मराठी विकासाचे आश्वासन जनतेस दिले होते. माझ्या अध्यक्षतेखाली मंडळाने आयोजित केलेल्या योजना एक-दोन अपवाद सोडल्यास सर्वच कार्यवाहीत आल्या आहेत. मंडळाच्या अधिकारपदावर व सदस्यपदावर असलेल्या मंडळींची बौद्धिक पात्रता व ध्येयधोरणांचा आवाका किती आहे, यावरच कामकाज अधिक प्रभावी व परिणामकारक होणे न होणे अवलंबून असणार.

साहित्य संस्कृती मंडळातर्फे नवोदित लेखकांसाठी शिबिरे भरविण्याचा उपक्रम सुरू झाला आहे. त्यांना जिल्हानिहाय सांस्कृतिक केंद्रे स्थापावयाची आहेत. हा उद्देश अतिशय स्तुत्य आहे. परंतु, सांस्कृतिक केंद्राचा कार्यक्रम काय, हे मात्र ठरवावे लागेल. कल्पनेमध्ये अत्यंत भव्य चित्र निर्माण करणे सोपे आहे. परंतु, कार्यवाहीत आणण्याकरिता लागणारे मनुष्यबळ व अर्थबळ निर्माण करणे फार कठीण आहे. जिल्हावार अनेक सांस्कृतिक केंद्रे निर्माण करण्याची योजना फार महत्त्वाकांक्षी आहे. महत्त्वाकांक्षा प्रशंसनीय नाही असे कोण म्हणेल?

हा लेख म्हणजे नव्या मंडळ नि त्यांच्या योजनांविषयीची साशंकता होय. त्यामागे २० वर्षांचा अनुभव आहे. शासकीय पाठबळ, अर्थबळ मिळविणे तितके सोपे नसते, हे तर्कतीर्थांनी वर्षानुवर्षे अनुभवले होते.

७८) माझी आयुष्याची संध्याकाळ

'ललित'च्या दिवाळी, १९८१ मधील हा आत्मपर लेख. त्यास विहंगमावलोकन आणि सिंहावलोकनाचा संगम आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी सहस्रचंद्रदर्शनयोगाप्रीत्यर्थ केलेले हे लेखन.

वयाचे ८१ वे वर्ष सुरू झाले. मनुष्याचा आयुर्दाय शंभर वर्षांचा असतो. आता सुमारे २० वर्षे राहिली आहेत. आयुष्याची ही संध्याकाळ निरामय वाटते. काळ फार वेगाने निघून जातो, असे म्हणतात. याकाळत माझ्या भोवतालच्या जगात अनेक सामाजिक व राजकीय स्थित्यंतरे झाली. वयाच्या साठाव्या वर्षांपर्यंत उद्याचे काय, हा प्रश्न कायम राहिला. माता, पिता, गुरू, बंधू, भगिनी, मित्र, नातेवाईक, पत्नी, मुले, मुली, जावई, सुना, नातवंडे इ. स्वरूपांत जी माणसे आली, त्यांनी प्रेमाचे व स्नेहाचेच विश्व निर्माण केले. वाईच्या नागरिकांनी सतत अखंडपणे आदरानेच माझ्याकडे पाहिले. हा सनातनी, रुढीनिष्ठ मध्यमवर्गीयांचा गाव. इथल्या तरुण पिढीने माझ्या नव्या मताला साथ दिली. संघर्ष झाले, पण कालांतराने शमले.

१९०८ चा टिळकांचा तुरुंगवास, १९१४ चे समाजिक युद्ध, १९१७ चे विनोबांचे प्राज्ञपाठशाळेत आगमन, असहकारिता (१९२०-२१) व कायदेभंग चळवळ (१९३०-३२), एम. एन. रॉय भेट या माझ्या आयुष्यावर प्रभाव पाडणाऱ्या घटना ठरल्या.

भारत स्वतंत्र झाल्यावर इथे सामाजिक व राजकीय समतेवर आधारलेली क्रांती होईल, अशी अपेक्षा मात्र मी कधी केली नाही. जिथे समाजवादी क्रांती झाली (रशिया) तिथे मानव स्वातंत्र्य गमावून बसला. त्यामुळे एकंदरीत जगाचे किंवा भारताचे भविष्य मनात विषाद निर्माण करते. आयुष्याची ही संध्याकाळ भयाण वाटावी असे कोणीही म्हणेल; पण विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या अव्याहत प्रगतीने माझे मन भारावून जाते. माझे हात-पाय अजून धडधाकट आहेत. मी स्वैर संचार करतो. जिज्ञासेने वाचन करतो. जीवविज्ञान अधिक वाचतो. जीवात्मा ते परमात्मा यांचा सांधा सापडेल काय? म्हणून मी उत्सुक आहे. ही आयुष्याची संध्याकाळ!

ह्या अनंत आश्चर्यमय दृश्यविश्वातील मानवी जीवनच भव्य आहे, त्यात विस्मयजनक नाट्य आहे; पण पलीकडे काय आहे कोणास ठाऊक? 'यतो वाचो निवर्तन्ते' अर्थात ब्रह्मानंद... जेथून वाणी रिकाम्या हातांनी परतत नाही आणि जेथून मन आश्चर्याविना उलट प्रवास करीत नाही... तो ब्रह्मानंद काय असतो, ते कुणास माहीत आहे ? (तैंतरीय उपनिषद)

७९) माझी तीन प्रेरणास्थाने

'दीपावली' मासिकाच्या सन १९८६ च्या अंकात 'माझे प्रेरणास्थान' सदरात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'तीन प्रेरणास्थाने' शीर्षक लेखात स्वामी केवलानंद सररस्वती, महात्मा गांधी आणि कॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांना आपली प्रेरणास्थाने म्हणून प्रस्तुत केले आहे.

मी जन्मलो पिंपळनेर गावी. घरचे व भोवतालचे वातावरण मात्र उच्च ब्राह्मण संस्कृतीचे होते. मी वयाच्या आठव्या वर्षी वेदाध्ययन करू लागलो. १३ व्या वर्षी मी वेदाध्ययार्थ वाईस प्राज्ञपाठशाळेत आलो. हरिद्वार, कांगडाऐवजी वाईची निवड वडिलांनी आपल्या एका मित्राच्या सांगण्यावरून केली. इथे मला गुरू नारायणशास्त्री मराठे मिळाले. त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक होते. इथे मला आचार्य विनोबांचा सहवास सहपाठी, सहाध्यायी म्हणून लाभला. पुढे गुरुजींनी संन्यास धारण करून ते स्वामी केवलानंद सरस्वती झाले. त्यांनी मला न्यायवेदांत, शांकरभाष्य शिकविले.

सन १९३० मध्ये मी महात्मा गांधींच्या कायदेभंग चळवळीत सामील झालो. राजकीय पारतंत्र्यातून देश मुक्त झाला पाहिजे, तरच समाजाची सर्वांगीण प्रगती होऊ शकते. हे स्वामी केवलानंद यांनी मनावर बिंबविले होते. विचार-आचाराचे अद्वैतही त्यांनीच शिकविले. त्यामुळे या चळवळीत प्रथम सामील होऊन भाषणे देऊ लागलो. नंतर शेतकरी, आदिवासी, कोळी संघटित करून जंगल सत्याग्रह योजला. दोनदा तुरुंगात गेलो. विनोबांची परत भेट १९३२ च्या धुळे तुरुंगवासात घडली. येथील माझ्या वेदाध्ययनाने प्रभावित होऊन जमनालाल बजाज यांनी माझी कीर्ती महात्मा गांधींपर्यंत पोहोचविली. महात्मा गांधी अस्पृश्यता निवारणासंबंधी विचारविमर्श करीत असण्याच्या काळात (डिसेंबर, १९३२ (उत्तरार्ध) मी त्यात सहभागी होतो. सनातनी मतवादी महात्मा गांधींना अस्पृश्यता निवारण कार्य धर्मविरोधी आहे, हे समजावत असण्याच्या काळात महात्मा गांधींनी सनातनींना समजावले की, "हिंदू धर्माप्रमाणे मनुष्याच्या हृदयात परमेश्वर वसत आहे. यामुळे प्रत्येक मनुष्य देवाचे देऊळ आहे, अशी माझी श्रद्धा आहे. त्यामुळे मला दुर्गती कशी प्राप्त होईल?" प्रतिबद्धतेमुळे महात्मा गांधींनी हा कार्यक्रम पुढे हाती घेतला. दे. भ. काकासाहेब कालेलकर यांच्या सांगण्यावरून गांधींचा पुत्र देवदास आणि राजगोपालाचार्य यांची कन्या लक्ष्मी यांच्या विवाहाचे पौरोहित्य माझ्याकडे आले.

अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न चार्चिला जात असताना दलितवर्ग जीवनाची चिकित्सा

समाजवादी दृष्टिकोनातून सुरू झाली नि मी या संदर्भात विचार करणाऱ्या सशस्त्र क्रांतिवादी एम. एन. रॉय यांचे यांचे लेखन वाचू लागलो. १९३६ साली कानपूर खटल्याच्या शिक्षेतून त्यांची तुरुंगातून सुटका झाली. मी त्यांना भेटण्यास उत्सुक होतो. पुणे येथील कै. अ. भ. कार्णिक यांच्या घरी पहिली भेट झाली. प्रथम भेटीतच त्यांची माझ्यावर छाप पडली. त्यांचे जीवन माझ्यापुढे होते. गेल्या पाच वर्षांच्या समाजवादी नववाचनातून माझ्या पूर्वश्रद्धा बदलल्या. वेदस्मृतिपुराणे ही ईश्वराने व त्रिकालज्ञ ऋषी यांनी निर्मिलेले आहेत, अशी मी श्रद्धा बाळगत होतो. ती सोडली आहे. वेदस्मृतिपुराणे मानवरचित आहेत, म्हणून मानवी ज्ञानाच्या मर्यादा त्या ग्रंथांनाही लागू आहेत, हे लक्षात घेऊन चिकित्सक दृष्टीने बुद्धिप्रामाण्यवादाचा अंगीकार करून त्यातील ग्राह्य काय व अग्राह्य काय, याचा विचार करू लागलो आहे. पुराणमतवादी श्रद्धेतून मी माझे मन मुक्त केले आहे. ते आता मार्क्सवादावरील श्रद्धेत कसे बद्ध होऊ शकेन? मार्क्सवादी विचार तपासलाच पाहिजे. त्याच्या मर्यादा ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मानवेंद्रनाथ रॉय यांनी माझ्या मतास दुजोरा दिला नि जनमानवतावाद मान्य केला. एम. एन. रॉय हे माझे प्रज्ञावंत मित्र व गुरू म्हणून मला मान्य झाले.

अशा प्रकारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सदर आत्मपर लेखातून आपल्या विविध गुरूंचे वेगवेगळ्या क्षेत्रांतील गुरुत्व समजावले आहे. स्वामी केवलानंद सरस्वती हे त्यांच्या वेदाध्ययनातील पंडित होते, तर महात्मा गांधी गुरू. हे त्यांचे धर्मश्रद्धेचे रूपांतर मानवी समाजशीलतेत करणारे गुरू होते. राजकीय विचारदिशा त्यांना मानवेंद्रनाथ रॉय यांनी दिली; पण अंतिमतः तेही नवमानवतावादाचे पुरस्कर्ते झाले. हा लेख १९८६ चा. यापुढे १९९० नंतरच्या आयुष्याच्या अंतिम पर्वात ते पूर्णतः विचारपूर्वक अहिंसक गांधीवादी व मानवतावादी झाले, ते केवळ बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकवाद व मानवतावादांची बलस्थाने लक्षात घेऊन. विचारी माणसं निरंतर विचारशील असतात, हे या आत्मपर लेखातून स्पष्टपणे सिद्ध होते.

८०) साहित्य संस्कृती मंडळ आणि मी

'लोकप्रभा' साप्ताहिकाच्या दिवाळी, १९८८ मधील हा लेख. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी यात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सन १९६० ते १९९० पर्यंतच्या दोन दशकांचा आढावा आठवणीतून घेतला आहे.

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर राज्याच्या भवितव्याची व्यापक मांडणी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिभासंपन्न मनाने सुरू केली. त्यांनी मला साहित्य आणि संस्कृती मंडळासाठी नावे सुचविण्यास सांगितले. मी १६ नावे दिली, तर ते म्हणाले, 'एवढे विद्वान एकत्र आले तर वादविवाद होत राहणार.' मी समजावले, 'वादे वादे जायते तत्त्वबोधः।' निरनिराळ्या तज्ज्ञांच्या उपसमित्या स्थापन करण्याचे काम हाती घेतले. त्यांच्यामार्फत कार्यक्रम आखले. मराठी विद्वान माणसे जी इंग्रजीत लिहीत, त्यांना मराठीत लिहिते केले.

सर्व ज्ञान मराठीत यावे म्हणून मराठी विश्वकोश प्रकल्प मंडळाने सन १९६२ साली हाती घेतला. यशवंतराव चव्हाण १९६२ साली केंद्रात मंत्री म्हणून गेल्यानंतर आलेल्या कन्नमवार तथा वसंतराव नाईक यांनी मंडळ कार्य अबाधित राखले.

मंडळाच्या एकंदर कार्यकक्षा रुंदावायाला पाहिजे होत्या; पण त्या संकुचत आहेत. दर तीन वर्षांनी नवे मंडळ नेमले जाते. त्याचे अध्यक्ष व सदस्य यांना मंडळाचे कार्य पटतेच असे नाही. मराठी विकास कार्यक्रम मूर्त रूपात आला नाही, तर माध्यमिक आणि उच्च शिक्षणाची मोठी हानी होईल. यामुळे बहुजन समाज शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला राहण्याचा धोका आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या मंडळाच्या स्थापनेपासून ते विकेंद्रीकरण धोरणानुसार मंडळाचे विभाजन होईपर्यंतच्या २० वर्षांच्या काळात त्यांनी अनेक मूलभूत ग्रंथांची भाषांतरे करवून घेऊन मराठी भाषा ज्ञानभाषा बनविण्याचा प्रयत्न केला. मराठी विश्वकोशाचे अनेक खंड या काळात प्रकाशित केले. कुमारकोशाची योजना आखली. उत्कृष्ट ग्रंथांना पुरस्कार, नवलेखक शिबिरे, नवलेखक प्रकाशने, आंतरभारती माला, भारतीय भाषांचा इतिहास इ. प्रकल्प सुरू केले व ते नावारूपाला आणले. साहित्य संस्कृती मंडळातर्फे साहित्यिक संस्थांना अनुदान, समग्र वाङ्मय प्रकाशन इ. योजना म्हणजे या मंडळाविषयीचे तर्कतीर्थांचे संकल्प आणि स्वप्ने होत.

८१) 'ऐ गोरख, तूने मच्छिंद्र को भी जीता है!'

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ते वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत शिकत असतानाची ही आठवण आहे, ती आचार्य विनोबा भावे यांची; पण त्यातून सन १९१४ ते १९१८ चा काळ, विनोबा भावे यांची स्वाध्यायी वृत्ती, तर्कतीर्थ निरीक्षक तटस्थता स्पष्ट होते म्हणून महत्त्वाची.

दैनिक सकाळ, पुणेने सन १९८८ मध्ये 'अजून आठवते' सदर चालवले होते. त्यात संपादक मान्यवरांना लिहायला आमंत्रित करीत हे सदर 'स्मरणरंजक' (Nostalgic) असल्याने वाचनीय ठरलं होत. त्या सदरात हा मजकूर ४ नोव्हेंबर, १९८८ मध्ये प्रसिद्ध झाला होता.

त्यानुसार आचार्य विनोबा भावे साबरमतीच्या आश्रमातून 'प्रस्थानत्रयी' (उपनिषदभाष्य, गीताभाष्य व ब्रह्मसूत्रभाष्य) शिकायचे म्हणून गुरू नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या प्राज्ञ पाठशाळा, वाईत आले होते. प्रौढ विद्यार्थी प्रारंभी विनोबांना शिकवत. पुढे विनोबांनी स्वाध्यायाने अल्पावधीत प्रस्थानत्रयी अध्ययन पूर्ण केले नि महात्मा गांधींना कळवले. त्यांना शाबासकी देत महात्मा गांधींनी पत्रात म्हटलं होतं, 'ऐ गोरख, तूने मच्छिंद्र को भी जीता है!' नवनाथ परंपरेत प्रथम आदिनाथ (शिवशंकर), द्वितीय मच्छिंद्रनाथ, तृतीय गोरखनाथ. गोरखनाथाने मच्छिंद्रनाथवर कडी करत तो जितेंद्रीय झाला होता. 'शिष्यात इच्छेत पराजय:'वत् विनोबांनी महात्मा गांधींवर कडी केल्याची कबुली यात आहे.

८२) स्वातंत्र्य चळवळीतील माझा कारावास

सातारा जिल्ह्यातील समाजसेवक संभाजीराव पाटणे यांनी 'स्वातंत्र्यसंग्रामातील सातारा जिल्हा' (१९९२) नावाचा ग्रंथ साकारला असून, त्यात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी स्वातंत्र्यचळवळीतील आपला सहभाग नोंदविला आहे. त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कायदेभंग चळवळीतील आपला सहभाग, कार्य, तुरुंगवास इत्यादींबद्दल आत्मकथनपर निवेदन केले आहे.

त्यानुसार, महात्मा गांधींनी कायदेभंगाची जी चळवळ सुरू केली, तेव्हा ती चळवळ अहिंसक असावी अशी त्यांची अट होती. या वेळी मी पक्का अहिंसावादी नव्हतो. संगमनेरला आम्ही २०० ते २५० कार्यकर्त्यांचे शिबिर योजले होते. ते तत्कालीन ब्रिटिश कलेक्टरांनी मोडले. ते दीड महिना सुरू होते. सन १९३० च्या सत्याग्रहात मला सक्तमजुरीची शिक्षा होऊन धुळे जेलमध्ये पाठविण्यात आले. चळवळ मागे घेतल्यावर सुटका झाली. परत १९३२ च्या चळवळीतील धरपकडीत अटक होऊन पुन्हा धुळ्याला तुरुंगात डांबण्यात आले. इथे जमनालाल बजाज, गुलजारीलाल नंदाही तुरुंगात होते. ती साने गुरुजींनी लिहून काढली होती. तेही आमच्याबरोबर धुळे तुरुंगात होते.

शंकर विठ्ठल लेले म्हणून एक कार्यकर्ते प्राज्ञपाठशाळेत होते. त्यांनी सातारा जिल्ह्यात कायदेभंगाचा खूप प्रचार केला होता. या काळात प्राज्ञपाठशाळेने अनेक क्रांतिकारकांना आश्रय दिला होता. असेच एक कार्यकर्ते भय्याशास्त्री वाटवे होते.

सातारा जिल्ह्यातील चळवळ हिंसक/अहिंसक दोन्ही मार्गांनी सुरू होती. मी शहरी कार्यकर्ता नसून ग्रामीण कार्यकर्ताच आहे. माझी ७ व्याख्याने कराड येथे झाली. त्याची आठवण यशवंतराव चव्हाण यांनी 'कृष्णाकाठ' या आपल्या आत्मकथेत नोंदविली आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे कायदेभंगाच्या चळवळीत राष्ट्रीय काँग्रेसतर्फे नेमण्यात आलेल्या 'वॉर कौन्सिल'चे सदस्य होते. याची नोंद ब्रिटिश गुप्तचर अहवालात आढळते. यावरून तर्कतीर्थ स्वातंत्र्यचळवळीतील अग्रणी नेते होते हे स्पष्ट होते.

८३) बालपणीचं माझं वेदवाचन

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९४६ ते १९९२ अशा काळात ११ आत्मपर लेख लिहिलेत. इथे ते प्रकाशनक्रमाने न देता जीवनक्रमाने दिले गेले आहेत. यामुळे जीवन, प्रसंग, विचार-विकासाची तर्कसंगती लावणे शक्य होते व त्यातून कालक्रमानुसार जीवनाचा उलगडा शक्य होतो. या क्रमाने 'बालपणीचं वेद वाचन' शीर्षक आत्मपर लेख तर्कतीर्थांनी सन १९९२-९३ च्या दरम्यान लिहिला होता 'महाराष्ट्र टाइम्स' या मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या दैनिकात 'ग्रंथांच्या सहवासात' सदर प्रकाशित होत असे. पुढे हे सदर संपादणारे सारंग दर्शने यांनी त्याच नावाने या सदरातील लेखांचे संपादन करून ग्रंथ प्रकाशित केला आहे.[23]

प्रस्तुत लेखानुसार तर्कतीर्थ जुन्या धार्मिक परंपरेत जन्मले. सभोवार मंत्रोच्चार नित्य असे. ते वेदांतील असत. उपनयन (मुंज) होताच मला 'वेद' शिकविले. 'अमरकोश' पढविला. गुरूजवळ मी संस्कृत ग्रंथ म्हणजे शास्त्रे शिकलो. इंग्रजी मला विनोबांनी शिकविले. पुढे इंग्लिशमधील 'एन्साक्लोपीडिया ब्रिटानिका' माझ्या कपाटात आला. तो माझ्या मित्रांनी मला भेट दिला होता. महामहोपाध्याय पां. वा. काणे यांचे 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र'चे खंड वाचले. भारतीय दर्शने वाचली. मग मी मार्क्सवादी ग्रंथ बाळगू लागलो. परंतु, अलीकडे मला मार्क्सवादाला बांधून घेणे जमेनासे झाले आहे. आता मी नोबेल विजेते रिचर्ड फिनमनचे 'The Strange Theory of Light and Matter' वाचत भौतिक शास्त्रात पाऊल टाकले आहे. आइन्स्टाइन वाचू लागलो आहे. एका शास्त्रज्ञाने प्रौढ विद्यार्थ्यांना बजावले आहे, 'विषय नीट कळत नाही म्हणून ढळू नका, हटू नका.' मी तेच करतो आहे. यातून मी मराठी 'विश्वकोश'चे १४ खंड आजवर संपादून प्रकाशित कारू शकलो. 'तुकारामाची गाथा' जितकी महत्त्वाची तितकाच 'वैदिक इंडेक्स' हा इंग्रजी ग्रंथराज. अँटोनी मॅक्डोनेल आणि बेरियेडल किथ यांनी संपादिलेला दोन हजार पृष्ठांचा ग्रंथ. 'गाथा पंचक', 'सकलसंतगाथा' म्हाइंभटाचे 'लीळाचरित्र' सारं वेळोवेळी वाचतो. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव संपादित 'प्राचीन चरित्र कोश' श्रुतिस्मृतिपुराणांचे संदर्भ पुरवितो. माझ्या ग्रंथालयात साठ हजार ग्रंथ आणि वीस हजार पोथ्या आहेत.

हे सारं वाचत असताना माझी छाती दडपून जाते अन् लक्षात येतं, तर्कतीर्थांनी बालपणापासून आयुष्याच्या उत्तरायणापर्यंत एकच केलं- वाचन आणि वाचन.

आत्मपर लेखांची मीमांसा

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जे दहाएक आत्मपर लेख लिहिले आहेत, त्यातून त्यांच्या जीवनांगाच्या विविध पैलूंवर प्रकाश पडतो. वाचन, गुरुकुल शिक्षण, गुरू, प्रेरणास्थाने, स्वातंत्र्यचळवळ, गृहस्थ जीवन, विविध विचारधारांचा अंगीकार नि त्यांची कारणमीमांसा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या माध्यमातून झालेले कार्य व योगदान, आयुष्याची संध्याकाळ असा जन्म ते जीवन संध्याकाळ असा समग्र परंतु सारसंक्षेपी जीवनप्रवास यातून उलगडत राहतो.

तर्कतीर्थांच्या वाचनाचा प्रारंभ जरी वेदवाचनसारख्या प्राचीन संस्कृत साहित्यापासून झालेला असला, तरी वाचनासंबंधी जे विविध संदर्भ त्यांच्या समग्र वाङ्मयातून हाती येतात, त्यातून लक्षात येते की, वाचनविकास ही त्यांनी सतत वर्धिष्णू ठेवलेली ज्ञानसाधना आहे. वेद, वेदान्त, श्रुती, स्मृती, पुराण हे त्यांचे संस्कृतचं प्रारंभिक वाचन; पण 'धर्मकोश'सारखे संस्कृत कोश वाङ्मय संपादनकार्य पाहता धर्मशास्त्र, इतिहास, व्याकरण, न्याय अशा चारी दिशांची वाचन भ्रमंती करीत ते आपलं वाचन पुष्ट व प्रगल्भ करीत राहतात. संस्कृतनंतर

वाचन नाम इंग्रजीचा येतो. इंग्रजी, मराठी समांतर वाचन करीत ते आपल्या वाचनाच्या कक्षा रुंदावत सर्वग्राही करतात. कादंबरी, कविता, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, विज्ञान, दर्शने यांचे सखोल वाचन त्यांना तर्कतीर्थ बनवतं. प्रा. मे. पुं. रेगे यांनी घेतलेल्या त्यांच्या मुलाखतीमधून ते कसे शास्त्री-पंडितांच्या सहवासात वाढले आणि त्यांचे अध्ययन अध्यापन निरंतर उच्चतर कसे होत गेले, त्याचा काहीएक अंदाज वाचकास येऊ शकतो. 'Encyclopedia of Ignorance'सारखा कोश ते नुसता वाचतच नाहीत, तर त्याच्या सामर्थ्य नि मर्यादा विशद करीत. ते संपादकीय[२४] वाचले की त्यांची ज्ञान-विज्ञान शाखांतील प्रज्ञा लक्षात आल्यावाचून राहात नाही.

माणूस आनुवंशिकतेने श्रेष्ठ ठरतो की परिस्थिती त्यास घडवत श्रेष्ठ करते, या संदर्भातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं लेखन वाचले की माणूस निरुत्तर होऊन जातो. 'तल्लख बुद्धिमत्ता, अस्मृतीचं वरदान घेऊन आलेली स्मरणशक्ती, अपराजेय तर्कबुद्धी यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होताच; पण त्यांना ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती, महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासारखे प्रेरक गुरू लाभले. हे त्यांना मिळालेलं परिस्थितिजन्य वरदानच. ज्या सामाजिक, राजकीय, धार्मिक परिवेशात, पर्यावरणात ते वाढले, तो विकासकाळ संघर्षाचा होता. हा संघर्ष आर्थिक, राजकीय, प्राचीन-आधुनिक, तर्क की बुद्धी असा द्वंद्वात्मक होता. राष्ट्रवाद, काँग्रेस, मार्क्सवाद, रॉयवाद, गांधीवाद अशा परस्पर विरुद्ध वैचारिक संघर्षातून त्यांनी विकासवाट चिकित्सक, चोखंदळपणे चोखाळली. तो संघर्ष त्यांनी 'मी रॉयवादी का झालो?' या लेखात सविस्तर केलाच आहे; पण सरते शेवटी आपण क्रांती, हिंसेचे समर्थन केल्याचा पश्चात्ताप त्यांनी आयुष्याच्या संध्याकाळी दिलेल्या एका मुलाखतीत[२५] व्यक्त केला आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपली पत्नी सौ. सत्यवती जोशी यांच्या अकाली नि अचानक निधनानंतर जो श्रद्धांजलीपर लेख लिहिला आहे, त्यातून तर्कतीर्थांच्या गृहस्थ नि सार्वजनिक जीवनावर प्रकाश पडतो, या उभयतांची कन्या प्रा.डॉ. अरुंधती खंडकर यांनी 'तर्कतीर्थ, एक प्रज्ञाप्रवाह' (१९९५), 'महाराष्ट्राचे शिल्पकार : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' (२००३) आणि 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' (२०१०) ही जी चरित्रत्रयी लिहिली आहे, त्यातूनही गृहस्थ जीवन उलगडले. त्यातून लक्षात येण्यासारखी गोष्ट अशी की, तर्कतीर्थांनी आपली गृहस्थी, 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे तेच करी॥' या नियमाने केल्याचे दिसते. काटकसरी जीवनात अभ्यागतांच्या आतिथ्यात या दाम्पत्याने कधी हात आखडला नाही हे विशेष.

तर्कतीर्थांचे राजकीय जीवन विलक्षण उलथापालथीचे राहिले आहे. एका आयुष्यातील परस्परविरुद्ध विचारधारांचा अंगीकार आणि सक्रिय सहभाग स्तिमित करणारा ठरतो. या अर्थांनीही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे जीवन आणि व्यक्तिमत्त्व अपवादभूत ठरते.

यासाठी लागणारी सोसण्याची सहनशक्ती येते, ती आत्मबल नि उत्तुंग अशा ध्येयासक्तीतून. ती त्यांच्यात होती, हे त्यांनी विचारपूर्वक स्वीकारलेले सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आन्हिक उखळीत डोके घालण्याइतके जोखमीचे होते; पण त्यांनी ते जबाबदारीने, पुरेशा गांभीर्याने निभावले, याची इथे नोंद घ्यायला हवी.

त्यांच्या जीवित कार्याची दोन अंगे होती- १) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, २) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ. ही झाली शासकीय कार्ये. या कार्याइतकेच प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईमार्फत केलेले कार्य विसरता येणार नाही. या सर्वांतून संस्कृत भाषेतील 'धर्मकोश' (१५ खंड), मराठीतील 'मराठी विश्वकोश' (१५ खंड) व शेकडो मराठी ग्रंथांचे भाषांतर, प्रकाशन, संपादनकार्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या माध्यमातून झाले. ते पाहता हे गृहस्थ संस्कृत पंडित, धर्मशास्त्री, साहित्य व्यासंगी, भाषातज्ज्ञ होते, हे कार्यातून सिद्ध होते. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चहाण यांनी राज्याच्या सिंहासनावर मराठी भाषा विराजमान झाल्याचे जे स्वप्न पाहिले, जो संकल्प केला, तो तडीस नि सिद्धीस नेण्याचे अमीट कार्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले, हे कोण अमान्य करील?

हे सारे आत्मपर लेख प्रथमपुरुषी एकवचनी शैलीत लिहिले गेले, तरी यात 'आम्ही'चा स्पर्श आहे, 'मी'चा अहंकार नाही. 'इदं न मम्' अशा निरपेक्ष निरिच्छ वृत्तीने त्यांनी भाषा, साहित्य, संस्कृतीची सेवा केली, म्हणून ते यशस्वी झाले. या आत्मपर निबंधातील शेवटचा लेख महत्त्वाकांक्षा विशद करणारा. महत्त्वाकांक्षा केवळ प्रशंसनीय असून चालत नाही, तर मनुष्यबळ संघटन आणि आर्थिक जुळणी यावरच कोणताही महत्त्वाकांक्षी प्रकल्प यशस्वी/अयशस्वी होणे अवलंबून असते. ही शहाणीव तर्कतीर्थांनी अनुभव नि व्यवहारातून संपादली होती. 'योजकस्य तत्र दुर्लभः।' न्यायाने त्यांनी ते सिद्ध केले. यात त्यांच्या आत्मपर जीवनाची फलश्रुती पाहता येते. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' असा परार्थ कल्याणी भाव तर्कतीर्थांनी जोपासला. ते मनुष्यसंग्रही गृहस्थ होते, तसे कुशल संघटकही. अनेक शिबिरे, संमेलने, आंदोलने यांतून त्यांनी ते वेळोवेळी दाखवून दिले आहे. ते पढिक पंडित नव्हते, तर कृतिशील बुद्धिवंत होते, म्हणून ते स्वातंत्र्योत्तर काळात मराठी ज्ञानसमाज न बुद्धिजीवी वर्गाचे मार्गदर्शक बनून राहिले.

इ) प्रवासवर्णनपर लेख

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९५५ ते १९९३ अशा सुमारे चार दशकांच्या कालावधीत ब्रह्मदेश, रशिया, फ्रान्स, जपान, अमेरिकासारख्या देशांच्या डझनभर यात्रा केल्या. त्यातील निम्म्या तर अमेरिकेच्याच आहेत. त्यांची मुलं-मुली अमेरिकेत होती म्हणून घडलेल्या या कुटुंबभेटी. उर्वरित भाग विविध परिषदांच्या निमित्ताने झालेला प्रवास यांचे वृत्तांत व प्रवासवर्णनपर आठ-नऊ लेख तर्कतीर्थांनी लिहिले. ते वृत्तांत, प्रवासवर्णने,

दैनंदिनी अशा मिश्र शैलीतील होत. त्यांचा उद्देश विदेशभेटीची माहिती देऊन तेथील नवे विचारप्रवाह, अनुभव, निरीक्षण नोंदविणे आहे. या विदेश प्रवासातील नोंदी त्यांनी प्रवासकाळात दैनंदिनीमध्ये नोंदल्या होत्या. त्याआधारे झालेले हे सारे लेखन वेळोवेळी 'नवभारत' मासिकात प्रसिद्ध झाले आहे.

वृत्तांतलेखन प्रसंग, कार्यक्रम, सभा, परिषदा, संमेलने, चर्चासत्रे यांचं असतं. ते यथार्थ असतं. ज्या क्रमाने ते घटना, प्रसंग, समारंभ घडतात, त्या क्रमाने ते लिहिलं जातं. त्यात संक्षिप्तता असते. त्याचं छोटंसं शीर्षक राहतं. अन्य वाचकांना अशा वृत्तांमधून त्या घटना, प्रसंग, समारंभाचे चक्षुर्वैसत्यं वृत्त समजते व प्रत्यक्ष पाहिल्या, अनुभवण्याची प्रचिती वा पुन:प्रत्यय येतो. असंच प्रवासवर्णन असतं. ते हकिकतीच्या रूपात लिहिलं जातं. प्रस्थान ते आगमन असा क्रमबद्ध वृत्तांत यात असतो. नवं सांगण्या-दाखविण्यावर यात भर असतो, तसाच आपले अनुभव दुसऱ्यास सांगून त्यांच्या माहिती, ज्ञानात भर म्हणून प्रवासवर्णन लिहिलं जातं. ते ललित, सौंदर्यस्थळे अनुभव, नवता यांनी नटलेलं असेल, तर वाचनीय ठरतं. दैनंदिनी रोज लिहिण्याचा प्रघात असतो. काही लोक ती सविस्तर लिहितात, तर काही संक्षिप्त. मनुष्य विसराळू असतो, शिवाय काळ मागे पडला की जुन्या घटना, प्रसंग धूसर होत विस्मृतीच्या गर्तेत जातात. पुनःस्मरण, स्मरणरंजन, नोंद म्हणून दैनंदिनीचं महत्त्व असतं. त्यात नियमितता राखली, तर त्याचे फायदेच अनेक. तर्कतीर्थांनी या सर्वांचा मेळ घालत लिहिलेले परदेश प्रवासाचे लेख, नोंदी, दैनंदिनी, वृत्तांत इतिहासलेखनाचा भाग असा, तसा संदर्भ, तपशील समजण्यास उपकारकही. वाचता हे सर्व लक्षात येतं.

८४) रंगून सांस्कृतिक, स्वातंत्र्य परिषद

रंगून ही तत्कालीन ब्रह्मदेश (सध्या म्यानमार)ची राजधानी. हा आपला शेजारी देश आशिया खंडातील म्हणून सहसांस्कृतिकही. तिथे १८ ते २० फेब्रुवारी, १९५५ या काळात चार दिवस आशियाई सांस्कृतिक परिषद संपन्न झाली होती. ती आशिया संस्कृती स्वातंत्र्य समिती आणि तत्कालीन ब्रह्मदेश सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने योजण्यात आली होती. तिचे कार्यवाह प्रभाकर पाध्ये आणि वसंतराव कर्णिक होते. भारतातून या परिषदेसाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. व्ही. के. गोकाक, प्रा. गोवर्धन पारीख, मिनू मसानी, जयप्रकाश नारायण प्रभृती गेले होते. परिषदेत जपान, भारत, पाकिस्तान, ब्रह्मदेश, इंडोनेशिया, फिलिपाईन्स या देशांचे प्रतिनिधी सहभागी होते. हा वृत्तांत 'नवभारत' मासिकाच्या एप्रिल, १९५५ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता.

या लेखात तर्कतर्थांनी परिषदेचे स्वरूप, कार्यपद्धती, चर्चित विषय, सहभागी मान्यवर विद्वान त्यांच्या शोधनिबंधांचे शीर्षक विषय, स्वरूप, चर्चेचा दर्जा, त्यातून ज्ञानात पडलेली भर यांविषयी सविस्तर माहिती विशद केली आहे. परिषदेत एकूण २४ शोधनिबंध सादर करण्यात आले. अधिकतर इंग्रजीत होते. परंतु, अनेक प्रतिनिधींना इंग्रजी बोलण्याचा

सराव नव्हता. रोज ७ तास परिषदेचे कामकाज चालत असे. ही परिषद रंगून या राजधानी असलेल्या शहरातील एका सरोवराच्या काठावर असलेल्या 'युनियन क्लब'मध्ये भरली होती. या सांस्कृतिक परिषदेत 'भारतातील आधुनिक कला आणि सौंदर्य', 'आशियातील धर्मांची जीवनशक्ती', 'स्वातंत्र्याचे भविष्य', 'आपल्या संस्कृतीतील आधुनिक व परंपरागत मूल्ये', 'बुद्धिजीवी वर्ग व कम्युनिझम', 'आशियाचा आर्थिक विकास' यांसारख्या विषयांवर सर्वश्री प्राचार्य गोकाक, प्रा. गोवर्धन पारीख, डिकास्टा, ए. के. ब्रोही, मायकल पोल्यानी, प्रा. नाकामुरा, प्रा. ताकेयामा, अलिस जबाना, फिलिप स्प्रॅट प्रभृती मान्यवरांनी आपले प्रबंध सादर केले. यावर चर्चा झाली. या परिषदेत ठरावांपेक्षा चर्चेस व वैचारिक देवाण-घेवाणीस महत्त्व देण्यात आले होते. परिषदेत कम्युनिस्ट प्रतिनिधींना आमंत्रित केले नव्हते. कारण, वैचारिक स्वातंत्र्य कम्युनिस्ट मान्य करीत नाहीत. जगातील परंपरागत विद्यमान संस्कृती व त्यांचे वैचित्र्य (विविधता) मानवी प्रगतीस उपकारक असल्याने तिचे संवर्धन व संरक्षण झाले पाहिजे, या विचारावर परिषदेचा भर होता. आशिया खंडात असलेला हुकूमशाहीचा धोका परिषदेच्या चिंतेचा विषय होता. आकाशमार्गे आलेले प्रतिनिधी विचारप्रकाश घेऊन मायदेशी परतले.

८५) मास्को प्राच्यविद्या विशारद विश्व परिषद

प्राच्यविद्या विशारदांच्या विश्वपरिषदेचे २५ वे अधिवेशन ९ ते १६ ऑगस्ट, १९६० या काळात मास्को (रशिया) येथे पार पडले. या परिषदेस भारतातून जे ४० प्राच्यविद्या पंडित आमंत्रित केले गेले होते, त्यांपैकी एक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते. त्यांनी या परिषदेत 'संस्कार आणि यज्ञ यांची एकता' या विषयावर आपला प्रबंध वा शोधनिबंध सादर केला होता. मूळ निबंध संस्कृतमध्ये लिहिला होता. परंतु, परिषदेच्या रशियन, इंग्लिश, फ्रेंच व जर्मनी या चारच भाषा अधिकृत असल्याने तर्कतीर्थांनी आपल्या मूळ संस्कृत निबंधाचा सारांश इंग्रजीमध्ये प्रस्तुत केला होता. 'इंटरनॅशनल काँग्रेस ऑफ ओरिएंटॅलिस्ट' संस्थेची स्थापना १८७३ मध्ये पॅरिस (फ्रान्स)मध्ये झाली. गेल्या ८४ वर्षांत २५ परिषदा संपन्न झाल्या. या परिषदेचे निमंत्रण तर्कतीर्थांना फेब्रुवारी, १९६० च्या मध्यास मिळाले, तेव्हा आश्चर्य वाटले. कारण, ते अनपेक्षित होते. तर्कतीर्थांनी संपादित केलेल्या त्या काळापर्यंतच्या 'धर्मकोश'च्या ८ खंडांची नोंद घेऊन ते देण्यात आले होते. या परिषदेवर आधारित 'नवभारत' मासिकात तर्कतीर्थांनी ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर १९६० असे अलग तीन लेख लिहिले. तिसरा लेख अपूर्ण म्हणूनच प्रकाशित झाला; पण नंतर काही त्यांच्याकडून या परिषद वा प्रवासाचे वृत्त पूर्ण झाले नाही. पैकी पहिला लेख प्राच्यविद्या विशारद विश्वपरिषदेच्या आठवडाभराच्या कार्याचा वृत्तांत आहे. दुसरा व तिसरा 'मास्को दर्शन'ला समर्पित असल्याने ते लेख विशुद्ध प्रवास वर्णन होत.

प्राच्यविद्या म्हणजे पौर्वात्य संस्कृती व समाज यांतील गणित, व्याकरण, काव्य,

चिकित्सा यांचा प्रामुख्याने अभ्यास. याला भारतीय संदर्भात भारतविद्या, संस्कृतविद्या नावाने ओळखले जाते. ते प्राचीन कालसूचक म्हणून कला, इतिहास, साहित्य व संस्कृती विशेषज्ञ प्राच्यविद्या विशारद (Orientalist) म्हणून ओळखले जातात. पौर्वात्य जगाचा अभ्यास हे प्राच्यविद्येचे क्षेत्र पाश्चात्यविद्या विशारद (Occidental or Western) पश्चिमी जगाचे तज्ज्ञ होत.

या परिषदेपूर्वी सदर अधिवेशनाच्या प्रस्तुतता वा उद्देशांविषयी अनेकांनी साधक-बाधक लेख लिहिले होते. त्यांची चिकित्सा तर्कतीर्थांनी या लेखाच्या पूर्वार्धात केली आहे. लेखाचा उत्तरार्ध म्हणजे परिषदेचे इतिवृत्त वा वृत्तांत होय. ही परिषद मास्को विधानपीठाच्या ३३ मजली प्रासादसदृश इमारतीत संपन्न झाली. ही विद्यापीठाची तत्कालीन नवी वास्तू. या परिषदेस परदेशातील ६०० प्रतिनिधी, तर कम्युनिस्ट देशांतील १२०० प्रतिनिधी उपस्थित होते. परिषदेचं उद्घाटन उपप्रधानमंत्री मिकोयान यांनी केलं. परिषदेचे अध्यक्ष प्रो. गफुरॉव होते. विविध भाषिकांसाठी अधिकृत चार भाषांमध्ये भाषांतर ऐकण्याची स्वयंचलित सोय होती. सहजीवनाचा प्रयोग सोव्हिएत रशिया वैचारिक क्षेत्रातही या परिषदेच्या माध्यमातून करू पाहात होता. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात सोव्हिएत रशियाने प्राच्यविद्या क्षेत्रात मोठी प्रगती केली. ती जगापुढे मांडण्याचा मंच म्हणून रशियाने या परिषदेचा विधायक वापर केला. परिषदेस भारतातून डॉ. रा. ना. दांडेकर, सुनीतीकुमार चटर्जी यांना बोलावले, तसे डॉ. राव, धनंजयराव गाडगीळ, डॉ. चंद्रशेखर प्रभृती मान्यवरांना आमंत्रित करायला हवे होते, असा अभिप्राय तर्कतीर्थांनी लेखात व्यक्त केला आहे. एक विशेष गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे, रशियाने आपल्या देशात विविधभाषी नि विषयांचे विशेषज्ञ तयार कराण्याकडे मोठे लक्ष पुरविले आहे. ही त्यांची सांस्कृतिक प्रगती होय. परिषदेत अनेक देशांना केंद्र करून विषयांचे नियोजन करण्यात आल्याने ती परिषद खऱ्या अर्थाने वैश्विक ठरली. परिषदेत भारतविद्येचा दोन अंगांनी विचार करण्यात आला. १) इतिहास तत्त्वज्ञान, २) भाषाशास्त्र कला. त्याद्वारे विविध विषयांना स्पर्श केला गेला. यातून वैचारिक समग्रतेचे दर्शन झाले. काही रशियन तज्ज्ञांनी मार्क्सवादी विचार दृष्टिकोनातून केलेली मांडणी त्यांची वैचारिक प्रतिबद्धता वा बांधिलकी स्पष्ट करीत होती, त्यामुळे एकांगीपणा प्रगट होत होता. पुढील अधिवेशनासाठी चीन, अमेरिकेची मागणी डावलून भारताची निवड करण्यात आली खरी; पण भारतास त्यासाठी भरपूर तयारी व नियोजन करावे लागेल, हे या परिषदेच्या सर्वांगीण स्वरूपावरून लक्षात आले. तर्कतीर्थांचा हा विचार आत्मसमीक्षेचा जसा होता, तसा आत्मपरीक्षण व आत्मचिंतनाचाही!

८६) मास्को दर्शन : भाग १

सन १९६०च्या प्राच्यविद्या विशारद विश्वपरिषद, मास्को, रशियाचा वृत्तांत लिहिल्यानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'नवभारत' मासिकाच्या पुढच्या अंकात (नोव्हेंबर,

१९६०) लगेचच 'मास्को दर्शन' शीर्षकांतर्गत रशिया वारीचे प्रवासवर्णन सादर केले आहे. तो पूर्वार्ध असून, त्याच्या पुढच्या अंकात (डिसेंबर, १९६०) या प्रवासवर्णनाचा उत्तरार्ध पेश केला आहे. पूर्वार्धात मास्को विद्यापीठाचे वर्णन आहे, तर उत्तरार्धात रशियाचे.

पूर्वार्धातील लेखानुसार तर्कतीर्थांनी नमूद केले आहे की, ते पूर्वी मार्क्सवाद समर्थक होते. आता ते मार्क्सवादाचे टीकाकार झाले आहेत. कारण, लालक्रांतीबद्दलच्या त्यांच्या आशा विफल झाल्या आहेत. ते भारतातून रशियाला रशियन एरो फ्लोट कंपनीच्या विमानाने निघाले. निरोप द्यायला भारत सरकारचे अधिकारी आले होते. डॉ. रा. ना. दांडेकरांसह दिल्ली, हैद्राबाद, अलिगड, कलकत्ता, मद्रास येथील अरबी, फारसी, उर्दू, तमीळ, संस्कृत भाषांचे आणि पुरातत्त्वाचे पंडित सहप्रवासी होते. विमान प्रवासात त्यांनी हिमालय, पामीर पठार, हिंदकुशच्या रांगा, सपाट मैदाने, गिरिशिखरे यांचा मनमुराद आस्वाद घेतला. ताश्कंदला एक तास विश्रांती घेऊन आम्ही पुढे दोन-अडीच तासांनी मास्कोत पोहोचलो. दिल्ली ते मास्को सहा तासांचा प्रवास होता. मास्को विमानतळावर आमच्या स्वागतासाठी भारतीय दूतावास व प्राच्यविद्या विशारद विश्वपरिषदेचे प्रतिनिधी उपस्थित होते. बसने आम्ही मास्को शहराकडे प्रयाण केले. या प्रवासात रशियाचे जनजीवन व जीवनस्तर लक्षात आला. विमानतळापासून १२ मैल अंतरावरील लेनिन टेकडीजवळील मास्को विद्यापीठातील निवासस्थान मी वास्तव्यासाठी निवडले. अन्यांनी युक्रेन हॉटेल पसंत केले. मी विद्यापीठ हॉस्टेल पसंत केले ते तेथील परिसर अभ्यासता येईल म्हणून.

इथे मला भारतीय विद्यार्थी संशोधक भेटले नि माझी निवड सार्थ ठरली. विद्यार्थी वसतिगृह, भोजनगृह इ. सर्व सोयींनीयुक्त होते. इमारती प्रशस्त होत्या. परिसर निसर्गरम्य होता. परिषदेपूर्वी तीन दिवस अगोदरच पोहोचल्यामुळे रशिया पाहता आला. इथले भोजन सकस आहारी होते. मास्को शहरातील प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. मेट्रो प्रवास केला. तो अनुभव विषादकारक वास्तववादी होता, अशी नोंद तर्कतीर्थांनी येथे केली आहे. त्याचे विश्लेषण लेखात सविस्तर कण्यात आले आहे.

८७) मास्को दर्शन : भाग २

उत्तरार्ध लेखात मास्कोतील अकरा दिवसांच्या वास्तव्याचे विहंगमावलोकन व निरीक्षणे नोंदविली आहेत. त्यानुसार विद्यापीठ पाहत असताना लक्षात आले की, इथे विविध ज्ञान-विज्ञान शाखांचे अध्ययन-अध्यापन चालते. प्राचीन आणि प्रगत दोन्ही काळ, तंत्र, विकासाचा अभ्यास, संशोधन मास्को विद्यापीठात होते. विद्यापीठाचे अवलोकन करण्यास आठ तास अपुरे पडले तेव्हा तर्कतीर्थांना 'इन्साइड रशिया' पुस्तक आठवले. त्यात लिहिले होते की, मास्को विद्यापीठ इतके विस्तृत नि प्रशस्त आहे की, त्याचा अभ्यास करण्यास तीन महिनेपण पुरायचे नाहीत. विशेष म्हणजे इथे सर्वांना मोफत शिक्षण दिले जाते. मास्को शहरातील सार्वजनिक जीवन शिस्तीचे व शांततेचे आहे. इथल्या विद्यापीठात संशोधन

स्तरावर शिक्षक : विद्यार्थी प्रमाण १:१२ असे असून, अध्यापन स्तरावर ते १:१६ असे आहे. शालांत परीक्षेस ६५% गुण धारण करणारे विद्यार्थीच उच्च शिक्षणास पात्र होतात. अन्यांना अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा लागतो. त्यामुळे इथे 'सब बारा टक्के' असा आपल्याकडचा शिरस्ता नाही. इथे लायकांची लायकी वाया जात नाही. विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षणास इथे प्राधान्य आहे. शिक्षणाच्या सर्व स्तरांवर कम्युनिस्ट पक्ष इतिहास व मार्क्सलेनिनवाद अनिवार्यपणे शिकविला जातो. त्याची पुनरावृत्ती कंटाळा आणणारी असते, असे विद्यार्थ्यांचे मत आहे. रशियन भाषा अन्य रशियन भाषांपेक्षा (अबाझा, अल्ताई, बुर्यात, क्रिमेन, इंगुश, काल्मिक, मारी इ.) विकसित व बहुप्रचारित असून, ती राजभाषा आहे. भाषा, साहित्य क्षेत्रातील प्रगती नेत्रदीपक आहे. वृत्तपत्रसृष्टी नियंत्रित व एकारलेली, सरकार समर्थक आहे. विचारस्वातंत्र्य मर्यादित आहे. माध्यमे नियंत्रित आहेत. गुप्तता आहे. स्त्रिया सर्वत्र आहेत. त्यांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य दिसले. परंतु, विद्यापीठ स्तरावर स्त्री-पुरुष भेद 'सनातन धर्म की जय' सिद्ध करणारा आहे.

पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशा या दोन्ही लेखांमधून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी राशियाच्या समाज, साहित्य, भाषा, शिक्षण, संशोधन, प्रगती, वृत्तपत्रसृष्टी, माध्यमे, वाहतूक, दळणवळण सोयी इ.द्वारे रशियाची प्रगती व मर्यादा अशी तटस्थ निरीक्षणे नोंदवून आपल्या लेखणीची तटस्थता सिद्ध केली आहे.

८८) रशियातील सर्वधर्म परिषद

रशियातील मास्कोपासून ८० किलोमीटर दूर असलेल्या झागोर्स्क शहरात १ ते ४ जुलै, १९६९ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या उद्देशाने सर्वधर्म विश्व परिषद संपन्न झाली. तिला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना धर्मकोश संपादक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. ही तर्कतीर्थांची दुसरी रशिया वारी होती. दैनिक 'महाराष्ट्र टाइम्स'च्या २० जुलै, १९६९ च्या अंकात तर्कतीर्थांनी या परिषदेचा वृत्तांत लिहिला आहे.

सदर परिषदेस जगातील विविध देशांतील १८१ प्रतिनिधी उपस्थित सेते. जगातील विविध धर्मांच्या ११८ प्रमुखांचा यात समावेश होता. भारतातून विविध धर्मांच्या प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले होते. त्यात २ हिंदू, ३ ख्रिश्चन, १ बौद्ध, १ जैन, १ मुस्लीमधर्मीय पंडितांचा अंतर्भाव होता. या सर्व जागतिक प्रतिनिधींना परिषदेतील चर्चेत सहभागी करून घेण्यात आले. मात्र, त्यांना मतदानाचा अधिकार नव्हता. सर्वधर्म प्रतिनिधींची आंतरराष्ट्रीय राजकीय परिषद असं या परिषदेचं स्वरूप होतं. परिषदेचे जे पुढील निषय निश्चित करण्यात आले होते, त्यातून ते पुरेसे स्पष्ट होत होते. १) व्हिएतनाम व आशियाई देशांचे प्रश्न, २) युरोपच्या संरक्षणाचा प्रश्न, ३) मध्यपूर्वेतील विग्रह, ४) वसाहतवाद व नववसाहतवाद, ५) निरनिराळ्या राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये सहकार्य व शांतता निर्माण कराण्याच्या उद्देशाने निरनिराळ्या धर्मांचे संयुक्त प्रयत्न घडवून आणण्याकरिता आवश्यक असलेली पार्श्वभूमी, कृती व

संभवनीयता. या परिषदेत अगोदरच निश्चित करण्यात आलेल्या पाच ठरावांवरून वरील उद्देशांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. रशियाच्या राजकीय धोरणांना धर्मीय पाठिंबा असं या परिषदेचं स्वरूप होतं. अमेरिकन साम्राज्यवादास शह व रशियन सत्ता विस्तारास समर्थन असं परिषदेचं सूत्र होतं. परिषदेत विविध धर्मप्रतिनिधींनी आपले विचार मांडले. तर्कतीर्थांनी इंग्रजीत केलेल्या भाषणात विशिष्ट वाद, विचार आग्रहार्थ सशस्त्र युद्धाचा पुरस्कार निषिद्ध असून, महात्मा गांधींचा अहिंसक मार्गच त्यावरचा अंतिम उपाय होय. युद्धाचा शेवट युद्धाने कधीच होत नाही, हे स्पष्ट केले. धर्मसंस्था व धार्मिक जनता यांचा आंतरराष्ट्रीय शांततेच्या राजकारणात उपयोग करून घ्यायचा सोव्हिएत रशियाचा मनसुबा लपून राहिला नव्हता.

८९) आमची अमेरिकेची यात्रा (दैनंदिनी) भाग १

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आपले अमेरिकास्थित ज्येष्ठ चिरंजीव मधुकर जोशी यांच्या निमंत्रणावरून ६ जून ते २१ जुलै, १९७७ या कालावधीसाठी अमेरिका दौऱ्यावर गेले होते. निमित्त होतं मधुकर जोशी यांचे चिरंजीव राम आणि विजय यांच्या स्कूल ग्रॅज्युएशन समारंभास (पदविका वितरण) उपस्थित राहणं. त्यासाठी परतीच्या तिकिटांसह आई-बाबांना (तर्कतीर्थ व सौ. सत्यवती) हे आमंत्रण होतं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९६४, १९७७, १९८३, १९८६, १९९२, १९९३ असा सहा वेळा वेगवेगळ्या कारणांसाठी अमेरिकेचा प्रवास केलेला होता. पैकी १९७७ च्या अमेरिका यात्रेच्या काळात त्यांनी दैनंदिनी लिहिली होती. त्याआधारे हे प्रवास वर्णन 'आमची अमेरिकेची यात्रा' तर्कतीर्थांनी लिहिली. ते 'नवभारत' मासिकाच्या ऑक्टोबर, १९७७, नोव्हेंबर, १९७७, जानेवारी-फेब्रुवारी, १९७८ आणि एप्रिल, १९७८ अशा चार अंकांमध्ये क्रमश: प्रसिद्ध झाले होते. हे विशुद्ध प्रवासवर्णन असून, ते दैनंदिनीतील नोंदींच्या रूपात/ शैलीत लिहिले गेले आहे. त्यात प्रवासाची तयारी, प्रत्यक्ष प्रवास, अमेरिका दर्शन, तेथील कुटुंब, समाजव्यवस्था, राहणीमान, कुटुंब संबंध, शिक्षण, निसर्ग, दळणवळण व्यवस्था, पदवीदान समारंभ, धर्मस्थिती व संकल्पना, पालक-पाल्य संबंध, स्वातंत्र्य व स्वावलंबन, तेथील वैवाहिक जीवन, मुक्त कामसंबंध, लोकशाही : भारतीय व अमेरिकेतील अशा अनेक गोष्टींवर तर्कतीर्थांनी आपली मते व निरीक्षणे नोंदविली आहेत. त्यातून १९७७ चे अमेरिकी जीवन वाचकांच्या नजरेसमोर उभे राहते.

मे, १९७७ मध्ये तर्कतीर्थांना मधुकर या आपल्या ज्येष्ठ चिरंजीवाकडून त्यांच्या राम नि विजय या मुलांच्या स्कूल ग्रॅज्युएशन समारंभास उपस्थित राहण्याचे सपत्नीक आमंत्रण तेही परतीच्या तिकिटांसह मिळाले. निमंत्रण मिळताच त्यांनी व्हिसा मिळविला. जायची तयारी केली व दि. ८ जून १९७७ रोजी पहाटे अमेरिकेस प्रयाण केले.

न्यूयॉर्क विमानतळावर कुटुंबीयांनी तर्कतीर्थ दाम्पत्याचे स्वागत केले. मुलगी-जावयाकडे

एक दिवस फिशकिलला राहून पाहुणचार घेऊन तर्कतीर्थ मधुकरच्या घरी एसेक्सजंक्शन (बर्लिटन) व्हर्मांट राज्यात स्थिरावले. घर प्रशस्त सर्व सोयींनीयुक्त होते. त्यावरून अमेरिकी समृद्धी लक्षात येत होती. सायंकाळी सर्वांनी पदवीदान समारंभास उपस्थिती लावली. हे समारंभ आपल्या पदवीदान समारंभसारखेच असतात. नंतरच्या काळात तर्कतीर्थांनी सहपरिवार विविध प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. येथील वृत्तपत्रांमधून भारतीय बातम्या अपवादाने येतात. युरोपीय बातम्यांना प्राधान्य असते. माझे स्वीय सचिव राम कोल्हटकर यांच्याकडून येणारी पत्रे, तारा हेच भारतीय हालहवाला कळावयाचे साधन होते. तेथील वृत्तपत्रांतील वृत्तांतांमधून अमेरिकेच्या विकास योजना, विविध क्षेत्रांमधील अत्याधुनिक संशोधन कळत होते. त्यातून भारत-अमेरिकेतील विकास, गती, समाज, राजकारण, लोकशाहीतील अंतर लक्षात येत होते. विशेषतः खनिज तेल विकास प्रकल्प, वैद्यकीय संशोधन, कुटुंब नियोजन, कामजीवन, समलिंगी संबंध अशांची आंदोलने, हक्काचे लढे लेख वाचून नवे विश्व समोर येत होते. तेथील मद्यपान, व्यसनींचे प्रश्न अतिगुंग करणारे होते.

या काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे श्री. पद्माकर गंगातीरकर यांनी 'इंडिया क्लब'मध्ये योजलेले 'भारतीय लोकशाहीचे भवितव्य' या विषयावर इंग्रजीत भाषण झाले. या भाषणात तर्कतीर्थांनी भारतातील सध्याची आणीबाणीची स्थिती विशद केली व आपण तिच्या तत्त्वतः विरोधी असल्याचे दाखले दिले. या काळात वेळ मिळेल तसे तर्कतीर्थांचे वाचन, लेखन अव्याहत होते. हे दैनंदिनीतील व प्रवासातील विविध नोंदींतून स्पष्ट होते. या काळात त्यांचे सहपरिवार विविध मित्र, स्नेही, परिचितांकडे जाणे-येणे, स्नेहभोजन, आमंत्रणे नित्याचीच होती. गप्पा-चर्चांमधून तर्कतीर्थ अमेरिकास्थित भारतीयांना भारतीय साहित्य, संस्कृती, संस्कार, शंका-समाधान, प्रश्न इ.च्या अनुषंगाने मार्गदर्शन करीत व त्यांच्याकडून तेथील प्रश्नांसंबंधी आपल्या शंकांचे निरसन करून घेत असत. यातून अमेरिकेत जाणे व तेथील संस्कृतीशी जुळवून घेण्यात, कुटुंब वाढविण्यात, विशेषत: मुलांच्या संगोपनासंबंधी दोन संस्कृतींतील अंतर जळवून घेण्यात भारतीयांना, विशेषतः स्त्रियांना करावी लागणारी तारेवरची कसरत तर्कतीर्थांना आणि सौ. सत्यवती जोशी यांना विचारात टाकणारी ठरत असे. तिथे धर्माचरणासंदर्भात हिंदू धर्म प्रचार, प्रसाराला आलेले व्यापारी रूप चिंताजनक होते. तथापि, काही धर्मपंडित, अभ्यासक (त्यात मूळ अमेरिकी, युरोपियन्स) हे योगी अरविंद, गौडपाद, महात्मा गांधी यांच्याइतक्या गांभीर्याने आजही धर्माकडे पहात असून, पठन, पाठन, चिंतन तितक्याच जबाबदारीने व डॉ. एस. राधाकृष्णन यांच्या व्यासंगी परंपरेने करीत आहेत. ही आनंद व अभिमानाची मानाची गोष्ट असल्याचे या प्रवासवर्णनात नोंदविण्यास तर्कतीर्थ विसरत नाहीत. आपली पत्नी अपरिग्रही असून, तिने केलेल्या काटकसरी संसारामुळे मुलांना हे वैभव आले, याचे कृतज्ञ स्मरण तर्कतीर्थ या लेखात प्रसंगानुरूप करीत हे प्रवासवर्णन हृद्य बनवितात.

येथील उच्च शिक्षण ज्या हार्वर्ड, येल, प्रिन्स्टन इ. विद्यापीठांमधून दिले जाते, तिथे ते खर्चिक असले तरी गरीब विद्यार्थ्यांना मोफतच असते, हे विशेष. मधुकर पती-पत्नी मुलांना स्वातंत्र्य देऊन वाढवत असल्याची महत्त्वाची नोंद लेखाच्या शेवटी आहे.

९०) आमची अमेरिकेची यात्रा (दैनंदिनी) भाग २

जून २४ ते ३०, १९७७ या काळातील तर्कतीर्थांच्या वास्तव्य आणि विहाराच्या नोंदी या भागातील दैनंदिनी व प्रवासवर्णनात आहेत. या भागाचा प्रारंभ मुलांच्या ग्रॅज्युएशननिमित्त तर्कतीर्थ पुत्र मधुकरने आप्त-स्वकीय, मित्रमंडळींसाठी योजलेल्या कॉकटेल पार्टीचा वृत्तांत आहे. ४०-४५ जणांचे हे स्नेहमिलन. सामीष-निरामीष भोजन, पेयपान, गप्पा असा पार्टीचा थाट-बाज. चर्चेत नवी पिढी ख्रिश्चन-हिंदू अशी मिश्र संस्कृतीत संकरित होत असल्याचे लक्षात येते. आपल्या मुलांवर भारतीय संस्कार करणे व टिकविण्याचा प्रश्न आणि आव्हान सर्वांपुढे आहे. ''सर्वधर्मसमभाव आदर्श तत्त्व म्हणून ठीक आहे; पण सर्वधर्मीयांना ते समानपणे मान्य असेल, तरच नव्या यांत्रिक युगात जागतिक एकात्मक मानवी समाज निर्माण होणार'' हे तर्कतीर्थांचे या लेखातील मत विचारणीय ठरते. हिंदूधर्मीय सामान्य जाती-पोटजातीत विभागला असल्याने तो संकुचित कोंडीत अडकला गेला आहे. यामुळे युरोप-अमेरिकेसारख्या संपूर्ण वेगळ्या जगात परका ठरतो. ख्रिश्चन धर्म संस्कृती व हिंदू धर्म संस्कृती यांत पूर्व-पश्चिम अंतर पूर्वापार आहे. ते वर्तमानात असले तरी दरी अरूंद होत आहे. दोन्ही समाज जग जवळ येत असल्याने आदानप्रदानाने संमिश्र होत आहेत. प्रत्येक देशीय, धर्मीय आपापल्या परंपरा जपण्याचा प्रयत्न करीत आहे, ही समाधानाची गोष्ट होय.

२६ जूनला परत फिशकलची सफर झाली. धर्मशास्त्र वाचन, चिंतन झाले. येथील वृत्तपत्रात वॉटरगेट प्रकरण अजून येतच आहे. निक्सन उच्च नैतिक मूल्यांना पायदळी तुडविणारे, तर कार्टर शुद्ध ध्येयवादी. ध्येयाबरोबर प्रत्यक्ष व्यवहार किती यशस्वीपणे पार पाडता येतो, ही कसोटी येथील नागरिक राष्ट्रपतींना लावत असतात. येथील लोकशाहीस चारशे वर्षांची समृद्ध परंपरा आहे. तिकडे आपल्याकडे अख्ख्या घटना दुरुस्तीला तिलांजली मिळण्यावरच भारताच्या नागरिकांची गुलामी की स्वतंत्रता यांचा निर्णय अवलंबून असल्याचे मत तर्कतीर्थ नोंदवितात. या प्रवासवर्णन नि दैनंदिनीतील नोंदींतून भारत-अमेरिका तुलना अनिवार्यपणे आंदोलित होत राहते.

अमेरिकेतील ६% नागरिक बेकार भत्त्यावर गुजराण करतात. काळा-गोरा भेद आहे. मानवी हक्कांचा पुरस्कार येथे असला तरी विषमता आहे. अमेरिकेचं समाजजीवन, संस्कृती व प्रश्न भारतापेक्षा वेगळे आहेत. स्वातंत्र्य व स्वैराचाराच्या सीमारेषा पुसट होत जाण्याची समस्या आहे. योग, हरे कृष्ण संप्रदाय इ.चे इथे पसरलेले लोण भारतापेक्षा भिन्न आहे. येथील संस्कृती आविष्कारप्रधान (Expressive) आहे. व्यक्तिपूजा इथेही आहे.

९१) आमची अमेरिकेची यात्रा (दैनंदिनी) भाग ३

२ जुलै ते १३ जुलै, १९७७ या कालखंडातील अमेरिका प्रवास, पर्यटन, भेटीगाठी इ. नोंदी या भागात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रस्तुत केल्या आहेत. यात स्टॅच्यू ऑफ लिबर्टी भेट, वॉशिंग्टन, जफर्सन, लिंकन स्मारके, श्री भारती स्वामी भेट, नायगरा धबधबा, लाँगवुड गार्डन फेरफटका इ. गोष्टींचे वर्णन या भागात आहे. अमेरिकेने न्यूट्रॉन बाँब बनविल्याच्या अनुषंगाने भारताची अणुसज्जता या विषयावरची या भागातील चर्चा महत्त्वाची आहे. अणुबाँब ही भारताची गरज आहे की नाही, यापेक्षा भारताची आर्थिक स्थिती पाहता विकासाचे कोणते प्रश्न प्राधान्याचे, याचाही विचार महत्त्वाचा, हे तर्कतीर्थांचे मत अंतर्मुख होण्यास भाग पाडते. मोरारजीभाई देसाईंचे याबाबतचे धोरण अधिक मुत्सद्दीपणाचे दिसते, हा अभिप्रायही महत्त्वाचा वाटतो. अमेरिकेचा बाँब माणसे मारतो; पण भौतिक संपत्तीचे रक्षण करतो, हा अमेरिकनांचा युक्तिवाद भांडवलशाही समर्थक म्हटला पाहिजे. येथे पर्यटनसमृद्धी ही संपत्तीत भर घालणारी ठरते. हे संपन्नतेमुळेच शक्य आहे. भारताचे विकासाचे प्राधान्यक्रमच भिन्न आहेत.

९२) आमची अमेरिकेची यात्रा (दैनंदिनी) भाग ४

१४ ते २० जुलै, १९७७ या अमेरिका दौऱ्यातील भारत प्रयाणपूर्व शेवटच्या आठवड्यातील प्रवासवृत्त या भागात आहे. मराठी विश्वकोशाच्या पहिल्या ५ खंडांच्या प्रकाशनाचा कार्यक्रम ठरल्याने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना नियोजित दौऱ्यापूर्वी पंधरा दिवस अगोदरच मायदेशी परतावे लागले. त्यामुळे धावपळ झाली. कार्यक्रमात बदल करून दौरा आटोपता घ्यावा लागला.

पूर्वपरिचित प्राच्यविशारद डॉ. एंगोल्सना भेटण्याची तर्कतीर्थांची इच्छा होती; पण हा एकेकाळचा सरस्वतीपुत्र आज लक्ष्मीपुत्र होऊन लक्ष्मी आराधनेत व्यस्त झाल्याचे ऐकून तर्कतीर्थांना विषाद व आश्चर्य वाटणे स्वाभाविक होते; पण हाही अमेरिकन संस्कृतीचा एक सांस्कृतिक धक्का वा झटकाच (Cultural Shock) म्हणायचा; पण दुसरीकडे इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठातील 'स्पॅल्डिंग चेअर'वर स्नेही डॉ. मतिलाल यांची नियुक्ती झाल्याचे ऐकून आनंद वाटला. या अध्यासनावर पूर्वी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन विराजमान होते.

तिथल्या पोलिसांची तत्परता तर्कतीर्थांना घरातील चिमुरडीच्या हरविण्यातून लक्षात आली. 'कर्मण्येवाधिकारस्ते' श्लोकाचे विश्लेषण जे या लेखात तर्कतीर्थ करतात, ते वाचले की त्यांच्या तर्कतीर्थ असण्याची खात्री पटते. तर्कतीर्थ आपल्या सुदृढतेचे व दीर्घायुष्याचे रहस्य इथे समाजावतात. बालपण हलाखीत गेलं तरी जीवनाला शास्त्रोक्त परिपाठ व शिस्तीची बैठक होती. सकस आहार, व्यायाम, नियमितता, योग, पोहणे, वाचन, चिंतन, मनन यांत संघर्षशीलतेतही संयमी जीवन जगता आले, हे तर्कतीर्थांनी आवर्जून नमूद केले आहे.

दि. २२ जुलै, १९७७ रोजी तर्कतीर्थ स्वकीयांचा निरोप घेऊन सपत्नीक भारतात सुखरूप परतले. सुमारे दीड महिन्याच्या वास्तव्य काळातील हे प्रवासवर्णन तर्कतीर्थांच्या अन्य लेखनाप्रमाणे इथेही विविध प्रश्नांसंबंधी तर्कतीर्थांची मते, दृष्टिकोन समजून घेण्याच्या दृष्टीने अमेरिका-भारत तुलनात्मक फरक वाचकांस नवं जग दाखवीत राहतो. प्रवासवर्णन केवळ देशाटन वर्णन असत नाही; ते सभा, संचार, मैत्री-संवादाने माणसाच्या जाणिवा प्रगल्भ नि विकसित करीत असतं. प्रवासवर्णन केवळ पर्यटन नसतं, ते असतं अंतर्मुख करायला भाग पाडणारं नव जग-जीवन!

प्रवासवर्णनपर मीमांसा

यापूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी दहा-बारा वेळा विदेशात जाऊन आले. ब्रह्मदेश, रशिया, फ्रान्स, अमेरिका इ. देशांना त्यांनी भेटी दिल्या असल्या तरी ब्रह्मदेश, रशिया नि अमेरिका दौऱ्यांचेच वृत्तांत व वर्णने त्यांनी लिहिली.

पैकी रंगून येथील सांस्कृतिक परिषदेचा जो वृत्तांत आहे, त्यात हे स्पष्ट केले गेले आहे की, या परिषदेत ठरावांऐवजी चर्चा नि मतांच्या देवाण-घेवाणीस अधिक महत्त्व होते. बऱ्याचदा अशा परिषदा या औपचारिकतेत गुंतून पडतात. 'सूप वाजले', 'संपन्न झाली' हीच अशा परिषदेची फलश्रुती मानली जाते. या पार्श्वभूमीवर रंगून परिषद चर्चा महत्त्वाची ठरते. या परिषदेत आशियाई देशांच्या आर्थिक विकासावर विचार करण्यात आली. 'ईस्टर्न इकॉनॉमिक्स' दिल्ली साप्ताहिकाचे संपादक डी कास्टा यांनी प्रतिपादन केले की, आशिया खंडातील राष्ट्रे जपान वगळता आर्थिकदृष्ट्या मागासलेली आहेत. त्यांनी आपले आर्थिक नियोजन केल्याशिवाय औद्योगिक प्रगती होणार नाही. त्यांचे दैन्य आणि उपासमार दूर करण्याचा दुसरा उपाय नाही. आशियाई राष्ट्रांचे नियोजन परस्परावलंबी व परस्परपूरक असले पाहिजे, आशियाई राष्ट्रांपुढे असलेल्या हुकूमशाहीची चर्चा परिषदेत करण्यात आली. हिंदुस्थानातील जातिसंस्था ही व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाहीमूल्ये तिथे रुजू देणार नाहीत, असेही मत व्यक्त करण्यात आले. आशियातील राष्ट्रांमधील रूढीप्रियता, अंधश्रद्धा व पारलौकिक विचारसरणीची परंपरा लोकशाही संस्कृतीला व ऐहिक प्रगतीला बाधक असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. सन १९५५ साली तत्कालीन बुद्धिजीवी समाजचिंतकांनी व्यक्त केलेल्या विचारांवर आपण गेल्या सुमारे ६५ वर्षांत विचार केला असता, तर आजची आशियाई राष्ट्रांची दुरवस्था दूर होण्यास मदत झाली असती.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९६० व १९६९ साली रशियाचे दौरे केले. पहिला दौरा प्राच्यविशारद विश्वपरिषदेच्या निमित्ताने होता, तर सुमारे दशकानंतरचा प्रवासदौरा जागतिक धर्मपरिषदेच्या निमित्ताने होता. पहिली परिषद वैचारिक, दुसरी धार्मिक असली, तरी तिचा उद्देश राजकीय होता. पहिली प्राच्यविद्या विशारद परिषदेने जगाचे लक्ष सोविएत रशियाने दुसऱ्या महायुद्धानंतर प्राच्यविद्या शास्त्रांमध्ये केलेल्या प्रगतीकडे वेधले.

दुसरे असे की, या परिषदेने प्राच्यविद्या अभ्यासाची दिशा बदलली. आजवर प्राच्यविद्या विशारद मध्ययुगातील वा प्राचीन युगातील प्राच्यसंस्कृतीच्या विविध अंगांचा बारीक (सूक्ष्म), तपशीलवार परामर्श घेत असत. या परिषदेने प्राच्य राष्ट्रांच्या वर्तमानकाळातील आर्थिक, सामाजिक, साहित्यिक, भाषिक, कला, तंत्रविषयक घडामोडी व परिवर्तन यांचा ऊहापोह केला.

'मास्को दर्शन' (पूर्वार्ध व उत्तरार्ध) लेख मास्कोच्या भौतिक प्रगतीची चर्चा करणारे असले, तरी त्या निरीक्षणातून रशियाचे सामाजिक, राजकीय, आर्थिक वास्तव आणि व्यक्तिस्वातंत्र्यविषयक वस्तुस्थिती लपून राहिलेली नाही.

सन १९६९ च्या रशियातील सर्वधर्म परिषदेत तर्कतीर्थांनी केलेल्या भाषणाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आजही तितकीच प्रस्तुत ठरते. ती अशासाठी की, गेल्या पन्नास वर्षांतील रशिया-अमेरिका महासत्तांचा साम्राज्यसंघर्ष थांबलेला नाही. या काळात अफगाण (२००१), लेबानन (१९८२), ग्रेनडा (१९८३), पनामा (१९८९), गल्फ (१९९१), सोमालिया (१९९३), हैती (१९९४), बोस्निया (१९९५), कोसोवो (१९९९), इराक (२००३ ते २०१०), लिबिया (२०११), सीरिया २०१२-२०१९) ही युद्धशृंखला लक्षात घेतली की, तर्कतीर्थांच्या भाषणाचे महत्त्व अधोरेखित होते. या लेखात ते सुज्ञ वाचकांनी आवर्जून वाचावे. त्याकडे लक्ष वेधण्यासाठी या खंडाच्या मलपृष्ठावर ते अंकित आहे

'आमची अमेरिकेची यात्रा' (भाग १ ते ४)मध्ये अमेरिकेतील पर्यटनस्थळांची माहिती जशी आहे, तशीच तेथील सांस्कृतिक प्रश्न, समस्यांची चर्चा आहे. ही चर्चा सांस्कृतिक तुलना, संघर्ष व संकरातून निर्माण होणाऱ्या नवसंस्कृतीकडे आपणा सर्वांचे लक्ष वेधते. आशियातील सांस्कृतिक वैविध्याचा एकेरी संस्कृतीकडे होणारा प्रवास वा वाटचाल (Multyculture to Monoculture) जितका चिंतनीय तितकाच अमेरिका - रशियातील सत्तासंघर्ष. तिथे लोकशाही विरुद्ध हुकूमशाही, व्यक्तिस्वातंत्र्य विरुद्ध साम्राज्यवाद संघर्ष ऐरणीवर आहे. तर्कतीर्थ या सर्व प्रश्नांकडे या सर्व वृत्तांतांतून व प्रवासवर्णनांतून आपले लक्ष वेधतात. हे प्रश्न प्रासंगिक असले तरी भविष्यलक्ष्यी जगाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याने विचारणीय ठरतात.

फ) भाषांतरित लेख

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे जे भाषांतरित लेख आहेत, ते सर्व रॉयवाद, नवमानवतावाद, रशियन क्रांती, विज्ञानसंबंधित आहे. त्यांचा काळ १९४७ ते १९६७ असा दोन दशकांचा आहे. मानवेंद्रनाथ यांनी १९४८ साली क्रांतीद्वारे परिवर्तनाचा विचार सोडून मानवतावादाद्वारे परिवर्तनाचा विचार स्वीकारला. १९४८ च्या डिसेंबरमध्ये कलकत्ता येथे झालेल्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीच्या अधिवेशनात मानवेंद्रनाथ रॉय आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रॉयवादास (क्रांतिविचारास) तिलांजली देऊन नवमानवतावाद (परिवर्तन विचार)

अंगीकारला. भारतीय जनमानस क्रांतीस अनुकूल नाही, याची प्रचिती रॉयवाद्यांनी लढविलेल्या निवडणुकीतून आली होती. रॉयवाद हा भारतात बुद्धिजीवी वर्गासाठी आकर्षक वाटला, तसा तो सर्वसामान्यांना साद घालू शकला नाही. म्हणून हिंसा, क्रांती तत्त्वे सोडून अहिंसा, परिवर्तन, मानवतावाद यांचा अंगीकार म्हणजे काँग्रेस आणि गांधीवादाची, त्यांच्या मार्गाची स्वीकृती ठरते. नवमानवतावाद दुसरा-तिसरा नवा विचार नसून, मार्क्सवादातील दोष वजा करून अंगीकारलेला समाजवादच होय, हे नवमानवतावादाची २२ सूत्रे वाचली की लक्षात येण्यास वेळ लागत नाही. ही सूत्रे सन १९४८ मध्ये मान्य केली असली, तरी त्याचा विचार १९४५ पासून सुरू होतो. तर्कतीर्थांनी 'रोहिणी' नियतकालिकाच्या १ ऑगस्ट, १९४७ मध्ये प्रकाशित केलेल्या या मूळ इंग्रजी २२ सूत्रांच्या भाषांतरावरून पुरेसे स्पष्ट होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जे तात्त्विक लेख भाषांतरित केले आहेत, ते निसिम ईझेकील, बर्नर हाइसेनबर्ग, मानवेंद्रनाथ रॉय, फिलिप स्प्रॅट, प्रा. मायकेल पोलॅनी यांचे आहेत. ते इंग्रजीतून मराठीत भाषांतरित केले आहेत. अधिकांश 'नवभारत' मासिकातून प्रसिद्ध झाले आहेत. जी भाषांतरे या मासिकात प्रकाशित आहेत, त्यांपैकी काहींवर भाषांतरकार म्हणून तर्कतीर्थांचे नाव नाही; पण अनुक्रमणिकेत भाषांतरकार म्हणून तर्कतीर्थांचा स्पष्ट निर्देश आहे. ही भाषांतरे मराठी वाचकांना देशी-विदेशी मान्यवरांचे इंग्रजीतील उच्च विचार अवगत करून देण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहेत, जुने विचार मराठीत रुजविणे हा त्यामागचा हेतू स्पष्ट आहे.

भाषांतर म्हणजे एका भाषेतील आशय, भाव विचार दुसऱ्या भाषेत पोहोचविणे. भाषांतरकार हे काम विविध प्रक्रियांतून तडीस नेत असतो. तर्कतीर्थांनी ज्या पद्धतीचे वैचारिक लेख इंग्रजीतून भाषांतरित केलेत, ते पाहता मूळ इंग्रजी लेख हे विचारप्रचुर होत. त्यांत विविध सिद्धांत आहेत, तशीच वैचारिक सूत्रे आहेत. ती सर्व मराठीत जशीच्या तशी भाषांतरित करणे आव्हान होते. तर्कतीर्थ हे संस्कृत, मराठी, इंग्रजी, हिंदी या भाषांचे जाणकार होत. त्यामुळे शब्दश: भाषांतरापेक्षा आशयानुवर्ती भाषांतराची पद्धती ते अंगीकारतात. भाषांतराच्या या प्रक्रियेस संभाव्य भाषांतर (Translitration) मानले जाते. ही पद्धत इतिहास लेखनातील 'संभाव्य सत्यलेखन शैली'शी साम्य राखणारी असते. जिथे प्रमाण नसते वा शब्दप्रामाण्य पाळणे अवघड असते, अशा ठिकाणी भाषांतरकार स्रोत भाषेतील आशय लक्ष्य भाषेत आणताना लक्ष्य भाषेतील वाचनपरंपरा प्रमाण मानत भाषांतर करीत असतो.

निसिम ईझेकील भारतीय ज्यू लेखक, तर बर्नर हाईझेनबर्ग जर्मन. मानवेंद्रनाथ भारतीय, तर फिलिप स्प्रॅट ब्रिटिश. तिकडे मायकेल पोलॅनी हंगेरियन; पण सर्व इंग्रजी लिहीत असले तरी सर्वांच्या इंग्रजीला एतद्देशीय वा स्वदेशीय भाषिक प्रभावाचा स्पर्श अटळ. मग इतक्या देशवैविध्यांची इंग्रजी भाषा, या मराठीप्रवण भाषेत तो सारा आशय उतरविणे खायचे काम

नव्हते; पण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे मूलत: भाषाशास्त्री होते, हे त्यांच्या विविध भाषांवरील अधिकारांतून स्पष्ट होते.

वैचारिक वा तत्त्वज्ञानविषयक लेख हे संज्ञा नि सिद्धांतावर आधारित असतात. तर्क हे त्यांचे आशय क्षितिज होय. शून्यात जाऊन विचार करण्याची बुद्धिजीवींची पद्धती विश्वविख्यात आहे. सुदैवाने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे मूळ लेखकांच्या प्रज्ञापंक्तीतील विद्वान असल्यामुळेच ते विविध शैलीत लिहिलेल्या लेखांचे भाषांतर मराठीत लीलया करू शकले. हे सर्व संस्कृती, आंतरराष्ट्रीय सद्भावना, नवमानवतावाद, राजकारण, मार्क्सवाद भारतीय नवजीवन चळवळ (Indian Renaissance)सारख्या गहन विषयावर आधारित असल्याने त्यांच्या भाषांतराविषयीच्या वाचक अपेक्षाही तितक्याच उंचीच्या असणे वा बाळगणे गैर नाही.

९३) नवमानवतावादाची बावीस सूत्रे - मानवेंद्रनाथ रॉय

'रोहिणी' नियतकालिकाच्या १ ऑगस्ट, १९४७ च्या अंकात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी'च्या सन १९४६च्या वार्षिक अधिवेशनात 'नवमानवतावाद' अधिकृतपणे स्वीकारला गेला. तो जनसामान्यांना कळावा म्हणून त्याच्या मूळ बावीस सूत्रांचे भाषांतर तर्कतीर्थांनी केले. 'नवमानवतावादाची बावीस सूत्रे' हे शीर्षकच या भाषांतरित लेखास अधिक समर्पक वाटते. सन १९५४ च्या एप्रिलमध्ये 'नवभारत' मासिकाने 'मानवेंद्रनाथ रॉय विशेषांक' त्यांच्या मृत्यूनंतर (२५ जानेवारी, १९५४) लगेचच प्रकाशित केला होता. यात या लेखाचे पुनर्मुद्रण असून, त्याचे शीर्षक 'नवमानवतावादाची बावीस सूत्रे' असेच आहे.

तर्कतीर्थांनी मूळ इंग्रजी 'Principles of Radical Democracy 22 Theses'चे जे मराठी भाषांतर केले, त्याचे सार सांगायचे झाले तर म्हणता येईल की, मानव समाजव्यवस्थेचा मूळ आदर्श आहे. स्वातंत्र्याची अन्वेषणा आणि सत्याचा शोध ही मानवी प्रगतीची पायाभूत प्रमेये होत. सर्व मानवी प्रयत्नांचा हेतू स्वातंत्र्यप्राप्ती हाच असतो. मनुष्य स्वभावतः बुद्धिजीवी प्राणी आहे. इतिहासाची आर्थिक उपपत्ती भौतिकवादाच्या चुकीच्या आधारावर केली गेली. त्यामुळे अनुभवाधारे त्यात सुधारणेची आवश्यकता आहे. विचारांचा विकासक्रम सामाजिक विकासक्रमाबरोबरच पावले टाकतो. समाजाची केवळ आर्थिक पुनर्घटना केली म्हणजे क्रांतीचा उद्देश सफल झाला, असे म्हणता येणार नाही. व्यक्तीचे सार्वभौमत्व अमान्य करणारे जे कोणते सामाजिक तत्त्वज्ञान असेल, तिच्या अंगी प्रगती व क्रांतीचे बल अत्यल्पच राहणार. राज्यसत्ता म्हणजे समाजाची राजकीय संघटना. तिच्यावर लोकांचेच नियंत्रण हवे. उद्योग, अर्थ, उत्पादन इ.वर राज्यसत्तेचे नियंत्रण म्हणजे परत वेगळी पिळवणूक. एकदा का एकाधिकारशाही रुजली की, कायम राहू पाहते. म्हणून लोकशाहीच असायला हवी. ती विवेकाधारी कार्यरत असली पाहिजे. लोकशाहीचा विकल्प हुकूमशाही होऊच शकत

नाही. मानव हाच सर्वांचा केंद्र व आधार हवा. उत्पादन व वाटणी मानवी गरजांवर आधारित हवी. मानव बंधमुक्त हवा. मूलगामी लोकसत्ताक राज्य म्हणजे नागरिकांचे राज्य. त्याचा पाया नैतिक बुद्धिवाद व समाजपरायणता आहे. मानव हाच प्रत्येक गोष्टीचा मानदंड हवा. स्वतंत्र मानवाचे बंधुभावाने भरलेले समाजजीवन म्हणजे जनमानवतावाद. तो या बाबीस सूत्रांमुळेच येणे शक्य आहे.

९४) गिंपेलची गोष्ट – आयझॅक बेहावीस सिंगर

आयझॅक बेहावीस सिंगर पोलंडमध्ये जन्मलेले अमेरिकी लेखक. यहुदी आंदोलनाचे ते समर्थक होते. त्यांचे साहित्य विचारप्रधान आहे. अनुवादक, कादंबरीकार, पत्रकार, लेखक, पटकथाकार असलेल्या आयझॅक सिंगर यांना सन १९७८ मध्ये साहित्याच्या नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं असलं, तरी तत्पूर्वी 'पर्शियन रिव्ह्यू' या अमेरिकी द्वैभाषिक नियतकालिकाने मे-जून, १९५३ या अंकात त्यांची एक कथा 'Gimpel : The fool' शीर्षकाने प्रकाशित झाली होती. मूळ यहुदी भाषेतील या कथेचे इंग्रजी भाषांतर सॉल बेलो (Soul Bellow)ने केले होते. ते तर्कतीर्थांच्या वाचनात आले. ती कथा त्यांना इतकी भावली की, त्यांनी त्या कथेचे मराठी भाषांतर केले. ते 'वाङ्मय विशाखा' मासिकाच्या सन १९५३ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाले होते.

तर्कतीर्थांनी हे भाषांतर केवळ गोष्ट आवडली म्हणून केलं असेल असं वाटत नाही. या गोष्टीत एका भोळ्या माणसाचं करुणाष्टक भरलेलं आहे. गिंपेल आतून, बाहेरून एक सरळ, भोळा माणूस आहे. जगाचे छक्के-पंजे त्याला माहीत नाहीत. तो आपल्या अंतरवृत्तीनं जग पाहतो नि जगतो. त्याची पत्नी एलका त्याला आयुष्यभर फसवत राहते; पण तो स्वतःच्या सरळपणाच्या आधारे जगाबरोबर तिच्यावर विश्वास ठेवतो. एलका आपल्या मृत्यूपूर्वी आपल्या चुकांचा पाढा वाचत स्वीकारते नि मरते. गिंपेल आयुष्यात फसला गेलेला. आयुष्य लुटलेलं. त्याला जगानं फसवावं, लुटावं वाटतं; पण क्षणभरच! सरतेशेवटी त्याचा सरळपणा, भोळेपणा (ज्याला जग वेडेपणा म्हणतं!) त्याच्यावर विजय मिळवितो. तो पापी विचार गाडून टकतो. आपलं फ्रॅमपोल गाव सोडून जग पालथं घालतो. कालौघात लक्षात येतं की, जग पूर्णपणे काल्पनिक आहे यात शंका नाही; पण खऱ्या जगापासून ते फक्त एका टप्प्यावर आहे.! (No doubt the world is entirely an imaginary world, but it is only once removed from the true world.) तर्कतीर्थ हे भाषांतर करतात, ते फक्त हे सत्य सांगण्यासाठी. स्वीकारार्हता, सकारात्मकता, विश्वास या गोष्टी खरा मानवी सद्भाव नि वृत्ती होय. जग बदमाश आहे, हे कळालं तरी ते सोडणं तुमचं बलस्थान आहे.

९५) श्वाइट्झरचे संस्कृतिविषयक तत्त्वज्ञान : निसिम इझेकील

डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर यांना सन १९५२ चा नोबेल शांतता पुरस्कार त्यांनी केलेल्या

आफ्रिकेतील कृष्णवर्णीय नागरिकांच्या सेवा कार्याबद्दल प्रदान करण्यात आला होता. डॉ. निसिम इझेकील यांनी त्या निमित्ताने नवी दिल्लीतून प्रकाशित होणाऱ्या 'Thought' साप्ताहिकात 'डॉ. श्वाइट्झर यांच्याबद्दल लिहिलेल्या इंग्रजी लेखाचे भाषांतर आहे, 'श्वाइट्झरचे संस्कृतिविषयक तत्त्वज्ञान' हे भाषांतर 'नवभारत' मासिकाच्या जानेवारी, १९५४ च्या अंकात प्रकाशित आहे. ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले आहे.

डॉ. निसिम इझेकील यांनी आपल्या या लेखात श्वाइट्झर यांच्या 'Philosophy of Civilization' ग्रंथातील 'Decay and the Restoration of civilization' शीर्षक निबंधाच्या अनुषंगाने विचार व्यक्त केले आहेत. डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर हे जर्मन तत्त्वज्ञ व संत होत. त्यांनी मूळ जर्मनीत लिहिलेल्या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर म्हणजे 'Philosophy of Civilization' होय. संस्कृतीचा अपक्षय (Decay) व उद्धार (Restoration) हा चर्चेचा केंद्रबिंदू होय. श्वाइट्झर यांच्या विचारानुसार, नैतिक अधिष्ठानाशिवाय संस्कृती अस्तित्वातच राहू शकत नाही. हे अधिष्ठान ज्ञानच निर्माण करू शकते. आज तत्त्वज्ञान विश्वविषयक सामान्य सिद्धांत सांगत नाही; परंतु तसा सिद्धांत तत्त्वज्ञानाने शोधलाच पाहिजे. डॉ. श्वाइट्झर यांच्या मतानुसार, व्यक्तीकडे दुर्लक्ष केल्याने स्वातंत्र्य व विचारांचे मोल नाहीसे होते. आपली सत्यावरची श्रद्धा उडत चालल्याने मूल्ये शिल्लक राहिलेली नाहीत. जेव्हा सर्वसामान्य जनसमुदायाच्या मनःस्थितीपेक्षा स्वतंत्र अशी मानसिक संवेदना निर्माण होईल, तेव्हाच ती जनमानसावर प्रभाव टाकू शकेल. बुद्धिवाद आवश्यक, पण त्याचा अतिरेक टाळायला हवा. बुद्धिवाद काही परिपूर्ण असत नाही. त्याला भावनेची जोड हवी. आध्यात्मिक अनुभववाद या संदर्भात लक्षात घेतला पाहिजे. जगत आणि जीवन (मानवी) दोन्ही तत्त्वे आस्तिक बुद्धीवर आधारित हवी. आस्तिक जीवन नास्तिकापेक्षा चांगले. यातून डॉ. श्वाइट्झर यांची भारतीय तत्त्वज्ञानविषयक सकारात्मक दृष्टी लक्षात येते. त्यांचे कार्य या तत्त्वज्ञानाचा कृतिशील वस्तुपाठ होय. म्हणून इझेकील यांच्याबद्दल लिहायला प्रवृत्त होता तर्कतीर्थ भाषांतर करत याबद्दलची अप्रत्यक्ष सहमतीच व्यक्त करतात.

९६) मानवतावादी राजकारण - मानवेंद्रनाथ रॉय

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या षष्ट्यब्दीपूर्ती वर्ष १९४९ मध्ये 'नेहरू अभिनंदन ग्रंथ' हिंदी व इंग्रजीमध्ये प्रकाशित करण्यात आला होता. त्यात मानवेंद्रनाथ रॉय यांनी 'Humanist Politics' शीर्षक लेख (१५ मार्च, १९४९) लिहिला होता. याच दरम्यान मानवेंद्रनाथ रॉय यांनी 'Practice of Humanism' शीर्षकाने एक छोटी पुस्तिका (२९ डिसेंबर, १९४९) प्रकाशित केली होती. दोन्हींवर बेतलेले एक भाषांतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले होते. ते 'नवभारत' मासिकाच्या एप्रिल, १९५४ मध्ये प्रकाशित 'मानवेंद्रनाथ रॉय विशेषांकात' (पृ. २९ ते ३३) प्रसिद्ध झाले होते.

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारानुसार, आजवर मानवास सापडलेल्या अनेक

राज्यपद्धतींत लोकशाही चांगली राज्यपद्धती होय. खरीखुरी लोकशाही शक्य आहे का, असे प्रश्न काही बुद्धिजीवी विचारत असले, तरी सरंजामी व हुकूमशाही राज्यपद्धती पाहिली की, तिचे श्रेष्ठत्व वेगळे सांगण्याची गरज उरत नाही. समाज व व्यक्ती संबंध म्हणजेच राज्य-व्यक्ती संबंध होय. लोकशाहीमुळेच मानवतावादी समाज प्रत्यक्षात येणे शक्य आहे. मानवसमता लोकशाहीशिवाय अशक्य. लोकशाही हे नागरी लोकशिक्षण होय. मानवी समाज उन्नत होण्यावरच लोकशाहीची प्रगल्भता अवलंबून आहे. वर्तमान गुंतागुंतीच्या समाजजीवनविषयक प्रश्नांची सोडवणूक मानवी लोकशाहीतूनच शक्य आहे. भांडवलशाही मागे पडून समाजवादी विचार अग्रेसर झाला. डाव्या, मार्क्सवादी विचारसरणीची सत्ताही जगाने अनुभवली आहे. डाव्या आणि उजव्यांची तत्त्वज्ञाने वेगळी असली, तरी सत्ताव्यवहार समान आहे. डाव्या सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे समर्थन करणारे पक्ष सत्तेवर आले की, तेही साधनशुचितेचा विवेक विसरतात, असा अनुभव आहे. जनतेतील असहायतेच्या भावनेस कारण होणारी अंधश्रद्धा नष्ट करणे आणि बुद्धिवादी विचारसरणी प्रसारित करणे, हे लोकशाहीतील लोकशिक्षणामुळेच शक्य आहे. समाजाचे सर्व प्रकारचे प्रश्न न्याय मार्गाने सोडविण्याची शक्ती व शक्यता केवळ लोकशाहीत आहे व तेच खरे. मानवतावादी राजकारणाचे साधन व माध्यम आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'नवमानवतावाद' विचारसरणीच्या समर्थनार्थ हे भाषांतर केले आहे. ते मानवतावाद समर्थक आहे.

९७) भारतीय नवजीवनाची चळवळ - मानवेंद्रनाथ रॉय

मानवेंद्रनाथ रॉय यांनी दिलेल्या तीन व्याख्यानांची छोटी पुस्तिका प्रकाशित असून, तिचे नाव 'Indian Renaissance Movement' असे असून, ती रेनासांस पब्लिशर्स, कलकत्ता यांनी सन १९४४ ला प्रकाशित केली आहे. त्या पुस्तिकेचा भाषांतरित सार म्हणून या लेखाकडे पाहावे लागते. सारसंक्षिप्त भाषांतरित लेख मासिक 'नवभारत'च्या एप्रिल, १९५४ ला प्रकाशित 'मानवेंद्रनाथ रॉय विशेषांक'मध्ये प्रकाशित असून, त्याचे भाषांतरकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आहेत.

नवजीवन शब्द प्रबोधनपर्व, पुनरुज्जीवन काळ या युरोपातील 'Renaissance Movement'पासून घेतला गेला आहे. युरोपिअन इतिहासातील मध्यकाळ, विशेषतः १५ वे, १६ वे शतक हे प्रबोधनपर्व म्हणून ओळखले जाते. या पर्वामुळे युरोपात मूलभूत सामाजिक व राजकीय सुधारणा घडून आल्या. तशा सुधारणांचा भारतीय संदर्भातील हा विचार होय.

मानवेंद्रनाथ रॉय यांनी सदर लेखात म्हटले आहे की, 'भारतीय नवजीवनाची चळवळ' या विषयावर मी बराच विचार केला आहे. माझे अधिकांश आयुष्य राजकारणात गेले. राजकारणात विचारांपेक्षा भावनांना महत्त्व असते. आपल्या सार्वजनिक जीवनात गेल्या ५०

वर्षांत राजकीय चळवळीस महत्त्व प्राप्त झाले आहे. भारत हा तसा मागासलेला देश आहे. या मागासलेपणाकडे दुर्लक्ष करणे शहामृगी खेळ खेळण्यासारखे आहे. छोटे राष्ट्र परकीय सत्ता वा आक्रमणापुढे शरण जाते, हे मी समजू शकतो; पण भारतासारख्या उपखंडसदृश देशाने परकीय आक्रमणापुढे मान तुकवावी हे पटत नाही; पण ते ऐतिहासिक सत्य आहे. या पराभवाचे कारण आपण आपल्या सामाजिक शक्ती गमावल्या हेच आहे. अवनत दशा संपली अशी खात्री करून देणाऱ्या अवस्थेस 'नवजीवन' (Renaissance) संबोधले जाते. भारतीय नवजीवन चळवळीचा विचार तसाच आहे. ही जीर्णोद्धार चळवळ होय. पुरोगामी शक्तीला विरोध करणाऱ्या साम्राज्यवादी हुकूमशाहीला विरोध करण्यातून ती निर्माण होईल. या चळवळीअंतर्गत आपणांस प्राचीन संस्कृतीतील चिरंतन मूल्यांचा शोध घ्यावयाचा आहे. दुसरे म्हणजे भारताचा प्रमाणशुद्ध इतिहास आपणास लिहावयाचा आहे. तिसरे म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिणे तितकेच गरजेचे. उत्तर-पश्चिमी संस्कृती भौतिकवादी, तर भारतीय आध्यात्मवादी. पाश्चात्य संस्कृती विज्ञानाधारित विकास पावली. आपणाकडे तसे झाले नाही. यासाठी सत्याचा शोध घेणारी अनिर्बंध प्रेरणा, बौद्धिक चिकित्सा करण्याचे सामर्थ्य असावे लागते. त्यासाठी भारतास शब्दप्रामाण्याच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन विवेकवादी बनायला हवे. त्यासाठी अंधश्रद्धा मुक्ती अनिवार्य आहे. रवींद्रनाथांचा तोच आदर्श होता.

९८) मार्क्सवादाच्या पुढे! - फिलीप स्प्रॅट

ब्रिटिश लेखक व विचारवंत फिलिप स्प्रॅट यांच्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेल्या लेखाचे भाषांतर म्हणजे 'मार्क्सवादाच्या पुढे!' होय. मूळ लेखाचा संदर्भ दिलेला नाही, शोधूनही सापडला नाही. हा भाषांतरित लेख 'नवभारत' मासिकाच्या 'मानवेंद्रनाथ रॉय विशेषांक' (एप्रिल, १९५४) मध्ये प्रकाशित आहे.

यातील विचारानुसार, विशद करण्यात आले आहे की, मार्क्सवादी सिद्धांतानुसार सर्व जगातील संस्कृती एकच आहे. समान संस्कृतीचा एक विकासक्रम आहे. ख्रिश्चन संस्कृती प्रगत आहे. आशियाई देशांनी विकास साधायचा, तर युरोपीय संस्कृतीचे अनुसरण करायला हवे. मार्क्सवादी सिद्धान्तानुसार सामाजिक बदलासाठी मौलिक परिवर्तन अनिवार्य असते. त्यासाठी पारंपरिक डोलारा (Superstructure) जो असतो, त्यात बदल अपेक्षित असतात. हा डोलारा आर्थिक व सामाजिक पायावर बेतलेला असतो. विज्ञान नि तत्त्वज्ञानाधारे हा पाया बदलणे विकासाची पूर्वअट असते. (मार्क्सवाद दोन रूपांत दिसतो- १) शुद्ध तत्त्वज्ञानाच्या रूपात, २) व्यवहारी राजकारणाच्या रूपात. रशियातील मार्क्सवाद दुसऱ्या प्रकारचा. स्टालिनने सत्ता स्थिरीकरणासाठी मूळ तत्त्वज्ञानाशी फारकत घेऊन सत्ता विस्तार व मजबुती केली. यामुळे मानवेंद्रनाथ रॉय आणि स्टालिनमध्ये मतभेद झाले. त्यामुळे रॉय यांना रशिया, जर्मनीतून निष्कासित होणे भाग पडले. रॉय यांनी भारतात येऊन

काँग्रेसमध्ये बदलाचे प्रयत्न केले. त्यातून घटना समिती आकाराला आली. सन १९३४ मध्ये स्टालिनने धोरण बदलले म्हणून रॉयनी त्याचे समर्थन केले; पण दुसऱ्या महायुद्धात रॉय यांचा भ्रमनिरास झाला. रॉय यांच्या मनात हिंदी राष्ट्रवाद्यांबद्दलही साशंकता होती. दोस्त राष्ट्रांच्या धोरणांशीही ते सहमत नव्हते. महायुद्ध संपल्यानंतर रॉय यांनी कम्युनिस्टांशी फारकत घेऊन रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टी स्थापन केली. त्याला भारतात बुद्धिजीवी वगळता फारसे समर्थन लाभले नाही. रॉय यांना मार्क्सवाद हा कायम राजकारणपरायण दिसत आला होता. त्यामुळे त्यापेक्षा वेगळा विचार नवमतवाद म्हणून नवमानवतावादाची त्यांनी मांडणी केली. व्यक्ती स्वातंत्र्याशिवाय समाजविकास खरा नाही, हे त्याचे सूत्र होते. मार्क्सवाद आणि मानवतावाद मिळून स्थापलेला नवमानवतावाद म्हणजे मार्क्सवादातील दोषांचे परिमार्जन व गांधीवाद/काँग्रेसमधील लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, समन्वयी नीती यांचा मिलाफ होय. ती मार्क्सवादापुढचे पाऊल म्हणून नवी विचारधारा होती.

९९) आंतरराष्ट्रीय सद्भावनेचे साधन विज्ञान - वर्नर हाइसेनबर्ग

वर्नर हाइसेनबर्ग हे (१९०१-१९७६) जर्मनीचे भौतिकशास्त्रज्ञ. पुंजयामिकी किंवा परिणामनिष्ठ यांत्रिकी (Quantum Mechanics) हे त्यांच्या अभ्यासाचे विशेष क्षेत्र. त्यांचा एक ग्रंथ आहे, 'Philosphic Problems of Nuclear Science'. हा आहे भाषणसंग्रह. त्यात त्यांनी आधुनिक भौतिकशास्त्राचे (Phisics) महत्त्व विशद करणारी प्राचीन भाषणे संकलित करून प्रकाशित केली आहेत. या भाषणांमधून त्यांनी ग्रीक काळापासून ते वर्तमानापर्यंतच्या पुंजयामिकीच्या विकासाचा वेध घेतला आहे. यातील शेवटचे व्याख्यान आहे, 'Science as a Means of International Understanding.' लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या भाषणाचे मराठीत केलेले हे भाषांतर एप्रिल, १९५७ च्या 'नवभारत' मासिकात प्रसिद्ध झाले होते. अणुशक्तीवर आधारित पहिल्या विद्युतभट्टीची सुरुवात २ डिसेंबर, १९५७ ला अमेरिकेत झाली; पण तत्पूर्वी वर्षभर अणुशक्तीच्या विधायक उपयोगाचे समर्थन जगभर होत होते. या भाषांतराची ही पार्श्वभूमी होती. वर्नर हाइसेनबर्ग सन १९३२ ला भौतिकशास्त्रातील यांच्या संशोधनाबद्दल नोबेल पुरस्काराने सन्मानित शास्त्रज्ञ होत.

विषयावरूनच भाषणाचे महत्त्व लक्षात येते. या भाषणात हाइसेनबर्ग यांनी विज्ञानसंदर्भातील तीन प्रश्नांचा ऊहापोह केला आहे. १) विज्ञानाचे कार्य कसे चालते व त्याचा व्यक्तीशी संबंध कसा असतो? २) सर्व वैज्ञानिक सहकार्य हे सर्व खऱ्या मानव्यपूर्ण संबंधांतील द्वेष आणि युद्ध यांच्या निवारणार्थ फारसे काही करू शकत नाहीत, ३) विज्ञानाचे महाकर्तव्य कोणते?

वरील प्रश्नांसंदर्भात विचार व्यक्त करीत हाईसेनबर्ग यांनी म्हटले आहे की, खरं तर विज्ञान हा भिन्न राष्ट्रांना जोडणारा सेतू वा दुवा असायला हवा. या कार्यात विज्ञानाची भूमिका साहाय्यकाची हवी. विज्ञान संशोधनात भिन्न देश, वंश, भाषा, धर्म असलेले वैज्ञानिक एकत्र

कार्य करीत असतात; पण हे कार्य मात्र एका विशिष्ट राष्ट्रापुरते चाललेले असते. विज्ञानाचा उपयोग एका विशिष्ट राज्यशक्तीच्या हितार्थ प्रारंभी होत असते. आपल्या श्रद्धा, परंपरांना बळ देणे ही विज्ञानाची जबाबदारी असते.

मी सन १९२० मध्ये म्युनिक विद्यापीठात विज्ञान अभ्यासार्थ प्रवेश घेतला. तेव्हा जर्मनीचा पहिल्या महायुद्धात पराभव झालेला होता. जर्मनीची मानसिकता पराभूताची होती. पुन्हा उठून उभे राहायचे म्हणून नव्या अणुविज्ञानचा अभ्यास सुरू केला. सॉमरफिल्ड, रॉटेग्जन, प्लांक, रुदरफोर्ड, बोर प्रभृती वैज्ञानिकांची भाषणे ऐकत मी समृद्ध झालो. १९२१ साली मला निल्स बोर व्याख्यानमालेत व्याख्यान देण्यासाठी सॉमरफिल्डने गॉटिंजेन (जर्मनी) ला बोलावले. इथेच माझे संशोधन क्षेत्र निश्चित झाले. मी अणुरचना निल्स बोरमुळे समजून घेऊ लागलो. पुढे म्युनिकला परतलो नि सॉमरफिल्ड यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करू लागलो. सन १९२५ ला मला केंब्रिज विद्यापीठाचे (इंग्लंड) व्याख्यानासाठी निमंत्रण मिळाले. रशियन पदार्थविज्ञान वैज्ञानिकांपैकी सिद्धान्त्यांपुढे व्याख्यान देण्याची संधी मिळाली. कोपेनहेगन, केंब्रिज, गॉटेंजेन ही त्या वेळची प्रगत पदार्थविज्ञान केंद्रे होती.

विज्ञान हे सार्वजनिक जीवनाच्या लहान भागाचे प्रतिनिधिभूत असते व प्रत्येक देशात फार थोडे लोक विज्ञानाशी प्रत्यक्ष निगडित असतात. विवाद्य प्रश्न वैज्ञानिक रीतीने म्हणजे वस्तुनिष्ठपणे भावनेची बाधा टाळून एकमेकांबद्दल सद्भावना ठेवून चर्चिण्यास जे उद्यत असतात, अशा अल्पसंख्याकांवर राजकीय शक्तीची कुरघोडी नेहमी चालत असते. गेल्या काही दशकांत या परिस्थितीत फरक पडत चालला आहे. वैज्ञानिकांचे संबंध आंतरराष्ट्रीय असतात. त्यामुळे सरकारे त्यांच्याकडे संशयाने पाहत असतात, ही वर्तमानातील भयदायक स्थिती होय. विज्ञानातील जीवशास्त्रातील नवी प्रगती वरदायी आहे व संहारकही. माणूस वा राष्ट्र आता सांसर्गिक रोग निर्माण करू शकतो. आता वैज्ञानिकांची जबाबदारी वाढली आहे नि त्यांच्या विवेकबुद्धीपुढे आव्हानही उभे आहे.

आता मानवास पूर्वीच्या आध्यात्मिक विश्वाबरोबर भौतिक विश्व लाभले आहे. निसर्गही समजला आहे. विज्ञान व तारतम्याचा विचार प्रबळ होत आहे. माणसाच्या दृष्टीत फरक पडला आहे. खरे-खोटे, प्रत्यक्ष-आभासी, योग्य-अयोग्य यांचा कस लागण्याची वेळ येऊन ठेपली आहे. अशा वेळी विज्ञान राष्ट्रा-राष्ट्रांत सद्भाव व सहयोग घडवून आणू शकतो. जगातील सर्वांना नव्या ज्ञानाचा खरा फायदा होईल, तेव्हा जग सुखी होईल. विज्ञानासंबंधी आंतरराष्ट्रीय सामंजस्यावरच विश्वशांती अवलंबून आहे, हा या व्याख्यानाचा सूत्रविचार महत्त्वाचा आहे.

१००) मार्क्सवादाची जादू - डॉ. मायकेल पोलॅनी

मायकल पोलॅनी (१८९१-१९७६) हे हंगेरियन - ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक व समाजशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्धीस आले होते. त्यांना भौतिक रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञानातील विशेषज्ञ

(Polymath) म्हणून ओळखलं जातं. ते मुक्त समाजव्यवस्थेचे (Free Society) समर्थक मानले जायचे. त्यांच्या मुलास नि विद्यार्थ्यांना सन १९४४ चं रसायनशास्त्राचं नोबेल पारितोषिक मिळालं होतं. त्यांचा सन १९५६ चा 'The Magic of Marxiom' निबंध जगभर गाजला होता. तो 'Committee on Science and Freeden' या संघटनेने प्रसिद्ध केला होता. त्याचा मूळ खर्डा व संपादित लेख/निबंध जिज्ञासू वाचकांना वाचण्यासाठी आंतरजालावर उपलब्ध आहे. या प्रसिद्ध लेखाचे शब्दश: भाषांतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. ते 'नवभारत' मासिकाच्या जून, १९५७ च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. सन १९८२ ला तर्कतीर्थांच्या निवडक लेखनाचा जो 'लेखसंग्रह' (खंड-१) श्रीविद्या प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केला होता, त्यातही या महत्त्वपूर्ण भाषांतरित लेखाचा अंतर्भाव करण्यात आला होता.

मार्क्सवादाचा प्रचारकीय प्रभाव हा जगभर चर्चेचा विषय बनून राहिला आहे. विशेषतः नैतिकता संदर्भातील वास्तव व सापेक्ष चर्चेमुळे. सर इसाया बर्लिन यांनी १९३९ मध्ये मार्क्सचे एक चरित्र (कार्ल मार्क्स : हिज लाईफ अँड एन्व्हिरॉनमेंट) लिहिले आहे. त्यात मार्क्सच्या या प्रचारकीय कौशल्याचा उल्लेख आहे. मार्क्सने शाश्वत न्याय, मानवी ऐक्य, संग्राम यांना प्रचाराने कशी तिलांजली दिली, याचे विवेचन आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता मूल्यांची बोल्शेविकांची सापेक्ष मांडणी व समर्थन मूळ नैतिकतेच्या कल्पनेसच आव्हान आहे. पोलॅनी असा विचार मांडतात की, विरुद्ध अशा सिद्धांतात श्रेष्ठ श्रद्धोत्पादक शक्ती का असावी? याचा शोध घ्यायला हवा. 'विरोधविकासयुक्त भौतिकवाद' नेमका काय आहे, ते समजून घ्यायला हवे. आपली वस्तुनिष्ठ दृष्टी जितकी अधिक नीतिनिरपेक्ष होईल, तितकी परस्पर विरुद्ध तत्त्वांची सांगड प्रभावी बनते, असा अनुभव आहे. हे सारं समजून घ्यायचं तर कार्ल मार्क्समध्ये तुम्ही परकाया प्रवेश केला पाहिजे. समाजवादी क्रांतीने भांडवलशाही संपुष्टात आणली व स्वातंत्र्यता, न्याय व बंधुता मूल्ये रुजविली; पण पुढे त्याचे विज्ञान बनविले गेले. आशा-आकांक्षेने भरलेले व भारलेले लोक मूल्ये विज्ञान म्हणून स्वीकारतात. यामुळे नैतिक आकांक्षांना वैज्ञानिक निष्कर्षांचे रूप येते. वैज्ञानिक मुखवट्याच्या योगाने ही केवळ भावनाविवशता होय. म्हणून व्हावयाच्या निंदेपासून नैतिक भावनांचे रक्षण केले आणि याच वेळी, याच्या योगाने भौतिक, ऐहिक ध्येयाच्या पोटात नैतिक भावनांचा उत्साह भरता येतो.

मार्क्सवादाच्या दोन वैचारिक शाखा वा प्रवाह आहेत- अभावात्मक व विधायक (नकारात्मक/सकारात्मक). या दोन्ही नीतीला स्वगत शक्ती आहे, हे नाकारून काम करतात. भांडवलशाहीचे ढोंग उघड करण्यात त्याचा शक्तिक्षय होतो. नैतिक आक्षेपांच्या निरसनार्थ प्रयत्न होत नाहीत. समाजवादाचा नैतिक उद्देश वैज्ञानिक पर्यायांनी युक्त अशा विधानांच्यामध्ये रूपांतरित केला, तेव्हा तो मूलभूत नैतिक संदर्भापासून विभक्त झाला, हे

लक्षात घ्यायला हवे. हा एक प्रकारचा धर्मोन्माद (Fanatism) होय. हे भौतिक पर्याय होत. हे भौतिक पर्याय कामगारहिताच्या रूपात पाहता येतात. त्यांच्या प्रतिनिधींच्या हातातील सत्ता कल्याणकारी न राहता जुलमी होते. यातून सर्वाधिकारवाद जन्मतो. तो विवेकहीन होतो. नैतिकता सापेक्ष मानण्या वा नाकारण्यातून हे घडते. चळवळीतील, मग ती कामगारांची असो वा जनतेची, तिच्यातून अनैतिकतेचे नैतिक आवाहन प्रभावी होणे, हा खरे तर मूळ विचार नि मूल्यविचारांचाच पराभव होय. मायनेक (Meinecke)ला याचे प्राथमिक प्रारूप प्रथम जर्मनीत हिटलरच्या उत्कर्षात प्रतिबिंबित झालेले आढळले. विनाशवाद 'हम करे सो कायदा'रीतीने वागतो, हे सर्व मूलत: अनैतिकतेत नैतिकता शोधत राहण्यातून येते. यास 'नैतिक विपर्यास' म्हणता येईल. नैतिक विवेकाच्या उघड तिरस्कारातील नैतिक आवाहनाचे कोडे उलगडते ते स्टालिन राजवटीने. 'ढोंगाचा परिस्फोट' असंच त्याचं वर्णन करता येईल. तुर्गनेव्ह, सार्त्र, कामू वाचला की माणसाचं उपरा, परका (Strenger) होणं उमगतं. तथ्यांचा त्याग ही खरी शोकांतिका असते. म्हणून मर्यादा पाळणे महत्त्वाचे असते. अन्याय्य विशेषाधिकार पायरी पायरीने कमी करत जाणे, हाच त्यावरचा रामबाण उपाय होय. अर्ध्या रात्रीत कोणतीही गोष्ट नष्ट करण्यातून नवी अरिष्टे जन्म घेत असतात. सर्वव्यापी सत्तेसच सर्वव्यापी नैतिकता निर्माण करणे, ते नवीनीकरण रुजविणे शक्य असते; पण त्यामुळे खऱ्या मानवी नैतिक जीवनाचा अनिवार्यपणे नाशच होत असतो, हे लक्षात ठेवले पाहिजे.

१०१) भ्रातृभाव (रशियन राज्यक्रांतीच्या संदर्भात) - फिलीप स्प्रॅट

फिलिप स्प्रॅट हे ब्रिटिश बुद्धिजीवी व लेखन विचाराने कम्युनिस्ट. त्यांना आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटना, मास्को यांनी पक्ष विचार, प्रसारार्थ भारतात पाठविले होते. इथे देशविरोधी कारवायांचा आरोप ठेवत त्यांच्यावर खटले भरले गेले आणि तुरुंगात पाठविले गेले. मेरठ खटल्यात ते आरोपी होते. इथे मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी त्यांचे सख्य जुळून आले. स्वातंत्र्यानंतरही ते इथेच डाव्या चळवळी, लेखन, वृत्तपत्रसृष्टीशी निगडित राहिले. रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीशी त्यांचा संबंध होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्यांच्या एका इंग्रजी लेखाचे केलेले मराठी भाषांतर. ते 'नवभारत' मासिकाच्या नोव्हेंबर, १९६७ च्या अंकात प्रसिद्ध झाले होते.

या लेखानुसार 'सोशॅलिझम' व 'कम्युनिझम' या शब्दांचा इतिहासात सर्वप्रथम वापर सन १८२७ मध्ये रॉबर्ट ओवेन यांनी केला होता; पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करून फ्रेंच राज्यक्रांतिकारकांनी पॅरिसच्या चर्चवर १७५ वर्षांपूर्वी लिहिलेले 'स्वातंत्र्य, समता, बंधुता' शब्द आपल्या क्रांतीची प्रेरणा असल्याचे नमूद केले. यातील 'भ्रातृभाव' (बंधुता) शब्द अधिक महत्त्वाचा. ख्रिस्ताच्या दोन आज्ञांमध्ये त्याचा समावेश आहे. अद्भुतरम्य ध्येयवादी भ्रातृभावास अधिक महत्त्व देतात. पुढे फ्रेंच राज्यक्रांतीस भांडवलशाहीची जननी मानण्यात येऊन समाजवादी क्रांती हीच खरी क्रांती मानण्यात आली.

कार्ल मार्क्सने सॉर्गेप्रमाणेच समाजवादाचा पाया मानला गेलेल्या नैतिकतेस निंद्य ठरविले. अद्भुतरम्यवाद्यांपासून आपण कसे वेगळे आहोत, हे दाखविण्यासाठी बहुधा हा विचार अंगीकारला. मार्क्सवर हेगेलची छाप होती; पण त्याचे चित्ततत्त्व त्याला मान्य नव्हते. केवळ भौतिक जीवनाचा मार्क्स समर्थक होता. निसर्गेतिहास मार्क्स प्रमाण मानतो. त्यानुसार निसर्गाने बनलेला माणूस तो खरा. प्रश्न पडतो की, मार्क्सने नैतिकतेला का तिरस्कारले? मार्क्सवाद ही धार्मिक विचारसरणी आहे. कारण श्रद्धा तिथे महत्त्वाची, स्वातंत्र्य नाही. समाजवाद कल्याणकारी आहे असे मार्क्सने कधी मांडले नाही. प्रत्यक्ष रशियन क्रांती झाली, तेव्हा रशियाची वैचारिक घडी नव्हती व आर्थिक नियोजन नव्हते. १९३० साली १९१३ सारखी आर्थिक स्थिती होती.

पुढे हुकूमशाही राहूनही बोल्शेविक सत्ता मान्य केली गेली. भ्रातृभाव विस्तृत झाला. १९६१च्या २२ व्या कम्युनिस्ट काँग्रेसमध्ये नवे नीतिनियम मान्य करण्यात आले. त्यात हे आश्वासन देण्यात आले की, कामगारांच्या आंतरराष्ट्रीय वादाची जाणीव बाणण्याकरिता पक्ष सोव्हिएत जनतेला शिक्षण देण्याचे अविश्रांत परिश्रम घेईल. यासाठीच्या व्यापक कार्यक्रमाची लेखात सविस्तर माहिती देण्यात आली आहे. त्यातून कम्युनिस्ट भ्रातृभाव स्पष्ट होतो. गटाबाहेर असलेल्यांचा द्वेष व गटातील स्वजनांशी प्रेम, असे त्या भ्रातृभावाचे थोडक्यात वर्णन करता येईल. दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व युरोपीय राष्ट्रांतून जे सैन्य रशियात आले, त्यांनी रशियातच ठाण मांडल्यामुळे रशियन समाज विविध वंशीय आकारला. ख्रिश्चन, ज्यू, मुस्लीम इ. लोक रशियात आहेत. पैकी ज्यू व कृष्णवंशीयांचा द्वेष पारंपरिक आहे; पण वंशमिश्रण राष्ट्रीय धोरणाचा भाग आहे. १९५२ मध्ये ज्यूंना फासावर लटकवले गेले. ज्यू-मुस्लीम संघर्षाची बीजे होती; पण नंतर त्यातून माघार घेण्यात आली.

स्वतःच्या नागरिकांशी भ्रातृभावाने वागावे असे नव्या सोविएतने भरपूर प्रयत्न केले; पण नैतिकतेस कमी वाव राहिला. उथळ सिद्धांतांची तळी उचलण्याचे कार्य झाले. हेगेल नाकारण्याचा हा परिणाम होय. सामान्यपणे माणसाचा जो स्वभाव मार्क्सने ठरविला, त्यापेक्षा त्याचा स्वभाव अगदी निराळा होता. 'कॅपिटल'चे पुढचे भाग (दुसरा व तिसरा) मार्क्सने अपुरे ठेवले. कारण, पूर्वानुभवाने तो साशंक झाला होता. त्याचे खासगी विचार काहीही असोत, त्याने सार्वजनिकरीत्या वस्तूचे दर्शनी स्वरूपच मांडले. एंगेल्स, लेनिनने याला पाठिंबा दिला. पॅवलोच्या सिद्धांताने तो दृढ केला. पुढे अंतिम ध्येय 'माणूस कसा हवा?' हे मात्र अंतिमतः निश्चित करता आले नाही. पुढे कुश्चेवच्या कार्यक्रमातून उन्नतीचा पोकळपणा स्पष्ट झाला. 'माणसाशी बंधुभावाने वागावे' ही गोष्ट पटविण्यासंबंधात साम्यवाद्यांना आलेल्या

अपयशाबद्दल आश्चर्य वाटण्याचे काही कारण राहिले नाही. प्रस्तुत लेखातून फिलिप स्प्रॅट यांनी मार्क्सवादी भ्रातृभावाचे वास्तव स्पष्ट केले आहे.

भाषांतरित लेखांची मीमांसा

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ज्या विविध आठ लेखांची भाषांतरे केली, त्यांपैकी चार मूळ इंग्रजीतील संहिता उपलब्ध झाल्याने त्यांच्या आधारे भाषांतरविषयक मीमांसा शक्य आहे. अन्यांबाबतीत उपलब्ध मराठी भाषांतर हाच मीमांसेचा आधार ठरतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मानवेंद्रनाथ रॉय, फिलिप स्प्रॅट, निसिम इझेकील, वर्नर हाइसेनबर्ग यांच्या ज्या लेखांची भाषांतरे केली, त्यांचे विषय नवमानवतावाद, संस्कृती, तत्त्वज्ञान, मार्क्सवाद, विज्ञान, आंतरराष्ट्रीय सद्भावना, भ्रातृभाव, रशियन क्रांती इ. राहिले आहेत. या विषयांवर तर्कतीर्थांनी मराठीत विपुल व विस्ताराने लिहिलेले असल्याने विषयांचे चांगले ज्ञान व आकलन भाषांतरकार तर्कतीर्थांना असल्याचे भाषांतरित लेख वाचताना लक्षात येते.

'नवमानवतावाद' लेख बावीस सूत्रांचे भाषांतर आहे. त्याची मूळ संहिता 'Principles of Radical Democracy 22 Theses' उपलब्ध आहे. हे भाषांतर करताना तर्कतीर्थ संस्कृतनिष्ठ क्लिष्ट शब्दावली वापरतात असे लक्षात येते. त्यामुळे भाषांतर सुबोध न होता ते दुर्बोधतेकडे झुकते. तर्कतीर्थांचे समग्र वाङ्मय लेखन हे वेद, प्राचीन साहित्य, संस्कृत, संस्कृती, तत्त्वज्ञान, तर्क अशा स्वरूप व शैलीचे राहिल्याने त्यांचा वाचक हा प्रारंभीपासूनच सुशिक्षित, उच्चविद्याविभूषित, बुद्धिजीवी, संशोधक, समीक्षक असा राहात आला आहे. त्यामुळे त्यांचे भाषांतरही त्याच स्तरीय वाचक वर्गासाठी असल्याचे लक्षात येते. अगदी भाषांतरित शब्दचयनाचा विचार करायचा झाला, तरी तर्कतीर्थ इंग्रजी Quest, Interpritation, Reorganization सारख्या शब्दांना अनुक्रमे शोध, व्याख्या, पुनर्रचना असे प्रचलित शब्द असताना अनुक्रमे अन्वेषणा, उपपत्ती, पुनर्घटनासारखे शब्दप्रयोग करतात. मूळ अभ्यासभाषा संस्कृत असणे हे त्याचे प्रमुख कारण होय. त्यांच्या मराठी लेखनांमधूनही क्लैब, मतैक्य, स्मृतिरोष, नवन्याय, मृगशीर्षकाल, परिभ्रमण असे शब्द सररास आढळतात.

तर्कतीर्थ भाषांतर करताना शब्दशः भाषांतर करण्याऐवजी आशयानुवाद वा छायानुवाद शैली पसंत करतात. अशा ठिकाणी ते वाक्यक्रमही पुढे-मागे करून आशयसंपन्न भाषांतरच पसंत करतात. वर्नर हाइसेनबर्गचा भाषांतरित लेख मूलत: भाषण आहे. वर्नर हाइसेनबर्ग यांची मातृभाषा जर्मनी. ते इंग्रजीत भाषण करीत असले वा लेख लिहीत असले, तरी त्यात मातृभाषा प्रभावामुळे - जर्मन शब्द येतातच. उदाहरणार्थ भाषांतरित भाषण हे विद्यापीठीय मूळ पदवीधर विद्यार्थ्यांना उद्देशून करण्यात आले होते. मराठी भाषणकार वा वक्ता 'प्रिय विद्यार्थी मित्रांनो' असे प्रारंभी संबोधन करणार, तसे जर्मन प्रभावामुळे वर्नर हाइसेनबर्ग

म्हणाले, 'Dear Kommilitonen'. त्याचे इंग्रजी रूपांतर होते. 'Fellow Students'. तर्कतीर्थ भाषांतर करतात, 'प्रिय प्रौढ विद्यार्थ्यांनो'. सहज भाषांतर हवे होते, 'प्रिय सहयोगी मित्रहो'. या भाषणाच्या ओघात एक जर्मन शब्द येतो 'Weltanschauung'. त्याचा इंग्रजी पर्याय आहे 'Worldview'. मूळ वाक्य आहे, 'It was atso held that the task of the pure science as well as of philosophy was to support our Weltanschauung and our beliefs.' तर्कतीर्थ भाषांतर करतात, 'आपल्या शुद्ध विज्ञानाची व तत्त्वज्ञानाची मोठी जबाबदारी म्हणजे आपल्या परंपरा व श्रद्धा यांना बळ देणे ही होय, असेही मानले जात होते. इथे शुद्ध विज्ञानऐवजी मूलभूत विज्ञाने व परंपरेऐवजी वैश्विक दृष्टिकोन शब्द आला असता, तर हे भाषांतर अधिक सयुक्तिक व समर्पक झाले असते.

पण तेच तर्कतीर्थ कधी कधी ललितमधुर मराठी भाषांतराचा प्रत्यय देत वाचकांना सुखद धक्का देत अभिजात भाषांतराची प्रचिती देतात. प्रा. मायकेल पोलॅनींचा जगप्रसिद्ध निबंध आहे, 'The Magic of Marxism'. त्यात एक वाक्य येते -"If our tormenting sense of bad faith would merely cause us to disguise our thirot for righteousness in the erudite terms of a specious sociology, the meaquerance would perhaps be merely pitiful.' तर्कतीर्थ त्याचे भाषांतर करतात, 'आपल्या विकृत श्रद्धेने प्रौढ समाजशास्त्रीय विद्वत्तापूर्ण परिभाषेच्या मुखवट्यामध्ये आपली पावित्र्याची तृष्णा लपविण्यास लावले असेल, तर तो मुखवटा करुणास्पद होय. या मूळ इंग्रजी वाक्यात खरे तर फ्रेंच, ग्रीक भाषेतील सारखे शब्द येतात. तर्कतीर्थ ते पचवत सौंदर्यशाली भाषांतर करतात, हे विशेष.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांचे समग्र साहित्य वाचलेले होते. ते त्यांच्या इंडियन डेमॉक्रॅटिक पार्टीचे सहयोगी कार्यकर्ते होते. इतकेच नव्हे तर या पक्षाने मार्क्सवादास तिलांजली देत डिसेंबर, १९४८ मध्ये भरलेल्या या पक्षाचे विसर्जन करीत नवमानवतावादाची कास धरण्याची जी घोषणा केली, त्या अधिवेशनाचे अध्यक्षच मुळी तर्कतीर्थ होते. त्यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या तीन लेखांची- 'नवमानवतावाद', 'मानवतावादी राजकारण' आणि 'भारतीय नवजीवनाची चळवळ' अशी मराठी भाषांतरे केली आहेत, पैकी दोन लेखांच्याच मूळ इंग्रजी संहिता हाती आहेत. पैकी 'Humanist politics' लेखाच्या भाषांतरात तर्कतीर्थ शब्दश: भाषांतराऐवजी आशयानुवादावर भर देताना दिसतात. तर्कतीर्थांचा हा आशयानुवाद छायानुवाद बनत स्वतंत्र लेखाचे रूप धारण करताना दिसतो. तर्कतीर्थ मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांशी इतके एकरूप झाले होते की, यातले तर्कतीर्थांचे विचार कोणते नि मानवेंद्रनाथांचे कोणते, याची फारकत करणे अभ्यासकाला अवघड होऊन बसते. तर्कतीर्थ आणि मानवेंद्रनाथ रॉय यांचं काया, वाचा, मने अद्वैत म्हणून या भाषांतराकडे पाहता येते. अशी मुक्त भाषांतरे हा तर्कतीर्थांचा छंद नि व्यासंगाचा सुंदर मिलाफ म्हणूनही त्याकडे बघावे लागेल.

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पातील खंड-४ हा 'भाषणसंग्रह' असून, यात 'साहित्य'विषयक भाषणे संग्रहित आहेत. त्यात 'अभिजात साहित्याचे भाषांतर : जोखमीचे कार्य' शीर्षक भाषण जिज्ञासूंनी भाषांतरविषयक तर्कतीर्थांची भूमिका समजून घेण्यासाठी मुद्दाम वाचावे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "भारताच्या संस्कृत प्राकृत अशा आर्यभाषाभगिनी आणि युरोपातील इंग्लिश, फ्रेंच इत्यादी आर्यभाषाभगिनी यांच्या रचनेचे नियम अगदी वेगळे आहेत. त्यामुळे भाषांतर करताना शब्दश: भाषांतरापेक्षा वाक्यार्थ लक्षात घेऊन भाषांतर करणे हे तंत्र भाषांतराची उपयुक्तता वाढविते." या विधानाच्या अन्वयानेच तर्कतीर्थांच्या भाषांतराकडे पाहणे न्यायाचे ठरेल. 'दोन भाषांमधील वाक्यरचनेचे नियम मुळापासून वेगळे असतील, तर भाषांतर करणे फार जोखमीचे ठरते, हे तर्कतीर्थांचे विधान या संदर्भात लक्षात घ्यायला हवे...

ग) वृत्तांत व विचार

१०२) काशी येथील अखिल भारतवर्षीय ब्राह्मण महासंमेलन

काशी येथे दि. २९ ऑक्टोबर, १९२८ ते ७ नोव्हेंबर, १९२८ या काळात अखिल भारतवर्षीय ब्राह्मण महासंमेलन संपन्न झाले. त्याचा सविस्तर वृत्तांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिला. तो इस्लामपूर (जि. सांगली) येथून प्रकाशित होणाऱ्या 'ब्राह्मण' मासिकाच्या जानेवारी-फेब्रवारी, १९२९ च्या अंकात (मार्गशीर्ष, शके १८५०, वर्ष-६, अंक-९) मध्ये पृष्ठ ३ ते २३ वर प्रसिद्ध झाला होता.

या महासंमेलनात धर्मशास्त्राशी संबद्ध सतरा विविध विषयांवर विचार विनिमय झाला. स्त्री-पुरुषांची शास्त्रसंमत विवाहकाल मर्यादा, विवाह कालमर्यादेचे नियम, स्त्रीला ऋतू प्राप्त झाल्यावर होणारा विवाह मुख्य, गौण वा आपद्धर्म म्हणून कशाच्या आधारे समजायचा, कन्या ऋतुप्राप्ती असता वृजस्वल सांगणाऱ्या वचनांचा आशय काय? ब्राह्मण पोटजातीतील विवाह शास्त्रसंमत मानावेत का? धर्मज्ञ कोण? विधवा विवाह वा काडीमोड (घटस्फोट) शास्त्रदृष्ट्या अयोग्य कि योग्य? अस्पृश्यत्व जातीत आहे की कर्मात?, म्लेंच्छ स्पर्शासंबंधी सार्वजनिक स्थानां(विहीर, मंदिर, सभा इ.) संबंधीचे तारतम्य, भागवत धर्मदीक्षा अधिकार कोणाचा? जाती धर्मसिद्ध की कर्मसिद्ध? शूलपाणी संबंधी देवल स्मृती प्रामाण्य, म्लेंच्छ स्पर्शित पतिता शुद्धता, पातक व प्रायश्चित्त विधान, व्रात्यसंस्कार काळ, जाती परिवर्तन हे ते विषय होत.

संमेलनास १५० ब्राह्मण पंडित उपस्थित होते. आठवडाभर चर्चा झाली. महासंमेलनाचे निर्णय बहुमतावर न होता धर्माचार्यांच्या निर्णयावर झाल्याने महासंमेलन देखावाच ठरला. धर्मविरोधी मतप्रदर्शित करणाऱ्याची मते केवळ ऐकली गेली. परिणामी त्यांना टाऊन हॉलमध्ये स्वतंत्र सभा घेणे भाग पडले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या महासंमेलनसंबंधी जो सविस्तर वृत्तांत सादर केला अहे, ते पाहता हे संमेलन केवळ एक फार्स होता हे लक्षात येते. शिवाय शब्द प्रामाण्य, सनातनत्व यापलीकडे हे संमेलन जाऊ इच्छित नव्हते अशी त्याची रचना होती, हेही स्पष्ट होते. यातून धर्मसुधारणा वा परिवर्तन अशक्य असल्याचेही स्पष्ट झाले. संमेलन म्हणजे सनातनत्वावर मोहर इतकेच.

- डॉ. सुनीलकुमार लवटे
संपादक

संदर्भ सूची

1) www.asiatique.com.
२) लवटे, डॉ. सुनीलकुमार : **साहित्य आणि संस्कृती**, अक्षर दालन, कोल्हापूर २०१८. पृ. १८७.
३) संपा. पळशीकर, वसंत : **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार**, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई १९९६ पृ. ५६ (सौ. सत्यवतीची जीवनयात्रा - तर्कतीर्थ जोशी)
४) साळुंखे डॉ. आ. ह. : **मराठी विश्वकोश (खंड-९) : 'पुराणकथा'**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई - १९८०, पृ. ८२८
5) **Eliade MirceaTrans** : Myth and Reality - New York - 1963.
६) संपा. खंडकर अरुंधती : **आद्य शंकराचार्य : जीवन आणि विचार : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९९७, पृ. ६५,
७) संपा. रायकर, सीताराम, पुंडे, द. दि., टापरे पंडित : **साहित्याचे तर्कशास्त्र (तर्कतीर्थ भाषणसंग्रह)**, प्राज्ञपाठशाळा प्रकाशन, वाई, २०१२, पृ. ३८३ (लेखन स्वातंत्र्याचे निर्मळ आकाश)
८) शेवते, अरुण : **कृष्णाकाठचा माणूस**, ऋतुरंग प्रकाशन, गोरेगाव (पूर्व, मुंबई, १ मे, १९९३, पृ. १२१ ('सुसंस्कृत नेतृत्व')
९) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : **ज्योतिचरित्र**, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिली. १९९२, पृ. ८१
१०) जोशी, अनिल : **'केसरी'चे पंचानन (मुलाखत)**, दैनिक केसरी, पुणे दि. ४ जानेवारी, १९८१.
११) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : **मुस्लीम लीगचे नवे तंत्र**, साप्ताहिक चित्रा, दि. १६ जुलै, १९३९ पृ. १७ (पाहा – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, समग्र वाङ्मय, खंड-७)
१२) संपा, गणोरकर, डहाके, दडकर, भटकळ, राजवडे, वरखेडे : **वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश,** ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई- २००१, पृ. ३३७

13) https://www.cbscsamplepapers.info - Biosketch

14) Roy M. N.: **Philosopher-Revolutionary**- Sibhabayah Bay Renaissance Publishers Pvt.Ltd. Calcutta-12 Page -15

१४) अ) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : **प्रशांत आश्रमातील तपस्विनीची हत्या**, नवभारत, फेब्रुवारी १९६१. पृ. १२ ते १५

१५) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : **सेनापती बापटांच्या आत्मयज्ञाचा महोत्सव करा,** साप्ताहिक चित्रा, रविवार, दि.२५ जून १९३९

१६) अ) श्री सोमनाथ तीर्थ- गौतमबुवा पाठक (पिंपळनेरकर), श्री यशवंतराव महाराज मंदिर, नाशिक - जुलै, १९५९

ब) गाडगीळ, काकासाहेब मुलाखत : **सहज संवादातून उभे राहिलेले सोमनाथ मंदिर,** 'नवाकाळ', मुंबई, रविवार, ६ मे १९५१

१७) कर्णिक, द्वा. भ. : **शास्त्रीबुवा आणि रॉयवादी चळवळ,** 'नवभारत', फेब्रुवारी, १९७५ पृ. ११ ते १७

१८) कर्णिक, द्वा. भ : **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**, 'ललित' (दिवाळी), १९८८- पृ.. ३५ ते ४०.

१९) कर्णिक, द्वा. भ. : **चित्ती असो द्यावे समाधान**, अनुभव प्रकाशन, …….. पृ. ५२

20) Roy M. N. : **An Unmatched Political Philosopher** - Anurag Bharadwaj - News Click - https://-lick-in.cnd.ampproject.org | 22 March, 2020

२१) संपा. लवटे डॉ. सुनीलकुमार : **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय, खंड - २ (भाषणसंग्रह- व्यक्ती आणि विचार)** - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई - २०२२

22) https://study com > academy > lesson

२३) संपा. सारंग दर्शने : **ग्रंथांच्या सहवासात**, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, ५ मे, २००९, पृ. ११२ ते ११५

२४) नवभारत : फेब्रुवारी, १९७९. (संपादकीय)

२५) शेवते, अरुण : **कृष्णाकाठचा माणूस**, ऋतुरंग प्रकाशन, मुंबई, १ मे, १९९३ किंवा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय खंड- ६ (मुलाखत संग्रह), मुलाखत. क्र ३१.

ooo

अ)

शोधनिबंध

1.

MATERIAL, CULTURAL AND SOCIAL BASIS OF VEDIC PHILOSOPHIES

(1) Physical geography conditioned the thought processes of early Vedic thinkers who created a pantheistic and idealistic monistic philosophy based on an optimistic world-view. The Vedic culture endowed with an optimistic world-view was the creation of both the delta of seven[1] rivers and the most compact and highest mountain range in the world, i, e. Himalayas. The stupendous chain of the Himalayas over-shadowing and protecting the privileged land of north India secures to it the largest rain fall in the world and feeds most of its great rivers- Indus, Ravi, Sutlej, Yamuna, Ganga and Brahmaputra by storing the moisture in its snow-drifts and glaciers. The bountiful productiveness of the soil feeds and nourishes virgin and gorgeous forests,[2] the immense variety of vegetation, a great many tropical food plants, the cotton plant, various kinds of fruit-trees, timber trees, ornamental plants, and such plants as rice; wheat, barley, indigo and others.[3] The same variety marks the animal creation, both wild[4] and domestic- for instance, elephants, lions, tigers, boars, cows, oxen, asses, buffalloes, sheep, goats, camels, pigs, etc; mineral wealth which pre-eminently associated with the name of ancient India abounds in salt[5], copper,[6] iron, gold, silver and all manner of precious[7] stones as well as various quarries of building stones, marble, slate etc.. Moisture and warmth were well balanced and contributed to the generation and growth of flora and fauna.

(2) *The material and socio-political conditions of Vedic people* :The Aryan martial tribes before their advent in India were agricultural and pastoral communities. After their arrival in India, they conquered this country by stages, settled down in fertile regions and organised themselves in an aristocratic society composed of three classes: priests, warriors and common people in hierarchical order. The Aryas arrived at an early stage of higher culture and could build a social organisation which could promote intellectual advancement hand in hand with material prosperity. They established families firmly and determined various duties of different classes based on division of labour. The noble community, by pastoral and agricultural pursuits continued through many centuries, must have provided milk and food in abundance and as well as meat and wheat. Basically all the regular and occasional rituals of the Vedas mostly comprehend the food and fertility cults supplicating divine forces of nature- Agnyadhana, Agnihotra Homa[8] and Istis as Darsapurnamasa, Agrahayana, Antyesti etc. as well as Somayagas[9] and Pasuyagas, Vajapeya, Asvamedha etc, and indicate their insistance on agricultural and pastoral way of life with political supremacy and fulfilment of this worldly as well as other worldly desires. The constant necessity of guarding against the raids of enemies and ambition for territorial expansion kept their martial spirit intact assisted by art and crafts. They were prompt and skillful in wielding metal weapons forged out of copper and perhaps iron. They could fashion and handle a sort of plough and various agricultural implements and could harness horses for military action, oxen, camels and asses for transport. They could build boats for navigation, houses provided with doors and fortifications for settlements. Their military organisation equipped with sharp weapons and cavalry could domineer the native population which was vanquished owing to their lack of a speedy animal i. e, the horse. The subjugated native inhabitants were assimilated by them in their own social structure according to different status of different strata of their communities. The Aryans owing to the lack of racial prejudice could absorb the native

population in their hierarchical social order according to their different levels of cultural affinities. This can be substantiated evidently by the total racial admixture discernible in the present Indian society on all social levels. During the Vedic antiquity as long as the heroic spirit of the Aryans was fully alive they did not harbour a world-negating pessimistic mood as far as religion and philosophic speculations are concerned.

(3) The three main currents of philosophic speculations. Upanisadic or Vedanta, Sankhyoga and Nyayavaisesika have their origin in the Vedic culture. The first is the direct outcome of Vedic philosophical speculation which is found in early Upanisads; Sankhyayoga, the second is the next stage of philosophical contemplation; and Nyayavaisesika, the third is the further development of Vedic thought; both the latter systems are based on the Vedic material and social sciences i. e. Ayurveda, Jyotisa, Vyakarasa, chandoviciti, Dandaniti and other branches of learning.

(4) There are *two cultural sources* of inspiration discernible in the Upanisadic contemplation. The first is the inner source i. e. the hymns of Rgveda and sacrificial religion of Vedas and the second is an outer source i. e, a pre-Vedic Indian culture which had incorporated three fundamental features Sanyasa, the institution of renunciation; Yoga, the essential part of the way of salvation; and Sansaraduhkhavada, the view that the world is misery. The first source of inspiration is a unitary world-view which is full of vigorous affirmation of worldly life. The pre-Upanisadic Vedic literature generally expresses[10] an aspiration of conquest of earthly and heavenly happiness cherished by the Vedic community. The temple of Vedic sages is universal nature symbolised by the place of sacrifice, the temple where the beneficent and overwhelming forces of nature were deified.[11]

(5) The early Vedie philosophical speculations represented by the Purusasukta, Hiranyagarbhasukta, Tvastrsuktas, Nisadiyasukta, and Atharvana Brahmasuktas as well as Cayana passages of Taittiriyabrahmana and Satapathabrahmana are the result of ritualistie meditation. The cosmos is conceived in them as a divine biological unity or architectural formation or a sacrificial creative scene founded on

unitary world-ground; matter and spirit are conceived as identical reality in essence. In the Upanisads are found the earliest attempts at construing the world of experience as a rational whole. The unitary world-ground is expressed in realistic terms in the first phase of thought-development,[12] in the second in idealistic terms without excluding the realistic or materialistic aspects of universal reality,[13] and in the third merging the material in the idea of the One,[14] the absolute.

The textual oritical study of the early Upanisads reveals that the inner structure of them is composed of heterogeneous material; Taittiriya, Chandogya, Brhadaranyaka, Prasna, Mundaka and Katha for instance contain Vallis, Adhyayas or Khandas which are evidently not continuous writings except Isa, Kena, Mandukya and Aitareya, Brahmavalli and Brguvalli have conceived the universal reality as supreme bliss or joy which is conceived as concretised in the sensible real, food, fertility, prosperity and life.[15] The joy of material and social life is identified with the eternal essence and supposed to be the expression of the supreme bliss.

The ultimate end of life is conceived as the merger of the individual Atman in the universal Atman conceived as the supreme bliss and is equated with immortality.[16] It is nothing more than the mere recognition of the winning of immortality as the result of knowledge of universal oneness which is a transformation of ritual knowledge.[17]

There is no trace of real pessimism in major early Upanisads especially in the Taittiriya, apart from mild expressions of the unsatisfactoriness of the finite compared with the infinite,[18] except in Maitrayaniya and a very few passages of Mundaka and Brhadaranyaka. The anguish oxpressed by Narada in Chandogya and the fear of death and the fear of the divine spirit expressed in some Upanisads is evidently suposed to be an outcome of the original ignorance of the fundamental unity of Atman and Brahman; there is no radical cleavage between the mortal and the immortal as they are essentially phenomenal expressions of the one, the Satccidananda Brahman or Atman taken as the universal essence which could not

be conceived as a development of radical pessimism, a fundamental assumption of Buddhism and later Mayavada. Real pessimism is by no means a characteristic of early Upanisads, as the empirical despair of the world, the main cause of real pessimism is nowhere narrated in the Vedas and early Upanisads.

(6) As the Vedic philosophy in its inception was essentially based on *a world-affirming point of view* the pessimistic tone appearing in some Upanisadic passages indicates the later influence of the pre-vedic cultural tradition. The emancipation theory or the idea of Moksa shows transitory stage connecting the two cultural sources in the earlier optimistic phase of thought. The fear of death did not discourage the minds of Vedic sages. Death was taken by them to be just a threshold opening a passage to a new[19] life. Life essentially was viewed to be the eternal and immortal core of all beings expressed by the term Atman. The cosmos, the microcosm along with the human being, the microcosm is conceived as five-sheathed self, an entity consisting of food, vital breath, mind, understanding and bliss.[20] They believed that the individual self by knowledge acquired by Tapas on departing from this world proceeds on and merges into the corresponding cosmic[21] self. The Purusasukta, Atharvana Brahmasukta and Upanisads conceived organic unity of the universe as a model of Aryan society. The cosmology of Rigveda depicts the universe as a cosmic state ruled by nature gods following the law of Rta. The Brhadaranyaka Upanisad[22] consequently comes to the conclusion that the cosmic state and the state on the earth are both composed of four Varnas-Brahmana, Ksatriya, Vaisya and Sudra and both these are inter-dependent. This myth of cosmic state and human state on earth and their interdependance is a transformed imagery of human experience of permanent and immutable inter-dependence of man and nature.

7. *The rise of material and social sciences* during the later Vedic age, namely, the age of early Upanisads created an intellectual atmosphere congenial to analytical rational thinking which culminated into the

Sankhyayoga and Nyayavaisesika. The material sciences - Jyotisa, Vyakarana, Chandoviciti, and Ayurveda and the social sciences Dandaniti and Dharmasturas - required formulations of rules of debate and hypothesis, the analysis of language and the categories of words in Vyakarana, the ideas of space, time and number in Jyotisa, the classification of things in nature according to their qualities and actions and their actions and reactions on or in the human body described in Ayurveda, the division of social classes according to their pre-dispositions and specific characteristics. All these created an intellectual climate conducive to rational philosophical speculations. The classifications of words of Jatisabdas, Gunasabdas, Karmasabdas and Dravyasabdas and Ayurvedic categories of existence as Samanya, Visesa, Guna, Karma and Dravya and the space, time and number concepts of Jyotisa culminated into Vaisesika metaphysical system as a pluralistic realism. The earlier philosophical development is the Sankhyayoga system which propounded dualist realism in contrast to Upanisadic monism. The evolution of Sankhya dualism can also be traced to the Brahman theory of Taittiriya Upanisad in which Brahman is contemplated as a unitary principle evolved in duel manifestation, conscious and unconscious or understanding and non-understanding, Vijnanan Cavijnanan Ca.

8. The Vedic philophies, owing to *the deep impact of the pre-Vedic culture*, borrowed its philosophy of life founded on the theory of eternal bondage of Karma and emancipation i. e. Moksa with certain modifications. According to the Upanisads,[23] for instance, Karma performed along with appropriate knowledge does not bind the performer; and according to the Bhagavadgita,[24] Karma done with detachment can be equated with the absence of Karma. The sociological conditions characteristic of a closed society which began to prevail at the end of the Vedic age were responsible for the inception of the idea of eternal bondage and the ideal of emancipation; rigid social customs in the form of positive and negative restrictions viewed as sacred were inviolable; it was a huge burden on the minds of individuals, families and groups in

the society; they were to be accepted by everybody without questioning their authority. The psycological climate of the closed ancient Indian societies gave birth to the institutions of Vanaprastha and Sannyasa, and the individuals who accepted the way of life of Vanaprastha or Sannyasa could escape from the rigid restrictions. The ancient Indians have idealised and hypostatised the restrictions and duties in the form of eternal bondage of Karma as a cosmic force and visualised the ultimate ideal of Moksa, emancipation from the bondage beyond phenomenal existence.

The early Upanisads combined both the philosophies of life, Vedic and pre-Vedic and consequently adopted the institutions of Vanaprastha and Sannyasa as optional alternatives of the life of household Grhasthasrama without underminig its equal value for Moksa. For instance, the king Janaka and the priestly sage Yajnavalkya who achieved the ultimate end of Moksa were ideal persons representing perfect household and Sannyasa respectively. The Yoga tradition which was also quite consistent with and similar to the sacrificial contemsplation as Upasana was absorbed in the Vedic principle of way of life. The only extraneous element, Duhkhavada the theory that all is misery-which is borrowed by the later Vedanta, Sankhyayoga and Nyayavaisesika obviously remained inconsistent with the structure of the systems; the theory that all is misery, Sarvam Duhkham, cannot be correlated with the idea of Satva, the intrinsic constituent of the universal nature (Prakrti) and with Dharma-theory of Nyayavaisesika as well as with the theory of Brahman as pure bliss (Ananda) immanent in the universal phenomenon as described in the original Vedanta.

Referances

(1) The earth's eight points his brightness hath illumined, three desert regions and the Seven Rivers.
God Savitar the gold-eyed hath come hither, giving choice Jewels unto him who worships. (Rgveda- 1-35-8)
All sacrificial viands wait on Agni as the Seven mighty Rivers seek

the ocean.

Not by our brethren was our food discovered: find with the Gods care for us, thou who knowest. (Rgveda- 1-71-7).

ALLIED with thee, in this thy friendship, Soma, Indra for man made waters flow together,

Slew Ahi, and sent forth the Seven Rivers, and opened as it were obstructed fountains. (Rgveda-4-28-1)

The singer, O ye Waters in Vivasvan's place, shall tell your grandeur forth that is beyond compare. The Rivers have come forward triply, seven and seven. Sindhu in might surpasses all the streams that flow. (1)

Varuna cut the channels for thy forward course, O Sindhu, when thou rannest on to win the race.

Thou speedest o'er precipitous ridges of the earth, when thou art Lord and Leader of these moving floods. (2)

His roar is lifted up to heaven above the earth: he puts forth endless vigour with a flash of light.

Like floods of rain that fall in thunder from the cloud, so Sindhu, rushes on bellowing like a bull. (3)

Like mothers to their calves, like miloh-kine with their milk, so, Sindhu, unto thee the roaring rivers run.

Thou leadest as a warrior king thine army's wings what time thou comest in the van of these swift streams. (4)

Favour ye this my laud, O Ganga, Yamuns, O Sutudri, Parusni, and Sarasvati:

With Asikn1, Vitasta, O Marudvrdha, O Arjikiya with Sushoma hear my call. (5)

First with Trstam thou art eager to flow forth, with Ras, and Susartu, and with Svetys here.

With Kubha; and with these, Sindhu I and Mehatnu, thou seekest in thy course Krumu and Gomati. (6)

Flashing and whitely-gleaming in her mightiness, she moves along her ample volumes through the realms.

Most active of the active, Sindhu unrestrained, like to a dappled mare, beautiful, fair to see.(7)

Rich in good steeds is Sindhu, rich in cars and robes, rich in gold, nobly-fashioned, rich in ample wealth.

Blest Silamavati and young Urnavati invest themselves with raiment rich in store of sweets.(8)

Sindhu hath yoked her car, light-rolling, drawn by steeds, and with that car shall she win booty in this fight.

So, have I praised its power, mighty and unrestrained, of independent glory, roaring as it runs. (Rgveda: 1-75-(1.9)

His, through his might, are these snow-covered mountains, and men call sea and Rasa his possession :

His arms are these, his are these heavenly rigions. What God shall we adore with our oblation? (Rgveda: 10-121-4)

Let Anca, Bhaga, Varuna, Mitra, Aryaman, Aditi - let the, Maruts protect (us); may the hatred of that injurer pass away, repel the foe from near by. (Atharva-Veda-Samhita : 6-4-2)

They flow forth from the snowy (mountain); in the Indus somewhere (is their) gathering; may the heavenly waters give to me that remedy for heart-burn. (Atharva-Veda-Sambita : 6-24-1).

(2) The Goddess never alays, unless some murderous enemy approach. Man eats of savoury fruit and then takes, even as he wills, his rest. Now have I praised the Forest Queen, sweet-scented, redolent of balm, The Mother of all sylvan things, who tills not but hath stores of food.

(Rgveda- 10-146-5,6).

(3) Rich in milk (are) the herbs, rich in milk my utterance (vacas): accordingly, of them that are rich in milk I bring by thousands.

(Atharva-Veda-Sambita 3-24-1);

There are ten cultivated grain (used): rice and barley, sesamum, and beans, millet and panic, and wheat, and lentils, and pulse, and vetohes. These, when they have been ground, one sprinkles with

ourdled milk, honey, and ghee; and one makes an oblation of melted butter.

(Brhad-Aranyaka: 6-3-13)

(4) To us and to our cattle may Soma give salutary food, To biped and to quadruped.

(Rgveda: 3-62-14)

From that great general sacrifice the dripping fat was gathered up. He formed the creatures of the air, and animals both wild and tame.

(Rgveda, 10-90-8)

The track (pada) of Ida (is) full of ghee, greatly trickling; O Jatavedas, accept thou the oblations. The cattle of the village that are of all forms- of those seven let the willing stay (ramti) be with me.

(Atharvaveda Samhita, 3-10-6)

The gods have turned away from old age; thou, O Agni, away from the niggard; I away from all evil(have turned), away from Yaksma, to union (sam) with life- time. (Atharvaveda Samhita 3-31-1)

Four times (cstus) nomage, eight times, to Bhava; ten times, O Lord of cattle, be homage to thee; thine are shared out these five creatures (paou)- cows, horses, men, sheep and goats.

(Atharvaveda Samhità: 11-2-9)

To thee are assigned the forest animals (paou), the wild beasts in the woods, the geese (hansa), engles, hawks, birds; thine, O lord of cattle, is the monster (2yaksa) within the waters, for thine increase flow the waters of the heaven. (Atharvaveda Samhits : 11-2-24)

The dolphines (cinoumara), boas (ajagara), purikäyas, jashas, fishes, rajasas, at which thou hurlest there is no distance for thee nor hindrance for thee, O bhava; at once thou lookest over the whole earth; from the eastern thou smitest in the northern ocean. (Atharvaveda: 11-2-25)

There are three animals which take by the hand, man, the elephant, and the ape. (Taittiriya Samhità 6-4-5-7)

(5) More deciduous (pl) than the deciduous one, more non-existent than the non-existent ones, more sapless than the sahu, more dissolving than salt. (Atharvaveda Samhita. 7-76-1)

So, as one would mend gold with borax-salt, silver with gold, tin with Silver, lead with tin, iron with lead, wood with iron or with leather. (Chandogya 4-17-7)

It is- as a lump of salt cast in water would dissolve right into the water; there would not be (any) of it to seize forth, as it were (iva) but wherever one may take, it is salty indeed- so, lo, verily, this great. Being (Bhuta), infinite, limitless, is just a mass of knowledge (Vijnana ghana) (Brhad-Arayanyaka: 2-4-12)

(6) May for me the stone, clay, hills, mountains, sand, trees, gold, bronze, lead, tin, iron, copper, fire, water, roots, plants, what grows on ploughed land, what grows on unploughed land, tame and wild cattle prosper through the sacrifice; may for me wealth and gaining wealth, attainment and attaining, riches, dwelling, aot, power, aim, strength, moving and going (prosper through the sacrifice). (Taittiriya Samhita-4-7-5)

(7) Vouohsafe us wealth, to him who pours thrice seven libations, yea, to each.

Give Jewels, pleased with our eulogies. (Rgveda: 1-20-7)

The earth's eight points his brightness hath illumined, three desert regions and the Seven Rivers.

God Savitar the gold-eyed hath come hither, giving choice Jewels unto him who worships. (Rgveda- 1-35-8)

(8) Then he said to them: 'Verily, indeed, you here eat food, knowing this Universal Atman (Soul) as if something separate. He, however, who reverences this Universal Atman (Soul) that is of the measure of the span- thus, (yet) is to be measured by thinking of oneself- he eats food in all worlds, in all beings, in all selves. 1.

The brightly shining (heaven) is indeed the head of that Universal Atman (Soul). The manifold (sun) is his eye. That which possesses

various paths (i. e. the wind) is his breath. The extended (space) is his body. Wealth (i. e. water) is indeed his bladder. The support (i.e. the earth) is indeed his feet. The sacrificial area is indeed his breast. The sacrificial grass is his hair. The Garhapatya fire is his heart. The Anvaharyapacana fire is his mind. The Ahavaniya fire is his month. 2. (Chandogya 5-18)

If one offers the Agnihotra (fire) sacrifice without knowing this-that would be just as if he were to remove the live coals and pour the offering on ashes, 1.

But if one offers the Agnihotra sacrifice knowing it thus, his offering is made in all worlds, in all being, in all selves, 2.

So, as a rush-reed laid on a fire would be burned up, even so are burned up all the evils of him who offers the Agnihotra sacrifice knowing it thus. 3.

And therefore, if one who knows this should offer the leavings even to an outcast (candala), it would be offered in his Universal Atman (Soul). As to this there is the following verse-

'As hungry children sit around.
About their mother here in life,
E'en so all beings sit around
The Agnihotra sacrifice.' 4. (Chandogya 5-24)

(9) Among the Kurus, when they were struck by hailstorms, there lived in the village of a rich man a very poor man, Usasti Cakrayana, with his wife Atki. 1.

He begged of the rich man while he was eating beans. The latter said to him: 'I have no others than these which are set before me'. 2.
'Give me some of them,' said he.
He gave them to him and said. 'Here is'drink.'
'Verily, that would be for me to drink leavings!' said he, 3.
Are not these (beans) also leavings?'
'Verily, I could not live, if I did not eat those,' said he. 'The drinking of water is at my will.' 4.

When he had eaten, he took what sill remained to his wife. She had already begged enough to eat. She took these and put them away. 5.

On the morrow he arose and said: ‘Oh, if we could get some food, we might get a little money! The king over there is going to have a sacrifice performed for himself. He might choose me to perform all the priestly offices.’ 6.

His wife said to him: ‘Here, my lord, are the beans’. He ate them and went off to that sacrifice, which had already been begun, 7.

There he approached the Udgatr priest as they were about to sing the Stotra in the place for the singing. Then he said to the prastotr priest : 8.

'Prastotr priest, if you shall sing the prastava (Introductory praise) without knowing the divinity which is connected with the prastava, your head will fall off.’ 9.

Similarly also he said to the Udgatr priest: ‘Udgatr priest, if you shall chant the Udgitha (Loud Chant) without knowing the divinity which is connected with the Udgiths, your head will fall off.’ 10.

Similarly also he said to the Pratihartr priest: ‘Pratihartr priest, if you shall take up the Pratihara (Responso) without knowing the divinity which is connected with the Fratihära, your head will fall off.’

Then they ceased and quietly seated themselves. 11.

(Chandogya 1-10)

Then the insitutor of the sacrifice said to him: ‘Verily, I would wish to know you, Sir.’

‘I am Usasti Cakrayana', said he. (1)

Then he (i. e. the institutor) said: ‘Verily. I have been searching around for you, sir, for all these priestly offices: Verily, not finding you, Sir, I have chosen others.' (2)

'But do you, Sir, perform all the priestly offices for me.'

‘So, be it,’ said the (iti). ‘But in this matter (tarhi) let these indeed,

being permitted, sing the Stotra; but you should give me as much money as you would give them.

'So be it', said the institutor of the sdcrifice. (8)

Then the Prastotr priest approached him and said, 'You, Sir, said unto me: "Prastotr priest, if you shall sing the Prastava without knowing the divinity which is connected with the Prastava, your head will fall off,' 'which is that divinity?' (4)

Breath (Prana), 'said he'. Varily. Indeed, all belogs hope enter (into life) with breath and depart (from life) with breath. This is the divinity connected with the Prastava. If you had sung the Prastava without knowing it, your head would have fallen off, after you had been told so by me. (5)

Then the Udgatr priest approached him and : 'You, Sir, said unto me: "Udgåtr priest, if you shall chant the Udgitha without knowing the divinity which is connected with the Udgitha, your head will fall off." Which is that divinity?' (6)

'The Sun,' said he. 'Verily, indeed, all beings here sing (gayanti) of the sun when he is up (uccais). This is the divinity. connected with the Udgitha. If you had chanted the Udgitha without knowing it, your head would have fallen off after you had been told so by me. (7).

Then the Pratihartr priest apprnoched him and said: 'You, Sir, said unto me: "Pratihartr priest, if you shall take up the Pratihara without knowing the divinity which is connected with the Pratihara, your head will fall off." Which is that divinity? (8)

'Food', said he. 'Verily, indeed, all beings here live by taking up to themselves (Pratiharamana) food. This is the divinity connected with the Pratihars. If you had taken up the Pratihara without knowing it, your head would have fallen off, after you had been told so by me.' (9) (Chandogya- 1-11)

(10) To him who worships Soma gives the milch-cow, a fleet steed and a man of active knowledge,

Skilled in home duties, meet for holy synod, for council meet, a glory to his father. (Rgveda: 1-91-20)

To him the Hero, on high days of prowess, heroes for help and booty shall betake them.

He hath found light even in the blinding darkness. May Indra, girt by Maruts, be our succour. (Rgveda- 1-100-8)

He with his left hand oheoketh even the mighty and with his right hand gathereth up the booty.

Even with the humble he acquireth riches. May Indra, girt by Maruts, be our succour. (Rgveda 1-100-9.)

May Indra evermore be our protector, and unimporilled may we win, the booty.

This prayer of ours may, Varuna grant, and Mitra, and Aditi and Sindhu, Earth and Heaven. (Rgveda: 1-100-19)

OPavamana, place me in that deathless, undecaying world wherein the light of heaven is set, and everlasting lustre shines, Flow, Indu, flow for Indra's sake. (Rgvoda 9-113-7)

Make me immortal in that realm where dwells the King, Vivasvan's Son, Where the secret shrine of heaven, where are those waters young and fresh. Flow, Indu, flow for Indra’s sake. (Rgveda: 9-113-8)

Make me immortal in that realm where they move even as they list, In the third sphere of inmost heaven where lucid worlds are full of light. Flow, Indu, flow for Indra's sake. (Rgvoda 9-118-9.)

Make me immortal in that realm of eager wish and strong desire, The region of the radiant Moon, where food and full delight are found.

Flow, Indu, flow for Indra's sake. (Regveda 9-118-10)

(11) To drink the Soma, Agni, come, come to our service and our songs. With all these Gods; and worship them. (Rgveda: 1.14. 1)

The Kanvas have invoked thee; they, O Singer, sing thee songs of praise:

Agni, come hither with the Gods; (Regveda 1. 14. 2).

Indra, Vayu, Brhaspati, Mitra, Agni, Pusan, Bhaga, Adityas and the Marut host. (Rgveda 1. 14. 8)

Adored, the strentheners of Law, unite them, Agni, with their Dames: Make them drink meath, O bright of tongue. (Rgveda : 1. 14. 7)

Let them, O Agni, who deserve worship and praise drink with thy tongue.

The meath in solemn sacrifice. (Rgveda 1. 14. 8)

Away, from the Sun's realm of light, the wise invoking Priest shall bring.

All Gods awaking with the dawn. (Rgveda: 1. 14. 9).

With all the Gods, with Indra, with Vayu, and Mitras splendours, drink.

Agni, the pleasant Soma juice. (Rgveda: 1. 14. 10)

(12) Understand from me, my dear, hunger (asana) and thirst. When a person here is hungry (asisisati), as it is called, just water is leading off (nayanti) that which has been eaten (**as). So, as they speak of "a leader-of-cows" (go-naya), "a leader-of horses" (asva-naya), "a leader-of-men" (Purusanaya.), so they speak of water as "a leader-of-food (asa-naya, hunger),

On this point, my dear understand that this (body) is asprout which has sprung up. It will not be without a root.

What else could its root be than food? Even so, my dear, with food for a sprout, look for water as the root. With water, my dear, as a sprout, look for heat as the root. With heat, my dear, as a sprout, look for Being as the root. All creatures here, my dear, have Being as their root, have Being as their home, have Beings as their support.

Now, when a person here is thirsty, as it is called, just heat is leading off that which has been drunk. So, as they speak of "a leader of cows" (go-naya), "a leader of- horses" (asva-naya), "a leader-of-men" (purusa-naya), so one speaks of heat as "a leader-of-water" (Uda-nya, thirst).

On this point, my dear, understand that this (body) is a sprout

which has spring up. It will not be without a root. where else could its root be than in water? With water, my dear, as a sprout, look for heat as the root. With heat, my dear, as a sprout, look for Being as the root. All creatures here, my dear, have Being as their root, have Being as their abode, have Being as their support.

But how, verily, my dear, each of these three divinities, upon reaching man, becomes threefold, has previously been said.

When a person here is deceasing, my dear, his voice goes into his mind; his mind, into his breath; his breath, into heat; the heat, Into the highest divinity. That which is the finest essence- this whole world has that as its soul. That is reality (satya). That is Atman (soul). That art thou Svetaketu.

"Do you, Sir, cause me to understand even more !"

So be it, my dear' said he. (Chandogya- 6-8-3,4,5,6,7)

(13) This Soul (Atman) is honey for all things, and all things, are honey for this Soul. This shining, immortal Peron who is in this Soul, and, with reference to oneself, this shining. Immortal Person who exist as Soul he is just this Soul, this Immortal. This Brahma, this All.

Verily, this Soul is the overlord of all things, the king of all things. As all the spokes are held together in the hub and felly of a wheel, just so in this Soul all things, all gods, all worlds, all breathing things, all selves are held together. (Brhadaranyaka-2-5-14, 15)

As a spider emits and braws in (its thread),
As herbs arise on the earth,
As the hairs of the head and body from living person,
So from the Imperishable arises everything here. (Mundaka-1-1-7)
By austerity (tapas) Brahma becomes built up,
From that, food is produced; From food-life breath, mind, truth.
The worlds, immortality too in works. (Mundaka- 1-1-8)
He who is all-knowing, all wise,
whose austerity consists of knowledge-
From Him are produced the Brahma here,

(Namely) name and form, and food. (Mundaka- 1-1-9)

(14) By the mind alone is It to be perceived.

There is on earth no diversity.

He gets death after death,

Who perceives here seeming diversity.

As a unity only is It to be looked upon -

This indemostrable, enduring Being,

Spotless, beyond space,

The unborn Soul, great, enduring.(Brhadaranyaka 4-4-19, 20)

Brahmanhood deserts him who knows Brahmanhood in aught else than the Soul. Ksatrahood deserts him who knows Katrahood in aught else than the Soul. The worlds desert him who knows the worlds in aught else than the Soul. The gods desert him who knows the gods in aught else than the Soul. The Vedas desert him who knows the Vedas in aught elso than the Soul. Beings desert him who knows beings in aught else than the Soul. Everything deserts him who knows everything in aught else than the Soul. This Brahmanhocd, this Ksatrahood, these worlds, these gods, these Vedas, all these Beings, everything here is what this Soul is. (Brhadaranyaka: 4-5-7)

(15) Om! He who knows Brahma, attains the highest I.

As to that this (verse') has been declared :-

He who knows Brahma as the real (satya), as knowledge (jnana), as the infinite (ananta),

Set down in the secret place (of the heart), and in the highest heaven (parame vyoman)),

He obtains all desires.

Together with the intelligent (vipafoit) Brahma.

From this Soul (Atman), verily, space (Akasa) arose; from space, wind (vayu); from wind, fire; from fire, water; from water, the earth; from the earth, herbs; from herbs, food; from food, semen; from semen, the person (purusa).

This, verily, is the person that consists of the essence of food.

This, indeed, is his head; this, the right side; this, the left side; this, the body (atman); this, the lower part, the foundation.(Taittiriya Upanisad 2-1)

In the beginning, verily, this (world) was non-existent.
Therefrom, verily, Being (sat) was produced.
That made itself (svayam akuruta) a Soul (Atman).
Therefore it is called the well-done (sukrta).

Verily, what that well-done is that, verily, is the essence (rasa) (of existence). For truly, on getting the essence, one becomes blissful. For who indeed would breath, who would live, if there were not this bliss in space! For truly, this (essence) causes bliss. For truly, when one finds fearlessness as a foundation in that which is invisible, bodiless (an-atmya), undefined, non-based, then he has reached fearlessness. When, however, one makes a cavity, an interval therein, then he comes to have fear. But that indeed is the fear of one who thinks of himself as a knower. (Taittiriya Upanisad-2.7)

he understood that Brahma is bliss (ananda). For truly, indeed. beings here are born from bliss, when born they live by bliss, on deceasing they enter into bliss.

This is the knowledge of Bhrgu Varuni, established in the highest heaven. He who knows this, becomes established. He becomes an eater of food, possessing food. He becomes great in offspring, in cattle, in the splendor of sacred knowledge, great in fame.
One should not blame food. That is the rule.

Breath (prana), verily, is food. The body is an eater of food. The body is established on breath; breath is established on the body. So food is established on food.

He who knows that food which is established on food, becomes established. He becomes an eater of food, possessing food. He becomes great in offspring, in cattle, in the splendor of sacred knowledge, great in fame.

One should not despise food. That is the rule.

Water, verily, is food. Light is an eater of food. Light is established on water; water is established on light. So food is established on food.

He who knows that food which is founded on food, becomes established. He becomes an eater of food, possessing food. He becomes great in offspring, in cattle, in the splendor of sacred knowledge, great in fame.

One should make for himself much food. That is the rule.

The earth, verily, is food. Space is an eater of food, Space is established on the earth; the earth is established on space. So food is established on food.

He who knows that food which is established on food, becomes established. He becomes an eater of food, possessing food. He becomes great in offspring, in cattle, in the splendor of sacred knowledge, great in fame. (Taittiriya Upanisad 8.6-9)

(16) As pure water poured forth into pure,

Becomes the very same, So becomes the soul (atman), O Gautama,

Of the seer (muni) who has understanding. (Katha 4-15)

A Person of the measure of a thumb is the inner soul (antaratman)

Ever seated in the heart of creatures.

Him one should draw out from one's own body.

Like an arrow-shaft out from a reed, with firmness.

Him one should know as the Pure, the Immortal-

Yea, Him one should know as the pure, the Immortal (Katha 6-17)

(17) Now, he who on all beings,

Looks as just (eva) in the Self (Atman),

And on the Self as in all beings,

He does not shrink away from Him. (Isa-6)

In whom all beings.

Have become just (eva) the Self of the discerner-
Then what delusion (moha), what sorrow (Soka) is there,
Of him who perceives the unity 1(Isa-7)
What is soundless, touchless, formless, imperishable,
Likewise tasteless, constant, odourless,
Without beginning, without end, higher than the great, stable -
By discerning That, one is liberated from the mouth of death. (Katha-3-15)

(18) Such a one am I, Sir, knowing the sacred sayings (mantravid), but not knowing the Soul (Atman). It has been heard by me from those who are like you, Sir, that he who knows the Soul (Atman) crosses over sorrow. Such a sorrowing one am I, Sir. Do you, Sir, cause me, who am such a one, to cross over to the other side of sorrow.

To him he then said: 'Verily, whatever you have here learned, 'verily, that is mere name (naman) (Chandogya 7-1-3)

'Verily, I plenum is the same as Pleasure. There is no Pleasure in the small. Only a Plenum is Pleasure. But one must desire to understand the Plenum (Bhuman).'

'Sir, I desire to understand the Plenum.' (Chandogya : 7-23)

'Where one, sees nothing else, hears nothing else, understands nothing else- that is a Plenum. But where one sees something else that is the small. Verily, the Plenum is the same as the immortal; but the small is the same ns the mortal.'

"That Plenum, Sir- on what is it established?"

"On its own greatness- unless, indeed, not-on greatness at all.

Here on earth people call cows and horses, elephants and gold, alaves and wives, fields and abodes" greatness. " I do not speak thus; I do not speak thus, said he;" for (in that case) one thing is established upon another. (Chandogya 7-24)

Then said Maitreyi: If now, Sir, this whole earth filled with wealth were mine, would I be immortal there by?"

'Non, said Yajnavalkya.' As the life of the rich, even so would your

life be. Of immortality, however, there is no hope through wealth.

Then said Maitreyi : 'What should I do with that through which I may not be imortal? What you know, Sir- that, indeed, tell me !" (Brhadaranyaka 2.4.2.3)

(19) The Sun receive thine eye, the Wind thy spirit; go, as they merit is, to earth or heaven.

Go, if it be thy lot, unto the waters; go; make thine home in plants with all thy members.

Thy portion is the goat: with heat consume him; let thy fierce flame, thy glowing splendour, burn him.

With thine auspicious forms, 0 Jatavedas, bear this man to the region of the pious.

Again, O Agni, to the Fathers send him who, offered in thee', goes with our oblations.

Wearing new life let him increase his offspring let him rejoin a body, Jatavedas. (Rgveda- 10-16-3, 4,5.)

Guard of the world, whose cattle ne'er are injured, may Pusan bear thee hence, for he hath knowledge.

May he consign thee to these Fathers' keeping, and to the gracious Gods let Agni give thee.

May Ayu, giver of all life, protect thee, and boar thee forward on the distant pathway.

Thither let savitar the God transport thee, where dwell the pious who have passed before thee.

Pusan knows all these realms: may be conduct us by ways that are most free from fear and danger.

Giver of blessings, glowing, all-heroic, may he, the wise and watchful, go before us. (Rgveda- 10-17-3,4,5)

(20) Taittirlya Upanisad 2.

(21) Taittiriya Upanisad 3.

(22) Brhadärapyaka Upanisad- 1-4-11, 12, 13, 14, 15

(23) Verily, he is the great, unborn Soul, who is this (person) consisting

of knowledge among the senses. In the space within the heart lies the ruler of all, the lord of all, the king of all. He does not become greater by good action nor inferior by bad action. He is the lord of all, the overlord of beings, the protector of beings. He is the Separating dam for keeping these worlds apart.

Him (who knows this) these two do not overcome- neither the thought "Hence I did wrong," nor the thought "Hençe I did right". Verily, he overcomes them both. What he has done and what he has not done do not affect him.(Brhadarnyaka: 4-1-22)

This very (doctrine) has been declared in the verse :

This eternal greatness of a Brahman,
Is not increased by deeds(Karma), nor diminished.
One should be familiar with it. By knowing it,
One is not stained by evil action.

Therefore, having this knowledge, having become calm, subdued, quiet, patiently enduring, and collected, one sees the Soul just in the soul. One sees everything as the Soul. Evil does not overcome him; he overcomes all evil. Evil does not burn him; he burns all evil. Free from evil, free from impurity, free from doubt, he becomes a Brahman. (Brhadaranyaka: 4-4-23)

(24) He who seeth inaction in action, and action in inaction, he is wise among men, he is harmonious, even while performing all action. (Bhagavad-gita: 1-18)

He who acteth, placing all actions in the ETERNAL, abandoning attachment, is unaffected by sin as a lotus leaf by the water. (Bhagavadgita 5-10).

(Paper to be read at the seminar on Historical Models In The Study Of Tradition And Change In India, to be held at Simla between October 19 to October 26, 1969; under the auspicies of Indian Institute of Advanced Study.)

❍❍❍

2.

The Cosmic State and the Collective Kingship of Vedic Gods

The discussion is primarily based on the hymns of Adityas occuring in the Rgveda, particularly the hymns 2-27. The hymns of the Rgveda except the 10th mandala are mostly polytheistic and invoke the great Gods Agni, Indra, Mitra, Varuna, Savitr, Aryaman, Visnu, Amsa, Bhaga, Pusan, Matariswan. Rudra and others as Kings (Rajanah) (Rv. 1-41-3; 1-22-11; 2-27 etc). The term 'samraj' is also used as an epithet in singular, duel or plural according to the substantive, for instance, Indra, Mitravarunau, and Adityan. The term 'samraj' is translated as 'imperial lord' (Rv. 1-71-1) or 'Sovereign Ruler' (Rv. 4-19-2) by Griffith and as 'Sovereign emperor' by Macdonel and Keith (Vedic Index II, 221). Keith moreover translates the word 'samraj' as 'Universal Monarch' as an epithet of Varuna elsewhere (Religion and Philosophy of the Veda p. 96). Monier Williams also who otherwise generally follows the etymological and philological method gives only the conventional meaning of 'samraj' as "a universal or supreme ruler (a N. of Varuta, the Adityas, Indra, Manu etc.) Rv. Vs; SBr; Vp; a sovereign lord, paramount sovereign (of men); one who rules over other princes and has performed the Rajasuya sacrifice: Rv. etc." These Vedic scholars do not take into account Sayana's more appropriate commentary which, leaving aside the conventional meaning of the epithet 'samraj' which occures 36 times and 'samrajya' 5 times in Rgveda, takes recourse to etymological meanings to interpret them. According to him

the prefix 'sam' Means 'samyak' or 'samichina' i. e. in right manner and 'raj' means rajamana i. e. shining one or 'iswara' i. e. controller or ruler. Sayana only in the context of Varuna in one place (Rv. 7-6-1) interprets the term samraj as the ruler of all existence. He interprets the epithet by taking both the meanings simultaneously as alternatives or either of them. The epithets 'Raj', 'Rajan', 'Samraj' and 'Swaraj' according to him are derived from the root 'Raj' denoting two meanings to govern or shine.

The word 'Sam' as prefix to verbs and verbal derivations means primarily (a) with, together with, together, along with and expresses 'conjunction' 'union', e. g. 'sam-yuj', 'to join together'; 'sam-dha', 'to place together', 'sam-gam', 'to go or come together'; join or unite with', 'Sam-gai' 'to sing together'; 'Samgita' 'song sung by many voices'; or singing accompanied by instrumental music, a chorus. a concert, (b) Sometimes the prefix intensifies the meaning of the simple root and may be translated as 'very' 'thoroughly' as Sayana has rendered with respect to the term 'Samraj'. However, to my mind, in the context of the gods of the Rgveda the epithet 'samraj' means a co-king or a king or ruler governing along with others on the basis of equality. The universe is considered by the Vedas, particularly by the Rgveda-seers, as a cosmic state, as a society organized and ruled on the principles of law. The physical world is conceived as a unified whole where, there rules a regular order called Rta. Rta is observed repeatedly, Rta is law; e. g. the dawns arise in the morning regularly; the seasons succeed one by one; the year is supposed to be a wheel of Rta with twelve spokes; Agni, the fire, which is hidden in the waters and plants, is produced for man from out of the kindling sticks, becomes the shoot of Rta, born in the Rta, The streams flow in obedience to the law of Rta.

The word Rta is employed with primary, secondary and tertiary meanings in the hymns. The word was used originally to express the regular movement of the sun and of all the heavenly bodies. It is a participle of the verb. 'R' which conveys the sense as fixed path followed in going or right path; the second meaning is vedic sacrifice, because the ancient sacrifices depended on the course of the sun, and were to be

practised according to the strict time-table. There are many more shades of meaning conveyed by Rta: ultimately Rta came to express all that is right, good and true.

All major gods are supposed by the Rgveda to be equal before the supreme law; their constant function is protection of the law. The law-governed universe of the Rgveda looks like a commonwealth, a republic, a form of Government without a monarch, in which supreme power is vested in the representatives elected by all the gods unanimously. This is indicated in the following verses of the Rgveda:

"There is not, in our knowledge one who passeth Indra in his strength:

In him the Gods have stored manliness, insight, power and might, lauding his own kingly way" (Rv. 1-80-15),

"Thee, verily, O Thunder-wielding Indra, all the gods here, the Helpers swift to listen, and both the worlds elected thee the Mighty, High, Waxen strong, alone to slaughter Vrtra" (Rv. 4-19-1)

"Thee, Agni, had the Gods made the first living one for living man, Lord of the house of Nahusa.

All they made the teacher of the sons of men, what time a son was born to the father of my race" (Rv. 1-31-11),

"Thou, Agni, art a cheering Priest, Lord of House, men's messenger:

all constant high decrees establisbed by the Gods, gathered together, meet in thee" (Rv. 1-36-5).

"Him, messenger of earth and head of heaven, Agni Vaisvanara, born in holy Order, Thee Sage, the king, the guest of men a vessel fit for their mouth, the Gods have generated" (Rv. 6-7-1).

"As all the Gods in their great joy and gladness gave you with one accord your high dominion,

As ye (Mitra-Varuna) surround both worlds, though wide and spacious, your spies are over true and neer bewildered" (Rv. 6-67-5).

"O, Indra-Varuna, mighty and very rich! One of you is called Samraj and One Swaraj.

All Gods in the most lofty region of the air have. O ye Steeds combined all power and might in you" (Rv. 7-82-2).

"These wait upon his loftiest power and vigour; he dwells in these who triumph in their God-head;

And thee, like people who elect their ruler, have in abhorrence turned away from Vrtra" (Rv. 10-124-8).

All the vedic gods are conceived as anthropomorphic and are mentioned as having the head, face, mouth, hair, arms, hands, feet and other members. They wear garments; they as warriors often are represented as wearing coats of mail, and wearing weapons such as the bow, the spear, the battle-axe. Indra the divine warlord is marked out by his constant association with thunderbolt Vajra. All the Gods, too, have luminous chariots. They live together in the highest heaven, and together they come when invoked to the offering, or, remaining in the heaven they receive the oblations which are brought to them by the god Agni, the messenger between men and the gods. Their food is almost the same, milk, melted butter, barley, oxen, goats and sheep though some gods have special preference for food; so Indra prefers bulls and posan mush. They enjoy together Soma-drink by which they won immortality. They govern by consensus and live in harmony, peace and friendship; although Indra alone.

All the translations of the Rgveda verses here are quoted from Griffith's translation. However, the translation of the word Swaraj is changed by me. Sometime breaks harmony of the heaven in anger until his anger is appeased. But, in general, gods are endowed, with the same attributes of might, light, goodness, nobility, and generosity. They are reckoned as individuals anthropomorphically although most of them have the common parent the goddess Aditi or Dyaus or the east. General tendency of the Rgveda-seers is to diminish the differences in two stages between deities including even those whose natural basis is different: first stage is towards unification by forming dual deities like Agni-Soma, Indra -Vayu, Indra-Agni, Indra-Pusan, Indra-Brhaspati, Indra-Varana, Indra-Visnu, Indra-Soma, Mitra-Varuna, Soma-Pusan, Soma-Rudra and Parjanya-Vata, and the second stage is towards identification and merger. For the sake of identification and merger, firstly, they have

tried to comprehend all the gods by one common name 'Visve devah'; and secondly by merging gods into each other e. g. Indra and Agni in Surya, the sun, Savitr with Mitra, and Pusan and Indra with Varuna. The tendency for merger was steadily growing throughout the period of the Rgveda, as the seers began to regard the gods as phenomena of the supernatural power. Thus a poet says, 'Thou, at birth O Agni, art Varuna, then kindled thou dost become Mitra. In thee, O Son of strength, all gods centred, to the worshipper thou dost become Indra (Rv. 5-3-1).

Aditi being conceived as the common origin of most of the great gods, they are called Adityas. They are conceived as co-Kings (samrajah), ruling over the universe with one accord, looking within who behold the good and evil, protect all beings, remaining true to eternal law, they support three earths and three heavens; they have common functions and common assembly from which they give guidance, light and forgive or punish the sinners. Their glory and greatness is due to their adherence to the supreme law. They are free from all guiles and falsehood, blameless and perfect. This is elaborately described in Aditya-hymns of the Rgveda; For instance, some of them are quoted here.

"These hymns that drop down fatness, with the ladle I ever offer to the Kings Adityas.

May Mitra, Aryaman, and Bhaga hear us, the mighty Varuna, Daksa, and Amsa.

With one accord may Aryaman and Mitra and Varuna this day accept this praise-song-

Adityas bright and pure as streams of wator, free from all guile and falsehood, blameless, perfect.

These Gods, Adityas, vast, profound, and faithful, with many eyes, fain to deceive the wicked,

Looking within behold the good and evil: near to the Kings is even the thing most distant.

Upholding that which moves and that which moves not, Adityas, Gods, protectors of all being.

Provident, guarding well the world of spirits, true to eternal Law, the

debt-exactors.

May I, Adityas, share in this your favour which, Aryaman brings profit e'en in danger.

Under your guidance, Varuna and Mitra, round troubles may I pass, like rugged places.

Smooth is your path, O Aryaman and Mitra; excellent is it. Varuna, and thornless.

Thereon, Adityas, send us down your blessing, grant us a shelter, hard to be demolished.

Mother of Kings, may Aditi transport us, by fair paths Aryman, beyond all hatred.

May we, uninjured, girt by many heroes, win Varuna's and Mitra's high protection.

With their support they stay three earths, three heavens; three are their functions in the Gods' assembly.

Mighty through Law, Adityas, is your greatness; fair is it, Aryaman, Varuna, and Mitra,

Golden and splendid, pure like streams of water, they hold aloft the three bright heavenly regions.

Ne'er do they slumber, never close their eyelids, faithful, far rulling for the righteous mortal.

Thou over all, O Varuna, art Ruler of all, be they Gods Asura or be they mortals.

Grant unto us to see a hundred autumns, ours be the blest long lives of our forefathers.

Neither the right nor left do I distinguish, neither the east nor yet the west, Adityas.

Simple and guided by your wisdom, Vasus! may I attain the light that brings no danger.

He who bears gifts unto the Kings, true Leaders, he whom their everlasting blessings prosper.

Moves with his chariot first in rank and wealthy, munificent and lauded in assemblies.

He who pure, faithful, very strong, with heroes round him, he dwells beside the waters rich with pasture.

None slays, from near at hand or from a distance, him who is under the Adityas' guidance.

Aditi, Mitra, Varuna, forgive us however we have erred and sinned against you.

May I obtain the broad light free from peril; O Indra, let not during darkness seize us.

For him the Twain united pour their fulness, the rain from heaven: he thrives, most highly favoured.

He goes to war mastering both the mansions to him both portions of the world are gracious.

Your guiles, ye Holy ones, to quell oppressors, your snares, spread out against the foe, Adityas.

May I car-borne pass like a sklliful horsman: uninjured may we dwell in spacious shelter.

May I not live, O Varuna, to witness my wealthy, liberal' dear friend's destitution.

King, may I never lack well-ordered riches. Loud may we speak, with heroes, in assembly (2-27-1 to 17).

This laud, O Heaven and Earth, to you I utter: let the kind-hearted hear, whose tongue is Agni.

Young, co-kings, Varuna and Mitra, the wise and very glorious Adityas (3-54-10).

Co-kings who bless us, who have come to sacrifice, who, never assailed, have set their mansion in the sky,-

These I invite with adoration and with hymns, mighty Adityas, Aditi, for happiness (10-63-5).

Common functions and close relations of the great gods are described not only in Aditya-hymns but also in the hymns adoring and extolling Indra, Varuna, Savity or Agni, exclusively. Modern Vedic scholars are puzzled by the hymns which place one of the gods alternately as supreme and others as subordinates of him. There is however, no evidence for any

consistent subordination of one god to another. The reason is that their functions as rulers of the universe are of equal importance. The general impression one gets is that there is practically no real hierarchy among the great gods. Some important functions of them are common owing to which specific individual functions are also assimilated in different gods. Comparative importance of a majority of gods cannot be estimated precisely.

There are, however, certain hymns in the 10th Mandala of the Rgveda in which all the great gods are merged into the unity of divine nature. They are identified, as one essence 'Sat'; or the idea of one lord of the existence' whose order is carried by all gods (Rv. 10-121-1) the reflection of changed political conditions in which monarchical system-one king of one region-was established as suggested by Vajapeya and Rajasuya Sacrifices of Yajurveda

During the early Upanisadic period, further, one can discern that the idea of cosmic state ruled by the great gods as co-rulers persisted in spite of the rise of monrachical system in Aryanized society organised as a four-Varna system which is described in the following passage of the Brhadaranyaka Upanishad (1-4-11to 15).

"Verily, in the beginning this world was Brahman, one only. Being one, he was not developed. He created still further a superior form, the Ksatrahood; even those who are Ksatras (rulers) among the gods, Indra, Varuna, Soma, Rudra, Parjanya, Yama, Mrtyu, Isana. Therefore, there is nothing higher than Kstra. Therefore, at the Rajasuya ceremony the Brahman sits below the Ksatriya. Upon Ksatarhood alone does he confer this honour. The same thing, namely Brahmanhood (Brahma), is the source of Ksatrahood. Therefore, even if the king attains supremacy, he rests finally upon Brahmanhood as his own source. So whoever injures him (i. e. a Brahmana) attacks his own source. He fares worse in proportion as he injures one who is better.

He was not yet developed. He created the Vis (the commonalty), those kinds of gods that are mentioned in numbers: the Vasus, the Rudras, the Adityas, the Vieve devas, the Maruts.

He was not yet developed. He created the Sudra class (varna), Pusan. Verily, this (earth) is Pusan, for she nourishes (Pus) everything that is.

He was not yet developed. He created still further a better form, Law (dharma). This is the power (ksatra) of the Ksatriya class viz Law. Therefore, there is nothing higher than Law. So a weak man controls a strong man by Law, just as if by a King. Verily, that which is Law is truth. Therefore, they say of a man who speaks the truth. He speaks the Law, or of a man who speaks the Law, 'He speaks the truth. ' Verily, both these are the same thing.

So that Brahman (appeared as) Ksatra, Vis, and Sudra. So among the gods Brahman appeared by means of Agni, among men as a Brahmana, as a Ksatriya by means of the (divine) Ksatriya, as a Vaisya by means of the (divine) Vaisya, as a Sudra by means of the (divine) Sudra. Therefore, people desire a place among the gods in Agni, among men in a Brahmana, for by these two forms (pre-eminently) Brahman appeared.

Now, whoever departs from this world (i.e. the world of the Atman) without having recognized it as his own, to him it is of no service, because it is unknown, (as the unrecited Vedas or any other undone deed (do not help a man).

Verily, even if one performs a great and holy work, but with out knowing this, that work of his merely perishes in the end. One should worship the Self alone as his (true) world. The work of him who worships the Self alone as his world does not perish, for out of that very Self, he creates whatsoever he desires.

[The paper submitted to the 29th International Congress of Orientalists, Paris (France) held in Paris from 16-22 July 1973: Section of the Paper "India" (Sanskrit and Indological Studies)]

वैश्विक व्यवस्था आणि वैदिक देवतांचे सामूहिक राज्य

*(The Cosmic State and the Collective Kingship of Vedic God***s**

या इंग्रजी लेखाचे मराठी भाषांतर)

भाषांतरकार : प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे

प्रमुख, इंग्रजी विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर

प्रस्तुत चर्चा ही प्रामुख्याने ऋग्वेदातील आदित्य स्तोत्रांवर आधारित आहे. विशेषतः स्तोत्र २-२७. ऋग्वेदातील दहाव्या मंडलाचा अपवाद करता इतर स्तोत्रे बहु-ईश्वरवादी आहेत. अग्नी, इंद्र, मित्र, वरुण, सावित्र, आर्यमान, विष्णू, आशा, भाग, पुसन, मातरिसवान, रुद्रा अशा देवतांना आवाहन करणारी आहेत.

''समाज'' हा शब्द विशेषण म्हणून वापरला जातो. उदा., इंद्र, मित्रावारुणी आणि आदित्य. ''सम्राज''चे भाषांतर "शाही स्वामी" असे केले जाते. ग्रिफिथ यांनी त्याचे भाषांतर ''सार्वभौम शासक'' (Rv. 4-19-2) असे केले आहे तर मॅकडोनेल आणि किथ यांनी टायचे भाषांतर 'शाश्वत सम्राट' (वैदिक इंडेक्स II, 221), असे केले आहे. किथ यांनी 'सम्राज' या शब्दाचा 'वैश्विक सम्राट' असाही अनुवाद केला आहे. इतरत्र वरुणाचे प्रतीक म्हणून (धर्म आणि वेदाचे तत्त्वज्ञान, पृ. ९६). व्युत्पत्तिशास्त्र आणि भाषारचनाशास्त्राची पद्धती अनुसरणारे मोनिएर विलियम्स हे देखील 'सम्राज' चा अर्थ "सार्वत्रिक किंवा सर्वोच्च शासक" असा देतात.

हे वैदिक विद्वान सायनाचार्यांच्या भाष्याचा विचार करताना दिसत नाहीत. ऋग्वेदात 'सम्राज' हे विशेषण छत्तीस वेळा तर 'साम्राज्य' हा शब्द पाच वेळा आढळतो. या शब्दांचे प्रचलित अर्थ बाजूला ठेवून व्युत्पत्तिशास्त्राच्या आधारे त्याचे अर्थनिर्णयन करण्याचा प्रयत्न सायनाचार्यांनी केला आहे. 'सम' हे उपसर्ग क्रियापद आणि क्रियापदापासून निर्माण होणाऱ्या शब्दप्रयोगांना लागते. तेव्हा त्याचा अर्थ प्रामुख्याने-

(अ) सह, एकत्र, एकत्र, सोबत आणि संयोग व्यक्त करते. संघ, उदा. 'सम-युज' - 'एकत्र जोडणे', 'सम- धा' - एकत्र ठेवणे', 'सम - गम' - 'एकत्र येणे किंवा जाणे', 'सम - गा' - 'एकत्र गाणे', 'सम- गीत' - 'सवाद्य गायन'.

(ब) कधीकधी "सम" हा उपसर्ग मूळ धातूचा अर्थ तीव्र करतो. 'अतिशय किंवा पूर्णतः'असे सायनाचार्यांनी त्याचे भाषांतर केले आहे. तथापि, माझ्या मते, ऋग्वेदातील देवतांच्या संदर्भात राज याचा अर्थ सह-राजा किंवा सह-शासक, वेदांच्या अनुसार विश्व ही एक वैश्विक व्यवस्था आहे. विशेषतः ऋग्वेद-दार्शनिकांच्या मते लौकिक जग म्हणजे एक कायद्यावर आधारलेली सामाजिक व्यवस्था आहे.

भौतिक जगाची कल्पना एक एकीकृत समुच्चय म्हणून केली जाते. जेथे, तेथे नियम- रत नावाची नियमित व्यवस्था आहे. 'रत' हा कायदा आहे, ज्याचे नियमितपणे पालन होते. उदाहरणार्थ, नेहमी पहाटे सूर्योदय होतो. एकानंतर एक ऋतू येतात. वर्ष हे बारा आऱ्यांचे एक चाक आहे असे मानले जाते; अग्नी, जो पाण्यात लपलेला आहे आणि झाडे, जळणाऱ्या काड्यापासून माणसासाठी तयार केली जातात. रताचा अंकुर बनतो, प्रवाह वाहतात ते सारे रताचे पालन करून. रत हा शब्द प्राथमिक, दुय्यम आणि तिय्यम अर्थासह वापरला जातो. मध्ये तृतीय अर्थ सूर्याचे नियमित क्रमण दर्शवतो. 'र' चे ते धातुसाधित रूप आहे ज्याचा अर्थ निश्चित किंवा योग्य मार्ग असा होतो. त्याचा दुसरा अर्थ होतो वैदिक आहुती. कारण प्राचीन काळी सूर्याच्या मार्गक्रमणावर आहुती अवलंबून असे. या शब्दाच्या आणखी अनेक छटा आहेत, परंतु सरतेशेवटी- 'बरोबर, चांगले आणि खरे' हे त्याचे अर्थ शिल्लक राहिले.

सर्वोच्च कायद्यासमोर सर्व प्रमुख देवता ऋग्वेदाने समान मानल्या आहेत. त्यांचे कार्य हे कायद्याने संरक्षित केलेले आहे. ऋग्वेदप्रणित नियम-शासित विश्व हे प्रजासत्ताक राज्य असल्यासारखे आहे. सर्व देवतांनी एकमताने निवडलेले प्रतिनिधी हा सर्वोच्च सत्तास्थानी आहे. ऋग्वेदाच्या अनेक श्लोकांमध्ये याचे वर्णन केले आहे. ''आमच्या माहितीत असा कोणी नाही की जो इंद्राहून बलवान असेल. सर्व देवांनी आपले पुरुषत्व, अंतर्दृष्टी, शक्ती आणि सामर्थ्य त्याच्यात साठवले आहे. त्याच्या राजेशाही थाटाची त्यांनी प्रशंसा केली आहे.'' (Rv. 1-80-15), ''हे गडगडाट करणाऱ्या इंद्रा, इथल्या सर्व देवता तुझे शब्द ऐकण्यासाठी तत्पर आहेत. पराक्रमी, मेणासम मजबूत असणाऱ्या व्रताचा नाश करण्यासाठी दोन्ही जगांनी तुला निवडले आहे.'' (४-१९-१). ''...हे अग्नी, तुझ्यासाठी देवांनी पहिला जीव बनवला होता. जिंवत माणूस, नहुषाच्या घराचा स्वामी.'' ''मनुष्याच्या मुलांचे शिक्षक केले, माझ्या वंशाच्या वडिलांच्या पोटी मुलगा झाला. काय वेळ होती ती.'' (Rv. 1-31-11).

''अग्नी, तू प्रफुल्लित करणारा पुजारी आहेस, घराचा स्वामी आहेस. दूत आहेस. देवांनी स्थापित केलेले सर्व तुझ्यात एक होतात.'' (Rv. 1-36-5) ''तो, पृथ्वीचा दूत आणि स्वर्गाचं मस्तक, नारा, पवित्र क्रमाने जन्मलेला, तू ऋषी, राजा पुरुषांचा पाहुणा त्यांच्या तोंडाला योग्य पात्र, देवांनी निर्माण केले आहे'' (Rv. 6-7-1.) जसे सर्व देवांनी त्यांच्या महान आनंदात आणि आनंदाने तुम्हाला दिले.

तुमचे उच्च वर्चस्व, जे मित्रवरुण दोन्ही जगाला वेढले आहे, तरी विस्तीर्ण आहे. आणि प्रशस्त. तुमचे हेर खरे आहेत आणि कधीही घाबरत नाहीत (Bv. 6-67-5). ''हे, इंद्र-वरुणा, पराक्रमी आणि खूप श्रीमंत! तुमच्यापैकी एक साम्राज्य आणि एक स्वराज म्हणतात. हवेतील सर्वांत उंच प्रदेशातील सर्व देव आहेत. स्टीड्सने तुमच्यामध्ये सर्व शक्ती आणि सामर्थ्य एकत्र केले आहे'' (Rv. 7-82-2) ''हे त्याच्या उदात्त सामर्थ्याची आणि उत्साहाची वाट पाहत आहेत; जे त्यांच्या देवाच्या डोक्यावर विजय मिळवतात तिथे तो राहतो. आणि

तू, जसे लोक त्यांचा शासक निवडतात, त्याप्रमाणे व्रतापासून दूर गेला आहेस''(Rv. 10-124-8).

सर्व वैदिक देवता मानववंशीय म्हणून कल्पित आहेत आणि डोके, चेहरा, तोंड, केस, हात इत्यादी अवयव आहेत. ते वस्त्र परिधान करतात; ते योद्धा म्हणून अनेकदा कोट परिधान केलेले म्हणून प्रस्तुत केले जाते. धनुष्य, भाला, युद्ध-कुऱ्हाड यांसारखी शस्त्रे ते धारण करतात. इंद्र हा दैवी सरदार सतत वज्र वागवतो. सर्व देवांचेदेखील तेजस्वी रथ आहेत. ते सर्वोच्च स्वर्गात एकत्र राहतात आणि आमंत्रित केले की ते एकत्र येतात. किंवा, ते स्वर्गात राहून अग्नी देवाने त्यांना आणलेले नैवेद्य स्वीकारतात, पुरुष आणि देव यांच्यातील दूत. त्यांचे अन्न जवळजवळ सारखे आहे. दूध, तूप, बार्ली, बैल, शेळ्या आणि मेंढ्या काही देवांना अन्नासाठी विशेष आवडतात, ते एकत्र सोमरसाचा आनंद घेतात. ज्यांनी त्यांनी अमरत्व मिळते. ते एकमताने शासन करतात आणि सुसंवाद, शांतता आणि मैत्रीमध्ये राहतात; एकटा इंद्र असला तरी.

ऋग्वेदातील सर्व श्लोकांचे भाषांतर येथे उद्धृत केले आहे. ग्रिफिथच्या भाषांतरातून, तथापि, शब्दाचा अनुवाद 'स्वराज्य' माझ्यामुळे बदलले आहे. एकटा इंद्र मात्र रागाच्या भरात कधीकधी नियमभंग करतो आणि स्वर्गातली शांतता धोक्यात आणतो. पण सर्वसाधारणपणे, या देवतांना अनेक गुणधर्मांनी संपन्न केले आहे - प्रकाश, चांगुलपणा, कुलीनता आणि औदार्य मानववंशशास्त्रीयदृष्ट्या त्यांना व्यक्ती म्हणून गणले गेले असले तरी त्यांचे समान पालक देवी अदिती किंवा दयाळू आहे. देवतांमधील भेद दोन टप्प्यांत कमी करण्याची ऋग्वेद-द्रष्ट्यांची सर्वसाधारण प्रवृत्ती आहे. अगदी ज्यांचा नैसर्गिक आधार वेगळा आहे: पहिला टप्पा आहे देवतांची जोडी लावण्याचा. अग्नी- सोम, इंद्र- वायू, इंद्र- अग्नी, इंद्र- पुसन इंद्र बृहस्पती, इंद्र- वरुण, इंद्र- विष्णू, इंद्र - सोम, मित्र- वरुण, सोम- पुसन, सोम-रुद्र, पर्जन्य - वत यांसारख्या दुहेरी देवतांची - निर्मिती करणे. दुसरा प्रकार म्हणजे देवतांचे विलीनीकरण. सर्व देवांना त्यांनी 'विश्व देवा' हे एकच नाव दिले आहे. आणि दुसरे म्हणजे, वेगवेगळ्या देवांना त्यांनी एकत्र केले आहे. इंद्र आणि अग्नी, सूर्य आणि सवित्र, पुसन आणि इंद्र, इंद्र आणि वरुण...

ऋग्वेद काळात द्रष्टे देवतांना अलौकिक शक्ती मानू लागले तशी विलीनीकरणाची प्रवृत्ती सातत्याने वाढत होती. एक कवी म्हणतो, 'तू, जन्माच्या वेळेस अग्नी, प्रज्वलित झाल्यावर मित्र. हे सामर्थ्याच्या पुत्रा, तुझ्यामध्ये सर्व देव केंद्रित आहेत. उपासक तू इंद्र झालास.' (Rv. 5-3-1). अदिती ही सर्व देवताची जननी म्हणून कल्पिण्यात आली आहे. म्हणून त्यांना 'आदित्य' असे म्हटले जाते. ते सह-राजे (साम्राजाह) म्हणून एकत्रितपणे सबंध विश्वावर राज्य करतात. चांगले आणि वाईट यावर नजर ठेवणे, सर्व जीवांचे संरक्षण करणे, विश्वाच्या चिरंतन तत्त्वाशी प्रामाणिक राहणे हे त्यांचे कार्य आहे. तीन पृथ्वी आणि तीन आकाश यांचे नियंत्रण त्यांच्याकडे आहे. त्या मार्गदर्शन करतात. प्रकाश प्रकाश देतात

आणि पाप्यांना दया दाखवतात किंवा शिक्षा देतात. विश्वाच्या सर्वोच्च अधिसत्तेशी एकनिष्ठ राहण्यातच त्यांची महानता सामावलेली आहे. फसवणूक आणि खोटेपणा या सर्वांपासून त्या मुक्त आहेत. तसेच त्या निर्दोष आणि परिपूर्ण आहेत. ऋग्वेदातील आदित्य-स्तोत्रांमध्ये याचे सविस्तर वर्णन आलेले आहे. (२-२७-१ ते १७:३-५४, १०, १०.६३, ५).

केवळ आदित्य-स्तोत्रातच नव्हे तर इंद्र, सावित्र किंवा अग्नीची पूजा आणि स्तुती करणाऱ्या इतर स्तोत्रांमध्येही या देवतांची सामान्य कार्ये आणि त्यांचे जवळचे संबंध वर्णन केलेले आहेत. आधुनिक वैदिक विद्वान हे स्तोत्र कोणत्या ठिकाणी आहेत हे पाहून हैराण झाले आहेत. सर्व देवांपैकी एक देव वैकल्पिकरीत्या सर्वोच्च आणि इतर गौण असे वर्णन आलेल्या स्तोत्रामुळे आधुनिक वैदिक विद्वान गोंधळलेले दिसतात. तथापि, एका देवाने दुसऱ्या देवाच्या अधीन असल्याचा कोणताही पुरावा आढळून येत नाही. विश्वाचे शासक म्हणून त्यांची कार्ये आणि त्यांचे महत्त्व हे समान आहे. या महान देवतांमध्ये कोणतीही उतरंड नाही.

आर्यकृत समाजातील सम्राटशाही आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे वर्णन बृहदारण्यक उपनिषदातील एका उताऱ्यात याचे वर्णन केलेले असले तरी असेही आढळून येते की, सुरुवातीच्या उपनिषद काळात वैश्विक व्यवस्थेच्या कल्पनेवर अधारित सहशासक या देवतांचे स्थान अबाधित राहिले. उपनिषद (१-४-११ ते १५).

लठ्ठपणा कमी करणारी ही स्तोत्रं, मी आदित्य राजास अर्पण करतो. मित्र, आर्यमान आणि भग हे पराक्रमी वरुण आमचे ऐकू दे. डाका आणि आमसा, आर्यमन आणि मित्र आणि वरुण हे एकाच संमतीने दिवस हे स्तुतिगीत स्वीकारा- आदित्य जलप्रवाहांसारखे तेजस्वी आणि शुद्ध, सर्वांपासून मुक्त फसवणूक आणि खोटेपणा, निर्दोष, परिपूर्ण. हे देव, आदित्य, विशाल, प्रगल्भ आणि अनेकांशी विश्वासू डोळे, दुष्टांना फसविण्यास अशक्त, आत पाहत चांगलं आणि वाईट पाहा: राजांच्या जवळ अगदी दूरची गोष्ट आहे. जे हलते आणि जे हलत नाही ते टिकवून ठेवणे, आदित्य, देव, सर्व जीवांचे रक्षक. आत्म्यांच्या जगाचे रक्षण करणारे, अनंतकाळचे खरे कायदा, कर्ज वसूल करणारे.

मी, आदित्य, तुमच्या कृपेत सहभागी होऊ या, आर्यमन नफा धोक्यात आणतो. वरुण आणि मित्रा, तुमच्या मार्गदर्शनाखाली संकटे येतील मी ओबडधोबड ठिकाणांप्रमाणे जातो. गुळगुळीत तुझा मार्ग, आर्यमन आणि मित्राः उत्कृष्ट आहे. वरुणा, आणि काटेरी, त्यावर, आदित्य, आम्हांला तुझा आशीर्वाद दे, आम्हाला निवारा, पाडणे कठीण. राजांची माता, आदिती आम्हांला न्याय्य वाटेने वाहून ने.

आर्यमन, सर्व द्वेषांच्या पलीकडे. अनेक वीरांनी हार न मानता आपण वरुणाचा विजय करू या मित्राचे उच्च संरक्षण, त्यांच्या आधाराने ते तीन पृथ्वी, तीन स्वर्ग राहतात: तीन देवांच्या संमेलनात त्यांची कार्ये आहेत. कायद्याद्वारे पराक्रमी, आदित्य, तुझी महानता आहे. ते न्याय्य आहे, आर्यमन, वरुण आणि मित्रा, सोनेरी आणि भव्य, पाण्याच्या झऱ्यांसारखे

शुद्ध, ते धारण करतात. तीन तेजस्वी स्वर्गीय प्रदेशांवर. ते कधीही निद्रिस्त राहात नाहीत, पापण्या कधीच बंद करत नाहीत, विश्वासू, दूर हे वरुणा, तू सर्वांचा अधिपती आहेस, ते देव हो असुर असो किंवा ते नश्वर असोत. आम्हाला शंभर शरद ऋतू पाहण्याची अनुमती दे, आमचे आशीर्वाद असो आमच्या पूर्वजांचे दीर्घायुष्य.

मी उजवीकडे किंवा डावीकडे भेद करू शकत नाही. पूर्वेकडेही नाही किंवा अजून पश्चिमेला, आदित्यस साधे आणि तुझ्या बुद्धीने मार्गदर्शन केलेले, वसूस! मी प्राप्त करू शकतो कोणताही धोका नसणारा प्रकाश. जो राजांना भेटवस्तू देतो, खरे नेते, तो ज्याला त्यांचे चिरंतन आशीर्वाद समृद्ध होतात, आपल्या रथाने प्रथम श्रेणीत आणि श्रीमंत, उदात्त असे फिरते आणि संमेलनांमध्ये कौतुक केले.

जो शुद्ध, विश्वासू, अतिशय बलवान, त्याच्या सभोवतालच्या वीरांसह, तो कुरणांनी समृद्ध पाण्याच्या बाजूला राहतो. कोणीही मारत नाही, जवळून किंवा दुरून, त्याला कोण आदित्य यांच्या मार्गदर्शनाखाली आहे. अदिती, मित्रा, वरुण, आमची चूक झाली तरी आम्हाला माफ कर तुझ्याविरुद्ध पाप केले. मला संकटांपासून मुक्त व्यापक प्रकाश मिळू शकेल, हे इंद्र, चला अंधारात आम्हाला पकडू नका. त्याच्यासाठी ट्वेन युनायटेडने त्यांची परिपूर्णता ओतली, पाऊस पडला. स्वर्ग : तो भरभराट करतो, अत्यंत अनुकूल. दोन्ही वाड्यांवर प्रभुत्व मिळवून तो युद्धात जातो. त्याला दोन्ही जगाचे भाग दयाळू आहेत.

अहो पवित्रांनो, जुलूम करणाऱ्यांना, तुमच्या सापळ्यांना शमवण्यासाठी, शत्रू, आदित्य विरुद्ध पसरला. मी एखाद्या कुशल घोडेस्वाराप्रमाणे गाडीने प्रवास करू शकतो: विना दुखापत.

आपण प्रशस्त आश्रयस्थानात राहू या.

हे वरुणा, मी माझ्या श्रीमंत उदारतेच्या साक्षीसाठी जगू नये.

राजा, मला सुव्यवस्थित धनाची कमतरता भासू नये. आम्ही जोरात करू.

समूहात नायकांसह बोला. (२-२७-१ ते १७).

हे स्तुती, हे स्वर्ग आणि हे पृथ्वी, मी तुम्हाला उच्चारतोः दयाळू श्रवण, ज्याची जीभ अग्नी आहे. तरुण, सह-राजे, वरुण आणि मित्र, ज्ञानी आणि अतिशय गौरवशाली आदित्य (३-५१-१०) आम्हांला आशीर्वाद देणारे सह-राजे, जे यज्ञ करायला आले आहेत, जे, कधीही हल्ला केला नाही, त्यांचा वाडा आकाशात उभा केला आहे. ह्यांना मी आराधनेने आणि भजनाने, पराक्रमी आमंत्रित करतो आदित्य, आदिती, आनंदासाठी. (१०-६३-५)

सामान्य कार्ये आणि महान देवांचे जवळचे संबंध आहेत. केवळ आदित्य स्तोत्रातच नव्हे तर आराध्य स्तोत्रांमध्येदेखील वर्णन केले आहे आणि केवळ इंद्र, वरुण, सावित्र किंवा अग्नी यांचे गुणगान करणे. आधुनिक वैदिक विद्वान हे स्तोत्र पाहून आश्चर्यचकित झाले आहेत की त्यापैकी कोणते स्थान आहे देव वैकल्पिकरित्या सर्वोच्च म्हणून आणि इतर त्याच्या अधीनस्थ म्हणून तेथे तथापि, एखाद्याच्या सातत्यपूर्ण अधीनतेचा कोणताही

पुरावा नाही दुसऱ्याला देव. याचे कारण म्हणजे राज्यकर्ते म्हणून त्यांची कार्ये ब्रह्मांड समान महत्त्व आहे, एक सामान्य छाप मिळते महान लोकांमध्ये व्यावहारिकदृष्ट्या कोणतीही खरी उतरंड नसते. देवता त्यांच्यापैकी काही महत्त्वाची कार्ये सामान्य आहेत. जे विशिष्ट वैयक्तिक कार्येदेखील भिन्नमध्ये आत्मसात केले जातात. देवता बहुसंख्य देवतांचे तुलनात्मक महत्त्व असू शकत नाही

तथापि, १०व्या मंडळामध्ये काही विशिष्ट स्तोत्रे आहेत. ऋग्वेद ज्यामध्ये सर्व महान देवांच्या एकात्मतेत विलीन झाले आहेत दैवी स्वभाव. ते एक सार 'सत्' म्हणून ओळखले जातात; किंवा कल्पना 'अस्तित्वाचा एक स्वामी' ज्याचा आदेश सर्व देवांनी पाळला आहे (Rv. १०-१२१-१). बदललेल्या राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब ज्या राजेशाही व्यवस्थेत एका प्रदेशाचा एक राजा स्थापित झाला-

यजुर्वेदातील वाजपेय आणि राजसूय यज्ञांनी सुचविल्याप्रमाणे सुरुवातीच्या उपनिषदिक काळात, पुढे, कोणीही ओळखू शकतो की वैश्विक राज्याची कल्पना महान देवतांनी सहशासक म्हणून राज्य केली. आर्यीकरणात राजेशाही व्यवस्थेचा उदय होऊनही टिकून राहिला. चार वर्णप्रणाली म्हणून संघटित समाज त्याचे वर्णन मध्ये केले आहे. बृहदारण्यक उपनिषद (१-४-११ ते १५)

खरोखर सुरुवातीला हे जग ब्रह्म. एक होते. फक्त एक असल्याने त्याचा विकास झाला नाही. त्याने अजून पुढे निर्माण केले. एक श्रेष्ठ रूप, क्षत्रहूड, अगदी जे क्षत्र आहेत. (शासक) देवतांमध्ये, इंद्र, वरुण, सोम, रुद्र, पर्जन्य, यम, मृत्यू, इसाना म्हणून, क्षत्रपेक्षा वरचे काहीही नाही, म्हणून राजसूय समारंभात ब्राह्मण खाली बसतो क्षत्रिय, क्षेत्रहूडवरच तो हा सन्मान बहाल करतो. ब्रालीमनहूड (ब्रह्म) या एकाच गोष्टीचा उगम आहे क्षेत्रहुड, त्यामुळे राजाने जरी वर्चस्व प्राप्त केले तरी तो शेवटी त्याचा स्वतःचा स्रोत म्हणून ब्राह्मणत्वावर अवलंबून आहे. त्यामुळे जो कोणी त्याला जखमी करतो (म्हणजे ब्राह्मण) त्याच्या स्वतःच्या स्त्रोतावर हल्ला करतो जो चांगला आहे. त्याला तो जखमी करतो त्या प्रमाणात वाईट. तो अजून विकसित झाला नव्हता. त्याने Vis (कॉमो-) तयार केला. त्या प्रकारचे देव जे संख्यांमध्ये नमूद केले आहेत: वसु, रुद्र, आदित्य, विश्व देव, मारुत, त्याचा अजून विकास झालेला नव्हता. त्यांनी सदरा वर्ग निर्माण केला (वर्ण), पुसान, खरंच, ही (पृथ्वी) पुसान आहे. कारण ती पोषण करते. (पू) जे काही आहे. तो अद्याप विकसित झाला नव्हता, त्याने आणखी चांगले निर्माण केले.

स्वरूप, कायदा (धर्म). ही क्षत्रियाची शक्ती (क्षत्र) आहे वर्ग उदा. कायदा. त्यामुळे कायद्यापेक्षा वरचे काहीही नाही. त्यामुळे एक दुर्बल माणूस एखाद्या बलवान माणसाला कायद्याने नियंत्रित करतो, जसे राजाद्वारे. खरंच, जे कायदा आहे ते सत्य आहे. म्हणून, ते पुरुषाबद्दल म्हणतात जो सत्य बोलतो, 'तो नियमशास्त्र बोलतो' किंवा एखाद्या मनुष्याविषयी नियमशास्त्र बोलतो, 'तो खरे बोलतो.' खरंच, हे दोन्ही आहेत समान गोष्ट. त्यामुळे ब्राह्मण

क्षेत्र, विस आणि शूद्र, समान.

तर देवतांमध्ये ब्रह्म अग्नीच्या माध्यमातून प्रकट झाला पुरुष ब्राह्मण म्हणून, क्षत्रिय म्हणून परमात्म्याद्वारे क्षत्रिय, परमात्म्याद्वारे वैश्य म्हणून, वैश्य, शूद्र म्हणून (देवी) शूद्राद्वारे. त्यामुळे लोकांना जागा हवी असते. अग्नीतील देवतांमध्ये, ब्राह्मणातील पुरुषांमध्ये, त्यांच्यासाठी ब्रह्म दोन रूपे (प्रथम) प्रकट झाले.

आता, जो कोणी या जगातून निघून जातो (म्हणजेच जग आत्मन) स्वतःचे म्हणून ओळखल्याशिवाय, त्याच्यासाठी ते आहे सेवा नाही, कारण ते अज्ञात आहे. (जसे न पाठलेले वेद किंवा कोणतेही इतर पूर्ववत कृत्य खरंच, जरी एखादे महान आणि पवित्र कार्य केले तरी पण सह हे जाणून घेतल्याने, त्याच्या केवळ कार्याचा अंत होतो. एक स्वतःलाच त्याचे (खरे) जग मानून त्याची पूजा करावी. जे काम जो स्वत:लाच त्याचे जग म्हणून पूजतो, त्याचा नाश होत नाही. त्या आत्म्यापासून, त्याला जे पाहिजे ते निर्माण करतो.''

❍❍❍

ब)

परिसंवाद

३.

१९४८ सालातील आपले भवितव्य काय?

आपणापुढे आज काही निकडीचे न महत्त्वाचे प्रश्न उभे आहेत. हे प्रश्न आपण कशा प्रकारे सोडवितो या गोष्टीवरच आपले १९४८ सालातील भवितव्य सर्वस्वी अवलंबून आहे.

असे प्रश्न कोणते? आणि ते कसे सोडविता येतील?

आम्ही तयार केलेली प्रश्नपत्रिका आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची उत्तरे-

प्रश्न- १) देशाची फाळणी होऊन हिंदुस्तान व पाकिस्तान अशी दोन संघराज्ये अस्तित्वात आली असली तरी गेल्या काही महिन्यांचा अनुभव जमेस धरता पाकिस्तानचे स्वतंत्र अस्तित्व असावे असे आपणांस वाटते काय?

उत्तर- पाकिस्तान व हिंदुस्थान ही संघराज्ये ज्या कारणास्तव स्वतंत्र अस्तित्वात आली ती कारणे जोपर्यंत राहतील, तोपर्यंत ही राज्ये विभक्त राहणेच योग्य व अपरिहार्यही आहे. हिंदू जमात आणि मुसलमान जमात यांना आपल्या विभक्त व अनेक दृष्टींनी मूलतः विरुद्ध परंपरेचा वारसा आहे. या वारशाला दुय्यम स्थान देणारी आधुनिक मानव्यमूलक, राजकीय व सांस्कृतिक भावना गेल्या पन्नास वर्षांतील समाजकारण व राजकारण निर्माण करू शकले नाही. अशा स्थितीत गेल्या काही महिन्यांच्या अनुभवाची जबाबदारी केवळ पाकिस्तानावर पडत नाही. हिंदूंचे समाजकारण व राजकारणही यास जबाबदार आहे.

प्रश्न - २) घटनात्मक दृष्टीने हिंदी संघराज्याला 'हिंदुराज्य' असे म्हणणे योग्य आहे का? आज भिन्न भिन्न भाषा, संस्कृती इत्यादी घरांच्या प्रांतीय घटकांना एकत्र आणणारी 'हिंदुत्वा'च्या भावनेपेक्षा दुसरी कोणती बंधक शक्ती नाही असे आपणांस वाटते काय? तशी कोणती शक्ती नसेल तर हिंदुत्वनिष्ठा आणि लोकशाही यांचा एकत्र समन्वय करता येईल काय?

उत्तर- हिंदी संघराज्य तांत्रिक लोकसत्तेवरच उभारले गेले तर आणि सजीव लोकसत्ता

अस्तित्वात जर आली नाही, तर हिंदुत्व हेच सर्वांचे समान लक्षण ठरेल. इतर नागरिक यातून वगळले जातील. हिंदुत्व हे ऐतिहासिक दृष्टीने पाहिल्यास समानत्वाच्या पायावर संघटित करणारे तत्त्व नाही असेच दिसेल. अवांतर भेद, वैषम्य आणि समानबंधुत्वाचा विरोध हे तर त्याचे ऐतिहासिक रहस्य आहे. त्यामुळे त्याच्यावर भर दिल्यास आज अस्तित्वात असलेल्या प्रांतिक राज्यातूनही राष्ट्रे उत्पन्न होतील आणि बाराखंड हिंदुस्थान होईल, अखंड नव्हे! खरी लोकशाही सांस्कृतिक व धर्ममूलक भेद मिटविते.

प्रश्न- ३) सध्या नियंत्रणे नकोत अशा स्वरूपाचे विचार जोर धरू लागले आहेत. याविषयी दूरवर दृष्टीने नियंत्रणे असावीत का नसावीत, याबद्दल आपले मत काय आहे? नियंत्रणे असावीत असे वाटत असले तरी ती एक संकटनिवारणाचा उपाय म्हणून तात्पुरती असावीत की देशाच्या आर्थिक प्रगतीचे आवश्यक अंग म्हणून कायम स्वरूपाची असावीत?

उत्तर- हल्लीची नियंत्रणे योग्य नियंत्रणेच नाहीत. नियंत्रण हे आर्थिक नियोजनाचे अंग म्हणून आवश्यक आहे. आर्थिक उत्पादन शिस्तशीर रीतीने निरंतर वाढीस लावणारा सर्वव्यापी नियोजनाचा सध्या अभाव असल्यामुळे चालू आर्थिक दुरवस्थेस उपाय म्हणून चालू नियंत्रणांचा तादृश्य उपयोग होत नाही. याकरिता नियंत्रणे रद्द करणे हा उपाय मात्र खासच नव्हे. नियंत्रणे काढल्यास गरीब जनतेच्या हलाखीत आणखी भयंकर भर पडेल. यापुढील काळात हिंदुस्थानची आर्थिक दुर्गती टाळायची असल्यास सर्वव्यापी उत्पादनाचे नियोजनच अमलात आणले पाहिजे व त्यांची अंगभूत म्हणून नियंत्रणे कायम ठेवली पाहिजेत. नागरिकांच्या शांततामय जीवनाची साधने व गरज भागविण्यास मात्र मोठ्या प्रमाणात उत्पन्न झाल्यावर नियंत्रण ही न्याय्य वाटणीची लक्षणे बनतील.

प्रश्न -४) सर्वांगीण राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कार्यक्रमात कोणत्या दोन गोष्टींना प्राधान्य द्यावे असे आपणांस वाटते?

उत्तर - सांस्कृतिक नियोजन व आर्थिक नियोजन या त्या सार्वत्रिक दोन गोष्टी होत. सांस्कृतिक नियोजनात सक्तीचे व मोफत, प्राथमिक शिक्षण, मातृभाषांचे आजचे अठराविश्वे वैचारिक दारिद्र्य न करणारा आणि इंग्लिश, फ्रेंच, जर्मन इत्यादी भाषांच्या बरोबरीस पोचविणारा ग्रंथोत्पत्तीचा कार्यक्रम, विश्वविद्यालयांची पुनर्घटना करून सार्वभौम, शास्त्रीय संशोधनावर भर देणे आणि व्यवसायोपयुक्त उच्च शिक्षणाची व्यवस्था करणे या गोष्टी पुनर्घटनेत येतात. आर्थिक नियोजनात परदेशी बाजार काबीज करण्याच्या ध्येयाचे नियोजन येता कामा नये, तर चाळीस कोटी कंगाल जनतेचे मातब्बर बाजारात रूपांतर होईल, असे नियोजन झाले पाहिजे. युद्धप्रवणता निर्माण करील असे कोणतेही आर्थिक नियोजन अखेरीस राष्ट्राचा नरक बनवील.

प्रश्न- ५) 'ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स' यामध्ये पुढे हिंदी संघराज्य एक घटक म्हणून राहावे काय?

उत्तर - लोकसत्तेची विश्वव्यापी आघाडी निर्माण करण्याकरिता ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये हिंदी संघराज्याने जरूर राहावे. इंग्लंड हे थोर लोकसत्तावादी राष्ट्र आहे. त्याचा याकरिता फायदा घ्यावा.

प्रश्न- ६) सध्या देशातील उत्पन्नामध्ये घट आढळून येत आहे. म्हणून उत्पादन वाढ घडून येण्यासाठी ताबडतोब व चटकन अमलात येतील असे आपण कोणते दोन उपाय सुचवू शकता?

उत्तर - शासकीय, सामुदायिक व यांत्रिक रीतीने शेतीची व तदांगभूत उद्योगधंद्यांची वाढ करणे हाच अगदी जवळचा भाग आहे. त्यापेक्षा जवळचा मार्ग म्हणजे स्वप्न!

प्रश्न- ७) संस्थाने न संस्थानिक यांचे अस्तित्व कायम ठेवून त्यांना संघराज्यास जोडून घेण्याचे चालू धोरण आपणास समाधानकारक वाटते की, संस्थानिकांचे अस्तित्व नाहीसे करून ती संघराज्यात एकजीव करून टाकणे आपणास अधिक इष्ट वाटते?

उत्तर - संस्थाने नष्ट करावीत. संस्थानिकांना चांगला तनखा कायम द्यावा.

प्रश्न- ८) पाकिस्तान आणि हिंदुस्थान यांमध्ये युद्ध होण्याची शक्यता आपणास वाटते काय? युद्ध उद्भवल्यास परकीय राष्ट्रांची मदत घेणे इष्ट ठरेल काय?

उत्तर - पाकिस्तान व हिंदुस्थान यांच्यामध्ये युद्धाकडे नेणारी प्रवृत्ती आज जबरदस्त दिसत आहे. युद्ध टाळणे मात्र शक्य आहे. याकरिता काश्मीर पाकिस्तानला द्यावे. जुनागढ, हैद्राबाद वगैरे हिंदी संघराज्यात जिरवून घ्यावीत आणि राज्यकर्त्यांनी दोन्ही मित्रराष्ट्र होतील व व्हावीत या दुर्दम्य आशेने सहिष्णू, उदार आणि सत्यपूर्ण राजकारण करावे. दोन्ही संघराज्यात राज्यकर्त्यांनी व जनतेने सांस्कृतिक पुनरुज्जीवन आणि आर्थिक प्रयत्न यांच्यामध्ये आपल्या सगळ्या शक्ती केंद्रित करून ठेवाव्यात. असे झाले तर दोन भिन्न राष्ट्रे निर्माण होऊन अखंडताही त्यातून येईल. नवसंस्कृती निर्माण करण्याकरिता व आर्थिक वैभव वाढविण्याकरिता समर्थकांची मन:शक्ती जर एकत्र झाली नाही, तर वरील दोन राष्ट्रांमधील युद्ध अपरिहार्य होईल. त्यात इतर राष्ट्रांचे साहाय्य घ्यावे की नाही असा प्रश्न नैतिकदृष्ट्या उत्पन्नच होत नाही. कारण यापुढे युद्ध ही संस्था मानव्याचा शत्रू असल्यामुळे तो अनैतिकच आहे. मग युद्धमान पक्ष कसाही असो.

प्रश्न- ९) लोकशाही राजकारणाच्या दृष्टीने जातीय संघटना व पक्ष यांना राजकारणात भाग घेण्याची मुभा असावी की नसावी?

उत्तर - निर्भेळ विचारस्वातंत्र्य आणि संघटनस्वातंत्र्य हे लोकशाही राजकारणाचे एक मूलभूत तत्त्व आहे. म्हणून जातीय पक्षांनासुद्धा कायदेशीर बंधन असणे गैर आहे. 'म्हातारी

मेल्याचे दुःख नाही काळ सोकावतो' या म्हणीप्रमाणे विचार व संघटना स्वातंत्र्याला कसलेही बंधन घालण्याचे तत्त्वच शेवटी लोकशाहीचा घात केल्याशिवाय राहणार नाही.

प्रश्न- १०) भाषावार प्रांतरचना असावी काय? यामुळे फुटीर मनोवृत्ती वाढीस लागेल असा जो आक्षेप घेतला जातो, त्यामध्ये कितपत तथ्य आहे असे आपणांस वाटते?

उत्तर- भाषावार प्रांतरचना असणे योग्यच आहे. मध्यवर्ती सरकार जर पुरोगामी धोरणाचे असेल, तर सगळ्या प्रांतांच्या समान वाढीचे धोरण आखून ते फुटीर वृत्ती निर्माण होऊ देणार नाही. प्रांतांची प्रगती विषम राहिल्यास भाषावार रचना टाळली तरी भाषिक संस्कृतीच्या लोकांचे झागडे वाढून विकोपास जातीलच. विषम वाढ झालेल्या प्रांतांना एकाच प्रांताच्या राजकीय विभागात गोवणे हेच प्रांत द्वेषाला फाजील ऊत आणील. यास 'विषम विवाह' म्हणतात.

(किर्लोस्कर, जानेवारी, १९४८ पृ. ४१७ ते ४३४)

ooo

४.

जगातील दुष्टपणा व अन्याय आणि ईश्वरवादी विचारसरणी

(जन्मभर देवाशी वैर करून शेवटी केवळ देवाच्या हातून मरण आले. एवढ्याच कारणामुळे दुष्ट माणूस सद्गतीला जाऊ शकतो, हे दाखविणाऱ्या अनेक कथा पुराणातून सापडतात. मिरजेचे श्री. वि. ज. सहस्रबुद्धे यांनी श्रीकृष्णचरित्रातील अशा कथांचा उल्लेख करून, नीतीच्या व तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अशा कथांची काही सुसंगत उपपत्ती लागणे शक्य आहे काय अशी शंका उपस्थित केली आहे. ही त्यांची शंका त्यांनी महाराष्ट्रातील काही विद्वान विचारवन्तांपुढे पत्रव्यवहारात मांडून त्यांना आपल्या शंकेचा खुलासा करण्यास विनंती केली, काही विचारवंतांकडून त्यांना उत्तरे आली. श्री. सहस्रबुद्धे यांची शंका आणि त्यांना विचारवंताकडून आलेली उत्तरे ही मोठी उद्बोधक आहेत. ही शंका व उत्तरे पुराणातील कथांच्या निमित्ताने निघाली असली तरी त्यातून निघणारे प्रश्न व्यापक स्वरूपाचे व विचारप्रवर्तक आहेत. या दृष्टीने प्रस्तुत पत्रव्यवहारच येथे प्रसिद्ध केला आहे. हा पत्रव्यवहार श्री. सहस्रबुद्धे यांनी गेल्या (१९५३) वर्षाच्या उत्तरार्धात केला. प्रस्तुत पत्रव्यवहार 'नवभारता'त प्रसिद्धीकरिता दिल्याबद्दल श्री. सहस्रबुद्धे यांचे आभार. - का. संपा. नवभारत)

मूळ शंका

श्रीकृष्णचरित्रातील माझी शंका आहे. पूतना ही कृष्णास दुग्धपान देण्याचे निमित्त करून त्याला मारण्यास आली होती. पण तो डाव तिच्यावरच उलटला. कृष्णाने तिला यमसदनास पाठविली हे खरे. परंतु ती पुढे सद्गतीला गेली असं भागवतात म्हटले आहे. दुसरे, अनेक असुर अथवा दैत्य कृष्णाने मारले परंतु तेही सद्गतीलाच गेले असे सांगण्यात येते. पूतना, कंस इत्यादींची ही एक विरोधी भक्तीच होय असेही समर्थन केले जाते. परंतु वेदान्तविचारसरणीने पाहता अगर तत्त्वज्ञानाचा विचार केला तर अशा दुष्ट लोकांस सद्गती मिळणे शक्य नाही व इष्टही वाटत नाही. कर्मविपाकप्रक्रिया मानली तर दृष्ट लोक दुर्गतीलाच गेले पाहिजेत. तेव्हा

वाय १८१-१३

भागवत इत्यादी पुराणांमध्ये वरील प्रकारच्या कथा वर्णिल्या आहेत त्या अर्थवादपर किंवा पोकळच समजल्या पाहिजेत. जन्मभर देवाशी वैर करून मग केवळ देवाच्या हातून मरण आले एवढ्याच कारणामुळे तो दुष्ट मनुष्य सद्गतीला जाऊ शकतो ही गोष्ट शक्य कशी समजावी? अशाने दुष्टांच्या दुष्ट कृत्यास आळा बसेल अगर आळा बसतो असे तरी कसे म्हणता येईल? तेव्हा या बाबतीत वस्तुस्थिती काय असावी व तत्त्वज्ञान दृष्टीने अशा कथांची संगती कशी लावावी, या प्रश्नांचा खुलासा आपल्याकडून कळला तर आभारी होईन.

वि. ज. सहस्रबुद्धे, मिरज

काही उपपत्ती

पुराणांतील देवकथांचे सुसंगत अभिप्राय निघतातच, असे मानण्याचे कारण नाही. देवाची लीला अगाध आहे ही भावना सर्वांत प्रधान असते. सुसंगत अभिप्रायाच्याही कथा असतात, नाही असे नाही. अनिर्बंध कल्पनांना कथाकार स्ववासनांच्या अनुरूप आकार देतो व कथा अस्तित्वात येते. कथारचनांची संगती कथारचनाकाराच्या वासनांशी असते. क्रूर कथाकार देवासही क्रूर बनवितो. निदान कौर्याचे समर्थन अप्रत्यक्षपणे करण्याचा हेतू त्याच्या कथेत असतो. स्वैराचारी, लहरी, व्यभिचारी व दुर्व्यवहारी देव आपल्या भक्तांचेच प्रतिबिंब बनतात. प्रमाद, गुन्हे, अत्याचार कदापि टळणार नाहीत, ते चालूच रहावयाचे अशी भावना अज्ञातपणे व ज्ञातपणे ज्यांच्या मनांत असते ते दुष्टकथालेखक ईश्वरासही तशा दुष्टांचा संहार करावयास लावून उद्धार करण्यास भाग पाडतात. कारण, त्यांना स्वतःला दुष्टावा ठेवून मुक्त व्हावयाचे असते.

दुसरा अभिप्राय अधिक तात्त्विक निघतो तो असाः देवाशी सामना करण्याचे सामर्थ्य असलेल्या दुष्टांच्या वा खलांच्या ठिकाणी अनेक महान दैवी गुण असतात, ते जवळजवळ देवच असतात. त्यांचे खलत्व एका मर्यादित विषयापुरतेच असते. त्याबद्दल शासन वा दण्डन झाले की, शिल्लक दैवी गुण राहतात; त्यांचे फल उद्धार!

तिसरी उपपत्ती अशी : ईश्वराचे ज्ञान हे मोक्षप्रद असा सिद्धान्त मानला म्हणजे त्याचे अपरिहार्य तर्कशुद्ध सार्वत्रिक समर्थन करणे भाग पडते. देवाशी सामना करणाऱ्या दुष्टास देवाचा साक्षात्कार होत असतो, एवढेच नव्हे तर त्यास देवाचा निरंतर ध्यासच असतो. दुष्टाला, मरण हे फळ त्याच्या दुष्टकर्माने मिळाल्यावर, शिल्लक पुण्य म्हणजे ज्ञान हेच राहते. त्याने तो मुक्त होतो. त्याच्या पूर्वजन्मीच्या सत्कर्मामुळेच ईश्वराचा साक्षात्कार होतो. ईश्वराच्या हातून मरण येणे हे पूर्व सुकृताचेंच फल, म्हणून सत्कर्माचा नियम येथे अमग्नच राहतो.

अशा अनेक उपपत्ती आणखी सांगता येतील.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

(नवभारत, जून, १९५४ वर्ष-७, अंक ९, पृ १ व ३)

○○○

५

वेदान्तातील काही प्रश्न : चर्चा

(या जगाचे मूळ तत्त्व कोणते? त्याचे स्वरूप काय? व जगाची उत्पत्ती कशी झाली? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. या प्रश्नांची उत्तरे अद्वैत-वेदान्तात आढळून येतात. परंतु या उत्तरातसुद्धा काही फरक दिसतो. हा फरक कित्येक वेळा तात्त्विक असतो तर कित्येक वेळा तपशिलांतील तो फरक असतो. अशाच एका प्रश्नासंबंधी मतभिन्नता दिसून आल्याने मिरजेचे छंदःशास्त्रावरील व्यासंगी व तत्त्वजिज्ञासू श्री. वि. ज. सहस्रबुद्धे यांनी वेदान्तातील काही तज्ज्ञ गृहस्थांकडे पत्रव्यवहार करून खुलासे विचारले. त्यापैकी काहींकडून खुलासे आले. ही चर्चा जिज्ञासूंना उपयुक्त होईल, या हेतूने हा चर्चात्मक पत्रव्यवहार 'नवभारत'मासिकाच्या जुलै, १९५६ च्या अंकात पृष्ठ ५४ ते ५६ प्रसिद्ध झाला आहे. पैकी मूळ प्रश्न, श्री. तर्कतीर्थांचे उत्तर व त्याला श्री. सहस्रबुद्धे यांचे स्पष्टीकरण इतकाच अंश इथे अंतर्भूत करण्यात आला आहे. अन्यांच्या मतांसाठी जिज्ञासूंनी मूळ अंक पाहावा ही विनंती - संपादक)

मूळ प्रश्न

उपनिषत्तीर्थ जोग, पुणे यांनी 'पंचदशी'वर ग्रंथ लिहिला आहे. त्यात "ब्रह्म हे जगताचे कारण असे शंकराचार्य म्हणतात, परंतु हे ब्रह्म मूळ शुद्धब्रह्म अथवा मायायुक्त (शबल) ब्रह्म याचा खुलासा शंकराचार्यांच्या विवेचनात मिळत नाही" असे जोग यांनी मत व्यक्त केले आहे. तेव्हा आपल्याकडे शंका विचारीत आहे. तरी कृपया खुलासा व्हावा अशी नम्र विनंती आहे.

१. 'एकोऽहम् बहुस्याम् प्रजायेत सोऽ कामयत' हे स्फुरण अथवा कामना कोणाला झाली? शुद्ध ब्रह्माला अगर शबल ब्रह्माला?

ब्रह्माचे दोन प्रकार मानले जातात.

शुद्ध ब्रह्म	शबल ब्रह्म
निर्गुण ब्रह्म	सगुण ब्रह्म

निरूपाधिक ब्रह्म	सोपाधिक ब्रह्म
निर्विशेष ब्रह्म	सतिशेष ब्रह्म

२. मायायुक्त ब्रह्म म्हणजे शबल ब्रह्म हे जगताचे कारण अगर कसे? शंकराचार्य जगताचे कारण या अर्थी ब्रह्म शब्द वापरतात. त्या ठिकाणी ब्रह्म शब्दाचा अर्थ कोणता?

३. शबल ब्रह्म म्हटले म्हणजे त्या अपेक्षेने शुद्ध ब्रह्म ही कल्पना आलीच. शुद्ध ब्रह्माचे शबल ब्रह्म कसे झाले?

४. ब्रह्म, परब्रह्म, ईश्वर, परमेश्वर असे शब्द वापरले जातात. ब्रह्मसूत्र- शांकरभाष्यात हे शब्द एकार्थक आहेत अगर भिन्नार्थक आहेत? यासंबंधी संदिग्धता उत्पन्न होते, तरी स्पष्टता झाल्यास उपयुक्त होईल.

- वि. ज. सहस्रबुद्धे (मिरज)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : उत्तर

ब्रह्म शबल, विश्वाच्या अपेक्षेने

'उपनिषतीर्थ' जोग यांचे पुस्तक माझ्याजवळ नाही. त्यामुळे त्यांच्या विधानासंबंधी मला काही सांगता येणार नाही; परंतु आपण त्यांचे म्हणणे काय आहे ते सांगितले आहे ते खरे गृहीत धरून उत्तर देतो. त्यांचे म्हणणे असे, "ब्रह्म जगताचे कारण, असे शंकराचार्य म्हणतात. परंतु हे ब्रह्म मूळ शुद्धब्रह्म अथवा मायायुक्त ब्रह्म (शबल) याचा स्पष्ट खुलासा शंकराचार्याच्या विवेचनात मिळत नाही.

यासंबंधी शंकराचार्यांनी अत्यंत विस्तृत खुलासा केला आहे व तोसुद्धा अनेक ठिकाणी. तो खुलासा स्पष्टही आहे. समाधानकारक आहे की नाही हे ज्याचे त्याने स्वतः ठरवावे. उदाहरणार्थ:- शारीरिक भाष्यात २/१/१४ या सूत्रावरील विवरणात आचार्यानी विस्ताराने या मुद्द्याचा खल केला आहे. "नित्यशुद्ध बुद्धमुक्तस्वरूपात् सर्वज्ञात सर्वशक्ते: ईश्वरात् जगत्जनिस्थितिप्रलया:' नाचेतनात् प्रधानात् अन्यस्तेत् वा इत्येषोऽर्थ प्रतिज्ञातः...। सा प्रतिज्ञा तदेवस्थैव, न तद्विरुद्धोऽर्थः पुनरिहोच्यते। (''नित्यशुद्ध बुद्धमुक्तस्वभाव असलेल्या सर्वज्ञ व सर्वशक्तिरूप ईश्वरापासून जगताची उत्पत्ती, स्थिती व नाश होतात. अचेतन प्रधानापासून वा अन्यापासून नव्हे. हा मुद्दा प्रतिज्ञेने सांगितला आहे. ही प्रतिज्ञा खरी आहे. तिच्याविरुद्ध मुद्दा येथे सांगितला नाही.")

"कथं नोच्यते, अत्यन्तमात्मन: एकलं अद्वितीयत्वंच । शृणु यथा नोच्यते ।"

("विरुद्ध मुद्दा सांगितला नाही असे कसे म्हणता? आत्मा केवळ एकच अद्वितीय आहे असे आहे तर म्हणत आहात! ऐका, कसे तसे म्हणत नाही ते.")

''सर्वज्ञस्य ईश्वरस्य आत्मभूते इव इवविद्याकल्पिते नामरूपे.... संसार प्रपंचबीजभूते सर्वज्ञस्य ईश्वरस्य माया, शक्तिः, प्रकृतिरिति च श्रुतिस्मृत्योरभिलप्येते। ताभ्यामन्यः सर्वज्ञ ईश्वर:।"

("सर्वज्ञ ईश्वराची जणू काय आत्मरूपच असलेली, अविद्येने कल्पिलेली नामरूपे होत, ती संसार प्रपंचाची बीजे होत; तीच सर्वज्ञ ईश्वराची माया, शक्ती वा प्रकृती होय, असे श्रुतिस्मृतीमध्ये म्हटले आहे.")

तदेवमविद्यात्मकोपाधिपरिच्छेदापेक्षमेव ईश्वरस्य ईश्वरत्वं सर्वज्ञत्वं सर्वशक्तित्वं च । न परमार्थतो विद्यया अपास्तसर्वोपाधिकस्वरूपे आत्मनि ईशित्रीशितव्यसर्वज्ञत्वादिव्यवहारः उपपद्यते।"

"(म्हणून अशा रीतीने अविद्यारूप उपाधीच्या मर्यादेच्या अपेक्षेने ईश्वरला ईश्वरत्व, सर्वज्ञत्व व सर्वशक्तित्व आहे. परमार्थत: म्हणजे वस्तुतः ज्ञानद्वारा सर्व उपाधी निरस्त झालेल्या स्वरूपाच्या आत्म्याचे ठिकाणी नियन्तृत्व, नियन्तव्यत्व किंवा सर्वज्ञत्व इत्यादी व्यवहार उपपन्न होत नाही.")

"...परमार्थावस्थायां इशित्रीशितव्यदिव्यवहाराभावः प्रदर्श्यते। व्यवहारावस्थायां तु उक्तः श्रुतावपीश्वरादिव्यवहारः।"

("परमार्थावस्थेमध्ये नियन्तृत्व, नियन्तव्यत्व इत्यादी व्यवहार नाही; पण व्यवहारावस्थेत श्रुतीतही ईश्वर इत्यादी व्यवहार आढळतो.")

आता तुमच्या चार प्रश्नांची उत्तरे अशी- प्रथम चवथा प्रश्न घेतो कारण त्याचे उत्तर वरील शांकरभाष्यात आले आहे. मायामुक्तब्रह्म = ईश्वर, असा अर्थ आचार्यांनी स्वतः सांगितला आहे.

(प्रश्न - १) मूळ शुद्ध ब्रह्मात "एकोऽहं बहुस्याम प्रजायेत" हे स्फुरण अथवा इच्छा नाही. व्यवहारात किंवा विश्वाचे अस्तित्व गृहीत धरूनच वरील इच्छा संभवते. शुद्ध ब्रह्म हे सर्वकाली शुद्धच; म्हणजे ते निर्विकल्प निरिच्छ असते.

(प्रश्न - २) शंकराचार्य जगताचे कारण "ब्रह्म" असे म्हणतात तेव्हा त्याचा अर्थ "मायायुक्त ब्रह्म'' असाच आहे. "ब्रह्म" असे "ब्रह्म" शब्दाचा किंवा कोणत्याही त्या अभिप्रायाने (ब्रह्म शब्दाचा पर्याय म्हणून) वापरल्या जाणाऱ्या शब्दाचा "शुद्धब्रह्म" हा अर्थ वाच्यार्थ होऊच शकत नाही. (शबल) मायायुक्त ब्रह्म वा ईश्वर हाच त्या सर्व पर्यायांचा वाच्यार्थ होय. ब्रह्मशब्दाचा निरूढ लक्ष्यार्थ "शुद्ध ब्रह्म" होय; "ईश्वर" शब्दाचा "शुद्ध ब्रह्म" हा रूढ लक्ष्यार्थ नाही, असा "ईश्वर" व "ब्रह्म" शब्दाचा फरक आहे.

(प्रश्न- ३) शबल ब्रह्म म्हटले म्हणजे नंतर 'शुद्धब्रह्म' ही कल्पना आलीच पाहिजे हे खरे, परंतु मूळ शब्दब्रह्माचे शबल ब्रह्म बनत नाही. त्या दोहोंत पौर्वापर्य नाही. शुद्ध ब्रह्म त्रिकालाबाधित आहे, कालातीत आहे. ब्रह्म शबल विश्वाच्या अपेक्षेने; वस्तुत: विश्व नाही, म्हणून ब्रह्मही वस्तुत: शबल नाही.

कळावे.

लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई

श्री. ज.स करंदीकर : अभिप्राय

शुद्ध ब्रह्माच्या इच्छेने शबल ब्रह्म झाले

आपले पत्र पोहोचले. "बहुऽस्यां प्रजायेत" ही स्फूर्ती कोणाला झाली, शुद्ध ब्रह्माला का शबल ब्रह्माला, अशी शंका का विचारता? तुम्हाला श्री शंकराचार्यांचेच मत पाहिजे असल्यास ते तैत्तिरीय उपनिषदातील ब्रह्मवल्लीत हे वाक्य आहे त्यावरील शांकरभाष्यात पाहावयास मिळेल. या भाष्यामध्ये 'बहुस्याम' याचे स्पष्टीकरण असे दिले आहे की, "वहिपुत्रोत्पत्या इव अर्थान्तर-विषय बहुभवनं, कथ तर्हि, आत्मास्थानाभिव्यक्तनामरू पाभिव्यक्त्या। यदा नामरूपे आत्मस्वरूप-अपरित्यागेन एवं ब्रह्मणाऽ प्रविभक्तदेशकाले सर्वावस्थासु व्याक्रियेते, तदा तन्नामरूपव्याकरणम् ब्रह्मणो बहुभवनम्।"

या उताऱ्यावरून आचार्यांनी शुद्धब्रह्मालाच स्फूर्ती झाली असे दर्शविले आहे आणि अशी स्फूर्ती होण्यापूर्वी शुद्धब्रह्माचे शबल ब्रह्म होण्याचे कारण काय? सृष्टिउत्पत्तीची इच्छा झाल्यानेच केवळ एकजिनसी ब्रह्मस्वरूपात शबलत्व येणार व त्यालाच सगुणब्रह्म, हिरण्यगर्भ, इत्यादी नामे मागाहून मिळणार.

श्री शंकराचार्यानी वर दिलेल्या उताऱ्यानंतर 'ब्रह्म' शब्द सोडून 'आत्मा' हा शब्द वापरला आहे. 'स आता एवंकामः तपोऽतप्यत' असे म्हणून पुढे 'आत्मन: आकाश: संभूतः आकाशात वायुः' इत्यादी प्रक्रिया जोडली आहे. त्यावरून 'ब्रह्म' आणि आत्मा यात आचार्य भेद मानीत नाहीत. पूर्ण अद्वैत मानतात हे उघड आहे.

दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर पहिल्या प्रश्नाच्या स्पष्टीकरणात आलेच आहे. शुद्धब्रह्माचे शबलब्रह्म झाले, ते शुद्धब्रह्माच्या इच्छेने आणि आत्मिक शक्तीने झाले.

भाषेत आपण शब्द वापरताना नीटशी काळजी घेत नाही. त्यामुळे ईश्वर, परमेश्वर तसेच आत्मा, परमात्मा, शुद्ध ब्रह्म, शबल ब्रह्म इत्यादी शब्द जणू काय एकमेकांचे पर्यायच आहेत अशासारखे वापरले जातात. पण त्यात अगदी व्याकरणदृष्ट्या पाहिल्यास फरक आहे. पण सामान्य व्यवहारात न्यायशास्त्रातल्याप्रमाणे अगदी काटेकोर शब्द प्रयोग केला जात नाही. पण प्रत्येक शब्दात वरच्या खालच्या पायरीसारखा फरक आहे.

'सोऽकामयत' हे वाक्य तैत्तिरीय उपनिषदाशिवाय तलवकार ब्राह्मण, बृहकारण्यकोपनिषद्, शतपथ ब्राह्मण, जैमिनीय ब्राह्मण इत्यादी ठिकाणी थोड्याबहुत फरकाने आले आहे. त्यांतील बृहदारण्यकोपनिषदात आचार्यांचे भाष्य पुनःश्च आले आहे. तेही पहावे.

कळावे

ज. स करंदीकर, पुणे- २.

(नवभारत, जुलै, १९५६ पृ. ५४ ते ५६)

○○○

६.

आम्हा सुशिक्षितांच्या जीवनात ईश्वर अजून का रेंगाळत आहे?

(ईश्वरविषयक श्रद्धेसंबंधी आजचा सुशिक्षित अत्यंत गोंधळलेल्या मनःस्थितीत आहे. विज्ञान व बुद्धिवाद यांच्या प्रहारांमुळे या पिढीतील सुशिक्षितांच्या जीवनातील ईश्वरश्रद्धा अधिक विवेचक होईल, अशी अपेक्षा होती, परंतु ती फोल ठरली आहे. सुशिक्षितांच्या वैयक्तिक जीवनात परंपरागत कल्पनांनी भरलेला ईश्वर रेंगाळतो आहे, इतकेच नव्हे, तर अशिक्षितांच्या जीवनांतील रुढीजन्य व भ्रामक ईश्वरकल्पनांना धक्का न लावता लोकानुनयाने वागण्याची प्रवृत्ती सुशिक्षितांमध्ये अतिशय वाढली आहे. त्यामुळेच कुंभमेळा, सार्वजनिक सत्यनारायण पूजा, पंढरपूरसारख्या यात्रा यांचा सरकारीरीत्या पाठपुरावा चालला असताना त्यासंबंधी आमचा सुशिक्षित विरोध दर्शवीत नाही.

याचे कारण विद्यापीठातील शिक्षणाचे उच्च संस्कार लाभलेल्या व्यक्तीही कोणताही सखोल विचार न करता, परंपरागत ईश्वरकल्पनांच्या जाळ्यांत गुरफटतांना आढळतात. विज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या पदवीधरांची विज्ञानावर पुरेशी श्रद्धा दिसत नाही. धड ना ईश्वरावर खंबीर श्रद्धा आणि धड ना बुद्धिवादावर व विज्ञानावर. (म्हणजेच त्यांच्या आधारे गेल्या शंभर-दोनशे वर्षात निर्माण झालेल्या उच्च मूल्यांवर) पूर्ण - श्रद्धा अशा विचलित मनःस्थितीत आमचा सुशिक्षित वर्ग सांप्रत वावरत आहे.

सुशिक्षितांच्या या विचित्र मनःस्थितीचे विश्लेषण करण्याच्या हेतूने आम्ही या अंकात डॉ. र. पु. परांजपे, मुंबईचे बिशप लॅश आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार देत आहोत. या व्यक्तींना आम्ही सर्व-साधारणपणे 'सुशिक्षितांच्या जीवनात सांप्रत ईश्वर कल्पनेची पारंपरिक बैठकच का रेंगाळत आहे?' या मुख्य पक्षाला अनुलक्षून त्यांच्या वैचारिक जीवनातील श्रद्धांसंबंधी व अनुभूतीसंबंधी काही प्रश्न विचारले होते. या प्रश्नांसंबंधी आमचे प्रतिनिधी श्रीयुत य. गो. नित्सुरे यांच्याजवळ त्यांनी प्रदर्शित केलेले महत्त्वाचे व निर्भीड विचार आमच्या वाचकांना अतिशय मोलाचे वाटतील व हे विचार वाचून आपापल्या जीवनातील ईश्वरश्रद्धा अधिक विवेचकपणे तपासण्यास वाचकांना स्फूर्ती लाभेल, अशी आम्हांस खात्री वाटते. - संपादक)

''ईश्वरावरील निष्ठेच्या दृष्टीने आजचा सुशिक्षित माणूस गोंधळलेल्या मन:स्थितीत आहे असे विधान करणे बरोबर होईल काय!'' असा प्रश्न तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मी विचारला असता ते उत्तरले -

''तुमच्या प्रश्नानेच मी थोडासा गोंधळून गेलो आहे! माझ्या समजुतीप्रमाणे आपला महाराष्ट्रीय सुशिक्षित मनुष्य साधारणपणे धार्मिक आचार-विचार कमी प्रमाणात पाळतो व देवाची नित्यउपासना तो भजन, पूजन इत्यादी प्रकारांनी करीतही नाही, हे खरे आहे; त्यामुळे त्याच्या मनातील ईश्वराची माया ना कमी झाली आहे असे वाटण्याचा संभव आहे. परंतु जरा खोलवर विचार केला तर असेच दिसून येते की आपल्या सुशिक्षितांचे मन अद्यापही बऱ्याच प्रमाणात देववादी व दैववादी आहे. काही काही प्रसंगांच्या निमित्ताने त्यांची देवावरील भावना उत्कट रूपाने प्रकट होते आणि ईश्वर कृपेची याचना तर तो मनातल्या मनात अनेकदा करीत असतो. त्याची धार्मिक श्रद्धा बाह्य कर्माच्या रूपाने विशेष प्रकट होत नसली तरी ती नामस्मरणाने प्रकट होते. देवादिकांची चित्रे, चरित्रे यांबद्दल त्याला ओढा असतो. कर्मकांडाबद्दल जी अनास्था दिसते, ती मात्र काहीअंशी बुद्धिवादी आहे. कर्मकांडाने काही विशेष पुण्य उत्पन्न होते, याबद्दलचा त्याचा विश्वास ढळला आहे; नष्ट झाला आहे की नाही हे सांगणे मात्र कठीण आहे. गणेशोत्सव, नवरात्र पूजा, पंढरी काशी, प्रयाग इत्यादी ठिकाणी यात्रांमध्ये वगैरे प्रसंगी जमणाऱ्या भाविकांत अशिक्षितांचाही गट आढळतो.''

''परंतु मग सुशिक्षितांच्या व अशिक्षितांच्या ईश्वरनिष्ठेत काही मूलभूत फरक पडू लागला आहे असे आपणांस वाटत नाही का? बुद्धिवाद व नास्तिकता हे सुशिक्षितांमध्ये एखाद्या फॅशनप्रमाणे पसरत आहेत असे आपणांस वाटते काय?''

''नास्तिकता व बुद्धिवादीपणा या दोन गोष्टी अगदी अलग आहेत. बुद्धिवादीपणा हे भूषण आहे, शिक्षणाचे फळ आहे, म्हणून त्याबद्दल सुशिक्षिताला अभिमानाने बोलावेसे वाटते. परंतु 'मी नास्तिक आहे' असे रोखठोकपणे प्रतिपादन करणारा सुशिक्षित फार थोड्या संख्येने सापडतो. बुद्धिवादाने ईश्वर सिद्ध होत नाही. याचे दोन अर्थ होतात, पहिला अध्ययवाद व दुसरा अनिश्वरवाद किंवा पाखंड. दुसरा अर्थ मान्य करणारे व त्याचा पुरस्कार करणारे सुशिक्षित अल्प प्रमाणात आहेत.

''नास्तिकतेपर्यंत पोचण्याची कुवत आपल्या सुशिक्षितात नसते असेच यातून सिद्ध होते काय !''

बालपणापासून मनावर तीव्रपणे होणारे परंपरेचे संस्कार बलवत्तर असतात. त्यामुळे भावनात्मक श्रद्धा खोल रुतलेली असते. बुद्धीने जे सिद्ध होईल तेच खरे, असे मानणारी परंपरा अजून आपल्या देशात नाही. त्यामुळे बुद्धीने सिद्ध होतील तेच खरे मानण्याचे संस्कार आईबाप मुलांवर करीत नाहीत. पाश्चिमात्य देशातील बुद्धिवादाची नवी परंपरा अद्यापि दृढमूल झालेली नाही. 'ईश्वर आहे का नाही?' असा प्रश्नच मुलांच्या मनात आपण उत्पन्न होऊ देत नाही. सूर्य, चंद्र, वारा, पाऊस यांच्याप्रमाणे तो निर्विवादपणे अस्तित्वात आहे, असे धरूनच कथा, पूजा, उत्सव, प्रार्थना, भजन यांच्या द्वारे तो प्रतिपादिला जातो. त्यामुळे

ईश्वर आहे की नाही असा प्रश्नच खऱ्या उत्कंठेने व जिज्ञासेने मुलांच्या मनात उभा केला जात नाही.''

''आपल्या शिक्षण पद्धतीतून वैचारिक दुबळेपणा नाहीसा करता येणार नाही का?''

''आपल्या शिक्षण पद्धतीचे स्वरूप हे बरेचसे माहिती पुरविणे व माहिती ध्यानात ठेवणे या प्रकारचे आहे. त्याचे संशोधन करण्याची साधकबाधक मनन करण्याची शक्ती उत्पन्न करणे म्हणजेच बौद्धिक सामर्थ्य वाढीस लावणे असे आपल्या शिक्षणपद्धतीचे ध्येय नाही किंवा तंत्रही नाही. म्हणूनच या शिक्षणपद्धतीने ईश्वरच काय, परंतु आपल्या जीवनाशी अत्यंत निगडित असलेले अथवा ऐहिक व्यवहाराला बळकटी आणणारे इतर विषयही बुद्धीच्या निकषावर तावून सुलाखून तपासण्याची शक्ती उत्पन्न होत नाही. बौद्धिक सकसपणा निर्माण करणं हे आपल्या शिक्षणपद्धतीचे ध्येयच नाही. या दृष्टीने तिच्यात आमूलाग्र बदल होणे इष्ट आहे.''

''आपल्या शिक्षणपद्धतीत बौद्धिक सकसपणा आणण्यासाठी नास्तिकवादाचे शिक्षण देणे जरूर आहे काय?''

''नास्तिकवाद हा शिक्षणाचा एक विषय होऊ शकतो; तो कितीही जरी शिकवला तरीही तेवढ्याने बुद्धिवादाची शक्ती विद्यार्थ्यांमध्ये येईल असे नाही, बुद्धिवाद ही ज्ञानाच्या सर्व विषयांना व क्षेत्रांना व्यापणारी पद्धती आहे. म्हणून ती मूलभूत अशी शिक्षणपद्धती आहे. अशा मूलभूत शिक्षणपद्धतीचाच प्रवेश आपल्या भारतीय शिक्षणपद्धतीत त्वरित व्हावयास हवा.''

''आता एक वैयक्तिक प्रश्न विचारू का? आपल्या आयुष्यात जे योगायोग घडले असतील त्यांसंबंधी आपला दृष्टिकोन कसा आहे? ईश्वराच्या कृपेमुळे अनुकूल योग घडतात असे आपण मानता का?''

''चांगले व वाईट अशा दोन्ही प्रकारच्या योगायोगांनी घडून आलेले महत्त्वाचे प्रसंग माझ्या आयुष्यात मी अनुभवीत आलो आहे. त्यासंबंधाचा कार्यकारण भाव देवाशी अगर दैवाशी जोडण्याची भावना स्वाभाविक रीतीने माझ्यामध्ये उत्पन्न होते. परंतु तेवढ्याने मन स्वस्थ बसत नाही. देव आणि दैव यांच्याशी त्या योगायोगांचा संबंध लावला नाही तरी त्याची उपपत्ती लागू शकेल असा विश्वास बुद्धीमध्ये उत्पन्न होतो. निसर्गाच्या कार्यकारणभावाने किंवा परिस्थितीच्या प्रभावाने किंवा अनेक गोष्टींच्या क्रमप्राप्त परिपाकाने चांगले किंवा वाईट प्रसंग घडतात, असे बुद्धिवादाने शोधून निश्चित करता येते.''

''पण बुद्धीला सुटत नाहीत असे काही गहन प्रश्न अजूनही आहेतच की नाही? अशा प्रसंगी आपला दृष्टिकोन कसा असतो?''

पण ते प्रश्न बुद्धीने कधीच सुटणार नाहीत असे नाही. आज आपणांस ज्या गोष्टी किंवा जे कार्यकारणभाव अज्ञात आहेत ते कालांतराने ज्ञा होत जातील. बुद्धिवादाने कधीच निकाल लागणार नाही अशा काही गोष्टी असतील; नाही असे मला म्हणावयाचे नाही. परंतु त्यांचा

आपल्या जीवनाशी काही संबंध आहे असे मानता येणार नाही.''

''माणसामाणसांमध्ये बौद्धिक, मानसिक, शारीरिक गुणांसंबंधी जी जन्मजात विषमता आढळते त्या पाठीमागे ईश्वराचा किंवा गूढ शक्तीचा हात असतो असे मानावे काय?''

''जन्मजात वैगुण्ये किंवा जन्मजात प्रतिभाशाली गुण काही व्यक्तींमध्ये आढळले तर त्यामुळे त्यांचा संबंध पापपुण्याशी किंवा ईश्वरकृपेशी जोडावा असे मला वाटत नाही. शारीरिक किंवा मानसिक वैशिष्ट्यांची किंवा वैगुण्यांची उपपत्ती वंशशास्त्र, गर्भधारणाशास्त्र इत्यादी शास्त्रांच्या द्वारे लागू शकते. त्यासाठी पूर्वकर्म किंवा अधिवैविक संबंध गृहीत धरण्याची गरज नाही.''

''एखाद्या विशेष अडचणीच्या प्रसंगी आपण आपली मन:शांती कशी राखता?''

''ईश्वरप्रार्थनेचा मन:शांतीसाठी व चित्ताच्या उत्साहासाठी मी पुष्कळ वर्षे उपयोग केला आहे. बालपणापासूनच्या संस्कारामुळे संध्या, जप इत्यादी रूपाने ईश्वरोपासना करण्याची अहेतुक सवय मला लागलेली आहे. परंतु माझा असाही अनुभव आहे, की ईश्वरोपासनेशिवाय केवळ विवकाने चिंता, उद्वेग, निराशा किंवा इतर विकार यांच्या तावडीतून बाहेर पडता येते. माझ्यावर अत्यंत अपमानकारक व दु:खकारक हल्ले झाले असता किंवा मला शारीरिक अपघात घडले असता मी केवळ चित्ताला इशारा देऊन मन स्वस्थ व निर्मळ ठेवले आहे. कित्येक प्रसंग असे आठवतात, की माझे चित्त संकटसमयीही आपोआपच निश्चल राहू शकले. अर्थात असे नेहमीच घडले असे मी आत्मविश्वासाने म्हणू शकत नाही. जप व ध्यान हा माझ्या मनाचा स्वभावच बनून गेला आहे. कारण, मी बुद्धिवादी म्हणून वयाच्या छत्तिसाव्या वर्षी पुढे आलो. तोपर्यंत माझी धार्मिक उपासना वयाच्या पाचव्या वर्षापासून अखंड चालू होती. तिची पाळेमुळे माझ्या मनाच्या अगदी खालच्या तळापर्यंत रोवून बसलेली आहेत.''

''मनुष्य नीतिमान राहावा व त्याला इंद्रियसंयमन साधावे म्हणून त्याने ईश्वर मानण्याची जरुरी आहे का?''

''ईश्वराचा व नीतीचा किंवा ईश्वराचा व इंद्रियसंयमनाचा संबंध किती पक्का हे सांगणे कठीण आहे. ईश्वर न मानणाऱ्यांत अनीतिमान जसे दिसतात, तसे नीतिमानही आढळतात. वास्तविक नैतिक विवेकबुद्धी व इंद्रियसंयमन ही धर्मापेक्षा निराळी आहेत. त्यांचा धार्मिक श्रद्धेशी संबंध धर्माने जुळविला आहे, एवढेच. नीतीचा महिमा किंवा संयमित जीवनाचे महत्त्व मनुष्याला स्वतंत्र रीतीने पटू शकते. परंतु धार्मिक श्रद्धेचा उपयोग नीतीच्या व संयमित जीवनाच्या समर्थनाकरीता धर्मसंस्थांनी आजपर्यंत केला आहे व त्यांत त्यांना बरेच यशही आले आहे, असे इतिहास सांगतो.''

''माझा आणखी एक प्रश्न आहे. वैयक्तिक स्वार्थापलीकडे जाऊन इतर माणसांच्या सुखासाठी त्याग करावा, असे माणसाला वाटते त्याची प्रेरणा त्याला कोठून मिळते?''

''त्यागाची भावना ही संग्रहाच्या भावनेइतकीच नैसर्गिक भावना आहे. अपत्यवात्सल्याकरिता, प्रेमाकरिता, सुडाकरिता, द्वेषाकरिता, आदरबुद्धीकरिता, सद्गुणांवरील आकर्षणाकरिता त्याग घडत असतो. आईबाप, पतिपत्नी, बंधुभगिनी हे वात्सल्य व प्रेम या भावनांनी प्रेरित होऊन एकमेकांकरिता त्याग करीत असतात. ईश्वर खात्रीने नाही असे कळले तरी आई अपत्य स्नेहाखातर त्याग केल्याशिवाय राहणार नाही. ईश्वर नाही असे शपथ घेऊन सांगणारा तरुण प्रेमवेडा होऊन तरुणीकरिता आत्महत्या करू शकतो किंबहुना, ईश्वर हा आदर्श रूपाने प्रेमात, वात्सल्यांत, निसर्गाबद्दलच्या आकर्षणात किंवा मानव्याबद्दलच्या सहानुभूतीत अखेरीस प्रकट होतो असे म्हणावे लागेल.''

''मग आजचा सुशिक्षित मनुष्य ईश्वरावर विश्वास ठेवणारा असावा की नसावा? त्याबाबत आपले मत काय आहे!''

''ईश्वरावर विश्वास ठेवण्यासंबंधी व्यक्तीव्यक्तींमध्ये फरक पडणे अपरिहार्य आहे असे मला वाटते. त्यामुळे ईश्वरावर सुशिक्षितांचा विश्वास असावा असेंही माझे मत नाही किंवा विश्वास नसावा असेंही मला वाटत नाही. ईश्वर आहे की नाही याचा स्वतः शोध घेऊन स्वतःच्या श्रद्धेची शुद्धी व रचना करणारा सुशिक्षित असावा, असेच माझे मत आहे.''

(किर्लोस्कर, दिवाळी अंक, नोव्हेंबर ,१९५६, पृष्ठ २८९,२९३ ते २९७)

❍❍❍

७

साहित्य, साहित्यिक आणि सरकार

शुद्ध साहित्याची निर्मिती ही व्यक्तितंत्रच असते. ज्ञानकोशासारखे सारस्वत समुदायाधीन असते असे जरी दिसत असले तरी त्यातील लेखसंपत्ती ही स्वतंत्र व्यक्तिमत्तेतूनच निर्माण झालेली असते. व्यक्ती हेच साहित्याचे मूळ व बीज असतें. म्हणून व्यक्तित्वाचा परिपोष, उत्कर्ष व निर्दोषता यांची साहित्याच्या परिपोषास, उत्कर्षास व निर्दोषतेस आवश्यकता असते. व्यक्तिस्वातंत्र्य हे व्यक्तित्वाच्या परिपोषाचे असाधारण कारण होय; व बंधन हे व्यक्तित्वाच्या ऱ्हासाचे असाधारण कारण होय. कलेस वा ललित साहित्यास प्रसवणारी प्रतिभाशक्ती स्वैरविहारिणी असावी लागते व वैचारिक साहित्यास निर्माण करणारी बौद्धिक प्रेरणा अप्रतिहत असावी लागते. विचारांचे इष्ट बंधन एकच होय व ते तर्कशास्त्र होय. तर्कशास्त्र हा विचाराच्या स्वाभाविक नियमांचा समुदाय होय, प्रतिभेचे इष्ट बंधन कोणते हे सांगणेच दुरापास्त आहे. ती आत्मनियंत्रित असते. साहित्यशास्त्र म्हणजे प्रगल्भ प्रतिभेने स्वीकारलेले आत्मनियंत्रणच होय.

साहित्य किंवा सारस्वत ही साक्षर समाजाची किंवा उच्च साक्षर संस्कृतीची अपरिहार्य अशी सामाजिक गरज आहे. सामाजिक गरज भागविण्यास लोकाश्रय किंवा राजाश्रय यांची आवश्यकता असतेच. लोकाश्रय किंवा राजाश्रय मिळाल्याशिवाय साहित्याची समाधानकारक निर्मिती व विस्तार होणे कठीण असते. साहित्याचे अंतरंग-साधन व्यक्तित्व व बहिरंग-साधन लोकाश्रय किंवा राजाश्रय होय. वाचकवर्गाचा म्हणजे रसिक व जिज्ञासू व्यक्तिसमुदायाचा (साहित्यकार अशा) व्यक्तित्वाशी जिव्हाळ्याचा संबंध स्थापित व्हावा लागतो. वाचकवर्ग म्हणजेच लोक होय. साहित्यकार व्यक्ती ज्यास साहित्याचे निवेदन करते असे कोणी तरी व्यक्तिरूप वा समुदायरूप असावेच लागते. आत्मनिवेदनातसुद्धा स्वतःचे दोन अंश गृहीत धरावे लागतात. कला वा साहित्य द्वैताश्रित असतें. वक्ता व श्रोता, निर्माता व निरीक्षक, कवी व रसिक, ज्ञाता व जिज्ञासू असे द्वैत असल्याशिवाय त्याची निर्मिती संभवत नाही.

ज्या सामाजिक स्थितीत साहित्यास लोकाश्रयाचे क्षेत्र विस्तृत व विविध प्रकारचे लाभते तेथे साहित्यकार व्यक्तीचे स्वातंत्र्य अधिक प्रमाणात सुरक्षितपणे राहू शकते. लोकांच्या अभिरुचीचे व संस्कृतीचे भिन्न स्तर व प्रकार या स्वातंत्र्यास पोषक ठरतात. अशा लोकाश्रयाच्या वातावरणात साहित्याला उत्कृष्ट बहर येतो. अशा स्थितीत साहित्यसृष्टी राजाश्रयाची पर्वा न करता समृद्ध होत जाते. त्यात एकच अपवाद धोक्याचा संभवतो. तो म्हणजे एकमार्गी, गतानुगतिक व अंधश्रद्ध लोक; जे लोक उदार मतवादास व वैचारिक स्वातंत्र्यास विमुख असलेल्या परंपरेत वाढलेले असतात ते लोक. हे असले लोक जुलमी हुकूमशाही इतकीच प्रतिभेची व विचाराची कुचंबणा करू शकतात. त्यांची परंपरा हुकूमशहापेक्षा दीर्घकाळ टिकते. असले लोक स्वतंत्र इतिहाससंशोधन, मुक्त धर्मचर्चा व बुद्धिवादी टीका यांचा दीर्घ काळ कोंडमारा करू शकतात. सत्याचे संशोधन अनंत काल चालावे लागते, मानवी बुद्धी प्रमादक्षम असल्यामुळे विविध व विरुद्ध विचारांना अवसर दिल्यानेच सत्याची वाढ होत जाते, अशी धारणा ज्यात रुजलेली आहे अशा सामाजिक संस्थांचा समाज साहित्याच्या योगक्षेमास योग्य होय. त्यात सरकार या संस्थेचा अंतर्भाव करण्यास हरकत नाही.

लोकाश्रय हाच साहित्याचा खराखुरा पोशिंदा होय. भारतात साहित्यास लोकाश्रय फार अल्प आहे. साक्षर लोकसंख्या कमी त्यात पुन्हा वाङ्मय विकत घेऊन वाचणाऱ्यांची संख्या फारच कमी. वैचारिक वाङ्मयाचा वाचकवर्ग तर फार तुरळक आहे. एवंच, देशी भाषांचे सारस्वत पाश्चात्त्यांच्या तोडीचे निपजण्यास पुष्कळ अंतराय उभे आहेत.

भारतातले स्वराज्यसरकार नुकतेच साहित्याच्या क्षेमकुशलाची विचारपूस करू लागले आहे. साहित्याला उत्तेजन देण्याकरिता काही थोड्याशा संस्था सरकारतर्फे काम करू लागल्या आहेत. साहित्य अकादमी, प्रादेशिक राज्यांनी नेमलेल्या पारितोषिक समित्या आणि साहित्यिकांस नोकऱ्या किंवा काम देणारी ऑल इंडिया रेडियो की केंद्रे ही प्रामुख्याने नेत्रांसमोर येतात. त्यांचा साहित्यिकांवर व साहित्यावर प्रभाव पडेल किंवा बंधन निर्माण होईल इतके महत्त्व त्यांना अजून यावयाचे आहे. त्यांचा साहित्यक्षेत्रांत अप्रत्यक्ष प्रभाव वा बंधन निर्माण करण्याइतका शिरकाव अजून झालेला नाही. साहित्याच्या गरजांना पुरणारा राज्याश्रय अजून निर्माण झालेला नाही. त्याविरुद्ध आरडाओरडा मात्र आतांपासून सुरू झाला आहे. त्यांच्या पारितोषिक वितरणांत राजकीयदृष्ट्या व अन्यप्रकारे काही महत्त्वाचा दोष वा पक्षपात होत आहे, असेही म्हणणे धाडसाचे ठरेल.

संसदीय लोकशाही व पक्षोपपक्षांना असलेले पूर्ण स्वातंत्र्य यांच्या पार्श्वभूमीवरून भारतीय व प्रादेशिक सरकारे साहित्याच्या संबंधात वागत आहेत असे आतापर्यंत तरी म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. पारितोषिके व नोकऱ्या यांच्या योगाने साहित्यिक मिंधे होतात हे त्यांच्या विचारांवर त्याचा विपरीत परिणाम होतो लोक म्हणतात. मिंधेपणाची सवय अत्यंत

कुचकामाची आहे; साहित्यकारांत व लेखकांत असा मिंधेपणा येतो आणि त्याने त्यात त्याचे नुकसानच आहे असे म्हणावे लागेल. सरकार जर काही तत्त्वांवर आधारलेले असेल, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बंधने साहित्यिकांवर लादीत नसेल, तर साहित्यिक आश्रय देणाऱ्या सत्तेचा तो सद्गुण ठरेल. काहीही असले तरी साहित्य व साहित्यकार यांनी लोकाश्रयालाच अधिक महत्त्व देणे योग्य ठरेल.

प्रबोधन पावलेली आत्मशक्ती कोणत्याच बंधनास जुमानीत नसते आत्मशक्ती ही सर्वांत वरिष्ठ होय. कारण ती अनंत असते. ती ज्याच्या ठिकाणी प्रबोधन पावलेली आहे, असे साहित्यकार व लेखक लोकबंधन वा राजबंधन या उपाधीच्या बाहेरच मनाने वावरत असतात. अशांच्या साहित्यापुढे लोक, राजे व राज्ये अखेरीस नमतातच.

(सत्यकथा, नोव्हेंबर, १९५७ (दिवाळी), पृ. ८४ ते ९७)

ooo

८

उद्याचा महाराष्ट्र

भूमिका

'मुंबई हे द्वैभाषिक ही काळ्या दगडावरची रेष आहे.' हे द्वैभाषिक राज्य 'यावच्चंद्र दिवाकरौ टिकणार' असे उद्गार एका काळी काढले जात असत. संताप आणि चीड या दोन्ही भावनांचा प्रादुर्भाव या उद्गारांमुळे असंख्य मराठी मनांमध्ये होत असे, आज त्या अविवेकी उद्गारांबद्दल वाटते ती कीव! परिस्थिती किती बदलली आहे, याचे हे द्योतक आहे. सरकारी पातळीवर द्वैभाषिक मुंबई राज्याच्या विभाजनाचा विचार मंजूर व्हावयाचा आहे. सध्या अधिकारारूढ पक्षात त्याची भवती न भवती चालू आहे; परंतु द्वैभाषिक राज्याचे विसर्जन आता फारसे दूर नाही, याबद्दल कुणालाही शंका नाही. नजीकच्या भविष्यकाळात द्वैभाषिक राज्याची जागा एकभाषिक राज्ये घेतील, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे. जनतेने हे जाणले आणि होऊ घातलेल्या बदलाचे मुक्तहस्ते स्वागत केले. आपल्याला जे हवे होते ते मिळाले, असेच जनतेने मानले. मात्र अजून पदरात पडायचे आहे, म्हणून तिला थांबावेसे वाटले नाही. मनमोकळ्या स्वागताचा नजराणा तिने पं. नेहरूंना देऊनही टाकला. महाराष्ट्रावर झालेला अन्याय दूर करण्याचा पवित्रा पंतप्रधानांनी घेताच जनतेने कृतज्ञबुद्धीने त्याला प्रतिसाद दिला. महाराष्ट्रातील वातावरणात झालेला हा बदल हे एक मोठे सुचिह्न आहे. हा बदल तसाच कायम राहील, अशी अपेक्षा आहे.

द्वैभाषिकाचे विसर्जन हा महाराष्ट्र-गुजरातमधील जागृत जनशक्तीचा विजय आहे. या चित्राच्या एका बाजूला गेल्या चार वर्षांतील आंदोलनाचा इतिहास आहे. राज्यपुनर्रचना समितीचा निर्णय जाहीर होण्याच्या सुमारास केलेले पोलिसी सक्तीचे प्रदर्शन, महाराष्ट्रावर अन्याय करणारा तो निर्णय, लोकांची प्रतिक्रिया व निर्घृण गोळीबाराने तिला मिळालेले उत्तर, शंभरावर जिवांचे झालेले बलिदान, महाद्वैभाषिकाचा जन्म आणि शेवटी सार्वजनिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे झालेले पानिपत-अद्याप महाराष्ट्रीयांच्या मनात ताजे आहे.

राज्यकर्त्यांचा दुराग्रह आणि जनतेचा प्रक्षोभ यांच्यात जणू रस्सीखेच चालली. दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचा भविष्यकाळ आहे. ज्यासाठी मराठीजनांनी एवढा जीव टाकला होता ते मराठी राज्य जन्मास येऊ घातले आहे. महाराष्ट्राचे स्वप्न साकार होऊ लागले आहे. आम्हाला असे वाटते की आपला विजय आहे असे महाराष्ट्राने मानून विजयाच्या या क्षणी उदार मनाने गेल्या चार वर्षांतील कटुता आणि प्रक्षोभ ही त्याने गिळून टाकावीत आणि आपले लक्ष, आपले बुद्धिवैभव, आपले सामर्थ्य नव्या महाराष्ट्राच्या उभारणीकडे वळवावे. या दृष्टीने विचाराला चालना मिळावी या हेतूने महाराष्ट्रातील प्रमुख पक्षाचे नेते आणि राजकारणाबाहेर असलेले काही विचारवंत यांच्यापुढे एक प्रश्नावली आम्ही ठेवली. ज्यांच्या उत्तरांतून गेल्या चार वर्षांतील घटनांचा अन्वयार्थ लागेल आणि पुढील मार्ग उजळून निघेल असे पुढील प्रश्न आम्ही विचारले होते :

१. द्वैभाषिक मुंबई राज्याचे लवकर विभाजन होणार या वार्तेचे लोकांनी स्वागत केले आहे; पण केंद्र सरकारने हा निर्णय याच वेळी का घेतला?

२. द्वैभाषिक विसर्जनाचा निर्णय हा महाराष्ट्र-गुजरातमधील जागृत जनशक्तीचा विजय आहे असे म्हटले जाते, पण या निर्णयाला लोकांची चळवळ किती मर्यादेपर्यंत कारणीभूत झाली आणि अधिकारारूढ पक्षाच्या पक्षीय स्वार्थाचा त्यांत किती भाग आहे?

३. राजपुनर्रचनेविषयीचा निर्णय जाहीर झाल्यानंतर जी चळवळ मुंबई राज्यात झाली तिच्याविषयी आपले काय मत आहे ?

४. संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेल्या चळवळीत महाराष्ट्रातील जातीयवाद गाडला जाऊन एक नवी शिवशक्ती निर्माण झाली, हे खरे आहे काय? की दुसऱ्या प्रभावी शक्तीचा जोर झाल्यामुळे गेल्या निवडणुकीत जातीयता गौण पावली!

५. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीबरोबरच महाराष्ट्राच्या सीमांचा प्रश्नही सुटण्याची शक्यता आहे काय? नसल्यास नंतर तो कसा सोडवावा?

६. संकल्पित महाराष्ट्रात उरणाऱ्या भाषिक अल्पसंख्याकांच्या हितसंरक्षणासाठी काही खास उपाय योजण्याची आवश्यकता आहे काय? असल्यास कोणते? मद्रास, बंगलोर, हैदराबाद या शहरांच्या बाबतीत अशी उपाययोजना केली नसती केवळ मुंबईच्या बाबतीत ती करणे न्याय्य ठरेल काय?

७. संकरित महाराष्ट्राचे प्रादेशिक ऐक्य कसे साधता येईल? नागपूर करारासारख्या करारांनी हा प्रश्न सुटू शकेल का? की करारामुळे देवाणघेवाणीला सौदेबाजीचे स्वरूप प्राप्त होऊन मूळ हेतूला धोका निर्माण होईल?

८. संकल्पित महाराष्ट्राच्या प्रादेशिक ऐक्याइतकाच सामाजिक ऐक्याचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. जातीयतेच्या जोडीला हरिजनांच्या धर्मांतराचा प्रश्न आहे. अशा स्थितीत एकसंध मराठी समाज कसा निर्माण करता येईल?

९. द्वैभाषिकविरोधी लढ्यामुळे मुंबई राज्यातील विकासकार्याची गती बरीचशी मंदावली. संकल्पित महाराष्ट्र हे अंतर कसे भरून काढू शकेल? द्वैभाषिकविरोधी लढ्याच्या निमित्ताने झालेल्या लोकजागृतीचा विकासकार्यासाठी कसा उपयोग करून घेता येईल?

१०. नवे मराठी राज्य आर्थिकदृष्टया कितपत समर्थ ठरेल? या राज्याच्या अर्थकारणावर मुंबईचा प्रभाव राहिल्यास ग्रामीण विभागाला त्यात अन्याय होणार नाही काय?

११. वर्तमान मुंबई राज्यापेक्षा नव्या मराठी राज्याचे आर्थिक धोरण अधिक पुरोगामी असेल, असे एक मत आहे. आपणांस ते मान्य आहे काय? का?

१२. नव्या महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाविषयी आपले काय विचार आहेत?

१३. महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्षांचे विधिमंडळांतील त्यांच्या प्रतिनिधिसंख्येवरून जे बलाबल दिसते ते वस्तुस्थितिनिदर्शक आहे काय? तसे ते नसेल तर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणाला नवे वळण लागणे अपरिहार्य नाही काय?

१४. संयुक्त महाराष्ट्र समितीची निर्मिती संयुक्त महाराष्ट्राचे ध्येय साध्य करण्यासाठी झाली होती. ते साध्य झाल्यावर समितीचे विसर्जन होणे क्रमप्राप्त नाही काय?

वरील प्रश्नांखेरीज निरनिराळ्या घटकांचे खास प्रश्न समजून घेण्यासाठी पुरवणी प्रश्न विचारण्यात आले. उदाहरणार्थ, रिपब्लिकन पक्षाचे नेते श्री. बी. सी. कांबळे यांना, डॉ. आंबेडकरांना एकाहून अधिक मराठी राज्ये अस्तित्वात यायला हवी असता रिपब्लिकन पक्षाने संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार कोणत्या भूमिकेवरून केला? धर्मांतरामुळे अस्पृश्यतेची सामाजिक बाजू कशी बदलते? धर्मांतरामुळे अस्पृश्यांच्या सामाजिक स्थानांत काही मूलभूत परिवर्तन झाले काय? नवबौद्धांच्या संयुक्त महाराष्ट्राकडून काय अपेक्षा आहेत? असे प्रश्न विचारले होते. स्वामी रामानंद तीर्थ यांनाही मराठवाड्याच्या संदर्भात मराठवाड्याची संयुक्त ते महाराष्ट्रविषयक भूमिका, मराठवाडा-विदर्भ यांचे वेगळे राज्य बनविण्याची कल्पना, मराठवाड्याच्या खास समस्या यांबद्दलचे प्रश्न विचारले. विदर्भाविषयी अशीच वेगळी मुलाखत घेण्याची कल्पना होती; पण अनेक अडचणींमुळे ती कल्पना प्रत्यक्षांत येऊ शकली नाही.

अशी ही मुलाखतींची योजना. या वेळी या मुलाखती महाराष्ट्रापुढे मांडण्यात एक औचित्य आहे. महाराष्ट्राचे स्वप्न साकार होत आहे, असे वर म्हटले; पण हा आकार द्यायचा कुणी? केंद्र सरकार भारताच्या राजकीय नकाशावर मराठी भाषिक राज्य निर्माण करून ठेवील; पण त्या राज्याचे भविष्य शेवटी साडेतीन कोटी महाराष्ट्रीयांच्याच हातात आहे. ओल्या मातीला द्यावा तसा आकार येतो; उद्याच्या महाराष्ट्राचे तसेच आहे. जातिभेद, पक्षभेद इत्यादी गोष्टी बाजूला ठेवून नव्या महाराष्ट्राची उभारणी करण्यास सर्व लोक एकजुटीने सिद्ध झाले तर पुढील मुलाखतींच्याद्वारे मराठी नेत्यांनी जे मार्गदर्शन केले आहे ते खरोखरच उद्बोधक ठरेल आणि त्याचा मागोवा विचारपूर्वक आणि दक्षतापूर्वक घेत गेल्यास महाराष्ट्र की वैभवाचा मार्ग पुन्हा एकदा आक्रमू लागेल, असा विश्वास वाटतो.

लक्ष्मणशास्त्री जोशी

केंद्र सरकारने हा निर्णय याच वेळी का घेतला, असा प्रश्न मांडण्यापेक्षा केंद्र सरकारने हा निर्णय याच वेळी घेण्याचे मनात आणले असावेसे दिसते ते का- असा हा प्रश्न बदलला पाहिजे. कारण केंद्र सरकारने वैध पातळीवरून म्हणजे उघडरीत्या हा प्रश्न सोडविण्यास हाती घेतलेला दिसत नाही. अधिकारारूढ पक्षाने तो हाती घेतला आहे, असे दिसते, याच वेळी हा प्रश्न हाती घेतला याची कारणं अनेक आहेत. आताच धसाला लावणारे कारण आंतरराष्ट्रीय कम्युनिझमचा निर्माण झालेला धोका हे असावे, असे वाटते. अशा प्रसंगी देशातील कोणत्याही प्रांतातील जनतेत नाखुशी किंवा बेदिली ठेवणे अधिक धोक्याचे ठरते.

द्वैभाषिक विसर्जनाचा निर्णय जागृत जनशक्तीच्या प्रभावी मागणीमुळे घेण्यात आला या बाबतीत कोणासच शंका असण्याचे कारण नाही. स्वतः पं. नेहरू यांनी गेल्या साली औरंगाबादेस ही गोष्ट अनेक वाक्यांनी सूचित केलेली अनेकांच्या आठवणीत असेलच. लोकांची चळवळ व अधिकारारूढ पक्षाचा लोकशाही ध्येयवाद यांच्या संयोगाचे हे फळ आहे. पक्षीय स्वार्थ त्यात आहे, यात शंका नाहीं. कोणताही स्वार्थ नैतिक व ध्येयवादी मार्गाने साधता आला तर तो स्वार्थ परमार्थच ठरतो. प्रादेशिक राज्यपुनर्घटनेचा निर्णय जेव्हा झाला तेव्हा या प्रदेशातील चळवळीत लोकशाहीचे संकेत पायाखाली तुडविणारे अनेक प्रकार व आविष्कार झाले.

राज्य पुनर्रचनेविषयीचा निर्णय जाहीर झाल्यानंतर जी चळवळ झाली ती लोकांची होती; तिच्यामध्ये पुष्कळ अविवेकाचे प्रकारही घडले आहेत. त्या अविवेकाच्या प्रकारांचे नैतिक समर्थन लोकशाही ध्येयवादात बसू शकणार नाही. लोक जे जे करतात ते बरोबर होय, हे काही लोकशाहीचे तत्त्व नव्हे. लोक चुकाही करू शकतात, एवढेच नव्हे तर, घोडचुकाही करू शकतात. मानवी मनात अविवेकाला प्रसविणाऱ्या भावनात्मक शक्ती भरपूर असतात; म्हणून लोकशाहीकरिता लोकशिक्षणाची आवश्यकता असते.

संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेल्या चळवळीत महाराष्ट्रातील जातीयवाद गाडला गेला, असे म्हणण्यापेक्षा तो तात्पुरता झाकून गेला असे म्हणणे अधिक समर्थनीय ठरेल. जात जोपर्यंत जात नाही, तोपर्यंत, जातीयवादाचे बीज कायम आहे, असे खुशाल समजावे. बर्फवृष्टीखाली देवदाराची उतारावरची झाडे गाडली जातात; परंतु उन्हे पडून बर्फ वितळू लागला म्हणजे वसंत ऋतूत, ती गाडलेली झाडे उघडी होतात. शिवशक्तीबरोबर 'शिवी' शक्ती तितकीच जोरदार होती, हे आपणास माहीत आहे. महाराष्ट्रात व दक्षिणेतील जातीयतेचा प्रश्न उदारमतवादी सार्वत्रिक शिक्षणाच्या खोल सरकाराने व दीर्घकाळाने सांस्कृतिक समता उत्पन्न होऊनच सुटू शकेल.

संकल्पित महाराष्ट्रात उरलेल्या भाषिक अल्पसंख्याकांचे हितसंरक्षण करण्यासाठी जी उपाययोजना करणे आवश्यक आहे ती मद्रास, मध्यप्रदेश, बंगाल, गुजराथ इत्यादी इतर सर्व प्रांतांतही करणे अत्यंत इष्ट आहे. याबाबतीत मध्यप्रदेशातील हिंदी भाषिकांना उपक्रम

अनुकरणीय व अभिनंदनीय म्हणता येईल, या बाबतीत कर्नाटकातील प्रशासकाचे धोरण अत्यंत आक्षेपार्ह आहे, असे म्हणतात.

मुंबईला ग्रीक पुराणातील वैमनस्य देवतेच्या सुवर्णफलाचा [Apple of Discord] दृष्टांत देता येतो. त्या सुवर्णफलाने जी दुःखान्तिका ग्रीक इतिहासात वैमनस्य देवतेने घडविली ती येथे घडली नाही, याचे श्रेय काँग्रेसच्या लोकशाही ध्येयवादालाही आहे. मुंबई शहराचा प्रश्नच संयुक्त महाराष्ट्राला नडला. मुंबईचे मद्रास, हैद्राबाद, कलकत्ता इत्यादी शहरांशी जरी साम्य असले तरी मुंबई ती मुंबई! येथील काही भाषिक अल्पसंख्याकांचे हितसंबंध फार जागृत आहेत. प्रांतरचनेचा प्रश्न हितसंबंधांनीच इतक्या घोटाळयाचा केला म्हणून लोकशाहीला व समतेला बाधक असा सवतासुभा निर्माण होणार नाही इतक्या प्रमाणातच, किंबहुना त्या मर्यादेत भक्कमपणे राहूनच,आश्वासने देणे आवश्यक आहे. त्याचा तपशील महत्त्वाचा नाही. त्यातील प्रवृत्ती किंवा भावना ही महत्त्वाची आहे.

महाराष्ट्राचे प्रादेशिक व सामाजिक ऐक्य साधण्यास नागपूर करारासारखे करार काही काळपर्यंत बाधक दिसत असले, तरी प्रादेशिक व सामाजिक ऐक्याचा प्रश्न अखेरीस भारतीय राजकारणाची व समाजकारणाची प्रगती व भवितव्य यांच्याशी निगडित आहे. महाराष्ट्राची सामाजिक रचना व भारतीय समाजरचना यांचे प्रश्न तत्त्वतः समानच आहेत. एकसंध मराठी समाज व एकसंघ भारतीय समाज या आदर्शरूप घटना जेव्हा इतिहासक्रमाने घडू लागतील व फलद्रूप होऊ लागतील तेव्हा तो क्रम (Process) भारताचा व महाराष्ट्राचा एकच राहणार आहे. एकसंध मराठी समाज बनण्याची प्रक्रिया अलगपणे चालेल हे म्हणणे प्रांतवादी अंधभावनेचाच एक प्रकार ठरेल. भारत हे एकराष्ट्र आहे, अशी ज्यांची श्रद्धा आहे, त्यांना भारताचे राजकारण व समाजकारण एक आहे. हे मान्य केल्याशिवाय गत्यंतर नाही. आजही भारत बंधनात आहे व त्याची बंधमुक्त करणारी शक्ती भारताबाहेर आहे, असे मानणारा एक गट संयुक्त महाराष्ट्र समितीत आहे; त्यालाच समाजवादी महाराष्ट्र ही घटना समाजवादी भारत या घटनेपेक्षा अलग दिसते; निदान तो गट ही अशी फुटीर भावना चेतवून येथे बेबंदशाही निर्माण करू इच्छितो.

मराठी राज्याचे आर्थिक धोरण व विकासकार्य हा, भारताचे आर्थिक धोरण व विकासकार्य यांचा अविभाज्य अंश आहे, ही गोष्ट भौतिक महत्त्वाची आहे, हे गृहीत धरूनच त्याविषयी विचार करणे समंजसपणाचे ठरेल. हा समंजसपणा प्रांतवादी विचारवंतात कमी असतो. हे मात्र खरे आहे की, त्या त्या प्रांतातील राजकीय संघटना व राजकीय नेतृत्व किती पुरोगामी असेल त्याच्या कमी जास्त प्रमाणावरच प्रगतीचा वेग ठरतो; परंतु एकंदरीत धोरण केंद्र-राज्याच्या धोरणाच्या अनुषंगानेच ठरते. केंद्र सरकारचे धोरण पुरोगामी की प्रतिगामी यावरच प्रामुख्याने प्रागतिक राज्याच्या आर्थिक धोरणाची दिशा अवलंबून राहणार, ही गोष्ट उघड आहे. जुने अथवा वर्तमान मुंबई राज्य जमीनमालकीच्या बाबतीत अत्यंत पुरोगामी आहे, ही गोष्ट कूळकायद्यावरून स्पष्ट होते. त्या बाबतीत नव्या मराठी राज्याचे धोरण निराळे

होईल, असे म्हणण्याचे कारण नाही. महाराष्ट्राच्या अर्थकारणावर मुंबईचा प्रभाव रहावा असेच कोणताही पुरोगामी शास्त्रीय दृष्टीकोनाचा मनुष्य म्हणेल. ग्रामीण विभाग व नागरिक विभाग यांची समतोल प्रगती करणे हा भारताच्या पंचवार्षिक नियोजनांती स्वीकारलेला एक मौलिक सिद्धांत आहे. तो चांगल्या रीतीने कार्यवाहीत आणणारे नव्या मराठी राज्याचे सरकार बनेल, अशी आशा अपाण बाळगू या. नवे मराठी राज्य काँग्रेसचे बनले तर तसे होईलच, अशी खात्री देता येते. कारण तृतीय पंचवार्षिक योजना ही काँग्रेसची योजना आहे. नवे मराठी राज्य आर्थिक दृष्ट्या अधिक समर्थ होईल, अशी अपेक्षा बाळगण्यास अनुकूल कारणे पुष्कळ आहेत. मुंबईचे आर्थिक नेतृत्व हे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे. ज्यांना विकासवादी अर्थशास्त्र समजते व समाजवादी शास्त्रीय स्वरूप समजते, त्यांना मुंबईचे नेतृत्व मान्य करणे तर्कप्राप्त आहे.

नव्या महाराष्ट्राचा औद्योगिक विकास मुंबई शिवाय अन्य भागात होण्यास सहकारी चळवळच अधिक उपयुक्त ठरेल. खाजगी भांडवलावर आधारलेले उद्योगधंदे चालवण्याची नीती व रीती अजून महाराष्ट्रीय मंडळींच्या अंगी फारशी मुरलेली नाही. त्याकरिता भांडवलाच्या वैभवकारक व प्रगतिकारक शक्तींवर स्वाभाविक श्रद्धा असावी लागते. ती श्रद्धा परंपरेने पारशी, गुजराती व राजस्थानी यांच्यामध्ये जशी दृढमूल झाली आहे तशी महाराष्ट्रीय मंडळीत झालेली नाही. खाजगी भांडवल जमा झाले की ते दीर्घ काल धीर धरीतच नाही. त्याची अजून बुडण्याकडेच अधिक प्रवृत्ती आहे.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या विसर्जनाचा प्रश्न केरळ विमोचन समितीच्या पद्धतीनेच सोडविणे युक्त. हे धोरणच सर्व समिती - घटकपक्षांचे भले करील. समितीच्या विसर्जनातच संयुक्त महाराष्ट्राचे अधिक भले होईल. नाहीतर अंतर्गत पक्षाचे विग्रह भल्याबुऱ्या मार्गाने एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात मग्न राहून महाराष्ट्राचे राजकीय वातावरण दूषित करीत राहतात. विरोधी पक्षांची निकोप वाढ ही उदारमतवादी लोकशाहीची महत्त्वाची गरज असते. समिती हा पक्ष बनणे शक्य नाही. म्हणून प्रजासमाजवादी पक्षासारखे उदारमतवादी व लोकशाहीवर श्रद्धा असणारे पक्ष हुकूमशाही प्रवृत्तीच्या पक्षांपासून विलगपणे कार्य करू लागणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकीय विचारांत स्वच्छता व स्पष्टता उत्पन्न होईल. कोण, कसे व कोणत्या विचारांचे याची नीट ओळख जनतेला होत जाईल; जनतेच्या मनातील मतामतांचा गोंधळ कमी होईल. लोकशाहीच्या वाढीस ज्या प्रकारचे राजकीय शिक्षण जनतेस मिळणे आवश्यक आहे, त्यास त्यामुळे चांगली मदत होईल.

(मौज, दिवाळी, १९५९, पृ. १२५ व १२६)

ooo

९

भारताचे ऐक्य धोक्यात आहे काय?

ब्रिटिश राजवटीच्या काळात परिस्थितीची आव्हाने विविध प्रकारची होती. त्यातील सर्वांत वरिष्ठ आव्हान कोणते असा वाद माजला होता. त्यातून राजकीय पारतंत्र्य हे सर्वांत वरिष्ठ आव्हान ठरले व त्याला भारताने यशस्वी उत्तर दिले होते.

आता स्वातंत्र्याची जबाबदारी पडल्यानंतर राष्ट्रीय ऐक्य साधण्याचे नवे महान आव्हान चालू परिस्थितीतून साद-पडसादाच्या रूपाने ऐकू येत आहे. त्यामुळे भय आणि निराशा उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. ब्रिटिशांच्या अपार राजकीय सामर्थ्यामुळे पारतंत्र्य मुक्तीबद्दल निराश झालेला सुशिक्षित विचार वंश, वर्ग, अभेद्य होता; परंतु गुंतागुंतीच्या विविध प्रश्नांच्या विराट जंजाळात ज्यांना आल्हाददाक किंबहुना निर्णयक असे उत्तर दिसले, असे द्रष्टे त्या काळाला लाभले. त्यांनी जनमनाला वेढून घेतले त्यामुळे तर्कवितर्कांच्या युक्तिवादाचे प्रचंड वैचारिक अडथळे धुक्यासारखे विरून गेले. हा नुकत्याच घडलेल्या भूतकाळाचा धडा आहे.

सद्यःस्थितीचे असेच विलक्षण गुंतागुंतीचे महान आव्हान दशदिशांना निनादून भेडसावू लागले आहे. विशाल लोकराज्य निर्माण झाले आहे. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रचंड नियोजने कार्यवाहीत येवू लागली आहेत. तथापि, या विशाल लोकराज्याला अराजकाचे धोके उत्पन्न होऊ लागले आहेत. नियोजने वैफल्याच्या दोषचक्रात सापडली आहेत असे राजकारणी व अर्थकारणी पंडितजन बोलू लागले आहेत.

मुक्ती निश्चितपणे दरवाजात येईपर्यंत ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातून मुक्त होण्याचा मार्ग व त्याची साधने बुद्धिवाद्यांच्या व विचारवतांच्या मनःचक्षुंपुढे स्पष्ट रूपांत गोचर झाली नव्हती. तरीसुद्धा तार्किक विचाराने निर्माण केलेल्या विलक्षण निराशेच्या पोटात अदम्य व अनिवार्य असा आशावाद कार्य करीत होता आणि बौद्धिक भूमिकेला न जुमानता नैतिक ध्येयवादाच्या अंतस्थ प्रेरणांनी प्रेरित झालेले द्रष्टे व त्यांचे अनुयायी असलेले सामान्यजन आंदोलनापाठीमागून आंदोलने निर्माण करून अखेर यशस्वी झाले. त्यापेक्षा आजची

परिस्थिती निराळी आहे. आजचा निराशावाद केवळ दुर्बल व घाबरट मनःप्रवृत्तीचा द्योतक आहे.

धोके आणि संकटे मोठीच आहेत, यात शंका नाही. राजकीय व राष्ट्रीय ऐक्याला जबरदस्त धक्के देणारे धोके निर्माण होत आहेत. कारण येथील राष्ट्रीयतेचा पाया इतिहास-प्रसिद्ध युरोपियन राष्ट्राच्यांपेक्षा निराळा आहे. राष्ट्रवाद व राष्ट्रप्रेम हा ध्येयवाद दोनशे वर्षांपेक्षा जुना नाही. त्या ध्येयवादांना साकार होऊन राष्ट्र निर्माण होण्यास दोनशे वर्षांपेक्षा अधिक काळ लोटलेला नाही. युरोपात राष्ट्र ही सामाजिक संघटना एकभाषिक समाजाच्या पायावर बहुतेक ठिकाणी उभारली गेली. इंग्लंड, फ्रान्स, इटली, स्पेन, जर्मनी ही एकभाषिक राष्ट्रे जन्मली. भिन्न भाषिक समाजांचे स्वित्झर्लंडसारखे एखादे चिमुकले राष्ट्र अपवादादाखल दिसतें.

भारताचे राष्ट्रीयत्व इतिहासप्रसिद्ध राष्ट्रीयत्वापेक्षा वेगळे आहे. त्याचे हे वेगळेपण दोन मोठ्या गोष्टींनी सिद्ध होते. यापेक्षा अधिक भाषिक समाजचे हे राष्ट्र बनले आहे. एकेक भाषेचे एकेक राष्ट्र बनण्याची युरोपप्रमाणे येथेही शक्यता होती, परंतु तसे झाले नाही.

दुसरी मोठी गोष्ट म्हणजे अनेक धार्मिक समाज असलेले हे अपवादात्मक असे मोठे राष्ट्र आहे. युरोपातली सर्व राष्ट्रे एकधर्मी आहेत. भारतात भिन्न धर्म व भिन्न भाषा असल्यामुळे येथील संस्कृतीसुद्धा भाषाभेदामुळे व धर्मभेदामुळे भिन्न आहे. येथे भिन्न संस्कृती आहेत, असे कित्येकांना सांगावेसे वाटते. कारण सांस्कृतिक जीवन हे मुख्यतः भाषेमध्ये म्हणजे साहित्यात व्यक्त झालेले असते आणि धर्म हा सांस्कृतिक मूल्यांचा संरक्षक आधार असतो. परंतु भेदामध्येसुद्धा भरलेला अभेद असतो. भिन्न भाषांच्यामधून एकच विचार व एकच भावना प्रभावीपणे गुंफलेली आढळते. परंतु भेदांची मीमांसा करीत असताना मन भेदांमध्ये गोंधळून जाते, त्यामुळे त्यांतील अभेदाचे दृढ धागे दृष्टीआड होतात.

भारतीय समाजरचनेमध्ये एकेक जात हा एकेक निराळा समाज आहे, असा भास समाजशास्त्रज्ञांनासुद्धा होतो. परंतु हजारो वर्षापासून विविध जाती या सामाजिक व्यापक सहकार्याच्या तत्त्वांत गुंफल्या जाऊन त्या एकविध समाजाचे विविध अंश किंवा भाग बनले आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे.

भिन्न भाषिक, भिन्न धर्मीय व भिन्न जातीय सामाजिक गटांनी भारत विभागलेला दिसत असला, तरी तो समान व व्यापक अशा हितसंबंधांनी अपरिहार्यरीतीने एकत्र जोडलेला व गुंफलेला आहे आणि एकसंध लोकशाही संघराज्य म्हणजे अप्रत्यक्ष असलेल्या समान हितसंबंधाचे मूर्तिमंत व प्रत्यक्ष रूप आहे. येथील भिन्न जाती व भिन्नभाषिक प्रांत यांचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हितसंबंध इतिहासाने व भूगोलाने एकमेकांत जखडून टाकले आहेत आणि त्या हितसंबंधांमध्ये एकजीवपणा (Organic Relationship) निर्माण केला आहे. त्या एकजीव अशा हितसंबंधांना धोके निर्माण करणाऱ्या विध्वंसक

प्रवृत्ती वाढू लागल्या म्हणजे वेदना निर्माण होतात. भारत या प्रक्षोभक वेदनांच्या युगात आहे. भारताचे मूलभूत ऐक्य हे भारताला पंचप्राणांसारखे आहे. भारताचे ऐक्य वरपांगी आहे, राष्ट्रीय एकता एक प्रासंगिक रीतीने घडविलेली ऐतिहासिक घटना (Accident) आहे, त्याला खंबीर सामाजिक व सांस्कृतिक पाया नाही, अशा प्रकारचे विचार हे अधीर व उथळ मनःप्रवृत्तीचे दर्शक आहेत.

भारतातील भाषिक भेद हे सांस्कृतिक भेदाचे दर्शक मानता येणार नाहीत. कारण, सांस्कृतिक एकता हजारो वर्षांच्या उच्च तत्त्वज्ञानांनी व जीवनमूल्यांनी, कलात्मक आविष्कारांनी व साहित्याच्या नवरसात्मक भावनांनी एकरूप अशी घडविलेली आहे. भिन्न भाषांमधील रामायण एकच आहे. हे एकात्मक संस्कृतीचें रामायण हजारो वर्षे कवींनी आजपर्यंत ऐकविले आहे. परंतु सांस्कृतिक एकता असूनही राष्ट्रीय एकता नसते याची उदाहरणे युरोपातील राष्ट्रांच्या रूपाने दिसून येतात.

परंतु येथील राजकीय एकता गेल्या शतकातील दोन ऐतिहासिक घटनांनी निर्माण केली आहे. (१) ब्रिटिशांचे एकछत्री राज्य व (२) ते राज्य घालविणारे राष्ट्रव्यापी जनतेचे आंदोलन या त्या दोन घटना होत. ब्रिटिशांच्या एकछत्र राज्याचाच तेवढा निर्देश पंडितजन करीत असतात; परंतु बरेचसे पंडित राष्ट्रव्यापी आंदोलनाचे तटस्थ प्रेक्षक होते, म्हणून त्यांना जणू काय दुसऱ्या घटनेचा विसर पडलेला दिसतो !

मानसशास्त्रदृष्टया आजची राष्ट्रीय मनःस्थिती भावनांच्या द्वैतांत गोंधळलेली Ambivalent दिसते. व्यापक राष्ट्रीय हितसंबंधाचा विसर पाडणारे स्थानिक स्वरूपाचे प्रश्न असा गोंधळ निर्माण करीत आहेत. परंतु याच वेळी, या व्यापक राष्ट्रीय हितसंबंधांना अधिक दृढ, बलशाली, मूर्तिमंत आकार आणणारी दोन नवी व्यापक आंदोलने सध्या निर्माण झाली आहेत. एक म्हणजे आर्थिक नियोजन, या नियोजनाने भिन्न भिन्न प्रदेशांमध्ये एकजीवपणा आणणारे नवे आर्थिक संबंध निर्माण होत आहेत. गुजरातच्या तेलावर, बिहारच्या लोखंडावर, बंगालच्या ज्यूटवर, बंगलोरच्या शास्त्रीय संशोधनावर व समुद्रकिनाऱ्यावरील अणुशक्ती निर्माण करणाऱ्या खनिज द्रव्यांवर हे आर्थिक हितसंबंध एकजीव बनत आहेत. आधुनिक यांत्रिक साधनांनी निर्माण होणारे नवे आर्थिक जीवन सगळ्या मानवजातीमध्येच एकता निर्माण करीत आहे; तर ते राष्ट्रीय एकता निर्माण करील यात नवल नाही. त्यामुळे युरोप, आशिया, अमेरिका अशा प्रकारचे भेदसुद्धा आधुनिक काळाशी विसंगत ठरत आहेत. राष्ट्रभेदावर रचलेले राजकीय भेद हेसुद्धा आधुनिक काळातील यांत्रिक वेगाने निर्माण होणाऱ्या एकसंध मानवी संबंधांशी विसंगत ठरत आहेत. या नव्या जगातील वैज्ञानिक व तांत्रिक शक्ती राजकीय व राष्ट्रीय भेदांना जरठ रूढीचे मृत अवशेष म्हणून धिक्कारण्यास लवकरच उद्युक्त होतील, असा अंदाज भारतातील राजकीय द्रष्टे करीत आहेत. म्हणून विज्ञान व तंत्र यांवर आधारलेल्या आर्थिक शक्तीमधील ऐक्यसाधक सामर्थ्य दिसते त्यापेक्षा

कितीतरी पटीने विशाल आहे हे ध्यानात आणणे जरूर आहे. जागतिक युद्ध जर दहावीस वर्षे लाभले तर मानवी ऐक्याचा विशाल मेरू जागतिक राज्याच्या रूपाने अवतरेल असेही भविष्य जर एखाद्या भविष्यवाद्याने सांगितले तर त्यांत फारसे गैर आहे असे म्हणता येणार नाही.

नवभारतात साकार होत असलेली दुसरी महत्त्वाची ऐक्यसाधक घटना म्हणजे समान शैक्षणिक मूल्ये व शिक्षणातील समान विद्या होत. आधुनिक शिक्षणातील विद्या या जागतिक विद्या आहेत. धर्मांध पाकिस्तानच्या इस्लामी विद्यापीठांतदेखील ज्या विद्यांच्या शिक्षणावर भर दिला जातो त्या विद्या धर्मातीत (सेक्युलर) व विश्वैक्य सांधणाऱ्या आहेत. हे शिक्षण सर्वसामान्य जनतेच्या घरादारात वावरू लागले म्हणजे प्रांतिक, भाषिक, जातीय व धार्मिक भेदांचे अभिमान आपोआप गळून पडतील!

(किर्लोस्कर मासिक, ५०० वा अंक, ऑगस्ट, १९६७, पृ. २६ ते २८)

○○○

१०

महाराष्ट्राची नीतिमत्ता

राजकीय क्षेत्रातील नीतिमत्ता

प्रश्न: अलीकडे शासन आणि राजकारण यांतील नीतिमतेची चर्चा फार चालते. या विशिष्ट दृष्टीने पाहू जाता, राजकीय नीतिमत्ता या शब्दाची व्याख्या आपण काय करता ?

उत्तर : राजकीय नीतिमत्ता या शब्दाची व्याप्ती राजकारणातील आणि राज्यशासनातील व्यवहार योग्य मार्गाने घडत आहेत की नाहीत एवढ्यापुरतीच मर्यादित असावी, असे पुष्कळ राजनीतिज्ञ मानतात. परंतु व्यक्तिशः मला तसे वाटत नाही. राज्यव्यवहाराची प्रेरकशक्ती जी राजनीती, तिचेही स्वतःचे असे नीतिमत्तेचे काही आदर्श आणि निकष असतात, आणि समाजाच्या धारणेसाठी तसे ते असणे आवश्यक आहे असे माझे मत आहे.

'राजनीती' या शब्दप्रयोगातील 'राज' हा शब्द प्राचीन काळी राजा या अर्थाने वापरला जात असे, सध्याच्या लोकशाहीच्या या काळात तो 'राज्य' या नव्या अर्थाने आपणांस वापरावा लागेल, एवढाच फरक आधुनिक काळी फार तर करता येईल.

प्रश्न : राजनीतीला नीतीचे बंधन असावे की नसावे याबद्दल आपले काय मत आहे?

उत्तर : राजनीतीला नैतिक पावित्र्याचे बंधन असावे की नाही, नैतिक मूल्यांचे निकष तिला लावावेत की नाही, यासंबंधी आपल्या देशात महाभारतकालापासून वादविवाद आणि चर्चा होत आल्या आहेत. राजनीतीला अशा प्रकारचे बंधन असू नये, असे हिरिरीने प्रतिपादन करणारा एक पक्ष प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. याच्या उलट राजनीतीत आणि राजकारणात नैतिक मूल्ये असली पाहिजेत, असे मानणारा दुसरा एक पक्ष आहे. प्रथमच सांगतो की व्यक्तिशः मी राजकारणात नैतिक मूल्ये असली पाहिजेत, असे मानणाऱ्यांपैकी एक आहे. ('शब्दरंजन'चे संपादकही तसेच असावेत, असे मला वाटते, नाहीपेक्षा महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील नैतिक पातळी खालावली आहे काय, या

प्रभावर माझी मुलाखत घेण्यास त्यांनी तुम्हास मजकडे पाठवलेच नसते.)

राजकारणांत आणि राजनीतीमध्ये नैतिक मूल्ये असलीच पाहिजेत, असे मी का म्हणतो, याचे थोडे स्पष्टीकरण देतो. राजनीतीचे अंतिम तथ्य जे राज्य, त्याचा मानवी जीवनाशी असलेला संबंध फार खोल आहे. माणसाचे सामाजिक जीवन राज्यसंस्थेवर आधारलेले असते. राज्यसंस्थेचे सामाजिक जीवन किंवा शासनमुक्त समाजजीवन याची कल्पनाच करवत नाही. जगाच्या इतिहासात अशा प्रकारचा समाज झाल्याचा कोठे दाखला नाहीं. यापुढेही कधी होईल असे वाटत नाही.

अशा स्थितीत, लोकजीवनाचा आधारच तर राजसत्ता अथवा राज्यसंस्था आहे तर विशिष्ट संस्थेचा नीती हा प्राणच आहे असे मानण्यावांचून गत्यंतर रहात नाही. कारण कोणतेही समाजजीवन नैतिक मूल्यांवाचून चालूच शकत नाहीं. नीती हा सामाजिक जीवनाचा प्राण आहे. या सामाजिक जीवनाचे नियंत्रण करणारी जी अनेक साधने समाजात उपलब्ध आहेत, त्यांपैकी राज्यसंस्था हे सर्वांत महत्त्वाचे साधन आहे. या विशिष्ट संस्थेत प्रामाणिकपणा, सचोटी, सत्यनिष्ठा व अहिंसा ही स्थायी स्वरूपाचीं नीतितत्त्वे नसतील, तर सर्व समाजजीवनच कोलमडून पडेल.

अशा स्थितीत, महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील नीतिमत्तेची सद्यःकालीन स्थिती काय आहे, हे नीट समजून घ्यावयाचें, तर त्यासाठी या प्रश्नाची तात्त्विक आणि ऐतिहासिक बाजू प्रथम समजून घेतली पाहिजे. राजनीती व भारतीय विचारवंतांच्या हजारों वर्षांच्या चर्चेचा व चिंतनाचा विषय झालेला आहे. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रांत व व्यासांनी ही महाभारतांत राजनीती आणि नीती यांच्या परस्परसंबंधांविषयी सविस्तर चर्चा केली आहे. सर्व चर्चेमध्ये, राजा किंवा राज्यसंस्था समाजधारणेकरता उत्पन्न झाली आहेत याविषयी त्या दोघांचेही एकमत दिसते. समाजधारणा हा राज्यसंस्थेचा नैतिक उद्देश आहे, आणि कोणत्याही राज्यसंस्थेच्या यशापयशाचा निकषही समाजधारणा हाच आहे, असे कौटिल्य पुनःपुन्हा सांगतो. महाभारतातही काही थोड्या फरकाने तसेच सांगितले आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय आणि अक्रोध हे गुण व्यक्तीच्या धारणेसाठी आवश्यक आहेत तसेच व्यक्तिसमूह या नात्याने समाजाच्या धारणेसाठीही आवश्यक आहेत असे व्यास म्हणतात, या विशिष्ट दृष्टीने, समाजधारणेचे प्रमुख साधन जी राजनीती, त्यामध्येही या गुणांचा प्रकर्षाने उपयोग झाला पाहजे, असे व्यास कटाक्षाने पुनःपुन्हा सांगतात.

प्रश्न : कौटिल्य आणि व्यास यांनी प्रतिपादन केलेले राजनीतीविषयक सिद्धांत आणि महात्मा गांधींचे सत्यअहिंसा या गुणांनी शिरोधार्य मानणारे तत्त्वज्ञान यांत काही तफावत आहे काय? असल्यास त्याचे निश्चित स्वरूप काय आहे?

उत्तर : राजाने किंवा क्षत्रियाने आक्रमण करून शस्त्रबलाने राज्य वाढवावे किंवा निर्माण करावे ही गोष्ट जगातील किंवा प्राचीन भारतातील सर्वच राजनीतिशास्त्रज्ञांनी योग्य मानली

आहे. अशा स्थितीत, राज्यस्थापनेकरता आणि राज्यवाढीकरीता प्रसंगी हिंसामय आणि असत्य मार्गाचाही अवलंब करण्यास हरकत नाही, असे प्राचीन राजनीतिज्ञांचे मत आढळून येते. लुटालूट, जाळपोळ, कत्तल यांसारखे अत्याचार आणि दंगलबाजी, फसवणूक यांसारखे असत्याचरण यांकडे राज्यसंपादनाचे अपरिहार्य मार्ग म्हणून ते बघतात. या दुर्गुणांकडे दुर्लक्ष करतात.

अगदी प्राचीन काळापासून आधुनिक क्रांतिकारकांपर्यंत भारताचा राजनैतिक इतिहास आपण बारकाईने पाहिला, तर सुमारे १९०० वर्षांच्या या साऱ्या इतिहासावर राज्यप्राप्तीच्या साध्यासाठी कोणतेही साधन क्षम्य आहे, या तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो. राज्यस्थापना ही समाजधारणेकरता असते. राज्यसंपादन करून देणारी राज्यक्रांती एकदा सिद्ध झाली म्हणजे समाजाचे कल्याण व प्रगती करणाऱ्या उच्चतर सामाजिक संस्था निर्माण करता येतात, निर्माण होतात व त्यामुळे मानवसमाजास हितसाधना करता येते. म्हणून राज्य निर्माण करण्याची साधने जरी नैतिकदृष्ट्या अशुद्ध असली तरी राज्यप्राप्ती हे साध्य किंवा उद्दिष्ट नेहमीच शुद्ध व पवित्र असते आणि त्यांच्या प्राप्तीकरिता अशुद्ध साधनेही समर्थनीय होत, असे या परंपरागत तत्त्वज्ञानाचे थोडक्यात स्वरूप सांगता येईल.

या विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवर म. गांधींनी उद्घोषित केलेला राजकारणातील साधनशुचितेचा अथवा सत्यअहिंसेचा सिद्धांत साऱ्या भारताच्या आणि जगाच्या इतिहासात अभूतपूर्व मानावा लागेल. म. गांधी हा विचार उद्घोषित करूनच थांबले नाहीत, त्यांनी तो प्रत्यक्ष कार्यान्वित केला आणि भारतातील फार मोठे स्वातंत्र्याचे आंदोलन जास्तीत जास्त अहिंसक व पवित्र स्वरूपात चालवून त्यांनी त्यात यश मिळवले.

प्रश्न : या विशिष्ट पार्श्वभूमीवर म. गांधींच्या शिष्यांकडून आता स्वराज्य राबवले जात असता, भारताच्या व विशेषत: महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील नैतिक स्तर सुधारला व उंचावला आहे, असे आपणांस वाटते काय?

उत्तर : स्वातंत्र्यस्थापनेनंतर भारतातील राज्यकर्त्यांवर सर्वच प्रकारच्या नवीन जबाबदाऱ्या पडल्या. त्या सर्वांचा सारासार बुद्धीने विचार करता, आपल्या राजनैतिक जीवनाची एकंदर स्थिती विशेष निराशाजनक आहे, असे मला वाटत नाही.

अर्थात असे मत व्यक्त करताना, आमच्या राजनैतिक जीवनाच्या उणे बाजूची मला पुरेपूर जाणीव आहे. आमच्या राज्यकारभारात म्हणजे प्रशासनात लाचलुचपत शिरली आहे, वाढली आहे, आर्थिक व्यवहारात काळाबाजार व नफेबाजी यांचा बुजबुजाट झाला आहे. सामान्य प्रजेमध्ये कायद्यातून निसटण्याची वृत्ती जोरावली आहे. अधिकारूढ पक्षाचे शासनकर्ते प्रसंग आल्यास अमर्याद गोळीबार करण्यास कमी करीत नाहीत. मुंबई राज्यातील एका माजी मुख्यमंत्र्याचे राजकीय वर्तन संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात किती हिंसक होते, याचे पुरावे महाराष्ट्राच्या सध्याच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उभारल्या जाणाऱ्या

हुतात्मा स्मारकाच्या रूपाने चिरंतन होणार आहे. विदर्भ आंदोलनात, विदर्भ आंदोलकांनी मारामाऱ्या आणि दमबाजी ही असूक्त साधने किती मुक्त हस्ताने वापरली यांचाही इतिहास ताजाच आहे.

परंतु दर्शनी दिसणाऱ्या या रोगलक्षणांनी घाबरून जाऊन भारतीय राजकारणाविरुध्द गांधीवादाचा सर्व प्रभावच नाहीसा झाला आहे. आणि आशेला आता किमपि जागा नाही, असा वैफल्यवादी निर्णय घेणे बरोबर होणार नाही असे मला वाटते. प्रशासन तंत्रात वशिलेबाजी, लाचलुचपत, आणि दप्तर दिरंगाई खिळलेल्या रोगाप्रमाणे दृढमूल झाली आहेत. ही गोष्ट खरी; परंतु एका महाराष्ट्रापुरतेच बोलावयाचे तर इतर राज्यांच्या मानाने या राज्याच्या प्रशासन तंत्रात आणि राज्यकारभारात तिचे प्रमाण फारच कमी आहे, असे अन्य प्रांतांतील जाणकार म्हणत असतात. महाराष्ट्रातील राज्यप्रशासन व राज्यकारभार यांमध्ये पुष्कळ सुधारणा करण्याचा अवसर आहे तशी गरजही आहे परंतु त्या बाबतची सर्व परिस्थिती राज्यकर्त्यांच्या आटोक्यातील अशी आहे, अशी माझी निरीक्षणान्ती खात्री झाली आहे.

या विधानात एक अपवाद कशाचा असेल तर तो नशाबंदीच्या कायद्याचा सांगता येईल. हा कायदा सर्व जिल्ह्यांत सर्व तालुक्यांत व बऱ्याचशा ग्रामीण भागांत आज मोडून पडल्यासारखा दिसतो. तो मोडून पडल्याची चर्चा चावडीवर, बसेसमध्ये, आगगाडीत व राजकीय मेळाव्यांत चाललेली आज दिसून येते. नशाबंदीच्या कायद्याच्या या विफलतेमुळे सर्वसाधारण कायद्याबद्दलचा लोकांच्या मनांतील आदर कमी होत चालल्याचे खेदजनक दृश्य आज सर्वत्र दिसत आहे.

संयुक्त महाराष्ट्रप्रकरणी राज्यकर्त्यांचा आणि विदर्भ आदोलनात आंदोलकांचा तोल गेला, हे मान्यच करावयास हवे, परंतु राज्यकर्ते वा आंदोलक आपल्या चुकीच्या वर्तनाचे समर्थन करीत नाहीत, ही गोष्ट आपल्या राजकीय नीतिमत्तेच्या दृष्टीने मला मोठी आशास्पद वाटते. गोळीबार करणे, धाकदपटशा व लुटालूट करणे, दंगामस्ती करणे या गोष्टी प्रसंगवशात कोणी केल्या तरी या गोष्टी विशेष स्पृहणीय नाहीत, याची जागृती राज्यकर्त्यांत आणि समाजात आजही दिसते. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे काही प्रवर्तक व नेते यांनी या चळवळीतील अत्याचारी वर्तनाचे समर्थन केल्याचे मला स्मरते. परंतु सर्वसाधारणपणे पक्षोपक्षांचे राजनैतिक वर्तन लोकशाही आणि जाहिरात यांना अनुसरून असावे हा सिद्धांत कोणताही पक्ष उघडपणे अमान्य करीत नाही, असे म्हणता येईल.

आपण तपशिलात फार शिरतो व तसे शिरण्याची गरज आहे. सर्वसामान्य नैतिक तत्त्वे, मूल्ये व सिद्धान्त नुसते मान्य करून भागत नाही. त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे पुरावे वारंवार तपासलेच पाहिजेत.

एक माझ्यापुरतेच विचाराल तर भारतातील महाराष्ट्रातील काही राजकीय पक्ष

गांधीप्रणित सिद्धान्त मान्य करीत नाहीत, हा भारतीय राजकारणातील सर्वांत मोठा धोका आहे, असे मला वाटते. ध्येयवाद व विचारसरणीमध्ये म. गांधीचा सिद्धान्त साधनशुचितेचा सिद्धांत देशातील सर्व राजकीय पक्षांनी मान्य केला तरच भारतीय लोकशाही सुरक्षित राहील, विकास पावेल व लोकशाहीमार्गे समाजवादाचे आपणा सर्वांचे स्वप्न साकार होऊ शकेल. भारतीय लोकशाही आणि म. गांधींचा अहिंसावाद यांचा अन्योन्यसंबंध किती आहे याची प्रचिती आमच्या राजकीय पक्षांना व त्यांच्या अनुयायांना येणे ही आजची सर्वांत मोठी राष्ट्रीय गरज आहे.

प्रश्न : भारतातील लोकशाहीचा प्रयोग अजून पूर्णपणे यशस्वी होतो न होतो तोच जिल्हा परिषद आणि पंचायतराज्य यांचा प्रयोग महाराष्ट्र शासनाने सुरू केला आहे. इतक्या वेगाने लोकशाहीचे अधिकार जिल्हा, तालुका आणि ग्राम यांना सुपुर्द केल्याने या स्थानिक पातळीवरचे सत्ताधारी आपल्या सत्तेचा व शक्तीचा अधिक दुरुपयोग करतील, असे आपणास वाटत नाही काय ?

उत्तर : जिल्हा परिषदा व तालुकापंचायत समिती यांना विस्तृत अधिकार महाराष्ट्र राज्याने दिले आहेत. भारतातील लोकशाहीचा प्रयोग अधिक विस्तृत प्रमाणात ग्रामपंचायत ते राज्यापर्यंत जात आहे. लोकशाहीचा हा नवा प्रयोग अभूतपूर्व खरा, परंतु त्या सत्ता दुरुपयोगाची त्याबाबतची तुमची भीती बरीचशी निराधार आहे असे मला वाटते.

तुम्हाला कबूल केले पाहिजे की शेकडो मैलांवर मुंबईला वा दिल्लीला असलेली राजकीय सत्ता पंचायत राज्यांच्या निमित्ताने लोकांच्या गांववेशीवर आता आली आहे. इतके दिवस लोकांच्या नजरेच्या टप्प्याच्या पलीकडे असणारी शासनसत्ता पंचायत राज्यामुळे जनतेच्या नजरेखाली येईल. त्यामुळे लोकांच्या तिखट व सावध नजरेतून अपराध अधिकाधिक सापडले जातील. लाचलुचपत, दप्तरदिरंगाई अंमलबजावणीतील कुचराई ही राज्याच्या पातळीवर असते. तेव्हा कोणीही एका व्यक्तीला बोट ठेवणे, कठीण जाते. परंतु स्वतः जिल्ह्यात वा गावात हे प्रकार घडू लागले की गावकरी त्याबद्दल पुराव्यानिशी तक्रार घेऊ शकतील. 'सूर्य जयद्रथ' न्यायाने राज्यकारभारातील प्रमादांची शहानिशा होऊ शकेल. माझे असे स्पष्ट व निश्चित मत आहे की सत्ता जितकी अधिक विकेंद्रित होत जाईल आणि जितकी अधिक लोकांच्या हातून वापरली जाईल तितकी ती अधिक प्रमाणात शुद्ध होत जाईल.

प्रश्न : भारतात तसेच महाराष्ट्रात लोकशाही स्थिरावली आहे आणि विशेषतः ती बिनघोर झाली आहे, असे म्हणता येईल काय?

उत्तर : भारतीय लोकशाही ही जगातील लोकशाही राष्ट्रांना कौतुकास्पद अशी झाली आहे. तिचे रक्षण करण्यास पात्र असेल लोक आणि लोकनेते या देशात आहेत, अशा तऱ्हेचा भरवसा जगात निर्माण करणे हा या देशात लोकशाही स्थिर होण्याचा एकमेव मार्ग

आहे, असे मला वाटते. आपल्या देशाची राजकीय नीतिमत्ता स्थिरावत आहे, वाढत आहे याची एकमेव प्रमाण म्हणजे आपल्या देशातील लोकशाही स्थिरावणे व वाढीस लागणे होय, असे मला मनोमन वाटते. आपल्या देशातील राजकारण, प्रशासन आणि राज्यकारभार नैतिकदृष्ट्या शुद्ध आहे की नाही याचे मुख्य गमक देशातील शुद्ध होणे व वाढणे हेच आहे. आमच्या राजकीय पक्षोपक्षांची नीतिमत्ता वाढत आहे की नाही याचेही तेच प्रमाण होय. लोकांचा कोणत्याही राज्यसंस्थेवर विश्वास बसतो तोही विशिष्ट राज्य संस्था व तिचे प्रशासन नैतिकदृष्ट्या चोख, कार्यक्षम आणि निर्दोष असेल तरच. या विशिष्ट दृष्टीने पाहू जाता अधिकात अधिक लोकांचा विश्वास व प्रेम संपादन करणे, हा कोणत्याही राज्यसत्तेचा नैतिकतेचा सर्वांत मोठा पुरावा व निकष मानता येईल. या विशिष्ट दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्याची सध्याची राजवट आपण तपासली, तर ती निःसंशयपणे प्रगतिपथावर आहे असे निर्धोकपणे म्हणता येईल.

(मासिक शब्दरंजन, दिवाळी अंक ,१९६२, पृष्ठ १८६ ते १८८)

ooo

११

अश्लील लेखनाबाबत : मतप्रदर्शन

(महाराष्ट्र साहित्य परिषदेने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. पु. ह. उर्फ रावसाहेब पटवर्धन आणि प्राचार्य त्र्यं. कृ. टोपे या तीन सभासदांची वाङ्मयीन अश्लीलता निरीक्षक समिती नेमली आहे. या समितीकडे परिषदेच्या काही सभासदांच्या सूचनेवरून श्री. चिं. त्र्यं. खानोलकर यांचे ''अजगर'' आणि श्री. उद्धव शेळके यांचे ''बाईविना बुवा'' ही पुस्तके पाठविली होती. त्यावर समितीच्या सर्व सभासदांचे जे अभिप्राय आले ते पुढे देण्यात येत आहेत. आणखी काही लिखाण साहित्य समितीच्या सभासदांकडे पाठविण्यात येत आहे. त्यावरील अभिप्राय असेच देण्यात येतील.(श्री. ना. बनहट्टी, निमंत्रक यांचेकडून))

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी :

''अजगर'' मधील लुळ्या व विपन्न तरुण माणसाच्या लैंगिक वासनेचे वर्णन किळस उत्पन्न करणारे आहे. त्याच्या लैंगिक प्रवृत्तीचे वर्णन किळस वाढविते. ते कलेचा हेतू सिद्ध होण्यास मदत करते. हे असे लैंगिक विकारावस्थेचे वर्णन रूढ शिष्टसंमत मर्यादेचे उल्लंघन करते, यात शंका नाही.

''बाईविना बुवा'' या पुस्तकातील मुख्य वर्ण्य व्यक्तीचे जीवन विवेकशून्य दुर्बळ मनाच्या व्यक्तीचे जीवन आहे. व्यवहारधंद्यामध्ये लागणारे चातुर्य व चिकाटी नसलेला व विवाहित पत्नी गमावून बसलेला माणूस आहे. वैध मार्ग न सापडलेल्या या व्यक्तीला लैंगिक वासना अनैतिक मार्गाने सफळ करण्याइतकीही धमक नाही. समसंभोगाचा तो प्रयत्न करतो. तोही जुळत नाही. अखेर पशुसंभोगाचा प्रयत्न सूचक रीतीने वर्णिला आहे. या लैंगिक वर्तनाच्या वर्णनाने वाचकाला किळसच उत्पन्न होते. काही ठिकाणी अपशब्दही वापरले आहेत. एकंदरीत रूढ सभ्य मर्यादांचे उल्लंघन कलामूल्य सिद्ध करण्याच्या उद्देशाने झाले आहे.

या दोन्ही कथांचे कलामूल्य बीभत्स रस हेच आहे. कामुकता उत्तेजित करण्याचा उद्देश

कोठेही आढळत नाही. रूढ शिष्टमर्यादांचा भंग कलेच्या उद्देशाने करणांचा कलाकाराला बंधन घालू नये. शिष्टमर्यादांच्या रूढ कल्पना वेळोवेळी बदलत असतात. मर्यादाभंगापासून अनैतिक परिणाम होत असतील तरच मर्यादा भंग करणाऱ्यांच्या मोहाला बंधन घालणे आवश्यक आहे. बीभत्स जीवनाचे चित्रण यशस्वी करण्याकरिता वरील पुस्तकांच्या लेखकांनी मर्यादाभंग केलेला आहे. या मर्यादाभंगाचे पर्यवसान अनैतिक होईल असे वाटत नाही. कारण चित्रित केलेल्या गलिच्छ जीवनाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या समर्थन होईल, असे काहीही त्यात नाही.

(महाराष्ट्र साहित्य पत्रिका एप्रिल- मे, १९६७)

○○○

१२

आजचा विद्यार्थी

आजकलचा पालकवर्ग आपल्या मुलामुलींच्या विद्यार्थी दशेतील व विद्यालयातील वर्तनाबाबत उदासीन आहे. परंतु हा उदासीनपणा त्यांच्यावर परिस्थितीने लादला आहे. कारण पालक हे आपापल्या व्यवसायात निमग्न असतात. मुले-मुली विद्यालयीन जीवन कसे घालवतात, यासंबंधी लक्ष घालणे त्यांना शक्य नसते. विद्यालयीन जीवनाची जबाबदारी शिक्षक वर्गाची आहे; परंतु पालकवर्गानेसुद्धा अधिक लक्ष घालण्याचे मनात आणले तर तेही मार्ग काढू शकतील.

आजकालचा विद्यार्थी बेशिस्त आहे, याबद्दल वाद घालण्याचे कारण नाही. सबंध विद्यार्थी वर्ग बेशिस्त आहे असे म्हणण्यापेक्षा बेशिस्तपणा हा विद्यार्थी वर्गात पूर्वीपेक्षा अधिक पसरत चालला आहे. वातावरणाने शिस्तशीर विद्यार्थी किंवा विद्यार्थिनीही बेशिस्त बनते. बेशिस्तपणा हा आता अपवाद राहिला नाही. संख्येच्या भाषेत बोलायचे म्हटल्यास १०-२० टक्के विद्यार्थी बेशिस्त असले तरी ते गोंधळ निर्माण करू शकतात व शिस्तशीर विद्यार्थी ८० टक्के असले तरी त्या बेशिस्तांना आवरू शकत नाहीत. कारण शिस्तशीरांची संघटना अलग नसते.

जाळपोळ क्षम्य नाही, चळवळ क्षम्यच नव्हे न्याय्यही आहे.

आजचा विद्यार्थी उच्छृंखल बनत चालला आहे, याला काही कारणे आहेत. त्यापैकी महत्त्वाचे कारण म्हणजे कुटुंबातल्या वडीलधाऱ्या माणसांचा प्रभाव कमी होऊ लागला आहे व शिक्षकांचा प्रभावही कमी होऊ लागला आहे. आजच्या विद्यार्थ्यांत ध्येयवादाचा ऱ्हास होत आहे, असे सर्वसामान्य विधान करणे अतिशयोक्तीचे ठरेल. ध्येयवादी विद्यार्थी व ध्येयवादी सामाजिक वातावरण यांचे प्रमाण आज कमी झाले आहे, म्हणून ध्येयवादाचा ऱ्हास होत आला आहे, हे मान्य करावे लागेल.

वाय १८१-१५

गेल्या व चालू पिढीमध्ये फरक दिसतोच. शहरी जीवनपद्धतीचा प्रभाव ग्रामीण जीवनावर होत आहे. वाहतुकीची व प्रचाराची साधने वेगाची झाली आहेत. त्यामुळे जुनी रूढी व वहिवाट किंवा आचारविचार मोठ्या प्रमाणात बदलत आहेत व विद्यार्थी संख्याही दसपटीने प्रत्येक १० वर्षांत वाढत आहे. याचा परिणाम जीवनपद्धतीवर झाला आहे.

पाश्चात्त्यविद्या व पाश्चात्त्य औद्योगिक पद्धती यांचा प्रभाव सर्वत्रच वाढत आहे. त्यातून विद्यार्थी वेगळा राहू शकत नाही. विद्यालयीन सर्व शिक्षण हे प्राधान्याने पाश्चिमात्य आहे. करमणुकीची व उपयोगाची साधने यांची उत्पत्ती यंत्रे व रसायनशास्त्र यांच्या आधारे होत आहे. वेषभूषा फार बदलत आहे. पागोटे, फेटे, धोतर, शेंडी इत्यादी गोष्टी नवी पिढी भराभर टाकीत आहे. उपाहारगृहात सर्व जाती-जमातींचे सहभोजन घडत आहे. धार्मिक उत्सव व समारंभ सोडल्यास सर्वच जीवनांत पश्चिमी वळण येत आहे व ते अधिक वाढणारच. सर्व आर्थिक व भौतिक उत्पादन साधने पाश्चात्त्यांकडून आम्ही घेतली आहे. त्याचा परिणाम जीवनावर होणारच. जुन्या चालींनी आपण अंधश्रद्धेने चालत होतो. आता पश्चिमी वळणही अंधानुकरणाने येत असल्यास त्याबद्दल वाईट वाटण्याचे कारण नाही. पश्चिमी वळण वाईट आहे असे म्हणणारे सुटाबुटात अर्धवट इंग्लिश मिसळलेल्या मराठीत पाश्चात्त्य वर्गाची निंदा करीत असतात. शिवाजीने तलवारीचे जोरावर राखलेली शेंडी या सनातनी वृत्तीच्या लोकांनी केव्हाच काढून टाकली आहे.

बदलत्या परिस्थितीवर मात करण्याची शक्ती तरुण मनगटात प्राधान्याने असते. शिक्षण घेऊन गुणसंपन्न होण्याची निष्ठा व कळकळ असलेले विद्यार्थी परिस्थितीवर जरूर मात करतील.

('कृष्णाई', (१९६९), किसन वीर महाविद्यालय, वाई, जि. सातारा.)

ooo

१३

धर्मदास्य, लोकशाही विवेक आणि दलितमुक्ती

हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुसलमान, जैन, यहुदी इत्यादी सुसंस्कृत समाजाच्या धर्मांनी सामाजिक विषमता आणि सामाजिक दास्य यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्राचीन काळापासून आजपर्यंत उचलून धरले आहे, बौद्ध, ख्रिश्चन, जैन व इस्लाम या धर्मांनी मानवी समतेचा पुरस्कार केलेला आहे. हिंदू धर्मातील भक्तिमार्गानेही मानवी समतेला महत्त्व दिले आहे. परंतु हिंदू धर्मात सामाजिक विषम-रचना समाजातील उच्चनीच भाव व दलित वर्गांचे दास्य एका विशिष्ट पद्धतीने स्थिर करण्याचाच प्रयत्न केला आहे. प्रत्येक धर्माखाली समाज संघटित झाले आहेत व सामाजिक संघटनेचे अधिष्ठान धर्म बनला आहे. आपल्या छत्राखाली न आलेला समाज हा कम दर्जाचा होय, असे प्रत्येक धर्माने ठरविले आहे. ख्रिश्चन व इस्लाम या धर्मांनी ध्वजा उभारून इतर धर्मीयांना राजकीय, सामाजिक वा आर्थिक दृष्टीने बंधनात पकडून आपल्या सत्तेखाली आणण्याकरिता सशस्त्र आक्रमणे केली आहेत व आक्रमणे यशस्वी झाल्यावर स्वधर्मीयांना परधर्मीयांचे शोषण करण्याचे अधिकार दिले आहेत. एवढंच नव्हे तर सामाजिक विषमता स्वधर्मीय समाजामध्येही कायम राखण्याचाही प्रयत्न केला आहे. कोणत्याही जागतिक प्रसिद्ध धर्मामध्ये म्हणजे हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, इस्लाम इत्यादी धर्मांमध्ये समान मानवी हक्कांची कल्पनाच कधी आली नाही उच्चवर्णीयांनी नीचवर्गीयांची पिळवणूक कारण्यास अनुकूल अशा सामाजिक संस्था दृढमूल करण्याकरिता आवश्यक असलेले कायदे किंवा सामाजिक परंपरा आणि रूढी यांना पावित्र्य दिले आहे; स्त्री आणि पुरुष यांची कुटुंबसंस्थेतील विषमता उचलून धरली आहे. पवित्र शास्त्राचे म्हणजे धर्मग्रंथाचे शब्द प्रामाण्य अबाधितपणे स्वीकारल्यामुळे धर्मग्रंथांच्या निर्मितीच्या वेळी ज्या प्रकारची सामाजिक विषमतेवर आधारलेली रूढी होती त्या रूढीलाही पावित्र्य दिले.

बौद्ध धर्म हा इतर कोणत्याही धर्मापेक्षा मानवी समानतेला अधिक महत्त्व देतो हे जरी खरे असले तरी ही समानता परमार्गातली भिक्षूंची समानता होती. वर्णांची समानता नव्हती.

हिंदू धर्मातील भक्तिमार्ग हा सर्व मानवांना समान मानतो. परंतु ही समानता सामाजिक समानता नव्हे, ही भक्तिधर्माच्या आचरणाची समानता होय. सर्वच मानव भक्तीच्या योगाने मुक्त होतात, एवढाच त्याचा अर्थ आहे. ख्रिश्चन व मुसलमान धर्मांमध्येही अशीच समानता आहे. मुळात जैन व बौद्ध हे हिंदूंचे धर्म कालान्तराने अगदी अलीकडे ते हिंदुंहून वेगळे झाले ते धर्म हिंदू समाजात वावरत असताना त्यांनी समाजातील चातुर्वर्ण्यावर आधारलेली समाजपद्धती किंवा जातिभेद मोडण्याचा कधीही महत्वाचा प्रयत्न केला नाही. इस्लामने तर बिनमुसलमानी समाजाला मुसलमान समाजाचा दर्जा देण्याचे तलवारीच्या जोरावर नाकारले, असा इतिहास आहे. त्यांनी कुटुंबसंस्थेत स्त्री ही पुरुषाची दासी म्हणूनच राखली आहे. एका पुरुषाला अनेक स्त्रिया करण्याचा अधिकार आणि वाटेल तेव्हा स्त्रियांशी घटस्फोट घेण्याचा स्वैर अधिकार इस्लामी कायदा पुरुषास देतो. श्रुतिस्मृतिपुराणांचा हिंदू धर्म हा तर उच्चनीच जातिभेदाचे पालन करण्याचा आग्रह धरतो.

धर्मग्रंथ म्हणजे ईश्वराची किंवा सर्वज्ञ ऋषींची वा त्रिकालज्ञ सिध्दपुरुषांची वाणी म्हणून प्रमाण सानणे ही गोष्ट सर्व जागतिक धर्मांनी मूलभूत म्हणून स्वीकारली आहे. त्या त्या धर्माच्या अनुयायांना धर्मग्रंथांतील विधिनिषेध किंवा तत्त्वज्ञान हे खरे की खोटे आहे यासंबंधी विचार करण्याचे स्वातंत्र्य नसते. धर्मग्रंथाचे प्रामाण्य तपासणे हे पाप मानले आहे. प्रत्येक धर्म पाप कशात आहे व पुण्य कशात आहे यासंबंधी विधींच्या द्वारे निश्चित निर्णय देत असतो. धर्माज्ञांचे उल्लंघन करण्याने महापातक घडते असे प्रत्येक धर्म मानतो. त्यामुळे मानवाच्या विचारस्वातंत्र्यावर पूर्ण बंधन पडते. त्यामुळे धर्माधिष्ठित कायदे अथवा विधिनिषेध बदलण्याचा अधिकार त्या त्या धर्मानुयायांना नसतो; धर्माचार्यांनाही नसतो. पवित्र काय व अपवित्र काय याचा निर्णय धर्मग्रंथच देत असतात.

अठराव्या शतकापर्यंतच्या जगातील सर्वच मध्ययुगीन समाजसंस्था धर्मग्रंथांच्या आधारावर संघटित झाल्या होत्या. या संस्थांच्या योगाने विषम वर्गरचना, सामाजिक दास्य व स्त्रीदास्य हे दृढ झाले. धर्माने पाठिंबा दिलेल्या रूढी व कायदे मोडले तर नरक प्राप्त होतो या प्रकारची श्रद्धा मध्ययुगात दृढ झाली होती. पवित्र काय आणि अपवित्र काय हे ठरविण्याचे साधन वस्तुतः शुद्ध नीतीनियमच असावयास पाहिजेत, परंतु तसे मध्ययुगात मानले जात नव्हते. धर्मामध्ये शुद्ध नीतिनियम सांगितलेले असतात. उदा. हिन्दू, जैन, बौद्ध, ख्रिश्चन इत्यादी धर्मांमध्ये अहिंसा, सत्य, अपरिग्रह हे उच्चतम नीती नियम म्हणून सांगितले आहेत. परंतु या नीतिनियमांच्या कसोटीवर सामाजिक विषमता अनीतिमय ठरविण्याचा प्रयत्न धर्मचिंतकांनी व साधूसंतांनी कधीच केलेला नाही. सामाजिक विषमता ही हिंसा आहे, ती एक प्रकारची पिळवणूक आहे, ते भयंकर शोषण आहे, म्हणून सामाजिक समतेची स्थापना केली पाहिजे; सामाजिक समतेमध्येच अहिंसाधर्माची खरीखुरी स्थापना होऊ शकते; असा विचार त्या काळी कोणालाही शिवला नाही. धर्माने सत्ताधारी उच्चवर्गीयांची,

उच्चवर्णीयांची व उच्चजातीयांचीच बाजू घेतली. खिश्चन धर्म व इस्लाम धर्म यांच्या इतिहासामध्येही हीच गोष्ट घडलेली दिसते. ख्रिश्चन व मुसलमान सत्ताधाऱ्यांनी जसे परधर्मीयांचे शोषण केले तसे स्वधर्मीयांचेही केले आणि या शोषणाचे साधन म्हणून धर्म उपयोगी पडला. धर्मग्रंथांचा अर्थ करण्याचा अधिकार ज्यांचा होतो त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या बाजूनेच धर्मानिर्णय केले. पापाची भीती व पुण्याचे प्रेम ह्या त्या काळच्या जनमानसात सर्वंकष खोल रुजलेल्या भावना होत्या. स्वतःच्या उच्चस्थानापासून ढळण्याचे भय किंवा उच्चवर्गाचे भय म्हणजे पापाचे भय आणि स्वत:च्या उच्चवर्गाची सांपत्तिक, सामाजिक व राजकीय सत्ता म्हणजेच पुण्य असा त्या भावनांचा गर्भित अर्थ होता. ईश्वर वा धर्मसंस्थापक हा सत्ताधारी वर्गाचे प्रतीक बनला होता. त्या त्या धर्माच्या बाहेरील लोक पापी होत ही जाणीव प्रत्येक धार्मिक समाजात असते. या जाणिवेचा उपयोग सत्ताधाऱ्यांना परधर्मीयांचे शोषण करण्यास चांगला झाला आहे. त्याचप्रमाणे खालच्या जाती अधिक पापी होत, या जाणिवेचा उपयोग खालच्या वर्गातील जाती जमातींच्या शोषणाला चांगला झाला आहे.

खालच्या जाती या पापी असल्यामुळे त्यांच्याशी विवाह, भोजन, स्पर्श करण्यात पाप आहे अशी श्रद्धा हिंदू समाजात दृढ झाली आहे. या श्रद्धेमुळे तथाकथित अस्पृश्य जातींना कायमचे गुलामगिरीचे बंधन पडले आहे. या बंधनामुळे त्यांच्यातील मानव्याच्या श्रेष्ठतेच्या जाणिवेला दडपून टाकले आहे. त्यामुळे प्रत्येक माणसाचे समान मानवी हक्क हे पवित्र हक्क आहेत, या आधुनिक विचारमूल्याला दृढता येत नाही; या मूल्यांवरची श्रद्धा मूळ धरू शकत नाहीत; ती वरपांगी, आभासमय ठरते. धार्मिक श्रद्धा विशेषतः अपावित्र्याचे किंवा पापाचे भय या मानवी हक्कांवरील श्रद्धेला सजीव करू शकत नाही. शुद्ध व अस्पृश्य जमाती यांचे हस्तव्यवसायही त्यामुळे अपवित्र जमातीचेच व्यवसाय ठरतात. विशेषतः तथाकथित अस्पृश्य जमातीचे व्यवसाय तथाकथित स्पृश्यांच्या दृष्टीने अत्यंत अपवित्र ठरतात. त्यामुळे श्रमाची प्रतिष्ठा सांस्कृतिक मूल्यांमध्ये एक उच्च मूल्य म्हणून मान्यता पावत नाही. कातडे काढणे, मृत जनावराची विल्हेवाट लावणे, मैला साफ करणे, ताग वगैरे वनस्पती कुजवून त्यांचे धागे काढून दोर वनविणे, कातडे कमविणे, कातड्याच्या उपयुक्त वस्तू बनविणे इत्यादी समाजउपयुक्त श्रमांना अप्रतिष्ठा प्राप्त होते. त्यामुळे एकंदरीत शारीरिक श्रमांनाच अप्रतिष्ठा प्राप्त होते. हिंदू धर्मग्रंथांनी एकंदरीत शारीरिक श्रम ही शूद्र व अतिशूद्र वर्गांची कर्तव्ये ठरविल्यामुळे शूद्र व अतिशूद्र वर्गांचे शोषण मान्यता पावले आहे.

हिंदुधर्मासह सगळेच धर्म पापपुण्याच्या पारलौकिक कल्पनांवर आधारलेले असल्यामुळे लोकशाही जीवनमूल्यांशी ते विसंगत ठरतात. लोकशाही जीवन निर्माण झाल्याशिवाय लोकशाही राज्यसंस्था ही अधांतरीच राहते, तिला विनाशाचे भय अधिक असते. धर्मग्रंथांचे प्रामाण्य, परलोकाचे भय, पापाची भीती या सर्व गोष्टी लोकशाही जीवनपद्धतीचा विरोध करणाऱ्या गोष्टी आहेत. लोकशाहीचे पहिले मूल्य विचारस्वातंत्र्य

व विचारांचा आविष्कार करण्याचे स्वातंत्र्य हे होय. धर्मसंस्था व धर्मग्रंथ यांच्यावरील श्रद्धा हा विचारस्वातंत्र्याचा पहिला शत्रू होय. परंपरागत समाज व परंपरागत समाजरचना बदलून त्या ठिकाणी नवीन लोकशाहीमूलक समाजरचना निर्माण करावयाची तर त्याचा प्रारंभ धर्मसंस्था व धर्मग्रंथ यांच्यावरील टीकेपासून व्हावा लागतो. धर्माबद्दलचे मानसिक दास्य हेच धर्मविषयक टीकेला व विचारस्वातंत्र्याला बाधक ठरते. लोकशाही जीवनपद्धतीला हे धर्मदास्य कायमचेच बाधक ठरणारे आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचा विचारस्वातंत्र्य हा भाग आहे. धर्मसंस्थेमध्ये व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा लोप झालेला असतो. धर्मग्रंथ सांगतील तोच आचार व व्यवसाय व्यक्तीला अंगीकारावा लागतो. हिंदू धर्मामध्ये व्यवसायस्वातंत्र्य नाही. व्यवसायामध्ये उच्चनीच, मध्यम असे धार्मिकदृष्ट्या भेद पाडले आहेत. त्यामुळे दलित जमातींना आर्थिक स्वातंत्र्य लाभू शकत नाही. परंपरागत धर्मसंस्थेचा समाजसंस्थेवर पगडा आहे; ही धर्मसंस्था हिंदू समाजसंस्थेमध्ये दलितांना आर्थिक स्वातंत्र्य लाभूच देणार नाही. लोकशाही कायद्याने सर्व जमातींना आणि व्यक्तींना व्यवसायस्वातंत्र्य दिले आहे परंतु परंपरागत धर्माचा पगडा पक्का असल्यामुळे दलित जातीची आर्थिक मुक्ती धर्माचा पगडा नाहीसा होईपर्यंत अशक्यप्राय ठरणार आहे. आर्थिक मुक्ती काही प्रमाणात झाली तरी सामाजिक मुक्ती अशक्यच ठरते. केवळ आर्थिक मुक्तीमुळे दलितांची सामाजिक मुक्ती होईल असे वाटते परंतु हे एक खोटे स्वप्न आहे. हिंदू समाजातील जातिभेद हा सामाजिक बंधनांचा तुरूंग आहे. या तुरुंगात शुद्र व अतिशूद्र मानलेल्या जमाती खितपत पडलेल्या आहेत. उच्चनीच जातिभेद व अस्पृश्यतेची भयानक संस्था जोपर्यंत भारतात कायम आहे तोपर्यंत येथे लोकशाही विवेकावर आधारलेले सामाजिक जीवन निर्माण होणार नाही आणि लोकशाही विवेकावर आधारलेले सामाजिक जीवन जोपर्यंत निर्माण होणार नाही तोपर्यंत भारताची लोकशाही व भारत हे राष्ट्र राजकीय व सामाजिकदृष्ट्या दुर्बल राहणार आहे. हा काळाचा इशारा आहे. हा काळाचा इशारा ज्यांना समजेल तेच लोकशाही जीवनमूल्याच्या प्रेरणेने प्रेरित होऊन सामाजिक क्रांतीचे आंदोलन उभारू शकतील. या आंदोलनाचा प्रारंभ परंपरागत धर्मश्रद्धेवरील वैचारिक आक्रमणापासूनच खराखुरा होऊ शकतो.

(अस्मितादर्श, दिवाळी अंक, १९७२)

ooo

१४

प्राचीन भारतीयांचा कामविषयक दृष्टिकोन

(साहित्यात काम आणि कामक्रीडा याचा आविष्कार कोणत्या मर्यादेत व्हावा हा एक वारंवार वादळे निर्माण करणारा प्रश्न झाला आहे. परंतु, या वादांत पूर्व आणि उत्तर पक्ष हे दोघेही जी भूमिका घेतात ती पुष्कळशी पाश्चात्त्य नीतिशास्त्रावर (वा साहित्यशास्त्रावर) आधारलेली असते. वस्तुतः ही चर्चा या देशातील विशिष्ट नैतिक वा सांस्कृतिक मूल्यांच्या अनुषंगाने होणे अधिक उचित ठरेल. त्या भारतीयांचा मूळ आणि साहित्यातील कामक्रीडेच्या आविष्कारासंबंधीचा दृष्टिकोन काय होता याचे विवेचन अधिकारी विद्वानांकडून व्हावे म्हणून या परिसंवादाची योजना!

या परिसंवादात भाग घेत आहेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. गो. के. भट, अ. ज. करंदीकर आाणि बाळाचार्य खुपेरकर! या व्यासंगी आणि अधिकारी विद्वानांच्या विवेचनातून एक विचार स्पष्टपणे येतो की 'काम' आणि 'पाप' यांची जी सांगड नीतिशास्त्राने घातली ती प्राचीन भारतीयांनी कधी मांडलेली नव्हती. 'काम' हा एक पुरुषार्थच मानला गेला होता. कवीप्रमाणेच लोकांनीही कामभावना आणि तिचे स्पष्ट किंवा सूचक वर्णन नैसर्गिक म्हणून स्वीकारले. कामक्रीडा जीवनातील एक स्वाभाविक आवश्यक भाग म्हणून स्वीकारून तिच्या वर्णनात काही गैर आहे असे त्या काळी वाटत नसले पाहिजे हा निष्कर्ष वेद ब्राह्मणापासून कालिदासादी कवींच्या नाटकांपर्यंतच्या संस्कृत वाङ्मयाच्या परिशीलनातून काढता येतो.

हा प्रक्षोभक परिसंवाद वाचनीय तर आहेच शिवाय विचार प्रवर्तकही व्हावा. - संपादक)

काम-पुरुषार्थ : भारतीय दृष्टिकोन

इसवी सन पूर्व पाचव्या सहाव्या शतकाच्या सुमारास माणसाची जीवनातील उद्दिष्टे धर्म, अर्थ व काम हे ठरवण्यात आली. मोक्ष हे उद्दिष्ट नंतर अंतर्भूत करण्यात आले. धर्म, अर्थ, काम व मोक्ष ही चार मानवी उद्दिष्टे म्हणजे पुरुषार्थही होत. ही भारतीय संस्कृतीची जीवनमूल्ये होत. चारीही पुरुषार्थांचा समतोल साधणे हे मोठे कठीण काम आहे. परंतु यांचा समतोल साधला तरच मनुष्याचा अध:पात होत नाही व जीवन यशस्वी होते, असा भारतीय संस्कृतीचा माणसाला आदेश आहे.

या चार पुरुषार्थांचे सम्यक ज्ञान व्हावे म्हणून प्राचीन भारतीयांनी धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, कामशास्त्र व मोक्षशास्त्र अशी चार मुख्य शास्त्रे सांगितली. मोक्षशास्त्राने मात्र अर्थशास्त्र व कामशास्त्र यांना गौण ठरविले आणि कित्येकदा कामशास्त्र हे मानवाचे केवळ कामविषयक वर्तन समजण्याकरिता अभ्यासावे व त्यातील परस्त्री वश करण्याचा प्रयोग टाळावा, असे सांगितले आहे या बाबतीत प्राचीन भारतीयांमध्ये दोन विरुद्ध प्रवृत्ती दिसतात. एक एकपत्नीव्रत व पातिव्रत्य यांचा आदर्श सांभाळणारांची आणि दुसरी सभोगस्वातंत्र्याची! दाशरथी राम हा पहिल्यांचा आदर्श होय.

सभोगस्वातंत्र्यवाद्यांनी गोपालकृष्णाचा दिव्य आदर्श निर्माण केला. गोपालकृष्णाने विविध प्रकारच्या शौर्याच्या कृत्यांनी रुक्मिणी, सत्यभामा, जाबुवंती इत्यादी मुख्य अष्टनायिका आणि सोळा सहस्त्र उपनायिका मिळविल्याच्या अद्‌भुतरम्य कथा गोपालकृष्णाच्या चरित्रात पुराणकारांनी गोवल्या आहेत. राधा ही परकीय असूनही तिच्यावर कृष्णाचे व तिचे कृष्णावरचे अनुपम प्रेम पुराणकारांनी व जयदेव कवीसारख्या महाकवींनी मोठ्या रसिकतेने वर्णिले आहे. राधा ही कृष्णाची जारिणी व कृष्ण हा तिचा जार या कल्पनेमध्ये, मोठमोठे कलावंतच नव्हे तर मोठमोठे भक्त संत रमतात. राधामाधवांच्या विलासामध्ये व गोपाळकृष्णाच्या लीलांमध्ये साधुसंतांना ईश्वर साक्षात्काराचा आनंद मिळतो, समाधी लाभते व मोक्ष प्राप्त होतो.

श्रुतीश्रुतींमध्ये एकपत्नीव्रत उत्तम मानले आहे. परंतु पुत्रप्राप्तीकरिताच नव्हे तर रमणार्थही अनेक भार्या करण्याची परवानगी दिली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चारी वर्णांना बहुभार्या करण्याची परवानगी दिली आहे. एवढेच नव्हे तर उपभोगार्थ स्त्रिया ठेवण्याची अनुमती दिली आहे. एकपत्नीव्रताचा कायदा नुकताच लागू केला आहे. परंतु गेली हजारो वर्षे बहुपत्नीकत्व हे हिंदू समाजात कायदेशीर मानले होते. रखेलीस अजूनही कायद्याने प्रतिबंध नाही. वा वेश्याव्यवसायासही नाही.

महाभारत व हरिवंश या पुराणात कृष्ण व अर्जुन हे अनेक प्रसंगी नदीतीरावरील वा सरोवरावरील सुंदर उपवनात अनेक सुंदरींच्या समवेत क्रीडा करीत आहेत, मद्यपान करीत आहेत व शृंगाररसाचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत, अशी वर्णने आली आहेत. मात्र कवीने

शिशुपालवध काव्यात बलरामाच्या व कृष्णाच्या रतिक्रीडेचे वर्णन केले आहे. कालिदासाने रघुवंशात दशरथाचा पिता राजा अज यांचा इंदुमतीशी झालेला प्रणय वर्णिलेला आहे. अजविलापातही इंदुमतीचा आकस्मिक अंत झाल्यानंतरचा विलाप वर्णित असता तिच्याशी केलेल्या रतिविलासाचे वर्णनही न चुकता घातले आहे. रघुवंशाच्या अखेरीस अग्निवर्ण राजा हा केवळ कामपुरुषार्थी बनला व त्यातच विविध कामक्रीडा करीत असता त्याला क्षय रोगाने पछाडले व त्यात त्याचा अंत झाला, याचे लालित्यपूर्ण वर्णन केले आहे.

आयुर्वेदाच्या चरक संहितेत व अन्य ग्रंथांत नैष्ठिक ब्रह्मचर्याने रोगोत्पत्ती होते असे म्हटले आहे. आयुर्वेदात स्वस्थवृत्त नावाचे महत्त्वाचे प्रकरण आहे. त्यात शरीर व मन यांच्या स्वास्थ्याकरीता नियमितपणे शृंगारसुख उपभोगावे, असे विधान केले आहे. उपभोगक्षमता येण्याकरिता विविध रसायननामक औषधे सांगितली आहेत. दीर्घकाळापर्यंत अनेक नारीशी एकाच रात्रीत उपभोग घेण्याची क्षमता प्राप्त होण्याकरिता बाजीकरणासारखी औषधे विस्ताराने प्रतिपादिली आहेत. अर्थात त्याबरोबर 'अतिसर्वत्र वर्जयेत्' असाही इशारा देऊन ठेवला आहे. अतिसंभोगामुळे उत्पन्न होणारे रोगही सांगून त्यावर उपचार सांगितले आहेत.

महाभारतात युधिष्ठिर हा धर्मपुरुषार्थाला महत्त्व देणारा, अर्जुन हा अर्थपुरुषार्थाला महत्त्व देणारा आणि भीम हा कामपुरुषार्थाला महत्त्व देणारा वर्णिला आहे. या तीनही पुरुषार्थांचा समतोल साधणे असा मध्यम मार्ग सांगून धर्म व अर्थ हे दोन पुरुषार्थ साधल्यावरच कामपुरुषार्थ अल्पप्रमाणात साधावा असेही विधान केले आहे.

अर्धनारी नटेश्वर म्हणजे शंकर हे सर्व हिंदूंचे आराध्य दैवत आहे. ते एकपत्नीव्रत सूचित करीत असले तरी पतिपत्नीसंभोग हा मानवी जीवनातला एक महत्त्वाचा उद्देश म्हणूनही त्याने सूचित केला आहे. भगवान बुद्धांचा अवतार झाल्यावर हिंदू समाजाचा अंतिम उद्देश कामविकारातून विमुक्ती हाच ठरला आणि गृहस्थाश्रम हा अंतिम उद्देश कामविकारातून विमुक्ती हाच ठरला आणि गृहस्थाश्रम हा, अंतिम वैराग्य साधत नसल्यास, दुय्यम मार्ग ठरला. नैष्टिक ब्रह्मचर्य, संन्यासमार्ग किंवा भिक्षुमार्ग हाच मोक्षाचा मुख्य मार्ग होय, असा अभिप्राय शंकराचार्यांनी भगवत्गीतेच्या भाष्यात व्यक्त केला आहे. सामान्य हिंदू मनुष्य मात्र विष्णू व लक्ष्मी किंवा ब्रह्मा व सरस्वती किंवा शिव व पार्वती यांची जोडी हाच अंतिम आदर्श मानून आपला जीवनक्रम चालविण्याचा प्रयत्न करतो.

(मोहर, दिवाळी अंक, १९७२)

ooo

१५

अस्पृश्यतेचे सामाजिक तपमान

(स्वातंत्र्याचा लाभ होऊन पाव शतक झाले. अस्पृश्यतेचा पुरातन ज्वर समाज-पुरुषाला पुनःपुन्हा झपाटीत असल्याचे जाणवते. कायदा, प्रचार, बदलता काळ, आर्थिक उन्नती, यांपैकी कशाचाच प्रभाव तितकासा पडला नाही. याचा शोध घेणे भावी कालाच्या वाटचालीसाठी अत्यावश्यक आहे. काही विचारवंतांनी या दृष्टीने घेतलेला हा शोध.)

हिंदू समाजाच्या मनात जोपर्यंत अस्पृश्यतेची वस्ती आहे, तोपर्यंत अस्पृश्यांची वेगळी वस्ती ग्रामीण भागात किंवा शहरातही राहणारच. अस्पृश्य व स्पृश्य यांच्यातील अनंत अंतर तुटणार नाही.

गेली पाच हजार वर्षे वेदकालापासून अस्पृश्यतेची सामाजिक संस्था अस्तित्वात आहे. इतिहासपूर्वकालापासून हजारो वर्षे हिंदू समाजरचनेच्या एका मूलभूत तत्त्वानुसार अस्पृश्यता अस्तित्वात आलेली आहे. हा मूलभूत सिद्धांत म्हणजे कर्मसिद्धांत होय. उच्चनीच जातीमध्ये जन्म मागील जन्मातील उच्चनीच कर्मानुसार प्राप्त होतो; पापकर्माने शूद्र, अतिशूद्र अथवा चांडाळादी योनी प्राप्त होतात, महापातकामुळे अस्पृश्य जन्म प्राप्त होतो, असा या कर्मसिद्धांताचा निष्कर्ष आहे. हिंदू समाजातील जन्मसिद्ध असा जातीय उच्चनीच भाव हा कर्मसिद्धांताने दृढ केला आहे. हिंदूंचे धर्मग्रंथ विशेषतः पुराणातील कथा व पापपुण्याची मीमांसा यांच्यामुळे या उच्चनीच भावाची मुळे जनमनात दृढपणे रुजली आहेत. समाजाच्या सगळ्या परंपरागत रूढी व आचार यांमध्येही या उच्चनीच भावाचे प्रतिबिंब पडलेले पदोपदी आढळते. भारत स्वतंत्र होण्यापर्यंत हिंदूंचा विवाहासंबंधी कायदा हा उच्चनीच जातिभेदावर आधारलेला होता; आंतरजातीय विवाह बेकायदेशीर मानलेला होता, अस्पृश्याला शिवल्याने पाप लागते; खालच्या जातीच्या हातचे अन्नपाणी घेतल्याने अपावित्र्य येते, अशी ही अपावित्र्याची भीती हिंदू मनामध्ये घर करून बसली

आहे. अपावित्र्यालाच 'विटाळचांडाळ' अशी शब्दावली मराठीमध्ये रूढ झालेली आहे. हजारो वर्षांचा दीर्घ इतिहास, विषम समाजरचनेचा कर्मसिद्धांत, विवाहाचा कायदा, धार्मिक साहित्य आणि विटाळाची जबरदस्त भीती या सर्वांचा जबरदस्त पगडा हिंदू मनावर बसला असल्यामुळे अस्पृश्यता समाजातून नष्ट करणे व अस्पृश्य समाजाला स्पृश्य समाजामध्ये सामावून घेणे ही गोष्ट अशक्यप्राय झाली आहे.

अजूनही वस्त्या वेगळ्याच

जोतिबा फुल्यांपासून महात्मा गांधींपर्यंत झालेल्या धर्मसुधारकांनी, समाजसुधारकांनी दीडशे वर्षे अस्पृश्यतेच्या उच्चाटनार्थ प्रयत्न केले आहेत. स्वतंत्र भारताच्या संविधानामध्येही अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली आहे. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचवीस वर्षे झाली तरी अस्पृश्य समाज व स्पृश्य समाज यांची ग्रामीण भागात व नागरी भागात वस्ती पृथक् पृथकच आहे. असे एकही खेडेगाव, अस्पृश्य वस्ती स्पृश्य वस्तीत सामावून घेणारे, या पाच लाख खेडी असलेल्या भारतात दाखविता येणार नाही. विटाळाच्या भीतीच्या पोटी दुसरे एक कारण दडलेले असते ते म्हणजे स्पृश्य उच्च जातीचा उच्चतेचा अभिमान, उच्च स्पृश्य जातीने आपले उच्चस्थान अबाधित ठेवण्याने अनेक आर्थिक व सामाजिक फायदे आपोआप प्राप्त होतात. स्पृश्यांचे धंदे अस्पृश्यांना करणे शक्य होत नाही त्यामुळे आर्थिक स्पर्धेतून समाजाचा एक मोठ्या संख्येचा भाग बाजूला टाकता येतो. किराणा मालाचे दुकान खेड्यात मध्यम प्रतीच्या गावात अगर शहरात मध्यवस्तीत यशस्वीपणे चालविणारा, चांभार, महार, ढोर, भंगी यांच्यापैकी आजही सापडणार नाही. स्पृश्य हिंदुंच्या देवळांमध्ये प्रवेश करण्यास अस्पृश्यांना परवानगी मिळाली आहे असे म्हणतात, परंतु अस्पृश्यांचा भजनी मेळा उघडपणे हिंदूंच्या कोणत्याही सुप्रसिद्ध देवळामध्ये जयजयकार करीत सवाद्य भजन चालवीत आहे असे कधीही दृष्टोत्पत्तीस येत नाही. जातींचा उच्चनीच भाव आणि अस्पृश्यता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मूलगामी सामाजिक स्थित्यंतर करण्यास आवश्यक असलेली आंदोलने दीर्घ काळ चालून जेव्हा संपूर्ण सामाजिक क्रांती होईल तेव्हाच अस्पृश्यतेची संस्थाही नष्ट झालेली दिसेल.

अधिकारी ध्येयशून्य

सरकारी प्रशासन–यंत्रणा अस्पृश्यता निवारणाकरिता उत्तम रीतीने वापरणे शक्य आहे. परंतु प्रशासन यंत्रणा किवा शासन कर्मचारी ही ध्येयवादी माणसांच्या नेतृत्वाखाली काम करीत नाही. उच्च पदवीधर, आय. ए. एस. झालेला कर्मचारी वर्ग ध्येयशून्य आहे. त्यात ध्येयवादी माणसे असली तरी ही यंत्रणा भावशून्य रीतीने केवळ यांत्रिक निर्जीव पद्धतीनेच कामे करणार. परंतु समाजसुधारणेची चळवळ हे जनतेचे आंदोलन बनले तरच प्रशासन-यंत्रणा अस्पृश्यता निवारणाकरिता राबविणे शक्य आहे. परंतु असे जनतेचे आंदोलन निर्माण

करणाऱ्या नेतृत्वाचा संपूर्ण अभावच देशात आहे.

स्पृश्य वर्गात अशा नेतृत्वाचा अभाव आहे. परंतु अशा तऱ्हेचे आंदोलन प्रथम दलित अस्पृश्य समाजातूनच निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. अशा आंदोलनाच्या संदर्भात ग्रामीण भागातील प्रतिष्ठा व सुस्थिती प्राप्त झालेले स्पृश्य वर्ग अत्याचाराचा कार्यक्रम हाती घेऊन हे आंदोलन दाबण्याचा किंवा मारण्याचा प्रयत्न करू लागतील. तशी दुश्चिन्हे आताच दिसत आहेत. अस्पृश्यता निवारण हा सर्वांत खडतर असा सामाजिक प्रश्न आहे.

(धरती, दिवाळी अंक, १९७२, पृ.७५ ते ७७)

○○○

१६

क्रांती

क्रांती या शब्दाचा रूढ असलेला अर्थ मौलिक परिवर्तन असा आहे. क्रांती हा शब्द राजकीय संदर्भात किंवा राज्येतिहासाच्या संदर्भात अधिक वापरला जातो. या संदर्भात सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून शासन पद्धतीत केलेले मौलिक परिवर्तन असा त्याचा अर्थ होतो. व्यापक सामाजिक संदर्भात म्हणजे वर्णव्यवस्था, संस्कृती, वैज्ञानिक वा इतर सामाजिक संस्था किंवा परिस्थिती यामध्ये मौलिक परिवर्तन घडून होणारा विकास, असा या शब्दाचा अर्थ होतो. मानवी प्रयत्नाच्या कोणत्याही क्षेत्रातले विकासाभिमुख परिवर्तन यात अभिप्रेत असते. अमेरिकन आणि फ्रेंच या राज्यक्रांत्यांच्या घडामोडीनंतर 'जुने सोडणे व नवे घडविणे' हा अर्थ त्यात अधिक स्पष्ट झाला. जुने हक्क वा जुन्या चांगल्या परंपरा पुनरुज्जीवित करण्याचीही कल्पना अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीच्या नेत्यांच्या मनात होती. त्याचप्रमाणे ब्रिटनमधील नागरिक अनुभवत असलेले स्वातंत्र्य व राजकीय हक्क आपणास पूर्णपणे प्राप्त व्हावे, आपणास कायदेमंडळावर वा संसदेवर प्रतिनिधी निवडण्याचा हक्क मिळावा, अशी आकांक्षा उत्तर अमेरिकेतील ब्रिटिश वसाहतवाल्यांनी ब्रिटनशी युद्धास प्रारंभ केला. परंतु अखेर अपेक्षेपेक्षा निराळेच घडले. अमेरिकन राष्ट्र स्वतंत्र झाले. फ्रेंच राज्यक्रांतीच्या नेत्यांनासुद्धा रोमन साम्राज्यातील नागरिकांचे राजकीय स्वातंत्र्य हे ध्येयही आकर्षक वाटत होते, परंतु या दोन्ही क्रांत्यांमध्ये प्रत्यक्ष मागणी व घोषणा स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मानवी हक्कांचीच होती.

आर्थिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक किंवा सामाजिक क्रांतीमध्ये सशस्त्र बंडाची किंवा उठावाची म्हणजे हिंसेची बहुधा आवश्यकताच नसते; राजकीय क्रांतीच्या घडामोडीतच हिंसा आवश्यक म्हणून निर्माण होते. क्रांतीची पूर्वतयारी म्हणजे प्रगती. स्वातंत्र्य व सामाजिक न्याय यांची नेत्यांच्या व जनतेच्या मनात उत्पन्न झालेली तीव्र जाणीव आणि त्याचप्रमाणे जुलूम, भ्रष्टाचार, जीर्ण झालेली सामाजिक व राजकीय चौकट यांच्याविरूद्ध प्रखर असंतोष

होय. या पूर्वतयारीनंतरच नेते क्रांतीचा उठाव करू लागतात.

क्रांती आणि प्रतिक्रांती

क्रांती व प्रतिक्रांती अशा दोन सापेक्ष संज्ञा राजकीय इतिहासात रूढ झाल्या आहेत. त्यांचा पहिला साधा अर्थ असा की, विशेष राजकीय परिवर्तन झाल्यानंतर नवी राजवट अस्तित्वात येते व नवे सत्ताधारी सत्तारूढ होतात. पुन्हा काही सामाजिक शक्ती उठाव करून ती राजवट त्या सत्ताधाऱ्यासह उलटून टाकतात आणि त्या शक्तीचे प्रतिनिधी आपली राजवट स्थापन करतात; ह्यास प्रतिक्रांती म्हणतात. परंतु केवळ नवी राजवट स्थिरावल्यानंतर किंवा स्थिरावत असताना पुन्हा तिला जबरदस्त धक्का देऊन निराळी राजवट स्थापन करणे, म्हणजे प्रतिक्रांती नव्हे. क्रांतीच्या मुळाशी प्रेरक असलेल्या ध्येयवादास सर्व नागरिकांचे राजकीय स्वातंत्र्य हे अंतिम मूल्य म्हणून गृहीत धरलेले असते आणि त्या मूल्यानुसार नवे राज्य संविधानात तयार होऊन ते संविधान, अर्थात राज्याचा मूलभूत कायदा कार्यवाहीत आणणारी राज्यसंस्था स्थापित होते आणि त्यानंतर जे वारंवार कायदे होतात ते मूलभूत स्वातंत्र्याला व इतर नागरिक हक्कांना जीवनात मूर्त स्वरूप देण्याकरिता तयार होत असतात, परंतु नंतर मूलभूत स्वातंत्र्य व नागरिक हक्क किंवा अन्य पुरोगामी जीवनमूल्ये अमान्य असलेल्या प्रतिगामी सामाजिक शक्तीचे प्रतिनिधी वरील प्रकारचे राज्यसंविधान व त्याच्यावर आधारलेली राज्यसंस्था व शासन उलथून पाडून त्यात अंतर्भूत असलेले स्वातंत्र्य व अन्य मूलभूत हक्क यांची गळचेपी करणारी राज्यसंस्था व शासन पुन्हा निर्माण करतात; त्याला प्रतिक्रांती म्हणतात.

क्रांतीचे प्रेरक घटक

जुनी सामाजिक व्यवस्था संपूर्णपणे किंवा अंशत: मोडकळीस येते तेव्हा क्रांतीची परिस्थिती तयार होते. सत्ताधारी वर्गाची अकार्यक्षमता व दुर्बलता, आर्थिक पेचप्रसंग, युद्ध, जनतेचा कंगालपणा इ. गोष्टी सामाजिक व राजकीय दुरवस्थेस कारण होतात. जेव्हा दीर्घकाळ लाभलेल्या शांततेत सुस्त बनलेला सत्ताधारी वर्ग, समाजातील प्रतिष्ठित लोक आळशी, भ्रष्टाचारी आणि बदलत्या परिस्थितीचे आकलन न करता मूढ व आत्मसंतुष्ट बनतात, अंधश्रद्धेने परंपरेला चिकटून बसतात, राज्याबाहेरच्या जगातील नव्या घटनांकडे दुर्लक्ष करतात; जनतेच्या दुस्थितीकडे कानाडोळा करतात आणि न्याय, तक्रारी करणाऱ्या बहुजनांना दडपून टाकतात; तेव्हा सामाजिक व राजकीय स्थिती मोडकळीस आली, असे समजावे. मात्र ही मोडकळीस आलेली परिस्थितीच केवळ क्रांतीस कारण होऊ शकत नाही; त्यात अधिक काही कारणांची भर पडण्याची जरूर असते.

दुसरे असे की, सामाजिक दुरवस्थेची जाणीव असलेला आणि त्या जाणिवेमुळे वारंवार आर्थिक, राजकीय किंवा सामाजिक सुधारकांची मागणी करणारा असा असंतुष्ट मोठा वर्ग,

जनतेचा मोठा विभाग, अस्तित्वात यावा लागतो आणि असंतोचे निदर्शक असे उद्रेकही व्हावे लागतात.

तिसरे कारण म्हणजे चालू सामाजिक व राजकीय परिस्थितीच्या विरुद्ध जनतेची कृती वारंवार घडून यावी लागते. त्याकरिता जनतेला वैचारिक शिक्षण देणारा व कृतीकरिता कार्यक्रम देऊन मार्गदर्शन करणारा, लहानमोठ्या नेत्यांचा वर्ग वा पक्ष तयार व्हावा लागतो. नेत्यांच्या वा पक्षाच्या नेतृत्वाखाली कायद्याच्या मर्यादेचे वा कायद्याच्या मर्यादेबाहेरचे आंदोलन सुरू व्हावे लागते. हा नेत्यांचा वर्ग सुशिक्षितांचा वर्ग असतो. कित्येक वेळा त्यांच्यामध्ये प्रस्थापित राजसत्तेच्या व्यवस्थेत भागीदार असलेले काही लोकही असू शकतात. क्रांतीच्या ध्येयाने भारलेले काही सामान्य सैनिक अधिकारीही त्यात सामील होऊ लागतात. उदा. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकांतल्या क्रांतिकारकांत मध्यमवर्गीय किंवा गरीब मध्यमवर्गीय शिक्षित लोक, विद्यार्थी, तरुण वर्ग, खालचे सैनिक अधिकारी यांचा भरणा दिसून येतो. अनुयायी वर्गातही यांचा मोठा भरणा झालेला असतो. स्वास्थ्यात वाढलेले अनेक पिढ्यांपर्यंत दौलतीचे मालक असलेले व आपल्या वर्गाचे सवलतीचे हितसंबंध राखू इच्छिणारे उच्चवर्गीय लोक सहसा क्रांतिकारक गटात नेते म्हणून किंवा अनुयायी म्हणून सामील होत नसतात. आर्थिक दृष्टीने ज्यांचे जीवन अस्थिर असते व ज्यांना सतत अस्वास्थ्यात दिवस काढावे लागतात, त्या वर्गातीलच लोक मौलिक समाजपरिवर्तनाला आवश्यक असलेल्या राजकीय आंदोलनात सामील होतात. परंतु केवळ आर्थिक अस्वास्थ्य किंवा दु:स्थिती एवढेच कारण पुरेसे होत नाही. आंदोलनात सामील होण्याकरिता ध्येयवादी प्रेरणांची गरज असते. पिढ्यानपिढ्या दैन्यवस्थेत राहिलेले वर्ग अज्ञानग्रस्त असल्यामुळे त्यांना पद्धतशीरपणे सामाजिक परिवर्तनाची वा मूलभूत हक्कांची आवश्यकताच ध्यानात येऊ शकत नाही. अजाणपणाच्या दीर्घ अंधकारातच ते वर्ग बुडलेले असतात. त्या अंधकारातून आशेचा किरण सुशिक्षित मध्यमवर्गीय प्रचारकांकडूनच किंवा राजकीय संघटना वा पक्ष यांच्याकडूनच त्यांना लाभावा लागतो. उच्च शिक्षण मिळालेले विचारवंतच त्या त्या परिस्थितीत अनुरूप असे कार्यक्रम आखून आंदोलनाचे शिक्षण सामान्य जनतेस जेव्हा देतात, तेव्हाच क्रांतीची पूर्वतयारी होऊ शकते.

क्रांती-सशस्त्र की नि:शस्त्र

राजकीय क्रांती ही बहुधा सशस्त्र उठाव व युद्ध यांच्या ओघातच घडून येते. सशस्त्र उठावावाचून म्हणजे हिंसेवाचून राजकीय व तज्ज्ञन्य सामाजिक क्रांती घडू शकते, असा विचार क्रांतीचा सर्वश्रेष्ठ तत्वज्ञ कार्ल मार्क्स (१८१८-८३) याला त्याच्या आयुष्याच्या शेवटी सुचला होता. तो लिहितो की, इंग्लंडमध्ये सशस्त्र उठावावाचून शांततामय उपायांनीच समाजवादाची स्थापना होऊ शकेल. नि:शस्त्र क्रांतीचा पुरस्कार भारतीय स्वातंत्र्याचे नेते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी प्रामुख्याने मांडला आणि भारताचे स्वातंत्र्य वा लोकशाही

संघराज्य हे एका अर्थी सत्याग्रहाच्या आंदोलनाने सशस्त्र युद्धावाचून निर्माण झाले. हे जरी खरे असले, तरी जगातील आजपर्यंतच्या राजकीय क्रांत्यांचा इतिहास हा मुख्यत: युद्ध आणि हिंसा यांनी भरलेला दिसतो. पुष्कळ वेळा प्रस्थापित राज्यसंस्थेतील सत्ताधारी हे क्रांतिकारक आंदोलनांना आळा घालण्याकरिता पोलीस व सैन्य यांचा वापर करतातच, त्यामुळे क्रांतिकारक आंदोलनाचे युद्धात रूपांतर होते. अमेरिकन क्रांती सफल होऊन शांतता प्रस्थापित होईपर्यंत ब्रिटनशी त्यांचा काही वर्षे संग्राम चालू होता. फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रारंभ १४ जुलै १७८९ मध्ये झाला आणि त्यात क्रांती व प्रतिक्रांती यांची मालिका, ही तिसरे गणराज्य स्थापन होईपर्यंत चालू होती. तिसरी जगातील मोठी राज्यक्रांती रशियन राज्यक्रांती होय. ही बोल्शेविक ऑक्टोबर क्रांती होय. ती रशियन कालगणनेप्रमाणे २५ ऑक्टोबर १९१७ मध्ये झाली. प्रस्थापित सत्ताधाऱ्यांच्या हातातून सत्ता काबीज करणे, ही क्रांतीच्या यशाची पहिली पायरी होय आणि सत्ता काबीज करणाऱ्या वर्गाने वा पक्षाने संविधान समिती निर्माण करून अथवा निर्माण न करता संविधान तयार करून राज्यसंस्था निर्माण करणे, ही क्रांतीच्या यशाची दुसरी पायरी होय. रशियन राज्यक्रांती ही सशस्त्र उठावाने झाली. परंतु त्यात सत्ता काबीज करण्याच्या कालबिंदूपर्यंत रक्तपात फार थोडा करावा लागला.

लाल चीनची १९४९ साली झालेली चौथी राज्यक्रांती होय. या राज्यक्रांतीचा इतिहास, हा दुहेरी युद्धाचा म्हणजे प्रथम कम्युनिस्ट पक्ष व राष्ट्रीय पक्ष यांच्यातल्या यादवीचा व नंतर जपानी साम्राज्यशाही व चिनी राजकीय शक्ती यांच्यातल्या युद्धाचा इतिहास होय. हे दुहेरी युद्ध १९२७ ते १९४९ पर्यंत तीव्रपणे चालू होते. यात तीन बाजू युद्धमान दिसतात. एक-चेंग कै-शेकची (१८८७-१९७५) राष्ट्रीय आघाडी, दुसरी जपानची आक्रमक आघाडी आणि तिसरी माओ त्से तुंगची कम्युनिस्ट पक्षाची आघाडी, राष्ट्रीय आघाडी आणि कम्युनिस्ट आघाडी यांच्यात अनेक तीव्र युद्धे झाली, त्याबरोबरच वारंवार शांततेने तात्पुरते तहही झाले. हे शांततेचे तह जपानच्या साम्राज्यशाही आक्रमणाला एकजुटीने तोंड देण्याकरिता झाले. जगाच्या इतिहासांत क्रांतीकरिता इतका दीर्घकाळ चाललेला सशस्त्र लढा दुसरा दिसत नाही.

भूतपूर्व पूर्व पाकिस्तानात म्हणजे सध्याच्या बांगलादेशात क्रांतीपासून स्वातंत्र्य युद्धास प्रारंभ झाला. नंतर सशस्त्र क्रांती झाली; त्यानंतर प्रतिक्रांती व क्रांती यांची मालिका लागलेली बांगला देशच्या स्वातंत्र्य आंदोलनात दिसते. म्हणून असे निश्चित म्हणता येते की, भारतातील शांततामय लोकशाही क्रांती हा जगाच्या इतिहासात एक अपवादच ठरतो. व हा अपवाद एका अर्थी ब्रिटनच्या जागतिक राजकीय धोरणाचाच परिणाम होय. एकीकडे अहिंसावादी गांधीप्रणित तत्त्वज्ञान व आंदोलन आणि दुसऱ्या बाजूला ब्रिटिश उदारमतवादी राजनीतीचे तडजोडीचे धोरण, हे होय.

क्रांतियुद्ध हे यादवी युद्ध असते. एका बाजूला प्रस्थापित सत्तेचे स्वसंरक्षक तथाकथित

सनदशीर किंवा कायदेशीर हिंसातंत्र आणि दुसऱ्या बाजूला राजकीय परिवर्तन घडवून आणण्याकरिता सनदशीर व बेकायदा असे मानलेले हिंसातंत्र होय. हे अंतर्गत यादवी युद्ध आंतरराष्ट्रीय युद्ध बनण्याचा धोका असतो. उदा. व्हिएटनाममध्ये सतरा वर्षांपेक्षा अधिक वर्षे चाललेले साम्यवादी क्रांतीचे युद्ध होय. या युद्धात एका बाजूने अमेरिका ही दक्षिण व्हिएटनाममधील प्रतिगामी सत्तेला पाठिंबा देण्याकरिता प्रथम अप्रत्यक्षपणे आणि कालांतराने प्रत्यक्षपणे युद्धात उतरली. उत्तर व्हिएतनामच्या साम्यवादी सत्तेला लाल चीन व सोव्हिएट युनियन अप्रत्यक्षपणे परंतु उघड रीतीने युद्धसाहाय्य करीत होते.

क्रांतीच्या यशाच्या मुख्यत: तीन पायऱ्या असतात. एक, यादवी युद्धाचा उठाव क्रांतिकारक गट करतो आणि तो गट दळणवळणाची संदेशवहनांची मुख्य स्थाने व साधने ताब्यात घेऊन प्रस्थापित सत्तेचे किंवा राजधानी काबीज करून गोंधळ निर्माण करतो. दोन, शत्रूच्या सैन्याची नाकेबंदी करून त्याची परिणामकारकता घालवितो आणि विरोध मोडून टाकण्याकरिता त्या विरोधी सेनेस व पोलीस दलास हतबल करतो. तीन, देशभर शांतता प्रस्थापित करून नव्या सत्तेचा अंमल स्थापित झालेला जाहीर करतो आणि नवे संविधान निर्माण करतो. या तीन पायऱ्या म्हणजे क्रांतीचे प्रथम पर्व होय. दुसरे पर्व म्हणजे सत्ता व संविधान यांच्याद्वारे क्रांतिकारक गट सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा कार्यक्रम अमलात आणू लागतो आणि क्रांतीच्या क्षेत्रात राष्ट्रराज्य उभारतो.

विश्वक्रांतीचा ध्येयवाद

आधुनिक क्रांतीचे युग अठराव्या शतकात अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती यांपासून सुरू झाले. या क्रांत्यांचा ध्येयवाद हा विश्वक्रांतीचा ध्येयवाद आहे. ध्येयवादाने माणसात अदम्य आत्मविश्वास उत्पन्न केला. या ध्येयवादाची तीन तत्त्वज्ञाने उदयास आली; ही विश्वमानवाची तत्त्वज्ञाने किंवा मानवतेची तत्त्वज्ञाने होत. मूलभूत मानवी हक्कांचे व लोकशाही तत्त्वज्ञान - जॉन लॉक (१६३२-१७०४) आणि झा झाक रूसो (१७१२-७८) या इंग्लिश व फ्रेंच तत्त्ववेत्त्यांनी प्रतिपादिले. दुसरे समाजवाद व साम्यवादाचे तत्त्वज्ञान अत्यंत प्रभावीपणे - कार्ल मार्क्स याने आणि तात्त्विक अराज्यवादाचे तत्त्वज्ञान गॉडविन, प्येअर प्रूंदी (१८०९-६५) - प्यॉटर क्रपॉटकियन (१८४२-१९२१) यांनी मांडले. प्रूंदीनेच प्रथम सतत क्रांतीचा सिद्धांत मांडला. या तिन्ही तत्त्वज्ञानांनी आधुनिक जग कमीजास्त प्रमाणात प्रभावित झाले आहे. ही तीनही तत्त्वज्ञाने समाज आणि मानव यांचा संबंध उलगडून सांगतात. सामाजिक घटनांचे कर्तृत्व हे मानवी कर्तृत्व आहे; मनुष्य इतिहासाचा कर्ता आणि मानवी स्वातंत्र्य, हे मानवी कर्तृत्वाचे व विकाराचे प्रेरक मुख्य तत्त्व व अंतिम उद्दिष्ट आहे, असे ही तत्त्वज्ञाने सांगतात.

लॉक आणि रूसो यांनी समाज व राज्यसंस्था यांचे कारण वा कर्ता मनुष्य आह, असे सामाजिक कराराचा सिद्धांत सांगून प्रतिपादिले आहे. या सिद्धांताच्या योगाने राजसत्तेला

धक्का दिला. म्हणजे असे की, राजाला कायदे करण्याचा आणि कायद्याची अंमलबजावणी करण्याचा व जनतेवर सत्ता चालविण्याचा नैसर्गिक वा दैवी हक्क आहे, या श्रद्धेला उखडून टाकले. राजाच्या विरूद्ध जाणे वा राजसत्तेला नष्ट करणे म्हणजे निसर्गाच्या वा ईश्वरेच्छेच्या विरुद्ध जाणे व पाप करणे होय, अशी सामान्य जनांची भावना होती, ती सामाजिक कराराच्या सिद्धांताने नष्ट झाली.

राज्यसंस्था ईश्वराच्या संकेताने निर्माण झाली आहे, अशी श्रद्धा राजसत्तेच्या मुळाशी हजारो वर्षे होती. परमेश्वर काही निवडक माणसांना राजकीय सत्तेचे वरदान देतो आणि ती माणसे त्या वरदानाच्या आधारे सनदशीर शासनाची स्थापना करून वंशपरंपरागत राज्ये चालवितात. राजद्रोह, बंड, कायदेभंग इ. कृती त्यामुळे अपवित्र ठरतात. सरदार वर्गातील काही गट राजसत्तेची बाजू या श्रद्धेने बळकट करतात, कारण त्यांच्या वंशपरंपरागत अधिकारास त्यामुळे आधार सापडतो. नवीन उदयास येणारा व्यापारी वर्ग आणि सुस्थितीतील मध्यमवर्ग वरचढ होऊ पाहतात. तेव्हा त्यांना सरदारवर्ग राजाश्रयाच्या द्वारे कह्यात ठेवतो. काही महत्त्वाकांक्षी सरदार मात्र वंशपरंपरागत राजसत्तेचा हेवा करीत राहतात. कारण त्यांनाही राज्य बळकवण्याची किंवा स्वसत्ता वाढविण्याची इच्छा असते. त्याचप्रमाणे राज्याच्या दैवी अधिकाराची कल्पना ज्या वर्गाच्या उत्कर्षाला अडचण उत्पन्न करू लागली. त्या वर्गाच्या जाणिवांचे तात्त्विक बुद्धिवादी आविष्करण सामाजिक कराराच्या सिद्धांताच्या योगाने सतराव्या शतकाच्या मध्यात होऊ लागले.

रूसोचा सामाजिक करार

प्रथम मानवजात अस्तित्वात येऊन जगू लागली, तेव्हा राज्यसंस्था नव्हती; केवळ 'निसर्गाचे राज्य' (स्टेट ऑफ नेचर) होते. माणसांना आपले जीवित व वित्त यांचे रक्षण करण्याकरिता स्वतःचीच शक्ती पणास लावावी लागली. माणूस मुळात स्वतंत्र होता. त्याला आपले स्वातंत्र्य सुरक्षित राखण्याकरिता स्वतःचीच ताकद वापरावी लागे. माणसे वाढली. गोंधळ वाढला. या गोंधळाच्या अवस्थेतून बाहेर पडण्याकरिता त्यांना एकत्र येऊन सर्वांच्या रक्षणार्थ व सर्वांच्या हक्कांच्या रक्षणार्थ सामुदायिक संकल्प करणे भाग पडले व त्यांनी आपल्यातलाच एक माणूस प्रमुख म्हणून निवडला. सर्वांचे रक्षण करण्याचा करार होत असताना निवडलेला माणूसही इतर सर्वांबरोबर कराराने बांधला गेला. सर्वांचे समान हित साधणे, हे या कराराचे उद्दिष्ट होते; परंतु या उद्दिष्टाला धरून करार पाळण्याचे कर्तव्य पार न पाडता सत्ता निरकुंश रीतीने राजा वापरू लागला. परंतु करारानुसार असा राजा अवैध ठरतो. टॉमस होब्जच्या (१५८८- १६७९) मते राजा हा कराराने बांधला जात नाही. त्याला करारात न गोवता माणसांनीच आपापसात करार करून त्याच्याकडे सत्ता सोपविली. म्हणून राजा हा अवैध रीतीने सत्ता वापरतो, असे केव्हाही म्हणता येत नाही. हॉब्जच्या मते निसर्गाचे राज्य म्हणजे नैसगिक बेबंदशाही होय. प्रत्येक जण दुसऱ्याच्या विरुद्ध लढत असतो, अशी

ही मुळातली परिस्थिती होती; त्यामुळे या परिस्थितीच्या अडचणीतून बाहेर पडण्याकरिता व सुव्यवस्थेकरिता कोणातरी एका वरिष्ठावर माणसांनी सत्ता सोपविली असे तो म्हणतो.

रूसोने सामाजिक कराराचा सिध्दांत लॉक व हॉब्ज यांचे विचार तपासून पुन्हा मांडला. रूसोचा सामाजिक करार हा ग्रंथ फ्रेंच राज्यक्रांतीचे बायबल ठरला. रूसोच्या मते माणूस जन्मला तो स्वतंत्र, आाणि आता तो सगळीकडे शृंखलांनी बांधला गेला आहे. रुसो म्हणतो की, सामाजिक संस्था व राज्य निर्माण करीत असता माणसांनी सर्वांच्या कल्याणाच्या इच्छेने समाज वा राज्य चालावे, म्हणून समाजाला आपले मूळचे स्वातंत्र्य बहाल करून माणसे सामाजिक बंधनात अडकली. सामाजिक विषमता वाढली. मूळचे सुखी जीवन माणूस गमावून बसला. मोठा मानववर्ग दैन्य व विपत्ती यांनी कायम ग्रासला गेला. अलीकडे अधिभौतिक विज्ञानाची व उपयोग्य संपत्तीची वाढ होत असली, तरी अगणित माणसे विषमतेत, दारिद्र्यात आणि अन्य विपत्तींत खितपत आहेत, विषमतेच्या प्रखर जुलमाखाली सामाजिक अन्याय फोफावत आहे. राजे व वरिष्ठ वर्ग मानवी दु:खाकडे आणि हालअपेष्टांकडे दुर्लक्ष करीत आहेत. याचे कारण राजकीय सत्तेच्या मूळ उद्दिष्टाशी विसंगत व विरोधी असे राज्ययंत्रे व कायदा यांचे शासन चालले आहे. सर्वांचे समानहित हे उद्दिष्ट सामाजिक कराराच्या पाठीशी आहे. त्याकरिता सर्वांच्या समानहिताची समान एवजा (जनरल बिल), ही प्रभावी व्हायला पाहिजे. ही समान हिताची समान एवज, एकरूप झालेल्या जनतेत वास करते. त्यामुळेच एकात्मक जनता किंवा लोक हेच सार्वभौम सत्तेचे अधिष्ठान होय, असे ठरते. एकाने किंवा काही जणांनी जनतेवर राज्य करणे हा अन्याय होय. एकेका व्यक्तीची इच्छा किवा एषणा, ही समान हिताच्या समान एषणेशी विरुद्धच असण्याचा फार संभव असतो. सर्वांचे मतदान होऊन जे ऐकमत्य निर्माण होते, त्याच्यापेक्षाही समान हिताची समान एषणा ही निराळी आहे, ह्या समान एषणेची सत्ता सुरू झाली, म्हणजे खरीखुरी समानता स्थापन होऊ शकते.

दया वा करुणा ही नैसर्गिक भावना आहे. दुसऱ्याचे दैन्य व दु:ख पाहून ती निर्माण होते व तिच्यातच समान हिताची एषणा प्रतिबिंबत होते. बुद्धी व भावना या दोन मानसिक प्रवृत्ती वा शक्ती आहेत; दुसऱ्या शब्दांत, डोके व हृदय यांच्या प्रवृत्ती होत. नुसती बुद्धी ही करुणा, सहानुभूती किंवा दयेवाचून स्वार्थी बनवते. त्यामुळे विषमता आणि सामाजिक अन्याय निर्माण होतो. बुद्धीपेक्षा म्हणजे डोक्यापेक्षा हृदयाला व व्यापक सद्भावनांना अधिक मूल्य आहे. भावना मुख्य व बुद्धी ही दुय्यम होय, भावनांच्या योगानेच म्हणजे उदा. करुणेने अथवा हृदयाच्या आर्द्रतेने समानतेची स्थापना करणारी समान एषणा प्रभावी ठरते.

ब्रिटनमधील लोकशाही आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने यांच्यातील मानवी हक्कांच्या कल्पनेच्या मुळाशी जॉन लॉक इत्यादिकांचे उदारमतवादी तत्त्वज्ञान आहे. 'पुष्कळांचे पुष्कळ हित' हीच नीतीची कसोटी मानणारे उपयुक्ततावादी नीतिशास्त्र उदारमतवादात अंतर्भूत आहे. रूसोचा परिणाम इंग्रजी भाषिक विचारवंतावर विशेषसा झाला नाही. परंतु

फ्रेंच राज्यक्रांतीच्या नेत्यावर खूप झाला. त्यांच्यावर उदारमतवाद व रूसोचे समतावादी राजकीय तत्त्वज्ञान या दोन्ही प्रणालींचा संमिश्र परिणाम झालेला दिसतो. रूसोच्या समुदायप्रधान लोकशाहीच्या विचारातूनच विद्यमान या हुकूमशाह्यांचा जन्म झाला, असेही काही राज्यमीमांसक म्हणतात. व्हॉल्टेअर (१६९४-१७७८) या फ्रेंच विचारवंतावर मात्र रूसोचा प्रभाव पडला नाही, त्याच्यावर इंग्लिश उदारमतवादाचाच खोल परिणाम झालेला दिसतो.

फ्रेंच आणि अमेरिकन क्रांती

फ्रेंच राज्यक्रांतीतून लोकशाहीचे राज्य संविधान निर्माण होऊ शकले नाही; ती क्रांती फसली. हुकूमशाही आणि एकतंत्री राज्यसत्ता एकापाठीमागून एक अशा निर्माण झाल्या. याची मीमांसा अनेक शतके इतिहासज्ञांनी व राज्यशास्त्रज्ञांनी आतापर्यंत चालविलेली आहे. यशस्वी झालेली अमेरिकन राज्यक्रांती इतिहासज्ञांचा आणि राज्यशास्त्रज्ञांच्या मीमांसेचा विशेषपणे विषयच झाली नाही. याचे एक कारण असे की, हजारो वर्षे प्रगतिपथावर प्रथम हळूहळू व नंतर सोळाव्या शतकापासून वेगाने मार्गक्रमण करीत असलेल्या युरोपीय समाजांना त्यांच्या सांस्कृतिक केंद्रस्थानी म्हणजे फ्रान्समध्ये अनेक दशके चाललेल्या या क्रांतीच्या क्रिया आणि प्रतिक्रिया तीव्रतेने जाणवत होत्या. अमेरिकन क्रांती ही त्या वेळच्या वाहतुकीच्या मंदगामी साधनांच्या दृष्टीने फार दूरच्या प्रदेशात घडून आली होती, त्यामुळे तिचे धक्के फारसे जाणवले नाहीत. अमेरिकन क्रांती यशस्वी झाली, याचे पहिले कारण असे की, त्या क्रांतीचे अधिष्ठान असलेला गौरकाय सामान्य समाज दैन्यग्रस्त नव्हता. म्हणून दैन्यवस्थेच्या पीडीने क्षुब्ध होऊन तो क्रांतीस उपयुक्त झाला, असे म्हणता येत नाही. अन्न, वस्त्र, निवारा आणि व्यवसाय यांची समाधानकारक तरतूद असलेला तो गौरकाय समाज नव्या भूमीत नांदत होता. दुसरे कारण असे की, ग्रामे, नगरे, जिल्हा व प्रांत या पातळीवर लोकशाही संस्था दृढमूल झाल्या होत्या. त्यामुळे विवेकबुद्धीने आणि बुद्धिवादाने निश्चित झालेली अशी मानवी मूलभूत हक्कांची ध्येये त्यांच्यात दृढमूल झाली होती. भूक व दैन्य यांच्यातून घडणारी कृती, ही विवेकबुद्धी व सारासार विचार यांच्यापासून अलगपणे घडत असते.

फ्रेंच राज्यक्रांतीचा उठाव करणारा जनसमुदाय हा विषमता आणि दैन्य यांनी पिडलेला होता; त्यात भुकेची हाक होती. गरिबांचा क्षोभ आणि नेत्यांची करुणा या दोन भावनांचे मिलन त्यात घडलेले होते. त्यामुळे भावनांचे आणि सहृदयतेचे समर्थन आणि समानतेचे विवेचन करणारे रूसोचे तत्त्वज्ञानच फ्रेंच राज्यक्रांतीचे प्रेरक ठरते.

भुकेने उत्पन्न झालेला क्षोभ हा अनिवार्य असतो. इतिहासातील स्थित्यंतरे व क्रांत्या अनिवार्यपणे घडतात. हा मार्क्सवादातील ऐतिहासिक अनिवार्यतेचा किंवा अपरिहार्यतेचा सिद्धांत हे गेलला (१७७०-१८३१) व मार्क्सला सुचण्याचे एक कारण फ्रेंच राज्यक्रांती होय.

मार्क्सचे क्रांतिशास्त्र

व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कावर आधारलेली राजकीय लोकशाही क्रांती आणि आर्थिक समताप्रधान समाजवादी क्रांती या दोन क्रांतीची प्रेरणा एकोणिसाव्या व विसाव्या शतकांतील मुख्य राजकीय घटनांच्या मुळाशी दिसते. सामाजिक व आर्थिक समतेच्या स्थापनेकरिता नवी समाजरचना कशी असावी, या संबंधाचा विचार टॉमस मोर (१४७८-१५३५) याने प्रथम केला. 'यूटोपिया' या ग्रंथात समताप्रधान समाजव्यवस्थेचे कल्पनारम्य चित्र त्याने रेखाटले. लोकशाही किंवा समाजवाद या ध्येयांचे प्रेरक मुख्य तत्त्वज्ञान मानवतावाद होय. कार्ल मार्क्सपर्यन्त जे मानवतावादी विचारवंत झाले, त्यांच्या समाजवादाला मार्क्सने 'युटोपियन समाजवाद' असे म्हणून बाजूला सारले व स्वतः तथाकथित वैज्ञानिक पद्धतीने समाजवादाचे 'साम्यवाद' नामक अंतिम परिणतीचे चित्र मांडण्याचा प्रयत्न केला. मार्क्स म्हणतो की, नैतिकदृष्ट्या आर्थिक समतेकडे नेणारा समाजवाद हा आदर्श, ऐतिहासिक दृष्टीने एका विशिष्ट सामाजिक परिवर्तनानंतरच मूर्त रूपास येऊ शकतो; ध्येयवादी माणसाने ऐतिहासिक भौतिकवादाच्या संदर्भातच हा आदर्श अस्तित्वात आणण्याचा कार्यक्रम स्वीकारला पाहिजे. मानवी इतिहासाचा गाभा आर्थिक इतिहास होय. राज्य, कायदा, कला, धर्म, साहित्य, विज्ञान, संस्कृती यांचा पाया अर्थोत्पादनाची पद्धती आणि त्याकरिता निर्माण झालेले सामाजिक संबंध वा वर्गविभाग होता. इतिहासाच्या परिणतिक्रमामध्ये जो कालखंड अथवा युग समाजवादाच्या स्थापनेस अनुकूल असेल, त्याच कालखंडात वा युगात समाजवादी समाजरचना अस्तित्वात येऊ शकेल; अन्यथा हा ध्येयवाद केवळ युटोपियन म्हणजे कल्पनारम्य ठरून कल्पनेतच राहणार; वास्तवात येणार नाही. माणसांच्या ध्येयवादी प्रयत्नांतून आर्थिक समाजरचना विशिष्ट अवस्थेस म्हणजे भांडवलशाहीप्रधान अवस्थेस पोहोचल्याशिवाय समाजवादी क्रांती होऊच शकत नाही. ऐतिहासिक क्रम हा अपरिहार्य असतो. हा कार्यकारणभावाचा क्रम असतो. कार्यकारणभावाचा नियम हा अपरिहार्य रीतीने विश्वात प्रभाव गाजवीत असतो.

एकोणिसावे शतक इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचे शतक होय. या तत्त्वज्ञानाप्रमाणे मानवी इतिहास हा प्रगतीचा इतिहास आहे आणि ही प्रगती अनिवार्यपणे किंवा अपरिहार्यपणे घडते, अशी श्रद्धा एकोणिसाव्या शतकात उत्पन्न झाली. प्रगती हा इतिहासाचा अपरिहार्य परिणाम आहे, हा विचार जर्मन तत्त्वज्ञ हेगेलने प्रथम प्रभावीपणे मांडला. कार्ल मार्क्स हा हेगेलचाच अनुयायी होय. ऐतिहासिक प्रगतीची शक्ती विश्वाचे अद्वैत तत्त्व चैतन्य शक्ती होय. त्या चैतन्य शक्तीचा अपरिहार्यपणे विकास होत जात असतो, हाच इतिहास होय; असे हेगेल मानत होता. मार्क्सने त्या चैतन्य शक्तीच्या ठिकाणी गतिशील जडद्रव्य, गृहीत धरले. त्याच्या मते मानवी इतिहासातील जडद्रव्य म्हणजे अर्थोत्पादनपद्धती होय. ज्याप्रमाणे विश्वात त्याप्रमाणे मानवी समाजातही सतत बदल होत असतो; समाजव्यवस्थेतील गुणात्मक

बदल म्हणजे क्रांती होय. अर्थोत्पादनपद्धतीत मौलिक गुणात्मक बदल मानवी प्रयत्नांनी जेव्हा होतो, तेव्हा सामाजिक संबंध परिवर्तन पावून नवी समाजरचना उत्पन्न होते. ही नवी समाजरचना उत्पन्न होणे म्हणजे सामाजिक क्रांती. या क्रांतीची वा समाजपरिवर्तनाची प्रेरक शक्ती वर्गविग्रह होय.

खालच्या वर्गाचे आर्थिक शोषण हे त्याचे मूळ कारण होय. सर्व मानवी इतिहास हा वर्गविग्रहाचाच इतिहास आहे. प्रत्येक सामाजिक क्रांतीचे युग नव्या प्रगतिशील विशिष्ट वर्गाच्या यशस्वी उठावाचेच फल होय.

बहुजनसमाजाची क्रांती

युरोपात औद्योगिक क्रांती विज्ञानाच्या आधारावर अठराव्या शतकात सुरू होऊन एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी प्रौढावस्थेस आली, ती प्रथम ब्रिटनमध्ये. तिचे अध्ययन व पृथक्करण मार्क्सने करून असा सिद्धांत मांडला, की औद्योगिक क्रांतीमध्ये जो वर्ग पुढाकार घेऊन राजकीय सत्ताधारी झाला, तो भांडवलशाही वर्ग होय. प्राथमिक साम्यवादी समाजरचना नष्ट झाल्यानंतर ज्या ज्या समाजरचना पहिली जाऊन दुसरी अशा क्रमाने अस्तित्वात आल्या. त्यांच्यामध्ये वरिष्ठ वर्ग व कनिष्ठ वर्ग असे भाग नियमाने पडत गेले. त्याप्रमाणे वर्तमान भांडवलशाही समाजरचनेमध्येही मुख्यत: दोन वर्गांचा संघर्ष सुरू आहे; ते वर्ग म्हणजे भांडवलशाही वर्ग व कामगार वर्ग होय. भांडवलशाही समाज रचना वा वर्गविषयक सामाजिक संबंध हे नफ्याच्या उद्देशाने उत्पादनवाढीला पायबंद घालू लागले, म्हणजे वर्गविग्रह तीव्र होतो. सतत चालणारी आर्थिक उत्पादनवाढ सामाजिक स्वास्थ्याला आवश्यक असते. कामगारवर्ग हा प्रचंड प्रमाणात वाढत जातो, त्याची हलाखी वाढली म्हणजे भांडवलशाही समाजव्यवस्थेत तो वर्ग मारक होतो. एका बाजूला श्रीमंतांची श्रीमंती वाढत जाते व दुसऱ्या बाजूला कामगारांसह बहुजनसमाज पिळला जातो व हलाखीत सापडतो; अशा स्थितीत भांडवलशाही अर्थव्यवस्था नफेबाजीच्या बंधनात सापडते, त्यामुळे तिचा विकास एका विशिष्ट कालखंडात थांबतो; तेव्हा कामगारवर्ग हा भांडवलशाही समाजरचना उलथून टाकून राज्यसत्ता काबीज करतो. हीच शेवटची क्रांती बहुजन समाजाची पहिली क्रांती होय.

राज्यसत्ता ही नेहमी वरिष्ठ वर्गाच्या हातातील दडपशाहीचे साधन असते. वर्गीय हितसंबंधांचे रक्षण आणि त्याबरोबर सामाजिक शांतता सांभाळणे हे राज्यसंस्थेचे मुख्य कार्य असते. कामगारवर्ग आर्थिक विषमता व धर्मविषमता नष्ट करण्याकरिता नवीनच काबीज केलेल्या राजकीय सत्तेचा उपयोग करतो व वर्गविहीन समाजरचना उभारून समाजवादाची स्थापना करतो. समाजवाद म्हणजे मुख्यत: वार्षिक उत्पादनाच्या साधनांवरील खाजगी वैयक्तिक मालकी नष्ट करून ती साधने समाजाच्या हिताकरिता समाजाच्या मालकीची करणे होय. समाजवादाची अशी अपरिहार्यपणे स्थापना झाल्यावर व्यक्तिस्वातंत्र्याच्या युगाचा

उदय होतो. दडपशाही करणारी राज्यसत्ता कार्य संपल्यामुळे आपोआप विराम पावते; त्यानंतर साम्यवादाचे अंतिम युग स्थापित होते. हीच मार्क्सच्या मते अखेरची ऐतिहासिक क्रांती होय.

बोल्शेविक क्रांती

मार्क्सवादाच्या प्रभावाखाली पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस लेनिनच्या (१८७०-१९२४) नेतृत्वाखाली रशियात समाजवादी क्रांती घडून आली; परंतु ही क्रांती रशियातील भांडवलशाही समाजरचना औद्योगिक क्रांतीच्या आधारावर नीटपणे उभारली जाण्यापूर्वीच घडून आली. मार्क्सच्या समाजवादी क्रांतीचे अधिष्ठान म्हणजे पूर्णतेस पावलेली भांडवलशाहीनिष्ठ औद्योगिक क्रांती होय. उलट, रशियन क्रांतीत हे अधिष्ठान तयार नव्हते. तेव्हा सरंजामशाहीचे व भांडवलशाहीचे अर्धवट संमिश्रण असलेल्या अतएव मागासलेल्या रशियन समाजात ती घडून आली. झारच्या राजवटीत शासकीय भांडवलशाहीचा पाया घातला; तेव्हा खाजगी भांडवलशाहीला प्रगल्भ रूप आले नव्हते. औद्योगिक क्रांतीचा कार्यक्रम राजकीय क्रांतीनंतरच अनेक पंचवार्षिक योजनांच्या स्वरूपात शासनातर्फेच अमलात आला.

ही क्रांती मार्क्सने वर्तविलेल्या अपरिहार्य परिणतीच्या सिद्धांताच्या कसोटीस उतरत नाही. तिच्यात (व्हॉलंटरिझम) नेत्याच्या स्वतंत्र ऐच्छिकतेचा भाग मोठा आहे. लेनिनने एक प्रकारची रणनीती अवलंबिली म्हणूनच ती क्रांती घडून आली. वैज्ञानिक समाजवादाचा दृष्टिकोन त्यात आढळत नाही. लेनिनने आपला क्रांतीचा कार्यक्रम मार्क्सवादी ध्येयाच्या प्रेरणेने आखला, तरी तो उक्त मार्क्सवादाशी न जुळणारा असा होता. ही क्रांती बोल्शेव्हिक कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली झाली व त्याच पक्षाच्या हाती सत्ता कायम केंद्रित झाली. कामगार वर्गाच्या नेतृत्वाखाली ही क्रांती झाली नाही. मागास कामगारवर्ग व पीडित शेतकरीवर्ग यांचा पाठिंबा मात्र त्यास होता. लेनिनचे समाजवादी क्रांतीच्या ध्येयाने प्रेरित असे शिक्षित क्रांतिकारकांचे संघटित दल म्हणजे पक्ष, या क्रांतीने मुख्य साधन बनला. ऐतिहासिक अपरिहार्यतेचा नियम या रशियन क्रांतीला जसा लागू पडत नाही तसाच त्यानंतरचा मार्क्सवादी चिनी कम्युनिस्ट पक्षाने केलेल्या लाल चीनच्या क्रांतीलाही लागू पडत नाही. व्यक्तिस्वातंत्र्यावर अधिष्ठित किंवा व्यक्तिस्वातंत्र्याचा संपुष्ट आविष्कार करणारी, मार्क्सने कल्पिलेली समाजवादी क्रांती अजून कोठेच अस्तित्वात आलेली नाही. रशियन राज्यक्रांतीपासून आतापर्यंत घडून आलेल्या समाजवादी क्रांतीच्या जगात एकपक्षीय राज्यसत्ताच सर्व सामर्थ्यानिशी नांदत आहे.

मार्क्सवादामध्ये जागतिक समाजवादी क्रांतीचे ध्येय हे मुख्य ध्येय मानले आहे. ते सर्व मार्क्सवादी पक्षाचे ध्येय असावयाच पाहिजे. परंतु आता मार्क्सवादाच्या प्रभावाखाली समाजवादी क्रांती झालेली सगळी राष्ट्रे ही राष्ट्रवादी बनून संकुचित आंतरराष्ट्रीय

राजकारणात गुरफटल्यामुळे त्यांच्यात आपापसात फूट पडून प्रखर विरोध उत्पन्न झाला आहे. हल्ली सुरू असलेला रशिया व चीन यांच्यातील बेबनाव हे त्याचे मुख्य उदाहरण होय. मार्क्सचे जागतिक समाजवादी क्रांतीचे स्वप्न अत्यंत दुरविले आहे. जागतिक क्रांती हे निरंतर विश्वशांतीचे युग निर्माण करील हा आशावादही त्याबरोबर आता फार दुरावला आहे, परंतु आजच्या युगात ते सर्वांत आवश्यक असलेले असे, पृथ्वीवरील मानव जातीच्या अस्तित्वास अत्यंत आवश्यक असलेले असे, ध्येय होय.

(पूर्वा, दिवाळी अंक, १९७७, पृ.५७ ते ६४)

ooo

१७

प्रबोधनाची शोकांतिका : उपोद्घात आणि उपसंहार

प्रास्ताविक

मराठवाड्यात नामांतराला विरोध करणाऱ्या सवर्ण हिंदूंनी जो दलित विरोधी हिंसक, अत्याचारी उठाव केला, त्याचे भीषण स्वरूप पाहून अनेक विचारी मने हादरून गेली. तसेच सवर्णांचे बंड आरक्षणाविरुद्ध बिहारमध्येही झाले. अन्य प्रदेशांतही अत्याचारी घटना सतत घडू लागल्या. या सर्व घटनांतून एक निष्कर्ष अपरिहार्यपणे स्पष्ट झाला की सवर्ण भारतीय समाज अद्यापही समताधिष्ठित समाजाचे ध्येय स्वीकारीत नाही. कागदोपत्री व घोषणेतून ते स्वीकारले असले तरी प्रत्यक्ष समाजजीवन त्या ध्येयानुसार घडविले जाण्याच्या प्रक्रियेला त्याची मान्यता नाही. इतकेच नव्हे तर त्याचा त्याला कडवा विरोध आहे. ही परिस्थिती आत्मपरीक्षणास प्रवृत्तणारी होती. या आत्मपरीक्षणाचा एक भाग स्वाभाविक असा की गेली पन्नास वर्षे प्रबोधन महाराष्ट्र व अन्य भारतीय प्रदेशांत झाले. त्याचा परिणाम समाज वर्तनावर काहीच झालेला नाही असे या घटनांवरून दिसून येते. असे का व्हावे? हे प्रबोधन निष्प्रभ का ठरले?

या प्रश्नाची चर्चा व्हावी म्हणून या परिसंवादाचे आयोजन- अर्थात ही चर्चा काही आध्यात्मिक दृष्टिकोनातून करण्याचा उद्देश असू शकत नाही. या प्रबोधनात जे परिवर्तन अभिप्रेत होते ते सामाजिक आणि वैयक्तिक वर्तनाचे होते. साम्यवादी व समाजवादी प्रबोधनाने वर्णव्यवस्थेविरुद्ध लढा द्यायला पाहिजे, याकडे बराच काळपर्यंत दुर्लक्ष केले असले तरी त्याचे कारण त्यांना भारतीय समाजव्यवस्थेच्या वर्णीय वैशिष्ट्याचे यथार्थ आकलन झाले नव्हते, आणि त्यामुळे केवळ वर्ग लढ्यातून ही क्रांती घडून येईल या सूत्राला ते आंधळेपणाने अनुसरत होते, आहेत. या सर्वसामान्य विधानाला एक अपवाद आहे. त्याचा उल्लेख या संदर्भात अवश्य केला पाहिजे. जे समाजवादी नेतृत्व मार्क्सवाद अधिक गांधीवाद अशी कृत्रिम सांगड घालण्यातच गुंतलेले होते, त्यांनी नंतर मार्क्सवादाचा

त्याग केला. वर्णलढ्याच्या सूत्राशिवाय त्यांनी वेगळे काही विचार केले नाहीत हे खरे आहे. परंतु समाजवादी नेतृत्वात डॉ. राममनोहर लोहिया हेच एकमेव असे नेते झाले की ज्यांनी प्रारंभापासूनच वर्णविरोधी लढ्याची आवश्यकता प्रतिपादन केली. १९३४ साली काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन झाला तर १९३६ च्या कानपूर अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणातून लोहियांनी जातिप्रथा नष्ट करण्यासाठी लढ्याचे आवाहन केले होते. काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर समाजवादी पक्षाची स्वतंत्र घटना तयार केली गेली. त्याप्रसंगी लोहियांनीच पक्षाच्या ध्येयात 'वर्गहीन समाजरचना' असा शब्दप्रयोग होता, त्यात दुरुस्ती सुचवून 'वर्गहीन आणि वर्णहीन समाजरचना' हे ध्येयधोरण बनवून घेतले. १९५५ मध्ये प्रजा समाजवादी पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतर लोहियांनी जो स्वतंत्र समाजवादी पक्ष स्थापन केला, त्या पक्षासाठी त्यांनी 'जातिनीती' एक मूलभूत धारण म्हणून ठरविले. जातिप्रथेविरुद्धच्या लढ्याचे महत्त्व सांगताना डॉ. लोहिया म्हणतात :

"हिंदुस्थानची मुक्ती जातिप्रथेविरुद्धच्या संघर्षातच आहे, किंबहुना जाती प्रथेविरुद्ध बंड हाच खरोखर हिंदुस्थानला पुन्हा जीवित करण्याचा एकमेव मार्ग आहे. अशी क्रांती करणे शक्य आहे काय? विद्वान लोकांना ते अशक्य वाटते पण कर्मयोगी ती क्रांती अटळ आहे, असेच मानतो. आज अशा क्रांतीला यश येण्याची थोडीफार आशा दिसत आहे. आता जातिप्रथेवर फक्त राजकीयदृष्ट्या हल्ला चढवून चालणार नाही. तसेच तिच्याविरुद्ध निव्वळ क्रियाशून्य ओरड करून काही होणार नाही. राजकीय त्याचबरोबर सामाजिक दृष्टीनेही जातिप्रथेविरुद्ध हल्ला चढविला पाहिजे. या प्रथेविरुद्ध राजकीय हल्ला करण्याचा अर्थ आज विशिष्ट जातींना उपलब्ध असलेली राष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी कनिष्ठ वर्णीयांसह साऱ्या भारतातील समाजाला मिळेल अशी व्यवस्था करणे, काही विशिष्ट जातींना मिळणारे समानतेच्या वागणुकीचे आश्वासन सर्व जातींना देणे हे या व्यवस्थेचे उद्दिष्ट असले पाहिजे. डॉ. लोहिया यांच्या समग्र जातिनीतीचे विवेचन करण्याची येथे आवश्यकता नाही; परंतु त्याचे एक वैशिष्ट्य येथे नमूद केले पाहिजे. त्यांनी मांडलेला आरक्षणाचा सिद्धांत हा केवळ शासनातील नोकऱ्या आणि शिक्षण क्षेत्रातील जागा यांपुरताच मर्यादित नव्हता. भारतीय समाजात उन्नती आणि कृती यांच्यात जो दारूण विसंवाद आढळून येतो, त्याचा लोहियांना मनस्वी राग होता आणि म्हणून जातिनीती सांगताना त्यांनी पक्षालाही ती लागू केली. पक्षसंघटनेच्या अगदी तळच्या कमिटीपासून राष्ट्रीय समितीपर्यंत आणि सत्र निवडणुकांसाठी पक्षातर्फे उभे करावयाच्या उमेदवारांच्या निवडीवरही हा सिद्धांत लावला पाहिजे, असा त्यांनी नियम केला होता. म्हणजे दलित, आदिवासी, मागास जाती, मुसलमान आणि स्त्रिया यांना ६० टक्के जागा व उच्चवर्णीयांना ४० टक्के अशी विभागणी त्यांनी आरक्षणाच्या सिद्धान्तानुसार सुचविली होती. त्यांच्या मते उच्चवर्णीयांचा अधिकार लोकसंस्थेच्या प्रमाणात फक्त २० टक्के जागांवरच असू शकतो. ८०-२० ही आदर्श समानता होईल, पण

संभाव्य समानता म्हणून ६०-४० अशी विभागणी तत्काल झाली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. अर्थात, समाजवाद्यांनी, स्वतःला लोहियावादी म्हणवून घेणाऱ्यांनीसुद्धा या नियमाप्रमाणे आचरण केले नाही, हेही सत्यच आहे.

'वर्गलढ्यातून क्रांतीचे सामर्थ्य निर्माण होऊ शकले असते. परंतु 'वर्गलढा' मानणाऱ्या साम्यवाद्यांनी (व समाजवाद्यांनी) वर्ग लढ्यासाठी कामगारांची जातिभेदविरहित अशी एकजूट उभारण्याचा, जातिभेदातीत वर्गीय एकतेचे कामगाराचा शिक्षण देण्याचा प्रयत्न केला नाही. जातीय उच्चनीचतेच्या कामगार वर्गात दृढमूल असलेल्या अहंकारांना धक्का लावला तर संघटनेला धोका निर्माण होईल या भीतीने त्यांनी या प्रश्नाला स्पर्श करण्याचे सातत्याने टाळले, एवढेच नव्हे तर जातीय उच्चनीचतेच्या कल्पनांशी तडजोड करूनच आपली कामगार चळवळीची उभारणी केली. पूर्वीचे मध्यमवर्गीय समाज सुधारक 'ब्राह्मणी कृतिशून्य होते' ही टीका जितकी खरी आहे, तितकेच साम्यवाद–समाजवादाचा घोष करणारे 'ब्राह्मणी' नेतृत्व हेही जातिप्रथेच्या बाबतीत 'कृतिशून्य' ठरले. भारतातील साम्यवादी व समाजवादी चळवळीची जी दुर्दशा आज दिसते आहे तिचे नेतृत्वाने केलेली जातिप्रथेशी तडजोड हे निदान एक प्रमुख कारण आहे.

तेव्हा, पुन्हा पुढे मूळ प्रश्नच उरतो. प्रबोधन समाज सुधारकांचे असो वा सामाजिक क्रांतीचा उद्घोष करणाऱ्या साम्यवादी-समाजवाद्यांचे असो, ते प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीने निष्फळ ठरलेले दिसते. या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी आम्ही महाराष्ट्रातील काही विद्वानांना आवाहन केले. आमचे गुरुतुल्य ज्येष्ठ आणि श्रेष्ठ स्नेही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या बहुविध जबाबदारीतून वेळ काढून या परिसंवादासाठी उपोद्घात व उपसंहार लिहून दिला. कोल्हापूरचे तपस्वी ध्येयनिष्ठ पत्रकार बाळासाहेब पाटील, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे विचारवंत शरद पाटील, विश्वकोशाचे प्रभारी संपादक रा. ग. जाधव आणि आमचे स्नेही मार्क्सवादी विचारवंत प्रभाकर वैद्य, थोर दलित साहित्यिक विचारवंत बाबुराव बागुल या सर्वांनी अगत्याने या विषयावरील आपले विचार प्रसिद्ध करण्याची संधी दिली, याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक ऋणी आहोत.

उपोद्घात

स्वातंत्र्यपूर्व काल

१९११ साली लंडन येथे जुलैमध्ये भरलेल्या एका जागतिक परिषदेत कै. ना. गो. कृ. गोखले, यांनी 'हिंदुस्थानात पूर्व पश्चिमेचा संगम' या शीर्षकाखाली एक निबंध वाचला. त्यात त्यांनी म्हटले, की पूर्व-पश्चिम देशांतील लोकांच्या या संगमाने दूरगामी परिणाम घडून येतील.' पश्चिमेचा हा संबंध भारताच्या हाडामांसात शिरून बसलेला आहे. हा संबंध दृढ होऊ लागला तो ब्रिटिशांचे राजकीय वर्चस्व स्थापन झाल्यानंतर. हा एक प्रकारचा संगम

होता. त्याबरोबरच संघर्षही होता. परंतु या संघर्षातच सांस्कृतिक व सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली, बाह्य व आंतरिक सामाजिक परिवर्तन घडू लागले, प्रबोधन म्हणजे आंतरिक वैचारिक परिवर्तन होय. आधुनिक राज्यव्यवस्था, न्यायसंस्था, शिक्षणसंस्था, अर्थव्यवस्था, कुटुंब पद्धती, वर्गीय हितसंबंध, जातिसंस्था, निरनिराळ्या धार्मिक समाजांचे संबंध इत्यादिकांमधले परिवर्तन हे बाह्य परिवर्तन होय. आध्यात्मिक व आधिभौतिक अशा दोन्ही प्रकारच्या सांस्कृतिक स्तरांमध्ये घडामोडी होण्यास प्रारंभ झाला. ब्रिटिशांची राजकीय सत्ता पश्चिमी संस्कृतीचा सर्वांगीण व समग्र वारसा घेऊन येथील राजसिंहासनावर विराजमान झाली. आणि भारतीय जीवनावर प्रभाव गाजवू लागली. त्याबरोबरच प्रबोधनाची प्रभात होऊ लागली. ब्रटिश राजसत्ता यशस्वी झाली, याचे मुख्य कारण म्हणजे तिची आधुनिक पश्चिमी संस्कृती होय. दूरपल्ल्याची शस्त्रे व शास्त्रे विरुद्ध कमी सामर्थ्याची भारतीयांची शस्त्रे आणि शास्त्रे यांच्या संघर्षात ब्रिटिशांची शस्त्रे व शास्त्रे यांनी विजय मिळवून दिला. येथील सरंजामशाही पूर्ण पराभूत झाली; परंपरागत मोठ्या राजसत्ता नष्ट झाल्या व शिल्लक जेवढ्या राहिल्या तेवढ्या ब्रिटिश सत्तेच्या मेहरनजरेखाली खुशामतीचे जीवन जगू लागल्या.

उच्च-नीच उतरंडीवर रचलेली जातिसंस्था विसकळीत होऊ लागली. तिचे अधिष्ठान म्हणजे मध्ययुगीन मागासलेल्या अर्थोत्पादनाच्या साधनांवर आधारलेली अर्थव्यवस्था होती.जीवनाकडे पाहण्याचा समग्र दृष्टिकोन धार्मिक होता.

विश्वाचे व जीवनाचे ज्ञान धार्मिक पोथ्या पुराणांवर आधारलेले होते. उलट पश्चिमी संस्कृतीचे अधिष्ठान औद्योगिक क्रांती होती. या औद्योगिक क्रांतीची मानसिक प्रेरणा म्हणजे आधुनिक विज्ञाने व तंत्रज्ञाने; ती सत्याशी अधिक जवळ होती, भौतिक जीवनावरील सत्ता, यांची कारकशक्ती विज्ञान व तंत्रज्ञान हीच असते, या पश्चिमी संस्कृतीचा औद्योगिक पाया तंत्रज्ञान व राज्यव्यवस्था यांचे सामर्थ्य पाहून सामान्य जनतेने तिला मूक संमती दिली आणि आधुनिक शिक्षण घेतलेले विद्यावंत नम्रपणे अंतर्मुख होऊन आत्मसंशोधन करू लागले. हे आत्मसंशोधन म्हणजेच प्रबोधन होय. या आत्मसंशोधनाच्या द्वारे लक्षात आले की आपली समाजसंस्था दुर्बल आहे. समर्थ समाजशक्तीचा आविष्कार प्रगत अर्थव्यवस्थेतच होत असतो. या राजकीय, सामाजिक व आर्थिक बाह्य मानवी विश्वाच्या आत मानवी मनाने निर्मित असे विचार, वासना, इच्छा, संकल्प भावना, याचे विश्व असते. या बाह्य व अंतरंगीण विश्वामध्येच समग्र परिवर्तन होणे आवश्यक आहे, हे ब्रिटिश आमदानीत एकोणिसाव्या शतकात प्रबोधनाच्या अग्रदूताच्या ध्यानात आले होते.

बाह्य इंद्रियगोचर मानवनिर्मित विश्व व मानवाचे आंतरिक मनोनिर्मित विश्व यांचा अतूट तादात्म्य संबंध असतो. ही दोन विश्वे विलग कधीच होऊ शकत नाहीत. एकाच मानवी जीवनाच्या ह्या आंतर व बाह्य अशा बाजू असतात. मन आणि मेंदू यांचे द्वैत गृहीत न धरणारे जीवविज्ञान या विसाव्या शतकात अधिक वेगाने प्रगती करू लागले आहे. विकार-विचार,

राग-द्वेष, अनुभव व स्मरण, भावना व ज्ञान आणि मानवी शरीराचे बाह्यवर्तनाचे प्रकार हे एकमेकांवर अवलंबून असतात.

बाह्य विश्वांचे यथार्थ ज्ञान म्हणजे विज्ञानाबाहेरच्या मानवी विश्वाला किंवा सामाजिक विश्वाला अधिक समर्थ आकार देण्यात अधिक यशस्वी होत असते. हे जसे खरे आहे तसेच विविध धर्मातील जीवनाच्या भवितव्याबद्दलचे मिथ्या कल्पनानिर्मित ज्ञान म्हणजे आध्यात्मविद्याही सामाजिक विश्वाला आकार देण्यास कारणीभूत होते. पुनर्जन्म, अमरत्व, पाप-पुण्य, देवासुर, स्वर्ग-नरक धर्मविषयक कल्पनाजालही मानवी व्यवहार व मानवी संस्था घडवीत असते कारण आधुनिक जीवविज्ञानाच्या दृष्टीने पाहिल्यास धार्मिक कल्पनाजालही मेंदूच्या प्रक्रियेचाच एक प्रकार आहे. म्हणजे भौतिक शक्तीचाच तो आविष्कार आहे. त्यात प्रचंड भौतिक शक्ती असते. धर्म ही अफू आहे, हे विधान त्यामुळे अर्थपूर्ण ठरते. याचे उदाहरण म्हणजे ज्ञात इतिहासातील वर्षानुवर्षे, शतकानुशतके चाललेले धार्मिक संग्राम होत. अधिक पृथक्करण केल्यास असेही लक्षात येते, की ही निरनिराळी धार्मिक कल्पनांची जाळी आणि माणसांचे, वर्गांचे, सामाजिक गटांचे आर्थिक हितसंबंध ही एकेकात गुंतलेली असतात. विचार आणि भावना ह्या जर यथार्थ म्हणजे विश्वविषयक सत्यावर अधिष्ठित असतील तर ती माणसांच्या सामाजिक प्रयत्नांना अधिक यशस्वी बनवितात. हा दृष्टिकोन लक्षात घेतला तर भारताच्या प्रबोधनयुगाचे रहस्य नीटपणे लक्षात येऊ शकते.

ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर भारताचे प्रबोधनयुग सुरू झाले; त्याच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक अशा सर्व बाजूंचा विचार सुरू झाला. ही सामाजिक क्रांतीची प्रस्तावना होय. वैचारिक व सामाजिक क्रांती यांच्या संबंधाचा विचार करीत असताना एक मूलभूत सिद्धांत लक्षात ठेवला पाहिजे. तो हा की सामाजिक क्रांतीच्या प्रयत्नातून वैचारिक क्रांतीचे प्रयत्न वेगळे करणे हे तर्कदुष्ट ठरते. कारण मानवी व्यवहार वा मानवी प्रयत्न यांच्यामधील मानसिक प्रक्रिया व तथाकथित भौतिक प्रक्रिया ही एकमेकांची पूरक असते. मन बदलले नाही तर बाह्य व्यवहार बदलत नाहीत व बाह्य व्यवहार बदलत नसतील तर मनही बदलणे कठीण होऊन जाते. अनेक वेळा व्यवहार बदलण्याकरता मनोव्यापार प्रथम बदलावा लागतो. न्यूटनने गतिविज्ञान शोधले, त्याचे नियम स्पष्ट केले, त्यामुळे न्यूटननंतर २०० वर्षेपर्यंत तंत्रविज्ञानाची आश्चर्यचकित अशी प्रगती झाली आहे. विचार पुढे जातो. नंतर समाज सरकतो. समाज पुढे गेल्यानंतर पुन्हा विचार पलीकडचा पल्ला गाठतो. असे घडले तरच सामाजिक क्रांती घडून येते.

भारताचे पहिले प्रबोधनाचे द्रष्टे राजा राममोहन राय हे होत. त्यांना समग्र सामाजिक परिवर्तनाचे भावी स्वरूप दिसले होते. त्यांनी धर्मसमीक्षेस प्रथम प्राधान्य दिले. कारण कार्ल मार्क्सने म्हटल्याप्रमाणे धर्मसमीक्षा हा सर्व समीक्षांचा प्रारंभ होय. विचार पुढे जातो व पाठीमागून व्यवहार घडतो, याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे अर्ध्या जगात सामाजिक क्रांतीचा

सुरू असलेला प्रयोग होय. एकोणिसाव्या शताच्या पूर्वार्धात कार्ल मार्क्स व त्याचे समविचारी यांनी साम्यवादी क्रांतीचे दिवास्वप्न पाहिले. म्हणूनच विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात साम्यवादी क्रांतीला प्रारंभ झाला. राजा राममोहन राय यांनी भारताच्या समाजस्थितीचे अवनत, विकृत व असमर्थ स्वरूप पाहिले. अवनतीचे, विकृतीचे व असामर्थ्याचे एक मुख्य कारण त्यांना दिसले, ते येथील हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी धार्मिक समाजांच्या परस्पर विरोधात. या सर्व धर्मांची मूलभूत प्रेरणा एकच आहे हे त्यांच्या ध्यानात आले. या प्रेरणेचे उगमस्थान मानवी मन होय, धर्मग्रंथ नव्हे, हेही त्यांनी विचारात घेतले, आणि सर्व धर्मांच्या समन्वयाचे एक व्यासपीठ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या नंतर केशवचंद्र सेन, महादेव गोविंद रानडे इत्यादी मंडळी या धार्मिक आंदोलनात सामील झाली. धर्मग्रंथांचे आधार घेऊन परंपरागत पवित्र मानलेल्या रूढीचे समर्थन धार्मिक लोक करीत होते. हिंदूंच्या सामाजिक संस्था धर्मशास्त्रांच्या पाठबळावर चालल्या होत्या. या सामाजिक संस्थांचे धार्मिक अधिष्ठान बदलण्याचा एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांचा प्रयत्न या दृष्टीने फार महत्त्वाचा ठरला. महाराष्ट्रात लोकहितवादी, जोतीराव फुले इत्यादी मंडळींनी धर्मविषयक ब्राह्मणी विद्यांवर हल्ला सुरू केला.

राजा राममोहन राय यांनी आधुनिक शिक्षणाचा पाया घातला. संस्कृत पाठशाळा आणि मुस्लीम धर्माचे शिक्षण देणारे मदरसे स्थापन करण्याऐवजी आधुनिक ज्ञानविज्ञानाचे शिक्षण देणारी महाविद्यालये स्थापन व्हावी असा आग्रह ह्या सर्व धर्मसुधारक व समाज सुधारकांनी धरला. याचा मुख्य उद्देश नवी अर्थव्यवस्था या देशात निर्माण व्हावी हा होता. चिपळूणकर, आगरकर, लो. टिळक इत्यादी भारतीय विचारवंतांनी तर आधुनिक शिक्षण म्हणजे औद्योगिक शिक्षण असेही समीकरण मांडले.

भारतीय प्रबोधनात धार्मिक समीक्षेबरोबरच ब्रिटिशांच्या साम्राज्यशाही आर्थिक धोरणावरही प्रखर टीका करण्यास सुरुवात झाली. दादाभाई नवरोजी, रमेशचंद्र दत्त, न्यायमूर्ती म. गो. रानडे इत्यादी मंडळींनी भारताच्या अर्थव्यवस्थेची आधुनिक तंत्रज्ञानावर उभारणी झाली पाहिजे आणि साम्रज्यशाहीने चालविलेली आर्थिक नागवणूक संपली पाहिजे या विचारावर भर दिला. रमेशचंद्र दत्त यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेची ऐतिहासिक मीमांसा केली. त्यात त्यांनी दाखवून दिले की, भारतीय कुटिरोद्योगाची गळचेपी करून नवीन तंत्रज्ञानावर आधारलेल्या उद्योगांना पायबंदी घालण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी चालविला आहे. साम्राज्यशाहीने चालविलेल्या आर्थिक पिळवणुकीचे हृदयविकारक चित्र दादाभाई नौरोजी प्रभृतींनी दृष्टीसमोर उभे केले, आणि आर्थिक दुःखस्थितीवर स्वदेशी उद्योगधंद्यांची उभारणी होण्याकरता राष्ट्रव्यापी आंदोलन आरंभिले.

धार्मिक सुधारणा आणि आधुनिक शिक्षणाचा प्रसार यांचा संदर्भ भारतीय राष्ट्रवादाच्या प्रेरणेशी होता ही प्रेरणा परकीय राज्याच्या स्थापनेबरोबर निर्माण झाली. राष्ट्रवादाच्या

ध्येयवादाला सामाजिक परिवर्तनाचा पाया दिला पाहिजे, हा विचार या प्रबोधनामधून स्पष्ट होऊ लागला. स्त्रियांना आणि शूद्रातिशूद्रांना समानतेचा अधिकार मिळाल्याशिवाय परिवर्तन होणार नाही, अशी पक्की श्रद्धा या प्रबोधनाच्या मुळाशी होती. म्हणून भारताच्या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाचा प्रश्न धसास लावला. प्रथम सतीची चाल व बालविवाह यांस बंदी घालण्याकरीता कायद्यांची मागणी केली. त्याचप्रमाणे आंतरजातीय विवाह व स्त्रियांचा पुनर्विवाह यासंबंधी आवश्यक अशा कायद्यांची मागणी केली. आणि शासनातर्फे तसे कायदे मान्य करून घेतले. जातिभेदाची म्हणजे वर्णव्यवस्थेची समीक्षा करून त्यातील सामाजिक अन्याय उघडकीस आणला. वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था यांचे भयंकर स्वरूप म्हणजे अस्पृश्यतेची संस्था होय, हे लक्षात धरून अस्पृश्यता निवारणाचे फार महत्त्वाचे आंदोलन म. गांधींच्या आणि डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सुरू झाले.

सामाजिक परिवर्तनाचा जातिसंस्था हा मूलभूत प्रश्न होय, याची जाणीव सर्व समाजसुधारकांना होती. जातिसंस्थेचा आर्थिक व व्यावसायिक पाया ब्रिटिश अमदानी सुरू झाल्यापासून जोरात ढासळू लागला. कृषिप्रधान व कुटिरोद्योगनिष्ठ अर्थव्यवस्थेने जातिसंस्था निर्माण केली व दृढ केली. शेकडो भिन्नभिन्न जमाती जातिसंस्थेच्या उच्च-नीच स्तरांवर स्थिरावल्या. आदर्श म्हणून मानलेल्या वर्णव्यवस्थेच्या परिभाषेत तात्त्विक व धार्मिक अधिष्ठान या संस्थेला लाभले. वस्तुतः वर्णव्यवस्था व्यवस्थित स्वरूपात दीर्घकाळपर्यंत भारतात कधीच अस्तित्वात आली नाही. तिचे स्वरूप केवळ कल्पनारम्यच राहिले. मानवी वंशभेदांच्या भाषेत तिचे समर्थन परंपरेचे समर्थक करीत होते; आणि अलीकडे वर्णव्यवस्थेचे ऐतिहासिक विवेचन करणारे पंडित तसेच समर्थन करू लागले. परंतु वर्णव्यवस्था व वंशभेद यांचे समीकरण केवळ अवास्तव कल्पनावर आधारलेले आहे. वस्तुतः अनेक मानववंश जेव्हा एकत्र येऊ लागले, एकत्र वस्ती करू लागले, तेव्हापासूनच या वंशांचा संकर होऊ लागला. गेल्या हजार वर्षांत जगात सर्वत्र जेथे अनेक मानववंश एकत्र आले, तेथे तेथे ते रक्ताने अपरिहार्यपणे मिसळले गेले. चार्डिन या मानवशास्त्रज्ञाने म्हटले आहे, 'की मानवी जैविक विज्ञानाने असे सिद्ध केले की भिन्न भिन्न मानववंश एकत्र आले की ते एकमेकांत मिसळतातच'; भारतातील जातिव्यवस्था त्याला अपवाद नाही. चार्डिन म्हणतो, की एकमेकांत मिसळणे ही गोष्ट मानवविकासाची अपरिहार्य गरज आहे. मनुष्याचा स्वाभाविक मनोधर्मच तसा आहे. म्हणून मनुष्यप्राणी मानसिकदृष्ट्या एकरूप होऊ इच्छितो, त्यामुळे एकरूपतेच्या द्वारा त्याच्या मानसिक शक्ती, संवेदना, विचार याची वृद्धी वाढते. जातिभेद हा वंशभेद समजून त्याचे दीर्घकाळ आचरण त्यामुळे म्हणजे तद्नुसार राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्था निर्माण झाल्यामुळे भारतीयांच्या ऐतिहासिक प्रगतीचा वेग वेळोवेळी कुंठित झाला आहे. चार्डिनचा हा मानववंशीय सिद्धांत प्रबोधनातील भारतीय सुधारकांना माहीत नव्हता, हे खरे आहे; परंतु जातिसंस्थेमुळे भारत हा देश राष्ट्र या नात्याने सामर्थ्यसंपन्न

बनला नाही; ही गोष्ट त्यांनी पक्की ध्यानात घेतली आहे.

समाजसंस्थेची राज्यसंस्था ही विकसित व परिणत अवस्था आहे. सबंध भारत राष्ट्र म्हणजे एक राज्य होय, असा भारतीय राष्ट्रवादाचा मूलभूत सिद्धांत आहे. हा सिद्धांत मनाशी बाळगून स्वराज्याचे आंदोलन भारतीय नेत्यांनी वाढीस लावले. भारताचे राज्य हे प्रातिनिधिक लोकशाही म्हणजे संसदीय लोकशाहीच्या स्वरूपाचे असावे, याबद्दल दादाभाई नवरोजींपासून ते म. गांधींपर्यंत सर्व नेत्यांमध्ये एकमत होते. याकरिता संसदीय लोकशाहीचा पाया म्हणून मूलभूत हक्कांच्या मागणीस त्यांनी प्रारंभ केला. आणि याच आंदोलनाची परिणती भारत स्वतंत्र होण्यात झाली.

ही गोष्ट विशेषतः ध्यानात घेऊन आगरकरांच्या विचारांचे मूल्यमापन करणे शक्य आहे. या प्रबोधनाच्या विचारवंतांमध्ये गोपाळ गणेश आगरकर हे सर्वांत मूलगामी विचारवंत होते. त्यांनी मानवी समाजसंस्थांचे व सांस्कृतिक अंगांचे विकासवादाच्या दृष्टीने परिशीलन केले होते. त्यात प्रातिनिधिक लोकशाही राज्यव्यवस्था ही राज्यसंस्थेची उच्चतम अवस्था होय, असा विचार मांडला आहे. या परिशीलनामध्ये स्त्री-पुरुषांच्या समानतेचे तत्त्व, सर्व मानवजातीची एकता, सामाजिक विकासाची प्रक्रिया, धर्मविकासाची प्रक्रिया इत्यादी गोष्टी त्यांनी आपल्या समर्थ व सुबोध शैलीने मांडल्या आहेत.

फुले हे देखील समग्रदर्शी होते. त्यांच्या समग्र दर्शनामध्ये समाज रचनेच्या मुख्य सक्तीची समीक्षा होती. औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीचे सर्व समाज हे अंधश्रद्धेवर आधारलेल्या धर्मसंस्थेने संघटित केले होते. समग्र धर्मसंस्था त्यांनी ऐहिकवादी दृष्टिकोनाने तपासली. दुसरी समाजरचनेची वस्ती म्हणजे शोषण करणारी वर्गयुक्त समाजपद्धती. या शोषणाचे स्वरूप त्यांनी निदर्शनास आणले. आणि त्याचे एक प्रतीक म्हणूनच आर्यभटाचे म्हणजे सामाजिक संस्थेतील स्थान होय. शोषणकर्त्या वर्गांची मीमांसा आगरकरांच्या मीमांसेत स्पष्ट नाही, ती गोष्ट कार्ल मार्क्सच्या समकालीन असलेल्या फुल्यांनी दाखवून दिली.

स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रबोधनयुगाच्या उतरार्धात म्हणजे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतामध्ये समाजवादी व साम्यवादी विचारांच्या लाटा उसळू लागल्या. हे समाजवादी व साम्यवादी विचार या प्रबोधनातील खरोखरच्या विचारप्रवाहांशी सुसंगतच होते. कारण मानवी इतिहासाचे तत्त्वज्ञान या सर्वांच्या मुळाशी आहे. ऐतिहासिक दृष्टी भारतीयांना नव्हती. ब्रिटिश कालापूर्वी घडलेल्या ऐतिहासिक घटनांना पुराणकथेचे स्वरूप वारंवार देण्यात आले. त्यामुळे देशकाल परिस्थितीप्रमाणे समाज बदलत असतो व बदलला पाहिजे, अशा प्रकारचा विचार ब्रिटिशपूर्व भारतीय विचारसरणीमध्ये कोठेच व्यवस्थित स्वरूपात मांडलेला दिसत नाही. ऐतिहासिक दृष्टिकोन ही पश्चिम आधुनिक शिक्षणाने दिलेली अमोल देणगी आहे. भारतात लोकशाही राज्यव्यवस्था निर्माण झाली, त्यामुळे समाजरचनेत मूलगामी परिवर्तन करण्याची भारतीयांना संधी मिळाली आहे. याचे श्रेय स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रबोधनाच्या आंदोलनाला आहे.

उपसंहार

विमोचक शक्ती व बंधक शक्ती यांचा प्रखर संघर्ष

स्वातंत्र्योत्तर काल

सरंजामी सत्ता व साम्राज्य सत्ता यांचा पराभव होऊन भारतात संसदीय लोकशाही निर्माण झाली. हा सामाजिक क्रांतीच्या प्रक्रियेतील फार महत्त्वाचा टप्पा होय. स्वातंत्र्यपूर्व प्रबोधनाचे हे फलित आहे. परंतु ही संसदीय लोकशाही आता डळमळू लागली आहे. कारण तिचा पाया कच्चा व भुसभुशीत आहे. कारण लोकशाही जीवनपद्धतीने भारतीय नागरिक जीवन जगत नाहीत. जाती जमातींची बंधने अजून पक्की आहेत. नागरिक एकमेकांना जातीचे आणि उपजातीचे घटक म्हणूनच ओळखतात; आणि विशिष्ट धर्मपंथाचे म्हणूनच नागरिक एकमेकांशी व्यवहार करतात. ग्रामीण आणि नागरी वसत्या या जात-पात व धार्मिक गट यांच्या भिन्न भिन्न गटांच्या वसत्या म्हणूनच ओळखता येतात. ग्रामीण भागात किंवा शहरी भागात अजून दलितांच्या जमातीची वसतिस्थाने वेगळी आहेत, त्यांच्या सीमारेषा म्हणजे एकमेकांपासून विलग ठेवणाऱ्या आक्राळ-विक्राळ दऱ्याच आहेत. जातिसंस्था ही जातीय अहंकाराच्या व विव्देषाच्या जागृत स्थानाचा समूहच म्हणून निर्दिष्ट करता येतो. कौटुंबिक संबंध हे जातपात ओळखूनच होत असतात. स्त्री-पुरुषांचे संबंध हे विषमतेवरच बांधलेले आहेत. लग्नाचे बंधन म्हणजे पुरुषाचे बंधन असाच लग्नाचा अजून अर्थ आहे. मुस्लीम वैयक्तिक कायद्याप्रमणे तर स्त्री ही पुरुषाच्या गुलामीतच जगते. तिला केव्हाही सोडचिठ्ठी मिळते. ती पुरुषाला केव्हाही सोडचिठ्ठी देऊ शकत नाही. प्रादेशिक राज्ये व प्रादेशिक भाषिक भावना यांच्या मुळाशी अर्धसुप्त राष्ट्रभेदाचाच अभिमान आहे. आर्थिक विषमता व शोषण या संदर्भात दलित व आदिवासी जमातींचे जीवन दैन्यामध्ये खितपत पडलेले आहे. शेकडा ४० ते ५० भारतीय दारिद्र्याच्या रेषेखाली जीवन जगत आहेत.

राममोहन राय यांचे सर्व धर्मांचे व्यासपीठ विस्मृतीच्या अंधारात लुप्त झाले आहे. म. गांधींची सर्वधर्मसमता हा वक्तृत्वाचा शोभादायक अलंकार आणि वक्त्याच्या उदात्त भावनेचे प्रदर्शक शाब्दिक प्रतीक बनले आहे. मशिदीवरून हिंदूंच्या वाजत गाजत जाणाऱ्या मिरवणुकींनी मुसलमानांचा अहंकार क्रोधाने उफाळून येतो, काही थोडे मुसलमानच हिंदूंशी दिलजमाई करण्याची भाषा करतात; पण तो एक उपरा उपचारच ठरतो. मुस्लीम समाजाच्या मनावर त्याचा ठसा कधीच उमटत नाही. हिंदूंचे गाय हे जनावर दैवत असून ते पूजास्थान बनलेले आहे आणि दलित हा माणून पापस्थान आहे अशी भावना म्हणजे मनाची अढी वज्रप्राय बनून घट्ट बसली आहे.

स्वातंत्र्यपूर्व प्रबोधन कालखंडात जे कृतिशील सुधारक होते आणि त्यांच्या ज्या सेवक

संस्था होत्या, त्यांचे संख्यात्मक परिगणन केल्यास ती संख्या नगण्यच होती. साम्राज्यशाही विरोधी लढा हा सामाजिक वर्तनाच्या दृष्टीने अगदी उथळ होता. त्यात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूलभूत मानवी मूल्यांवर श्रद्धा प्रकट झालेली नव्हती; केवळ नेत्यामध्येच ती श्रद्धा होती. तो वस्तुतः दारिद्र्याविरुद्ध झगडा होता. नागरिक स्वातंत्र्याच्या व समतेच्या तत्त्वावर श्रद्धा ठेऊन संघटित झालेल्या संस्थांचे सदस्य म्हणून नागरिक हक्कांच्या मागणीने प्रेरित होऊन स्वातंत्र्याचा लढा लढला गेला नाही. आज जी संसदीय लोकशाही राज्यसंस्था भारतात उभी राहिली आहे तिचा पाया कच्चा व भुसभुशीत आहे, असे आम्ही जे वर म्हटले आहे त्याचा हाच अर्थ आहे. समाजसुधारकांना व धर्मसुधारकांना युरोपमध्ये लढा द्यावा लागला तो धार्मिक पुरोहितशाहीच्या विरुद्ध होता. धार्मिक पुरोहितशाहीची सामाजिक व राजकीय सत्ता तेथे दृढमूल होती. परंतु केंद्रित पुरोहितशाही उखडणे त्या मानाने सोपे होते. भारतात लढा पुरोहितशाही विरुद्ध झाला, परंतु येथील पुरोहितशाही संघटित व एककेंद्रित नव्हती. ती साफ नेस्तनाबूत झाली आहे; परंतु धार्मिक कर्मकांडावर आधारलेली समाजसंस्था म्हणजे जातिसंस्था शाबूत राहिली आहे. प्रबोधनकालातील सुधारकांना तिचाच विरोध होता.

आता प्रबोधनाच्या शक्तीशी लढणारी शक्ती म्हणजे धार्मिक सामाजिक जातिसंस्थेची पोलादी चौकटच होय. ती इथल्या नागरिकांच्या रोमरोमात, हाडीमासी आपली मुळे पक्की रोवून बसली आहे. ते एक प्रचंड भ्रमजाल आहे. त्या भ्रमजालातून मुक्त नागरिक हे संख्येने अत्यल्प आहेत. म्हणून कार्ल मार्क्सच्या विरोधाच्या (डायलेक्टिक्सच्या) भाषेत बोलायचे, तर संख्या गुणात व गुण संख्येत परिवर्तन पावतो म्हणजे विशिष्ट संख्यात्मक परिवर्तन झाले तर गुणात्मक परिवर्तन होते. तोपर्यंत परिवर्तन होत नाही. प्रबोधनाचे नेतृत्व ब्राह्मणांच्या हाती होते म्हणून प्रबोधन यशस्वी झाले नाही, हे म्हणणे वरवर यथार्थ वाटले तरी ते खरे नाही. प्रबोधनाचा विचार ब्राह्मण्यसूचक कधीही नव्हता. विचार सांगणारा कोण आहे याच्यापेक्षा विचार कसा आहे, हाच मुद्दा ध्यानात घ्यावा लागतो. दलिताचा डॉक्टर ब्राह्मण, बनिया वा मराठा आहे की दलित आहे, ह्या संशोधनाला काही महत्त्व नसते. डॉक्टर हा कुशलतेने उपचार करतो की नाही यालाच महत्त्व असते. गणित, भौतिकी, जीवशास्त्र कोण शिकवतो, याच्यापेक्षा काय शिकवले जाते हेच केवळ महत्त्वाचे असते. त्याचप्रमाणे दुसरा एक मुद्दा ध्यानात घेतला पाहिजे. सुधारकांचे बोलके व कर्ते असे दोन विभाग गो. ग. आगरकर यांनी दाखविले आहेत. कर्ते हे अधिक प्रभावी होतात यात शंका नाही. कृतिशीलता ही महत्त्वाची आहे, परंतु विचार समर्पकपणे तत्त्वाची पकड घेऊन सुबोधपणे मांडणे व त्या विचारांचा जन्मभर प्रचार करणे हीसुद्धा कृतीच आहे. मन बदलण्याचे सामर्थ्य विचारांमध्ये मोठे असते.

शेकडा ७० ते ७५ लोक निरक्षर व अज्ञानी राहिल्यामुळे विचार बहुजन समाजापर्यंत खोलवर पसरू शकला नाही; जो काही प्रमाणात पसरला तो विकृत बनला. उदा; विसाव्या

शतकातील ब्राह्मणेतर चळवळ होय. या चळवळीने ब्राह्मणाचे राजकीय महत्त्व कमी झाले ही गोष्ट स्वातंत्र्योतर काळात निवडणुकीच्या संदर्भात अगदी स्पष्ट झाली आहे; परंतु ज्या जातिसंस्थेचा ब्राह्मण हा बोलका समर्थक होता ती जातिसंस्था व अस्पृश्यतेची संस्था सुरक्षित, जागृत व लढाऊ ठेवणारा समाज मुख्यतः ब्राह्मणेतर समाजच आहे. लो. टिळकांनी 'आधी राजकीय की आधी सामाजिक', या प्रश्नावर आधी राजकीय हे उत्तर दिले. इतिहासामध्ये तेच उत्तर परिणामकारक ठरले. लो. टिळक म्हणत, की सामाजिक प्रश्नांना महत्त्व दिल्यास राजकीय आघाडी मजबूत राहणार नाही, कारण प्रत्येक जातीत तथाकथित पवित्र जात्यभिमानाने भरलेल्यांची संख्या प्रचंड आहे. म्हणून प्रत्येक जातीत सुधारक व रूढिनिष्ठ असे तट पडतील आणि त्यामुळे राजकीय आघाडी भक्कम राहणार नाही. आज जी राजकीय परिस्थिती दिसते त्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता, अस्पृश्यता निवारण, दलितोद्धार, सर्वधर्मसमानता, मानवी मूलभूत हक्क, मानवी समानता इ. मूल्ये ही भाषिक अलंकार म्हणून फार मोठ्या प्रमाणात मिरवली जातात; परंतु प्रत्यक्ष राजकारण हे जाती जमातींच्याच अहंकाराने खेळले जाते. बंधक प्रतिगामी व्यक्ती येथील हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख, दलित इत्यादी धार्मिक समाजांच्या राजकीय व सामाजिक वर्तनात प्रकट होत असते. सर्व नागरिकांचे समान आर्थिक हितसंबंध निर्माण करणाऱ्या मोचक शक्ती या विशिष्ट सुसंबद्ध जातपातधर्माच्या बंधनापलीकडे जाणारा कार्यक्रम घेऊन बंधक शक्तीशी लढू लागल्या तरच सामाजिक क्रांती ही गतिमान होईल. सामाजिक क्रांतीच्या दिशेने मोचक शक्ती गतिमान होण्याकरता वरील प्रकारचा कार्यक्रम स्वीकारला पाहिजे. आज बंधक शक्तीचे उग्र आव्हान मोचक शक्तीपुढे उभे राहिले आहे. या विग्रहात मोचक शक्तींचा पराभव झाला तर मात्र तो शोकांतिकाच ठरेल. आजची परिस्थिती कठीण आहे; परंतु त्यात शोकांतिका खास नाही. लढा उग्र झाला आहे, यात मात्र शंका नाही.

(पूर्वा, दिवाळी अंक, १९८०, पृ. ६९ ते ९८)

○○○

१८

महाराष्ट्राची नवी अस्मिता

प्रस्तावना

१९४७ साली आपला देश स्वातंत्र झाला. स्वातंत्र्य-संपादन केले म्हणजे सारे झाले असे मानण्याची चूक विचारी माणूस करणार नाही. कारण इतरही प्रश्न होते. प्रार्थना समाजाने धर्मसुधारणेचे स्वप्न पाहिले होते. फुले, आगरकरप्रभृतींनी समाजसुधारणेसंबंधी काही मौलिक सांगितले होते. रानडे, गोखले, टिळक, गांधी यांनी विशुद्ध राष्ट्रवादाचा पुरस्कार केला होता.

स्वराज्यप्राप्तीनंतर आता तीन दशकांहून अधिक काळ लोटला. काही प्रगतीची म्हणून वाटचाल झाली. परंतु करावे असे अजून फार आहे. महाराष्ट्रापुरते सांगायचे झाले तर असे दिसून येते की, दलित व सवर्ण यांचा प्रश्न आहे. नामांतराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात झालेली दंगल व नंतर निघालेला लाँगमार्च आठवणीत ताजाच आहे. आजही पुरुष–वर्चस्वापासून स्त्री मुक्त नाही. शेतकऱ्यांनी मालाला न्याय्य भाव मिळावे म्हणून नुकतेच मोठे आंदोलन केले होते. शिक्षणाचा प्रसार झाला, परंतु फक्त प्रसारच झाला. सुशिक्षितांजवळही खरी विज्ञाननिष्ठा नाही.

थोडक्यात सांगायचे म्हणजे आजच्या तरुणांसमोर साऱ्या समाजाच्या प्रबोधनाचा प्रश्न आहे. तरुणांजवळ शक्ती असते. उत्साह असतो. त्यांना योग्य दिशा दाखविण्याची गरज आहे. ह्या शक्तीची उत्साहाची स्पंदने जाणवतात. त्यातून महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रत्ययही येतो. तरुणांनी महाराष्ट्राचे प्रश्न समजून घेतले नाहीत तर, येत्या दोन दशकांतील आव्हानांना ते समर्थपणे सामोरे जाऊ शकणार नाहीत. या दृष्टीने महाराष्ट्रातील काही विचारवंतांनी कथन केलेले विचार :

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

आपल्याकडील वर्णव्यवस्था धार्मिक तत्त्वज्ञानावर अधिष्ठित आहे. ब्रह्मदेवाच्या उत्तमांगातून ब्राह्मण, बाहूतून क्षत्रिय, उरुप्रदेशातून वैश्य व पदातून शूद्र जन्मले, ही आहे धार्मिक उपपत्ती. स्त्री ही पुरुषांच्या सेवेकरता आणि शूद्र हे त्रैवर्णिकांच्या सेवेकरता जन्मले असे हिंदू धर्म सांगतो.

दलितांचे प्रश्न, शोषितांचे प्रश्न हे सामाजिक आणि ज्वलंत असे प्रश्न आहेत. हे प्रश्न परंपरागत, आर्थिक व्यवस्थेतून निर्माण झालेले आहेत. स्पृश्य वर्गातील लोकांना स्वस्तात स्वस्त मजूर मिळावा म्हणून अस्पृश्य वर्ग समाजात कायम राहिला, स्पृश्यांचे धंदे अस्पृश्यांनी करू नयेत, अशी बंदी घातली व ही बंदी पक्की करण्याकरता स्पृश्यवस्तीमध्ये अस्पृश्यांच्या वस्त्या निर्माण होणार नाहीत, अशी धर्माच्याद्वारे निर्बंधांची रचना केली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय : खंड - ९ / ११४

दलितवर्ग मुक्त व्हायचा असेल तर दलितवर्ग हा सवर्णांचे सगळे व्यवसाय करण्यास समर्थ व्हावयास पाहिजे. सवर्णांच्या वस्तीमध्ये अस्पृश्य वर्गीय डॉक्टर दवाखाना घालून वैद्यक व्यवसाय मांडू शकत नाही, असे आजचे चित्र आहे. हल्ली कायद्याने निर्बंध उठले आहेत. परंतु सामाजिक परिस्थिती निर्बंधात्मकच आहे. म्हणून राखीव जागा दिल्या पाहिजेत. अशा जागा ठेवल्याने शासन करील तेथे दलित-वर्गातील सरकारी कर्मचाऱ्याची नेमणूक होईल. दलितांना उच्च उद्योगाकडे आकृष्ट करील अशी आज सामाजिक परिस्थिती नाही. राखीव जागांच्या योगाने स्पर्धेचे क्षेत्र मर्यादित होते. म्हणजे दलितापुरतेच ते राहते. स्पर्धेच्या क्षेत्रामध्ये असलेला सवर्ण विद्यार्थी व राखीव जागेमध्ये निवडून आलेला दलित ह्यांच्यामध्ये गुणात्मकदृष्ट्या फार अल्प तफावत असते. ही अल्प तफावत म्हणजे पक्षपात होय, असे सवर्णांना वाटू लागले आहे. अशा वेळी स्पृश्य समाज आपल्या वस्तीमध्ये अस्पृश्य वर्गाची वस्ती समाविष्ट करीत नाही, ह्या गोष्टीकडे पूर्ण दुर्लक्ष करतो. त्यामुळे पक्षपाताला अन्यायाचा रंग भरतो.

सवर्णांची ही आत्मवंचना आहे व त्यात त्यांचा नागडा स्वार्थ आहे.

स्त्री मुक्ती : आपल्या समाजात स्त्रीपुरुष मिसळत नाहीत. म्हणून त्यांचे सामाजिक जीवन कुटुंबाबाहेर वेगवेगळे असते. ह्याचा परिणाम असा होतो की, आपल्या समाजातील स्त्रीला लग्नाच्याबाबतीत निवडीचे व्यापक क्षेत्र लाभत नाही. घरात लग्नाची मुलगी असली की हुंडापद्धती अयोग्य आहे असे बोलले जाते व लग्नाचा मुलगा असला की ती पद्धती योग्य आहे, अशी भूमिका घेतली जाते- ही चिंतेची, आत्मसंशोधनाची व आत्मटीकेची बाब आहे. हुंड्याचा प्रश्न कायद्याने सुटणार नाही. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे, की तिच्या आईवडिलांनी त्यांची शक्ती पणाला लावावी व हुंडा देऊन चांगले स्थळ मिळवून द्यावे अशी सुशिक्षित तरुण स्त्रीचीसुद्धा इच्छा असते. स्त्री व पुरुष ह्यांच्यामध्ये एक पाशवी शक्ती सोडल्यास काही एक फरक नाही असे जैवविज्ञानदृष्ट्या तपासले असता दिसून येते. स्त्रीला एक व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा लाभली पाहिजे.

समाजप्रबोधन : आपल्याकडे बुद्धीवादी दृष्टीकोन नाही. त्या दृष्टिकोनाच्या अभावी चमत्कार करणारे, दैवीशक्ती असल्याचा दावा करणारे साधु व साध्वी यांचे समाजात प्रस्थ माजलेले दिसते. साधु रोग बरे करतात अशी श्रद्धा अशिक्षित व सुशिक्षित वर्गात दिसून येते. परंतु गेल्या १५० वर्षातील ज्ञात इतिहासाची साक्ष अशी आहे की साधु व बुवा हे स्वत:च रोगराईला बळी पडले होते. रोगराई बरी करणारे साधु हा एक लोकभ्रम आहे. तरुणांनी बुद्धीवन्दी दृष्टीकोन स्वीकारला तरच समाज-प्रबोधनाचे कार्य होऊ शकेल. साधूंच्या या अेकाच उदाहरणाच्या बाबतीत असे सांगता येईल की डोक्याला टक्कल पडणे, डोळ्यांना चष्मा लागणे, कान बहिरे होणे, दात पडणे टेकायाकरता हातात काठी घ्यावी लागणे हे साधूंच्या बाबतीतसुद्धा घडते हे लोकांना नीट समजावून सांगितले पाहिजे. चिकित्सा, बुद्धीवादी दृष्टिकोन व विज्ञान निष्ठा ह्यांचा अंगिकार केल्याशिवाय खऱ्या अर्थाने समाज-प्रबोधनहोणार नाही.

(किर्लोस्कर, हीरक महोत्सवी वर्ष विशेषांक, ऑगस्ट, १९८१)

○○○

१९

विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि महात्मा जोतिबा फुले

(प्रतिक्रिया)

राष्ट्रवादाची मूलगामी संकल्पना व विष्णुशास्त्र्यांचा राष्ट्रवाद

श्री. द. न. गोखले यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि जोतीराव फुले यांच्यातील वादाचा म्हणजे एकंदरीत महाराष्ट्रातील व भारतातील परंपराभिमानी देशभक्त आणि परंपरेमध्ये मूलगामी सुधारणांचा पुरस्कार करणारे धर्मसुधारक वा समाज सुधारक यांच्यातील वादाचा नीट उलगडा व्हावा म्हणून विष्णुशास्त्री यांच्या 'देशोन्नती' या लेखातील उद्धरण या लेखात दिले आहे. त्यास त्यांनी विष्णुशास्त्र्यांच्या सर्व प्रयत्नांचे आदिरहस्य म्हणून निर्दिष्ट केले आहे- ''देशाच्या उत्तम स्थितीचे पहिले लक्षण देशाभिमान होय. ...घन पदार्थात जसे दाढर्य आढळते, म्हणजे त्यातील परमाणू अगदी परस्परसंलग्न असतात, त्याप्रमाणे राष्ट्राराष्ट्रांतील लोकसमुदाय... अभिमानाच्या योगाने जितका एकत्र जखडला गेला असेल तितकी त्याची उन्नतावस्था समजली पाहिजे.'' या उद्धरणापुढे श्री. द. न. गोखले म्हणतात- ''म्हणजे त्यांना सर्वप्रथम देशाभिमान हवा होता आणि त्या अभिमानातून देशाचे दाढर्य वाढायला पाहिजे होते.''

येथे देशाभिमान म्हणजे राष्ट्राभिमान असा अर्थ विष्णुशास्त्री यांना अभिप्रेत आहे. देश म्हणजे केवळ विशिष्ट भौगोलिक मर्यादेतील प्रदेश नव्हे. विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील लोकसमुदाय समान हितसंबंधाच्या जाणिवेतून उत्पन्न झालेल्या अभिमानामुळे मनाने एकत्र जखडले जातात. म्हणजे एक प्रकारची मानसिक एकात्मता उत्पन्न होते. राजा राममोहन रॉय, फुले, महादेव गोविंद रानडे, आगरकर इत्यादी सगळे धर्म सुधारक किंवा समाजसुधारक असा अभिमान भारतीय जनतेत उत्पन्न व्हावा म्हणून परस्परविरोधी ऐहिक हितसंबंध वा धार्मिक हितसंबंध निर्माण करण्याकरिता प्रयत्नशील होते. एकात्म भावनेला अत्यंत बाधक असलेली वास्तव सामाजिक स्थिती किंवा बाधक सामाजिक संबंध बदलल्याशिवाय खराखुरा राष्ट्राभिमान किंवा देशाभिमान निर्माण होऊ शकत नसतो. सर्वप्रथम देशाभिमान

नव्हे, सर्वप्रथम देशातील सर्व जातिजमातींचे म्हणजे नागरिकांचे हितसंबंध परस्परपोषक व परस्परांच्या आत्मोन्नतीस संपूर्णपणे उपकारक असावे लागतात. असे परस्पर उपकारक नागरिकांचे सामाजिक हितसंबंध वस्तुत: समाजरचनेत दृढमूल झाले असले म्हणजे तेथे राष्ट्र म्हणून एक सामाजिक– राजकीय संघटना अस्तित्वात येते. अशी वरच्या दर्जाची राष्ट्रनामक संघटना भारतात अस्तित्वातच नव्हती, म्हणून भारत वारंवार परकीय आक्रमणाखाली पराभूत झाला. राजकीयदृष्ट्या परतंत्र झाला. अशी ही पारतंत्र्याची मीमांसा विष्णुशास्त्र्यांनी ध्यानात घेतली नाही. त्यामुळे त्यांच्या प्रखर देशाभिमानाच्या मुळाशी देशाभिमानाचे आदिरहस्यच अस्पष्ट राहिले. त्याचे जुजबी आकलन केले गेले. राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद, आगरकर, न्या. रानडे इत्यादिकांना हे देशाभिमानाचे वा राष्ट्राभिमानाचे आदिरहस्य म्हणजे राष्ट्रीयत्वाचे जीवनतत्त्व याचा जसा साक्षात्कार झाला होता, तसा साक्षात्कार चिपळूणकरांना झाला नव्हता. फुले यांच्या 'गुलामगिरी' या निबंधात [समग्र वाङ्मय, पृ. १३५ आणि पृ. ४०७, त्याचप्रमाणे 'सार्वजनिक सत्य धर्म' पुस्तक, समग्र वाङ्मय, पृ. ४०७] फुले विचारतात की, देशाभिमानाचा पुरस्कार करणाऱ्यांना आमचा असा सवाल आहे की, ज्या ठिकाणी ज्या देशात सगळे नागरिक स्वतंत्र नाहीत, बहुजनसमाज धार्मिकदृष्ट्या अपवित्र आणि काही वरिष्ठच पवित्र अशा तऱ्हेचा अनेक प्रकारे व्यक्त होणारा सामाजिक उच्चनीच भेदभाव आहे तेथे "Nation" असते काय?

भारत हे एक राष्ट्र आहे. ही जाणीव भारतामध्ये इंग्रजी राज्य संपूर्णपणे स्थिरस्थावर झाल्यावरच निर्माण झाली. इंग्रजांच्या भारतविजयापूर्वी भारत हे एक राष्ट्र आहे, अशी जाणीव कधीही नव्हती. राष्ट्रवादाचा राज्यशास्त्रात व सामाजिक शास्त्रात जो अलीकडे ऐतिहासिक परामर्श घेतला जातो, त्यानुसार राष्ट्र ही राजकीय संकल्पनात मुळी अठराव्या शतकात जगात उत्पन्न झाली. अठराव्या एकोणिसाव्या शतकात युरोपात व अमेरिकेत राष्ट्र-राज्ये (Nations States) निर्माण झाली. ती बहुतेक लहानसे अपवाद सोडल्यास समान-भाषिक प्रदेश राज्ये म्हणून अस्तित्वात आली. उदा. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इटली, अमेरिकेतील संयुक्त संस्थाने इत्यादी. युरोपातील एकेका राष्ट्राएवढे भारतातील भाषिक प्रदेश आहेत. येथेही अठराव्या एकोणिसाव्या शतकात देशाभिमानाचा प्रखर उदय झाला असता, तर येथेही भाषिक प्रदेश हीच राष्ट्रे म्हणून स्थापन झाली असती. परंतु येथे ब्रिटिशांपूर्वी राजकीय अस्थिरता होती. शेकडो लहानमोठी राज्ये होती. भाषिक संस्कृतीच्या अधिष्ठानावर प्रादेशिक एकराज्यस्थापनेची स्फूर्ती सामाजिक नेत्यांना लाभली नव्हती.

या देशामध्ये भारत हे एक राष्ट्र आहे अशी तेव्हाची व्यापक राष्ट्रजीवनाची भावना सार्वत्रिक इंग्रजी पारतंत्र्याच्या दृढ संदर्भात निर्माण झाली. महादेव गोविंद रानडे यांच्यासारख्या महान चिंतनशील द्रष्ट्याच्या लक्षात आले, की इंग्रजी पारतंत्र्य हा जसा शाप आहे तसे ते वरदानही आहे. एका आधुनिक, विकसित संस्कृतीने संपन्न अशा परकीय राजकीय शक्तीचा

संबंध निर्माण झाल्यामुळे भारत आधुनिक, पुढारले राज्य निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली. ह्या भविष्याचे ह्या देशातील एकमेव द्रष्टे म्हणजे महादेव गोविंद रानडे होत. हिंदुत्व शतकानुशतके दुबळे राहिले, म्हणून भारत पारतंत्र्यात वारंवार सापडला. याचे प्रकट दर्शन महर्षी स्वामी दयानंदांना झाले, म्हणून त्यांनी जन्मजात जातिभेद व मूर्तिपूजा ह्यांसारख्या दौर्बल्यकारक परंपरांना मूठमाती देणारा विश्वव्यापी महत्त्वाकांक्षेचा आर्यधर्म उपदेशिला. अशा तऱ्हेचे दयानंद हजार वर्षांपूर्वी या देशात उत्पन्न झाले असते, तर हा देश परतंत्र झाला नसता. एवढेच नव्हे, तर जगातील एक थोर राष्ट्र म्हणून तळपत राहिला असता. दयानंदांची निंदा करणाऱ्या विष्णुशास्त्र्यांना परंपरागत हिंदुत्वाची दौर्बल्यकारक स्थानेच लक्षात आली नव्हती. म्हणून एकंदरीत ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की विष्णुशास्त्र्यांना देशाचा जसा कळवळा व अभिमान होता, तसाच उत्कट कळवळा फुले इ. समाज सुधारकांना व धर्मसुधारकांनाही होता. त्याकरिता त्यांनीही अग्निदिव्याची प्रतिज्ञा केली होती. त्यांनीही महान त्याग केला होता, ही गोष्ट आम्ही द. न. गोखले यांच्या लेखाच्या वाचकगणांपुढे मांडीत आहोत. द. न. गोखले यांनी व्यासंगपूर्वक लेख लिहून हे मांडण्याची संधी दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहेत.

यासंदर्भात विष्णुशास्त्री चिपळूणकर पुण्यतिथी शताब्दीनिमित्त 'नवभारत' मासिकाच्या विशेषांक येत्या आक्टोबरमध्ये प्राज्ञपाठशाळा मंडळातर्फे प्रसिद्ध होईल. त्यात यासंबंधी विशेष सविस्तर, सर्वांगीण, परामर्श विविध साहित्यिक व राज्यशास्त्रज्ञ यांच्या लेखांमधून प्रसिद्ध होईलच.

(महाराष्ट्र साहित्य पत्रिका; एप्रिल- मे- जून-१९८२, अंक २२१, पृ. १५ ते ३८)

ooo

२०

भारताचे महासंघाद्वारा पुनर्एकीकरण

भूमिका

२ जून, १९४७ ला देशाच्या विभाजनाची घोषणा करण्यात आली. फाळणीमुळे दंगे थांबतील, या आशेने देशाने फाळणीचा स्वीकार केला.

काँग्रेस कार्यकारिणीची बैठक फाळणीच्या योजनेवर निर्णय घेण्यासाठी भरली, तर असे आढळून आले की गांधीजींचा सल्ला न घेताच नेहरू पटेलांनी फाळणीच्या ठरावाला अनुमती दिली होती. कार्यकारिणीच्या बैठकीत निमंत्रिक म्हणून उपस्थित असलेले जयप्रकाश नारायण आणि बॅ. राममनोहर लोहिया यांच्याशिवाय फक्त सरहद्द गांधी, अब्दुल गफार खान आणि खुद्द महात्मा गांधीजीच या योजनेच्या विरूद्ध होते. गांधीजींनी अशी सूचना मांडली की कार्यकारिणीच्या ठरावात फाळणीच्या योजनेचा स्वीकार करताना त्याच्याबरोबर असेही नमूद करावे की इंग्रजांनी प्रथम चालते व्हावे, मग हिंदुस्थानचे लोक स्वत:च विभाजन करतील. गांधीजींची ही सूचना मान्य झाली नाही. पण गांधीजींनी पाठिंबा दिल्यावर लोहियांची एक उपसूचना स्वीकारण्यात आली. ती अशी की, ''निसर्गाने भारताचा जो नकाशा घडवला आहे, तो सतत आमच्या हृदयाच राहील.''

काँग्रेस महासमितीच्या बैठकीत गांधीजींनी फाळणीला त्वरित विरोध करूनही कार्यसमितीचा फाळणीला मंजुरी देण्याचा ठराव स्वीकारण्याचे सर्व सदस्यांना आवाहन केले. फक्त पुरुषोत्तमदास टंडन यांनी फाळणीच्या ठरावाला विरोध केला. समाजवादी तटस्थ राहिले. नंतर लोहिया, जयप्रकाश, नरेंद्र देव यांनी पत्रक काढून खुलासा केला की समाजवादी देशापुढे दुसरा कोणताही पर्याय ठेवू शकत नव्हते. म्हणून ते तटस्थ राहिले.

हिंदू आणि मुसलमान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत. त्यांचे एक राष्ट्र होणे शक्य नाही. या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताच्या आधारावर बॅ. जीनांच्या मुस्लीम लीगने पाकिस्तानची मागणी केली. तेव्हापासून देशाच्या फाळणीबद्दल चर्चा चालू आहे. आणि प्रत्यक्षात फाळणी होऊन

दोन राष्ट्रे अस्तित्वात आली तरी फाळणीसंबंधी उलटसुलट चर्चा होतेच आहे. फरक इतकाच की फाळणीपूर्वी फाळणीविरोधकांकडे फाळणीच्या अनिष्टतेबद्दल एकमत होते. पण प्रत्यक्षात फाळणी झाल्यानंतर जवळजवळ सर्वच फाळणीविरोधकांनी फाळणीचा स्वीकार केलेला दिसतो.

त्याला काही अपवाद आहेत. लोकनायक जयप्रकाश आणि डॉ. लोहिया या दोघांनीही फाळणीचा स्वीकार केला नव्हता. फाळणीने तोडलेला देश, तोडलेली माणसे, तोडलेली मने पुन्हा जोडली जावीत अशी दोघांचीही इच्छा होती. जयप्रकाशांनी पाकिस्तानी मैत्री संघाची कल्पना काढली तर डॉ. लोहियांनी हिंदुस्थान-भारत महासंघ स्थापन करावा अशी संकल्पना मांडली. दोन्ही देशांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित राखून विदेशनीती, आर्थिक विकास, अल्पसंख्यांचे संरक्षण अशा मर्यादित अधिकारांचा हा महासंघ हे एक प्रकारे स्वप्न वाटते.

स्वप्न! ज्यांना देशाच्या महान भवितव्याची स्वप्ने पाहता येतात, तेच लोक देश बनवू शकतात. आज जे अशक्य वाटते ते शक्यतेच्या कोटीत आणण्यातच राजनीतीची चतुरता असते, शक्ती असते. दूरदृष्टीने काही निश्चित उद्देशांकडे निश्चयपूर्वक वाटचाल करावी लागते, असा दूरगामी उद्देश म्हणून महासंघाचा विचार करता येईल काय?

- हा वादग्रस्त प्रश्न आम्ही काही विद्वानांना चर्चेसाठी दिला होता. निदान या प्रश्नाचा विचार व्हावा, विचाराला चालना मिळण्याचे कार्य या परिसंवादाने होऊ शकले तर त्यात समाधान आहे. **- संपादक**

❍❍❍

महासंघ : अनिष्ट व अशक्य

भारत आणि पाकिस्तान अशी भारतीय उपखंडाची फाळणी किंवा राष्ट्रनिर्मिती १९४७ साली झाली. त्यानंतर पाकिस्तान आणि बांगला देश अशी फाळणी होऊन ती दोन राष्ट्रे जन्माला आली. राजकीय दृष्ट्या भारतीय उपखंडामध्ये आजज तीन राष्ट्रे अस्तित्वात आहेत. पाकिस्तान आणि भारत या दोन राष्ट्रांचे संबंध पहिल्या फाळणीपासूनच विरोधाचे आणि दबलेल्या वैराचे आहेत. स्वातंत्र्यानंतर भारताची राजकीय संस्कृती अगदी वेगळी झाली आहे. अलीकडे अनाक्रमणाच्या तहाची मागणी पाकिस्तान वारंवार करू लागला आहे. परंतु पाकिस्तानमध्ये स्वातंत्र्योत्तर काळी संसदीय लोकशाही स्थिरावूच शकली नाही. तीच गोष्ट बांगला देशाची. लष्करी हुकूमशाहीचाच अंमल या दोन्ही देशांमध्ये दृढमूल होऊ पहात आहे. दोन्ही देशांमध्ये विरोधी राजकीय लष्करी दबावाखाली जीवन जगावे लागत आहे. नागरिकांना नागरिक हक्कांपासून वंचित केले आहे. राज्याचे आणि कायद्याचे पूर्ण इस्लामीकरण हे तेथील राजकीय सत्तांचे मुख्य उद्दिष्ट आहे. अशा स्थितीत पाकिस्तान आणि बांगला देश हे भारताच्या राष्ट्रीय जीवनाच्या मूलभूत तत्त्वाशी पूर्णपणे विरुद्ध अशा दिशेने संघटित होत आहेत. त्यामुळे भारताशी कोणत्याही प्रकारचे सुसंवादी असे राजकारण

इस्लामीकरणाकडे आणि हुकूमशाहीकडे पूर्णपणे झुकलेल्या या देशांमध्ये नजीकच्या काळात निर्माण होऊ शकेल याची आशाही दुरापास्त झाली आहे.

राजकीयदृष्ट्या अखंड भारत हे स्वप्न पाहणारे, त्याकरिता वाटेल तो किंमत द्यावी असे म्हणणारे हिंदुत्ववादी भारतात सर्वत्र आढळतात. भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचा राजकीयदृष्ट्या स्वतंत्र अखंड भारत हाच आदर्श होता. परंतु हा आदर्श मुसलमानेनंतर भारतीय लोकांनीच आपल्या मनासमोर ठेवला होता. इंडियन नॅशनल काँग्रेसने हा आदर्श अखेरच्या क्षणापर्यंत म्हणजे फाळणीच्या क्षणापर्यंत हृदयाशी सतत बाळगला होता. परंतु मुसलमानधर्मीय बहुजन समाजाच्या नेत्यांनी या आदर्शकडे कायम पाठ फिरविली होती. जे मुस्लीम नेते काँग्रेसच्या आंदोलनामध्ये सामील झाले, त्यातीलही फार थोडे या आदर्शाला प्रमाणभूत मानणारे होते.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली १९१७-१९४७ वर्ष काँग्रेसने मोठ्या देशव्यापी चळवळी केल्या. त्यात हिंदु मुस्लीम ऐक्य हा महत्त्वाचा असा कार्यक्रम स्वीकारला तरी पाकिस्तानची मागणी वाढत गेली. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतच्या या भारत उपखंडामधील सर्व मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात पाकिस्तानचीच मागणी करत होता; त्याकरिता मोर्चे काढून ललकाऱ्या देत होता. त्यामुळे फाळणीच्या कालखंडात भयानक रक्तपाती यादवी माजली. लक्षावधी हिंदु-मुस्लीम स्त्री-पुरुषांच्या कत्तली झाल्या. सिंध, प. पंजाब, सरहद्द प्रांत, बलुचिस्तान आणि पूर्व बंगाल या प्रदेशांतील हिंदूंचे जीवित आणि वित्त कायम धोक्यात सापडले. तात्पर्य काँग्रेसचा हिंदु-मुस्लीम ऐक्याचा कार्यक्रम निष्फळ ठरला. याची खोलात जाऊन मीमांसा स्वातंत्र्योत्तर काळात अनेक राजकीय तत्त्वचिंतकांनी केलेली आहे.

त्यातील मीमांसेचे एक सूत्र असे की, हिंदूंमध्ये राजा राम मोहन रॉयांपासून म. गांधींपर्यंत जे समाजसुधारक आणि धर्मसुधारक झाले, त्यांनी परंपरागत रूढींना आणि धर्मग्रंथांच्या प्रामाण्याला आव्हान दिले. हिंदू धर्मातील आणि हिंदू संस्कृतीतील जीवनमूल्यांची आणि सामाजिक रचनेच्या तत्त्वांची मूलगामी समीक्षा सुरू केली आणि धार्मिक आणि सामाजिक सुधारणेचे आणि ऐहिक मानवी जीवनमूल्यांचे महत्त्व स्थापित केले. प्रबोधन निर्माण केले. याच्या उलट अशी सामाजिक आणि धार्मिक मूलगामी प्रबोधन करणारी विचारवंतांची आणि धर्मसुधारकांची युग निर्मिती भारतीय मुसलमानांमध्ये होऊ शकली नाही. पवित्र धर्मग्रंथाचे प्रामाण्य झुगारून देणारे शेकडो धर्मसुधारक व समाजसुधारक गेल्या २०० वर्षांत हिंदू समाजात निर्माण झाले. तसा पवित्र धर्मग्रंथांच्या प्रामाण्याला आव्हान देणाऱ्या किंवा देशकाल परिस्थितीला अनुरूप असा धर्मग्रंथाचा नवा अर्थ सांगणारा मुसलमानांस मान्य एकही ख्यातनाम धर्मज्ञ भाष्यकार भारतीय मुसलमानांत निर्माण होऊ शकला नाही. अनेक हिंदू सुधारकांवर प्रथम सामाजिक बहिष्कार पडला; कित्येकांनी तर जन्मभर त्या बहिष्काराच्या उपेक्षेमध्ये जीवन कंठले, परंतु आता त्यांना थोर प्रबोधनकार म्हणून हिंदूंनी

स्वीकारले. असा प्रबोधनाचा प्रभावी प्रयत्न भारतीय मुसलमानांत झाला नाही, तसा इतरही मुस्लीम राष्ट्रांमध्ये फारसा झालेला इतिहासकार नमूद करीत नाहीत. त्यामुळे इस्लामी राष्ट्रांमध्ये परंपरावादाला (फंडामेंटॅलिझमला) अलीकडे अधिक महत्त्व आले आहे.

भारत हा लोकशाही व इहवादी राजकारणाच्या द्वारे धर्मनिरपेक्ष, समताप्रधान समाज निर्माण करण्याकरता उद्युक्त झाला आहे. मूलभूत आदर्श असलेल्या मानवी मूल्यांच्या प्रकाशामध्येच असे सामाजिक परिवर्तन घडू शकते आणि ते घडू लागले आहे. याच्या उलट पाकिस्तानात आणि बांगला देशामध्ये राजकीय व सामाजिक विचारप्रवाह वेगाने वाहात आहेत. धर्मनिरपेक्ष इहवादी बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणीचा विशेष पुरस्कार भारतात होऊ लागला आहे. तसा तेथे होत नाही म्हणून भारतामधील आणि पाकिस्तान व बांगला देश यांच्यातील सामाजिक व राजकीय ध्येयवादी प्रेरणा अगदी परस्परविरुद आहेत. अशा स्थितीत राजकीयदृष्ट्या या तिन्ही देशांचे राजकारण परस्पर सुसंगत रीतीने चालू लागायलाच अनेक युगे जावी लागतील. राजकीय एकात्मता तर पूर्ण अशक्य. लोकशाही जीवनपद्धती व संसदीय लोकशाहीचे राजकारण या दोन तत्त्वांना पाकिस्तान आणि बांगला देश यामध्ये निर्वेध आणि निःशंक स्वीकार व्हायलाही अनेक युगे निघून जातील. म्हणून या भारतीय उपखंडाच्या राजकीय एकात्मतेची कल्पनासुद्धा करवत नाही.

भारताची फाळणी झाली तेव्हा अखंड भारतराष्ट्राचा आदर्श दुरावला म्हणून व्यथित झालेली जी मने होती आणि अजून आहेत त्यांनी आता त्या व्यथेतून बाहेर पडावे; कारण भारताला इहवादी लोकशाही जीवनपद्धती हीच सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशात स्थिरावयाचे आहे. म्हणून पाकिस्तान आणि बांगला देश हे राजकीयदृष्ट्या वेगळे झाले व मनाने दूर गेले, हे फार चांगले झाले. कारण फाळणी झाली नसती तर पाकिस्तानी आणि बांगला देशी मुस्लीम समाजात लोकशाही जीवनमूल्ये आणि धर्मनिरपेक्षता यांचे स्वागतच होऊ शकले नसते. त्यामुळे हिंदू व मुस्लीम समाजात भयानक अस्वास्थ्य व तज्जन्य लढे वारंवार उद्भवले असते. मारामाऱ्या, जाळपोळ यांचा कहर माजला असता. शांत राजकीय जीवन न लाभल्यामुळे आर्थिक सामाजिक परिवर्तनाला योग्य अशी परिस्थिती लाभली नसती, ती दुरावली असती. फार बरे झाले, भारताची फाळणी झाली.

(पूर्वा, दिवाळी अंक, १९८५. पृ.४४ ते ४६)

ooo

क)

व्यक्तिलेख

*

राजकारण

*

२१

जागतिक कीर्तीचे पहिले हिंदी क्रांतिकारक : कॉम्रेड मानवेंद्रनाथ रॉय

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या साहसपूर्ण व चमत्कृतिजनक जीवनाचा परिचय मी वाचकांस करून देणार नाही. खरे पाहता त्यांच्या चरित्राचा बराच भाग अद्याप अज्ञात आहे. त्यांचा व माझा चांगला परिचय आहे. आणि ही विशाल व्यक्ती कोण आहे, कशी आहे, हिचे भूतकालीन व वर्तमानकालीन खाजगी व सार्वजनिक जीवन कसे आहे, याचा शोध करण्याचा बराच प्रयत्नही मी केला आहे. तथापि त्यांची समग्र जीवनकथा मला अजून कळली नाही. त्यांना आत्मकथनाचा स्वाभाविकच कंटाळा आहे. त्यांचे कर्तृत्व विविध क्षेत्रांत, जगाच्या अत्यंत दूरदूरच्या प्रदेशांत गाजलेले आहे. त्यांचा अनुभव जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पसरलेल्या निरनिराळ्या मानवसमाजांच्या स्थितिगतींच्या वैचित्र्यपूर्ण माहितीने भरलेला आहे. त्यांचे चरित्र लिहिणे हे एक अवघड काम आहे. चरित्रकारास चरित्र नायकाचे कार्यक्षेत्र प्रत्यक्ष अवलोकावे लागते. रॉय यांच्या चरित्राचे कार्यक्षेत्र चीनपासून मेक्सिकोपर्यंत व हिंदुस्थानपासून स्पेनपर्यंत पसरलेले आहे. त्यांनी अमेरिका, मेक्सिको, स्पेन, रशिया, जर्मनी, चीन व हिंदुस्थान येथील क्रांतीच्या चळवळीत वैचारिक नेता व क्रियावान सूत्रधार या नात्याने भाग घेतला, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. त्यांचे एक त्रोटक चरित्र इंग्रजीत प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या नातलगांना त्यांच्या वयाच्या चौदाव्या वर्षानंतरची काहीएक माहिती नाही; कारण तेव्हापासूनच त्यांनी आपल्या घरास देशसेवेसाठी रामराम ठोकला. १९०७ खाली, अवघ्या चौदाव्या वर्षीच, क्रांतीच्या लढ्याचे ते शिपाई बनले. बंगालमध्ये ज्या वेळी क्रांतीच्या चळवळीचा जन्म झाला, तेव्हाच रॉय यांच्या सार्वजनिक जीवनास प्रारंभ झाला.

क्रांतीचा मोठा कट

क्रांतीची चळवळ हीच त्यांच्या शिक्षणाची शाळा झाली. गेल्या महायुद्धाचे वेळी हिंदुस्थानात ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्याकरिता झालेल्या सगळ्यांत मोठ्या कटाचे ते नेते होते. हे हिंदुस्थान सरकारने १९१८ साली प्रसिद्ध केलेल्या रौलेट कमेटीच्या राजद्रोह वृत्तांतावरून कळते. बंगालमध्ये अगदी प्रथम दोन क्रांतिकारक संस्था अस्तित्वात

वाय १८१-१८

आल्याः- युगांतर व अनुशीलन. रॉय हे अनुशीलनचे संस्थापक. त्या वेळचे रॉय यांचे कित्येक सहकारी आता पुढे निघून गेले आहेत. खुदिराम बोस, भगतसिंग इत्यादी भारताचे त्यागी पुत्र ज्या पवित्र मार्गाने निघून गेले, त्याच मार्गाने ते सहकारी पुढे गेले. रॉय हे त्याच मार्गाचे पाईक होते. मोठ्या शिताफीने ब्रिटिश सत्तेच्या अहोरात्र जागत्या कडक पहाऱ्यांतून ते निसटले व जगाचे मुशाफिर बनले. तसे झाले नसते, तर त्यांचे केवळ पावन नामच हिंदी जनतेने ऐकले असते.

विस्मयजनक विद्याव्यासंग

विश्वविद्यालयीन शिक्षणाचा त्यांना लाभ झाला नाही. पण विश्व हेच त्यांचे विद्यालय बनले. सगळे आयुष्य युरोपियन विश्वविद्यालयांत, अध्यापनांत व संशोधनांत ज्यांनी घालविले, अशा पाश्चात्त्य देशांतील महान पंडिताइतके ते विद्वान आहेत. हिंदी राजकारणाचे क्षेत्रांत न्या. रानडे यांच्यानंतर रॉयइतका कोणीही विद्वान पुढारी झाला नाही. पण रॉय यांच्या विद्याव्यासंगाचा इतिहास, सापडत नाही. कारण इतक्या विद्याव्यासंगास लागणारी फुरसत त्यांना कशी मिळाली हे सांगता येत नाहीं; कारण १९१४ सालापासून तो तहत १९३१ सालापर्यंतचा त्यांचा सगळा काळ देशो-देशी प्रवास, राजकीय चळवळी, उलाढाल्या, लढाया व क्रांत्या यांच्यातच गेलेला दिसतो. पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, हिंदी तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास, राजनीती, अर्थशास्त्र व गणित या विषयांत त्यांच्याइतकी पारंगतता एका विषयात जरी मिळवावयाची झाली तरी बुद्धिवान मनुष्यास सगळे आयुष्यच खर्च करावे लागेल.

देशोदेशींचा पराक्रम

लहानपणापासून आतापर्यंत ते पूर्ण अकिंचन स्थितीत आयुष्य काढीत आहेत. दारिद्र्य त्यांचा कायमचा सोबती आहे. ते ज्या ज्या देशांत गेले, त्या त्या देशांतील पहिल्या दर्जाच्या क्रांतिकारक पुढाऱ्यांना त्यांच्या प्रतिभासंपन्न, कर्तृत्वाने आकर्षून घेतले. त्यामुळे त्यांचा योगक्षेम चालण्यास अडचण पडली नाही. चीनमध्ये प्रथम गेले तेव्हा डॉ. सन्यत्सेन हे त्यांचे मित्र बनले. त्या वेळी रॉय वीस वर्षांचे होते. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेत ते मजूरपक्षाच्या मध्यवर्ती कमिटीत काम करीत होते. मेक्सिकोमध्ये क्रांतिकारक पक्षाचे ते सरचिटणीस होते. स्पेनमध्ये ''आंतरराष्ट्रीय क्रांतिकारक'' पक्षाचे प्रतिनिधी म्हणून ते काम करीत होते. रशियात प्रत्यक्ष लेनिननेच त्यांना 'थर्ड इंटरनॅशनलच्या' मध्यवर्ती कमेटीत काम करण्याकरिता बोलाविले होते. १९२७ सालच्या क्रांतीत चीनमध्ये ते कॉमिन्टॉर्नचे स्टॅलिनने अधिकार देऊन पाठविलेले प्रतिनिधीच होते. त्यामुळे योगक्षमाचा प्रश्न त्यांना कोठेच अडला नाही. संचय त्यांनी फक्त ज्ञानाचाच केला. आत्मविश्वास व तत्त्वनिष्ठा हेच त्यांचे सहकारी, जगातील दलित जनता हेच त्यांचे कुटुंब.

प्रत्यक्ष उपासमार

त्यांनी धनसंचय केव्हाच केला नाही. त्यांनी जर्मन भाषेत लिहिलेल्या Revolution and Counter- Revolution in China या ग्रंथावर बराच पैसा मिळविला. पण तो

सगळा पैसा पक्षसंघटनेत खर्च केला. आज मी त्यांना गेली चार वर्षे पाहात आहे. कित्येक वेळा दुपारची वेळ कशी भागेल हा प्रश्न असतो. मुंबईत तीन वर्षांपूर्वी गोदी कामगारांचा संप चालला होता. भाई वसंतराव कर्णिक वगैरे साथी संपाच्या भानगडीत अहोरात्र मशगुल होते. इकडे चर्निरोड स्टेशनजवळील एका इमारतीच्या चौथ्या मजल्यावर एम. एन. रॉय व एलन रॉय राहात होते. रॉय यांच्याजवळ काहीच शिल्लक नव्हते. सकाळी आठपासून दुपारी तीन वाजेपर्यंत फासीझमवर लेखन चालले होते. मिसेस एलन रॉय यांच्या टाईपरायटरची कटकट जवळ जवळ सहा-सात तास चालली. माझे एक स्नेही भेटावयास गेले, त्यांना वरील परिस्थिती कळली. नंतर जेवणाची व्यवस्था झाली!

दरिद्री दांपत्याचं कर्तृत्व

रॉय यांचे मन व बुद्धी इतकी संपन्न आहे की, त्यामुळे दारिद्र्याचे संकट त्यांचा उत्साहभंग कधीच करू शकत नाही. रॉय व एलन हे चोवीस तास काबाडकष्ट करणारे मजूर आहेत. ते दोघेही मजुरासारखे राबत असतात. सहा वर्षांच्या कारागृहवासाने श्री. रॉय यांची प्रकृती क्षीण झाली आहे. ते मधून मधून सारखे आजारी असतात. लहानपणापासून शर्यतीच्या रिंगणातील घोड्याप्रमाणे सारखी जीवनाची दौड सुरू आहे, क्षणाचा विसावा नाही. रॉय म्हणूनच टिकू शकले, इतरांची मात्रा नाही. केवढा विशाल देह! पण तो तरी किती टिकाव धरणार? इतक्या लहान वयापासून स्वातंत्र्याच्या लढ्यात जगभर एकसारखा लढत असणारा दुसरा एकतरी पुढारी आहे काय? आजारीपणातही ते काम करतात. एकदा बैठक मारली की सहज चारपाच तास निघून जातात.

एलनचा टाईपरायटर अखंड कट-कटत असतो. सकाळी ७ ॥ ला चहा तयार होतो. अकरा वाजेपर्यंत काम. मग दोघेही स्वयंपाक करतात. स्वयंपाकात कोणतातरी एक पदार्थ तयार केला जातो. एक-दोन पदार्थ बाजारचे असतात. बहुशः ब्रेड व लोणी, चीज किंवा जांब यांपैकी काहीतरी असते. मी त्यांना नेहमी विचारतो तुम्ही शरीराला मानवेल असाच आहार का घेत नाहीं ? ते म्हणतात, ''मला या पृच्छेचा काय उपयोग? गरिबांस मिळेल तेच खाणे भाग पडते."

मिसेस्एलन नसत्या तर आजची परिस्थिती रॉयना दुर्धर वाटली असती. दक्षता, दाक्षिण्य व निष्ठा हे हिंदी स्त्रीचे सद्गुण त्यांच्या ठिकाणी आहेत. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश आणि रशियन या भाषा त्या उत्तम लिहू शकतात व बोलू शकतात. बर्लिन येथे देशोदेशीच्या कोमिंटार्नच्या सभासदांचे दुभाषाचे काम त्यांनी अनेक वर्षे केले आहे. 'इंडिपेंडन्ट इंडियांत युरोपियन राजकारणावर त्यांचे लेख येत असतात. त्यांचे इंग्लिश किती झुळझुळीत आहे, ते पहावे. इंग्रजी त्यांची मातृभाषा नाही. त्यांची पितृभाषा जर्मन व देशभाषा फ्रेंच, मध्यम वर्गीय कुटुंबात जन्म. आतापर्यंतचे सगळे आयुष्य युरोपियन मजूरवर्गाच्या चळवळींत व लढ्यांत गेले. परराष्ट्रीय राजकारण व इतिहास या विषयांत त्यांच्या बुद्धीची सूक्ष्मता व विचारक्षमता पंडितासही चकित करते. रॉय यांची सेवा व शुश्रूषा त्या हिंदी गृहिणीप्रमाणे करतात.

सरळ व मोकळा स्वभाव

रॉय यांची गाठ पडण्याचे अगोदर मला असे वाटत होते की, देशो-देशी मोठमोठ्या गुंतागुंतीच्या राजकीय उलाढालीत अग्रस्थानी काम करणाऱ्या या पुरुषाचा स्वभाव मोठा कारस्थानी व संशयी असेल, पण या बाबतीत मला वेगळाच अनुभव आला. त्यांचा स्वभाव फार सरळ आहे. त्यांना एवढ्याशा थोड्या काळात कितीतरी देशांत व समाजांत काम करावे लागले. प्रत्येक ठिकाणी त्यांनी पहिल्या प्रतीच्या माणसांचा विश्वास संपादन केला. ते कोणत्याही मनुष्यास प्रथमतः प्रामाणिक धरून चालतात व त्याच्यावर विश्वास ठेवतात. त्यांना विश्वासातील कितीतरी माणसांनी आतापर्यंत फसविले आहे. ही गोष्ट त्यांच्या निदर्शनास आली असता त्यांना आश्चर्य व दुःख मुळीच वाटत नाही. ते म्हणतात ''सावधपणाने दुसऱ्यावर विश्वास ठेवावा. व्यवहार व वागणूक नेकीची व सरळपणाची असावी. कामाची जबाबदारी क्रमाक्रमाने टाकावी. म्हणजे व्यक्तीची परीक्षा आपोआप होते. व्यक्तिपरीक्षेचा याशिवाय कोणताच मार्ग नाही.''

संधिसाधू नाहीत

कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या प्रामाण्याची क्रिया व अनुभव हीच खरी कसोटी आहे, असे राय मानतात. नव्या नव्या अनुभवाप्रमाणे व देशकालपरिस्थितीच्या भेदाप्रमाणे ते कार्यक्रमांत बदल करीत असतात. ठोकळ पद्धतीने विचार करणाऱ्या लोकांना रॉय यांच्यावर संधिसाधूपणाचा आरोप करावासा वाटतो. रॉय यांची विचारसरणी पेलणे हे मोठे अवघड काम आहे. ध्येयाचे पूर्ण स्वरूप व कार्यक्रमाचा संपूर्ण अर्थ यांची रॉय यांना जितकी स्पष्ट कल्पना आहे, तितकी फारच थोड्यांना असेल. श्री. सुभाष बोसांनी गेल्या ९ जुलैचा निषेधदिन पाळला. त्यांत रॉय यांनी भाग घेण्याचे नाकारले. पुष्कळशा जहाल म्हणविणारांनी व काँग्रेस-विरोधी वृत्तपत्रांनी रॉय यांच्यावर भ्याडपणाचा व संधिसाधूपणाचा आरोप केला. ते पाहून बॅ. जमनादास मेहेता मार्मिकपणे म्हणाले की, ''या देशातील दोनच पुढाऱ्यांना आपले स्वतःचे मन कळले आहे. एक रॉय व दुसरे गांधी. सुभाषबाबूंचा नुसता देखावा पहावा.'' जमनादास हे दोघांचेही चाहते नाहीत.

पुढाऱ्यांशी धोरण

फैजपूरच्या काँग्रेसनंतर भुलाभाई व वल्लभभाई यांनी रॉय यांना सांगितले की, ''तुम्ही आपल्या ज्ञानाचा व कर्तृत्वशक्तीचा उपयोग काँग्रेसला करून द्या. आम्ही तुम्हांस मदत करू. मात्र एकदा वर्ध्याला जाऊन महात्माजींशी जमवून घ्या. नाहीतर तुम्हाला अगदी एकटे स्वतंत्र मार्गाने जावे लागेल.'' रॉय यांनी सांगितले की, ''काही काळपर्यंत तुमचे-आमचे बऱ्याच बाबतीत जमेल. सत्याचा मार्ग खूप रुंद असतो. मोठाच मतभेद झाला तर आपण निरनिराळे रस्ते धरू." वल्लभभाईंनी हे नाकारले. राय यांनी एकट्यानेच प्रवास करण्याचा दुसरा मार्ग धरला. रॉय यांना त्या वेळी मी म्हटले की, 'वल्लभभाईंचे म्हणणे ऐकले असते तर काय बिघडले असते?'' ''मला विचारस्वातंत्र्यास मुकावे लागले असते. माझा जुना

अनुभव विसरावा लागला असता.'' रॉय म्हणाले. मी म्हटले ''तुमचे सगळे पूर्वीचे आयुष्य अशाच तऱ्हेने गेले आहे. आता यापुढे पाया बांधण्यापासून सगळी नवी तयारी तुम्हांस करावी लागेल.''

मतभेद कोठे आला?

तत्त्वनिष्ठेकरिता कित्येक वेळी सर्वस्व गमवावे लागते. थर्ड इंटरनॅशनलशी १९२८ साली रॉय यांचा महत्त्वाचा मतभेद झाला. रशियातील मोठ-मोठ्या समाजवादी पुढाऱ्यांशी त्यांचा मतभेद विकोपास गेला. विषय दोन. हिंदुस्थानातील युद्धोत्तर परिस्थितीची क्रांतिशास्त्र,दृष्ट्या मीमांसा कशी करावी? आणि जर्मन कम्युनिस्ट पार्टीचे जर्मन लोकसत्ताक राज्याशी संबंध कसे असावे? कूश्निन, बुखारिन वगैरे रशियन पुढारी म्हणत की, हिंदुस्थानातील भांडवलदारवर्ग क्रांतिकारक आहे. रॉय यांचे म्हणणे की, हिंदी भांडवलदारवर्ग ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्यास केव्हाही तयार होणार नाही, म्हणून तो क्रांतिकारक नाही. संस्थानिक, बडे जमीनदार व बडे भांडवलदार ब्रिटिश सत्तेचा समूळ उच्छेद व संपूर्ण लोकसत्तेची स्थापना करू देणार नाहीत; कारण ब्रिटिश साम्राज्यशाही या वर्गांना थोडाबहुत आश्रय देते. या मुद्द्यावर रशियन कम्युनिस्ट पक्षाशी व कोमिंटर्नच्या पुढाऱ्यांशी मतभेद होऊन रॉय यांचा संबंध तुटला. जर्मन कम्युनिस्ट पक्ष जर्मन लोकसत्ताक राज्यास एकांतिक विरोध करून नाझीपक्षाला अप्रत्यक्षपणे प्रबळ होण्यास मदत करीत होता. याही गोष्टीवर रॉय यांनी जर्मन वृत्तपत्रांतून प्रचंड हल्ला केला. त्यामुळे कम्युनिस्ट पक्षातून रॉय यांना बाहेर पडावं लागले.

स्टॅलिन या पक्षाचा सूत्रधार. रशियातील बलाढ्य राज्यसंस्थेचा या पक्षास पाठिंबा. रॉयच्या बुद्धिमत्तेवर व कर्तृत्वावर स्टॅलिनचा विश्वास, पण मतभेदामुळे या रशियन राज्यशक्तीचे ऐश्वर्य रॉय यांनी तृणवत मानले. त्यांनी असहाय व दैन्यपूर्ण जीवन पुनः स्वीकारले. रशियामधून ते निघाले त्या वेळी त्यांच्याजवळ एक होल्डऑल, लहानशी पुस्तकांची पेटी व सरासरी महिनाभर पुरतील इतके रूबल्स होते.

तिसऱ्या वर्गाने प्रवास करून ते बर्लिनला गेले; चीनमधील दगदगीमुळे त्यांची प्रकृती बिघडली होती; कानाचे दुखणे विकोपास गेले होते. ऑपरेशन नीट न झाल्यामुळे दुखणे जीवावर बेतले होते; पण हा पुरुष कशालाही नमला नाही. या वेळी धीरोदात्ततेची परिसीमा त्याने गाठली. फाशीच्या तक्त्यावर चढून फासात मान अडकविण्याला इतके धैर्य लागत नाही. त्यांना इंचाइंचाने व पळापळाने मरावे लागले!

खोडसाळ गैरसमज

रॉय यांनी चीनमध्ये काय कामगिरी केली याबद्दल हिंदुस्थानातील मत्सरग्रस्त कम्युनिस्ट उगीच खोडसाळ गैरसमज पसरवीत असतात. स्टॅलिन व लेनीन यांचा दोस्त मिफ् (Mif) याने जर्मन भाषेत क्रांतीचा इतिहास लिहिला आहे. त्यात त्याने असे म्हटले आहे की, चिनी समाजवादी पक्षास लेनीनच्या क्रांतिशास्त्राचा खरा धडा रॉय यांनीच प्रथम दिला. साम्यवादी पक्षाच्या सगळ्या अनुभवाचे सार रॉयच चिनी समाजवादी पक्षास पढवू शकले. (पा. नं.

११८). हीच गोष्ट ट्राटस्कीच्या देखरेखेखाली प्रसिद्ध झालेल्या Isaacs च्या The Tragedy of the Chinese Revolution या पुस्तकात उल्लेखिलेली (पृ.२५५) आहे. थर्ड इंटर नॅशनलच्या १९२७-२८ सालच्या दप्तरात रॉय यांच्या फार मोठ्या लिखाणाचा संग्रह आहे. कोमिंटार्नच्या अधिकृत पत्रांत रॉयचा चिनी राज्यक्रांतीबद्दलचा सगळा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे व तो पूर्ण मान्य केला गेला आहे. तो हिंदी कम्युनिस्टाने थोडा प्रामाणिकपणे चाळावा.

क्रांतिशास्त्राचे द्रष्टे

हिंदुस्थान व साम्राज्यशाहीच्या गुलामगिरीतील इतर देश यांतील जनतेने साम्राज्य सत्ता उलथून पाडून लोकसत्ताक क्रांती कशी करावी, याचे शास्त्र रॉय यांनी प्रथम जागतिक काँग्रेसच्या दुसऱ्या व चौथ्या अधिवेशनात मांडले व ते लेनिनला पूर्णपणे मान्य होते ही गोष्ट थर्ड इंटरनॅशनलच्या इतिहासात नमूद झाली आहे. साम्राज्यशाहीच्या गुलामगिरीत सापडलेल्या वसाहतीत लोकसत्ताक राष्ट्रीय क्रांती कशी होईल, यासंबंधीचे शास्त्रोक्त विवेचन प्रथम रॉय यांनीच जागतिक काँग्रेसमध्ये मांडले. अर्थशास्त्र, समाजशास्त्र व इतिहास यांचे सम्यक परिशीलन करून हिंदुस्थानातील ब्रिटिश अमदानीतील समाजरचनेचे, राजकारणाचे व विचारपरिणतीचे युक्त विवेचन रॉय यांनीच आतापर्यंत केले आहे. त्यांनी या विषयावर आतापर्यंत आठ ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत, ट्रॉट्स्की व स्टॅलिन हे दोघेही रॉयचे हे श्रेय मान्य करतात.

ज्ञानाची मेजवानी

रॉय यांच्याशी चर्चा करीत असता त्याच्या वादपटुत्वाची खात्री पटते. पूर्वी ते वादाचे वेळी चिडत नसत असे लोक सांगतात. हल्ली मात्र एखाद्या वेळी फार लवकर रागावतात. जेव्हा त्यांना असे वाटते की, वाद करणारी व्यक्ती मुद्दे समजून न घेता भलत्याच मुद्द्याचा आग्रह धरते, तेव्हा ते रागावतात. त्यांचे वादातील बोलणे सूत्रबद्ध व तर्कशास्त्राच्या सूक्ष्म नियमांनी युक्त आणि बहु-अर्थ-गर्भ असते. दुसऱ्या मनुष्याच्या बुद्धीला त्यांचे शास्त्रशुद्ध संक्षिप्त उत्तर झेपत नाही. रॉय यांच्या लक्षात ही गोष्ट कित्येक वेळा येत नाही.

प्रज्ञावान व संवाद-चतुर मनुष्य जर रॉय यांच्याशी चर्चा करू लागला, तर त्याला ज्ञानाची मेजवानी मिळते. रॉय यांना अडविण्याचे बुद्धीने जर कोणी गर्वाने चर्चा करील, तर त्याची रग जिरल्याशिवाय राहात नाही. रॉय यांची वादपद्धती व संवादपद्धती यांतील भूमिका अगदी निराळी असते. संवादाचे वेळी ते अडखळत बोलतात, जणू काय मनाशीच विचार करीत बोलतात. बोलण्यात कसलीही सजावट नसते व नाट्य नसते. पण विनोद व कोट्या व्याख्यानांतही असतात. वादात त्यांनी केलेला कणखर व भक्कम प्रमाणांचा मारा प्रतिपक्षास सोसत नाही.

शास्त्रीय भूमिका

व्याख्यान देत असताना ते प्रथम अडखळतात. एक मुद्दा मांडला म्हणजे थोडीशी विश्रांती घेतात. तुरुंगामधून बाहेर आले तेव्हा त्यांना नीट बोलणेही कठीण जात होते. अलीकडे ते

कित्येक वेळा तासन् तास अस्खलित वक्तृत्व करू लागले आहेत. त्यांचे व्याख्यान निबंधच असतो. सिद्धांतांची मालिका एकत्र गुंफण्याचे कार्य ते व्याख्यानात करतात. दृष्टांत व उदाहरणे यांचा उपयोग ते जर व्याख्यानात करू लागले, तर ते हिंदुस्थानातील पट्टीचे इंग्रजी वक्ते बनतील.

हिंदी राजकारणाची मीमांसा

हिंदी राजकारणात आज कित्येक वर्षे पेचप्रसंग उत्पन्न झाला आहे. त्याची गती कुंठित झाली आहे. श्री. रॉय यांनी त्याचे एक निदान ठरविले आहे. ते म्हणतात, ''गांधी-युगात सामान्य जनता राजकीय चळवळीत दाखल झाली, हे एक मोठे, शुभ लक्षण आहे; पण तर्कशुद्ध विचारसरणीचा पाठिंबा या चळवळीला नसल्यामुळे ही चळवळ यशस्वी होणार नाही, अंधश्रद्धा हा या चळवळीतील मोठा दुर्गुण आहे. जवाहरलालसारखे पुढारी या दुर्गुणाचीच प्रशंसा करितात. विचारक्रांती झाल्याशिवाय राजकीय क्रांतीची चळवळ यशस्वी होणार नाही. युरोपमध्ये विज्ञान शुद्ध बुद्धिवादाची चळवळ झाली. म्हणून नव्या युरोपचा जन्म झाला. हिंदुस्थानातील अंधकारयुग अजून संपावयाचे आहे.'' श्री. रॉय यांचे हे निदान इतिहासाचा ज्यांनी अभ्यास केला आहे, त्यांना पटल्याशिवाय राहणार नाही. रॉय यांनी स्वत: विचारक्रांतीच्या चळवळीचा पाया घातला आहे. काँग्रेसमधील वामपक्षीयांना या विचारांचे महत्त्व अद्याप कळावयाचे आहे.

रॉय यांच्या विचारसरणीचा अप्रत्यक्ष परिणाम काँग्रेसच्या राजकारणावर झाला आहे. त्याचे एकच उदाहरण म्हणजे 'घटनासमितीचे राजकारण' होय. प्रथम सर्वांनी विरोध केला होता. आता सगळेच उचलून धरीत आहेत. अद्याप रॉय त्यांना राजकारणाच्या मार्गात एकट्यालाच प्रवास करावा लागणार आहे. हा जगाचा मुशाफिर थकणार नाही, अशी माझी कल्पना आहे. हा वीर आहे, तत्त्ववेत्ता आहे व मुत्सद्दी आहे.

(अग्रणी, दि. १८ डिसेंबर, १९३९, पृ. १० ते १२)

○○○

२२

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे थोर व्यक्तित्व

विशाल नेत्र, निरोगी गौरकाया, तरतरीतपणा, भावुक अविष्कार, उच्च विचार, आधुनिकता इत्यादी गुणांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे व्यक्तिमत्त्व कोणाच्याही मनावर खोल ठसा उमटविल्याशिवाय रहात नाही. परंतु जवाहरलाल हे खोल मनाचे गृहस्थ नाहीत. त्यांचे मानसिक सर्वस्व उजेडात बिलोरी काचेच्या पेटीत ठेवलेल्या जडजवाहिरासारखं चमकत असते. त्यांचे उच्च विचार हा त्यांच्या भावुकतेचा भाग आहे; व भावुकता हा त्याच्या मनोरचनेचा प्रधान धर्म आहे.

अत्यंत सुधारलेल्या इंग्लंडसारख्या देशात त्यांचे मुख्य शिक्षण झाले असल्यामुळे आधुनिक सभ्यता त्यांच्या अंगवळणी पडली आहे. त्यामुळे त्यांचे महत्त्वाचे भावनाप्रधान अविष्कारही कित्येक वेळा अद्यावत विचारांनी प्रभावित झालेले दिसतात. गेल्या दीडशे वर्षांच्या इतिहासात भारतीय नेत्यांमध्ये आधुनिक जागतिक संस्कृतीशी तन्मय झालेले, लोकमान्यता पावलेले थोर पुरुष काढले तर फार थोडे सापडतील. त्यात जवाहरलालांचे स्थान फार मोठे समजले जाते, याचे कारण त्यांचे पाश्चात्त्य विद्यापीठातील शिक्षण होय.

जवाहरलालजींच्या जीवनाचा, मानसिक घटनेचा अर्थ समजून घेण्याची फार गरज आहे. त्यामुळे आजचा सर्वांत वरिष्ठ प्रश्न सोडविण्यास फार चांगली मदत होईल. तो प्रश्न म्हणजे, भारतीय राजकारण हे जागतिक शांतता स्थापन करायचे शक्तिपूर्ण साधन कसे बनेल, हा होय. हा प्रश्न अत्यंत बिकट आहे. मनुष्यजातीच्या भवितव्याशी निगडित असलेला हा प्रश्न आहे. त्याकरिता जवाहरलालांचे व्यक्तित्व समजून घेतले पाहिजे.

मनोविश्लेषणशास्त्र ऐतिहासिक महान व्यक्तींच्या व्यक्तित्वाचा समग्र अर्थ उलगडून सांगण्याइतके पुढे गेलेले नाही, हे जरी खरे असले तरी त्याचे त्या बाबतीतले परिमित यशही काही कमी उपयुक्त नाही. त्या शास्त्राच्या आधारे इतिहासातील काही नमुनेदार थोर व्यक्ती शोधून त्यांच्याद्वारे विद्यमान व्यक्तींच्या व्यक्तित्वाचा अर्थ शोधला पाहिजे. अशा ऐतिहासिक

व्यक्तींचे इतिहास व पुराण यांनी चित्रिलेले नमुने काल्पनिकही असू शकतील. ते काल्पनिक असले तरी काही हरकत नाही. काल्पनिकतेमुळे गहन अभिप्राय उघडा करून दाखविण्याचे सामर्थ्य कमी होत नाही. कारण मनुष्यजातीच्या अनेक युगे साठलेल्या अपरिमित अनुभवाने त्या व्यक्तींच्यावर संस्कार करून त्या व्यक्ती निर्माण केलेल्या असतात. अशा व्यक्तींचा नमुना मिळविण्याकरिता डॉ. फ्रॉइडने प्राचीन काल्पनिक कथांचा आश्रय केला. प्राचीन लोकप्रसिद्ध अनेक कथा मनुष्याच्या दीर्घ प्रत्ययाच्या असतात.

आत्मसमर्पण : आत्मनिष्ठा

जवाहरलालांचे व्यक्तित्व समर्पणपरायण आहे. 'समर्पण' ही कल्पना धार्मिक अर्थाची आहे ईश्वरास समर्पण करण्याचा विधी या शब्दाने आठवतो व पवित्र भावना उदित होते. पितृसमर्पणभावनेचा पहिला आदर्श दशरथी रामचंद्र होय. नेहरूंच्या मनातील पिता व दशरथ हे एकच होत. पुत्रशोकाने दशरथ दग्ध होऊन नष्ट झाला. अथांग पुत्रप्रेम तेथे होते. त्याचेच प्रत्यंतर रामचंद्रांच्या असीम पितृभक्तीत मिळते. रामचंद्र हा पितृप्रधान कुटुंबसंस्थेत आदर्श पुत्र होय. पितृप्रधान समाज संस्थेतील ऐहिक भावनेचे उन्नयन ईश्वरभक्तीत होत असते. उन्नयन पावलेल्या पितृनिष्ठेचे उत्कृष्ट निदर्शन ख्रिस्तात झालेले दिसते. रामचंद्र पितृप्रधान समाजसंस्थेकरिता अत्यंत नाजूक अशा पत्नीप्रेमाची आहुती देतो. रामचंद्राच्या पत्नीप्रेमाची नेहरूंच्या क्रांतिप्रेमाशी तुलना चांगली होऊ शकते. ख्रिस्ताशी तुलना करण्यासारखे अंश थोडे आहेत, परंतु मूळ भावनेचे साम्य आहे. मानवी इतिहासात समर्पणभावना येशू ख्रिस्तात संपूर्णपणे परिणत झालेली दिसते. तो आकाशातील पित्यास आपले संपूर्ण जीवित वाहतो. तो अत्यंत ईश्वरशरण आहे. ख्रिस्त ईश्वरनिष्ठेचा कळस बनला आहे.

या भावनेशी प्रतियोगी असलेली भावना 'आत्मनिष्ठ' या शब्दाने व्यक्त होते. या भावनेचा इतिहासातील उत्कृष्ट नमुना म्हणजे भगवान बुद्ध होय. तो 'अनन्यशरण' आहे. तो ईश्वरास मानीत नाही तो जगाला पिता आहे, असे समजत नाही. पित्याची मुख्य इच्छ असते की, पुत्राने लग्न करून नीट संसार करावा. बुद्ध ऐन उमेदीत सुंदर, सापत्य पत्नीचा त्याग करून, पेटलेल्या घरातून बाहेर पडावे, त्याप्रमाणे घरातून बाहेर पडतो, ईश्वर न मानणाऱ्या धर्माची स्थापना करतो. हे पितृत्वाच्या व पितृप्रधान समाजसंस्थेच्या विरुद्ध असलेले एक मोठे बंडच उद्भवलेले असते. त्यानंतर शतकानुशतके सहस्त्रावधी तरुणांच्या अनेक पिढ्या तारुण्यातच श्रमण बनत असतात; असा इतिहास आहे.

पितृभक्तीचे आलंबन

आत्मसमर्पण व आत्मनिष्ठा या अत्यंत प्रतियोगी कल्पना आहेत. जवाहरलाल हे आत्मसमर्पणाचे उदाहरण आहे; अनन्यशरण आत्मनिष्ठेचे नव्हे. या आत्मसमर्पणाची तयारी त्यांच्या बाल्यावस्थेत झाली. बाळपणात तिचे बीजारोपण झाले. ते सार्वजनिक चळवळीत

पडल्यापासून त्या बीजाच्या अंकुराला फूट येऊन बहर आला. आता स्वराज्यानंतर फल येऊ पहात आहे. लहानपणाचा जीवनक्रम मानव्यशास्त्रदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असतो. भावी आयुष्याची ढोबळ जन्मपत्रिका बालपणाचे मानसशास्त्रच लिहून ठेवीत असते.

कै. पंडित मोतीलाल नेहरूंवर लक्ष्मीचा हस्त सतत होता; पाश्चात्त्य विद्येची सरस्वतीही कृपाकटाक्ष फेकीत होती. मनमोकळा व उदार पिता जवाहरलालांना लाभला. श्रीमंतीच्या सौख्याला उदार, मनमोकळ्या पित्याच्या खेळकर वृत्तीने मिसळलेल्या वात्सल्याची जोड मिळाली होती. खानदानी घराण्यातील बापाचा दरारा फार असतो. बाहेर गांभीर्य व हृदयात वात्सल्य दडलेले, असाच प्रकार बहुश: असतो. नेहरू कुटुंबात याच्या उलट परिस्थिती होती. पाश्चात्त्य वळणही या कुटुंबाला खूप आलेले होते. मुसलमानी उर्दू भाषा ह्या कुटुंबाची होय. नागरी आता मागाहून शिकू लागले. हिंदू, मुसलमान व इंग्रज या तिन्ही संस्कृतींचे हे संगमस्थान बनले. पाश्चात्त्य संस्कृतीच्या सर्व छटा ह्या कुटुंबाच्या राहणीत उमटल्या. व्यक्तिस्वातंत्र्य वैवाहिक जीवनातसुद्धा मधून मधून मान वर काढत असे. या वातावरणावर पित्याचे उदार साम्राज्य होते. साधारणपणे ज्या कुटुंबात पितृभक्तीचा प्रभाव असतो, तेथे ती पितृभक्ती बहुश: आदर व भीती या भावनांनी मिश्रित असते. नेहरू कुटुंबातील पितृभक्तीत हे मिश्रण नहते. त्यामुळे मुले लाडात वाढली. लाडाने मुले स्तुतिप्रिय व आत्मनिरीक्षणशून्य बनण्याचे भय असते. गोडव्याने व लाडाने भरलेल्या पितृवात्सल्याच्या वातावरणातील मनामध्ये जे आदर्श निर्माण होतात, त्यात पित्याची चित्रे नकळत चिरस्थायी होतात.

जवाहरलालांच्या सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ मोठ्या कल्पनारम्य परंतु धामधुमीच्या परिस्थितीत झाला. पहिल्या देशव्यापी राजकीय चळवळीत ते जनतेपुढे आले. ती म्हणजे असहकारितेची चळवळ होय. या चळवळीत पंडित मोतीलाल महात्माजींचे सहकारी व अनुयायी बनले. आपल्या शेकडो सहकाऱ्यांना कौटुंबिक गोड बंधनांनी सर्व बाजूंनी बांधून टाकण्याची हातोटी महात्माजींच्या ठिकाणी अप्रतिम होती. महात्मा गांधी जवाहरलालांना पितृवत भेटले. गांधींच्या रूपाने त्यांना पुन: मोतीलालच दिसले. पंडित मोतीलालांच्या मृत्यूने मोतीलालांची जागा महात्मा गांधींनी सहाजिकपणे भरून काढली. जवाहरलालांचे पितृभक्तीचे आवलंबन स्मृतिशेष कधीच झाले नाही.

लावण्यशाली, अपत्यवती व आरोग्यामुळे यौवन मुसमुसत असलेली पत्नी पितृमातृभक्तीला फिकी पाडते. सुसंस्कृत निरोगी पत्नी जीवनाच्या वैभवाला प्रवसते. कारण मग मातृपितृभक्ती आपले सामर्थ्य पत्नीच्या आकर्षणात विलीन करून पत्नी भविष्यकालाकडे ओढणारी शक्तिदेवता होय. मानवी सृजन शक्ती भविष्यकालाला आकार देत असते; नवे आदर्श व क्रांतीची ध्येये ही सृजनशीलता अप्रतिहत व अनिरुद्ध असल्याची निदर्शने होत. भूतकालाच्या बंधनांना छेदून नव्या नव्या अविष्काराला कारणीभूत होणारी शक्ती पत्नीच्या प्रभावाने जागृत होते. नल व दमयंती यांचे आख्यान हेच सूचित करीत

असते. पतीवाचून पत्नी व पत्नीवाचून पती, हे रेताड मैदानासारखे निरर्थक जीवन होय. नल हा कलाकारांचा मुकुटमणी होता. दमयंतीच्या अभावी त्याचे सर्व जीवनरस सुकत चालले होते. तिच्या प्राप्तीने पुनः त्याचे जीवन भरभराटीस आले. अशा तऱ्हेचे वैवाहिक जीवन लाभले म्हणजे शेवटी पितृभक्ती मनाच्या अज्ञात दालनात विश्रांती घेत कायम पहुडते. ती आदराच्या सदरात केव्हा केव्हा प्रकट होते. आत्मप्रशंसेची आवड माणसात अगाध आहे. त्यामुळे आपल्या मोठेपणाचा अलंकार म्हणून पितृभक्ती वा मातृभक्ती आपण दाखवीत असतो. परंतु ती भक्ती तिच्या विषयाप्रमाणेच वयस्कर होऊन दुर्बल बनलेली असते.

सौ. कमलाबाई नेहरूंची प्रकृती नाजूक फार; नव्हे दुखणाइताची. आजारी पत्नीचे पती एवढ्याच शब्दाने जवाहरलालांचा उल्लेख एका सुप्रसिद्ध गृहस्थांनी आपल्या पत्रव्यवहारात केलेला मला आठवतो.

भारतवर्ष हा देश म्हणजे अत्यंत प्राचीन असा जणूकाय वृद्ध पुरुषच होय. हा देश अमेरिकेसारखा नवा देश आहे; किंवा प्राचीन, थोर इतिहासपरंपरा नसलेला रशियासारखा देशही नव्हे. भारतवर्षाला प्राचीनतम भव्य इतिहास आहे. या देशाच्या पारतंत्र्यमुक्तीच्या चळवळीचे थोर अग्रणी जवाहरलाल बनले. या देशभक्तीत पितृभक्तीने प्रवेश केला. भारतवर्षासारखा वृद्ध पुरुष आपल्या पुत्राच्या ठिकाणी 'आपण याचे पुत्र असल्यामुळे धन्य आहोत' अशी भावना निर्माण केल्याशिवाय कसा राहील?' अशी जवाहरलालांच्या समर्पणपरवृत्तीची पार्श्वभूमी आहे. व्यक्तिस्वातंत्र्यप्रधान इंग्लिश संस्कृतीचा संस्कार झालेला असल्यामुळे समर्पण वृत्तीचा आविर्भाव, शालीनता वा शरणागती या स्वरूपात होत नाही. उलट आपण मोठ्या पित्याचे वारस, औरस पुत्र आहोत, याच भावनेच्या डौलात ती प्रकट होते. परंपरेची पूजा करण्यास लावणारा हा मोठेपणा असतो, तो जवाहरलालांच्या आधुनिकतेच्या आवरणाखाली सुंदरपणे झाकलेला आहे.

नवीन युगातील प्रेरणांचे आशास्थान

जवाहरलाल ही नवपाश्चात्त्य संस्कृतीचे उच्च संस्कार मिळालेली व्यक्ती असल्यामुळे, त्यांच्यात वर्तमान युगातील अभिनव वैचारिक चळवळीचे पडसाद अप्रतिहतपणे उमटत असतात. त्यांनी त्यांच्या मनाने आधुनिक क्रांतिकारक विचारांचे मोकळेपणाने स्वागत केले आहे. लखनौ येथे भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदीय भाषणात याचे उत्तम प्रत्यंतर मिळते. भारतीय समाजरचनेत आमूलाग्र बदल व्हावा, अशी त्यांची उत्कट मनीषा आहे. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनानेच भारतीय जीवनाची बांधणी योग्य रीतीने करता येईल, असा आदेश ते वारंवार देत असतात. लोकसत्ता, व्यक्तिस्वातंत्र्य, दलित जनतेची बंधमुक्तता इत्यादी वर्तमानयुगाच्या आदेशांचे त्यांना चांगले भान आहे. गेली अनेक वर्षे आंतरराष्ट्रीयतेस वरिष्ठ स्थान देणाऱ्या जागतिक कल्पनांचा ते घोषही करीत असतात. सुधारलेल्या जगातील समतावादास व व्यक्तिस्वातंत्र्यवादास जवाहरलाल हे एक आशास्थान आतापर्यंत वाटत

आलेले आहे. गेली ३० वर्षे या देशातील राजकीय युद्धातले आघाडीचे समरधीर वीर म्हणून जगातील लोकांना ते दिसत आहेत.

स्वराज्य प्राप्तीनंतर जवाहरलालांचे कार्यक्षेत्र बदलले आहे. ते आता समरधीर वीर या नात्याच्या ऐवजी भारतवर्षाचे आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय राजकारणाचे मुख्य मुत्सद्दी या नात्याने पुढे येत आहेत. या वेळी त्यांच्या अंतरंगाच्या गाभ्यात वाढलेले व्यक्तित्व प्रकट होऊ लागले आहे. आता त्याची पावले क्रांतीच्या दिशेने पडत आहेत, असे निश्चित म्हणवत नाही. दूरच्या काळात अमलात आणावयाची गोष्ट म्हणून त्यांनी समाजवादास बर्फाच्या पेटीत थंडगार करून ठेविले आहे की काय असेही वाटू लागते.

काश्मीरच्या लढाईचा राजकीय भावार्थ काहीही असो - काश्मीर भूलोकातील नंदनवन व जवाहरलालांच्या वाडवडिलांची परंपरागत जन्मभूमी होय. तेथे मुसलमानांची वस्ती बहुसंख्य आहे. स्वयं निर्णयाच्या तत्त्वाप्रमाणे लोकमत घेतल्यास ते हिंदूंच्या बाजूने पडेलच याची खात्री देणे कठीण आहे. परंतु ते काहीही असले तरी काश्मीरच्या प्रश्नात जवाहरलालांची पितृभक्तिप्रधान भावना अनुस्यूत असणे अस्वाभाविक नाही. त्यामुळे या प्रश्नावर जवाहरलाल यांना नमते घेणे कदाचित जडही जाईल. काश्मीरची किंमत कदाचित जागतिक महायुद्ध हीही ठरेल. तसे न झाले, व पाक - हिंदू युद्धानेच निकाल लागावयाचा ठरला, तर हिंदमध्ये आर्थिक अनवस्था ओढवून बेबंदशाही माजेल.

हे व्यक्तित्व परंपरेविरुद्ध बंड करेल का?

पितृप्रधान भावनेच्या पोटीच परंपरेचा गाढ अभिमान भरलेला असतो. त्यामुळे पितृपूजा हा धर्म बनतो. परंपरेची पूजा हे पितृपूजेचे उत्कर्षाप्रत गेलेले रूप होय. अशोकचक्रांकित ध्वज स्वराज्यप्राप्तीच्या क्षणी जवाहरलालांनी उभारला. वृद्ध भारताच्या प्राचीन साम्राज्याचे ते स्मारक होय. अद्यावत ध्येयवादाने या प्रवृत्तीचा अर्थ उलगडता येणे अशक्य आहे. तो ध्येयवाद पाठीमागे पहात नाही, पुढे पाहतो.

सारीपुत्त मोग्गलान या बुद्ध शिष्याचे अवशेष हिंदुस्थानात सिलोनहून आणविले. त्याचे स्वागत करताना जवाहरलाल त्यास वंदन करीत आहेत, अशा प्रकारचे प्रकाशचित्र (फोटो) प्रसिद्ध झाले आहे, तेच पहा ना! यात प्रतिबिंबित झालेली जवाहरलालांची नितांत नम्रता त्यांच्या समर्पित व्यक्तित्वाचे हृदयंगम प्रमाण नव्हे असे कोण म्हणू शकेल? आता जवाहरलालांच्या मनावर अहंभावपूर्ण अशा राष्ट्रवादाने पूर्ण मात केली आहे, असे कित्येक टीकाकारांचे विधान केवळ खोडसाळपणाचे आहे, असे म्हणताना विचार करावा लागेल. समाजवादी क्रांतीच्या अद्‌भुतरम्य कल्पनांशी क्रीडा व प्रेमलाप करताना ते अजूनही दिसतात; नाही असे नाही. उदाहरणार्थ, त्यांनी वर्गहीन समाजरचनेचे मार्क्सवादी ध्येय नुकतेच काँग्रेसतर्फे पुकारले आहे. परंतु त्या कल्पनांना प्रत्यक्ष सृष्टीत आणून त्याच्याशी संसार करण्यास ते तयार आहेत, असे म्हणणे मोठेच धाष्टर्य ठरेल. कारण त्यांचे व्यक्तित्व

सनातनी राष्ट्रीय परंपरेला नकळत समर्पित झाले आहे, अशी शंका येते.

हे अशा प्रकारचे व्यक्तित्व परंपरेविरुद्ध बंड करण्यास सिद्ध होईल का? समाजवाद हे परंपरेविरुद्ध असलेले प्रचंड बंड आहे. हल्ली समाजवादाचे व मार्क्सवादाचे प्रयोग इंग्लंड, रशिया इत्यादी देशांत चालू आहेत. त्यात समाजवादाची वैगुण्येही उघडकीस येऊ लागली आहेत. म्हणून जवाहरलालांनी त्या ध्येयांना न तपासता बिलगावे, असे कोणताच स्वतंत्रप्रज्ञ म्हणणार नाही. परंतु जवाहरलालांची राजकीय कार्यप्रणाली लोकशाही स्वातंत्र्याच्या संपूर्ण विकासार्थ आखली जात आहे, असे निश्चितपणे म्हणवत नाही. कारण त्याकरिता त्यांनी कोणता मूलगामी कार्यक्रम आखलेला दिसत नाही. त्यांचे अनेक सहकारी ठरावीक प्रकारच्या नेहमीच्या राजकारणाचे उपासक आहेत. त्यात जवाहरलाल फरक घडवीत आहेत, त्याला प्रत्यक्ष प्रमाण सापडत नाही. कारण सर्वांचीच मनोभूमिका मूलतः पितृपूजक संस्कृतीची आहे,

जवाहरलालांच्या अत्यंत कठीण परीक्षेचा हा समय आहे. नवा इतिहास घडविण्याची संधी भाग्याने व पराक्रमाने त्यांना लाभली आहे. हिंदुस्थान भगवद्गीतेच्या पहिल्या अध्यायात वर्णिलेले कुरुक्षेत्र बनविणे न बनविणे त्यांच्या हातात सर्वस्वी आहे. हे कुरुक्षेत्र बनले तर पुढील पिढ्या- जर त्या थोड्याशा शाबूत राहिल्या तर- काय म्हणतील हे सांगण्याची गरज नाही. नजीकच्या दहा-वीस वर्षांच्या भावी काळात युद्ध व अंतर्गत यादवी टाळण्यात जर जवाहरलाल यशस्वी ठरले, तर पुढील कितीतरी पिढ्या त्यांना धन्यवाद देतील; नव्हे, हा देश धन्य होईल.

समर्पणपर व्यक्तित्वात एक प्रकारची संकुचित राष्ट्रभक्ती असते. ती असीम उत्कटत्वाने भरलेली असू शकते. तिने पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात युरोपातील फॅसिझमला जन्म दिला. स्वराष्ट्रविघातक राष्ट्रीय अहंभावाने बेहोष होऊन हातावर शिरकमले घेतलेल्या तरुण पिढीने शास्त्र व शस्त्रे यांच्या साहाय्याने माणुसकीला धोक्यात आणिले. हिंदुस्थानच्या शांततेचा प्रश्न सोडविण्यास पितृदेशाची अशी वेडी भक्ती असमर्थ आहे. अशा वेड्या भक्तीचे पीक या ठिकाणी आता भरभराटीस येऊ लागले आहे. 'उच्च सुख व पवित्र सेवा म्हणजेच भारतीयता होय. अभारतीय विचारांनी हे गुण दूषित होतात', अशा प्रकारच्या विचाराच्या लोकांचे स्वागत काँग्रेसमध्ये होऊ लागले आहे. म्हणून अशी भीती साधारणपणे वाटते की एक दिवशी काँग्रेस पितृदेशाच्या भक्तीला चेतवून अशांततेच्या, कृतान्ताला जवाहरलालच अडवू शकतील! पण तसे होईल काय? महात्माजींचा आत्मा या देशात जागृत असेल तर तसे होणारही नाही कदाचित ! पण भरवसा वाटेनासा झाला आहे.

जवाहरलाल बुद्धाचे भक्त आहेत, हे खरे आहे; परंतु त्यामुळे दोघांची मानसिक घटना सारखी आहे, असे म्हणता नाही. सम्राट संन्याशाचीही पूजा मनोभावाने करत असतो.

आत्मनिष्ठेचा ध्येयवाद प्रभावी होतो

समर्पणपर व्यक्तित्व थोर असू शकते. अलौकिक पराक्रमयची सामर्थ्ये त्यात असू शकतात. दाशरथी रामचंद्र व ख्रिस्त ही उदाहरणे समर्पणपर व्यक्तींची आहेत.

आत्मनिष्ठा ही बुद्धिवादी असते. बुद्धी जर निद्रिस्त असेल तर तिला ती जागृत करून तिच्यात अनंत अंतरे भेदून जाणारा प्रकाश उद्भव अनासक्तीच्या योगाने ही बुद्धी अधिकाधिक विवेकक्षम होत जाते. समर्पणपर व्यक्ती असावधानपणे परिस्थितीचा अर्थ लक्षात न घेता काम करण्याचा संभव असतो. आत्मनिष्ठेचा ध्येयवाद देशविशेषाच्या मर्यादांना न जुमानता दूरवरच्या गोष्टींचे यथातथ्यपूर्ण दर्शन घडवीत असतो त्यास परमार्थ म्हणतात.

भारतवर्ष पाप व पुण्य या दोघांचे क्षेत्र आहे. कोणताही देश तसा असतो. म्हणून देशास देव मानू नये. देश दीर्घकाल जगतात व मरतातही. ध्येयवाद अमर सिद्धांतांच्या बैठकीवर उभारावा लागतो. मरणास न शिवणारी ध्येये मार्गदर्शक करावी लागतात. जवाहरलालांना अशा ध्येयाचा प्रकाश नित्य लाभावा. उच्च ध्येयवादाच्या स्वप्नमय स्वर्गातून उतरून या भूलोकीच्या क्षणभंगुर राजकीय डावपेचांत ते न सापडोत. डोके शाश्वत ध्येयवादाच्या स्वर्गात व पाय भूलोकावर टेकलेले, अशी त्यांची थोर मूर्ती ६१ व्या वाढदिवसानंतर अधिकाधिक भव्य बनावी अशी आशा मी व्यक्त करतो.

(नवभारत / नोव्हेंबर, १९४९, पृ. ६०)

○○○

२३

स्टॅलिन: कम्युनिस्ट क्रांतीचा कारागीर

"Perhaps truth is most profoundly manifested where the movement is charactarised by the greatest upheaval" - Karl Jaspher.

("मानवी आंदोलनास जेव्हा उच्चतम उद्रेकाचे स्वरूप प्राप्त होते, बहुतेक तेव्हाच सत्याचा गंभीर आविष्कार होतो" कार्ल जॅस्पर्स)

कम्युनिझमने उत्पन्न केलेल्या प्रश्नांचा निकाल लावणे, हेच विद्यमान विश्वव्यापी मानवतावादी आंदोलनाचे उद्दिष्ट आहे. कम्युनिझम संबंधाच्या स्वरूपात जगातील सर्व राष्ट्रे गुंतली आहेत. आज जागतिक चळवळीचे एकमेव लक्षण, कम्युनिस्ट चळवळीच्या पृथक्करणाशिवाय, निश्चित करता येत नाही. कम्युनिझमने ज्या मूलभूत प्रश्नांकडे मनुष्यजातीचे लक्ष खेचून घेतले आहे, त्याचे उत्तर कम्युनिझममध्ये मिळते की नाही, हाच वादग्रस्त मुद्दा आहे. परंतु कम्युनिझमने त्या सर्वश्रेष्ठ व मूलभूत मूल्यांकडे सर्व मानवजातीला आपले लक्ष केंद्रित करावयास लावले, यांत शंका बाळगण्याचे मुळीच कारण नाही. माणसा माणसावरील आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक सत्ता नष्ट कशी करता येईल व समतेचे व व्यक्तिस्वातंत्र्यांचे जीवन माणसास कसे निर्माण करता येईल, असा तो प्रश्न आहे. या प्रश्नाचा निकष लावूनच क्रांतीच्या चळवळीचे योग्य मूल्यमापन करता येते. कम्युनिझमच्या यशापयशाचाही हाच निकष आहे.

वैज्ञानिक सत्य आणि मानवी ध्येयवाद यांची सांगड क्रांतीच्या चळवळीला घालावी लागते. कम्युनिझमचा जरी वैज्ञानिक सत्यावर भर असला तरी ते वैज्ञानिक सत्य मानवी ध्येयवादाला संपूर्णपणे वाहून घेतलेले आहे, असा दावा कम्युनिझमलाही करावा लागतो. स्टॅलिनच्या क्रांतीच्या कर्तृत्वाचे मूल्यही वरील ध्येयवादास अनुसरूनच करावयास पाहिजे. कारण मूल्य मीमांसा करण्याचा मानदंड ध्येयवादच असतो. ध्येयवादाशिवाय मूल्य मीमांसा करणेच अशक्य असते.

ऐतिहासिक भौतिकवादाचे मूर्तिमंत चैतन्य

स्टॅलिनच्या निधनाने जागतिक इतिहासातील एक कालखंड समाप्त झाला. स्टॅलिन मेला, त्या क्षणी मानवी जगात त्याच्याइतकी प्रभावज्ञान व्यक्ती कोणी नव्हती. स्टॅलिन मेला, त्या आधुनिक जगाच्या समोरून एक उच्चतम वीर विभूती निघून गेली, असेच एकदम निदर्शनास आले. श्रेष्ठ विभूतिमत्ता ज्या राजकीय पुरुषांना आजपर्यंतच्या मानवी इतिहासात आली आहे, त्यांच्यात स्टॅलिनचे स्थान ध्रुवाइतके अढळ राहील. तो अधिक जगला असता तर हे विधान करता आले असते की नाही, हे मात्र सांगवत नाही. त्याला नेपोलियनसारखा पराभव मिळालाच नसता, असे म्हणवत नाही. स्टॅलिनच्या जीवनातील सगळे पराजय त्याच्या विजयाच्या उत्तुंग पर्वतमालांनी मानवाच्या दृष्टिप्रथाच्या आड झाले आहेत. त्याचे जीवन क्रांतिकारकाचे जीवन होते. सन १९०२ पासून १९१७ पर्यंत सतत पंधरा वर्षे भडकलेल्या आगीत उभा राहून, झारच्या प्रचंड सत्तेशी लढा देत तो उभा होता! अद्भुतरम्य साहसाने भरलेला रोमांचकारी लढ्याचा इतिहास, असे स्टॅलिनच्या चरित्राचे स्वरूप आहे. त्यात त्याला कितीतरी वेळा हार खावी लागली आहे. परंतु १९१७ सालानंतरचा क्रांतीच्या विधायक रचनेचा इतिहास यशाच्या अनेक धवलगिरींचा साक्षात्कार करून देतो.

स्टॅलिनच्या मृत्यूनंतर गोंधळ माजेल, सत्तेच्या स्पर्धेतून यादवी निर्माण होईल अशी आशा कम्युनिस्टविरोधी गट करीत आहेत. ही आशा खोट्या वासनेतून निर्माण झाली आहे. वस्तुस्थितीच्या अज्ञानाने ही आशा उत्तेजित केली आहे. स्टॅलिनचे दीर्घकालपर्यंत पसरलेले यशस्वी व प्रतापी कर्तृत्व न तपासल्यामुळे अशी खोटी आशा उत्पन्न झाली आहे! संघटनाचातुर्य व वस्तुवादी वृत्ती हे स्टॅलिनच्या यशाचे एक महत्त्वाचे कारण आहे. अहंता आणि ममता यांची बाधा विवेकाला होण्याइतके त्याचे मन दुर्बळ नव्हते. प्रतापी सामर्थ्याचे हे दौर्बल्य इतिहासप्रसिद्ध आहे. त्या दौर्बल्यामुळेच त्यांना यशाचा उन्माद होतो, जगाचे नेतृत्व किंवा गुरुत्व प्राप्त झाल्याचा भास उत्पन्न होतो. दौर्बल्यदर्शक मनोवृत्तीची बाधा स्टॅलिनला झालेली नव्हती, म्हणून त्याने 'माझ्यापाठीमागे काय होईल' असा प्रश्नच त्याला पडला नाही. 'माझ्यापाठीमागून काय होणार आहे हे मला पूर्ण माहीत आहे' असा निर्वाळा त्याने चर्चिलला दिला होता. त्याने दोन भक्कम संघटना आपल्या प्रत्यक्ष देखरेखीखाली निर्मिल्या. त्या म्हणजे प्रचंड पक्ष व विशाल एकजीव राष्ट्र. तो व्यक्तिशः हुकूमशहा होता. तो प्रथम क्रांतीचा शिपाई होता व नंतर क्रांतीचा सेनापती झाला. सशस्त्र क्रान्तीचा उठाव करण्याचे ध्येय त्याने जन्मभर जवळ बाळगिले व वागविले. त्यामुळे त्याने पक्षाला लष्करी संघटनेचे स्वरूप दिले आणि राष्ट्राला सैन्याचे शिबिर बनविले. प्रत्येक गाव आणि शहर म्हणजे लढाऊ किल्ला बनला. प्रत्येक नागरिक सैनिक झाला. म्हणून पाश्चात्त्य संस्कृतीच्या राजकारणी प्रवृत्तीचे ऐकांतिक व प्रत्यक्ष निदर्शन म्हणजे सोव्हिएट रशिया होय, असे इतिहासशास्त्रज्ञांस म्हणावे लागेल. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर गडबड व गोंधळ उडणार नाही, याची हमी स्टालिनचे व्यक्तिमत्त्वच देते. स्टालिनच्या व्यक्तिमत्त्वाचे पृथक्करण करा, त्यांत

ऐतिहासिक भौतिकवादाचे चैतन्य सापडेल. हे चैतन्य (spirit) हेगेलच्या चैतन्यवादाचे मूर्तिमंत स्वरूप होय. मानवी इतिहासात चैतन्य प्रचंड राज्यशक्तीच्या रूपात प्रकट होते, असा इतिहासवाद हेगेल सांगून गेला. हेगेलला असा भास झाला की जर्मन राज्य हेच ते चैतन्याचे मूर्तिमंत रूप होय.

तो भास होता. स्टॅलिनने निर्माण केलेले सोविएत राज्य हे मात्र चैतन्याचे साकार रूप होय, असे हेगेलच्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाप्रमाणे म्हणता येते. कार्ल मार्क्सच्या कम्युनिझमचे मात्र हे स्वरूप नव्हे. त्यात व्यक्ती पूर्ण स्वतंत्र असते. स्टॅलिनच्या सोव्हिएट युनियनमध्ये व्यक्ती ही राज्यास समर्पित आहे व राज्य हे पक्षास समर्पित आहे. तेथे पक्षाची हुकूमशाही अनिर्बंधपणे नांदत आहे. म्हणून स्टॅलिननंतर काय होणार ही शंकाच अस्थानी आहे.

स्वत:स विभूती न समजणारी विभूती!

स्टॅलिन ही या शतकातील अद्वितीय राजकीय विभूती होय, ही गोष्ट विभूतिवादी इतिहासकाराने तर मान्य केली पाहिजे. मी स्वत: विभूतिवादी नाही किंवा विभूतिपूजकही नाही. कारण माझे असे मत आहे की, प्रत्येक महान ऐतिहासिक घटनेला जन्म देण्याकरिता विभूती लागतेच असे नाही. विशिष्ट विभूतीवाचूनही इतिहासाची श्रेष्ठ सामर्थ्ये प्रकट होतात. विविध क्षेत्रांत अगणित कर्तृत्वशाली व्यक्तींच्या सामुदायिक तेजानेही मानवी कालखंड तेजस्वीपणाने तळपत असलेले इतिहास दाखवितो. परंतु कित्येक वेळा विलक्षण विचारसामर्थ्याच्या व्यक्तींनाही इतिहासात अलौकिक स्थान लागते. कित्येकदा इतिहासच अशा व्यक्तींना निर्माण करतो. सोव्हिएट युनियनच्या इतिहासाने अशी अद्वितीय व्यक्ती प्रकट केली आहे, हे मात्र नाकारता येत नाही.

स्टॅलिन स्वत:स विभूती समजण्याइतका भाबडा अथवा अहंकारी नव्हता. भावनांच्या भ्रमात न सापडणारे पोलादी व्यक्तित्व त्याच्या ठिकाणी होते. त्याला देव किंवा सैतान मानणाऱ्या माणसांबद्दल तो मनातल्या मनात कीव करीत असेल. ट्रॉट्स्की हा मानवी इतिहासात नावाजलेल्या उच्चतम वक्त्यांमध्ये गणला जातो; त्याची लेखनशैलीही श्रेष्ठ प्रतीची आहे; व त्याबद्दल त्याला खूप अस्मिता व घमेंडही होती. तो या आपल्या गुणांमुळे सामान्य माणसांना तुच्छ लेखीत होता. ट्राट्स्कीची ही सामान्य माणसांना तुच्छ लेखण्याची प्रवृत्ती स्टॅलिनने ओळखली म्हणूनच तो ट्रॉट्स्कीबद्दल घृणा बाळगीत होता. स्वत:स विभूती न समजणारी अशी विद्यमान जगातील अद्वितीय विभूती, असे स्टालिनचे वर्णन करता येईल. स्टॅलिनला सैतानाच्या किंवा दैत्यदानवाच्या कोटीत गणणारे अनेक विचारवंत आहेत! त्यांना स्टॅलिनचे मनुष्यत्व ओळखता येत नाही. याचे कारण, स्टॅलिन हा क्रांतीचा प्रणेता होता, या कल्पनेचा त्यांना अर्थ समजत नाही, हे होय. इतिहासाच्या तत्त्वज्ञानात हेगेलने मुद्दाम बजाविले आहे की, जे पुरुष मोठ्या ऐतिहासिक घटनांचे जन्मदाते असतात, त्यांना सर्वसामान्य माणसांना लागू पडणारे नीतिशास्त्र लागू करणे चूक होय. त्यांनी उभारलेली राज्ये किंवा संस्था किंवा महान चिरंतन कृती त्यांच्या हातून झालेल्या प्रमादांचे परिमार्जन करणाऱ्या पुण्यराशीच बनतात, मानवी नैतिक जीवनाच्या सत्त्वांशाच्याच त्या राशी होत. हेगेलने प्रतिपादिलेल्या त्या दृष्टिकोनावरून स्टॅलिनचे समर्थन होऊ

शकते. दुसरे असे की, महाकाव्ये आणि श्रेष्ठ घटनांचे इतिहास ज्या प्रकारच्या शूर विभूतींचे वर्णन करतात, त्या प्रकारात स्टॅलिनचा समावेश होऊ शकतो, ही गोष्ट तटस्थ बुद्धीच्या विवेचकास मान्य करावी लागते. विभूतीच्या श्रेष्ठतेबद्दल तीव्र मतभेद होणे हे अत्यंत स्वाभाविक आहे. क्रांतीच्या स्वभावातच तीव्र मतभेदाला पोषक असलेली भूमिका भरलेली आहे. क्रांती ही तीव्र संग्रामावस्थेचीच परिणती होय. जुन्या बाधक व संकुचित सामाजिक हितसंबंधांचा संहार करणे आणि नवे सर्वसाधारण व्यापक सामाजिक हितसंबंध निर्माण करणे हा क्रांतीचा कार्यक्रम असतो. क्रांतीच्या इष्टतेबद्दल परस्परविरोधी असलेले सिद्धांत प्राज्ञांनी सांगितलेले दिसतात, क्रांतीशी संबंध नसलेले परंतु इतिहासप्रसिद्ध अथवा पुराणप्रसिद्ध राज्यधारी पुरुषदेखील मतभेदाचा विषय बनतात. राजनीतीची वक्रता, कुटिलता अथवा सामान्य नैतिक तत्त्वांबद्दल बेफिकिरी ही पौर्वात्यांच्या व पाश्चिमात्यांच्या राज्यशास्त्रात महशूर आहे. म्हणून राजनैतिक महत्पदास प्राप्त झालेल्या व्यक्ती साधुत्वाच्या सुप्रसिद्ध कसोटीस क्वचितच उतरतात. रामचरित्रही यास अपवाद नाही, हेही येथे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

राष्ट्रावादाचा मागच्या दाराने प्रवेश

कम्युनिझम ही मानवव्यापी आंतरराष्ट्रीय विचारसरणी व चळवळ आहे. राष्ट्रवादाच्या संकुचित भावनांशी या विचारसरणीचा खास विरोध आहे. या आंतरराष्ट्रीय चळवळीला पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस रशियात राहण्यास घर मिळाले. परंतु रशियासारखे आधुनिक औद्योगिक क्रांतीत मागासलेले राष्ट्र हे कम्युनिझमचे अपेक्षित घर नव्हे. औद्योगिक क्रान्तीत पुढारलेले भांडवलदारी राष्ट्रच कम्युनिस्ट क्रांतीचे खरे जन्मस्थान होय. तेथेच कम्युनिस्ट क्रान्ती जन्मास येण्यास आवश्यक अशी सामाजिक परिस्थिती परिणतीस पावलेली असते, असा मार्क्स व लेनिन यांचा सिद्धान्त होता. 'जर्मनीसारख्या सुधारलेल्या देशातील क्रान्ती हाती येत असेल तर रशियन क्रान्तीचा हात सोडण्यासही मी तयार होईन' असे लेनिन म्हणत असे. मार्क्सवादाने ठरविलेली तत्त्वपद्धतीच ऐतिहासिक क्रम उल्लंघून कम्युनिस्ट क्रान्तीने रशियासारखा मागासलेला देश आश्रयास घेतला. तत्त्वपद्धती आणि वस्तुस्थिती यांच्या विरोधातून मार्ग काढणे हेच मोठे बिकट काम क्रांतिकारकांच्या पुढे उभे राहिले. हे एक मोठे व्यावहारिक कोडे होते! रशियातील आर्थिक शक्ती दुबळी होती, कामगारवर्ग बेकारीत व हलाखीत दिवस काढीत होता. जनतेचे जीवनमान अगदी आजच्या खालच्या पातळीवर खिळलेले असून भकास बनले होते. म्हणून १९१७ साली झालेली क्रांती सात-आठ वर्षांच्या आत निरुत्साही बनली. लेनिन परलोकवासी झाला होता. आंतरराष्ट्रीय क्रांतीच्या आशा मावळल्या होत्या. जर्मनीत एवढ्या अवधीत तीन वेळा कामगार क्रांतीची संधी आली, परंतु स्फोट होण्याच्या आधीच तिला ओहोटी लागली. क्रांतीच्या पराभवाचाच इतिहास युरोपियन रंगभूमीवर नृत्य करू लागला. स्टालिनने हे सर्व ओळखले. तत्त्वांचा व आंतरराष्ट्रीय क्रांतीचा घोष करीत क्रांतीचे प्राण कंठाशी आलेले त्याने पाहिले. म्हणून त्याने क्रांतीची मर्यादा ध्यानात घेतली. 'एकाच देशातही समाजवाद' स्थापता

येतो या विचाराचे सूत्र त्याने रशियातील कम्युनिस्ट पक्षाला शिकविले. जगात अन्यत्र क्रांती फैलावण्याच्या प्रयत्नांत माहेरघरची स्वदेशातली क्रान्ती पराभूत व्हावयाची, म्हणून जागतिक क्रांतीना उठाव होण्याची संधी बघत बसण्यात अर्थ नाही, असे त्याने ठरविले.

राष्ट्राच्या सीमामंडळातच क्रांतीला दृढमूल करावयाचे व वाढवावयाचे हे ठरल्यावर राष्ट्रवादाशी जुळते घेण्याची कामगिरी स्टालिनला करावी लागली. राष्ट्रवाद कम्युनिझमच्या गोटात मागच्या दाराने शिरला. रशियन देशाभिमान पुनः जागृत करण्याचे काम राष्ट्रभेदाच्या मर्यादा न ओळखणाऱ्या व सर्व जग एक समजणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाच्या कपाळी आले. पूर्वजपूजा, परंपरेचा अभिमान, राष्ट्रीय वीरांचे गुणगान, राष्ट्रीय इतिहासाची कृत्रिम रचना इत्यादी प्रतिगामी म्हणून धिक्कारलेली अंगे कम्युनिस्टांनी रशियात अंगीकारिली. राष्ट्रवादाच्या या सकुंचित भावनेचा पुनरुद्धार जरी स्टालिन करीत होता, तरी त्याने आंतरराष्ट्रीय कम्युनिझमची चळवळ या रशियन राष्ट्रवादाच्या दर्पापासून दूर ठेविली, हे सर्वांत अवघड, किंबहुना अशक्य कार्य स्टालिनला करून दाखविता आले. या बाबतीत आंतरराष्ट्रीय कम्युनिझमची चळवळ मात्र संधिसाधू तत्त्वच्युत झाली. भांडवलशाहीची साम्राज्ये उलथून टाकण्यास त्या त्या राष्ट्रातील प्रतिगामी राष्ट्रवादांना भडकविण्याचे काम कम्युनिझमने सुरू केले. परंतु याच्या उलट असेही दिसते की खुद्द सोव्हिएट यूनियनमध्ये अनेक राष्ट्रे होती, ती सुधारणेच्या भिन्न भिन्न पातळीवर, खाली-वर होती. स्टॅलिनने कम्युनिझमच्या द्वारा ही संकुचित राष्ट्रीयत्वे नामोहरम केली आणि 'कम्युनिझमची पितृभूमी' या भावनेच्या ललकारीने एकसंध विशाल राज्य निर्माण केले.

मागासलेल्या देशांत क्रांतीचा महान प्रयत्न

स्टॅलिनला, मागासलेल्या राष्ट्रांत, सर्वांत पुढारलेल्या ध्येयवादाची उपासना करणारी क्रांती रचावयाची होती. त्या ध्येयवादाला लागणारी नागरिकांची उच्चतर मानसिक संकृती येथे नव्हती. यांत्रिक औद्योगिकी क्रांतीने निर्मिलेल्या विशाल आर्थिक वैभवाची योग्य वाटणी करण्यास आवश्यक असलेला वर्ग निरसनाचा राजकीय व सामाजिक कार्यक्रम अमलात आणणे एवढेच कार्य तेथे नव्हते. तेथे औद्योगिक क्रांतीच अस्तित्वात नव्हती. तेथे या औद्योगिक क्रांतीशी संलग्न अशी लोकशाही नव्हती; किंवा मानवी मूलभूत हक्कांचा पुस्कार करणारा उदारमतवादही नव्हता. कम्युनिझमचे समतेचे ध्येय सरळ पटवून घेणारी मानसिक संस्कृतीच तेथे नव्हती. अज्ञानी, दरिद्री, माणुसकीचे, स्वातंत्र्याचे महत्त्व न कळलेली अशी ती अर्धरानटी अवस्थेतली जनता होती. त्या ठिकाणी सर्वच काही पहिल्यापासून निर्माण करावयाचे होते. क्रांती हे केवळ स्वप्न होते. झालेली क्रांती त्या मागासलेल्या जगातील वैराण प्रदेशात सहज लुप्त होऊन गेली असती! या सर्व परिस्थितीचा अर्थ समजलेला वस्तुवादी ध्येयनिष्ठ आणि अनंत हिम्मत बाळगणारा स्टॅलिन, पक्षाची व सत्तेची संघटना करून, हुकूमशाहीच्या साधनाचा पुरेपूर उपयोग करण्यास सज्ज झाला. कम्युनिझमच्या प्रत्यक्ष उभारणीचा कार्यक्रम त्याने आखला. त्याने उदारमतवादाची फिकीर बाळगली नाही. कारण रशियन संस्कृतीचा त्या ध्येयाशी काहीही संबंध नव्हता. विवेकसंपन्न,

सुसंस्कृत व स्वयंस्फूर्तीने कार्य करणारा नागरिकवर्ग रशियात नव्हता. म्हणून अशा नागरिकांच्या संघटनेचे नीतिशास्त्र स्टॅलिनने मान्य केले. मर्यादित कालखंडात ठरावीक कार्यक्रम पार पाडणे हे अत्यंत जरुरीचे आहे, नाही तर पूर्ण धोका व विनाश ठरलेला आहे, असे ओळखून संघटनेची हुकूमशाही तत्त्वेच स्टॅलिनने अंगीकारिली. मार्क्स व लेनिन यांच्या क्रांतिशास्त्रांत कामगार-हुकूमशाहीचे तात्पुरते अवलंबन करणे हे प्रशस्त मानलेच होते. पक्षाची हुकूमशाही तंत्रदृष्ट्या प्राप्तच होती. स्टॅलिनला दुसरा मार्ग मोकळा नव्हता. अराजक ध्येयवादाकडे जाण्याकरिता तात्पुरती परंतु आवश्यक पायरी म्हणून जी हुकूमशाही मार्क्सवादाने समर्थित केली, तिची प्रचंड स्वरुपातली उभारणी स्टॅलिननी केली. कारण, गत्यंतरच नव्हते. मागासलेल्या देशांत वर्गहीन क्रांती उभारण्याच्या प्रयत्नाला याशिवाय दुसरे फळ येणे अशक्य होते.

नियोजन-युगाचा प्रणेता आणि अजिंक्य वीर

स्टॅलिनने नवी सत्ता, नवी अर्थरचना आणि नवा समाज निर्माण केला. नियोजनयुगाचा स्टॅलिन हाच प्रणेता होय. नियोजनाचा कार्यक्रम यशस्वी करून दाखवून स्टालिनने जगाचे अर्थशास्त्रच बदलून टाकले. गरीब शेतकरीवर्ग धरणाची वीज व धरणाचे पाणी विकत घेण्यास असमर्थ असतो; मोठमोठी धरणे आणि विद्युत उत्पादनाची केंद्रे आर्थिकदृष्ट्या डबघाईस आलेल्या राष्ट्रांत निर्माण केल्यावर त्याला गिऱ्हाइकाचा बाजार मिळत नसतो. स्टॅलिनने सामुदायिक शेतीचा प्रयोग करून नवा बाजार निर्माण केला. जीवनमान वाढविण्याचा प्रश्न हुकूमशाहीच्या जोरावर मागे रेटला. जास्त श्रम व कमी मोबदला, या धोरणाची अंमलबजावणी केल्याशिवाय राष्ट्राची उत्पादनशक्ती विस्तारणे अशक्य आहे असे त्याने पाहिले. याही धोरणाकरिता हुकूमशाही राज्यपद्धतीचा स्टॅलिनला उपयोग करून घेता आला. राष्ट्राच्या आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला हुकूमशाहीने वेग आला. रॅडेक, सिनॉचिव्ह, बुखारिन, कॅमेनेव्ह, क्रॉसिन, रॅकोवस्की, ट्रॉटस्की इत्यादी क्रांतिकारकांना नष्ट करण्याचे क्रूर कृत्य स्टॅलिनला करावे लागले, म्हणून त्याला टीकाकार क्रूर समजतात. राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारची आहे यावर या कृत्यांची मीमांसा अवलंबून आहे. वरील सगळे क्रांतिकारक, कामगार वर्ग व कामगारांचा पक्ष यांच्या हुकूमशाहीचे तत्त्व मान्य करणारे होते. हुकूमशाही ही कठोर नसावी, हे म्हणजे तलवारीला धार नसावी असे म्हणण्याइतकेच अनुचित आहे. क्रांतिकारकांना बळी देणे हे क्रांतीचे ऐतिहासिक कार्य आहे. 'क्रांती ही पुत्रभक्षक माता आहे' ही सुप्रसिद्ध म्हण ध्यानात ठेवली पाहिले. स्टॅलिनला प्राप्त कर्तव्य पार पाडणे अपरिहार्य होते. भगवद्गीतेचा आदेश प्रमाण मानणाऱ्यांना स्टॅलिनचे कृत्य गर्ह्य वाटणार नाही. आडवा आलेला गर्भ कापावा लागतो, कापणाऱ्याला कोणीच दोषी ठरवीत नाही, असेही स्टॅलिनचे समर्थन होऊ शकते. राज्य करीत असताना शत्रूचे दमन करणे व कंटकांचा उच्छेद करणे हे सर्व राजनीतीला मान्य असलेले सूत्र आहे. हे क्रूर कृत्य टाळणे हेच स्टॅलिनला महत्त्वाचे वाटले असते, तर राज्याच्या नेतृत्वाचा राजीनामा देण्याशिवाय दुसरा इलाज शक्य झाला नसता.

पंचवार्षिक योजनांच्या साफल्याने स्टॅलिन हा विधायक कर्तृत्वाचा आदर्श ठरला. परंतु विश्वाला भय उत्पन्न करणारा अजिंक्य वीर म्हणून त्याची ओळख जगास तोपर्यंत पटली नव्हती. विश्वमान्य विजयी सेनापतीचा जो काही इतिहास आज माहीत आहे, त्यात स्टॅलिनने उच्चतम स्थान दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस मिळविले. त्याची पूर्वतयारी त्याने १९१७ सालापासून १९४० सालापर्यंतच्या काळात केली. सोव्हिएत युनियनची सर्वांगीण रचना करण्यात त्याने सर्व प्रकारच्या सामाजिक शक्ती पणास लावल्या. अस्त, व्यस्त, अर्धरानटी, मतिमंद व पडिक स्थितीतल्या जुनाट जगाच्या कुशीतून, सुशीत ओतलेल्या पोलादी पुरुषाप्रमाणे सामर्थ्यशाली व भव्य राष्ट्र त्याने निर्मिले. हे निर्मित असता जगातील सर्व राष्ट्रांमध्ये, जगाच्या कानाकोपऱ्यातही त्याने सोविएट युनियनच्या ध्येयवादाचा झेंडा घेऊन उभे असलेले कम्युनिस्ट गट संघटित केले. जागतिक कम्युनिस्ट चळवळीशी सोविएट युनियनच्या राजकारणाचा आत्मीयतेचा संबंध कायम राखतात. हिटलरची पोलादी सेना सोविएट युनियनच्या तटबंदींना आरपार फोडून जेव्हा खोलवर शिरली, तेव्हा स्टॅलिनची लाल सेना हजारो मैलांपर्यंत लढत लढत मागे रेटली गेली होती. अशा प्रसंगी पराभव जवळजवळ अटळ दिसत होता. परंतु राजकीयदृष्ट्या सोविएट यूनियनची किंमत याच वेळी अत्यंत उंचावली होती. त्यामुळे राष्ट्राचे धैर्य अधिक मजबूत झाले. 'राजनैतिक विजय प्रथम मिळवावयाचा, त्यामुळे दीर्घ काळ टिकाव धरता येईल. शत्रूचा दम आटेल आणि अखेरीस लष्करी विजय प्राप्त होईल', असा अंदाज स्टॅलिनने हिटलरी आक्रमणाच्या पहिल्या दिवशीच सूचकपणे व्यक्त केला होता.

जुन्या जगास आव्हान

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील सर्वांत मोठ्या अजिंक्य सेनेचा निर्माता म्हणून स्टॅलिन जगाच्या दृष्टीसमोर उभा राहिला. सर्व पूर्व युरोप लाल झाला. कम्युनिझमने एक तृतीयांश मानवजात लाल झेंड्याखाली आणली. परंतु सुसंस्कृत मनुष्याची, स्वातंत्र्यपूर्ण व विश्वबंधुत्वाने व्यापलेली संस्कृती लवकरच अवतरेल, ही आशा मात्र दुरावली आहे. स्टॅलिनने ज्या प्रकारची कम्युनिझम मूर्तरूपास आणली आहे, तिच्यात मानवतावादी चळवळीस समाधान प्राप्त न होता निराशाच निर्माण होते. कम्युनिझमच्या कक्षेबाहेरील राष्ट्रांतील संस्कृती जीर्ण, अवनत व पतित झाली आहे. तिच्या समर्थकांना व राज्यकर्त्यांना कम्युनिझमचे भय वाटते. कारण कम्युनिझम ही जुन्या जगाला आव्हान देणारी शक्ती आहे. 'बदला नाही तर मरणास तयार व्हा' असे ते आव्हान आहे. मरण जवळ येत आहे, अशी भीती या जुन्या जगाच्या हृदयाला शुष्क करीत आहे. या जुन्या जगाला आत्मविश्वासच वाटत नाही. कारण तसे वाटण्यासारखे त्याच्यापाशी काहीही शिल्लक नाही. पाश्चात्त्य राष्ट्रांची राजकीय लोकशाही व त्यांचा उदारमतवाद निस्तेज झाला आहे आणि पौर्वात्य राष्ट्रांचा अध्यात्मवाद कल्पित व भावुक कथांची कथा बनली आहे; त्यांचा पोकळ दिमाख अध्यात्मवादाच्या लष्करांनी उघडा पाडला आहे.

मानवतावादी मूल्यांना दुय्यम स्थान!

विज्ञान, यंत्र व आधुनिक उत्पादनतंत्र यांच्या महिम्यावर, स्टॅलिनने मूर्तस्वरूपास आणलेला कम्युनिझम पूर्ण श्रद्धा ठेवतो. परंतु वैज्ञानिक दृष्टिकोनास कम्युनिझमच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानात स्थान राहिलेले नाही. प्रत्येक तत्त्वावर आक्षेप घेण्याचा अधिकार मानणे हे या दृष्टिकोनाचे पहिले सूत्र आहे, त्याशिवाय समीक्षाच अशक्य आहे. समीक्षेलाच कम्युनिस्ट पक्षाच्या श्‍ब्दप्रमाण्याने शृंखला घातल्या आहेत. हे एक उच्चतम मानवी मूल्यच आधुनिक कम्युनिझमने भ्रष्ट केले आहे. त्यामुळे मानव्याच्या अंतरंगाशी त्याने प्रतारणा केली आहे. विचारस्वातंत्र्य हे ज्ञानसाधनानेचे प्रेरक तत्त्व आहे, याचा पूर्ण विसर कम्युनिस्ट पुरोहितशाहीला पडला आहे. विसाव्या शतकातला कम्युनिझम म्हणजे मध्ययुगीत युरोपातील चर्चेत प्रकट झालेले पिशाचच होय. मानवी समतेचा किंवा मानवाने मानवावर सत्ता चालविता कामा नये याचा ध्यास धरून प्रथम कम्युनिझमची व समाजवादाची चळवळ जगात उत्पन्न झाली; परंतु विसाव्या शतकातील कम्युनिझमने निर्माण केलेल्या राज्यसंस्थेत नागरिक हा राज्यसत्तेचा पूर्ण अंकित झाला आहे. केंद्रीभूत मध्यवर्ती, सत्तेचा अनन्यभक्त असे नागरिकाला स्वरूप प्राप्त झाले आहे. लेनिनसारख्या कम्युनिस्टांनी प्रत्यक्ष लोकशाही (Direct Democarcy) हेच कम्युनिझमचे राजकीय स्वरूप पाहिले. हे नैतिक, ध्येयवादी प्रेरणेला उत्तेजित करणारे स्वरूप आधुनिक कम्युनिस्ट पूर्णपणे विसरला आहे. सोव्हिएट युनियनच्या स्तुतिपाठाच्या पोथ्या पाठ करीत आधुनिक कम्युनिस्ट श्रद्धाजड बनला आहे. एकतृतीयांश मानवजातीत जो कम्युनिझमचा प्रयोग सुरू आहे. त्याच्यात मूलभूत मानवी मूल्यांना जर मूर्तिमंत स्वरूप देण्याचा प्रयत्न सफल होत असता तर पाश्चात्त्य राष्ट्रातील नागरिकाने त्याचे सौहार्दाने प्रथम स्वागत केले असते. आज भांडवलशाही अर्थव्यवस्थेची अब्रू कोठेच शिल्लक राहिलेली नाही. पाश्चात्त्य राष्ट्रांतील भांडवलशाहीच्या नावाने खडे फोडणे हेसुद्धा अंधपरंपरेचेच लक्षण आहे. प्रयोगात आलेला कम्युनिझम मानवाला बंधमुक्तीची आशा निर्माण करू शकत नाही. कम्युनिझमच्या पलीकडे गेले पाहिजे; कारण कम्युनिझमने मानवतावादी मूल्यांना दुय्यम स्थान दिले आहे. स्टॅलिनने कम्युनिझमला व्यवहार्य आणि मूर्तिमंत स्वरूप दिले. हेच त्याचे जागतिक इतिहासातील अद्वितीय कार्य आहे. त्याच्या कार्याची नीट समीक्षा करून माणसाने पुढे जावे, असा इशारा त्याचा अस्त देत आहे.

(नवभारत, मे, १९५३)

○○○

२४

जुन्या जगाची बंधने तोडणारा तत्त्वद्रष्टा: मानवेंद्रनाथ रॉय

चौथ्या प्रजासत्ताक दिनाला दहा मिनिटे उरली होती. मानवेंद्रनाथ रॉय यांची जीवनज्योती मावळली. प्रजासत्ताक दिन भारताच्या क्षितिजावर उगवण्याकरिता ज्यांनी जीवित समर्पित केले त्यांच्यापैकी रॉय हे एक होत. या प्रजासत्तेच्या स्थापनेकरिता या देशात जो संग्राम अनेक वर्षे चालला होता, त्यातील या शतकाच्या प्रारंभापासूनचे वीर रॉय हे होते.

वयाच्या १४ व्या वर्षांपासून घरादाराचा त्याग करून स्वातंत्र्यसंग्रामात रॉय हे उतरले. ते घराकडे पुन्हा वळले नाहीत; व त्यांनी घरही पुन्हा बांधले नाही. पृथ्वीवर माणसाचे घर स्थिरपणे बांधले कसे जाईल, हा प्रश्न त्यांनी सोडवला. मानवी स्वातंत्र्याचे अत्यंत कठीण प्रश्न सोडविण्याकरिता वैचारिक संग्राम करीत असता ते हे जग सोडून गेले.

गेल्या २६ तारखेस भारतीय जनता प्रजासत्ताक दिनाचा उत्सव साजरा करीत होती. लोकशाहीच्या उत्सवात रंगून गेली होती. तिकडे डेहराडून येथे रॉय यांची अंतिम यात्रा सुरू होती. लोकशाहीचा विशाल महाल रॉय यांच्या तत्त्वज्ञानाच्या व कार्यक्रमाच्या पायावर उभारला तर उभा राहील, नाही तर कोसळेल. लोकशाहीस मूलभूत असलेले तत्त्वज्ञान व सामाजिक कार्यक्रम शोधणारा विश्वाच्या अंतरंगात विलीन होत होता, याची जाणीव लोकांना झाली नाही. हरकत नाही. त्यानेही याची अपेक्षा कधीच बाळगली नहती.

'जेव्हा सगळे निद्रिस्त आहेत...'

''लंब्या लक्षात ठेव, जेव्हा सगळे राष्ट्र जयजयकार गर्जत असते, क्रीगलाही फासावर हसत लटकण्याचे शौर्य चढते. परंतु जेव्हा कोणीही लक्ष देत नाही, सगळे निद्रिस्त आहेत, अशा वेळी फासावर हसतमुखाने जाण्यास उद्युक्त होणारा विरळा! अशी माणसे पाहिजेत!'' क्रांतिकारक ज्यांना वडिलांप्रमाणे मानीत ते जतीनदादा सोळा वर्षांच्या नरेंद्रला म्हणाले होते, ''आज यतींद्रनाथ नाहीत, ते असते तर–''

रॉय यांची अंगकाठी १६-१७ वर्षांचे असताना खूप उंच दिसू लागली होती. त्यामुळे क्रांतिकारकांमध्ये प्रेमाने 'लंबू' असे म्हणत. जागतिक भ्रमण व कारावास संपवून परत आल्यानंतर रॉय यांनी आपल्या पूर्वायुष्यातील सहकाऱ्यांच्यामध्ये काही आठवणी सांगत असता, यतींद्रनाथांचे वरील उद्गार उद्धृत केले होते. यतींद्रनाथ हे क्रांतिकारकांचे 'दादा' समजले जात. ते सर्वांची आईप्रमाणे काळजी वाहात, जिवापेक्षा जपत. कोणाला कशाची वाण पडू नये, म्हणून खपत. एक लहानसा गट सशस्त्र बंडाकरिता तयार होत होता. त्या वेळी एवढी प्रचंड ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्यास तयार झालेला हा लहानसा गट पाहून छोट्या नरेंद्राने त्यांना विचारले, "जतीनदादा, ही थोडीशी माणसे शेवटपर्यंत टिकाव धरतील का? हा तलवारीच्या धारेचा, आगीचा मार्ग आहे." जतीनदादाने दिलेले उत्तर रॉय वरीलप्रमाणे सांगत असत.

सशस्त्र बंडाच्या कल्पनेतून झालेली मुक्तता

रॉय यांनी अखेर डेहराडून येथे देह ठेवला. डेहराडूनशी त्यांचा संबंध १९१२ साली आला होता. हार्डिजवर दिल्ली दरबारच्या वेळी बाँब उडाला. या कटाचे अध्वर्यु प्रथम डेहराडूनला अज्ञातपणे येऊन राहिले होते. त्यांना भेटण्याकरिता रॉय प्रथम डेहराडूनला गेले होते. रॉय हे या सशस्त्र बंडाच्या कल्पनेतून १९१८ सालानंतर मुक्त झाले. उच्च दर्जाची शुद्ध श्रद्धा हा यांचा स्थायिभाव होता. त्यामुळे विवेकाने आणि बुद्धीने दिलेले निर्णय सर्वस्व पणाला लावून ते पाळीत आले. अशक्य आणि असाध्य हे शब्द उच्च श्रद्धा मानीत नव्हते. म्हणूनच ब्रिटिश राज्य पहिल्या महायुद्धाच्या संकटात सापडलेले पाहिल्याबरोबर हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर लक्षावधी शस्त्रास्त्रांची जहाजे उतरविण्याची रॉय यांनी पराकाष्ठा केली. चितगाव, पाँडेचारी, गोवा इत्यादी भारतीय बंदरांवर अस्वस्थपणे इंग्रज सरकार रात्रंदिवस लक्ष ठेवून बसले होते. रौलेट कमिटीच्या चौकशीच्या वृत्तांतात या प्रकरणाची हकिकत तपशीलवार सापडते.

चीनचे थोर नेते सन यत सेन यांनी रॉय यांच्या मनातील सशस्त्र बंडाची कल्पना पालवली. राष्ट्रातील प्रजा जागृत करणे हे पहिले काम आहे; थोड्या निवडक लोकांचे बंड मोडून पडेल, ही गोष्ट रॉय यांना पटली. आंतरराष्ट्रीय राजकारणातील पहिले वंद्य पुरुष सन यत सेन रॉय यांना भेटले. राज्यसंस्था हा चिनी संस्कृतीचा गाभा होय. राज्यविषयक शहाणपणाची चिनी लोकांची परंपरा लाभलेले सन यत सेन हे गृहस्थ होते.

अखंड वैचारिक

रॉय यांच्या विचारांना यानंतर नवी दिशा लागली. ते देशांतर करीत असताच नव्या ध्येयवादाचा अभ्यास करीत होते. अमेरिकेत आणि मेक्सिकोत त्यांना नवे अनुभव मिळाले, तसे नवे विचारही मिळाले. खऱ्या वैचारिक जीवनाचा प्रारंभ येथे झाला. परंतु विचारांचे परिशीलन प्रत्यक्ष कार्यक्रम यांची संगती सारखी, समतोल राहात गेली. भारतातून बाहेर

गेलेल्या, निर्वासित झालेल्या, देशभक्तांना व क्रांतिकारकांना जे विचारवैभव आणि राजकीय महत्त्व लाभू शकले नाही, ते रॉय यांना लाभले. जागतिक राजकारणाच्या नेत्यांच्या मालिकेत ते विराजमान होऊ लागले, याचे मुख्य कारण वैचारिक अधिष्ठान विकास पावत गेले हे होय. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीला स्वदेशाभिमानाचे व परंपरेच्या गौरवाचे अधिष्ठान होते. खरेखुरे राज्यशास्त्रीय चिंतन त्यांच्या पाठीशी नव्हते, ऐतिहासिक दृष्टिकोन नव्हता, सांस्कृतिक वातावरण बदलले पाहिजे, अशा जबाबदारीची जाणीव नव्हती. स्वदेशाभिमान हा विचार पराङ्मुख होता. या सर्व उणिवा रॉय यांनी भरून काढल्या.

मार्क्सवादाकडे आणि पुढेही

या वैचारिक प्रगतिक्रमात त्यांना मार्क्सवादाने विशाल दृष्टी दिली. परंतु बुद्धिवादाची पार्श्वभूमी पक्की असल्यामुळे ते मार्क्सवादाला कधीच शरण गेले नाहीत. यामुळे मार्क्सवादाला नवे संस्कार देणारे व त्यात भर टाकणारे असे जे कौट्स्की, तेनिंग, मेहेरिंग, थलायमार इत्यादी मार्क्सवादी जागतिक कम्युनिस्ट क्रांतीच्या आघाडीवर दिसत होते, त्यात रॉय यांचे बुद्धिवैभव झळकू लागले. लेनिन व स्टालिन यांनाही त्यांचा विरोध प्रमाण शुद्ध म्हणून त्यांस महत्त्वाचे स्थान द्यावे लागले. त्यांनी सुचविलेल्या योजना विकल्याने मान्य कराव्या लागल्या. एशियातील साम्राज्यविरोधी राजकारणाची त्यांची मीमांसा वर्तमानयुगातील राजकीय इतिहासाचे एक अत्यंत दूरगामी परिणामाचे निदान म्हणून मान्य झाली आहे. रशियन कम्युनिस्ट राज्यकर्ते व जागतिक कम्युनिस्ट संघटना यांच्यापासून त्यांनी अलग होण्यास हीच मीमांसा अखेर कारण झाली. त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेमुळे संप्रदायवादी कम्युनिस्ट व पुराणमतवादी राष्ट्रवादाचे अध्वर्यु त्यांच्यापासून दुरावले. परंतु मानवी स्वातंत्र्याचे अनेक सेवक व द्रष्टे त्यांचे मित्र बनले.

मानव्याचा नवा ध्येयवाद

रॉय यांना मधल्या काळात हिंदुस्थानात सहा वर्षांचा खडतर कारावास कंठावा लागला. त्यामुळे, त्यांचे शरीर पोखरले गेले. परंतु यातही त्यांनी श्रेष्ठ योग्याप्रमाणे ज्ञानविज्ञानाचा विशाल व्यासंग केला. हजारो पृष्ठांचा मजकूर लिहिला. विस्तृत ग्रंथरचनेस आवश्यक अशी वैचारिक साधनसामग्री त्यांनी ग्रथित केली.

१९३७ साली हा विशालकाय पुरुष भारतीय राजकारणत सक्रिय भाग घेऊ लागला. मागासलेल्या राष्ट्रवादी दृष्टिकोनाशी त्यांचा व्यापक व दूरगामी दृष्टिकोन जमला नाही. त्यामुळे यांना काँग्रेसच्या राजकीय नेतृत्वापासून दूर जावे लागले. काँग्रेसमध्ये शिरून त्यांनी तो नवा कार्यक्रम मांडला होता, यात लोकशाही क्रांतीची शक्ती निर्माण व्हावी असा हेतू होता.

मनुष्यजातीच्या वर्तमानकालीन अवनतीची मीमांसा करून त्यांना मानव्यांचा नवा ध्येयवाद सापडला. केवळ राजकीय लोकशाहीवर ओढवलेले नष्टचर्य थांबविता येणे

शक्य नाही व कम्युनिझमच्या मार्गाने मानवी स्वातंत्र्य सिद्ध होणे अशक्य आहे, म्हणून लोकशाहीच्या नव्या संस्कृतीची स्थापना करणे अगत्याचे आहे. हे त्यांनी त्यांच्या नव्या मानवतावादाच्या आधारे सिद्ध करून दाखवले आहे.

अत्यंत सार्थ जीवित

रॉय यांचे यश आणि अपयश व्यावहारिक पद्धतीने मोजणे योग्य नाही. मूर्तरूपास येणारे व्यावहारिक यश अपयशाची पहिली पायरी ठरू शकते. माणसाचा संसार दृष्टीवर आधारलेला असतो. मानवी सृष्टीचे जीवन दृष्टी हे आहे. रॉय यांनी मानवी दृष्टीची बंधने तोडण्यात अपूर्व यश मिळवले आहे. नव्या भारतात पहिल्या दर्जाचे जे तत्त्वद्रष्टे जीवनाच्या तत्त्वज्ञानाचे प्रणेते झाले, त्यांना मानवाच्या जुन्या युगाची बंधने तोडण्याचे सामर्थ्य लाभले नाही. ते सर्व भगवद्गीतेचे पाईक आहेत. वेदांताच्या सहस्रावधी वर्षांच्या चक्रातून बाहेर पडण्याचे अप्रतिम वैचारिक शौर्य रॉय यांच्याच ठिकाणी प्रकट झाले. प्रत्यक्ष क्रियेतच अनुभवाचा साठा त्यांनी संपादिला. विद्यापीठातील थोर पंडित आश्चर्य करतील एवढा विद्यांचा निधीही धकाधकीच्या जागतिक राजकारणाच्या उलथापालथीत त्यांनी संपादन केला. आधुनिक मानवी इतिहासाचे अत्यंत कूट प्रश्न सोडविण्यासाठी साहाय्य करणारे तत्त्वदर्शन अशा परिस्थितीतच त्यांनी मिळविले. रॉय हे विश्वाची दीर्घकालीन अखंड यात्रा संपवून, पाय चालेनासे झाले म्हणून आयुष्याच्या उत्तरखंडात हिमालयाच्या परिसरात उभे राहून हे नवे तत्त्वदर्शन जगाला देत होते. तत्त्वचिंतनातच त्यांची येथील जीवितयात्रा संपली.

आज भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यात सदोषता व अपूर्णता आहे. एखादे नवे मानवी बंधनही निर्माण होण्याचे भय त्यात आहे. या राजकीय स्वातंत्र्यातील सदोषता व अपूर्णता नष्ट करण्याचे एकमेवाद्वितीय साधन नवमानवतावादाच्या रूपाने रॉय ठेवून गेले आहेत. रॉय यांचे जीवित अत्यंत सार्थ झाले आहे.

(साप्ताहिक मौज, मुंबई, रविवार, ता. ३१ जानेवारी, १९५४, पृ. ५)

ooo

२५

मानवेंद्रनाथ रॉय

जे जे लहान थोर स्त्रीपुरुष मानवेंद्रनाथ रॉय त्यांच्या निकटच्या परिचयात आले ते ते त्यांच्या निधनाने अत्यंत हळहळले; आपली एक दिलदार जिवलग मित्रच मृत्यूने कायम नेला, म्हणून त्यांच्या जीवाला धक्का बसला.

त्यांची बुद्धी समुद्राप्रमाणे गंभीर व स्थिर होती. त्यांच्या वयाच्या १२ व्या वर्षापासून बलाढ्य ब्रिटिश राज्याचे कुटिल गुप्तचर कचाट्यांत पकडून त्यांना चिरडण्याचा वीस वर्षे प्रयत्न करीत होते. देशोदेशींच्या राज्यसत्तांचा ससेमिरा त्यांच्या पाठीशी लागला होता, तरी मार्दव, उत्साह, स्थैर्य व समता या गुणांची त्यांच्या चित्ताची घडण यत्किंचितही बिघडली नाही. याची खूण कधीही पटल्याशिवाय रहात नसे. प्रस्थापित राज्यसत्तांशीं विरोध व संग्राम अनेक वर्षे केला, असंभवनीय वाटणाऱ्या अद्भुत कल्पनारम्य ध्येयांची प्रखर साधना सतत केली, तरी मन शिणले नाही, चित्तप्रसाद मंदावला नाही. भौतिकवाद व बुद्धिवाद यांच्या उंच चिरंतन हिमप्रदेशात त्यांची विचारपद्धती स्थिरावली होती, तरी मानव्याच्या मधुर व नाजूक प्रीतीचे पुष्प त्यातही विकास पावून डोलत होते. ते जेथे जेथे गेले तेथे तेथे जिवाभावाचे मित्र व मैत्रिणी यांचा त्यांना अखेरपर्यंत लाभ झाला.

हा माणूस लाखांत उठून वेगळा दिसत होता. आजानुबाहू, रुंद छाती. उंच व भव्य शरीरबांधा, विचक्षण चक्षू, विस्मयजनक स्मरणशक्ती, विशाल प्रज्ञा, विनयी वृत्ती व शूराचा जीवनक्रम यांचा प्रभाव अनेकांवर पडत असे.

भारताच्या स्वातंत्र्याची चळवळ व सामाजिक दास्याचा अंत करण्याच्या उद्देशाने निर्माण झालेली समाजवादी चळवळ यांत त्यांच्या आयुष्याचा मुख्य भाग गेला. त्याकरिता त्यांना सर्व पृथ्वीचा प्रवास करावा लागला. दीर्घकालपर्यंत अज्ञातवास, देशत्याग व कारागृहवासही त्यांनी सहन केला. अशा धकाधकीचे आयुष्य होते तरी स्थिरबुद्धीची जन्मसिद्ध प्राप्ती झाली असल्यामुळे विद्याव्यासंग करून विद्यापीठालाही धन्यता वाटावी अशी विद्वत्ता संपादन

केली. युरोपातील मुख्य पाच भाषांमध्ये- इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश व रशियन- त्यांनी अप्रतिहत गती प्राप्त करून घेतली. मानवी स्वातंत्र्याचा एकमेव प्रश्न, दृष्टीसमोर ठेवून तो सोडविण्याकरिता विद्याव्यासंग केला. मन अनुभवाने समृद्ध झाले. इतके करून अखेर काय साधलं? विवेक, प्रज्ञा व शुद्ध मानवी प्रेम.

त्यांची वैचारिक प्रतिमा सतत उन्मेषशालिनी राहिली. त्यांच्या जे सहवासात आले त्यांना ते एका थोर प्राज्ञ आचार्यासमान दिसले. त्यांच्यापुढे सतत नम्र व्हावे, असा भाव निर्माण होई. वैचारिक जीवनाचा अखंड पुरवठा करणारा चैतन्यनिधीच त्यांच्या मृत्यूने हिरावून नेला, म्हणून कित्येकांना दुःख झाले. कित्येकांनी त्यांचे पितृत्व स्मरून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

परंतु गुरूचे वा नेत्याचे जे आदरपूर्ण अंतर असते ते त्यांनी कधीच ठेवले नाही. ही व्यक्ती ऋजु स्वभावाची होती. चार माणसांसारखे ते वागत. संबंध सलगीचे व खेळीमेळीचे ठेवीत. बैठकींत, सुपरिचयाच्या गाठीभेटीत, पान, भोजन इत्यादी प्रसंगी विनोद, थट्टा, कुचेष्ट, स्वैर कथालाप यांनाही प्रसंगानुरूप भरती येई. कोणत्याही विचाराचे, व्यवसायाचे, पक्षाचे वा धर्माचे लोक स्नेही मंडळींत होते. अपरिचित माणसांचा भरणा असलेल्या वातावरणात मात्र ते फार संकोचाने बोलत व वागत.

१) भाषणे

त्यांना लेखनाचा हव्यास होता, भाषणाचा नव्हे. त्यांच्यात सार्वजनिक प्रसंगी वक्तृत्व फारसे कधी दिसले नाही. फार जबाबदारीने भावना आवरून व शब्द मोजून बोलत. त्यामुळे भाषण करीत असता मध्ये मध्ये थांबण्याची सवय त्यांना लागली होती. परिचित समुदायात कित्येकदा ७०-८० मिनिटे त्यांचे अखंड प्रवाही वक्तृत्व ऐकण्यास मिळाले आहे. भाषण केव्हाही व कोठेही केले तरी ते साधकबाधक चर्चेने भरलेले व तत्त्वचिंतनाने भारावलेले असल्यामुळे विचारप्रवर्तक होत असे. सुदैवाने त्यांची गेल्या १६ वर्षांतील व्याख्याने त्यांच्या साक्षेपी पत्नीने लघुलिपीत उतरून घेतली असल्यामुळे आणि त्यांतील बरीचशी प्रसिद्ध झाली असल्यामुळे त्यांच्या वैचारिक जीवनाचे चित्र त्यांत उमटलेले सापडेल.

२) लेखनपद्धती व विस्तार

त्यांनी जे जे लेखन केले ते ते सर्व विशिष्ट चळवळींतील वैचारिक प्रश्नांची चर्चा करण्याकरिता केले. तेथे जीवन व ज्ञान यांचा सांधा एकजीव होता. कर्तव्याच्या प्रश्नांतून विचार निर्माण होत, शुद्ध विद्योपासना म्हणून नव्हे. शुद्ध विद्योपासनेचा महिमा त्यांना मान्य होता. परंतु त्यांच्या जीविताची मांडणी तशी झाली नव्हती. भाषणेंही त्याच दृष्टीने त्यांनी केली. सौजन्याने व विचारांच्या प्रभावाने राजकारणात त्यांना मित्र मिळाले. ते मित्र त्यांनी राजकीय पक्षाचे विसर्जन केल्यानंतरही टिकले. हे संबंध टिकले एवढेच नव्हे तर ते अधिक शुद्ध व निरुपाधिक झाले. त्यांना अगदी वैयक्तिक स्वरूप प्राप्त झाले. त्यांच्या मित्रांचा

परिवार मोजका आहे. परंतु तो थोडा थोडा मुंबई, पुणे, सोलापूर, सातारा, दिल्ली, बरेली, लखनौ, कानपूर, पाटणा, कलकत्ता, मद्रास, बंगलोर, विजयवाडा इत्यादी भागांत पसरला आहे. त्यांतील कित्येकांना आपल्या कुटुंबातील जिवलगालाच काळाने नेले असे वाटून त्यांचे मन उदास व विषण्ण झाले, घरांत अंधार भरलासे वाटले.

३) अखेरचे दिवस: निर्वाण

ते १८ महिन्यांपूर्वी हिमालयांत मसूरी येथे काही दिवसांपुरते रहावयास गेले होते. तेथे नित्याप्रमाणे फिरून परतताना चढणीवर तोल जाऊन पन्नास फुटांवरून खाली कोसळले. पायांची हाडे मोडली. त्यातून बरे होत असता मेंदूत रक्तकण गोठून आजार आला. ह्या आजारातून दोनदा उठले, बरे झाले. कित्येक महिने मृत्यू व जीवन यांच्यातील सूक्ष्म सीमारेखांवर जीव होता. त्यात एकदा म्हणाले की "मला मृत्यूची भये मुळीच भेडसावीत नाहीत. परंतु यातील पराधीनता व शरीरयातना मात्र सोसवत नाहीत." अशाही स्थितींत विनोदवृत्तीला खळ पडली नाही. पत्नी एलन परिचर्येत अहोरात्र गर्क होत्या. रॉय यांचे स्नायू अन्तर्बाह्य अर्धांगाने जखडले गेले होते. त्यांना घास भरवावे लागत, गिळण्यास फार प्रयास पडत. तेव्हा या अनुव्रत व दक्ष पत्नीला म्हणाले : "तुला लहान मूल नाही, घे, आता लहान मूल मिळाले?"

त्यांची मृत्यूशी सलगी फार जुनी होती. वयाच्या बाराव्या वर्षापासून तो त्यांच्या आसपास वावरत होता. जीवन व मरण यांच्या सीमेच्या क्षुरधारेवरच ऐन उमेदीची २० वर्षे त्यांनी लीलेने काढली होती. भारतात परतल्यावर, सहा वर्षांचा कारागृहवास संपविल्यावर, काहीशी स्वस्थता आली होती. या शेवटच्या आजारातूनही ते नुकतेच उठले होते. अखेरच्या दोन आठवड्यांत प्रकृती चांगली सुधारली होती. अमेरिकेतील अनेक विद्यापीठांनी त्यांना 'पूर्व दिशेतील राजकारण' या विषयावर संशोधनात्मक व्याख्यान देण्याकरिता व ग्रंथ लेखनार्थ निमंत्रणे दिली होती. समुद्रपर्यटनाची तयारी सुरू झाली. परवाना मिळाला. स्टॅन्फोर्ड व हार्वर्ड विद्यापीठांना आगमनाच्या तयारीत असल्याची वार्ताही मिळाली. मुंबईस निरोप देण्याकरिता मानवतावाद्यांचे संमेलनही भरविण्याचे ठरले.

परंतु परलोक-पर्यटनाची वार्ताच आकस्मिक रीतीने विद्युत्पाताप्रमाणे आली. २५ जानेवारीच्या रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी स्वस्थ बेशुद्धीत मृत्यू त्यांस अलगदपणे घेऊन गेला. माणसास जेव्हा नकळत मृत्यू नेतो, तेव्हा ही त्याची मोठीच कृपा समजली पाहिजे. तो त्यांचा अखेरचा स्नेही होता, त्यांच्या मुखावर शेवटी स्मित प्रकट झाले होते.

४) बंगाली कुल व बालपण

मानवेंद्रनाथ रॉय यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ भट्टाचार्य. वडिलांचे नाव दीनबंधु भट्टाचार्य. भट्टाचार्यांचे घराणे पूर्वबंगालमधील मिदनापूर जिल्ह्यातील खेपूत किंवा घताल ह्या गावचे. हे

तीर्थक्षेत्र आहे. तेथील काली मंदिराच्या पूजेचे पूर्वापार वतन यांच्या घराण्यात आहे. दीनबंधु भट्टाचार्यानी गांव सोडले. ते चोवीस परगणा जिल्ह्यातील अरबालिया गांवी येऊन राहिले. तेथे ते हायस्कूलमध्यें संस्कृत शिक्षक होते. नंतर त्यांनी कलकत्याजवळ बारा मैलावर पूर्वबंगाल रेल्वेच्या फाट्यावरील कोदालिया गांवी घर केले. नरेंद्राचा जन्म ६ फेब्रुवारी १८९३ ला झाला. वनश्रीच्या अंकावरच कोदालिया हा गाव बसला आहे. फुलांचा व फळांचा प्रदेश. कमलिनींनी भरलेली तळी दृष्टीला शांत व मनाला प्रसन्न करतात. आंबे, माड, खजूर इत्यादी वृक्षांनी गाव झाकोळला आहे. भातशेतीने संपन्न मुलूख. बाराही महिने दुधाळ व पुष्ट जनावरांचे कळप सकाळ संध्याकाळ गावाच्या सीमेवरून जाताना व परतताना दृष्टीस पडतात. संदेश, रसगुल्ला, खिरमोन, मीठा दही इत्यादी दुधाच्या शुद्ध मिठाईने तेथे पाहुण्यांचे आदरातिथ्य होते. निदान उसाच्या रसापेक्षाही अधिक मधुर अशी खजुरीची शीत नीरा तरी पुढे येतेच.

नरेंद्राचे शिक्षण या गावात झाले. बंगाली, संस्कृत व इंग्लिश यांचे पायाशुद्ध अध्ययन झाले. पायाशुद्ध म्हणजे व्याकरण व वाक्यमीमांसा झक्क तयार. या पायाशुद्धीमुळेच पुढील आयुष्यात देशोदेशींच्या युरोपियन भाषांत झपाट्याने ते व्युत्पन्न बनले. अलीकडच्या एम. ए. व पीएच. डी.ची इंग्रजीची तयारी पाहून खेदाने ते म्हणत की, चाळीस वर्षांपूर्वीचे मॅट्रिकचे इंग्लिश व्याकरण यांच्यापेक्षा अधिक पक्के होते. संस्कृत स्तोत्रे व सुभाषिते यांचे लहानपणीच घरच्या घरी सहज पाठांतर झाले होते. शंकराचार्यांची चर्पटपंजरी त्यांना आवडत असे. एखाद्या गर्विष्ट पुढाऱ्याशी लहानशा बैठकीत चर्चा चालत असता तो शेखी मिरवू लागला की "मा कुरु जनधनयौवनगर्व हरति निमेषात् कालः सर्वम्" ही ओळ शेजारी बसलेल्या मित्राच्या कानांत ते हळूच पुटपुटत. गणिताचीही तयारी प्रशंसनीय होती. त्याचा उपयोग १९९८ ते १९२९ पर्यंतच्या काळांत जर्मनीत राहण्याचा अनेक वेळा योग आला तेव्हा झाला. उच्च पदार्थविज्ञानांत आइन्स्टाइनलाही कौतुक वाटावे असे प्रावीण्य त्यांनी मिळविले. १७ व्या शतकात तर्कशास्त्राच्या संबंधात भट्टाचार्यांच्या घराण्याने अप्रतिम यश मिळविल्याची गोष्ट रॉय अनेक वेळा सांगत. भारतीय तर्कशास्त्रास शिखरास नेणारे गदाधर, धर्मशास्त्रात बंगालमध्ये अग्रपूजेचा मान मिळविलेले रघुनन्दन व अद्वैतसिद्धिकार मधुसूदनसरस्वती ही नावे सर्व भारतात प्रख्यात आहेत.

भट्टाचार्य-कुलातील नरेंद्र विसाव्या शतकातील आशियाच्या जागृतीचा प्रतिनिधी बनला. त्या जागृत जाणिवांनी वयाच्या १२ व्या वर्षीच घेरला गेला. मध्ययुगीन भावनांच्या बंधनांत सापडणारे नरेंद्राचे मन नव्हते. आधुनिक युरोपने आशियाला १९ व्या शतकात पूर्ण वेढून बंदिवान केले होते. त्या बंधनांच्या बाहेर पाडणारी चेतना आशियात विसाव्या शतकाच्या पहिल्याच दशकात प्रकट झाली. या चेतनेचे एक महत्त्वाचे केंद्र बंगाल व विशेषतः कलकत्ता शहर बनले होते. भारतातील ब्रिटिश राज्याची नैतिक महती संपुष्टात आल्याचे हे गमक होते.

५) राष्ट्रीय क्रांतिवादी चळवळ

ब्रिटिशांनी भारतातील दीर्घकालीन राजकीय यादवीच्या परिस्थितीचा फायदा घेऊन आपली राज्यसत्ता येथे स्थापन केली. कोणत्याही मोठ्या सामाजिक घटनेस व संस्थेस नैतिक अधिष्ठान लाभल्याशिवाय ती स्थिरावत नाही. ब्रिटिशांना आपल्या सत्तेच्या नैतिक समर्थनास भारताला डबघाईस आणणारा जातिभेद, धर्मभेद आणि सामाजिक मागासलेपणा उपयोगी पडला. राजकीय बेबंदशाहीची भीती हे कायमचे समर्थन हाती आले. जुनी कारणे अपूर्ण वाटून त्या बेबंदशाहीच्या कारणांत ब्रिटिश धूर्त मुत्सद्दी स्वतः काही भर टाकत. विशेषतः मागासलेल्या जगाला सुधारणे ही पाश्चात्त्यांवर इतिहासाने सोपविलेली जबाबदारी आहे हे त्यांतील सर्वांत महत्त्वाचे कारण सांगण्यात येई.

या सर्वांची प्रचंड प्रतिक्रिया भारतात हळूहळू निर्माण होऊ लागली. नवजागृती उत्पन्न झाली. १९ व्या शतकात ही मुख्यतः अंतर्मुख होती. तिला आक्रमक चेतनेचे रूप २० व्या शतकाच्या प्रारंभी प्राप्त झाले.

ब्रिटिशांना दीर्घकालीन शांतता स्थापन करण्यात यश आले होते. परंतु सामाजिक स्वास्थ्य निर्मिता आले नाही. आर्थिकदृष्ट्या भारतास अधिक नष्टचर्याच प्राप्त झाली. त्यामुळे सामाजिक अवनती अधिक झाली. या अवनतीस ब्रिटिश सत्ताच कारण आहे, अशी जाणीव समंजस सुशिक्षितांना झाली. त्यामुळे पाश्चात्त्यांच्या विशेषतः ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वाचे नैतिक अधिष्ठानच नष्ट झाले.

प्रतिक्रिया अत्यंत खोल गेली; संस्कृतीच्या अंतरंगाच्या तळातून तिला प्रेरणा मिळाली. भारतावरील परकीय राजकीय सत्ताच भारताच्या वर्तमान अवनतीला जबाबदार आहे; ती नष्ट करणे व स्वतः भारताने स्वकीय राज्य स्थापन करणे हे उच्चतम नैतिक कर्तव्य आहे' अशा प्रकारच्या नैतिक जाणिवेला मोठ्या आध्यात्मिक प्रतिष्ठेचे अधिष्ठान लाभले. भारत हा आध्यात्मिकदृष्ट्या जगाचा प्राचीन गुरू आहे व हे त्याचे गुरुपद अढळ आहे, अशी गंभीर आत्मनिष्ठ प्रज्ञा दशदिशा उजळून बाहेर आली. विवेकानंद व अरविंद हे या प्रज्ञेचे केंद्रस्थान बनले. राजकीय चेतना या प्रज्ञेमुळे प्रखर व अदम्य झाली, अनंत श्रद्धा निपजली, अलौकिक शौर्य चमकू लागले.

या चेतनेस राज्यशास्त्र, समाजरचनेची ऐतिहासिक उपपत्ती वा नवे राजकीय ध्येयवाद यासंबंधीच्या वैचारिक पद्धतीची पार्श्वभूमी मात्र प्राप्त झाली नाही. अखेरपर्यंत त्या बाबतीत वैगुण्य कायम राहिले.

या श्रद्धेला जुना व रूढ प्रतिकारमार्गच माहीत होता. तो तिने अनुसरला. ताज्या रक्तात ती वाढीस लागली. कोवळ्या तारुण्यात प्रवेश केलेली माणसे या श्रद्धेचे आश्रयस्थान झाली. घरादारांचा त्याग करून ही माणसे बाहेर पडत. ही थोडी होती. गीतेचे पुस्तक घेऊन आत्म्याच्या अमरत्वाचे व मातृभूमीचे गाणे गात फाशीच्या तक्त्यावर प्रातःकाली चढत;

किंवा भूमिगत होत; किंवा देशांतर करीत; किंवा काळ्या पाण्याच्या शिक्षेवर जात.

१९०५ साली बंगालची फाळणी झाली. हा ब्रिटिशांच्या भेदनीतीचाच एक भाग होता. वरील श्रद्धेने देशभर क्षोभ निर्मिला. बंगालमध्ये क्रांतिकारक संघटना अस्तित्वात आल्या. त्यांची अनुशीलन समिती व युगांतर समिती ही नावे प्रसिद्धच आहेत.

या समितीचे नेते प्रथम तरुणांचा लक्ष्यवेध करीत. जतीन मुखर्जी या नेत्यांतीलच एक होत. ते शौर्याने अजरामर झाले आहेत. नरेंद्र हा कोवळ्या वयातला मुलगा त्यांच्या ध्यानात भरला. त्या क्रांतिकारकांपैकी काही मंडळी अजून हयात आहेत. विवेकानंदांचे बंधु डॉ. धीरेंद्रनाथ दत्त, हरींद्र चक्रवर्ती, बारिन घोष, जीवन चटर्जी, मधु घोष, धीरेन मुजुमदार, अमरेंद्र चट्टोपाध्याय वगैरे. अमरेंद्रनाथ चट्टोपाध्याय लिहितात की, "आमचा नेता जतीन मुखर्जी. १२ वर्षांच्या नरेंद्राची व आमची गाठ त्याने प्रथम श्रमजीवी समावाय स्टोअर्स, कलकत्ता, या ठिकाणी घालून दिली. क्रांतिकारकांच्या हालचालीचे हे एक ठिकाण. या वयात क्रांतिकार्यात सामील झालेला व इतकी विलक्षण कामगिरी केलेला माणूस माणसाच्या इतिहासास माहीत असेलसे वाटत नाही"! या दोन समितींच्या द्वैतांत नरेंद्र कधीच सापडला नाही. दोन्ही समितींच्या सभासदांस त्याच्या उमद्या स्वभावाचा वेध लागे.

सरकारी व निमसरकारी खजिने लुटून व शस्त्रास्त्रे जमवून बंड उभारावयाचे म्हणून त्याकरिता काही काळ (१९०३ ते १९१४) अगदी प्राथमिक प्रयोगावस्थेत गेला. जपान, चीन, इंडोचायना, युरोप व अमेरिका इतक्या प्रदेशांत या काळात या चळवळीचे क्षेत्र पसरले. स्वदेशांतही खोल मुळे धरू लागली. ब्रिटिश सरकार अस्वस्थ झाले. परंतु सावधपणाने हे बंडाचे मूळ व बीज उपटून व ठेचून थंड करू असा त्याचा आत्मविश्वास १९४० पर्यंत कायम होता.

सरकार नरेंद्रावर करडी नजर ठेवू लागले. १९०६ व १९१४ साली नरेंद्रास दरवड्याच्या बाबतीत अटक झाली. परंतु नंतर आरोप शाबीत न होता सुटकाही झाली. १९०८ सालच्या हौरा कटाच्या खटल्यातही नरेंद्र गोवला गेला होता. परंतु त्यातूनही बचावला.

६) पहिल्या राष्ट्रीय युद्धाचे सेनानी

१९१४ सालापर्यंत क्रांतिकारकांजवळचे धनभांडार चांगले आत्मविश्वास उत्पन्न होण्याइतके वाढले. पहिल्या महायुद्धाची संधी प्राप्त झाली. क्रांतिकारक गटांनीं ही संधी गमवावयाची नाही, असा पण केला. चीन, जपान व जर्मनी यांच्याशी संधान बांधण्यास सुरुवात केली.

पहिल्या जागतिक महायुद्धाच्या कालखंडातील भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याच्या पर्वावर नरेंद्राच्या कामगिरीचा ठसा सर्वोत्कृष्ट रीतीने उमटला आहे. शत्रूचा शत्रू हा आपला मित्र, हे राजनीतीचे पुराण. प्रसिद्ध धोरण लक्षात ठेवून या वेळच्या लढ्याची आखणी झाली. यात केवळ आत्यंतिक साहसाचेच प्रदर्शन झाले नाही, परिस्थितीच्या आकलनाचाही

भाग महत्त्वाचा होता. सामान्य जनता व शिक्षित मत इंग्रजी राज्याच्या विरुद्ध आहे, ही गोष्ट जर्मनीबद्दलच्या सार्वत्रिक सहानुभूतीने व्यक्त होत होती. जर्मनीची प्रत्येक यशस्वी हालचाल येथे आनंदाचे आंदोलन निर्माण करी. परंतु ब्रिटिशांचीही विलक्षण हिकमत या वेळी प्रत्ययास आली. शंभर वर्षे राज्य करून मिळालेला जनमनाचा आवाका उपयोगी पडला. ब्रिटिशांचा आब व दरारा मोठा होता; त्यांचे राजकीय शहाणपण बिनतोड म्हणून सर्व मानीत. त्यांनी याचा भरपूर फायदा, धोका पत्करूनही करून घेतला. लष्करी शक्ती नावापुरती येथे राखून, बाकी सर्व युरोपच्या रणांगणावरील कामगिरीकरिता रवाना केली. ह्या गोष्टीचा पक्का कयास नरेंद्र- प्रभृती क्रांतिवीरांना आला. त्यांनी चीनशीं व जपानशी संधान बांधण्याचे यत्न केले. जर्मनीशी संधान बांधण्यात बरेंच यश आले. येथे असलेल्या ब्रिटिशांच्या सैन्यशक्तीचा व शस्त्रशक्तीचा ठीक अंदाज करून शस्त्रास्त्रांचे द्विगुण संभार भारताच्या किनाऱ्यावर उतरविण्याचा उद्योग आरंभिला. भोलानाथ चतर्जीने लक्षावधी रुपये येथल्या येथे आपल्या बाहुबलावर उभारले होते. जतीन लाहिरीने युरोपात प्रथम संधान बांधून जर्मनीचे मनोगत जाणून मदत करण्याचे आश्वासन आणले. पुढील सर्व योजनांची सूत्रे नरेंद्राच्या हाती दिली. नरेंद्राच्या बटेव्हिया व शांघाय ते सुंदरवनच्या दरम्यान अनेक खेपा झाल्या. हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरील बंदरे व महत्त्वाची रेल्वेकेंद्रे कशी व कोणी काबीज करावयाची याची आखणी केली.

परंतु हिंदुस्थानातील व समुद्रावरील या संकेतित उठावाशी संबद्ध महत्त्वाच्या व्यक्ती पकडल्या गेल्या वा मारल्या गेल्या; अनेक शस्त्रास्त्रांनी भरलेली जहाजे पकडली गेली. सगळी सूत्रे नीट रीतीने हलविणे मुष्किलीचे झाले. शेवटी नरेंद्राला १९१६ च्या प्रारंभी पुनः हिंदुस्थान सोडणे भाग पडले. चीन, जपान, इंडोनेशिया, फिलिपाईन्स, अमेरिका इत्यादी देशांत त्याच प्रकारचे यत्न केले. परंतु अडचणींचे पर्वत उभे रहात.

फार प्रयासाने अमेरिकेचा किनारा गाठला. पकडले जाऊन ब्रिटिशांच्या हाती लागण्याचे अनेक प्रसंग येऊन गेले. त्या त्या वेळी बुद्धी सावध राहिली म्हणून युक्त्या सुचत गेल्या.

७) नरेन्द्राचे मानवेन्द्र!

नरेंद्र अमेरिकेच्या किनाऱ्यावर गुप्त रीतीने पोचले. परंतु तिसऱ्या दिवशीं अमेरिकन वृत्तपत्रांत 'जर्मन गुप्त हेराचे काम करणारा एक भारतीय माणूस' देशात आला आहे, अशी बातमी प्रसिद्ध झाली. अमेरिकेत राहणे धोक्याचे झाले. युगांतर समितीचे नेते जे यदुगोपाल मुखर्जी त्यांचे बंधु प्रसिद्ध साहित्यिक ननुगोपाल मुखर्जी त्या वेळी अमेरिकेत होते. त्यांनी नरेंद्रांना नाव बदलून राहण्याचा सल्ला दिला. नरेंद्रनाथ भट्टाचार्यांचे मानवेंद्रनाथ रॉय बनले. हिंदुस्थानात सशस्त्र क्रांतीचा उठाव करण्याच्या योजनेत गदर पार्टीचा फार मोठा भाग होता. पहिल्यांदा यत्न फसला तरी पुनः यत्न करून पहावा, म्हणून मानवेंद्रनाथ रॉय यांनी गदर पार्टीच्या अमेरिकेतील सदस्यांशी गाठीभेटी घेण्याचा उद्योग आरंभिला. परंतु

त्यांच्यात आपसांत फार बेबनाव झालेला आढळला. रॉय यांनी तो मार्ग सोडला व श्री. लाला लजपतराय अमेरिकेत अडकून पडले होते, त्यांच्याबरोबर काम करण्याचे ठरविले.

जर्मनीशी बांधलेल्या संधानास यश आले असतें तर काय झाले असते असा पुनर्विचार सुरू झाला : झाले ते एका अर्थी फार वाईट झाले नाही, असे ध्यानात आले. "जर्मनीने काही विशिष्ट अटींवर मदत करण्याचा करार केला होता. त्या म्हणजे व्यापाराच्या पूर्ण सवलती. त्यातून दुसरे पारतंत्र्य जन्मले नसते कशावरून?" अशा चिंतनास व विद्याराधनेस येथे प्रथम अवसर मिळाला, लजपतराय या वेळी उतारवयाचे झाले होते. त्यांचे विचारही काहीसे सौम्य झाले होते. त्यांचे लेखन व वाचन सुरू होते. समान ध्येयाचे, शूर, चिकित्सक व शालीन तरुण सहकारी म्हणून रॉय त्यांना फार आवडले. दोघांची आपसांत राजकारणचर्चा होई. अन्यत्रही वादविवादाचे विविध प्रसंग येत. भारतापेक्षा निराळ्याच जगात आल्याची साक्ष रॉय यांना पटू लागली. राजकारण, धर्म, संस्कृती, विज्ञान, तत्त्वज्ञान, कला, वाङ्मय इत्यादी विषयांची वैचारिक भूमिका तेथ त्यांना काही निराळी दिसली.

लजपतरायांच्या एका सभेत एका पाश्चात्त्य गृहस्थाने प्रश्न विचारला की, "समजा, इंग्लिशांचे हिंदुस्थानातले राज्य गेले व आज आहे अशीच विषम समाज रचना राहिली, जमीनदार व वरिष्ठ वर्ग संपन्न व इतर लोक आजच्या सारखेच विपन्न राहिले तर तुम्हांस चालेल काय?" लजपतरायांनीं उत्तर दिले की, "भावाने लाथ मारली व परक्याने लाथ मारली तर त्यांत जे अंतर तेच परक्याचे राज्य व स्वकीय राज्य यांत अंतर कायम असणार- स्वकीयांचे राज्य कसेही असले तरी स्वकीयाचेच!"

मार्क्सवादाची नवी दृष्टी

राजकारण व सामाजिक न्याय यांचा संबंधही, स्वकीय राज्य की परकीय राज्य या प्रश्नाइतकाच मूलभूत आहे. राजकीय स्वातंत्र्यातील सामाजिक गर्भितार्थ विचारांत घेतला पाहिजे असा विचार अशा प्रकारच्या चर्चेतून रॉय यांच्या मनात उद्भवला. स्टॅन्फर्ड विद्यापीठात रॉय येऊ जाऊ लागले, त्यामुळे राजकीय भावुक प्रेरणेला शास्त्रीय बैठकीची आवश्यकता अत्यंत पटू लागली. लजपतराय यांच्याशी मतभेद होऊ लागला. परंतु लजपतराय दिलदार स्वभावाचे; त्यामुळे संबंध बिघडले नाहीत.

जे लव्हस्टोन इत्यादी अमेरिकन मार्क्सवाद्यांच्या सहवासात रॉय यांचा मार्क्सवादाचा व्यासंग वाढीस लागला. त्यांना नवी दृष्टी लाभली. सामाजिक-ऐतिहासिक स्थित्यंतरांचे रहस्य उलगडण्याचे उच्च दर्जाचे साधन हस्तगत झाल्यासारखे वाटले. हाच हात प्रथम भारताच्या मानसिक क्षेत्रांत मार्क्सवादी दृष्टिकोन निर्माण करू शकला!

रॉय यांची पंचविशी नुकतीच उलटली होती. स्टॅन्फर्ड येथील विश्वविद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी ट्रेन्ड हिच्याशी त्यांचा विवाह झाला. थोड्याच दिवसांत तिच्या लक्षात आले की फार निराळ्या प्रकारचे धामधुमीचे व धोक्यातील आयुष्य जगणाऱ्या अज्ञातवासी

पुरुषाशी आपण विवाहबद्ध झालो आहोत! रॉय यांना १९१७ च्या मध्यात अमेरिकेस रामराम ठोकणे भाग पडले. नंतर या बाईनी ठरविले की, "या पुरुषाबरोबर शांतीचा व सुखासमाधानाचा संसार होणे अशक्य. संबंध सोडणे बरे." तिच्या मनातील आदर मात्र कधीच कमी झाला नाही. दीर्घकाल पत्रव्यवहार सुरू होता. अडीअडचणीत त्या उपयोगीही पडल्या.

पहिल्या महायुद्धात अमेरिकेचा दोस्तांकडेच पहिल्यापासून कल होता. म्हणून जर्मनीच्या हालचालींवर अमेरिकन सरकारची कडक नजर होती. "हा माणूस जर्मनीच्या तर्फे येथे काम करीत असून याच्यापासून धोका आहे" असा वहीम येऊन अमेरिकन पोलिसांनी रॉयना अटक केली. परंतु अटक करण्यास पाहिजे तितका पुरावा नव्हता. मॅजिस्ट्रेटने रॉयनी जामीन मिळवावा, म्हणून मुदत देऊन त्यांना मोकळे केले. पोलिसाने नजर ठेवली. परंतु रॉय ह्यांनी मेक्सिकोची सरहद्द गांठली.

८) जागतिक क्रान्तीच्या चळवळीत प्रवेश

१९१७ सालीं मेक्सिकोत शेतकरी क्रान्ती सफल होण्याच्या मार्गावर होती. रॉय यांनीं तेथील नेत्यांच्या बरोबर चळवळींत भाग घेण्यास प्रारंभ केला. डाव्या गटाचे ऑब्रेगॉन व कॅले हे नेते होते. मार्क्सवादी क्रांतीचा कार्यक्रम व लोकशाही राज्यघटना अमलात आणण्याचे ठरले व त्यांत यशही आले. कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. रॉय हे त्याचे चिटणीस बनले. त्यांनी राजकारणपटुत्व, वादकुशलता व लेखनसामर्थ्य यांच्या योगानेउत्तम छाप बसविली.

पहिल्या महायुद्धानें पाश्चात्त्य राष्ट्रांतील विचारवंत मानवी सुधारणेबद्दल साशंक झाले. गंभीर विचारांनी त्यांचीं मने ग्रस्त झाली. देशोदेशी विचारवंतांना मानवी शांततेचा प्रश्न कसा सोडवावा याची चिंता पडली. रॉय यांनी याच प्रश्नाच्या अनुरोधाने "विश्वशांतीचा राजमार्ग" म्हणून एक निबंध अमेरिकेत प्रसिद्ध केला. तेथे मार्क्सवाद्यांत या निबंधाचे चांगले स्वागत झाले.

जागतिक क्रांतीच्या चळवळीत रॉय यांचा साक्षात प्रथम प्रवेश मेक्सिकोद्वारा झाला. नुकत्याच घडलेल्या रशियन राज्यक्रांतीचा एक सोव्हिएट प्रतिनिधी बोरोडिन (Borodin) नामक येथे भेटला. त्यालाही अमेरिकेतून पळ काढावा लागला होता, त्याने मेक्सिकोत आश्रय घेतला. तो चांगला कसलेला विचारवंत होता. रॉय यांच्याशी त्याची मैत्री जमली. या मैत्रीत रॉय यांच्या मार्क्सवादी पांडित्यास सूक्ष्म धार मिळाली.

रॉय यांचे स्पॅनिश व इंग्लिशमध्ये प्रसिद्ध होणारे लेख वाचून बोरोडिनला रॉय यांच्या सूक्ष्म अवगाहन लेख शीलतेचा प्रत्यय आला. बोरोडिनने रशियन क्रांतिनेते व विशेषतः लेनिन यांना रॉय यांच्या विशेष व्यक्तिमत्त्वाची माहिती दिली.

रॉय यांना लेनिनचे मॉस्कोस भेट देण्यासंबंधीं आमंत्रण मिळाले. कम्युनिस्ट चळवळ

जगात सर्वत्र फैलाविण्याकरिता 'थर्ड इंटरनॅशनल'ची संघटना उभारावी असे लेनिनने ठरविले. रॉय या संबंधात फार उपयुक्त ठरतील, असे लेनिनने मनात घेतले. मेक्सिकोच्या राष्ट्रपतींची रॉयशी चांगली मैत्री होती. त्यांना रॉय यांनी मेक्सिको सोडावे, ही कल्पना आवडली नाही. ब्रिटन व अमेरिका यांचा मेक्सिकन सरकारला तगादा होता की रॉय यांना आश्रय देऊ नका. पण मेक्सिकोच्या राष्ट्रपतींनी ही गोष्ट मानली नाही.

रॉय यांच्या आग्रहावरून मेक्सिकन राष्ट्रपतींनी त्यांना जाण्याची अनुमती दिली. राष्ट्रपतींनी स्वतःचा खास पासपोर्ट दिला. रॉय यांना अत्यंत सावधगिरी ठेवून अनेक धोक्याच्या जागा चुकवून स्पेनच्या किनाऱ्यावर कसेबसे पोचतां आले. स्पेनमधील समाजवादी व कम्युनिस्ट रॉय यांची वाट पहात होते. कारण बोरोडिन अगोदर पोचला होता; त्याने सर्व तजवीज केली होती. रॉयनी काही महिने स्पेनमध्ये काढले; आंतरराष्ट्रीय क्रांतिकारक पक्षाची संघटना करण्यास आवश्यक असलेली सूत्रे जुळविली.

रॉयना स्पेनमध्ये काबारेल्लोसारखे स्नेही मिळाले. १९३७ मध्ये फ्रँकोने जे प्रतिक्रांतीचे बंड चालविले त्यांत क्रांतिकारक आघाडीवर रॉयचे बहुतेक स्पॅनिश स्नेही कामास आले.

९) 'थर्ड इंटरनॅशनल'

बोरोडिनच्या पाठीमागून रॉय स्वित्झर्लंडच्या वाटेने जर्मनीत जाऊन पोचले. या वेळी पहिले महायुद्ध नुकतेच संपले होते. जर्मन भूमी राजनैतिक भूकंपांनी सारखी हादरत होती. जनता आर्थिक दुरवस्थेने हैराण झाली होती. कामगारवर्ग बेचैन झाला होता; सैन्य बिथरले होते. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या हाती सरकार आले. या पक्षातील कम्युनिस्ट गट म्हणजे स्पार्टाकस बंड; या गटाने सार्वत्रिक संपाची चिथावणी दिली. बर्लिन शहरात सार्वत्रिक संपाची धुमश्चक्री सुरू झाली. त्या दिवसाचे दृश्य रॉय यांनी एका हॉटेलमधील खिडकीतून पाहिले. परंतु त्या संपातून राज्यक्रांती जन्मू शकली नाही. कारण योग्य नेतृत्व लाभू शकले नाही. काही महिने रॉय जर्मनीत राहिले. थेलमान, ब्रँडलर, ऑगस्ट थलायमार इत्यादी कम्युनिस्टांचा दृढ परिचय झाला. १९१९ ते १९२९ च्या दरम्यानच्या काळात जर्मनीत रॉय यांचा अनेक वेळा अल्प वा दीर्घ काल मुक्काम झाला; त्यात या स्नेही मंडळींचे चांगले साहाय्य झाले.

रॉय हे 'थर्ड इंटरनॅशनल'च्या दुसऱ्या (१९२० च्या) अधिवेशनास उपस्थित राहिले. लेनिनने त्यांच्याशी दीर्घकाल चर्चा व वाटाघाटी केल्या. भारतीय व पौर्वात्य देशी क्रांतिकार्याचा मार्गदर्शक या नात्याने रॉय यांची योग्यता त्यांना पटली. लेनिन, ट्रॉट्स्की, बुखारिन इत्यादी मंडळींच्या बरोबरीचे स्थान 'थर्ड इंटरनॅशनल'मध्ये रॉय यांना मिळाले. अध्यक्षमंडळा (Presidium)मध्ये त्यांचा समावेश झाला. जागतिक राजकारणाचे हे उच्चतम समरकेंद्र होते.

या वेळी १६ वर्षे ब्रिटिशविरोधी कारस्थानात घालवून मिळविलेल्या अनुभवाची समीक्षा

करून कारस्थानी राजकारणाला रॉय यांनी मनाने पूर्णपणे रजा दिली. मार्क्सवादातील सामाजिक विकासतत्त्वाने पूर्वानुभवाचे सार काढण्यास त्यांना मदत केली. बंडे उठवून क्रांती निर्माण करण्याच्या कल्पनेवरचा विश्वास उडाला. समाजविषयक व इतिहासविषयक विद्यांच्या दृष्टीने राजकारणाचा व परिस्थितीचा अर्थ समजून घ्यावा व समाजातच बंदिस्त असलेल्या प्रगतिक्षम शक्तींना वैचारिक नेतृत्वाच्या द्वारे, संघटना करून, कार्यप्रवृत्त करावे, या निर्णयाप्रत ते आले.

कम्युनिस्ट राज्याचे वरिष्ठ अधिकारी व नेते एका बाजूला, दुसऱ्या बाजूला एक विचारसंपन्न श्रद्धाशील विवेकी रॉयसारखा माणूस- असे चित्र १९२० साली भरलेल्या जागतिक काँग्रेसमध्ये दिसले. तोपर्यंत सत्तेचा मद सत्ताधीशांना चढला नव्हता. म्हणून विवेकाची वाणी तेथे प्रभाव करू शकली. सत्यापुढे नमावयाचे, सत्तेपुढे नव्हे- हेच व्रत जीवनभर पाळायचे रॉय यांचे ठरले होते.

थर्ड इंटरनॅशनलच्या जागतिक काँग्रेसमध्ये लेनिनने साम्राज्यशाहीच्या अमलाखालील देशातील क्रांतीच्या मीमांसेचा व धोरणाचा मुद्दा मांडला. रॉय यांचा संपूर्ण मतभेद होता. लेनिनने रॉय यांचाही मुद्दा विचारणीय बाजू म्हणून मान्य करून घेतला.

रॉय यांच्या मुद्द्याचा सारांश असा की, हिंदुस्थानसारख्या साम्राज्याची वसाहत बनलेल्या देशातील भांडवलदार किंवा अन्य वरिष्ठ वर्ग लोकशाही क्रांतीस व साम्राज्यविरोधी क्रांतिकारक लढ्यास संपूर्ण अनुकूल असणे शक्य नाही. भांडवलदारवर्गाच्या पाठिंब्यावाचूनच येथे लोकशाहीक्रांती करावी लागेल. जमिनीची मालकी कसणाऱ्याच्या संपूर्ण मालकीची करणे ही या क्रांतीची आर्थिक बाजू होय. बुद्धिजीवी मध्यमवर्ग, शेतकरी व कामकरी हेच वर्ग क्रांतीची खरी शक्ती होय.

लेनिनचे मत होते की, साम्राज्यशाहीच्या वसाहतीतला राष्ट्रवाद क्रांतिकारक आहे व त्याला भांडवलदारांचाही पूर्ण पाठिंबा आहे, म्हणून भांडवलदार वर्गही क्रांतिकारक शक्तीचा भाग आहे, असे मानले पाहिजे.

हे दोन्ही मुद्दे विचारार्थ स्वीकारावे व अनुभव जसा जसा अधिक येईल त्याप्रमाणे कोणतातरी एक मुद्दा निश्चितपणे स्वीकारता येईल, असे म्हणून लेनिनने रॉयच्या बाजूस एकापरी मान्यता दिली

१०) पौर्वात्य देशातील क्रांती कार्याची धुरा

लेनिनने थर्ड इंटरनॅशनलच्या पौर्वात्य देशांतील क्रांतीच्या कार्याची धुरा रॉयवर ठेवली; एवढेच नव्हे तर १९२० सालापर्यंत मध्य आशयांत बोल्शेविक क्रांती स्थिरावली नव्हती, त्याकरिता रॉयच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून तिच्यावर तो कार्यभाग सोपविला.

१९२० च्या सुमारास हिंदुस्थानात खिलाफत चळवळ मुसलमानांत सुरू झाली. ब्रिटिशांनी खिलाफतविरोधी व मुस्लीम धर्मक्षेत्रांच्या स्थानात ढवळाढवळ करणारे धोरण

धरले होते. त्याच्या निषेधार्थ भारतीय मुसलमानांनी हिजरत म्हणजे देशत्याग मोठ्या प्रमाणात आरंभिला. अफगाणिस्थानात व रशियन तुर्कस्थानात हिंदी मुसलमानांच्या टोळ्या आश्रयार्थ येऊ लागल्या. या संधीचा फायदा घेऊन त्यांच्यापैकी काहीना कम्युनिझमची दीक्षा देऊन हिंदुस्थानात परत पाठविण्याकरिता मध्यंतरीचे एक आश्रयस्थान व शिवाय लष्करीशिक्षणाचे विद्यालय ताशकंद येथे रॉय यांच्या संचालकत्वाखाली स्थापले गेले. ही हिजरतची चळवळ थोड्याच दिवसांत थांबली. त्यामुळे रॉय मास्कोला परतले.

रॉय यांचा भारतीय राजकीय चळवळींचा व ब्रिटिश साम्राज्याच्या समग्र इतिहासाचा व्यासंग अधिक व्यापक स्वरूपांत सुरू झाला. त्यांचा वैचारिक अधिकार अधिक मोठा दिसू लागला. थर्ड इंटरनॅशनलतर्फे १९२२ साली 'व्हँगार्ड' ('Vanguard') व 'मासेस' ('Masses') ही साप्ताहिक रॉय यांच्या संपादकत्वाखाली हिंदुस्थानात समाजवाद व कम्युनिस्ट क्रांती यांच्या प्रचाराकरिता सुरू झाली. 'व्हँगार्ड' बर्लिनहून प्रथम निघे. ब्रिटिश सरकारच्या दडपणामुळे जर्मन सरकारने ते बंद पाडले, नंतर स्वित्झर्लंडहून प्रसिद्ध व्हावयास लागले, तेथेही तीच अडचण आलो. नंतर त्याचे पॅरिसला स्थलांतर झाले. १९२४ साली फ्रान्समध्ये पोलिसाने अटकही केली. त्यांतून रॉय यांची सुटकाही झाली.

११) संक्रमणावस्थेतील भारत

१९२२ ते १९२८ पर्यंत रॉय हे या साप्ताहिकाचे संपादक होते. त्या काळात त्यांनी भारताच्या राजकारणावर व राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर अनेक निबंध, पुस्तिका, पुस्तके व ग्रंथ लिहिले. विशेषतः त्यांचे ('India in Transition') 'संक्रमणवस्थेतील भारत' हे पुस्तक भारत व युरोपमध्ये अत्यंत नावाजले. हे पुस्तक प्रथम जर्मन भाषेत प्रसिद्ध झाले. नंतर इंग्लिशमध्ये त्याचा अनुवाद झाला.

अखंड लेखन व निरंतर विद्याव्यासंग यांची जोड त्यांच्या क्रांतिकार्याला सतत राहिली. म्हणून वैचारिक गतिशीलता व प्रभाव ही सतत टिकली व वाढत गेली युरोपियन कम्युनिस्ट चळवळीशींही त्यांनी आपला संबंध दृढ राखला. पूर्व, मध्य व पश्चिम युरोपातील व विशेषतः जर्मनीतील कम्युनिस्ट पक्षांचे अन्तर्गत व्यवहार, उलाढाली व व्यक्तिविशेष यांचे सूक्ष्म निरीक्षण ते त्यामुळे करू शकले. त्यांनी चीनशीही संबंध सारखा ठेवला होता.

१२) साम्राज्यशाह्यांनी घेरलेला चीन

पाश्चात्त्य साम्राज्यशाहीने एकोणिसाव्या शतकांत चीनला घेरून टाकले. फ्रेंच, ब्रिटिश, रशियन व जपानी अशा चार साम्राज्यशाह्यांनी चार दिशांनी चीनला वेढले होते. प्रत्येकीने चीनच्या अतिविस्तृत पसरलेल्या महान राष्ट्राचे बाजूबाजूचे प्रदेश व समुद्रालगतचे भाग ग्रासले. पैकी कोणोही एक अधिक बलिष्ठ होऊन इतरांस मागे टाकू शकली नाही. त्यामुळे चीन त्यांचे आर्थिक व राजकीय स्पर्धेचे क्रीडांगण बनले. त्यामुळे चीनची राज्यसत्ता

खिळखिळी झाली. परंतु ती १९११ पर्यंत टिकली.

अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत चीन ही सुवर्णभूमी होती. जगाच्या पेठांत चिनी कलाकुसरीचे व चैनीचे पदार्थ भरले जात. सोन्याचा व रुप्याचा प्रवाह चीनकडे वहात होता. त्याची दिशा ब्रिटिशांनी तलवार व तराजू यांच्या साहाय्याने उलटी फिरविली. इतर साम्राज्यशाह्यांनी त्या प्रवृत्तीला बळकट केले. हिंदुस्थानात अफू पिकवायची व चिनी बाजारात विकायची असा सपाटा चालविला. कर्तबगार, वाकबगार व कष्टाळू चिनी माणसास व्यसनाधीन करून त्याची बुद्धी अक्षरशः नष्ट केली. चिनी माणसाने कातलेल्या व विणलेल्या मृदू व तकतकीत रेशमी वस्त्राच्या वेषात लंडन, न्यूयार्क, पॅरिस, टोकियो व पेट्रोग्रॅड येथील रमणी झळकू लागल्या व मँचेस्टरच्या जाड्याभरड्या मळक्या कपड्यांत चिनी ललना संसाराचे जड ओझे वाहू लागल्या. चिनी मनुष्याच्या मानेचा मणका दिला झाला. चीन राष्ट्र विनाशार्थ जगू लागले.

चिनी समाजसंस्था अंतर्गत सरंजामशाहीच्या ओझ्याखाली पार तडकून गेली होती. शेतकरी वर्ग हिंदुस्थानइतकाच या समाजाचा मुख्य आधार. त्याच्या श्रमाचा मोठा वाटा जमीनदार घेई व केवळ श्वासोच्छ्वासापुरते त्याच्याजवळ ठेवी.

चिनी राज्यसंस्थेचे १९९१ नंतर अनेक तुकडे झाले. लष्करी अमलदारांच्या व मुत्सद्द्यांच्या हातांत निरनिराळे प्रांत पडले.

एकात्मक व एकछत्री चिनी राष्ट्राची स्थापना व्हावी व त्याला जपान, इंग्लंड व अमेरिकेसारखे नवे रूप यावे अशी आशा प्रदीप्त झालेली राष्ट्रवादी चळवळ निर्माण झाली. "कौमिंटांग" नावाची राष्ट्रवादी संघटना उत्पन्न झाली. लोकसत्तावादी मध्यमवर्गीय ध्येयवादी सुशिक्षित या संस्थेत आले. सन्-यत् सेन हे इ. स. १९२५ पर्यंत या संस्थेचे एक नेते होते.

चीनमध्ये हुकूमशाही, लोकसत्तावादी व कम्युनिझमची स्थापना करू इच्छिणारे असे त्रिविध नेतृत्व काम करीत होते. तिरंगी सामना चालला होता. "कौमिंटांग" मध्ये तिन्ही प्रवृत्ती एकमेकांत मिसळत होत्या व संघर्षही करीत होत्या.

सोव्हिएट रशियाच्या स्थापनेनंतर कम्युनिस्ट चळवळीलाही चीनमध्ये बळ आले. चीनमधील कारखानदारी व व्यापारी शहरे व विशेषतः दर्याकिनाऱ्यावरील बंदरी नगरे यांच्यातील कामगारवर्गात कम्युनिस्ट चळवळ अत्यंत जोरदार होती; व खेडोपाडी शेतकऱ्यांत शेतकरी-क्रांतीची जागृती होती. इ.स. १९२३ साली सोव्हिएट रशिया व थर्ड इंटरनॅशनलने दोन मुख्य प्रतिनिधी चीनच्या क्रांतीस मार्गदर्शनार्थ पाठविले : बोरोडिन (Borodin) व जनरल ब्लूशर ऊर्फ गॅलन्स (Blucher alias Galans). त्यांनी मास्को येथील लष्करी विद्यापीठांत लष्करी विद्या शिकलेल्या चॅंग कै शेकला हात घेऊन "कौमिंटांग" ची संघटना नियंत्रित करण्याचे प्रयत्न करून चीनची राज्यसत्ता संघटित करण्याचे यत्न चालविले, सर्व

वर्गांचा जास्तीत जास्त पाठिंबा मिळावा या धोरणाने बोरोडिन मार्गदर्शन करीत होता. त्याने क्रांतीच्या सामाजिक व आर्थिक कार्यक्रमाचा प्रश्न मागे ठेवून राष्ट्रीय एकात्मकतेस प्राधान्य दिले. राष्ट्रवादी भावनेचा जास्तीत जास्त उपयोग केला, त्यामुळे विविध प्रवृत्तींचा व हेतूंचा गोंधळ झाला. कोमिंटांगमध्ये अनेक सेनापती व मुत्सद्दी विविध व विरुद्ध उद्देशांनी सामील झाले. प्रत्यक्ष जनतेच्या बहुजनसमाजाच्या जागृतीचे महत्त्व कमी लेखून चिनी कम्युनिस्ट पक्ष व रशियन मार्गदर्शक वागू लागले. त्यामुळे क्रांतिवादी राजकारण संधिसाधू डावांच्या भानगडींत गुंतले.

सर्व प्रकारचे इत्थंभूत वृत्त मास्को येथे सतत पोचत होते. थर्ड इंटरनॅशनलमध्ये चीनचे प्रत्यक्ष निरीक्षण केलेले व चिनी समाज, इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान व राजकारण यांचे १० वर्षे अध्ययन केलेले रॉयच्या तोडीचे कोणी नव्हते.

इ. स. १९२६ च्या नोव्हेंबरमध्ये थर्ड इंटरनॅशनलच्या कार्यकारी समितीने नवे धोरण रॉय यांच्या सांगण्यावरून ठरविले : 'शेतकरी क्रांतीचा कार्यक्रम हाती घेऊनच चिनी राज्यसत्तेचा विस्तार व संघटन करीत जाणे युक्त होय. राजकीय क्रांतीला सामाजिक विस्तारापेक्षा सामाजिक खोली आणणे अधिक जरूर. जेथे जेथे क्रांतिवादी गटाच्या हाती सत्ता येईल तेथे तेथे प्रथम शेतकरी क्रांतीचा कार्यक्रम अमलात आणून पुढे पाऊल टाकावे आणि शहरातील कामगारांना न्याय मिळेल अशा धोरणाला प्राधान्य द्यावे' स्टालिन प्रथम ही गोष्ट मान्य करीना. परंतु अखेरीस रॉय यांच्या युक्तिवादास मान्यता त्यानेही दिली व रॉय यांना १९२७ च्या प्रारंभास चीनमध्ये नवा आदेश देऊन पाठविले.

वेळ बरीच कठीण होती. १९२६ च्या २० मार्च ला चँग कैशेकने सर्व सूत्रे हाती घेतली होती. कँटन हे लाल क्रांतीचे प्रखर केंद्र होते. तेच त्याने आपल्या काबूत आणले.

चिनी कम्युनिस्ट पक्षाने व बोरोडिनने रॉयच्या म्हणण्यास नकार दिला. समन्वयवादास सर्वच बळी पडले होते. परंतु वूहानचे सरकार अजून क्रांतिवाद्यांच्या हाती होते. चीनच्या किनाऱ्यापासून दूर असलेले फार मोठे प्रदेश शेतकरी क्रांतीस मोकळे होते. दर्यालगतची अनेक शहरे कामगारसंघटनांच्या छापेत होती. कौमिंग्टांग की क्रांतिकारक जागृत जनता यांच्यापैकी कोणावर भरवसा ठेवावयाचा, हाच प्रश्न होता. "कौमिंग्टांग" वर चिनी कम्युनिस्ट पक्ष व रशियन नेते यांनी भिस्त ठेवली, त्याचे पर्यवसान म्हणजे चँग कैशेकने सर्व सूत्रे हाती घेऊन व लष्करी कब्जा बळकट करून, फितूर बनून क्रांतिकारकांची कत्तल केली. अखेरीस त्याला पाश्चात्त्य साम्राज्यशाह्यांनी सर्व प्रकारे आर्थिक साहाय्य केले. १९२८ साली तो हुकूमशहा बनला.

थर्ड इंटरनॅशनलच्या १९३२ साली प्रसिद्ध झालेल्या अधिकृत इतिहासात मिफ् हा जर्मन कम्युनिस्ट लेखक म्हणतो : "चिनी कम्युनिस्ट पक्षाला लेनिनवादी मीमांसा योग्य प्रकारे शिकविणारे रॉय हेच पहिले गृहस्थ होत. या पक्षाला चळवळीचा संपूर्ण दृष्टिकोन व

परिस्थितीची मीमांसा रॉयनी शिकवली. बोल्शेविक विश्वक्रांतीच्या अनुभवाचे सार त्यांनी शिकविले.''

रॉय हे, आपले कोणी ऐकत नाही, हे पाहून चीनहून १९२७ च्या अखेरीस मास्कोस परतले. त्या सर्वच मंडळींना पळून यावे लागले. चीनमधील अतिपरिश्रमाने रॉय आजारी झाले.

१९२८ साली रॉय यांना कानाचे दुखणे उद्भवले. मास्को हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया झाली. परंतु आराम पडला नाही. विमानाने बर्लिनच्या हॉस्पिटलमध्ये आणावे लागले. तेथे पुनः शस्त्रक्रिया होऊन ते पूर्ण बरे झाले.

१३) रॉय यांच्यावर विपर्यस्त आरोप

रॉय आजारी असताना त्यांच्या गैरहजेरीत थर्ड इंटरनॅशनलच्या सहाव्या विश्वकाँग्रेसचे अधिवेशन १९२८ सप्टेंबरमध्ये झाले. १९२० ते १९२७ पर्यंतच्या रॉयच्या पौर्वात्य देशांतील मीमांसेच्या विरोधी निर्णय घेण्यात आला. कुसेनिन हा फिनिश कम्युनिस्ट रॉयच्या विरुद्ध बाजूचा पुढारी होता. रॉयच्या मताचा विपर्यास करून विरोधी निर्णय घेण्यात आला. बौद्धिक मीमांसेपेक्षा, बळकट होणाऱ्या बोल्शेविक पक्षाच्या सत्तेचे पाठबळ हेच निर्णय बदलण्याचे व विचारविरोधाचे साधन बनले. तत्त्वज्ञानापेक्षा राजकारणी कारस्थाने वैचारिक निर्णयाचे सुकाणू बनली.

''ब्रिटिश आर्थिक साम्राज्यशाहीला पहिल्या महायुद्धाने उतरती कळा लागली. उदा. हिंदुस्थानमधील आर्थिक परिवर्तन त्याचे निदर्शक आहे. देशी भांडवल वाढीस लागून देशी यांत्रिक उद्योगधंदे व कारखाने मँचेस्टरचे स्थान घेऊ लागले. साम्राज्यशाही शोषणाचा दुय्यम भागीदार म्हणून देशी भांडवलदार उत्पन्न झाला आहे. म्हणून भारतीय लोकशाही क्रांतीचा तो वर्ग पुरस्कर्ता होणे शक्य नाही.'' या रॉय यांच्या मीमांसेवरून रॉयवर आरोप केला गेला की, ब्रिटिश साम्राज्यशाही स्वतःचे विसर्जन करावयास लागली आहे व ती हिंदुस्थानच्या राजकीय स्वातंत्र्यास अनुकूल झाली आहे, असे रॉय म्हणतात व ते ब्रिटिश साम्राज्यशाहीची तरफदारी करीत आहेत!

असा आरोप केल्यामुळे १९२९ मध्ये रॉय यांचे नाव थर्ड इंटरनॅशनलमधून आपोआप वगळले गेले. नंतर १९२८ पासून रॉय हे जर्मनीत बर्लिन येथे वास्तव्य करून राहिले. तेव्हा जर्मन कम्युनिस्ट पक्षांतही दोन तट झाले होते. कम्युनिस्टांच्या सत्तारूढ झालेल्या गटाच्या विरोधी असलेले कम्युनिस्ट गट युरोपातील अनेक देशांत याच सुमारास उद्भवले. आतापर्यंत हे कम्युनिस्ट मास्कोकडे मानवी दास्याचा अंत करण्यास सज्ज असलेले श्रेष्ठ मोचकशक्तीचे केंद्र या नात्याने पहात होते. परंतु आता संदेह बळावू लागला. सोविएट रशियाच्या नेत्यांनी स्टालिनच्या नेतृत्वाखाली तत्त्वच्युत सत्तेचे राजकारण खेळण्यास प्रारंभ केला.

१४) उच्च पदार्थ विज्ञानाचे अध्ययन

रॉय यांच्या बर्लिनमधील या वास्तव्यांत तत्त्वचिंतनास व विद्याव्यासंगास भरपूर अवसर थर्ड इंटरनॅशनलची जबाबदारी कमी झाल्यामुळे लाभला. आइन्स्टाईन, मॅक्स प्लांक व हैसेनबर्ग यांच्या पदार्थविज्ञानांतील क्रांतिकारक शोधांमुळे पाश्चात्त्य भौतिकवादी तत्त्वज्ञानांत मूलगामी फेर करण्याची आवश्यकता वाटावी असे तत्त्वचिंतकांत वैचारिक आंदोलन सुरू होते. रॉय यांनी उच्च पदार्थविज्ञानाचे अध्ययन केले व आइन्स्टाइनसारख्या पंडितांशीं तत्त्वचर्चेचे प्रसंग साधले. उष्णता हळूहळू नष्ट होऊन सर्व विश्वच विराम पावेल या कल्पनेचे खंडन करणारी उपपत्ती रॉय यांनी मांडिली. त्यामुळे जर्मनीतील पदार्थविज्ञानाच्या व्यासंगी पंडितांस एक प्रकारे कौतुक व आदर उत्पन्न झाला.

रॉय यांच्या जीवनाला मुळातच निराळे वळण लागलेले. त्यामुळे त्यांनी चालू राजकारण व चालू ऐतिहासिक घडामोडी यांच्यांतून मन काढले नाही. चीनच्या अनुभवावर आधारलेली चीनविषयक नवी मार्क्सवादी मीमांसा त्यांनी जर्मन भाषेत लिहिली. या ग्रंथात चीनची प्राचीन समाजरचना, चीनचा धर्म व चीनमधील क्रांती प्रतिक्रांती यांचे साधार मार्क्सवादी विवेचन केले. युरोप व अमेरिका येथील मार्क्सवादी व समाजवादी यांना फार मोठे वैचारिक खाद्य रॉय यांच्या या सहाशे पृष्ठांच्या ग्रंथाने मिळाले. हा ग्रंथ १९३० साली पूर्ण झाला. नंतर त्यांनी जर्मनीस रामराम ठोकला.

१५) डेहराडून

रॉय यांच्या पत्नी श्रीमती एलन व रॉय यांची जर्मनीत प्रथम गाठ पडली. युरोपच्या सहा भाषा चांगल्या लिहिता व बोलता येण्यासारख्या त्यांच्या तयार असल्यामुळे त्या जर्मन कम्युनिस्ट पक्षांत दुभाषी म्हणून काम करीत.

श्रीमती एलन यांनी जेम्स फ्रेझर याचा मानवजातिशास्त्रावरील जगप्रसिद्ध महाप्रबंध जर्मन भाषेत भाषान्तरित केला आहे. युरोपियन कम्युनिस्ट व समाजवादी चळवळींच्या मोठ्या कालखंडाच्या ऐतिहासिक घडामोडी त्यांच्या प्रत्यक्ष अवलोकनांत आल्यामुळे त्यांना राजकीय परिपक्वता आलेली आहे. ही मोठी कणखर बाई आहे. "विवाहित होऊन कोणा एका पुरुष व्यक्तीला जीवित समर्पित करून जीवन जगण्याची कल्पना मला आवडत नव्हती. अनेक मित्र भेटले, परंतु विवाहबद्ध होण्याची भावना उपजली नाही. परंतु रॉय यांचे व्यक्तित्वच सामर्थ्यशाली, त्यामुळे माझे मन दिपून गेले. विचारमय प्रकाशाची नवी नवीं क्षितिजें नित्य दाखविणारी ही व्यक्ती होती. ते प्रकाशमय जीवित होते. त्यांच्या सहवासात वर्षे क्षणाप्रमाणे निघून गेली!" असे उद्गार दीर्घ निःश्वासासह त्यांच्या तोंडांतून परवा बाहेर पडले.

१६) डॉ. महमूद

रॉय यांनी १९३० साली हिंदुस्थानांत येण्याचा हिय्या केला. जन्मठेप काळ्या पाण्याच्या शिक्षेची तलवार येथे लटकली होती. "या अग्निदिव्यातून गेलेच पाहिजे ! घरची क्रांती सोडून कसे चालेल ?" असे म्हणून आल्प्स पर्वतातील मेरॅनो (Merano) येथील एका रम्य निवासमंदिरात एलनचा निरोप रॉयनी घेतला व हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर डॉ. महमूद म्हणून पाऊल ठेवले.

येथे म. गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेली कायदेभंगाची चळवळ ओसरत होती. या चळवळीच्या मेघगर्जनेचे पडसाद युरोपच्या नभोमंडळात उठलेले रॉयनी ऐकले होते. म्हणून ते इकडे अधिक आकर्षिले गेले.

गांधी-आयर्विन कराराने स्थिरस्थावर होत होती. डॉ. महमूद तडफेने व अस्वस्थपणे नव्या ध्येयवादाच्या चळवळीस अनुकूल केंद्रस्थाने तपासीत व स्थापीत संचार करू लागले. रात्रंदिवस अविश्रांतपणे गाठीभेटी व खाजगी सभा यांचा तडाखा त्यांनी चालविला. त्यांना अनेक वेळा दिवस उपाशीतापाशीपणे काढावे लागत. कित्येक वेळा रात्री १ वाजता मित्राच्या बिऱ्हाडाचे दार ठोठावून क्षमा मागून आत शिरत. अवशिष्ट असेल त्यावर तहान भागवीत व पुनः अज्ञात स्थळी निघून जात. कित्येकदा दिवसात चार ठिकाणी स्थलांतरे करावी लागत. मित्र म्हणत "कोठे तरी एकत्र स्वस्थ काही न करता बसलात तर बिनधोक राहता येईल." त्यात काय अर्थ आहे? स्वस्थ बसणे म्हणजे पराभव. नच जमले तर परत परदेशी होईन" असे उत्तर मिळे. माणूस कितीही चतुर असला तरी जेथे सरकारला माणूस अगदी जरुरीचा वाटतो तेथे तो किती दिवस छपेल? मुंबईसारख्या ब्रिटिशांच्या बालेकिल्ल्यात तर सुतरां अशक्य!

२१ जुलै १९३१ ला रात्री एका हुशार पोलीस अधिकाऱ्याने सर्व वाटा रोखून व इमारतीस वेढा देऊन डॉ. महमूदला पकडले. सर्व जगाच्या कान्याकोपऱ्यांत पहाटेस वार्ता दणाणत गेली.

ते कानपूर कटाच्या खटल्यातील आरोपी नं. १ म्हणून आहेत हे अगोदरच ठरले होते. त्यांच्यावर "राजाचे राज्य उलथून टाकण्याचा कट" केल्याचा आरोप होता. खटला जेलमध्येच चालला. आरोपीला स्वतःचे निवेदन न्यायाधीशाने करू दिले नाही व निकाल दिला, १२ वर्षे सक्त मजुरी. नंतर अपिलात ती ६ वर्षांची झाली. अपेक्षेपेक्षा फारच अल्प शिक्षा म्हणून त्या रात्री आरोपीला समाधानाने झोप लागली!

"माझा बचाव" ("My Defence") या नावाचे न्यायाधीशाने परवानगी न दिलेले राय यांचे निवेदन पुस्तकरूपाने पांडेचरीहून प्रसिद्ध झाले. त्याला ब्रिटिश हिंदुस्थानात बंदी होती.

या 'बचावा'चे महत्त्व भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात अनन्यसाधारण आहे. राज्यशास्त्र, कायदेतत्त्व व मानवी स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान या दृष्टीने तर त्याची योग्यता मोठी आहेच; परंतु भारतीय स्वातंत्र्याच्या सर्व प्रकारच्या प्रयत्नांचे नीतिशास्त्रीय महान समर्थन म्हणून हा पुराव्याचा कागद वरिष्ठ प्रतीचा आहे. सर्व देशभक्तांच्या गंभीर श्रद्धेचे, भावनांचे व

यत्नांचे बौद्धिक मूल्यमापन यात असून त्यांचे आत्मे कृतार्थ होतील, अशी त्याची संपन्नता आहे. त्यात सांगितलेला मुख्य निर्णय असा आहे की, "ब्रिटिश राजा सनदशीर रीतीने भारताचा राजा नव्हताच. दुसरे असे की, ही बेसनदशीर राज्यसत्ता नष्ट करण्याचे सर्व उपाय व प्रयत्न सर्वथैव न्याय्य व कायदेशीर मानले पाहिजेत. तिसरे असे कीं, कोणतेही राज्य जनतेस अमान्य असेल तर ते उलथून टाकणे हा जनतेचा न्याय्य व सनदशीर हक्क आहे."

रॉय यांचे वकील (सध्याचे भारताचे संघराज्य मंत्री) पं. कटजू यांनी हा बचाव मांडण्याचे नाकारले, परंतु त्यांतील सर्व समर्थन लॉक, ह्यूम, बेंथॅम, बेजेहॉट, डिसी, ब्लॅक्स्टोन इत्यादी ब्रिटिश राज्यशास्त्रज्ञांच्या व कायदेशास्त्रज्ञांच्या आधारेच केले आहे. वकील म्हणाले : "यानें शिक्षा अधिक दीर्घ मुदतीची होईल; मी तर शिक्षा कमी कशी होईल या पंचायतीत आहे." रॉय यांनीं सांगितले : "ते काही असो. माझे समाधान मात्र तुमच्या बचावात नाही."

१७) बंदिवासातील जीवन

बंदिवानाच्या दीर्घकालीन जीवनास प्रारंभ बरेली सेंट्रल जेलमध्ये झाला. कित्येक वर्षे भोगलेल्या भूमिगत अज्ञात वासापेक्षा बंदिवानाचें दीर्घजीवन अधिक असह्य असते असा अनुभव येऊ लागला. भूमिगत अज्ञात वासात कारागृहापेक्षा जबर कष्ट असतात, हालअपेष्टांना अंत नसतो, परंतु शूराला त्याची क्षिती नसते. कारण त्यात संकटांशी झगडण्याचे एक प्रकारचे स्वातंत्र्य असते; बंधनांचे स्वरूप बदलत असते व झगडण्याचे मार्गही बदलत असतात; धैर्य व बुद्धिचातुर्य यांचा कस लागत असतो. कारागृहातला बंदिवान नित्य अन्तर्बाह्य जखडलेला असतो; त्याच एका कंटाळवाण्या चक्रात रात्र व दिवस यांचे द्वन्द्व फिरत असते; कधीकाळी तरी सुटका होईल, ही आशा तेवढी जीवाला आश्वासन देऊन जगवीत असते; जीवनाच्या शक्तींचा प्रतिदिन होणारा ऱ्हास दिसत असतो. "बंदिवानाचे जीवन मरणप्राय असते!" असा या संबंधातला अनुभव रॉय यांनी आपल्या 'बंदिवानाची दैनंदिनी' या पुस्तकात नोंदून ठेवला आहे.

बरेलीचा उन्हाळा व हिवाळा दोन्ही फार कडक. तेथील जेलचे उंच प्राकार प्रखर उन्हाने तापून जेलचा फर्नेस बनतो. कपडा घामाने ओला चिंब होऊन सारखी चिकचिक होते. तहान न भागल्यामुळे ओठ सुकून कंठ कोरडा पडतो. रॉय यांची बरीच वर्षे पश्चिमेतील शीत प्रदेशात गेलेली. म्हणून येथील उन्हाळा सोसेना. कपडा व पांघरूण अंथरूणही जेमतेमच. म्हणून थंडी कडाक्याची पडली की अंथरुणात हुडहुडी भरायची. उबाऱ्यावाचून रात्र कंठायची. हातपाय थिजून जायचे. यामुळे त्यांच्या हृदयावर परिणाम कायमचा झाला. त्यांना पोटदुखी व आंत्रविकार जडला. कारण ते पुनःपुनः आजारी पडू लागले. अन्नही अत्यंत रूक्ष व अपुरे मिळे. रविवारी गूळ मिळाला की दिवाळीदसरा. त्यांची शक्ती घटत चालली. डोळे मिटून रामराम म्हणत अर्धतंद्रेत दिवस घालवायची त्यांना सवय नव्हती व त्यास अनुकूल अशी भावनाही नव्हती. त्याच परिस्थितीत अखंड लेखन व सतत विद्याव्यासंग हे मानस तप

त्यांनी निरंतर सुरू ठेवले. हस्तव्यवसायांतही त्यांना गंमत वाटायची. ते मधून मधून चरखाही चालवीत. यामुळे म. गांधींनी आपणांवर मात केली, अशी कबूलीही त्यांनी दिली.

रॉयना पुस्तके व नियतकालिके मिळण्याच्या बाबतीत बहुत जिकीर व्हावयाची. त्यांचे मित्र, युरोप-अमेरिका येथूनही जर्मन, फ्रेंच व स्पॅनिश भाषेतली पुस्तके पाठवीत. ती येथे आली तरी मिळावयास महिने निघून जात. कारण ती कोणत्या विषयाची आहेत, याची खात्री करून घेण्यात अधिकाऱ्यांचा वेळ जाई. रॉयना तर पुस्तकांच्या प्राप्तीविषयी प्रियतमेसारखी उत्कंठा लागे.

त्यांनी जेलमधून विस्तृत पत्र पाठविली. त्यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्याच्या प्रस्तावनेत मुंबईचे प्रथितयश डॉ. एरूळकर लिहितात की "या लेखकाचे मन किती सुसंस्कृत व संपन्न आहे, माणसे, वस्तू, विविध घडामोडी - यांनी भरलेल्या परिस्थितीच्या बाबतीत ते किती सूक्ष्म संवेदनशील आहे, व ते किती वैचित्र्यपूर्ण व सामर्थ्यशाली प्रतिक्रियांना प्रसवणारे आहे हे या पत्रांवरून प्रत्ययास येते. ही पत्रे म्हणजे "एक उत्कृष्ट वैशिष्ट्याचा वाङ्मयप्रकारच होय."

रॉयनी जेलमध्ये अनेक ग्रंथ लिहिले व अनेक मोठ्या प्रबंधांची टिप्पणे लिहिली. डॉ. एरुळकर आणखी लिहितात : "इतक्या खडतर जीवनदशेतही इतके उच्च चिंतनपर प्रचंड लेखनकार्य रॉय करू शकले, ही आशा व इच्छाशक्ती यांची खूण आहे. हजारो मैलांवरून खटपटीनें पाठविलेली पुस्तके मिळण्याकरिता नित्य खटखट होत होती. लेखनसाहित्यही देण्यात कंजूषपणाची कमाल व्हावयाची. कागद अगदी तुटपुंजा मिळायचा. रॉयनी अशाही परिस्थितींत प्रचंड लेखन केलें. डोळे फाडून कांही ठिकाणीं वाचावे लागते इतक्या बारक्या अक्षरांत समास न सोडतां लिहिलेली हजारों पृष्ठे त्यांच्या संग्रहात पहायला मिळाली. रॉयना आणखी वेळ मिळावा व त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध व्हावे अशी अपेक्षा लिखाणाचे भार पाहिल्यावर अनावर झाली."

जेलमध्ये असताना रॉय यांचे तीन प्रश्नांवर चित्त एकाग्र झाले होते: (१) आधुनिक विज्ञानाच्या नव्या शोधांनी तत्त्वज्ञानात उत्पन्न झालेल्या मौलिक अडचणीतून बाहेर कसे पडावे? (२) जगात फासिस्ट हुकूमशाही वाढीस लागली आहे. त्यामुळे लोकशाही संस्कृती केव्हां विनाशाप्रत जाईल याचा नियम नाही, असे भय उत्पन्न झाले आहे. यातून कोणत्या उपायांनी जग सुटका करून घेऊ शकेल? (३) भारताची संस्कृती व समाजसंस्था जीर्णावस्थेत रुद्ध आहे. वैचारिक नव जीवनानेच तिला मरण टाळता येईल. त्या वैचारिक नवजीवनाच्या प्रथम गरजा कोणत्या?

रॉय यांनी कारागृहवासातील अखेरीचे दिवस डेहराडूनच्या जेलमध्ये काढले. जेलमधून २० नोव्हेंबर १९३६ ला सुटका झाली. बाहेरून दिसायला कणखर, परंतु आतून पोखरलेली प्रकृती घेऊन ते बाहेर आले. मित्रमंडळी लांबून रेल्वेप्रवास करून स्वागतास आली.

त्यांपैकी कोणाचीच सांपत्तिक स्थिती फारशी चांगली नव्हती. रॉय यांच्या अकिंचन परंतु स्वतंत्र जीवनक्रमाचा पुनश्च हरिः ओम झाला.

१८) काँग्रेसमधील तीन वर्षे...

कोणत्या राजकीय संघटनेत प्रथम सामील होऊन पहावयाचे हे जेलमध्ये खूप विचार करून अगोदरच ठरले होते. काँग्रेस समाजवादी गट काँग्रेसमध्ये होता. त्याबद्दल खरे प्रेमिही होते. परंतु संघटनेच्या मुद्द्यावर रॉय यांचा मतभेद होता. मतभेद असा : समाजवादी पक्ष म्हणून काँग्रेसमध्ये राहू नये; पक्षात दुसरा पक्ष ही विसंगती आहे. दुसरे असे की, काँग्रेस ज्या ध्येयाकरिता अस्तित्वात आली त्याला लोकशाही क्रांतीचा उत्तम कार्यक्रमच अधिक समर्थ करील; समाजवादी कार्यक्रम नव्हे. समाजवादी पक्षाशी या मतभेदामुळे रॉय यांचे शेवटपर्यंत जमले नाही. कम्युनिस्ट पक्षाची वाट दोन्ही बाजूंनी बंद होती. रॉय व कम्युनिस्ट पक्ष यांचे मार्क्सवाद हे मौलिक साम्य होते. पण जवळची परंतु परिपक्व विचारसरणीची व्यक्ती किंवा संघटना ही कम्युनिस्टांच्या दृष्टीने पहिल्या क्रमांकाचा शत्रू. अर्ध्याकच्च्या विचाराचे व समान ध्येयाचे गट हे कार्यकर्त्यांना जाळ्यांत पकडण्याचे क्षेत्र म्हणून कम्युनिस्ट पक्ष मानतो. अगदीं मूलतःच विरुद्ध असलेल्या विचाराच्या व्यक्ती वा गट ह्यांस प्रसंगानुसार संधिसाधू डाव टाकून जवळ करावयाचे किंवा दूर लोटावयाचे, हे नेहमीचे कम्युनिस्टांचे धोरण होय. कम्युनिस्ट पक्षाच्या या अव्वल सत्तास्पर्धेच्या राजकारणाची पूर्ण माहिती असल्यामुळे रॉय यांनी तो मार्गच दृष्टीआड केला होता.

काँग्रेसमध्ये रॉय यांना खरोखर स्थान नव्हतेच. रामगड काँग्रेसमध्ये अखेर श्री. राजेंद्रप्रसादांनी उघडच सांगितले की "रॉय यांचा मार्ग व काँग्रेसचा मार्ग यांत मौलिक तफावत आहे." पं. नेहरूंनीही त्यास दुजोरा दिला. रॉय यांनी दोन गोष्टी काँग्रेसपुढे ठेवल्या होत्या : एक, काँग्रेसची स्थानिक जनसमित्यांच्या संघटनेवर उभारणी करावी; या स्थानिक, प्रांतीय व राष्ट्रीय जन समित्यांच्या संघटनेने आर्थिक व राजकीय ध्येयाने झगडा वाढीस न्यावा; संघटना पूर्णपणे जनताव्यापी होईपर्यंत स्वरूप आर्थिक मागण्यांवर भर देणारे असावे; आत्मविश्वास आल्यावर घटनासमिती स्थापून लोकशाही क्रांती घडवून आणावी. हिंसा की अहिंसा, हा यामध्ये वादाचा मुद्दा नव्हता. या विचाराचा प्रचार करण्याकरिता रॉयनी 'लीग ऑफ रॅडिकल काँग्रेसमेन' स्थापिली आणि 'इंडिपेंडंट इंडिया' हे साप्ताहिक सुरू केले. याच साप्ताहिकास 'रॅडिकल ह्यूमॅनिस्ट' असे नवे नामाभिधान अलीकडे देण्यात आले आहे. रॉय हे अत्यंत धिम्मेपणानेच भारतीय राजकारणाकडे बघत. नजीकच्या काळात अनुकूल असा बदल होईल असे त्यांनी मनोमनी कधी मानले नव्हते. लोकशाही राजकारणास आवश्यक अशी वैचारिक क्रांती या देशास आवश्यक आहे, असे रॉय यांनीं ध्यानात घेतले होते. १९२२ साली आधुनिक भारताची जी राजकीय मीमांसा त्यांनी लिहिली, त्यातील विचारांतून ही कल्पना निघाली. 'येथील पुराणमतवाद व रूढिनिष्ठा लोकशाहीला रुजू देणार

नाही. सतत परिवर्तनशील समाजसंस्थेचे लोकशाही हे मुख्य साधन आहे. विचारसमर्थ माणसे ही लोकशाहीची मुख्य गरज आहे. बदलत्या जगात माणसास नित्य नवा विचार सुचावा लागतो, नाहीतर 'माणूस पराभूत होतो; येथील मनावर परंपरेची जी बंधने आहेत, तीं नवा विचारच निर्माण होऊ देत नाहीत. हे वैचारिक क्लैब्य हरण करणे जरूर आहे.'' अशा संकेताने त्यांनी डेहराडून येथे 'रेनासन्स इन्स्टिट्यूट' (Renaissance Institute) काढली. चालू राजकारणावर प्रत्यक्ष प्रभाव उत्पन्न नाही झाला तरी हरकत नाही, कारण त्यांस मोठ्या अडचणी आहेत; भविष्याचा पायाच घालणे योग्य असे त्यांनी ठरवून ही संस्था निर्मिली.

काँग्रेसमध्ये रॉय यांनी तीन वर्ष काढली. १९४० साली दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर जागतिक राजकारणात हिंदी राजकारण पूर्णपणे गुंतले. मूलगामी मतभेदाचा प्रश्न उद्भवला. रॉयना त्यामुळे काँग्रेसमधून बाहेर पडणे भाग पडले.

१९) दुसऱ्या महायुद्धाची मीमांसा व लोकनिंदा

मानवजातीने आजपर्यंत जी प्रगती केली, चिरंतन मानवी मूल्यांची साधना केली तीच या संग्रामात धोक्यांत आहे; हा केवळ राजनैतिक संग्राम नाही; त्यात हुकूमशाही विरुद्ध लोकशाही हाच मुद्दा गुंतलेला नाही, तर मानवी स्वातंत्र्य विरुद्ध गुलामगिरी हा मुद्दा मुख्यतः गुंतलेला आहे. मानवी स्वातंत्र्याचे जग प्रलयाग्नीत सांपडले आहे. हुकूमशाहीविरोधी संग्राम जिंकणे म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचाही प्रश्न सोडविणे होय,'' अशी रॉय यांची धारणा त्या वेळी होती; त्यांनी केलेल्या दुसऱ्या महायुद्धाच्या मीमांसेत ती प्रकट केली आहे. हिंदी राजकारण संकुचित राष्ट्रवादाच्या भावनेस बळी पडले व त्याने जागतिक मानवी स्वातंत्र्याला त्याच्या नशिबावर सोपविले.

रॉयनी दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभी अशी आपली निराळी राजकीय भूमिका घेतली व त्याकरिता निराळा राजकीय पक्ष ('रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी') काढला. रॉय यांनी सॉक्रेटिसाप्रमाणे नव्हे तर शंकराप्रमाणे लोकनिंदेचे, भयंकर अपकीर्तीचे हलाहल प्राशन करण्याचे ठरवून फॅसिझमविरोधी राष्ट्रांची बाजू घेतली.

हे ''युद्ध ब्रिटिश साम्राज्यशाहीचा अंत करीलच. त्याबद्दल संदेह बाळगण्याची गरज नाही'', असे स्पष्ट भविष्य १९४० साली रॉयनी सांगितले. ''इंग्लंडची बाजू घेणे म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीची बाजू घेणे नव्हे. पहिल्या महायुद्धाने ब्रिटिश साम्राज्यास उतरती कळा लागली, या दुसऱ्या महायुद्धाने त्या साम्राज्याचा आर्थिक पायाच नष्ट होईल. इंग्लंडने हे युद्ध जिंकले तर साम्राज्याला अधिक आयुष्य लाभेल हे म्हणणे अत्यंत तर्कदुष्ट आहे. साम्राज्य टिकविण्याचा उद्देश साम्राज्य टिकवू शकत नाही. त्या साम्राज्याचा पायाच साम्राज्य टिकवू शकतो. तो पायाच हे युद्ध नष्ट करीत आहे'' - अशी साम्राज्यमीमांसा रॉयनी त्या वेळी मांडली. मानवेंद्रनाथ रॉय हेच एकटे अशी मीमांसा सांगणारे सगळ्या मानवी जगात तेव्हा होते.

२०) मानवी एकतेच्या विशुद्ध सत्याचे दर्शन

१९२० सालापासून रॉय यांना ज्या परमार्थाचा साक्षात्कार झाला, त्यावरच ते शेवटपर्यंत स्थिरावले. ती निष्ठा अधिकाधिक बळावत गेली. मार्क्सवादाने त्यांना या निष्ठेवर आणून सोडले. तिला अद्ययावत बौद्धिक विचारवैभवाने बळकट करण्याचे कार्य मार्क्सवादानेच केले. वस्तुतः, स्वामी विवेकानंदांच्या प्रसन्न अध्यात्मवादाच्या संस्कारांनीच प्रथम कौमारावस्थेत या निष्ठेची बीजे रोवली गेली. मार्क्सवादाने राष्ट्रवादी अहंकाराची शकले उडविली व मानव्याच्या एकतेचे सत्य निरुपाधिक विशुद्ध रूपात दाखवून दिले. हे मानवी एकतेचे विशुद्ध सत्य हाच रॉय यांचा परमार्थ होय. याच परमार्थाने सोविएट यूनियन व थर्ड इंटरनॅशनल यांच्याकडे ते आकर्षिले गेले; कम्युनिझमचाच नव्हे तर मार्क्सवादाचाही अंगीकार केवळ याच निष्ठेचे उपांग म्हणून त्यांनी केला; त्याच परमार्थाच्या सिद्धीकरितां त्यांनी वेळोवेळी निरनिराळ्या मार्गांचा स्वीकार व त्याग केला. कम्युनिझमच्या पलीकडे त्यांना त्याच निष्ठेने नेले. या आपल्या निष्ठेचा अर्थ त्यांनी नवमानवतावाद या बौद्धिक तत्त्वज्ञानाच्या स्वरूपाने अखेरीस १९४७ साली मांडला.

'रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी'चे विसर्जन त्यांनी १९४८ सालाच्या शेवटी केलें. राष्ट्रवादी राजकारण हे लोकशाहीला मर्यादा घालते व संकटकाळी तिचा बळीही घेते हे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या ऐतिहासिक अनुभवांचे रहस्य त्यांनी दुसऱ्या महायुद्धात मांडले. पक्षनिष्ठ राजकारण वा पार्लमेंटरी लोकशाहीसुद्धा अंतिम अर्थाने लोकशाहीला नेहमी मर्यादा घालते व संकटकाळी अविवेकी बनून लोकशाहीचीही पर्वा करीत नाही, अशा निर्णयाला ते ते पोचले. तदर्थ त्यांनी स्वपक्षाचेही विसर्जन केले.

आधुनिक जगात मानवी कुलाला विनाशाच्या संकटांतून जी आध्यात्मिकता तारील ती श्रेष्ठ आध्यात्मिकता होय. ती कशात आहे? आज सामुदायिक अहंकारदेवतेला मानव्याचा बळी दिला जात आहे. राष्ट्रवाद व कम्युनिझम ही त्या देवतेची दोन रूपे आहेत. मानवी स्वातंत्र्य व सद्गुण यांचे हवन या देवतेच्या स्थंडिलावर चालले आहे. संकटांतून जी श्रद्धा व निष्ठा माणसाला वाचवील त्या श्रद्धेतून व निष्ठेतून प्रकट होणारी या युगाची प्रज्ञा हीच श्रेष्ठ आध्यात्मिकता होय. अशी प्रज्ञा मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नवमानवतावादाच्या रूपाने मूर्त रूपात आली आहे.

आपला ध्येयवाद निरपवादपणे आचरणात आणणे व आचरणात आणताना येणारी संकटे सोसण्यास व त्या करिता सर्वस्व गमावण्यास तयार होणे हे अनंत श्रद्धेचे लक्षण होय. त्या श्रद्धेला सत्याचे स्वभावसिद्ध नितांत आकर्षण असते. परंतु पूर्वपरंपरागत संस्कार व भावना यांची बंधने बुद्धीला सत्याची प्रतीती होण्यास प्रतिबंध करीत असतात. ही बंधने श्रद्धेची अंगे बनतात. बुद्धिद्वारा प्रमाणांच्या योगांनी सत्याची समीक्षा निरंतर करीत राहिले तरच सत्याच्या जवळ मनुष्य जाऊ शकतो. समीक्षेस नित्य तत्पर राहणे हे सत्यनिष्ठेचे लक्षण

होय, अशी सत्यनिष्ठा आधुनिक अध्यात्मवाद्याच्या ठिकाणी सापडत नाही. तिला श्रद्धेपासून वेगळी करण्याच्या मोहात तथाकथित अध्यात्मवादी सापडला आहे. वर्तमानकालातील अध्यात्मवादी परंपरा अवनत झाल्याचे हे मुख्य गमक आहे. पुरातन युगाचा हा हीन वारसा आहे. पुरातन युगात मानवी ज्ञानाच्या मर्यादा लवकर बदलत नसत. त्यामुळे ज्ञान शब्दप्रामाण्याच्या मर्यादेत बंदिस्त होते. त्यामुळे श्रद्धा व सत्यनिष्ठा एकच होत असे. परंतु हे युग ज्ञानाच्या मर्यादा अनन्त अवकाशात सतत विस्तार पावण्याचे आहे. बाह्य जगाचेच नव्हे तर अंतरंगाचेही ज्ञान विस्तार पावत आहे. याची दखल वर्तमान युगातही जुन्या संस्कारांच्या कारागृहात बद्ध असलेल्या अध्यात्मवाद्याने घेतलेली नाही.

ध्येयवादाप्रमाणे आचरण करणे व त्याच वेळी त्याची सतत समीक्षा करीत राहणे हे मानवेंद्रनाथ राय यांच्या जीवनाचे रहस्य होय, अनंत श्रद्धा व सत्यनिष्ठा यांचा उच्चतम समन्वय त्यांनी साधला होता. त्याकरिता लागणारी संपूर्ण अनासक्ती त्यांनी हृदयात बाणविली होती. पूर्वयुगापेक्षा या विज्ञानयुगाला अनासक्तीची अधिक गरज आहे. तिचा भावार्थ व्यापक बनला आहे. अनासक्तीशिवाय पूर्वसंस्कार व परंपरेच्या भावना यांची हृदयावरची बंधने तोडून टाकण्याचे मनःसामर्थ्यच लाभू शकत नाही. सत्याचा व स्वातंत्र्याचा पंथ अनंत आहे, हे प्रत्ययास आल्याशिवाय असे मनःसामर्थ्य लाभू शकत नाही. सत्याचा शोध व स्वातंत्र्याची अन्वेषणा ही मूलभूत मानवी प्रेरणा होय. तिच्यावर आधारलेल्या कर्मयोगशास्त्रावर नवमानवतावादाच्या स्वरूपात मानवेंद्रनाथ रॉय यांनी प्रकाश टाकला आहे. नव्याविज्ञानाची पार्श्वभूमी या नवमानवतावादास उजळून टाकीत आहे. ते कर्मयोगी होते, स्वातंत्र्याच्या त्या अनंत मार्गाचे पथिक व मार्गशोधक होते. मार्गदर्शनाच्या चिरंतन खुणा कालपथावर राखून ते कालातीत झाले आहेत.

(नवभारत, एप्रिल, १९५४ पृ. १ ते १५)

ooo

२६

गुरुवर्य श्री. विनोबा यांच्यासंबंधी काही स्मृतिशेष

वेदशास्त्रांचे पारंगत पंडित व नैष्ठिक ब्रह्मचारी म्हणून वाई येथील गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे (केवलानंद सरस्वती) यांची कीर्ती, महाराष्ट्रात नुकतीच होऊ लागली होती; १९१६ साली त्यांनी आपल्या अंतेवासी शिष्यांच्या साहाय्याने आपल्या छोट्या प्राज्ञमठास प्राज्ञपाठशाळेचे रूप दिले. ही गोष्ट तत्कालीन वृत्तपत्रांत आली. महाराष्ट्रातील राष्ट्रीय जीवनावर राष्ट्रीय जागृतीच्या प्रभातकाली संत रामदास स्वामींचा आदर्श अत्यंत प्रभाव गाजवीत होता. रामदासांनी मठ स्थापना करून लोकसेवेचे व्रत घेतलेले महंत भारतांत विखरून टाकले, अशी ऐतिहासिक ख्याती होती. या इतिहासाची पुनरावृत्ती करण्याची पवित्र भावना कार्यकर्त्यांना आवाहन देत होती. प्राज्ञपाठशाळा याच आवाहनाचे फल होय. धार्मिक पावित्र्य व राष्ट्रीय भावना यांचा ज्यांच्या हृदयांत संगम झाला होता, असे देशभक्तीची दीक्षा घेतलेले तरुण विद्यार्थी गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे यांच्या सान्निध्यात येऊन राहू लागले.

याच सुमारास म्हणजे १९१६ साली आचार्य विनोबा भावे गु. नारायणशास्त्रीजींच्या सान्निध्यात प्रस्थानत्रयीचे श्रवण करावे म्हणून वाई येथे आले साबरमती येथील सत्याग्रहाश्रमाची महाव्रतदीक्षा त्यांनी अगोदरच घेतली होती. ते सद्गुरू रामदासस्वामींच्या उज्ज्वल प्रेरणेचे ते प्रज्ज्वलित प्रतीक होते. रामदासस्वामींप्रमाणेच तारुण्याच्या प्रभातीच गृहत्याग करून देशसेवेची दीक्षा घेतलेली ही व्यक्ती.

विनोबा आल्यावर शंकराचार्यांच्या शारीरभाष्याचा पाठ प्रथमपासून पुनः चालू झाला अनेक प्रौढ विद्यार्थी या वर्गात होते ते व्युत्पन्नही होते आळीपाळीने कोणीतरी एका विद्यार्थ्याने भाष्यपंक्ती वाचावयाच्या आपापल्या सामर्थ्याप्रमाणे स्वबुद्धीने त्या त्या विद्यार्थ्याने भाष्यपंक्तीचे विवरण करावयाचे; ज्या पंक्तींचे विवरण विद्यार्थ्यांना अवघड वाटेल त्या पंक्तींचे विवरण स्वतः गुरुवर्य करीत किंवा ज्या ठिकाणी मूलभूत तत्त्वाचे अधिक स्पष्टीकरण

गुरुवर्यानींच करणे अपरिहार्य होत असे, तेथे गुरुवर्य स्वतः स्पष्टीकरण करीत. ज्या दिवशीं विद्यार्थी या नात्याने विनोबांवर वाचनाची जबाबदारी येई त्या दिवशी गुरुवर्यांना फारच थोडें प्रवचन करावे लागे. विवरणाचा बहुतेक सर्व भाग विनोबाच पूर्ण करीत असत. विनोबांचा प्रवचनाचा वेगही एकेक सप्ताहाने अधिकाधिक वाढू लागला. पाच-सहा आठवड्यांनंतर विनोबा स्वतःच गुरुवर्यांच्या साहाय्यावाचून भाष्यार्थ सांगू लागले. इतर व्युत्पन्न विद्यार्थी विनोबांची ही धारणाशक्ती पाहून आदराने नम्र झाले. स्वतःपेक्षा अत्यंत विलक्षण असलेल्या प्रज्ञेची ही व्यक्ती आहे, हे त्यांच्या प्रत्ययास आले.

योगशास्त्रात उत्तम, मध्यम व मंद असे त्रिविध अधिकारी सांगितले आहेत. उत्तम अधिकारी षण्मासात सिद्ध होतो, असे म्हटले आहे; त्याचे प्रत्यंतर विनोबांच्या ठिकाणी दिसले. सहा महिन्यांतच शांकरप्रस्थानत्रयीवर उत्कृष्ट अधिकार विनोबांना प्राप्त झाला, असे गुरुवर्यांना आढळून आले.

वाई गावात याच सुमारास प्लेग होता. प्राज्ञपाठशाळा कृष्णातीरावर उभारलेल्या झोपड्यांत गावाबाहेर गेली होती. विनोवा गावातच राहात व गावाबाहेर झोपडीत भाष्याचा पाठ घेण्यास येत. प्रातःकाली संध्यावंदनादी आन्हिक आटपल्यावर गुरुवर्य सात वाजता प्रथम माझा नव्यन्यायाचा पाठ घेत असत. काही विद्यार्थी झोपडीच्या बाहेर शेताच्या बांधावर पुढील पाठाचे पूर्वावलोकन करीत बसत. एके दिवशी मी प्रातःकाली गादाधरीचा पाठ गुरुवर्यांपासून घेत होतो. झोपडीच्या बाहेर आंब्याच्या वृक्षांची रांग होती. त्या वृक्षांच्या छायेत भाष्यपाठाचे पूर्वावलोकन विनोबा करीत होते. हे पूर्वावलोकन येरझारा घालीतच चालले होते. भाष्याचे पठन व मनन एकदमच सुरू होते. भाष्याच्या गद्यपंक्ती मध्यमस्वरांत पद्याच्या लयीत तालबद्धरीतीने अस्खलितपणे विनोबा वाचीत होते. विनोबांच्या वाचनाचे स्वर गुरुवर्यांच्या झोपडीत कास्यपात्राच्या घंटारवाप्रमाणे शिरत होते. गादाधरीच्या अवघड पंक्तींचे प्रवचन गुरुवर्यांनी मध्येच थांबविले; आणि ते मला म्हणाले, "गीर्वाणवाणीचे इतके सुंदर उच्चारण ऐकले म्हणजे ही देववाणी आहे, असे प्रत्ययास येतें; आद्य शंकराचार्यांचीच ही वाणी आहे, अशी ओळख पटते.

"विनोबांसारखे पठन करता आले पाहिजे. तू वाचतांना फार घाई करतोस. विनोबांची वाक्शक्ती अलौकिक आहे; त्याचे अनुकरण कर.''

कृष्णेच्या काठी गंगापुराच्या घाटावर गुरूवर्य नारायणशास्त्री मराठे यांच्या मोक्षगुरूंची म्हणजे प्रज्ञानंद सरस्वतींची समाधी आहे. त्या समाधीसमोर प्रत्येक सोमवारी तिसऱ्या प्रहरी प्राज्ञपाठशाळेचे विद्यार्थी धर्मसभा भरवीत असत. त्यात अध्यापक व विद्यार्थी विविध शास्त्रीय विषयांवर चर्चा व भाषणे करीत. श्रावणमासाचा सोमवार होता. त्या दिवशी मुख्य विषयाचा उपन्यास करण्याचे काम माझ्याकडे होते. कै गंगाधरशास्त्री सोहनी, पं. दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर, विष्णुशास्त्री परांजपे इत्यादी अध्यापक मंडळीही या सभेस

उपस्थित होती. 'राज्यसंस्था व धर्मसंस्था' या विषयावर माझे भाषण झाले. महाभारताच्या शांतिपर्वाच्या आधारे मी समाजधारणेस दंडसंस्थेची कशी आवश्यकता आहे, याचे समर्थन केले. माझे भाषण संपल्यानंतर दुसरे कोणीच बोलण्यास उभे राहिले नाही. मी विषयाची मांडणी आधुनिक राज्यशास्त्राच्या थाटात केली होती. टी. एच. ग्रीन व सिज्विक या इंग्लिश राज्यशास्त्रज्ञांच्या व नीतिशास्त्रज्ञांच्या युक्तिवादाने माझे भाषण कसलेले होते. आमचे अध्यापकही माझ्या या नव्या व अनपेक्षित विचारवैशिष्ट्याने दबले होते. विनोबा या सभेत उपस्थित होते. ते एका कोपऱ्यातच बसले होते. त्यांची एकंदर राहणी व वर्तणूकही निराळीच असल्यामुळे व मुनिवृत्तीमुळे गुरुवर्योशिवाय इतरांना त्योचे वैचक्षण्य पूर्ण अज्ञात होते. माझ्या भाषणानंतर सभा विसर्जित होणार हे पाहून विनोबा पुढे आले. त्यांनी भाषणास सुरुवात केली. माझ्या भाषणाचे सहानुभूतिपूर्ण स्वागत करून खंडनास सुरुवात केली. क्रमाने सर्व मुद्दे खोडून काढले. माझा युक्तिवाद ढासळून टाकला. अहिंसेच्या तत्त्वज्ञानात उदात्त व भव्य राज्यशास्त्रही असू शकते, याची उत्कृष्ट प्रतीती प्रथमच विनोबांनी आणून दिली. सगळी सभा विनोबांच्या तेजस्वी वक्तृत्वाने स्तिमित झाली. अहिंसेचे शौर्य हीच मानवसमाजाची धारणशक्ती; शस्त्रसामर्थ्य मानव्यास दुर्बल बनविते व समाजाच्या विनाशाची बीजे रोवते, हा सिद्धान्त सांगून दंडाचे वैय्यर्थ्य विनोबांनी सिद्ध केले.

या सभेंत "रणावीण स्वातंत्र्य कोणासही मिळणार नाही", अशा मताची मंडळी होती. या मंडळींतील एक प्रमुख गृहस्थ प्राज्ञपाठशाळेचे संचालक होते. त्यांचा संबंध सशस्त्र क्रांतीचा उठाव करू पाहणाऱ्या गदर पार्टीशी होता. न बोलताच अनेक गोष्टी घडवून आणण्यात ते गर्क होते. विनोबांशी त्यांचा तीव्र मतभेद होता. परंतु त्यांना बोलणे धोक्याचे वाटले. ते बोलले नाही. सभा विसर्जित झाली.

विनोबा जनसंपर्कापासून दूर राहणारे व एकांतसेवी. तरी त्यांना वाईत दोन विद्यार्थी मिळाले. श्री ग. ह खरे व मी; श्री खरे हे हल्ली पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्यकर्ते असून भारतवर्षात नावाजलेले इतिहास संशोधक आहेत. आम्ही दोघांनी सत्याग्रहाश्रमाची महाव्रतदीक्षा घेतली, परंतु आम्हांस ती पेलली नाही. आम्हांवर या संतसंगतीने जे संस्कार झाले ते संस्कार आमच्या उन्नतीच्या मार्गातील मार्गदर्शक झाले.

विनोबांची आचारपद्धती लोकविलक्षण होती. स्वतःच्याच हाताने दळलेल्या पिठाची भाकरी ते खात असत. आम्हीही पहाटे ४॥ वाजता उठून त्यांच्यावरोवर दळत असू. पांढरपेशे लोक आम्ही पहाटेस दळतो, हे ऐकून आम्हांस हसत. श्रमाची प्रतिष्ठा बुद्धिजीवी पांढरपेशांना मान्य नाही. आम्ही त्यांच्या थट्टेचे विषय झालो. 'दळुबाई' म्हणून माझे मित्र माझी थट्टा करीत. परंतु गांधीसुद्धा दळण्यास लाजत नाहीत, हे विनोबांच्या तोंडून ऐकल्यामुळे मला त्याची लाज वाटली नाही.

वाईच्या द्रविड हायस्कूलच्या एका अध्यापकांना, एकदा विनोबांची गाठ घ्यावी, अशी

इच्छा झाली. मी अध्यापक महाशयांना गाठ घालून देण्याचे आश्वासन दिले. हे गृहस्थ रविवारी दुपारी चार वाजता विनोबांच्या भेटीस आले. विनोबा त्या वेळीं आपल्या राहत्या माडीत दळत बसले होते. बैठकीकडे त्यांची पाठ होती. भेटण्यास आलेले गृहस्थ जिना चढत असता मी विनोबांना ते येत असल्याची वर्दी दिली. विनोबांनी दळण्याचे काम तसेच चालू ठेवले: अर्धा तास झाला, परंतु यत्किंचितही मागे वळून पाहिले नाही. मी बुचकळ्यात पडलो; परंतु हाती घेतलेले काम संपल्यावर आलेल्या गृहस्थांकडे ते बघतील, असे समजून गप्प बसलो. विनोबा दळणे संपल्यावर पाठ फिरवून सामोरे बसले, परंतु दृष्टी अधोमुखच होती; घट्ट मौन होते. त्यामुळे मी अधिकच गोंधळलो; अध्यापकांना मी नेत्रसंकेताने खुणवून पृच्छा करण्यास सांगितले.

अध्यापक - मी येथील द्रविड हायस्कूलमध्ये शिक्षक आहे. शिक्षणविषयक काही प्रश्न मला विचारावयाचे आहेत, अध्यापन सुधारण्याची आवश्यकता आहे, हे आपणांस मान्य असेल.

विनोबा - दुसऱ्याला शिकविण्यापेक्षा शिक्षकांनीच स्वतः शिकले पाहिजे. जो कमीत कमी शिकवितो, तो खरा शिक्षक होय.

अध्यापक - शिक्षकाने स्वतःचा विषय उत्तम तऱ्हेने तयार करावा, हे सर्वमान्य तत्त्व आहे.

विनोबा - शिकणे म्हणजे स्वतः आचरण करणे. जो आचरण करतो, तोच आचार्य होय. आचार्य काय करतो, याचे महत्त्व आहे.

अध्यापक - ज्ञान देणे हेही आचार्याचे काम आहे.

विनोबा - ज्ञान देता येत नाही, तें स्वतःच मिळवावयाचे असते. आचार्य मार्ग मात्र दर्शित करतो, म्हणूनच त्यास 'देशिक' अशी संज्ञा आहे. ज्ञान कोठूनही मिळू शकते. डोळे मात्र उघडे पाहिजेत.

विनोबांची साधारण दिनचर्या प्रखर तपस्व्याची. वाईस आले तेव्हा नुकतेच दीर्घकालीन मलेरियातून उठले होतं. डोळ्यांवरही दीर्घकालीन परिणाम झाला होता. डोळ्यांत पिवळी झांक होती, तरी सत्याग्रहाश्रमाची पाच महाव्रते ते निग्रहाने पाळू लागले. शरीरातील दोष उपवासानेच बरे करावे, असा त्यांचा आग्रह असल्यामुळे बारीक सारीक शरीरदोष दिसला तरी ते उपवास करून घालवीत. एकदा अंगावर दोन पुटकुळ्या दिसल्या. कोणीही त्यांची उपेक्षाच करील, परंतु त्यांनी त्वरित पाच दिवस उपवास केला. पाण्याशिवाय कांहीही घेतले नाही. डोळ्याची पिवळी झांक घालविण्याकरिता डोळ्यांत कागदी लिंबाचे तीक्ष्ण थेंब स्वतःच्याच हाताने पिळून घेत असत.

शीतोष्णावर विजय मिळविण्याचा ते प्रयत्न करीत. त्यामुळे नकळत शरीरावर अत्याचारही होई. मला एक उदाहरण आठवते ते असे-

गंगापुरीतील पंचायतनाच्या देवळातील पाषाणाच्या उघड्या फरशीवर रोज येरझारा घालीत. सकाळ, संध्याकाळ व रात्र तेथेच स्वाध्यायात ते घालवीत होते. उपनिषदे भगवद्गीता व संतवाङ्मय याची नित्य आवर्तने तेथेच येरझारा घालीत चालवीत असत. कडक थंडीचे दिवस आले. ४०-४२ डिग्रीपर्यंत पारा उतरू लागला. त्या पाषाणाच्या फरशीवर खाली कांही न आंथरतांच ते रात्री अंग टाकीत असत. मीही स्वतः एकदा कडक हिवाळ्यातील सबंध रात्र त्याच उघड्या फरशीवर प्रयोगादाखल बसून काढली, मला झोप आली नाही. त्यांना मात्र तेथे चांगली झोप येई.

विनोबांच्या वाणीचे वैभव परिचयानंतर ध्यानात भरते. यांचा मुख्य अध्ययनाचा विषय अध्यात्मविद्या व दुसरा विविध भाषा होय. अत्यंत निवडक अशी संतांची सहस्रावधी वचने त्याच्या रसनाग्रावर वयाच्या २२ ते २४ वर्षांच्या सुमारास खेळू लागली. वाईस येण्याच्या अगोदरच ज्ञानेश्वरीची आठ पारायणे झाली होतीं; गीतारहस्य पाच वेळां वाचले होते. दासबोध व समर्थांची स्फुट कविता यांचे समालोचन झाले होते. गाथापंचकाचे समग्र अवगाहन करून शेकडो अभंग अनायासाने पाठ झाले होते; मोरोपंतांची कविता अभ्यासिली असल्यामुळे संस्कृत भाषेत उत्तम प्रवेश झाला होता. शांकरभाष्याच्या द्वारे भगवद्गीता व उपनिषदे यांचे मनन मात्र विनोबांनी वाईस केले.

त्यांची अध्ययनपद्धती उत्कृष्ट पंडितांची आहे आणि सहृदयता महाकवीची आहे. ते जसे भावगंभीर आहेत, तसेच कठोर तर्ककर्कशही आहेत. प्रत्येक वाक्य, वाक्यखंड, शब्द व वर्ण यांची सूक्ष्म छाननी करूनच वाक्यार्थ व भावार्थ यांच्याकडे ते जातात. त्यांची कठोपनिषदाच्या अभ्यासाची वही अनेक वर्षे माझ्यापाशीच होती. नंतर ती माझ्या एका मित्रानें नेली. ती परत केली नाही. त्यांचे गीतारहस्य व ज्ञानेश्वरीही माझ्याजवळ होती. ती पुस्तके काही काळानंतर मित्राच्या हाती पडली व पुनः ती हाती आली नाहीत. ती पुस्तके परत करावी व त्याऐवजी माझी नवी कोरी पुस्तके घेऊन जावी, असे माझ्या त्या मित्रांना मी लिहिले; परंतु त्या मित्रांनी ती पुस्तके परत केली नाहीत, कारण त्यावर विनोबांच्या खुणा होत्या. त्या खुणा मर्मज्ञ वाचकांना मार्गदर्शन करीत होत्या. विनोबांच्या टिप्पणवह्याही अशाच लोभनीय होत्या. लिखित पोथ्यांवरून अभ्यास करण्याचा जेव्हा काळ होता, त्या काळी अशी समजूत होती की ज्या पोथीवरून अभ्यास करून विद्यार्थी विद्वान झाले. त्याच पोथीवरून अध्ययन करणे हे विद्येच्या अनुग्रहास कारण होते.

महात्मा गांधींनी मसाले व मीठ वर्ज्य करून आहार घेणे योग्य होय, असे प्रतिपादन केले होते. त्याप्रमाणे विनोबांनीही आपल्या आहारात मसाले व मीठ वर्ज्य केले. वाईस फळे बेताचीच होतात. संत्री व मोसंबी अलीकडे होऊ लागली आहेत. पेरू, केळी व डाळिंबे याशिवाय अन्य फळे त्या वेळी होत नसत. खरे पाहिले तर केळी हीच नेहमी मिळतात, बाकीचीं फळे केव्हातरी मोसमांत बाजारांत येतात. विनोबांच्या त्या वेळच्या आहारात

केळी, दूध व भाकरी हा त्रिफळाच असे. जनावरांचे दूध घेणे हे एक प्रकारचे स्तेय आहे. पशूंच्या वत्सांचा तो आहार आहे; त्याचा आपण अपहार करतो, असे गांधींनी लिहिले आहे. विनोबांनी त्याप्रमाणे दूधही वर्ज्य करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे गांधींना त्यांनी पत्र लिहिले. गांधींनी त्यांना उलट टपाली कळविले की, 'दूध सोडू नका.' म्हणून त्यांनी दूध आपल्या आहारात कायम ठेवले.

विनोबा वाईस आले, तेव्हा संपूर्ण खादीचा वेष होताच; परंतु 'वेष असावा बावळा' याचे प्रात्यक्षिक त्यांच्या पोषाखावरून मिळे. टोपी, सदरा व धोतर असा वेष होता. परंतु कपड्याला कधीच साबण लावीत नसत. कपडे मळकट असत. विनोबांनी सदरा व टोपी वाईस आल्यानंतर सोडली. पहिल्यापासूनच गुरुवर्य नारायणशास्त्री व मी सदरा, टोपी किंवा शिवलेले कपडे घालीत नव्हतो. गांधींच्या आश्रमात ही पद्धती वाईच्या प्राज्ञपाठशाळेकडून गेली असे म्हटले तरी चालेल. अलीकडे बरेच दिवसांत मला विनोबांचे दर्शन नाही. हल्ली त्यांचे कपडे किती स्वच्छ असतात, हे माहीत नाही. कपड्याच्या बाबतीत टापटीप किंवा आटोपशीरपणा वाईस येईपर्यंत नव्हता. पुष्कळ वेळा तर धोतराला बोंगाच असावयाचा. मधून मधून दुहेरी पासोडी पांघरूनच रस्त्यातून हिंडावयाचे. अपरिचित मनुष्यास ही विक्षिप्त व्यक्ती असावी, असाच भास होई. परंतु सूक्ष्मदर्शी माणसांना थोड्या परिचयातच थोर अंतर्मुखी संत म्हणून खूण पटल्याशिवाय राहात नसे. दोनचार प्रश्नोत्तरांतच जाणत्या माणसाला वेधून टाकण्याइतक्या चमकदार, सूक्ष्मभेदी व प्रतिभासंपन्न विचारांचा अखंड भाता बाळगणारा धीरपुरुष हा आहे, अशी प्रतीती आल्याशिवाय राहात नसे.

विनोबांची प्रार्थना ऐकत असता अद्भुत सामर्थ्याचा प्रत्यय येतो. स्वच्छ व प्रसन्न वर्णोच्चार, अनुरूप वृत्ताची संगती, भाव व रस यांस अनुरूप स्वरांची आळवणी, भक्ती व आत्मसमर्पण या गुणांच्या योगाने ही त्यांची प्रार्थना मनुष्याच्या मनाला उच्चतर दिव्यानुभूतीच्या प्रदेशात नेऊन सोडते. पाखंड्यासही भक्तीची गोडी लावते. विनोबांचे प्रार्थनासंगीत अत्यंत संपन्न असते. संस्कृत, मराठी, गुजराती, बंगाली, इंग्रजी इत्यादी भाषांतील संतांच्या उक्तींचे भाण्डार त्यात उघडलेले असते. पुनरुक्ती न करता कित्येक आठवडेपर्यंत त्यांचे भजन चालू शकते. रामदास, तुकाराम, एकनाथ, नामदेव, ज्ञानदेव वामनपंडित, मोरोपंत, तुलसीदास, सूरदास, कबीर, शंकराचार्य इत्यादी संतांच्या व भक्तांच्या कविता, एक दिवस हा संत तर दुसऱ्या दिवशी दुसरा संत अशा रीतीने, त्यांच्या प्रार्थनेत ऐकावयास मिळतात. मी अशा प्रार्थना तासन् तास ऐकल्या आहेत. विनोबांच्या भजनाचे नुसते श्रवण करीत असणारा श्रोताही काही दिवसांनी संतवाङ्मयाचा तज्ज्ञ अधिकारी बनू शकतो.

१९१७ साली मी बडोदे येथे काही महिने होतो. विनोबांच्या तरुण मित्रांनी एक विद्यार्थिमंडळ स्थापले होते. या विद्यार्थिमंडळात मधून मधून अभ्यासू विद्यार्थ्यांच्या सभा

भरत असत. एके दिवशी एका सभेत विनोबा उपस्थित होते. अर्थातच त्यांना सभापती बनविले. श्री. धोत्रे, श्री. काळे, श्री. परांजपे, श्री. दाते इत्यादी पुष्कळ मित्रांनी सभेतील चर्चेत भाग घेतला. इतिहाससंशोधक राजवाडे यांच्या संतविषयक विचारसरणीस अनुलक्षून साधकबाधक चर्चा झाली. ही बहुतेक चर्चा करणारी मंडळी महाविद्यालयीन शिक्षण घेणारी होती. बरेचसे वक्ते नवखे होते. त्यांतील एकदोघे जणच अस्खलित बोलू शकले. परंतु तरबेज असा वक्ता कोणीच नव्हता; सर्वच मंडळी होतकरू होती. सफाईने जे बोलले त्यांच्या भाषणांत मुद्दे कमी होते व विषयांचे आकलनही जेमतेमच होते. ज्यांच्या भाषणांत मुद्दे चांगले होते, त्यांना मांडण्याची हातोटी नव्हती. एकजण बोलत असता गोंधळून गेले. एका गृहस्थांनी विषयांतर केले. मला पूर्वतयारीशिवाय व टिप्पणाशिवाय बोलता येत नसे; म्हणून मी भाग घेतला नाही. माझे मन सभापतींचे भाषण ऐकण्यास मिळणार म्हणून अत्यंत उत्सुक झाले होते. सभापतींनी भाषणास आरंभ केला; प्रत्येक वक्त्याच्या चांगल्या वाक्यांचाच निर्देश त्यांनी केला; व सगळे वातावरण प्रथमच मधुर करून सोडले. एक वक्ता अडखळत बोलला, एक गोंधळला एक वायफळ पण भरपूर बोलला. एक समर्पक परंतु त्रोटक बोलला इत्यादी सर्व प्रकार एक क्षणात सर्व विसरून गेले. सभापतींनी विरोधी मताचा समंजसपणे निर्देश करून वक्त्यांच्या मनास लागणार नाही, अशा पद्धतीने समन्वय केला. संतांच्या निवृत्तिवादाचे, संसारात विजय मिळवून देणारी प्रवर्तक शक्ती म्हणून विनोबांनी समर्थन केले. ते म्हणाले, "सूर्यात अनंतपरींनी प्रखर उष्णता आहे म्हणून आपल्या शरीरात ९७ अंशांची उष्णता राहू शकते. संतांचा प्रखर वैराग्याचा आदर्श आहे, म्हणूनच सामान्य सांसारिक माणसे महापातकांच्या मोहापासून स्वतःस वाचवू शकतात."

विनोबांची सुंदर गीताप्रवचने प्रसिद्ध झाली आहेत; म्हणून मला त्यांचे भाषण काय झाले हे सांगावयाचे नाही. सभा चालविणारा सभापती कसा समवृत्तीचा व समयज्ञ असावा, याचे एक उत्कृष्ट निदर्शन द्यावयाचे आहे. हे उदाहरण माझ्या ध्यानांत कायम राहिले आहे.

याच वर्षी म्हणजे १९१७ साली विनोबा पुणे, कऱ्हाड, सांगली, मिरज या बाजूला संचारार्थ गेले होते. त्या वेळी मी त्यांच्या वडिलांच्याकडे राहात होतो. त्यांच्या मातापित्यांना विनोबांच्याबद्दल सांसारिक दृष्टीने फार अपेक्षा होत्या. त्यांना असेही वाटे की म. गांधींचा प्रभाव कमी झाल्यास कदाचित विनोबा प्रापंचिक व्यवहारात येऊ शकतील. परंतु हे अशक्य आहे असे मी त्यांना सांगत असे. "ही स्वयंसिद्ध प्रेरणा आहे. तिच्यात उलटा फरक होणार नाही विकासच होत राहणार. गांधींचा प्रभाव पडला याचे कारणच समानधर्मित्व होय. त्या सुमारास विनोबांची मला पत्रे येत असत. माझ्यावर टिळकांच्या प्रवृत्तीची खोल छाप आहे, हे विनोबांना अनेक कारणास्तव कळून चुकले होते. म्हणून टिळकांच्या व गांधींच्या संबंधी एक तुलनात्मक निर्देश त्यांनी आपल्या एका पत्रात केला होता. ते पत्र गमावल्याबद्दल मला अजूनही किंचित खेद होतो. त्यांत आता इतिहासाने सिद्ध केलेली गांधींबद्दलची भविष्यवाणी

होती. "टिळकांचे युग संपत आले आहे, असे माझ्या प्रवासातील अनुभवावरून निश्चित करता येते. सत्याग्रहाचे शास्त्र लोकांच्या बुद्धीवर नवा प्रभाव पाडील, असे दिसते. आतां गांधींचे युग सुरू होईल. गांधींच्या मार्गाशिवाय दुसरा कोणताही मार्ग राष्ट्राला पुढे नेऊ शकणार नाही." अशा अर्थाची वाक्ये वाचून माझे मन अस्वस्थ व चिंतनपर झाले. कारण गांधींपेक्षा टिळक अधिकच जहाल होत असे वाटत होते. कारण गांधीनी पहिल्या महायुद्धांत ब्रिटिशांना बिनशर्त साहाय्य करण्याचे ठरविले होते. त्याचप्रमाणे टिळकांच्याबद्दल श्रद्धामय आसक्ती असल्यामुळे किंचित अस्वस्थता वाटली; परंतु गांधींचा मार्ग बुद्धिशुद्ध दिसल्यामुळे विचाराला गती मिळाली.

दक्षिण महाराष्ट्राची सफर संपवून परत आल्यावर विनोबांनी आपल्या दोन्ही बंधूंना सत्याग्रहाश्रमाच्या पंथावर आणले. त्यांच्या मातेला व विशेषतः वडिलांना प्रापंचिकदृष्टीने श्री. शिवाजी आणि श्री. बाळकोबा यांच्याबद्दल फार आशा होती. परंतु ही आशा फार वेळ टिकू शकली नाही. बाळकोबा बडोद्याच्या कलाभवनात मूर्तिकला शिकत होते. बाळकोबांना परदेशीही पुढील अभ्यासास पाठवावे, असा विचार त्यांच्या वडिलांच्या मनात घोळत असे. बाळकोबा एकदा साबरमतीस जाऊन गांधींचे दर्शन घेऊन आले व गांधींची पुस्तके वाचू लागले. या वेळी बाळकोबांचे वय सतरा वर्षांचे होते. गांधीजींची पुस्तके व विनोबांचे प्रत्यक्ष उदाहरण यांच्यामुळे त्यांच्या आत्म्यांतील मूलभूत श्रद्धा जागी झाली. त्यांनी सत्याग्रहाश्रमाची पंच महाव्रते पाळण्याचा निर्धार केला. खऱ्या श्रद्धाशील माणसाच्या आचारांत व विचारांत कधीही अंतर राहात नाही. शिवाजी व बाळकोबा दोघेही नाजूक व गोंडस दिसत होते, परंतु त्यातल्या त्यात बाळकोबाचे शरीर चांगले वाढीस लागले होते. तारुण्यात नुकताच प्रवेश होत होता. निग्रही व कर्तव्यदक्ष स्वभाव असल्यामुळे सगळी कामे ते वेळच्या वेळी करीत. या वेळी बडोदे शहरात प्लेग उद्भवला होता. भाव्यांचे कुटुंब बडोद्यापासून अडीच-तीन मैलांवर असलेल्या घोडदौडीजवळील खेड्यात राहावयास गेले. मी त्यांच्या कुटुंबातच राहात असल्यामुळे त्यांच्याबरोबर शहर सोडले. बाळकोबा सकाळी १०-११च्या सुमारास कलाभवनात जात व संध्याकाळी परत येत. आठ तास सतत उभे राहून मूर्तिकाम करीत. याच वेळी त्यांनी आश्रमीय जीवनास प्रारंभ केला. त्यांनी नित्याची दक्षिणी आहारपद्धती सोडून दिली. चपाती व थोडेसे दूध घेत. त्याबरोबर थोडी कच्ची भाजीही असे. नंतर दूधही सोडले. एका महिन्यांत शरीराचे वजन पुष्कळच घटले. आहारात जसा बदल केला तसे प्रमाणही त्यांनी कमी केले. त्यांच्या शरीरावर कांती व डोळ्यात तेज होते. ही मूर्ती मातापित्यांच्या मनांतच नव्हे तर इतराच्या मनांत भरत असे. परंतु एका महिन्यात कायेची कांती निघून गेली. डोळ्यातील तेज स्तिमित होऊ लागले. मातेला ही आहारपद्धती मुळीच पसंत नव्हती. बाळूचे शरीर वाळत चाललेले पाहून आईला चिंतने घेरले. त्यांच्या वडिलांनाही ही गोष्ट संपूर्ण नाकबूल होती. परंतु ते फार धीरगंभीर स्वभावाचे होते. त्यांच्या

चक्षूत चिंतनशीलतेची झाक होती. राष्ट्राची औद्योगिक वाढ होणे हाच तरणोपाय ते मानीत. ते अल्पभाषी होते. विनोबांच्या व गांधींच्या प्रभावाने आपल्या अपत्यांच्या चित्तांत मूलगामी क्रांती होऊ लागली आहे हे त्यांच्या ध्यानात आले होते व आपला उपाय त्यांच्यापुढे चालणार नाही, हे त्यांना कळून चुकले होते. भावी पिढीचा परमार्थच प्रपंच बनणार आहे, याची त्यांना अटकळ येऊन चुकली. आपले तिन्ही पुत्र मोठ्या जिद्दीचे आहेत हे त्यांना माहीत होते. परंतु बाळकोबांचा हा दीर्घकालीन उपवासाचा प्रयोग आईच्या मनाला मानवेना. मीही आश्रमीय व्रत घेतल्याचा देखावा करीत होतो. परंतु आहारोपसंहाराचा हा विलक्षण प्रयोग मात्र मला पूर्ण अमान्य होता. मीही पहाटे उठून बाळकोबांबरोवर स्वतःच्या भाकरीचं पीठ दळून घेत असे. व मोजकाच आहार घेत असे. बाळकोबांचा आहार अर्ध्या भाकरीवर आला, त्यांचे डोळे खोल गेले. त्यांच्या मातुश्रीने स्वतः पुष्कळ वेळा त्यांना सांगून पाहिले व शेवटीं हात टेकले. बाळकोबांच्या मातुश्रींनी डोळ्यांत पाणी आणून मला सांगितले की, "भाई, तुमचे शरीर व बाळूचे शरीर सारखेच कणखर व तेजस्वी गेल्या महिन्यापर्यंत दिसत होते. किंबहुना बाळू तुमच्यापेक्षा अधिक उफाड्याचा दिसतो परंतु याला अवदसा सुचली आहे. तुम्हीतरी सांगून पाहा." मला या घरात मान होता व वडीलधाऱ्या माणसांची सहानुभूतीही खूप होती. म्हणून मी या खेड्यांतून बाहेर पडून बाळकोबांची मध्येच रानात एका झाडाखाली गाठ घेतली. त्यांच्या आहारशास्त्रावर टीकेच्या शस्त्रांची झोड उठविली. आमचा दोघांचा कडाक्याचा वाद झाला. मी फार कडक व निक्षून बोललो. या बाबतीत माझ्यावर विनोबांची छाया पडली आहे. मी बाळकोबांना बजावले की, "हे आहार कर्शन आणखी काही महिने असेच चालू ठेवल्यास तुमची प्रकृती कायमची भलत्या मार्गास लागेल." या माझ्या व बाळकोबांच्या संभाषणातील मुद्दे बाळकोबांनी विनोबांना पत्रांनी कळविले. विनोबांना हे कळून चुकले होते की, बाळकोबांनी आता आश्रमाची यावज्जीव दीक्षा स्वीकारली आहे; म्हणून विनोबांनी आपल्या पत्रांत बाळकोबांच्या तपस्येला उचलून धरले व आहारासंबंधाचे माझे मत खोडून काढले. त्या पत्रांत विनोबांनी माझी चांगलीच खरडपट्टी काढली होती. याच पत्रव्यवहारात बाळकोबांनी माझ्या आहारासंबंधी वर्तनाचे सूक्ष्म निरीक्षण करून पाहिलेले वृत्त विनोबांना कळविले होते. त्यावरही विनोबांची टीका होती. माझी प्रकृती मुळातच चांगली निरोगी होती; बडोद्याजवळील खेड्यातील हवापाणी तर अधिकच मानवल्यामुळे माझ्या शरीरावर पुष्टी व तेज अधिकच आले. विनोबांच्या मातुःश्रींना या गोष्टीचे फारच कौतुक वाटले. त्या बाळकोबांना माझेच उदाहरण देऊन आहार भरपूर घेण्याचे तत्त्व पटवीत होत्या. पण लक्षात कोण घेतो? बाळकोबांनी तर माझी बाजू माझ्यावरच उलटविली. मी घरी जो व जितका आहार घेत असे, त्यावरून माझ्या वजनवाढीचा उलगडा होणे शक्यच नव्हते. मी विनोबांचे स्नेही श्री. दाते यांच्याकडे इंग्रजी व बीजगणित शिकण्यास जात असे. त्यांचे घर एक मैलावरील दुसऱ्या खेड्यात होते. मी जातायेताना मालकास विचारूनच वाटेतील

बोरींच्या झाडांवर चढून पिकलेल्या सुगंधी, तकतकीत व मधुर बोरांचा सडा खाली पाडीत असे; व शेर दोन शेर बोरे खात असे. ६-७ फूट उंच वाढलेल्या तुरीच्या झाडावरील शेंगा मालकादेखतच खात असे व मोठ्या पहाटे उठून घोडदौडीच्या रंगणाला पळत फेरी मारोत असे. हे वृत्त बाळकोबांनी विनोबांना लिहिले. कोणालाही कळू नये म्हणून मी काळजी घेतली होती. परंतु बेंड अखेरीस फुटलेच. विनोबांच्या पत्रातील माझ्यावरील टीकेचा मजकूर मला पटला नाही. परंतु हे मी दाखविले नाही. विनोबा फिरतीवरून परत आल्यावर त्यांनी सत्याग्रहाश्रमाच्या मार्गाचे व आहारविधीचे महत्त्व मला व स्वतःच्या बंधूंना पुनः पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बाळकोबा व शिवाजी यांच्यात तर बुद्ध कुटुंबाप्रमाणे पूर्ण परिवर्तन घडून आले. मी त्या मार्गाचा कायमचा चाहता बनलो. परंतु त्या मार्गाचा संपूर्ण अंगीकार करण्याचे धैर्य मात्र कधीच झाले नाही. माझे आहारासंबंधीचे मत मात्र कधीच बदलले नाही. षड्रसाचा प्रमाणशुद्ध आहार भरपूर घ्यावा व पूर्ण पचवावा, हे माझे मत कायम आहे. हे माझे मत मी बाळकोबांना प्रारंभीच सांगितले, त्यांना तेव्हा मान्य झाले नाही. त्यानंतर पुढे दोन वर्षांनी बाळकोबांचे मला पत्र आले. त्यात मी त्यांच्या प्रकृतीबद्दल जे दुःखद भविष्य वर्तविले होते, ते खरे ठरले, अशी कबुली होती. माझे भविष्य खोटे ठरले असते तर मला अपार आनंद झाला असता.

विनोबांनी आपल्या दोन्ही बंधूंना सत्याग्रहाश्रमाची दीक्षा देऊन आपला पितृवंश खुंटविला, परंतु त्या योगे नव्या ऋषिवंशाची स्थापना केली; यामुळे पितृवंशाला आनन्त्य आणले, असें उपनिषदांच्या आधाराने म्हणता येते.

१९३१ साली सत्याग्रहाच्या चळवळीत धुळे येथील कारागृहात मला विनोबांचे दर्शन पुनः घडले. त्या वेळी त्यांच्या मुखावर शांतीची प्रभा व सौम्यता अधिकच दिसली. त्यांची गीताप्रवचनें सोळा ऐकली. मुखातून अमृतच स्रवत आहे असे वाटे. संतांचा वरदहस्त मिळालेला दिसला. प्रत्येक प्रवचनाचे श्रवण म्हणजे हृषिकेशचे गंगास्नान होय, असा अनुभव आला. पांडित्य, सहृदयता व अनुभूती या त्रिवेणीच्या संगमातच स्नान घडले. मी पंडित परंपरेतील विद्यार्थी असल्यामुळे मतभेद होणे अपरिहार्यच होते. मतभेदांच्या शाखांशिवाय ज्ञानवृक्षाचा विस्तार होत नाही, हे अबाधित ऐतिहासिक सत्य आहे. गुरूला शरण जाऊन गुरूशी लढावेच लागते. शास्त्र हे व्याघ्रमुख असते. लढल्याशिवाय वश होत नाही. शिव हा अर्जुनाचा गुरू होय. शिवाशी लढल्यानंतर त्याला दिव्यास्त्रप्राप्ती झाली आहे. देवांशी लढल्याशिवाय माणसाला दिव्यत्व येत नाही, म्हणून रामाला व भीष्मालाही परशुरामाशी लढावें लागले. हे तत्त्व समजले तर आत्यंतिक मतभेद असूनही अहिंसेचे तत्त्व विजयी होईल.

धुळे येथील कारागृहात विनोबांशी माझी तीन वेळा चर्चा झाली. माझे काही प्रश्नांवर समाधान होऊ शकले नाही. वैचारिक असमाधान सत्यशोधनाच्या मार्गातील प्रवासाची गती वाढविते. म्हणून या असमाधानाचा लाभही फार मोलाचा असतो. आध्यात्मिक अशांती ही

माणसाच्या भाग्याला यावी लागते. शांतीइतकाच तिचा महिमा आहे. सूर्याचे तेज जितके दिव्य आहे, तितकीच त्याची उष्णताही दिव्य आहे.

ईश्वराचे प्रेम मातेच्या वात्सल्याच्या रूपाने प्रकट होत असते हा नीतीचा पहिला आविष्कार होय, असे विधान त्यांच्या प्रवचनांत अनेक वेळा येतें, त्याबद्दल मी त्यांच्याशी चर्चा केली. नीतीची भौतिकवादी व विकासवादी मीमांसा हर्बर्ट स्पेन्सरपासून मी शिकलो आहे. मी विनोबांना म्हटलेः अपत्यस्नेह किंवा वात्सल्य हा नीतीचा पहिला आविष्कार होय, असे आपण म्हणता, परंतु हा अंतिम आविष्कार होय. हे पतिपत्नींच्या शृंगारमय प्रेमाचे ते नैसर्गिक फळ आहे. ते शृंगारमय प्रेमसुद्धा अहंकाराची ग्रंथी शिथिल करते, संकुचित वैयक्तिक स्वरूप नष्ट करते. म्हणून तोच नीतीचा प्रारंभ होय. विनोबांनी उत्तर दिले कीं, त्यांतील वैषयिकतेचा दोष वगळावा, त्यांतही ईश्वरी विभूतीचे दर्शन घडतेच. मी 'विषय' वगळण्यास तयार झालो नाही. मातेच्या वात्सल्याचाही 'विषय' वगळण्याची आपत्ती येते, असे मी म्हटले. विनोबा सर्वच 'विषय' वगळा असे म्हणाले. विनोबांनी मायावादावा आश्रय केला व शुद्ध अद्वैत ब्रह्मचैतन्याचा अंगीकार केला. त्यांना नीती आणि अनीती या द्वंद्वाच्या पलीकडे जावे लागले. अद्वैतवाद (निवृत्तिपर व संन्यासवादी) पारलौकिक नीति-शास्त्राचे समर्थन करू शकतो, परंतु ऐहिक जीवनाची सुधारणा करणारे गृहजीवन व सामाजिक जीवन विशाल करणारे, भौतिक व सामाजिक संबंध बदलणारे ऐहिक नीतिशास्त्र देह हेच बंधन समजणाऱ्या आध्यात्मिक दर्शनांतून, अद्वैतवादांतून व मायावादांतून निघू शकत नाही, हा माझा आक्षेप तसाच कायम राहिला. ऐहिक मानवी जीवनच बदलले पाहिजे, सुधारले पाहिजे, सुंदर व पवित्र केले पाहिजे, अशा प्रकारची ऐहिक नीतीची प्रेरणा उपनिषदांच्या व भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानांतून तर्कशुद्ध रीतीने कशी निघते याचे उत्तर मिळणे मोठे कठीण आहे. कारण देह व भौतिकताच दोष होय, असे मानणारे हे तत्त्वज्ञान आहे, असा माझ्या आक्षेपांचा अभिप्राय होता.

एकदा धंद्याचे राष्ट्रीयीकरण व यांत्रिक उद्योगाच्या पायावरील आर्थिक रचना या विषयावर माझी व विनोबांची चर्चा झाली. यांत्रिक उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीचे करून समृद्धीचे युग आणता येईल, असा समाजवादी युक्तिवाद विनोबांनी मान्य केला. परंतु त्यावरील त्यांनी घेतलेला आक्षेप फारच मार्मिक होता. त्यांचे बोलणे नेहमीच मार्मिक असते. त्यांच्या सर्व बोलण्यात हा आक्षेप अधिकच मार्मिक वाटला. ते म्हणाले- "ही यंत्रोद्योगाच्या भरभराटीतून निघालेली समृद्धी माणसाला खाऊन टाकण्याचा फार संभव आहे. भोग ही जशी माणसाची मुख्य गरज आहे, तसेच काम असणे ही देखील एक महत्त्वाची गरज आहे. इंद्रियांना काम मिळाले नाही तर इंद्रिये निकामी होतात, बुद्धीला काम मिळाले नाही तर बुद्धी मठ्ठ होते, मनाला काम मिळाले नाही तर मन भुताटकीचा कारखाना बनते. आज जिकडेतिकडे खोलपोटें दिसतात; यांत्रिक समृद्धीच्या समाजवादी युगात जिकडे तिकडे ढेरपोटे दिसू

लागतील.'' अजून तसे समाजवादी समृद्धीचें युग यावयाचे आहे हे खरे. बेकारीचा प्रश्न यंत्रांच्या वाढीने उत्पन्न होतो. तो केवळ आर्थिक प्रश्न म्हणूनच समजला जातो. तो प्रश्न सांस्कृतिकही आहे, असे गांधीवाद इशाऱ्याचे बोल बोलून घोषित करीत आहे.

दुसरा एक उपमुद्दा भारतीय शेतीच्या अर्थशास्त्राच्या संबंधात निघाला. आधुनिक व यांत्रिक शेतीशिवाय अन्नसमृद्धी होणार नाही, असे मी म्हटले. विनोबा म्हणाले- ''अन्नधान्याबरोबरच दुधाचीही गरज आहेच. दूध हे सर्वश्रेष्ठ पोषक अन्न आहे. दूध उत्पन्न होते तेव्हा बैलही उत्पन्न होतात. यांत्रिक शेतीत बैलांचा काय उपयोग? बैलांना काम तरी दिले पाहिजे किंवा बैल खाल्ले तरी पाहिजेत. बैलांना खायची तयारी आहे काय? यावर मी काही बोललो नाही. माझ्या या संवादाचे वृत्त माझे मित्र श्री. भैयासाहेब मुधोळकर (धुळे येथील वकील) व बॅ. पुरुषोत्तमदास त्रिकम यांना सांगितले. श्री. पुरुषोत्तम त्रिकम म्हणाले, ''अहो, आम्ही बैलही खाऊ, असे उत्तर का दिले नाही?'' मी म्हणालो, ''मी असे उत्तर दिले असते तर त्या साधु पुरुषाला त्या रात्री झोप आली नसती. मला वाद खेळण्याची हौस आहे; परंतु वाद जिंकण्याची हौस नाही.''

विनोबांच्या संबंधांतील थोड्या निवडक आठवणी मी येथे दिल्या आहेत. हाती अनेक महत्त्वाची कामे घेतली असल्यामुळें अधिक लिहिण्यास सध्या फुरसत नाही. भारताला व जगाला नैतिक शुभप्रेरणा देणाऱ्या महनीय संत व्यक्तींपैकी विनोबा आहेत. म्हणून ही सेवा करण्यात धन्यता वाटते.

(सदर लेख तर्कतीर्थांनी सन १९५५-५६ साली आचार्य विनोबा भावे यांच्या नियोजित षष्ट्यब्दीपूर्ती गौरव ग्रंथासाठी लिहिला होता, पण तो ग्रंथ काही प्रकाशित झाला नाही. मग हा लेख 'नवभारत' मासिकाच्या ऑक्टोबर, २००० च्या अंकात प्रकाशित करण्यात आला, विनोबांच्या १०५ व्या जयंती निमित्त)

ooo

२७

ध्येयवादी विचारवंत : आचार्य शंकरराव जावडेकर

गेल्या पस्तीस वर्षांतील महाराष्ट्राच्या राजकारणात वैचारिक मार्गदर्शन प्रामुख्याने करणारी व्यक्ती म्हणजे कै. शंकरराव जावडेकर होत. त्यांचा मनःपिंड मननात्मक होता, वृत्ती सत्त्वस्थ होती व निष्ठा राष्ट्रीय होती. त्यांचा समन्वयाचा शोध करणारा दृष्टिकोन असल्यामुळे व चित्ताचा अध्यात्माकडे ओढा असल्यामुळे ते अजातशत्रू बनले. गांधीवादी युगात म. गांधींना अनुसरणारे, वरच्या दर्जाचे लेखक, वक्ते व कार्यकर्ते महाराष्ट्रात अनेक निर्माण झाले. गांधींच्या सत्य-अहिंसेचा वाणी व लेखणीने सतत पुरस्कार व जयजयकार करणारे नामवंत साहित्यिकही झाले. त्यांच्या वाणीने व लेखणीने हिंसाही क्वचित प्रसंगी केलेली आढळते. परंतु त्यात कै. जावडेकर हे अपवाद होत. त्यांच्या लेखणीने अहिंसेचे सार्वभौम महाव्रत निरपवादपणे पाळले. ते अनेक दैनिकांचे, साप्ताहिकांचे व मासिकांचे बहुत वर्षे संपादक म्हणून राहिले. परंतु कठोर वा हिंसक वा मर्मच्छेदक वा निंदक शब्द त्यांच्या लेखणीला स्पर्श करण्यास कधीही धजला नाही. या दृष्टीने विचार करता असे म्हणावे लागते की, ते जन्मतःच दग्ध-किल्विष होते. महाराष्ट्राच्या बुद्धिक्षेत्रांत शुद्ध विचारांची वृष्टी सतत करीत राहून जावडेकर यांनी आपल्या वाङ्मय तपाची समाप्ती केली. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या दैवी संपत्तीतील एक थोर रत्न हरपले!

त्यांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमास असहकारितेच्या चळवळीपासून प्रारंभ झाला. त्यांनी गांधींच्या राजकीय चळवळीत कारावासही भोगला. १९३० साली ६ महिने, १९३२-३३ साली पावणेदोन वर्षे आणि ४२ सालच्या लढ्यात २॥ वर्षे कारागृहात त्यांनी काढली. परंतु प्रथमपासून अखेरपर्यंत शिक्षक याच नात्याने लोकशिक्षणाचे कार्य त्यांनी केले. काँग्रेसच्या व समाजवादाच्या चळवळीत शेकडो लहानमोठ्या कार्यकर्त्यांना त्यांनी वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. महाराष्ट्रतील विद्यमान राजकीय कार्यकर्त्यांचे गुरू असा जर निर्देश केला तर ही गोष्ट वस्तुस्थितीचीच निदर्शक ठरेल. प्रजासमाजवादी पक्षाचे नेते जावडेकरांना पक्षाचे

वैचारिक प्रवक्ते म्हणून मोठा मान देतात.

जावडेकर हे स्वतंत्र प्रज्ञेचे गृहस्थ होते. त्यामुळे त्यांनी कोणत्याही एका विचारसरणीच्या संप्रदायास चिकटून न बसता स्वतंत्र विचार करून स्वतःचे असे तात्त्विक निष्कर्ष काढले. या बाबतीतली त्यांची कामगिरी नितान्त वैशिष्ट्यपूर्ण आहे. टिळकांचा राष्ट्रवाद, गांधींचा सर्वोदयवाद, आणि कार्ल मार्क्सचा समाजवाद या तिन्ही विचारप्रवाहांचे त्यांनी खोल अवगाहन केले आणि एका मोठ्या समन्वयाच्या सिद्धांतावर येऊन ते स्थिरावले होते. गेल्या ५० वर्षांतील मोठमोठ्या विचारसंप्रदायांचा पुनः आढावा घेण्याची आता वेळ आली आहे. कोणतीही रूढ विचारसरणी आता तपासलीच पाहिजे, असा इशारा देणारा हा संधिकाल आहे. या संधिकालाचा साद जावडेकरांच्या विचारसरणीत ऐकू येतो. महाराष्ट्रामध्ये १९२० ते १९३७ सालापर्यंत टिळकसंप्रदाय व गांधीसंप्रदाय यांच्यातील वैचारिक विग्रह महाराष्ट्रात सुरू होता. या वैचारिक विग्रहात जावडेकर हे गांधीसंप्रदायात उभे राहिलेले दिसत होते. हे जरी खरे असले तरी, जावडेकर हे वैचारिक भूमिकेवरून निक्षून व बजावून सांगत होते की, टिळकांच्या राजकारणाचा खराखुरा वारसा हा गांधींच्याच वाट्यास आला आहे, टिळकांच्या जीवनाचे साफल्य गांधींच्या राजकारणातच उजळून दिसेल, टिळकांच्या राजकारणाचाच वारसा गांधींच्याकडे गेला आहे असे नव्हे, तर टिळकांच्या अध्यात्माची व कर्मयोगाचीही दौलत गांधीवादच संभाळून वाढवीत आहे; असा निर्वाळा मोठ्या हिमतीने ते देत असत. त्यांची ही हिंमत म्हणजेच त्यांचे विचारस्वातंत्र्य होय. गांधींचा यतिधर्म हा श्रेष्ठ कर्मयोगच आहे; त्याचीच समाजवादाशी सांगड घातली म्हणजे जे अध्यात्मदर्शन उत्पन्न होते, तेच नव्या युगाचे तत्त्वज्ञान होय, गांधींच्या अध्यात्माशी किंवा सत्याग्रहाशी समन्वित पावलेला समाजवाद हाच शांतिमय विश्वक्रांती निर्माण करील- अशी जावडेकरांची श्रद्धा होती. गांधी व कार्ल मार्क्स यांचा समन्वयच नव्या युगास आवश्यक असलेली क्रांती घडविण्यास समर्थ आहे, अशा निर्णयाप्रत ते पोचले होते. त्यांची या संबंधाची पुष्कळ विवेचने आजपर्यंत प्रसिद्ध झाली आहेत. अर्थशास्त्र, समाजशास्त्र किंवा मानवी विज्ञान या संबंधाची प्रमाणे किंवा पुरावे यांची न्यूनता जरी त्यात अनेक ठिकाणी भासत असली तरी त्यातील समन्वयाचे दर्शन सखोल व सूक्ष्म होते, ही गोष्ट पटल्याशिवाय राहात नाही.

साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना त्यांनी आधुनिक वाङ्मयाचा मानदंड म्हणून किंवा मूल्यमापक म्हणून एक नवा रस दाखवून दिला, तो म्हणजे क्रांतिरस होय. साहित्य समीक्षकांनी त्या रसाची उपेक्षा केली. परंतु क्रांतिरसाची कल्पना हे जावडेकरांच्या सूक्ष्म संवेदनाशील अशा नवसाहित्यविषयक सहृदयतेचे प्रमाण आहे. साहित्याची सामाजिक समीक्षा ही गोष्ट आधुनिक समीक्षाशास्त्रातील अत्यंत महत्त्वास पोचलेली शाखा आहे. क्रांतिरस ही कल्पना आचार्य जावडेकर यांनी सामाजिक समीक्षेस दिलेली एक अप्रतिम देणगी आहे. मनुष्यजातीच्या आधुनिक सामाजिक इतिहासाचे

साहित्यात जर प्रतिबिंब पहावयाचे झाले, तर ते प्रतिबिंब क्रांतिरस या कल्पनेने अधिक, उज्ज्वल स्वरूपात दिसते. या क्रांतिरसात परिणत पावणारे वाङ्मयच पुरोगामी अस्सल वाङ्मयय होय, असा निर्णय जावडेकरांच्या प्रतिपादनातून निघतो.

जावडेकरांचे वैचारिक वाङ्मय- विशेषतः त्यांचा 'आधुनिक भारत', 'राजनीतिशास्त्र परिचय' आणि त्यांची 'राज्यशास्त्रमीमांसा' ही मराठी भाषेत चिरंतन ठरतील. आधुनिक भारताची त्यांनी केलेली मीमांसा शास्त्रीय इतिहासाचें नमुनेदार उदाहरण होय. या विषयावर इतका सुंदर ग्रंथ दुसरा कोणताही नाही. राष्ट्रीय दृष्टिकोनातून इतिहास कसा लिहावा याचे उत्तम निदर्शन म्हणजे हा ग्रंथ होय. ऐतिहासिक कार्यकारणभाव, वर्गसंबंध, वैचारिक प्रवाह, थोर व्यक्तींचे इतिहासातील स्थान इत्यादी गोष्टींचे उत्कृष्ट विवेचन या ग्रंथात मिळते. राष्ट्रीय चळवळीत प्रत्यक्षभाग घेत असता केलेल्या ऐतिहासिक चिंतनातून हा निबंध निर्माण झाला असल्यामुळे त्यात जिव्हाळा व वैचारिकता यांचा उत्कृष्ट संगम झालेला अनुभवास येतो.

जावडेकरांचे खाजगी जीवन व सार्वजनिक जीवन या दोन्ही बाजू सारख्याच शुद्ध चारित्र्याने पावन झालेल्या दिसतात. त्यांचे जीवन व वृत्ती संताला शोभणारी होती. त्याचा परिणाम नातेवाईक, संबंधी जन व मित्रमंडळी या सर्वांवर अनुकूल असाच झाला. त्यांना जिव्हाळ्याचे मित्र पुष्कळच मिळाले. सार्वजनिक व विशेषतः राजकीय क्षेत्रात त्यांच्या चाहत्यांची संख्या फार मोठी आहे. म्हणून त्यांचे आयुष्य जरी स्वास्थ्यात गेले नसले तरी त्यांची उपेक्षाही फार झाली नाही. सद्विचारांचा निर्मळ निर्झर जसा तृषितांना आकर्षित करतो तसे ते विचारांची कदर असलेल्या माणसांस आकर्षित करीत होते. त्यांची प्रकृती मात्र दीर्घकालपर्यंत श्वासाने बेजार झाली होती; अशा स्थितीतही त्यानी साठीचे आयुष्य भोगले. याचे श्रेय त्यांच्या थोर, सच्छील पत्नीकडेच जाते त्या सतीसावित्रीमुळे या सत्यवानास दीर्घजीवन लाभले!

(नवभारत, जानेवारी, १९५६ पृ. ५४-५५)

❍❍❍

२८

साठीच्या उंबरठ्यावरील तरुण : माधवराव बागल

श्री. माधवराव बागल हे वयाची साठी पूर्ण करीत आहेत याबद्दल त्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. त्यापेक्षा अधिक अभिनंदनाची अशी गोष्ट आहे की त्यांचे मन अजून तरुण आहे व शरीर ताठ आहे. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची आघाडी ते जोमदारपणे सांभाळत आहेत. भारतीय मोठे योद्धे व थोर सेनानी कुरुक्षेत्रावर लढत असता त्यांच्यापैकी अनेक जण साठीच्या पलीकडे गेलेले होते व कित्येक तर वयाच्या ८० ते ९० च्या सुमारात होते. वयाचे वार्धक्य युद्धाच्या आड येऊ शकत नसते. त्याची जुन्या नव्या इतिहासात पुष्कळ प्रमाणे आहेत. श्री माधवराव बागलांचा व माझा पंचवीस वर्षांपेक्षा अधिक काळपर्यंत परिचय व स्नेह आहे. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात त्यांना एक विशिष्ट स्थान आहे. ह्या गोष्टींचे प्रत्यंतर गेल्या ३५ वर्षांतील राजकीय सामाजिक चळवळींच्या इतिहासात अनेक ठिकाणी मिळते.

चळवळीची चार पर्वे

बागलांचा कोल्हापूरच्या राजकारणाशी व सामाजिक चळवळींशी दोन पिढ्यांचा संबंध आहे. महाराष्ट्राचे विसाव्या शतकातील राजकारण व समाजकारण कोल्हापूरशी अनेक कारणांस्तव निगडित आहे, त्यात बागल येतात. माजी 'इंटर' पत्राचे संपादक व कै. छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारातील एक प्रस्थ म्हणून माधवरावांचे वडील कै. खंडेराव बागल प्रसिद्ध होते. सत्यशोधक चळवळीची सूत्रे शाहू महाराजांच्या दरबारातून हालत असत; त्यात खंडेराव बागलांचाही हात होता.

या पार्श्वभूमीवर माधवरांच्या सार्वजनिक जीवनास प्रारंभ झाला. कोल्हापुराने राजकारणी चळवळीची आतापर्यंत चार वर्षे पहिली आहेत. त्या चारी वर्षांवर कोल्हापुरी राजकारणाची काही विशिष्ट छाप पडलेली दिसून येते . ब्रिटिश अमदानीपासून स्वातंत्र्य युगापर्यंत त्यातील

तीन पर्वे निघून जातात. पहिले पर्व दहशतवादी राष्ट्रीय चळवळीचे, दुसरे इंग्रजधार्जिण्या कारस्थानांचे व तिसरे अखिल भारतीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या प्रजापरिषदेचे. आता संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे चौथे पर्व सुरू झाले आहे. तिसरे व चौथी पर्व माधवरावांचे आहे असे सहज म्हणता येते. प्रथम पर्वात दहशतवादी राष्ट्रीय क्रांतीच्या राजकारणाचे केंद्र म्हणून कोल्हापूर महाराष्ट्रात चमकू लागले. तो काळ फारच अल्प होता; महाराष्ट्रातील टिळकांच्या राजकारणातील चळवळीचा तो काळ होता. कोल्हापूरच्या दरबाराने काही गूढ कारणांमुळे उलटी कलाटणी देण्याचा प्रयत्न केला. टिळकांच्या राजकारणाला धोक्यात आणण्याचे कारस्थान येथे शिजले असे म्हणतात. टिळकांचा अवतार संपल्यानंतर सत्यशोधक चळवळ उफळली; हे दुसरे पर्व होय. त्यात इंग्रजधार्जिणे स्वरूपही आलेले होतेच. ही गोष्ट कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या महत्त्वाच्या व्यक्ती कबूल करू लागल्या आहेत. १९३० साली म. गांधींनी कायदेभंगांचे आंदोलन सुरू केले. ते महापुराप्रमाणे देशभर पसरले. या आंदोलनानेच इंग्रजधार्जिण्या प्रवृत्तीची पाळेमुळे हादरली. त्यामुळे श्री. केशवराव जेथे यांनी सत्यशोधक चळवळीचे विसर्जन केले व ते गांधीजींच्या चळवळीत सामील झाले. त्याच वेळी माधवराव बागल यांनीही सत्यशोधक चळवळीस हळूच बगल देऊन केशवरांच्या पावलावर पाऊल ठेवले. तेव्हापासून राष्ट्रीय चळवळीचे ध्वजारोहण कोल्हापुरात झाले.

सत्यशोधकी खेड्यात

माधवरावांशी प्रथम माझा संबंध १९४० साली आला. मी सातारा जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात कायदेभंगाच्या चळवळीत दौऱ्यावर होतो. मी काँग्रेसचा संदेश खेड्यांपर्यंत पोहोचवीत होतो. माधवरावांची व माझी गाठ या दौऱ्यात पेठ या नावाच्या सुप्रसिद्ध सत्यशोधकी खेड्यात पडली. माधवराव कायदेभंगाचा प्रत्यक्ष पुरस्कार करीत नव्हते. देशाच्या अवनतीस ब्राह्मण व इंग्रज हे दोघे सारखे जबाबदार आहेत, असे त्यांच्या व्याख्यानांचे सूत्र होते. आमच्या सभा एकत्र होत. मी बागलांच्या ब्राह्मणांवरील जहरी टीकेस बगल देऊन आवर्जून भाषणे करीत होतो, माझा आवश्यक युक्तिवाद बागलांना खेचल्याशिवाय राहिला नाही. आम्ही तेव्हापासून मित्र बनलो. माझे तात्पर्य असे होतेः 'ब्राह्मणी वर्चस्वाला महात्मा गांधींच्या चळवळीने पूर्णपणे सुरूंग लावला आहे. बहुजन समाज तिच्यात भाग घेऊ लागला आहे. त्यामुळे बहुजन समाजातही नवे नेते निर्माण होऊ लागतील व ब्राह्मणी वर्चस्व संपुष्टात येईल. बहुजन समाजातील अज्ञान हे ब्राह्मणांपेक्षा भयंकर आहे. हे नष्ट झाले तर ब्राह्मणी वर्चस्व नष्ट होईल, कारण ब्राह्मण हा केवळ शिक्षणामुळेच पुढारलेला आहे.'' त्यानंतर बहुजन समाजात पुष्कळ नवीन नेते निर्माण झाले. बागल हे त्यांतीलच एक होते .

काँग्रेसशी दुरावा

दक्षिण महाराष्ट्रातील प्रजापरिषदांचे मुख्य केंद्र कोल्हापूर बनल्यापासून माधवराव

बागलांना त्या राजकारणाचे नेतृत्व लाभले. कोल्हापूरच्या छत्रपतींच्या गादीने हेवा करावा, अशी लोकप्रियता प्रजापरिषदेच्या राजकारणात माधवरावांनी कमावली. कोल्हापूरच्या गादीवर माधवरावांची मोठी निष्ठा! कै. छत्रपती शाहू महाराजांच्या प्रभावाखालीच पहिल्या उमेदीत त्यांची अस्मिता पोसली गेली आहे. शाहू महाराजांच्या वात्सल्याची छाया त्यांच्यावर होती. त्यामुळे ते गादीचे नितांत भक्त बनले. ह्या निष्ठेमुळे कोल्हापूर संस्थानातील सगळी मराठा जमात राजकीय चळवळीत माधवरावांच्या पाठीशी उभी राहिली. अनेक वेळा करागृहवास माधवरावांनी सोसला, याचे कारण तेथील जनतेने त्यांच्यावर दाखवलेले विलक्षण प्रेम होय.

१९४५ च्या सुमारास काँग्रेसच्या चळवळीला पूर्ण ओहोटी लागली. आणि त्यामुळे भारतीय राजकारणाला सनदशीर वाटाघाटींचा आकार आला. स्वराज्य दृष्टिपथात आले. कोल्हापूर संस्थानातही नवे प्रतिनिधी मंत्रिमंडळ स्थापन झाले. या वेळी माधवरावांची हिम्मत खूप वाढली. कोल्हापूर संस्थान हे समाजवादी स्वराज्य बनवण्याचा मनसुबा त्यांनी बांधला. कोल्हापूर संस्थान हे समाजवादी गणराज्य बनविण्याचा मनसुबा त्यांनी बांधला. कोल्हापूर संस्थानाचे विलीनीकरण होण्याऐवजी त्याचे एक जर लोकशाही राज्य बनले तर फार चांगले, अशी वृत्ती असलेला फार मोठा गट कोल्हापूर संस्थानात अस्तित्वात आला. मराठा गट प्रामुख्याने अशा वृत्तीचा होता. छत्रपतींच्या गादीबद्दलची ममता या वृत्तीस कारण झाली होती. सर्व दक्षिणी संस्थांने खालसा करण्याचे ठरल्याने या मंडळींचा धीरच खलास झाला. या मंडळींत माधवराव होते. काँग्रेसचे राजकारण व माधवराव यांच्यामधले अद्वैत त्यामुळे नष्ट झाले. हळूहळू माधवराव काँग्रेसपासून फारच दूर गेले. मुंबई राज्यातर्फे नेमलेला जिल्हाधिकारी नंजाप्पा याने तर माधवरावांची फारच मानखंडना केली. त्याने कोल्हापुरात दहशतीचे वातावरण निर्माण केले. खेर-मुरारजी यांचे मंत्रिमंडळ त्या वेळी अधिकारारूढ होते.

शुद्ध जनसंमर्दाचे नेते

या मंत्रिमंडळाच्या कारकिर्दीत कोल्हापुरातच नव्हे तर सगळ्या महाराष्ट्रात असमाधानाचे वातावरण पसरले. काँग्रेस राज्याबद्दल मनात बांधलेल्या अशाआकांक्षांना पहिल्यांदाच मोठा धक्का पोहोचला. त्यातून शेतकरी-कामगार पक्षाचा उदय झाला. जेधे मोरे यांनीही आघाडी उघडली. ही आघाडी लवकरच ढिली पडली. त्या चळवळीचा जोर ओसरला; त्याबरोबर माधवरावही खाली उतरले. माधवरावांच्या स्वभावाची एक विशिष्ट भावनाप्रधान रचना आहे. शांतता व विधायक प्रवृत्तीचे वातावरण जेव्हा असते, तेव्हा माधवरांचे नेतृत्व मंदावते, ते बाजूस पडतात. लहान लहान कार्यकर्त्यांच्या गटात शांततेच्या काळी ते खेळीमेळीने समतेच्या नात्याने रमू शकत नाहीत. ते चळवळीला ऊत आला असता क्षोभ पावणाऱ्या जनसंमर्दाचेच नेते होऊ शकतात व त्यांत शोभून दिसतात. लहान माणसांशी जमवून घेणारा

त्यांचा स्वभाव नाही. आपले प्रस्थ जमविण्याची, ठाकठीक जम बसविण्याचीही गटबाजी प्रवृत्ती त्यांच्यात नाही. म्हणून जेव्हा चळवळ नसते तेव्हा ते एकटेच असतात. ते दिलदार आहेत; परंतु त्याबरोबरच त्यांची अस्मिताही तितकीच उघडी आहे. अहंता छपविण्याचे कसब त्यांच्यात नाही. त्यांचा स्वभाव रोखठोक व सरळ आहे. त्यामुळे ते एखाद्या पक्षाचे नेते म्हणून धुरा वाहण्यास समर्थ झाले नाहीत. म्हणूनच ते शे. का. पक्षात फार वेळ टिकले नाहीत; ते मागे पडले.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ

आता संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन सुरू आहे. कोल्हापूर शहर व जिल्हा या चळवळीची एक महत्त्वाची आघाडी बनली आहे. याचे बरेच श्रेय माधवरावांकडे आहे. संस्थान खालसा झाल्यामुळे तेथील मराठा जमात विशेष दुखावली गेली आहे. या दुखावलेल्या भावनांच्या गाभ्यात आता या चळवळीने जोराचे मूळ धरले आहे. माधवराव त्या मुळाचे सिंचन भावुकपणे करीत आहेत.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ध्येय सिद्ध होईपर्यंत कायम राहणार आहे. बेळगावसारख्या मराठी सरहद्दी व मुंबई शहर यांचा जोपर्यंत मराठी राज्यात समावेश होणार नाही, तोपर्यंत ही चळवळ व्यक्त वा अव्यक्त स्वरूपात मूळ धरून राहणारच. कोल्हापूर हा या चळवळीचा एक बालेकिल्ला म्हणून काम करीत राहील, युगे लागली तरी ही चळवळ शमणार नाही. कारण त्यासंबंधी भारताच्या नेत्यांनी घेतलेल्या निर्णयास तात्त्विक स्वरूपाचा आधार नाही; त्यात शुद्ध बुद्धी नाही. महाराष्ट्राबद्दलची साशंकता व त्या साशंकतेतून उत्पन्न झालेले डावपेची राजकारण या निर्णयाच्या मुळाशी आहे. त्यामुळेच भाषिक राष्ट्रवाद चेतविला गेला आहे. भारतीय एकतेच्या मर्मस्थानावर या निर्णयाने घाव घातला आहे. याचे प्रत्यंतर माधवरावांच्या भाषणातून जितके स्पष्ट रीतीने सापडते, तितके इतर कोणत्याही भाषणावरून सापडत नाही. कारण माधवरावांचे मन अगदी उघडे आहे; त्याला ढोंग व डावपेच समजत नाहीत. म्हणूनच माधवरावांच्या भाषणातील नुसता एक संदर्भ दिला तरी पुरा होईल. 'राष्ट्रीय निष्ठा म्हणजे महाराष्ट्र निष्ठा' होय, असे समीकरण माधवरावांनी मांडले आहे. हे समीकरण माधवरावांच्या सर्व भाषणांत अलीकडे ओतप्रोत भरलेले दिसते. माधवराव मिरज येथील भाषणात म्हणतात, ''श्री. शंकरराव देव व काकासाहेब गाडगीळ हे खरे मराठे होत; भाऊसाहेब हिरे हे खरे मराठे होत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी खरे मराठी नव्हेत! यशवंतराव चव्हाण खरे मराठे नव्हेत!'' माधवरावांचे हे भाषण या चळवळीच्या प्रारंभ काळातील आहे. देव, गाडगीळ, हिऱ्यांनी त्यानंतर माधवरावांचा खरोखर अपेक्षाभंगच केलेला दिसतो. देव, गाडगीळ व हिरे ही मंडळी आता चव्हाण व लक्ष्मणशास्त्री यांच्या पंक्तीला येऊन बसलेली माधवरावांना दिसत असेल. माधवराव म्हणत असतील की, हे सगळे एकजात एकाच माळेचे मणी ठरले! मी मित्रभावाने माधवरावांस असे सांगतो की,

व्यक्तीविषयक मते बनवीत असताना पुष्कळच धीर धरावा लागतो व काळ लोटावा लागतो.

माधवरावांची राजकीय व सामाजिक विचारसरणी ही आंतरराष्ट्रीय समाजवादावर व विश्वव्यापी मानवतावादावर आधारलेली आहे. परंतु त्यांच्या मनाची घडण करणारे संस्कार मात्र 'मी अस्सल मराठा' अशा अभिमानावर उभारलेले आहेत. त्यामुळे ऐन आणीबाणीच्या वेळी त्यांचा हा अभिमान थरारून उभा राहतो. अशा वेळी माधवरावांची विचारसरणी त्या अभिमानाच्या आड लुप्त होते. सध्या महाराष्ट्रातील अनेक मानवतावादी, समाजवादी, साम्यवादी व राष्ट्रवादी असलेल्यांची हीच गत झालेली दिसून येते. माधवराव हे त्यांतलेच नमुनेदार उदाहरण होय.

तळमळीचा लेखक

राजकारणाशिवाय माधवरांच्या जीवनाचे इतरही पैलू चांगले चमकदार आहेत. त्यांच्या या षष्ट्यब्दीत त्यांचेही दर्शन घेणे प्रसंगोचित ठरेल. माधवराव मोठे लेखक आहेत. स्वतःस बहुजन समाजातला म्हणून म्हणवणाऱ्या लोकांत माधवरावांइतके विपुल लेखन करणारा कोणीही नाही. महाराष्ट्रातील लहानमोठी वृत्तपत्रे व मासिके गेली ३० वर्षे माधवरावांच्या निर्मळ व सुबोध लेखनाने वारंवार सजलेली आढळतात. समाजसुधारणा व समतेचे राजकारण हा त्या सर्व लेखनाचा स्थायीभाव आहे. त्यांच्या सर्व लेखनाच्या मुळाशी समाजसुधारणेची तळमळ व दलितांबद्दलचा जिव्हाळा भरलेला असतो. ते मुळात सत्यशोधक समाजाचे असले तरी त्यांनी 'सत्यशोधकांस इशारा' अनेक वेळा दिलेला आहे. जातिभेद हा 'स्वराज्याचा शत्रू' आहे ही गोष्ट त्यांनी सविस्तर रीतीने एका पुस्तकात दाखवली आहे. समाज सत्तावाद किंवा साम्यवाद आणि पुरस्कार करणारी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. कै. छत्रपती शाहू महाराजांवर त्यांची भक्ती होती. त्याचे कारण शाहू महाराज मोठे समाजसुधारक होते, हेही आहे. शाहू महाराजांच्या आठवणी लिहून त्यांनी सरळ, सुरेख व सुबोध मराठीचे सुबक लेणेच निर्मून ठेवले आहे. माधवराव स्वतः उत्कृष्ट कलाकार असे आहेत, तसे कलेचे टीकाकार किंवा समीक्षकही आहेत. त्यांनी दोन भागांमध्ये लिहिलेल्या 'कला व कलावंत' या पुस्तकात पाश्चात्त्य व भारतीय चित्रांचा व शैलींचा सुगम व सुंदर परामर्श लिहिला आहे.

-आणि निसर्गप्रेमी चित्रकार

माधवराव निसर्गाचे देखावे रंगविण्यात अत्यंत कुशल आहेत. त्यांच्या नयनमनोहर कृती कोल्हापूर येथे एका सार्वजनिक दिवाणखान्यात मांडलेल्या पहावयास मिळतात. त्यांच्या राहत्या घरीही भिंतीवर टांगलेली सुंदर चित्रे पाहून पाहुणा खुश होतो. कोल्हापूर ते पन्हाळा हा प्रदेश त्यांच्या निसर्गचित्रांचा विषय होय. हा प्रदेश सह्याद्रीचा मावळ भागातील एक रमणीय व भव्य भाग आहे. येथील हवापाणी खूप जोमदार आहे. या प्रदेशात सूर्यकिरणांची विचित्र माया क्रीडा करीत अनंत आकार निर्माण करीत असते. त्या मायेची ती क्षणभंगुर परंतु

नितांत सुंदर असलेली रूपे माधवरावांनी आपल्या कुंचल्यांनी उचलून पटांवर स्थिर करून नजरबंदीत ठेवली आहेत. माधवरावांनी सर्व ऋतूंतील आणि अहोरात्रींच्या व प्रहरांच्या परिवर्तनातील निवडक देखावे रंगवून दृष्टिक्षेत्रात करून ठेवले आहेत. काही ठिकाणी निसर्गालाही आत्मरूप पाहून चमत्कार वाटावा, अशी भू-परिमाणे माधवरावांनी चितारली आहेत. 'पंचगंगेचा संध्या घाट', 'मंदिराच्या बाहेरील दर्शन', 'पन्हाळगडावरील प्रभात' इत्यादी चित्रातील मृदू व हळुवारपणे एकमेकांत मिसळणारे रंगच मनास रमवीत नाहीत तर तेथील हवेचा स्पर्शही जिवाला सुखाची जाणीव दिल्याशिवाय राहत नाही. माधवरावांचे कलावैभव छत्रपतींनाही मोहित करणारे आहे. हे वैभव त्यांच्या हृदयातील निसर्गप्रीतीने निर्मिले आहे. हा कलेतील व निसर्ग प्रीतीतील आत्मानंद अनुभवीत असता राजांचे ऐश्वर्यही माधवरावांना तुच्छ वाटते. कला व निसर्गप्रेम यांच्याबद्दल माधवराव म्हणतात, ''सकाळ संध्याकाळ आकाशात सुवर्ण मोहरा रोज उधळल्या जात आहेत; सरोवर-सागर-नदीनाले-निर्झरावर जललहरींचा नाच चालला आहे; वर आकाशात व खाली पृथ्वीतलावर रंगीबेरंगी फुले सारखी उमलत आहेत; पक्ष्यांची सुस्वर गीते, तैमुरलंग, नादिरशहा किंवा शिकंदर यांच्या भीतीने बंद पडली नाहीत; जिंकलेल्या प्रदेशावरची फुले उमलायची थांबली नाहीत, किंवा समुद्र हटविता आला नाही. ही संपत्ती आहे तशीच आहे.''

''ही निसर्गाची संपत्ती चित्रकार, कवी व लेखक यांच्या सेवेला सदैव तत्पर असते. मात्र निव्वळ पैशामागे लागलेल्या गुलामांना ती मिळत नाही. मनाजोगे चित्र निघाल्यावर, एखादे उत्कृष्ट काव्य साधल्यानंतर, एखादे सुंदर हृदयस्पर्शी कथानक आठवल्यानंतर किंवा एखादा तसाच लेख किंवा ग्रंथ वाचल्यानंतर वाटणाऱ्या आनंदाची कल्पना पैशापायी जगणाऱ्यांना काय करता येणार? दरिद्री कलावंतांचे जीवनसुद्धा ऐश्वर्यसंपन्न असते. त्यांना प्राणधारणेपुरता आधार झाला की ते समाधानी राहतात. कोट्यधीशांना जन्मोजन्मी न आढळणारा आनंद ते भोगू शकतात. उच्च प्रतीच्या वातावरणात, उच्चतर विचारांच्या मनोभूमिकेत ते तरंगत असतात. यातूनच देशाची संस्कृती बनत असते: देशाचा दर्जा ठरत असतो.'' (कला आणि कलावंत, पृ. ५, ६).

वैयक्तिक जीवनातील व्यथा

यात माधवरावांच्या खाजगी जीवनाचेही रहस्य सूचित होते. शाहू महाराज होते तोपर्यंतच म्हणजे पहिल्या उमेदीतच त्यांना जे कौटुंबिक स्वास्थ्य थोडेबहुत भोगावयास मिळाले, तेवढेच. आतापर्यंत त्यांची सर्व उमेद सांपत्तिक दृष्टीने विवंचनेतच खर्च झाली आहे. त्यांचे बालपण व तारुण्याचा पहिला भाग एका संस्थानी अंमलदाराचे पुत्र या नात्याने ऐटीत व आरामात गेला. त्यांच्यात जो ताठरपणा आहे, त्याला एक कारण म्हणजे आयुष्याच्या पहिल्या भागातील पितृछायेखाली झालेली वाढ होय. नंतर मात्र त्यांना चांगले असे कौटुंबिक सौख्य मिळाले नाही. त्यांच्या पत्नीची प्रकृती निकोप अशी कधीच राहिली नाही. आजारी

पत्नीची काळजी वाहण्यातच त्यांची ऐन उमेद खर्च झाली आहे. मात्र एकपत्नी व्रत त्यांनी कसोशीने पाळले. त्याचे कारण पापभिरूपणा नव्हे, असे ते मोकळेपणाने आत्मचरित्रात कबूल करतात. जगाची भीती हेच शील शुद्ध राहण्याचे मुख्य कारण होय, असे ते ग्वाही देऊन सांगतात. लग्नापूर्वी त्यांचा प्रेमभंगही झालेला आहे. परंतु त्यामुळे ते भग्नहृदय बनले नाहीत. फार लवकर ती गोष्ट ते विसरले. त्यामुळे त्यांच्या आयुष्याची सहृदय कलाकाराला योग्य अशी करुण कहाणी झाली नाही. आपल्या आयुष्यातील संयमाची कथा ते मोकळ्या मनाने सांगतात.

हिंमत आणि जोम

वरून पाहणाऱ्यास हे गृहस्थ मोठ्या ऐटीत जगत असावेत, असा भास होतो. परंतु अंदर की बात न्यारी आहे. योगक्षेम कसाबसाच चालू आहे. त्यांचे राहते घरही स्वतःच्या मालकीचे नाही. घरात शिरल्याबरोबर मात्र तेथील मांडणीवरून हे गृहस्थ सुस्थितीत आहेत असे वाटते. सुबक लाकडी सामान, भिंतीवर टांगलेले वेचक चित्रांचे नमुने, लेनिन, स्टालिन, टागोर, गांधी, नेहरू यांची भव्य छायाचित्रे, पाश्चात्त्य वाङ्मयांतील निवडक पुस्तकांची खच्चून भरलेली चार कपाटे, खुर्च्यांतील आणि चौपाईवरील गालिचे आणि कमावलेली व मऊ व्याघ्रादिकांची आजिने, हे सर्व पाहून हा गृहस्य थाटात राहतो असे वाटते. परिस्थिती जेमतेम आहे, असे या राजबिंड्या व्यक्तीकडे पाहून तर मुळीच पटत नाही. पाणीदार टपोरे डोळे, खादीचा परंतु नीटनेटका पोशाख, फरची उंच टोपी, वगैरे ढब पाहून माणूस खूश होतो. पण वस्तुस्थिती अशी आहे की, माधवराव सांपत्तिक विवंचनेत दिवस काढीत आहेत. त्यांना गृहसौख्य नाही व समाजातही शांती मिळाली नाही. केवळ निसर्गाच्या दर्शनाने मिळणारा आनंद आणि उदात्त विचारसरणीतील सत्यदर्शनाने होणारे समाधान, यांवरच माधवराव मोठ्या हिमतीने आणि जोमाने जगत आहेत. त्यामुळेच त्यांना अधिक दीर्घ जीवन लाभेल यात शंका नाही.

(साप्ताहिक मौज, शनिवार, २७ मे, १९५६, पृ. ३ व १०)

❍❍❍

२९

वेदवेत्ते टिळक

इंग्रजी विद्या भारतातील विद्यापीठांत स्थिरावल्यानंतर मुंबईत व महाराष्ट्रात विद्वानांच्या ज्या दोन पिढ्या निपजल्या, त्यात अखिल भारतीय कीर्तीची फार महत्त्वाची मंडळी होऊन गेली. या मंडळींत टिळकांचे स्थान उच्च मानले जाते. डॉ. भांडारकर, डॉ. भाऊ दाजी, न्यायमूर्ती तेलंग, न्यायमूर्ती रानडे, वेदार्थ रत्नकार शं. पां. पंडित इ. पंडितांमध्ये टिळकांचे नाव विशेष चमकून दिसते. भारतातील वेदविद्येत निपुण व थोर विद्वान म्हणून पाश्चात्त्य पंडितांनी टिळकांना मान्यता दिली. इ. स. १८९७ साली टिळकांना राजद्रोहाचा अभियोग होऊन त्यांना काराग्रहवासाची शिक्षा झाली. तेव्हा पाश्चात्त्य देशात अद्वितीय संस्कृतपंडित म्हणून प्रसिद्धीस आलेले मॅक्समुलर टिळकांना सक्तमजुरीची शिक्षा झालेली ऐकून हळहळले. टिळकांना कारागृहात वेदव्यासंगाची परवानगी मिळवून देण्याची खटपटही मॅक्समुलरनी केली.

टिळक हे एका अर्थाने महायोगीच होते. इकडे अनेक गुंतागुंतीच्या व कटकटीच्या सामाजिक व राजकीय चळवळींची सूत्रें हालवायचीं किंवा पक्षोपक्षांचे निकराचे लढे लढवायचे किंवा न्यायालयीन झगडे वर्षानुवर्षे लढावयाचे किंवा कारागृहांतील कोंदट, भिकार, उदास व कंटाळवाण्या एकांतात दिवस कंठावयाचे आणि दुसरीकडे त्याच वेळी फुरसत सापडल्याबरोबर त्या संग्रामाच्या धकाधकीतून मन अल्लदपणे काढून घेऊन वेद, अवेस्ता, बायबल, महाभारत, ग्रीक पुराणकथा वा खाल्डियांतील उत्खननांत सापडलेल्या अवशेष कथा यांच्यावरील पांडित्यपूर्ण विवेचनाचे जाडे ग्रंथ उघडून त्यांचे मनन करीत, टिपणे तयार करावयाची. असा वर्तनक्रम भगवद्गीतेतील स्थितप्रज्ञाच्या आदर्शासच साधू शकतो. झंझावातात महावृक्ष उन्मळून पडतात, महावने थरारत असतात तरी पर्वताचे शिखर अचलच राहते, तसे त्यांचे चित्त होते.

टिळकांचा विद्याव्यासंग आणि ध्येयवाद यांत अत्यंत सुसंगती होती. त्यांच्या ध्येयवादानेच

त्यांना वेदविद्यांच्या व्यासंगाची स्फूर्ती अर्पण केली होती. भारतीय राष्ट्रीयत्वाचे ते द्रष्टे व स्रष्टे होते. राष्ट्रीयत्वाचे दीर्घ, विस्तृत, गंभीर व बलिष्ट अधिष्ठान निर्माण करण्यास आवश्यक अशी भारताची ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी ते वेदामध्ये वेदान्तामध्ये शोधत होते. त्याकरिता त्यांनी सव्यसाची बनून भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याचे सेनापतित्व करीत असताच वेदव्यासंग आयुष्यभर चालू ठेविला. त्यांचे मन राजकीय स्वातंत्र्यावर जितके एकाग्र झाले होते तितकेच ते भारतीयांच्या प्राचीन संस्कृतीच्या इतिहासावर म्हणजे पर्यायाने वेदांवरही एकाग्र बनले होते. वेदांचा अभ्यास करून भारतीयांच्या अतिप्राचीन इतिहासाचा आरंभबिंदू त्यांनी शोधला. पाश्चात्त्य विद्वान जेव्हा प्राचीन भारतीय इतिहासाची व प्राचीन मानवेतिहासाची रचना करू लागले, तेव्हा त्यांना ऋग्वेदासारखा मानव जातीच्या वाङ्मयातील सर्वांत प्राचीन लेख सापडला म्हणून फार कौतुक वाटले. परंतु लगेच खाल्डिया व इजिप्त येथील अतिप्राचीन संस्कृतीतील लिखाणही शिलालेख व इष्टकालेख या रूपांत मितिवार सापडले. त्यामुळे ऋग्वेदाच्याही पूर्वीची मध्यपूर्वेतील मिसरी व असुरी लोकांची संस्कृती होती, असे ठरू लागले. वैदिक व वैदिकेतर संस्कृत वाङ्मयाचे व पाली वाङ्मयाचे परिशीलन करून भारतीय वाङ्मयेतिहास पाश्चात्त्य पंडितांनी लिहिले. त्यात ऋग्वेदाचा काल इ. स. पूर्व १५ व्या शतकाच्या पाठीमागे नेणे त्यांना कठीण दिसू लागले. तेव्हा टिळकांनी वेदांतील कालदर्शक प्रमाणांची मीमांसा प्रारंभिली; त्यावरून टिळकांना असे दिसले की इजिप्शियन, सुमेरियन, चिनी किंवा इराणी लोकांच्या संस्कृतीच्याही पूर्वी भारतीय आर्यांच्या संस्कृतीचे धागे जाऊन पोचतात. आर्यांचा आदिकाल व मूलस्थान कोणते याचा शोध घेण्याकरिता त्यांनी मानवजातीच्या इतिहासाचा चित्रपटच कालाच्या खोल अंतरंगांत प्रवेश करून मनापुढे उभा केला.

वेदांसंबंधी टिळकांचे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. इतर 'मृगशीर्षकाल अथवा वेदकालनिर्णय' (The Orion or Researches into the Antiquities of the Vedas) आणि 'वैदिक कालानुक्रम व वेदांगज्योतिष' (Vedic Chronology and Vedanga Jyotisha) या दोन पुस्तकांत गणितज्योतिष, खगोलशास्त्र व तुलनात्मक पुराणकथाशास्त्र यांच्या आधारे भारतीय आर्यांच्या अतिप्राचीन काळाची पहिली मर्यादा इ. स. पूर्व सहा सहस्र वर्षांपर्यंत नेऊन भिडविली; त्याचप्रमाणे, 'आर्यांचे उत्तरध्रुव-प्रदेशांतील मूलस्थान (Arctic Home in the Vedas) या ग्रंथांत टिळकांनी भूस्तरशास्त्र व मानवजातीचा पाश्चात्त्यांनी शोधलेला इतिहास यांचे साहाय्य घेऊन, वेदांतील व जगातील प्राचीन धर्मग्रंथ व पुराणे यांच्यातील कथांचा तुलनात्मक अभ्यास करून व तुलनात्मक भाषाशास्त्राचाही पाठिंबा घेऊन आर्यांचे मूलस्थान उत्तर ध्रुवाच्या परिसरात असावे असे तर्क सयुक्तिक रीतीने मांडले. त्यात असे दाखविले आहे की, इ. स. पूर्व १० व्या सहस्रकाच्या सुमारास भारतीय आर्य, इराणी आर्य व युरोपियन आर्य हे एका जमातीच्या रूपाने वसती करून राहिले होते. हा

प्रदेश सैबेरियाच्या लगत असावा. सर्व मनुष्यजात, पशू व वनस्पती यांची सृष्टी किंवा आदिमानवांची सर्व संस्कृतीच उत्तरध्रुव प्रदेशात जन्मली व वृद्धिंगत झाली, असे अनेक अमेरिकन भूस्तरशास्त्रज्ञ व मानवजातीचा इतिहास शोधणारे संशोधक म्हणत आहेत. यावरूनच टिळकांना वेदांतील उत्तरध्रुवसंबंधी प्रमाणे हुडकण्याची प्रेरणा झाली. हा प्रदेश एकदा मानवी जीवनास संपूर्ण अनुकूल हवापाण्याचा होता. परंतु कालान्तराने हिमपात व जलप्रलय दीर्घकालपर्यंत होऊन तेथील स्थान मानव वसतीस अत्यंत निरुपयोगी बनले. हिमपातापूर्वीच्या युगात ते मनुष्यजातीच्या आनंदाचे निधानच बनले होते. निरामय होते. इकडच्या भूप्रदेशाच्या मस्तकावरून सूर्यचंद्रतारकांचे पुंज पूर्वेकडे अस्तास जातात तसे तेथे होत नाही. तेथे तारकापुंजांकित आकाश क्षितिजाशी समांतर व छत्राप्रमाणे चक्राकार फिरत असते. चित्रविचित्र रंगांनी रंगलेली मंगल उषा तीसतीस दिवसपर्यंत अखंडपणे न मावळता क्षितिजाजवळून परिभ्रमण करीत, आश्चर्यमय क्रीडा करीत, रमवीत असते. तेथे सूर्यही अस्तास न जाता असाच अनेक महिने चक्राकार परिवर्तने करीत राहतो; कधी तापत नाही, सौम्यपणे प्रदक्षिणा करीत राहतो. सहा महिने दिवस चार महिने संधिप्रकाश व दोन महिने अंधकार, असे येथील दिवस रात्रीचे प्रमाण आहे. तेथे दहा महिने एकच ऋतू हिमपातापूर्वी राहात असे तो म्हणजे वसंत ! ते मानवी देवांचे हिमपातापूर्वीचे नंदनवन होते. ते नंदनवन हिमप्रलयानंतर विलीन झाले. तेव्हा आर्य मानवजातीने त्या स्थलाचा परित्याग करू परिभ्रमणास व कायम वसतीस योग्य अशा स्थानाच्या शोधास प्रारंभ केला.या काळासच ऐतरेय ब्राह्मणांत भ्रमणाचा म्हणजे कृतयुग म्हटले आहे, असे टिळक सांगतात. या भ्रमणाच्या काळात आर्य जमातीची फाटफूट होऊन एक शाखा युरोपात, एक शाखा दक्षिण रशिया व एक शाखा इराणात गेली. इराणी आर्य व भारतीय आर्य झरथुष्ट्रापूर्वी एकत्र राहिले होते. झरथुष्ट्राच्या वेळी मतभेद होऊन वैदिक आर्य त्यांच्यापासून फुटून भारतात उतरले, असे टिळकांच्या म्हणण्याचे सार आहे.

ऋग्वेदांतील, यजुर्वेदांतील, अथर्व वेदांतील अनेक निर्देश टिळकांच्या मते असे सूचित करतात की, उत्तर ध्रुवापासून निघून स्थलांतरे करीत भारतात उत्तरेपर्यंत आर्यांचा अनेक सहस्त्र वर्षांचा काळ लोटला होता. तरी आर्यांनी आपला आदियुगाचा वा पूर्वयुगाचा इतिहास स्मरणात, कथा, संज्ञा कालसंकेताची चिन्हे व यज्ञविधी यांच्या रूपाने कायम ठेवला. भारतातील कालमाने व ऋतुमाने आणि उत्तरध्रुव प्रदेशातील कालमाने भिन्न प्रकारची होती. तरी पूर्वीचे अवशेष कथांच्या व संज्ञांच्या रूपाने शिल्लक राहिले. उदाहरणार्थ अदितीचे पुत्र म्हणजे आदित्य मास भारतात बारा ठरले; परंतु उत्तरध्रुव प्रदेशांत अदितीचे पुत्र सात मानले होते. आदितीच्या सात पुत्रांची कथा ऋग्वेदात आली आहे; तिचा अर्थ उत्तर ध्रुव प्रदेशातील कालमानाशीच सुसंगतपणे जुळतो. देवांचा सहा महिन्यांचा दिवस व सहा महिन्यांची रात्र, ही वैदिक कल्पना उत्तर ध्रुवप्रदेशास उत्तम लागू पडते. उषा ही तीस दिवसपर्यंत सतत

क्षितिजावर रेंगाळत राहते, असा यजुर्वेदसंहितेतील निर्देश उत्तर ध्रुवातील दृश्याचाच बोधक आहे. इंद्राचा व वृत्रादी असुरांचा संग्राम कित्येक महिने चालून इंद्र हा वृत्रादी असुरांचा पराभव करतो. व प्रकाश व जल यांची द्वारे, अगोदर आलेल्या दीर्घकालीन प्रतिबंधांचा नाश करून, मोकळी करतो; ही कल्पना उत्तर ध्रुवाकडील दोन महिन्यांची दीर्घ रात्र संपून दिवसाचा प्रकाश दिसू लागतो, अशा या दृश्याचेच रूपक होय; असे मानले म्हणजे पुष्कळच अर्थपूर्णता येते. खाल्डीयन, इराणी, ग्रीक, इजिप्शियन व भारतीय पुराणकथेत जलप्रलयांतून मनुष्यजात वाचल्याची कथा थोड्याफार फरकाने येते; यजुर्वेदाच्या शतपथ ब्राह्मणांत मनु व मत्स्य याची जलप्रलयातून उत्तीर्ण झाल्याची कथा आली आहे; या जलप्रलयासंबंधी कथेचा संबंध उत्तर ध्रुवावरील दहा सहस्र वर्षांपूर्वीच्या हिमपाताशी चांगला जमतो, असे टिळक म्हणतात. टिळकांनी वेद, अवेस्ता व इतर पुराणकथा यांच्यातील शेकडो संदर्भांचे अर्थ ध्रुवप्रदेशाकडील मूळ वसती व तदुत्तर स्थित्यंतरे यांच्याशी कसे जुळतात, हे फार सूक्ष्म व विस्तृत रीतीने मोठ्या अनुमानकुशलतेने प्रतिपादिले आहे.

टिळकांनी 'ओरायन किंवा मृगशीर्षकाल' आणि वेदांग ज्योतिषावरील निबंध लिहून मानवी कालगणनापद्धतीच्या इतिहासात फार महत्त्वाची भर घातली आहे. व्हिट्नेसारख्या गाढ्या पाश्चात्त्य संस्कृत-पंडिताला असे वाटत होते की वेदांगज्योतिषातील अनेक श्लोक म्हणजे अर्थशून्य बडबड आहे; त्या श्लोकांचा अर्थ नीट लागतच नव्हता. टिळकांनी मंडाले येथे कारागृहात असताना वेदांगज्योतिषातील ही विषमस्थले पाठ शुद्ध करून विवरिली; हे शुद्धीकरण व विवरण अत्यंत मोलाचे आहे.

टिळकांनी वैदिक आर्यांचा कालानुक्रमात्मक इतिहास 'ओरायन किंवा मृगशीर्ष' या ग्रंथात व 'आर्यांचे उत्तर ध्रुवाकडील मूलस्थान' या ग्रथात जो सांगितला त्यांचे दोन्ही मिळून तात्पर्य असे आहे; -

उत्तर ध्रुवावर हिमपात व जलप्रलय होण्यापूर्वीचा काळ म्हणजे इ. स. पूर्व १३ वे व १२ वे सहस्त्रक होय. इ. स. पूर्व. १० व्या सहस्त्रकापासून ८ व्या सहस्त्रकापर्यंतचा काल प्रलयस्थलातून बाहेर पडून दूर योग्य स्थलापर्यंत पोहचण्याचा काल होय. इ. स. पूर्व ८ व्या सहस्त्रकापासून ५ व्या सहस्त्रकापर्यंतचा काल म्हणजे अदिती काल होय; या कालात आर्य लोक भटकेपणातच राहिले. राष्ट्रनिर्मितीस योग्य स्थाने शोधण्याचा हा काल होय. यास पुनर्वसुकाल असेही म्हटले आहे; पुनर्वसूत वसंत संपात होत असल्यामुळे त्यास पुनर्वसुकाल म्हटले आहे. त्यासच अदितिकाल म्हणण्याचे कारण त्या नक्षत्राची देवता अदिती होय. इ. स. पूर्व ५ व्या सहस्रकापासून इ. स. पूर्व ३ ऱ्या सहस्त्रकापर्यंतचा काल म्हणजे मृगशीर्ष काल होय. याच कालाचा टिळकांनी प्रामुख्याने ऊहापोह केला आहे. या काली यज्ञसंस्था शिस्तबद्ध होऊ लागली, वैदिक सुक्तांची महत्त्वाची रचना झाली व पंचांगपद्धती अधिक व्यवस्थित झाली. उत्तरध्रुवाची स्मृती या वेळपर्यंत जागृत होती. इतउत्तरकृत्तिकाकाल होय.

इ. स. पूर्व ३ऱ्या सहस्त्रकापासून इ. स. पू. १४ व्या शतकापर्यंतचा हा काल होय. कृत्तिका नक्षत्रात वसंत संपात या काळात होता. म्हणून नक्षत्रचकाची गणना कृतिकपासून करीत. या वेळीं वेदांच्या संहिता तयार झाल्या; ब्राह्मणे निर्माण झाली; या सुमारास उत्तरध्रुवाची स्मृती बुजली वेदांगज्योतिष याच कालाच्या अखेरीस तयार झाले. इ. स. पूर्व चवदाशेपासून इ. स. पूर्व ६ व्या शतकापर्यंतचा म्हणजे बुद्धजन्मापर्यंतचा काल भारतीय संस्कृतीच्या बौद्धिक उत्कर्षाचा समय होय. या कालखंडांत गृह सूत्रे, श्रौतसूत्रे षड्दर्शने व स्मार्त धर्मशास्त्रे उदयास आली.

'ओरायन' या ग्रंथातील कालापेक्षा उत्तरध्रुव प्रदेशातील मूलस्थान या ग्रंथांतील कालाची पूर्व मर्यादा अधिक मागे म्हणजे दोन सहस्त्रकांनी मागे हटली आहे. याचे कारण हिमप्रलयाच्या समयाशी कालक्रम जुळविण्याची जबाबदारी पडली हे होय.

इ. स. पूर्व ३५०० ते ३०००च्या सुमारास ग्रीक आर्य व हिंदू आर्य यांच्यात फाटाफूट झाली; इ. स. ३००० ते २५०० या कालाच्या आत बाहेर इराणी आर्य व हिंदू आर्य यांच्यांत बेबनाव झाला व दूरत्व आले.

वरील आर्यकालक्रमाचा निष्कर्ष ज्योतिषशास्त्रीय प्रमाणे गृहीत धरून काढला आहे. हा निष्कर्ष बऱ्याच पाश्चात्त्य वा भारतीय पंडितांना स्वीकार्य वाटत नाही. टिळकांच्या प्रतिपादनातील विद्वत्ता, संशोधनचातुर्य व कल्पकता मान्य आहे, परंतु निर्णय मान्य नाहीत. याची मुख्यतः दोन कारणे. बुद्धपूर्वकालातील प्राचीन संस्कृतीच्या अवशेषांवरून जो आर्य जातीचा इतिहास ठरवावा लागतो, त्याच्याशी टिळकांची अनुमाने योग्य रीतीने जुळत नाहीत, हे पहिले आर्य कारण सांगितले जाते. दुसरे असे की पाश्चात्त्य संस्कृतपंडितांनी भारतीय वाङ्मयाचा व संस्कृत वाङ्मयाचा वेदकालापासून जो ऐतिहासिक कालक्रम त्या वाङ्मयाच्या अंतर्गत असलेल्या प्रमाणांवरून तारतम्यपूर्वक बसविला आहे त्याच्याशीही टिळकांचे कालनिर्णय जमत नाहीत, असे म्हटले जाते.

भारतीयांच्या प्राचीन इतिहासाशी संलग्न अशी कालविषयक सर्वसंमत निश्चित मर्यादा म्हणजे बुद्ध जन्माचा काल होय, सर्व पंडितांचे यासंबंधी असे मत आहे की वैदिक संहिता, ब्राह्मणग्रंथ, उपनिषदे, श्रोत व गृह्यसूत्रे बुद्धजन्माच्या पूर्वीच निर्माण झाली होती, असे पालीवाङ्मयातील प्रमाणांनी ठरते. मॅक्समुलरने ठरविले की संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासात बुद्धाच्यापूर्वी सुमारे ८शे वर्षांच्या अवधीत म्हणजे इ. स. पूर्व १२ व्या शतकाच्या प्रारंभापर्यंतच्या काळात ऋग्वेद सूक्तापासून तो श्रौतसूत्रापर्यंतचे संस्कृतवाङ्मय उत्पन्न झाले. मॅक्समुलरने साधा अंदाज करूनच ही आठशे वर्षे ठरविली. बुद्धाचे ६ वे शतक होय. त्यापूर्वी २शे वर्षे सूत्रकाल; तत्पूर्वी २शे वर्षे ब्राह्मणग्रंथांचा व यजुर्वेद संहितांचा काल, त्याही पूर्वी २ शे वर्षे मंत्रकाल; आणि मंत्रकालाच्या पूर्वी ऋग्वेदातील सूक्ताच्या रचनेचा प्रारंभ काल दोनशे दोनशे वर्षांच्या एकएका कालखंडाची वाटणी कालांतराने मॅक्समुलरलाच

असमाधानकारक वाटू लागली. म्हणून त्याने नंतर असे जाहीर केले की, इ. स. पूर्व १५ व्या शतकापासून तत्पूर्वी तिसऱ्या सहस्रकाच्या प्रारंभापर्यंतचा समयही वेदकाल म्हणून संबोधिता येईल; पण त्यासंबंधी निश्चयात्मक विधान करणे कठीण आहे. श्रोडर या पंडिताने इ. स पूर्व १५ व्या शतकापासून तत्पूर्वी इ. स पू. २० शटकापर्यंत वेदकाल नेता येईल असे विधान केलें. एवढ्याने वेबर या जर्मन पंडिताचे समाधान होईना. वेबरने असें अनुमान काढले कीं, भौगोलिक व ऐतिहासिक पुराव्यावरून भारतीय वाङ्मयाचा प्रारंभ, पारशी व भारतीय आर्य एकत्र रहात होते त्या काळापर्यंत पोचविला पाहिजे. डॉ. हौने हा काळ इ. स. पूर्व २४०० वर्षे मानला. झरथुष्ट्र हा पारशी धर्माचा संस्थापक ट्रोजन युद्धाच्या म्हणजे इ. स. पूर्व १८ शेच्या पूर्वी ६ शे वर्षे होऊन गेला, असे इ. स. पूर्व ५ व्या शतकातील लिडियातील ग्रंथकार झॅथस सांगतो. हे खरे असल्यास इ. स. पूर्व २५ शे, हा काल पारशी व हिंदू यांच्या फाटाफुटीचा मानावा लागतो. वेदांतील ज्योतिषविषयक प्रमाणांचा परामर्श घेऊन कालनिर्णयाचा प्रयत्न ए. लड्विग या जर्मन वेदार्थज्ञाने प्रथम केला. नंतर बॉन येथील एच. याकोबी (Jacobi) या पंडिताने वेदांतील ज्योतिषविषयक प्रमाणांचा अर्थ करून वेदकाल इ. पूर्व ४ थे सहस्त्रक हा ठरविला. या समयी टिळकही याकोबीच्या दिशेने परंतु स्वतंत्रपणे प्रयत्न करीत होते. त्यांनीही याकोबीप्रमाणेच अनुमाने रचून इ. स. पूर्व ४-६ सहस्रके हा समय ठरविला. याकोबीनेही मृगशीर्ष व कृतिका यांतील वसंतसंपाताची चर्चा केली. टिळकांपेक्षा एक महत्त्वाचे प्रमाण याकोबीला मिळाले ते गृह्यसूत्रात. गृह्यसूत्रातील विवाहविधीतील ध्रुवदर्शनाचा कार्यक्रम ज्योतिषशास्त्रदृष्ट्या सूचक आहे. पतीने विवाहदिनी रात्री नववधूस अंगुलीनिर्देशपूर्वक ध्रुवतारकेचे दर्शन करवावयाचे असते. गृह्यसूत्रकालीन ध्रुवकेंद्रावरील विशिष्ट तारका (Alpha Praconis) इ. स. पूर्व तिसऱ्या सहस्रकातच संभवते.

याकोबी व टिळक यांच्या वेदकालविषयक अनुमानांची भाषाविकास वाङ्मयेतिहास व प्राचीन मानवजातीच्या इतिहासाची अन्य प्रमाणे यांच्याशी अजून संगती जुळत नाहीं. हे जरी मान्य केले तरी एक आकर्षक इतिहासिक विचार म्हणून त्यांची किमत मानावीच लागते. जर्मन संस्कृत पंडित विंटरनीझ याने टिळकांच्या व याकोबीच्या या विवेचनाचा योग्य परामर्श आपल्या भारतीय वाङ्मयेतिहास या ग्रंथात घेतला आहे. परंतु शोचनीय गोष्ट अशी की मुंबईस भारतीय विद्याभवन संस्थेतर्फे प्रसिद्ध झालेल्या वैदिक युगाच्या इतिहासखंडात भारतीय पंडितांनी टिळकांच्या मताला फारच उपेक्षणीय स्थान दिले आहे. वेदकालासंबंधाचे विचार हे टिळकांनी मोठ्या सावधानपणे वाङ्मयेतिहास संस्कृतिविकासाचा क्रम इत्यादी गोष्टींशी शक्य तितका कालमर्यादेचा दृष्टीने विसंगत होणार नाही अशा रीतीने मांडला आहे. इ. स. पूर्व १८ व्या सहस्रकापासून २५ व्या सहस्रकापर्यंत वैदिक आर्यांचा काल मानणारे अविनाशचंद्र दास. डी. एन. मुखोपाध्याय यांच्यासारखे पंडित लेखक आहेत. त्यांची अनुमाने संभवनीय अनुमानाच्या कोटीत टिळकांनी निर्दिष्ट केलेली आढळतात; परंतु टिळकांनी त्यांना मान्यता

दिली नाही; याचे कारण इतर प्रश्नांची सुसंगती ठेवण्याची आवश्यकता भासली हेच होय.

वेदाप्रमाणे वेदांताचे टिळकांचे अध्ययन गंभीर, सूक्ष्म व तत्त्वग्राही होते. भारताला त्यांनी गीतारहस्याच्या रूपाने फार मोठा ठेवा दिला आहे; ते त्यांच्या वेदांतमननाचे अमृतफल होय. या नव्या युगातील नव्या जीवनातील अपूर्णता कशी भरून काढावी व जीवनास साफल्य सर्वांगानी कसे आणावे, यासबंधी मार्गदर्शन गीतारहस्याच्या द्वारे टिळकांनी केलें आहे. मानवांच्या ऐहिक जीवनातील यशाला वेदान्ताच्या अभिषेकाने पावन करा, असाच गीतारहस्याचा थोर आदेश आहे.

(प्रतिष्ठान, ऑगस्ट, १९५६, **(लोकमान्य टिळक विशेषांक) पृ. २५ ते २८ व ३७)**

❍❍❍

३०

समतोल, समंजस राज्यकर्ता : यशवंतराव चव्हाण

श्री. यशवंतराव चव्हाण हे नव्या द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले तेव्हा अनेकांच्या मुखांतून उद्गार निघाले की, वयाच्या मानाने फार लवकर या अशा मानाच्या अधिकाराच्या मोठ्या पदवीस यशवंतराव पोचले; अवघ्या त्रेचाळिसाव्या वर्षी एवढ्या अधिकारावर आरूढ झालेला या देशात दुसरा कोणी विद्यमान नाही. परंतु जरा विचार केला तर या गोष्टीचा नीट उलगडा होऊ शकतो. केवळ जन्मापासूनच्या वयाचा विचार न करता त्यांच्या राजकीय वयाचा, म्हणजे प्रत्यक्ष राजकारणात त्यांनी किती वर्षे जबाबदारी घेऊन कामे केली याचा विचार केला तर ही गोष्ट क्रमप्राप्तच होती, असेही एक प्रकारे म्हणता येते.

वयाच्या सोळाव्या वर्षीच ते भारताच्या स्वातंत्र्यसमरात सामील झाले. गेली सव्वीस वर्षे ते राजकारण करीत आहेत. भारताच्या आधुनिक राजकीय इतिहासातील अत्यंत महत्त्वाची अशी स्वातंत्र्यपूर्वकालातील दोन पर्वे व स्वातंत्र्योत्तरकालातील दोन पर्वे त्यांच्या राजकीय जीवनाशी संलग्न आहेत. इतिहास हा काळाची लांबी घड्याळाच्या लंबकाच्या आंदोलनाने किंवा पंचांगाने केवळ मोजत नसतो; त्यात महत्त्वाच्या वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या घटनांच्या योगानेच काळाचे दीर्घत्व वा ऱ्हस्वत्व इतिहास ठरवीत असतो. फार विलक्षण अशा घटनांनी १९३० सालापासूनचा काळ भरलेला आहे. या २६ वर्षांच्या अवधीत यशवंतरावांनी सर्वस्वी राजकारणात भाग घेतला. हा काल त्या पूर्वीच्या ७० वर्षांच्या काळापेक्षा अधिक प्रगमनशील व वैचित्र्ययुक्त असा घडला आहे. या काळात त्यांनी राजकीय जीवनाचा अनुभव घेतला त्यांना तो अनुभव फार संपन्न आहे, याची खात्री होईल. मात्र अशा संपन्न अनुभवापासून शिक्षण घेण्याची योग्यता पाहिजे; अशी पात्रता व योग्यता यशवंतरावांच्या ठिकाणी आहे. वस्तुतः वरील कालखंडांतील राजकारणात प्रत्यक्ष भाग घेतलेले पुष्कळ आहेत; परंतु त्यापासून शहाणपणा शिकलेले फार थोडे आहेत. त्या थोड्यांपैकी यशवंतराव एक महत्त्वाचे गृहस्थ आहेत.

उपकारक सामाजिक पार्श्वभूमी

बहुजन समाजातील गरीब शेतकरी कुटुंबात जन्म, अत्यंत प्रयासाने हालअपेष्टा सोसूनही नवशिक्षण घेण्याची तळमळ, भोवताली चाललेल्या राष्ट्रीय व जागतिक घडामोडी जाणण्याची तीव्र जिज्ञासा, आधुनिक ध्येयवादाचे आकर्षण, राजकीय संगरात सामील होण्याची नित्य तयारी इत्यादी गोष्टींमुळेच यशवंतरावांच्या व्यक्तित्वाची वैशिष्ट्यपूर्ण घडण झाली आहे. बहुजनसमाजात जन्मून नवशिक्षण घेतलेल्या आणि राजकीय जीवनाचा दीर्घ अनुभव असलेल्या हातावर मोजण्याइतक्याच व्यक्ती मराठी भाषिक प्रदेशात आढळतात. त्यांच्यांत अगदी वरच्या क्रमांकात यशवंतरावांची गणना करावी लागते. यशवंतरावांची सामाजिक पार्श्वभूमी त्यांच्या उत्कर्षास कारणीभूत झालेल्या गोष्टींपैकी एक अंश आहे. पांढरपेशांत वा ब्राह्मणांत जन्मलेल्या राजकीय व्यक्तींपेक्षा यशवंतरावांची ही सामाजिक पार्श्वभूमी त्यांना अत्यंत अनुकूल अशीच लाभलेली आहे. परंतु तेवढ्यामुळेच त्यांचे महत्त्व स्थापित झालेले नाही. त्यांचे राजकीय कार्यक्षेत्र व त्यात काम करताना त्यांनी वैचारिक दृष्ट्या मिळविलेली पात्रता याही गोष्टी सामाजिक पार्श्वभूमीबरोबरच जमेस धराव्या लागतात.

चव्हाणांचे राजकीय कार्यक्षेत्र पुण्यापासून कोल्हापूरपर्यंतचा प्रदेश व विशेषतः सातारा जिल्हा होय. हे महाराष्ट्रातील वर्तमान युगातील फार मोठ्या सामाजिक अंतर्विग्रहाचे केंद्रस्थान होय. १९१० ते १९५० पर्यंतच्या कालखंडात याच प्रदेशात सत्यशोधक समाजाची किंवा ब्राह्मणेतर वादाची चळवळ नावारूपास येऊन फोफावली. मात्र या चळवळीत स्वतः यशवंतराव प्रत्यक्षपणे कधीच शिरले नाहीत किंवा त्या चळवळीतील विकृत जातिद्वेषाचाही संस्कार त्यांनी आपल्या मनावर होऊ दिला नाही. त्या चळवळीपासून वा तिच्यातील दोषांपासून ते अलिप्त राहिले. परंतु त्या चळवळीत निर्माण झालेल्या सामाजिक जाणिवेचा व बहुजनसमाजाच्या सामाजिक अवनतिविषयक प्रश्नाचा त्यांच्याही मनावर परिणाम झाला. ते त्या चळवळीत सामील झाले नाहीत, हा काही केवळ योगायोग नव्हे. त्या चळवळीवर मात करणारी अशी भारतव्यापी राजकीय चळवळ तीस साली महात्मा गांधींनी निर्माण केली. त्या चळवळीत यशवंतराव लहान वयात, माध्यमिक शिक्षण पुरे होण्याच्या आत ओढले गेले. सत्यशोधक चळवळीचा त्यांना अप्रत्यक्ष उपयोग झाला. तो म्हणजे ध्येयवाद व तत्संबंधी विचारसरणी कशा प्रकारची असावी या गोष्टी समजण्याकरिता. क्रांतिकारक विचारसरणी आणि समाजवादी ध्येयवाद त्यांनी त्यामुळे अंगीकारला. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे मार्क्सवादावर आधारलेल्या एम. एन. राय यांच्या मानवतावादी विचारसरणीचा आदरपूर्वक अभ्यास त्यांनी केला. या अभ्यासामुळे स्वतंत्रपणे सामाजिक व राजकीय प्रश्नांची मीमांसा करण्याची पात्रता त्यांना प्राप्त झाली. दुधात साखर पडावी त्याप्रमाणे त्यांना बहुजनसमाजातील जन्मामुळे त्यांच्या जीवनाशी एकरूपता लाभली व नवशिक्षणामुळे जीवनाचा अर्थ समजण्याची योग्यता आली.

रॉयवादाकडून नेहरूवादाकडे

खेड्यापासून शहरापर्यंत राजकीय संघटना कशी करावी याचा उत्कृष्ट अनुभवही त्यांना दीर्घकाळपर्यंत मिळाला आहे. सातारा जिल्ह्यातील काँग्रेस संघटनेत १९३० ते ३८ पर्यंत आत्मारामबापू पाटील हे बहुजन समाजाचे प्रतिनिधी म्हणून नेतृत्व करीत होते. त्यांचे सहकारी म्हणून यशवंतराव त्या संघटनेत प्रथम भाग घेऊ लागले. १९३७ सालची आत्मारामबापू पाटलांची गाजलेली निवडणूक मोठ्या यशानिशी जिंकण्यात यशवंतरावांचे चातुर्य उपयोगी पडले. समयोचित वक्तृत्व, संघटना कौशल्य व राजकीय धोरणीपणा हे त्यांचे गुण याच सुमारास व्यक्त होऊ लागले. त्या वेळी आत्मारामबापूंचा यशवंतरावांवर फार लोभ होता; यशवंतराव चांगले सुशिक्षित बनून आपल्या बौद्धिक प्रभावाने समाजाचे नेतृत्व करतील अशा भविष्यवाणीही त्या समयी आत्मारामबापू माझ्यापाशी बोलल्याचे मला आठवते.

एम. एन. रॉय यांच्या रॅडिकल काँग्रेसजनांत यशवंतराव काही काळ दाखल झाले होते. परंतु १९४० साली रॉय यांचा महायुद्धविषयक धोरणासंबंधी काँग्रेसशी मतभेद झाला, म्हणून रॅडिकल काँग्रेसजन काँग्रेसमधून बाहेर पडले. यशवंतराव मात्र काँग्रेसमध्येच राहिले. याचें निदान यशवंतरावांचा व्यावहारिक व वस्तुवादी दृष्टिकोन होय, असे काही जण सांगतात. माझ्या मते त्यांच्या लहानपणापासूनच्या मानसिक संस्कारांत काँग्रेसचे मूळ फार खोल गेले; राष्ट्रवादी भावनेच्या बलामुळे ते काँग्रेस सोडू शकले नाहीत. त्यांची पुरोगामी विचारसरणी व क्रांतिकारक ध्येयवाद यांस पूरक असे पं. नेहरूंचे आलंबन त्यांना काँग्रेसमध्येच गवसले. राष्ट्रीयत्व, लोकशाही आणि समाजवाद यांचा समन्वय त्यांना पं. नेहरूंत सापडला. त्यामुळे ते एका अर्थी नेहरूवादी बनले. रॉयमध्ये त्यांची विचारसरणी उगम पावली व नेहरूंमध्ये ती परिणत झाली, असा क्रम लावला तर यशवंतरावांच्या राजकीय वर्तनाचा उलगडा होऊ शकतो. माझ्यासारखे लोक, ध्येयवादाला व्यावहारिकपणाची जोड व तडजोडीची वृत्ती असाही याचा अर्थ करू शकतील.

'चलेजाव' चळवळीत आणि नंतर

१९४२ च्या 'चलेजाव' चळवळीत सातारा जिल्ह्यातील भूमिगत कार्यकर्त्यांचे मुख्य मार्गदर्शकत्व यशवंतरावांकडे होते; ही गोष्ट, त्या चळवळीशी माझा संपूर्ण मतभेद होता तरी, मला कळत होती. कारण प्रत्येक खेडे हे स्वयंशासित लोकशाहीचे केंद्र बनले पाहिजे, या कल्पनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न त्यात होत होता. ह्या कल्पनेची व्यवस्थित तात्त्विक बैठक जाणणारे यशवंतरावांशिवाय दुसरे कोण असू शकणार, हे आमच्या लक्षात सहज आले होते. तेव्हा यशवंतरावांना अत्यंत निधड्या छातीचे न निर्धाराचे सहकारी पुष्कळ मिळाले. त्यांत माझे फार जुने राजकीय सहकारी किसन महादेव वीर अग्रगण्य होते. किसन वीर हे अत्यंत श्रद्धाशील, निष्ठावंत व जिवास जीव देणारे मित्र लाभल्यामुळे तेव्हापासून

आतापर्यंत यशवंतराव मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीही नेटाने धीर धरू शकले. किसन वीरांच्या अभावी सातारा जिल्ह्यातील काँग्रेस संघटनेचे काय झाले असते हे सांगणेही फार कठीण आहे. यशवंतराव हे भावनाविवश क्वचितच होतात. वस्तुवाद व व्यवहार यांची राजकीय ध्येयाशी सांगड घालण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यामुळे 'चलेजाव'ची चळवळ खाली जाऊ लागणार, ही गोष्ट ४३ सालीच त्यांच्या लक्षात आली; लगेच त्यांनी आपला भूमिगत राहण्याचा मनसुबा सोडला व कारागृहवास पत्करला.

१९४५ नंतर यशवंतराव महाराष्ट्रातील काँग्रेसनेत्यांच्या प्रभावळीत दिसावयास लागले. थोड्याच अवधीत काँग्रेसच्या हाती ब्रिटिशांनी भारताची सत्ता सोपविली. १९४७ सालापासून गेली दहा वर्षे काँग्रेस शासनयंत्रारूढ झाली असता यशवंतरावांनी शासन-तंत्राचा अनुभव घेतला. सत्तेचे राजकारण कसे चालते व ते कसे चालवावे याचे प्रात्यक्षिक, कसलेल्या प्रशासक मित्रांच्या सान्निध्यांत, त्यांनी जवळून पाहिले व त्यांत भागही घेतला. हा दहा वर्षांचा कालखंड अनेक आणीबाणीच्या प्रसंगांनी व नाजूक प्रश्नांच्या गुंतागुंतींनी भरलेला असताना त्यांना पाहावयास मिळाला व त्यात प्रत्यक्ष हालचालीही करण्यास त्यांना मिळाल्या. गेली पाच वर्षे तर ते मुंबईच्या मंत्रिमंडळात प्रत्यक्ष राज्यकारभार करीत होते.

मुंबई राज्याच्या मंत्रिमंडळात गेल्या पाच वर्षांत गुजराती व महाराष्ट्रीय अशी फळी पाडण्याचा प्रसंग यशवंतराव नसते तर टळला नसता. एकमुखी मजबूत सहकार्य व जुळवून घेण्याची प्रवृत्ती या गोष्टींवर मंत्रिमंडळाची बैठक स्थिरावते. ही मुंबई राज्याची बैठक बिघडण्याची कारणे मंत्रिमंडळाच्या बनावाच्या पहिल्या क्षणीच पाच वर्षांपूर्वी उत्पन्न झाली. घटनात्मक पेचप्रसंगही त्यांतून उद्भवला असता. तो यशवंतरावांनी दूरदर्शित्वाच्या योगाने हिमतीने टाळला. नंतर खाजगी रीतीने त्यांच्या विरुद्ध विषारी प्रचार सुरू झाला. त्यांनी निमूटपणे धैर्याने त्याला कां कू न करता तोंड दिले.

प्रादेशिक राज्यरचनेला काँग्रेसच जबाबदार

प्रांतवाद व जातिवाद ही भारतीय राजकारणाची मुख्य अंतस्थ भयस्थाने होत. ही भयस्थाने धोका देणार नाहीत याविषयी ज्याचे मन कायम सावध राहील तोच भारतीय राजकारणाची धुरा निर्विघ्नपणे वाहू शकतो. जातिवादाला व प्रांतवादाला जी व्यक्ती, गट व पक्ष वश होतो, त्याला भारतीय राजकारणात विधायक रूपाचे सत्तेचे राजकारण यशस्वीपणे चालविण्यात कधीही यश लाभणे शक्य नाही. कारण राजकारणाची सामाजिक पार्श्वभूमी मजबूत व स्थिर राखणे ही राजकीय नेतृत्वाची एक मुख्य जबाबदारी राज्यशास्त्रद्वारा निश्चित झालेली आहे. ही जबाबदारी ओळखणारा राजकारणी माणूस महाराष्ट्रात यशवंतरावांच्या रूपाने कित्येक वर्षांनी पुढे आला आहे.

प्रादेशिक राज्यरचनेचा अहवाल बाहेर आल्यानंतर महाराष्ट्रात जी खळबळ उडाली त्याला प्रथम जबाबदार काँग्रेसचे नेतृत्वच होय, ही गोष्ट स्पष्ट आहे. भाषावार प्रदेशरचनेच्या

प्रश्नाला महत्त्व त्यांनीच प्रथम आणले, व तेच त्यांच्यावर उलटले. भाषावार प्रदेशरचना ही अनेक भाषिक भारतीय राष्ट्रीयत्वाच्या विकासास पूरक नाही, हे राजकीय तत्त्व केव्हाही त्यांच्या फारसे लक्षात आले नाही. त्याचप्रमाणे प्रादेशिक भाषांची वाढ करण्यास भाषावार राज्यरचनेची आवश्यकता नाही, हीही गोष्ट त्यांच्या लक्षात कधी आली नाही; त्यांचे वैचारिक दौर्बल्यच प्रादेशिक राज्यरचनेच्या अहवालाने उघडकीस आले. मध्यवर्ती सिद्धांत म्हणजे अनेकभाषिक राष्ट्रीयत्व होय, ही गोष्ट स्वीकारल्यावर भाषिक राज्यांची रचना गौण ठरविणेच प्राप्त होते. हे व्यावहारिक राजकारणाचे दर्शन काँग्रेसनेत्यांना लवकर झाले नाही. या प्रमादापासून अर्थातच महाराष्ट्रीय नेतेही दूर राहू शकले नाहीत. काँग्रेसची निष्ठा विरुद्ध प्रांतरचना, असा पेचाचा प्रश्न उत्पन्न झाल्यास मी काँग्रेसच्या व राष्ट्रीय ऐक्याच्या बाजूचाच राहीन, ही गोष्ट यशवंतरावांनी फार अगोदर जाहीर करून टाकली. महाराष्ट्र काँग्रेसमधील अनेक महत्त्वाच्या नेत्यांनी काँग्रेस की इष्ट प्रकारची प्रांतरचना असा पेच उभा राहिल्यास काय ठरवावयाचे हे स्वतःच्या मनास कधीही विचारले नाही. भाषिक प्रश्नाला किती महत्त्व द्यावयाचे हेही ठरविले नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात अग्रभागी असलेल्या अनेक व्यक्तींची फार कुतरओढ झाली. यशवंतराव या प्रसंगी अगदी धिमेपणाने बेताबाताने पावले टाकीत चालले. त्या बाबतीत त्यांच्या पाठीशी सल्ला व धीर देणारे मित्रही उभे राहिले. पक्षसंघटनेच्या मर्यादांचा भंग होणार नाही असे ते वागले. या एका महत्त्वाच्या गोष्टीमुळेच ते अखेरीस मुख्यमंत्रिपदाप्रत पोचू शकले. मध्यंतरी प्रादेशिक राज्यरचनेच्या भानगडी उभ्या राहिल्या नसत्या तर यशवंतराव कोठे असते? याचे उत्तर सोपे आहे. ते मुंबई मंत्रिमंडळात महत्त्वाचे राजकीय धोरण संभाळून राहिले होते. दमादमाने, पाचदहा वर्षांच्या काळात केव्हा तरी, त्यांच्या वाट्यास हे मुख्यमंत्रिपद येणे प्राप्तच होते. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसमध्ये त्यांचे वजन वाढत होते. दुसऱ्या क्रमांकावर ते उभे होते. पहिल्या क्रमांकावर येण्यास थोडा वेळ लागला असता, इतकेच म्हणता येते.

संथ आणि सावध उदारमतवादी

त्यांच्या राजकीय जीवनाचे धागेदोरे समजण्यास त्यांच्या मनाची व खाजगी जीवनक्रमाची माहिती घेणे जरूर आहे. ज्याचे मन पूर्वग्रहदूषित नाही त्याला यशवंतरावांचे मन व खाजगी चरित्र सहज उलगडेल असेच आहे. ते खोल मनाचे गृहस्थ आहेत, असे म्हटले जाते. खोल म्हणण्यापेक्षा संथपणे विचार करणारे व सावधपणे जपून पावले टाकणारे गृहस्थ आहेत, हे म्हणणे अधिक जुळेल. त्यांचा स्वभाव पाताळयंत्री आहे, असाही एक आरोप केला जातो; त्यातही काही तथ्य नाही. अत्यंत मोठ्या व सत्तारूढ पक्षाचे एक प्रमुख कार्यकर्ते आपण आहोत, याची जाणीवच त्यांना गंभीर बनविते. त्यामुळेच सर्व गोष्टी जपून व ताळतंत्र ओळखून बोलाव्या वा कराव्या, असे त्यांना वाटत असते. मंत्रिमंडळाचे एक सदस्य या नात्याने कमी बोलणे हेच पथ्याचे आहे, असे त्यांना वाटत असते. पाताळयंत्रीपणाला

लागणाऱ्या स्वभावाची घढण फार निराळी असते. ती घडण जात्याच प्राप्त व्हावी लागते. मित्रमंडळींच्या त्यांच्या वर्तनासंबंधी अनेक अपेक्षा लवकर सफल होत नाहीत किंवा यशवंतरावांच्या अडचणीही मित्रांच्या लक्षात भरत नाहीत, म्हणून ते खोल मनाचे आहेत असा भास होतो.

यशवंतराव संवेदनशील व भावुक वृत्तीचे गृहस्थ आहेत. केवळ वस्तुवादी व व्यवहारी बुद्धीच्या बळावरच ते भावनांवर नियंत्रण ठेवू शकतात. व्यावहारिक वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाला ते फार महत्त्व देतात. त्यामुळेच ते भावनांचा तोलही संभाळू शकतात. उदाहरणार्थ, निवडणूक प्रचारात शेतकरी मतदारांपुढे मताची याचना करताना ते मोठ्या खुबीने मतदारांच्या मनांत प्रवेश करताना असे म्हणतात:

"आमचा शेतकरी अशिक्षित असला तरी त्याचे व्यवहारज्ञान पक्के असते. तो शेतांतील विहिरीच्या काठाजवळील झाडाच्या शांत सावलीखाली दुपारी अवजारे ठेवून जेव्हा अंग टाकतो, तेव्हा तो शांतपणे व्यवहाराचा हिशेब करीत असतो व बिनचूक निर्णयाप्रत येऊन पोचतो. राज्य कोणता पक्ष खरोखर करू शकेल, ही गोष्ट त्याला कळण्यात ग्रंथांची पारायणे करण्याची गरज लागत नाही." यशवंतरावांनी स्वतःचेच चित्र शेतकऱ्यांत कल्पिले आहे, असा माझ्यासारख्याचा ग्रह त्यांचे हे भाषण ऐकताना होतो.

त्यांच्या ठिकाणी जशी समतोल व्यावहारिक बुद्धी आहे, त्याचप्रमाणे उदारमतवाद व अलिप्त वृत्ती अंगी बाणावी अशीही इच्छा आहे. विफलतेला तोंड देण्यास अशी वृत्ती व उदारमतवाद उपयोगी पडतो. म्हणून मतदारांची मनधरणी करता करता ते हमेशा असेही बोलून जातात की, "तुम्ही पाहिजे तर मला मते देऊ नकाः पटल्यास मला मते द्या. 'जो दे उसका भला, न दे उसका भी मला!''' उदारमतवाद अंगी बाणावा अशी त्यांची इच्छा आहे. याचे महत्त्वाचे गमक म्हणजे गेल्या वर्षात त्यांच्यावर जे वृत्तपत्रांनी, लेखकांनी चळवळ्यांनी अनेक प्रकारे वाक्प्रहार केले, पराकाष्ठेची निर्भर्त्सना केली, अपमानकारक निदर्शने केली, ती सर्व त्यांनी निमूटपणे सहन केली. गालिप्रदान करणारा, त्याच गोष्टीमुळे अमंगळ ठरतो, ही गोष्ट ते जाणून आहेत, म्हणूनही संयम राखण्याचा ते प्रयत्न करतात.

मनोदौर्बल्याचा आरोप

आज ते मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बनले. ह्यासंबंधी त्यांनी मनाशी तसा संकल्प करून ठेवला होता, असे म्हणता येत नाही. योगायोगाने अशा गोष्टी घडतात; संकल्प करूनही उपयोग होतोच असे नाही, असे ते म्हणतात. ते मुख्यमंत्रिपदावर येण्यापूर्वी चार-पाच महिने त्यांचे मित्र त्यांना मुख्य मंत्रिपदाच्या रोखाने पावले टाकण्यासंबंधी वारंवार सूचना देत होते. त्यांच्या अनेक मित्रांनी त्या दृष्टीने महत्त्वाच्या हालचालीही केल्या. त्यांच्या दोन-तीन मित्रांनी त्यांना बजावले की, तुम्ही दुसऱ्या एका महाराष्ट्रीय पुढाऱ्याचा आमचा मुख्य नेता म्हणून वेळी-अवेळी निर्देश करता ही गोष्ट आम्हांस नापसंत आहे; तुम्ही स्वतःच हिंमत

धरून पुढे सरा! परिस्थितीची अनुकूलता वाढत असलेली मित्रमंडळींच्या नजरेस येत होती. तरी यशवंतरावांनी अखेरच्या क्षणापूर्वीपर्यंत त्या महाराष्ट्रीय नेत्याचीच मुख्य नेता म्हणून प्रशंसा केली. याचे कारण अवास्तव औत्सुक्यास ते बळी पडू इच्छीत नाहीत, हे होय. चालू क्रमात विक्षेप उत्पन्न होऊन नसत्या नव्या अडचणी आपल्या वाटेत उभ्या राहू नयेत याची वाजवीपेक्षा जास्त दक्षता बाळगण्याकडेच त्यांचा कल असतो.

परिस्थितीत जपून पावले टाकणे, हा त्यांचा स्वभावधर्म त्यामुळे आहे. त्यांच्यावर काही मित्र मनोदौर्बल्याचाही आरोप करतात. ताळमेळ पाहून वागणे, प्राप्त परिस्थितीत फारशी गडबड उडणार नाही अशी दक्षता बाळगणे व सहकाऱ्यांशी शक्य तितके जुळवून घेण्याचा प्रयत्न राखणे या गोष्टींमुळे कदाचित महत्त्वाच्या राजकीय कार्यक्रमांचा उलगडा व अंमलबजावणी करणे आणि कार्यक्षमतेचा वेग व कौशल्य साधून महाकायत साफल्य मिळविणे या गोष्टीत अडचणी उत्पन्न होऊन दौर्बल्य सिद्ध होण्याचीही शक्यता आहे. सहकारी मित्र व मंत्री अदूरदर्शित्वामुळे व संकुचित वृत्तीमुळे संकटांतही नेऊन सोडणार नाहीत असे नाही. परंतु या बाबतीत आताच निश्चित विधान करणे फार कठीण आहे. दीर्घकालीन मंत्रिमंडळ बनविल्यानंतरच या बाबतीत त्यांची परीक्षा होऊ शकेल.

यशवंतरावांच्या भाग्यात मित्रलाभ हा मोठा आहे. जिवाला जीव देणारे, निःस्वार्थी मित्र त्यांना मिळाले आहेत. सर्व जातींत व सर्व धर्मांत त्यांचे मित्र आहेत. सुशिक्षित व अशिक्षित, पत्रपंडित, लेखक, कवी, प्राध्यापक, व्यापारी, शेतकरी इत्यादी अनेक व्यवसायांतले मित्र त्यांना आहेत. त्या मित्रांना न सांभाळताच ते मित्र सांभाळले जात आहेत. ह्यामुळे यशवंतरावांना एक प्रकारचा आत्मविश्वास प्राप्त झाला आहे.

कौटुंबिक जिव्हाळा

त्यांचे खाजगी जीवन गरिबीचे, साधे व प्रेमळ, असेच अद्यापपर्यंत आहे. प्रथमायुष्यांतील खडतर जीवनक्रमाने त्यांना सोशिक व संयमी बनविले आहे. पुष्कळ वेळा मनुष्य गरिबीने कठोरही बनतो. ते तसे झाले नाहीत. कौटुंबिक भावनेचा जिव्हाळा त्यांच्या ठिकाणी ओतप्रोत भरलेला आढळतो. वृद्ध मातेवरील त्यांची भक्ती मित्रांशी खाजगी रीतीने बोलतांना प्रसंगाने व्यक्त झाल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या स्वर्गवासी वडील बंधूंच्या अपत्याचे संगोपन, शिक्षण व लग्नकार्ये त्यांनी परम वात्सल्याने साजरी केली आहेत. कुटुंबसंस्थेचे पावित्र्य हा एक श्रेष्ठ सांस्कृतिक ठेवा होय, असे समजून त्यांचे वर्तन असते. अशक्त नेहमी व नेहमी मधूनमधून आजारी पडणाऱ्या पत्नीची काळजी वाहताना त्यांच्या चारित्र्याच्या पावित्र्याची खूण मनास पटल्याशिवाय राहत नाही. त्यांना स्वतःच्या गरीब स्थितीची पूर्ण जाणीव आहे. त्याबद्दल इतर सामान्य चार माणसांप्रमाणेच कसलीही खंत करीत नाहीत. उदाहरणार्थ, एक गोष्ट नुकतीच घडलेली मला आठवते, ती येथे उद्धृत करतो. मुंबईस सहा महिन्यांपूर्वी जे ए. आय. सी. सी. चे अधिवेशन भरले, त्याच्यानंतर लगेच यशवंतराव काश्मीरच्या छोट्या

दौऱ्यावर गेले. तेथून ते परतल्यावर त्यांची माझी गाठ पडली. त्यांना मी सहज उत्सुकतेने विचारले, "काश्मीरला काय काय खरेदी केली?" त्यांनी उत्तर दिले, "काही विशेष सांगण्यासारखी नाही. केवळ अपवादच सांगायचा तर एक रेशमी पातळ पत्नीला आणले. अक्रोड वृक्षाच्या लाकडाचे नक्शीकाम आणले नाही. कारण ते आणल्यावर ठेवायचे कोठे? आपले कराडचे घर कसे आहे, ते माहीत आहेच. त्या नकशीकामाचा तेथे अपमानच व्हायचा; भारी पश्मिना शाल खांद्यावर टाकून चालण्याइतकी आपली ऐपत नाही. फक्त एवढे खरे की, तेथील निसर्गाचे सौंदर्य व पावित्र्य मनात साठवून आणले आहे!"

त्यांच्या कराड येथील घरी मी अनेकदा गेलो आहे. अगदी साधे व स्वच्छ. ओसरीवर एक सतरंजी अंथरून ठेवलेली व तिच्यावर एक दोन तक्क्ये भिंतीस टेकून ठेवलेले. त्या तक्क्यांकडे पाहून गेलेल्यांनी आपला मान करून घ्यावा, व बैठक मारावी. 'या, बसा' हे यजमानाचे गोड शब्द पुरेसे वाटतात. चार महिन्यांपूर्वी उत्तर सातारा जिल्ह्यात एक प्रचारसप्ताह किसन महादेव वीर यांनी आखला होता. कराडलाही एक निमंत्रितांची सभा त्या सप्ताहाच्या कार्यक्रमाचा भाग म्हणून ठरविली होती. तेव्हा आम्ही बरेच लोक त्यात फलटणचे राजेसाहेबही होतेच, चव्हाणांच्या घरी दुपारी भोजनाकरिता गेलो. भोजनाचा बेत अगदी साधा. दोनच पदार्थ: एक मसालेदार कालवण आणि दुसरा म्हणजे चपात्या. चव्हाण माझ्या घरी जेव्हा जेव्हा आले तेव्हा तेव्हा मी ब्राह्मणी पद्धतीची मेजवानी दिली. परंतु त्यांत त्यांचे विशेषसे लक्ष दिसले नाही. त्यांना मिष्टान्नाची महती नाही. सरकारी बंगल्यातील भोजनांतही कितीही विविध पदार्थ केलेले असले तरी त्यातील थोडे पदार्थ चव्हाण घेतात.

काही अवास्तव आरोप

यशवंतरावांबद्दल अनेक गैरसमज बरीच वर्षे विनाकारण पसरविले जात आहेत. सातारा जिल्हा हा चव्हाणांच्या जन्मापूर्वीपासून गुन्हेगारीसंबंधी, खून, मारामारी, जाळपोळ, दरोडे इत्यादी बाबतींत प्रसिद्ध आहे. गांधींच्या खुनानंतर झालेल्या जाळपोळीच्या प्रकाराचा संबंध सातारा जिल्ह्यातील खुनानंतर काही काँग्रेसच्या कार्यकर्त्यांशी जोडला जातो व त्या गोष्टीशी खाजगी अप्रत्यक्ष रीतीने चव्हाणांचाही संबंध सूचित दिसतो. परंतु त्यासंबंधी पूर्वग्रहदोष सोडून शोध करण्याची काळजी कोणीच घेत नाही. अलीकडील एका गुन्ह्याचाही बादरायण संबंध ध्वनित केला जातो. त्यासंबंधी निःपक्षपाती संशोधन करून असाच निर्णय निघतो की, आरोप करणाऱ्यांना कोणातरी विशेष व्यक्तीच्या माथी दोष मारून त्यात गोवण्यात समाधान वाटते, एवढीच त्या आरोपांच्या मुळाशी असलेली मनोभूमिका सापडते. चव्हाण तसे आहेत, म्हणून चव्हाणांवर आक्षेप घेण्याची वृत्ती नाही, तर चव्हाण तसे ठरले पाहिजेत, अशी वासनाच त्या आरोपांच्या मुळाशी आहे. आरोप करणाऱ्यांच्या ठायी न्यायबुद्धी, विवेकाचे महत्त्व व सत्याची चाड असती तर चव्हाणांच्या बाबतीत अवास्तव आरोप करण्यास ते धजलेच नसते. चव्हाणांचा उत्कर्ष अपरिहार्य आहे, ही गोष्टच मनात सलते.

संधी सापडेल तेव्हा असले आरोप करून समाधान मानण्याचा प्रतिपक्षांचा उद्देश असतो. चव्हाण खंबीर मनाचे असल्यामुळेच 'हाथी चलत है अपने गतमें, कुतवा भुकत है भुकवा दे' या कबीरोक्तीप्रमाणे ते उपेक्षा करीत आहेत, ही गोष्ट फारच चांगली आहे.

काही अपेक्षा

श्री. चव्हाण हे येत्या निवडणुकीनंतर पुनः मुख्यमंत्री होतीलच, ही गोष्ट साधारणपणे ठरलेली आहे, असे गृहीत धरण्यास हरकत नाही. मुख्यमंत्रिपदाच्या स्वीकारानंतर नव्या मुंबई राज्यात त्यांची जी भाषणे झाली; त्यावरून एक समतोल व समंजस राज्यकर्ता पुढे आला आहे, असेच निःपक्षपाती निरीक्षकांचे मत बनत चालले आहे. यापुढे स्थिर व दीर्घकालीन मंत्रिमंडळ त्यांनी बनविल्यावर त्यांच्याकडून काय काय योग्य गोष्टी घडाव्या याबद्दल काही अपेक्षा व्यक्त होऊ लागल्या आहेत; त्यांतील थोड्या मूलभूत बाबींचा क्रमवार निर्देश करून हा लेख संपवितो.

(१) राज्य : प्रांतिक संकुचित वृत्ती व केवळ व्यावहारिक दृष्टिकोन असलेले मंत्री नव्या मुंबई राज्याला आवश्यक असलेल्या व्यापक ध्येयवादी राजकारणाचा पायंडा पाडू शकणार नाहीत. मंत्रिमंडळाची योग्य निवड ही एक काळजीची गोष्ट आहे. ध्येयवादी व व्यापक दृष्टीचे मंत्री मिळवता येणे ही मुख्य गरज आहे. सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कामावर योग्य नियंत्रण व मार्गदर्शन करणारे मंत्रीच निवडता आले पाहिजेत. सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांची काम करण्याची पद्धती यांत्रिक व दूरदृष्टीचा पोच नसलेली असते. मंत्री जर ध्येयवादी दृष्टिकोनाचे व कार्यक्षम नसले तर ते स्वस्थ व तटस्थ राहतात किंवा केवळ वशिलेबाजी करीत राहतात; किंवा सत्तेचा मनसोक्त वापर करू इच्छितात.

(२) शिक्षण ; शिक्षणसंस्था, विद्यापीठे व साहित्यिक संस्था यांच्यावर देशाचे मानसिक व बौद्धिक सामर्थ्य अवलंबून असते. त्यांच्यावर सरकारी नियंत्रण राहण्यावर भर न देता सरकारी मदतीने सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणण्याकरिता कार्यक्षम व आत्मविश्वाससंपन्न माणसे व त्यास उपयुक्त अशी विचारसरणी त्या संस्था कशी निर्मितील हा महत्त्वाचा मूलभूत प्रश्न आहे. सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणणे व दैनंदिन राजकारणापासून विद्यार्थी वर्गास अलिप्त ठेवून त्यांचा आत्मविकास साधणे हेच शिक्षण व साहित्य यांचे मुख्य कार्य आहे. विद्यापीठे स्वायत्त व स्वयंतंत्र रूपाने चालण्यास मदत करणे ही गोष्ट राज्यकर्त्यांना इष्ट वाटली पाहिजे. राज्यकर्त्यापुढे विनाकारण वाकणार नाहीत अशा हिंमतीचे नेते विद्यापीठात स्थापले पाहिजेत. कारण व्यापक संस्कृती ही सत्तेच्या कमीत कमी नियंत्रणामुळेच योग्य दिशेने कार्य करू शकते. बौद्धिक व सांस्कृतिक दर्जा असलेले स्वतंत्र बाण्याचे वजनदार लोक विद्यापीठांना लाभले पाहिजेत.

(३) नियोजन : आर्थिक नियोजनांची अंमलबजावणी नोकरशाही मार्फतच विशेषतः होत आहे; लोकांचे सहकार्य हा त्यातला फार दुय्यम भाग आहे. नियोजनात लोकनेतृत्व व

लोकांचे स्वावलंबी सहकार्य जेव्हा दिसू लागेल तेव्हाच नियोजनांना साफल्य येऊ लागेल. नाही तर ठरावीक रकमा ठरावीक मुद्द्यावर खर्च पडल्या, एवढेच नियोजनातून समाधान प्राप्त होईल. लोकांच्या स्वयंप्रेरित आर्थिक व्यवहारांच्या द्वारा बेकारीचे निवारण करण्याच्या प्रयत्नावर भर दिला तरच देशाचा आर्थिक प्रश्न सुटण्याच्या मार्गास लागला असे होईल.

(साप्ताहिक मौज, मुंबई, १७ फेब्रुवारी, १९५७.
द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्याबद्दल लिहिलेला गौरव लेख.
मूळ शीर्षक : सहयात्रीला पाच वर्षांपूर्वी दिसलेले व्यक्तिमत्त्व)

ooo

३१

किसन वीर : खरा स्वातंत्र्यवीर

खरा स्वातंत्र्यवीर

कवठे येथील किसन वीरांची माहिती सातारा जिल्ह्यातील राजकारणी लोकांना व खेड्यापाड्यांतील सामान्य जनतेला करून देण्याची गरज नाही. त्यांची कीर्ती कानांवर गेली नाही असा माणूस या जिल्ह्यात सांपडणार नाही. त्यांचे तेजस्वी नेत्र उमदा शरीर बांधा, चौकस बुद्धी, मानवी स्वभावाचे सूक्ष्मज्ञान, उत्तर वृत्ती आाणि प्रखर देशभक्ती पाहून त्यांच्या सन्निध आलेल्या माणसांत त्यांच्याबद्दल आदर उत्पन्न होतो. गेल्या २० वर्षांतील देशसेवेच्या व्रताने त्यांनी आपले जीवन धन्य केले आहे. आपल्या घराकडे सतत पाठ फिरवून त्यांनी देशाच्या स्वातंत्र्याचा लढा केला आहे.

घरगुती अडचणींची त्यांनी फिकीर न करता गेली १२ वर्षे सातारा जिल्ह्यातील राजकीय संघटनेला वाहून घेतले आहे. उत्तर सातारा जिल्ह्याच्या काँग्रेस समितीचे ते अध्यक्ष बनल्यानंतर काँग्रेस संघटनेवर अनेक आपत्ती आल्या; त्यांतून सातारा जिल्ह्यातील काँग्रेस-संघटना जिवंत ठेवण्याचे कार्य किसनवीरांनाच साधू शकले. त्यांच्या ठिकाणी दुसरा कोणीही असता तर त्याने निराश होऊन हात टेकले असते. किसनवीरांची देशभक्ती अतिशय उच्च प्रकारची आहे. राष्ट्रीय ऐक्यापुढे सर्व गोष्टी तुच्छ आहेत, अशी त्यांची श्रद्धा आहे. ही त्यांची श्रद्धा अनेक वेळा कसास लागली आहे. सोने तापलेल्या भट्टीतून तावून सुलाखून शुद्ध होऊन बाहेर येते त्याप्रमाणे ते बाहेर पडले आहेत.

किसनवीरांनी भारतीय स्वातंत्र्याकरिता प्राणाचीही पर्वा केली नाही. त्यांनी भारत राष्ट्राच्या स्वराज्याची स्थापना करण्याकरिता अग्निदिव्य केले आहे. ४२ साली राष्ट्रात स्वातंत्र्य संग्राम सुरू झाला. महात्मा गांधींनी देशातील जनतेला ब्रिटिश राज्याची हकालपट्टी करण्याकरिता बंडाच्या उठावणीची हाक दिली. तेव्हा सातारा जिल्ह्यातील ज्या थोर वीरांनी बंडाच्या आघाडीवर येऊन लढ्याचे नेतृत्व केले त्यांत किसनवीर प्रमुख होते. त्या संबंधाची

हकिकत पुनः वाचल्याशिवाय किसनवीरांचे महत्त्व मनात बिंबणार नाही. ज्यांना ज्यांना आपल्या देशाच्या स्वराज्याचे व लोकशाहीचे संरक्षण करावयाचे आहे व समाजवादाची निर्मिती करावयाची आहे त्याने त्याने किसनवीरांच्या चरित्रातील ही हकिकत वाचली पाहिजे.

४२ सालचा लढा सुरू झाल्यावर किसनवीरांना ब्रिटिशसरकारने पकडून येरवडा जेलमध्ये कैदेत टाकले. ब्रिटिश सरकारने किसनवीरांसारख्या कार्यकर्त्यांना कारागृहात बंद करून स्वातंत्र्याचा लढा मारून टाकण्याचा बेत केला होता. किसन वीर व त्यांचे मित्र यांनी येरवडा जेलमध्ये खलबत करून हा बेत हाणून पाडून स्वातंत्र्याचा लढा अधिक जोरदार करण्याचे ठरविले. येरवडा जेल फोडण्याचा कट त्यांनी रचला. जेल फोडणारे जेल फोडताना पोलिसाला दिसले तर गोळी घालून ठार करण्याची परवानगी पोलिसाला असते. किसनवीर व त्यांचे साथी यांनी प्राणाची पर्वा न करता येरवड्याच्या तटबंदीवर चढून जेलच्या बाहेर उड्या टाकल्या हे केवढे साहस! हे साहस यशस्वी रीतीने किसनवीरांनी पार पाडले. ते सातारा जिल्ह्यात पुनः कार्यास लागले. नुसते दडून राहिले नाहीत. त्यांनी स्वातंत्र्यसंग्राम चेतविला.

४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामाची आग खेडोपाडी पसरविण्याकरिता भूमिगत कार्यकर्त्यांचे मोठे सैन्यदल किसनवीर व त्यांचे मित्र यांनी संघटित केले. त्या सैन्याचे संरक्षण जनतेने स्वतःच्या हिमतीवर केले. भूमिगतांना आश्रय देण्याचे काम जनतेने निर्भयपणे केले. जनतेचा पाठिंबा इतका मिळाला की, ब्रिटिशांचे राज्य सातारा जिल्ह्यातून नष्ट झाले अशीच राज्यकर्त्यांची खात्री झाली. सातारा जिल्हा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या आघाडीवर चमकावयास लागला. भूमिगतांचे राज्य सातारा जिल्ह्यात स्थापन झाले. रानावनातून, डोंगर कपाऱ्यांतून व किल्ल्यांतून भूमिगत स्वराज्य चालवू लागले. ब्रिटिशांचे पोलीसदल खेडोपाडी ब्रिटिशांच्या पोलिसांना दाद न देता भूमिगतांचा शोध करीत. परंतु जनतेच्या संरक्षणाखाली व विश्वासाखाली भूमिगत कार्यकर्ते राहत असल्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांना भूमिगत स्वातंत्र्यवीर सापडू शकले नाहीत.

भूमिगत कार्यकर्त्यांनी किसनवीरांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण लोकशाहीची स्थापना करण्याचा प्रयोग केला. लोकांच्या न्यायालयांची स्थापना करून देशद्रोह्यांचा व ग्रामकंटकांचा बंदोबस्त करण्यास प्रारंभ केला.

या पुढे भारतात समाजवादाची स्थापना व त्या प्रकारची समाजरचना करावयाची आहे. ग्रामीण लोकशाही म्हणजे खेड्यातील प्रत्यक्ष लोकशाही होय. ती स्थापन केल्याशिवाय सामान्य माणसाला समाजवाद निर्माण करता येणार नाही.

ग्रामीण लोकशाही स्थापन केल्याशिवाय समाजवादाची स्थापना रशियात व चीनमध्ये झाली आहे, परंतु तेथे हुकूमशाहीच्या मार्गाने समाजवाद आला आहे. भारताला समाजवाद

हुकूमशाहीच्या मार्गाने आणावयाचा नाही. हुकूमशाही टाळून समाजवाद आणण्याकरितां ग्रामीण लोकशाहीची गरज आहे. ग्रामीण लोकशाहीचा प्रयोग ज्यांनी अगोदर केला आहे अशीच मंडळी भारताच्या समाजवादाची स्थापना करू शकतील. किसनवीर व त्यांचे मित्र अशा मंडळींपैकी आहेत.

नाना पाटील किंवा त्यांचा कम्युनिस्ट पक्ष हे सुद्धा भारतात समाजवाद आणूं इच्छितात. परंतु तो समाजवाद रशियाच्या व चीनच्या समाजवादासारखा हुकूमशाहीकडे नेणारा असणार. कारण, भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा रशिया व चीन येथील समाजवादी राज्यकर्त्यांच्या नेतृत्वाला प्रमाण मानतो. भारतीय कम्युनिस्ट पक्ष व त्यांचे सदस्य नानापाटलांसारखे लोक जर भारतात बहुमताने निवडून आले तर ते रशियाच्या पद्धतीचा हुकूमशाही समाजवाद स्थापन करतील. हुकूमशाही समाजवादात जनता ही राज्याची गुलाम बनते. शेतकरी व कामकरी यांना राज्याच्या हुकमाप्रमाणेच वागावे लागते. राज्य ठरवील तेच वेतन वा पगार घ्यावा लागतो. कसणाऱ्याला जमीन मिळत नाही. जमिनीची मालकी राज्याकडेच जाते. व राज्याचे सरकारी अधिकारी शेतकऱ्यांवर व कारखान्यांतील मजुरांवर हुकूम गाजवितात. मतभेदाचा किंवा जादा मागण्या करण्याचा हक्क नष्ट होतो. संपावर जाण्याचा मजुरांचा हक्क नष्ट होतो. रशिया व चीनमधील समाजवादी राज्य म्हणजे मोठा तुरुंगच होय. तुरुंगात काम मिळते, रोजगार मिळतो व भाकरी मिळते, जाडाभरडा कपडा मिळतो तशी भाकरी, रोजगार व कपडा कम्युनिस्ट पक्षाच्या राज्यात मिळेल. परंतु सर्व प्रकारचे स्वातंत्र्य नष्ट होईल. म्हणून कम्युनिस्टपक्ष किंवा त्यांच्याशी हातमिळवणी करणारे इतरपक्ष यांच्या योगाने येणारा समाजवाद हा लोकशाहीचा घात करील, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

ग्रामीण लोकशाहीचा प्रयोग करणारे किसन वीरांसारखे काँग्रेसचे सेवकच लोकशाही राखून समाजवाद आणू शकतील. किसनवीर ह्यांच्या बाबतीत आणखी एक महत्त्वाची विशेष गोष्ट लक्षात आणली पाहिजे ती ही की, त्यांनी श्री. यशवंतराव चव्हाण यांचे हात बळकट कसे होतील या करिता जिवाचे रान केले आहे. श्री. यशवंतराव चव्हाण हे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री आता झाले आहेत. किसन वीर हे यशवंतरावांचे अत्यंत महत्त्वाचे उजवे हात होत असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. यशवंतराव म्हणजे मराठा गरीब शेतकऱ्याचा मुलगा, मुंबई राज्यासारखे भारताच्या राज्याखालोखाल महत्त्वाचे राज्य चालविण्यास पात्र ठरला, ही गोष्ट शेतकऱ्यांना अत्यंत अभिमानाची वाटली पाहिजे. एवढ्या मोठ्या राज्याचा मुख्यमंत्री एका मराठा शेतकऱ्याचा सुपुत्र झाला आहे; ही गोष्ट काय सिद्ध करते? हीच गोष्ट सिद्ध करते की, भारतातील शेतकरी समाजाचा उदयाचा व भाग्याचा काळ जवळ आला आहे. श्री. किसनवीरांची ताकत वाढविणे म्हणजे यशवंतरावांच्या मुख्यमंत्रिपदाला बळकटी आणणे होय. किसनवीरांनी सातारा जिल्ह्यातील काँग्रेसला संघटनेचे बळ आणले म्हणून यशवंतरावांना उच्च पातळीवरचे राजकारण करण्यात यश आले आहे. किसनवीरांना जे

लोक पाठिंबा देणार नाहीत ते यशवंतरावांच्या म्हणजे शेतकरी समाजाच्या मुख्यमंत्रिपदास व शेतकऱ्यांच्या राज्यास विरोधी आहेत असेच म्हणावे लागेल. लोकशाही समाजरचना स्थापण्याकरिता यशवंतरावांच्या हातांत मुंबईराज्याचे मुख्यमंत्रिपद टिकले पाहिजे. यशवंतरावांच्या हाताचे बळ म्हणजे किसनवीरांसारखे त्यांचे मित्र होत.

नैतिकदृष्ट्या किसनवीरांचे चारित्र्य अत्यंत शुद्ध आहे. चारित्र्य शुद्ध असणे ही आजकाल राजकारणात अत्यंत आवश्यक बाब आहे. किसनवीर नम्र स्वभावाचे व अजातशत्रू आहेत. त्यांचा व्यवहार व देणीघेणी चोख असतात. ते अडचणीच्या वेळी सर्वांच्या उपयोगी पडतात.

खेड्यांतील जनतेचा थोर मित्र म्हणजे किसनवीर होत. वाई तालुक्यातील विकासाची कामे अधिक चांगल्या रीतीने पुरी व्हावयास पाहिजेत. जी काही कामे झाली आहेत, त्याचे कारण किसनवीर होत. वाई भागातील शेती, उद्योगधंदे, पाटबंधारे, रस्ते, शिक्षण, शाळा, दवाखाने इत्यादी गोष्टींचा विकास होण्याकरिता लाखो रुपयांची कामे सरकारने करणे जरूर आहे. काँग्रेसच यापुढेही देशाचे राज्य चालविणार आहे. किसनवीरांच्या ऐवजी दुसरा कोणी इतर पक्षाचा माणूस निवडून आला तर वाईभागाची उपेक्षा होणे संभवनीय आहे. वाईभागातील दारिद्र्य, बेकारी, अज्ञान व रोगराई यांचा नाश करावयास किसनवीरांचे नेतृत्वच उपयोगी पडेल. ही गोष्ट या विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी जनतेने लक्षात ठेवावी. किसनवीरांना पाठिंबा मिळाला नाही तर जनतेच्या हिताचा घात होईल हे ध्यानात ठेवले पाहिजे.

किसनवीर हे स्वांतत्र्यवीर आहेत. त्यांचा जय म्हणजेच हिंदुस्थानच्या लोकशाहीचा व समाजवादाचा विजय होय. त्यांचा पराभव म्हणजे हिंदुस्थानच्या लोकशाही समाजवादाचा पराभव होय.

जय हिंद ! जय हिंद!! जय हिंद !!!

(पत्रक - १९५६-५८)

ooo

32

First Philosopher of Modern India: M. N. Roy

His was a dedicated life, enriched by ennobling contemplation; it ended after contributing a great philosophy of life. It therefore belongs to the few instances of fulfilment afforded by human history.

As a matter of fact, his life could not have been regarded as a failure no matter when and where it ended since the age of fourteen when he was born in public life. Just recollect whatever he did or wrote, big or small; it is significant, an artistic whole. Like a beautiful verse, a lyric, a piece of scientific value or a quality produced by nature or man, it has its intrinsic value. The story of his life reads like an epic, the concluding chapter of which constitutes a philosophy of life, integrating the fundamentals of science and the moral experience of man.

Every important stage of the public life of M.N. Roy was inspired by one or the other of the leading ideals of the modern world. Nationalism and Communism are outstanding modem ideals elevated to secular religions. And Roy dedicated his thoughts and activities to these until his acute intelligence and profound understanding could find the way to a new, noble and liberating philosophy. Roy is one of the greatest champions of reason of our times, a symbol of rationalism. But his life can be understood also as a life of pure and infinite faith. It would be otherwise difficult to explain how Roy the thinker could also be Roy the Karmayogi. It was a life of a great synthesis of faith and reason which

could successfully emerge from all tragedies, always enriched, always without a scar.

While pursuing the ideals of nationalism and communism, Roy saw in them the elements of bondage which have thrown the world in great calamities. And the direction in which he moved clearly shows that unbounded love of humanity was the permanent basis of his character. His sublime spirituality prepared him for all adventures in pursuit of his ideals and also ultimately revealed to him their enslaving character.

Continual quest of freedom and endless search for truth are the foundations of humanist thought. They are the concrete manifestation of the supreme spirituality of man which ushered the modern scientific age into existence. Attempt to combat the enslaving ideals which have thrown humanity into a crisis is the only expression of supreme spirituality in our times. Roy departed after giving a new philosophical synthesis for overcoming the crisis. His achievement is unique.

India is known since ancient times as a land of philosophers and spiritual guides. But all of these until date have moved within the same limits of the Bhagwad Geeta. In M.N. Roy came the only thinker who could transcend these limits and offer a philosophy of life, fresh, rich and abiding. Realisation of this fact is and shall continue to be the proper homage to Manabendranath Roy.

(M. N. Roy: Philosopher-Revolutionary

Ed. by- Sibnarayan Ray

Ajanta Publication, Delhi- 1995. Page 206-207)

❍❍❍

३३

प्रशांत आश्रमातील तपस्विनी : एलन रॉय

दिनांक १५ ला सकाळी ९ वाजता एलन रॉय यांचा खून झाला, ही वार्ता आली. ही वार्ता ऐकून माझ्या डोळ्यांसमोर अंधेरी आली. शोकाविष्ट झालो. तो केवळ शोक नव्हता; शोकापेक्षा दाहक अशा भावनेने हृदय भरून गेले होते. दुःख, करुणा, उद्वेग, निराशा व अगतिकता या भावनांचा तो क्षोभ होता. हा क्षोभ मला हालाहलासारखा स्तब्धपणे धारण करावा लागला. कारण त्या दिवशी माझ्याकडे अभ्यागतांची गर्दी झाली होती. ता. १३ डिसेंबरला माझे गुरू केवलानंद स्वामी यांच्या स्मारकमंदिराचा उद्घाटन समारंभ राष्ट्रपतींच्या हस्ते झाला. त्यानंतर त्या मंदिराच्या वास्तुशांतीचा उत्सव दोन दिवस चालू होता. त्याकरितां शेकडो अभ्यागत आले होते. त्यांना माझी दीनवाणी स्थिती उमगली. त्यांनी त्यानंतर माझ्यापासून औपचारिक शिष्टाचाराची अपेक्षा केली नाही. जन्मभर विरक्त व संन्यासी राहून दुःखसागर म्हणून करुणेने व औदासीन्यपूर्ण वृत्तीने विश्वाकडे पाहणाऱ्या संन्यासी गुरूंच्या समाधिस्थानाच्या स्मारकाचा हा उत्सव होता. संन्यासी दृष्टीला दिसणारा मानवीजीवनाचा अर्थच ह्या वार्तेच्या रूपाने मला धक्का देऊन माझ्यासमोर प्रत्यक्ष उभा राहिला! कोणतीही महत्त्वाची घटना पाहिली किंवा ऐकली की विचारांत मग्न होण्याचा माझा स्वभाव आहे. ही वार्ता ऐकल्यानंतर माझे विचारच खुंटले. ज्या परिस्थितीत तिचा खून झाला ती परिस्थिती एका शांत आश्रमाची परिस्थिती होती. आणि हा शांत आश्रम म्हणजे एका आंतरराष्ट्रीय थोर क्रांतिकारकाचे निवासस्थान आहे.

एम. एन. रॉय यांची तपश्चर्या

एम. एन. रॉय यांनी स्वतःचे घर वयाच्या चौदाव्या वर्षी भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेण्याकरिता सोडले. ते एलनशी विवाहबद्ध होईपर्यंत बेघर होते. बिप्सीसारखे विश्वक्रांतीच्या ध्यासात ते विश्वभर भटकत होते. कोणत्याच देशात ते स्थिरपणे टिकू शकले नाहीत. ब्रिटिश साम्राज्यशाहीचा ससेमिरा त्यांच्या पाठीशी पंचवीस वर्षे होता. एम. एन. रॉय भारतात म्हणजे मायदेशी आल्यावरदेखील गुप्त परंतु नीडरपणेच संचार करीत होते. वयाच्या

चौदा वर्षापासून ५० वर्षांपर्यंत त्यांना कोठेही स्वतःची विश्वासाची जागा लाभली नाही. वादळांपाठीमागून वादळे म्हणजे क्रांतीची वादळे उठत होती; व ते त्यांत सामील होत होते. अशा वादळी जीवनांत राहूनही ते तत्त्वचिंतकाच्या भूमिकेतून विश्वाचा, समाजाचा आणि राजकारणाचा अभ्यास व अध्ययन करीत होते. जेव्हा ते भारताच्या कारागृहात सहा वर्षे बंदिस्त झाले तेव्हा त्यांच्या अध्ययनाला व ज्ञानमय तपाला अधिक साफल्य येऊ लागले. १९३६ च्या अखेरीस त्यांची भारताच्या कारागृहातून मुक्तता झाली. ही वार्ता एलनना युरोपमध्ये कळली. एलनचे आणि रॉय यांचे मिलन युरोपातच जर्मनीत १९२७ च्या सुमारास झाले होते.

प्रेम व ध्येय

एलन मोठी भाग्यशाली होती. एम. एन. रॉय यांच्यामध्ये तिला अगाध प्रेमाची आणि विश्वक्रांतीच्या ध्येयवादाची सफलता लाभली. ती विदुषी होती. तिला जर्मन, फ्रेंच व इंग्लिश भाषेवर प्रभुत्व लाभले होते. जर्मन कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यवाहीत उच्चपदावरून अनेक वर्षे ती भाग घेत होती. तिने जर्मन भाषेत फ्रेझरच्या 'गोल्डन बाऊ' म्हणजे 'सुवर्णशाखा' या मानवजातिशास्त्रावरील महाग्रंथाचा हजारो पृष्ठांचा पहिल्या तारुण्याच्या उमेदीतच अनुवाद केला आहे. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट आंदोलनामध्ये विविध भाषांत अनुवाद करण्याची कामगिरी मोठ्या कुशलतेने तिने बजावलेली आहे. इंग्लिशप्रमाणेच जर्मन व फ्रेंच भाषांमध्ये सहज लीलेने उच्च दर्जाचे राजकीय, सामाजिक व तात्त्विक विषयांवर निबंधलेखन तिने केले आहे. "पेझंट्स इंटरनॅशनल"- (शेतकरी आंतरराष्ट्रीय संस्था)ची चिटणीस व त्या संस्थेची संपादिका म्हणून तिने अनेक वर्षे कामे केली आहेत. एम. एन. रॉय हे तिला भेटल्यावर त्यांच्या बुद्धिमत्तेची व क्रांतिकारक धीरगंभीर अशा सुंदर व्यक्तिमत्त्वाची छाप तिच्या मनावर पडली. एका क्रांतीच्या आगीतून दुसऱ्या क्रांतीच्या आगीत निधड्या छातीने शिरून काम करीत असलेला चिंतनशील योगीच तिला भेटला, असे तिला वाटले. या योगिनीचे हृदय आपोआप त्याच्या ठायी समर्पित झाले.

सांसारिक योगक्षेमाची कसलीही तरतूद ज्या पुरुषापाशी नाही, दुपारची भाकरी कशी मिळवावी व ज्याचा योगक्षेम कसा चालेल याचा विचार जो करीत नाही, अशा पुरुषाला आत्मसमर्पण करणारी अशी विदुषी क्वचितच सापडेल.

केवळ दर्शनाची उत्कट इच्छा

एम. एन. रॉय कारागृहातून सुटले, ही वार्ता कळत्याबरोबर त्यांच्या दर्शनाची अनेक वर्षे उत्कंठेने प्रतीक्षा करीत युरोपमध्ये आंतरराष्ट्रीय क्रांतीच्या आंदोलनांत भाग घेत असलेली एलन भारताकडे येण्यास उद्युक्त झाली. तिने 'मी भेटीस येत आहे' म्हणून रॉय यांना कळविले. रॉय यांनी उलट टपाली तिला लिहिले की, "कशाला येतेस? युरोपमध्ये काय वाईट आहे. तेथील प्रगत संस्कृतीच्या वातावरणात तुझ्या कर्तबगारीच्या विस्ताराला फार वाव आहे.

कशाला इकडे येतेस?'' एलनने लिहिले, 'केवळ दर्शनाकरिता व केवळ भेटीकरिता येत आहे. राहावत नाही, म्हणून येत आहे. बोटी हिंदुस्थानच्या किनाऱ्याला लागतात व परत जातात. परत येणाऱ्या बोटीनें परतही येईन. पण एकदा डोळे भरून दर्शन घेऊ द्या.'

एलन एम. एन. रॉय यांना भेटली. येथील मित्रांना लंडनचे चमकदार व्यक्तिमत्त्व पाहून ही रॉय यांची सहधर्मचारिणी म्हणून शोभेल, असे एकदम वाटले. येथील मित्रांनी रॉय यांना सल्ला दिला की अशी जोडीदारीण तुमच्या उतारवयांत तुम्हाला मिळणे आवश्यक आहे. तिच्याशीच विवाहबद्ध झालांत तर तुमच्या कर्तृत्वाला अधिष्ठान लाभेल.

विचारसृष्टीला अनमोल देणगी

रॉय यांचे मन वज्रासारखे दृढ होते. बुद्धिमत्ता हिमालयासारखी विशाल होती. विचार अत्यंत प्रगल्भ होते, परंतु त्यांचे शरीर पोखरले गेले होते. एलनशी विवाहबद्ध झाल्यानंतर रॉय जवळजवळ पंधरा वर्षे जगले. एलन लाभली नसती तर रॉय यांच्या पंधरा वर्षांच्या विचारमय तपस्येचा मानवतावादरूपी अमर निष्कर्ष प्राप्त झाला नसता. दोनचार वर्षांत त्यांच्या प्रकृतीने त्यांना दगा दिला असता. एलनने रॉय यांचा मातृवत सांभाळ केला. त्यांची सर्व प्रकारची सेवा अहोरात्र दक्ष राहून शेवटच्या क्षणापर्यंत तिने केली. त्यांच्या जीवनाचा प्रत्येक क्षण तिला अलौकिक मोलाचा वाटत होता. त्यांच्या प्रत्येक श्वासाला नवसाला पावलेल्या देवाप्रमाणे ती महत्त्व देत होती. त्यांनी खाजगी चर्चेत, सामुदायिक चर्चेत व सार्वजनिक सभेमध्ये ची जी भाषणे केली, ती सर्व तिने सोन्याचे कण समजून आपल्या अत्यंत वेगवान, अशा लघुलेखन पद्धतीने लिहून घेतली. त्यांच्या बोलण्याचा प्रत्येक क्षण तिने लेखनिविष्ट केला आहे. एलनने इंग्लिशमध्ये नवमानवतावादाच्या तात्त्विक भूमिकेवर 'मॅन इन हिज ओन इमेज' ('मानवाचा आदर्श') हा ग्रन्थ लिहिला आहे. त्यावरून तिच्या तत्त्वदर्शी प्रज्ञेची व विचारगांभीर्याची साक्ष पटते.

रमणीय आश्रमाची निर्मिती

एलनमुळेच त्यांना घर मिळाले. डेहराडून येथील १३ मोहिनी रोड येथील रॉय यांचा आश्रम हा एलनने निर्माण केला. तेथे एक लहानसे घर व दीड एकर पडीक जमीन होती. मसुरी या हिमालयातील पर्वतशिखराचा परिसर येथून दिसतो. चार महिने किंवा तीन महिने हिमाच्छादित होणारी चमकदार शिखरे येथून दृष्टीचे आकर्षण करीत असतात. पडिक जमिनीला सुंदर उपवनाचा आकार एलनने दिला. विविध प्रकारची सर्व ऋतूंत फुलणारी व डोलणारी फुलांची बाग तिने निर्माण केली. भारतातील उद्यानविशारदांना मोहित करणारें वैचित्र्यसंपन्न असे हे उद्यान आहे. नुसते जास्वंदीचेच २२ प्रकार या उद्यानांत मी स्वतः मोजून काढले आहेत. तेथेच राहत्या कुटीच्या डाव्या बाजूला पूर्वाभिमुख व कुटीकडे पाठ असलेले पुस्तकालय व उच्च विद्यालयीन चार विद्यार्थ्यांना योग्य अशी नवी अभ्यासिका येथे बांधली आहे.

या आश्रमात एम. एन. रॉय यांनी रेनासन्स इंस्टिट्यूटची सन १९४६ साली स्थापना केली. हा आश्रम गेली २२ वर्षे भारतातील नवमानवतावादी आंदोलनाचे केंद्र बनला. येथे भारतीय व आंतरराष्ट्रीय सहस्रावधी अभ्यागत आजपर्यंत भेट देऊन व राहून गेले आहेत. या आश्रमांतील १॥ एकरातील प्रत्येक वृक्ष, फुलझाड, फळझाड, झुडूप व वल्ली एलनच्या स्निग्ध दृष्टीने व हळुवार हाताने जोपासली गेली आहे. या उद्यानातील वृक्षवल्लींनी स्वतःच्या प्रफुल्लित शोभेने व रॉय पतिपत्नींनी प्रसन्न स्मित मुद्रेने अभ्यागतांचे व मित्रांचे निरन्तर स्वागत केले आहे. रॉय पतिपत्नी दोघेही उत्तम पाकविशारद व चोखंदळ; दोघेही चुलाणात इंधन घालण्यापासून पाकसिद्धीपर्यंतच कामे बरोबरीने करीत. त्यांच्या उदार आतिथ्याने उद्यानातील वृक्षवेलीचा तजेला अभ्यागतांच्याही चेहऱ्यांवर खुलू लागे. आश्रमाची पृष्ठभूमी म्हणजे ध्यानमग्न दिसणाऱ्या हिमालयाच्या उत्तुंग रांगांचा परिसर! एरवी नित्य चिंतनमग्न असणाऱ्या या पतिपत्नींबरोबर आलेले अभ्यागत चर्चा करण्याकरिता उत्सुक असत. बहुतेकांच्या भेटीचा उद्देश काही चर्चा करावी व राष्ट्रीय व जागतिक प्रश्नांसंबंधी मार्गदर्शन मिळवावे, असाच असे. केवळ ओळख व गृहस्थीची मैत्री म्हणूनही काहीजण येत; जीवनाशी ज्ञान वा चर्चा यांचा काही लागाबांधा नसलेले साधे लोकही येत. परंतु तसे थोडे प्राध्यापक, पंडित, संपादक, ग्रंथकार, दिल्लीतील विदेशी राजकीय दूत, राजकारणी, समाजसेवक, तत्त्वचिंतक अशाच देशी व विदेशी मंडळींचा अभ्यागतांत भरणा असे. काही मंडळी जिवंत व ज्वलंत अशा चालू विषयांवर चर्चा करण्याकरिता व माहिती घेण्याकरिता येत आणि काही शाश्वत व अमर तत्त्वांचा परामर्श करण्याकरिता येत. सकाळी चहा व स्नान झाल्यावर ९॥ वाजता चर्चेचें 'सूत उवाच' व्हावयाचे ते दुपारी १२ पर्यंत चालावयाचे. नंतर पुनः तिसऱ्या प्रहरी ३॥ वाजता सुरू होऊन, मधून मधून विराम घेत, चर्चासत्र रात्री ११॥ ला समाप्त होई. एलनची झटपटीने कामे उरकण्याची उमेद वाखाणण्यासारखी होती. वय ५० च्या आतबाहेर असताना २२ वर्षांच्या तरुणीची तरतरी तिच्या अंगात होती. कामाकरिता येरझारा घालताना टाइपरायटरमधील टपटप पडणाऱ्या टाइपाच्या वेगाने तिची पावले पडत. वेळेवर १०-१५ पाहुणेही येऊन उतरावयाचे. त्यांचे स्नान, भोजन, चहापान, बिछाना, वस्त्रधावन इत्यादी सर्व प्रकारची व्यवस्था करण्यात दीड एकर पसरलेल्या सुरेख बागेची निगा राखण्यात दर आठवड्यास नियमितपणे निघणाऱ्या इंग्लिश सामाहिककरिता मजकूर तयार करून तो टाइपरायटरवरून भराभर काढण्यात, आलेल्या देशी विदेशी पत्रव्यवहाराची विल्हेवाट ताबडतोच लावण्यात व एम. एन. चर्चेतही रॉय यांच्या लघुलेखद्वारा टिपलेल्या भाषणांचे पूर्ण लेखान्तर करण्यात दक्ष असलेली एलन या चर्चेतही भाग घेई व पंडितांनाही माना डोलावयास लावी. एम. एन. रॉय यांच्या निधनानंतर त्यांच्या देशोदेशी वास करणाऱ्या मित्रांचे एलनशी अत्यंत सौहार्दाचे संबंध राहिले. याचे कारण तिचे दाक्षिण्य व सौजन्य यांनी भरलेले मधुर व्यक्तिमत्त्व होय. रॉय यांच्या निधनानंतर अखेरपर्यंत तिने आश्रमातच आपले आयुष्य व्यतीत केले. रॉय यांच्या वसतीची स्मृती एलनला रॉय यांच्या मानसिक सान्निध्यात ठेवी.

एलनच्या ठायी अत्यन्त सुसंस्कृत व समर्पित अशा स्त्रीत्वाच्या उत्कर्षाने सीमा गाठली होती.

महत्त्वाच्या साधनांची जुळणी

१९५४ च्या जानेवारीमध्यें रॉय यांचे देहावसान झाल्यानंतर एलनने रॉय यांच्या विविध देशांतील कर्तबगारीचे निदर्शक असे विविध आधारलेख, वृत्तपत्रांचे अंक, पुस्तिका, पत्रे इत्यादी गोळा करण्यास प्रारंभ केला. त्याकरिता ती एकदां अमेरिकेला व युरोपला जाऊन आली. आणि या सर्व संग्रहाची जुळणी करून रॉय यांच्या कामगिरीने यथार्थ ऐतिहासिक दर्शन व्हावे म्हणून त्याचे संशोधन सुरू केले. रॉय यांनी स्थापलेल्या 'रॅडिकल हॅमनिस्ट' या साप्ताहिकाचेही संपादन बिनचूक रीतीने ती येथूनच करीत होती. तिच्या संशोधनाला व संग्रहाला चांगला आकार येऊ लागला होता. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट आंदोलनातील विशेषतः भारतीय कम्युनिस्ट आंदोलनातील फार महत्त्वाच्या घटनांचा व फेरबदलाचा संगतवार इतिहास निष्पन्न व्हावा, इतकी महत्त्वाची साधनसामग्रीची जुळणी एलनने चालविली होती.

सीमेवरील रखवालीण

एलनचें 'रॅडिकल ह्युमॅनिस्ट' हे साप्ताहिक ती कलकत्त्याहून संपादन करीत होती. त्यांत भारतीय व जागतिक राजकीय घडामोडींचे समालोचन ती करीत होती. भारत आणि चीन यांच्या संबंधांत जो नवा सीमावाद निर्माण झाला, त्यांचेही साधकबाधक समालोचन निःपक्षपातीपणे व सप्रमाण ती करीत होती.

जिऑलॉजिकल सर्व्हेची मुख्य कचेरी डेहराडून येथे आहे. त्यात भारत व चीन यांच्या सरहद्दीचे संशोधन सुरू आहे. या कचेरीच्या कामगारांचा एक संघही तेथे आहे. त्यांत कम्युनिस्टांचा भरणा अधिक आहे. हा कामगार संघच कम्युनिस्ट चालवीत आहेत. या कचेरीतील कागदपत्रांना दोनदा आगी लागल्या. त्याचप्रमाणे कलकत्ता विमानतळावरून ब्रह्मदेशाला निघालेल्या भारतीय कर्मचाऱ्यांचे दप्तरही पळविण्याचा प्रयत्न झाला.

या संबंधांत एलनने 'रॅडिकल ह्युमॅनिस्ट'मध्ये भारत सरकारला सावधगिरीचा इशारा देणारे टिप्पण लिहिले. विशेषतः ही आग लागण्याचे कारण आकस्मिक नसून त्याच्या पाठीमागे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा संबंध असला पाहिजे, अशीही धोक्याची सूचना तिने केली.

आपल्या खुनाच्यापूर्वी काही दिवस गृहमंत्री पं. पंत यांनाही सावधगिरीची सूचना देणारे पत्र तिने लिहिले होते असे सांगतात. भारत सरकारच्या दिल्लीच्या मंत्रालयात व यंत्रणालयात परदेशी गुप्तचरांचे जाळे असलेले नुकतेच उघडकीस आले आहे. एलनचा थोर पती हा भारतीयच होता. तीही मनाने संपूर्ण भारतीय बनली होती. विचाराने अत्यंत कणखर व विलक्षण निश्चयी अशी ध्येयवादी स्त्री प्रत्यक्ष सीमावादाच्या क्षेत्रातच वस्ती करून राहिली होती. अत्यंत तीक्ष्ण बुद्धीचा, निरंतर जागरूक व चौफेर दृष्टी फेकणारा भारताचा हा 'निश्चयी पहारेकरी'च होता. हा पहारेकरी मारला गेला आहे.

एलनचा खून झाल्याची परिस्थिती अत्यंत लक्षात घेण्यासारखी आहे. त्या परिस्थितीचा तपशीलवार अभ्यास करणे जरूर आहे. दिनांक १३ डिसेंबर १९६० ची रात्र. ती झोपी जाण्याच्या अगोदर तिचा खून झाला आहे. रात्री भोजनाकरिता तिचे दोन परिचित तिच्याकडे आले होते. एका जहागिरदाराची पत्नी व आश्रमातच राहणारा एक प्रौढ जर्मन विद्यार्थी हे दोघे पाहुणे रात्री साडेदहाच्या सुमाराला जेवून निरोप घेऊन गेले. तिच्या कुटीतील शेकोटीजवळील जागेत तिचे खून केलेले शरीर सापडले. डोळे गच्च बांधले होते; तोंडात बोळा कोंबला होता. झोपी जाण्याच्या अगोदर जे कपडे उतरून ठेवावयाचे असतात, ते तिने उतरून ठेवले नव्हते. किंवा बिछान्यावर जाण्याच्या वेळी ती नेहमी जो धारण करीत होती तोही तिने धारण केला नव्हता. तिच्या एका पायातले पादत्राण तेवढे त्या प्राणघातक झटापटीत निसटून पडले होते. तिला भोसकले नव्हते म्हणतात. तिच्या डोक्यावर हातोडीसारख्या हत्याराने घाव घातलेले होते असे म्हणतात. तिची कोणतीही चीजवस्तू तेथून हिरावलेली दिसली नाही. तिच्या हातातले घड्याळसुद्धा तेथेच सापडले. ती आपल्या कुटीचा विशेष बंदोबस्त कधीच करीत नव्हती. कोणीही तोडमोड न करता सहज शय्यास्थानापर्यंत जाऊ शकेल, इतका मोकळेपणा तेथे चोवीस तास नेहमी असे. कोठचे दिवेही मालवले नव्हते.

चोरट्या भुरट्यांची ही घरफोडी आहे असे मानणे म्हणजे योग्य तपास लावण्याची जबाबदारी टाळणे होय. ट्राट्स्कीचा खूनसुद्धा हातोडीसारख्याच हत्याराने घडविला होता, ही गोष्ट पुष्कळांच्या स्मरणात असेल. ज्या प्रकारचे हत्यार अंगावर सापडले असता खुनाचा वहीम यावा, असे कसलेही हत्यार न बाळगण्याची दक्षता या खुनात दिसून येते.

जन्माने परदेशी असलेल्या एका विदुषी आश्रमवासिनी तपस्विनीची ही हत्या आहे. स्वदेशाबद्दल अभिमान वाटणाऱ्या कोणत्याही भारतीय माणसाला या खुनामुळे खालीं मान घालावीशी वाटेल. माझ्या देशात अशा प्रकारचा खून व्हावा काय? असे चिंतेचे शल्य मनातून केव्हाही जाणे शक्य नाही.

धनहीन व सत्ताहीन एलन. तिचा कोणाही व्यक्तीशी, जातीशी, धर्माशी, देशाशी व पक्षाशी हेवादावा नव्हता. ती केवळ वैचारिक जीवनात रमलेली होती. गणपतीच्या वैचित्र्यपूर्ण चरित्राच्या ऐतिहासिक प्रमाणांची जुळणी करीतच पतीच्या मानसिक सान्निध्याची सविकल्प समाधी तिला लाभली होती. अशा स्थितीत तिच्या प्राणहरणाचा संकल्प करणारी माणसें कशी आहेत, याचा विचार मनात येतो व वाटते की, माणूस मुळात चांगला आहे, असे जे सन्त व नीतिशास्त्रज्ञ समजतात त्याला काय अर्थ आहे? अशी माणसे ज्या जगात वावरतात त्या जगात मनुष्यजातीचे भवितव्य अत्यन्त धोक्यात आहे असेच म्हणावे लागते.

(नवभारत, फेब्रुवारी, १९६१, पृ. १२ ते १५.
मूळ शीर्षक: प्रशांत आश्रमातील तेजस्विनीची हत्या)

ooo

३४

राजकीय सहयात्री : यशवंतराव चव्हाण

श्री. चव्हाण यांच्यासंबंधी १९३० सालापासून न पुसलेल्या अशा अनेक आठवणी सांगता येतील. येथे त्यांच्या राजकीय चरित्राचा व राजकीय चारित्र्याचा अर्थ ज्यांच्यामुळे उलगडेल अशा काही मोजक्याच सांगतो. गेल्या तीन वर्षांतील घटना तर सर्वांच्या समोर ताज्या आहेत; त्याबद्दल विस्तार करण्याची येथे गरज नाही.

१९३० साली सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात मी हिरिरीने प्रचार करीत हिंडत होतो. माझ्या प्रचाराला रंग व आवेश कराड येथील कृष्णाकाठच्या वाळवंटांतील सभांच्यामध्ये विशेष आला. त्या वेळी मायक्रोफोन नसे, तरी केवळ कराड शहरातीलच नव्हे तर सभोवतालचे खेड्यांतीलही लोकांचे लोट संध्याकाळी मोठ्या उत्साहाने माझ्या सभेला जमत व अंधारात परतत. त्या वेळी श्री. यशवंतराव चव्हाण हे माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी होते. त्या सुमारासच राजकारणाकडे आकृष्ट होऊन सामील झालेल्या विद्यार्थ्यांपैकी म्हणून मी त्यांना ओळखू लागलो.

लहान वयातील प्रौढ समंजसपणा

ही ओळख १९३४-३५ च्या सुमारास दृढ झाली. त्या वेळी काँग्रेसच्या नेतृत्वावर परंपरागत राष्ट्रवादी विचाराची छाप फार खोल होती. तळापासून तो शिखरापर्यंत जी महत्त्वाची माणसे काँग्रेसमध्ये प्रामुख्याने वावरत होतीं त्यांच्या विचारांत राजकीय स्वातंत्र्याला निषेधात्मकच अर्थ होता. ब्रिटिशांचे राज्य नष्ट करणे हीच भावना प्रभावी होती. सामान्य जनतेच्या जीवनांतील क्रांती किंवा सामान्य माणसाची सामाजिक व आर्थिक बंधमुक्ती हा राजकीय स्वातंत्र्याचा खोल आशय बनला पाहिजे, अशी वैचारिक बैठक परंपरागत राष्ट्रवादाला तोंपर्यंत लाभली नव्हती. हा नवा आशय हृदयाशी बाळगून काम करू पाहणाऱ्या नव्या विचाराच्या काँग्रेसजनांची संख्या त्या वेळी फार लहान होती. सातारा जिल्ह्यातील

काँग्रेसजनांत राष्ट्रीय क्रांतीचा असा नवा अर्थ पाहणारा जो नवा लहानसा गट तयार झाला, त्यात माझ्याबरोबर जी विशीच्या आतबाहेर असलेली तडफदार तरुण मंडळी सामील झाली, त्यांत श्री. यशवंतराव अधिक चमकून दिसूं लागले. मनाने प्रौढ व वयाने लहान असे उमेदीने भरलेले हे तरुण गृहस्थ या आमच्या नव्या गटाचें नेतृत्व आंत दाखल होताच थोड्याच वर्षांत करूं लागले. हें सातारा जिल्ह्याबाहेरच्या त्या वेळपासून काँग्रेसमध्ये असलेल्या मंडळींनाही कदाचित एकदम पटणार नाही. मी स्वतः प्रयाग, बनारस, कलकत्ता येथे तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र व तर्कशास्त्र या विषयांवर संस्कृत पंडितांच्या अनेक विद्वान परिषदांमध्ये चर्चा व वादविवाद बरोबरीच्या नात्याने करीत असे. परंतु प्रत्यक्ष सातारा जिल्ह्याच्या काँग्रेसचे नेतृत्व श्री. चव्हाणांचेच निर्विवादपणे मान्य करून त्या वेळीं काम करीत होते. जहाल विचारांच्या नव्या गटाच्या हातीं अनेक वर्षे जिल्हा काँग्रेस कमिटी होती, हे पाहून १९३६ मध्ये काँग्रेसच्या प्रांतीय (व मध्यवर्तीसुद्धा?) नेत्यांकडून चक्रे फिरवलीं गेली. उजव्या गटाचे या जिल्ह्यातील प्रमुख कै. भाऊसाहेब सोमण होते. त्यांचे कल्याण पट्टशिष्य श्री. बुवा गोसावी यांनी सातारा जिल्हा कमिटीत उजव्या गटाचे बहुमत केले. नव्हे, त्यांना करावे लागले. त्याकरिता खूप शिकस्त करावी लागली व थोड्याच मतांनी या क्रांतिवादी गटाच्या हातातून जिल्हा काँग्रेसची सूत्रे उजव्या गटाच्या हाती गेली. या प्रसंगी डावा गट हलकल्लोळ करील व दंगल माजवील अशी अपेक्षा उजव्या गटाची होती. परंतु वादविवाद किंवा कसलीही गरमागरमी न होता हे परिवर्तन घडले ते पाहून श्री. बुवा गोसावी यांनी माझ्यापाशीं याबद्दल आश्चर्य प्रकट केले. संघटनेची शिस्त ही राजकारणातील एक पवित्र गोष्ट आहे; याची जाणीव त्या लहान वयातच दाखविण्याचा श्री. चव्हाणांचा पहिला प्रसंग हा होता. समंजसपणा पुष्कळ वेळा जन्मसिद्धच असतो. समंजसपणा, पुष्कळ अनुभव घेऊन, ज्यांना शिकावा लागतो त्यांना राजकारणी यशाकरिता पुढील जन्माची वाट पाहावी लागते.

आमच्या या नव्या गटाला क्रांतिकारक विचारसरणीचे शिक्षण एम. एन. रॉय यांच्या लिखाणांतून मिळाले होते. भारतीय राजकारण व समाजकारण यांची मार्क्सवादी मीमांसा एम. एन. रॉय यांच्यापासून हा गट शिकला होता. सातारा जिल्हा काँग्रेसने जिल्ह्याच्या राजकीय परिषदेचे अधिवेशन एम. एन. रॉय यांच्या अध्यक्षतेखाली तासगाव येथे १९३७ साली भरविले. हे अधिवेशन जुन्या गटाने उधळून लावले. पुण्याहून मुद्दाम संदेश पाठवून, श्री. नाना पाटील व त्यांचे काही सवंगडी यांना हाती धरून, ही परिषद उजव्या गटाने मोडली. त्याच दिवशी रात्री एका खाजगी जागेत एम. एन. रॉय यांचेशी चर्चा करण्याकरिता शे दीडशें कार्यकर्ते जमले होते. त्या चर्चेत श्री. चव्हाण यांनी प्रामुख्याने भाग घेतला होता. श्री. चव्हाण यांनी 'भारतीय सामाजिक क्रांतीतील किसानांचे स्थान आणि राजकीय क्रांतीचे तंत्र' या विषयांवर रॉय यांच्याशी सविस्तर खल केला. श्री. चव्हाण यांच्या विचारांची चमक पाहून रॉय यांना विशेष कौतुक वाटले.

आम्ही एकमेकांपासून दूर गेलो

१९४० साल म्हणजे दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा प्रारंभकाल होय. जागतिक लोकशाहीचें संरक्षण झाले तरच वसाहतींचा व विशेषतः भारताचा स्वातंत्र्यसंग्राम सफल होईल. ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध भारतीय स्वातंत्र्य हा लढा आता महत्त्वाचा राहिला नाही. तो जिंकण्याकरिता प्रथम जागतिक लोकशाहीचा लढा जिंकला पाहिजे, असा विचार एम. एन. रॉय यांनी मांडला. ब्रिटिश साम्राज्यशाहीचा आर्थिक पाया दुसऱ्या महायुद्धांत पूर्ण खतम होऊन जाईल; भारत मुक्त होण्यास नंतर अधिक अनुकूल परिस्थिती उत्पन्न होईल, त्याची चिंता आता या वेळी नको; असे रॉय मोठ्या भविष्यवाद्याच्या आत्मविश्वासाने प्रतिपादू लागले. मला ही रॉय यांची मीमांसा पूर्व मान्य झाली. परंतु काँग्रेसच्या नेतृत्वाला हा विचार मानवला नाही वा मान्य झाला नाही. या समयी मी व माझे अनेक राजकीय सहकारी मौलिक मतभेद होऊन एम. एन. रॉय यांचेबरोबर काँग्रेसमधून बाहेर पडलो: किंबहुना आम्हास बाहेर पडणे भाग पडले, श्री. यशवंतराव चव्हाण हेच यास अपवादभूत ठरले. त्यांचे काँग्रेस संघटनेवरील प्रेम फार खोल होते. नव्या उमेदींत निर्माण झालेले ते प्रेम होते. त्यांच्या प्रेमाचा विजय झाला. मी त्यांच्याशी पुष्कळ विचारविनिमय केला. त्यांनी त्याबद्दल वाद न घालताच मतभेद व्यक्त केला. कारण, ते माझ्याशी कधीच वाद घालीत नसत व आजपर्यंतही त्यांनी माझ्याशी कधी वाद घातला नाही. त्या वेळी वाद न घालता आम्ही एकमेकांपासून राजकीयदृष्ट्या विभक्त झालो व एकमेकांपासून खूप दूर गेलो!

दुसरे महायुद्ध समाप्त झाले. जुन्या भारतीय राज्याच्या कायद्याखालीच प्रांतीय व केंद्रीय विधिमंडळाच्या निवडणुकांची धामधूम सुरू झाली. या धामधुमीत रॉय यांच्या रॅडिकल पक्षातर्फे काही उमेदवार उभे केले होते. निवडणूक प्रचारात त्या प्रसंगी सातारा रोड स्टेशनवर माझी व श्री. चव्हाण यांची अनेक वर्षांनंतर गाठ पडली. श्री. भाऊसाहेब हिरे त्या वेळी महाराष्ट्राचे एक महत्त्वाचे नेते होते, तेही त्यांच्याबरोबर होते. या भेटीत शिष्टाचाराची सभ्यता होती; परंतु मनमोकळेपणा नव्हता. या निवडणुकीत आमचा रॅडिकल पक्ष पूर्ण हरला व त्यानंतर १९४८ साली या पक्षाचे आम्ही विसर्जन केले.

काँग्रेसमध्ये समाजवादी विचाराचा प्रभाव हळूहळू वाढू लागला, परंतु त्याला त्यात स्थिरासन लाभले नव्हते, कारण उजव्या गटाची छाप कमी झाली नव्हती. त्यामुळे काँग्रेसमधील समाजवादी गटास काँग्रेसमधून बाहेर पडावे लागले. भारताची राज्यघटना तयार झाल्यानंतर लोकशाही क्रांतीच्या दृष्टीने फार महत्त्वाची परिवर्तने घडून येऊ लागली. ज्या प्रकारच्या राजकीय परिवर्तनांना पाश्चात्त्य लोकशाही राष्ट्रांमध्ये अनेक शतके वाट पाहावी लागली, दीर्घ प्रयत्न व संघर्ष करावे लागले, त्या प्रकारची परिवर्तने भारतीय राज्यघटनेने क्षणाचाही विलंब न लावता घडवून आणली. मी लोकशाहीचे तत्त्वज्ञान व नवमानवतावाद

यांचा पुरस्कार करीत महाराष्ट्रात फिरत होतो. १९४० पासून मी काँग्रेसचा कडक टीकाकार बनलो होतो. माझ्या टीकेत मूलभूत सिद्धांतांचा अभिनिवेश होता. त्यामुळे काँग्रेसच्या नव्या विचारसरणीकडे व ध्येयवादाकडे माझी सहानुभूतीची नजर वळू लागली. हे ध्यानांत घेऊन काँग्रेसमधील माझ्या अनेक मित्रांनी काँग्रेसच्या व्यासपीठावरून हेच विचार बोला, असे मला स्नेहपूर्वक आवाहन दिले. मी पडत्या फळाची आज्ञा समजून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. १९५२ साली महाराष्ट्र प्रांतिकाचा सदस्य म्हणून सातारा जिल्ह्यातील मित्रांनी मला निवडून आणले.

माझा पुनः काँग्रेसप्रवेश व श्री. चव्हाणांशी सहकार्य

या निवडणुकीनंतर पुणे येथील काँग्रेस भवनांत प्रांतिक काँग्रेसची साधारण सभेची पहिली बैठक भरली. दरवाजावर श्री. भाऊसाहेब हिरे उभे होते. त्यांनी माझे मोठ्या आनंदाने स्वागत केलें. परंतु आत बैठकीत गेल्यावर अनेक मंडळींना मी परत आलेलो पाहून बरें वाटले नसावे असे त्यांच्या चेहऱ्यावरून व कित्येकांच्या "आलांत?" या खोचक प्रश्नावरून दिसून आले. मी श्री. चव्हाण यांच्या नकळत त्यांच्या पाठीशी जाऊन बसलो. त्यांच्या हे मागाहून लक्षात आले. त्यांनी स्मित मुद्रेने मागे वळून मला म्हटले की, 'पुढे या, पाठीमागे का? मी चटदिशी उत्तर दिले की, 'मी पाठीशी राहण्याकरताच आलो आहे. माझे शेजारी माझे परम मित्र श्री. किसनवीर होते. त्यांनी माझे हे वाक्य ऐकून माझ्या पाठीवर थाप मारली.

"महाराष्ट्र काँग्रेसमध्ये नुकतेच एक प्रकरण घडले होते. राजे श्री. मालोजीराव निंबाळकर व श्री. गणपतराव तपासे यांना श्री. मुरारजीभाई देसाई यांनी मंत्रिमंडळात घेतल्याबद्दल कांही महाराष्ट्र काँग्रेसचे नेते नाखूश होते. श्री. मुरारजीभाई यांनी मुख्यमंत्री या नात्याने आपले मंत्रिमंडळ स्वतःची सोय पाहून निवडले होते, हे घटनाशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत योग्य झाले आहे, असे माझे मत होते. श्री. चव्हाण यांनी श्री. मुरारजीभाईंच्या या संचाला संमती दिल्यामुळे महाराष्ट्रीय नेत्यांच्या गटात त्यांच्याबद्दल नाखुशी होती. मी मुरारजीभाईंच्या मताचा होतो ही गोष्ट श्री. चव्हाण यांना माहीत नसेल; परंतु श्री. किसनवीर यांस माहीत होती.

संघटना व राज्यघटना यांच्याशी इमान

संघटना व भारताची राज्यघटना यांच्यावरील चव्हाणांच्या श्रद्धेची कसोटी लागण्याचे असे प्रसंग वेळोवेळी येऊ लागले. त्या त्या वेळी या कसोटीस श्री. चव्हाण पुरेपूर उतरले. याची साक्ष हा अगोदरचा इतिहास व नंतरचा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा संग्राममय इतिहास उच्च स्वराने श्री. चव्हाणांच्या बाजूनेच देतो. त्याकरिता त्यांच्यावर वाटेल ते वाकडे तिकडे आरोप केले गेले. गैरसमज पसरविण्यात आले. निंदा, उपहार, बहिष्कार धिक्कार व अधिक्षेप करणाऱ्या अनेक अग्निदिव्यांमधून श्री. चव्हाण यांना या निष्ठेकरिता जावे लागले.

१९५५-५६ साल हे राज्य पुनर्रचनेच्या प्रचंड आंदोलनाचे साल होय. महाराष्ट्रातील राजकारणात प्रचंड उलथापालथी याच वेळी झाल्या. काँग्रेस संघटनेवर प्राणघातक प्रहार या वेळीच पडले. या कालखंडापासूनच महाराष्ट्र राजकारणातील श्री. चव्हाणपर्व सुरू झाले, असे म्हणतां येईल. कर्णाच्या रथाप्रमाणे काँग्रेसच्या रथाचे चाक महाराष्ट्र भूमीने गिळले होते. परंतु सुदैवाने या पर्वाचा कर्णपर्वाप्रमाणे शेवट झाला नाही. श्री. चव्हाण व त्यांचे सहकारी यांचा तेजोभंग करणारे शेकडो शल्य महाराष्ट्रभर निर्माण झाले. तीक्ष्ण अशा अधिक्षेपरूप शल्यांचा मर्मभेदी वर्षाव श्री. चव्हाणांवर होऊं लागला. पुण्यात नगरपालिकेच्या एका रंगमंचाचा उद्घाटनसमारंभ श्री. चव्हाणांच्या हस्ते झाला. त्या वेळी त्यांच्या सभेवर कडक बहिष्कार पडला. रस्त्यावर दुतर्फा धिक्कार करणाऱ्या हजारो स्त्रीपुरुषांच्या रांगा लागल्या होत्या. मित्रांच्या एका खाजगी बैठकीत स्वतःवर झालेल्या या हल्ल्याचे निवेदन करीत असताना श्री. चव्हाणांच्या डोळ्यांतून अनिवारपणे अश्रूही ओघळले. त्यांचे चित्त विव्हल होते, परंतु चलित होत नाही. कारण राष्ट्रनिष्ठेचा बळकट आधार आहे. या प्रसंगी काँग्रेस घटनेमधील श्री. हिरे-चव्हाण मतभेद पूर्ण उघडकीस येऊन चव्हाट्यावर आले; परंतु हे मतभेद संयुक्त महाराष्ट्राच्या ध्येयाबद्दल नव्हते, पद्धतीबद्दल व ते ध्येय मिळविण्याच्या साधनांबद्दल होते. काँग्रेस संघटना व काँग्रेसचे नेतृत्व ज्याच्या योगाने निर्बल होणार नाही अशीच साधने व अशीच पद्धती मान्य करणार, असा श्री. चव्हाण यांचा दावा होता. कारण सध्या तरी या संघटनेवरच सर्व राष्ट्राची मदार व जबाबदारी आहे. राष्ट्राची जबाबदारी वाहणारी दुसरी कोणतीच व्यापक संघटना देशात आज उभी नाही. राष्ट्राच्या सुरक्षिततेकरितां काँग्रेस ही बलशाली राहिलीच पाहिजे. काँग्रेसचे बळ म्हणजे श्री. नेहरूंचे नेतृत्व, असे समीकरण त्यांनी मांडले. या विचाराने प्रेरित होऊनच संघटनेच्या नीतिशास्त्राचे परिपूर्ण पालन श्री. चव्हाण यांनी आणीबाणीच्या प्रसंगी केले.

काँग्रेस संघटनेला व राष्ट्रनेत्यांना महाराष्ट्रातील आघाडी सांभाळणारा नवा माणूस श्री. चव्हाणांच्या स्वरूपात सापडला. त्यामुळे द्विभाषिक मुंबई राज्याचे नेतृत्व श्री. चव्हाणांना प्राप्त झाले. श्री. चव्हाणांच्याबद्दल महाराष्ट्रात या क्षणापर्यंत खूपच विविध प्रकारचे गैरसमज होते. त्यामुळेच द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्रिपद प्राप्त झाल्यानंतर अनेक आश्चर्याचे धक्के देत श्री. चव्हाणांचे कर्तृत्व उजळून विकसित होऊ लागले. विशेषतः मुंबईच्या पुंजीपती प्रतिष्ठितांना नवाच शोध लागला. बहुजन समाजांत मुंबईच्या विश्वजनीन, बहुरंगी व प्रगत संस्कृतीचा राज्यकारभार पेलणारा माणूस असेल, याची शक्यताच वाटत नव्हती. मुंबई हीच संयुक्त महाराष्ट्राच्या आड आलेली धोंड होती. म्हणूनच हृदयपालट घडवून आणणे हाच संयुक्त महाराष्ट्राचा उपाय होय, असे श्री. चव्हाण महाराष्ट्रांतील जनतेला प्रत्येक सभेमधून सांगत असत. श्री. चव्हाणांनी मुंबईचे हृदय जिंकले. त्यामुळेच त्यांना संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापन करता आले.

लोकशाहीचा नेता

श्री. चव्हाण हे केवळ एका राजकीय पक्षाचे मुख्यमंत्री म्हणून राज्य चालवीत नाहीत. लोकशाहीचा नेता, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. लोकशाहीचा नेता असलेल्या राज्यकर्त्याने लोकांच्या चळवळींवर शस्त्र शक्य तोपर्यंत वापरताच कामा नये, असा दंडक श्री. चव्हाण यांनी स्वतःचे तत्त्व म्हणून स्वीकारलेला दिसतो, असे त्यांच्या गेल्या पाच वर्षांतील कृतीने सिद्ध केले आहे. अहमदाबाद येथील प्रक्षोभक आंदोलन, सार्वत्रिक अखिल भारतीय संप व महाविदर्भवादी चळवळ यांतील त्यांचे वर्तन त्यांच्या अहिंसावादित्वाचेच गमक ठरते.

"बलवानाची अहिंसा हीच खरी अहिंसा," या गांधींच्या सिद्धान्ताचे आचरण करण्याची संधी सशस्त्र वा राज्यधारी यांसच लाभत असते. स्वातंत्र्यपूर्व अहिंसक आंदोलन हे निर्बळ म्हणजे निःशस्त्र जनतेचे आंदोलन होते. काँग्रेसच्या हाती सत्ता-बल-शस्त्र आल्यानंतर 'बलवानाची अहिंसा' या सिद्धान्ताचा प्रयोग करण्याची संधी प्राप्त झाली आहे. आमच्या सत्ताधाऱ्यांशी जगातील इतर सत्ताधाऱ्यांची तुलना करण्याच्या प्रसंगी आमच्या मंडळींचा गांधीवादी वारसा प्रथम लक्षात येतो. राज्य सत्ता वापरताना हा अहिंसावादी वारसा, नव्या लोकशाही नेतृत्वाचे रहस्य ज्यांस समजेल तेच चालवू शकतील. खरेखुरे आधुनिक लोकशाही नेतृत्व म्हणजे पक्षीय नेतृत्व नव्हे; कारण विसाव्या शतकाच्या मध्यान्हात डावे व उजवे भेदसुद्धा पाश्चात्त्य राष्ट्रांत वरपांगी ठरत आहेत; भारतातही तसे ते ठरू शकतील, पक्षातीत भावनेचे लोकशाही नेतृत्व भारतात काय किंवा अन्यत्र काय, वाढीस लागले तरच त्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाचे मर्मग्रहण होऊ शकेल; हे मर्म च्या प्रज्ञावंतास अधिक समजू शकेल तोच राष्ट्रीय वा जागतिक राजकारणास योग्य बळ देऊ शकेल. श्री. चव्हाण राज्यकारभारांत विरोधी पक्षांनाही विश्वासांत घेतात, हे अशा व्यापक लोकशाही नेतृत्वाचेच लक्षण आहे.

धीरोदात्त व मधुर व्यक्तिमत्त्व श्री. चव्हाणांच्या ठिकाणी विकास पावत आहे याचा प्रत्यय आता केवळ महाराष्ट्रासच नाही तर सर्व भारताला येऊ लागला आहे.

(यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ,
श्री यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती,
महाल, नागपूर,
प्रमुख संपादक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,
१२ मार्च, १९६१, पृ. ७ ते १०)

○○○

३५

कै. श्री. मारोतराव कन्नमवार

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. मारोतराव कन्नमवार यांचे देहावसान दिनांक २४ नोव्हेंबर १९६३ ला रात्री १०.५५ ला अचानकपणे झाले. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील जनता हळहळली. कै. मारोतराव कन्नमवार हे माजी मध्यप्रदेश राज्याचे अनेक वर्षे मंत्री होते. प्रदेश राज्यांची पुनर्रचना झाल्यावर द्विभाषिक मोठे मुंबई प्रदेश राज्य अस्तित्वात आले व त्याचे मुख्यमंत्रिपद माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांना लाभले. या मंत्रिमंडळात कन्नमवारांचा आरोग्य मंत्री म्हणून समावेश झाला. या मुंबई राज्याची महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन प्रदेश राज्ये १९६० साली १ मे ला, झाल्यानंतर चव्हाण मंत्रिमंडळातही बांधकाम खात्याचे मंत्री म्हणून कन्नमवारांचा समावेश केला गेला आणि उपमुख्यमंत्रिपदही त्यांना त्याच वेळी प्राप्त झाले. चिनी आक्रमणानंतर चव्हाण हे १९६२ च्या नोव्हेंबर महिन्यात भारताचे प्रतिरक्षामंत्री म्हणून भारत संघराज्याच्या मंत्रिमंडळात समाविष्ट केले गेल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रिपद २२ नोव्हेंबर १९६२ रोजी कन्नमवार यांजकडे आले. एक वर्षपर्यंत मोठ्या शिताफीने महाराष्ट्र राज्याची धुरा कन्नमवार यांनी वाहिली.

कै. कन्नमवार यांच्या या एका वर्षाच्या करकिर्दीत महाराष्ट्र सरकारला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले व त्यात हे राज्य यशस्वी ठरले. कन्नमवारांनी ३१ मंत्री आणि उपमंत्री यांचे विशाल मंत्रिमंडळ एकजुटीने कार्यास लाविले. स्वतः कन्नमवार विश्वविद्यालयीन शिक्षित नव्हते. मंत्रिमंडळांतील बहुतेक मंत्री व उपमंत्री उच्चविद्याविभूषित असूनही मंत्रिमंडळावर छाप ठेवून एकोपा राखणे ही गोष्ट किती कठीण असावी याची कल्पनाच करणे बरे. हा एकोपा राहिला, याचे कारण महाराष्ट्र राज्याचे प्रभावी राजनैतिक नेतृत्व होय. महाराष्ट्रीय व विशेषतः मराठे यांचा भांडखोर स्वभाव आहे; त्यामुळे महाराष्ट्र राज्य अलग झाल्याबरोबर हा भांडखोरपणा बाहेर चव्हाट्यावर येईल अशी अपेक्षा महाराष्ट्राचे अन्यप्रदेशीय टीकाकार व राजनैतिक समीक्षक द्विभाषिक मुंबई राज्याचे विभजन होण्यापूर्वी बाळगीत होते. परंतु

त्यांची अशा प्रकारची अपेक्षा निर्मूल ठरली. महाराष्ट्रात पक्षभेद व सार्वजनिक भांडणे फार जुनी आहेत. परंतु व्यक्तिनिष्ठ राजकीय गटबाजी महाराष्ट्रात गेल्या शतकात कधीच प्रभावी झाली नाही. ध्येयवाद व तत्त्वे यासंबंधात मौलिक मतभेदांच्या अनुषंगोनच महाराष्ट्रात राजकीय संघर्ष वाढले व पेटले. व्यक्तिनिष्ठ गटबाजी राजकीय पक्षात वाढीला लागून राजकारण दूषित झाले म्हणजे राजकीय अधःपातास प्रारंभ झाला असे म्हणावे लागते. महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाला अशा वैयक्तिक गटबाजीचा विटाळ लागणार नाही असा निश्चित भविष्यवाद सांगणे जरी कठीण असले तरी महाराष्ट्राचे राजकीय वातावरण उच्च दर्जाच्या वैचारिक पातळीवरच दीर्घकालपर्यंत हेलावत असल्यामुळे व्यक्तिनिष्ठ राजकीय गटबाजीचा वास आल्याबरोबर त्याचा निषेध सर्व बाजूंनी सुरू होऊन त्याचा बीमोड तत्क्षणीच होईल अशा तऱ्हेची अपेक्षा उत्पन्न करण्याइतके दूरदर्शी व सामर्थ्यशाली राजकीय नेतृत्व महाराष्ट्रास लाभले आहे, याची उत्कृष्ट प्रतीती कन्नमवारांच्या यशस्वी कारकिर्दीवरून येते.

श्री. कन्नमवारांनी लहानपणापासून राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घेतला, त्याकरिता कारावासही अनेक वेळा अनेक वर्षे भोगला. त्यांच्या उमेदीच्या काळात भारताचे राजकीय स्वातंत्र्याचे आंदोलन जनतेचे आंदोलन बनले होते. समाजाच्या सर्व थरांमध्ये या आंदोलनाच्या मुळाशी असलेल्या स्वातंत्र्याभिमुख भावना दृढमूल झाल्या होत्या. हे स्वातंत्र्याचे आंदोलन अखेरीस सफळ होऊन लोकशाही राज्याचे विशाल रूप धारण करून भारतात विराजमान झाले. लोकशाहीच्या शक्ती अत्यंत साधारण माणसासही कर्तबगारीची मोठी संधी प्राप्त करून देतात याचे उत्कृष्ट प्रत्यंतर म्हणजे कन्नमवारांची राजकीय कर्तबगारी होय.

श्री. कन्नमवार यांचा जन्म १० जानेवारी १९०० मध्ये विदर्भात चांदा येथे झाला. गरिबीमुळे शिक्षण बेताबाताचेच झाले. मध्यमवर्गीय बौद्धिक वातावरणाचे आकर्षण असल्यामुळे वृत्तपत्र व्यवसायात शिरले. 'लोकसेवक' (१९३४); 'नवसंदेश' (१९४८) व 'ग्रामसेवक' (१९५३) ही नियतकालिके चालविली. त्यांना मराठ्यांच्या इतिहासाचा अभिमान होता व विशेषतः श्रीछत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल नितांत पूज्यबुद्धी त्यांच्या हृदयात वसत होती. म्हणून शिंदखेड राजा (विदर्भ) येथे मातुःश्री जिजामाता स्मारक उभारण्याची योजना आखून ग्रामीण स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या शिक्षणाचे केंद्र म्हणून शिंदखेड राजा हा गाव बनावा, या उद्देशाने कार्यास प्रारंभ केला. मातुःश्री जिजामाता स्मारकसमितीची स्थापना केली. या समितीच्या कार्याची सर्वांगीण उभारणी करणे हे त्यांच्या नंतर महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक सेवकांचे पवित्र उत्तरदायित्व आहे.

(नवभारत, जानेवारी, १९६४ पृ. ४९-५०)

○○○

३६

दिवंगत लालबहादूर शास्त्री

पं. जवाहरलाल नेहरूनंतर त्यांची उणीव कोण भरून काढील हा प्रश्न त्यांच्यासमक्ष अखेरच्या कालखंडात आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चिला जात होता. नेहरूची जागा भरून काढणारा कोणीही माणूस दिसत नाही, असे निराशाकारक उत्तर त्या प्रश्नाने सुचविले जात होते. नेहरूनिधनानंतर लालबहादूर शास्त्री हे भारताचे प्रधानमंत्री म्हणून फारसा वाद न होता निवडले गेले. थोड्याच अवधीत ती उणीव भरून निघाल्याचे समाधान या देशाला प्राप्त झाले. शास्त्री यांची निवड व्हावी ही कल्पना नेहरूनादेखील समाधान देत असावी याची साक्ष नेहरूच्या अखेरच्या दिवसातील वर्तनावरून सहज मिळते. पं. नेहरूची उणीव शास्त्रींच्या योगाने भरून निघाली एवढेच नव्हे तर नेहरूच्या राजकारणातील व अर्थकारणातील उणिवाही शास्त्री भरून काढतील अशी आशाही थोड्याच अवधीत शास्त्रींनी निर्माण केली. नेहरू फार मोठे, भारतासारख्या विशाल लोकशाही राष्ट्राचे महान प्रतीक; जागतिक नेतेही. या फार मोठ्या व्यक्तीने मोठी ऐतिहासिक कार्ये केली. आशिया, आफ्रिका इत्यादी मागासलेल्या जगातील एका अद्ययावत लोकशाहीची पायाभरणी केली. अर्थविकसित राष्ट्राला आवश्यक असलेल्या विकास योजनांचे तंत्र निर्माण केले; जागतिक शांततेचे युग अवतरावे म्हणून काही मूलभूत सिद्धान्तांवर आधारलेल्या प्रथा स्थापित करण्याचा प्रयत्न केला. अशा मोठ्या गोष्टी करीत असतानाही काही मोठ्या चुका झाल्या. त्या निस्तरण्यास समर्थ असा, व्यावहारिक दृष्टिकोनाचा, ध्येयवादी माणूस शास्त्रींच्या रूपाने भारताचे नेतृत्व करू लागला. नेहरूंचे रिते उच्च स्थान भरून काढणारी लोकशाही व्यक्ती भारतामध्ये आहे ही गोष्ट शास्त्रींच्यामुळे प्रत्ययास आली. लोकशाहीमध्येच अशी सर्जनशक्ती असू शकते! लोकशाही खरीखुरी असेल तर तिच्यात अशी शक्ती असू शकते, आणि अशी शक्ती लोकशाहीमध्येच असू शकते. नेहरूंनंतर कोण याचे अस्तिपक्षी उत्तर लोकशाहीनेच दिले. येथील लोकशाहीबद्दल शंका होती, म्हणूनच असा प्रश्न निघाला.

लोकशाहीच्या म्हणून काही मूलभूत जाणिवा असतात. या जाणिवांची बीजे लोकशाहीच्या निर्मितीचे प्रयत्न होत असतानाच रोवली जातात. हस्तिदंती महालात राहून लोकशाहीचे पांडित्य करणाऱ्या विद्वानांमध्ये या जाणिवा असतीलच, असा निर्वाळा देणे कठीण असते. या जाणिवा विवेकबुद्धीच्या भावनामय अंतरंगात वाढीस लागाव्या लागतात; त्या आचरणाने निर्माण होतात व आचरणाने व्यक्त होतात. शास्त्रींचे आचरण लोकशाही संस्कृतीचे दर्शक होते. ही त्यांची लोकशाही संस्कृती दीर्घकालपर्यंत घडविली जात होती. त्यांच्या जीवनाच्या चित्रपटात प्रथमपासून अखेरपर्यंत या लोकशाही संस्कृतीची कथा चित्रित झालेली प्रत्ययास येते. बरोबर सहकार्य करण्याचा लाभ झाला होता. उच्च दर्जाचे व्यापक जीवनशिक्षण त्यांच्या भाग्याला आले होते. त्यांनी सार्वजनिक दीर्घ जीवनात मिळविलेला अनुभव अत्यंत समृद्ध होता. या दीर्घकाल सुप्त असलेल्या राष्ट्राला जागृत करून जीवनसंग्रामात सज्ज करणाऱ्या मोठमोठ्या आंदोलनांत आघाडीचे वीर म्हणून प्रवेश केल्यापासून शास्त्रींनी तरुणपणीच मोठमोठी कार्य केली, विचार व विवेक अत्यंत परिपक्व बनला; विशाल शील अंगी बाणले. त्यामुळे आपल्या उच्च पदस्थ सहकाऱ्यांना बरोबर घेऊन जाणारा धुरंधर नेता या नात्याने गेल्या १८ महिन्यांच्या अवधीत जागतिक पातळीवरील निर्णय घेण्यात यश संपादिता आले. निगर्वी, शालीन, समंजस व सौजन्यशील असा शास्त्रींसारखा नेता लाभणे हा एक राष्ट्रीय चमत्कारच म्हटला पाहिजे. "अत्यंत थोड्या अवधीत अत्यंत परिणामकारक ठरलेला प्रभावी प्रधानमंत्री भारताला लाभला असे मँचेस्टर येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'गार्डिअन' पत्राने तेव्हा म्हटले होते.

गंगाजलासारख्या शुद्ध शीलाचा हा माणूस गंगेच्या तीरावर ऑक्टोबर २, १९०४ साली जन्मला. उत्तर प्रदेशातील वाराणशी जिल्ह्यात वाराणसीजवळील मोगलसराय या लहान गावात श्रीवास्तव घराण्यात त्यांचा जन्म झाला. ते १८ महिन्याचे असतानाच त्यांचे वडील निवर्तले. त्यांचे वडील शारदाप्रसाद प्राथमिक शाळामास्तर होते. त्यांचे लहानपण आजोळी वाराणशी येथे गेले. पहिले शिक्षण वाराणशीतील हरिश्चंद्र विद्यालयात झाले.

स्वातंत्र्य संग्रामातच उच्चशिक्षण

म. गांधींनी पहिले महायुद्ध संपल्यानंतर रौलॅट कायद्याविरुद्ध असहकारितेचे आंदोलन पुकारले. ह्या आंदोलनात वयाच्या १७ व्या वर्षीच लालबहादूर यांनी भाग घेतला. सरकारी विद्यालयांचा व सरकारी नोकऱ्यांचा बहिष्कार हा या आंदोलनातील कार्यक्रमाचा भाग होता. सरकारी विद्यालयातून लालबहादूर बाहेर पडले. १९२१ साली गांधींना राजद्रोहाबद्दल कारावासाची शिक्षा झाली, लाल बहादुरांनाही याच वेळी कारावास घडला. असहकारितेच्या आंदोलनात सरकारी विद्यालयातून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांकरिता राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्था स्थापन झाल्या होत्या. त्यांपैकीच काशी विद्यापीठ ही उच्च महाविद्यालयीन शिक्षण देणारी संस्था कै. शिवप्रसाद गुप्ता यांच्या आर्थिक मदतीने स्थापन झाली. काशी विद्यापीठात

लालबहादुराचे उच्च शिक्षण झाले. मानवतावादी तत्त्वज्ञ बाबू भगवानदास यांच्या हाताखाली त्यांनी तत्त्वज्ञानाचे अध्ययन केले. या विद्यापीठातच पुरुषोत्तमदास टंडन, संपूर्णानंद आणि आचार्य कृपलानी यांचा सहवास त्यांना लाभला. काशी विद्यापीठाची शास्त्री पदवी परीक्षा ते चांगल्या रीतीने उत्तीर्ण झाले. लगेच वयाच्या तेविसाव्या वर्षीच ललितादेवी या शालीन ललनेशी ते विवाहबद्ध झाले. अनेक तपे आर्थिक विपत्तीत व सत्याग्रह संग्रामात गेली तरी या महिलेने गुण्यागोविंदाने संसार केला.

राजनैतिक जबाबदाऱ्यांच्या द्वाराच जीवनाचा समृद्ध अनुभव

लाला लजपतराय यांनी स्थापन केलेल्या 'सर्व्हंट्स ऑफ दि पीपल सोसायटी' या संस्थेचे १९२६ साली ते आजीव सदस्य बनले. १९१८ ते १९४५ हा "स्वराज्य" आंदोलनाचा अत्यंत खळबळीचा कालखंड होय. दहा-बारा वर्षांच्या अंतराने एका पाठीमागून एक अशी भारतीय जनसागराचे मंथन करून टाकणारी प्रचंड वादळी आंदोलने घडून आली. असहकारिता, सविनय कायदेभंग आणि चलेजाव या आंदोलनांचा अद्वितीय नेता म्हणजे म. गांधी होत. तो वायुदेवच. दुसरी उपमाच नाही. या सर्व आंदोलनांची प्रवर्तक संघटना भारतीय काँग्रेस होय. उत्तर प्रदेशातील काँग्रेस संघटनेचे कुशलतेने कार्य करणाऱ्यांत लाल बहादूरशास्त्री हे मोठमोठ्या नेत्यांच्या डोळ्यांत भरत होते. शेकडो व हजारो कार्यकर्ते या आंदोलनात भाग घेत होते. त्यांच्यात मतभेद उत्पन्न होत व प्रसंगी विरोधही माजत. अत्यंत मुकाट्याने मतभेद मिटविण्याची व विरोध शमविण्याची कामगिरी लाल बहादूरशास्त्री बजावीत असत. १९३५ पासून आतापर्यंत उत्तर प्रदेशातील प्रत्येक सामान्य निर्वाचनसमयी शास्त्रींनी कुशलतेने कामे पार पाडली आहेत.

उत्तर प्रदेश काँग्रेस कमिटीचे १९३५ ते १९३८ सचिवपद संभाळले. १९४६ मध्ये उत्तर प्रदेश काँग्रेसच्या संसदीय समितीचे सचिवपद भूषित केले. १९५१ मध्ये स्वतंत्र भारताच्या सामान्य निर्वाचनाच्या प्रसंगी काँग्रेसचे ते मुख्य सचिव होते. १९५६-५७ च्या दुसऱ्या सामान्य निर्वाचनाच्या समयी ते काँग्रेसच्या निर्वाचन समितीचे प्रमुख होते. १९६० मधल्या केरळमधील पेचप्रसंगात झालेल्या निर्वाचनाच्या अगोदर काँग्रेसश्रेष्ठींनी केरळमध्ये निर्वाचनाचे धोरण आखण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविली होती. १९४६ साली पं. गोविंदवल्लभपंत हे उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री असताना त्यांच्या हाताखाली संसदीय सचिव म्हणून काम केले. १ वर्षानंतर गृह आणि वाहतूकमंत्री म्हणून १९५१ पर्यंत कारभार केला. १९५१ मध्ये राजीनामा देऊन ते काँग्रेसचे सामान्य सचिव बनले. १९५२ मध्ये राज्यसभेवर निवडणूक होऊन रेल्वे व वाहतूक खात्याचे केंद्रीय मंत्री बनले. १९५६ च्या नोव्हेंबरमध्ये अलियालूर येथे रेल्वे अपघात होऊन १४४ माणसे दगावली. याबद्दल अंतःकरणाला धक्का बसून त्यांनी आपल्या मंत्रिपदाचे त्वरित त्यागपत्र दिले. या प्रसंगी सर्व देशाने त्यांची वाहवा केली. नेहरू म्हणाले "शास्त्रीजींपेक्षा अधिक प्रामाणिक माणूस मला माहीत नाही. उच्चतम ध्येयाबद्दल कमालीची निष्ठा बाळगणारे ते आहेत. सदसद्विवेकबुद्धी ही त्यांचे

वरिष्ठ न्यायालय आहे. पराकाष्ठेचे श्रम करण्याची शक्ती त्यांच्या ठायी आहे. कोणत्याही माणसाला इतका चांगला मित्र आणि सोबती मिळणे शक्य नाही.'' १९५७ च्या सार्वत्रिक निर्वाचनामध्ये अलाहाबाद पश्चिम निर्वाचन क्षेत्रातून ते लोकसभेवर निवडून आले आणि केंद्रशासनाच्या मंत्रिमंडळात प्रथम वाहतूक आणि दळणवळण खात्याचे मंत्री म्हणून काम केले; आणि वर्षानंतर व्यापार व उद्योग मंत्री म्हणून कारभार करू लागले. १९५९ मध्ये त्यांना कामाचा फारच ताण पडला. केरळमध्ये पक्षोपपक्षांच्या कटकटी मिटविण्यामध्ये रात्रंदिवस गाठीभेटी व चर्चा सतत कराव्या लागल्या. त्याच साली अलाहाबाद विभागात दुष्काळ पडला. त्यातही खूप परिश्रम झाले. यामुळे पहिल्यांदा हृदयविकाराचा सौम्य झटका आला. १९६१ साली गोविंदवल्लभपंतांच्या मृत्यूनंतर केंद्राचे गृहमंत्रिपद स्वीकारावे लागले. केंद्राचे गृहमंत्रिपदाला या कालखंडात राष्ट्राच्या अंतर्गत असलेल्या कठीण प्रश्नांना तोंड द्यावे लागले. आसाम व केरळ येथील वाढत्या कटकटी, गोव्यातील काँग्रेस निवडणूक, महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांमधील सीमातंटा आणि या सर्वांत अधिक गुंतागुंतीच्या पंजाबी सुभ्याच्या मागणीची भर या सर्व विवादांचा फार ताण सोसावा लागला. या सर्वांत कडी म्हणजे काँग्रेस पक्षाकडे दीर्घकाल सत्तेची सर्व सूत्रे राहिल्यामुळे वरिष्ठ पातळीवरील सत्ताधाऱ्यांमध्ये भ्रष्टाचार माजल्याच्या तक्रारींच्या राशी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या दप्तरखात्यात साठून त्यांचे डोंगर पडू लागले. सबंध देशामध्ये कुजबुज व गलबला सुरू झाला. पं. नेहरू का कोणास ठाऊक, तिकडे कानाडोळा सारखा करीत होते. ज्याच्या रथाचे चाक भूमीला कधीच स्पर्शिले नाही, अशा या धर्मराजाला या भ्रष्टाचाराचे आव्हान स्वीकारावे लागले. केंद्रीय चौकशी मंडळ आणि संथानम् समिती त्यांनी नेमली. १९६३ मध्ये नेपाळ आणि भारताचे बिघडलेले संबंध सुधारण्याकरिता त्यांनी खाटमांडूला प्रयाण केले. नेपाळ व भारत यांचे संबंध सुधारण्यात यशाची पहिली पायरी त्यांनी त्या वेळीच गाठली. तेव्हापासून आतापर्यंत हे संबंध अधिकाधिक सुधारत आहेत.

नेहरूंची वारसदारी

१९६३ च्या ऑगस्टमध्ये कामराज योजना अमलात येऊ लागली. त्यात त्यांनी आपणहून केंद्रीय मंत्रिपदाचा त्याग केला. सत्तात्यागाची कायमची तयारी असलेला असा एकच स्थितप्रज्ञ जनकराजा भारताच्या गेल्या १८ वर्षांच्या स्वातंत्र्य कालखंडात उजळून दिसला, परंतु अशीच माणसे सत्तायुगाला सत्ययुगाचे परम मंगल रूप देण्यास समर्थ होतात. पं. नेहरूंना आपला वारस कोण याचे उत्तर शास्त्रींच्या स्वरूपात दिसत होते. बिनखात्याचे केंद्रमंत्री म्हणून १९६४ च्या जानेवारीत त्यांची नेमणूक झाली. लगेच फेब्रुवारी १९६४ च्या पहिल्या आठवड्यात हजरतबाल प्रकरणी त्यांना काश्मीरचा दौरा करावा लागला. म. पैगंबराचा पवित्र केस चोरीस गेला म्हणून काश्मीरमध्ये जातीय दंगल माजली. मुल्ला मौलवींच्या पोटात शिरून शास्त्रींना हरवलेला तो सूक्ष्म केस कसून शोध केल्यावर सापडला.

शास्त्रीजींच्या मुत्सद्देगिरीची कसोटी लागली. पं. नेहरूंची प्रकृती ढासळत होती. त्यांच्या स्वतःच्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडणारा माणूस त्यांनी नेमला. डावे गट व उजवे गट या दोघांनाही आपल्या समत्वबुद्धीने सभाळणारा व लोकशाही समाजवादाकडे संथपणे नेऊ शकणारा हाच माणूस होय, अशी प. नेहरूंची खात्री होती. १९६४ मे २७ ला नेहरूंचा अस्त झाला आणि जून २ ला एकमताने शास्त्रींची पक्षनेता म्हणून निवड झाली. आणि जून १६ ला त्यांचा भारताचे महामंत्री म्हणून शपथविधी झाला. मंत्रिमंडळाची पुनर्घटना करताना त्यांना फार मानसिक यातना सोसाव्या लागल्या. कठोर निर्णय घ्यावे लागले. या घालमिलीत फार शीण झाला. जूनच्या अखेरच्या आठवड्यात पुनः हृदयविकाराचा झटका आला. वैद्यकीय सल्ल्यानुसार पूर्ण विश्रांती- २५ जुलैपर्यंत घेतली. जगभर या घटनेचे अत्यंत उचित निवड म्हणून स्वागत झाले.

पंजाबचे तत्कालीन मुख्यमंत्री कैरा यांचे त्यागपत्र घेणे नेहरूंनाही जमले नाही. शास्त्रींनी दास आयोगाचा वृत्तांत प्रसिद्ध करून कैरांचे त्यागपत्र घेतले. हा धैर्य, ऋजुता व न्यायबुद्धी यांचा देशातील सर्व पक्षांना मान्य झालेला विजय ठरला.

जागतिक राजकारणात पाऊल टाकल्यावरोवरच कैरो येथे भरलेल्या अलिप्ततावादी व शांततावादी स्वतंत्र राष्ट्रांच्या सत्ताप्रमुखांच्या परिषदेत शास्त्रींनी तारीख ७ ऑक्टोवर १९६४ रोजी जे प्रभावी भाषण केले, त्यामुळे पं. नेहरूंच्या स्थानी आलेला नवा मनुष्य जागतिक शांततेचा मोठा पुरस्कर्ता आहे हे निदर्शनास आले. त्या ठिकाणी शास्त्रींनी संयुक्त राष्ट्र संघटनेचा पुरस्कार करून अणुनिःशस्त्रीकरणाला प्रथम स्थान दिले. या वेळी लाल चीनने अणुबांबचा स्फोट केला होता. रशिया व चीन यांचा सरहद्दवाद विश्वशांतीस धोक्याचा ठरेल असे बजावून रशिया व भारत यांच्यातील नेहरूंनी निर्माण केलेले स्नेहाचे संबंध अधिक दृढ केले. शास्त्रींनी आपली पाच कलमी योजना तेथे घोषित केली. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री डीन रस्क यांनीही त्या पाच कलमांचे स्वागत केले. भारतात परतल्यानंतर शास्त्रींनी कोलंबो व भारत संबंध सुधारण्याकरिता लंकेची वारी केली. सिलोनच्या पंतप्रधान श्रीमती सिरीमाओ बंदरनायके या भारतविरोधी व चीनशी संगनमत करणाऱ्या राजकारणी महिलेचे मन वळवून कोलंबोमधील भारतीयांच्या दीर्घकालीन समस्या न्याय्य स्वरूपात सोडविण्यासंबंधी उभयसंमत करार केला.

भारताच्या भोवतालच्या निकटच्या लहानमोठ्या देशांचे राजनैतिक व सांस्कृतिक संबंध सुधारणे व सहानुभूतिपूर्ण करणे ही भारताची आंतरराष्ट्रीय राजकारणातील अत्यंत पहिली गरज आहे. याची उत्कट जाणीव चिनी आक्रमणानंतर भारतीय राजकारणात प्रतिबिंबित होऊ लागली. निकटच्या देशांचे संबंध हे भारताच्या सीमा संरक्षणाच्या दृष्टीने सर्वांत अधिक महत्त्वाचे आहेत अशी जाणीव शास्त्री यांच्या राजकीय व्यवहारामध्ये दृढमूल झालेली दिसली. नेपाळ, सिलोन, ब्रह्मदेश, अफगाणिस्तान या लहान देशांच्या संबंधांकडे

लक्ष अधिक प्रमाणात त्यांनी वेधले व त्याप्रमाणे महत्त्वाची पावलेही टाकली. भारताच्या भोवतालच्या देशांपैकी भारत पाकिस्तानचे भारताशी असलेले संबंध कसे सुधारावेत हा आंतरराष्ट्रीय राजकारणातला अत्यंत जटिल प्रश्न आहे व तो प्रश्न लोंबकळत ठेवणे अत्यंत धोक्याचे आहे याची तीव्र जाणीव शास्त्रींना होती. सर्वांत मोठा धोका चीनचा असला तरी त्या धोक्याची जबाबदारी भारताबरोबरच जगातील अन्य मोठमोठ्या राष्ट्रांवरही पडते. त्या जबाबदारीची संपूर्ण कल्पना रशिया, पश्चिमी राष्ट्र व विशेषतः अमेरिका यांना असल्यामुळे भारताच्या मनावरील ताण सह्य बनतो. पाक-भारत संबंधांची गोष्ट अगदी वेगळी आहे. भारत-पाक संबंध असेच तणातणीचे किंबहुना वैराचे दीर्घकालपर्यंत राहिले तर हे दोन्ही देश सुंदोपसुंदीमध्ये खलास होतील याबद्दल शास्त्रींना शंका नव्हती. लाल चीनचा प्रश्न आंतरराष्ट्रीय जबाबदारीचा असल्यामुळे संयुक्त राष्ट्र संघटना बलवान करून तो सुटू शकेल अशी शास्त्रींची धारणा होती. विशेषतः लाल चीनच्या अणुबाँबचा धोका टाळण्याकरिता भारतानेही अणुबाँब उत्तरास प्रत्युत्तर म्हणून तयार करावा या कल्पनेचा स्वीकार शास्त्रींनी केला नाही, याचेही समंजस उत्तर शास्त्रींच्या वरील धारणेतच सापडते. शिवाय, अणुबाँव निर्मितीचे अर्थशास्त्र हे भारताच्या अर्थरचनेस रसातळास पोचवील हेही कारण या संदर्भात ध्यानात ठेवण्यासारखे आहे. भारत-पाक संबंध सुधारल्यास लाल चीनचा धोका टाळण्यास आंतरराष्ट्रीय शक्तीचे फार मोठे साहाय्य बिनदिक्कत मिळू शकते असाही अंदाज शास्त्रींनी मनाशी बांधला होता. म्हणूनच पाकशी विचारविनिमय करण्याची प्रत्येक संधी साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ११ ऑक्टोबर १९६४ रोजी कैरोहून परत येताना ते कराची येथे मुद्दाम उतरले. तेथे पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल अयूबखान यांची भेट घेऊन अयूबखानाचे अंतरंग शोधण्याचा प्रयत्न केला. संबंध सुधारण्याची शक्यता वाढली.

परंतु काय झाले कोणास ठाऊक! अयूबखानने कच्छच्या रणावर आक्रमण सुरू केले. जे संबंध सुधारतील अशी आशा होती ते अधिकच बिघडले. ब्रिटनने मध्यस्थी केल्यामुळे कच्छच्या रणावरील आक्रमणातून उत्पन्न झालेला व्यापक रणसंग्राम टळला. परंतु तो तात्पुरताच ठरला. १९६५ च्या १ सप्टेंबरपासून पुन भारत-पाक संघर्ष प्रत्यक्ष युद्धाचे उग्र रूप घेऊन बाहेर पडला. सगळे जग चिताक्रांत झाले. योगायोगाने २२ दिवसांच्या अवधीत हा संग्राम समाप्त झाला. संयुक्त राष्ट्र संघटनेची मध्यस्थी उपयोगी पडली. शस्त्रविराम उभयपक्षी मान्य झाला तरी प्रत्यक्षात घडून आला नाही. रशियाने मध्यस्थी केली. ताश्कंदला ४ जानेवारीपासून ११ जानेवारी १९६६ पर्यंत शास्त्री-अयूब यांच्यात रात्रंदिवस वाटाघाटी झाल्या. देवासुरांच्या समुद्रमंथनाप्रमाणे भारत-पाक संबंधातले एकूण सर्वच प्रश्न चर्चिले गेले. कोणताही प्रश्न शिल्लक ठेवला नाही. दोन्ही राष्ट्रांना सन्मानास्पद असा शांत करार झाला. संबंध जसे सुधारत जातील तसे प्रश्नही स्वाभिमान न सोडता परंतु औदार्याने व देवघेवीने सोडवू असे इंगित या कराराच्या पाठीमागे आहे. त्यात काश्मीरचाही मुद्दा गर्भित असावा

असेही म्हणण्यास हरकत नाही. १० जानेवारी हा तो कराराचा दिवस होय. या कराराचे अभिनंदन व शुभचिंतन सर्व युरोपियन राष्ट्रांनी आणि अमेरिकेने केले. जपाननेही केले. रात्री बारा वाजल्यानंतर ही शुभरात्र काळरात्र बनली. शास्त्रींनी ११ तारीख लागल्यानंतर रात्री २ च्या सुमारास या लोकची महायात्रा संपवली. भारत-पाक कराराच्या अमृतकलशाची भारतास अखेरची महनीय देणगी देऊन ते अमर बनले.

अमृताला जन्म देणारा देवदूत

अजातशत्रू व मानव्याचे भवितव्य घडविणाऱ्या देवदूतांची ही परंपरा आहे. या देवदूतांच्या मृत्यूतूनच मानव्याचे भव्य आणि अमर भवितव्य घडवावे असा जणू काय नियतीचा संकेत असावा असे भासते. भारत-पाक संघर्षाने जगाचे भवितव्य धोक्यात येते की काय अशा भीतीने शांततेचे मुत्सद्दी शंकित झाले होते. या संघर्षाने निर्माण झालेली व आक्रमण करू लागलेली काळरात्र संपवीत असतानाच हा वामनावतार काळाच्या अधीन झाला. ध्येयवाद, मुत्सद्देगिरी व राष्ट्रनिष्ठा यांचा त्रिवेणी संगम लालबहादूर शास्त्री यांच्या ठिकाणी झाला होता. महात्मा गांधी यांनी जगाच्या राजनीतीला अंतिम नीतिनिष्ठेचे पावित्र्य देण्याकरिता अनेक तपे जो शांतिमय संग्राम चालविला, त्या दीर्घ संग्रामातून भारतीय स्वातंत्र्याचे राजकारण निर्माण झाले आहे. अहिंसेचा व मानव्यावरील श्रद्धेचा राजनीतीच्या क्षेत्रात व्यापक प्रमाणातील प्रयोग जागतिक संस्कृतीच्या इतिहासात प्रथम गांधीजींनीच केला. त्या दीर्घ संग्रामामध्ये ज्या शुभशक्ती उन्मेष पावल्या, त्यातीलच एक उन्मेष म्हणजे लालबहादूर शास्त्री यांचे व्यक्तिमत्त्व होय. भारत-पाक संघर्ष तीव्र होऊ लागला तेव्हा गांधींचा हा पवित्र, उत्तमोत्तम वारसा गांधींच्या राखेतच लुप्त झाला की काय अशी निराशामय शंका मानव-संस्कृतीच्या चिंतकांच्या हृदयाला खिन्न करू लागली. परंतु त्या शुभशक्तीचा हा उन्मेष आशेचा किरण दाखवीत होता.

उपेक्षित अधिष्ठान

भारत-पाक स्नेहसंबंधाला हुतात्म्या-महात्म्याचे अधिष्ठान १८ वर्षांपूर्वी प्राप्त झाले. मनुष्याच्या इतिहासात अंतिम नैतिक तत्त्वांचा विजय होण्याकरिता हुतात्मा लागतो. सतत सत्यान्वेषी बुद्धीच माणसाला तारते. त्याकरिता स्वतःच्या अज्ञानबंधनाची नित्य जाणीव पाहिजे, असा मानवी बुद्धीला दास्यातून मुक्त करणारा विचार सॉक्रेटिसने सांगितला. त्याकरिता सॉक्रेटिसला हसत हुतात्मा बनावे लागले. दैन्यग्रस्त मानव्याच्या सेवेतूनच व प्रेमातूनच ईश्वराचे दर्शन घडू शकते, ईश्वरापाशी जाता येते, असा देवाचा आदेश देणाऱ्या ख्रिस्ताला त्याकरिता हुतात्मा बनावे लागले. परंतु धर्मसंस्था व धर्मसंस्थेच्या आधारावर निर्माण झालेली समाजसंस्था मानव समाजामध्ये अंतर्विग्रह वाढविते हा गेल्या दोन सहा वर्षांच्या इतिहासाचा एक महत्त्वाचा अर्थ आहे. धर्मसंस्थांच्या विग्रहामध्ये अनंत मानवांचे

रक्त सांडत आले आहे. या रक्तकलंकित इतिहासाची पुनरावृत्ती भारताच्या स्वातंत्र्याच्या नांदीच्या वेळी घडली. हुतात्म्याच्या परंपरेमध्ये त्याच इतिहासाच्या शापाने गांधींचे बलिदान दिले. शापमुक्ती होईल अशी आशा या बलिदानाने अधिक दृढावली. मानव्याच्या करुणेकरिता गांधींनी आत्मबलिदान केले. आधुनिक जगाने या संघर्षाची समाप्ती केल्याशिवाय मानव्याला या पृथ्वीवर जगण्याची आशा नाही, म्हणून गांधींचे बलिदान झाले. त्या बलिदानाने निर्माण झालेले अधिष्ठान गेली १७ वर्षे तसेच उपेक्षित होऊन पडले.

मूर्तिमंत आशीर्वाद

या उघड्यावर पडलेल्या अधिष्ठानाभोवती त्याला उद्ध्वस्त करणाऱ्या अनिष्ट प्रवृत्तींची मुळे रुजून त्यांत घुसू लागली. गेल्या १७ वर्षांच्या भारतीय राजकारणात व अर्थकारणात अशा अनेक उणिवा व दोष उत्पन्न झाल्यामुळे त्यापासून भारतीय राजकारण व अर्थकारण वाचविण्याकरिता गांधींचा मूर्तिमंत आशीर्वादच असलेला माणूस नुकताच पुढे आला, तो म्हणजे लालबहादूर शास्त्री होय.

लालबहादूर शास्त्री यांचे बालपण व तारुण्य अत्यंत गरिबीत गेले. वर सांगितल्याप्रमाणे तारुण्याच्या उमेदीमध्येच त्यांनी गांधींच्या राजकीय मार्गाची दीक्षा घेतली. गांधींनी असहकारितेचे आंदोलन सुरू केल्यानंतर त्यामध्ये असंख्य तरुण स्त्रीपुरुष सामील झाले. गांधींच्या राजकारणाला प्रारंभ होईपर्यंत या देशाचे स्वराज्याचे आंदोलन भारतीय समाजातील सुशिक्षित अल्पसंख्यांकामध्येच मर्यादित राहिले होते. थोड्याशा शहरांच्या बाहेर वसलेल्या कोट्यवधी भारतीय जनतेला राजकीय स्वातंत्र्याच्या कल्पनेचा स्पर्शही नव्हता. भारतच नव्हे, तर पश्चिमी राष्ट्रांच्या शिवाय असलेल्या सर्व जगातील जनताच राजकारणापासून वंचित होती. या जगात लोकशाहीला अधिष्ठानच नव्हते. सर्वसामान्य जनतेची राजकीय जाणीव हीच लोकशाहीची मूलभूत प्रेरक शक्ती होय. या मागासलेल्या विशाल मानवी जगात लोकशाहीला भवितव्यच नव्हते. या लोकशाहीच्या भवितव्याचे सुंदर बीजारोपण करून त्यावर त्यागमय जीवनाचे पर्जन्याप्रमाणे दीर्घकाल सिंचन करणारा महामेघ पूर्वेस महात्मा गांधींच्या रूपाने अवतरला. तोपर्यंत जागतिक लोकशाही लहानशा पश्चिमी देशांच्या परिसरातच शतकानुशतके निरुद्ध होती, व ती तशीच आणखी काही दशके निरुद्ध राहिली असती, तर तिला या भूगोलावरून कायम जावे लागले असते. महात्मा गांधींनी अहिंसेचे राजकारण पश्चिमी साम्राज्यसत्तेखाली वाढीस लावले नसते, तर या तथाकथित मागासलेल्या जगात दडपलेल्या मानव जातीतून हिंसक शक्तीच शस्त्रधाऱ्यांच्या नेतृत्वाखाली गनिमी काव्याच्या लढाया लढत उफाळून आल्या असत्या. या मागासलेल्या जगातील शस्त्रधाऱ्यांना मूलभूत मानवी हक्कांची सांस्कृतिक परंपरा नसल्यामुळे त्यांनी स्थापलेली राज्ये ही लोकशाहीला वर डोके न काढू देणारे अभेद्य किल्लेच ठरतात. अशा अभेद्य किल्ल्यांची बांधणी भारतातही होऊ शकली असती. फासावर जाणाऱ्या

देशभक्तांच्या वीरगाथांनी प्रेरित झालेली संघटित, सशस्त्र दले गांधींच्या राजकारणामुळे निर्माण होऊ शकली नाहीत. त्यामुळे ब्रिटिश साम्राज्यसत्ता येथून निवृत्त होत असता पश्चिमी लोकशाही परंपरेची देणगी तिला येथेच ठेवावी लागली; याचे असाधारण कारण गांधींनी निर्माण केलेले सत्याग्रही व अहिंसावादी राजकारण होय. त्या अहिंसावादी राजकारणाने येथील लोकशाहीची विशाल राज्यसंस्था निर्माण झाली आहे. लोकसंख्येने जगात सर्वांत मोठ्या असलेल्या या लोकशाही राज्यसंस्थेला धर्मविग्रहातीत अशी समाजसंस्थाच बलिष्ठ आधार देऊ शकते. भारतपाक विग्रह या आधाराला धोका निर्माण करीत आहे.

हिंदु-मुस्लीम ऐक्याची ग्वाही देणारे निर्वाण

भारत-पाक संघर्ष या विशाल उपखंडातून नाहीसा झाल्याशिवाय आशियातील शांती व लोकशाही यांना स्थिरता लाभणे शक्य नाही. भारत-पाक संघर्ष हा भारतीय लोकशाहीचा वैरी आहे. भारत व पाकिस्तान या दोन राज्यांच्या परस्पर स्नेहाच्या व मैत्रीच्या दृढसंबंधांच्या निर्मितीनेच येथील लोकशाही समर्थ व कार्यक्षम बनून चिरकाल टिकू शकेल. भारत-पाक स्नेहसंबंधांचा या उपखंडातील मानवी स्वातंत्र्याशी तादात्म्य संबंध आहे. पाक-भारताच्या थोर भवितव्याची उभारणी करणाऱ्या शक्तीचे प्रतीकच लालबहादूर शास्त्री होते. ते गेल्या वर्षातील बावीस दिवसांच्या सशस्त्र विग्रहात अप्रतिम संयमाने लढत उभे होते. परंतु त्याबरोबरच त्यांच्या हृदयात गांधीवादी निष्ठाही त्यांच्या विवेकाला आवर्जून, सावधपणे हळुवारपणे जपत होती. हिंदु-मुसलमानांचे समत्व व भ्रातृत्व उजळण्याकरिता गांधींची दिव्य आहुती पडली होती. ती त्यांच्या हृदयाला उजळवीत होती. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रांच्या हाकेला क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी साद दिली. पश्चिमी लोकशाही राष्ट्रांचे मनोगत व सोव्हिएत युनियनचे आवाहन या ऐतिहासिक पेचप्रसंगात उपयोगी पडले. ताश्कंदला शास्त्री व अयूबखान यांच्या विचारमंथनातून जो निष्कर्ष निघाला, तो देवासुरांच्या समुद्रमंथनातून निघालेल्या अमृतासारखा आहे. मेरु-मंदारासारखी भव्य गांधीवादी निष्ठा या मंथनामध्ये विचारसागर ढवळीत होती. हा थोर माणूस ते अमृत घेऊन भारताकडे प्रस्थान करावयास निघाला होता. मृत्यूच्याच दारातून अमृताचा मार्ग जातो हे एक जीवनाचे प्रखर व दाहक सत्य आहे. अमृताला जन्म देणारा हा थोर देवदूत भारताला जी देणगी देऊन गेला, त्या देणगीचा भारतीय जनतेने व्यथित मनाने, अश्रुसिंचन करीत स्वीकार करावा. अकबर व गांधी यांनी आरंभिलेले महान ऐतिहासिक कार्य, म्हणजे या उपखंडातील हिंदू व मुसलमान या मोठ्या मानवसमूहांची एकी होय. या एकीची यत्किंचितही प्रतारणा होणार नाही अशी निर्वाणीची ग्वाही शास्त्रींचे निर्वाण देत आहे.

(नवभारत, फेब्रुवारी, १९६६, पृ. १ ते ७)

○○○

३७

स्वातंत्र्यवीर सावरकर

गेल्या २६ फेब्रुवारी १९६६ रोजी दुपारी ११ वाजून १० मिनिटांनी मुंबई येथे स्वतःच्या निवासात वयाच्या ८३ व्या वर्षी शांत प्रायोपवेशन करून इहलोकची जीवनयात्रा स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी संपविली. सशस्त्र राष्ट्रीय क्रांती व निधर्मी हिंदू राष्ट्रवाद या दोन कल्पनांमध्ये त्यांच्या जीवनाचा समग्र अर्थ व्यक्त होतो. भारताच्या ब्रिटिशविरोधी स्वातंत्र्यविषयक आंदोलनातील सशस्त्र क्रांतीच्या पर्वाचा मुख्य प्रणेता म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव भारतीय इतिहासात कायम नोंदले गेले आहे. देशभक्तीच्या दाहक तेजाने भरलेल्या प्रतिभेने निर्माण केलेले त्यांचे साहित्य ही सशस्त्र क्रांतीची प्रेरक शक्ती होती. वीररसपूर्ण गद्य महाकाव्यच त्यांनी मराठीत रचले. त्यांच्या राजकीय जीवनाची मूलभूत प्रेरणा भारताच्या भूतकाळाच्या अस्मितेतून निर्माण झाली होती. आधुनिक वैज्ञानिक जगाच्या बुद्धिवादाचा प्रभाव त्या अस्मितेवर पडल्यामुळे भूतकाळातील परलोकवादी श्रद्धा मात्र नष्ट झाली होती. अतातुर्क केमालपाशासारखे ऐहिक राष्ट्रवादाचे जे अनेक प्रणेते या २० व्या शतकात चमकून गेले त्यांच्यामध्ये सावरकरांची गणना करता येते. इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनी याचा आध्यात्मिक राष्ट्रवाद (Mystic Nationalism) त्यांनी स्वीकारला होता. व्यक्तिस्वातंत्र्य नव्हे तर राष्ट्रीय स्वातंत्र्य हे अमरमूल्य होय, अशी गूढवादी श्रद्धा हा या राष्ट्रवादाचा आधार होय. हा एक समुदायात्मवादाचाच प्रकार होय. या राष्ट्रवादाचा भौगोलिक पाया सिंधूपासून ब्रह्मपुत्रेपर्यंत आणि "हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पसरला असला तरी त्याची सामाजिक बैठक मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी सामाजिक गटांना वगळणारी अशीच त्यांना दिसली; ती म्हणजे हिंदुत्व होय. सावरकर हेच भारतातील हिंदुत्ववादी राजकीय विचारांचा प्रमुख तत्त्वज्ञ म्हणून भारतीय राज्यशास्त्राच्या विचारवतांपुढे काही मननीय परंतु विवाद्य विचार मांडून गेले आहेत. लोकशाही जीवनमूल्यांपेक्षा ऐतिहासिक हिंदुत्वाचे सामाजिक ऐक्यच हिंदुराष्ट्रवादाचा पाया म्हणून सावरकरांनी कल्पिला आहे.

त्यामुळे या राष्ट्रवादाच्या प्रेरणेतून भारतीय मुसोलिनी किंवा हिटलरही निर्माण होऊ शकतात. सावरकरांनी क्वचित समाजवादाचे समर्थन केलेले आढळते; तेही या प्रेरणेशी विसंगत नाही, हे युरोपच्या ताज्या इतिहासावरून निदर्शनास येते.

१८५७ चा स्वातंत्र्यसमर

गेल्या २८ फेब्रुवारीला सावरकरांच्या निधनाचा तिसरा दिवस होता. नव्या दिल्लीतील कॅनॉट प्लेसमधील एका कॉफी-पानगृहात दुपारी ११ च्या सुमाराला आम्ही काही मित्रमंडळी जमलो होतो.

योगायोग असा की, या मित्रमंडळीतील तिघेजण भगतसिंग प्रभृतींनी रचलेल्या कटातील सदस्य होते. सुप्रसिद्ध काकोरी खटल्यातील हे प्रमुख आरोपी होते. त्यातील श्री. रामसिंग यांची हल्ली इंग्लिश वृत्तपत्रकर्त्या मंडळींमध्ये ख्यातनाम राजकीय विचारवंत म्हणून गणना होते. सावरकरांचा विचार निघाल्याबरोबर ते म्हणाले, "वैद्युत अग्नीने मंत्रतंत्रावाचून दहन; तीर्थात रक्षा विसर्जन वर्ज्य; श्राद्ध वगैरे धार्मिक विधीस फाटा, सुट्या देऊ नका, काम करा, त्यांचे हे मृत्युपत्र अलीकडच्या भारतीय नेत्यांचे रक्षाविसर्जनादी धार्मिक विधी व भरमसाट सुट्या देण्याची गलथान प्रवृत्ती याला आळा नक्की घालील! नव्हे काय?" मी उत्तरलो- "मला शंका आहे." पुढे रामसिंग म्हणाले, "सावरकरांचे मृत्युपत्र बुद्धिवादाचे उत्कृष्ट प्रमाणपत्रच होय. निधर्मी राष्ट्रवादाचा अहर्निश पुकार करणाऱ्या महान नेत्यांनादेखील जे साधले नाही ते सावरकरांना साधले असे ते पत्र सूचित करीत आहे. विसंगती सावरकरांमध्ये दिसत नाही. सावरकरांचे '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हे पुस्तक आम्ही मुखोद्गत केले होते. त्यातील महत्त्वाचे अनेक संदर्भ आजही आम्हास मुखोद्गत आहेत." विमलप्रसाद जैन त्यापुढे म्हणाले की, 'शास्त्रीजी, 'स्वातंत्र्य समर' हे पुस्तक वाचताना त्यातून क्रांतीच्या ज्वाळा बाहेर पडत असलेल्या आम्हाला दिसत असत.' माझ्याही स्मृतिपटलासमोरून त्यातील अनक संदर्भ प्रखर तेजस्वी अक्षरमालिकेच्या रूपाने तळपत लगेच सरकून गेले. त्यातील एक नमुना असा- "तात्यांच्या पायातील बेड्या काढल्या, तात्या (टोपे) शूरासारखे सरळ पावले टाकीत फासापर्यंत गेले, सरळ शिडी चढून वर फळीवर उभे राहिले, जणू काय ते सभास्थानी स्वागतार्थ उभारलेल्या व्यासपीठावरच चढत होते. रिवाजाप्रमाणे जेव्हा फाशी देणारे मांग तेथे तात्यांचे हात व पाय बांधण्यासाठी पुढे सरसावले तेव्हा तात्या स्मित हास्य करून, 'याची काही आवश्यकता नाही' असे म्हणाले आणि लगेच त्यांनी स्वत चे हातांनीच तो फास एखाद्या हाराप्रमाणे आपल्या गळ्यात घालून घेतला. फळी दूर झाली! फास आवळला गेला! आणि त्या हिसक्यासरशी- तात्या टोपे, पेशव्यांचा एकनिष्ठ सेवक, १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा नायक, हिंदुस्थानचा देशवीर, धर्मरक्षक, अभिमानी व प्रेमळ सेनापती तात्या टोपे याचे मृत शरीर इंग्रजांनी उभारलेल्या फासावर लटकू लागले. तो फास रक्ताने भिजला आणि देश अश्रूंनी ओलाचिंब झाला! देशाच्या स्वातंत्र्यासाठी अत्यंत कष्ट सोसले

हाच त्यांचा अपराध होता! एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे इंग्लिशांनी त्यांना फासावर लटकाविले! तात्या! तात्या! या असल्या दुर्दैवी देशात तुम्ही कशाला जन्म घेतलात? या नीच, महामूर्ख व विश्वासघातकी लोकांकरिता तुम्ही कशाला लढलात? तात्या, आपणासाठी आज आम्ही जे अश्रू ढाळीत आहोत ते आपणांस दिसतात का? या दुर्बळांच्या अश्रूंसाठी आपण रक्त सांडावे! खरोखर कसला हा महागडा सौदा!!

१८५७ च्या त्या स्वातंत्र्ययुद्धातील होमकुंडात तात्यांची ही शेवटची आहुती पडली!

तो भयंकर ज्वालामुखी- ज्याच्या विस्तीर्ण मुखातून क्रोधाविष्ट होऊन मांसाचे, रक्ताचे, प्रेतांचे, विजांचे, वादळांचे आणि लखलखणाऱ्या लाव्हारसाचे कल्लोळावर कल्लोळ बाहेर पडत होते- तो ज्वालामुखी पुन; एकवार आपले तोंड मिटवू लागला; त्याचा तप्त लाव्हा थंड होऊ लागला! त्याच्या तलवारीप्रमाणे तळपणाऱ्या जिव्हा पुनः म्यानात कोषबद्ध झाल्या. त्याच्या लकाकणाऱ्या विजा, कानठळ्या बसविणारे गडगडाट, झंझावात, त्याच्या भयंकर हालचाली व प्रचंड उलथापालथी सर्व काही जादुगाराच्या पोतडीत शिरल्या आणि अदृश्य हवेत विरून गेल्या. आणि आता ज्वालामुखीचा पृष्ठभाग इतका मऊ आणि हसरा दिसू लागला की, त्याच्याच पृष्ठभागाखाली एखादा भयानक ज्वालामुखी असेल याची कोणास शंकासुद्धा येणार नाही!''

- (स्वातंत्र्यसमर, पृष्ठ ४२०-२१)

'१८५७ चे भारतीय स्वातंत्र्यसमर' हा ऐतिहासिक ग्रंथ सावरकरांनी १९०७ या साली इंग्लंडमध्ये असताना मुळात मराठीत लिहिला होता. तो ग्रंथ छापून घेणे, अशक्यप्राय असे जेव्हा लक्षात आले तेव्हा त्याचे इंग्रजी भाषांतर करून हॉलंडमधील एका छापखान्यात छापून त्याच्या शेकडो प्रती वेगवेगळ्या पुस्तकांच्या नावाखाली भारतात गुप्त रीतीने पाठविण्यात आल्या होत्या. या ग्रंथाचे पुनर्मुद्रण फान्समध्ये झाले व त्याच्या शेकडो प्रती जगभर पसरल्या. पुढे १९२७ च्या सुमारास भगतसिंग प्रभृतींनी या ग्रंथाचे गुप्त प्रकाशन दोनदा केले. हा ग्रंथ दुर्मीळ असल्यामुळे कित्येक वेळा क्रांतिभक्तांनी त्याची एकेक प्रत तीन तीनशे रुपये देऊनही विकत घेतलेली आहे. हा मूळ मराठी ग्रंथ मॅडम कामा यांच्याजवळ सावरकरांनी दिला होता. तो बँक ऑफ फ्रान्समध्ये त्यांनी सुरक्षित ठेवला होता.

या 'स्वातंत्र्यसमर' पुस्तकाने सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नांना प्रेरणा दिली. परंतु त्यातील ऐतिहासिक तथ्य तसे प्रेरक नाही असे अलीकडे इतिहासज्ञ म्हणू लागले आहेत. ब्रिटिश राजवटीविरुद्ध असलेल्या उठावास सरंजामशाही प्रवृत्तींचाच क्षोभ कारणीभूत झाला असे इतिहासकार म्हणतात. राष्ट्र व राष्ट्रीय स्वातंत्र्य या भावना भारतीय मनात त्या काळी रुजल्याच नव्हत्या. त्यात मध्ययुगीन शौर्य होते परंतु आधुनिक राष्ट्रीय ध्येयवाद नव्हता, अशी त्या बंडाची मूल्यमीमांसा त्या वेळच्या घटनांच्या आधारे इतिहासज्ञ करीत आहेत. तात्या टोपे हा स्वामिभक्त होता, तो राष्ट्रभक्त तात्या सावरकर नव्हता, असे त्या मीमांसेचे सार

आहे. शतकापूर्वी झालेल्या ऐतिहासिक रणगाथेमध्ये शतकानंतरच्या स्वातंत्र्यवीराने उदात्त भावनेला आवाहन देणारा स्वातंत्र्य समराचा भाव ओतला. ते काहीही असो. सावरकरांच्या 'स्वातंत्र्यसमरा'ने २० व्या शतकातील स्वातंत्र्यसमर भारतात निर्माण केले, यात शंका नाही.

'अभिनव भारत' गुप्तसंस्थेची स्थापना

हा १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा दबलेला ज्वालामुखी पुनः एकदा क्षुब्ध होऊन बाहेर पडावा याकरिताच सावरकरांनी त्याची आराधना वयाच्या २५व्या वर्षापासूनच सुरू केली. हा प्रसंग म्हणजे पुणे येथे प्लेगचा कहर उसळला असता चाफेकर बंधू व रानडे यांनी नागरिकांना छळणाऱ्या दोन गोऱ्या अधिकाऱ्यांचा खून केला व ते त्या भीषण कर्मामुळे फासावर गेले, हा होय. त्यासंबंधी सावरकरांनी म्हटले आहे, चाफेकर फासावर गेले व त्यानंतर आमचा आविर्भाव झाला. चाफेकरांचे कार्य पुढे तसे चालविले पाहिजे ना? तर मग ते मी का चालवू नये. तो होम मीही का करू नये? चाफेकरांच्या प्राणज्योतीने जाता जाता चेतविलेली ही प्रेरणा ज्योत होती. देवीच्या पवित्र चरणांवर हात, डोके यांची साक्ष ठेवून सावरकरांनी प्रतिज्ञा केली की, या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र युद्धात बाजी मारीत चाफेकरांसारखा मरेन किंवा शिवाजीसारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकी या राज्याचा राज्याभिषेक करवीन! ही माझी प्रतिज्ञा अभिनव भारताचे मूळ बीज होती." हे सन १८९८ वर्ष होते. सावरकरांनी त्याच वेळी 'चाफेकरांचा फटका' नावाची कविता रचिली. ही कविता महाराष्ट्रात पुढे १२ वर्षे गुप्तपणे किंवा प्रकटपणे गायिली जात होती. चाफेकरांच्या भीषण कर्माची उलटसुलट चर्चा त्या वेळी महाराष्ट्रातील वृत्तपत्रात सुरू होती. टिळक पकडले जाऊन तुरुंगात डांबले गेले होते; केसरीमध्ये त्या वेळी चाफेकरांना माथेफिरू, वेडेपीर इत्यादी निंदाव्यंजक विशेषणे लावण्यात आली होती. त्याच्या उलट कै. शिवराम महादेव परांजपे यांनी 'काळ' या आपल्या साप्ताहिकात 'चाफेकर आणि रानडे' हा लेख लिहून त्यात चाफेकर हे खुनी नसून हत्यारी हुतात्मे आहेत असा त्यांचा गौरव केला होता. त्या लेखाची सावरकरांनी पारायणे केली. काळातील काही लेख तर त्यांनी दहा दहा वेळा वाचले. काळकर्त्यांच्या अशा प्रकारच्या लेखनाबद्दल दादाभाई नवरोजींनासुद्धा तिटकारा आला. त्यामुळे काळकर्त्यांना काँग्रेसमध्ये प्रवेश त्यांनी नाकारला. सशस्त्र क्रांतीचे समर्थक व सूचक असे सामर्थ्यशाली लेखन करणारे काळाइतके दुसरे कोणतेही वृत्तपत्र मराठीत नव्हते. त्यासंबंधी सावरकर म्हणतात. "माझ्या मतावर नसला तरी माझ्या ज्ञानावर, भाषेवर, संस्कृतीवर आणि उत्साहावर 'काळा'च्या अखंड परिशीलनाचा फारच मोठा परिणाम झाला. इतका की, जर मला माझ्या क्रांतिकारक जीवनाच्या स्फूर्तीचे गुरुपद कोणास तरी देणेच असेल तर ते मी काळासच देऊ शकेन; पण तेही केवळ क्रांतिकारक जीवनाच्या स्फूर्तीचे, कृतीचे नव्हे. क्रांतिकारक संघटनेत आणि प्रत्यक्षात सदैव मलाच माझे पुढारी व्हावे लागले. या क्रियाविणे दुसरा कोणता गुरू वा नेता त्या क्षणी प्रत्यक्ष सक्रिय साहाय्य देणारा

नव्हता, तर सरळ मला नाकारणारेच होते. सशस्त्र क्रांतीच्या काळात प्रकट पुरस्कार केला तर 'काळ'कर्तेच स्वतः केसरीकार (टिळक) नाही, ही गोष्ट त्यांना न सांगताच समजली होती... स्थापणार आस्था, जिंकायला हिंदुस्थानचे स्वातंत्र्य सशस्त्र जरी लढून प्रत्यक्ष इंग्रजांशी! मला तरी ते अगदी विश्वासार्ह, सुसंगत, न्याय्य किंबहुना कोणाही सुज्ञ व स्वप्रज्ञ माणसाचे एक अपरिहार्य कर्तव्य वाटत होते. लो. टिळकांना ते कसे दिसेल, किती माथेफिरूपणाचे भासेल, ते कसे हसण्यावारी ते सर्व नेतील हेही मी जाणून होतो.''

सावरकर इतिहासाच्या परिशीलनाने अशा निर्णयास येऊन पोचले की, भारताचे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हे ध्येय जर स्वीकारले तर त्याची साधना सशस्त्र क्रांतीवाचून दुसरी कोणतीही असणार नाही. ते असे म्हणत की, गोखले प्रभृती नेमस्तांची विनंती, याचना, अर्ज यांनी काही नोकऱ्या देण्यात येतील, स्वामित्व नाही; टिळक प्रभृती राष्ट्रभक्तांच्या निषेध, स्वदेशी, असंतोष, बंदीवास, इत्यादी उपायांनी काही अधिकार देण्यात येतील; परंतु ते अधिकार देण्याचाच अधिकार, ती मूळ सत्ता, मिळणार नाही. या दोन्हीही पायऱ्यांवर चढून असंतोषाच्या म्यानातून तो खड्ग, ती सशस्त्र क्रांतीची तलवार उपसल्यावाचून तें स्वातंत्र्य, ते सिंहासन, तो मुकुट मिळणार नाही. सशस्त्र क्रांती हेच साधन सार्वभौम सत्तेच्या सिंहासनावर विराजमान करील! या निर्णयाच्या पोटीच 'अभिनव भारत' ही गुप्त संस्था प्रथम लहानसे परंतु नंतर हळूहळू मोठे मित्रमंडळ जमवून स्थापन करण्यात आली.

इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनी याचे आत्मचरित्र आणि 'मानवी कर्तव्ये' हा निबंध यांचा अत्यंत खोल परिणाम सावरकरांवर झाला होता. सावरकरांनी मॅझिनीच्या आत्मचरित्राचे भाषांतर केले व त्याला अभिनव भारत संस्थेच्या उद्देशांचे व कार्यक्रमाचे सूचक रूपाने विवरण करणारी सुरेख व आवेशपूर्ण भाषेत प्रस्तावना लिहिली. ती म्हणजे त्या वेळच्या क्रांतिकारक पक्षाचा जाहीरनामाच आहे. मॅझिनीच्या व्यक्तिमत्त्वावर सावरकरांचा एकच निर्देश संपूर्ण प्रकाश टाकतो. तो म्हणजे, ''त्याने राखेच्या ढिगाऱ्यातून जिवंत राष्ट्र निर्माण केले.'' मॅझिनीच्या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेच्या मिषाने सावरकरांनी देशभर सशस्त्र क्रांतिकारकांच्या गुप्त मंडळ्या कशा स्थापाव्या, त्यांना गनिमी युद्धाचे शिक्षण कसे द्यावे आणि गनिमी युद्धाच्याद्वारे अखेरीस परकीय राज्य उद्ध्वस्त कसे करावे यासंबंधी उपयुक्त असलेले तंत्र थोडक्यात सांगितले आहे. गुप्त मंडळ्यांची मुख्य दोन कार्ये त्यांनी सांगितली आहेत. पहिले विचारजागृती व दुसरे स्वातंत्र्यार्थ गनिमीयुद्ध. मॅझिनीच्या मुखाने सावरकर सांगतात की, ''गुप्त मंडळ्यांशिवाय परवशतेतून सुटण्याचा दुसरा मार्ग नाही. सत्य प्रतिपादनाची जुलमाने जेथे बंदी झालेली आहे तेथे गुप्तमंडळ्या पवित्रतम आहेत. सत्य प्रतिपादनाचा तो एकच मार्ग आहे. गुप्तमंडळ्यांचा प्रसार परकीय सरकारास दाबणे अगदी अशक्य होते. गुप्त मंडळींचा स्फोट हा ज्वालामुखीच्या स्फोटासारखा आहे. फार थोड्या शक्तीने गुप्तमंडळ्या परकीय सरकारास गांगरून सोडतात.'' सावरकरांचे हे पुस्तक ब्रिटिश

सरकारने जप्त केले होते, परंतु त्याच्या प्रती महाराष्ट्रात गुप्त रीतीने देशभक्तीचा प्रसार करणारे प्रचारक वाचून दाखवीत. त्यांच्या पठनाने देशभक्तीचा पहिला धडा क्रांतिकारक मंडळी शिकत असत. उत्साही तरुण ही प्रस्तावना धार्मिक स्तोत्रपाठाप्रमाणे मुखोद्गतही करीत असत.

जन्मठेप

१९१० साली सावरकरांना ५० वर्षांची जन्मठेपीची शिक्षा झाली. अंदमान बेटातील तुरुंगात ठेवण्यात आले. १९२४ साली त्यांची जन्मठेपीची शिक्षा संपून त्यांना रत्नागिरी येथे अनेक वर्षे स्थानबद्ध करण्यात आले. 'माझी जन्मठेप' असा त्यांच्या आत्मचरित्राचा कठोर व करुण महाखंड आहे. स्थितप्रज्ञाप्रमाणे त्यांनी तेथे मरणापेक्षा भयंकर अशा अनंत यातना सोसल्या. त्या जीवनापेक्षा मरणही निःसंशय गोड आहे असे वाटू लागले होते. आत्महत्येचे आकर्षणही कित्येक वेळा वाढले. परंतु राष्ट्रीय स्वातंत्र्याची सुखस्वप्ने त्या यातनांचे आघात बोथट करी, लुप्त झालेले मनोधैर्य पुनः नव्या तेजाने चमकू लागे व निर्धाराची धार तीक्ष्ण होई. सावरकरांचा निधर्मी हिंदुराष्ट्रवाद या दीर्घ अंदमानवासातच परिष्कारला गेला. १९२६ साली 'श्रद्धानंद'नामक साप्ताहिक त्यांच्या बंधूंनी सुरू केले. त्यात हिंदुराष्ट्रवादाचा जोरदार पुरस्कार वि. दा. सावरकरांनी केला.

अंदमानातून सुटका व नंतरचे हिंदुत्वदर्शन

सावरकर अंदमानातून बंधमुक्त झाल्यानंतर भारतात परतले. दरम्यानच्या कालावधीत त्यांनी दाखविलेल्या सशस्त्र क्रांतिमार्गाचा प्रसार व विस्तार अपेक्षेप्रमाणे होऊ शकला नाही हे त्यांच्या प्रत्ययास आले. कारण ब्रिटिश राजनीती मुळापासूनच तडजोडवादी होती. ब्रिटिश संस्कृतीच्या उदारमतवाती मूल्यांच्या प्रभावामुळे साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षेची शास्त्रावरील पकड ढिली पडत चाललेली येथील प्रज्ञावंत नेमस्तांना व जहालांना दिसत होती. म्हणून मध्यममार्गी निःशस्त्र प्रतिकारच शिक्षितांना व इतरेजनांना इष्ट व व्यवहार्य म्हणून पटू लागला. निःशस्त्र क्रांतिमार्गच सामान्य जनतेला पटलेला स्वातंत्र्यमार्ग बनला.

नष्ट हिंदुपदपादशाहीच्या पुनःस्थापनेची दिव्य सुखस्वप्ने पाहणाऱ्या पदभ्रष्ट व संतप्त राजपुत्राचे जसे मन असावे तसे सावरकरांचे मन होते. ते म्हणजे पूर्वजन्माची स्मृती ठेवून माधवराव पेशवेच जणू पुन: जन्माला आलेले असावे. अखिल भारतात हिंदुपदपादशाही स्थापन करण्याचा महान ऐतिहासिक विक्रम म्हणून सावरकरांनी मराठेशाहीच्या इतिहासाचे आवेशपूर्ण मूल्यमापन केले. सशस्त्र क्रांतीच्या संग्राम-गीतांमध्ये मराठीशाहीचे पोवाडे त्यांनी रचले व गायला लावले. इतके करूनही हिंदुराष्ट्रवादी सशस्त्र राजकारणाचा प्रतापी प्रसार व विस्तार मात्र त्यांच्या अपेक्षेप्रमाणे होऊ शकला नाही. कारण सावरकरांनी जी महान भूतकाळाची अस्मिता वीररसाने रंगविली, तिचे सामान्य जनमनाला आकर्षण वाटले नाही.

सामान्य जनतेचे राजकारण हे भविष्यकाळातील आर्थिक व सामाजिक कार्यक्रमाकडेच आकर्षिले जाते. त्यामुळे जनतेच्या महान स्वातंत्र्य आंदोलनाचे प्रेरकत्व व नेतृत्व या दोन्ही गुणांचा मूर्धाभिषेक म. गांधीनाच झाला. हिंदुत्व सामर्थ्यशाली कसे बनेल याचीच चिंता सावरकरांच्या वाट्याला आली.

भूतकाळाच्या किंवा ऐतिहासिक परंपरेच्या उदात्तीकरणावर सावरकरांनी भर दिला. मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी निधर्मी जमाती भारताच्या राष्ट्रीयत्वात सामील होऊ शकणार नाहीत, भारतीय राष्ट्रीयत्व म्हणजे हिंदुत्वच, असे निराशाजनक तसेच राष्ट्रान्तर्गत थंड वा गरम अशा निरंतर यादवी युद्धाचे सूचक व वस्तुस्थितीच्या मीमांसेवर आधारलेले सत्य त्यांना सांगावे लागले. लोकभ्रम, अंधश्रद्धा, संकुचित जातिभेद इत्यादी मागासलेपणाची अवलक्षणे नष्ट झाल्याशिवाय हिंदू समाज बलवान होऊ शकणार नाही हे जाणून त्यांनी हिंदू बलवर्धनार्थ बुद्धिवादाचे प्रखर अस्त्र रूढीवर व परंपरेवर चालविले. पश्चिमी विज्ञान व तंत्र यांच्या योगाने पश्चिमी राष्ट्रे सामर्थ्यशाली बनून अत्यंत वेगाने प्रगतीचा मार्ग आक्रमीत आहेत हे पाहून सावरकरांनी सनातन पोथीनिष्ठेवर आघात करून विज्ञाननिष्ठेचा पुरस्कार केला व उपयुक्ततावादी नीतिशास्त्र अंगीकारले. लोकक्षोभाची पर्वा न करता गोभक्षणाचेही समर्थन केले. पश्चिमी विज्ञानाची वाढ पश्चिमी संस्कृतीतील सत्याच्या शोधाच्या प्रेरणेतून मुख्यतः झाली आहे. सावरकरांचा मुद्दा निराळा होता. सावरकरांनी राष्ट्रबलवर्धनार्थ विज्ञानाची व यंत्रांची आराधना करण्याचा संदेश दिला!

सावरकरांचे प्रचंड साहित्य हे मराठी साहित्याचा अत्यंत उज्ज्वल असा ठेवा आहे. भारताच्या स्वातंत्र्य इतिहासातील एका प्रभावी प्रवृत्तीचे विराट दर्शन त्या साहित्याच्या द्वारे घडते!

(नवभारत, एप्रिल, १९६६, पृ.१ ते ८)

○○○

३८

‘दास कॅपिटल’चा जनक: कार्ल मार्क्स

युरोपात इ. स. १८४८ साली लोकशाही व समाजवादी शक्तींनी राजकीय क्रांतीचे अनेक राष्ट्रांत उठाव केले. या १८४८ पासून सुरू झालेल्या आधुनिक कालखंडातील जगाच्या वादळी जीवनाचा अर्थ समजण्याकरिता कार्ल मार्क्सची विचारसरणी समजावून घेणे आवश्यक आहे. समग्र मानवी इतिहासातील सर्वांत मोठ्या जनता आंदोलनाचे मुख्य स्फूर्तिस्थान मार्क्सच होय. टॉमस पेन, रूसो व व्हॉल्तेर ह्यांनी नुसता प्रारंभ केला. हे आंदोलन राष्ट्रीय, वंशीय व खंडात्मक मर्यादांना न जुमानता भूगोलाला वेढीत आहे. वर्तमानकाळी एकंदर मानवी समाजाचे स्थित्यंतर होऊन जी नवीन घडण तयार होत आहे, तिच्यावरील मार्क्सवादाचा प्रभाव स्पष्ट दिसत आहे.

मार्क्सची अशी धारणा होती की, क्रांतिकारक वर्गसंग्रामाचा एक मुख्य विभाग वैचारिक आघाडी होय. ही वैचारिक आघाडी ढासळली, तर पराभव अटळ ठरतो. दूर पल्ल्याची वैचारिक कणखर हत्यारे बाळगणाऱ्या वर्गसंघटना वा पक्षच विजयी आक्रमणे करू शकतात. केवळ ध्येयवादी अशा नैतिक भावनांच्या बळावर फार वेळ तग धरता येत नाही. ध्येयांना जीवन देणारी शक्ती विचारातच असते. नैतिक भावनांना चेतविणारी कामगार जीवनाची करुणास्पर्श चित्रणे व काव्यमय टीका यांच्यापेक्षा वस्तुस्थितीच्या चिंतनातून जागृत होणारा विचार कार्ल मार्क्स अधिक पसंत करतो. अग्रगामी क्रांतिवीरांचा गंभीर सामाजिक अनुभव सर्जनशील असतो. उत्कृष्ट ललित साहित्याची शूर प्रेरणा तेथेच तयार होत असते. मार्क्स असा अनुभव घेणारा क्रांतिवीर होता आणि महाकाव्ये व कादंबऱ्या वाचण्याचा त्याला खूप शौक होता हे जरी खरे होते; तरी तर्कशुद्ध विचारनिष्ठ साहित्यच चिरप्रेरक ठरते, असे त्याचे ठाम मत होते. सर्जनशील अनुभवाला त्याने वाचा फुटू दिली नाही; परंतु त्या अनुभवाच्या प्रेरणेने जन्मभर त्याने सर्वस्व पणाला लावून काम केले.

इ. स. १८४८ मध्ये युरोपात हंगेरी, दक्षिण जर्मनी व पॅरिस येथे क्रांती होऊन लगेच त्या

क्रांतीचा शेवटही झाला व प्रतिक्रांती स्थिरावली. नेपोलिअनने हुकूमशाही स्थापन केली, तोपर्यंत क्रांती नजीकच आहे, असा त्याचा विश्वास होता. नंतरच क्रांती दुरावत चालली, असे त्याला वाटू लागले. इ. स. १८५० साली मार्क्सचा एक मित्र एकॅरिअस याने वृत्तपत्रात एक लेख प्रसिद्ध केला, तो त्याला फार आवडला. तो वाचून मार्क्सने त्याला लिहिले की, "कामगार क्रांतीच्या आघाडीवरील खंदकात लढत चालली असता, अगोदरच वैचारिक विजय मिळवून आगामी कामगार राज्याची द्वाही फिरवावी लागते, त्यापैकीच हा तुझा विजय होय."

इ. स. १८४२ पासून म्हणजे वयाच्या चोविसाव्या वर्षापासून क्रांतीचा विचारवंत नेता या नात्याने कार्ल मार्क्सने अखंड लेखनसाधना केली. वृत्तकार, संपादक, समाजवादी परिषदांचा अध्यक्ष व लेखक या नात्याने फार मोठे वैचारिक साहित्य त्याने प्रसिद्ध केले. 'पवित्र कुटुंब', 'जर्मन ध्येयवाद', 'कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा', 'अर्थशास्त्राची समीक्षा' इत्यादी कॅपिटलपूर्वीची त्याची पुस्तके होत. इ. स. १८४८ मध्ये जागतिक कामगार वर्गाची घोषणा म्हणून मान्य झालेला कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. वैचारिक सकस गाभा असलेला हा छोटा निबंध धार्मिक नसलेल्या साहित्यात सर्वांत प्रभावशाली ठरला आहे.

मार्क्सची साहित्यशैली सक्षम, भेदक व उपरोधक युक्तिवादाने जुनी श्रद्धास्थाने ढासळून टाकते. सारगर्भ विचार व्यक्त करण्याचे उत्कृष्ट साधन म्हणून ललित अलंकारही तो वापरतो. सूत्रमय, गंभीर व वस्तुस्थितीच्या अवलोकनावर आधारित अशा सिद्धांतांचे प्रसन्न रीतीने समर्थन करून जीवनाच्या वा दिक्कालाच्या प्रदेशावर संशयाचे धुके नष्ट करणारा बुद्धीचा प्रकाश त्याची शैली ठरविते आणि इतिहासाची रहस्ये उलगडून आश्चर्यचकित करते. इतिहासक्रमाने अस्तित्वात येणाऱ्या वास्तव घटनांची मानवी भव्योदात्त ध्येयांशी निगडित असलेली कार्यकारणभाव-मालिका बुद्धिवादानेच उलगडून अद्भुतरम्य भावनांना आवाहन देते व अंतिम ध्येयांच्या संग्रामास उद्युक्त करते. मार्क्सच्या शैलीत तारक संदेश देणाऱ्या भविष्यवादी धर्मसंस्थापक प्रेषितांचा धीरोदात्त आत्मविश्वास आहे. 'दुसऱ्यांदा जन्मलेला क्रुद्ध मोझेस' असाच त्याचा उल्लेख एक पश्चिमी पंडिताने केला आहे.

इ. स. १८४९ सालापासून युरोपचे क्रांतीचे वातावरण थंडावले व क्रांतिकारण ध्येयवाद्यांना व त्यांच्या संघटनांना सहन न करणारी व सहन न होणारी राज्ये स्थिरावली. मार्क्सला जर्मनीतून हद्दपार केले, तो पॅरिसला आला. पॅरिसमधून हद्दपार केले, तो बेल्जमला आला. अखेरीस बेल्जमही सोडून ४ ऑगस्ट १८४९ ला थोड्या महिन्यांकरिता तो इंग्लंडमध्ये रहावयास आला. परंतु अखेरपर्यंत म्हणजे. इ. स. १८८३ मध्ये त्याचा मृत्यू झाला, तोपर्यंत लंडनमध्येच त्याला राहावे लागले. प्रथम युरोपातील निर्वासित क्रांतिकारकांचे थवेच्या थवे इंग्लंडमध्ये आश्रयार्थ आले व तेथूनच युरोपातील क्रांतिकारकांशी व गुप्त संघटनांशी ते दळणवळण ठेवू लागले. त्यांच्यातील क्रांतीचा आवेश जिरून त्यांची मने निराशेने घेरली

जाऊ लागली. आपसातल्या मतभेदांना व भांडाभांडीला मधूनमधून ऊत येऊ लागला. त्यातील बरेच क्रांतिकारक समाजवादी होते. भावनाप्रधान समाजवादाची चर्चा करताना मार्क्सला त्यांच्या उथळपणाची चीड येई. मार्क्सला बुद्धीची रग फार होती. शरणचिठ्ठी देणाऱ्या बौद्धिक दासाशीच त्याचे जमे. त्यामुळे जवळ आलेले लवकरच दुरावलेही जात. युरोपच्या सर्वच विचारवंत क्रांतिकारकांमध्ये त्याचा दबदबा होता; परंतु फार थोडे मित्र भक्त म्हणूनच त्याच्याजवळ टिकाव धरू शकले. इ. स. १८४८ सालची युरोपियन क्रांती फसली असली, तरी ती पुन्हा नजीकच्या काळात लवकरच डोके वर काढील, असा त्याचा भविष्यवाद होता; तो पण खोटा ठरला. त्याचा विपरीत परिणाम संघटनेवरही झाला. युरोपात त्या वेळी दूरगामी ध्येयवादाचे मोठमोठे क्रांतिकारक जे होते, त्यांच्याशी त्याचे जवळचे संबंध आले होते. उदा., तात्त्विक अराजकवादाचा रशियन महान द्रष्टा बॅकुनिन होय. त्याला मार्क्सची इतिहासाची आर्थिक उपपत्ती फार महत्त्वाची वाटली. त्यामुळे तो प्रथम मार्क्सकडे आकर्षित झाला. परंतु त्याची प्रशंसा करतानाही प्रूधाँला स्वातंत्र्याची फार कदर आहे मार्क्सला नाही, तो आहे जर्मन व ज्यू, नखशिखान्त हुकूमशहा! असे तो म्हणे. दीर्घ परिचयान्ती त्याला उबग आली, मार्क्स व एंगेल्स यांचे स्वभावदोष बॅकुनिनला असह्य झाले.

लंडनमध्ये आल्यापासून मार्क्सने कॅपिटल-रचनेचा संकल्प केला. अध्ययन, चिंतन, मनन व लेखन सतत अठरा वर्षे करून कॅपिटलच्या तीन भागांची तयारी केली. बौद्धिक अहंकाराने निर्मिलेला अलगपणा या कामी उपयोगी पडला. इंग्लंडमध्ये दुसरा मार्गच उरला नव्हता. औद्योगिक क्रांती येथे स्थिरावलेली, विकसित झालेल्या भांडवलशाही समाजव्यवस्थेच्या आर्थिक व राजकीय शक्तींची विशाल वाढ येथे चाललेली. ती त्याला जवळून निरीक्षण करून अभ्यासावयास सापडली. कॅपिटलच्या रचनेस आवश्यक असा प्रत्यक्ष जिवंत नमुनाच बनलेले ब्रिटिश राष्ट्रच त्याच्या निरीक्षणाखाली आले. त्याची अर्थशास्त्रीय गृहीतकृत्ये (हायपॉथेसेस) व जनरलायझेशन्स इंग्लिश साहित्याच्या आधारावरच प्रामुख्याने त्याला कल्पिता आली. सामाजिक व ऐतिहासिक तपशीलवार संशोधनाचे भाग म्हणजे कॅपिटलची उत्तम व अत्यंत मौलिक प्रकरणे होत. 'इकॉनॉमिस्ट' नियतकालिकातील आर्थिक विवेचनाचे स्तंभ, वारंवार प्रसिद्ध होणाऱ्या सरकारी नील-पुस्तकांमधील संख्याशास्त्रीय विवरणे व आर्थिक इतिहास आणि ब्रिटिश म्युझियममधील वाचनगृहात उपलब्ध होणारी पुस्तके हा सर्व आधारभूत लेखसंभार लंडनमध्ये राहूनच त्याला प्राप्त झाला. या लेखसंभाराचा योग्य वैज्ञानिक उपयोग करणारा पहिला पंडित मार्क्सच होय.

बत्तिसाव्या वर्षीच सार्वजनिक चळवळीला रामराम ठोकलेला, सर्व वेळ केवळ तात्त्विक लेखनाच्या कामात व्यतीत करणारा व अलिप्त जीवन जगणारा पंडित तो बनला, असाही मिथ्या ग्रह व्हावा अशा दर्जाचे बौद्धिक कार्य तो करीत राहिला. वस्तुतः संघटना व आंदोलन यांतून त्याची कधीच सुटका झाली नाही. २८ सप्टेंबर १८६४ मध्ये पहिले इंटरनॅशनल

त्याच्या सल्ल्याने स्थापन झाले. इंटरनॅशनलचे मुख्य बौद्धिक नेतृत्व त्याच्याकडेच राहिले. लंडनमधील निवासाच्या कालखंडात त्याचे विचार पुष्कळ परिपक्व झाले. युरोपमधील क्रांतीची लाट ओसरली, तरी गरीब, मध्यमवर्ग व कामगारवर्ग यांचा असंतोष शमला नव्हता. ध्येयवाद्यांच्या छोट्या गुप्त गटांमध्ये कामगार क्रांतीचा विचार धगधगत होता. खूप निरीक्षण करून त्याचे असे मत झाले की, शुद्ध कामगार क्रांती वेगळी होऊ शकणार नाही; नवीनच उदयाला आलेला कामगारवर्ग मागासलेला व विसकळीत असल्यामुळे तो चिरडला जाईल. मध्यमवर्गाशी सहकार्य करूनच लोकशाही क्रांती करणे शक्य आहे. गुप्त संघटनांपेक्षा उघड संघटना कराव्यात, त्यामुळे कामगारवर्गाला राजकीय शिक्षण मिळेल व त्याची शक्ती वाढेल. 'सबुरीने चला' असे मत होते, तरी तो म्हणे की, भांडवलशाही क्रांतीच्या भव्य यशाने निराश होण्याचे कारण नाही. या भांडवलशाहीच्या विजयाच्या पोटीच तिचा विनाश करणारा गर्भ वाढत आहे. इतिहासाचा प्रवाह अपरिहार्य रीतीने कामगारक्रांतीचाच मार्ग वेगाने आक्रमीत आहे. धीर धरून त्या इतिहासक्रमाचे साथीदार बना; असा विचारनिष्ठ आदेश देण्याकरिता कॅपिटलची रचना मार्क्स करीत होता.

शेवटची काही वर्षे सोडल्यास मार्क्सला फार हलाखीत दिवस काढावे लागले. गृहस्थिती फारच खालावलेली होती, तरी कॅपिटलकरिता विद्याव्यासंग अखंड चालू होता. ८ सप्टेंबर १८५२ रोजी मार्क्स एंगेल्सला लिहितो : "माझी बायको आजारी, छोट्या जेनीची तब्येत बिघडलेली, बाळ लिंचेन मज्जातंतूच्या तापाने पछाडलेला. डॉक्टरच्या मदतीची जरुरी आहे. पण डॉक्टरला बोलावले तर फीला पैसे कोठून आणायचे ही पंचाईत. गेले आठ दहा दिवस पाव व बटाटे यांवरच आम्ही भागवीत आहोत. तेही यापुढे मिळतील की नाही याची शंका आहे. 'न्यूयॉर्क ट्रिब्यून'ला पाठविलेल्या वृत्तलेखाबद्दल थोडे पैसे येतात खरे; परंतु येथील वृत्तपत्रे विकत घेतल्याशिवाय वृत्तलेख तरी कसे लिहिणार? घरमालकीण भाडे थकल्यामुळे हाकलून देईल, तर बरे होईल; म्हणजे साचलेल्या भाड्याचा बोजा कमी होईल. बेकरी, डेअरी, किराणा दुकान, भाजी दुकान व खाटीक या सर्वांचेच देणे थकले आहे. काही कामगारांकडून उसनवारी केली नसती, तर उपाशीच मेलो असतो. "मार्क्सला चार मुले झाली. दोन मुली, दोन मुलगे. सर्व मुले सुरेख होती. पत्नी एका जीवाभावाने नांदत सर्व यातना सोसत होती. ती फार समंजस, ध्येयवादी, धीराची व विलक्षण सुंदर बाई होती. कित्येक वेळा दुपारचीही भ्रांत पडे. उपासमारीमुळे पति-पत्नी व मुलेबाळे सारखी आजारी पडत. इ. स. १८५० ते १८५५ या पाच वर्षांच्या अवधीत दोन मुलगे व एक मुलगी मृत्युवश झाली. लाडका एडगर वारला, तेव्हा मार्क्सचे शूर हृदय अत्यंत विव्हल झाले. पुत्रशोकाला या जगात इलाज नसतो. गलिच्छ वस्तीत कौलारू घराच्या दोन खोल्यांत संसार थाटलेला होता. छोटी मुलगी एक वर्षांची होताच वारली, तेव्हा तिच्या दफनाकरिताही पेसे नव्हते. कित्येकदा कोट व पादत्राणे फाटलेली, त्यामुळे बाहेर पडणे अशक्य; म्हणून बिछान्यात बसूनच विद्याव्यासंग करावा लागे.

कौलारू घराच्या माळ्यातील खबदाडीसारख्या खोलीत बसून मार्क्स देशोदेशींच्या कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेई व चर्चा करी. त्याला एंगेल्ससारखा जीवाला जीव देणारा भक्त व मित्र मिळाला म्हणूनच जगता आले. एंगेल्स हा त्याच्या तोडीचा विचारवंत व लेखक होता. मँचेस्टर येथे त्याच्या वडिलांच्या व्यापारी पेढीत काम करून मिळालेल्या उत्पन्नाचा काही भाग तो आपल्या मित्राकडे मधूनमधून पोचता करी. व्यापारही खालावत चालला, म्हणून मार्क्सकरिता तो व्यापारात अधिक लक्ष घाली. मार्क्सने आरंभिलेला महाग्रंथ पूर्ण व्हावयास पाहिजे, असा त्याचा आग्रह होता. एंगेल्स हा उत्कृष्ट लेखक असल्यामुळे त्याचा फार वेळ व्यापारासारख्या फालतू कामात जात असलेला पाहून मार्क्सलाही खूप खेद वाटे. एंगेल्सप्रमाणेच दुसरे काही चाहते इकडून तिकडून पैसे मिळवून मार्क्सची पुस्तके प्रकाशित व्हावी, याकरिता प्रयत्न करीत. इ. स. १८५१ साली जर्मन सरकारने मार्क्सला एका सशस्त्र क्रांतीच्या खटल्यात खोटे पुरावे तयार करून गोवले होते. हा खटला दीर्घ काळ चालला होता. याच सुमारास त्याची पत्नी आपल्या अमेरिकन मैत्रिणीला पत्रात लिहिते, "येथे रात्रंदिवस सशस्त्र क्रांतीच्या खटल्यातील पोलिसांनी बनविलेली बनावट कागदपत्रे खोटी ठरविण्याचे किचकट काम मार्क्सवर पडले आहे. या सशस्त्र क्रांतीचा प्रमुख सूत्रधार म्हणून ठरविल्यामुळे आमच्यावरच सगळी जबाबदारी पडली आहे. फ्रान्स व जर्मनीकडे जाणारा-येणारा आमचा पत्रव्यवहार पोलीस जप्त करीत आहेत. त्यामुळे आमचा पत्रव्यवहार योग्य ठिकाणी पोचविण्याची जबाबदारीही आमच्यावर पडली आहे. यासंबंधीची लेखनाची मदत तीन जण करीत आहेत. मीही बोटे दुखू लागेपर्यंत लिहिण्याची मदत करीत आहे. खटल्याच्या खर्चाकरिता एक एक पैसा जुळवावा लागत आहे. या छोट्या जागेत माझी तीन तरतरीत मुले गातात, शिळा वाजवितात, कामात व्यत्यय येतो, कार्ल यांच्यावर चिडून ओरडतो. कसले हे जीवन?"

मार्क्सने न्यायालयात विजय मिळविला. दीर्घ काल काम केल्याने खूप थकवा आला; शरीराची चौकट पोलादी होती, तरी ती ढिली झाली.

दारिद्र्य व प्रदीर्घ विद्याव्यासंग यांच्यामुळे यकृत बिघडले. इतके असूनही ब्रिटिश म्युझियममध्ये सकाळी ९ पासून संध्याकाळी ७ पर्यंत जेठा मारून त्याने व्यासंग चालूच ठेवला.

मार्क्सने हे दारिद्र्य जाणूनबुजून पत्करले होते. जर्मनीमध्ये असतानाच त्याच्या प्रखर बुद्धिमत्तेचे तेज राज्यकर्त्यांना दीपवीत होते. प्रिन्स बिस्मार्कने त्याचे मन वळवून त्याच्या बुद्धिमत्तेचा राष्ट्ररचनेस उपयोग करावा म्हणून दोनदा प्रयत्न केला. लंडनमध्ये एक अज्ञात व्यक्ती बिस्मार्कने संदेश देऊन पाठविली. संदेशात म्हटले होते की, "तुझ्या थोर बुद्धिमत्तेचा जर्मन राष्ट्राच्या प्रगतीकरिता फार उपयोग होणार आहे, माझे हे निमंत्रण स्वीकारावे!"

मार्क्सने त्या संदेशाकडे पूर्ण दुर्लक्ष केले व या संदर्भात एंगेल्सला सांगितले की, "बिस्मार्क स्वतःवरून दुसऱ्याची परीक्षा करतो."

कॅपिटलच्या लेखनास इ. स. १८४९ पासून प्रारंभ झाला. अठरा वर्षे काम चालले. मार्च १८६६ ला लेखन पूर्ण झाले. एक वर्ष मुद्रणप्रत तयार करावयास लागले. त्यामुळे ३ सप्टेंबर १८६६ रोजी जिनिव्हा येथे भरलेल्या पहिल्या इंटरनॅशनल काँग्रेसला मार्क्स उपस्थित राहू शकला नाही. अनुपस्थितीचे कारण सांगताना मार्क्सने असे म्हटले आहे की, "कॅपिटल (भाग १) पूर्ण होत आला आहे. माझ्या काँग्रेसमधील उपस्थितीपेक्षा ग्रंथ पूर्ण करण्याने कामगारांच्या ध्येयाची सेवा अधिक होणार आहे.'' मुद्रणप्रतीचे अखेरचे वाक्य समाप्त झाले, त्या दिवशी मार्क्सने मित्राला लिहिले, "इतक्या दीर्घकाळ प्रसूतिवेदना सोसल्यानंतर जन्मलेला छावा चाटून स्वच्छ करण्यात आगळा आनंद होत होता." मुद्रणप्रतीचा पुष्कळसा भाग नोव्हेंबर १८६६ मध्ये हांबुर्गचा प्रकाशक ऑटो मायसनेर या सभ्य गृहस्थाच्या स्वाधीन केला. १८६७ च्या एप्रिलमध्ये राहिलेली प्रत घेऊन तो स्वतः हांबुर्गला गेला. पहिली प्रुफे मिळेपर्यंत जर्मनीत लाइपझिगलाच राहिला. कुगेलमन या मित्राचा पाहुणा म्हणून मोठ्या खुशीत दिवस घालविले. या वैराण भकास जीवनातील ते दिवस ओयेसिस(हिरवळीसारखेच) होते, असे तो म्हणतो. प्रुफे येत व ती लगेच तपासून परत पाठवी. १६ ऑगस्ट १८६७ रोजी पहाटे अडीच वाजता त्याने अखेरचे प्रूफ तपासून संपविले व लगेच एंगेल्सला पत्र लिहिले, हा ग्रंथ आताच संपविला. हे शक्य झाले याबद्दल मी तुझ्या एकट्याचे आभार मानतो. या तीन भागांकरिता करावे लागलेले प्रचंड परिश्रम तू केलेल्या त्यागाशिवाय बहुतक शक्य झाले नसते. आभारपूर्वक मी तुला आलिंगन देतो. माझ्या प्रियतम मित्रा, धन्यवाद!"

कॅपिटल ग्रंथ डार्विनला अर्पण करावा, अशी मार्क्सची फार इच्छा होती. त्याने डार्विनला पुस्तक पाठविले व त्याबरोबर पत्र पाठवून अर्पणाची संमती मागितली. आपणास अर्थशास्त्र हा विषय समजत नाही, असे म्हणून डार्विनने नकार दिला.

जर्मन भाषेत कॅपिटल प्रसिद्ध झाले. परंतु विद्वानांकडून अपेक्षेप्रमाणे त्याचे स्वागत झाले नाही. एंगेल्स व कुगेलमन या मित्रांनी पुस्तकास जास्तीत जास्त प्रसिद्धी मिळावी म्हणून वृत्तपत्रे व नियतकालिके यांत पुष्कळ जाहिरात केली व प्रस्तावनाही उद्धृत केली. मार्क्सला प्रसिद्धी मिळावी म्हणून एंगेल्सने त्याच्यावरील चरित्रलेखही प्रसिद्ध केला. मार्क्सला मात्र आवडला नाही. भावनोद्दीपक लेखनाने प्रसिद्धी मिळविण्याचा त्याला तिटकारा होता. त्याने एंगेल्सला लिहिले की, अशा लेखनाचा परिणाम चांगला होत नसतो. शास्त्रकाराची महती यामुळे खालावते. एका विश्वकोशाने पत्रद्वारा माझ्या चरित्रटिपणीची मागणी केली होती. मी त्याचे साधे उत्तरही दिले नाही." प्रत्येकाची अभिरुची निराळी असते हेच खरे. जर्मन भौतिकवादी तत्त्वज्ञ फायरबाख याला त्याने पुस्तक पाठविले; त्याने आपले गंभीर मतभेद नोंदवूनही हा ग्रंथ युगप्रवर्तक आहे, असा अभिप्राय दिला आहे.

कॅपिटलचे पहिले भाषांतर रशियन भाषेत एका वर्षात प्रसिद्ध झाले. बॅकुनिनने रशियन भाषेत भाषांतर केले होते, परंतु ते गहाळ झाले. नवल असे की, झारच्या सरकारने प्रकाशनास परवानगी दिली. ती देताना असे म्हटले की, हा समाजवादी ग्रंथ असला तरी शास्त्रीय आहे व फार थोड्यांनाच त्याचे आकलन होणार आहे, म्हणून प्रसिद्ध करण्यास हरकत नाही. इ. स. १८७५ मध्ये कॅपिटलचे फ्रेंच भाषांतर प्रसिद्ध झाले. मार्क्सची हयात संपल्यानंतर युरोपच्या सर्व प्रमुख भाषांमध्ये त्याची भाषांतरे प्रसिद्ध झाली.

(महाराष्ट्र टाइम्स, १३ ऑगस्ट १९६७,
मूळ शीर्षक: दास कॅपिटलची जन्मकथा)

ooo

३९

आत्मबलसंपन्न वीर : किसन वीर

आम्ही दोघे वाईचेच राहणारे असलो तरी एकमेकांचा दृढ परिचय फार उशिरा झाला. मैत्री तर अलीकडची म्हणजे पंधरा-वीस वर्षांचीच आहे. वस्तुतः परिचय व मैत्री ३५ वर्षांपूर्वी व्हावयास पाहिजे होती. कारण १९३४ च्या सुमारास महाराष्ट्रात वावरत असलेल्या गुप्त क्रांतिकारकांच्या एका गटाशी माझा व किसन वीरांचा संबंध आला. त्यातील क्रांतिकारक आमचे दोघांचेही मित्र होते. पण विचित्र योगायोग असा की, आम्ही दोघे एकमेकांपासून दूरच राहिलो. तो सशस्त्र क्रांतिकारक गट भगतसिंग, राजगुरू यांच्या प्रेरणेमुळे अस्तित्वात आला होता. भगतसिंग व राजगुरू यांचे प्रतिनिधी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत विद्यार्थी म्हणून राहत होते. किसन वीर हे रायफल व रिव्हॉल्व्हर यांच्या नेमबाजीत अत्यंत तरबेज व सशस्त्र क्रांतीच्या उठावाकरिता अधीर झालेली मनोवृत्ती या दोन गुणांमुळे या गटात त्यांना महत्त्व प्राप्त झाले. गुप्तकटांचे लाहोर व कलकत्तापर्यंत पसरलेले धागे त्यातील क्रांतिकारक नेत्यांच्याही दृष्टिपथात येऊ शकत नसत. त्यामुळे किसन वीरांना त्या वेळी लांबचे धागेदोरे माहीत नसणे हे स्वाभाविक आहे.

किसन वीरांची म. गांधींवर अपार श्रद्धा होती. परंतु ते गांधीवादी नाहीत. जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया, अच्युत पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली 'भारत छोडो' या म. गांधींच्या आंदोलनाला सत्याग्रही रूप राहिले नाही. प्रतिसरकार स्थापन करण्याची त्यांची क्रांतिकारक कल्पना ही गांधींच्या कल्पनेत नव्हती. 'करा वा मरा' असा आदेश होता खरा; पण त्याला इतका खोल अर्थ नव्हता. हा अर्थ काँग्रेसमधील जयप्रकाश नारायण इत्यादी डाव्या नेत्यांच्या पोटी होता. भारतातील प्रतिसरकार निर्माण करण्याच्या कल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप फार थोड्या ठिकाणी आले. त्या कल्पनेला किसनवीरांच्या प्रयत्नाने सातारा जिल्ह्यात मूर्त रूप आले.

ब्रिटिश साम्राज्यशाही सत्ता ही फ्रेंच साम्राज्यशाही सत्तेप्रमाणे दुसऱ्या महायुद्धोत्तर

काळात ताठर राहिली असती तर फ्रेंच साम्राज्यशाहीच्या आशिया व आफ्रिका येथील वसाहतीत जसे सशस्त्र क्रांतीचे उठाव झाले व हुकूमशाह्या आल्या तसेच भारतात देखील झाले असते असे अनुमान करण्यास मुळीच हरकत नाही. जयप्रकाश, किसनवीर इत्यादी नेते या सशस्त्र क्रांतीचे सेनापती बनले असते, असे चित्र कल्पनेच्या क्षेत्रात चित्रित करता येते.

परंतु गांधींची अहिंसक राजनीती व ब्रिटिश उदारमतवाद यांचा प्रीतिसंगम होऊन भारतात उदारमतवादी लोकशाही निर्माण करता आली. या लोकशाही स्वातंत्र्याची निर्मिती काँग्रेसने केली. हे जगाला दिपवून टाकणारे असे मानवजातीतील लोकशाही शक्तीचे यश आहे. या यशामुळे काँग्रेसवरील निष्ठा ज्यांच्या हृदयात अढळपणे वास करू लागली, अशा थोर कार्यकर्त्यांमध्ये श्री. किसन वीर यांना फार महत्त्वाचे स्थान आहे.

गेली वीस वर्षे मी त्यांच्या फार जवळ येऊन मित्र या नात्याने काम करीत आहे. या काँग्रेसच्या ऐन वैभवशाली काळात मोठमोठे काँग्रेस कार्यकर्ते ध्येयच्युत होऊन मोहवश झालेले सर्वत्र दिसतात. ब्रिटिशसत्ता संपल्यावर सत्ययुगाची पहाट होईल, असे अनेकांना वाटत होते; सत्ययुग फार दुरावले आहे; कल्पनेच्याही बाहेर गेले आहे; सत्तायुग भरात आले आहे. सत्तेकरिता स्पर्धा व संघर्ष तापत आहे. संघर्षाच्या ठिणग्या सामान्य जनांना चटके देत आहेत. सामान्य जनता हजारो वर्षांच्या तमोयुगाच्या घन अंधकारात अजून बुडालेली आहे. परंतु या सत्तास्पर्धेपासून शक्यतो अलिप्त राहून काँग्रेसच्या सत्तेचा पवित्र लोकहिताच्या साधनेकरिता रात्रंदिवस उपयोग करणारे व मोहपाशापासून दूर राहिलेले असे जे आत्मबलसंपन्न कार्यकर्ते दिसतात त्यांच्यात किसन वीरांचे स्थान फार उच्च आहे. त्यांचा गृहप्रपंच व परिवार मोठा. त्यांची दैनंदिन विवंचना तशीच आहे; परंतु मन लोकहिताच्या चिंतेत निमग्न आहे. किसन वीरांसारखे कार्यकर्तेच काँग्रेसला आजच्या विपत्तीच्या सागरातून तारू शकतील.

(कृष्णाई, १९६७)

ooo

४०

अनेक तेजस्वी पैलू असलेले व्यक्तिमत्त्व : भाऊसाहेब बांदोडकर

श्री. भाऊसाहेब बांदोडकर यांना मी गोव्याच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९६२ साली प्रथम पाहिले. त्या अगोदर जवळ-जवळ २०-२५ वर्षे भाऊसाहेब मला ओळखत होते, हे त्यांनी मला प्रथम भेटीतच सांगितले. गोव्यातील शेतकऱ्यांच्या परिषदेचे अधिवेशन पणजी येथे १९६३ साली श्री. विश्वनाथ लवंदे यांच्या प्रयत्नाने भरले होते. मी उद्घाटक व श्री. मोहन धारिया हे अध्यक्ष होते. या अधिवेशनाचे मुख्य सूत्रधार भाऊसाहेबच होते.

या प्रसंगी पणजी येथील हिरव्यागार वृक्षलतांनी भरलेल्या टेकडीवरील एका सुरेख प्रासादात मला उतरण्याकरिता नेले. गौरकाय, टणक, भरदार, तेजस्वी मध्यमवयीन व्यक्ती माझ्यासमोर स्वागतार्थ आली. ती म्हणजे भाऊसाहेब. प्रासादात प्रवेश केल्यानंतर चहा आला. शेतकऱ्यांच्या परिषदेबद्दल माहिती मी करून घेतली. हेच गोव्याचे प्रमुख नेते होत असे लक्षात आले. आम्हा दोघा पाहुण्यांची सरबराई करण्याचे काम भाऊसाहेबांची सुशिक्षित कन्या सौ. शशिकला हिच्याकडे सोपविले होते. चार दिवस त्यांचा पाहुणचार घेतला. भाऊसाहेबांनी आपल्या मोटारीतून स्वतःच गोव्यातील रमणीय स्थळे, ख्रिश्चन प्रार्थनामंदिरे, मंगेश, शांतादुर्गा, म्हाळसा इत्यादी देवतांची प्रसिद्ध मंदिरे दाखविली. या सर्व तीर्थयात्रेत भाऊसाहेबांचा खूप परिचय झाला. त्यांनी मला सांगितले की, १९४२ मध्ये ते मुंबईत राहात होते तेव्हा त्यानी मला पाहिले होते. एम. एन. रॉय यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीच्या कार्यक्रमांना ते उपस्थित रहात. मी या पक्षाचा प्रवक्ता म्हणून महाराष्ट्रात काम करीत होतो. मी मुंबई येथे पक्षाच्या दादर शाखेत राजकीय अभ्यासवर्गात आंतरराष्ट्रीय राजकारण, मार्क्सवाद इत्यादी विषयांवर भाषणे करीत होतो. ही त्यांनी ऐकली होती. एम. एन. रॉय यांची भाषणेही त्यांनी ऐकली व विचाराने रॉयवादी झाले. परंतु पक्षातील वैयक्तिक हेवेदावे पाहून- असे हेवेदावे सगळ्याच पक्षांत असतात- पक्षसंघटनेपासून अलिप्त राहिले. अशी पूर्वीची हकिकत त्यांनी मला या यात्रेत सांगितली.

त्यांच्या मनात माझ्याबद्दल आत्मीयता आहे हे माझ्या तेव्हा प्रथमच लक्षात आले.

या माझ्या भेटीनंतर मधूनमधून मला गोव्याच्या भेटीचा योग येत असतो. मी भाऊसाहेबांचा कायमचा पाहुणा आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या गोमांतक साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून आणि दुसऱ्या संमेलनाचा सन्माननीय पाहुणा म्हणून मी गेलो होतो. या दुसऱ्या संमेलनच्या वेळी मला मित्रमंडळींच्या गाठीभेटी आणि गोव्याची यात्रा याशिवाय दुसरे काही काम नव्हते. भाऊसाहेबही मोकळे होते. या तिसऱ्या भेटीत त्यांनी मला लहानपणी ज्या लहानशा घरात ते वाढले ते घर दाखविले. त्यांच्या जीवनातील आर्थिक उत्कर्षाची कथा कळली. लहानशा घरकुलातील हा मनुष्य मोठमोठ्या प्रासादांचा व बागांचा मालक कसा झाला, याचा विचार माझ्या मनात आला. लहानशा झोपडीपासून पणजीचा सुंदर परिसर दृष्टीत सामावून घेणाऱ्या प्रासादापर्यंत हा माणूस पोचला हे पाहून त्या व्यक्तीबद्दल खूपच उत्सुकता वाढली. चौकशीअंती असे कळले की त्यांची मोठी श्रीमंती गोव्यातील इतर श्रीमंतांच्या मानाने आठव्या दहाव्या पायरीवर आहे. त्या श्रीमंतीचा उपयोग सामान्य झोपडीत राहणाऱ्या गरीब जनांना सतत होत आहे. महात्मा गांधीनी, 'श्रीमंती ही श्रीमंतांची नव्हे, त्यावर गरिबांचीच मालकी आहे; श्रीमंताला केवळ विश्वस्त म्हणूनच अधिकार आहे', हा सांगिततेला श्रीमंतांचा आदर्श मला भाऊसाहेबांमध्ये आढळला.

प्रथम झोपडीत राहणारे भाऊसाहेब भावनेने नेहमी झोपडीतच राहतात. गोव्यात सागराजवळ त्यांच्या अनेक बागा आहेत. त्यातील एका बागेमध्ये भाऊसाहेबांनी मला व माझ्या पत्नीला नेले. तेथे ५-२५ लहानशा सुरेख नावा खाडीच्या पाण्यात हेलकावत होत्या. आसपास टुमदार छोट्याछोट्या ख्रिश्चन कोळयांच्या झोपड्या होत्या. मी भाऊसाहेबांना विचारले, या होड्या व त्यातील नॉयलॉनची जाळी कोणाची आहेत? ते म्हणाले, ह्या नावा व ही जाळी ख्रिश्चन कोळयांची आहेत. ती मी त्यांना बहाल केली आहेत.

गोवा हे एक कलाकारांचे निजधाम आहे. गोव्यातील देवळांचे उत्सव व यात्रा यात नाटके व नाच अनेक महिने ओळीने चालतात. या यात्रांमध्ये हिंदू बहुजनसमाज नाटके, नाच व मिरवणुका यांच्या जल्लोषात बेभान होऊन भाग घेत असतो. हे उत्सव आणि यात्रा यांच्यातच गोव्यातील कलाकार हा पिढ्यान् पिढ्या व युगानुयुगे तयार होत आला आहे. भाऊसाहेबांनी अनेक प्रसंगी आम्हा मित्रमंडळींना या उत्सवाच्या यात्रा घडविल्या आहेत. या उत्सवांच्या यात्रांना भाऊसाहेबांनी मोठमोठ्या भारी रकमांच्या देणग्या देण्याचे व्रत अनेक वर्षे चालविले आहे. ख्रिश्चन प्रार्थना मंदिरांनाही त्यांनी आर्थिक हातभार लावला आहे. ते नुसते उत्सवप्रिय नाहीत. त्यांच्या जीवनात धार्मिक पावित्र्याची गूढ ओढ आहे. प्रत्येक आठवड्यात सोमवारी ते उपासनेत मग्न असतात. त्यांच्या मनाची घडण धार्मिक श्रद्धेची आहे. ते श्रद्धेने हिंदू असले तरी सर्वधर्मी समानत्व हा हिंदुत्वाचा गाभा त्यांच्या धार्मिक श्रद्धेचाही गाभा आहे. ते विचाराने मानवतावादी आहेत. मानवी समानतेचे तत्त्व त्यांच्या

अंगी बाणलेले आहे, ती त्यांची निष्ठा आहे; ही निष्ठा त्यांची कृतीच बोलून दाखवीत असते.

गोमांतकीय बहुजन समाजाचा एकमेव श्रेष्ठ नेता जर गोव्यात कोणी असेल तर भाऊसाहेबच! त्यांचे राजकीय नेतृत्व मानवतावादी भूमिकेवर आधारलेले आहे. बहुजन समाजाच्या हृदयात, मग तो हिंदू, ख्रिश्चन अगर मुसलमात कोणीही असो, भाऊसाहेबांनी अढळपद मिळविले आहे. ते राजकीय मुत्सद्दी नाहीत. मुत्सद्द्याला लागणारी बुद्धिमत्ता असली, तरी त्यांचा स्वभाव सरळ, उघडावागडा असा आहे. त्यांना अंतरीच्या नाना कळा नाहीत परंतु दुसऱ्यांच्या नाना कळा ते बरोबर ओळखतात, बोलूनही दाखवितात. सडेतोड बोलण्यामुळे माणसे नाराजही होतात. राजकीय मुत्सद्दीपणाला खोल मन व मौन आवश्यक असते. नुसती बुद्धिमत्ता राजकारणात काम देत नाही. भांडवल-संचयाची कला त्यांच्या श्रीमंतीत दिसते. परंतु त्यांनी राजकीय भांडवल जमा केलेले नाही. सार्वजनिक सेवा त्यांनी जन्मभर केली. हेच आपोआप त्यांचे राजकीय भांडवल बनले.

त्यांचे खाजगी जीवन रसिकाचे जीवन आहे. त्यांच्या पणजी येथील प्रासादात मी जेव्हा प्रथम शिरलो आणि तेथील सुरेख चित्रे, विशेषतः भिंतीवरील चित्रे पाहिली तेव्हा लक्षात आले की, चित्रकलेचा रसिकराज येथे राहतो. जपानी कलाकुसरीचा गुळगुळीत व तकतकीत लाकडी पडदा भोजनाच्या चौपाईच्याजवळ लावलेला आहे. त्या पडद्यावर प्रेक्षकाची दृष्टी पुनः पुन्हा खेळत असते. ते मैदानी खेळाचे फार शौकीन आहेत. मुंबईत वारंवार मधूनमधून होणारे मैदानी सामने पाहण्याकरता त्यांच्या वाऱ्या मुंबईत वारंवार होतात. त्यांना शिकारीचाही नाद आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक व भाऊसाहेब बांदोडकर हे या बाबतीत समान व्यसनी होत, असे म्हणण्यास हरकत नाही.

भाऊसाहेबांचे व्यक्तिमत्त्व हे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व आहे. परंतु त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव कोणता? याचे उत्तर सहज मिळू शकते. ते राजकीय ध्येयवादी असले तरी व्यवहार दृष्टीनेच ते बहुजन समाजाच्या हिताहिताचा निरंतर विचार करीत असतात; हाच त्यांचा स्थायीभाव होय. बहुजन समाजाची गरिबी खोल व अथांग आहे. त्यातून गरीब कसे उत्तीर्ण होऊ शकतील याच चिंतेत ते निमग्न असतात.

(आमचे भाऊ, नाम. भाऊसाहेब बांदोडकर षष्ट्यब्दीपूर्ती गौरव ग्रंथ,
प्रकाशक: मधुकर कृष्णाजी पाटकर,
संपादक, ५५,
पंडित बखले मार्ग, मुंबई-४,
२६ ऑक्टोबर १९७१)

○○○

४१

कै. किसन महादेव वीर

कै. किसन महादेव वीर यांचा जन्म ११ ऑगस्ट १९०६ रोजी वाई येथे झाला. वाईजवळील पुणे -बंगलोर रस्त्यावरील वाईपासून सु. ९ मैलांवर असलेल्या कवठे या गावचे ते रहिवासी. वाडवडिलांचा व्यवसाय शिंप्याचा. मराठी ५ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण कवठे या गावीच पूर्ण झाले. इंग्रजी शिक्षण अनेक कारणांस्तव ते घेऊ शकले नाहीत. लहानपणापासून मैदानी व मर्दानी खेळ यांची त्यांना आवड होती. मलखांब, कुस्ती, दांडपट्टा यांत ते तरबेज होते. आपल्या सवंगड्यांची आणि गावातील तरुणांची संघटना करण्यात ते पहिल्यापासूनच तरबेज होते. गावातील आणि भोवतालच्या गावांतील सार्वजनिक उत्सव आणि यात्रा भरत. त्यात तरुणांचा पुढाकार घेऊन मैदानी खेळ आणि कुस्त्यांचे फड यांची व्यवस्थित संघटना करून त्यांना शिस्तीचे वळण ते लावत असत.

त्यांना सर्व जातिजमाती आणि धर्मांमधील मित्र लहानपणापासूनच मिळत गेले. शरीर उत्कृष्ट कमावलेले. नेमबाजीत कोणासही ते हार जात नसत. अनेक शालेय शिक्षकांच्या प्रेमाचा लाभ झाल्यामुळे मराठी साहित्याच्या वाचनाची त्यांना गोडी लागली. 'रामविजय', 'हरिविजय', महीपतीचे 'संतचरित्र', भारताचा प्राचीन अर्वाचीन इतिहास, रजपूत व मराठे शूरवीरांची चरित्रे आणि संतचरित्रे यांचे वाचन करण्यात ते रमून जात. परंतु जन्मजात चिकित्सक बुद्धी असल्यामुळे भोळ्या भावाला किंवा अंधश्रद्धेला मनाच्या कोपऱ्यातही त्यांनी स्थान दिले नाही. आधुनिक स्वातंत्र्यवीरांच्या कथा वाचत असताना त्यांच्यामध्ये देशभक्तीचे बीज खोल रुजले. वाईचा परिसर डोंगरी किल्ल्यांनी वेढलेला. रायगडापासून प्रतापगडापर्यंत अनेक किल्ल्यांवर मित्रमंडळी व शिक्षकमंडळी यांसह अहमहमिकेने शिखर गाठण्याच्या सहली करण्याचा त्यांना नाद होता. या किल्ल्यांचा आश्रय घेऊन इंग्रजांविरुद्ध गुप्त कट करावेत व लढावे अशी ईर्षा त्यांच्यात उत्पन्न झाली. माणिकतोळा बाँबकटाचे प्रमुख सूत्रधार बारींद्रकुमार घोष यांनी त्या वेळी काढलेला जाहीरनामा त्यांच्या वाचनात

आला होता. कै. ना. के. बेहेरे यांनी लिहिलेल्या अठराशे सत्तावनच्या क्रांतियुद्धाच्या कथेचे त्यांनी अनेकदा पारायण केले होते. बारींद्रकुमार, खुदीराम बोस, सत्येंद्रकुमार घोष, कन्हैयालाल दत्त, मदनलाल धिंग्रा इत्यादी क्रांतिकारकांच्या शोर्यकथा त्यांनी स्मरणात कायम ठेवल्या होत्या.

१९२९ च्या सुमारास मुंबई येथे फणसवाडीत त्यांचे कापडाचे दुकान होते. त्या वेळी सायमन कमिशनवरच्या बहिष्काराच्या चळवळीने देशात जोर धरला होता. मुंबईत विदेशी कापडावर बहिष्काराचा कार्यक्रम, विदेशी कापडाची होळी करणे आणि विदेशी कापडाच्या दुकानांवर पहारा करून विदेशी कापड दुकानांतून काढून टाकणे इ. कार्यक्रमांना जोर चढला होता. त्यात किसन वीरांनी अत्यंत उत्साहाने भाग घेतला होता. १९३० साली म. गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ आरंभल्याबरोबर त्या चळवळीने सबंध देश, शहरे, आणि खेडीपाडी व्यापून टाकली होती. किसन वीरांचे आपल्या दुकानदारीच्या व्यवसायात मन रमेना. आपल्या वाई तालुक्यातील कवठे गावी येऊन त्यांनी मुक्काम ठोकला. महात्मा गांधींची दांडीयात्रा सुरू झाल्यावर या सत्याग्रहाच्या चळवळीला उधाण आले आणि अनेक मित्रांबरोबर डोंगरकपारींमध्ये असलेल्या खेड्यापाड्यांत सत्याग्रहाची चळवळ त्यांनी नेऊन पोहोचवली. त्यात शेकडो मित्रांबरोबर त्यांनाही मिठाच्या कायदे भंगाबद्दल कारावासाची शिक्षा झाली. दहा महिने शिक्षा भोगल्यावर ते परतले आणि पुन्हा मुंबई येथील आपल्या दुकानाचे काम पाहू लागले. महात्मा गांधींच्या निःशस्त्र चळवळीपेक्षा सशस्त्र क्रांतिकारकांची चळवळच देशाला स्वातंत्र्य देऊ शकेल, या विचाराची मनावरील पकड दृढ राहिल्यामुळे हे मुंबईतील त्यांचे दुकान सशस्त्र क्रांतिकारकांच्या संघटनेचे एक केंद्र बनले. १९३६ सालच्या अखेरीस भाई मानवेंद्र रॉय हे सहा वर्षांची कारावासाची शिक्षा भोगून बाहेर आले आणि त्यांनी किसन वीरांच्या अनेक क्रांतिकारक मित्रांना असे पटवून दिले, की अशा सशस्त्र क्रांतिकारकांच्या तुरळक प्रयत्नांनी देशव्यापी सशस्त्र क्रांतीच्या लढ्याची तयारी सद्यःस्थितीत करता येणे अशक्य आहे. म्हणून प्रथम लोकांचे राजकीय शिक्षण करणे हाच कार्यक्रम हाती घेतला पाहिजे; सशस्त्र क्रांतीच्या उठावाची पार्श्वभूमी तयार करावयास पाहिजे.

१९४२ साल उजाडले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात 'भारत छोडो' असा इंग्रजांना इशारा देणारा ठराव सर्वसंमत झाला. ह्या वेळी किसन वीरांचे वास्तव्य कवठ्यास होते व त्यांनी आपले मुंबईचे दुकान गुंडाळले होते. या 'भारत छोडो' लढ्याचे नेते पकडले जाऊ लागले. सप्टेंबरमध्ये पुणे येथील येरवडा तुरुंगात किसन वीरांची रवानगी करण्यात आली. ह्या येरवडा तुरुंगातील राजकीय कैदी तुरुंग फोडून - भूमिगत होऊन हा १९४२ चा लढा राजकीय -क्रांती व पर्यवसित करण्याचा बेत करू लागले. ह्या राजकीय कैद्यांचे दोन पुढारी होते १) सोलापूरचे भाई छन्नुसिंग व २) वाईचे

किसन वीर. ३१ ऑक्टोबर १९४२ च्या रात्री येरवडा तुरुंगाच्या भिंतीला पोलिसांना फितवून मिळवलेल्या दोन शिड्या लावून छन्नुसिंग, किसनवीर, पांडू मास्तर इ. मंडळी भिंतीवरून उड्या मारून पसार झाली. सातारा जिल्ह्यात वेगवेगळे भूमिगत गट करून किसन वीर आणि नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंडळी कामे करू लागली. श्री. यशवंतराव चव्हाण हेही या वेळी भूमिगत राहून काम करीत होते; परंतु ते फार दिवस भूमिगत न राहता प्रकट होऊन पोलिसांच्या स्वाधीन झाले. शेकडो कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागातील प्रत्येक खेडे हा क्रांतिकारकांचा बालेकिल्ला बनविण्याचा प्रयत्न केला, प्रतिसरकार स्थापन करण्याचा प्रयोग सुरू केला.

या प्रकारची भूमिगतांची आंदोलने देशभर सुरू होती. जयप्रकाश नारायण या भूमिगतांच्या आंदोलनाचे सर्वश्रेष्ठ नेते होते. १९४५ साली 'भारत छोडो' ही चळवळ मागे घेण्यात आली, भूमिगत क्रांतिकारकांवरील पकड वॉरंटे मागे घेण्यात आली. तेव्हापासून आतापर्यंत सातारा जिल्ह्यातील काँग्रेसचे नेतृत्व किसन वीर करीत होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रातील काँग्रेसचे ग्रामीण नेतृत्व सत्तास्पर्धेच्या बाहेर राहून निरपेक्ष वृत्तीने ज्यांनी चालवले, अशा अत्यंत थोड्या स्वातंत्र्यवीरांपकी किसन वीर हे होते. अत्यंत धाडसी स्वभाव, संघटनाचातुर्य, मनुष्यस्वभावाची उत्तम पारख, सर्वस्व अर्पण करण्याची तयारी हे गुण त्यांच्यामध्ये एकवटले होते. सार्वजनिक चारित्र्य व खाजगी चारित्र्य दोन्हीही निर्मळ असली पाहिजेत; आणि असाच नेता सामान्य जनांचे नेतृत्व करू शकतो, या सिद्धांतावर त्यांची श्रद्धा होती. म्हणून ज्या कार्यकर्त्यांच्या व नेत्यांच्या खाजगी चारित्र्यामध्ये त्यांना भानगड दिसत असेल, त्यांच्यावर ते उघड टीका करीत असत. प्रसंगविशेषी खाजगी चारित्र्यातील कलंक दिसत असूनही तडजोड म्हणून खाजगी भ्रष्टाचाराकडे त्यांना कानाडोळाही करावा लागे; परंतु त्याबद्दल त्यांच्या मनात शल्य किंवा खंत राहूनच जात असे.

निष्काम मित्रप्रेम हे एक श्रेष्ठ मानवी मूल्य आहे. या मूल्याची मूर्ती म्हणजे किसन वीर होत. यशवंतराव चव्हाणांच्यामध्ये सामान्य, गरीब, बहुजनसमाजाचे नेतृत्व करण्यास आवश्यक असलेले अनेक गुण आहेत, ही गोष्ट त्यांच्या मनात खोल बिंबली होती. त्यामुळे यशवंतरावांशी राजकीय धोरणांच्या बाबतीत अनेक वेळा मतभेद होऊनही त्यांनी यशवंतरावांना गेली सुमारे पन्नास वर्षे निरंतर सक्रिय पाठिंबा दिला. सुशिक्षित, शहाणा, दूरदर्शी व प्रतिभाशाली असा यशवंतरावांसारखा नेता, भारताचा योग्य नेता होऊ शकतो अशी त्यांची खात्री होती. या मित्राची शक्ती वाढवण्यात देशाचे कल्याण आहे आणि लोकशाहीची प्रतिष्ठा आहे अशी त्यांची निश्चित धारणा होती.

सध्या लोकसभेची मध्यावधी निवडणूक अगदी जवळ आलेली आहे. अशा वेळी ते एकदम आजारी झाले. तो आजार आटोक्याबाहेर गेला आणि हा आघाडीचा मोहरा या ऐन

निकडीच्या वेळी देह सोडून निघून गेला. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाची प्रचंड हानी झाली. महाराष्ट्राचे सध्याचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांचे पुलोद सरकार निर्माण झाले व टिकून राहिले याचे बरेचसे श्रेय किसन वीरांकडेच जाते. कै. आबासाहेब वीर प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या संचालकमंडळाचे गेली अनेक वर्षे संचालकही होते. त्यांच्या पवित्र स्मृतीस आम्ही ही श्रद्धांजली अर्पण करतो.

(नवभारत, जानेवारी, १९८०)

○○○

४२

भारतीय आदर्शवादाचा नवा अवतार: सेनापती बापट

भारतीय स्वातंत्र्याच्या सशस्त्र आंदोलनापासून तो विश्वातील युद्धसंस्था समाप्त होण्याकरिता नि:शस्त्र अहिंसक सामुदायिक आत्मयज्ञापर्यंत आंदोलन विचारात घेणारा भारतीय अध्यात्मवादी म्हणजे "सेनापती बापट." भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये परंपरागत उपनिषद कालापासून आलेली आध्यात्मिक विचारसरणी व जीवनपद्धत यांना नवा आकार भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातच प्राप्त झाला. माणसाची भौतिक व आध्यात्मिक संस्कृती विज्ञानयुगापूर्वी धार्मिक तत्त्वज्ञानावर अधिष्ठित होती. जगातल्या निरनिराळ्या ऐतिहासिक संस्कृतींना प्रेरणा देणारी निरनिराळी धार्मिक तत्त्वज्ञाने झाली आहेत. त्याचपैकी भारतीय अध्यात्मविद्या या भारतीय विद्येला पश्चिमी संस्कृतीचा संपर्क झाल्यावर नवा संस्कार प्राप्त झाला. या नव्या संस्काराचे दर्शन सेनापती बापटांच्या जीवनात व साहित्यात दृग्गोचर होते.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात म्हणजे इ. स. १९०४ साली सेनापती बापट हे बी. ए. पदवीधर होऊन पुढील उच्च शिक्षणाकरिता इंग्लंडला गेले. इंग्लंडमध्ये त्यांना सशस्त्र क्रांतीची दीक्षा मिळाली. आपले उच्च शिक्षण पुरे करताच बापट पॅरिसमध्ये जाऊन बॉम्ब बनविण्याची विद्या शिकून आले आणि भारतातील सशस्त्र क्रांतिकारकांच्या गटास जाऊन मिळाले. बंगालमध्ये ही क्रांतिकारक चळवळ फोफावत होती, म्हणून ता. ६ एप्रिल १९०८ रोजी ते कलकत्त्याला गेले. तेथे बारिंद्रकुमार घोष, उल्हासकर दत्त, विभूतिभूषण सरकार, पूर्णचंद्र सेन, निरुपद रॉय, प्रफुल्ल चक्रवती इ. समानधर्मी क्रांतिकारकांच्या गुप्त मंडळींस जाऊन भेटले. त्यांत योगी अरविंद घोषही होते. ही बॉम्बची विद्या बापटांनी या मंडळींना शिकविली. पोलिसांना त्यांच्या हालचालींचा वास लागला आणि बापट यांनी मित्रांचा निरोप घेऊन महाराष्ट्राकडे प्रयाण केले. त्याच सुमाराला माणिकतोला बॉम्ब खटला सुरू झाला. त्यात नरेन्द्र गोस्वामी हा माफीचा साक्षीदार होता. त्याने बॉम्बचा कलाकार बापट

होय, असे आपल्या जबानीत सांगितले. त्या खटल्यात अरविंद बाबूंसारखी ३०/३५ मंडळी पकडली गेली. दहशतीचे वातावरण निर्माण झाले. महाराष्ट्रात या खटल्याची हकिगत पोचली. त्याचबरोबर बापट अंतर्धान पावले आणि साडेचार वर्षे त्यांनी अज्ञातवासात काढली. सारखी चोरटी भ्रमंती सुरू होती. पोलिसांचा ससेमिरा होताच. ता. २८ डिसेंबर, १९१२ रोजी ते शांतपणे पोलिसांच्या स्वाधीन झाले. खूप तपासाअंती बापटांविरुद्ध योग्य तितका पुरावा न मिळाल्यामुळे २८ जानेवारी १९१३ रोजी बापटांना मुक्त करण्यात आले.

बापट स्वतःच्या जन्मग्रामी म्हणजे पारनेर येथे लोकशिक्षणाचे काम करू लागले. तेथे दोन वर्षे घालवून पुणे येथे लोकमान्य टिळकांकडे आले. लोकमान्य टिळक नुकतेच कारावास संपवून परत आले होते. टिळकांच्या 'मराठा' या इंग्रजी पत्रात संपादक म्हणून लेख लिहू लागले. टिळकांशी मतभेद होऊन 'मराठा' पत्राच्या संपादकत्वाचा राजीनामा दिला. काही काळ श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या ज्ञानकोशात लेखनाचे काम केले. १९२१ साली मुळशी सत्याग्रहाच्या संग्रामाचे नेतृत्व सुरू केले व तेव्हापासून बापट यांस 'सेनापती' हे पद प्राप्त झाले. हा सत्याग्रह फसला. त्यात त्यांना अनेकदा कारागृहाच्या शिक्षा झाल्या. २४ मे १९३१ साली बापट सात वर्षे कारागृहाची शिक्षा भोगून सुटले. त्याच सुमारास म. गांधींनी सुरू केलेले सविनय कायदेभंगाचे एक पर्वही समाप्त झाले.

अहिंसात्मक प्राणयज्ञाचा विचार

तारीख २८ जून १९३१ रोजी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून सेनापती बापट निवडले गेले. या निवडणुकीच्या वेळी आम्ही स्वतः उपस्थित होतो. त्यात म. गांधींचे कट्टर अनुयायी दे. भ. श्री. शंकरराव देव यांच्या पाठीशी सशस्त्र क्रांतिवादाच्या तत्त्वाशी संपूर्ण मतभेद असलेली काही मंडळी होती. आणि बहुसंख्य सदस्य हे या कट्टर मतभेदापासून अलिप्त होते. त्यामुळे बापट यांची बहुमताने निवड होऊ शकली. या सुमारास सशस्त्र क्रांतीबद्दलचे बापटांचे विचार मूलतः बदलले होते. परंतु त्या विचारांची व्यवस्थित मांडणी त्यांनी केली नव्हती. त्यामुळे बापटांच्या निवडीमुळे गांधीवादी गटामध्ये खळबळ माजून असंतोष उत्पन्न झाला. या असंतोषाचे निराकरण व्हावयास त्यानंतर फारसा काळ गेला नाही. भारतीय स्वातंत्र्याचा संग्राम यशस्वी व्हावयाचा तर केवळ सविनय कायदेभंग करून भागणार नाही, तर त्याकरिता अहिंसात्मक प्राणार्पण करण्याची तयारी करणे आवश्यक आहे; या विचारापर्यंत बापटांची मजल गेली होती. स्वकीय-परकीय, हिंदू-मुसलमान, स्पृश्य-अस्पृश्य, स्वधर्मीय-परधर्मीय अशा तऱ्हेचे भेद न मानता मनुष्यमात्रांची एकात्मता हेच तत्त्व अंतिम सत्य होय. किंबहुना, सबंध विश्व हेच परमेश्वराचे व्यक्त रूप असल्यामुळे कसलाही भेदभाव मनात येणे हे आध्यात्मिक उन्नतीला हानिकारक आहे. अशा विचारापर्यंत बापट येऊन पोहोचले होते. तारीख १५ जून १९३१ रोजी "भारतीय प्राणयज्ञ दल" या मथळ्याचे पत्र त्यांनी प्रसिद्ध केले. त्यात ते म्हणतात. "महात्मा गांधींनी ठरविलेल्या आत्मशुद्धीकर

रचनात्मक कार्यक्रमाच्या द्वारा आत्मशुद्धी केलेल्या आणि आत्मशुद्ध्यर्थ अविरत प्रयत्न करीत राहिलेल्या एक लक्ष भारतीयांचा नितांत शांतिमय पूर्ण अहिंसात्मक प्राणयज्ञ भारताच्या स्वातंत्र्यार्थ घडून आल्यास त्याचा आम्हाला स्वातंत्र्यप्रीत्यर्थ विशेष उपयोग होईल. इतकेच नव्हे तर, जगातील सर्व सात्त्विक माणसांना मनापासून हवी आहे अशी गोष्ट म्हणजे हिंसात्मक मार्गांची उच्चाटना होण्यासही अशा प्राणयज्ञाची विशेष मदत होईल असे मला स्पष्ट दिसत आहे. या माझ्या अंतःप्रकाशानुसार भारतीयांना हे मी आमंत्रण देत आहे.'' या निवेदनावरून हे लक्षात येईल की, बापटांच्या विचारामध्ये फार मोठी क्रांती झाली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात जेव्हा जगाला अणुयुद्धाचा धोका निर्माण झाला, तेव्हा राष्ट्रीय पातळीवरून जागतिक पातळीवर हा अहिंसात्मक प्राणयज्ञाचा विचार बापटांनी पोचविला. या सर्व विचारसरणीच्या बुडाशी भारतीय ब्रह्मवाद होता. कोणत्याही जिवाबद्दल प्रेमाची व मैत्रीचीच भावना असली पाहिजे आणि ही मैत्रीची भावना म्हणजेच परमेश्वरभक्ती होय असा त्यांचा दृढ विश्वास होता. निर्गम आणि निरहंकारबुद्धीने विश्वाच्या कल्याणाकरिता आयुष्य वेचणे हेच मनुष्याचे उच्चतम नैतिक कर्तव्य होय, असा सिद्धांत बापटांनी मनाशी बाळगला होता. गेल्या १५० वर्षांत राजा राममोहन राय, रामकृष्ण परमहंस स्वामी विवेकानंद, योगी अरविंद घोष, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी इत्यादी जे राष्ट्रीय द्रष्टे झाले, त्यांनी हाच अध्यात्मवाद पुकारला. बापटांच्या जीवनामध्ये याच अध्यात्मवादाचे साक्षात प्रत्यंतर मिळते.

(लोकराज्य, १ मार्च व १६ मार्च १९८१, पृ. २२-२३)

ooo

४३

वऱ्हाडाचे टिळक : लोकनायक बापूजी अणे

बापूजी अणे यांचा टिळकयुगात जन्म, बालपण व तारुण्य गेले. त्या युगातील सगळे राजकीय विचारांचे आणि संघर्षाचे संस्कार घेतलेले प्रौढ व्यक्तिमत्त्व असे बापूजी अणे गांधीयुगामध्ये १९२० च्या सुमारास महाराष्ट्राचे नेते म्हणून प्रकट झाले.

त्यांचा जन्म वैदिक विद्वान ब्राह्मणाच्या कुलात झाला. त्यांचे आचारविचार अस्सल सनातनी विचारपरंपरेचे होते. माझ्या त्यांच्या गाठीभेटी अनेक वेळा झाल्या, ज्यात त्यांच्या सुसंगत आचारविचारांचा आणि निर्मळ दिलदार मनाचा प्रत्यय आला.

१९३४ साली प्रयाग येथील मदनमोहन मालवीय यांनी भरविलेल्या सनातन धर्म परिषदेचे अधिवेशन आटोपून मी वाराणसी येथील हिंदू विद्यापीठाच्या परिसरातील मदनमोहन मालवीय यांच्या निवासस्थानी परतलो. त्या परिषदेमध्ये अस्पृश्यता निवारणाची बाजू धर्मशास्त्राधारे मांडण्याकरिता मालवीयजींनी मला निमंत्रण दिले होते. मालवीयजींबरोबर मी वाराणसी येथे त्यांच्या निवासस्थानी आलो. संध्याकाळ झालेली होती. एका निराळ्या खोलीत मला जागा देण्यात आली होती. रात्री भोजन झाल्यानंतर काही वेळ वाचन करून मी झोपलो. पहाटे पाच वाजता जाग आली. जाग आली तेव्हा शेजारच्या खोलीमध्ये शुद्ध व मधुर स्वरात कोणीतरी ऋग्वेदातील उषेची व भगवतदेवतेची सूक्ते म्हणत होते. मी त्या सुरात माझा सूर मिळविला. सूक्तपठण झाल्यावर एक तेजस्वी मूर्ती माझ्या खोलीत आली. मी पाहतो तर बापूजी अणे. तत्पूर्वी अनेक वेळा गाठीभेटी झालेल्या असल्यामुळे आम्ही एकमेकांस चटकन ओळखले. बापूजी गला म्हणाले, सनातन धर्म परिषदेमध्ये शास्त्रार्थाची चर्चा करून आपण इकडे आलात हे मालवीयजींनी काल रात्री मला सांगितले. मला असे वाटत होते की, बापूजी अणे हे सनातन धर्माचे मोठे पुरस्कर्ते, त्यामुळे त्यांना अस्पृश्यता-निवारणाचे विचार मान्य नसावेत. परंतु बापूजींनी मला उत्तेजन देऊन विचारले की, ‘‘कोणकोणती शास्त्रवचने तुम्ही उद्धृत केलीत ?’’ मी ती वचने म्हणू लागल्याबरोबर तेही वचने बिनचूक रीतीने म्हणू लागले. त्यांनी मला सांगितले की, ‘‘ देशकालपरिस्थितीप्रमाणे धर्मशास्त्राचा अर्थ करण्याची

ही तुमची पद्धती फार चांगली आहे. आपली श्रेष्ठ परंपरा मोडावयाची नाही, परंतु तिच्यामध्ये योग्य असा बदल करणे आवश्यक आहे, कारण आपला धर्म हा सनातन धर्म आहे. सनातन धर्म म्हणजे बदलत्या परिस्थितीवर मात करून समाजाला सन्मार्गामध्ये ठेवणारा शाश्वत धर्म होय.'' मला बापूजींचे हे म्हणणे ऐकून काहीसे वाश्चर्य वाटले व त्याबरोबर आनंद झाला.

बापूजी अणे हे लोकमान्यांचे निष्ठावंत अनुयायी होते. ते लोकमान्यांच्या गीतारहस्याचे उत्कृष्ट समर्थक होते. लोकसंग्रहार्थ जीवनमुक्त सिद्धपुरुषांनी कर्मयोगाचे आचरण केले पाहिजे, परंपरागत साधु-संन्याश्याप्रमाणे सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनाकडे दुर्लक्ष करून केवळ भजनीमार्गाचा आणि यज्ञयागादिकांचा प्रचार करून स्वस्थ बसू नये, भगवद्गीतेतील लोकसंग्रह म्हणजे लोकशिक्षण, म्हणजे परकीय साम्राज्यशाहीचा सशस्त्र वा नि:शस्त्र प्रतिकार करण्यास उपयुक्त होण्याकरिता लोकांस जीवनाच्या सर्व बाजूंचा अर्थ समजावून सांगणे. त्यामुळेच अमानुष लोकांमध्ये खरी सामाजिक शक्ती निर्माण होते आणि लोक प्रतिकारास समर्थ होतात. राजकीय सत्ता प्रतिकाराशिवाय प्राप्त होऊ शकणार नाही असा टिळकांच्या विचारांचा भावार्थ बापूजी अणे यांनी काढला होता.

गणेशोत्सव आणि शिवाजी उत्सव ही लोकांच्या राजकीय शिक्षणाची उत्कृष्ट साधने लोकमान्य टिळकांनी निर्माण केली होती. या साधनांचा नागविदर्भामध्ये चांगला फैलाव करण्याचे काम लोकमान्यांच्या अनुयायांनी चालविले होते. विदर्भात लहान-मोठे राजकीय पुढारी या माध्यमामधून राजकारणाचे शिक्षण जनतेस देत होते. त्यात बापूजी अणे प्रामुख्याने भाग घेत होते. बापूजी अणे हे संस्कृतचे उत्तम पंडित होते, आणि त्या त्यांच्या पांडित्याला त्यांनी आधुनिक धर्ममीमांसेचीही जोड दिली होती. त्यांनी गणेशदेवतेची उपपत्ती मांडलेली आहे. ती या दृष्टीने फार उद्बोधक आहे. ऋग्वेदातील आर्यांचा ब्रह्मणस्पती म्हणजे विद्याधिपती आणि अनार्यांचा हस्तिमुख गणपती यांचा समन्वय होऊन अथर्वशीर्षातील गणपती कसा बनला, याची उपपत्ती त्यांनी मांडलेली आहे. एका देशात, प्रदेशात राहणाऱ्या जातिजमाती धार्मिक व सांस्कृतिक देवघेव कशी करतात याचे उदाहरण म्हणून त्यांनी वरील उपपत्ती सांगितली आहे. त्याच्या पाठीमागे भारतात आणि महाराष्ट्रात ज्या भिन्न भिन्न जमाती, भिन्न भिन्न समाज राहतात त्यांच्यामध्येही एकमेकांचे धर्मस्वातंत्र्य राहून एकजूट निर्माण होणे आवश्यक आहे असा विचार होता. हिंदू मुसलमानांचा प्रश्न हा भारतीय राजकरणातील अत्यंत गुतागुंतीचा असा कूट प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर धर्मस्वातंत्र्य तत्त्वावर आधारलेले पाहिजे असा लोकमान्यांचा विचार होता. तोच विचार बापूजींनीही चांगल्या रीतीने जनतेला समजावून सांगितला. भारताचे एकराष्ट्रीयत्व म्हणजे केवळ हिंदूंचे एकराष्ट्रीयत्व नव्हे तर हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतच्या विस्तृत प्रदेशात राहणाऱ्या विविध धर्मीय जमातींचे एकराष्ट्रीयत्व होय, अशा तऱ्हेची श्रद्धा बापूजींच्या राष्ट्रवादाच्या मुळाशी होती.

महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीशी बापूजींचे मौलिक मतभेद होते. पण या मतभेदांचा कल नेमस्त पक्षाप्रमाणे सहकार्याकडे वळलेला नव्हता. लोकमताची भक्कम

बाजू मांडण्याची आणि लोकमत जागृत करण्याची सर्व प्रकारची साधने वापरणे हे आवश्यक आणि सयुक्तिक आहे. म्हणून विधिमंडळामध्ये आणि विधिमंडळाच्या बाहेर लोकांची परकीय सत्तेशी सामना करण्याकरिता प्रतिकार शक्तीही वाढविली पाहिजे. परंतु आज सजस्त्र प्रतिकाराचा मार्ग व्यवहार नाही म्हणून निःशस्त्र प्रतिकाराची शक्ती वाढविली पाहिजे, अशी विचारसरणी बापूजींनी आपल्या सुरेख युक्तिवादाने मांडलेली आहे.

बापूजींनी तत्कालीन भारतीय नेत्यांच्या बरोबरीने कामे केली आणि अनेक राजकीय संघटनांमध्ये नेतृत्व केले. त्यांच्या उत्कृष्ट वाक्पटुत्वामुळे देशबंधु चित्तरंजन दास, पंडित मोतीलाल नेहरू, बॅ. विठ्ठलभाई पटेल, राजगोपालाचारी, सरहद्द गांधी यांच्यावर त्यांची छाप पडत असे. या बड्या नेत्यांशी मतभेद झाला असता ते प्रांजलपणे आपल्या सदसद्विवेक बुद्धीला जे पटेल तेच मांडायचे.

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात काँग्रेसच्या नेत्यांनी कायदेमंडळांचा राजीनामा दिला. ब्रिटिश सरकारशी पूर्ण असहकार पुकारला होता. परंतु बापूजी अणे यांनी १९४१-४२ च्या सुमारास व्हॉइसरॉयच्या कौन्सिलमध्ये सदस्य म्हणून प्रवेश केला होता. व्हॉइसरॉयचा कौन्सिल सदस्य म्हणजे त्या वेळच्या केंद्र राज्यात्रा एक मंत्रीच होय. परंतु सत्ता आणि धनलोभ यांनी ते सदस्यत्व त्यांनी पत्करले नव्हते. त्या वेळी दिल्लीस मोठ्या सरकारी बंगल्यात ते राहात होते. मीही एकदा त्यांचा पाहुणा म्हणून एक आठवडाभर त्यांच्या बंगल्यात मुक्काम केला होता. तेथे बापूजींचा दिनक्रम जुन्या सनातनी ब्राह्मणासारखाच होता. सूर्योदयाअगोदर स्नान संध्या आटोपून बापूजी आपल्या सुंदर देव्हाऱ्यासमोर बसून यथासांग पूजा करीत. जवळजवळ तीन तास सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत रुद्राभिषेक, पोथीवाचन, जप व अखेर आरती करून नऊ वाजता बाहेर येत. माझी त्यांची संध्याकाळच्या भोजनाच्या वेळी भेट व्हायची. बापूजींना मी विचारले की, ''रामशास्त्र्यांनी माधवराव पेशव्यांना सांगितले की, पूजा-अर्चा करण्यात वेळ घालवू नका. यावर आपले काय म्हणणे आहे?'' बापूजी हसत मला म्हणाले, "मी बाकी सबंध १४ तास (झोपेची वेळ सोडून) राज्यकारभारातच असतो. त्याकरिता मनाला सामर्थ्य पुरविण्याचे कार्य ही माझी पूजा-अर्चा करीत असते. त्यामुळे माझा विचार अधिक सकस आणि परिणामकारक बनलेला असतो. कोणी पाहिले आहे देव आहे की नाही? परंतु धार्मिक उपासना मला बळ देते याबद्दल मला मुळीच शंका नाही. देव आणि स्वर्ग आहे अशी माझी दृढ श्रद्धा आहे. पण तुम्हा तार्किकांना मी हे पटवू शकत नाही. कारण परमार्थ हा तर्कवितर्कांच्या पलीकडे असतो."

('ओंजळ' : लोकनायक बापूजी अणे गौरव ग्रंथ
संपादक: शांताराम कवडे, माधव सरपटवार;
लोकनायक जन्मशताब्दी समिती प्रकाशन, वणी, जि. यवतमाळ
नोव्हेंबर, १९८१, पृ. ६७ ते ७०)

○○○

४४

शुध्द चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी : यशवंतराव चव्हाण

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा कालखंड हे भारताच्या इतिहासातील प्रज्ञावंत पुरुषांना, शुद्ध चारित्र्याच्या त्याग वीरांना जन्म देणारे आणि भारताला आदर्श नेतृत्व मिळवून देणारे युग होय. त्या स्वातंत्र्य आंदोलनात त्यांच्या जीवनाचा अर्थ समजून घ्यावा, महत्ता अजमावण्याचा प्रयत्न करावा, अशा व्यक्ती या राष्ट्रीय जीवनात समाजाच्या अत्यंत खालच्या थरापासून तो वरच्या थरापर्यंतच्या समाजजीवनात चमकणाऱ्या अगणित व्यक्ती झाल्या. त्यांपैकी काही थोड्या व्यक्ती अशा झाल्या की, त्यांच्या जीवनात वर्तमान युगाचा अर्थ भरलेला दिसतो. वर्तमान युगाच्या प्रेरणा, ध्येयवाद, स्थित्यंतरे आणि महत्त्वाच्या घडामोडी यांचा ध्वन्यर्थ उमटलेला त्यात दिसतो. अशा थोड्या व्यक्तींपैकीच यशवंतराव चव्हाण होत.

यशवंतरावांचा जन्म अत्यंत गरीब अशा शेतकरी कुटुंबात १२ मार्च १९१३ ला झाला. हे ग्रामीण जीवन होते. भारताचे ग्रामीण जीवन शतकानुशतके खुरटलेले होते. त्यातील माणसांची मने जन्मभर मुकुलित स्थितीत कायम राहिलेली. बदल घडतच नव्हते. उमेद निर्माण होईल, दुःखावस्थेच्या कचाट्यातून बाहेर पडता येईल असे काहीच घडत नव्हते. विकासाचा स्पर्श कोठेही नव्हता. अशा ग्रामीण जीवनात चव्हाण यांचे कुटुंब पिढ्यान्‌पिढ्या जीवन कंठित होते. यशवंतरावांच्या वडिलांनी त्या दुर्धर परिस्थितीत कुचंबत न राहता नागरी जीवनाचा आश्रय केला.

कराड येथे बेलिफाची नोकरी पत्करली. आधुनिक नागरी संस्कृतीचा वरदहस्त प्राप्त झाला म्हणजे जीवनविकासाच्या वाटा दिसू लागतात; सगळ्यांनाच दिसतात असे नव्हे, ज्यांना दिसतात त्यांना भाग्योदयाचा मार्गही दिसू लागतो. त्याचे प्रत्यंतर यशवंतराव चव्हाण यांच्या आयुष्यक्रमात मिळते. आधुनिक इंग्रजी शिक्षणाचा लाभ यशवंतरावांना त्यांच्या बंधूंच्या कै. गणपतरावांच्या आधुनिक दृष्टीमुळे झाला. हे केवळ योगायोगाने घडले. गणपतराव हे जोतीराव फुल्यांच्या सामाजिक क्रांतीच्या ध्येयवादाने भारलेले होते. त्यांच्या बंधूंना नव्या इंग्रजी शिक्षणाचे

माहात्म्य उमगले होते, दारिद्र्याने जर्जर झालेले कुटुंब असतानाही बंधूंनी यशवंतरावांना नव्या शिक्षणाचा मार्ग दाखवला. यशवंतरावांनीही या उपकाराची फेड नंतर मोठ्या कृतज्ञतेने केली.

मोठा सामाजिक परिवर्तनाचा आदेश सत्यशोधक समाजाच्या दणदणीत प्रचाराने महाराष्ट्राच्या ग्रामीण जगात दुमदुमू लागला होता. विशेषत: नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये या प्रचाराला प्रखर स्वरूप प्राप्त झाले होते. या प्रचारापेक्षा एक वेगळी राजकीय स्वातंत्र्याच्या अांदोलनांची आघाडी ग्रामीण भागात उघडली जाऊ लागली. लहान-मोठ्या नगरांना भेटून ग्रामीण भागामध्येही या दोन बाजंूच्या प्रचाराच्या नौबती दुमदुमू लागल्या. वैचारिक संघर्ष सुरू झाला. त्याचाही परिणाम यशवंतराव चव्हाण यांच्या तरल व प्रत्ययशील बुद्धीवर झाला. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली या देशात परकीय पारतंत्र्याविरुद्ध तीन मोठी देशव्यापी वादळे १०-१२ वर्षांच्या अंतराने निर्माण झाली. शेवटच्या वादळाचे फळ ब्रिटिश साम्राज्यशाहीचा अंत. पहिले वादळ असहकारितचे; ते १९२० साली सुरू झाले; १९२३ च्या सुमारास शमले. १९३० साली दुसरे अधिक मोठे सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाचे वादळ उठले. या वेळी यशवंतराव (वय वर्षे १६) माध्यमिक विद्यालयाच्या शालान्त परीक्षेचा अभ्यास करीत होते. या वादळात सामील झाले, त्या वेळी ते यौवनाच्या पहिल्या उन्मेषात होते. भारतीय राष्ट्रवाद त्यांच्या जीवनाचा कायमचा मार्गदर्शक तेव्हाच ठरला. मनाची कवाडे खुली ठेवल्यामुळे इकडे विद्यालयीन पुस्तकी शिक्षण चालू असतानाच भोवतालचे राष्ट्रीय जीवन आणि जागतिक उलाढाली यांचेही पडसाद त्यांच्या बुद्धीत उमटू लागले. भोवतालची वैचारिक आंदोलनेही त्यांच्या विचारांना चालना देत होती. १९३० ते १९४५ या कालखंडात त्यांनी विश्वविद्यालयीन शिक्षण पुरे केले. त्याबरोबरच स्वातंत्र्याच्या आंदोलनात वारंवार कारावासाच्या शिक्षा भोगून राजकीय आणि सांस्कृतिक विषयांचे धडे गिरवले. बंदिशाळा ही त्यांचे विद्यापीठ बनले. अभ्यासाने त्यांची बुद्धी व विचार संपन्न व समर्थ बनले. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, एम. एन. रॉय इत्यादिकांचे परिशीलन त्यांनी मोठ्या आस्थेने केले. त्याबरोबरच पश्चिमेकडील क्रांत्यांच्या मुळाशी असलेली विचारसरणी तुलनात्मक रीतीने अभ्यासली. प्रत्यक्ष राजकीय आंदोलनात भाग घेतल्यामुळे पुस्तकी अध्ययनाला मर्यादा पडल्या; परंतु भारतीय वस्तुस्थिती, राजकीय व सामाजिक वस्तुस्थिती व ध्येयवादी तत्त्वज्ञाने यांच्या तुलनात्मक अध्ययनाने समन्वयदादी दृष्टिकोन प्राप्त झाला. तत्त्वांशी तडजोड करणे प्राप्त झाले, तरी ध्येयवादाच्या प्रकाशापासून विचार दूर जाऊ दिला नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या आंदोलनात त्यांनी अनुयायित्व प्रथम निष्ठेने पत्करले. मनोरचना विचारवंताची असल्यामुळे त्यातच विचारप्रर्वक भाग घेतला. कोणतीही कृती किंवा कार्यक्रम अमलात आणणारा माणूस जेव्हा त्या कृतीचा अभ्यास करतो, साधकबाधक दृष्टीने कृती करू लागतो, तेव्हा त्याचे ते जीवन वैचारिक जीवन बनते. त्यातच नेतृत्वाचे बीज रोवले जाते. या अनेक आंदोलनांमध्ये विचारांबरोबर वक्तृत्वाची कला यशवंतरावांना संपादन करता

आली. त्यांची भाषणशैली अगदी वेगळ्या प्रकारची होती. त्यात एक खास वैशिष्ट्य होते. स्वातंत्र्याच्या चळवळीत ग्रामीण जनतेत वावरत असताना त्यांना सामान्य जनांचे अथांग कष्ट दिसत होते. त्याबरोबरच सामान्य जनांचे अथांग प्रेमही ते अनुभवत होते. या जनतेच्या प्रेमाने त्यांच्या वक्तृत्वकलेला अगदी वेगळा असा आकृतिबंध दिला. आपल्या माणसांशी आपण विचारविनिमय करत असतो तेव्हा हट्टत बोलतो, हितगूज करतो, भावुकतेने आत्मनिवेदन करतो. अशा तऱ्हेचे त्यांचे वक्तृत्व होते. जिव्हाळ्याच्या माणसांशी बोलणाऱ्याची रीती त्यात दिसत होती. या मोठमोठ्या आंदोलनांमध्ये देशभर वृद्ध, मध्यमवयीन, तरुण वक्ते आणि प्रवक्ते, सभा-मोर्चे, अधिवेशने यांच्यामध्ये गर्जत आणि गाजत असत. लोकशाहीच्या आवश्यक साधनांपैकी वक्तृत्व ही कला असते. हा लोकशाहीचा वक्ता अनेक वेळा जनतेपेक्षा वेगळा असलेला, जनतेच्या उद्धाराचा बाणा बाळगणारा, तडफदार वक्ता म्हणजे यशवंतराव नव्हे. त्यांना फड जिंकायचा नव्हता, जनतेवर मोहिनी टाकून तिला वाहवत न्यावयाचे नव्हते किंवा नादी लावायचे नव्हते. जनतेला शिक्षण देणारा शिक्षक म्हणून यशवंतराव संभा संमेलनांमध्ये बोलत असत. यशवंतरावांना लोकशाहीची जोपासना करायची होती. लोकशाहीचा नेता हा लोकशिक्षक असावा लागतो.

१९४२ सालच्या 'भारत छोडो' या अखेरच्या आंदोलनात यशवंतरावांनी त्या वेळच्या मोठ्या सातारा जिल्ह्याचे नेतृत्व केले. १९४१ साली कायद्याची पदवी परीक्षा ते उत्तीर्ण झाले होते. वकिलीची सनद हातात पडल्यावर वकिलीकडे लक्ष न देता सातारा जिल्ह्याच्या राजकारणाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. २ जून १९४२ ला एका सुखवस्तू घरंदाजाच्या मुलीशी विवाहबद्ध झाले. दिसायला नीटनेटक्या, सुरेख म्हणून पसंत झालेल्या वेणुताईंशी लग्न केले. विवाहाचा सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला. परंतु लगेच भूमिगतांचे नेतृत्व सुरू झाले. स्वातंत्र्यसंग्रामात अखेरचे १९४५ पर्यंतचे जे महाराष्ट्रात नेते झाले, त्यांच्यातील सर्वांत तरुण यशवंतराव हे होते. १९४६ साली विधानसभेवर ते निवडून आले.

मुंबई ही एका अर्थाने भारताची आर्थिक राजधानी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या सर्व सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय चळवळींचे भारतातील श्रेष्ठ असे एक केंद्रस्थान मुंबई होय. त्या वेळच्या बहुभाषिक मुंबई राज्याच्या राजधानीत यशवंतराव एक पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून राहावयास गेले. १४ एप्रिल १९४६ ला या भूमिकेतून या पदाची सूत्रे त्यांनी स्वीकारली. साताऱ्याकडील अनेक मित्रमंडळींची आणि एकंदरीत राजकीयदृष्ट्या अत्यंत जागरूक अशा मतदार वर्गाची उत्कट इच्छा होती की, यशवंतरावांना मुंबईतील खेर मंत्रिमंडळात मंत्रिपदाचा अधिकार मिळावा. परंतु यशवंतरावांचा स्वभाव जे अनायसे प्राप्त होते, ते समाधानाने स्वीकारावयाचे. शासनाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश मिळाला यातच समाधान मानले. त्या वेळी मोरारजी देसाई हे गृहमंत्री होते. महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःचे स्थान भक्कम केल्याशिवाय मुंबई राज्याच्या प्रशासनात घट्टपणे बैठक मांडता येणार नाही, हे ओळखून त्याकरिता सामान्य ग्रामीण जनतेतल्या नवोदित,

कर्तबगार तरुणाला हाताशी घेणेच आवश्यक आहे, म्हणून मोरारजींनी अशा आपुलकीच्या आर्जवी भाषेत यशवंतरावांची विचारपूस केली. गृहखात्याकडेच दाखल का होत नाही? असा विनंतीवजा शब्द टाकला आणि मोरारजींच्याच खात्यात पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून रुजू होऊन कारभार पाहू लागले. मोरारजी हे ब्रिटिश अमदानीतील साहेब! या साहेबांची मर्जी राखून प्रशासनावर कब्जा मिळवण्याची युक्ती यशवंतरावांनी मोठ्या खुबीने वापरली. उत्कृष्ट प्रशासक म्हणून मोरारजींची ख्याती; त्यामुळे मोरारजींची प्रशासनाची हातोटी यशवंतरावांनी हस्तगत केली. मोरारजींचा स्वभाव ताठर म्हणून प्रसिद्ध. मोरारजींच्या स्वभावातील कंगोऱ्यांना टाळून सोपवलेली सगळी कारभारातील कामे पार पाडली. पोलीसयंत्रणा हा कारभाराचा मुख्य सांगाडा सूक्ष्मपणाने तपासला.

१९४८-४९ सालात हिंदु-मुसलमानांचे दंगे उफाळून आले. त्या वेळी चव्हाणांनी योजना तयार करून होमगार्ड संघटना बांधून काढली. संरक्षणार्थ सिद्ध अशी स्वतंत्र नागरिकांची एक प्रकारची ही सेनाच त्यांनी निर्माण केली. नागरी पुरवठ्याला शिस्त आणली. यशवंतराव हे खरेखुरे रसिक. उच्च अभिजात रसिकता जशी त्यांच्यामध्ये होती, तशीच ग्रामीण भागातील डफ-तुतारीच्या मैदानी लोककलेचीही त्यांना खूप आवड होती. तमाशा या लोककलेला शासकीय मान्यता प्रथम यशवंतरावांनी मिळवून दिली.

पार्लमेंटरी सेक्रेटरी पदावर राहून यशवंतराव मुंबईत काम करत. शरीर मुंबईत, पण मन कराडात; मुंबईतील राज्य कारभारात त्याचप्रमाणे कराड येथील घरात, अशा द्विधा स्थितीमध्ये मन ताणले गेले होते. परमप्रिय वडील बंधू गणपतराव क्षयाने आजारी होते. त्यांची सेवा करीत असताना गणपतरावांच्या पत्नीनाही त्या संसर्गजन्य रोगाने पछाडले. या दोघांच्या सेवेमध्ये यशवंतरावांची तरुण पत्नी वेणूताई सारख्या झटत होत्या. त्यांनाही क्षयाची बाधा झाली. १९४७ च्या डिसेंबर महिन्यात गणपतराव दिवंगत झाले. दोन वर्षांत यशवंतरावांची भावजय म्हणजे गणपतरावांच्या पत्नी याही इहलोकातून गेल्या. गणपतरावांच्या मुलांची म्हणजे पुतण्यांची जबाबदारी यशवंतरावांवर पडली. सेवा करीत असताना वेणूताईंची प्रकृतीही ढासळलीच. अशा आपत्तींच्या वेढ्यात यशवंतराव सापडले. वेणुताई मिरजेच्या डॉ. जॉन्सन या मिशनरी डॉक्टरांच्या उपचाराने संकटातून बाहेर पडल्या.

१९४६ ते १९५६ या १० वर्षांचा महाराष्ट्रातील व स्वतंत्र भारतातील राजकारणाचा रंगमंच हा विलक्षण संग्रामनाट्यांनी झपाट्याने बदलत होता. काँग्रेसमध्ये डावे आणि उजवे असे गट निर्माण झाले आणि त्यांच्यात रस्सीखेच सुरू झाली. स्वतंत्र भारताची घटनासमिती स्वतंत्र व एकात्म भारताची लोकशाहीप्रधान राज्यघटना निर्माण करण्यात यशस्वी झाली. आशिया खंडात एका विशाल लोकशाही राष्ट्राची म्हणजे भारताची निर्मिती झाली; परंतु ही राज्यघटना निर्माण होत असताना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा एका हिंदुत्ववादी अतिरेक्याने खून केला. त्याची भयंकर प्रतिक्रिया महाराष्ट्रातील शहरांत आणि विशेषतः ग्रामीण भागात उफाळून आली. त्यात

गेल्या १०० वर्षांत वाढीस लागलेल्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाने हिंसक व विध्वंसक रूप घेतले. अनेक शहरांमध्ये आणि शेकडो खेड्यांमध्ये तालुक्यांच्या ठिकाणी असलेली ब्राह्मणांची घरे जाळण्यात आली. लागोपाठ जवळजवळ ६ महिने या संहारक घटनांची मालिका सुरू होती. त्यात यशवंतरावांच्या नेतृत्वाची कसोटी लागली. त्यांनी कराड व कराडच्या भोवतालच्या भागात जातीने उपस्थित राहून ग्रामीण प्रक्षुब्ध, गटागटांनी हिंडणाऱ्या जमावांना शांत केले.

प्रत्यक्ष काँग्रेस संघटनेमध्ये महाराष्ट्रात काँग्रेसमधून फुटून निघालेल्या डाव्या गटाचा शेतकरी कामकरी पक्ष १९४९ सालच्या दरम्यान स्थापन झाला. बहुजन समाजातले कही मुरब्बी नेते काँग्रेस सोडून या नव्या गटाचे नेतृत्व करू लागले. शंकरराव मोरे, भास्करराव जेधे, दत्ता देशमुख, तुळशीदास खाडिलकर, यशवंतराव मोहिते इत्यादिकांनी या पक्षाच्या प्रसारास वेग आणला. यशवंतराव चव्हाण या पक्षाच्या स्थापनेच्या वेळी ज्या अनेक वेळा खलबती झाल्या, त्यातील काही बैठकीत स्वतः उपस्थित होते. परंतु या वेळी पक्ष स्थापनेच्या प्रसंगी पुन्हा बाजूला होऊन ते काँग्रेसलाच चिकटून राहिले. खरोखर हा यशवंतरावांच्या दृष्टीने इकडे की तिकडे जावे अशा तऱ्हेचा मानसिक भावनांचा संघर्षच होता. त्यातून विवेकाने ते क्षणात बाहेर पडले.

१९५२ सालची भारताची पहिली सार्वत्रिक निवडणूक होय. महाराष्ट्रात काँग्रेसविरुद्ध शेतकरी कामकरी पक्ष असा निकराचा सामना होऊन जेधे मोरे यांचा नवा पक्ष मार खाऊन खाली बसला. नंतर थोड्याच म्हणजे ४-५ वर्षांच्या अवधीत जेधे, मोरे, तुळशीदास जाधव, खाडिलकर, यशवंतराव मोहिते वगैरे मंडळी काँग्रेसमध्ये म्हणजे स्वगृही परतली. १९५२ च्या निवडणुकीत बाळासाहेब खेर उभे राहिले नाहीत. खेरांची राजवट संपली. खऱ्या अर्थाने ती मोरारजींचीच राजवट होती, परंतु आता या नव्या निवडणुकीनंतर मोरारजी पक्षनेते म्हणून निवडून आले. मोरारजींनी आपल्या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाण व भाऊसाहेब हिरे या दोघा ग्रामीण जनतेच्या नेत्यांना सामावून घेतले. या काळात महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्षपदही भाऊसाहेब हिरे यांच्याकडेच आले. हे बहुभाषिक मुंबई राज्य होते. यात गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटक हे तिन्ही भाषिक प्रदेश समाविष्ट होते.

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये एवढेच नव्हे तर भारताच्या राजकारणामध्ये भाषिक राज्यांच्या मागणीचे आंदोलन वाढीस लागले. भारताचे काँग्रेस पक्षीय केंद्रीय सत्ताधारी भाषिक राज्यनिर्मितीच्या बाबतीत साशंक मनःस्थितीत होते; परंतु भाषिक प्रदेश राज्यांची मागणी अत्यंत गगनभेदी आवाजाने होऊ लागली. आंध्रमध्ये हा प्रश्न धसास लागला. नाखुशीने पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र आंध्र राज्याची योजना लोकसभेकडे पुढे मांडून मान्य करून घेतली. १९४६ सालापासून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन सुरू झाले. या आंदोलनात महाराष्ट्राच्या साहित्यकारांनी पुढाकार घेतला. साहित्यकारांनी निर्माण केलेल्या आंदोलनाचे जनतेच्या आंदोलनात रूपांतर होऊ शकते, याचे आश्चर्यकारक प्रत्यंतर संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्ये मिळाले. भारत सरकारने भाषावार प्रांतरचनेकरिता फाजल अली

आयोग निर्माण केला. त्या आयोगाचा अहवाल १९५५ च्या ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध झाला. तेव्हा महाराष्ट्राच्या काँग्रेस पक्षामध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन शिरले. महाराष्ट्राच्या काँग्रेस समितीने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव एकमताने सम्मत केला. फाजल अली आयोगाने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. त्यामुळे महाराष्ट्राच्या काँग्रेसमध्ये नेमस्त गट व जहाल गट असे पडले. भाऊसाहेब हिरे हे जहाल गटाचे नेते होते. संयुक्त महाराष्ट्राचा लढा वाढत होता. त्याला भाऊसाहेब हिऱ्यांचा पाठिंबा होता. यशवंतराव चव्हाण हे मनापासून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे पुरस्कर्ते होते, परंतु वेळ पडली तर काँग्रेसमधून फुटून लढ्यामध्ये सामील होण्यास उत्सुक नव्हते. १९५६ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षात फूट पडली. त्यामुळे मोरारजी देसाई यांनी पक्षनेता म्हणून उभे न राहता यशवंतराव चव्हाण यांनाच पक्षाचे नेते म्हणून उभे केले. यशवंतराव चव्हाण पक्षनेते म्हणून बहुमताने निवडून आले.

१ नोव्हेंबर १९५६ ला द्वैभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले. त्या द्वैभाषिक मुंबई, राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांनी सत्ता हाती घेतली. त्या वेळी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला अत्यंत विशाल, उत्कट आणि भव्य रूप प्राप्त झाले होते. भव्य मोर्चे आणि अफाट प्रचंड सभा यांच्या योगाने महाराष्ट्र खवळून उभा राहिला होता. मोरारजी देसाईंच्या कारकिर्दीत १९५२ सालापासून ते १९५६ सालापर्यंतच्या या कारकिर्दीत मुंबई राज्याच्या प्रशासनाने आंदोलन दडपण्याकरता १०५ बळी घेतले. हा सगळा इतिहास डोळ्यांसमोर घडत असताना यशवंतरावांनी मोठ्या द्विभाषिक मुंबई राज्याची धुरा खांद्यावर घेतली हे मोठेच धाडस होते. ही धुरा वहात असताना यशवंतरावांनी असा पण जाहीर केला की, मी बंदुकीची गोळी न वापरता राज्य चालवणार, त्याप्रमाणे त्यांनी शिताफीने राज्य चालविले, पंडित जवाहरलाल नेहरूंसारख्या संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या बाबतीत साशंक असलेल्या वरिष्ठ नेत्यांना पटवून दिले की, गुजराती, मराठी आणि कानडी या तीन भाषिक जनतेच्या नेत्यांची एका राज्यात राहून मनापासून सहकार्याने काम करण्याची तयारी नाही. अखेरीस असेही सांगितले की यापुढील सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचे राज्य महाराष्ट्रात आणि गुजरातेत येऊ शकणार नाही. काँग्रेस या दोन्ही राज्यांत पराभूत होणार. ही गोष्ट वरिष्ठ नेत्यांना पटली आणि वऱ्हाड, मराठवाडा आणि कोकणसह उत्तर-दक्षिण महाराष्ट्र असे हे मराठी भाषिक राज्य स्थापन करण्याचे विधेयक लोकसभेने आणि राज्यसभेने स्वीकारले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्थापना झाली. या १९४६-६० पर्यंतच्या कालखंडात यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेचे राजकारण यशस्वी झाले. मैत्री, सद्भावना, शुद्ध चारित्र्य, व्यावहारिक शहाणपण या सद्गुणांचे फळ म्हणून यशवंतराव हे यशस्वी होऊ शकले.

१९५६ पासून तो १९६२ पर्यंतच्या सहा वर्षांच्या कारकिर्दीत यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला. गरीब माणसाला शिक्षणाच्या बाबतीत कुठेही अडचण येऊ नये म्हणून शिक्षणविषयक महत्त्वाचे विधेयक अमलात आणले. ग्रामीण भागांचा विकास होऊन

ग्रामीण भागाची अवनत दुर्दशा संपावी म्हणून ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषदा या स्थानिक स्वराज्य संस्था समर्थ हाव्या म्हणून नवा कायदा पारित केला. सहकारी संस्थांचा विस्तार करून महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक अर्थव्यवस्थेचा पाया घातला. या अवधीत यशवंतरावांची महाराष्ट्रातील राजकारणी कर्तबगारीची कीर्ती भारतात पसरली.

१९६२ साली चीनचे आक्रमण भारतावर झाले. या आक्रमणाच्या क्षणापर्यंत 'हिंदी-चिनी भाई भाई' अशा भावनेमध्येच भारतीय राज्य होते. त्या वेळचे जवाहरलाल नेहरू यांचे खरेखुरे दोस्त कृष्ण मेनन हे त्या वेळचे संरक्षण मंत्री होते. त्यांना या आक्रमणाची यत्किंचितही कल्पना आली नाही. त्यांच्या विरुद्ध लोकक्षोभ झाला. त्यांना बाजूला करावे, अशी लोकसभेने व राज्यसभने हाकाटी केली आणि यशवंतरावांची सुरक्षामंत्रिपदी निवड व्हावी म्हणून मागणी केली. यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या विकासाचे भावी भव्य चित्र मनापुढे ठेवून महाराष्ट्राचा कारभार चालविला होता. केंद्र सरकारच्या उच्च पदावरून भारताने त्यांना संरक्षणाची जबाबदारी पत्करण्याकरिता निमंत्रित केले. त्यांनी मोठ्या नाइलाजाने येथील मुख्यमंत्रिपद सोडले आणि केंद्र राज्याचे संरक्षण मंत्रिपद स्वीकारले. त्यानंतर अर्थमंत्री पद, विदेश मंत्रिपद, गृहमंत्रिपद इत्यादी केंद्र सरकारची प्रशासन पदेही खऱ्यखुऱ्या अर्थाने भूषविली.

१९७७ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीत इंदिराजींच्या नेतृत्वाखाली असलेला काँग्रेस पक्ष पराभूत झाला. त्यानंतर काही काळ १९८० अखेरपर्यंत यशवंतराव आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यात दुरावा आला. यशवंतरावांना या दुराव्याच्या बाबतीत खूप मनस्ताप झाला आणि १९८१ साली इंदिरा गांधींच्या काँग्रेसमध्ये त्यांनी पुन: प्रवेश केला.

यानंतर गेल्या ४ वर्षात यशवंतरावांवर अनेक कौटुंबिक आपत्ती आल्या. पुत्रवत परिपालन केलेला त्यांचा पुतण्या डॉ. राजा चव्हाण मोटार अपघातात दगावला. त्यानंतर १ जून १९८३ ला पत्नी सौजन्यमूर्ती वेणुताई चव्हाण निवर्तल्या. त्यामुळे अपरंपार शोक झाला. हळूहळू आवरला. आठव्या वित्त आयोगाचे ते अध्यक्ष होते. त्याचा अहवाल शासनाकडे सादर केला. लोकसभेचे सदस्य म्हणून स्वत:वर सोपवलेली कामे निरलसपणे करीत राहिले. या ४-५ वर्षांच्या अवधीत यशवंतरावांचे मन अत्यंत शांत होते. ते म्हणायचे, ''आता काही मिळवायचे राहिले नाही, जनता जनार्दनाच्या चरणी सेवा रुजू झाली आहे.'' शरीरही थकत चालले होते. मात्र अंतकाल जवळ आला आहे, हे काही लक्षात आले नाही. दिल्लीतच देशसेवा करीत असतानाच अल्पावधीच्या आजाराने २५ नोव्हेंबर १९८४ च्या संध्याकाळी ते अनंत शांतीमध्ये विलीन झाले.

(लोकराज्य, मार्च, १९८५,

यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक, पृ. २३ ते २६)

○○○

४५

तत्त्वचिंतक राजकारणी : यशवंतराव चव्हाण

यशवंतराव चव्हाण हे स्वातंत्र्यसैनिक- स्वातंत्र्यपूर्व काळातले. उत्कृष्ट प्रशासक आणि राजकारणी- स्वातंत्र्योत्तर काळातले. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. परंतु 'तत्त्वचिंतक यशवंतराव' असे विधान जेव्हा माझ्यासारखा त्यांचा मित्र करतो तेव्हा यशवंतरावांच्या वैचारिक जीवनाची फारशी कुणी लक्षात घेतलेली नाही अशी एक बाजू असल्याचे जाणवते. यशवंतराव महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात जेव्हा अदम्य उत्साहाने भाग घेत होते, त्या काळात यशवंतराव हे मोठे मार्मिक वक्ते आहेत, अशी महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रांतल्या जाणकारांची खात्री होती. नाट्य संमेलन असो, साहित्य संमेलन असो, महाविद्यालयांचे किंवा विद्यापीठांचे समारंभ असोत, अशा वेळी निमंत्रण संघटनेतील प्रमुख मंडळी त्यांच्यापासून काहीतरी महत्त्वाच्या विचाराला एकदम चालना देणाऱ्या आणि उत्साहित करणाऱ्या भाषणाची अपेक्षा करीत.

यशवंतराव विद्यार्थिदशेत असतानाच आपल्या औपचारिक शिक्षणक्रमातील पुस्तकांपेक्षा बाहेरचे साहित्य उत्सुकतेने वाचत असत. उत्तम कविता, सुरेख कलाकृती, उद्बोधक वैचारिक निबंध किंवा इतर कोणत्याही प्रकारचे ललित किंवा शासकीय ग्रंथ यांच्याकडे तेच स्वभावतःच आकर्षिले जात. याचे उत्कृष्ट उदाहरण त्यांच्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात सापडते. त्यानंतर पहिल्यांदा जेव्हा कारावासाची शिक्षा झाली तेव्हा कारागृहामध्ये निरनिराळे ध्येयवादी विचारवंतही सहप्रवासी म्हणून भेटली. आणि कायद्याच्या व्यवहाराचे उन्नत विद्यालयात शिक्षण कारागृहात बंद झाले तरी माझे विद्यापीठीय शिक्षण सुरूच होते, असे त्यांनी 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्राच्या प्रथम खंडात नोंदवून ठेवले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात त्यांना या औपचारिक शिक्षणक्रमाबाहेर संपादन केलेला समृद्धपर विचारांचा निधी उपयोगी पडला. कोणत्याही महत्त्वाच्या प्रसंगी भाषण करण्याच्या अगोदर अनेक दिवस त्या विषयाला धरून ते व्यासंग करीत असत. महाराष्ट्र राज्याची स्थापना

झाल्यावर त्यांनी जी वारंवार भाषणे केली, त्या भाषणांचा संग्रह 'सह्याद्रीचे वारे' या नावाने प्रसिद्ध झाला आहे. त्यात महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राचे आर्थिक आणि भावनात्मक संवर्धन आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांची दिशा यांचे दिग्दर्शन मुख्यत्वेकरून केलेले आढळते. ही भाषणे वाचली म्हणजे लक्षात येते की, यशवंतरावांची नव्या महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासात कायमची नोंद करावी लागणार आहे.

कृषी औद्योगिक महाराष्ट्र गेल्या पंचवीस वर्षांत निर्माण होतो आहे. त्याची संपूर्ण रूपरेषा, त्याचा सर्व कार्यक्रम यशवंतरावांनी पहिल्यांदा आखला. महाराष्ट्राला नवे आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन कसे प्राप्त होईल आणि जीर्ण, ढासळलेल्या ग्रामीण जीवनाला पुन्हा नवयौवन कसे प्राप्त होईल, याचे सखोल चिंतन यशवंतरावांनी केले. त्यामुळे महाराष्ट्राचा ग्रामीण भाग जुनी, जीर्ण आणि वृद्ध काया टाकून नवीन यौवनसंपन्न काया धारण करू लागला आहे. महाराष्ट्रामध्ये या कृषिऔद्योगिक, समाजरचनेस पोषक असा सहकारी अर्थव्यवहार विकसित होतो आहे आणि सगळ्या भारतात सहकारी संस्था अधिकाधिक प्रगत स्वरूपात महाराष्ट्रातच निर्माण झाल्याचे दिसते. याचे कारण यशवंतरावांनी दाखवलेल्या निश्चित दिशेने महाराष्ट्र जात आहे हे होय.

लोकशाही पद्धतीत स्थिरावण्याकरता ग्रामसंस्थेचे राजकारण अधिक समंजस पायावर उभारण्याकरिता जिल्हा परिषदेच्या प्रशासनाचा पाया यशवंतरावांच्या कारकिर्दीत घातला गेला. गरिबीमुळे शिक्षणापासून मुला-मुलींनी वंचित राहू नये म्हणूनही यशवंतरावांनी त्या तऱ्हेचे विधेयक मान्य करून घेतले. एवढेच नव्हे, तर ''मराठी भाषा ही आधुनिक राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवहाराची आणि कायद्याच्या व्यवहाराचे उन्नत माध्यम बनावे म्हणून त्यांनी भाषा संचालनालयाची स्थापना केली. त्यामुळे आज परकीय इंग्रजी शब्दांच्या ठिकाणी समर्पक मराठी हजारो पारिभाषिक शब्द उपलब्ध झाले आहेत.''

या देशाने आधुनिक तंत्रज्ञानावर उभारलेले अर्थकारण हे सर्वव्यापी व्हावे आणि अद्ययावत तंत्रज्ञानाच्या कक्षेतच ते उभारले जावे, असा दृष्टिकोन यशवंतरावांनी स्वीकारला. हा दृष्टिकोन स्वीकारला तरी उच्च माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठी भाषा अजून स्वीकारली गेली नाही. परंतु ती तशी स्वीकारली जावी, ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान मराठीतून उपलब्ध व्हावे आणि शास्त्रज्ञांनी, तंत्रज्ञांनी मराठी भाषा माध्यम अशा स्वरूपात सामर्थ्यसंपन्न करावी अशा दृष्टिकोनातून १९६०च्या अखेरीस साहित्य संस्कृती मंडळाची यशवंतरावांनी स्थापना केली. तात्पर्य, 'महाराष्ट्राचे आधुनिक शिल्पकार' म्हणून यशवंतरावांचा उल्लेख करावाच लागेल.

परंतु त्याहीपेक्षा अखिल भारतीय स्तरावर त्यांनी भारताच्या नव्या उभारणीचा सर्वांगीण विचार खूप गंभीर रीतीने केलेला आढळतो. याचे प्रत्यंतर त्यांच्या 'युगांतर' (निवडक

भाषणे १९६२-१९६९) भाषण संग्रहात फार चांगल्या रीतीने मिळते. त्यांच्या आयुष्यातील यशस्वितेचा अतिशय उच्चतम क्षण म्हणजे त्यांना लोकसभेने आणि राज्यसभेने संरक्षणमंत्री म्हणून निमंत्रण दिले, हा होय. हे भाग्य केवळ यशवंतरावांचेच. सबंध राष्ट्राने प्रादेशिक राज्य शासन चालवीत असलेल्या मुख्यमंत्र्याला बोलावून घेणे यासारखी महाराष्ट्रीय माणसाला उल्हसित करणारी, आत्मविश्वास निर्माण करणारी कोणतीही घटना सांगता येणार नाही. या कालखंडात त्यांनी संरक्षणाचा खोलात जाऊन अभ्यास केला. आधुनिक युद्धतंत्राचे अध्ययन केले. संरक्षणाची मूलभूत सूत्रे लक्षात घेऊन भारताच्या युद्धसंस्थेची नवी रचना करण्याचा कार्यक्रम त्यांनी आखला. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, साहित्यिक, भाषिक अशा विविध प्रश्नांचा उलगडा करण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला त्यात अखिल भारतीय एकात्मतेचे सूत्र त्यांनी शिस्तशीर रीतीने ध्यानात ठेवले.

लोकभाषा या ज्ञानभाषा कशा होतील, याचे सुंदर चिंतन के. जे. सोमय्या आर्ट्स-कॉमर्स कॉलेजच्या इमारतीच्या पायाभरणीच्या समारंभाच्या वेळी त्यांनी केले. राष्ट्रभाषेचा प्रश्न त्यांनी हळुवारपणे हाताळला. शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाच्या वेळी (ता. ६ ऑक्टोबर १९६४) कोल्हापूर येथे विद्यापीठीय शिक्षणाचे उद्दिष्ट विवरून दाखविले. उत्कृष्ट असा सर्वांगीण रीतीने विचार करीत असताना त्यांनी भारताच्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक इतिहासाची पार्श्वभूमी कायम ठेवली. त्यांच्या विचारात 'आधुनिक ऐतिहासिक दृष्टिकोन' हे मर्मस्थान होय.

प्रशासक-राजकारणी हा तत्त्वचिंतक असला म्हणजे नवी ध्येयधोरणे आखत असताना तो भूत, वर्तमान, भविष्य या तिन्ही काळांचे अनुसंधान कायम ठेवतो. हे अनुसंधान यशवंतरावांनी कायम ठेवले. खांडेकरांसारख्या श्रेष्ठ साहित्यिकाच्या संदर्भात भाषण करताना तर त्यांची व्यासंगी वृत्ती अधिकच प्रत्ययास येते. उत्कृष्ट नाटक, सुंदर कविता, मनोरंजक कादंबरी यांचे वाचन ते कधीही चुकवत नसत. त्यांनी स्वतःचा ग्रंथसंग्रह निर्माण केला. साहित्यसमीक्षेची वृत्तपत्रे व त्यातील निवडक सदरे ते साक्षेपाने पाहत आणि समीक्षण पटले रे पटले, की पुस्तक ताबडतोब विकत घेतलेच म्हणून समजावे. पुस्तक हाती पडेपर्यंत त्यांना चैन पडत नसे. हे केवळ मराठीपुरते नव्हते, तर हिंदी, इंग्रजी पुस्तकांकडेही त्याची अशीच अनिवार्य प्रवृत्ती होती. ते भारताचे परराष्ट्रमंत्री होते तेव्हा इंग्लंड, अमेरिका देशात गेल्यावर तेथील मोठ्या पुस्तकांच्या दुकानांत गेल्याशिवाय राहत नसत. स्वतःला वेळ नसेल तर सचिवांना, उप-सचिवांना पाठवून गाजलेला, नावाजलेला ग्रंथ आपल्या संग्रहासाठी घेऊन येत व रात्री एक वाजेपर्यंत, कित्येक वेळी पहाट होईपर्यंत ते तो ग्रंथ खाली न ठेवता वाचून काढीत.

हा जो विचारांचा विलक्षण धागा त्यांच्यात होता, त्यामुळेच ते राष्ट्रउभारणीसाठी काही महत्त्वाचे सहाय्य करू शकले.

तत्त्वचिंतन आणि राजकारण यांचा असा समन्वय साधलेले जीवन फार थोड्या सत्ताधारी प्रशासकांमध्ये आपल्याला आढळेल. असा हा मोठा आदर्शाच्या प्रकाशात जीवन जगलेला महाराष्ट्रीय सज्जन सद्गृहस्थ अचानक रीतीने एक वर्षापूर्वी कायमचा दृष्टिआड झाला. त्यांनी 'कृष्णाकाठ' आत्मचरित्र लिहिले. प्रथम खंड प्रसिद्ध झाला. त्यामुळे सर्वांची उत्सुकता वाढली. 'सागरतीर' आणि 'यमुनातीर' हे दोन खंड त्यांनी लिहावयास घेतले. पण ते पुरे व्हायच्या आतच ते कायमचे निघून गेले. त्यांचे आत्मचरित्र म्हणजे उत्कृष्ट अशी साहित्यकृती आहे. या तत्त्वचिंतकाचे प्रथमायुष्य कसे होते याचे सुरेख चित्र 'कृष्णाकाठ' मध्ये आपल्याला वाचावयास मिळते.

(प्रथम स्मृतिदिननिमित्त लिहिलेला लेख. दैनिक सकाळ, पुणे:
रविवार, २४ नोव्हेंबर, १९८५, पृ. ३ व ६)

ooo

४६

यशवंतराव चव्हाण : संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आदर्श

सातारा जिल्ह्यातील मागासलेल्या ग्रामीण भागात म्हणजे देवराष्ट्रे या लहानशा गावात १२ मार्च १९१३ ला अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबात श्री. यशवंतरावांचा जन्म झाला. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या भारतात ग्रामीण जीवनात जन्मणाऱ्या आणि जगणाऱ्या व्यक्तींचे जीवन सामान्यपणे खुरटलेलेच राहात असे. त्यातील माणसांची मने जन्मभर मुकुलित स्थितीत राहावयाची. कारण त्या ग्रामीण जगतात शतकानुशतके महत्त्वाचा असा बदल घडतच नव्हता. व्यक्तीच्या विकासाची कसलीही साधने उपलब्ध नव्हती. विशेषतः गरिबांची कुटुंबे पिढ्यान्‌पिढ्या परिस्थितीच्या कचाट्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न क्वचितच करीत. बंधनातून मुक्त होण्याकरता आवश्यक असा संस्कृतीचा प्रकाशच त्या कोंडलेल्या जीवनात शिरू शकत नव्हता. यशवंतरावांचे वडील बळवंतराव यांनी हिंमत धरली आणि नशिबाची परीक्षा पाहण्याकरिता त्या खेड्याची हद्द कायमची ओलांडली. नागरी जीवनाचा आश्रय केला. कराड या तालुक्याच्या शहरात राहावयास गेले. यशवंतरावांच्या वडिलांचे प्राथमिक शिक्षणही जेमतेमच झाले होते. त्यामुळे चवथ्या श्रेणीचीच नोकरी शोधावी लागली.

कराड येथे ठाण मांडले. बेलिफाची नोकरी पत्करली. दोन मुले व दोन मुली होत्या. यशवंतरावांची आई विठाबाई. यशवंतरावांचे वडील बळवंतराव ऐन उमेदीत १९१८ साली इहलोक सोडून गेले. यशवंतरावांचे वडीलबंधू गणपतराव यांच्या खांद्यावर प्रपंचाची धुरा आली. यशवंतरावांच्या मातुश्री विठाबाई या तर अगदी निरक्षर होत्या. मुलामुलींचे शिक्षण व्हावयास पाहिजे, असा निश्चय त्यांनी मनाशी पक्का बांधला. यशवंतरावांचे बंधू गणपतराव यांना इंग्रजी शिक्षणाचे माहात्म्य उमगले होते. गणपतरावांनी यशवंतरावांना कराड येथे टिळक हायस्कूलमध्ये घातले.

टिळक हायस्कूलमधील त्या वेळचे शिक्षक आदर्शवादी होते. ''सर्व हि तपसा साध्यम्'' हे व्यासवचन या शाळेचे ध्येयवाक्य होते. शिक्षक राष्ट्रवादी विचाराचे होते. केवळ

वर्गाचाच अभ्यासक्रम विद्यार्थ्यांनी पुरा करावा आणि उत्तीर्ण व्हावे अशा मर्यादित उद्देशाने आपला शिक्षकाचा व्यवसाय चालवीत नव्हते. टिळकयुग सुरू झाले. हे युग राष्ट्रवादाच्या मंत्राने भारलेले होते आणि या युगाच्या प्रेरणांनी अस्वस्थ झालेले ध्येयवादी शिक्षक हे टिळक हायस्कूल चालवत होते. यशवंतरावांचे बंधू गणपतराव सत्यसमाजी. ब्राह्मणेतर चळवळीमध्ये मोठ्या हिरिरीने भाग घेत होते. सत्यशोधक समाजाच्या दणदणीत प्रचाराने सामाजिक परिवर्तनाचा आदेश महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दुमदुमत होता. या प्रचाराला प्रखर स्वरूप पुणे, सातारा, कोल्हापूरमध्ये प्राप्त झाले होते. १९१९- १९३० या कालखंडात याच वेळी राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाने महाराष्ट्रासह अखिल भारतास व्यापून टाकलेले होते. भगतसिंगासारखे सशस्त्र क्रांतीचे वीर फासावर लटकले होते. त्या सुमारास क्रांतिवीर जतींद्र दास यांनी कारागृहात आमरण अन्नत्याग करून देशातील तरुणांची आणि सगळ्या नागरिकांची मने सचिंत आणि शोकाकुल करून टाकली. याचा परिणाम यशवंतरावांच्या संवेदनशील मनावर अत्यंत खोलवर झाला. जतींद्रांच्या उपवासाच्या दिवसांत यशवंतराव वेदनांनी विव्हल झाले आणि जतींद्रांच्या निधनाने ते शोकाकुल होऊन अश्रू ढाळत बसले. त्यांच्या अशिक्षित मातुश्रीला दिसले की आपला मुलगा घरातलंच कोणी जिव्हाळ्याचं दगावलं तसा रडतो आहे. तिला यशवंतरावांच्या रडण्याचा उलगडा झाला नाही. या परिस्थितीचा स्वाभाविक परिणाम म्हणजे यशवंतराव सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीत सामील न होता राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात अगदी कुमारवयात १४-१५ व्या वर्षीच ओढले गेले. महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक इतिहासातील स्थित्यंतराच्या कालखंडाचे एक उत्कृष्ट प्रतीक म्हणून हे यशवंतरावांचे उदाहरण लक्षात घेता येते.

१९३० आणि १९३२ सालच्या कायदेभंगाच्या चळवळीत यशवंतरावांनी उडी घेतली. १८ महिन्यांचा कारावास भोगला. घरची गरिबी, शिक्षण अपुरे अशा स्थितीत सविनय कायदेभंगाच्या चळवळीत ते सामील झाले. या चळवळीच्या प्रारंभीच्या आठवड्यांमध्ये म्हणजे म. गांधींच्या दांडी मोर्चाच्या आठवड्यांमध्ये आम्ही स्वतः कराड येथे आणि कराडच्या भोवतालच्या खेड्यांमध्ये कायदेभंगाचा प्रचार करीत होतो. या प्रचारात १५-१६ वर्षांचे कुमारवयातले यशवंतराव आमच्या सहकारी मंडळींत सामील झाले होते. त्या वेळी आमचे व यशवंतरावांचे जे अनेक विषयांवर बोलणे झाले, त्यांत शिक्षण पुरे करण्याचा प्रश्न उपस्थित झाला. शालान्त परीक्षा पुरी करून पदवी परीक्षेपर्यंत जावयाचे असा निर्णय यशवंतरावांनी घेतला. राजकीय वा सामाजिक चळवळीमध्ये सार्वजनिक निधीवर जगण्याची पाळी येऊ नये म्हणून काही झाले तरी शिक्षण पुरे करायचे असा निर्णय त्यांनी त्या वेळी केला. १९३४ मध्ये ते शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले. १९३८ मध्ये इतिहास व अर्थशास्त्र हा विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बी. ए. ही पदवी त्यांनी घेतली. १९४० मध्ये एल.एल. बी. ही कायद्याची पदवी घेऊन वकिलीस प्रारंभ केला.

१९३० ते १९४५ या कालखंडात यशवंतरावांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात कारावासाच्या शिक्षा वारंवार भोगल्या. त्या भोगत असता कारागृह हेसुद्धा एक प्रकारचे विद्यापीठ असे समजून त्यांनी राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञानांचे व समाजवादाचे मौलिक अध्ययन केले. बंदिशाळा हे त्यांचे विद्यापीठ बनले. लो. टिळक, म. गांधी, एम. एन. रॉय, कार्ल मार्क्स, जवाहरलाल नेहरू इत्यादिकांच्या लेखनाचे परिशीलन त्यांनी मोठ्या आस्थेने केले. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात व्यावहारिक राजकारणामध्ये राजकीय सत्तेच्या गाभाऱ्यात शिरून प्रादेशिक राज्याचे मंत्री, मुख्यमंत्री व केंद्र शासनाचे संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री व विदेशमंत्री म्हणून यशस्वी रीतीने कामे केली. अशा स्थितीत बहुतेक सत्ताधारी सत्तापिपासेने आणि धनलालसेने ध्येयापासून दूर जातात तसे यशवंतराव दूर गेले नाहीत. आदर्शाच्या प्रकाशात राहून शासनाला नवीन कार्यक्रम आणि प्रशासनाला पद्धती प्राप्त करून दिल्या.

१९४२ सालच्या 'भारत छोडो' या अखेरच्या आंदोलनात यशवंतरावांनी त्या वेळच्या विशाल सातारा जिल्ह्याचे नेतृत्व केले. या सातारा जिल्ह्यात विद्यमान सांगली जिल्ह्याचाही बराच भाग अंतर्भूत झालेला होता. १९४० साली वकिलीची सनद हातात पडली. परंतु न्यायालयामध्ये वकील मंडळींच्या दालनामध्ये अशिलांच्या दरखास्ती आणि कायद्यांचे जाडेजाडे ग्रंथ वाचत न बसता किंवा गप्पा छाटत न बसता सातारा जिल्ह्याच्या राजकारणाची सूत्रे हातात घेतली. याच वेळी २ जून १९४२ ला फलटण येथील सुखवस्तू घरंदाज मुलीशी म्हणजे वेणूताईशी ते विवाहबद्ध झाले. दिसायला नीटनेटक्या, सुरेख आणि शालीन वेणूताईशी झालेल्या विवाहाचा सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला. परंतु लगेच भूमिगतांचे नेतृत्व सुरू झाले. सातारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना प्रतिसरकार स्थापन कसे करावे याचे मार्गदर्शन केले. छोडो भारत चळवळीला अत्यंत उग्र स्वरूप भारतातील ज्या काही ग्रामीण केंद्रांत प्राप्त झाले, त्यांपैकी सातारा जिल्हा गणला जातो. या चळवळीच्या इतिहासात जयप्रकाश नारायणांनी बिहारमध्ये ज्या प्रकारची कामगिरी बजावली, त्याच प्रकारची कामगिरी यशवंतरावांनी सातारा जिल्ह्यात बजावली. या अखेरच्या स्वातंत्र्यसंग्रामातील महाराष्ट्रात गाजलेल्या आघाडीच्या कार्यकर्त्यांतील सर्वांत तरुण, यशवंतराव हेच होते.

कौटुंबिक जीवन गरिबीचे आणि कष्टाचे, परंतु कौटुंबिक जीवनातील आणि परिवारातील व्यक्तींचे संबंध परस्परांच्या विश्वासाचे आणि जिव्हाळ्याचे होते. त्या स्थितीत देशाकरता त्याग केला आणि विद्येची साधना केली. देशाकरता त्याग करीत असताना देशाचे प्रश्न शास्त्रीय दृष्टीने समजावून घेण्याचा प्रयत्न केला. त्याकरता नित्य विद्याव्यासंग अखंडपणे चालू ठेवला. माणसे जोडावी कशी आणि त्यांची मने सांधावी कशी, याची कला साध्य करून घेतली. सत्तेच्या गाभाऱ्यामध्ये उच्चस्थानी जाण्याकरता आणि त्या ठिकाणी यशस्वी रीतीने राज्याची प्रचंड कामे हिमतीने आणि दूरदृष्टीने पार पाडण्याकरता बौद्धिक व मानसिक सामर्थ्य मिळविले. वयाच्या ३८ व्या वर्षी म्हणजे १९५२ साली ते मुंबई राज्याचे पुरवठामंत्री

झाले. प्रशासनाची शिस्त आणि प्रशासनपद्धती यांचे सक्रिय अध्ययन करण्याची संधी मिळाली. मोरारजी देसाई हे मुख्यमंत्री होते. संयुक्त महाराष्ट्राचा लढा व्यापक स्वरूपात लढला जाऊ लागला होता. १९४६ सालापासून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन सुरू झाले. या आंदोलनात महाराष्ट्राच्या साहित्यकारांनी प्रथम पुढाकार घेतला आणि राजकारणी नेत्यांनी त्याची सूत्रे हाती घेऊन जनतेच्या आंदोलनात त्यांचे रूपांतर केले. भाषिक राज्याची मागणी ही नैसर्गिक सामाजिक तत्त्वावर आधारलेली अशी मागणी असल्यामुळे तिला खरेखुरे गंभीर रूप प्राप्त झाले.

भाषा ही सामाजिक शक्ती आहे. याचे कारण माणसाची माणुसकी भाषेतून निर्माण होते. माणसाला सामाजिक प्राणी म्हणून भावनिक आणि बौद्धिक अलौकिक शक्ती भाषेने प्राप्त झालेली असते. म्हणून माणुसकीची ती अधिष्ठान ठरते आणि म्हणूनच ती राजकीय शक्तीही बनते. हा लढा वाढत गेला. १०५ बळी या लढ्याने घेतले. याचे कारण या लढ्याचा प्रतिकार मोरारजी देसाई यांच्या शासनाने कठोरपणे केला. १९५६ मध्ये सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यात महाराष्ट्र काँग्रेस पक्षात फूट पडली. त्या वेळी मोरारजी देसाई यांनी माघार घेतली. पक्षनेता या नात्याने यशवंतराव चव्हाण बहुमताने निवडून आले. लगेच १ नोव्हेंबर १९५६ ला विशाल द्वैभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले. त्या द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांनी सत्तेची सूत्रे हाती घेतली. यशवंतरावांनी मुंबई राज्याची धुरा खांद्यावर घेतली. हे मोठेच धाडस होते. कारण महाराष्ट्र पेटला होता. या धाडसाच्या पाठीमागे आत्मविश्वास होता. तो आत्मविश्वास त्यांनी दूरदर्शित्वामुळे प्राप्त करून घेतला होता. भाषिक राज्य होणे अपरिहार्य आहे हे त्यांनी मनोमनी जाणले होते, परंतु ही जाण पंडित नेहरूंसारख्या केंद्रीय सत्ताधाऱ्यांमध्ये त्या वेळी आली नव्हती. सत्तेची सूत्रे हातात घेतल्याबरोबर त्यांनी मुंबई राज्याच्या जनतेला व राजकीय पक्षोपपक्षांच्या नेत्यांना आश्वासन दिले की, मी बंदुकीची गोळी न वापरता राज्य चालवणार आहे. विरुद्ध मने सांधावी कशी आणि विरोधाला बगल कशी द्यावी यासंबंधी त्यांनी मनोमनी काही आडाखे बांधले होते आणि त्याप्रमाणे घडले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या बाहेर ते राहिल्यामुळे एक प्रकारची अप्रियता जनतेमध्ये निर्माण झाली होती, ती त्यांच्या मनाला डाचत होती. काही कालपर्यंत ही जनतेची नाखुशी सोसली पाहिजे असे त्यांनी ठरवून राजकीय प्रपंचाचा कारभार चालविला. महाराष्ट्र व गुजराथ या दोन्ही प्रदेशांमध्ये भाषिक राज्याची मागणी ज्वलंत स्वरूपात प्रभाव गाजवू लागली. मधून मधून काँग्रेस पक्षाला पोट निवडणुकांच्यामध्ये अपयशांचे तडाखे बसू लागले. १९५७ साली प्रतापगडाला शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचा उद्घाटन समारंभ प्रचंड उत्साहाने साजरा झाला. पंडित नेहरू उद्घाटनास आले तेव्हा वाईपासून प्रतापगडापर्यंतच्या ३० मैलांच्या मार्गावर संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे मोर्चे ललकारत उभे राहिले होते. पंडित नेहरूंना संयुक्त महाराष्ट्राच्या, भाषिक राज्याच्या

मागणीची तीव्रता आणि प्रखरता प्रत्यक्ष नेत्रांनी पाहावयास मिळाली आणि हळूहळू केंद्रीय नेतृत्वाला भाषिक राज्याची गरज पटवण्याची परिस्थिती निर्माण होत गेली. महाराष्ट्र व गुजरातमध्ये यापुढे सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्ष पराभूत होणार, याची लक्षणे दिसू लागली. यशवंतरावांनी ही परिस्थिती अगोदरच हेरली होती. पंडित नेहरूंना आपले धोरण बदलणे भाग पडले आणि परिणामतः १ मे १९६०ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राच्या इतिहासामध्येही एक अभूतपूर्व घटना झाली आणि या घटनेच्या पाठीशी असलेल्या शक्तींचा अर्थ अलिप्तपणे केल्यास हे लक्षात येते की, देशभक्त शंकरराव देव, एस. एम. जोशी, भाऊसाहेब हिरे इत्यादिकांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या भाषिक राज्याची निर्मिती करणारी जशी चळवळ होती त्याबरोबर यशवंतरावांसारखे दूरदर्शी नेतृत्व होते, हे नाकारून चालणार नाही. हे यशवंतरावांचे राजकीय दूरदर्शित्व म्हणजे मुत्सद्दीपण भारताच्या संसदीय लोकशाहीला मान्य झाले आणि पंडित नेहरूंच्या विश्वासातले संरक्षणमंत्री कृष्ण मेनन ह्यांना पदत्याग करावा लागून त्या स्थानी यशवंतराव चव्हाणांना बोलवून घ्यावे लागले. यात यशवंतरावांच्या असाधारण संपन्न व्यक्तिमत्त्वाचे प्रत्यंतर मिळते.

(यशवंतराव : राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व,
संपादक - भा. कृ. केळकर,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२५ नोव्हेंबर, १९८५)

ooo

४७

द्रष्टा क्रांतिकारक : स्वातंत्र्यवीर सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर हे अनेक बाबतींत द्रष्टे होते. त्याचा द्रष्टेपणा या देशाच्या राजकीय घडामोडींमध्ये अनेक वेळा प्रत्ययास आला.

भारताच्या अहिंसात्मक सत्याग्रहाच्या लढ्याने स्वातंत्र्य मिळाले अशा तऱ्हेचा एक दावा सांगण्यात येतो. परंतु त्याला मर्यादा आहे. स्वातंत्र्याचा लढा झाला त्यात जी अहिंसात्मक चळवळ झाली, ती जन जागृती शेवटी येथे ब्रिटिशांना असा अनुभव देऊन गेली की येथे आता शांततेने राज्य करता येणार नाही, येथे सशस्त्र लढा हा होणारच. आणि हे त्यांना शेवटी शेवटी लक्षात आले. नेताजींनी आझाद हिंदसेना उभी केली. त्यात सावरकरांचेच द्रष्टत्व दिसून येते. नेताजींनी सेना उभी केल्यावर ब्रिटिशांच्या लक्षात आले की आता सेनेमधे फूट होते. ४२ साली आणि दुसऱ्या महायुद्धामध्ये नौका दलामध्ये फूट पडली हेही त्यांच्या प्रत्ययास आले आणि अशा रीतीने भारत जो स्वतंत्र झाला, तो नुसत्या शांततामय सत्याग्रही लढ्याने नाही तर या देशात आपल्याला आता शांततेने राज्य करता येणार नाही, इथे सशक्त लढे उभे राहणारच असे जेव्हा ब्रिटिशांच्या लक्षात आले, तेव्हाच त्यांनी हा देश सोडलेला आहे, तेव्हा हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे द्रष्टत्व लक्षात घेण्यासारखे आहे.

दुसरी एक सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांनी १८५७ च्या बंडाचा इतिहास लिहिला तो मोठ्या साहित्यिक शैलीनं. त्याच्यामध्ये दिसते त्यांची काव्यमय स्फूर्ती! ते कवी तर उत्कृष्टच होते. त्यामुळे त्यांना काव्यमय स्फूर्ती तर होतीच, पण तो जो निबंध त्यांनी लिहिला, त्या निबंधाचा या देशातील राजकीय विचारांवर परिणाम कायमचा राहिला. देशात वारंवार जे सशस्त्र उठावाचे प्रयत्न झाले त्या प्रयत्नाच्या पाठीमागे त्यांनी लिहिलेला तो निबंध हा एक भाग लक्षात घेतलाच पाहिजे. त्यांनी त्या निबंधामध्ये भारत, भारतीय जनता ही परकीय सत्तेखाली कायम नांदू शकणार नाही हे पटवून दिले आणि इतिहासाने पण ते सिद्ध केले. ब्रिटिशांना १८५७ सालानंतर नेहमी भीती वाटायची की उठाव होईल की काय? त्या

उठावाला केव्हाही, कोणत्याही रितीने अवसर मिळू नये म्हणून वेळेवरच ठेचले पाहिजे म्हणून ते सगळीकडे संशयात्मक दृष्टीने बघत होते. ही जी त्यांची संशयात्मक दृष्टी आहे त्याला कारण १८५७ सालचा लढा हे लक्षात ठेवले पाहिजे.

सावरकरांचे भारताच्या इतिहासावर प्रभुत्व होते आणि त्याचा त्यांना जो अर्थ कळला होता, त्याचा परिणाम १०० वर्षांच्या ब्रिटिशांच्या राजवटीवर दिसून येतो.

त्यांचा जो हिंदूधर्माबद्दल दृष्टिकोन आहे, तो दष्टिकोन हिंदू हा सामर्थ्यशाली व्हावा आणि आधुनिक काळामध्ये जे सामर्थ्य निर्माण होतंय ते विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या योगाने आणि त्यामुळेच राष्ट्रेही समर्थ होत असतात. धार्मिक दृष्टिकोनाच्या योगाने राष्ट्र समर्थ होत नाहीत. मुसलमानांचा दृष्टिकोन हा तसा धार्मिक आणि बळकट- पण सगळे मसलमान गेल्या १५० ते २०० वर्षांत परकीय, पश्चिमी सत्तेखाली आले. त्यांचा धार्मिक दृष्टिकोन तर अतिशय कट्टर आहे. म्हणजेच कट्टर धार्मिक दृष्टिकोनाने ताकद वाढत नाही, ताकद वाढण्याकरता आधुनिक ज्ञान विज्ञान पाहिजे, जीवनाची दृष्टी आधुनिक पाहिजे आणि त्याकरता शिक्षणामध्ये सर्वत्र आधुनिक ज्ञानविज्ञानच आले पाहिजे, हा सावरकरांचा दृष्टिकोन लक्षात ठेवण्यासारखा आहे.

ते महाकवी होते. कवी असल्यामुळे त्यांना एक तऱ्हेची प्रतिभा होती आणि त्या प्रतिभेच्या योगाने आणि इतिहासाचे अध्ययन यामुळे ही गोष्ट त्यांनी लक्षात घेतली आणि भारताचा शंभर वर्षांचा इतिहास झाला तो सावरकरांचे जे द्रष्टेपण होते त्याचा पुरावाच आहे असे मला म्हणता येते.

त्यांची हिंदुत्ववादाची कल्पना ही जातीय होती असा सावरकरांबद्दल एक आक्षेप घेतला जातो. त्याला सावरकरांनीच उत्तर दिलंय. डॉ. आंबेडकर 'समता' नावाचे पत्र काढत होते. त्याच्यामध्ये हे जातीयवादी आहेत असा सावरकरांवर आरोप केला गेला. तेव्हा सावरकरांनी उत्तर दिलं- 'मुसलमान म्हणतो की तू हिंदू आहेस आणि मी मुसलमान आहे. म्हणून मी हिंदू आहे, नाही तर हिंदू मुसलमान सगळी मानवजात एक आहे, असा माझा विश्वमानवतावादी दृष्टिकोन आहे,' असे त्यांनी स्वतः लिहिलेले आहे. तेव्हा त्यांचा जो हिंदुत्ववाद होता, हा सापेक्ष हिंदुत्ववाद होता. केवळ हिंदुत्ववादी ते नव्हते. कारण तसे असते तर हिंदुत्वाचा जो अत्यंत महत्त्वाचा धार्मिकतेचा गाभा आहे, तो त्यांनी फेकून दिलाच नसता. गंगेत स्नान केल्याने पुण्य मिळते आणि तीर्थयात्रा केल्याने मनुष्याची सगळी पापं धुवून जातात हा दृष्टिकोनच त्यांनी ठेवला नव्हता, पारलौकिक दृष्टिकोन पूर्णपणे झुगारून देणारा अशा तऱ्हेचा सावरकरांचा हिंदुत्ववाद आहे आणि तो विश्व मानवतावादामध्ये विसर्जन पावणारा अशाच तऱ्हेचा आहे.

रत्नागिरीला त्यांनी अस्पृश्यता निवारणाकरता पतित पावन मंदिर काढले. तर हा त्यांचा जो एकंदरीत 'इहवादी' दृष्टिकोन वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या दृष्टीने कसा काय? असं म्हटले

तर त्या दृष्टीने ती विसंगती आहे. पण त्या पाठीमागे जो सामाजिक दृष्टिकोन आहे की मंदिर प्रवेश ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे- कारण मंदिर प्रवेश म्हणजे पवित्र स्थानात प्रवेश म्हणजे अस्पृश्य हा आता अपवित्र राहिला नाही व पतित राहिला नाही, तो पावन झालाय, ही दृष्टी यावी याकरता. पण त्यांनी तो मुख्य उपाय नव्हे हे लक्षात घेतले पाहिजे, रोटी बंदी, त्यांनी तोडली आणि बेटी बंदीसुद्धा तुटली पाहिजे, आणि त्यांची परस्परांत लग्ने झाली पाहिजेत, असाच त्याचा दृष्टिकोन होता. त्यामुळे समाज बळकट होईल, जातिभेद नष्ट होईल. हा जातिभेद नसता तर हिंदु आणि मुसलमान अशा दोन जातीच शिल्लक राहिल्या नसत्या. कारण मग हिंदू समाजात बाटलेले मुसलमान मिसळून गेले असते. 'वाटणे' हा प्रकारच शिल्लक राहिला नसता. कारण 'बाटणे' म्हणजे जात पाळणं आहे, पण जर हिंदू जातच पाळीनासेच झाले तर बाटण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही. कारण मुसलमानांची 'बाटवण्याची जी शक्ती आहे ती एखाद्याचे धार्मिक मन परावर्तित करण्यात नाही, तर त्याला आपल्याबरोबर रोटी खायला लावून, त्याची जात तोडण्यात आहे. तेव्हा जर हा भेदच नष्ट केला तर सर्व जण भारतीय होऊन राहतील असं त्यांचं म्हणणं होतं. माझं जे सावरकरांच्या विचारांचं मनन झालंय, त्या आधारे मला त्यांचं असंच दर्शन घडत आहे.

('स्वातंत्र्यवीर': सावरकरांच्या तेजस्वी जीवनावरील अलौकिक विशेषांक,
संपादकः मुकुंदराव किर्लोस्कर, शंकर पाटील,
सावरकर दर्शन प्रतिष्ठान,
ग्राहक भवन, टिळक मार्ग, पुणे,
गुरुपौर्णिमा, २१ जुलै, १९८६, पृ. १५-१६)

○○○

४८

मानवेंद्रनाथ रॉय : तत्त्वज्ञ आणि राजकीय द्रष्टे

१९१८ साली रशियामध्ये लेनिनच्या नेतृत्वाखाली समाजवादी राजकीय क्रांती झाली. या क्रांतीच्या पूर्वी सुमारे दीडशे वर्षे आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानावर आधारलेली औद्योगिक क्रांती युरोपात आणि अमेरिकेत घडून आली. त्याबरोबरच संसदीय लोकशाही युरोपात आणि अमेरिकेत विकसित होऊन विजयी झाली. परंतु स्वातंत्र्य आणि समता हे मूलभूत मानवी हक्क पूर्णपणे भोगणाऱ्या सर्व नागरिकांचा समाज निर्माण करण्यात या संसदीय लोकशाहीला यश येऊ शकले नाही. म्हणून रशियन राज्यक्रांतीने स्वातंत्र्याचा व समतेचा नवा मानवी इतिहास घडू लागेल, स्वातंत्र्य भोगणाऱ्या मानवांचा समाज आणि अशा मानवांचे राज्य अस्तित्वात येऊ शकेल, वर्गहीन समाजरचना अस्तित्वात येईल, शासक वर्ग व शासित वर्ग असा वर्गभेद नष्ट होऊन खरीखुरी लोकशाही जगात अस्तित्वात येईल अशी अपेक्षा मानवी स्वातंत्र्याकरता लढणाऱ्या ध्येयवाद्यांच्या ठिकाणी दृढमूल झाली होती. त्यांच्यापैकीच मानवेंद्रनाथ रॉय हे भारतीय राष्ट्रवादी ध्येयवादातून बाहेर पडून नवा मानवी इतिहास घडविणाऱ्या मार्क्सवादाचे उपासक बनले.

मार्क्सवाद हे राष्ट्रीय क्रांतीचे तत्त्वज्ञान नसून विश्वक्रांतीचे तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानाची विवेकपूर्ण चिकित्सा करून मानवेंद्रनाथ रॉय यांनी जागतिक क्रांतीच्या कार्यक्रमाला आणि प्रचाराला स्वतःला वाहून घेतले. सोव्हिएट रशियामध्ये स्थिरावलेल्या मार्क्सवादी राज्यक्रांतीची परिणती जागतिक क्रांतीमध्ये व्हावी अशी आशा उत्पन्न झाली. परंतु जागतिक क्रांतीचा कार्यक्रम ही दुय्यम बाब हळूहळू ठरू लागली. रशियन कम्युनिस्ट पदाच्या हाती सोव्हिएट युनियनची प्रचंड सत्ता केंद्रित झाली. कामगार क्रांती ही नाममात्र शिल्लक राहिली. मूलभूत मानवी हक्कांपासून सोव्हिएट नागरिक दुरावला, वंचित झाला. जागतिक क्रांती होऊन मानव हे नैतिकदृष्ट्या स्वतंत्र होतील आणि समाजातील शास्त्य आणि

शासित असा भेदभाव नष्ट होईल, अशा प्रकारची अपेक्षा स्वप्नातही राहिली नाही. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेल्या युरोपीय व अमेरिकन संसदीय लोकशाहींनाही धक्के बसू लागले.

उजवी हुकूमशाही पद्धती प्रचंड बहुमताने जर्मनी आणि इटली या देशांमध्ये पहिल्या महायुद्धानंतर दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या अगोदर अस्तित्वात आली. जर्मनीत हिटलरच्या नेतृत्वाखाली हुकूमशाही प्रतिक्रांती झाली. हिटलरच्या शासनाशी सोव्हिएट युनियनमधील स्टालिनच्या शासनाने अनाक्रमणाचा करार केला. त्यानंतर हिटलर आणि मुसोलिनी हे दोन्ही हुकूमशहा आपल्या साम्राज्याच्या विस्ताराकरिता लष्करी आक्रमण करू लागले. नव्या मानवी इतिहासाबद्दलचा आशावाद त्यामुळे दुरावला. मानवेंद्रनाथ रॉय हे त्यामुळे अत्यंत चिंताग्रस्त झाले आणि मार्क्सवादाने निर्माण केलेली रशियन राज्यक्रांती मानवी स्वातंत्र्याचा आणि समतेचा पूर्ण निःपात करण्यास निघालेल्या उजव्या हुकूमशाहीशी शांततेचा तह करते हे पाहून मार्क्सवादामध्येच काहीतरी वैचारिक तर्कदुष्टता असली पाहिजे, अशी शंका रॉय यांच्या मनात बळावू लागली.

रशियन राज्यक्रांतीच्या नेत्यांना मार्क्सवादाने प्रेरणा दिली हे जरी खरे असले, तरी भांडवलशाही अर्थव्यवस्था नष्ट केल्यानंतर भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या जागी समाजवादी अर्थव्यवस्था कशा प्रकारची असावी यासंबंधी मार्क्सवादामध्ये कसलेही मार्गदर्शन नसल्यामुळे बंदिस्त समाजव्यवस्थेच्या आधारावर उभारलेली रशियन राज्यसंस्थाच भांडवलदार बनली. व्यक्तिप्रधान भांडवलशाहीच्या ठिकाणी राज्यच भांडवलदार बनून कामगारांचे शोषक बनले. कामगार सर्व प्रकारचे हक्क गमावून बसले. मार्क्सने इतिहासाची आर्थिक उपपत्ती सांगितली, भांडवलशाही र्थव्यवस्थेची समीक्षा केली; परंतु इतिहास घडविणाऱ्या इतर घटकांकडे, विशेषत: विचारांच्या विकासाकडे मार्क्सने दुर्लक्ष केले आहे. ध्येयवादी विचारविकासाचे सामर्थ्य नगण्य ठरविले. आर्थिक उत्पादन साधने व आर्थिक उत्पादन पद्धती म्हणजे एकंदरीत आर्थिक व्यवस्था हीच इतिहासाची संपूर्ण कारक शक्ती होय; विचार आणि नैतिक श्रद्धा या गोष्टी केवळ आर्थिक जीवनाची क्लीब, परिणामशून्य, दुबळी प्रतिबिंबे होत; असा एक अर्थ मार्क्सच्या ऐतिहासिक अर्थमूलक उपपत्तीतून निघाला. स्टालिनच्या कारकिर्दीत याचे प्रत्यंतर मिळू लागले. कोट्यवधी शेतकरी निर्दय उपासमार होऊन भूकबळी झाले, शेकडो क्रांतिकारकांच्या निर्घृणपणे कत्तली झाल्या. याचा अर्थ मार्क्सच्या एकांगी ऐतिहासिक उपपत्तीने नीट उलगडला जातो. युरोपातील हुकूमशाहीशी रशियन क्रांतीने समझोता केला याचे कारण मार्क्सची एकांगी ऐतिहासिक उपपत्तीने नीट उलगडला जातो. याचे कारण मार्क्सची एकांगी ऐतिहासिक उपपत्ती होय. कसोटीच्या क्षणी मार्क्सवाद कसोटीस उतरला नाही असे आढळून आले. निर्माण झालेल्या अरिष्टमय परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी आधुनिक जगाला नव्या व अधिक व्यापक स्वरूपाच्या

सामाजिक तत्त्वज्ञानाची खरी निकडीची गरज आहे हे रॉय यांच्या ध्यानात आले. समाजाच्या भौतिक गरजा आणि आर्थिक प्रश्न हे जितके महत्त्वाचे तितकेच मानवी मनाच्या ध्येयवादी प्रेरणा आणि उच्च नैतिक जाणिवा यांना महत्त्व देणारे व्यापक तत्त्वज्ञान शोधले पाहिजे, याची चिंता रॉय यांच्या मनाला दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात सतावू लागली.

मार्क्सवादामध्ये व्यक्तीचे स्थान आणि महत्त्व अस्पष्ट राहिले आहे. व्यक्ती हा समाजाचा भाग असून त्याला स्वतंत्र महत्त्व नाही, असे मार्क्सने आपल्या आर्थिक विवेचनात स्पष्टपणे मांडले आहे. त्याच्या उलट 'मॅनिफेस्टो ऑफ दि कम्युनिस्ट पार्टी' या निबंधात व्यक्तिव्यक्तीचे स्वातंत्र्य मिळून सर्वांचे स्वातंत्र्य सिद्ध होते असे विधान केले आहे. हे मार्क्सचे विधान जेथे जेथे कम्युनिस्ट साम्यवादी क्रांती या विसाव्या शतकात झाली, तेथे तेथे विसरले गेले व व्यक्तिस्वातंत्र्याचा बळी पडला; आणि पक्षीय हुकूमशाही स्थापन झाली. रॉय यांनी मार्क्सवादातील हे वैगुण्य लक्षात घेऊन व्यक्तीचा महिमा विशद करून सांगितला. उत्पादनाची साधने आणि पद्धती ही इतिहासाची मुख्य शक्ती मार्क्सने मानली. याच्यातूनच हे सिद्ध होते की, अर्थोत्पादन हे मनुष्याच्या हातांनी आणि मेंदूने होत असते. मेंदूतील विचार ही माणसाची मुख्य प्रेरक शक्ती आहे. समाजाला किंवा समुदायाला मेंदू नसतो. मेंदू व्यक्तीलाच असतो. विज्ञानाने आणि तंत्रज्ञानाने मनुष्याच्या अर्थोत्पादन शक्तीचा अमर्याद विकास झाला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान हे आधुनिक औद्योगिक क्रांतीचे मुख्य अधिष्ठान होय. न्यूटनसारख्या एकेका महाप्रज्ञाशाली संशोधकाच्या संशोधनाने मनुष्याच्या अर्थोत्पादन व्यवहारात क्रांती केली आहे. केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञानच नव्हे सामाजिक ध्येयवाद सांगणारी कार्ल मार्क्ससारखी एकेक व्यक्ती सामाजिक क्रांतीला कारण होणारी ऐतिहासिक शक्ती बनलेली दिसते. व्यक्तिव्यक्तींचा मिळून समुदाय बनलेला असतो. समाजाला व्यक्तींशिवाय अस्तित्व नसते. मानवी व्यक्तीचे मानसिक सामर्थ्य; हे जीवनार्थ कलहात मनुष्यजातीला यशस्वी करणारी शक्ती आहे. म्हणून माणसाच्या मूळ नैसर्गिक प्रेरणांचा शोध रॉय यांनी मानवी इतिहासाची उपपत्ती सुधारून मांडण्याकरता केला आणि मार्क्सवादाच्या पुढची पायरी म्हणून नवमानवतावादाची मांडणी केली.

नवमानवतावादाचा विश्वविषयक दृष्टिकोन रॉय यांनी आधुनिक विज्ञानाच्या आधारे निश्चित केला. विज्ञान हे विश्वातील अगणित घडामोडींच्या पाठीमागे असलेले नियम शोधत असते. विश्व किंवा निसर्ग हा नियमबद्ध आहे. या नियमबद्ध विश्वाचा विकसित व समर्थ अंतिम आविष्कार मानवप्राणी आहे. मानवप्राण्यामध्ये विवेकबुद्धीचा विकास झालेला दिसतो. ही विवेकबुद्धी निसर्गातील नियमबद्धतेचेच फलित आहे. मानवी बुद्धी हे मानवाच्या निसर्गातील झगड्याचे मुख्य साधन होय. मानवामध्ये जी सर्जनशीलता अस्तित्वात आली आहे. नवनिर्माणशक्तीचा विकास करणे आणि विकास करीत जीवन यशस्वीपणे चालवणे ही मनुष्याची नैसर्गिक प्रेरणा होय. ही नैसर्गिक प्रेरणा म्हणजे स्वातंत्र्याची प्रेरणा होय.

भोवतालच्या विश्वावर स्वामित्व निर्माण करून या स्वातंत्र्याचा विस्तार विवेकबुद्धीच्या द्वारे मनुष्य करतो. या विवकबुद्धीने सत्याची अन्वेषणा करीत मनुष्य आपले स्वातंत्र्य विस्तारीत जातो.

या स्वातंत्र्यविस्ताराला सामुदायिक जीवनाची नितांत आवश्यकता असते. म्हणून मनुष्याला नीतिमत्तेची गरज असते. समाजजीवनामध्ये मानवी व्यक्तीचे जीवन सहकार्याने समृद्ध बनत जाते. बंधुत्व, सख्य, करुणा ही नैतिक जीवनमूल्ये होत. ही जीवनमूल्ये सामुदायिक संस्थात्मक जीवनामध्ये व्यक्तीच्या प्रत्ययास येतात. सामाजिक जीवनात मानवव्यापी नियमबद्ध नैतिक व्यवहार हा मनुष्याच्या शुद्ध बुद्धीचा विषय बनतो. अतीव व व्यापक जीवनमूल्ये विवेकबुद्धीत प्रतिबिंबित होतात. त्यामुळे सामाजिक सहकार्य अपरिहार्यपणे आवश्यक ठरते. निरोगी मनालाच व्यापक नैतिक मूल्यांचा प्रत्यय येतो. तात्पर्य, विवेकबुद्धी, स्वातंत्र्याचा विस्तार आणि सत्याचा शोध ही तीन मानवी स्वभावाची वैशिष्ट्ये होत. ती नैतिक अधिष्ठानावरच स्थिरावतात. सबंध मानवी समाज हा वरील तीन वैशिष्ट्यांनी निसर्गत: भूषित असला, तरी त्याच्या नैतिक बुद्धीला जेव्हा जेव्हा अवकळा येते तेव्हा तेव्हा सामाजिक सहकार्याचा नीट अर्थ समजेनासा होतो; त्यामुळे वैयक्तिक आणि सामुदायिक संघर्ष निर्माण होतात. या संघर्षामुळे मानवी इतिहासामध्ये अनेक राष्ट्रे प्रगत व सुसंस्कृत होऊनही अस्ताला गेली. म्हणून असे निश्चितपणे म्हणता येते की, मानवी इतिहास प्रगतीचा इतिहास आहे, असा मार्क्सचा मानवी प्रगतीबद्दलचा नियतिवाद हा निश्चितपणे स्वीकार्य ठरत नाही. नैतिक आदर्शाकडे जाणारा स्वतंत्र मानवांचा विश्वव्यापी समाज निर्माण करण्याची मानवामध्ये पात्रता आहे. परंतु अशी विश्वव्यापी क्रांती निश्चितपणे घडून येईलच असे सांगता येत नाही. त्याकरता मनुष्याच्या विवेकबुद्धीला सतत जागृत ठेवणाऱ्या आणि कार्यतत्पर करणाऱ्या सामाजिक संस्था निर्माण व्हावयास पाहिजेत.

रॉय यांच्या नवमानवतावादाप्रमाणे संसदीय लोकशाही ही अपूर्ण लोकशाही आहे. प्रतिनिधींच्या द्वारे राजकीय सत्ता वापरून राज्यसंस्था चालू ठेवण्यात मानवी स्वातंत्र्याच्या विस्तारास मर्यादा पडते; कारण दोन निवडणुकींच्या मध्यंतरीच्या काळात मतदार वर्ग हा सत्तेपासून वंचित झालेला असतो. सत्तास्पर्धेमध्ये गुंतणाऱ्या राजकीय पक्षांपैकी एका किंवा अनेक राजकीय पक्षांच्या हातात सत्ता केंद्रित होते. त्यामुळे कित्येक वेळा सत्तापिपासू राजकीय पक्ष संसदीय लोकशाहीला गुंडाळून ठेवतो आणि हुकूमशाहीची स्थापना करतो; असा हा या विसाव्या शतकातील ताजा अनुभव लक्षात घेता जनतेच्या हाती प्रत्यक्ष लोकशाही शासन निरंतर कसे राहील हा प्रश्न रॉय यांनी वैचारिक पातळीवर सोडविला. समाजातील विसकळीत व्यक्ती निराधारतेच्या भावनेने पराभूत मनोवृत्तीच्या बनून हुकूमशाहाला शरण जातात. ही शरणागतीची भावना मानवांच्या ठिकाणी निर्माण होणार नाही अशा तऱ्हेची मानवांची सामाजिक व राजकीय संघटना म्हणजे लोकसमिती, हाच शरणार्थी वृत्ती नष्ट

करण्याचा उपाय ठरतो. याला जनतेचे आत्मशासन म्हणता येते.

संसदीय लोकशाहीमध्ये लोकशाहीचा पाया अत्यंत दुबळा असतो. आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक व्यवहार स्वत:च्या सामुदायिक निर्णयाने चालवण्याची पात्रता स्थानिक लोकसमितीत निर्माण करूनच हे दौर्बल्य नष्ट करता येईल. यामुळेच लोकशाही समर्थ करणे शक्य होईल. यालाच मूलगामी लोकशाही अशी रॉय संज्ञा येतात.

संसदीय लोकशाहीच्या द्वाराच मूलगामी लोकशाहीची स्थापना चांगल्या रीतीने होऊ शकते. ही संसदीय लोकशाहीच दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या वेळी धोक्यात सापडली असताना रॉय हे अत्यंत अस्वस्थ झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभीच आयुष्यभर ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरूद्ध लढलेले रॉय दोस्त राष्ट्रांच्या बाजूने लोकनिंदेची पर्वा न करता धैर्याने उभे राहिले. दोस्त राष्ट्रेसुद्धा साम्राज्यवादीच होती. परंतु हिटलर मुसोलिनीचा आणि जपानचा दुसऱ्या महायुद्धामध्ये विजय झाला असता तर जगातील सर्वच लोकशाही विनाशाला गेली असती. हा लोकाशाहीचा सर्वंकष विनाश टाळण्याकरिता रॉय यांनी ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका या दोस्तराष्ट्रांची बाजू समर्पित केली. आणि या दोस्त राष्ट्रांचा विजय झाल्यानंतर जगातील साम्राज्यशाहीच्या बंधनातील राष्ट्रे बंधमुक्त होण्याची परिस्थिती निर्माण होईल असा राजकीय भविष्यवाद रॉय यांनी १९४० सालीच मोठ्या हिमतीने मांडला आणि तो भविष्यवाद इतिहासाने खरा ठरविला. रॉय हे एकच असे भारतीय आधुनिक ज्ञानविज्ञानांच्या पार्श्वभूमीवर नवमानवतावाद तर्कशुद्ध रीतीने मांडून आधुनिक जगाच्या मानवतावादी आंदोलनाला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे.

(साप्ताहिक साधना, पुणे.
मानवेंद्रनाथ रॉय विशेषांक,
२१ मार्च, १९८७. पृ ९, १० व १४)

○○○

४९

आदर्शाच्या प्रकाशात विकसित झालेले व्यक्तिमत्त्व: यशवंतराव चव्हाण

भारताच्या लोकशाही क्रांतीचा महिमा ज्यांच्या जीवनाने चांगला ध्यानात भरेल अशा अनेक व्यक्ती आधुनिक भारताच्या राष्ट्रीय जीवनात चमकून गेल्या; त्यांपैकीच यशवंतराव चव्हाण ही व्यक्ती होय. अशा काही थोड्याच व्यक्ती झाल्या आहेत की, ज्यांच्या जीवनात भारताच्या वर्तमान युगाचा गर्भितार्थ अधिक खोलपणे सूचित होतो; या युगाच्या प्रेरणा, ध्येयवाद, स्थित्यंतरे आणि महत्त्वाच्या घडामोडी यांचा ध्वन्यर्थ ज्यांच्या जीवनात उमटलेला आहे, अशा थोड्या व्यक्तींपैकीच यशवंतराव चव्हाण हे होत.

ब्रिटिशांच्या राज्यस्थापनेपासूनची भारताच्या इतिहासाची गेली २००-२५० वर्षे हे एक महत्त्वाचे युग आहे. पूर्वीच्या अनेक शतकांच्या आणि सहस्रकांच्या इतिहासापेक्षा हे युग संपूर्णपणे वेगळ्या ऐतिहासिक घटनांनी भरलेले युग आहे. म्हणून यास युगांतर म्हणता येते. अस्तित्व किंवा जीवन हे नित्य परिवर्तनशील असते. जग जगते म्हणजे नित्य बदलत राहते. जगाची ही परिवर्तनशीलता सामाजिक वा राष्ट्रीय जीवनात अधिक स्पष्ट होते. काही थोड्या कर्तृत्वशाली व्यक्तींमध्ये ही परिवर्तनशीलता उत्कट प्रमाणात अनुभवास येते. परंतु नुसती परिवर्तनशीलता म्हणजे इतिहास नव्हे. काही विशिष्ट उत्कट घटना, आणि तशा घटनांच्या मालिका, इतिहास या संज्ञेस प्राप्त होतात. बऱ्याचशा घटना काळाच्या पोटात गडप होतात, भूतकाळाच्या अंधारात त्यांचा मागमूसही राहात नाही. कारण त्यांना ऐतिहासिक महत्त्व नसते. विशेषत समाजात किंवा राष्ट्रात गुणात्मक, अर्थपूर्ण वैशिष्ट्ययुक्त होणारी घडामोड म्हणजेच इतिहास होय. इतिहास घडतो तेव्हा काही तोडमोडही अपरिहार्यपणे होते. विकास घडविला जातो म्हणजे परंपरा मोडावीच लागते. इतिहासातील वैशिष्ट्यपूर्ण अशा घडामोडीच्या नव्या घटनांची मालिका म्हणजे युगांतर होय. सामाजिक वा राष्ट्रीय जीवनात नेहमीच काहीतरी अत्यंत मूलगामी समस्या निर्माण झालेल्या असतात. जेव्हा अशा समस्या सोडविण्याचा प्रयत्न शिथिल होतो, मंद होतो, त्या समस्यांमध्ये सामाजिक जीवन कुंठित होऊन अगतिक

व सुस्त बनते, तेव्हा त्यास अंधारयुग म्हणतात. भारताचा भूतकाळ पाहिला तर अशा कुंठित अवस्थेत अनेक युगे निघून गेली. रवींद्रनाथ ठाकूर यांनी म्हटल्याप्रमाणे निर्विकल्प योगसमाधीत गढलेला अस्थिपंजरावशेष असा हा भारत देश बनला होता. या योग्याच्या चिरनिद्रेचा भंग नवयौवन-संपन्न अशा पश्चिमी संस्कृतीच्या गोऱ्या, बूट घातलेल्या पुरुषाने एका लाथेच्या तडाख्याने केला. कठीण समस्यांचे पहाड डोळे उघडल्याबरोबर एकदम या योग्याला दिसले. त्या समस्यांचे आव्हान स्वीकारले. मुकाबला सुरू झाला. इतिहास घडू लागला. खुरटलेले अनेक दुर्धर मानसिक व्याधींनी जर्जर झालेले राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक दुरवस्थेचे विषादकारक आणि निराशाजनक चित्र ग्रामीण जीवनाचे होते. इतिहास घडत नव्हता म्हणून विकासाचा स्पर्श कोठेही नव्हता. अशाच ग्रामीण जीवनात ब्रिटिश पारतंत्र्याच्या उत्तरार्धात किंवा अखेरच्या अर्धशतकात यशवंतराव चव्हाण यांचा सातारा जिल्ह्यातील एका खेड्यात देवराष्ट्रे या लहानशा गावात एका गरीब शेतकऱ्याच्या घरात जन्म झाला.

समस्यांचे आव्हान स्वीकारणे व त्या समस्या सोडविणे यांचा अव्याहत क्रम यशवंतरावांच्या आयुष्यक्रमात दिसतो. त्यांच्या वडिलांचे नाव बळवंतराव आणि मातुश्री विठाबाई. यशवंतरावांच्या जन्माच्या वेळी विठाबाईची सुटका लवकर झाली नाही. आमचा कयास असा की, सुटका लवकर न होण्याचे कारण या बालकाचे डोके मोठे होते. या धोक्यातून योगायोगाने सुटका झाली. डोके मोठे असल्यामुळेच अखेरची ५-६ वर्षे सोडली तर विलक्षण कठीण समस्यांचा मुकाबला यशवंतराव करू शकले. ब्रिटिशांच्या द्वारे भारतात जवळ जवळ १५० वर्षे बीजारोपण झालेली आणि पसरत असलेली आधुनिक संस्कृती भारताच्या शहराच्या मर्यादा ओलांडून कोठेही फारशी गेली नाही. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात अलीकडे ग्रामीण भारताला ती स्पर्श करू लागली आहे. यशवंतरावांचे जन्मगाव या आधुनिक नागरी संस्कृतीपासून त्या वेळी म्हणजे ७० वर्षांपूर्वी अगदी दुरावलेले होते. यशवंतरावांचे पिताजी बळवंतराव यांचे प्राथमिक शिक्षण जेमतेम झाले होते. पण नशीब काढायची अनिवार इच्छा झाली. देवराष्ट्र्याची सीमा उल्लंघून कऱ्हाड येथे बेलिफाची नोकरी पत्करली. अजूनही अगणित ग्रामीण व्यक्तींना खेडे सोडून शहरात पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याकरता जावे लागते, तरी नागरी संस्कृतीपासून वंचितच राहावे लागते. याला काही अपवाद सापडतात. चव्हाणांचे कुटुंब असा हा क्वचित सापडणारा अपवाद होय. आधुनिक संस्कृतीचा उदार वरदहस्त प्राप्त झाला म्हणजे जीवन-विकासाच्या वाटा दिसू लागतात. कित्येकांची दृष्टी त्यामुळे क्रांतदर्शीही बनते. याचे महाराष्ट्रातील अत्यंत अपवादभूत उदाहरण म्हणजे बाबासाहेब आंबेडकर यांचे होय. या आंबेडकरांच्या उदाहरणाशी कोणाचीच तुलना होऊ शकत नाही, इतके ते आश्चर्यकारक उदाहरण आहे. आधुनिक इंग्रजी शिक्षणाचा लाभ यशवंतरावांना त्यांच्या वडीलबंधूंच्या कै. गणपतरावांच्या आधुनिक जीवनदृष्टीमुळे झाला

हे मात्र योगायोगाने घडले नाही. गणपतराव जोतीराव फुल्यांनी स्थापिलेल्या व ब्राह्मणेतर चळवळीत रूपांतरित झालेल्या सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. नव्या इंग्रजी शिक्षणाचे रहस्य त्यांना उमगले होते. मोठा सामाजिक परिवर्तनाचा आदेश सत्यशोधक समाजाच्या दणदणीत प्रचाराने महाराष्ट्राच्या ग्रामीण जगात दुमदुमू लागला होता. पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये या प्रचाराला प्रखर स्वरूप प्राप्त झाले होते. गरीब अशा ब्राह्मणेतर मराठा, कुणबी, माळी इ. सामाजिक स्तरामध्ये सत्यशोधक समाजाच्या विचाराचे स्वागत मनमोकळेपणे होत होते. परंतु त्या वेळच्या ब्राह्मण, वाणी आणि इतर उदिम व्यापारी वर्ग हा या चळवळीपासून अलिप्त होता. या चळवळीच्या कार्यक्रमात प्रचाराचे दणदणीत साधन म्हणून तमाशाही अंतर्भूत केला होता. ह्या तमाशाची गंमत मात्र पांढरपेशा समाजातील मंडळी तटस्थपणे पाहात होती.

यशवंतराव कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत होते. शिक्षकांना पसंत पडणाऱ्या विद्यार्थी मंडळींत चमकत होते. टिळक हायस्कूलची त्या वेळची शिक्षक मंडळी ही एक प्रकारची ध्येयवादी मंडळी होती. ठरलेला अभ्यासक्रम शिकवून विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त संख्येने उत्तीर्ण केले म्हणजे झाले, एवढाच शिक्षणोद्देश त्यांच्या पुढे नव्हता. त्या वेळी सबंध भारत राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनांनी भारला जात होता. टिळकयुग नुकतेच संपले होते. म. गांधींच्या नेतृत्वाखाली परकीय स्वातंत्र्याविरुद्ध जी तीन मोठी देशव्यापी वादळे १०-१२ वर्षांच्या अंतराने निर्माण झाली, त्यांतील पहिले वादळ नुकतेच शमले होते. हे पहिले वादळ असहकारितेचे. ते १९२३-२४ च्या सुमारास शांत झाले होते. परंतु सगळा पांढरपेशा समाज राष्ट्रीय भावनांनी भारला गेला. अशा राष्ट्रीय भावनांनी भारलेले शिक्षण टिळक हायस्कूलमध्ये शिकवीत होते. या भावनांनी लहानमोठ्या नगरांना वेढून ग्रामीण भागामध्येसुद्धा खोल प्रवेश केला होता. त्यामुळे विचारांचे दोन प्रवाह एकमेकांना छेद देऊ लागले. सत्यशोधकी ब्राह्मणेतर चळवळ ही यशवंतरावांच्या भाषेत सांगायचे म्हणजे मध्ययुगीन सरंजामदारी प्रवृत्तीच्या वर्गांनी उचलून धरली होती. ही मंडळी राजनिष्ठ होती. या राजनिष्ठ सरंजामदारांपासून बहुजनसमाजाला फोडून वेगळे करण्याचे काम या म. गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या राजकीय आंदोलनाने केले. वैचारिक द्वंद्वे, संघर्ष यांचे पडसाद वारंवार उमटत होते. या राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयवादी क्षोभामध्ये भगतसिंगसारख्या सशस्त्र क्रांतिवाद्यांनी भावनेची आग निर्माण केली. जतींद्रनाथ दास या सशस्त्र क्रांतिकारकाने कारागृहामध्ये आमरण उपवास अनेक आठवडे, ६२ दिवस चालविला, व त्यातच आत्मार्पण केले. याचा विलक्षण परिणाम देशाच्या तरुण पिढीवर झाला. जतींद्राच्या अन्नत्यागाच्या बातम्या रोज यायच्या. ते क्षीण होत गेले. त्यांची शुद्ध गेली. त्यांचा जीवात्मा राष्ट्राच्या आत्म्यामध्ये विसर्जन पावला. हे सगळे रोज वाचत असता यशवंतराव रात्रंदिवस दुःखाने आणि संतापाने अस्वस्थ होत होते. जतींद्रांच्या आत्माहुतीची वार्ता वाचल्याबरोबर घरातलेच

अत्यंत जिव्हाळ्याचे कोणीतरी दगावले अशा भावनेने ओक्साबोक्शी रडू लागले. अनेक दिवस त्यांचे नेत्राश्रू ओघळत होते. यशवंतराव म्हणतात, "जतींद्राच्या देहातील राष्ट्रीय स्वातंत्र्याचे प्रखर वलय माझे अंतःकरण छेदून गेले." भारतीय स्वातंत्र्याच्या काँग्रेसच्या आंदोलनात संपूर्णपणे माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत असताच वयाच्या १६ व्या वर्षी ते सामील झाले.

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील एका निराळ्या पर्वाची ही घटना सूचक ठरली. सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर चळवळ राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत विलीन झाल्याची ही घटना सूचक होय. टिळक हायस्कूलमध्ये यशवंतराव वक्तृत्वही शिकले. वयाच्या १६ व्या वर्षी वक्तृत्व स्पर्धेत पहिल्या क्रमांकाचे रु. १५०/- बक्षीस यशवंतरावांनी मिळविले. त्याच सुमारास म्हणजे १९३० साली म. गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. ब्रिटिशांचे राज्य गरिबांकरिता नाही. गरिबांना जाचक असे कायदे ब्रिटिशांनी केले आहेत. ते कायदे मोडणे व मोडल्यावर झालेली शिक्षा शांतपणे भोगणे म्हणजे सविनय कायदेभंग. मीठ खासगी रीतीने परवाना घेतल्याशिवाय कोणी बनवू नये असा कायदा होता. म. गांधींच्या चळवळीच्या कार्यक्रमामध्ये हा कायदा मोडून कारागृहवास प्रतिकार न करता किंवा बचाव न करता पत्करायचा हा मुद्दा अंतर्भूत केलेला होता. हा कायदेभंग प्रतीकात्मक होता. ही चळवळ देशभर पसरली. गांधींनी दांडी नावाच्या समुद्रकाठच्या गावाकडे ८० सत्याग्रहींसह साबरमतीच्या तीरावरून पदयात्रा सुरू केली आणि तेथे मिठाचा कायदा मोडला. ह्या दांडी यात्रेची वार्ता रोज वृत्तपत्रांत प्रकाशित व्हायची. गावोगाव, शहरोशहरी मोर्चे आणि प्रचाराच्या सभा व्हायच्या. माध्यमिक शिक्षण घेत असतानाच या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाने यशवंतरावांना ओढून घेतले. यशवंतरावांच्या भाषेत बोलायचे म्हणजे अहमदाबादजवळील साबरमती नदीच्या तीरावरून दांडी मार्च सुरू झाला. त्याने उठलेल्या या वादळाने कृष्णाकाठ पुरा भारून गेला. या वादळाने भारताची सगळी शहरे आणि खेडी थरारू लागली. काँग्रेसचा झेंडा सगळीकडे फिरत आणि फडकत होता. अशा अहिंसक चळवळीमुळे एवढी दूरगामी शस्त्रास्त्रांनी समृद्ध असलेली ब्रिटिश सत्ता कशी पराभूत होणार अशा वस्तुवादी विचाराला त्या वेळच्या तरुण पिढीच्या मनामध्ये थारा मिळेनासा झाला. स्वराज्य मिळणारच असा अंत:प्रत्यय येत होता. याचे तपशीलवार विवेचन यशवंतरावांनी 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्रातील 'वैचारिक आंदोलन' या प्रकरणात सम्यक रीतीने केलेले वाचावयास मिळते. या चळवळीत एकंदरीत १९३३ पर्यंत १८ महिन्यांचा कारावास यशवंतरावांनी भोगला. या संदर्भात ते आपल्या एका लेखात म्हणतात, "१९३० साली मी राष्ट्रीय चळवळीत उतरलो त्या वेळी माझ्या मनात एक वैचारिक द्वंद्व निर्माण झाले. स्वातंत्र्य चळवळीला सामाजिक व आर्थिक स्वरूपाची एक बाजू असावी असे मला नेहमी वाटे. त्या दृष्टीने एम. एन. रॉय यांच्या विचारांचा पगडा माझ्यावर अधिक पकड

करू शकला. या स्वातंत्र्याच्या आंदोलनात सामील झालेले यशवंतराव वयाने लहान होते, परंतु त्या मानाने त्यांची वैचारिक प्रौढता सहकाऱ्यांच्या मनावर प्रभाव गाजवीत होती. या वैचारिक प्रौढतेचा परिचय त्यांनी आत्मचरित्रात वर्णिलेल्या मसूर येथे भरवलेल्या सातारा जिल्हा राजकीय परिषदेच्या घटनेवरून चांगला होतो. या परिषदेचे कोल्हापूर संस्थानचे राजकीय नेते माधवराव बागल यांनी वैचारिक नेतृत्व केले. ती परिषद संपल्यानंतर प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये वादविवाद सुरू झाले. त्या वादामध्ये सामाजिक व आर्थिक प्रश्नांना स्पर्श केल्याशिवाय आपली स्वातंत्र्याची चळवळ पुढे जाऊ शकणार नाही असे आपले मत यशवंतरावांनी सविस्तर रीतीने पटवून देण्याचा प्रयत्न केला. तेव्हापासून यशवंतरावांचा मित्रसंग्रह सारखा वाढत गेला. हरिभाऊ लाड, काशीनाथपंत देशमुख, शांताराम इनामदार, महादेव जाधव, बाळासाहेब पाटील उंडाळकर, सदाशिव पेंढारकर, नीळकंठराव कल्याणी, गणपतराव बटाणे, राघुआण्णा लिमये इ. कितीतरी मित्र अगोदरच मिळविले होते. त्यात वाईचे किसन वीर, वाळव्यातले आत्माराम पाटील व पांडुरंग मास्तर, खटाव तालुक्यातील गौरीहर सिंहासने इत्यादिकांची भर पडली. जेथे जातील तेथे काही काळ राहिले म्हणजे नवे मित्र व नवे सहकारी जोडायचे ही त्यांच्या ठिकाणी असलेल्या माणसाच्या नैसर्गिक आवडीतून निर्माण झालेली पद्धती होती.

यशवंतरावांनी चळवळीत प्रथम कारावासाची एक वर्षाची शिक्षा भोगली होती. औपचारिक शिक्षणाला खंड पडला; परंतु जेलमध्ये काढलेल्या एका वर्षात निराळ्या प्रकारचे अनौपचारिक परंतु विद्यापीठीय दर्जाचे शिक्षण संपादन केले. कारावासातील प्रौढ विचाराची माणसे, निरनिराळ्या राजकीय विचारप्रणालीच्या कार्यकर्त्यांनी जेलमध्ये आणलेली पुस्तके, तेथे झालेल्या चर्चा यांच्या माध्यमातून ते वैचारिक चिंतनशील जीवनाच्या नव्या मार्गात शिरले. त्यांच्या कृतिशील जीवनाला चिंतनशीलतेची कायमची जोड मिळाली. १९३३ च्या मे महिन्यानंतर जेलमधून बाहेर पडले, तेव्हा ते फक्त काँग्रेसमान राहिले नव्हते. त्यांच्या काँग्रेसनिष्ठेला समाजवादी ध्येयाची जोड मिळाली. जागतिक समाजवादी आंदोलनाचे वैचारिक मंथन हे त्यांच्या राष्ट्रीय चिंतनाला पोषक ठरले. समाजवादी व रॉयवादी मित्रांच्या बरोबर सातारा जिल्ह्यात ते काम करीत राहिले. या अवधीत त्यांनी शालान्त परीक्षा उत्तीर्ण होऊन १९३८ मध्ये इतिहास व अर्थशास्त्र या विषयात मुंबई विद्यापीठातून बी. ए. पदवी मिळवून १९४० मध्ये एल. एल. बी. ही कायद्याची पदवी संपादन केली. पदवीनंतर पत्नी मिळविली. फलटण येथील सुखवस्तू मोरे घराण्यातील सुरेख व सुशील मुलगी वेणूताई पत्नी झाली.

१९४० च्या सुमाराला युरोपमध्ये दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले. काँग्रेसमधील रॉयवादी गट (लीग ऑफ काँग्रेसमन) काँग्रेसचे या दुसऱ्या जागतिक महायुद्धाबद्दलचे धोरण नापसंत पडल्यामुळे काँग्रेसमधून बाहेर पडला. तोपर्यंत यशवंतराव या रॉयवाद्यांबरोबरच

काम करत होते. महाराष्ट्राचे काँग्रेसनेते त्यांना रॉयवादीच समजत, परंतु यशवंतरावांनी रॉयवाद्यांबरोबर काँग्रेसच्या बाहेर पडण्याचे नाकारले, एवढेच नव्हे तर १९४२ सालच्या 'भारत छोडो' या काँग्रेसच्या आंदोलनात ते सहभागी झाले. या आंदोलनात सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारची स्थापना करणारी भूमिगतांची चळवळ वाढत गेली. त्या चळवळीच्या प्रारंभीच्या अवस्थेत यशवंतरावांनी भूमिगत होऊन नेतृत्व केले, परंतु दीर्घकाल भूमिगत न राहता प्रकट होऊन त्यांनी कारावास पत्करला. ते रॉयवाद्यांबरोबर राहिले नाहीत, कारण त्यांना रॉयवाद्यांची दुसऱ्या महायुद्धाबद्दलची भूमिका पटली नव्हती. ही गोष्ट 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्रावरून लक्षात येते. ह्या ग्रंथात काँग्रेसची महायुद्धाबद्दलची कल्पना यशवंतरावांनी मोठ्या आत्मीयतेने मांडली आहे. 'भारत छोडो' आंदोलनाचे सयुक्तिकपणे समर्थन केले आहे. पण एम. एन. रॉय यांचा या युद्धाबद्दलचा दृष्टिकोन त्यांनी समजावून घेण्याचा कधीच प्रयत्न केला नाही, असे या समर्थनावरून दिसते. एम. एन. रॉय यांनी या जागतिक युद्धाची मीमांसा १९४० साली अशी केली की, या महायुद्धात जागतिक हुकूमशाहीचा विजय झाल्यास म्हणजे मुसोलिनीचा फॅसिझम व हिटलरचा नाझिझम विजयी झाल्यास जगातील लोकशाहीच नष्ट होईल आणि पश्चिमी साम्राज्यशाहीच्या आधिपत्याखाली असलेली राष्ट्रे कायम गुलाम राहावी आणि कायम गुलाम राहण्यासच ती पात्र आहेत असा विचार प्रस्थापित होऊन प्रभावी होईल. याच्या उलट ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका इ. दोस्त राष्ट्रांचा विजय झाल्यास पश्चिमी साम्राज्यशाह्यांचा ऱ्हास होऊन वसाहतवाद संपेल आणि लोकशाहीला ऊर्जितावस्था प्राप्त होईल.

एम. एन. रॉय यांनी वर्तविलेल्या जागतिक साम्राज्यशाहीच्या ऱ्हासाच्या भविष्याची सत्यता १९४५ सालाने पटवून दिली. १९४५ साली दोस्त राष्ट्रांचा विजय होऊन आणि हिटलर, मुसोलिनी आणि जपानची साम्राज्यशाही याचा पराभव होऊन भारतीय स्वातंत्र्याचा उषःकाल दिसू लागला.

१९४६ ची मार्च महिन्यातली निवडणूक यशवंतरावांनी जिंकली. काँग्रेस पार्लमेंटरी पार्टीचे नेते म्हणून बाळासाहेब खेर निवडले गेले होते. त्यांनी यशवंतरावांची पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड केली. त्यामुळे यशवंतरावांना कृष्णाकाठावरून अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरील एका महानगरात म्हणजे मुंबईत आपले निवासस्थान थाटावे लागले. पुढे ते शेवटपर्यंत कृष्णाकाठावर कायम कधीच परतले नाहीत. मुंबईत महाराष्ट्राच्या राजकारणाची धुरा त्यांच्या खांद्यावर थोड्या वर्षांच्या अवधीत आली. पुढील जीवनाची भव्य यात्रा यशस्वी रीतीने डौलात पुढे जाऊ लागली. यमुनेच्या तीरावरच त्या यात्रेची समाप्ती झाली.

पार्लमेंटरी सेक्रेटरीपदावर राहून यशवंतराव मुंबईत काम करू लागले. शरीर मुंबईत पण मन कराडात अशा द्विधा मनःस्थितीत ते काम करीत होते. परमप्रिय वडीलबंधू गणपतराव क्षयाने आजारी होते. त्यांची सेवा करीत असताना गणपतरावांच्या पत्नींनाही त्या संसर्गजन्य

रोगाने पछाडले. या दोघांच्या सेवेमध्ये यशवंतरावांची तरुण पत्नी वेणूताई सारख्या झटत होत्या. त्यांनाही क्षयाची बाधा झाली. १९४७ च्या डिसेंबर महिन्यामध्ये गणपतराव दिवंगत झाले. पुढील दोन वर्षांत गणपतरावांच्या पत्नीही इहलोक सोडून गेल्या. गणपतरावांच्या मुलांची म्हणजे पुतण्यांची जबाबदारी यशवंतरावांवरच पडली. सौ. वेणूताईंची प्रकृतीही ढासळलीच होती. अशा आपत्तीच्या वेढ्यात यशवंतराव सापडले. वेणूताई मिरजेच्या डॉ. जॉन्सन या मिशनऱ्यांच्या उपचाराने संकटातून बाहेर पडल्या. कराडच्या घरात त्या परिवाराची जबाबदारी समर्थ रीतीने पेलणारी यशवंतरावांची माता विठाबाई, त्या खूप वृद्ध झाल्या होत्या, परंतु थकल्या नव्हत्या.

पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाल्यानंतर त्यांची गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी गृहखात्यात उपमंत्री म्हणून नेमणूक केली. या त्यांच्या उत्कर्षाच्या पहिल्या वर्षाच्या अखेरीस कराड-वाळवा भागातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये यादवी सुरू झाली. या यादवीला 'कऱ्हाडचे कुऱ्हाडीचे राजकारण' असे नाव देत होते. यशवंतरावांचे जिवलग मित्र के. डी. पाटील यांची शेतात कुऱ्हाडीने हत्या झाली. हा सुडाचा प्रकार होता. अगोदर आमदार चंदू पाटील यांचा खून झाला होता. त्यांच्या खुनाचा आळ के. डी. पाटलांवर आला. के. डी. पाटलांच्या गटाचे म्होरके म्हणून यशवंतरावांवरही हत्येचे संकट टपून बसले होते. यशवंतराव मुंबईहून आजारी व अत्यवस्थ स्थितीतल्या वडीलबंधूंना उभ्या उभ्या भेटून जावे म्हणून कऱ्हाडला आले. कल्याणी बिल्डिंगमध्ये ते राहात. बंधूंच्या जवळ बसून मनमोकळेपणे दोन तास बोलणे झाले. नंतर खोलीच्या बाहेर पडून सिगारेट पेटविली. त्या इमारतीच्या गच्चीवरून सिगारेट ओढत विचार करीत बाहेर उभे राहिले. थोरली बहीण तेथेच होती. तिच्याशी बोलत असता कसल्या तरी विचारतंद्रीत दूर दिसणाऱ्या रेल्वे स्टेशनचा सिग्नल पाहिला, मनात एकदम धस्स झाले, कराड त्वरित सोडावे असे त्यांच्या मनाने घेतले. त्वरित रेल्वे स्टेशनचा रस्ता धरला. बहीण जाऊ देत नव्हती. तिचे ऐकले नाही. कऱ्हाड स्टेशनमध्ये उभ्या असलेल्या गाडीत शिरले व पुण्यास निघून गेले.

नंतर त्याच दिवशी रात्री विलक्षण भीषण प्रसंग घडला. टपलेल्या शत्रुपक्षाला बातमी लागली होती की, यशवंतराव कल्याणी बिल्डिंगमध्ये वडील बंधूंच्या समाचाराकरिता आले आहेत. मध्यरात्र उलटल्यावर दोनच्या सुमारास सहा जवान ठासलेल्या बंदुका, भाले, कुऱ्हाडी घेऊन कल्याणी बिल्डिंगवर चाल करून आले. त्यांनी दारावर धक्के मारून दार फोडण्याचा प्रयत्न केला. ही बातमी पोलिसांपर्यंत पोचली व गावात पसरली. लोकांचा समज झाला की यशवंतरावांना शत्रूंनी पळवून नेले असावे. यशवंतरावांचा शोध सुरू झाला. रात्री सर्वत्र तारा झाल्या. रेल्वेने यशवंतराव अगोदरच पुण्यास पोचले होते व इन्स्पेक्शन बंगल्यात झोपी गेले होते. पुण्याच्या पोलिसांनी कराडच्या पोलिसांना यशवंतरावांच्या खुशालीची बातमी दिली. भीषण प्रसंग टळला. यशवंतरावांच्या अंतर्मनाला सांकेतिक भाषेत इशारा

मिळाला व त्याप्रमाणे यशवंतरावांनी सावधगिरीने संकटाच्या क्षेत्रातून पलायन केले. परंतु यशवंतरावांना या अंतर्मनाच्या इशाऱ्याच्या बाबतीत अगम्य व गूढ घटनाच वाटली. ते 'ऋणानुबंध' या लेखसंग्रहात 'नियतीचा हात' या लेखात म्हणतात, "त्या सिग्नलच्या बोलावण्याचा अर्थ समजून घेण्याचा मी खूप प्रयत्न केला आहे. परंतु या गोष्टीचा अन्योन्य संबंध जुळवून देणारा मला अजून कोणी भेटला नाही. एवढे मात्र खरे की तो खुणेचा हात नियतीचा होता."

१९४७ साली भारत स्वतंत्र होऊन भारताची संविधान समिती स्थापन झाली. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल आणि संविधान समितीचे सभापती राजेंद्र प्रसाद हे होते. संविधान समिती म्हणजेच घटना समिती. स्वतंत्र भारताची घटना समिती ही स्वतंत्र व एकात्म भारताची लोकशाहीप्रधान घटना निर्माण करण्यात यशस्वी झाली. आशिया खंडात अशी विशाल संसदीय लोकशाही म्हणजे भारताचीच लोकशाही ठरली. पाकिस्तान आणि भारत असे हिंदुस्थान उपखंडाचे दोन राजकीय विभाग निर्माण झाले. राजकीयदृष्ट्या अखंड भारत उभा राहू शकला नाही. भारत व पाकिस्तान अशी विभागणी होत असताना काही देवघेवीचे प्रश्न उत्पन्न झाले. म. गांधींनी पाकिस्तानला सोईची होईल अशा रीतीने एक देवघेव सोडविण्यात भारत सरकारला मदत केली. हिंदुत्ववाद्यांना नेहमीच वाटत होते की, महात्मा गांधींचा कल हा मुसलमानधार्जिणा आहे. या गैरसमजामध्ये थोडीशी भर पडून एका हिंदुत्ववादी अतिरेक्याने महात्मा गांधींचा खून केला. सगळे जग हादरले. त्याची भयंकर प्रतिक्रिया महाराष्ट्रात उफाळून आली. १०० वर्षांच्या जुन्या ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाने हिंसक व विध्वंसक रूप घेतले. अनेक शहरांमध्ये आणि शेकडो खेड्यांमध्ये, तालुक्याच्या ठिकाणी असलेली ब्राह्मणांची घरे जाळण्यात आली. जवळजवळ ६ महिने या संहारक घटनांची मालिका लागोपाठ सुरू होती. सांगली, कोल्हापूर, सातारा या भागात याला अधिकच उग्र रूप आले होते. यशवंतरावांनी या वेळी योग्य अशी कामगिरी बजावली. त्यांच्या राष्ट्रवादी नेतृत्वाची कसोटी लागली. त्यांनी कराड व कराडच्या भोवतालच्या भागात जातीने गाठीभेटी घेऊन ग्रामीण, प्रक्षुब्ध, गटागटाने हिंडणाऱ्या जमावांना शांत केले.

महाराष्ट्रातील प्रादेशिक काँग्रेस संघटनेमध्ये डावे आणि उजवे असे गट निर्माण झाले. त्यांच्यात रस्सीखेच सुरू झाली. ज्या डाव्या गटांना वाटले की जुने ब्राह्मणी नेतृत्वच अधिक प्रभावी राहिले आहे, तो डावा गट काँग्रेसमधून फुटून बाहेर निघाला. शेतकरी कामकरी पक्षाची १९४९ साली स्थापना झाली. बहुजन समाजातले काही मुरब्बी नेते काँग्रेस सोडून या नव्या पक्षाचे नेतृत्व करू लागले. शंकरराव मोरे, केशवराव जेधे, दत्ता देशमुख, तुळशीदास जाधव, र. के. खाडिलकर, यशवंतराव मोहिते इ. नी या पक्षाच्या प्रचारास वेग आणला. या पक्षाच्या स्थापनेच्या वेळी अनेक खलबते झाली. त्यांतील काही बैठकींस यशवंतराव

स्वतः उपस्थित होते. तेव्हा त्यांचे मन दोलायमान झाले. एक पाय काँग्रेसच्या बाहेर व एक पाय काँग्रेसच्या आत होता. परंतु आयत्या वेळी पक्ष स्थापनेच्या वेळी काँग्रेसच्या बाहेर आलेला पाय त्यांनी पुन्हा आत घेतला. काँग्रेसलाच चिकटून राहिले. सुमारे २० वर्षे खांद्यावर बाळगलेला काँग्रेसचा तिरंगी झेंडा बदलून लाल झेंडा खांद्यावर घेणे जीवावर आले. आयत्या वेळी विवेकाने त्यांना साथ दिली. हा विवेकही नियतीचा हात होता.

स्वतंत्र भारताचे संविधान म्हणजे स्वतंत्र भारताच्या संसदीय लोकशाहीची राज्यघटना १९५२ साली अमलात आणण्याकरता प्रदेश राज्यांच्या आणि लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. १९५२ सालची भारताची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली तेव्हाच मुंबई प्रदेश राज्याची सार्वत्रिक निवडणूक झाली. महाराष्ट्रात काँग्रेसविरुद्ध शे का पक्ष असा निकराचा सामना होऊन जेधे, मोरे यांचा नवा पक्ष त्या वेळी मार खाऊन खाली बसला. त्यानंतर ४-५ वर्षांच्या अवधीत शे. का. पक्षाला गळती लागली. जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, खाडिलकर इ. मंडळी काँग्रेसमध्ये म्हणजे स्वगृही परतली. हे बहुभाषिक मुंबई राज्य होते. त्यात गुजराथ, महाराष्ट्र आणि कर्नाटक हे तिन्ही भाषिक प्रदेश लहान-मोठ्या प्रमाणात समाविष्ट होते. १९५२ च्या निवडणुकीत खेरांची राजवट संपली, मोरारजींची राजवट सुरू झाली. मोरारजींनी आपल्या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाण व भाऊसाहेब हिरे या दोघा ग्रामीण जनतेच्या नेत्यांना सामावून घेतले. परंतु महाराष्ट्राचे वास्तविक नेतृत्व भाऊसाहेब हिरे यांच्याकडे आले.

भारत स्वतंत्र झाल्यावर भाषिक राज्ये निर्माण व्हावी, भाषावार प्रादेशिक राज्यांची निर्मिती व्हावी हा सिद्धान्त भारत स्वतंत्र होण्याच्या अगोदर ३०-३५ वर्षे मान्य झाला होता. १९२० च्या काँग्रेस अधिवेशनात भाषावार प्रादेशिक राज्यरचनांचा सिद्धान्त मान्य करण्यात आला. परंतु भाषावार प्रादेशिक राज्यांची रचना भारताच्या संविधानात प्रत्यक्ष अंतर्भूत केलेली नाही. भारताचे केंद्रीय सत्ताधारी भाषिक राज्य निर्मितीच्या बाबतीत साशंक मनःस्थितीत होते. भाषिक प्रादेशिक राज्ये निर्माण झाली तरी एकात्मतेला न जुमानता फुटून निघण्याच्या मागणीला प्रारंभ करतील अशी भीती त्या साशंक मनःस्थितीच्या मुळाशी होती. आंध्रामध्ये हा प्रश्न धसास लागला. रामुलूंचा प्राणान्तिक उपवास झाला आणि निषेध मोर्चे सुरू झाले. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या लक्षात आले की, भाषिक आंध्र राज्याची मागणी याच वेळी अमान्य केल्यास स्वतंत्र आंध्र राज्याची मागणी सुरू होईल. म्हणून नाखुशीने लोकसभेमध्ये प्रादेशिक आंध्र राज्याची योजना मान्य करून घेतली. महाराष्ट्रात अगोदरच म्हणजे १९४६ सालापासून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन आकारात येऊ लागले. या आंदोलनाचा प्रथम पुढाकार महाराष्ट्राच्या साहित्यकारांनी केला. त्यानंतर लगेच महाराष्ट्राच्या राजकीय पक्षांनी त्या आंदोलनाला पाठिंबा दिला व ते आंदोलन सबंध महाराष्ट्रभर पसरले. महाराष्ट्राचा काँग्रेस पक्ष त्यापासून अलिप्त राहू

शकला नाही. महाराष्ट्र काँग्रेस समितीने या मागणीचा ठराव एकमताने सम्मत केला. नंतर महाराष्ट्राच्या काँग्रेसमध्येच नेमस्त गट आणि लढाऊ गट असे भेद पडले. भाऊसाहेब हिरे आणि शंकरराव देव हे लढाऊ गटाचे नेते बनले. काँग्रेसच्या पाठिंब्यावाचूनच संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन आक्रमक बनले. शहरे आणि खेडी तापू लागली. यशवंतराव चव्हाण या आंदोलनात हिरिरीने पडले नसले तरी त्याला त्यांचा मनापासून पाठिंबा होता. यशवंतरावांच्या लक्षात आले होते की, काँग्रेसला संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे नेतृत्व करता येणार नाही. त्या करता आपणास काँग्रेसमधून फुटून निघावे लागेल. त्यामुळे महाराष्ट्राच्या काँग्रेसमध्ये फूट पडली व ती वाढत गेली १९५६ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीनंतर ही पडलेली फूट अधिक रुंदावली. पक्षाचा एकमताने पाठिंबा मिळणार नाही, हे लक्षात घेऊन मोरारजी देसाई यांनी पक्षनेता म्हणून उभे न राहता यशवंतराव चव्हाण यांनाच पक्षाने नेते म्हणून उभे केले. यशवंतराव चव्हाण पक्षनेते म्हणून बहुमताने निवडून आले, तरी एक गट त्यांच्या विरोधीच राहिला.

१ नोव्हेंबर १९५६ ला द्वैभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले, कर्नाटकाचा भाग त्यातून वगळला होता. त्या द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून चव्हाणांनी सत्ता हाती घेतली. त्याच वेळी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला आक्रमक उग्र रूप प्राप्त झाले होते. महाराष्ट्र खवळून उभा राहिला होता. तोपर्यंत १९५२ सालापासून १९५५ सालापर्यंत मोरारजी देसाईंच्या प्रशासनाने आंदोलन दडपण्याकरता १०५ बळी घेतले. हा सगळा इतिहास डोळ्यांसमोर घडत असताना यशवंतरावांनी मुंबई राज्याची धुरा खांद्यावर घेतली, हे मोठे साहस होते. केंद्रीय नेत्यांना त्यांनी आश्वासन दिले होते की, हे संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन दडपण्याकरता मी राज्याची सूत्रे हाती घेतली नाहीत. बंदुकीची गोळी न वापरताच मी राज्य चालवणार आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील नेत्यांशी त्यांनी सतत संपर्क चालू ठेवला. गुजराती आणि महाराष्ट्रीय मंत्र्यांमध्ये प्रशासनाच्या बाबतीत सामंजस्य व सलोखा निर्माण केला. त्यापुढे झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये महाराष्ट्रात व गुजरातेत काँग्रेस उमेदवारांचा पराभव होऊ लागला. १९५७ साली प्रतापगड येथे शिवाजीमहाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचा अनावरण समारंभ पंडित नेहरूंच्या हस्ते मोठ्या इतमामाने साजरा करण्यात आला. त्या वेळी वाईपासून प्रतापगडपर्यंतच्या ३२ मैलांच्या हम रस्त्यावर संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचे मोर्चे गर्जत होते. याचे प्रत्यक्ष दर्शन पं. नेहरूंना घडले. पंडित नेहरूंच्या लक्षात आले, की महाराष्ट्र संतापला आहे. त्यांना यशवंतरावांनी सांगितले की महाराष्ट्रीय लवकर रागावत नाहीत, पण रागावल्यानंतर लवकर शांत होत नाहीत. त्यानंतर महाराष्ट्र आणि गुजरातमधील लोकमानसाचा अंदाज घेण्याकरता पंडित नेहरूंनी स्थानिक नेत्यांशी वारंवार चर्चा केल्या. अनेकदा मुख्य चर्चा यशवंतरावांशी झाल्या. यशवंतरावांनी सांगितले की, मी द्वैभाषिक राज्याचे शासन मनापासून राबविले आहे, परंतु माझी खात्री

झाली की, पुढील सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही प्रांतांमध्ये काँग्रेस अल्पमतात जाणार. ही गोष्ट केंद्रवर्ती सत्ताधारी वरिष्ठ नेत्यांना पटली. वऱ्हाड व मराठवाडा येथील स्थानिक नेत्यांशी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या नेत्यांच्या आणि यशवंतरावांच्या अनेकदा वाटाघाटी झाल्या. नाग-विदर्भ आणि मराठवाडा यांच्यासह सबंध महाराष्ट्र म्हणजे कोकणासह उत्तर-दक्षिण महाराष्ट्र असे मराठी भाषिक राज्य स्थापन करण्याचे विधेयक लोकसभेने आणि राज्यसभेने संमत केले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्थापना झाली. १९४६-६० पर्यंतच्या कालखंडात यशवंतराव चव्हाणांचे बेरजेचे राजकारण यशस्वी झाले. मैत्री, सद्भावना, स्वच्छ प्रशासन आणि व्यावहारिक शहाणपण या सद्गुणांचे फलित यशवंतराव यांच्या हाती लागले.

१९६२ पर्यंतच्या ६ वर्षांच्या कारकिर्दीत यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला. अर्थरचना, प्रशासनपद्धती व शिक्षणाचा विस्तार हे तिन्ही मूलभूत विषय त्यांनी मूलगामी पद्धतीने हाताळले. अर्थव्यवस्थेमध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेला प्राधान्य दिले. कृषिऔद्योगिक अर्थ व्यवस्था सहकारी तत्त्वाच्या आधारे निर्माण करण्याकरता कायदेविषयक तरतुदी केल्या. गरीब माणसाला शिक्षणाच्या बाबतीत केव्हाही आणि कोणत्याही श्रेणीपर्यंत पोहोचवण्यास आर्थिक अडचण येऊ नये म्हणून महत्त्वाचे विधेयक संमत करून घेतले. ग्रामीण जनतेच्या हातात सत्तेची सूत्रे काही प्रमाणात जावीत व सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे याकरता ग्रामपंचायतीचा व जिल्हा परिषद निर्मितीचा कायदा संमत करून घेतला. एकंदरीत स्थानिक स्वराज्य संस्था समर्थ व्हाव्यात याकरता राज्याचे नवे धोरण आखले. महाराष्ट्राची कला आणि साहित्य या विषयाची फार मोठी दीर्घकालीन परंपरा लक्षात घेऊन त्याकरता अत्यंत महत्त्वाची धोरणे आखली, परंपरागत धोरणे बदलून टाकली.

१९४८-५७ पर्यंत सरकारी कराचा जबर बोजा मराठी रंगभूमीवर होता. त्यामुळे ती खंगली होती. महाराष्ट्रातील रंगभूमी हिंदुस्थानातील एक प्रगत रंगभूमी असल्यामुळे तिचा हा पडता काळ सर्वांनाच तीव्रतेने जाणवत होता. यशवंतरावांनी यासंबंधी शासनाचे धोरण पूर्ण बदलून टाकले. १९५८ साली नाट्य, नृत्य, संगीत, लोककला इत्यादींवरील करांचा बोजा काढून टाकला. त्यामुळे महाराष्ट्रातील नाट्यकलेला नवे भरते आले. रंगभूमी अधिक उजळून निघाली. सहकारी चळवळ ही महाराष्ट्रात इतकी फोफावली की तिने भारतामध्ये आता अग्रस्थान मिळविले आहे.

१९६२ साली चीनचे आक्रमण भारतावर झाले. या आक्रमणाच्या क्षणापर्यंत 'हिंदी-चिनी भाई भाई' अशा भावनेमध्येच भारतीय राज्यकर्ते गुंग होते. त्या वेळचे भारताचे संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांच्यावर पंडित नेहरूंचा नितांत विश्वास होता. कृष्ण मेननना या आक्रमणाची अगोदर यत्किंचितही कल्पना आली नाही. बफिकीर राहिले. त्यामुळे

लोकसभा आणि राज्यसभा त्यांच्याविरुद्ध क्षुब्ध झाली. यशवंतरावांच्या हाती संरक्षणाची सूत्रे द्यावी असे भारतीय संसदेचे सदस्य आणि नेते म्हणू लागले. यशवंतरावांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे पद सोडून केंद्रातील संरक्षणमंत्रिपद नाइलाजाने व नाखुशीने स्वीकारावे लागले. महाराष्ट्राच्या विकासाचे भावी भव्य चित्र मनापुढे ठेवून त्यांनी कारभार चालविला होता. ते संरक्षणमंत्रिपदावर गेल्याबरोबर तत्क्षणी दैवयोग असा की, चीनने आपणहून हिमालयातून माघार घेतली. १९६५ साली पाकिस्तानचे आक्रमण झाले. तेव्हा लालबहादूर शास्त्री हे भारताचे पंतप्रधान होते. पाकिस्तानने आघाडीवर मार खाल्ला आणि सोव्हिएट रशियाच्या मध्यस्थीने भारताशी अनाक्रमणाचा करार केला.

१९६२ चे चीनचे आक्रमण आणि १९६५ चे पाकिस्तानचे आक्रमण या दोन आक्रमणांमध्ये मंत्रिपदावरून रणनीती ठरवीत असता आणि शत्रूच्या आघाडीवर सैन्याच्या हालचालीच्या आणि व्यूहांच्या तपशीलवार दैनंदिनी आखीत असताना युद्धमान राष्ट्रांच्या उद्दिष्टांचेही ते चिंतन करीत होते. ते म्हणतात, ''संरक्षणमंत्री म्हणून ज्या दिवशी मी दिल्लीला गेलो, त्याच्या दुसऱ्या दिवशी चीनचे सैन्य माघारी फिरले आणि प्रश्न असा पडला की या सगळ्या गोष्टीचा अर्थ काय? ते आले आणि परत गेले. याच्या पाठीमागे त्यांचे काय इरादे असावेत? काय हेतू असावेत? याचा जेव्हा अभ्यास झाला आणि चर्चा झाली तेव्हा त्याचे सरळ सरळ तीन हेतू दिसून आले. सरळ एक गोष्ट आहे की, चीन आणि हिंदुस्थान हे प्रचंड लोकसंख्या असलेले विस्तीर्ण भूभाग आहेत. दोन प्रचंड भूभाग असलेली राष्ट्रे जेव्हा शेजारी शेजारी असतात तेव्हा हितसंबंधांचे विरोध निर्माण होत असतात. चीनच्या दृष्टीने त्यांच्यात आणि भारतात जी स्पर्धा होती ती अशी, की आशिया आणि आफ्रिका खंडांतील स्वतंत्र होणारी जी छोटी छोटी राष्ट्रे आहेत, त्यांच्या पुढे आफ्रिका आणि आशिया खंडांत चीन हा भारतापेक्षा लष्करीदृष्ट्या अधिक समर्थ देश आहे. असे जे प्रदर्शन करावयाचे होते ते त्याने हिमालयामध्ये करण्याचे ठरविले आणि तेथे हा उद्योग केला.''

"दुसरी गोष्ट अशी, की गेली १५-१६ वर्षे हिंदुस्थानने लष्करी तयारी गौण मानून विकासाची तयारी महत्त्वाची मानली आणि आपली सगळी साधन सामग्री विकासाच्या कामावर केंद्रित केली. पण लष्करी प्रश्न हिंदुस्थानपुढे येऊन ठाकल्यामुळे विकासाच्या कामासाठी लागणाऱ्या साधनांतला काही भाग तरी संरक्षणाच्या तयारीला घातल्याशिवाय हिंदुस्थानला दुसरा मार्ग नाही, हे चीनला माहीत होते. हिंदुस्थानच्या आर्थिक संकटाचा बोजा अधिकाधिक वाढवण्याचा प्रयत्न करणे हा चीनच्या आक्रमणातला दुसरा उद्देश होता. चीनचा आणखीही एक उद्देश होता. तो म्हणजे हिंदुस्थानच्या नॉन-अलाइनमेंटच्या -तटस्थतेच्या धोरणाला खीळ घालणे हा होय. पण या बाबतीत चीनचा अपेक्षाभंग झाला. हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यातील संघर्ष जागता ठेवला पाहिजे असा त्यांचा आता नवा प्रयत्न आहे. परंतु या संघर्षाचे स्वरूप पाकिस्तानने समजून घेतले, तर ती गोष्ट पाकिस्तानच्या

हिताची ठरेल. कारण हिंदुस्थान व पाकिस्तान यांचा संघर्ष झाला पाहिजे अशा तऱ्हेची भावना मनात ठेवून आम्हाला चालणार नाही, कारण त्यामध्ये पाकिस्तानचाही नाश आहे व हिंदुस्थानचेही नुकसान आहे हे आम्हाला उघड दिसते.''

"पाकिस्तानच्या मनात हिंदुस्थानसंबंधी विरोधाची भावना मुळातच आहे, पण पाकिस्तान व चीन हे एकत्र आले याचे मुख्य कारण कोणते? एकत्र आले ते काही धर्म किवा साम्यवाद यांच्यामुळे नव्हे, तर हिंदुस्थानसंबंधी या दोन राष्ट्रांच्यामध्ये असलेला विरोध हेच याचे मुख्य कारण आहे. पण विरोधावर आधारलेले राजकारण फारसे यशस्वी होत नसते ही गोष्ट त्यांना समजत नसावी." (युगांतर, पृ. १०० - २).

यशवंतरावांच्या अध्ययनशील, चिंतनशील आणि कृतिशील राजकारणाला एक खोल अशी निष्ठा लाभली होती. प्रत्यक्ष राजकारणामध्ये राष्ट्राची प्रकृती ते सतत जाणून घेत होते. इथल्या लोकशाहीचा पाया मजबूत नाही, नेहरूसारख्या नेत्यांच्या अभावी ही संसदीय लोकशाहीची विशाल, भव्य रचना डळमळून कोलमडेल अशीही शंका एतद्देशीय आणि विदेशी राजकारणी आणि समाजकारणी पंडितांना पडत होती. यशवंतराव संरक्षणमंत्री असतानाच चीनच्या आक्रमणाच्या धक्क्याने प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू खचले व निर्वतले. त्यांच्या पदावर लालबहादूर शास्त्री आले. ताश्कंद करार झाला. त्या संदर्भात यशवंतराव म्हणतात, "या देशामध्ये असलेली लोकशाही या देशाला एक मोठा नेता होता, म्हणूनच आहे यावर माझा पूर्वीही विश्वास नव्हता आणि आजही नाही. नेहरूंनंतरही आम्ही या देशात लोकशाही टिकवली. हिंदुस्थानचा हा एक मोठा विजय आहे. या राष्ट्राच्या जीवनात प्राण ओतून एक नवे राष्ट्र बनवण्याचा प्रयत्न करताना एका नवीन तऱ्हेच्या आर्थिक जीवनाचा आपणास पाया घालावयाचा होता. हिंदुस्थान हे एक पहिल्या प्रतीचे आणि मोठे प्रगत राष्ट्र म्हणून दुनियेमध्ये अभिमानाने जगू शकेल अशी माझी श्रद्धा आहे. राष्ट्र बनविण्याचे हे काम आज तुमच्या-आमच्याकडे आले आहे; हे तुमचे आमचे भाग्य आहे." (युगांतर, पृ. १०८-१०).

संरक्षणमंत्रिपदानंतर त्यांच्याकडे केंद्राचे गृहमंत्रिपद आले. नंतर अर्थमंत्री म्हणून समर्थपणे कारभार केला व अखेर विदेशमंत्रिपद स्वीकारले विदेशमंत्रिपद स्वीकारल्यावर त्यांनी पश्चिमेकडील आणि पूर्वेकडील राष्ट्रांच्या यात्रा केल्या. एका तऱ्हेची सबंध पृथ्वी प्रदक्षिणा घडली. महानद्यांच्या काठची आणि सागरकिनाऱ्यावरची शहरे पाहिली. नद्या, सरोवरे, जंगले, उद्याने यांच्यात विहार केला. निरनिराळ्या राष्ट्रांच्या विकासाचे कार्यक्रम अमलात आलेले प्रत्यक्ष अवलोकिले. या सर्वांचे मोठे रसिकतेने मार्मिक वर्णन त्यांनी आपल्या विविध लेखसंग्रहांमधून केलेले वाचावे. ते प्रत्यक्ष प्रशासनाच्या व्यापात नसते, तर मराठीतील प्रवासवर्णनाच्या साहित्यात त्यांनी अभिजात यात्रा-वर्णनांची भर घातली असती. त्यांच्या त्या यात्रावर्णनावरून त्यांचे मराठी शब्दकळेवरील प्रभुत्व प्रत्ययास येते.

प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांना तात्त्विक चिंतनाची जोड अशा तऱ्हेचे सुभग लेखन करण्यात यशवंतरावांचा हातखंडा होता. 'सह्याद्रीचे वारे', 'ऋणानुबंध', 'युगांतर', 'कृष्णाकाठ' हा आत्मचरित्राचा प्रथम खंड आणि 'भूमिका' हा चौथा लेखसंग्रह व भाषणसंग्रह (प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे) हे सगळे ग्रंथ मराठी साहित्याचे तेजस्वी अलंकार आहेत. त्यात यशवंतरावांची क्रांतदर्शी प्रतिभा आणि तत्त्वदर्शी प्रज्ञा प्रसन्नपणे प्रकट झालेली दिसते.

शेवटची १९७९ पासूनची त्यांची वर्षे ही ते यशाच्या उत्कर्षबिंदूपासून खाली जात आहेत याचे दर्शन ठरतात. परंतु त्यातही त्यांचे अंतःकरण शुद्ध तत्त्वनिष्ठेपासून कधीही ढळलेले आढळत नाही. नियतीने हात दिला असता तर या १९८५ च्या काँग्रेसच्या अभूतपूर्व विजयाच्या वर्षात ते पुन्हा भारताच्या राजकीय क्षितिजावर तेजस्वीपणे जनतेला मार्गदर्शन करीत असलेले दिसले असते.

(मराठी मातीचे वैभव: यशवंतराव चव्हाण स्मरणग्रंथ,
संपा. प्रा. उत्तम सूर्यवंशी,
सांगाती प्रकाशन, नांदेड,
जुलै, १९८९. पृ. ७ ते २३,
मूळ शीर्षक : आदराच्या प्रकाशात विकसित झालेले व्यक्तिमत्त्व)

ooo

५०

यशवंतराव चव्हाण : आधुनिक महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान

माझे मित्र पत्रकार श्री. रामभाऊ जोशी यांनी यशवंतराव चव्हाण यांचे सविस्तर चरित्र बारा वर्षांपूर्वी प्रसिद्ध केले. त्या चरित्राचे अभिधान 'यशवंतराव, इतिहासाचे एक पान' असे आहे. महाराष्ट्राचे भवितव्य घडविण्यात ज्या तरुण-तरुणींना उत्साह आहे त्यांनी यशवंतरावांचे हे जोशींनी लिहिलेले चरित्र आणि यशवंतरावांनी लिहिलेले आत्मचरित्र अवश्य वाचले पाहिजे. जोशींच्या चरित्रात ग. दि. माडगूळकर यांनी छोटेसे प्रास्ताविक लिहिले आहे. त्याच्या प्रारंभीच ते म्हणतात, 'भारतीय गणराज्याचे सुविख्यात परराष्ट्रमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण' हे एक असाधारण व्यक्तिमत्त्व आहे. महाराष्ट्रातील एका आडवळणी खेड्यात त्यांचा जन्म झाला. त्यांचे जन्मदातेही कुणी नामांकित नव्हते. भारतातले करोडो शेतकरी अज्ञान आणि दारिद्र्य यांच्या संगतीत काळ कंठित होते, त्यातीलच तेही एक.

स्वातंत्र्योत्तर कालातला महाराष्ट्राचा इतिहास हा यशवंतरावांच्या प्रतिभा आणि प्रज्ञा यांच्या उत्कर्षाचा इतिहास आहे. महाराष्ट्राच्या अनेक समस्या सोडविण्यात त्यांना यशप्राप्ती झाली. याचे कारण दीर्घदर्शी आणि दूरदर्शी धोरण होय. समस्यांचे आव्हान स्वीकारणे व त्या सोडविणे यांचा क्रम म्हणजेच इतिहास होय.

यशवंतरावांचा जन्म अजूनपर्यंत न सुटलेल्या खोल समस्येच्या जगात झाला. राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक दुरवस्थेचे खरेखुरे विषादकारक व निराशाजनक भारतीय ग्रामीण जीवन होय. अशाच ग्रामीण जीवनात यशवंतराव चव्हाण यांचे कुटुंब पिढ्यान्‌पिढ्या कठीण जीवन कंठित होते. खेड्यातून नगरात यशवंतरावांचे वडील बळवंतराव आले. कऱ्हाड येथे बेलिफाची नोकरी मिळाली. आधुनिक नागरी संस्कृतीचा प्रकाश प्राप्त झाला. खेड्यातून नगरामध्ये स्थलांतर करणारे फारच थोडे त्या प्रकाशाचा अर्थ समजून घेतात. त्यामुळे नागरी जीवनामध्ये प्रवेश केल्यामुळे विकास होतोच असे नाही. यशवंतरावांचे वडील बंधू

गणपतराव हे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. सत्यशोधक समाजाच्या आंदोलनामुळे धार्मिक अंधश्रद्धेच्या घनांधकारातून ते बाहेर पडले होते. नव्या ध्येयवादाने भारले होते. नव्या इंग्रजी शिक्षणाचे रहस्य उमगले होते. मोठा सामाजिक परिवर्तनाचा आदेश सत्यशोधक समाजाच्या दणदणीत प्रचाराने महाराष्ट्राच्या ग्रामीण जगात दुमदुमू लागला होता. संकुचित व जीर्ण जातिवादाच्या व हिंदुत्वाच्या प्रतिगामी प्रभावातून सत्यशोधक समाजाने अनेक तरुण मंडळींना बाहेर काढले होते. त्याचाही परिणाम यशवंतरावांवर झाला होता. अनेक सत्यशोधकी नेते राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्यापासून दूर राहिले होते. यशवंतराव नवे जे जे काही महत्त्वाचे परिवर्तन घडत होते, त्याचे प्रत्ययशील चिंतन त्या कोवळ्या तरुण वयातही करू शकत होते. शालांत परीक्षेच्या काळात परकीय पारतंत्र्याविरुद्ध देशव्यापी पहिले आंदोलन असहकारितेचे त्यांनी पाहिले. १९३० साली अधिक मोठे सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाचे वादळ उठले. त्यात यशवंतराव स्वतः सामील झाले.

भारतीय राष्ट्रवाद हा त्यांच्या जीवनाचा कायमचा मार्गदर्शक ठरला. तो महात्मा गांधींच्या विश्वमानवतावादाच्या अधिष्ठानावरचा होता. पंडित जवाहरलाल नेहरू हे या स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे महात्मा गांधींचे सहकारी म्हणून चमकू लागले होते. त्यांच्याही भाषणांचा आणि पुस्तकांचा प्रभाव यशवंतरावांच्या विचारसरणीवर पडून, यशवंतरावांचे जीवनाचे तत्त्वज्ञान त्यांच्या बुद्धीच्या पटलावर सुंदर अक्षरात लिहिले जात होते. मनाची कवाडे खुली ठेवल्यामुळे इकडे विद्यालयीन पुस्तकी शिक्षण चालू असताना राष्ट्रीय जीवन व जागतिक उलाढाली यांचेही पडसाद त्यांच्या बुद्धीत उमटू लागले. १९३० ते ४५ या कालखंडातील भारत यशवंतरावांचे वाच्यार्थाने विश्वविद्यालयच बनले. अभ्यासाने त्यांची बुद्धी व विचार संपन्न व समर्थ बनले. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू, एम. एन. रॉय इत्यादींचे परिशीलन त्यांनी मोठ्या आस्थेने केले. रशियन राज्यक्रांती होऊन अनेक दशके लोटली होती. समाजवादी क्रांतीचा आणि वर्गहीन समताप्रधान समाजरचनेचा अर्थ समजून घेण्याचा त्यांनी दीर्घकाळ प्रयत्न केला. स्वातंत्र्याप्राप्तीच्या आंदोलनात त्यांनी अनेक वर्षे कारागृहवास भोगला. तुरूंग हेसुद्धा त्यांना विद्यापीठासारखेच उपयोगी पडले, असे त्यांनी आत्मचरित्रात लिहिले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आंदोलनात त्यांनी निष्ठेने अनुयायित्व पत्करले. खेड्यापाड्यांतून व शहरांतून लहानमोठ्या सभांतून भाषणे केली. त्यात त्यांचे नेतृत्व विकसित झाले. एक वेगळी भाषणशैली त्यांना प्राप्त झाली. त्यांच्या वक्तृत्वकलेला जनतेच्या प्रेमाने अगदी वेगळा असा आकृतिबंध दिला. आपले हृदगत सांगतो, हितगूज बोलतो असे त्यांचे वक्तृत्व होते. फड जिंकायची भाषा ते बोलत नसत. लोकशाहीचा निष्ठावंत शिक्षक व लोकशाही ध्येयवादाचा प्रेषित अशा स्वरूपात त्यांची भाषणे होत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात त्यांना नेतृत्व लाभले. नेतृत्वातून सत्ताही त्यांच्याकडे चालून आली. संयुक्त महाराष्ट्राची प्रचंड चळवळ म्हणजे महान दिव्यच होते. जनक्षोभाच्या

दाहक ज्वाला आकाशाला भिडत होत्या. भाषिक राज्यांच्या मागणीची चळवळ विरुद्ध केंद्रवर्ती सत्ता असा तो संग्राम होता. द्विभाषिक मुंबई राज्याचे ते मुख्यमंत्री बनले. अशा वेळी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मुक्तपणे भाग घेणे शक्य नव्हते. कारण त्यात केंद्रसत्तेशी संघर्ष अटळ झाला असता आणि मुख्यमंत्रिपद सोडावे लागले असते. परंतु फार मोठ्या कुशलतेने त्यांनी मुख्यमंत्रिपद सांभाळून महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपर्यंत राजकीय प्रश्नांचा उलगडा शिताफीने केला. खवळलेल्या समुद्रात सापडलेल्या प्रचंड नौकेसारखी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची अवस्था होती. या दुस्तर स्थितीतून उलट्या-सुलट्या मार्गांनी प्रदेश काँग्रेसला वादळातून सुरक्षित स्थानी पोहोचविले. हा १९६२ पर्यंतच्या यशवंतरावांच्या कारकिर्दीचा अर्थ आहे.

या कारकिर्दीतून यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत उज्ज्वल बनले. भारत देशाच्या राजकारणात एक नवा प्रज्ञावंत, दूरदर्शी नेता झळकू लागला. चीनचे आक्रमण १९६२ साली झाले. तेव्हा भारताच्या लोकसभेने नवा संरक्षणमंत्री पाहिजे म्हणून यशवंतरावांची मागणी केली. हा एक विलक्षण राष्ट्रीय निष्ठेची कसोटी पाहणारा क्षण होता. यशवंतरावांचे महाराष्ट्रातील नेतृत्व अत्यंत खोलवर रुजले होते. महाराष्ट्राचा मोह बाजूला सारणे जिवावर आले, परंतु केंद्रसत्तेच्या आवाहनाबरोबर क्षणाचाही विलंब न करता, मागे न पाहता दिल्लीस प्रयाण केले. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी चालली होती. परंतु केंद्रसत्तेच्या आवाहनाची उपेक्षा करणे शक्य झाले नाही.

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात यशवंतरावांना अजातशत्रूपद प्राप्त झाले. इंदिरा गांधींचे नेतृत्व मान्य करून केंद्रीय सत्तेमध्ये यशवंतरावांनी गृहमंत्री, अर्थमंत्री इत्यादी पदे कुशलतेने सांभाळली. संरक्षण, अर्थ व विदेश व्यवहार या विषयात मंत्रिपदावरून आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करताना, जगातील मुत्सद्दी राजकीय प्रज्ञावंत, अर्थशास्त्रज्ञ, मोठमोठे सत्ताधारी इत्यादिकांमध्ये यशवंतरावांचे नेतृत्व खुलून दिसत होते. समतोल विचारवंत व व्यवहारी प्रज्ञावंत या स्वरूपांत ते झळकत राहिले.

गेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रारंभी पाच वर्षांपूर्वी यशवंतरावांचे आकस्मिक निधन झाले. भारताच्या आणि महाराष्ट्राचा राजकीय जीवनामध्ये त्यामुळे एक दूरदर्शी मार्गदर्शक, राजकारणी मुत्सद्दी आपल्यातून नाहीसा झाला, अशी काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाला दुःखद जाणीव झाली. यशवंतराव चव्हाण कायमचे दृष्टीआड झाले तरी त्यांनी विकासाचे व प्रगतीचे सकस विचार आपल्यामागे पुढच्या पिढीकरता मुद्रित रूपाने ठेवले आहेत. महाराष्ट्राच्या नवीन पिढीला ते विचार मार्गदर्शक ठरत आहेत आणि महाराष्ट्र त्यांच्याबद्दल कृतज्ञ आहे. महाराष्ट्राचा गेल्या पन्नास वर्षांचा उज्ज्वल इतिहास निर्माण करण्यात यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व उपयुक्त ठरले आहे. भारताला ज्याप्रमाणे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा वारसा लाभला आहे, त्याप्रमाणे महाराष्ट्राला यशवंतरावांचा वारसा

मोठ्या भाग्याने प्राप्त झाला आहे. या भाग्याचा हेवा क्षुद्र बुद्धीच्या एका पत्रकाराला वाटला. मुंबईत प्रसिद्ध होणाऱ्या एक इंग्रजी वृत्तपत्रात यशवंतरावांवर गलिच्छ आरोप करण्यात आले. कसलाही संदर्भ नव्हता, प्रसंग नव्हता. उपटसुंभासारखा एक 'इंडिपेंडंट' नावाच्या पत्राचा संपादक निराधार आरोप करण्यास धजावला. त्यामुळे महाराष्ट्रातील सामान्य कामगार वर्गात जबरदस्त प्रतिक्रिया व्यक्त झाली. त्यामुळे त्या पत्रकाराला संपादकपद सोडून पळावे लागले. त्या संपादकाला विवेक आणि तारतम्यबुद्धी न राहिल्यामुळे त्याने अमेरिकन दूतावासातील एका जबाबदार, सुशिक्षित शासकीय सेवेतील यशवंतरावांच्या जीवनामध्ये गुंतवण्याचा प्रयत्न केला. या संपादकाने दोन गुन्हे केले. यशवंतरावांसारख्या अत्यंत समंजस, विवेकी व संयमी, स्वच्छ व पवित्र आचरणाच्या थोर व्यक्तीविरुद्ध निराधार आरोप केले आणि दुसरे असे की, एका विदेशस्थ, सुशिक्षित, उच्चपदस्थ महिलेला भ्रष्टाचारात गुंतवण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही राष्ट्राच्या दूतावासातील उच्चपदस्थ कर्मचारी लैंगिक भ्रष्टाचारापासून स्वतःच्या आणि राष्ट्राच्या इभ्रतीकरता दूर राहतात ही साधी माहिती या पत्रकाराला नसावी, याचे आश्चर्य वाटते.

(यशवंतराव चव्हाण स्मृतिविशेष पुरवणी,
दैनिक सकाळ, दि. २५ नोव्हेंबर, १९८९,
पृ.१ व **)

○○○

५१

क्रांतिकारक समादेशक : स्वातंत्र्यवीर सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर यांची नि माझी समक्ष भेट आयुष्यात दोनदा झाली. प्रत्येक भेटीच्या वेळी मला मी धन्य झालो, अशा तऱ्हेची उत्कट भावना निर्माण झाली.

पहिली भेट सन १९३१ साली रत्नागिरी येथे वीर सावरकर स्थानबद्ध असताना झाली. त्या वेळी मी रत्नागिरीस सावरकरांची भेट व्हावी याकरिता गेलो नव्हतो. रत्नागिरी येथे सडा म्हणून उंचवटा आहे. त्यावर अनेक इमारती होऊ लागल्या होत्या. त्यातील एका इमारतीत लोकसभेचे माजी सभापती व कायदेपंडित कै. दादासाहेब मावळंकर राहिले होते. त्यांचा प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या धर्मकोशाशी संबंध होता. कागदपत्रांवर त्यांची स्वाक्षरी घ्यावयाची होती. दुपारी मी सावरकरांच्या निवासस्थानी गेलो. त्यांच्या चरणांना स्पर्श करून वंदन केले. ते मला खूपच ओळखत होते. त्यांनी सांगितले की पतितपावन मंदिरामध्ये तुमचे भाषण होईल. तरी मी शहरात ग्वाही फिरवतो. पतितपावन मंदिरात सावरकारांच्या अध्यक्षतेखाली 'धर्मशास्त्र व अस्पृश्यता निवारण' या विषयावर माझे भाषण झाले. त्याप्रसंगी रत्नागिरीस मी तीन दिवस राहिलो होतो. तिन्ही दिवस सावरकरांची व माझी समुद्र किनाऱ्यावर बातचीत झाली. सोलापूर येथे १९३० साली अनेक स्वातंत्र्यवीरांचा खून झाला. त्या खुनांच्या संदर्भात सावरकरांनी मला डिवचले आणि म्हटले की, "तो सोलापूरचा कलेक्टर नाईट आता नाशिकला गेला आहे. त्याला त्या सोलापूरच्या हुतात्यांच्या बरोबर स्वर्गाला पाठवण्याची काही योजना आखा." दादासाहेब मावळंकरांदेखत हा असा सल्ला दिला. दादासाहेब व मी परतत असताना दादासाहेब मला म्हणाले, ''हा जो सल्ला माझ्यादेखत दिला, त्यामुळे माझी मोठी पंचाईत झाली आहे, शास्त्रीबुवा!" मी म्हटले "सावरकारांनी सूचित केलेली योजना कृतीत आणता येईल की नाही याबद्दल मला काही सांगता येत नाही, म्हणून निश्चिंत राहा." तिसऱ्या दिवशी पुन्हा सावरकरांची माझी सायंकाळी समुद्र किनाऱ्यावर भेट झाली. त्या वेळी दादासाहेब आमच्या बरोबर नव्हते.

१९५१ साली भी सोमनाथ ज्योतिर्लिंगाचा पुनःप्रतिष्ठा समारंभ करून मुंबईस परतलो. देशातील वृत्तपत्रांत जवळजवळ आठवडाभर समारंभाच्या हकिकती येत होत्या. राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद हे यजमान व मी पुनःप्रतिष्ठेचा आचार्य याबद्दल सावरकरांना अत्यंत आदर वाटला. मुंबईत शिवाजी पार्कवर माझ्या बंधूंच्या निवासस्थानी मी उतरलो होतो. जवळच सावरकर निवास आहे. तेथून निरोप आला की तुमची सावरकर वाट पहात आहेत. मी दुपारी ३ वाजता सावरकर निवासात वरच्या मजल्यावर त्यांच्या खोलीपाशी गेलो. ते बाहेर आले आणि माझा हात धरून खोलीत नेले आणि मला एक पुष्पगुच्छ दिला. मी तो पुष्पगुच्छ स्वीकारून त्यांच्या चरणास वंदन केले.

(मी पाहिलेले सावरकर, संकलक - रा. स. भट,
प्रकाशक- वीर गौरव समिती, ७७६,
सदाशिव पेठ, पुणे - ३०. प्रकाशन १६ मे, १९९०,
स्वा. सावरकरांची १०७ वी जयंती, पृ. १०, ११,
मूळ शीर्षक: सावरकरांचा क्रांतिकारक समादेश)

ooo

५२

समाजभूषण बाबूराव घोरपडे

सातारा जिल्ह्यातील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये बाबूराव घोरपडे यांना फार महत्त्वाचे स्थान होते. स्वातंत्र्य चळवळीत ऐन उमेदीचे काळात ते सहभागी झाले. अनेक वेळा त्यांनी तुरुंगवासही भोगला. सातारच्या भूमिगत चळवळीत त्यांनी केलेले काम क्रांतिकारी स्वरूपाचे होते. प्रतिसरकारचे ते मुख्य न्यायाधीश होते. त्यांनी केलेले न्यायनिवाडे महत्त्वाचे व समतोल बुद्धीचे होते. भारतामध्ये प्रतिसरकारची चळवळ विस्तारित झाली नाही परंतु सातारा जिल्ह्यात किसन वीर व बाबुराव घोरपडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही चळवळ मोठ्या आत्मविश्वासाने चालविली.

देशभक्ताचे मनामध्ये "स्वातंत्र्य" हा एकच ध्रुवतारा होता. या ध्रुवताऱ्याच्या प्राप्तीसाठी या देशभक्तांनी अपार परिश्रम घेतले. त्यामध्ये बाबूराव घोरपडे हे अग्रेसर होते. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ जोमाने चालली असताना सातारा जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते या चळवळीत सहभागी झाले. माझा व बाबुरावजी घोरपडे यांचा ४० वर्षांहून अधिक काळ परिचय होता. त्यांची अनेक भाषणेही मी ऐकली आहेत. त्यांच्या भाषणात ज्ञानेश्वरांच्या ओव्या, गीतेतील अभंग त्याचप्रमाणे रामायण, महाभारतातील व इसापनीतीतील गोष्टी असत. त्यांचे भाषण म्हणजे एक प्रकारचे लोकशिक्षणच असे. अशा लोकशिक्षकांची लोकशाहीला गरज असते. मनाबरोबरच मती तयार करण्याचे महत्त्वाचे काम बाबूरावजींनी सेवाभावाने केले. स्वातंत्र्य वेळच्या त्यांच्या त्यागमय जीवनाचा काँग्रेसने गौरवही केला.

सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष त्याचप्रमाणे मुंबई विधान सभेचे ते १९५२ साली सदस्यही झाले. सातारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पद व अध्यक्षपद भूषविण्याचा मानही त्यांना मिळाला. महाराष्ट्र राज्याच्या सहकारी बँकेचे ते संचालक होते. सातारा जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे अध्यक्षपदही त्यांना मिळाले. त्यांच्या कार्याचा जास्त गौरव

झाला. तसाच आणखीही मला एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावा वाटतो तो असा की, घोरपडे गुरुजींना इतिहासाचे वेड होते. आपल्या घराण्याचा इतिहास त्यांनी संशोधनपर वृत्तीने लिहिला. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने तो प्रकाशित केला. छत्रपती शिवरायांचे कालखंडापासून सुरू झालेले ऐतिहासिक पर्व घोरपडे गुरुजींनी अभ्यासले होते. अस्सल कागदपत्रांच्या पुराव्यावरून त्यांनी अनेक ऐतिहासिक संशोधनपर लेखही लिहिले. भारतीय इतिहास संशोधन मंडळाचे त्याचप्रमाणे राजवाडे इतिहास संशोधन मंडळाचे ते सदस्य होते. या ऐतिहासिक लेखनाबरोबरच स्वातंत्र्य चळवळीतील 'चले जाव' आंदोलनाचा इतिहासही त्यांनी लिहिला. त्यांचे हे संशोधनपर लेखन कार्य प्रशंसनीय असेच आहे.

माझे मित्र बाबूरावजी घोरपडे यांनी राजकीय, सामाजिक आणि ऐतिहासिक क्षेत्रात जे काम केले आहे, ते मोलाचे आहे. त्यांची कार्यपद्धती सर्वांना समत्व बुद्धीने बरोबर घेऊन जाण्याची होती. त्यांचे ठिकाणी असलेली विधायक स्वरूपाची राजकीय दृष्टी, लोकशाहीची जाण आणि विवेकबुद्धी आजही अनुकरणीय अशी आहे. खऱ्या अर्थाने ते एक समाजाचे भूषण होते.

(देशभक्त बाबूराव घोरपडे गौरव ग्रंथ, ३० जून, १९९०. पृ.७८, ७९)

ooo

५३

जनसेवक श्री. बाबुराव धारवाडे

आमदार श्री. बाबूराव धारवाडे यांच्या एकसष्टी समारंभ होत आहे. ती योग्यच गोष्ट आहे. श्री. धारवाडे यांच्यासारखा सामाजिक कार्यकर्ता दीर्घकालपर्यंत अखंड विविध क्षेत्रांत समर्थपणे वावरतो आणि कार्य करतो याबद्दल समाजाने योग्य दखल घेणे जरुरीचे आहे. सामाजिक जीवन योग्य लोककल्याणकारी व्हावयास बाबूराव धारवाडे यांच्यासारखे कार्यकर्ते उपलब्ध व्हावे लागतात.

कोल्हापूर शहर हे महाराष्ट्रातल्या राजकीय व सास्कृतिक आंदोलनाचे महत्त्वाचे केंद्र आहे. श्री. शाहू छत्रपतींनी कोल्हापूरला एक अर्थपूर्ण स्थान प्राप्त करून दिले. कोल्हापूर शहराचा माहिमा वाढविण्यात जे अनेक सामाजिक आणि राजकीय पुढारी चमकून गेले, त्यांनी या शहराचा इतिहास घडविला आहे. भाई माधवरावजी बागल, पुढारीकार ग. गो. जाधव इ. नेत्यांचे कार्य अविस्मरणीय आहे. मेजर दादासाहेब निंबाळकर, हिंदुराव मोहिते, नानासाहेब गद्रे, सि. गो. सरदेसाई, रवींद्र सबनीस इत्यादिकांनी कोल्हापूरच्या इतिहासात महत्त्वाची भर टाकली आहे.

कोल्हापूरचे विद्यार्थी बाबूराव धारवाडे यांचे ऋण कधीच विसरणार नाहीत. कोल्हापूर शहरात जे जे जनतेचे महत्त्वाचे प्रश्न गेल्या चाळीस वर्षांत उत्पन्न झाले, ते प्रश्न नीट रीतीने गोंधळ न करता सोडविण्याचे कार्य बाबुरावांनी अनेक मित्रांच्या सहकार्याने केले, ही गोष्ट कायमची ध्यानात राहाते.

विशेषत: भाई माधवरावजी बागल यांची कारकिर्द कोल्हापूरच्या इतिहासावर कायमचा ठसा उमटवून समाप्त झाली आहे. त्यांच्या नावाने विद्यापीठाची स्थापना बाबूरावांनी केली. अनेक वादग्रस्त प्रश्नांचा नीट खुलासा करून बाबूरावांनी जनमानसाला मार्गदर्शन केले आहे.

बाबूरावांचा आणि माझा गेली अनेक वर्षे वारंवार संबंध आला आहे आणि सामाजिक

वाय १८१-३०

प्रबोधनाच्या कार्यात आमचे सहकार्य सुरू आहे. या एकसष्टी समारंभाला उत्तम प्रतिसाद मिळावा, अशी शुभेच्छा करतो.

(आमदार बाबूराव धारवाडे,
एकसष्ठी समारंभ गौरविका, १९९१ पृ.३)

ooo

५४

तत्त्वचिंतक : रा. ना. चव्हाण

विठ्ठल रामजी शिंदे वाईला १९३४ मध्ये आले. त्यांनी वाईत ब्राह्मो समाजाची स्थापना केली. रा. ना. चव्हाण यांनी तेव्हा मोठा पुढाकार घेतला होता. त्या वेळी रा. ना. चव्हाण महर्षी शिंदे यांना म्हणाले, "अहो, एक गोष्ट तुम्हाला माहीत आहे का? मातंग समाजातील एका मुलाला आमचे शास्त्रीजी वेदांचे उतारे शिकवतात." महर्षी शिंदे यांनी रा. ना. चव्हाण यांच्याकडून ही गोष्ट ऐकली आणि नंतर समोरच्या सभेला आपल्या भाषणातून ऐकवलीही!

"त्या काळात बी. ए. ला वेदाच्या उताऱ्याचा अभ्यास असे. हा मुलगा म्हणजे पुढे विधिमंडळाचे सदस्य झालेले लक्ष्मणराव भिंगारदिवे. त्या वेळी पांढरपेशा समाज आजच्याइतका पुढारलेला नव्हता. त्यामुळे मातंग समाजातील मुलाने वेद शिकणे आणि त्याला मी शिकविणे या दोन्ही गोष्टी विशेष महत्त्वपूर्ण होत्या."

बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड अधूनमधून महाबळेश्वरला येत. एकदा ते महाबळेश्वरला आलेले असताना नारायणराव चव्हाण (रामचंद्र चव्हाण यांचे वडील) यांनी त्यांना वाई भेटीचे निमंत्रण दिले. नारायणराव त्या काळात बहुजन समाजाचे पुढारी होते. त्यांनी सयाजीरावांच्या सत्काराचा कार्यक्रम आखला व मला सत्कार सभेत भाषण करावयास सांगितले. मी त्या वेळी सत्कार सभेत बोललो. तद्नंतर नारायणराव चव्हाण यांनी मोठ्या मनाने माझे कौतुक केले. मला शाबासकी दिली.

"मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर झालेच पाहिजे. मराठा महासंघ काय किंवा ब्राह्मण महासंघ अशा तऱ्हेच्या जातीय चळवळी किंवा संस्था असूच नयेत." समाजातील सर्व धर्मांचे हित पाहणारेच खरे समाजचिंतक असतात, अशा तऱ्हेची ठाम मते ते मांडीत; पण त्यांच्यामध्ये दुराग्रह नसे. त्यांच्या या विचाराने व स्वभावगुणाने मी भारावून जात असे.

या देशातील थोर धर्मसुधारक आणि समाजसुधारक विठ्ठल रामजी शिंदे यांचे सहकारी म्हणून रामचंद्र नारायण तथा रा. ना. चव्हाण यांना महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेमध्ये

फार महत्त्वाचे कार्यकर्ते म्हणून स्थान होते.

रा. ना. चव्हाण यांना त्यांच्या वडिलांचाही (नारायणराव चव्हाण) पाठिंबा होता. नारायणराव हे ब्राह्मो समाजाचे कार्यकर्ते होते. ब्राह्मो समाजाचे संस्थापक राजा राममोहन रॉय हे कोणत्याही विशिष्ट धर्माचे उपासक नागरिक नव्हते. ते खरे ब्राह्मो समाजी होते. सगळेच धर्म ईश्वराची उपासना करतात. त्यामुळे अमक्या एका धर्माचा सदस्य म्हणून प्रार्थना समाजी किंवा ब्राह्मो समाजी नसतो, तर ब्राह्मो समाजी किंवा प्रार्थना समाजी म्हणजे विशिष्ट धर्माभिमानाच्या बंधनातून मुक्त झालेला. भिन्नभिन्न धार्मिक समाजांच्या वेगळेपणामुळे त्यांचा एक सामुदायिक अहंकार असतो आणि त्यामुळे मानसिक संघर्षामध्ये तो अडकलेला असतो. प्रार्थना समाज व ब्राह्मो समाज हे एकच. कलकत्त्यात त्याला ब्राह्मो (ब्राह्म) समाज म्हणतात. मुंबईत श्री. भांडारकर व श्री. चंदावरकर यांनी 'प्रार्थना समाज' म्हणून त्याला वेगळी संज्ञा दिली. ही संज्ञा सर्व धर्मांना जवळ करते. कोणालाही दूर सारत नाही.

रा. ना. चव्हाण यांनी ही सर्वव्यापक भावना अनुभवली होती. वाईसारख्या धार्मिक दृष्टीने महत्त्वाच्या तीर्थक्षेत्री रा. ना. चव्हाण यांनी आपले स्थान पक्के केले होते. आणि वाईच्या नागरिकांमध्येही त्यांचे महत्त्व मान्य झाले होते.

धार्मिक तुलनात्मक विचार अत्यंत आवश्यक आहे. कारण मानव समाज फार जवळ आले आहेत. आधुनिक दळणवळणाची अत्यंत वेगवान साधने मनुष्यजातीला एकमेकांपासून जवळ आणतात. पूर्वीच दूरत्व केवळ भूतकाळाच्या आठवणी दूर ठेवते. वर्तमानकाळ हा दूर राहू देत नाही. अशा एका द्वंद्वामध्ये सगळी मनुष्यजात भूतकाळात सापडली आहे. भिन्न भिन्न धार्मिक समाज एकमेकांपासून कल्पनेने दूर आहेत. वस्तुस्थिती दूर नाहीत. त्यामुळे धार्मिक चिंतन हे अधिक गूढवादी झाले आहे.

धर्म हा तर्कशुद्ध विचारसरणीचा आदर करतो, परंतु विचारसरणीच्या मर्यादेत बांधला जात नाही. कारण ईश्वराचे स्वरूप कसे आहे, तो मूर्त आहे की अमूर्त आहे, याबद्दल तत्त्ववेत्त्यांमध्ये मतभेद कायम राहत. ईश्वरांची प्रतीकेही मूर्त आणि अमूर्त अशा दोन्ही प्रकारची आहेत. कारण प्रतीकांमुळेच ईश्वराचे चिंतन करता येते. आणि चिंतनामध्येच शांती अनुभवायला मिळते.

धर्माने नैतिक जीवन अधिक शुद्ध होते. नीतीची व्यापक जाणीव धर्मतत्त्वज्ञान करून देते. प्राणिमात्रांबद्दल आणि एकंदर सबंध विश्वाबद्दल गूढ सहानुभूती प्राप्त होते. प्राणिमात्रांबद्दल गूढ सहानुभूती नैतिक जीवन पद्धतीचे खरेखुरे अधिष्ठान आहे. रा. ना. चव्हाण हे एक 'तत्त्वचिंतक' असल्यामुळे त्यांना या धार्मिक जीवनाने चित्तशुद्धीचा अनुभव येत असे.

आम्ही दोघे प्रथम एकत्र आलो ते जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीला अधिक ताकद यावी या दृष्टीने. 'जोतिनिबंध' मी रा. ना. चव्हाण यांच्या विनंतीवरून लिहिला. ते माझे लेखक बनले, अशी वस्तुस्थिती आहे. या कामी त्यांचे मला मोलाचे साह्य झाले.

'जोतिनिबंध' लिहिण्याअगोदर महात्मा फुले यांच्या विचारसरणीवर माझी सलग व्याख्याने झाली. वाईतील सुशिक्षित समाज त्यांच्या सत्यशोधक चळवळीचे महत्त्व जाणू लागला. रा. ना. चव्हाण यांच्या या ब्राह्मो समाजात तत्कालीन अनेक धर्मसुधारक, समाजसुधारक भाषणे करून गेले, तेव्हापासून रा. ना. चव्हाण हे वाईमधील श्रेष्ठ नागरिक या नात्याने प्रतिष्ठा प्राप्त झालेले थोर पुरुष होते.

महाराष्ट्रातील अनेक आधुनिक सुशिक्षित ब्राह्मो समाजाकडे आकर्षिले. त्यात महादेव गोविंद रानडे यांचा समावेश आहे. त्यांनी ब्राह्मो समाजाची महती वाढविली. समाज सुधारणेकरिता उच्च दर्जाची ईश्वरभक्ती आवश्यक आहे; ही गोष्ट महादेव गोविंद रानडे यांच्या धर्मपर व्याख्यानातून व्यक्त होते. मराठी भाषेमध्ये व्यापक धर्मचिंतनपर विचार श्री. महादेव गोविंद रानडे यांनी व्यक्त केले आहेत. महादेव गोविंद रानडे यांना भारताच्या सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाचे श्रेष्ठ प्रवक्ते म्हणून स्थान होते. त्यामुळे त्यांच्या विचारांकडे धर्माच्या तत्त्वामानाच्या अभ्यासाचे साधन म्हणून लक्ष पुरविले पाहिजे. महाराष्ट्रात धर्माचे चिंतन ज्ञानेश्वरांपासून सुरू झाले. ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंत जो भक्तिसंप्रदाय महाराष्ट्रात सबंध समाजाला उदात्त धर्माची शिकवण देत होता; त्यांच्याशी महादेव गोविद रानडे यांनी ब्राह्मो समाजाचा घनिष्ठ संबंध स्थापन केला. ही गोष्ट आधुनिक जागतिक समाजाला निर्मितीला अत्यंत पोषक अशी आहे, कारण भागवत भक्ति संप्रदाय हा महाराष्ट्रात फार खोलवर दीर्घकाळापर्यंत पसरलेला आहे. आषाढी आणि कार्तिकेला पंढरपूर यात्रा पाहावी. त्या यात्रेत नागपूरपासून बेळगावपर्यंतचा ग्रामीण समाज आपल्या प्रतिनिधींच्या रूपाने सामील झालेला असतो. त्यांच्या दिंड्या भजनात दंग झालेल्या असतात. या दिंड्या शेकडो मैल पायी जात असत. आता शेकडो मैल नव्हे, तर काही मैल ते वाजतगाजत, भजन करीत सामुदायिक जथ्यांच्या रूपात चालत असतात. हे मोठे आनंददायी व उत्साहप्रद असे चित्र दरवर्षी पाहावयास मिळते. आमचे रा. ना. चव्हाण त्यात सामील झाले नाहीत; परंतु त्याबद्दल त्यांना विलक्षण आस्था होती. आणि हे मी जवळून अनुभवले आहे.

(दैनिक सकाळ १२-४-९३
शब्दांकन : बाबुराव शिंदे,
अक्षर श्रद्धांजली,
सौ. वैशाली रमेश चव्हाण.
रा. ना. चव्हाण फाउंडेशन, वाई,
१९९४, पृ. १०५-१०६)

○○○

समाजकारण

*

५५

‘भारतरत्न’ अण्णासाहेब कर्वे

दिनांक १८ एप्रिल, १९५८ ला श्री. धोंडो केशव ऊर्फ अण्णासाहेब कर्वे यांच्या आयुष्याची शंभर वर्षे पूर्ण झाली. शंभर वर्षे म्हणजेच माणसाचे पूर्णायुष्य, अशी परंपरागत प्रसिद्धी आहे. पूर्णायुष्य अण्णासाहेबांनी भोगले हे एक भाग्याचेच लक्षण आहे. परंतु त्यापेक्षाही अत्यंत दुर्लभ भाग्य म्हणजे शंभर वर्षे लोकवंद्य कृती करीत घालविली हे होय. “कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समा:” या ईषोपनिषदातील आदेशानुसार अण्णासाहेबांनी कर्तव्यकर्मे पार पाडीतच शंभर वर्षे पूर्ण केली, एवढेच नव्हे तर ह्या कर्तव्यांच्या योगाने भारतीय जीवनाला व भारतीय इतिहासाला सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने नवे वळण लावून दिले.

स्त्रिया व पुरुष यांचे समाजात व कुटुंबात समान अधिकार स्थापन करणे हे या नव्या मानवी युगाचे महत्त्वाचे कार्य आहे. उदारमतवादी मूल्यांची चळवळ ही दीडशे वर्षांपेक्षा अधिक जुनी असली तरी त्या मूल्यांची स्थापना सर्व देशातील व सर्व मानव समाजांतील सामाजिक संस्थांत अजून पूर्णपणे झाली नाही. ही उदारमतवादी मूल्ये म्हणजेच लोकशाहीची मूलतत्त्वे होत. उदारमतवादी चळवळीचा अजून संपूर्णपणे विजय व्हावयाचा आहे. भारतात या चळवळीचा प्रवेश ब्रिटिश राज्य स्थापनेनंतर नवीन शिक्षणपद्धतीचा प्रचार होऊ लागला तेव्हा झाला. या आंतरराष्ट्रीय चळवळीतील नैतिक प्रेरणा ही शाश्वत मानवी मूल्यांशी संबद्ध अशी प्रेरणा आहे. ती प्रेरणा भारतातील इंग्रजी विद्याविभूषितांच्या पहिल्या व दुसऱ्या पिढीतील काही थोड्या व्यक्तींत निर्माण झाली. राजा राममोहन राय, केशवचंद्र सेन, विद्यासागर, जोतिबा फुले, महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर इत्यादी व्यक्तींच्या जीवनाचा इतिहास म्हणजेच सामाजिक व धार्मिक सुधारणांचा इतिहास होय. ह्या इतिहासाचे एक महत्त्वाचें यश हे अण्णासाहेव कर्वे यांच्या महिला विद्यापीठाच्या स्थापनेच्या रूपाने मूर्तिमंत बनले आहे.

फार मोठा वैचारिक संग्राम या इतिहासात सुरू झाला. रूढिवादी जुन्या श्रद्धांच्या व

जुन्या पावित्र्याच्या मुळांना खिळखिळे करणारा हा विचारसंग्राम होता. स्त्रियांचे जीवन व पुरुषजीवन यांची मूलगामी मीमांसा या विचारसरणीचा एक महत्त्वाचा भाग बनला होता. त्या सर्व वैचारिक प्रक्षोभांतून जे नवनीत निघाले, त्याचे प्रत्यंतर कर्वे यांच्या महिला विद्यापीठाच्या रूपाने आता मिळत आहे. पुरुषांच्या व महिलांच्या समान हक्काच्या कल्पनेवरील एक महत्त्वाची टीका मान्य झाली, हे स्वतंत्र महिला विद्यापीठाच्या स्थापनेने सिद्ध झाले. स्त्रिया व पुरुष यांचे मानवी हक्क समान आहेत असे मान्य केले तरी त्यांची काही मूलभूत कर्तव्ये त्यांच्या शरीररचनेच्या व शरीर कार्याच्या भेदामुळे भिन्न पडतात; गृह हे स्त्रीचे महत्त्वाचे कर्तव्यक्षेत्र तर घराबाहेरचा समाज हे पुरुषांचे महत्त्वाचे कर्तव्यक्षेत्र होय, हा फरक मान्य केल्यामुळेच स्त्रिया व पुरुष यांच्या शिक्षणातील काही महत्त्वाचे विषय भिन्न ठरतात. म्हणून गृह शिक्षणापेक्षा भिन्न शिक्षणच स्त्रियांना अधिक उपयुक्त होय; हे तत्त्व मान्य केल्याचेच निदर्शन महिला विद्यापीठ हे होय. हा एक महत्त्वाचा वैचारिक समन्वय त्या विचार संग्रामातून निर्माण झाला.

विचारांची केवळ मीमांसा महान कृतीला जन्म देत नाही. मानवी समतेची स्थापना करणाऱ्या महात्म्याचा कृतीला विशुद्ध, उदार व खोल अशा भावनांची प्रेरणा लाभलेली असते. श्री. अण्णासाहेब कर्वे यांच्या ठिकाणीही अशी थोर भावना म्हणजे करुणावृत्ती वास करीत आहे; महिला विद्यापीठ हे जसे त्यांच्या शैक्षणिक विचार - समन्वयाचे प्रतीक आहे तसे अनाथ-महिलाश्रम ही संस्था त्यांच्या उदार व व्यापक अशा करुणेचे प्रतीक आहे. मानवव्यापी सहानुभूती हीच मानव्याच्या रक्षणाचे एकमेव साधन अशी शक्ती आहे. ती शक्ती मंदावली म्हणजे मानव्य लोपू लागते, ती शक्ती प्रदीप्त झाली म्हणजे मानव्य उच्छ्वास करू लागते. अण्णासाहेब म्हणजे मानव्याला जगविणाऱ्या व जागविणाऱ्या सहानुभूतीचा शंभर वर्षे तेवत राहिलेला नंदादीप होय.

श्री. अण्णासाहेब कर्वे यांच्या कार्याचा यथोचित गौरव गेल्या १८ तारखेस भारत सरकारने व भारतीय जनतेने केला. भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' ही पदवी देऊन कृतज्ञता व्यक्त केली. भारताचे प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांनी स्वतः मुंबईस येऊन ह्या शताब्दी समारंभात भाग घेऊन अत्यंत विनयाने स्तुति-सुमनांजली अर्पण केली, हे एक उचित असेच कर्तव्य केले. समाज सुधारणेच्या चळवळीने या शताब्दीच्या निमित्ताने प्रगतीच्या नव्या पायरीवर आरोहण केले असेच म्हटले पाहिजे. उपेक्षा, निंदा व अप्रतिष्ठा यांच्या विषारी वातावरणात प्रारंभिलेल्या कार्याला अभिनंदन व कृतज्ञता यांचा अमृतासारखा वर्षाव करणारा वर्षदिन उगवला, याबद्दल श्री. अण्णासाहेब कर्वे हे अनंत धन्यवादास पात्र झाले आहेत.

(नवभारत, मे, १९५८, पृ. ५१-५१)

○○○

५६

मानव्याचा सेवक व मानवी संस्कृतीचा तत्त्वज्ञः डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर

विषुववृत्तावरील आफ्रिकेच्या जंगलात रानटी निग्रोंची गेली ५२ वर्षे सेवा करण्यात ज्याने जन्म घालविला, तो जर्मन तत्त्वज्ञ डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर वयाच्या ९० व्या वर्षी गेल्या सप्टेंबरच्या ५ तारखेस आफ्रिकेतील स्वतःच्या रुग्णालयात ख्रिस्तवासी झाला. १४ जानेवारी, १८७५ साली अल्सेस प्रांतातील केसरबर्ग येथे श्वाइट्झरचा जन्म झाला. त्याला १९५२ साली शांततेचे नोबेल पारितोषिक मिळाले. तत्त्वज्ञान, धर्मविद्या, संगीत आणि वैद्यक या विषयांत तो पारंगत होता. एवढेच नव्हे तर या चारही विषयांत त्याने संशोधन करून नव्या उन्नत कल्पनांची व विचारांची भर घातली. "भारतीय विचारसरणी व तिचा विकास" या नावाचा भारतीय तत्त्वज्ञानाची समीक्षा करणारा त्याचा प्रबंध विश्वसंस्कृतीच्या तत्त्वसमीक्षेत भर घालणारा आहे. प्राचीन वैदिक कालापासून तो विवेकानंद, महात्मा गांधी, रवींद्रनाथ ठाकूर यांच्यापर्यंतच्या तत्त्वज्ञानाच्या विचारसरणीचे मंथन व मूल्यमापन या प्रबंधात केले आहे. पश्चिमी संगीतज्ञ जोहान सेबॅस्टिअन बाख (Bach) याचे जीवनचरित्र व त्याची वादनकला या विषयावर फ्रेंच भाषेत प्रथम ग्रंथ लिहिला व त्यामध्ये भर घातलेली त्याची नवी आवृत्ती जर्मन भाषेत त्याने लिहून नंतर प्रसिद्ध केली. हा ग्रंथ इतर अनेक युरोपियन भाषांमध्ये भाषांतरित झालेला आहे. जर्मन महाकवी गटे (Guethe) याच्या संबंधी श्वाइटझरचा "पाच" अध्ययने हा निबंध फार महत्त्वाचा मानला जातो. गटेच्या जीवनाचा श्वाइटझरच्या जीवनावर मोठा प्रभाव पडला होता असे या निबंधावरून दिसून येते. श्वाइटझरने लिहिलेल्या ग्रंथांची संपत्ती मोठी आहे. परंतु त्या सर्व संपत्तीमध्ये त्याचे मानवी संस्कृतीचे मनन, चिरंतन मूल्याचे आहे. मानवी संस्कृतीचा समतोल बिघडला असून तिचा ऱ्हास होत आहे. त्या ऱ्हासापासून तिचा बचाव करण्याकरता मानवी संस्कृतीचे पुनरुज्जीवन ज्या तत्त्वांच्या आधारे केले पाहिजे, त्याचे समालोचन त्याने आपल्या संस्कृतीविषयक दोन प्रबंधांमध्ये अधिक विस्ताराने केले आहे. मानवी संस्कृती पतन पावत आहे, अशी भयाविष्ट

भावना त्याच्या ठिकाणी व अनेक पश्चिमी तत्त्वचिंतकांच्या ठायी निर्माण होण्याचे एक प्रधान कारण पहिले जागतिक महायुद्ध होय.

डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर याने देवविद्या, तत्त्वज्ञान, संगीत व वैद्यक या चारही विद्यांमध्ये परिणतप्रज्ञ म्हणून जरी ख्याती मिळविली होती तरीही त्याची कामगिरी फावल्या वेळातील होती. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा अलौकिक महिमा म्हणजे दुःखित व पतित मानव्याची सेवा करण्याकरिता समर्पित केलेले त्याचे जीवन होय. पश्चिम युरोपातील उच्च संस्कृतीत वाढलेला, प्रतिभाशाली म्हणून विद्यापीठामध्ये मान्यता पावलेला हा माणूस वैभव, सुख आणि मान यांचा त्याग करून विषुववृत्तावरील मध्य आफ्रिकेतील ओगोवे नदीच्या तीरावर लॅम्बरिनी येथे रुग्णालय बांधून रानटी, गलिच्छ व महारोगपीडित माणसांची सेवा करण्यात धन्यता मानतो. पतन पावत असलेल्या व विनाशाकडे धावणाऱ्या मानवी संस्कृतीला वाचविण्याकरिता व कर्तव्यकर्माची दिशा दाखविणारा आदेश म्हणजेच हे डॉ. श्वाइट्झरचे जीवन होय. मानवाचे व्यक्तिमत्त्व व शील त्याच्या वर्तनातून निर्माण होते; त्याच्या प्रयत्नातील विविध अनुभव हे स्वभाव व शील घडवीत असतात; हा श्वाइट्झरचा सिद्धान्त त्याच्या स्वतःच्या जीवन पद्धतीत प्रकट झाला आहे.

"प्राचीन अरण्याच्या परिसरात" या ४५ वर्षांपूर्वी प्रथम साडेचार वर्षे घालविल्यानंतर लिहिलेल्या आपल्या आफ्रिकेतील अनुभवांच्या कथेच्या प्रारंभी श्वाइट्झर म्हणतो, "मध्य आफ्रिकेत रुग्णालय स्थापन करून वैद्यकीय सेवा करण्याकरिता मी ट्रॉसबर्ग विद्यापीठातील प्राध्यापकपद, साहित्यलेखन आणि वादन व्यवसाय वय वर्षे ३० च्या सुमारास सोडून दिला, हे कसे घडले? त्या आफ्रिकेतल्या जुनाट जंगलामधील मूळच्या रहिवासी जमाती भयंकर शारीरिक व्याधींनी ग्रासलेल्या असतात, असे मी वाचलेले होते. तेथे जाऊन आलेल्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांकडूनही या माहितीस दुजोरा मिळत होता. आम्ही युरोपियन लोक त्या दूरच्या प्रदेशावर अनेक शतके वर्चस्व गाजवीत आहोत; तेथील मानवांना राबवून वैभव संपादन करीत आहोत. आम्ही स्वतःला ख्रिस्ताचे अनुयायी समजतो. आफ्रिका खंडात आम्ही प्रवेश करून त्यावर आमची अधिसत्ता स्थापन केली. तेथील काळ्या लोकांशी आम्हा गोऱ्या लोकांचे कशा प्रकारचे वर्तन आहे? त्या जमाती नष्ट झाल्या, नष्ट होत आहेत व काही मरणोन्मुख झाल्या आहेत. सर्व काळ्या लोकांची खच्ची होत आहे; आणि हे कशाने घडत आहे. तर आम्ही त्या खंडात प्रवेश केला म्हणून. या साध्या गोष्टीचा काय अर्थ? युरोपियन लोक अन्याय व क्रूर कर्मे शतकानुशतके करीत आले आहेत, याची करुणकथा कोण सांगू शकेल? आम्ही ख्रिस्ताच्या अनुयायांनी जळती पेये व मृत्युपंथाला नेणारे भयंकर रोग त्यांना दिले व त्यापासून त्यांची जी दुर्दशा झाली याचे मोजमाप कोणी काढू शकेल काय? गोरे मानववंश व काळे मानववंश यांचा संबंध घडून आल्यापासून आतापर्यंत जे जे काही घडले, त्याची कथा जर तपशीलवार लिहिली गेली तर ती कथा आमच्यापैकी

कोणीही न वाचता मिटवून ठेवील इतकी ती हृदयविदारक व भयानक कथा आहे.''

''आपण व आपली संस्कृती यांच्यावर मोठ्या ऋणाचा भार आहे. या लोकांवर आपण उपकार करावयाचे की नाही यासंबंधी आपणास स्वातंत्र्य मुळीच नाही; ते आपले कर्तव्य आहे, त्यात आपले औदार्य नसून ते एक कृतकर्माचे प्रायश्चित्त आहे. आपण आपल्या शक्तीप्रमाणे जी काही सेवा करू तेवढ्याने हे प्रायश्चित्त पुरे होणारे नाही. आपण केलेल्या महापातकाची निष्कृती सहस्रांशानेही होणार नाही. येथील दुःखनिवारणाकरिता जे काही करावयाचे त्याचा ही जाणीव पाया होय.''

''गेल्या ४॥ वर्षांच्या (इ. स. १९१३-१८) अनुभवाचे सार कसे सांगावे? विद्या आणि कला यांच्या जगामधून मी या प्राचीन जंगलाकडे ज्या विचारांनी ओढलो गेलो, ते विचार या अनुभवाने खरे ठरले. माझे मित्र पूर्वी मला तिकडे जाऊ नकोस अस सांगताना असे म्हणाले की, निसर्गाच्या उत्संगावर जगणारे ते लोक आपल्याइतके व्यथित नाहीत व त्यापासून इतक्या दुःखाची जाणीवही त्यांना होत नाही. परंतु मला अशी खात्री झाली आहे की ते त्यांचे म्हणणे खरे नव्हते. आपणास युरोपमध्ये माहीत असलेले सगळे रोग येथे पसरले आहेत. ते भयंकर रोग येथे आपण आणले आहेत. त्या रोगांच्या वेदना आपणापेक्षा येथे अधिक दुरवस्था निर्माण करीत आहेत. हे निसर्गाचे बालक माणसासारखे माणूस आहे. त्यामुळे भयंकर यातना या बालकाला अधिक भेडसावीत आहेत. शारीरिक दुःखांनी येथे सगळीकडे छळ मांडला आहे. आपली वृत्तपत्रे याची उपेक्षा करून मौन धारण करतात. आपण तिकडे कानाडोळा करतो. हे न्याय्य आहे काय? आपण सुसंस्कृत लोक खरे बिघडलेले आहोत. आपल्यापैकी कोणी जर आजारी पडले तर डॉक्टर लगेच धावत येतो. शस्त्रक्रियेची आवश्यकता दिसली तर रुग्णालयाचे द्वार त्वरित उघडले जाते. उलट इकडे लाखो आणि करोडो लोक असहाय व निराश होऊन निपचित पडलेले असतात. वैद्यक विज्ञानाच्या योगाने ज्या भयंकर यातना सहज दूर होऊ शकतात, त्या येथील हजारो माणसांना प्रतिदिन सहन केल्याशिवाय इलाज नसतो. प्रतिदिनी जी निराशा दूरच्या अंतरावरील या झोपड्यांना वेढून बसली आहे, ती आपण सहज संपुष्टात आणू शकू. आपल्यापैकी कोणीही १० वर्षे कोणतीही वैद्यकीय मदत मिळाली नाही अशा कुटुंबातील आहोत अशी कल्पना तरी करू शकतो काय? आपली ही डोळ्यावरील झापड नष्ट करून आपल्यावरील ही जबाबदारी पार पाडण्यास उद्युक्त व्हावयास पाहिजे.''

''काळ्या आजारी लोकांची सेवा करण्यात आयुष्य झिजविणे हे माझ्या जीवनाचे इतिकर्तव्य होय. हे केवळ सत्कर्म नव्हे. जे टाळणे अयोग्य व अशक्य आहे असे हे मुख्य कर्तव्य आहे. ख्रिस्त आणि धर्म ज्या करुणेला आवाहन देतात, आपल्या मूलभूत कल्पना व तर्कशास्त्रे ज्या करुणेचे समर्थन करतात, ती करुणा आपल्या ठिकाणी जागृत व्हावी असे मी इच्छितो.''

"४॥ वर्षे ओगोवे नदीच्या काठी असलेल्या लँबरिनी या खेडेगावात मी काम केले. या ठिकाणी पावसाळ्यामध्ये फार उकाडा होतो. विषुववृत्तावरील जास्तीत जास्त उन्हाळ्याचे हे ठिकाण आहे. उन्हाळ्यामध्ये आम्ही समुद्रकिनाऱ्यावर काही महिने काढतो. ओगोवे नदीच्या मुखाशी केप लोपेजपासून दोन तासांच्या अंतरावर इमारती लाकडाचा व्यापार करणाऱ्या गोऱ्या माणसाचे एक घर होते. ते त्याने आम्हाला विनामूल्य राहावयास दिले. त्याचे हे औदार्य आम्ही कधीही विसरणार नाही. आमचे तेथे मुख्य अन्न म्हणजे समुद्रात पकडलेले मासे. येथे हेरिंग मासे अतोनात मिळतात. या वेळी लाकडाचा व्यापार मंदावून स्थगित झाला होता. या घराच्या भोवताली या गोऱ्या माणसाच्या कामगारांच्या झोपड्या होत्या. त्या आता मोडकळीस आल्या आहेत. वाटेने जाणारे येणारे निग्रो वाटसरू येथे विश्रांती व झोप घेत असत. मी येथे राहायला आल्यावर त्या दिवशी तेथे कोणी राहते की काय हे समजण्याकरिता मोठ्याने हाका मारू लागलो. कोणीही साद दिली नाही. सगळीकडे सामसूम दिसली. सहज एका झोपडीत शिरलो, एक मनुष्य जमिनीवर पडलेला, त्याचे डोके वाळूत रुतलेले व त्याच्या अंगावर मुंग्या तरतरत चाललेल्या होत्या. तो निद्रा-रोगाने पछाडलेला होता त्यामुळे त्याच्या सोबत्यांना त्याला बरोबर नेणे अशक्य झाल्यामुळे ते तेथेच सोडून गेले असावे. त्याचा श्वास चालू होता. त्या असहाय स्थितीतल्या माणसाला मी तपासू लागलो. झोपडीच्या दारातून बाहेरचेही दृश्य मला दिसत होते. हिरव्या निळ्या प्रचंड वनश्रीच्या परिसरात लांबवर पसरलेल्या उपसागराचे चमकदार निळे पाणी आणि त्या पाण्यावर मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणांचा पूर पसरलेला होता. निसर्गसौंदर्याच्या जादूने भारलेले, नयनात भरणारे ते नंदनवन आणि त्या नंदनवनातील निराधार व निराश असा दुर्दशेत सापडलेला माणूस. या दोन्ही गोष्टी एकाच दृष्टिक्षेपात सामावलेल्या होत्या. या दृश्याने मी भारावून गेलो. ही स्थिती म्हणजेच आफ्रिका होय. हेच आफ्रिकेचे प्रतीक!"

डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर याने रामदास स्वामींच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे तारुण्यकाळीच अरण्यवास पत्करला. परंतु हा अरण्यवास रामदास स्वामींच्या जीवनाच्या भारतीय तत्त्वज्ञानाच्या आदर्शानुसार नव्हता. सर्व संकल्प विकल्पांचा निरास करून ऐहिक जीवनाचे व विश्वाचे मिथ्यात्व अंगी बाणवून निर्गुण व शाश्वत चैतन्यामध्ये निर्विकल्प समाधी लावून बसण्याकरिता नव्हता. हा अरण्यवास ऐहिक जग व जीवन हे सत्य असून जग व जीवन बदलण्याकरिता, सुधारण्याकरिता व मंगलमय बनविण्याकरिता भगीरथ प्रयत्न करणे हा त्याचा उद्देश होता. ही भारतीय, अध्यात्मवादाशी सुसंगत नसलेली आणि येशू ख्रिस्ताच्या जीवनातून मिळालेली प्रेरणा होती. करुणामय परमात्मा हेच नैतिक जीवनाच्या प्रामाण्याने सिद्ध होणारे पारमार्थिक सत्य आहे. या सत्यावरील श्रद्धा हा ज्याचा गाभा आहे, तो मानवी समाजातील उच्चतम धर्म होय. असा उच्चतम धर्म जगात एकच आहे. तो म्हणजे ख्रिस्ताचा धर्म होय. सुमारे गेली दोन हजार वर्षे ज्याचा इतिहास घडत आहे तो ख्रिश्चन धर्म म्हणजे हा

धर्म नव्हे. ऐतिहासिक ख्रिश्चन धर्मात अनेक दोष आहेत. जगातील सर्वच धर्मांत कमीअधिक प्रमाणात तसे दोष आहेत. म्हणून असे म्हणता येते की जगातील धर्म हे दुबळे आहेत. कारण धर्म दुबळा असल्यामुळे युद्धसंस्था हजारो वर्षे प्रबळ राहिली आहे. परंपरागत ख्रिश्चन धर्म किंवा जगातील इतर सर्व धर्म करुणामय ईश्वरी सत्यापासून दुरावलेले आहेत. असा धर्मविषयक विचार डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर याने धर्ममीमांसेत व संस्कृती मीमांसेत प्रामुख्याने मांडला आहे. प्रेमस्वरूप सान्निध्य आणि तादात्म्य दुःखित जिवांच्या सेवेतच आणि मानवी जीवनाच्या भौतिक व आध्यात्मिक सुधारणेतच अनुभविता येते. जो वैद्य क्लोरोफॉर्मसारखे औषध वापरून रोगपरिहारक सुरी चालवितो, आणि जिवाला दुःखमुक्त करतो तो मोक्ष आणि ईश्वरी राज्य यांचा भागीदार होतो असा एक धर्मसिद्धान्त डॉ. श्वाइट्झर याने मांडला व आचरणात आणला.

मानवी संस्कृतीचे तत्त्वज्ञान

विद्यमान मानवी संस्कृतीची मीमांसा ही डॉ. श्वाइट्झरची मौलिक देणगी होय. मानव समाजाचे या विश्वातील व्यवहार हे त्याच्या विचारविश्वाचे निदर्शक असतात, म्हणून विचारविश्व तपासत असताना विश्वातील व्यवहारही तपासले पाहिजेत, असे सांगून तो म्हणतो- विश्वविचाराचा प्रभाव मानव जसे राहतात व जसे वर्ततात त्यावर पडलेला असतो. या विचारविश्वाच्या जीवनदृष्टी व विश्वदृष्टी अशा दोन बाजू असतात. अनेक तत्त्ववेत्ते विश्वाची तात्त्विक मीमांसा सांगून त्याच्या आधारावर आपल्या जीवनदृष्टीची मीमांसा करतात. वस्तुतः या मीमांसेचा क्रम उलटा असावयास पाहिजे. जीवनदृष्टी व विश्वदृष्टी यामध्ये जीवनदृष्टी ही प्रधान होय, आणि विश्वदृष्टी हे तिचे कार्य होय. जीवनार्थ प्रेरणा (Will-to-Live) हीच जीवनदृष्टी व विश्वदृष्टी यांचे मूळ होय. सर्व प्रकारचे ज्ञान जीवनार्थ प्रेरणेचेच आविष्कार होत. आजपर्यंत पाश्चात्त्य व भारतीय हे दोन्ही या मूलभूत प्रेरणेचा व सत्याचा महिमा लक्षात न घेता जीवनदर्शन व विश्वदर्शन यांची रचना करीत राहिले आहेत. विश्वज्ञान जीवनदृष्टीचा अभिप्राय निश्चित करण्यास समर्थ नाही. इच्छाशक्ती हीच त्याचा अर्थ निश्चित करू शकते. जीवनार्थ प्रेरणेत इच्छाशक्ती ही अंतर्भूत होते. निसर्गात सर्जनशक्तीच्या रूपाने शाश्वत चैतन्याची प्रतीती व भेट होत असते. आपल्या जीवनार्थ प्रेरणेत हीच सर्जनशक्ती इच्छाशक्तीच्या रूपाने अनुभवावयास मिळते. विश्व व जीवन यांच्या अस्तित्वाची किंवा सत्तेची हमी आणि नीतिशास्त्र या इच्छाशक्तीतून निष्पन्न होते. जीवनार्थ प्रेरणेचे तार्किक पृथक्करण करू लागले म्हणजे आपला विश्वाशी असलेला संबंध आपोआप सिद्ध होतो. इच्छाशक्तीचे आकलन विचार रूपाने करून पाहा, म्हणजे त्या इच्छाशक्तीचे आलंबन किंवा विषय विश्व होय, असा अर्थ त्यातून निघतो. अशा रीतीने जीवनदृष्टीचे विश्वदृष्टी हे कार्य ठरते.

जगातील विद्यमान धर्म व विविध मानवी संस्कृती यांचे चिंतन व समीक्षण करून मनुष्याच्या सांस्कृतिक जीवनाचे मूलभूत सिद्धान्त नव्या परिभाषेने नव्या स्वरूपात

मांडण्याचा एक यशस्वी प्रयत्न श्वाइट्झरने केला आहे. गटेच्या चरित्राचे व साहित्याचे यथार्थ दर्शन व तात्त्विक मूल्यमापन करणाऱ्यांमध्ये श्वाइट्झरला उच्चतम मानाचे स्थान मिळाले आहे. गटेच्या जीवनाचा व साहित्याचा खोल प्रभाव त्याच्यावर पडला होता. वैज्ञानिक सत्याचे उत्कृष्ट समर्थन गटेने केले आहे. गटे एकदा असे म्हणाला की, पृथ्वी गोल असून सूर्याभोवती फिरते हा शोध बायबलपेक्षाही अधिक मोलाचा आहे. परंपरागत श्रद्धा आणि पवित्र धर्मग्रंथ यांना वैज्ञानिक सत्यापुढे बाजूला सारण्याचे धैर्य पश्चिमी संस्कृतीमध्ये किती खोल प्रभावी रीतीने निर्माण झाले होते व ते निर्माण करणाऱ्यांमध्ये गटेसारख्या विचारवंत व अद्वितीय साहित्यकार यांचा हात होता हे यावरून दिसते. श्वाइटझर खरा ख्रिश्चन होता, परंतु ऐतिहासिक ख्रिस्ताच्या दृष्टिकोनाचे मर्यादित महत्त्व त्याला मान्य होते. मनुष्यजातीवरील विशेषतः दुःखित मानवावरील अमर्याद प्रेम व करुणा हाच ख्रिस्ताच्या जीवनाचा गाभा असून ते विधायक, सक्रिय व विश्वव्यापी प्रेम हेच ख्रिश्चन धर्मातील नैतिक परमसत्य होय, असा श्वाइट्झरने काढलेला ख्रिस्तविषयक विचारांचा निष्कर्ष होय. या मूलभूत निष्कर्षाचे समर्थन करणारी विश्वाची, जीवनाची, संस्कृतीची व नीतीची तात्त्विक मीमांसा श्वाइट्झरने मांडली आहे. ही मांडत असताना सत्यसंशोधनाची प्रेरणा त्याने शुद्ध बुद्धीने व निर्भयपणे मांडली. आपल्या आत्मचरित्रपर निबंधात तो म्हणतो, "अध्यात्माचे मौलिक स्वरूप सत्य हे आहे आणि प्रत्येक प्राप्त नवे सत्य म्हणजे नवा विजयच होय. इतिहास किंवा ज्ञानाचे इतर क्षेत्र यात सत्याचे शुद्ध मूल्यच स्वीकार्य ठरते. धर्मसंस्थेला प्रथम प्रथम ते मानवत नाही; पण त्याच्या स्वीकारात कसलाही धोका नसतो, अधिक गांभीर्यच त्यामुळे लाभते. ऐतिहासिक सत्याशी धर्माने जुळतेच घेतले पाहिजे. सत्य विकत घ्यावे विकू नये." श्वाइट्झरने नव्या मूलभूत कल्पना व नव्या परिभाषा निर्माण केल्या आहेत व त्यात तात्त्विक विचार गुंफले आहेत. जीवनार्थ प्रेरणा (Will-to-Live), विश्व व जीवन-यांच्या अस्तित्वाचे समर्थन (World-and Life Affirmation), विश्व व जीवन यांचे निरसन (World-and Life-negation) आणि जीवनाची पूजनीयता (Reverence for Life) या शब्दावलींचा त्याच्या संस्कृती (Civilization) मीमांसेमध्ये वारंवार प्रयोग त्याने केलेला दिसतो. या मीमांसेचे सूत्ररूपाने सार असे सांगता येतेः- जीवनार्थ प्रेरणा हेच जीवात्म्याचे किंवा 'मी'चे स्वरूप होय. या प्रेरणेच्या अनुभवातूनच विश्व व जीवन यांच्या अस्तित्वाचा निर्धार निर्माण होतो. विश्वविषयक विचार तर्कबुद्धीने करीत असता अखेरीस त्यातून विश्वविषयक निश्चयात्मक तत्त्वज्ञान निष्पन्न होत नाही; अज्ञेयवादात त्याचे पर्यवसान होते. या अज्ञेयवादालाही भिऊन चालत नाही. बुद्धिवादाच्या पातळीवर त्याला मान्यता द्यावी लागते. विश्व व जीवन यांच्या सत्तेचा निश्चय जीवनार्थ प्रेरणेच्या द्वारेच करावा लागतो. माझ्या जीवनाचे नैतिक उद्दिष्ट जीवनातच सामावलेले असते. जीवनाची पूजनीयता हा नीतिशास्त्राचा मूलभूत सिद्धान्त आहे. हा जीवनाच्या पूजनीयतेचा निर्णय अतर्क-सिद्ध आहे. अतर्क-सिद्ध परंतु अनुभवाश्रित

निर्णयाचा आधार घेतल्याशिवाय तर्काला वा बुद्धिवादाला गत्यंतर नसते. जीवनाच्या पूजनीयतेचा निर्णय हा अमर्याद व सर्व पातळीवरील जीवजातींना व्यापणारा असतो. सर्व मानव, अन्य प्राणिमात्र व वनस्पती सृष्टी या सर्वांमध्ये पूजनीयतेचा अनुभव हेच नीतिशास्त्राचे रहस्य होय. विश्वव्यापी जीवनाची पूजनीयता हा नैतिक निष्कर्ष जीवनार्थ प्रेरणेतून साक्षातपणे निष्पन्न होतो. हाच जीवनाचा अर्थ व परमार्थ आहे, व सर्व मूल्यांचे उगमस्थान आहे. आध्यात्मिक गूढानुभवाला तार्किक स्वरूप देण्याचा प्रयत्न हिंदू, बौद्ध इत्यादी पूर्वेकडील धर्मांनी केला आहे. ज्या आध्यात्मिक गूढानुभवाला तार्किक नव्हे तर नैतिक स्वरूप येते, तोच जिवंत अनुभव होय. असा जिवंत आध्यात्मिक अनुभव ख्रिस्ताच्या धर्माचा आधार होय. आज जगातील इतर धर्म यांच्यामध्ये ही नैतिक धारणा प्रभाव गाजवीत नसल्यामुळे ते धर्म दुबळे राहिले आहेत. धर्म दुबळा आहे म्हणूनच युद्धसंस्था प्रबळ झाली आहे. मानवी संस्कृतीचा अधःपात होत आहे, मग ती युरोपातील, अमेरिकेतील, भारतातील, चीनमधील वा पश्चिम आशियातील असो.

विश्व आणि जीवन यांच्या अस्तित्वाचा निश्चय वा निर्धार हा या नीतिशास्त्राचाच एक परिणाम आहे. नैतिक हित वा पुण्य म्हणजे जीवनाचे रक्षण, संवर्धन आणि विकसन होय; आणि अहित वा पाप म्हणजे जीवनाची हिंसा, क्षती किंवा संकुचितता होय... माझे जीवन दुसऱ्याच्या जीवनाच्या रक्षणार्थ, संवर्धनार्थ व विकासार्थ जेव्हा यत्नशील असते तेव्हा विश्वाच्या अस्तित्वाचा निश्चय दृढमूल होतो. विश्वाचा अर्थ काय आहे हे जरी मला समजले नाही तरी अपरिहार्यपणे नैतिक वर्तनातन मूल्यनिर्मिती होत असते.

विश्व व जीवन यांचे निरसन करणारी म्हणजे त्याला मायामय ठरविणारी भारतीय तत्त्वज्ञानातील मुख्य विचारसरणी आहे. ही विचारसरणी जीवनार्थ प्रेरणेला दुर्बळ करते कारण ती निवृत्तिवादाचा महिमा गाते. विश्वव्यापी करुणेला किंवा प्रेमाला केवळ निष्क्रिय सहानुभूतीचे स्वरूप देते. ख्रिश्चन धर्मामध्येदेखील प्रथमपासून विश्व व जीवन निरसनाची विचारसरणी निर्माण झालेली दिसते. परंतु गेली काही शतके पश्चिमी संस्कृतीमध्ये विश्व व जीवन यांच्या अस्तित्वाचा निर्धार प्रकट होण्याचे कारण ख्रिस्तामध्ये सक्रिय व विधायक प्रेमाचे व करुणेचे उच्च आवाहन मुळात होते, हे होय; त्याच्यातून ऐहिक प्रगतीच्या पराक्रमालाही सामर्थ्य मिळाले. जगातील सर्वच संस्कृतींची रचना विश्वाच्या व जीवनाच्या अस्तित्वाच्या निर्धारावर झालेली असते. प्रगतीकरिता (Progress) प्रयत्न संस्कृतीची रचना करीत असतात. श्वाइट्झरने संस्कृती म्हणजे काय याची समर्पक व्याख्या सांगितली आहे, ती अशी- ''लोकांनी व व्यक्तिशः माणसांनी प्रत्येक दृष्टिकोनाच्या संदर्भात आणि प्रत्येक कर्मक्षेत्रात केलेल्या प्रगतीची गोळाबेरीज म्हणजे संस्कृती होय. ही प्रगतीची गोळाबेरीज व्यक्तींच्या आध्यात्मिक पूर्णतेला म्हणजे प्रगतीच्या प्रगतीला मदत करते, म्हणूनच ही प्रगती पूर्ण अर्थाने संस्कृती ठरते. ''माणसांच्या आणि समाजाच्या किंबहुना सर्व मानवजातीच्या

परिस्थितीत सुधारणा करण्याचे प्रयत्न, इच्छा आणि आशा अशा आशावादी तत्त्वज्ञानाच्या योगाने निर्माण होऊ शकते. धार्मिक, आर्थिक आणि अन्य प्रकारच्या व्यावहारिक संघटना आणि संस्था यांची अंतिम परिणती म्हणजे मानवी चैतन्याने निसर्गशक्तीवर मिळवलेला विजय होय. जोपर्यंत हा विजय भौतिक प्रगतीस महत्त्व देतो, परंतु आध्यात्मिक प्रगतीस गौण लेखतो तोपर्यंत संस्कृतीला अधःपाताचे व विनाशाचे भय राहते. ज्या प्रमाणात किंवा अनुपातात भौतिक बाजू प्रगत होते त्याच प्रमाणात किंवा अनुपातात आध्यात्मिक प्रगतीही व्हावयास पाहिजे. नाहीतर महासागरातील सुकाणू ढिला झालेल्या नौकेस विनाशाचे भय असते तसेच संस्कृतीलाही असते.

श्वाइट्झरच्या जीवनाची रूपरेषा

डॉ. अल्बर्ट श्वाइट्झरचे आयुष्य दुःखित, व्यथित व पतित, रानटीपणाच्या अज्ञानतमात युगानुयुगे रुतलेल्या व गुलामगिरीत पिचत असलेल्या विषुववृतावरील काळ्या मानवांच्या दुःखविमोचनार्थ ५२ वर्ष व्यतीत झाले. त्याने वयाच्या ८ व्या वर्षीच वादन संगीताच्या अभ्यासास सुरुवात केली. १८ व्या वर्षी पॅरिस येथील सुप्रसिद्ध संगीततज्ज्ञ विडोर (Widor) याच्या हाताखाली तो वादननिपुण बनला; ट्रासबर्ग विद्यापीठात ४ वर्षे देवविद्या, तत्त्वज्ञान आणि संगीताचे तत्त्वज्ञान यांचे अध्ययन केले. त्याच वेळी त्याचा एक वादन संगीताचा गुरू युजीन मंच याचे चरित्र त्याने फ्रेंचमध्ये लिहिले. नंतर त्याच सुमारास एक वर्षपर्यंत लष्करात नोकरी केली. वयाच्या २२ व्या वर्षी १८९७ मध्ये श्लाएरमाखर या जर्मन धर्मशास्त्रज्ञाने लिहिलेल्या ख्रिस्ताच्या अंतिम भोजनासंबंधी विचारावर लूथर, झिवंगली आणि कॅलव्हिन यांच्या विचारांशी तुलना करणारा निबंध लिहिला. १९९८ साली म्हणजे वयाच्या २३ व्या वर्षी खिश्चन धर्माच्या इतिहासावर लेख लिहून परीक्षा उत्तीर्ण झाला. वयाच्या २४ व्या वर्षी काण्टच्या सर्व ग्रंथांचे अध्ययन केले व त्याच वर्षी- विंल्डेलबाण्ड आणि झिंग्लर यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रासबर्गची पीएच. डी. तत्त्वज्ञान विषयात संपादन केली. त्याच वर्षी काण्टचे धार्मिक तत्त्वज्ञान बुद्धी आणि धर्म या विषयावर ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. १९०१ साली धर्ममहाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती झाली व त्याच वर्षी ईश्वरी राज्याची गूढता यावर पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. वयाच्या ३०व्या वर्षी १४ जानेवारी १९०५ ला म्हणजे स्वतःच्या वाढदिवसाला जीवनातील उच्चतम कर्तव्याचा निर्णय घेतला. विषुववृत्ताच्या आफ्रिकेत जाऊन डॉक्टर म्हणून काळ्या लोकांची सेवा करण्याचे ठरविले. व त्याकरिता पाश्चात्त्य वैद्यकाचे अध्ययन केले. या अध्ययनाच्या कालावधीत पश्चिमी संगीतसंशोधक व कवि जे. एस. बाख याच्यावर फ्रेंचमध्ये व ख्रिस्ताच्या चरित्रावर संशोधनात्मक प्रबंध जर्मन भाषेत लिहिला. १९०९ साली व्हिएन्ना येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय संगीत समाजाच्या तिसऱ्या काँग्रेसमध्ये भाषण दिले आणि वादन संगीताची आंतरराष्ट्रीय नियमधारा तयार केली. १९११ साली म्युनिक येथे साजऱ्या झालेल्या फ्रेंच संगीताच्या महोत्सवात

समूहवादनात भाग घेतला व त्याच वर्षी वैद्यकाची परीक्षा उत्तीर्ण झाला. १९१२ साली हेलन ब्रेसली या महिलेशी लग्न झाले. २६ मार्च १९१३ ला सपत्नीक आफ्रिका प्रयाण करून लँबरिनी या गावी रुग्णालय स्थापन केले. १९१३ ते १९६५ पर्यंतचे आयुष्य प्रामुख्याने याच स्थानी दुःखितांच्या सेवेत घालवीत, युरोपमध्ये मधूनमधून येणे जाणे होते. तेव्हा अनेक संशोधन संस्था आणि विद्यापीठ यांच्यामध्ये व्याख्यानमाला गुंफून मिळालेली सर्व रक्कम रुग्णालयाकरिताच खर्च केली. धर्म, संस्कृती, इतिहास व कला या विषयांवर फ्रेंच व जर्मन भाषेत लिहिलेल्या पुस्तकांपासून होणारी प्राप्तीही याच कार्यात खर्च केली. १९५४ साली शांततेचे नोबेल पारितोषिक मिळाले. तेही सुमारे सव्वा लाख रुपये महारोग्याचे रुग्णालय बांधण्याकरिता खर्च केले.

आफ्रिकेतील गलिच्छ, रानटी, काळ्या लोकांत सेवा करीत असताना कित्येक वेळा त्यांचा अडाणीपणा आणि मौर्ख्य पाहून श्वाइटझरला उबगही येत असे. एकदा असे झाले की, वैतागून खुर्चीत त्याने अंग टाकले होते. "या जंगली लोकांच्या सहवासात राहण्याचा हा माझा उद्योग माझ्या अस्सल निर्बुद्धपणाचा पुरावा होय," असे उद्गार अचानक बाहेर पडले. जवळच एक निग्रो द्वाररक्षक उभा होता. त्याने श्वाइट्झरला उत्तर दिले, ''या निग्रोंच्या जगात राहणारा निर्बुद्ध तू स्वर्गात स्थान मिळविले आहेस!"

डॉ. अल्बर्ट श्वाइट्झरचे काही महत्त्वाचे निबंध व प्रबंध

1. **On the Edge of the Primeval Forest and the Forest Hospital,** at Lambarene. Both translated by C. T. Campion. Combined in one volume. New York: The Macmillan Company, 1948.
2. **Out of My life and Thought,** Translated by C. T. Campion, New York: Henry Holt and company, 1948.
3. **My First Organ Teacher,** Eugene Munch, 1857-1888.
4. **Goethe: Four Studies**, Translated by Charles R. Joy. Boston] The Beacon Press, 1949.
5. **Christianity and the Religions of the World**, Translated by Joanna Powers. New York: Henry Holt and Company, 1939.
6. **The mystery of the kingdom of God**, Translated by Walter Lowrie. New York Dodd, Mead & Company, 1914.
7. **The Quest of the Historical Jesus**, A Critical study of Its progress from Reimarus to Wrede. Translated by W. Mont gomery. New York: The Macmillan Company, 1945.
8. **Civilization and Ethics**, Being Part II of the Philosophy of

Civilization. Translated by C. T. Campion. New York: The Mac millan Company, 1929.

9. **The Decay and Restoration of Civilization**, Translated by C. T. Campion. Now York The Macmillan Company, 1932.
10. **Indian Thought and Its Development**, Translated by Mrs. C. E. B. Russell. New York Henry Holt and Company 1936.
11. **Johann Sebastian Bach**, Translated by Ernest Newman. London A. and C. Black, 1938.
12. **The Animal World of Albert Schweitzer**, Translated and edited by Charles R. Joy. Boston The Beacon Press, 1950.
13 **The Wit and Wisdom of Albert Schweitzer,** A Book of epigrams compiled with on introduction by Charles R. Joy. Boston The Beacon Press, 1949.

(नवभारत, ऑक्टोबर, १९६५, पृ. १ ते ७)

❍❍❍

५७

विश्वधर्माचा प्रज्ञावंत प्रवक्ता: कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे (जन्म दि. २३ एप्रिल) यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे. त्यांचे कार्य आणि विचार यांचा सखोल परामर्श या शताब्दीच्या निमित्ताने घेणे आवश्यक आहे. समाजाचे मौलिक परिवर्तन घडविणारा विचार, नवा इतिहास घडविण्याचा प्रयत्न किंवा नवा धर्म, नवा ध्येयवाद, नवे विज्ञान किंवा नवी विचारसरणी यांचा प्रारंभ बहुधा सामुदायिक रीतीने घडत नसतो. एखादी चिंतनशील व स्फूर्तिमान व्यक्तीच पुढे येते व प्रथम प्रारंभ करते. इतिहासाला नवे वळण देण्याचे हे कार्य असते. महात्मा गांधींच्याबाबतीत एक उक्ती प्रसिद्ध आहे. ती म्हणजे, 'एकला चलो रे'. वस्तुत: महात्मा गांधींनी सत्याग्रहाचा नवा मार्ग दाखविण्याकरिता एकट्यानेच नवे पाऊल टाकले असले तरी पहिले पाऊल टाकताच, त्यांच्यामागे प्रचंड मानवसमूहांचे प्रवाह वाहू लागले.

नव्या सत्याच्या शोधाकरिता व दर्शनाकरिता एकटीच निघालेली माणसं इतिहासात दिसतात. विज्ञानात गॅलिलिओ व ब्रुनो, धर्म इतिहासात ख्रिस्त, सामाजिक क्रांतीत कार्ल मार्क्स, भारतातील धर्मसुधारकांत राम मोहन रॉय व सामाजिक सुधारकांत महात्मा फुले व गोपाळ गणेश आगरकर ही अशी माणसं आहेत. लोक आपल्याबरोबर येतात की नाही असा विचारच असे महात्मे करीत नाहीत. यांना एखादे नवे सत्य तेजस्वी ताऱ्याप्रमाणे चमकत असलेले प्रत्ययास येते. त्याचा यांना विलक्षण ओढा लागतो व त्याकडे त्यांची पावले दुर्दम्य उत्साहाने पडू लागतात.

एकला चलो रे

'एकला चलो रे' याचे महाराष्ट्रातील कर्मवीर शिंदे हेही एक उत्कष्ट उदाहरण आहे. बरोबर कोणी येवो वा न येवो, याची फिकीर नाही. अशा निश्चयवान दलित सेवकांची संस्था त्यांनी स्थापन केली. त्याकरिता अपरिमित कष्ट केले आणि ते कष्ट करीत असताना आयुष्याची संध्याकाळ दिसू लागली. तेव्हा त्यांनी उद्गार काढले की, ''अस्पृश्यतेचा छडा

लावण्यात निवारण्याचा भाग तर राहू द्या, मला स्वतःला जो जन्मभर अनुभव आला आणि आनंद झाला, तो लक्षात होता, मला आणखी जन्म मिळाले तरी ते याच बांधवांत आणि सेवाशुश्रुषात खर्चीन, अशी उमेद वाटली आहे.'' त्यांची मूळ प्रेरणा अध्यात्माची व विश्वव्यापी करुणेची, विश्वव्यापी मैत्रीची होती, ते विश्व कुटुंबवादी होते.

'महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा एकमेव मार्ग' या शीर्षकाखाली किर्लोस्कर मासिकाच्या संपादकांनी १९३५ साली त्यांची मुलाखत घेतली. त्यात ते म्हणतात, ''तरुण पिढीने आपण केवळ हिंदी आहोत एवढेच ध्यानात ठेवावे, एकी करावयाची तीसुद्धा महाराष्ट्रापुरती न करता प्रांतिक भेद न मात्सर्य यांना आपणामध्ये येऊ देऊ नये. तरुणांनी आपला दिलदारपणा विश्वकुटुंबीयत्वाला शोभेल असाच ठेवला पाहिजे. भवितव्य जर एवढे विशाल आहे तर, तरुणाने मी ब्राह्मण, मी ब्राह्मणेतर असे सटरफटर भेद लक्षात का आणावेत? असला सटरफटरपणा टाकला पाहिजे. हिंदुस्थानने जगाला धडा घालून दिला आहे, असे एका तोंडाने म्हणायचे आणि आपल्यातच सोवळेपणा ठेवायचा हा म्हाताऱ्यांचा दुटप्पीपणा आहे, यापासून सर्वांनी सावध व्हावे. जुन्याचा सर्वत्र त्याग करावा असे कोणी म्हणत नाही. मग हे नव्याच्या मागे कशाला लागावं असं म्हणतात, तेव्हा तरुणांनी विनय न टाकता शिस्तीने व श्रद्धेने सुधारणांच्या कामाला पुढे यावं; हा माझा यांना नम्रपणाचा संदेश आहे. '' 'तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र' लेखात त्यांनी महाराष्ट्रातील लोकहितवादी, फुले, आगरकर इत्यादिकांपासून ते १९३५ पर्यंतच्या महाराष्ट्रातील वैचारिक संघर्षाचा आढावा घेऊन वैचारिक संघर्षाचे मूल्यमापन करतात व नव्या समाजशास्त्राचे किंवा सामाजिक क्रांतीचे 'मंगलाचरण' म्हणून ते या संघर्षाचा निर्देश करतात.

वैचारिक संघर्ष हवा

सामाजिक परिवर्तन व प्रगती मूलगामी स्वरूपात करावयाचे तर वैचारिक संघर्षाची आवश्यकता आहे, असं त्यांचं मत आहे. एका बाजूला समाजवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, समतावाद, बहुजनहितवाद वगैरे तत्त्वांचे उच्च घोषाने प्रतिपादन व उलट दिशेने सामाजिक बनवेगिरी, साम्राज्यवाद, संकुचित राष्ट्रवाद, जातनिष्ठा, वंशशुद्धी इत्यादी रूढ भावनांवर आधारलेला प्रचार, वैचारिक युद्ध नव्या युगाचे लक्षण आहे, असं प्रतिपादून ते पुढे म्हणतात की, समाजशास्त्रीय निरीक्षण करताना हा वैचारिक विरोध एक महत्त्वाचा विषय म्हणून स्वीकारला पाहिजे. तटस्थपणा व अभ्यासू वृत्ती साध्य करून सामाजिक मानवजीवन चालविले पाहिजे, अशी सामाजिक युद्धे आणि वाद समाजशास्त्राला बाधक मुळीच ठरत नाहीत. समाजशास्त्राचा निरीक्षणाचा हा मोठा विषय आहे. ही युद्धे आणि वाद या शास्त्राच्या निरीक्षण मंदिरातील देखावे आणि प्रयोग आहेत. अध्ययनाला अशा घडामोडींमुळे मोठी स्फूर्ती येते. समाजशास्त्राच्या अभ्यासातले हे तर अलभ्य वस्तुपाठच होत. प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ता हेगेल म्हणतो की, ''समाजाच्या उन्नतीची बीजे विरोध-विकासात आहेत.'' कार्ल मार्क्स त्याचा शिष्य, याने या विरोध-विकासावर आपली सर्व शिकवण रचिली. महात्मा

गांधी सांगतात की, आपली पद्धती झंझावाताची आहे. क्रांतीचा प्रत्यक्ष पुतळा ख्रिस्त म्हणतो, 'मी विरोधाची मुळे हटवायला आलो आहे, शांतीची थडगी बांधायला नव्हे.'

सामाजिक क्रांतीच्या भावी झंझावाताचे व नव्या मताच्या मूल्यांच्या भावी वावटळीचे आवाहन करण्यात शिंदे यांचा जन्म गेला. ऐतिहासिक दृष्टीने भारतीय समाजरचनेत हिंदू धर्म व तत्त्वज्ञान यांची मांडणी होणे यांना आवश्यक वाटत होते. परंपरागत समाज, धर्म व तत्त्वज्ञान यांच्यात बदल घडवून आणावयाचा तर याचे ऐतिहासिक परिशीलन आवश्यक आहे व ते हिंदू समाजाच्या व एकंदर मानवी विश्वाच्या सहयोग व दृष्टी प्रत्यक्ष यातील शीर्षस्थ वृत्तीच्या क्रिया होय आणि यातून याचं प्रत्यंतर येऊ शकत नाही. असे प्रत्यंतर आल्याशिवाय नवा विचार व ध्येयवाद यांची पायाभरणी होऊ शकत नाही; अशा प्रकारचा ऐतिहासिक दृष्टिकोन त्यांच्या ठिकाणी होता. या दृष्टिकोनातून त्यांनी परंपरागत हिंदू समाज व रूढ हिंदू धर्म यांची समीक्षा केली आणि हिंदू समाजाची मौलिक समतेच्या पायावर नवी रचना करणे व हिंदू धर्माचे सारग्रहण करून हिंदू धर्माच्या पलीकडचा व वरचा विश्वधर्म स्थापन करणे, हे आधुनिक भारताचे मुख्य कर्तव्य आहे, असा विचार त्यांनी मांडला.

जातीयवादावर टीका

हिंदुसमाजाचा दृष्टिकोन हा जातिवादी आहे. (१) उच्च-नीच जातिभेद म्हणजेच उच्च-नीच वंशभेद होय, या तऱ्हेचा विचार जातिभेदाचा पाया आहे. हा पायाच खोटा व भ्रांतिमय आहे. (२) उच्च-नीच जातिभेदाचा अत्यंत विषारी व समाजघातक परिणाम म्हणजे अस्पृश्यतेची संस्था होय, असे सिद्धांत शिंदे यांनी 'मराठ्यांची पूर्वपीठिका', 'राधामाधवविलासचंपु आणि रा. राजवाडे', 'वेदोक्त की पुराणोक्त' आणि विशेषत: 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या निबंधांमध्ये मांडले आहेत. हे सिद्धांत त्यांनी मानववंशशास्त्र, मानववंश इतिहास, राजकीय अर्थसंस्थांचे विधिवत विश्लेषण करणारे सांख्यकीय शास्त्रज्ञांची प्रसिद्ध झालेली जातिभेदविषयक व अस्पृश्यताविषयक पुस्तके यांचे मनन करून व स्वतः अवलोकनार्थ भारतभर वारंवार यात्रा करून मांडले. या चिंतनाला त्यांनी भाषाशास्त्रविषयक अध्ययनाची जोड दिली. भारतातील परंपरागत संस्कृतीचे समालोचनही यात भरीस घातले.

त्यांचे प्रतिपादन अत्यंत अभिनव आहे. महात्मा जोतीराव फुले यांनी भारतातील उच्च-नीच जातिभेद व अस्पृश्यांची संस्था निर्माण होण्यास ब्राह्मणांना जबाबदार धरले. शिंदे यांना जोतीरांवाची आर्य ब्राह्मणमूलक जातिभेदाची उपपत्ती व अस्पृश्योपपत्ती मान्य झाली नाही. जोतीरावांचा समाजक्रांती व धर्मक्रांतीचा विचार मात्र समग्र मान्य झाला. शिंदे यांनी पुराणांचा अभ्यासक पार्जिटर याच्या पुस्तकातील ब्राह्मण, क्षत्रिय व एकूण चातुर्वर्ण्य यासंबंधीचे महत्त्वाचे विचार मान्य केले. पार्जिटरचं म्हणणं असं की, ''आर्यपूर्व भारतीय संस्कृतीत ब्राह्मण वर्ग होता. तो आर्येतर होता. त्यानेच वैदिक धर्म प्रामुख्याने स्वीकारला व यात आर्यवंश मिसळून गेला.'' शिंदे यांच्या म्हणण्याचे सार असे की, ''जातिभेदाची व अस्पृश्यतेची तीव्रता हजारो वर्षे दक्षिण भारतात चालू आहे. वैदिक आर्यपूर्व, आर्य द्रविड

इत्यादींच्या संस्कृतीत जातिभेद व अस्पृश्यता निर्माण झाली. वैदिक आर्यांच्यापूर्वी अनेक आर्यांच्या व द्रविडांच्या टोळया भारतभर पसरल्या व युद्धे करून ज्या आर्यांना, द्रविडेतरांना त्यांनी जिंकले व भारतातील मूळचे सत्ताधीश होते त्या सत्ताधीशांना जिंकून, त्यांच्या जमिनी बळकावून त्यांना कायमचे अस्पृश्य केले. हे वेदपूर्वकालीन आर्य व भारताबाहेरून आलेले द्रविड लोक यांच्यामध्ये रक्ताची सरमिसळ झाली. माळी, कुणबी, रेड्डी, नायर, रजपूत जाट इत्यादी ग्रामीण समाजसंस्थेतील सत्ताधारी वर्ग हेच स्पृश्यांचे वर्ग होते. वर्तमानकालीन भारतीय हिंदूंची संस्कृती म्हणजे आर्य व आर्येतर द्रविड इत्यादी मानव समाजाच्या विविध वंशांच्याच संस्कृतीचं मिश्रण होय. ब्राह्मण वर्ग हा प्रथम वंशवादी नव्हता, तो आर्यवंशीय नव्हता, वंशशुद्धीची कल्पनाही त्याला नव्हती. कोळणीचा पुत्र व्यास व वाल्मिकी, वसिष्ठांचे पुत्र ही चांडाळ वंशाची संतती, हे सर्व ब्राह्मणोत्तम आहेत. मराठ्यांमध्येही वंशशुद्धीची कल्पना आली ती अलीकडे काही शतकांपूर्वीच. ब्राह्मणांत काय किंवा मराठ्यांत काय, भारतात बाहेरून आलेल्या व मुळात असलेल्या मानववंशाचा बीजसंकर किंवा रक्तसंकर मोठ्या प्रमाणात स्पष्ट दिसतो.''

अस्पृश्यतेच्या कल्पनेचे मूळ रानटी लोकांच्या जादूटोण्यांनी भरलेला अपधर्म होय. सोवळयाओवळयाची कल्पना ही मुळातली रानटी अपधर्मातील कल्पना होय. ती प्रथम यज्ञ, होम, जादूटोणा इत्यादी व्यवसाय करणाऱ्या पुरोहित व जादुगारांची होती. तीच जात लोकांना लागू करून अस्पृश्य जात जेत्या लोकांनी स्वतःच्या सामुदायिक स्वार्थाकरिता अस्तित्वात आणली. ब्राह्मणांनी म्हणजे पुरोहित वर्गाने जेत्या वर्गाला साथ दिली. ब्राह्मण हा पुरोहित या नात्याने मराठा इत्यादी जेत्या जमातींचा बलुतेदार होता. या ब्राह्मण बलुतेदाराने पारलौकिक पाप-पुण्याची कल्पना दृढ केली. इस्लाम, ख्रिश्चन, यहुदी धर्मांनी मानव समाजात निग्रहाचे बीज कायम पेरले. हे सर्व धर्म कालविसंगत आहेत. वर्तमानकाळातील मानव समाजाचे संबंध किंवा राष्ट्राराष्ट्रांमधील संबंध पूर्वीसारखे राहिले नाहीत, अत्यंत घनिष्ठ झाले आहेत. ज्या काळी ग्रंथप्रामाण्यावर आधारलेल्या धर्मसंस्था उत्पन्न झाल्या, विस्तारल्या, एकमेकांशी संघर्ष करू लागल्या, त्या काळातील राष्ट्राराष्ट्रांतील संबंध विरळ होते; पण समाज दुसऱ्या समाजापासून मोठ्या भौगोलिक अंतरावर नांदत असत. त्यामुळे त्यांचे आचार, विचार, भावना, श्रद्धा व समजुती यांच्यामध्ये वैचित्र्य व विरोध फार होता. जागतिक भौतिक सुधारणा झाल्यानंतरच्या काळात सर्व पृथ्वीवरील राष्ट्रे, भिन्न-भिन्न धार्मिक समाज फार जवळ आले आहेत. पवित्र धर्मग्रंथनिष्ठ धर्मामुळे प्रत्येक सामाजिक मन एकमेकांपासून विभक्त, भिन्न-भिन्न अहंकारांनी भरलेले, वितुष्टास कारण होणारे व नित्य संग्रामास प्रवृत्त करणारे झाले आहे. पवित्र धर्मग्रंथावरील श्रद्धा ही कालबाधित झाली आहे. पवित्र धर्मग्रंथाच्या पलीकडे पाहणारी नैतिक, व्यापक, पवित्र श्रद्धा हीच मानव समाजातील विसंगत अशा सामाजिक अहंकारावर विजय मिळवू शकेल. कोणत्याही पवित्र ग्रंथावरील श्रद्धा ही मानव समाजातील विसंगत अशा सामाजिक अहंकारावर विजय मिळवू शकेल.

कोणत्याही पवित्र ग्रंथावरील श्रद्धा ही आजच्या वर्तमानकाळातील ज्ञान-विज्ञानाशी, बुद्धिवादाशी आणि नव्या घनिष्ठ मानवी संबंधांशी विरोधी आहे. ती अंधश्रद्धा बनली आहे. त्या श्रद्धेचे अधिष्ठान असलेले तत्त्वज्ञानही अनेक अंधविश्वासांवर आधारलेले आहे, असे स्पष्ट झाले आहे.

विश्वमांगल्यावर लक्ष

अशा वेळी परंपरागत रूढी आणि पवित्र ग्रंथ यांना मागे टाकणारा विचारच मानवी समाजाची नव्या विश्वबंधुत्वाच्या व समतेच्या आधारावर रचना करू शकेल, असा विचार आधुनिक युगाचा मार्गदर्शक बनू पाहात आहे. आधुनिक श्रद्धेवर आधारलेला विश्वधर्मच मानवी समाजामधील व राष्ट्राराष्ट्रांमधील अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सोडवू शकतो, याची उत्कट जाणीव भारतात साधारणतः ब्राम्हो समाजाने निर्माण केली. भौतिकवादी मार्क्सवादाला किंवा तशा प्रकारच्या विचारसरणीला व ध्येयवादाला नव्या धर्माची आवश्यकता वाटत नसली तरी, उच्चतम नैतिक मानवांचे परिपोषण करणारा विश्वधर्म ही मानवाची मानसिक गरज आहे, यात शंका नाही. परमपवित्र विश्वव्यापी शक्तीच्या भक्तीने जीवनाला मांगल्य प्राप्त होते, व्यापक नीतिधर्माचे आचरण करून मानवी मनाला जी शांती किंवा पावित्र्य प्राप्त होते, या पावित्र्याचा आधार अशी विश्वव्यापी शक्तीच होऊ शकते, अशी एक व्यापक श्रद्धा सर्व प्रस्थापित धर्मांच्या मननातून प्राप्त होते. रूढी व धर्मग्रंथांना बाजूला सारणारा धर्मच सर्व मानवांची समतानिष्ठ समाजरचना निर्माण करण्यास स्फूर्ती देऊ शकतो, अशी कल्पना विश्वधर्माच्या मुळाशी आहे. मनुष्य परमशांती आणि पावित्र्य यांचा शोध करणारा प्राणी आहे. जगातील मानवमुक्तीच्या व मानवी समानतेच्या चळवळी या भावनामय आहेत व त्या भावना नैतिक आहेत, हे लक्षात घेऊन विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात-

''सर्व प्रकारच्या भावनामय चळवळी असतात. आपण कोठूनही सुरुवात करा, शेवटी एकाच उगमापाशी पोहोचतो. तो उगम म्हणजे आध्यात्मिक होय.'' व्यापक नीतितत्त्वावर आधारलेले वर्तन हीच त्या परमपवित्र विश्वसाक्षी शक्तीच्या भक्तीचे साधन होय, विशेषतः दलित व परतंत्र मानवाला मुक्त करण्याकरिता करावयाची सेवा ही या देवाची खरी पूजा होय, अशी श्रद्धा विश्वधर्माच्या प्रेरणेने शिंदे यांना मिळालेली होती.

प्रखर प्रतीती असलेली व्यक्ती

भारतीय सामाजिक क्रांतीचा धार्मिक क्रांतीशी, राजकीय क्रांतीशी अविभाज्य संबंध आहे. याची प्रखर प्रतीती असलेली स्वातंत्र्यपूर्व काळातील एक प्रमुख व्यक्ती म्हणजे कर्मवीर वि. रा. शिंदे होत. व्यक्तींना व जातींना जन्मसिद्ध उच्च-नीच भागात जखडून टाकणारी भारतातील समाजपद्धती ही हिंदू धर्म व त्याचे तत्त्वज्ञान यांच्यापलीकडे गेले पाहिजे. पलीकडे गेलेला विश्वधर्म व त्याचे तत्त्वज्ञान प्राप्त झाल्याशिवाय भारतात खरीखुरी सामाजिक क्रांती होणार नाही. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी समाज धर्मग्रंथांच्या

संकुचित श्रद्धेच्या विळख्यात सापडलेले समाज होत. नव्या विश्वव्यापी धार्मिक जाणिवेचे स्वरूपच या विळख्यामधून या परस्पर विभक्त राहिलेल्या समाजांना मुक्त करू शकेल, असा व्यापक विचार शिंदे करीत होते. तो करीत असतानाच त्यांनी भावी विश्वमांगल्याकडे लक्ष देऊन आपले जीवन समाप्त केले. वैचारिक संघर्षाशिवाय व नव्या व्यापक विचारांच्या विजयाशिवाय ज्या ज्या चांगल्या चळवळी होतील त्या अपयशीच ठरतील, असा शिंदे यांच्या जीवनातून मिळणारा संदेश आहे. विचार बदलले पाहिजेत. जुन्या विचारांची बीजे जोपर्यंत कायम राहतात, तोपर्यंत समाजपरिवर्तनाचे केलेले प्रयत्न विफलच होतात, संधी सापडताच ही बीजे पुन:पुन्हा अंकुरित होऊन वृद्धिंगत होतात, असा इतिहासाचा अनुभव आहे.

(जन्मशताब्दी निमित्ताने लिहिलेला खास लेख, महाराष्ट्र टाइम्स,
रविवार पुरवणी, (साहित्य, कला, राजकारण) दि.२२ एप्रिल, १९७३)

ooo

५८

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : काही आठवणी

दिवंगत विठ्ठल रामजी शिंदे हे ब्राह्मो समाजाचे प्रचारक आणि दलितोद्धारक मंडळींचे संस्थापक म्हणून मला अनेक वर्षे माहीत होते व त्यांची सभा संमेलनामधून भाषणेही ऐकण्याचा प्रसंग वारंवार मला येत होता. परंतु त्यांची जवळून ओळख प्रथम येरवडा जेलमध्ये झाली. येरवडा जेलमध्ये १९३२ च्या अखेरीस महात्मा गांधी अस्पृश्यता निवारण्याच्या संदर्भात अनेक कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेत होते. हा त्यांचा क्रम अनेक महिने चालला होता. त्या निमित्ताने माझीही येरवडा जेलला भेट होत होती. महात्मा गांधींनी मला कायमचे निमंत्रण देऊन ठेवले होते. १९३२ च्या डिसेंबरमध्ये श्री. शिंदे हे गांधींच्या भेटीस येरवडा जेलमध्ये गेले तेव्हा मी तेथे उपस्थित होतो. गांधी आणि शिंदे यांचा संवाद इंग्रजीमध्ये चालला होता. शिंदे यांनी वृत्तपत्रात वाचले होते, की 'गांधी हे भारतातील अनेक शास्त्रीपंडितांची मते अस्पृश्यता या विषयावर जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु भारतातील अनेक शास्त्री पंडितांची मने अस्पृश्यता निवारण्याच्या बाजूने वळविण्यात तुम्हाला फारसे यश येईल असे मला वाटत नाही व काही थोडेसे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके वळले तरी आपल्या कार्यात त्यांचा विशेषसा उपयोग होणार नाही,' हे ऐकून मला थोडीशी गंमत वाटली. परंतु गांधी गंभीर बनले, ते शिंदे यांना म्हणाले, ब्राह्मण जर माझ्या बाजूला अल्पसंख्येने जरी वळले तरी मी त्यांच्यापासून फार मोठ्या यशाची अपेक्षा करतो, ब्राह्मण हा माझा आधारस्तंभ होय, असे मी मानतो. श्री. शिंदे यांनी मग दुसरा मुद्दा चर्चेकरिता काढला व माझी ओळख करून घेतली.

त्यानंतर कालांतराने शिंदे यांची व माझी वाईस एका सार्वजनिक सभेत गाठ पडली. ही सभा टिळक मंदिरात भरली होती. मी त्या सभेचा अध्यक्ष होतो. शिंदे हे वक्ते होते. शिंदे यांनी वाईकर श्रोतृवृंदास सांगितले की, ''तर्कतीर्थ जोशी हे वाईस अनेक वर्षे रहात असूनही वाईच्या हिंदू मंडळींना त्यांची मी नव्याने व निराळ्या प्रकारची ओळख करून

देतो.' त्या वेळी माझ्या निवासस्थानात म्हणजे प्राज्ञपाठशाळेत एक मांग जमातीचा हरिजन विद्यार्थी बी. ए. च्या संस्कृतचा सुट्टीच्या दिवसात अभ्यास करण्याकरीता राहिला होता. त्याला मी वेदातील भाग अर्थासह शिकवत होतो. मधून मधून तो माझ्या पंक्तीत जेवायलाही बसत होता. ही गोष्ट श्री. शिंदे यांनी वाईकरांना जाहीर रीतीने सांगितली आणि म्हटले की, "तर्कतीर्थ जोशींवर जातीबहिष्कार पडला तर तो सोसण्याची त्यांची तयारी आहेच पण आम्हीही त्यांच्या पाठीशी उभे आहोत." ब्राह्मो समाजाचे अनेक प्रचारक जुने कार्यकर्ते माझे स्नेही होते. ब्राह्मो समाजाचा वाईत एक मोठा उत्सव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झाला. तेव्हा शिंदे यांच्या विनंतीवरून उत्सवाची बरीचशी पाहुणे मंडळी प्राज्ञपाठशाळेच्या इमारतीत उतरली होती.

('महर्षी विठ्ठल रामजी शिंदे: एक दर्शन (भाग - १), रा.ना. चव्हाण',
मधून. संपा. रमेश चव्हाण,
रा. ना. चव्हाण : एक दर्शन (भाग -१),
रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, वाई,
२ जानेवारी, २०१८, पृ. ३४१ व ३४२)

○○○

धर्मकारण

५९

ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती यांचे आत्मनिष्ठ व्यक्तिमत्त्व

दिल्लीस मराठी साहित्य संमेलनाच्या अधिवेशनास उपस्थित राहावे म्हणून गु. स्वामींना प्रार्थना करण्याकरिता मी त्यांच्या मठात गेलो: प्रथम साष्टांग प्रणाम केला. कोणत्याही दिवशी जेव्हा गुरूंचे प्रथम दर्शन घ्यावयाचे तेव्हा प्रथम साष्टांग प्रणाम करावा, अशी पूर्वापार चाल आहे. प्रणाम केल्यावर मी गुरुवर्यांना विचारले, "आपण दिल्लीस यावे, अशी स्वागताध्यक्षांची व माझीही इच्छा आहे; तेथेच जवळ कुरुक्षेत्र आहे, आपण नंतर कुरुक्षेत्रासही जाऊ." स्वामींनी उत्तर दिलं, "आम्ही जेथे आहो तेथेच कुरुक्षेत्र आहे! व काशी आहे!" माझा धार्मिक उद्देश नसून व्यावहारिक उद्देश आहे, हे लक्षात घेऊन ते लगेच पुन्हा पुढे म्हणाले, "माझे वय झाले आहे; आता प्रवास सोसणार नाही." मी जरा अधिक आग्रह केला. मी म्हटले की, "प्रवासात दगदग पडणार नाही अशी सर्व प्रकारची काळजी आम्ही घेऊ. साहित्य संमेलन दिल्लीस असल्यामुळे मराठी साहित्याची नावाजलेली मंडळी मोठ्या संख्येने जमतील, त्यामुळे चर्चाही चांगल्या रंगतील." अपरिग्रह-वृत्ती स्वभावतःच बाणल्यामुळे स्वामींचा स्वभाव संकोची बनला होता. दुपारच्या वारा बाजेच्या भिक्षेशिवाय त्यांनी कोणापाशी कधीही काहीही मागितले नाही. कोणी काही देऊ केल्यास प्रथम नकार द्यावयाचा; आग्रह दिसल्यास होकार द्यावयाचा. या स्वभावाप्रमाणे त्यांनी दिल्लीस येण्याचे मान्य केले. दिल्लीच्या प्रवासात त्यांची प्रकृती अधिक सुधारली. आम्ही हरिद्वार व हृषिकेश येथेही संमेलनानंतर गेलो. हृषिकेशच्या गंगेच्या धावत्या प्रवाहात स्वामींनी नुसती लंगोटी नेसून दंडवत आडवे होऊन प्रसन्न मनाने "हर गंगे !" म्हणून त्रिवार मज्जन-उन्मज्जनही केले. लक्ष्मणझुला येथे जाऊन गंगेचे दर्शन घेतले. या वेळी त्यांच्यांत अपरिमित उत्साह भरलेला दिसला. वसत्या ठिकाणीच सर्व तीर्थे संगम पावली आहेत असे अनुभवणाऱ्या या ब्रह्मनिष्ठ पुरुषाला हिमालयात गंगेचे चर्मचक्षूने दर्शन झाल्यानंतर त्या प्रवाहात ब्रह्मदर्शन घडले. साधना व सिद्धी या दोन्ही एकाच क्षणी जीवन असेपर्यंत चालतात, किंवा चालाव्या

लागतात. सिद्धीनंतराही साधन सुटू देऊ नये, असे जे समर्थ रामदासांनी सांगितले आहे; त्याप्रमाणे वर्तन स्वामींचे चालले होते.

'एकान्ती' जीवन

वयाच्या बाविसाव्या वर्षीच स्वामींना स्वतःच्या गुरूंकडून अनुग्रह प्राप्त झाला होता. त्यामुळे त्यांनी ऐकान्तिक नैष्ठिक ब्राह्मचर्याची जी दीक्षा घेतली तीच अखेर परमगती प्राप्त होईपर्यंत स्थिरावत गेली व दृढमूल झाली. ब्रह्मनिष्ठ ज्ञान हा आदर्श त्यांनी आपल्या जीवनाचा ठरविला होता. महान शिल्पकाराप्रमाणे दीर्घ प्रयासांनी तो आदर्श स्वतःच्याच हातांनी त्यांनी आत्मरूपात घडविला. शिल्पकार चुकतो व चुका दुरुस्त करीत जातो त्याप्रमाणे विवेकाने व विचाराने अनेक प्रमादाचे प्रसंग टाळीत, हळूहळू महान प्रयत्नांनी यांची शुद्ध निर्वैर वृत्ती स्थिरावली आणि जीवनयज्ञास सांगता यावी म्हणून प्राणिमात्रांना अभयदक्षिणा देऊन ते पूर्णतेस पोचले. म्हणूनच 'जीवन सर्व तीर्थांचे संगमस्थान झाले आहे' असा त्यांना अनुभव येऊ शकला. त्यांनी नम्रतेने अहंतेचे विसर्जन केले; अपरिग्रहाने ममतेचा त्याग केला.

"एकान्तिनो हि पुरुषा दुर्लभा बहवो नृप।"

असे महाभारतात नारायणीय धर्मात म्हटले आहे. नैष्ठिक ब्रह्मचर्य हाच एकान्तीपणा होय. अशी एकान्ती माणसे जगात फार थोडी असतात, असे व्यासाचे व नारदाचे म्हणणे आहे. अशा प्रकारच्या दुर्लभ एकान्ती व्यक्तींपैकी स्वामी हे एक होत. त्यांना एकान्त खूप मानवला होता, कारण ते आत्मनिष्ठ होते. एकान्त मानवणे फार कठीण असते. पुष्कळशी एकान्ती माणसे मनोव्याधींनी ग्रस्त झालेली असतात. विषय, इंद्रिये आणि मन यांच्यावर विजय मिळविण्याकरिता ही माणसे निघालेली असतात. काही एका प्रमाणांत विजय मिळाला की त्यांना विजयाची धुंदी चढू लागते. परमार्थाच्या शिखरावर बसलेल्या या माणसांना बाकीची माणसे लहान दिसू लागतात त्यामुळे नव्या प्रकारची अहंता उद्भवते. पारमार्थिक विजयसुद्धा टिकाऊ नसतात. वस्तऱ्याच्या धारेप्रमाणे परमार्थाचा मार्ग दुर्गम असतो. जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत लढा द्यावा लागतो, पूर्ण अंतर्मुख वृत्ती बाणावी लागते, आणि प्रत्येक क्षणी बंदोबस्त ठेवावा लागतो.

शुद्ध व सामर्थ्यशाली मनाच्या एकान्ती पुरुषांना आपल्या एकटेपणातच आत्मनिष्ठा असेल तर पूर्णतेचा मार्ग सापडतो. परंतु मानवी निसर्गाप्रमाणे एकटी व्यक्ती पुष्कळ वेळा एकलकोंडेपणाने जर्जर होते. एकटपणाने दुर्मुखलेले, तुसडे किंवा हेकट वैरागी तयार होतात. ते व्यथित मनाचे बनतात; ते स्वातंत्र्य गमावतात. पराश्रित बनून स्वातंत्र्याचे भय त्यांना वाटू लागते.

निरामय समग्र व्यक्तिमत्त्व

स्वामींच्या ठिकाणी एकान्तवृत्तीचे परिणाम आत्मनिष्ठेमुळे मंगल व शुभच झाले.

त्यांच्यात निरोगिता, तेजस्विता व चित्ताची प्रसन्नता चिरकाल निरंतर झळकत होती. जन्मतःच पिंड सत्त्वस्थ होता; भरदार, कोमल, रेखीव व सशक्त अशी तनू होती; चित्त मधुर व कोमल होते. कोप जमदग्नीसारखा जरी होता तरी तो क्षणभंगुर होता. वादळानंतरची शांतता! शांती हा त्यांच्या चित्ताचा स्वभावधर्म होता. एकान्ताची आवड होती व त्याच एकान्ताने निर्विकल्पक समाधी गाठली होती. तरी गृहस्थाश्रमी व सुखी स्त्री-पुरुषांच्या संसाराबद्दल त्यांना फार आस्था होती. शेकडो विद्यार्थी त्यांचेपाशी शिकून गृहस्थाश्रमी झाले. त्या विद्यार्थ्यांच्या संसारी गृहिणींना नेटका. शिस्तीचा व टापटिपीचा प्रपंच कसा करावा, या संबंधाचे सुंदर वळण त्यांच्या वर्तनावरून लागे. त्यांची बारीकसारीक व्यवहारावरही सूक्ष्म नजर असे. गरीब, मध्यम वा श्रीमंत यांची गृहव्यवस्था निर्दोष कशी असावी. मुलांना वळण कसे लावावे, याबद्दल त्यांच्या डोळ्यांसमोर विचार करून ठरवलेले चित्र असे. चारी पुरुषार्थांचे त्यांनी मनन केले होते. व्यास, वाल्मीकी, भास, कालिदास, भवभूती, भारवी, बाण, श्रीहर्ष, जगन्नाथ इत्यादी संस्कृत कवींच्या काव्योदधीचे त्यांनी दीर्घकाल पूर्ण अवगाहन कले होते व दोहनही केले होते. शिकवीत असताना विद्यार्थ्यांना कालिदास, श्रीहर्ष, भारवि यांच्या दीर्घ वृत्ताच्या श्लोकांचा अन्वय जर नीट लागला नाही तर गुरुवर्य स्वतः अन्वय दाखवून देण्याच्या अगोदर तो दीर्घ वृत्तातला श्लोक डौलदार रीतीने म्हणून दाखवीत. त्या श्लोकातील रस व अभिप्राय नुसत्या सुरेल व तालबद्ध पठनांतच व्यक्त व्हावा, अशा रीतीने म्हणून दाखवीत. अनेक वेळा विद्यार्थ्यांचा असा अनुभव आहे की, गुरूंच्या मुखांतून श्रवण केल्याबरोबर न लागलेल्या श्लोकाचा उलगडा होई. गुरुवर्य सर्व रसाचा उलगडा करून दाखवीत, मात्र उत्तान शृंगार पूर्ण वर्ज्य होता. इतर सर्व रस शांतरसाचे अंकित व अंगभूत रहावं याच दृष्टीने ते शिकवीत.

या सर्व गोष्टींचा अर्थ असा की, यावज्जीव निवृत्तीचे ध्येय व संन्यासाचा आदर्श स्वामींनी राखला होता व आचरला हाता, तरी त्याचे मानसिक विकृतीच्या लक्षणांत कधीही रूपांतर झाले नाही. अनेक निवृत्तिमार्गी साधू, संत किंवा संन्यासी यांच्या ठिकाणी एकान्त वृत्तीमुळे एक प्रकारची मनोविकृती निर्माण होते. तशा प्रकारची विकृती यत्किंचितही स्वामींच्या ठिकाणी निर्माण झाली नाही. याचे कारण, समाधानी स्वभाव व षट्शास्त्रांच्या परिशीलनाने उजळलेली विशाल प्रज्ञा हे होय. त्यामुळे साधुसंतांच्या ठिकाणी बहुशः आढळणारे संमिश्र व्यक्तिमत्त्व (Complex Personality) स्वामींच्या ठिकाणी नव्हते. त्यांच्यात अत्यंत दुर्लभ असे समग्र व्यक्तिमत्त्व (Integrated Personality) होते. स्वतःच्या हातून दोष व चुका चार साध्या माणसांप्रमाणेच होऊ शकतात, अशी नेहमीच भावना त्यांच्यात असल्यामुळे प्रत्येक महत्त्वाची गोष्ट चारचौघांना विचारून व सल्लामसलत करूनच करावयाची, असे त्यांचे धोरण असे. स्वतःच्या पारमार्थिक प्रवृत्तीचे कोणत्याही प्रकारचे प्रदर्शन करणे त्यांना आवडत नसे. ईश्वराचा संदर्भ वारंवार आणून व्यवहाराच्या गोष्टींची चर्चा अथवा निर्णय

करण्याची खोड परमार्थी माणसांना जडलेली असते. असा ईश्वराच्या भक्तीचा सवंग उपयोग त्यांनी कधीही केला नाही. मधुपानांत निमग्न असलेल्या कमलकोशांतील भृंगाप्रमाणे त्यांची ईश्वरभक्ती मौनात व्यक्त होत असे. ईश्वराचे निरंतर साक्षित्व त्यांच्या शुद्ध वर्तनानेच व्यक्त होते.

संन्यासनिष्ठा आणि कर्मयोग यांच्यात त्यांच्या दृष्टीने विरोध नव्हता. शांकरमत व टिळकांचा कर्मयोग यांच्यात विरोध आहे असे ते मानीत नव्हते. 'गीतारहस्या'ला त्यांचा प्रथमपासून पाठिंबा होता. पूर्वमीमांसेचे, यज्ञसंस्थेचे किंवा वैदिक कर्मकांडाचे अधिक व्यापक व खोल परिशीलन त्यांनी संन्यासदीक्षा घेतल्यानंतरच केले. हिंदुधर्मसंस्थेचे तपशीलवार आधुनिक स्वरूप कसे असावे, याची मांडणी त्यांनी 'धर्मनिर्णयमंडळा'करिता संन्यासाश्रमातच केली. शास्त्रीपंडितांनी आधुनिक परिस्थितीप्रमाणे समाजाला मार्गदर्शन करावे, या गोष्टीचा पुरस्कार प्रामुख्याने त्यांनी संन्यासी अवस्थेतच केला. स्वदेशी व्रताचे परिपालन त्यांनी यावज्जीव केले. ते वस्त्रस्वावलंबनी होते. विश्रांतीच्या वेळी प्रतिदिन नियमाने ते सूत कातीत. वृद्धपणी शीतबाधा अधिक होते. वस्त्रे अधिक लागतात तरी त्यांची सगळी भगवी वस्त्रे हातकताईची व हातमागाचीच होती.

आत्मनिष्ठ मनुष्यास एकान्त हा साधनीभूत होतो. आत्मविकासाकडे व पूर्णतेकडे त्याच्या जीवनाचा ओढा कायम राहातो. संकटांतून तो निर्भयपणे निभावून जाऊ शकतो. आपत्तीमध्ये तो खचत नाही किंवा त्याच्या जीवनशक्ती क्षीण पावत नाहीत. अशा वेळी त्याची आत्मनिष्ठा कसाला लागते. एवढेच नव्हे तर आपत्तीशी संग्राम करताना दोष व वैगुण्ये झडून जातात. ऐहिक किंवा भौतिक दृष्टीने पाहिले तर स्वामीजींना कधीही कोणाचेही साहाय्य मिळाले नाही. धनिक लोक, बड़े अधिकारी किंवा संपन्न संस्था असे कोणाचेही साहाय्य त्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कधीही नव्हते. अशा स्थितीतही असहायतेची यत्किंचितही जाणीव न होता त्यांनी आपले दीर्घ जीवन मोठ्या आनंदात, वैभवशाली व भाग्यवान अशा मनुष्यापेक्षाही अधिक समाधानाने व्यतीत केले. या समाधानात एका महत्त्वाच्या कारणाची भर पडली होती. ते म्हणजे वेद व शास्त्रे यांच्या व्यासंगी मनुष्याची महती स्वयंसिद्धच असते, अशी सामाजिक मान्यता आतापर्यंत भारतात टिकून राहिलेली होती ती त्यांनी अनुभवली. आणखी असे की, परमार्थसाधना व विद्याव्यासंग असा सुंदर संगम स्वामींनी साधल्यामुळे अनंत समाधानात त्यांचे मन निमग्न राहिले. चित्त नम्र, बुद्धी अचल व वृत्ती धीर यांमुळे व्यक्तित्व अत्यंत उंचावले. यापेक्षा अधिक माणसास काय पाहिजे, अशी कृतकृत्यता लाभली. पांडित्य व साधुत्व यांच्या लाभापेक्षा महान लाभ तो कोणता असणार!

अशा व्यक्ती केंद्रस्थानी राहून संस्था उत्पन्न होऊ शकतात व मोठमोठी समाजोपकारक कामेही पार पाडली जातात. स्वामींनी पाठशाळा स्थापन करून २२ वर्षे चालविली. पाठशाळेपेक्षा त्यांचे व्यक्तित्व काही निराळे होते. कार्यावरून अशा व्यक्तीचा महिमा

अजमावता येत नाही. कित्येक वेळा कार्ये विशाल व गुणसंपन्न असतात; परंतु कार्य करणाऱ्या व्यक्तीची व्यक्तित्वे त्या मानाने सामान्य असतात. स्वामींनी प्राचीन विद्योच्या अनेक शाखांचा दीर्घकाल व्यासंग केला. प्रचंड ग्रंथरचनाही केली. परंतु केवळ विद्याव्यासंगात रत व समाजापासून अलग असलेले महापंडित ते नव्हते. समाजातील चालू घडामोडी व त्यापासून उत्पन्न होणरें हिताहिताचे प्रश्न याबद्दलही ते अत्यंत जागृत होते. गेल्या पन्नास वर्षांतील राजकीय व सामाजिक चळवळींविषयी त्यांनी आपले अनुसंधान कायम ठेवले. त्यांच्या आशीर्वादामुळे त्यांच्या अनेक शिष्यांनी राजकीय संग्रामांत अनेक वेळा भाग घेतला व धार्मिक व राजकीय धोरणांना पाठिंबा दिला. शास्त्री, पंडित व विद्वान यांच्या परंपरेला त्यांनी नवेच वळण लावले. डोळ्यांसमोर घडणारा सामाजिक इतिहास उपेक्षून चालणार नाही, त्याबद्दल तटस्थ राहाणे बरे नव्हे, ही गोष्ट संन्यस्त व अन्तर्मुख वृत्तीच्या स्वामींनी निक्षून सांगितली. यापासून विश्वविद्यालयीन नवशिक्षितांनीसुद्धा बोध घेण्याची खरोखरच आवश्यकता आहे.

स्वामीजींच्या बुद्धीला अंधश्रद्धेचे जाड्य कधी आले नाही. मंत्रतंत्र यांचे त्यांनी खोटे समर्थन कधी केले नाही. त्यांच्या अखेरच्या आजाराच्या वेळी गेल्या महिन्यात 'नवभारत' मासिकाचे एक संपादक श्री. ह. कृ. मोहनी यांनी स्वामींना प्रश्न विचारला की, "आपले मंत्रसामर्थ्याबद्दल काय मत आहे व काय अनुभव आहे?" स्वामींनी उत्तर दिले की, "मी आयुष्यभर, निदान पाच तपे तरी, मंत्रजप केलेला आहे. चित्तशुद्धी हाच माझ्या मंत्रजपाचा हेतू होता. मनुष्य जितका निष्पाप राहू शकतो तितका निष्पाप मी राहिलो आहे. एवढेच नव्हे, तर धर्मशास्त्रोक्त पद्धतीने आचारधर्मांचे संपूर्ण परिपालन केले आहे. मला मात्र मंत्रसामर्थ्याच्या चमत्काराचा कधीही अनुभव आला नाही, निसर्गाचे नियम मंत्रसामर्थ्याने बदलू शकतील असे मला वाटत नाही."

आत्मतृप्त मानवाचे अखेरचे दिवस

कफविकार उद्भवून स्वामींना १६ डिसेंबर १९५४ ला खूप ज्वर आला. हा ज्वर अल्पप्रमाणात अगोदरही ४/ ५ दिवस होताच. आजाराकडे दुर्लक्ष करण्याची त्यांची प्रवृत्ती होती. ज्वर असताच ते पुणे येथे १४ व १५ डिसेंबरच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिले. या प्रवासाची दगदग त्यांना बाधली व ज्वर वाढला. ब्रँको न्युमोनिया झाला. त्यात प्रथम ३/४ दिवस औषधपाण्याची त्यांनी हयगय केली. मी १७ डिसेंबरला बाहेरगावाहून वाईस आलो व लगेच आजाराची वार्ता कानी पडल्यावरोवर स्वामींची भेट घेतली. मी फारच खिन्न झालो. परततांना त्यांच्या माडीच्या जिन्यांत विषण्णपणे थांबलो, हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी जवळ असलेल्या उपचार करणाऱ्या शिष्याला सांगितले की, आमची "तत् सत्'ची वेळ जवळ आली आहे. लक्ष्मण जिन्यात थांबलेला दिसतो. त्याला परत बोलवा." मी पुन्हा त्यांच्यापाशी जाऊन बसलो. ते किंचित उठून बसले. प्रेमळपणे माझे हस्तांदोलन करून

थोडा वेळ गंभीरपणे त्यांनी ईश्वरचिंतन केले नंतर मला रजा दिली.

७/८ दिवसांतच आजाराने त्यांचे हृदय दुर्बल झाले व हृदयदौर्बल्याचा विकार वाढला. उपचाराची अधिक चांगली व्यवस्था व्हावी म्हणून मठातून स्वामींना धर्मकोश कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर आणले. ते १२ दिवस पर्यंत आडवे होऊन मुळीच झोपले नाहीत; बसून होते. आयुर्वेदिक उपचार थोडासा घेत होते. डॉ. खरे, डॉ. दातार व मुंबईचे डॉ. य. वि. पुरंदरे यांची निरंतर देखरेख सुरू झाली. डॉ. दातार व पुरंदरे यांच्या मते स्वामींनी ॲलोपॅथीचे उपचार घ्यावे, असे होते. मी धीर करून जानेवारी ३ तारखेस पहाटे "स्वामींनी नवी औषधयोजना मान्य करावी," अशी प्रार्थना केली. स्वामींनी मला सांगितले की "हे शरीर आजारातून बरे झाले तरी कार्यक्षम राहणार नाही, आता हे जाऊ दे." मी यावर मोठा धीर करून त्यांना सांगितले की, "प्रत्येक श्वास व जागृतीचा क्षण मोठ्या मोलाचा असतो. येथील जीवन हेच अंतिम मूल्य आहे. विशेषतः आपली जागृती ईश्वरचिंतनाने भरलेली; आपले श्वास आत्मसाक्षात्काराचे. त्यांचे मोल वर्णनापलीकडे आहे!" स्वामींनी यावरून ओळखले की, कार्यक्षम न राहिलेले माझे शरीरही यांना पाहिजे आहे; यांची इच्छा पुरी होऊ द्यावी. स्वामींनी नवी औषधयोजना मान्य केली.

स्वामींना म्हातारपणाचा मूत्रकृच्छाचा विकार गेली दोन वर्षे होता. तो त्यांनी कोणास कळू दिला नाही. कसलेही कठोर कायाक्लेश व देहयातना त्यांच्या खिजगणतीत नव्हत्या. सहा फूट उंचीचा भरदार देह, परंतु अखेरच्या आजारात कफ, खोकला, मूत्रकृच्छ व धाप यांच्या यातना उद्भवल्या. शंकराच्या देहावर विषारी नागांचे विळखे असतात तरी त्याची योगसमाधी जशी निरंतर अभग्न राहाते, त्याचप्रमाणे शरीरव्याधीच्या व्यालांचे विळखे पडले होते. तरी स्वामींचे तत्त्वानुसंधान सतत चालूच होते. १२ दिवस प्रथम सतत बसून काढले. परंतु केव्हाही कण्हले नाहीत. केव्हाही चेहऱ्यावरची प्रसन्नतेची छाप ढळली नाही. डोळे खोल गेले तरी दृष्टीतील समाधान स्थिरच होते. बोलण्यात गोडवा कायम राहिला, स्मृती तल्लख होती, विचारांत स्वच्छता व संगती होती. शांती, संयम व आनंदी वृत्ती पाहून डॉक्टरमंडळी चकित झाली. नवी ॲलोपॅथीची औषधयोजना म्हणजे इंजेक्शन. पूर्वी इंजेक्शने कधीच घेतली नव्हती; त्यामुळे प्रकृती २/३ दिवसांत सुधारण्याच्या मार्गास लागली. १५ दिवसांत चांगलाच फरक पडला. कफ, खोकला, मूत्रकृच्छ व धाप इत्यादी दोष नष्ट झाले. जानेवारीच्या उत्तरार्धात स्वामी अर्धा तास माडीतल्या माडीत फेऱ्या घालू लागले. ३ तास मीमांसाकोशाचे संपादकीय कार्य पाहू लागले. एक दिवस कोठा स्वच्छ नसावा, अशी त्यांना शंका आली आणि त्यांनी एनिमा घेतला. मला ही गोष्ट कळल्याबरोबर मी लगबगीने स्वामींकडे गेलो आणि सांगितले की, "एनिमा घेतला नसता तर बरे झाले असते. एरंडेल घेतले नाही हे तर फारच चांगले झाले. नाही तर तत्क्षणी समाधी!" हे माझे किंचित चिडीचे उद्गार ऐकून स्वामींना उपहासगर्भ हसू आले. थट्टा व उपहास अशी छटा

चेहऱ्यावर होती. त्यांच्या मनात असे आले की 'वा ! समाधीचा उत्कृष्टच उपाय तर्कतीर्थांना सापडला! योगसूत्राला पुस्ती जोडली पाहिजे.' रात्री नेहमीप्रमाणे मंडळी जमली तेव्हा त्यांनी हा तर्कतीर्थांचा शोध सूत्ररूपाने बोलून दाखविला : "एरंडविरेचनात् समाधिः असमर्थहृदयस्य इति तर्कतीर्थ:" स्वामीना हे मागाहून पटले. कारण त्यांना त्यानंतर खूप अशक्तपणा आला. तो पुन्हा निघालाच नाही. यानंतर देहदुःखव्यथा मात्र कसलीही राहिली नाही. शेवटपर्यंत आनंदच आनंद!

अखेरचे दिवस थोडे राहिले, असे स्वामींना एक महिना अगोदर पुन्हा दिसले. शाण्डिल्याची आत्मविद्या (छांदोग्योपनिषद ३/१४) हाच त्यांचा अनेक वर्षे अजपाजप होता. त्यांच्या गुरुसंप्रदायाप्रमाणे त्यात काही विशेष भर व काटछाट केलेली होती. आपल्या निर्वाणसमयी ही शांडिल्यविद्या शिष्याने २८ वेळा जपावी म्हणून त्यांनी संप्रदायपद्धतीने एका कागदावर टिपून ठेवली व उलट असेही सांगितले की "कोणी नाही जपली तरी चालेल, कारण, आमचा जप अखंडपणे शेवटच्या क्षणापर्यंत चालूच राहणार!"

मी फेब्रुवारी १२ तारखेस ब्रह्मदेशला जाण्यास निघालो. स्वामींची मुद्दाम अनुज्ञा घेतली. माझा अनुज्ञा घेण्याचा हेतू त्यांच्या लक्षात आला. माझा हेतू होता की, ब्रह्मदेशाहून २५ तारखेपर्यंत परतेन, परतल्यावर भेट व्हावी. १४ तारखेस स्वामींची प्रकृती खूप बिघडली, परंतु त्यांनी इतरांना बजावलं की, "लक्ष्मणला माझी प्रकृती बिघडल्याचे कळवू नका, त्याला यात्रा पूरी करू द्या."

दोन दिवसांत प्रकृती पुन्हा पूर्वपदावर आली. पण अखेर आजार उलटला. २६ व २७ तारखांना हृदयव्यथेचे जोराचे हल्ले झाले. स्वामींनी दोनदा ते तसेच सासले, कोणासही सांगितले नाही. अखेरचा हल्ला आला, तेव्हा डॉक्टर जवळ होते. त्यामुळे डॉक्टरांना कळले. तरी स्वामींची प्रसन्नता मात्र अढळ होती; मन अगदी मोकळे होते. त्यामुळे इतरांना स्वामींचा अंतकाळ जवळ आला आहे हे नीट लक्षात आले नाही. मी फेब्रुवारी ता. २८ ला संध्याकाळी आठच्या सुमारास व्रहादेशाहून परत आलो. स्वामीजी दोन दिवस वाट पहात आहेत असे घरातल्या मंडळींनी सांगितले. मी तडक स्वामींच्या बिछान्यापाशी गेलो.

स्वामी ध्यानस्थ सिद्धासनावर बसले होते. प्रणाम करून, मोठ्याने "प्रकृती कशी आहे?" असे मी विचारलें. मी आलो हे त्यांच्या ध्यानात आले व हसतमुद्रेने प्रणामाचा स्वीकार करून हस्तांदोलन करून त्यांनी जवळ बसवून घेतले. अखेरचा निरोप घेतला; पूर्ण समाधान आहे. कसलीही उणीव नाही, असे मला सांगितले.

अलीकडे ९ ते ११ या दरम्यान रात्री शिष्य व मित्रमंडळी, स्त्रीपुरुष स्वामींच्या संन्निध येऊन रोज बसत. त्याप्रमाणे मंडळी २८ फेब्रुवारीलाही आली. आज कोणी येऊं नका, मी एकटाच स्वस्थ पडतो, असा स्वामींनी आदेश दिला. रात्री ११ वाजता स्वामींना थोडी भूक लागली. त्यांनी दूधपीठ मागून घेतलेः खाल्ले व पुन्हा स्वस्थ पडले. मध्यरात्र उलटल्यावर

दोन वाजून वीस मिनिटांनी श्री एकनाथ विश्वनाथ शुक्ल या अहोरात्र सेवा करणाऱ्या व जवळ उपस्थित असलेल्या विद्यार्थ्याजवळ ऊन पाणी मागितले. पाणी गार झाले होते. ते गरम होईपर्यंत खाटेवर वाट पहात बसून राहिले. गरम पाणी मिळाले. तेथेच हत्तीसारख्या जाड्या भिंतीला पुरुषभर उंचीचा रुंद कोनाडा आहे. त्यात भांडे ठेवले होते. देहशुद्धी केली. तेथेच उभे राहिले, दीर्घ प्रणवोच्चार केला व परमगतीस पोचले! भगवदगीतेत म्हटले आहेः

"ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन्।
यः प्रयाति त्यजन् देहं स याति परमां गतिम्।।"

"ॐ हे एकाक्षर ब्रह्म उच्चारीत माझे स्मरण करीत जो देह टाकून प्रयाण करतो, तो परमगतीला प्राप्त होतो." हे क्षणात घडले, ते श्री. शुक्ल यांनी पाहिले व लगेच तेथूनच खिडकीतून तोंड बाहेर काढून आम्हांस पुकारले. श्री. भालचंद्रशास्त्री नेने तेथेच भिंतीआड अर्धवट जागे होते; त्यांनी प्रणव ऐकला; ते उपस्थित झाले. आम्ही सर्व मिनिटाच्या आत स्वामींजवळ आलो. देह कोनाड्यांतच भिंतीस उभा टेकलेला, तळहात उलथे ज्ञानमुद्रेने युक्त असे गुडघ्यावर टेकलेले. नेत्र उघडे परंतु किंचित निमीलित, ओष्ठ प्रणवोच्चाराच्या आकारात, सर्व शरीर चांगले ऊबदार, परंतु श्वास विलीन! मी शोकाकुल होऊन अगदी जवळ गेलो व आसनस्थ करण्याकरिता देह उचलण्यास सिद्ध झालो; तोच आज्ञेची आठवण झाली; अत्यंत उच्च स्वरात २८ वेळा आत्मविद्येचा मंत्र जपला; अखेरीस 'सोऽहम' म्हणून साश्रुनयनांनी गुरुचरणांवर मस्तक ठेवले!

(नवभारत, एप्रिल, १९५५. पृ. ५४ ते ५८)

○○○

६०

थोर धर्मसुधारक : कै. महादेवशास्त्री दिवेकर

महादेवशास्त्री यांचा जन्म सु. ५-२-१८८२ मध्ये बेळगाव जिल्ह्यातील उगारखुर्द येथे झाला. मॅट्रिक्युलेट झाल्यावर तळेगाव ढमढेरे येथील समर्थ विद्यालयात येऊन दाखल झाले. कै. विष्णु गोविंद विजापूरकर यांनी तळेगाव - दाभाडे येथे लो. टिळकांच्या स्वदेशी, बहिष्कार राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रीस अनुसरून समर्थ विद्यालय नावाची राष्ट्रीय शिक्षणाची शाळा स्थापिली होती. स्वधर्म, स्वदेश व स्वभाषा यांच्या अभिमानाने भरलेले विद्यार्थी तयार करणे हे या विद्यालयाचे मुख्य उद्दिष्ट होते; सशस्त्र क्रांती हा उद्देश बाळगून ब्रिटिश राज्य उलथून पाडण्याचा प्रयत्न करण्याकरिता विद्यार्थी तयार करावयाचे म्हणून तशा तऱ्हेचे शिक्षणही काही शिक्षकांनी देण्यास सुरुवात केली होती. अशी २० विद्यालये भारतात काढावयाची, असेही स्वप्न काहींना पडू लागले होते; इंग्रज सरकारने हे स्वप्न नष्ट केले; समर्थ विद्यालय इंग्रज सरकारने स्वतंत्र हुकूम काढून १९१० साली बंद पाडले. या समर्थ विद्यालयात बंडखोर तयार करतात, असा आरोप करून ते विद्यालय ब्रिटिश सरकारने बंद पाडले. त्या संस्थेतील काही बंडखोर वृत्तीचे विद्यार्थी व शिक्षक-वाई येथे ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती (नारायण शास्त्री मराठे) यांच्यापाशी शास्त्राचे शिक्षण घेण्याकरिता १९११ साली येऊन राहिले. त्यापैकीच एक कै. महादेवशास्त्री दिवेकर हे होत. मी वाईस - १९१४ साली फेब्रुवारी महिन्यात मराठेशास्त्री यांच्याकडे अध्ययनार्थ आलो; तेव्हा मराठेशास्त्र्यांच्या पाठशाळेत विद्यार्थी व शिक्षक या दोन्ही नात्याने काम करणारी जी तेजस्वी, बुद्धिमान व देशभक्त अशी मंडळी भेटली त्यात महादेवशास्त्री हे दिसले. त्या वेळी महादेवशास्त्री हे शास्त्रीबुवांपाशी शांकरभाष्य व पाणिनीय व्याकरणावरील काशिकावृत्ती शिकत होते. दर आठवड्याच्या प्रारंभी म्हणजे सोमवारी प्रौढ विद्यार्थी व शिक्षक यांची पुराणचक्री, दुपारी ३ तास आळीपाळीने चालत असे, आणि मधूनमधून रामनवमी, हनुमानजयंती, कृष्णाष्टमी इत्यादी देवदेवतांच्या व साधुसंतांच्या उत्सवात कीर्तने होत.

महादेवशास्त्र्यांचे पुराण - प्रवचन व कीर्तन अशा प्रसंगी वारंवार होत असे. तत्त्व प्रतिपादन, पौराणिक कथा व विनोदी गोष्टी सांगून महादेवशास्त्र्यांच्या कीर्तनाला खूप रंग भरत असे. राजकीय बंडखोर वृत्तीमुळे या कीर्तनाला ते आपल्या पौराणिक कथांमध्ये राजकीय आशयही चांगल्या मार्मिकपणे भरत असत. त्यांच्या प्रसन्न व ओजस्वी वक्तृत्वाने आणि संत-वाङ्मयाच्या भावभक्तीने भरलेल्या सुरेल गाण्यांनी श्रोतृवर्ग आनंदाने डोलू लागे. त्यांनी ज्ञानेश्वरीचे अध्ययन विष्णुबुवा यांच्यापाशी केले होते.

१९१६ साली विजयादशमीस प्राज्ञपाठशाळा मंडळाची नारायणशास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली महादेवशास्त्री दिवेकर, पं. दिनकरशास्त्री कानडे व सोहनी यांच्या सहकार्याने स्थापना झाली. प्राज्ञपाठशाळा १९०१ सालापासून चालू होती; तिलाच सार्वजनिक संस्थेचे कायदेशीर स्वरूप देण्यात आले. या संस्थेच्या अनेक उद्देशांमध्ये देशकालपरिस्थितीप्रमाणे हिंदुधर्मात मूळ तत्त्वांच्या आधाराने परिवर्तन केले पाहिजे अशा विचारांचे शास्त्रज्ञ धर्मप्रचारक विद्यार्थी तयार करणे हा मुख्य उद्देश समाविष्ट केला होता. महादेवशास्त्री दिवेकर यांनी या पाठशाळेतील शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा योगक्षेम चालविण्याकरिता निधी गोळा करण्याचे काम मुख्यतः पत्करले. नागपूरपासून तो धारवाड-हुबळीपर्यंत प्रतिवर्षी संस्थेचा सहा ते आठ महिने ते प्रचार करीत. या प्रचाराच्या निमित्ताने कीर्तन-प्रवचनांच्या द्वारे धर्मजागृतीचे कार्यही मोठ्या उत्साहाने पार पाडीत. सुमारे दहा वर्षे महाराष्ट्रभर ही धर्मप्रचार यात्रा प्राज्ञपाठशाळेकरिता त्यांनी केली. प्रतिवर्षी चार ते सहा महिने वाईत राहून विद्यार्थ्यांना कथा-कीर्तनाचेही ते शिक्षण देत. १९२० साली असहकारतेच्या चळवळीत प्राशपाठशाळेचे राष्ट्रीय शिक्षण संस्थेत महादेवशास्त्री दिवेकर यांनी रूपांतर केले.

इंग्रजी माध्यमिक शाळा व इंग्रजी कॉलेजे भराभर सोडून हजारो विद्यार्थी असहकारतेच्या आंदोलनामध्ये बाहेर आले. यापैकी काही विद्यार्थी प्राज्ञपाठशाळेत येऊन दाखल झाले. देशभक्त कै. विष्णुपंत आपटे (मोहन रानडे यांचे वडील), सुप्रसिद्ध पत्रकार श्रीपाद शंकर नवरे इत्यादी मंडळी याच वेळी प्राज्ञपाठशाळेत उच्च संस्कृत शिक्षणाकरता येऊन अध्यापनाकरिताही दाखल झाली. सुमारे दीडशे विद्यार्थी या संस्थेत त्या वेळी होते. राष्ट्रीय भावनेने या संस्थेचे वातावरण पूर्ण भरून राहिले होते. हिंदू धर्मसुधारणेच्या आंदोलन लाटा या वेळी महाराष्ट्रात उसळू लागल्या, या लाटांना प्रेरणा देणारी हवा प्राज्ञ-पाठशाळेतून बाहेर पसरत होती. महादेवशास्त्री 'दिवेकर या प्रेरणेची स्फूर्ति दायक शक्ती होती. विधवा पुनर्विवाह, स्त्रियांचा प्रौढ विवाह, गुणकर्म विभागशः चातुर्वर्ण्य स्थापना, जातिभेद निर्मूलन, अस्पृश्यता निवारण इत्यादी संबंधी प्रगतिशील विचारांचा प्रचार करण्यात महादेवशास्त्री यांनी पुढाकार घेतला. अकोला येथे १९२७ साली ब्राह्मण परिषद महादेवशास्त्री यांच्या नेतृत्वाखाली भरली. त्या परिषदेचे अध्यक्ष नारायणशास्त्री मराठे (केवलानंद सरस्वती) हे होते. या परिषदेच्या व्यासपीठावरून ' सर्व मानवजात समान' असे हिंदु धर्माचे मूलभूत

तत्त्व आहे अशी घोषणा करण्यात आली. या तत्त्वानुसार परधर्मात गेलेल्या हिंदूंना पुन्हा शुद्धीकरण करून हिंदुधर्मात परत घेता येते असा ठराव प्रचंड बहुमताने संमत करण्यात आला व महाराष्ट्रात मसुराश्रमातर्फे त्या वेळी चालू असलेल्या ख्रिश्चनांच्या शुद्धीकरणाच्या आंदोलनास पाठिंबा देण्यात आला; त्याचप्रमाणे, अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाचाही ठराव संमत करण्यात आला; जातिभेद निर्मूलनाची व गुणकर्मविभागशः स्थापनेची हिंदू अंमलबजावणी करण्याची पहिली पायरी म्हणून महाराष्ट्रातील ब्राह्मणांच्या सत्तावीस पोटजातींच्या विवाहासही बहुमताने संमती देण्यात आली.

यानंतर महाराष्ट्रात अनेक धर्मपरिषदा व धर्मसुधारणेची संमेलने भरविण्यात येऊ लागली. श्री. तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोगजे यांच्या नेतृत्वाखाली चाललेले धर्मनिर्णयमंडळ लोणावळे येथे या चळवळीत स्थापन झाले. महादेवशास्त्री दिवेकर यांनी महाराष्ट्राचा दौरा काढून महाराष्ट्रातील अस्तित्वात असलेल्या सर्व ब्राह्मणजातींची सविस्तर कागदपत्रांसह माहिती गोळा केली व ती पुस्तकरूपाने, प्राज्ञ पाठशाळा मंडळाच्या वतीने प्रसिद्ध केली. जातींच्या अभ्यासाकरिता अत्यंत आधारभूत असे हे महत्त्वाचे पुस्तक आहे. प्रचारकी हेतूने जरी ते तयार केलेले असले तरी ऐतिहासिक दृष्टीने ते फार मोलाचे आहे. प्राज्ञ पाठशाळेत असतानाच त्यांनी विद्यार्थी धर्म (१९२५), अस्पृश्यतेचे निर्मूलन, क्षत्रियवैश्यांचे अस्तित्व, आर्य संस्कृतीचा उत्कर्षापकर्ष इत्यादी महत्त्वाची ग्रंथरचना केली. केसरी, नागपूरचा महाराष्ट्र, किर्लोस्कर मासिक इत्यादी नियतकालिकांमधून त्यांनी हिंदुधर्म व सुधारणा यासंबंधी विपुल लेखन प्रसिद्ध केले. हिंदुसमाजोद्धारक पुस्तकमाला त्यांनी चालविली. त्या मालेत त्यांनी १० पुष्पे प्रसिद्ध केली. 'हिंदु संस्कृतिदीप' (१९४०), 'नवा हिंदुधर्म' (१९४२), 'धर्मशास्त्रमंथन' (१९३३), 'हिंदुसमाज समर्थ कसा होईल,' 'हिंदुधर्म शिक्षण' इत्यादी त्यांची पुस्तके मौलिक विचारांची आहेत.

१९२६ साली त्यांनी प्राज्ञ पाठशाळेचा राजीनामा दिला व वयाच्या ३८ व्या वर्षी विवाहबद्ध होऊन ते मिरज येथे कायम वस्ती करून राहिले. त्यांचे धर्मसुधारणेचे प्रचारकार्य मात्र अखंड अखेरपर्यंत चालूच राहिले. प्राज्ञ पाठशाळेचा प्रचार करीत असताना मुंबई येथे ट्राममधून त्यांचा पाय घसरून जबर दुखापत झाली; दुखापत साधारणपणे बरी झाली परंतु एक पाय कायम अधू राहिला. परंतु त्यांचे देशपर्यटन वयाच्या ७० वर्षेपर्यन्त चालूच होते. कधी दमले-भागले नाहीत व मनाचा उत्साहही कधीच घटला नाही.

महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनात शुद्धी निर्माण करण्याकरिता त्यांनी आटोकाट परिश्रम केले. धर्मभोळेपणावर त्यांनी कडाडून हल्ला चालविला होता. बुद्धिनिष्ठ धर्माची तात्त्विक बैठक अधिक शुद्ध पायावर उभारून हिंदू समाज सामर्थ्यशाली य विजिगीषू कसा होईल व हिंदू हे सनातन राष्ट्र जगामध्ये सामर्थ्याने कसे तळपू लागेल, याचाच विचार करीत राहिले व आयुष्यभर त्याच विचारात त्यांची समाधी लागली होती. उपासनी महाराज, नारायण

महाराज इत्यादी आधुनिक बुवा मंडळींची व शिष्यांची ढोंगबाजी त्यांनी 'किर्लोस्कर' मासिकातून बाहेर काढली. त्यामुळे बुवाबाजीच्या नादी लागलेले भोळे लोक आणि लफंगे व स्वार्थी शिष्यगण त्यांच्यावर संतापून उठले. त्यांच्यावर न्यायालयात खटलाही भरण्यात आला. परंतु ते त्यातून दोषमुक्त झाले. या त्यांनी चालविलेल्या बुवाबाजीच्या चळवळीच्या मुळाशी त्यांना केवळ शुद्ध हिंदू धर्माची स्थापना कशी होईल याचीच विवंचना होती. कथाकीर्तनातून ते साधुसंतांच्या व देवदेवतांच्या चमत्कारकथाही खुलवून सांगत; परंतु त्या चमत्कार कथांचा नैतिक व तात्त्विक अर्थही उलगडून सांगत. भोळा भाव हा अज्ञानाचा स्वभाव होय; ही समर्थोक्ती सांगण्यास ते विसरत नसत. धार्मिक भोळ्याभावाने माणसाचा नैतिक अधःपात होतो, उद्धार होत नाही, असा विचार ते पटवून देत असत.

श्री. महादेवशास्त्री दिवेकर दीर्घायुषी जीवन जगले. प्रथमपासून त्यांना व्यायामाची गोडी होतीं. तारुण्यात शीतऋतूमध्ये ते सूर्यनमस्कार १२०० पर्यन्त घालीत असत. प्राज्ञपाठशाळेच्या विद्यार्थ्यांकडून नियमित व्यायाम करून घेत. आखाड्यात कुस्ती खेळण्याचा नाद नव्हता, परंतु वाईत व महाराष्ट्रात जे तालमीचे आखाडे सगळीकडे अनादिकालापासून चालत आलेले होते, त्या तालीमखान्याच्या वस्तादांना ते अनेक प्रकारे उत्तेजन देत असत. मैदानी खेळ मेळून शूर माणसे तयार व्हावीत व त्यांनी हिंदू राष्ट्राला बळकटी आणावी असा ते कथाकीर्तनातून उपदेश करीत. ते राष्ट्रीय कीर्तनकार होते; परंतु चालू राजकारणावर कथा कीर्तनातून विस्ताराने कधीही ते बोलत नसत. धर्म व तत्त्वज्ञान हाच त्यांच्या प्रतिपादनाचा मुख्य विषय असे. नारदाच्या गादीची प्रतिष्ठा ते निक्षून सांभाळीत. तथाकथित राष्ट्रीय कीर्तनकारांचा मुख्य भर लोकिक प्रचलित विषयांवर असतो हे त्यांना मान्य नव्हते; त्यामुळे धर्मही साधत नाही व व्यवहारही साधत नाही असे त्यांचे मत होते.

लो. टिळक व म. गांधी या दोन्ही नेत्यांवर त्यांची नितांत निष्ठा होती. टिळकांच्या श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वाचे तर ते पुजारी होते. महादेवशास्त्री दिवेकर म्हणजे मूर्तिमंत धार्मिक ज्योत; ती गेल्या ८ ऑगस्टला (१९७१) सोलापूरला मावळली. जुन्या पिढीतला एक महान धर्मप्रवक्ता कायम निघून गेला!

(नवभारत, सप्टेंबर, १९७१, पृ. १ ते ३)

○○○

६१

कै. वासुदेवशास्त्री कोनकर

गेल्या २५ नोव्हेंबर १९७६ ला सायंकाळी ८-३० वाजता वासुदेवशास्त्री यांचे निधन विलेपार्ले येथे त्यांच्या निवासस्थानी झाले. जवळ त्यांचे एकुलते एक चिरंजीव श्री. राजाभाऊ कोनकर व त्यांच्या सूनबाई होत्या. तत्पूर्वी दिनांक १ नोव्हेंबर १९७६ ला वासुदेवशास्त्री यांच्या पत्नी गोदूताई यांचे पक्षाघाताने निधन झाले. पक्षाघाताच्या विकाराने त्यापूर्वी सुमारे पाच वर्षे त्या आजारी होत्या. सगळी इतर कामे बाजूला सारून वासुदेवशास्त्री यांनी पत्नीची सर्व प्रकारे एकनिष्ठेने सेवा केली. शुश्रूषेस सेविका ठेवण्याइतकी त्यांची सांपत्तिक स्थिती नव्हती. स्वतः वासुदेवशास्त्री धार्मिक वृत्तीचे असल्यामुळे त्याही स्थितीत संध्या, पूजा, स्तोत्रपाठ इत्यादी धार्मिक अनुष्ठान सतत सुरू होते. वासुदेवशास्त्री यांचे निधनसमयी वय ७५ वर्षांचे होते. त्यांना काही वर्षांपूर्वी हृदयविकार उद्भवला होता. तरी मध्यंतरी प्रकृती ठीक होती. रोज दोन तीन मैल चालण्याचा परिपाठ त्यांनी ठेवला होता. पक्षाघाती व्यक्तीची दीर्घ आजारामध्ये सेवा ही फार कष्टाची असते. अशी कष्टाची सेवा निरंतर शांत चित्ताने त्यांनी केली.

त्यांचा जन्म कुलाबा जिल्ह्याच्या सुधागड तालुक्यात गणपतीच्या पालीजवळील सिद्धेश्वर या गावी झाला. त्यांचे वडील विष्णुशास्त्री व चुलते कृष्णशास्त्री हे कीर्तनकार होते. या घराण्यात कीर्तनकाराचा व्यवसाय अनेक पिढ्या चालू होता. वासुदेवशास्त्री यांचे चुलत बंधू महादेवशास्त्री व नारायणशास्त्री हेही संस्कृतचे उत्तम विद्वान होते. त्यांचे तिसरे चुलत बंधू दामोदरशास्त्री कोनकर हे संस्कृतचे विद्वान असून ते पुणे येथे वैद्यकीचा व्यवसाय अजून करतात. या घराण्यातील बऱ्याच व्यक्ती दीर्घायुषी झाल्या. बहुतेकांचे वय ७५ वर्षांच्या पुढचे होते. श्री वासुदेवशास्त्री व बाकीचे तिघेही बंधू यांचे संस्कृतचे व शास्त्रांचे अध्ययन मुख्यतः वाई येथे ब्र. भू. केवलानन्द सरस्वती यांच्यापाशी झाले होते.

वासुदेवशास्त्री कोनकर हे वयाच्या तेराव्या वर्षी वाई येथे प्राज्ञपाठशाळेत वेद व संस्कृत

यांच्या अध्ययनाकरिता येऊन दाखल झाले. तीन वर्षे ऋग्वेद संहितेचे अध्ययन केले. श्रावणी, उपनयन, विवाहादी संस्कार, श्राद्ध, पूजा इत्यादी याज्ञिकीचे म्हणजे कर्मकाण्डाचेही येथे त्यांनी अध्ययन केले. नंतर संस्कृत काव्ये व व्याकरण शिकून वेदान्त व धर्मशास्त्र शिकले. भागवतादी पुराणांचा अभ्यास केला, रामायण व महाभारत यांचे त्यांनी अनेक वेळा वाचन केले होते; व त्यांना या ग्रंथांची उत्तम उपस्थिती होती. कीर्तनाचाही अभ्यास करण्याचा त्यांनी प्रयत्न केला, परंतु गायनाचा गळा नसल्यामुळे त्यांनी कीर्तनाचा व्यवसाय पत्करला नाही.

त्यांनी अध्ययन संपल्यानंतर प्राज्ञपाठशाळा मंडळाची अनेक प्रकारांनी जन्मभर सेवा केली. प्रचारक म्हणून महाराष्ट्रभर वर्गणी गोळा करण्याचे कार्य केले. हे काम करीत असता ते प्रवचने करीत व धर्मसुधारणेच्या तत्त्वानुसारे व्याख्यानेही देत. उत्कृष्ट वक्तृत्वामुळे त्यांची छाप पडत असे. व्याख्यानात व प्रवचनात शास्त्राधार मुखोद्गत म्हणून दाखवीत असत. त्यांना प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या संचालक मंडळाने 'प्रवचनपटु' हा किताब दिला होता. मन समाधानी आणि वृत्ती शांत होती. कधीही कठोरपणे वादविवाद करीत नसत. गोड बोलून मधुर वाणीने लोकांना वश करण्याची हातोटी विलक्षण होती, धर्मकोशाच्या संपादकीय कार्यातही प्रथम काही काळ त्यांनी भाग घेतला होता. धर्मसुधारणेच्या तत्त्वाप्रमाणे ब्राह्मण पोटजाती वधुवरांचे अनेक विवाहांचे त्याचप्रमाणे काही आंतरजातीय विवाहांचेही पौरोहित्य केले. प्राज्ञपाठशाळा मंडळ या संस्थेचे आजीव सेवक म्हणून मोठ्या निष्ठेने त्यांनी अनेक कामे पार पाडली. प्राज्ञप्रेस हा एक या संस्थेचा महत्त्वाचा भाग होय, तो १९४० साली सुरू झाला. हा उद्योग तसेच 'नवभारत' मासिक ऊर्जितावस्थेत येण्याकरिताही त्यांनी परिश्रम केले. प्राज्ञपाठशाळेच्या कार्याकरिताच मुंबईमध्ये ते सुमारे १६ वर्षे अखेरच्या कालखंडात बिऱ्हाड करून राहिले. ध्येयनिष्ठा, सौजन्य, मधुर स्वभाव इत्यादी त्यांचे गुण कायम स्मरणात राहतील असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. ब्र. भू. केवलानन्द सरस्वती यांच्या हाताखाली अनेक कर्तबगार व्यक्ती झाल्या. त्यांच्यात वासुदेवशास्त्री यांचे स्थान महत्त्वाचे आहे.

(नवभारत, जानेवारी, १९७७. पृ. ६७-६८)

○○○

इतिहास

६२

प्रा. नरहर रघुनाथ फाटक

गेल्या एप्रिल १५ तारखेस प्रा न. र. फाटक यांच्या वयाला सत्तर वर्षे पूर्ण झाली. त्यांचा जन्म १५-४-१८९३ साली मावळात. त्या वेळच्या भोर संस्थानातील जांभळी या खेडेगावात झाला. उंच सह्याद्रीचा परिसर, सुंदर वनश्री, मधुर जलसंचय, जोमदार हवा व काटक प्रकृतीची माणसे हे मावळ भागाचे वैशिष्ट्य होय. त्यांचे बालपण, किशोरवयाची वर्षे बहुतेक उत्तर हिंदुस्थानात गेली. माध्यमिक शिक्षण पुण्यात न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. उच्च विद्यापीठीय शिक्षणाचे पहिले वर्ष पुण्यात आणि बाकीचे बी. ए. पर्यंतचे उच्च शिक्षण अजमेर, इंदूर व अलाहाबाद येथे झाले. बी. ए. ला ऐच्छिक विषय तत्त्वज्ञान होता व त्याच विषयात ते पदवीधर झाले; परंतु संस्कृत, इतिहास व अर्थशास्त्र हे विषय अत्यंत आवडीचे म्हणून महाविद्यालयीन अध्ययनाच्या काळातच अभ्यसिले. वडिलांची नोकरी उत्तर हिंदुस्थानात झाल्यामुळे राजस्थान, माळवा, उत्तर प्रदेश या भागांतील मोठमोठ्या शहरांत सुबत्तेच्या काळात पहिल्या उमेदीच्या व शिक्षणाच्या वयात उत्तर भारताचे प्रसन्न, उत्साही व सुखी वातावरण अनुभविले. उपनिषदात याज्ञवल्क्यमुनीने शिक्षणाबद्दल म्हटले आहे की मातृमान्, पितृमान्, आचार्यवान् वेद, माता, पिता व आचार्य यांच्यापासून जेवढे शिक्षण मिळणे शक्य असते तेवढे मिळाले आहे. अध्ययनाला शिस्त असावी लागते तरच अध्ययन दृढ बनून वैचारिक शक्ती येते. उत्तम स्मरणशक्ती व विवेचकबुद्धी असूनही अध्ययनाला शिस्त नसेल तर त्याचा कमी उपयोग होतो. वडिलांच्या प्रेमळ परंतु करड्या देखरेखीखाली मराठी व संस्कृत शिक्षणाचा पाया घातला गेला. तपशीलवार व प्रमाणशुद्ध अध्ययनाची सवय फाटक यांना लागली. उत्तर हिंदुस्थानात मध्यमवर्गीय शिक्षित समाजात त्या वेळी उर्दूची कदर विशेष होती. त्यामुळे उर्दू भाषेनेही संस्कार मिळाले. भारताचा अद्ययावत इतिहास आणि प्राचीन व अर्वाचीन मराठी साहित्य या विषयात एक मोठी अधिकारी व्यक्ती म्हणून महाराष्ट्रात फाटक यांस असाधारण स्थान प्राप्त झाले आहे; या गोष्टीची प्राथमिक

तयारी पहिल्या वयातच झाली. 'रामविजय', 'हरि विजय', 'दासबोध' इत्यादी ग्रंथांचे वाचन मातु:श्रींकरिता लहानपणी केले. त्यामुळे प्रासादिक साहित्याची अवीट गोडी लागली व ती कायम टिकली. महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रारंभ होताना व माध्यमिक शिक्षण संपताना नुकत्याच स्थापन झालेल्या पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळाशी व त्यातील संशोधक व व्यासंगी व्यक्तींशी संबंध आला व संशोधनाची गोडी लागली; त्यांच्या ओळखी होऊन मैत्री जडली. कै. पांडुरंग नरसिंह पटवर्धन, कै. तात्यासाहेब मेहेंदळे, सरदार आबासाहेब मुजुमदार, श्री. वा. सी. बेंद्रे, महामहोपाध्याय द. वा. पोतदार इत्यादी मंडळींचे साहचर्य लाभले. श्री. द. वा. पोतदार यांची ओळख दृढ होऊन मैत्री उशिरा झाली. पटवर्धन व बेंद्रे यांचा परिचय अगोदरच दृढ झाला होता. भारत इतिहास संशोधन मंडळाकडे मन इतक्या लवकर ओढले गेले, याचे कारण वडिलांच्या ग्रंथ संग्रहांतील पारसनीस, खरे, राजवाडे इत्यादी इतिहास संशोधकांच्या ग्रंथांकडे वारंवार नजर जाऊन या नजरेतूनच इतिहासाच्या महतीचे प्रेम जडले हे होय. इतिहासज्ञानाची पात्रता जशी जशी वाढत गेली तसतशी मराठी व इंग्रजी इतिहासाधनांचे वाचन करण्याची गोडी वाटली.

शालान्त परीक्षा किंवा महाविद्यालयीन पदवी परीक्षा यात परीक्षेतील उच्च गुणांक भरपूर संपादन करून डोळ्यात भरणारे यश फाटक यांना मिळाले नाही. शालान्त परीक्षा व विद्यापीठीय परीक्षा यात विशेष ठसठशीत यश किंवा विक्रम दाखविणारे विद्यार्थी विद्यापीठोत्तर आयुष्यक्रमात विद्वत्तेच्या क्षेत्रात यश वा विक्रम दाखवितातच असे हमी देऊन सांगता येत नाही. यासंबंधात व्यस्त प्रमाण किती आहे हे जरी संख्यानशास्त्राप्रमाणे सांगता आले नाही तरी अपेक्षाभंग करण्याइतके व्यस्त प्रमाण खास आहे, असे निरीक्षणावरून सांगता येते. किंबहुना विद्यापीठातील यशावरून व विक्रमावरून विद्वत्तेतील भावी यश वा विक्रम अनुमित करणे धोकादायक आहे, विद्यापीठातून उत्तीर्ण झाल्यानंतर बौद्धिक प्रगतीची सीमा संपलेली उदाहरणे कमी सापडणार नाहीत. व्यासंगाने व पांडित्याने नमावयास लावतात अशी जी उदाहरणे सापडतात, त्या उदाहरणांच्या मालिकेत फाटक हे झळकत आहेत.

उच्च वृत्तपत्रकार, उत्कृष्ट शिक्षक व उत्तम पंडित म्हणून श्री. फाटक यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. खाजगी बैठकीत फाटकांची चर्चा चांगली रंगते. त्यात इतस्तत: अनेक विषयोपविषय निघतात. सहजासहजी बहुगामी विद्याव्यासंगाचा प्रत्यय त्यात मिळतो. 'यास्तेषां स्वैरकथास्ता एव भवन्ति शास्त्राणि।' ही उक्ती त्यांच्या संवादांना समर्पकपणे लागू पडते. परखड, तिखट, धारदार व उपरोधिक लेखक म्हणून त्यांची प्रसिद्धी आहे; वादात ते कधी हार गेलेले नाहीत, मोठमोठ्या धेंडांची तोंडे त्यांनी बंद केली आहेत. लेखनशौंड घ साहित्यसम्राटही त्यांनी गप्प बसविले आहेत. त्यामुळे हे एक उग्र प्रकृतीचे गृहस्थ आहेत असा कयास करून अनेक जिज्ञासू लोक त्यांच्यापासून दूर राहतात, संबंध टाळतात. कित्येक वेळा संबंध आल्यानंतर त्यांच्या हजरजबाबी, कडक स्वभावाचे प्रत्यंतर मिळवून कित्येक

व्यक्ती त्यांना दुरून रामरामही टोकतात. दृढ धारणाशक्ती व हजरजबाबीपणा असल्यामुळे त्यांचा धाक जसा वाटतो तसे त्यांचे आकर्षणही वाटते. देशकालप्रसंगांची अचूक नोंदणी करणाऱ्या स्मृतिपटाचे बंदिस्त स्थानासारखे त्यांचे मन आहे. धैर्य धरून त्यांच्या सान्निध्यात जे लोक हट्टाने बैठक मारतात, त्यांच्या मनातील धाक हळूहळू नाहीसा होतो; त्यांच्यातील ऋजु व मधुर वृत्तीचा अनुभव येतो, दुरून जे वाटत होते तो भ्रम होता अशी खात्री पटते.

फाटक यांनी अगणित मित्र जोडले आहेत. त्यांच्या स्वभावातील खाचाखोचा संभाळण्याचे ज्यांना साधले ते त्यांचे मित्र बनतातच. हे संभाळण्याची जरुरी जे स्वतःची प्रतिष्ठा मोठी मानतात त्यांना वाटत नसते. परंतु ज्यांना स्वतःचा मोठेपणा संभाळण्याचे महत्त्व वाटत नाही, त्यांना फाटक यांच्या स्वभावातील खाचाखोचा समजल्यावर धोरण संभाळण्याचीही गरज नाही. फाटकांचा स्वभाव हा सहानुभूतीचा नित्य वाहता निर्मळ झराच आहे. त्यांच्या स्वभावात एक उष्ण प्रवाह आहे व एक शीत प्रवाह आहे. दोन्हीही प्रवाह सारख्याच मोलाचे आहेत. त्यांचे केव्हा बिनसेल याचा नेम नाही असा ज्यांचा संभव वाटतो अशाही व्यक्ती फाटक यांच्या मित्रवर्गात आढळतात. कलापूर्ण व उत्तम चिकित्सक असे नमुनेदार लेखन करण्यात सिद्धहस्त असलेल्या श्रीमती दुर्गा भागवतांसारख्या विदुषी फाटकांच्या खाजगी संवादात मशगुल झालेल्या आढळतात. फाटकांचे कोणाशीही जमते असे त्यांच्यावर लोभ ठेवणाऱ्या विविध व्यक्तींवरून अनुमानिता येते. त्यात न्हावी, व्यापारी, कलावंत, धोबी, महारसुद्धा दिसतात. त्यांच्या मित्रमंडळींमध्ये ढोंगी, सोंगी माणसेही सापडतील. मात्र केव्हा फटकारा बसेल याचा नियम नाही हे त्यांनी धरून चालावे लागते. काही ढोंगी सोंगी माणसे मानभावीपणे वाटेल तसे फटके सोसण्याइतके चिवट असतात. मुंबईसह महाराष्ट्राच्या गेल्या साडेतीनशे वर्षांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक इतिहासातील व्यक्तिविशेष आणि प्रसंगविशेष यांचे तपशीलवार वर्णन मनोरंजक व विवेचक पद्धतीने ऐकायचे असेल तर फाटक यांच्या बैठकीत बसावे. विशेषतः अव्वल इंग्रजीपासून आजतागायतचे महत्त्वाचे नाट्यमय प्रसंग व त्यातील व्यक्तिरूप पात्रे यांचे चित्र फाटक शब्दांनी डोळ्यांसमोर उभे करतात. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राची व मुंबईची जडणघडण कशी झाली याचे तपशीलवार, विवेचक व यथार्थ वर्णन करण्यास समर्थ विद्यमान व्यक्तींत फाटकांइतका कोणी असेल असे वाटत नाही.

फाटक यांची वैचारिक बैठक उदारमतवादी रानडे गोखले यांच्या परंपरेतील आहे. भारत इतिहास संशोधन मंडळाचे स्फूर्तिस्थान असलेले कै. वि. का. राजवाडे यांनी अव्वल दर्जाचे फार मोठे इतिहाससंशोधन केले असले तरी त्यांची ऐतिहासिक उपपत्ती पुराणमतवादी आहे. भारतीय सनातनी राष्ट्रवादाचे अधिष्ठानावर त्यांची ऐतिहासिक उपपत्ती उभारलेली आहे. राजवाड्यांच्या दृष्टिकोनाचा व ऐतिहासिक उपपत्तींचा प्रभाव फाटक यांच्या विचारपद्धतीवर बिलकूल पडलेला नाही. फाटक यांची विवेचक दृष्टी रानडे गोखले यांच्या उदारमतवादाने व

बुद्धिवादाने भारलेली आहे. पूर्वजांची थोरवी गाणारी पुराणकथा असे रूप राजवाडे यांच्या परंपरेतील इतिहासकार इतिहासाला देतो. उलट फाटक यांच्या इतिहासदृष्टीला वस्तुनिष्ठा प्राप्त झालेली आहे. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या गेल्या तीनशे वर्षांच्या इतिहासातील अनेक अद्भुतरम्य पौराणिक कथांची काल्पनिकता उघडकीस आणली. रामदास आणि शिवाजी या गुरुशिष्यांच्या जोडीतील श्री समर्थ रामदास हे शिवाजीच्या राजकारणात गुप्तरूपे प्रत्यक्ष उलाढाली करणारे राजकीय गुरू होते; महाराष्ट्रात व सर्व भारतभर संत रामदासांनी महंताचे ११०० मठ स्थापून गुप्त राजकारणाचे जाळे पसरले होते, देशभर पसरलेल्या मुसलमानी राज्यसत्तेचे अंतस्थ डावपेच, मर्मस्थाने व राजकीय उलाढाली यांची दैनंदिन बित्तंबातमी रामदासांकडे व शिवाजीकडे पोचविणारी महंत मंडळी या अकराशे मठांत राहात होती; अफजुलखानाचा वध, शाहिस्तेखानावरील हल्ला, शिवाजीची आग्र्याहून सुटका इत्यादी घटनांच्या पाठीशी या महंत मडळींचे गुप्तपणे चाललेले संचार शिवाजीच्या राजकीय यशास कारणीभूत झाले. अशा तऱ्हेची बृहत्कथा राजवाडे संप्रदायाने रचली होती. या कथेचे काल्पनिकत्व व निर्मूलत्व सिद्ध करण्यास फाटक यांनी निर्णायक असा युक्तिवाद केला. रामदास हे शिवाजीचे राजकीय गुरू होते की केवळ परमार्थाचे गुरू होते याची पुरी शहानिशा विविधज्ञानविस्तारातील लेखनमालेत (इ. स. १९२९) मध्ये केली. रामदासांचे चित्रशाळेतर्फे प्रसिद्ध झालेले चरित्र व मौज प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित झालेला रामदास हा प्रबंध त्यांच्या रामदासी समग्र साहित्याच्या व्यासंगाची साक्ष पटवितात. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादी संतांच्या प्रासादिक साहित्याचीही आधुनिक सामाजिक व ऐतिहासिक समीक्षेच्या दृष्टीने त्यांनी आलोचना चालविलेली आहे. त्यांच्या ज्ञानेश्वर व एकनाथ या प्रबंधात याचे प्रत्यंतर मिळते. भारताच्या प्राचीन व अर्वाचीन अशा समग्र इतिहासाचा दीर्घ व्यासंग त्यांनी केला आहे; परंतु त्यातल्या त्यात क्रमाने मुसलमानी बादशाही, मराठी राजवट व इंग्रजी अंमल यात जितके अलीकडे यावे तितका व्यासंगाचा सर्वांगीणपणा वाढता व सखोल बनलेला दिसतो. भारताच्या राष्ट्रीय एकतेची घडण व विशेषत: हिंदू-मुसलमानांच्या सामाजिक व सांस्कृतिक समरसतेची रचना गेल्या ६ शे वर्षांच्या संघर्षात कशी होत होती याचे तपशीलवार विवेचन करून भारताच्या राष्ट्रीयतेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे सम्यक स्वरूप निदर्शनास आणणारे जे थोडे इतिहासचिंतक आहेत, त्यात फाटक यांची गणना केली पाहिजे. त्यांनी जितके लिहिले आहे त्याच्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक लिहिण्याची साधन सामग्री स्वतःच्या स्मरणधारणेच्या दालनात विवेचकपणे त्यांनी साठवून ठेवली आहे. मराठ्यांच्या इतिहासातील विशेषतः पेशवाईवरील त्यांची विवरणे अत्यंक विदारक व उद्बोधक अशी त्यांच्या व्याख्यानात व बैठकीतील चर्चेत ऐकावयास मिळतात. त्यांच्या बहुश्रुततेच्या संभाराला सागरातील हिमपर्वताचीच उपमा दिली तर शोभेल. दिसणाऱ्या भागापेक्षा झाकलेला भागच अधिक विस्तृत व भारी आहे. संस्कृत, इंग्लिश व मराठीमधील

ललित व वैचारिक साहित्य यांचे त्यांनी केलेले सखोल अध्ययन हे त्यांच्या इतिहासज्ञानाचे एक प्रधान अंग आहे.

साहित्याच्या व इतिहासाच्या मूल्यमापनाचा त्यांचा निकष त्यांच्या निःस्पृह विवेचकतेचा सूचक आहे. इ. स. १८५७ चे बंड व त्यातील वीरयुवती झाशीची लक्ष्मी यांची कथा आपल्या पूर्वेतिहासातील देशभक्तीची प्रेरणा निर्माण करणारी मानली जाते. ५७ चे बंड हे राष्ट्रीय स्वातंत्र्याचे युद्ध होय व त्या युद्धातील तेजोमयी शक्तिदेवता झाशीची लक्ष्मी होय; असे तात्पर्य काढण्याचा राष्ट्रीय इतिहासकारांचा प्रयत्न पोकळ व निराधार कल्पनांवर आधारलेला आहे व त्या बंडात राष्ट्रीय स्वातंत्र्याची प्रेरणा नव्हती, ही गोष्ट जनतेच्या अप्रीतीची व शिष्टांच्या क्षोभाची पर्वा न करता सत्यसंशोधकाच्या निष्ठेने फाटकांनी सप्रमाण सिद्ध केली. इतिहासकाराला सत्याच्या विजयाकरिता समाजसुधारक किंवा धर्मसुधारक यांच्यासारखेच संकटाना तोंड द्यावे लागते; विज्ञानाच्या अनेक पश्चिमी शोधकांना जिवावरील आपत्तीचे प्रहार सहन करावे लागले, तशीच इतिहाससंशोधकावरही पाळी येते; सत्याचे आविष्करण कठोर व कटू असते; अशा इतिहासज्ञाचे उत्कृष्ट उदाहरण फाटक होत. हे त्यांनी इ. स. ५७ सालच्या बंडासंबंधी सत्याची बाजू घेऊन दाखवून दिले आहे.

रामदास व ५७ चे बंड याशिवाय तिसरे महत्त्वाचे प्रत्यंतर कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्राची व साहित्याची इ. स. १९३० साली विविध ज्ञान विस्तारात तीन लेखांकांनी केलेली समालोचना होय. रानडे व गोखले यांच्या परंपरेने दिलेल्या उदारमतवादाचे निकष वापरून श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या कार्याचे निर्भिड मूल्यमापन करण्याचा श्रेष्ठ मान फाटक यांच्याकडे जातो. विष्णुशास्त्री चिपळूणकर आधुनिक मराठी गद्याची आद्य प्रतिष्ठापक देवता मानली गेली असल्यामुळे त्यांच्या विचारांतील दोषांचे उद्घाटन करणे म्हणजे मोठे पाखंडच रचणे होय; हे एक प्रकारचे अब्रह्मण्यम् म्हणून निंदास्पद ठरणारे पातकच मानले जात होते; कै. शिवराम महादेव परांजपे, कै. न. चिं. केळकर, कै. ज. स. करंदीकर इत्यादी मान्यवरांनी पूजनीय देवतेप्रमाणे मानलेल्या चिपळूणकरांचा प्रतिगामीपणा दाखवून त्यांच्या विचारातील वैगुण्य दाखविणे हे मोठ्या नैतिक धैर्याचे दर्शक काम होते. श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांस बदलत्या सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याच्या युगाचा उदय दिसत नव्हता, त्यांचे मन गतयुगाच्या अस्तंगत वैभवाच्या आराधनेत मग्न होते; याच्या स्पष्ट निशाण्या निबंधमालेत गोवलेल्या सापडतात. जोतिबा फुले, स्वामी दयानंद व लोकहितवादी यांच्यावरील चिपळूणकरांची अदूरदर्शी व उथळ टीका नव्या युगाच्या आगमनाची ओझरती वार्तासुद्धा नसल्याचे दर्शक होती. जोतिबा फुल्यांनी शंभर वर्षांपूर्वी जे अपेक्षिले ते आज महाराष्ट्र राज्यावर आलेले सत्ताधारी घडवीत आहेत. ज्या सामाजिक रचनेवर फुल्यांनी मर्मभेदी प्रहार केला, ती आज मुमूर्षु अवस्थेत पडली आहे. लोकहितवादींनी ब्राह्मणी विद्येवर व ब्राह्मणी

विचारसरणीवर शतपत्रांच्या धनुष्यातून बौद्धिक शरसंधान केले व पाश्चात्त्य विद्येचे आवाहन केले. आता ती शतपत्रे यथार्थ भविष्यवादी ठरली आहेत व लोकहितवादींच्या आकांक्षा पूर्ण होऊन पश्चिमी विद्या भारतीय विद्यासनाची सम्राज्ञी बनली आहे.

फाटक हे उत्कृष्ट चरित्रकार व चरित्रटीकाकार म्हणून नाणावलेले आहेत. त्यांनी भारतीय आधुनिक युगाच्या दोन प्रणेत्यांची म्हणजे म. गो. रानडे व गो. कृ. गोखले यांची चरित्रे लिहिली. त्यांपैकी रानडे यांचे चरित्र इ. स. १९२४ मध्ये प्रसिद्ध झाले आणि गोखले चरित्राचे हस्तलिखित आर्यभूषण छापखाना जळला तेव्हा त्या आगीत भस्मसात झाले. फाटक यांचे रानडेचरित्र हे बिनचूक व सुटसुटीत चरित्राचा नमुना आहे. रानडे हे युगकर्ते होते. त्या युगाच्या प्रारंभाची रूपरेषा या चरित्रामध्ये प्रतिबिंबित झाली आहे. महान व्यक्तींच्या चरित्रांची नोंद बिनचूक व व्यवस्थित रीतीने समकालीन व्यक्तींनीच केली तर बरी; नाहीतर त्या त्या कालखंडाचा इतिहासच थोड्याबहुत अंशाने विस्मृत व कालग्रस्त होतो असे म्हणावे लागते.

जगातील अत्यंत दीर्घकाल जगलेल्या ज्या काही थोड्या जागतिक संस्कृती आहेत त्यांपैकी भारतीय संस्कृती ही एक आहे. परंतु या संस्कृतीचा मोठा दोष म्हणजे हिला कालसंवेदनेचा म्हणजेच इतिहासप्रज्ञेचा अभाव आहे. ही मोठी उणीव आधुनिक भारतीय प्रज्ञावंतांच्यामध्येसुद्धा वंशपरंपरागत रीतीने आलेली दिसून येते. याचे ठळक उदाहरण म्हणजे साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचे टिळकचरित्र होय. न. चिं. केळकर हे लो. टिळकांचे निकटचे सहवासी व चिर सहकारी होते. तरीदेखील त्यांच्या टिळकचरित्रातील महत्त्वाच्या व्यक्तींच्या व प्रसंगांच्या नोंदी कशा साफ चुकल्या आहेत याचे सम्यक उद्घाटन फाटक यांनी विविधज्ञानविस्तार मासिकात १९२४ व १९२६ मध्ये केळकरांच्या टिळकचरित्रावरील समीक्षापर लेखमालेत केले आहे. ही फाटकांची लेखमाला त्या वेळी खूप गाजली. श्री. केळकर यांना स्वतःचे समर्थन करणे अशक्यप्राय झाले. याचे एकच ठळक उदाहरण द्यावयाचे झाले तर ते असे की, कै. आगरकर व कै. टिळक यांना क्रमाने कऱ्हाडे ब्राह्मण व चित्पावन ब्राह्मण लेखून यांच्यामध्ये जमातीतील भिन्न स्वभावविशेष दाखवून एक लांबलचक साहित्यिक कोटिक्रम केळकरांनी लिहिला आहे; परंतु आगरकर हे कऱ्हाडे नव्हते तेही टिळकांप्रमाणे चित्पावन ब्राह्मणच होते, ही गोष्ट पटल्यानंतरही व फाटक यांनी उघडकीस आणलेल्या कालनिर्देशाच्या चुका मान्य होण्यासारख्या असूनही नंतर पुष्कळ कालांतराने केळकरकृत समग्र ग्रंथात अन्तर्भूत केलेल्या टिळकचरित्रातील उघडकीस आणलेले दोष दुरुस्त न करता, आगरकर हे कऱ्हाडे आहेत, अशा प्रकारच्या चुकीच्या नोंदीसह, जसेचे तसे प्रसिद्ध केले आहेत.

कर्व्यांचे महिला विद्यापीठ व रामनारायण रुईया कॉलेज यामध्ये पुष्कळ वर्षे अध्यापनाची वयोमर्यादा ओलांडीपर्यंत फाटक यांनी मराठी साहित्याचे प्राध्यापन केले

आहे. या प्राध्यापनाच्या कालखंडात असंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी त्यांच्या हाताखाली शिकून तयार झाल्या. या विद्यार्थी-विद्यार्थिनींना टीकाकार पंडित या नात्याने फाटक जितके पटतात तितके साहित्याचे चोखंदळ रसिक या नात्याने पटत नाहीत, असे त्यांच्या परोक्ष केलेल्या चौकशीत आढळते. ते निर्भीड, प्रखर टीकाकार आहेत ही जशी त्यांची एक बाजू आहे तसेच सहानुभूतिपूर्ण रीतीने हळुवारपणे मर्मग्रहण करणारे रसिक म्हणूनही त्यांची दुसरी एक बाजू आहे हे त्यांच्या निकटच्या सहवासातल्या निरीक्षकांच्या ध्यानात भरते. एखादी गोष्ट पटली तर ते मुक्तकंठाने प्रशंसाही करतात. मात्र त्याकरिता त्यांच्यापाशी जाणाऱ्याने योग्य काळवेळ व मनस्थिती पाहून त्यांच्या समीप गेले पाहिजे. यासंबंधी त्यांच्या मर्मज्ञ रसिकतेबद्दल निर्वाळा देणाऱ्या तीन महाराष्ट्रीय विदुषींचा निर्देश करता येईल. त्या म्हणजे- दुर्गा भागवत, कुसुमावती देशपांडे व मालती बेडेकर या होत. या तिन्ही विदुषींच्या साहित्यिक प्रतिभेची व प्रज्ञेची मोकळ्या मनाने फाटक यांनी वारंवार प्रशंसा केली आहे. कविता, लघुकथा, प्रशस्तकथा (कादंबरी), आत्मचरित्र, वृत्त, प्रवासवृत्त, विनोद, उपरोध, समीक्षा, चरित्र, आत्मचरित्र, ललितनिबंध, निबंध, नाटक, नाटिका इत्यादि साहित्याच्या विविध आकृतिविशेषांचा परामर्श फाटक चांगल्या रीतीने घेऊ शकतात. त्यांच्या स्वतःच्या लेखन शैलीला प्रासंगिक व स्वैर वातावरणामध्ये लालित्याचा आकार व रंग लवकर येतो. ते स्वतः वक्तृत्व करीत असताना किंवा चर्चा करीत असताना त्यांच्यातील ललितशैलीचे चमत्कार मधूनमधून प्रकट होतात, परंतु ही त्यांची ललितशैलीची लीला ते विद्यापीठीय दर्जाचे लेखन करू लागले की पूर्ण लुप्त होते. एक प्रकारे करकचून आवळलेले व माहिती ठासून भरलेले असे ते लेखन असते. यास त्यांचे वृत्तपत्रीय लेखनच तेवढे अपवाद होय.

वृत्तपत्रकारांच्या जगातून विधियुक्तपणे सेवानिवृत्त होऊन फाटकांची पुष्कळ वर्षे झाली आहेत. परंतु एक खंदा वृत्तपत्रकार म्हणून त्यांची कीर्ती अजूनही तितकीच उज्ज्वलपणे कायम राहिली आहे. वृत्तपत्राचे संपादक या नात्याने कारभार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर इ. स. १९१८ साली पडली. इ. स. १९१८ ते १९३५ पर्यंत ते वृत्तपत्रांच्या जगात बैठक मारून बसले होते. इ. स. १९१८ ते १९२४ पर्यंत नेमस्त पक्षाचे 'इंदुप्रकाश' हे दैनिक त्यांनी चालविले व इ. स. १९२३ पासून १९३५ पर्यंत कै. कृ. प्र. खाडिलकर यांच्या छायेत 'नवाकाळ' दैनिकाचे संपादकीय काम केले. मुंबईतील दैनिक वृत्तपत्राचा विद्वान व विचक्षण संपादक म्हणून त्यांनी अनन्यसामान्य अशी प्रतिष्ठा मिळविली. गेल्या दीडशे वर्षांतील भारताच्या राजकीय आर्थिक व सांस्कृतिक घडामोडींचे व आंदोलनांचे सर्वोत्तम केन्द्रस्थान म्हणून मुंबई ही नगरी मान्यतेस पावली. या मुंबईतील राजकीयदृष्ट्या आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रीय सुशिक्षित वर्गास फाटक यांनी आपली बौद्धिकदृष्ट्या परिणामकारक अशी भूमिका गाजवली. नेमस्त पक्षाच्या फिरोजशहा मेहतांसारख्या महनीय व्यक्तींना आणि प्रार्थना समाजाच्या अध्वर्यूंना जवळून पाहण्याचा योग लाभला. मुंबईतील व पुण्यातील

नेमस्त, जहाल व गांधीवादी अशा लहानमोठ्या व्यक्तींना जवळून समजावून घेण्याचे अनेक प्रसंग आले व त्यांच्या स्मृतिपटलावर ते कायम कोरले गेले. अनेक सार्वजनिक व्यक्तींच्या अंतरंगाचे व बहिरंगाचे दर्शन त्यांच्या तीक्ष्ण समालोचक दृष्टीला घडले. त्यामुळे त्यांचे वृत्तपत्रातील मर्मग्राही व मर्ममेदक असे लेख सार्वजनिक चर्चेचे विषय बनले. 'आलमगीर' या टोपण नावाखाली समयानुरूप टिप्पणी लिहिण्याचे काम 'विविधवृत्त' या साप्ताहिकात त्यांनी केले. त्यामुळे विविधवृत्त हे साप्ताहिक विचक्षण वाचकवर्गला अधिक आकर्षक वाटू लागले. हे मात्र येथे लक्षात ठेवले पाहिजे की 'आलमगीर' या विविधवृत्तातील सदराखाली लेखन करण्याचे काम फाटकांनी लवकरच सोडले. ते लिहीत होते त्या कालावधीतसुद्धा या सदराखाली इतरही टीकाकारांनी लेखन केले आहे.

मुंबई शहराच्या व महाराष्ट्राच्या वैचारिक आंदोलनात वर्तमानकाळी आता सत्तरी उलटत आली तरी फाटक हे अग्रभागी झळकत आहेत. मुंबई शहरातील मराठी साहित्य संघाच्या व मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या विद्यमाने अलीकडे प्रतिवर्षी प्रदीर्घ व्याख्यानमाला फाटक गुंफत असतात. समाज, धर्म, राजकारण, साहित्य, रामायण-महाभारताच्या सार्वजनिक जीवनातील कर्तबगार व्यक्ती इत्यादी विषयांचा परामर्श या व्याख्यानमालांच्याद्वारा ते घेत असतात. त्यांचा अष्टपैलू व्यासंग व इतिहासाच्या ऐतिहासिक घटनांचे चमकदार विवरण ऐकून चाणाक्ष सुशिक्षित श्रोतृवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांच्या व्याख्यानांमध्ये रमलेला दिसतो. या व्याख्यानमालांच्या निमित्ताने त्यांच्या अनेक नवीन पुस्तकांची विस्तृत टिपणे तयार झालेली आहेत. ह्या व्याख्यानमालांमध्ये भूतकाळाचा इतिहास प्रत्यक्ष वर्तमानकाळातच घडत आहे इतक्या कुशलतेने ते रंगवीत असतात.

त्यांचे खाजगी जीवन अगदी साधे आहे. वयाच्या ५५ वर्षांपर्यंत त्यांची प्रकृती सुदृढ व कणखर होती. पोशाखात रुबाब, आकर्षकपणा वा छाप पाडण्याचा भाग नसतो. अजूनही ते पंचावजाच धोतर नेसतात; जुन्या पद्धतीने क्षौर करतात; पान तंबाखूचा तेवढा शौक आहे; परंतु त्यांचा खरा शौक म्हणजे पुस्तकसंग्रहाचा होय. लक्ष्मीचे वरदान नसले तरी निर्वाहापुरते अन्न व आच्छादन मिळत राहिले आहे. त्यांची श्रीमंती त्यांच्या ग्रंथसंग्रहात दिसते. इतके मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तीला एवढा मोठा ग्रंथसंग्रह करण्याचा हव्यास म्हणजे एक सात्त्विक परंतु अनिवार्य व्यसनच समजले पाहिजे. अष्टपैलू व्यासंग असल्यामुळे संस्कृत, इंग्लिश, मराठी व हिंदी या चारी भाषांतील निवडक व संशोधनास व व्यासंगास उपयुक्त अशा उत्कृष्ट शेकडो पुस्तकांचा संग्रह प्रतिवर्षी ते शेकडो रुपये खर्च करून करीत राहतात. त्यांच्याकडे महाराष्ट्रीय किंवा अन्य प्रांतीय शिक्षक, प्राध्यापक, संस्थाचालक, सार्वजनिक कार्यकर्ते यांची येरझार चालू असते. या वारंवार येणाऱ्या अभ्यागतांची लोभी नजर या ग्रंथांवरून फिरत असते. उदार धनिकाप्रमाणे या लोभी अभ्यागतांना हे ग्रंथस्वामी विमुख पाठवीत नाहीत. अनेक अभ्यासू वा जिज्ञासू व्यक्तींना व सार्वजनिक संस्थांना फाटक

मुक्तहस्ताने ग्रंथदान करीत आले आहेत. वाई येथे प्राशपाठशाळेच्या केवलानंद स्मारक मंदिराच्या ग्रंथ संग्रहालयातील शेकडो बहुमोल ग्रंथ फाटकांच्या दानौघामधून प्राप्त झाले आहेत. प्राज्ञपाठशाळेच्या ग्रंथालयातील अनेक महत्त्वाची दुर्मीळ संस्कृत, इंग्लिश व मराठी पुस्तके फाटकांची स्वाक्षरांकित आहेत.

महाराष्ट्रातील अनेक संस्थासंचालक फाटकांच्या सार्वजनिक वजनाचा उपयोग करून घेतात व फाटक हे विनासंकोच आपल्या वजनाचा व परिचयाचा फायदा करून देण्यास सज्ज असतात. प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या संचालक समितीचे सुमारे तीस वर्षे फाटक सदस्य आहेत. प्रतिवर्षी वाईस त्यांची एकदा तरी भेट असते. ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती यांच्याशी त्यांचा दृढ परिचय होता. स्वामींवर फाटकांची नितांत भक्ती आहे. या संस्थेच्या विविध कार्याचा उत्कर्ष होण्याकरिता फाटक निरंतर सन्नद्ध असतात. आता त्यांची सत्तरी जरी उलटली असली तरी उत्साह मात्र तिशीच्या उमेदीतला आहे. शरीरप्रकृती अलीकडे नरम झालेली असली तरी विद्याव्यासंग पूर्वीइतकाच सतत चालू आहे. ते महाराष्ट्र राज्याच्या स्वातंत्र्येतिहास समितीचे सन्मान्य सचिव आहेत. त्यांनी आज जेवढी विद्यासाधना केली आहे, त्यातून अजूनही पुढील काही वर्षांत विविध विषयांवरील महत्त्वाची ग्रंथनिष्पत्ती ते करू शकतील अशी बळकट आशा बाळगता येते. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे ते सदस्य आहेत. त्यांच्याकडे या मंडळाच्या संकल्पित षट्खंडात्मक महाराष्ट्रेतिहासाचा आधुनिक काल हा खंड सोपविला आहे.

(नवभारत, मे, १९६३, पृ. १ ते ७)

○○○

६३

इतिहास संशोधक : कै. वि. का. राजवाडे

राजवाडे जन्मशताब्दी १९६४ मध्ये की १९६३ मध्ये?

या अग्रगण्य भारतीय इतिहास संशोधकाचा जन्मदिन कोणता? या संबंधात राजवाडे यांचे भक्त कै. भा. वा. भट यांनी विस्तृत लिहिलेल्या चरित्रात असे म्हटले आहे: "विसूभाऊंचा जन्म (टीप- श्री. दत्तोपंत पोतदार यांचा दिनांक ४ जानेवारी १९२७ चा केसरीचा लेख.) शके १७८६, आषाढ शुद्ध ८ म्हणजे दिनांक १२ जुलै इ. स. १८६४ रोजी झाला. त्यानंतर थोडेच दिवसांनी त्यांचे वडील इ. स. १८६७ साली वारले. या वेळी राजवाडे यांचे वडील बंधू वैजनाथ हे आठ वर्षांचे होते. वडील वारल्यामुळे राजवाड्यांची मातुश्री, वडील मुलगा वैजनाथ व लहान मुलगा विश्वनाथ यासह वरसईस मुलांच्या आजोबाकडे म्हणजे आपल्या वडिलांकडे राहण्यास गेली. राजवाड्यांचे चुलते जगन्नाथ बापुजी राजवाडे हे पुणे जिल्ह्यातील वडगाव या गावी मराठी वकील होते. इ. स. १८९५ च्या मे महिन्यात हे गृहस्थ वारले. त्यांच्या कुटुंबाचे नाव लक्ष्मीबाई असे होते; व ती पुढे १४-१५ वर्षे तिचे निधनापावेतो म्हणजे इ. स १९१० पावेतो वैजनाथपंत यांचेकडेच रहात होती. चुलत्यांचे कधी कधी वडगावी वैजनाथपंत व विसुभाऊ हे त्याच्याकडे रहावयास जात असत." (पृ. ४४) भट या चरित्रग्रंथात श्री. दत्तोपंत पोतदार यांच्या केसरीतील लेखाच्या आधारे राजवाड्यांचा जन्मदिन देतात. याविरुद्ध पुरावा मिळतो तो कै. साने गुरुजींनी लिहिलेल्या (अभिनव ग्रंथमालेतील ७ वे पुष्प) 'राजवाडे यांचे चरित्र' या पुस्तकात मिळतो. ते म्हणतात : "कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा जन्म शके १७८५ आषाढ शुद्ध अष्टमीस झाला. त्यांच्या आईचे नाव यमुना." शके १७८५ म्हणजे इ. स. १८६३ होय. राजवाडे यांचे छायाचित्र या पुस्तकास जोडले आहे. त्याच्या खाली जन्म, आषाढ शु. ८ शके १७८६ (सन १८६४) असे म्हटले आहे. त्याचा खुलासा करताना साने गुरुजी 'चरित्रलेखकाचे दोन शब्द' या प्रारंभीच्या निवेदनात म्हणतात की, राजवाडे यांच्या छायाचित्रावर जन्म शक

१७८६ घातला गेला, तो, कसरीतून घेतला गेला. परंतु राजवाडे तिलांजली अंकात १७८५ हा शक त्यांच्या कुंडलीत आहे. तोच खरा समजला पाहिजे. नव्या दिल्लीच्या साहित्य अकाडेमीतर्फे आम्ही संपादिलेल्या "राजवाडे लेखसंग्रह" या पुस्तकातील छायाचित्रावर जन्म १२ जुलै १८६४ दिला. परंतु प्रस्तावनेत साने गुरुजींच्या पुस्तकास अनुसरून जन्म आषाढ शु. ८, शके १७८५ (सन १८६३) दिला आहे. सानेगुरुजींचे म्हणणे प्रमाण मानणे अधिक सयुक्तिक वाटते, राजवाडे यांची जन्मशताब्दी सन १९६३ साल ठरते; चालू सन १९६४ ठरत नाही. भारतीयांच्या ऐतिहासिक जाणिवेत कालसंवेदनेची उणीव आहे, असे विधान स्पेंग्लर या इतिहास तत्त्ववेत्त्याने आपल्या Decline of the West या ग्रंथात केले आहे, त्याची असंख्य प्रत्यंतरे भारताच्या इतिहासात मिळतातच. आता त्याला दुजोरा विसाव्या शतकातील भारतीय सर्वोत्तम इतिहास संशोधकाचा जन्मसंदेहही देतो. वस्तुतः संदेह राहण्याचे कारण नाही. राजवाडे यांचे एक दुसरे भक्त व आमचे मित्र कै. वा. दा. मुंडले यांनी ही चूक पूर्वीच दुरुस्त केली होती. मुंडले स्वतः ज्योतिषी होते. ते वाईस १९४२ साली आमच्या प्राज्ञपाठशाळेत ४ महिने प्रकृतिस्वास्थ्याकरिता इस्लामपूरहून राहण्यास आले होते. तेव्हा त्यांनी आमच्या मुलामुलींच्या कुंडल्या लिहिल्या. त्यांनी वि. का. राजवाडे यांची जन्मकुंडली इतिहास संशोधकांचे वडीलबंधू वै. का. राजवाडे यांच्याकडून श्री. द वा. पोतदार यांच्या हस्ते आणवून राजवाडे तिलांजली अंकात प्रसिद्ध करून संशयनिवारण केले, असे आम्हांस सांगितले. जुलै ११, (१९६४) ला आम्ही अमेरिकेची यात्रा संपवून मुंबईस आल्यानंतर लगेच राजवाडे यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने नियतकालिकांचे रकाने भरून प्रसिद्ध होत असलेले पाहिल्याबरोबर मुद्दाम उपरिनिर्दिष्ट राजवाडे लेखसंग्रहाची आम्ही लिहिलेली प्रस्तावना पाहिली; त्यावरून हे सर्व आठवले.

प्राथमिक, मध्यम व उच्च शिक्षण

राजवाडे यांचे बालपण व प्राथमिक शिक्षण पुणे जिल्ह्यातील वडगाव येथे झाले. त्यांचे वडील बाळपणीच वारल्यामुळे शिक्षण प्रथम चुलत्याजवळ झाले. भाषा व गणित या दोन्ही विषयांत सारखीच उत्तम गती प्राप्त झाली. त्यांची प्रकृती कणखर व कष्ट सहन करणारी होती व ती तशी अखेरपर्यंत टिकली. याचे कारण लहानपणापासून शरीरश्रमाची आवड होय. मुळातच चांगली रग असल्यामुळे मस्ती, धांगडधिंगा, मारामारी करण्यात लहानपण गेले. विटीदांडू, आट्यापाट्या, खोखो, पोहणे व पळणे यांत पहिली किशोर अवस्था गेली. महाविद्यालयीन शिक्षण संपेपर्यंत हा नाद टिकला. यामुळे शरीरयष्टी बळकट व काटक बनली. जन्मभर कष्ट करण्याची हौस व उत्साह टिकला.

माध्यमिक व बहुतेक उच्च शिक्षण पुणे येथे झाले. त्यांनी आपले विद्यार्थी दशेतील शिक्षणविषयक अनुभव, 'कनिष्ठ, मध्यम व उच्च शालातील अनुभव' या विस्तृत (छापील ५० पृष्ठांच्या) लेखात नमूद केले आहेत. त्यांच्या आत्मचरित्राचे हे एक उत्तम प्रकरण आहे.

हा लेख उत्कृष्ट साहित्याचा एक नमुना म्हणून मराठीत कायम राहीलच, पण त्याशिवाय त्यांत त्या वेळच्या भारतीय शैक्षणिक संस्थांचेही दर्शन घडते आणि इंग्लिशांनी निर्माण केलेल्या शिक्षणपद्धतीच्या गुणवगुणांची गंभीर मीमांसा वाचावयास मिळते. राजवाडे यांची नैसर्गिक बुद्धिमत्ता विशाल होती. त्या बुद्धिमत्तेचा संपूर्ण उपयोग होऊन बौद्धिक प्रगती व्हावी अशा प्रकारचे सकस शिक्षण देण्याची योग्यता असलेल्या शिक्षकाचा आजसारखाच दुष्काळ त्या वेळच्या मध्यम व उच्च शिक्षणसंस्थांमध्येही होता. म्हणून राजवाडे यासंबंधी म्हणतात की, 'पंतोजी (शिक्षक) आडमुठे, पोटभरू, इकडची पाटी तिकडे नेऊन टाकणारे होते, जर चांगला शिक्षक (हायस्कूलमध्ये) मिळता तर ३ वर्षांत बी. ए. इतकी तयारी झाली असती.' मध्यम शिक्षण देणाऱ्या इंग्लिश शाळांबद्दल ते आपल्या लेखात असे सांगतात की, त्यांना एकंदर पुणे येथील तीन इंग्लिश शाळांमध्ये क्रमाने शिकण्याचा योग आला. प्रथम सन १८७६ मध्ये बाबा गोखले यांच्या शाळेत ते दाखल झाले. शाळेचे ठिकाण गलिच्छ, दुर्गंधाचे माहेरघर, पडक्या भिंती, जवळच उघडी गटारे, आणि पाट्यांचे पायखाने, शिक्षक चुकार, एका तासात ५-१० मिनिटेच वर्ग शिक्षण देत. नंतर ते वासुदेव बळवंत फडके (बंडवाले) यांनी स्थापन केलेल्या हायस्कूलमध्ये प्रविष्ट झाले. या संस्थापकाने सद्बुद्धीने शाळा काढली होती परंतु तेथेही नालायक शिक्षक पुष्कळ; नंतर ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या हायस्कूलमध्ये प्रवेश मिळविला. तेथेही अनेक शिक्षक व्यसनी, दारुडे व अनाचारी दिसले. सर्वत्र आचारहीन व देशभक्तीचा लेशही नसलेलेच शिक्षक भरलेले होते, त्यास मोठा अपवाद म्हणजे कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी स्थापलेले न्यू इंग्लिश स्कूल होय. यासंबंधी राजवाडे लिहितात की, ते स्थापताना चिपळूणकरांनी अशी प्रतिज्ञा केली होती की, आपल्या शिक्षणसंस्थेला गोऱ्या इंग्लिश साहेबाचा पाय लागू द्यावयाचा नाही. परंतु चिपळूणकर अल्पायुषी ठरले. त्यांच्याही संस्थेत संस्थाचालकांनी मागाहून इंग्लिश गोऱ्या अधिकाऱ्यांचे सुस्वागत करण्याची प्रथा सुरू केली.

सन १८८२ जानेवारीत राजवाडे मुंबई विद्यापीठाची प्रवेश परीक्षा (मॅट्रिक) उत्तीर्ण झाले. मुंबईच्या सुप्रसिद्ध एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये पहिली सहामाही काढली. नंतर पैसे नसल्यामुळे कॉलेज सोडावे लागून पोट भरण्याकरिता खाजगी माध्यमिक शिक्षण देण्याचा वर्ग काढला. पुढे १८८४ साली वडीलबंधू प्रा. वैजनाथ काशिनाथ राजवाडे यास पुणे येथील डेक्कन कॉलेजात फेलोशिप मिळाली. त्यामुळे वडील बंधूंच्या मदतीने डेक्कन कॉलेजात विश्वनाथपंत राजवाडे यांना शिक्षणास अवसर मिळाला. या कॉलेजात त्या वेळी भारतीय कीर्तीचे विद्वान न्यायकोशकर्ते म. म. भीमाचार्य झळकीकर, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर इत्यादी प्राध्यापक होते. या कॉलेजमध्ये राजवाडे यांनी ६ वर्षे काढली. १८९० साली जानेवारीत ते बी. ए. उत्तीर्ण झाले. क्रमाने प्रत्येक वर्षी ते परीक्षेम बसलेच नाहीत. लहर येईल तेव्हा एका वर्षाचा अध्ययनक्रम २ महिन्यात तयार करून परीक्षेस बसावयाचे

व उत्तीर्ण व्हावयाचे, मधली अनेक वर्षे गाळली, कारण कॉलेजमधील परीक्षेस नेमलेल्या अनेक पुस्तकांच्या अध्ययनात त्यांना कालक्षेप करणे आवडले नाही. तर्कसंग्रह, लॉर्ड बेकन इ. पुस्तके जुन्यापुराण्या बाधित सिद्धांतानी भरलेली होती. अतएव यांचे अध्ययन व्यर्थ होय, असे त्यांना वाटे. म्हणून त्यांनी या कालखंडात पाश्चात्त्य ग्रंथकारांच्या इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, साहित्य या दृष्टीने महत्त्वाच्या मोठमोठ्या ग्रंथांचे परिशीलन करण्यात व समवयस्क विद्यार्थ्यांबरोबर घर गप्पा छाटण्यात बराच वेळ घालविला आणि त्याबरोबरच शारीरिक व्यायाम करून शरीरसंपत्ती कमावली. कॉलेजच्या ७ वर्षांत ते कधीही आजारी पडले नाहीत. कॉलेज- शिक्षणातील परीक्षांची पद्धती त्याना कंटाळवाणी व खुळचटपणाची वाटली. कॉलेजमध्ये दाखल झाल्यापासूनच त्यांनी सरकारी नोकरी करावयाची नाही असा निश्चय केला होता; त्यामुळे परीक्षा उत्तीर्ण होण्याला त्यांनी बिलकूल महत्त्व दिले नाही व त्यामुळे तेथील शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंधही निर्माण झाले नाहीत. यासंबंधी ते म्हणतात, "शिक्षकाशी व परीक्षार्थ्यांशी माझा फारसा स्नेह झाला नाही याचे मुख्य कारण हेतूंची भिन्नता होय. शिक्षकांचा हेतू मुले परीक्षेकरता तयार करण्याचा, मुलांचा हेतू परीक्षा देऊन नोकरी मिळविण्याचा आणि माझा हेतू केवळ विद्यार्जन करून पूर्णपणे स्वतंत्र धंदा करण्याचा. केवळ विद्यार्जन करण्याचा हेतू बाळगणारा मी नोकर तयार करण्याच्या गिरणीत जाऊन पडलो... सरकारी नोकरी म्हणून करावयाची नाही असा दृढतर ग्रह माझ्या मनाचा झाला... वाजवीच आहे की ह्या भाडोत्री शिक्षकांच्या गुलामगिरीच्या नोकऱ्यांचा व कंटाळवाण्या परीक्षांच्यापासून मी पराङ्मुख झालो व पुस्तकालयातील ग्रंथांकडे एकदिलाने वळलो. १८८४ पासून १८९० पर्यंतच्या सात वर्षांत व पूर्वीच्या दोन वर्षांत युरोपियन इतिहास, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, राजनीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र व मानसशास्त्र ह्यांवरील प्राचीन व अर्वाचीन, अस्सल व भाषान्तरित बरेच ग्रंथ मी मननपूर्वक वाचले. शिवाय वनस्पतिशास्त्र व फारशी भाषा कामापुरती मी शिकलो... प्लेटोचे सुराज्य (रिपब्लिक) मी याच वेळी सबंध मराठीत उतरले... ह्या (सरकारी) शिक्षणपद्धतीचा मुख्य हेतू जो नोकरीकरिता परीक्षा देणे तो मी बहुतेक अजिबात झुगारून दिला. त्यामुळे ह्या शिक्षण पद्धतीने जे एक प्रकारे मानसिक दौर्बल्य येते व कर्तृत्वशक्तीचा ऱ्हास होतो, तो माझ्या ठायी झाला नाही. परंतु एका दुष्ट खोडीने मात्र मला अतोनात ग्राशिले. ती खोड म्हणजे दुसरी तिसरी काही नाही. इंग्रजी बोलण्याची व इंग्रजीत विचार करण्याची... सतत पंधरा वर्षे बारा आणि बारा चोवीस तास सर्व कामे मी इंग्रजीत करू लागलो... परंतु दोघा तिघा गृहस्थांनी मला ह्या विपत्तीतून वाचविले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या टीकात्मक निबंधांनी इंग्रजीच्या ह्या खग्रासापासून माझा बचाव केला. काव्येतिहास संग्रहकारांच्या ऐतिहासिक पत्रांनी स्वदेश म्हणून काही आहे हे मला कळले व परशुरामतात्या गोडबोले ह्यांनी छापलेल्या काव्यांनी महाराष्ट्र सारस्वताचा मला अभिमान वाटू लागला." यावरून राजवाडे यांच्या ध्येयवादी

जीवनाची नांदी महाविद्यालयीन शिक्षणाच्या समयीच सुरू झाल्याचे निदर्शनास येते.

भारतास नव्या ज्ञानविज्ञानांचा प्रकाश लाभावा हा जीवनोद्देश

महाविद्यालयीन शिक्षण संपल्याबरोबर त्यांचा विवाह झाला. परंतु पत्नी थोड्याच अवधीत कालवश झाल्यानंतर राजवाडे यांच्या ध्येयवादी जीवनाला म्हणजे दीर्घ अशा ज्ञानमय तपाला एकाग्रता लाभली. सन १८९५ मध्ये त्यांनी 'भाषांतर' हे मराठी मासिक सुरू केले त्यात प्लेटो, ॲरिस्टॉटल, गिबन इत्यादी पाश्चात्त्य ग्रंथकार व शंकराचार्य इत्यादी भारतीय ग्रंथकार यांच्या ग्रंथांची भाषांतरे क्रमाने प्रसिद्ध करणे हा त्यांचा उद्देश होता. त्याकरिता अनेक संस्कृतच्या व इंग्लिशच्या विद्वान पदवीधरांचे साहाय्य त्यांना मिळू लागले. ते 'भाषांतर' मासिक ३७ महिने चालले. परंतु त्या मासिकाच्या प्रथम अंकातील प्रास्ताविक लेखावरून राजवाडे यांचा जीवनोद्देश व्यक्त होतो. ज्या ज्ञानाच्या प्रकाशामुळे युरोप हा अंधकारमय मध्ययुगातून जागा झाला, ते ज्ञान भारतालाही प्राप्त होणे जरूर आहे, त्यायोगेच येथील बौद्धिक व मानसिक अवनती संपून पुनरुज्जीवन (Renaissance) सुरू होईल. नव्या ज्ञानाचा प्रकाश येथील लोकांना लोकभाषेतून मिळावा म्हणून त्यांनी भाषांतर मासिक सुरू केले. भाषांतर मासिक लवकर बंद पडले. परंतु त्यामुळे राजवाडे यांच्या पुनरुज्जीवनाच्या किंवा नवजीवनाच्या प्रयत्नांना खंड पडला नाही. त्यांनी त्याकरिता इतिहासविद्येचा आश्रय केला. १४ व्या शतकागील युरोपच्या पुनरुज्जीवनापेक्षा १९ व्या शतकातील पुनरुज्जावनाची पार्श्वभूमी अत्यंत निराळी दिसल्यामुळे राजवाडे यांनी त्याला ऐतिहासिक जाणिवेचे अधिष्ठान पाहिजे असे निश्चित केले. कारण हा देश परकीय राजसत्तेने जिंकलेला असल्यामुळे त्याच्या पराभूत मनोवृत्तीला अस्मितेची व आत्मस्मृतीची आवश्यकता होती. म्हणून इतिहासविद्येच्या स्थापनेची गरज निर्माण झाली. परंतु या अस्मितेच्या जाणिवेबरोबर बुद्धिवादी अशा आधुनिक वैज्ञानिक संस्कृतीचेही बल प्राप्त करून घेणे आवश्यक झाले. राजवाडे यांनी आपल्या इतिहासमीमांसेत भारत पाश्चात्त्यांनी कसा जिंकला व भारत त्यांच्यापुढे का पराभूत झाला यासंबंधी कार्यकारणभाव सांगताना पाश्चात्त्यांची संस्कृती ही भारतीय हिंदूंपेक्षा अधिक प्रगत अतएव अधिक समर्थ होती हे सांगितले आहे. याचा अर्थ असा की भारतीयांना स्वाभिमान व वैज्ञानिक संस्कृती या दोन्ही गोष्टींचा लाभ झाल्याशिवाय भारतात नवजीवन येणार नाही असा सिद्धांत राजवाडे यांनी सूचित केला. या ऐतिहासिक चिंतनाने मराठी भाषेत नवजीवनाचे बीजच रोवले.

मराठ्यांचा इतिहास, मराठी भाषेचे व संस्कृतचे ऐतिहासिक व्याकरण, जुन्या मराठी वाङ्मयाचा इतिहास व भारतीय वा हिंदू समाजाच्या इतिहासाची समाजशास्त्रीय मीमांसा या संबंधात इतिहाससंशोधक राजवाडे यांचे संशोधनमय लेखन व त्यांनी संपादित केलेले ग्रंथ याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मराठ्यांच्या इतिहासाची साधने त्यांनी गोळा करून प्रसिद्ध केली किंवा मराठी वाङ्मयाची मध्ययुगीन ग्रंथसंपत्ती व अनेक ग्रंथकार परिश्रमपूर्वक

शोधून प्रकाशात आणले एवढीच त्यांची इतिहासक्षेत्रातील कामगिरी नाही, तर त्यांनी इतिहासाची आधुनिक तत्त्वदर्शने, समाजशास्त्रीय विविध विचारप्रणाल्या आणि भाषाशास्त्र यांचेही चिरकाल मनन करून त्यासंबंधी स्वतःचे सिद्धांत रचले व भारतीय समाजेतिहास व भाषेतिहास यांना ते सिद्धांत लागू करून काही महत्त्वाच्या निर्णयाप्रत ते येऊन पोचले. त्याकारता त्यांनी ग्रीस, रोम, मध्ययुगीन व आधुनिक युरोप याने सुप्रसिद्ध इतिहास व जागतिक इतिहास प्रथितयश ग्रंथकारांनी लिहिले त्याचाही व्यापक व्यासंग केला होता.

राजवाडे यांची ज्ञानसाधना

राजवाडे लेखनकार्याचा तपशील पुढील प्रकारचा आहे. राजवाडे यांच्या सन १८९० ते १९२६ पर्यंतच्या प्रौढावस्थेतील कालात भारतीय व विशेषतः महाराष्ट्रीय आधुनिक पंडितांच्या लेखनात व चर्चेत जे ऐतिहासिक मुद्दे उपस्थित होत होते व त्यासंबंधी लेखन-भाषणात्मक चळवळ चालू होती, त्या मुद्द्यांना वैचारिक चळवळीला धरून राजवाडे आपले संशोधन व मनन करीत व संशोधनाचे व मननाचे फलित लेखन रूपाने वेळोवेळी प्रसिद्ध करीत असत. कॉलेजमध्ये शिकत असतानाच प्रथम त्यांनी प्लेटोच्या (Republic) गणराज्याचे मराठी भाषांतर केले. पाश्चात्त्य विद्या व भारतीय प्राचीन विद्या मराठीत अवतरल्या तरच मराठी भाषा उन्नत असे ज्ञानसाधन बनेल; म्हणून भाषांतरास अग्रस्थान प्रथम देणे जरूर आहे, असे त्यांना दिसले. त्याप्रमाणे त्यांनी सन १८९४ च्या जानेवारीत 'भाषांतर' मासिक प्रकाशित करण्यास प्रारंभ केला. हे ३७ आठवडे चालले व पुण्यात सन १८९७ मध्ये प्लेगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे बंद पडले. सन १८९८-१९२६ च्या अवधीत त्यांनी आपल्या जीवितोद्देशातील महत्त्वाचे कार्य म्हणून 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' संग्रहाची २२ खंडे या (सुमारे ११ सहस्र पृष्ठे) प्रसिद्ध केली. या बावीस खंडांपैकी १-६, ८ या खंडांना आणि १० व ११ या खंडांना त्यांनी ऐतिहासिक विवेचनात्मक निबंध या स्वरूपाच्या प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यातील १, ३, ४, ६, ८ या महत्त्वाच्या असून पहिल्या खंडाची प्रस्तावना ही सर्वांत मोठी म्हणजे १२३ पृष्ठांची आहे. त्यामध्ये मराठ्यांच्या इतिहासाचे काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करून उलगडून दाखविले आहेत, त्याचप्रमाणे स्वतःचा इतिहासदर्शनाचा मौलिक दृष्टिकोनही मांडला आहे. या प्रथम खंडाच्या प्रस्तावनेने राजवाडे यांची महाराष्ट्रीय सुशिक्षितांत खूप प्रशंसा झाली व त्यांना थोर इतिहासचिंतक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली. ही त्यांची प्रतिष्ठा शेवटपर्यंत केवळ टिकली एवढेच नाही, तर लेखनकार्याच्या वाढीबरोबर ती वाढत गेली. तिचे अनेक तेजस्वी पैलू प्रकट होत गेले, मराठीमध्ये त्यांच्या समयी जी महत्त्वाची वैचारिक विषयाला स्थान दणारी मासिके वा नियतकालिके होती, त्यांमध्ये म्हणजे विश्ववृत्त, ग्रंथमाला, सरस्वती मंदीर, प्राची प्रभा, इतिहास व ऐतिहासिक, रामदास व रामदासी, केसरी, भारतेतिहास संशोधक मंडळाचे वार्षिक संशोधनवृत्त इत्यादिकांमध्ये मधून मधून लेख प्रसिद्ध करीत. त्यातून त्यांचे अनेक मोठे निबंधही आले आहेत. महाराष्ट्राचा

वसाहतकाल हा ग्रंथ इतिहास व ऐतिहासिक मासिकात खंडशः प्रसिद्ध झाला. 'निङन्त विचार' हा मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणावरील निबंध 'प्राची प्रभा' या मासिकात प्रसिद्ध झाला. त्याचा 'सुबन्त विचार' हा निबंध भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे या संस्थेने; संस्कृत भाषेचा उलगडा हा निबंध स्वतंत्र पुस्तक म्हणून सत्कार्योत्तेजक सभा, धुळे या संस्थेने व मराठी धातुकोश हा मराठी ३० सहस्र धातूंच्या निरुत्तावरील ग्रंथ धुळे येथील राजवाडे संशोधन मंदिराने प्रसिद्ध केला आहे. सन १९०३ साली ग्रंथमाला मासिकाच्या संपादकांनी राजवाडे यांचा त्या समयापर्यंत प्रसिद्ध झालेल्या लेखांचा 'संकीर्ण लेखसंग्रह' प्रकाशित कला. राजवाडे यांच्या निधनानंतर त्यांनी ग्रंथांच्या प्रस्तावना म्हणून किंवा स्वतंत्र लेख म्हणून जे काही लेखनकार्य केले, त्याचा संपूर्ण संग्रह तीन खंडांत मिळून चित्रशाळा, पुणे या संस्थेने प्रसिद्ध करून प्रशंसनीय कामगिरी केली आहे. या तीन भागांच्या संग्रहाशिवाय आणि वर निर्दिष्ट केलेल्या लेखनकार्याव्यतिरिक्त अत्यंत चिरस्थायी महत्त्वाचे राजवाडे यांचे निबंध म्हणेज राधामाधवविलासचंपू व महिकावतीची बखर यांच्या प्रस्तावना होत. या प्रस्तावना म्हणजे भारताच्या महाराष्ट्राच्या इतिहासाचे गंभीर तत्त्वचिंतनच होय; त्यांचे वैचारिक मूल्य मोठे आहे.

मराठ्यांच्या इतिहास साधनांची जुळवाजुळव करण्याकरिता राजवाडे यांनी आपले सर्व आयुष्य वाहिले. राजवाडे यांचे असे मत होते की, भारताचा व महाराष्ट्राचा शास्त्रशुद्ध इतिहास उपलब्ध होण्याकरिता इंग्लिश इतिहासकारांवर अवलंबून राहणे धोक्याचे आहे. त्यांनी लिहिलेला इतिहास हा बहुश: जेत्यांच्या दृष्टिकोनातून लिहिलेला जितांचा इतिहास असण्याचा संभवच फार; आपला इतिहास शास्त्रशुद्ध, निःपक्षपाती व पूर्वग्रहशून्य मनाने लिहिला जावा व तो तथ्य (Facts) निष्ठ प्रमाणांवर आधारला जावा; अशा इतिहासानेच राष्ट्राला आत्मस्मृती लाभेल; म्हणून ऐतिहासिक प्रमाणांची जुळणी करणे हे इतिहासकारांचे प्रथम कर्तव्य होय; त्याकरिता अनेक इतिहासकारांनी जन्मभर तपःसाधनाच करणे आवश्यक आहे अशी त्यांची श्रद्धा होती.

अशी श्रद्धा त्यांच्या ठिकाणी तारुण्यात, विद्यार्थी दशेतच उत्पन्न झाली. त्यानंतर त्यांनी आपले सर्व जीवित इतिहासाच्या ज्ञानमय तपात व्यतीत केले. इ. सन १८९५-१९२६ पर्यंत, अंतकालापर्यंत, लोकनिरीक्षणार्थ व इतिहास साधनांचा शोध करण्याकरिता भारताची व विशेषतः मराठी भाषिक प्रदेशाची निरंतर यात्रा करीत ते राहिले. ही यात्रा त्यांनी अनिकेत बनून परंतु स्थिर मतीने केली. गृहस्थाश्रमाचा बंध म्हणजे पत्नी; २७ वर्षे वय होण्याच्या आत त्यांच्या पत्नी निधन पावल्या. नंतर ते परिव्राजक म्हणजे चिरयात्रिक बनले; इतिहासात व पुराणात वर्णिलेली स्थळे पहात हिंडले. त्यातील काही इतिहासदृष्ट्या महत्त्वपूर्ण वाटणाऱ्या स्थलांची वारंवार दर्शने घेतली. प्रांत, ग्रामे, नगरे, सरोवरे, नद्या, पर्वत, गड व गढ्या पाहिल्या. हे अवलोकन करताना इतिहासवर्णित घटनांची या स्थलकालाशी तुलना करीत

इतिहासाचे मनन करीत. त्या स्थलातील किंवा प्रदेशातील जमाती, त्यांच्या चालीरीती, वाङ्मय, भाषोपभाषा, संज्ञा व उच्चार यांचा निरुक्तशास्त्र, वंशशास्त्र व समाज संस्थाशास्त्रद्वारे छडा लावीत. प्रवासातले काही दिवस, आठवडे किंवा महिने एखाद्या मुक्कामात राहून वाचन, लेखन व मनन याकरिता काढीत.

अशा मुक्कामात ऐतिहासिक कागदपत्रे किंवा हस्तलिखित पोथ्यापुस्तके यांचा संग्रह कोणाकडे आहे काय त्याची चौकशी करून तो मिळविण्याची खटपट करीत व मिळाल्यावर महत्त्वाचे लिखाण हाती आले की बुभुक्षिताप्रमाणे तुटून पडत. मालकाची खुशी असली व त्यामुळे तो संग्रह अन्यत्र सोयीच्या स्थळी अध्ययनार्थ व संग्रहार्थ नेण्यास मिळाला तर तिकडे न्यावयाचा. जर तितकी खुशी नसली तर मालकाच्या मर्जीप्रमाणे त्याच गावी मुक्काम ठोकून वाचन, तर्जुमा इत्यादी कामे करावयाची. राजवाडे यांची मनःप्रकृती दुर्वासमुनीप्रमाणे होती हे सर्वत्र प्रसिद्ध आहे. परंतु इतिहाससाधनांचा लाभ ज्याच्याकडून होण्याची शक्यता असे त्याच्याशी त्यांचे वर्तन पुष्कळदा विनयशील किंवा निदान संयमी असायचे. नवी कागदपत्रे किंवा वैशिष्ट्यपूर्ण असे अन्य प्रकारचे लिखाण हाती पडल्याबरोबर त्यांच्या वाचनात व प्रतिलिपी करण्यात देहभान विसरून त्याचे अहोरात्र काम चालावयाचे. मितविदा व मित आहारविहार असावयाचे. दुपारी एकदाच २ किंवा ३ वाजता स्वहस्तानेच बहुशः पाकसिद्धी करून दूधभातासारखा सात्त्विक आहार घेत. रात्री फलाहार किंवा दूध घेत. स्वच्छतेची फार काळजी घेत. एकच लहानसे व्यसन होते. ते म्हणजे विडी. कित्येकदा चार पाच विड्याही एकदम शिलगावून पीत बसत व धुराच्या वलयाकडे मंद नजर टाकीत ऐतिहासिक प्रश्नाच्या चिंतनात निमग्न होत.

हस्तलिखिताची दप्तरे तपासताना खूप कष्टही पडत. स्वच्छ व व्यवस्थित रीतीने ठेवलेली दप्तरे त्यांना फार थोड्या ठिकाणी आढळली. बऱ्याच ठिकाणी मालक दप्तरे दाखविण्यास नाराज असत. त्यांना राजी करण्याकरिता खटपट करावी लागे. लागेबांधे किंवा वजनदार माणसाचे दडपण याचा उपयोग करणे भाग पडे. त्यात पुनः दप्तरे पाहावयास मिळाली तरी तर्जुमा करण्यास किंवा योग्य ठिकाणी संग्रह करण्याकरिता नेण्यास पुष्कळच आर्जवे करावी लागत. प्रथम पुष्कळदा दप्तरे सुरक्षित नसावयाची. अडगळीच्या माडीत जाळ्या-जळमटी भरलेल्या जागेत अस्ताव्यस्त रीतीने टाकलेल्या राशीत पडलेली असावयाची. त्यावर पाऊस गळून कित्येक दप्तरांचा कागद एकमेकांस चिकटून कागदपत्रांच्या विटाच बनलेल्या असावयाच्या. अक्षरे व ओळी ओघळ जाऊन अस्पष्ट झालेल्या स्थितीत असायची, किंवा उंदीर व बागुर्डे यांनी खराबी केलेली किंवा कसरींनी अर्धवट नष्ट झालेली कागदपत्रे असावयाची. अशा स्थितीत कसलाही निर्वेध उत्पन्न होऊ न देता शांतपणे विनतक्रार त्या कागदपत्राची नीट जुळणी करून व साफसफाई करून त्यांचे अध्ययन करून विल्हेवाट लावीत. असे हे तप ३५-४० वर्षे राजवाडे यांनी केले आणि मराठी भाषेत इतिहासाची

साधने सिद्ध केली. असे श्रम करीत असता अडचणी, संकटेही आली परंतु त्यांना तोंड देऊन अधिक उत्साहाने कामे केली.

उदाहरण म्हणून प्रथम खंडाच्या संपादनाची हकिकत ध्यानात ठेवण्यासारखी आहे. त्यांच्या इतिहास साधनाच्या संशोधनास खरा प्रारंभ वाई प्रांतीच झाला. वाई येथील श्री. एरंडे यांच्या वाड्यात पानिपतच्या संग्रामाच्या काळातील कागदपत्रांचा कातडी पेटीत सुरक्षित ठेवलेला व अव्वल दर्जाच्या प्रमाणांनी भरलेला असा संग्रह त्यांच्या हाती लागला. इतिहाससाधनांचा प्रथम खंड त्यावरूनच त्यांनी तयार केला. तो पुणे येथे फडकेवाड्यातील विठ्ठल छापखान्यात छापला, परंतु त्या छापखान्यास आग लागून तो जळला व त्याबरोबर प्रथम खंडाची पुस्तकेही भस्मसात झाली. पुनः तोच खंड त्यांनी स्वहस्ताने लिहून काढला. या करिता खूप काम करून दप्तरे पुनः तपासाची लगली. तेव्हा एक मित्र त्यांना म्हणाले की तुम्ही इतके श्रम करून जिवाला फार ताप करून घेता. त्यांनी त्यावर उत्तर दिले की, 'माणूस काम करून मरत नाही आळसाने मरतो.' प्रथम खंडाच्या प्रस्तावनेत त्यांनी पानिपतच्या संग्रामात झालेल्या मराठ्यांच्या पराभवाची मीमांसा केली. नंतर त्यांनी वाईच्या जवळ मेणवली येथील नाना फडणविसांचे दप्तर रात्रंदिवस काम करून तपासले. नंतर वाईजवळील ओझर्डे येथील मोगलाचे देशमुख सूर्याजी पिसाळ यांच्या दप्तराचे अध्ययन केले. त्या संबंधात लिहिताना त्यांनी, सूर्याजी पिसाळावर तो मोगलांच्या बाजूचा व मराठी लोकांचा गनीम (शत्रू) म्हणून उल्लेख करणारा म्हणून टीकेची झोड उठविली त्यामुळे ते ओझर्डेदप्तर राजवाडे यांना नाराज होऊन मालकांनी दिले नाही.

राजवाडे यांनी कागदपत्रांच्या रूपाने जेवढी इतिहास सामधने प्रसिद्ध केली त्यापेक्षा अधिक मोठा अप्रकाशित असा संग्रह त्यांच्यापाशी राहिला. त्यातील काही अंश त्यांनीच पुणे येथे सन १९१० मध्ये स्वतः स्थापन केलेल्या 'भारत इतिहास संशोधन मंडळ' या संस्थेत ठेवला. नंतरच्या संग्रहाचा अंश त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या निधनानंतर स्थापन झालेल्या धुळे येथील 'राजवाडे' संशोधक मंडळ, या संस्थेत ठेवलेला आहे.

मराठी व संस्कृत भाषा, यांचे व्याकरण व हिंदू समाज या संबंधांतील त्याचे संशोधन असेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात व पंजाबात प्रसिद्ध असलेल्या महानुभाव संप्रदायाचे मराठी वाङ्मय हे मराठीतील सर्वांत प्राचीन वाङ्मय होय. हे वाङ्मय अनेक गुप्त सांकेतिक लिपींमध्ये लिहिले आहे. त्या लिपींचा उलगडा राजवाडे यांनी प्रथम स्वबुद्धीने केला व त्या वाङ्मयाचे द्वार खुले केले. ज्ञानेश्वरीची एकनाथ पूर्वीची प्रत राजवाडे यांनीच प्रथम हुडकून काढून व तिचे व्याकरण काढले व हेच ज्ञानेश्वरकालीन मराठीचे व्याकरण होय हे सिद्ध केले. त्यामुळे त्यांच्या संशोधक प्रतिभेचा प्रकाश अधिक उज्ज्वल दिसू लागला. मुकुंदराज, मुक्तेश्वर, दासोपंत, रघुनाथ पंडित, जनीजनार्दन, शिवदिन केसरी इत्यादी मध्ययुगीन साहित्यकारांचे व संतांचे वाङ्मय, वंशावळी व काळ याच्यासंबंधी महत्त्वाचे शोध राजवाडे यांनीच प्रथम

लावले. तात्पर्य, मध्ययुगीन मराठी वाङ्मय व मराठी राज्य याच्या संबंधाच्या संशोधनकार्यात राजवाडे यांचे अद्वितीय महत्त्व मान्य करावे लागते.

राजवाड्यांच्या मते इतिहास म्हणजे काय?

राजवाडे यांची इतिहासाची कल्पना विज्ञाननिष्ठ व जीवनव्यापी आहे. मानवाच्या सार्वदेशिक व सार्वकालिक स्थित्यंतरांचा समावेश करणाऱ्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाचा संपूर्ण त्यांच्या इतिहास कल्पनेत समाविष्ट केलेला आहे. त्यांनी आपली इतिहासाची ही व्यापक कल्पना पाश्चात्त्य इतिहासज्ञ पंडितांच्या सर्व विवेचनाचे मंथन करून निर्माण केली आहे. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' खंड ६ च्या प्रस्तावनेत त्यांनी इतिहासविषयक महत्त्वाच्या पाश्चात्त्य कल्पनांची साधकबाधक चर्चा केली आहे. या चर्चेचे सार त्यांनी 'विद्यासेवक' मासिकातील (वर्ष १ अंक ७) 'भारतीय इतिहासाची मूलतत्त्वे' या लेखात इतिहासाच्या लक्षणात सांगितले आहे असे म्हणता येईल. ते लक्षण असे- इतिहास शब्दाचे दोन अर्थ आहेत. (१) गतकाली होऊन गेलेल्या कृत्यांच्या परंपरित वर्णनालाही इतिहास हा शब्द लावतात. (२) कृत्ये व त्यांची वर्णने. या दोहोंचा वाचक एकच शब्द आहे. पैकी कृत्यपरंपरा वाचक जो इतिहास शब्द तो येथे इष्ट समजावा. इतिहासाची मूलतत्त्वे म्हणजे कृत्यपरंपरेची मूळ कारणे. मूलकारणे दोन प्रकारची, बाह्य व आंतर. मनुष्याच्या पिंडावर बाह्य सृष्टीने आघात होतात. आघातांचे सातत्य होऊन मनोरचना बनते. सृष्टी ही मनोरचनेचे ऊर्फ स्वभावाचे बाह्य कारण होते आणि कृत्यरूपाने फलद्रूप होणारा स्वभाव कृत्यांचे आंतर कारण ठरते."

ही इतिहासाची व्याख्या वैज्ञानिक आहे, गृढ़वादास बाजूला सारणारी आहे. या इतिहासाच्या व्याख्येत परिस्थिती व मानव यांच्या द्वंद्वावर आधारलेली ऐतिहासिक प्रक्रिया आहे. यात दैवी संकेत किंवा दिव्य व वीर विभूतींचे कर्तृत्व किंवा भौगोलिक कारणे किंवा आर्थिक, राजकीय वा अन्य प्रकारची सामाजिक शक्ती किंवा विशिष्ट वंशाचे वा राष्ट्राचे जन्मसिद्ध सामर्थ्य किंवा इतिहासाची अबाधित गती किंवा युगप्रेरणा इत्यादी कोणते तरी एक कारण इतिहासाला प्रेरणा देऊन त्याची दिशा, उन्नती, अवनती व परिणती ठरविते असे सांगणाऱ्या विविध ऐतिहासिक उपपत्तींना राजवाडे यांनी कमी महत्त्व दिले आहे. या व्याख्येत व्यक्त झालेल्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाला धरूनच प्रथमपासून इतिहास संशोधनास राजवाडे प्रवृत्त झाले. राजवाडे यांच्यावर मुख्यतः प्लेटो, हेगेल व कांत (Comte) ह्या तत्त्वज्ञांच्या विचारांची छाप पडली होती. त्यामध्ये त्यांनी कांतने मांडलेली मानवी समाजाच्या वैचारिक विकासाची क्रमिक सोपानपरंपरा मुख्यतः मान्य केली होती. धार्मिक (Religious), आध्यात्मिक (Metaphysical) व वैज्ञानिक (Scientific) या तीन श्रेणींत वैज्ञानिक अवस्था सर्वोच्च होय हे त्यांना मान्य झाले होते. उदाहरणार्थ, 'विकार- विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती' या निबंधात त्यांनी धार्मिक कल्पना, धार्मिक ग्रंथ वा धार्मिक कला यांना

भ्रमाधिष्ठित म्हणून निर्दिष्ट केले आहे. त्याचप्रमाणे सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेत तत्त्वज्ञान हे स्वैर कल्पनांचा खेळ असल्यामुळे कालांतराने मानवी ज्ञानाची उत्कृष्ट वाढ होऊन विज्ञानच तत्त्वज्ञानाचा प्रांत आक्रमून टाकील व पारमार्थिक तत्त्वज्ञानाचा पदोपदी पराभव होईल असेही त्यांनी भविष्य वर्तविले आहे. त्यामुळे वैज्ञानिक किंवा भौतिकवादी (Positivist) इतिहासोपपत्तीच सर्वथा ग्राह्य म्हणून त्यांनी मान्य केली. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' खंड- १ या प्रस्तावनेत त्यांनी 'ऐतिहासिक प्रसंग' म्हणजे काय यांचे जे स्पष्टीकरण केले आहे ते या व्याख्येस धरून आहे. तेथे ते म्हणतात, ''मानवी इतिहास काल व स्थल यांनी बद्ध झालेला आहे. कोणत्याही प्रसंगाचे वर्णन द्यावयाचे म्हटले म्हणजे प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखविला पाहिजे. प्रसंगाचा परिष्कार कालाने व स्थलाने विशिष्ट कसा झाला आहे, हे दाखविताना त्या काली व स्थळी कोणत्या व्यक्ती प्रामुख्याने पुढे येतात, हेही इतिहासकाराला स्वाभाविकपणेच सांगावे लागते. सारांश, काल, स्थल व व्यक्ती या त्रयींची जी सांगड तिलाच प्रसंग व ऐतिहासिक प्रसंग अशी संज्ञा देता येते'' (राजवाडे, लेखसंग्रह पृ. ३०). येथे इतिहासाच्या मुळाशी समाज हा न धरता, व्यक्ती ही मूलभूत धरली आहे. म्हणजे इतिहास हा मानवव्यक्तींनी घडविलेला असतो, हा सिद्धांत गृहीत धरला आहे. व्यक्ती ही मूलभूत धरून समाज म्हणजे व्यक्ति-समुदाय असा अर्थ करतात व समाजेतिहासाचा अर्थ सांगतात, ''लहान व्यक्तींची चरित्रे व मोठ्या व्यक्तींची चरित्रे मिळून समाजाचा संपूर्ण इतिहास होतो. समाजात मोठ्या व्यक्ती केव्हाही थोड्या असल्यामुळे मोठ्या व्यक्तींच्या इतिहासाला लहान व्यक्तींच्या म्हणजे बहुजनसमाजाच्या इतिहासाचा जोड द्यावा लागतो. केवळ मोठमोठ्या व्यक्तींच्याच चरित्राने समाजाचा इतिहास संपूर्ण होत नाही.'' (पृ. ३१)

इतिहासाची अशा प्रकारची भौतिकवादी व्याख्या स्वीकारल्यावर समाज म्हणजे व्यक्तिसमुदाय, असा अर्थ करावा लागतो. व्यक्ती ही मूलभूत घटक धरून इतिहासमीमांसेस प्रारंभ केला तरी त्या मूलघटकापाशी थांबून भागत नाही. त्या मीमांसेचा विस्तार करण्यास व्यक्तिसमुदायांचे भिन्न भिन्न प्रकार हेही ध्यानात धरावे लागतात. समाजातील भिन्न भिन्न कर्मे व त्या कर्माकरिता आवश्यक अशा भिन्न भिन्न प्रकारच्या मानवी संघटना समजावून घेतल्या तरच इतिहास म्हणजे काय याचा उलगडा होऊ शकतो. संस्था व संस्थेची कर्मे यांच्याशी इतिहासाचे मुख्य कर्तव्य आहे ही गोष्ट राजवाडे यांनी मान्य केली आहे. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' खंड ६ च्या प्रस्तावनेत संस्था म्हणजे शरीर होय अशी ते रूपकात्मक परिभाषा वापरून म्हणतात: ''वासना - यंत्रणा व साधना किंवा इच्छा शरीर व कर्म अशी मानव समाजाच्या चळवळीची त्रिविध परंपरा आहे. या त्रिविध परंपरेची हकिकत देणे म्हणजेच इतिहास लिहिणे होय. कोणत्या वासनेकरिता संस्थायंत्राचे कोणते इंद्रिय निर्माण झाले, त्या इंद्रियाने इष्टकार्य कितपत होते व ते इंद्रिय सर्वच यंत्रांच्या अनुरोधाने

चालते किंवा प्रतिरोधाने चालते ही हकिकत देण्याचे काम शारीरिक पद्धतीचे असते. वस्तुतः पाहता संस्थांच्या शरीरांपेक्षा शरीराच्याद्वारे झालेले जे काम त्याच्याशी इतिहासाचे मुख्य कर्तव्य आहे. परंतु काम सिद्ध व्हावयाला शरीराची अपेक्षा असल्यामुळे व शरीराच्या सिध्यर्थ समाजाची झटपटही विशेष असल्यामुळे किंबहुना शरीराची रचना व सुधारणा हेच काही काल किंवा सर्वकाल राष्ट्राचे मुख्य कर्तव्य होऊन बसल्यामुळे शरीर, शरीररचना व शरीरसुधारणा हाच इतिहासाचा मुख्य विषय होऊन बसला आहे. वासनेचा निर्देश केल्यावाचून शरीर का निर्माण झाले ते सांगता येत नाही व कार्याचा निर्देश केल्यावाचून शरीराची लक्षणेही ठरविता येत नाहीत. ही अडचण लक्षात घेऊन शरीरक म्हणून एकच पद्धती मी स्वीकारली आहे.'' (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. २२८-२९).

राजवाडे यांच्या दृष्टीने इतिहासाचा निश्चित अर्थ कोणता याची अशी रूपरेखा आहे. असा इतिहास पूर्वग्रहरहित व प्रामाणिकपणे लिहिण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे असे ते वारंवार सांगतात. ते म्हणतात: ''निर्लेप व निरहंकारपणाने इतिहासाचा विचार करावयाला लागणे ही इतिहासाचे खरे स्वरूप जाणण्याच्या मार्गाला लागण्याची पहिली पायरी आहे. ह्या मार्गाला लागण्याची दुसरी पायरी सर्व प्रकारचे अर्धवट ग्रह सोडून देणे ही होय'' (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. १३२). परंतु यासंबंधी ते निराशेचे उद्गार काढतात- ''वर्तमानक्षणाच्या पाठीमागील गतकाळी पृथ्वीवरील नव्या व जुन्या दरोबस्त सर्व समाजांच्या सर्व तऱ्हेच्या उलाढालींची जी साद्यंत व विश्वसनीय हकिगत ती इतिहास होय. असला साद्यंत व विश्वसनीय इतिहास पृथ्वीवरील कोणत्याही भाषेत अद्यापपर्यंत लिहिला गेला नाही. ...प्रत्येकाचा इतिहास त्याच्या त्याच्या स्वदेशाभिमानाच्या रंगाने चितारला गेल्यामुळे इतर देशातील इतिहासज्ञांच्या पसंतीस सहजच उतरत नाही. जो तो आपला देश त्रिभुवनाचा केंद्र समजून तत्प्रवण सर्व देशांची चरित्रे होत आहेत असे चित्र काढण्याचा निःपक्षपातीपणाची प्रतिज्ञा करूनही, प्रयत्न करीत असतो. ह्या स्वदेशाभिमानाखेरीज प्रत्येकाचे काही ना काही तरी वैयक्तिक खूळ असतेच. कोणी केवळ भौगोलिकदृष्ट्या, कोणी केवळ काळदृष्ट्या, कोणी निवळ व्यापारीदृष्ट्या व कोणी स्वदेशसंस्कृतीदृष्ट्या जगाच्या इतिहासाची अजमावणी करीत असतात.... असा प्रकार असल्यामुळे समाजाच्या चरित्राचे खरे स्वरूप काय, त्याचे केंद्र कोठे आहे, ते प्रागतिक आहे किंवा अधोगतिक आहे किंवा स्तब्ध आहे, वगैरे प्रश्नांचा जसा समाधानकारक निकाल लागावा तसा लागत नाही. वैयक्तिक मते बाजूला सारून व स्वदेशाभिमानाचा दर्प बाजूला ठेवून हे काम केले तरच शुद्ध व विमल तत्त्व हस्तगत होण्याचा संभव आहे.'' (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ३१२).

परंतु अशा प्रकारे पूर्वग्रहमुक्त मन असलेला इतिहासकार कोठे मिळणार? निर्लेप व निरंजन होऊन इतिहासाचा विचार करणे दुर्घट आहे. झाडून सर्व पूर्वग्रह टाकून देणे मनुष्यस्वभावाला निसर्गतः अशक्यप्राय आहे. सांस्कृतिक संप्रदायाच्या परिसरात मानवी मन

बाल्यापासून वाढत असते. मनुष्य बाल्यात स्वसमाजाची भाषा जशी साहजिक आत्मसात करतो त्याप्रमाणे स्वसमाजाच्या इष्टानिष्टत्वाच्या भावना, परस्परसंबंधी अभिमान, अभिरुची इत्यादी सर्व काही आत्मीय बनवितो. ह्या सर्व मानसिक बनावाच्या अनुरोधाने सत्यासत्य व सारासार ठरविणारी स्वाभाविक बुद्धी विवेक व निर्णय करू लागते. म्हणून प्रत्येक समाजाची, कालाची व व्यक्तीची जगाच्या व स्वतःच्या इतिहासाकडे पाहण्याची तऱ्हा एकसारखी असणे कठीण आहे. ही गोष्ट राजवाडे यांनी लक्षात घेतली आहे. ते म्हणतात: ''ह्या भिन्न दृष्टीचा परिणाम असा होतो की एका काळी व एका समाजाला जी विधाने सिद्धांतवत भासतात, तीच दुसऱ्या काळी दुसऱ्या समाजाच्या अश्रद्धेचे विषय होतात. ह्या विरोधाचे कारण असे आहे की विकार व विचार यांनी खळबळून जाणाऱ्या व्यक्तींशी व समाजाशी मानवइतिहासाला कर्तव्य असते, ज्या निर्विकार दृष्टीने दगडाकडे किंवा वनस्पतीकडे मनुष्य पाहू शकतो, तिचा उपयोग मनुष्यसमाजावर करता येत नाही. कारण निर्विकार दृष्टीचा उपयोग करू पाहणारी व्यक्ती स्वतः विकारवश असते; व ज्या समाजांवर दृष्टीचा प्रयोग करावयाचा ते समाजही विकारवश असतात.'' (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ३१६).

इतिहासविषयक विवेचनात ह्या महत्त्वाच्या अडचणीबरोबर दुसरी एक महत्त्वाची अडचण उभी असते, ती म्हणजे इतिहासातील घटनांच्या मूल्यमापनासंबंधी होय. अमुक एक ऐतिहासिक कृत्य, विधी, निषेध, संस्था, चाल, प्रवृत्ती, अधम की उत्तम, हितकारक की अहितकारक, प्रगत की अप्रगत, इत्यादी प्रश्न मूल्यमापनात अंतर्भूत होतात. यासंबंधी राजवाडे यांचे मत असे आहे की मूल्यमापन हे इतिहासकाराचे उद्दिष्ट किंवा प्रयोजन नाही; कारण मूल्यमापन हे नीतिशास्त्राशी संलग्न कार्य आहे. परंतु नीतिशास्त्र हे शाश्वत निकष देण्यास असमर्थ आहे; कारण ते विशिष्ट देशकालाशी सापेक्ष असते. ते म्हणतात ''मानवसमाजाची हकिकत देताना संस्थांचे किंवा कृत्यांचे अधमोत्तमत्व ठरविण्याला स्थिर मान असू शकत नाही. असू शकते, असे म्हणणे म्हणजे एका पूर्वग्रहाचाच आश्रय करणे आहे. आणि पूर्वग्रहाचाच आश्रय करणे म्हणजे इतिहासाच्या सशास्त्र परिशीलनाला सर्वस्वी घातक आहे. बरे, वाईट, शुभ, अशुभ वगैरे नीतिशास्त्रातले जे अर्थ आहेत ते गृहीत धरून ऐतिहासिक प्रसंगांची, समाजाची व संस्थांची परीक्षा करणे म्हणजे ठरीव नीतिशास्त्रातल्या अर्थाच्या पलीकडे जाण्यात मानवसमाजाला अटकाव करण्यासारखेच आहे... तात्पर्य प्रगती झालेली आहे किंवा अधोगती झालेली आहे हे पाहण्याचे काम नीतिशास्त्राचे आहे, इतिहासाचे नाही.

सूक्ष्मतेने पाहता, निर्भेळ इतिहास म्हणून ज्याला म्हणता येईल त्याचे काम फक्त झालेल्या प्रसंगाची विश्वसनीय हकिकत देण्याचे आहे. कालाचे पौर्वापर्य लावून व प्रसंगाचे कार्यकारणत्व सिद्ध करून मृत गोष्टी अशा अशा सातत्याने झाल्या इतके सांगितले म्हणजे इतिहासाची कामगिरी आटोपली; ''इतिहास भूतवृत्ताचा विश्वसनीय सारांश देतो व

नीतिशास्त्र त्याचे उत्तमाधमत्व ठरविते.... निःपक्षपाताने काढलेला सारांश मात्र, यावच्चन्द्र दिवाकरौ अजरामर राहतो'' (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ३१७,१८).

या प्रतिपादनाचा भावार्थ असा आहे की, राजवाडे हे, इतिहास ही विज्ञानाप्रमाणेच एक ज्ञानशाखा आहे, असे मानतात. ज्ञान शाखेचा दर्जा इतिहासास आणण्याचा प्रश्न आधुनिक काळातच सुरू झाला. आधुनिक काळापूर्वी जगात जे इतिहास झाले त्यांचा उघड हेतू भूतवृत्तानुवाद हाच असला तरी त्याबरोबर भिन्न अन्तस्थ हेतू दडलेले होते. विशिष्ट व्यक्ती, कुले, वंश, राष्ट्रे, संप्रदाय, प्रसंग किंवा घटना यांचे माहात्म्य वाढविणे किंवा त्यांच्यावर क्षुद्रत्वारोप करणे हाच अन्तस्थ हेतू इतिहास निवेदकात वसत होता. त्यामुळे त्यात वाटेल तेथे अवास्तवाची वा अतिशयोक्तीची भर पडल्याशिवाय राहात नसे. त्या काळी वस्तुतः काही थोड्याच वस्तुनिष्ठ दृष्टीच्या महानुभावांना सत्यकथनाची प्रेरणा लाभलेली असे. त्या काळी इतिहास हा निर्भेळपणे वस्तुनिष्ठच असला पाहिजे, असा नियम सर्वसंमत होण्याची प्रवृत्ती समाजात नसे. अद्भुत व कल्पित कथांची इतिहासात भर टाकल्याने काही बिघडले आहे अशी जाणीवच त्या वेळी नव्हती. अशा पूर्वपरंपरेच्या विपरीत वातावरणातून बाहेर पडलेली इतिहासकाररीती हे या आधुनिक युगाचेच लक्षण आहे. परंतु नैतिक मूल्यमापन व इतिहास यांच्यासंबंधी सापेक्ष नीतिवादाच्या आधारे राजवाडे यांनी जे प्रतिपादन केले आहे त्यातली महत्त्वाची अडचण राजवाडे यांनी ध्यानात घेतलेली दिसत नाही. ती अशी की, इतिहासाचा विषय मानवी कृत्ये हा असल्यामुळे त्यात मानवी कृत्याची सद्विवेकबुद्धीशी नित्यसंलग्नता ध्यानात घ्यावी लागते. मानवी विश्वच नैतिक विश्व आहे. त्याच्यासंबंधी कोणतेही विवेचन नैतिक विवेकाच्या स्पर्शापासून मुक्त असे करणे अशक्य आहे. म्हणजे मानवी ऐतिहासिक प्रसंग हा नैतिक प्रसंगच आहे; या प्रसंगाच्या कोणत्याही तथ्यकथनपर वा कार्यकारणत्व निर्णयपर इतिहासात चांगले व वाईट या कोटींचा म्हणजे नैतिक मूल्यांचा अनुकूल वा प्रतिकूल निर्देश अपरिहार्यपणेच करावा लागतो. उदाहरणार्थ स्वतः राजवाडे हेच इतिहासविवेचनात अशी सदसत् मूल्यांचा निर्णय दर्शविणारी शेकडो विधाने करताना दिसतात. उदाहरणार्थ, 'मराठेशाहीचा पाया घालणारा शहाजी' व 'शिवाजीची गुणसंपदा' (पृ. १८७-२८) ही या पुस्तकातील प्रकरणेच पहावी. यात गुणदोष विवेचन म्हणजे नैतिक मूल्यावर आधारलेली चर्चाच प्राधान्याने आली आहे. "१८ व्या शतकाच्या पूर्वार्धात व उत्तरार्धात मराठ्यांची! (म्ह. महाराष्ट्रीयांची) संस्कृती युरोपातील प्रगत राष्ट्राच्या संस्कृतीहून कमी दर्जाची होती. (पृ. १९३) हे वाक्य अत्यंत मौलिक महत्त्वाचे आहे. यात सांस्कृतिक मूल्यांचा तुलनात्मक निर्णय राजवाडे यांनी जाहीर केला आहे. मराठ्यांचा पराभव ब्रिटिश का करू शकले या तथ्याच्या मुळाशी असलेले कार्यकारणत्व दाखविणे हा राजवाडे यांचा उद्देश असला तरी त्याकरिता हिंदूंची संस्कृती युरोपियन संस्कृतीपेक्षा हीन होती हा नैतिक निर्णय करूनच हिंदूंच्या पराभवाची मीमांसा राजवाडे करू शकले. व राजवाडे यांचा शिवाजीची

गुणसंपदा हा लेख शिवाजीसंबंधी नैतिक निर्णय सिद्ध करणारा आहे. समाजमनोरचनेची मीमांसा इतिहासाचा भाग आहे, असे राजवाडे मानतात; (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ३६१) त्यात नैतिक कल्पनांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. या संबंधात हिंदूंचा इतिहास काय संदेश देतो हे राजवाडे स्वतः सांगतात- ''हिंदू लोकांची ही तात्त्विक संन्यासप्रवण मनोरचना बदलण्याचा दीर्घोद्योग केला पाहिजे असा सल्ला इतिहासाचा हा भाग सांगतो.'' नैतिक वा कलात्मक मूल्यांचा सापेक्षतावाद मान्य केला तरी इतिहास हा मूल्यचर्चेच्या जाळ्यातून कधीही सुटणे शक्य नाही, कारण मानवी विश्वातील हालचालींचा तथ्य (Fact) व मूल्य (Value) यांचा प्रांत वेगळा करून विचार करणे अशक्य आहे. हा वदतोव्याघात किंवा स्वविरोध (Inner Contradiction) राजवाडे यांच्या ध्यानात आला नाही.

राजवाडे यांनी स्वीकारलेली ही इतिहास कल्पना पाश्चात्त्य इतिहासतत्त्वविचारात अत्यंत महत्त्वाची मानलेली व गाजलेली आहे. पाश्चात्त्य देशात गेली दोन शतके इतिहासतत्त्वाची मीमांसा सुरू आहे. इतका अत्यंत खोलात जाऊन त्यामध्ये भाग घेणारा पहिला इतिहाससंशोधक भारतीय म्हणजे राजवाडे हेच होत. म्हणून त्यांचा या संबंधातला दृष्टिकोन अत्यंत संक्षेपाने वर मांडला आहे.

(नवभारत, ऑगस्ट १९६४, पृ. १ ते १०,
मूळ शीर्षक : कै. वि. का. राजवाडे जन्मशताब्दी)

○○○

६४

इतिहास संशोधक व साहित्यनिर्माते कै. न. र. फाटक

प्राज्ञपाठशाळा मंडळाशी न. र. फाटक ह्यांचा संबंध १९३३ साली आला. १९३५ साली मंडळाचे सदस्य झाले तेव्हापासून १९७५ पर्यंत ते प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या विविध कार्याशी निगडित झाले होते. निसर्गरम्य भोर संस्थानमधील जांभळी येथे १५ एप्रिल १८९३ रोजी फाटक यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण बी. ए. पर्यंत झाले होते. बी. ए. ला तत्त्वज्ञान घेतले होते. वडिलांची सरकारी नोकरीत निरनिराळ्या प्रांतांत बदली होत होती. त्यामुळे महाराष्ट्र, मध्यप्रदेश, पंजाब व राजस्थानमधील शहरांमध्ये माध्यमिक व उच्चशिक्षणार्थ फाटकांना राहण्याची संधी मिळाली. परंतु पुढील सर्व कारकिर्द महाराष्ट्रात झाली. शनिवार २१ डिसेंबर १९७९ रोजी मुंबई (गिरगाव, नवी भटवाडी) येथे दिवसा एक वाजता त्यांचे निधन झाले. इतिहास संशोधक कै. द. वा. पोतदार यांचे निधन ६ ऑक्टोबर १९७९ रोजी झाले. तेव्हा त्यांचे दीर्घकालीन मित्र फाटक म्हणाले, 'तुमच्यामागून आलोच.' अंतकाळ जवळ आलेला आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षात कित्येक महिने आली होती. ''आता हे सारे अटळ आहे'' असे ते म्हणू लागले. पोतदार आणि फाटक हे दोघेही इतिहास संशोधनात जवळजवळ पाच तपे रमलेले! दोघांचाही मुख्य विषय मराठ्यांचा इतिहास व मराठी साहित्य हा होता. पोतदार यांनी इतिहास संशोधनाची साधने जमविण्यात सबंध आयुष्य घालविले; परंतु त्या साधनांच्या आधारावर महत्त्वाचे साहित्य निर्माण करू शकले नाहीत. उलट फाटक यांचे साधनसंशोधन चालत असतानाच साधनांतून निघणाऱ्या निष्कर्षांवर साहित्यनिर्मितीचे कार्य निरंतर अखेरपर्यंत चालू राहिले; फाटकांचे ज्ञानदेव, एकनाथ, रामदास, म. गो. रानडे, लोकमान्य, गो. कृ. गोखले इत्यादिकांवरचे लेखन हे महाराष्ट्राच्या इतिहासाचा आधार होय. त्यामुळे महाराष्ट्राच्या बौद्धिक संस्कृतीत मोठ्या मोलाची ग्रंथसंपत्तीची भर ते टाकू शकले. फाटक हे त्यामुळे अजरामर झाले आहेत.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात ते एक झुंझार पत्रकार म्हणून १९१८ ते १९३५

या काळात चमकत होते. 'इंदुप्रकाश' या नेमस्तांच्या नियतकालिकात संपादक म्हणून अनेक वर्षे काम केल्यावर भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला वाहिलेल्या कै. नाटकसम्राट खाडिलकर यांच्या 'नवाकाळ' या दैनिकात उपसंपादक म्हणून त्यांनी विपुल लेखन केले. ते महाराष्ट्रातील व भारतातील वास्तविक घटना आणि त्यांचा विशिष्ट देशकाल यांची निश्चित अशी दखल घेऊन, विचार करणारे ग्रंथकार होते. त्यामुळे साहित्यसम्राट कै. न. चिं. केळकर यांनी लिहिलेल्या टिळक चरित्रातील अनेक घटना कशा अवास्तव आहेत हे सप्रमाण दाखवून महाराष्ट्राच्या बौद्धिक जगात अग्रगामी समीक्षक म्हणून ते प्रथम झळकू लागले. इतिहासक्षेत्रात आाणि साहित्य क्षेत्रात त्यांनी दबदबा निर्माण केला, तो त्यांनी 'विविधज्ञानविस्तार' या प्रतिष्ठित वैचारिक मासिकात लिहिलेल्या समर्थ रामदास स्वामींवरील लेखमालेमुळे. त्यांनी त्यात असे सिद्ध केले की स्वामी रामदास हे राजकारणी संत नव्हते; रामदास शिवाजी भेट स्वराज्य स्थापनेनंतरची, शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या लढ्याशी त्यांचा काही संबंध नव्हता; ते इतर संतांप्रमाणेच शुद्ध भक्तिमार्गी होते आणि धार्मिक संस्थांची निर्मिती करीत होते. समर्थ रामदास आणि स्वराज्यसंस्थापक शिवाजी यांचा राजकारणात प्रत्यक्ष संबंध होता, याला काही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लेखी प्रमाण मिळत नाही, असे त्यांनी आव्हानपूर्वक सिद्ध केले व ते सर्व तर्कशुद्ध म्हणून मान्य करावे लागते तरी फाटकांनी हा मुद्दा फार ताणला; मर्यादेबाहेर ताणला! समर्थस्वामींना इतर संतांप्रमाणेच राजकारण - पराङ्मुख ठरविण्याकरिता समर्थ वाङ्मयात वारंवार येणाऱ्या 'राजकारण' शब्दाचा वाच्यार्थ टाकून 'चातुर्य' असा गौण अर्थ ठरविण्याचा जो खटाटोप फाटकांनी केला त्यात त्यांचा केवळ हेकेखोरपणाच उघडकीस आला. कारण, समर्थ वाङ्मयातील 'राजकारण' शब्दाचे संदर्भात तेथे वर्णिलेली भारतीयांची धार्मिक, सामाजिक संस्कृती, समाजरचना व राजकीय बेबंदशाही लक्षात घ्यावीच लागते. तेथे वाच्यार्थच घ्यावा लागतो. नाहीतर तेथील 'राजकारण' शब्द अर्थशून्य ठरतो. 'विविध ज्ञानविस्तार', 'इंदुप्रकाश', 'नवा काळ', 'विविधवृत्त', 'मौज' इ. नियतकालिकांतील त्यांची पत्रकारिता चांगलीच गाजली. स्वतःच्या नावाने वा 'आलमगीर,' 'सत्यान्वेषी, 'फरिश्ता' अशा टोपण नावांखालीही त्यांनी लेखन केले. वृत्तपत्रव्यवसाय सुटल्यानंतरही नियतकालिकांशी लेखक वा स्तंभलेखक म्हणून त्यांचा संबंध शेवटपर्यंत कायम राहिला. यांतील त्यांचे अनेक लेख फार मोलाचे आहेत.

१९३५ साली प्राज्ञपाठशाळा मंडळाशी फाटकांचा संचालक मंडळाचे सदस्य म्हणून संबंध आला. या वेळी मुंबईचे न्यायमूर्ती सर सीताराम पाटकर हे प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या धर्मकोश मंडळाचे अध्यक्ष होते. धर्मकोश मंडळाच्या अनेक बैठकी होत. या बैठकीत न्या. प्र. वा. गजेंद्रगडकर, कै. श्री. पु. मं. लाड इत्यादी मंडळींबरोबर अनेक विषयांवर चर्चा चालत असे. या चर्चांमध्ये न. र. फाटक यांची विद्वत्ता, सूक्ष्म समीक्षकता, साहित्यिक

मार्मिकता प्रकट होत असे. न्या. पाटकरांच्या लक्षात आले की, फाटक हे केवळ साधे बी. ए. पदवीधर असले तरी व्यासंगी, अनेक विषयांत मूलग्राही विद्वत्ता संपादन केलेले, गृहस्थ आहेत. ते महाविद्यालयीन अध्यापनासही समर्थ आहेत. म्हणून पाटकर यांनी स्वतः कुलगुरू या नात्याने महिला विद्यापाठाच्या मुंबई येथील महाविद्यालयातील मराठी प्राध्यापकाच्या आसनावर फाटकांची नेमणूक केली. दोन वर्षे या महाविद्यालयात काम केल्यावर मराठीचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक रामनारायण रुईया महाविद्यालयात झाली व तेथूनच ते मुदत संपल्यावर १९५७ साली निवृत्त झाले. त्यांच्या हाताखाली, त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी उत्कृष्ट पदवीधर होऊन तयार झाले. महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात वा सार्वजनिक जीवनात काम करणारे हे विद्यार्थी व विद्यार्थिनी, मोठ्या अभिमानाने आपण फाटकांचे शिष्य आहोत, असे सांगत असतात.

महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रातून निवृत्त झाल्यावर त्या वेळचे मुंबईचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या सल्ल्याने महाराष्ट्र राज्याच्या स्वातंत्र्येतिहास समितीचे प्रमुख म्हणून ते काम करू लागले. त्याच्या अगोदरच त्यांनी महादेव गोविंद रानडे यांचे सुरेख चरित्र (१९२४) लिहून प्रसिद्ध केले होते; श्री समर्थचरित्र, रामदास : वाङ्मय आणि संप्रदाय, ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी, श्री ज्ञानेश्वर: वाङ्मय आणि कार्य, श्री एकनाथ: वाङ्मय आणि कार्य इत्यादी विषयांवर त्यांनी आपले ग्रंथ प्रसिद्ध केले होते. महाराष्ट्र राज्याच्या स्वातंत्र्येतिहास समितीवर संशोधन व संपादनकार्य करीत असता, त्यांना सरकारी गुप्त साधनेही पहावयास मिळाली; त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांचा चरित्रकोश महाराष्ट्र राज्य विदर्भ विभाग, खंड १ प्रसिद्ध केला. महाराष्ट्र राज्यातील स्वातंत्र्य इतिहासावर असे १०-१५ खंड तरी प्रसिद्ध करण्याइतकी साधनसामग्री त्यांना मिळाली व जुळवता आली, पण ते कार्य अपुरे राहिले आहे. ते कोणालाही पूर्ण करणे जवळजवळ अशक्य आहे. फाटक त्या स्वातंत्र्य आंदोलन युगाच्या प्रेरणांच्या अर्थाचे जाणकार होते; त्या युगाशी एकरूप झालेले होते तसा जाणकार कसा मिळणार? या कालावधीत 'आदर्श भारत सेवक गोपाल कृष्ण गोखले', (साहित्य अॅकॅडमीचे पारितोषिक १९७१ ला मिळाले), 'लोकमान्य', 'श्रीमंत महाराज यशवंतराव होळकर', 'भारतीय राष्ट्रवादाचा विकास', १८५७ ची 'शिपाईगर्दी' इ. ग्रंथ त्यांनी लिहिले व ते प्रकाशित झाले. १८५७ सालची शिपाईगर्दी या पुस्तकात त्यांनी हे बंड स्वातंत्र्याचा संग्राम नव्हता, असा पाखंडी-निष्कर्ष काढला. अशा तऱ्हेचे इतिहासविषयक पाखंडी निष्कर्ष काढण्यात फाटक यांचा हातखंडा होता. 'मुंबई वर्णन' हे १९ व्या शतकात प्रसिद्ध झालेले सुंदर पुस्तक त्यांनी संपादित करून पुनःप्रकाशित केले. त्यांनी आता नुकताच मुंबईचा इतिहास लिहून जवळजवळ पुरा केला आहे. श्री. फाटक म्हणजे महाराष्ट्राचे राजकारण, समाजकारण व प्राचीन अर्वाचीन वाङ्मय यांच्या इतिहासाचा सखोल व समतोल मनाने अभ्यास करणारे आणि विलक्षण स्मरणशक्तीचे थोर विद्यासेवक होते.

फाटकांचे महाराष्ट्रातील अनेक संस्थांशी सदस्य, पदाधिकारी वा अध्यक्ष म्हणून निकटचे संबंध आले. भारत इतिहास संशोधक मंडळ (पुणे), मुंबई मराठी साहित्य संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ इ. संस्थांशी त्यांचा दीर्घकाल संबंध राहिला होता. ते उत्कृष्ट लेखक तसे उत्कृष्ट वक्तेही होते. त्यांचे लेखन तसेच भाषण नव्यानव्या माहितीने भरलेले असे. त्यांनी मुंबई, पुणे इत्यादी ठिकाणी अनेक विषयांवर अनेक व्याख्यानमाला गुंफल्या. ह्या त्यांच्या व्याख्यानमालांमध्ये त्यांनी स्वतःचे संशोधनाने सिद्ध केलेले अनेक अविवाद्य व विवाद्य परंतु विचाराला चालना देणारे सिद्धान्त ग्रथित केले. त्यांचे समग्र व त्रोटक वृत्तान्त त्या वेळी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले आहेत.

फाटक हे फटकळ होते, यात शंका नाही, परंतु ते मत्सरी नव्हते, ते गुणग्राहकही होते. त्यांच्या विद्वत्तेची छाप अचूक पडत असे; त्यांच्या दिलदारपणाची मोहिनी माणसांना आपोआप आकर्षून घेत असे; त्यांनी साहित्य आणि विद्वत्ता यांच्या क्षेत्रांतल्या लहान मोठ्या व्यक्तींना मित्र म्हणून जवळ केले होते. राजकीय क्षेत्रातल्या अनेक व्यक्तींना आपल्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने भारावून टाकले होते. त्यांना एखाद्या व्यक्तीचा दांभिकपणा, ती व्यक्ती कितीही मोठी असली तरी, उपहासपूर्वक उघडकीस आणण्याची हौस होती. त्यांच्या उपरोधपूर्ण लेखनाला कित्येकदा विलक्षण तिखट धार येत असे. साहित्य, इतिहास इ. विषयात अनेक विद्वान त्यांची सल्लामसलत घेण्याकरिता उत्सुक असत; व त्या विद्वानांना ते खूप मदतही करत. त्यांचा प्रांजळपणा व दिलखुलास खट्याळ विनोद यांमुळे आकर्षित झालेले शेकडो मित्र त्यांच्या परिवारात कायम समावले गेले होते. फाटक संगीतरसिकही होते. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील संगीतज्ञांच्या परंपरेची त्यांना फार चांगली माहिती होती. ते विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे शिष्य असल्यामुळे अनेक प्रथितयश संगीतकारांच्या मेखा त्यांना माहीत होत्या.

उत्तम नाणावलेल्या अनेक मुद्रक - प्रकाशक संस्थांशी त्यांनी स्नेहाचे बंध दीर्घकाल टिकविले होते. कै. दामोदर सावळाराम यंदे यांच्याशी फाटकांचा 'इंदुप्रकाश'चे संपादक म्हणून संबंध आला. तरे अखेरपर्यंत कायम टिकला. मुंबईच्या मौज-प्रकाशन संस्थेचे व त्यांचे ऋणानुबंध आजन्म स्थिरावले.

फाटकांचा शरीरबांधा उंच व भक्कम होता उमेदीत असताना डोंगरी किल्ले चढून शिखर गाठण्याची व दूरदूरच्या रमणीय ऐतिहासिक स्थळांना विद्यार्थी गणांसह पायी प्रवास करून भेटी देण्याची हौस होती. ते मोठे रसिक होते. चांगले मसालेदार पदार्थ, मिष्टान्ने, संगीताची मैफल, चटकदार गप्पा-गोष्टी यांची त्यांना खूप आवड होती. त्यांच्या बैठकीच्या खोलीत नित्य स्नेहसंमेलने भरत.

असा हा महाराष्ट्राच्या बौद्धिक संस्कृतीतील देदीप्यमान तेजस्वी तारा, शरीर सुमारे ५ वर्षे व्यथित व गलितगात्र झाले असूनही बुद्धी आणि अंतःकरण स्वच्छ प्रकाशमय असताना

(वय वर्षे ८६ पूर्ण करून) शांतपणे अस्ताला गेला. व्यासंगाकरिता ते ग्रंथसंग्रह सतत करीत राहिले; ग्रंथसंग्रह मोठा केला. परंतु तो त्यांनी अनेक संस्थांना वेळोवेळी वाटून टाकला. मित्रसंग्रह अनेक उत्कृष्ट गुणांमुळे आपोआप वाढत गेला; मोठा झाला. त्यांतून बरेचजण त्यांच्या आधीच वेळी अवेळी पुढे निघून गेले; काही काही मागे राहिले आहेत, त्यांपैकी एक आम्ही त्यांच्या पवित्र स्मृतीला ही श्रद्धांजली आम्ही अर्पण करतो.

(नवभारत, जानेवारी, १९८०,

संपादकीय, पृ. १ ते ४

मूळ शीर्षक: कै. प्रा. न. र. फाटक)

ooo

६५

प्रा. न. र. फाटक : सार्वजनिक जीवनाशी एकरूप झालेला विद्वान

प्राज्ञपाठशाळा वय वर्ष २५ पासून तो वय वर्ष ४० पर्यंत एक झुंझार पत्रकार म्हणून महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात प्रा. न. र. फाटक सतत चमकत राहिले त्यानंतर ते महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रात प्रविष्ट झाले; व एक ख्यातनाम शिक्षक म्हणून मान्यता पावले. वय वर्ष ६२ ते वय वर्ष ८० पर्यंत महाराष्ट्र राज्याच्या स्वातंत्र्य इतिहास समितीचे प्रमुख संचालक म्हणून स्वातंत्र्य इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात फार मोलाची कामगिरी केली. त्यातूनही निवृत्त झाल्यानंतर त्यांचे संशोधन व लेखन अखेरच्या घटकेपर्यंत चालूच राहिले. अलीकडे अनेक वर्षे काळ जवळ आलेला दिसत होता तरी आपल्या वैचारिक समाधीचा भंग त्यांनी होऊ दिला नाही. महाराष्ट्राच्या बौद्धिक जीवनामध्ये एक प्रभावी व्यक्ती म्हणून फाटक अस्तापर्यंत सतत तळपत राहिले.

निसर्गरम्य भोर संस्थानामधील जांभळी येथे १५ एप्रिल १८९३ रोजी फाटक यांचा जन्म झाला. सरकारी नोकरीमुळे वडिलांची निरनिराळ्या प्रांतांत बदली होत होती. त्यामुळे महाराष्ट्र, मध्यप्रदेश, पंजाब व राजस्थानमधील शहरांमध्ये माध्यमिक व उच्च शिक्षणार्थ राहण्याची संधी मिळाली. बी. ए. पदवीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. बी. ए. ला त्यांनी तत्त्वज्ञान विषय घेतला होता. शिक्षणानंतरची सर्व कारकिर्द महाराष्ट्रात झाली.

पत्रकारिता आणि ज्ञानसाधना यांच्यामध्ये एक प्रकारचा सुसंवाद फाटकांनी साधला होता. मर्मग्राही, मर्मभेदी व निर्भय पत्रकार या नात्याने भारताच्या पत्रकारी उज्ज्वल परंपरेमध्ये स्थिर स्थान त्यांनी मिळविले होते. आधुनिक भारताचे दोन महान प्रेषित न्या. म. गो. रानडे आणि आदर्श भारत सेवक गो. कृ. गोखले यांचे ते अनुयायी होते. या दोन महापुरुषांचे ते नितांत भक्त होते. त्यांच्या जीवनयात्रेच्या मननातून आधुनिक भारताच्या नवजीवनाच्या मुख्य प्रेरणा फाटकांनी आत्मसात केल्या होत्या. भारताच्या लोकशाहीचे चैतन्य म्हणजे विचार स्वातंत्र्य होय. या विचारस्वातंत्र्याचा अविष्कार मुख्यतः भारतीय

वृत्तपत्रे व नियतकालिके यांच्या मुक्त प्रसारामुळे झाला. हे चैतन्य मंदावले तर लोकशाही संपेल. हे चैतन्य फाटकांच्या पत्रकारितेमध्ये सतत सळसळत होते. संपादक पदावरून आणि त्या पदावरून निवृत्त झाल्यावरही अखेरपर्यंत त्यांची पत्रकारिता चांगलीच गाजत राहिली. 'विविध ज्ञानविस्तार', 'नवाकाळ', 'विविध वृत्त', 'मौज' इत्यादी नियतकालिकांमध्ये स्वतःच्या नावाने वा 'आलमगीर', 'सत्यान्वेषी', 'फरिश्ता' अशा टोपण नावांखाली त्यांनी लेखन केले. वृत्तपत्र व्यवसाय सुटल्यानंतरही नियतकालिकांचे लेखक व स्तंभ लेखक म्हणून त्यांचा संबंध शेवटपर्यंत कायम राहिला. यातील त्यांचे अनेक लेख फार मोलाचे ठरले आहेत. त्यांनी वारंवार मुंबई-पुण्यात व अन्यत्र अनेक व्याख्यानमाला मधूनमधून गुंफल्या आहेत. त्यांचेही सारांश लेखरूपाने नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. पत्रकारितेला कसलेही बंधन असू नये, ती नित्य मुक्त पाहिजे, वाद व्हावयास पाहिजे; नुसते वाद नव्हे तर खडाजंगी वाद व्हावयास पाहिजेत, चारित्र्यहनन होणार नाही अशा बेताबाताने सावधगिरीने लेखन झाले तर आवश्यकच आहे; परंतु चारित्र्यहनन होते की वास्तव प्रकट होते ही गोष्ट अनुकूल प्रतिकूल चर्चेतच ठरते. काही असले तरी शुद्ध चारित्र्याचे हनन होऊ शकत नाही अशी त्यांची श्रद्धा होती. कारण ज्याच्या चारित्र्याचे हनन होते, त्याच्याशी वृत्तपत्रामध्ये व नियतकालिकामध्ये आत्मसमर्थनाचा हक्क बजावताच येतो. लोकांमध्ये सर्व बाजू, अनुकूल व प्रतिकूल बाजू बघण्याची स्वाभाविक उत्सुकता असते. सर्व बाजू पुढे आल्या पाहिजेत असे लोक म्हणतात. वृत्तपत्र स्वातंत्र्याचा हक्क हीच सत्य निर्णयाची खरीखुरी हमी होय. न्यायालय ही संस्थाच चारित्र्य हननाचा योग्य निर्णय घेण्यास पात्र होय; सत्ताधारी नव्हे; अंतिम अर्थाने लोक हाच लोकशाहीतला मुख्य न्यायाधीश होय; सत्ताधारी नव्हे .अशा तऱ्हेची विचार स्वातंत्र्याच्या मूल्यांची जोपासना करणारा एक थोर पत्रकार म्हणूनच फाटक हे निरंतर मान्यता पावले.

१९३५ साली वाई येथील प्राज्ञ पाठशाळा मंडळाशी फाटकांचा संबंध आला. प्राज्ञपाठ शाळेच्या विविध कार्यांशी ते निगडित झाले होते. १९४५ पर्यंत या मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. प्राज्ञपाठशाळेची धर्मकोश मंडळ ही एक शाखा. या धर्मकोश मंडळाचे पहिले अध्यक्ष कै. न्या. सीताराम पाटकर हे होते. धर्मकोश मंडळाच्या बैठकीमध्ये अनेक विषयांवर चर्चा चालत असत. या चर्चांमध्ये न. र. फाटक यांची चतुरस्र विद्वत्ता, सूक्ष्म समीक्षकता आणि साहित्यिक धार्मिकता प्रकट होत असे. न्या. पाटकरांच्या लक्षात आले की फाटक हे साधे बी. ए. पदवीधर असले तरी व्यासंगी आहेत. त्यांच्यात मूलग्राही विद्वत्ता आहे. म्हणून ते महाविद्यालयीन अध्यापनास समर्थ आहेत. म्हणून पाटकर यांनी स्वतः कुलगुरू या नात्याने महिला विद्यापीठाच्या मुंबई येथील महाविद्यालयातील मराठी प्राध्यापकाच्या आसनावर त्यांची नेमणूक केली. यामध्ये महाविद्यालयात दोन वर्षे काम केल्यानंतर त्यांची उत्तम शिक्षक म्हणून ख्याती झाल्यामुळे राम नारायण रुईया

महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. या बावीस वर्षांच्या अध्यापन कालखंडात त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी उत्कृष्ट पदवीधर होऊन बाहेर पडले. त्यांची अध्यापन पद्धती ठराविक अभ्यासक्रमाला बांधलेली नव्हती. विशिष्ट एका पुस्तकाच्या मूळ मजकुराच्या मुळाशी त्यांचे प्रवचन खिळून राहत नसे. अध्यापनातून अनेक विषय व उपविषयांचा परामर्श ते घेत असत. त्या त्या विषयाच्या किंवा पुस्तकाच्या संबंधात जे वादविवाद झाले असतील, त्यांचाही ऊहापोह केल्यावाचून ते राहत नसत. तत्कालीन सार्वजनिक घडामोडींचा आहे निर्देश करून विद्यार्थ्यांच्या मनाला भोवतालच्या जगाकडे पाहावयास लावत. मार्मिक व मर्मभेदी विश्लेषण करीत असताना उपरोधाच्या व विनोदाच्याही छटा उमटत असत. उद्देश असा होता की विद्यार्थी हा नुसत्या ठरावीक अभ्यासक्रमाच्या कक्षेत गुंतून केवळ परीक्षार्थी राहू नये, त्याची जिज्ञासा प्रदीप्त व्हावी आणि बौद्धिक जीवनाचे महत्त्व त्याच्या मनाला पटावे. या वीस-बावीस वर्षांच्या अध्यापनाच्या काळात त्यांच्या स्वाध्यायाचे विषयही विस्तारत राहिले. ते केवळ मराठी साहित्याचे जरी प्राध्यापक होते तरी त्या साहित्याच्या संदर्भात महाराष्ट्रातील व भारतातील सामाजिक, धार्मिक व विशेषतः राजकीय घडामोडींकडे विद्यार्थ्यांचे लक्ष ते वेधून घेत. त्यांच्या व्यासंगाचा खराखुरा मुख्य विषय म्हणजे भारताचा व महाराष्ट्राचा मध्ययुगीन व आधुनिक इतिहास हा होय. आधुनिक इतिहासाचा त्यांचा व्यासंग त्यांच्या अनेक ग्रंथांमधून उत्तम रीतीने प्रकट झालेला आहे

ठरलेल्या चाकोरीबाहेर पारंपरिक विचारांच्या आणि श्रद्धांच्या बंधनांच्या बाहेर पडून इतिहासातील वास्तव घटना पुराव्यांच्या आधाराने तपासण्याकडे त्यांच्या मनाचा जबरदस्त ओढा असे. त्यामुळे प्रसंगाच्या अधिष्ठानावरून रूढ असलेल्या समजुतींना व श्रद्धांना धक्का देण्याचेही धैर्य आणि कुवत त्यांनी प्रकट केली आहे. लोकांत रूढ काय व लोकांना गोड काय वाटते यापेक्षा वस्तुस्थिती काय आहे या गोष्टीची ते विशेष कदर बाळगत. कित्येक वेळा सुशिक्षितांच्या मनावर पकड असलेल्या व्यक्तींच्याही विधानांना त्यांनी वारंवार आव्हान दिलेले दिसते. उदा. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर थोड्याच कालावधीत साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी लोकमान्य टिळकांचे हजारो पृष्ठांचे चरित्र अनेक भागांत प्रसिद्ध केले. त्यातील अनेक विधाने कशी निराधार आहेत हे त्यांनी दाखवून दिले आणि त्यामुळे फाटक हे कोणी अव्वल दर्जाचे विद्वान आहेत याची महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गाने प्रथमच दखल घेतली. त्यानंतर असेच प्रथितयश विद्वानांच्या बौद्धिक प्रतिष्ठेच्या मर्यादा दाखवून देण्याचे काम फाटक करीत राहिले. रामदास-शिवाजी संबंधाचा वाद अगोदरच सुरू होता. स्वामी रामदासांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संग्रामास प्रारंभ करून यशाच्या शिखरावर पोचविला, अशा तऱ्हेची धारणा त्या वेळच्या जनमनात होती. कै. न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले यांच्यापासून ते इतिहास संशोधक

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, मुमुक्षकर ल. रा. पांगारकर, धुळे येथील समर्थ बाग मंदिराचे संस्थापक शंकर श्रीकृष्ण देव या सर्वांच्या दृष्टीने समर्थ रामदास स्वामींचे कार्य केवळ राम भक्ती संप्रदायाच्या प्रवासापुरते मर्यादित नव्हते तर हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवाजी महाराजांना गुप्तपणे साहाय्य करण्याचा कार्यक्रमही त्यात अंतर्भूत होता. फाटकांनी नेमकी याविरुद्ध बाजू घेऊन समर्थ रामदास स्वामी हे राजकारणी नव्हते तर ते केवळ राम भक्ती संप्रदायाचा प्रसार करणारे एक महान संत व महंत होते; शिवाजी महाराजांच्या राजकारणाशी त्यांचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता; असा हा सिद्धांत पुढे मांडून त्यांनी धसास लावला. १९२९ मध्ये विविध ज्ञानविस्तार या मासिकात त्यांनी या संबंधाची लेखमाला प्रसिद्ध केली. श्री समर्थांच्या दासबोधात व अन्यत्र राजकारण हा शब्द वारंवार आला असून राजकारण प्रकरणेही आहेत. फाटकांनी या मुळांवरच घाव घातला. राजकारण शब्दाचा अर्थ फिरविला व राजकारण संबंधित प्रकरणाचा अर्थही मामुली ठरविला. दासबोधातील राजकारण शब्दाचा अर्थ राजनीती किंवा राज्यव्यवहार नसून चातुर्य असा आहे अशा तऱ्हेने स्वमत समर्थन फटकांनी सुरू केले. विविध ज्ञानविस्तारातील लेखमाला अनेक समर्थ भक्तांना आव्हान देणारी ठरली. त्या लेखमालेनंतर समर्थांच्या राजकारणाचे समर्थन करणारी समर्थ भक्तांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली. वरील लेखमाले नतर २१ वर्षांनी अखेरीस फाटकांनी 'श्री समर्थ चरित्र' चित्रशाळा प्रेस तर्फे 'रामदास वाङ्मय आणि कार्य' हा विस्तृत ग्रंथ प्रसिद्ध झाला.

सामान्य लोकमताला न जुमानता प्रमाणाच्या आधारे जे ऐतिहासिक तथ्य सिद्ध होईल तेच मांडावे, असा प्रण करून फाटकांनी जे विस्तृत लेखन कार्य केले त्यामध्ये त्यांची नऊ पुस्तके- 'भारतीय राष्ट्रवादाचा विकास', (सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुष्प ४८ वे) आणि '१८५७ ची शिपाई गर्दी' (शिवराज्य प्रकाशन) ही खूप नावाजली. १८५७ सालचे बंड इंग्रज सरकारच्या दिमतीस असलेल्या हिंदी सैन्याचा उठाव होता. इंग्रजी पारतंत्र्याच्या विरुद्ध हिंदवी स्वातंत्र्याच्या स्थापनेकरता झालेले हे युद्ध होते, असा निष्कर्ष स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्यासारख्या सिद्धहस्त लेखकांनी काढला होता. सामान्य जनांची धारणाही तशीच होती. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर या महान ऐतिहासिक घटनेचे भारतीयांना महत्त्व पटावे म्हणून या घटनेनंतर १०० वर्षांनी भारत सरकारतर्फे १८५७ च्या या लढ्याचा इतिहास प्रसिद्ध झाला. त्याच्या अगोदरही मधून मधून आधुनिक भारताच्या इतिहासासंबंधी जे ग्रंथ प्रसिद्ध झाले, त्यामध्ये या बंडाचा इतिहास सांगितला आहे. तत्संबंधी वारंवार अनेक पुस्तकेही प्रसिद्ध झाली. फाटकांच्या मताने हल्ली स्वातंत्र्य किंवा राष्ट्रीय स्वातंत्र्य हे शब्द ज्या अर्थाने आपण वापरतो, जे ध्येय दर्शवितो त्या ध्येयाने या बंडाचा उठाव झाला नव्हता. हा उठाव मुख्यतः दिल्लीची बादशाही स्थिर आणि पुनरुज्जीवित करण्याकरिता झाला होता. इंग्रजी राज्याविरुद्ध बंड करणाऱ्या हिंदी फौजा दिल्ली येथे चोहोकडून गोळा झाल्या

आणि त्यांनी बादशहाच्या नावाची द्वाही पुकारून इंग्रजांना सामना दिला. ही एकच मुख्य गोष्ट या संदर्भात ध्यानात आणली पाहिजे असे फाटक म्हणतात. त्या वेळच्या भारतीयांना मुसलमानी राज्यकर्ते हे परके वाटत नव्हते. इंग्रज मात्र त्यांच्या दृष्टीने परकेच होते. हा दृष्टिकोन लक्षात घेऊन १८५७ ची मीमांसा आणि तत्संबंधीच्या पुराव्यांची छाननी फाटकांनी केली आहे. भारतीय राष्ट्रवादाच्या विकासाचा सर्वांगीण परंतु संक्षिप्त परामर्श त्यांनी आपल्या पुस्तकात घेत असताना भारतीय राष्ट्रवाद ही इंग्रजांच्या राजवटीबरोबरच जन्माला आलेली विचारसरणी आहे, असा दृष्टिकोन स्वीकारून या पुस्तकातले सगळे विवेचन केले आहे. या राष्ट्रवादाच्या इतिहासातील पहिली ठळक व्यक्ती राम मोहन रॉय ही होय असे त्यांनी म्हटले आहे. राम मोहन रॉय ते महात्मा गांधी हा काळ भारतीय राष्ट्रवादाचा विकासाचा काळ होय असे गृहीत धरून भारतातील राजकीय चळवळींचा परामर्श या पुस्तकात घेतला आहे.

भारताच्या आधुनिक राजकीय इतिहासातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणजे महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा गांधी व लोकमान्य टिळक हे होत. यांपैकी म. गांधी सोडून तिघांची चरित्रे मोठ्या साक्षेपाने साधार व सविस्तर रीतीने फाटकांनी लिहिली आहेत. फाटकांनी लिहिलेले न्या. रानडे यांचे चरित्र म्हणजे मराठी साहित्यांतर्गत चरित्र वाङ्मयातील अजरामर ठेवा होय. त्याची पहिली आवृत्ती १९२४ साली निघाली व दुसरी आवृत्ती १९६६ साली प्रसिद्ध झाली. पहिल्या आवृत्तीला न्यायमूर्तींच्या पत्नी रमाबाई रानडे यांचा आशीर्वाद लाभला. या आशीर्वादाच्या प्रारंभीचे वाक्य असे- 'निराशा झालेल्या मनुष्याला केवळ ईशकृपेमुळे बहुत वर्षे इच्छिलेली गोष्ट मिळाल्याने जसा अनुपमेय आनंद होतो तसा मला हे चरित्र पाहून होत आहे.' आदर्श भारत सेवक गोपाळ कृष्ण गोखले यांचे हे चरित्र (पहिली आवृत्ती, १९६७, मौज प्रकाशन) तितकेच मोलाचे आहे. लोकमान्य टिळकांचे 'लोकमान्य' हे चरित्र या दोन ग्रंथांपेक्षा निराळ्या भावनेने लिहिलेले आहे. वस्तुनिष्ठा शक्य तितकी सांभाळली असली तरी भरपूर पुराव्यांनिशी व अचूक लिहून असा बाणा असला तरी गोखल्यांना न्याय देण्याच्या नादात टिळकांवर अन्याय करण्याचे कारण नाही. प्रा. न. र. फाटक यांनी दुर्दैवाने असे केले आहे असे वाटते. 'सुरतेची काँग्रेस फूट' (प्रकरण) या संदर्भात तपासून पाहण्यासारखे आहे. (शोधः बाळ गोपाळांचा- ले. य. दि. फडके) असे प्रा. य. दि. फडके म्हणतात ते लक्षात ठेवले पाहिजे. अनेक वेळा फाटक हे पक्षपाती व क्वचित आग्रहाने पछाडलेले दिसतात. आणखी एक उदाहरण फाटकांसंबंधाच्या या विधानाच्या समर्थनार्थ देणे योग्य होईल. त्यांनी रामदासांच्या राजकारण शब्दाचा अर्थ चातुर्य असा केला आहे. ही शब्दाची ओढाताण आहे. समर्थांनी देवाधर्माची आणि देवळांची स्थापना करण्याचे उद्योग केले, असे निश्चितपणे फाटक सांगतात. मुसलमानी राजसत्तेच्या राजकारणाची हिंदूंची देवळे पाडून लूट करणे, हिंदुंना बाटवून निपचित पाडणे हा महत्त्वाचा कार्यक्रम होता, ही गोष्ट 'भारतीय राष्ट्रवादाचा विकास' या पुस्तकात (पृ. ७७) फाटक मान्य करतात. हे मान्य

केल्यावर देवधर्माची स्थापना आणि देवळांचा जीर्णोद्धार हे राजकारण होय, हे आपोआप सिद्ध होते. समर्थांनी लिहिलेले 'अस्मानी सुलतानी' हे प्रकरण किंवा 'परचक्र निरूपण' हे प्रकरण पाहिले म्हणजे समर्थांच्या सामाजिक निरीक्षणाचे राजकारण हे महत्त्वाचे लक्ष होते ही गोष्ट नाकारता येत नाही. समर्थांच्या पूर्वी झालेल्या व समर्थ समकालीन संत वाङ्मयामध्ये अशा तऱ्हेचे राजकारणप्रधान समाज निरीक्षण कोठेही विवरिलेले दिसत नाही. बेबंदशाहीचे व रामराज्याचे ज्या प्रकारचे चित्र समर्थांनी रेखाटले आहे, त्या प्रकारचे चित्र रेखाटण्यास राजकारणी दृष्टी मुळात असावी लागते.

सार्वजनिक जीवनाशी एकरूप झालेला विद्वान

फाटकांचे महाराष्ट्रातील अनेक संस्थांशी सदस्य, पदाधिकारी, अध्यक्ष वा उपाध्यक्ष म्हणून निकटचे संबंध आले. भारत इतिहास संशोधक मंडळ (पुणे), महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ इत्यादी संस्थांशी त्यांचा दीर्घकाल संबंध राहिला. मुंबई मराठी साहित्य संघाचे अनेक वर्षे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. ते उत्कृष्ट लेखक तसेच उत्कृष्ट वक्तेही होते. त्यांचे लेखन तसेच भाषण नव्या नव्या माहितीने भरलेले असे. त्यांची भाषणे व लेख यांच्यामध्ये स्वतःच्या संशोधनाने सिद्ध केलेले अनेक अविवाद्य व विवाद्य परंतु विचाराला चालना देणारे सिद्धांत प्रतिपादिलेले असत.

फाटक हे फटकळ होते यात शंका नाही, परंतु ते तसे मत्सरी नव्हते; ते गुणग्राहकही होते. त्यांच्या विद्वत्तेची छाप अचूक पडत असे. जी माणसे त्यांच्याजवळ सरळ भावनेने किंवा जिज्ञासेने जात, त्यांच्यावर त्यांच्या दिलदारपणाची मोहिनी आपोआप पडत असे. साहित्य, विद्वत्ता, सार्वजनिक सेवा, राजकारण इत्यादी क्षेत्रांतल्या लहान मोठ्या व्यक्तींना मित्र म्हणून त्यांनी जवळ केले होते; परंतु त्यांना दांभिकपणा सहन होत नसे. आमच्यासारखी माणसे दांभिकपणाची उपेक्षा करतात; अनेकांच्या विद्वत्तेचा ताठरपणा पाहून आम्हास कीवही येते; परंतु फाटकांचे तसे नव्हते. विद्वत्तेचा ताठरपणा मोडून काढण्याची व दांभिकाची उपहासाने खच्ची करण्याची ऊर्मी त्यांना वारंवार होत असे. त्यांच्या खाजगी भाषणात व चर्चेत अनेक वेळा खट्याळ विनोद भरलेला असे. उपरोधपूर्ण लेखनही ते करीत. लेखनाला कित्येकदा विलक्षण तिखट धार येत असे. साहित्य, इतिहास इत्यादी विषयांत अनेक विद्वान त्यांच्याशी सल्लामसलत करण्यास उत्सुक असत. जिज्ञासूंना ते मदतही करत. त्यांच्या खाजगी मित्रमंडळींच्या बैठकी दीर्घकाल रंगत असत. इतक्या रंगत की रात्री बसलेल्या बैठकी पहाटे उठत असत. फाटक संगीतरसिकही होते. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील संगीततज्ज्ञांच्या परंपरेची त्यांना चांगली माहिती होती. ते विष्णू दिगंबर पलूसकर यांचे शिष्य असल्यामुळे अनेक नाणावलेल्या संगीतकारांच्या मेखा त्यांना चांगल्या माहीत असत. उत्तम नाणावलेल्या अनेक मुद्रक प्रकाशक संस्थांशी स्नेहाचे बंध त्यांनी दीर्घकाल टिकविले होते. कै. दामोदर सावळाराम यंदे यांच्याशी फाटकांचा 'इंदुप्रकाश'चे संपादक म्हणून संबंध आला तो

अखेरपर्यंत कायम टिकला. पुणे येथील चित्रशाळा छापखान्याचे मालक कै. वासुकाका जोशी आणि अन्य व्यवस्थापक, संपादक मंडळी यांचा व फाटकांचा ऋणानुबंध दीर्घकाल स्थिरावला होता. चित्रशाळा संस्थेला पुढे उतरती कळा आली. नंतर मुंबईच्या मौज प्रकाशन संस्थेचे व त्यांचे स्नेहाचे नाते चांगले जमले. त्यामुळे त्यांचे अनेक महत्त्वाचे ग्रंथ प्रकाशित होऊ शकले.

फाटकांचा शरीरबांधा उंच व भक्कम होता. उमेदीत असताना डोंगरी किल्ले चढून शिखरे गाठण्याची व दूरदूरच्या रमणीय, ऐतिहासिक स्थळांना विद्यार्थी-विद्यार्थिनी गणांसह पायी प्रवास करून भेटी देण्याची हौस होती. ते मोठे कलारसिक जसे होते तसे चोखंदळही होते. चांगले मसालेदार पदार्थ, ओल्या भुईमुगाच्या भाजलेल्या शेंगा, मक्याची भाजीकी कणसे, शड्रस पूर्ण चारी ठाव भोजन पदार्थ मिष्टान्ने, संगीताची मैफल, चटकदार गप्पागोष्टी यांची त्यांना खूप आवड होती. त्यांच्या बैठकीच्या खोलीत स्नेहसंमेलने नित्य भरत असत. स्नेहसंमेलनात व गप्पाष्टकांत खूप वेळ जात असे तरी विद्याव्यासंगाला अंतर पडत नसे.

असा हा महाराष्ट्राचा बौद्धिक संस्कृतीतील देदीप्यमान तेजस्वी तारा वय वर्षे ८६ पूर्ण करून शांतपणे अस्ताला गेला. शनिवार दिनांक २१ डिसेंबर १९७९ रोजी मुंबई, गिरगाव, नवी भटवाडी येथे दिवसा एक वाजता त्यांचे निधन झाले. त्यांच्याअगोदर इतिहास संशोधक द. वा. पोतदार यांचे निधन ६ ऑक्टोबर १९७९ रोजी झाले. पोतदारांचे दीर्घकालीन मित्र फाटक; त्यांच्या कानावर ही बातमी आली. तेव्हा फाटक म्हणाले की, ''मीही तुमच्या मागून आलोच.'' अंतकाळ जवळ आला आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षात कित्येक महिने आली होती. पोतदार आणि फाटक हे दोघेही इतिहास संशोधनात जवळजवळ पाच तपे रमलेले! दोघांचाही मुख्य विषय मराठ्यांचा इतिहास व मराठी साहित्य हा होता. पोतदार यांनी इतिहास संशोधनाची साधने जमविण्यात सबंध आयुष्य घालविले; परंतु त्या साधनांवर आधारलेला इतिहास निर्माण करू शकले नाहीत. त्या उलट फाटकांचे साधन संशोधन चालत असतानाच साहित्य निर्मितीचे कार्य अखेरपर्यंत चालू राहिले. व्यासंगाकरता ग्रंथसंग्रह ते सतत करीत राहिले. ग्रंथ संग्रह मोठा केला, परंतु अलीकडे हा संग्रह त्यांनी अनेक संस्थांना वेळोवेळी वाटून टाकला. मित्रसंग्रहही आपोआप वाढत गेला; मोठा झाला. त्यातील बरेच जण वेळी अवेळी पुढे निघून गेले. काही काही मागे राहिले आहेत, त्यापैकी एक आम्ही!

(साहित्य, दिवाळी, १९८२)

ooo

शिक्षण

६६

माझे थोर मित्र : कै. प्रा. गोवर्धनदास पारीख

कै. प्रा. गोवर्धनदास पारीख यांची माझी भेट १९३७ मध्ये मे किंवा जूनच्या सुमारास झाली. नेमका महिना व तारीख लक्षात नाही. मी दैनंदिनी लिहिण्याचा प्रयत्न करतो; परंतु पुष्कळ वेळा माझी दैनंदिनी कोरीच राहते. त्यामुळे जीवनातील महत्त्वाच्या घटनांचासुद्धा निश्चित काळवेळ मला सांगता येत नाही. काही प्रा. न. र. फाटकांसारखे मित्र कधीही दैनंदिनी ठेवत नाहीत; परंतु पन्नास-साठ वर्षांच्या पूर्वीच्याही लक्षात ठेवण्यासारख्या घटनांची तारीख आणि वेळ नेमकी सांगू शकतात.

मानवेंद्रनाथ रॉय यांची अनेक व्याख्याने १९३७ च्या मे महिन्यात पुणे येथे झाली. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीमध्ये महिनाभर उतरण्याची त्यांची व्यवस्था झाली होती. त्यांच्या पत्नी एलन रॉयही त्यांच्याबरोबर होत्या. त्या वेळी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत रॉय यांचे व्याख्यान झाले; प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. वा. गो. काळे हे अध्यक्षस्थानी होते. भारताच्या संदर्भात मार्क्सवादाच्या दृष्टिकोनाची आवश्यकता व विशेषतः विरोधविकासवाद भारताच्या इतिहासास कसा चांगला लागू होतो, याचे विवेचन रॉय यांनी केले होते. मी उपवक्ता म्हणून रॉय यांच्या विचारसरणीला पाठिंबा दिला. मी मराठीत बोललो. तोपर्यंत माझा वेष महात्मा गांधींप्रमाणे टोपी किंवा शर्टही अंगात घालत नव्हतो; गांधीवादी म्हणून प्रसिद्ध होतो. रॉय यांच्या पुणे येथील सर्व व्याख्यानांच्या सभांना प्रा. पारीख उपस्थित राहात. मी उपवक्ता म्हणून जेव्हा वसंत व्याख्यानमालेत बोललो, तेव्हा भारतातील तत्त्वज्ञानात भौतिकवाद आहे व त्याचप्रमाणे डायलेक्टिक्स म्हणजे एक प्रकारचा विरोधविकासवादही आहे; म्हणून मार्क्सवादी तत्त्वज्ञानाला अनुकूल अशी भारतीय तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी मिळू शकते असे मी प्रतिपादिले. प्रा. पारीख हे या माझ्या प्रतिपादनामुळे रॉय यांच्या सभांमध्ये माझ्या शेजारी बसून मधून मधून बातचीत करू लागले. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या रॉय यांच्या निवासस्थानी ते माझ्याबरोबर येऊ लागले. रॉय यांच्याशी माझी चर्चा होत

असे मला रॉय म्हणाले, की तुमचे मराठीतील भाषण मला नीट कळले नाही. भारतीय तत्त्वज्ञानातील परिभाषा माहीत असल्यामुळे काय तो अंदाज केला आहे. मी त्याचे इंग्रजीत स्पष्टीकरण केले. हे करीत असताना मला पारीख यांनी त्यांचा तत्त्वज्ञान विषय नसतानाही मदत केली.

या प्रसंगानंतर पारीख आणि मी विचाराने खूप जवळ आलो. ते त्या वेळी फर्ग्युसन कॉलेजमध्ये पदवी परीक्षेचा अभ्यास करीत होते. ते ज्या वसतिगृहात रहात होते तेथे आमच्या दोघांच्या गाठीभेटी व बैठकी सुरू झाल्या. त्याबरोबरच पारीख यांचे अनेक मित्र म्हणजे न्या. ए. आर. शिंपी, मिरजेचे-आप्पासाहेब देशपांडे, प्रा. दिगंबरपंत नरवणे, नी. वि. सोहनी, मा. पं. शिखरे, डॉ. र. भ. कर्णिक, गोविंदराव हर्षे इ. मंडळींची व माझी चांगली ओळख झाली. पारीख यांचा मित्रपरिवार फारच मोठा आहे. पुण्यात त्या वेळी त्यांचे तीस-पस्तीस मित्र मला आढळले. एकदा त्यांचे जे मित्र झाले ते कायम राहिले. या मित्रपरिवारात आमच्या विविध विषयांवरील चर्चा खूप रंगत. पारीख बुद्धिवादी, चर्चेत कधीही हार जात नसत. चर्चेला रंग भरायचा तो त्यांच्या विनोदांच्या आणि वादपटुत्वाच्या कौशल्याने. फर्ग्युसन कॉलेजमध्ये किंवा इतरत्र राजकीय, सामाजिक व आर्थिक विषयांवर भाषणांच्या स्पर्धा चालत. अनेक सुप्रसिद्ध तरुण समाजवादी या मैफलीत भाषणे करीत. त्यांत पारीख हे रॉयवादाच्या भूमिकेवरून समाजवाद, लोकशाही क्रांती इ. विषयांवरच्या रॉयवादविरोधी मुद्द्यांना अभिनिवेश न दाखविता विनयपूर्ण शैलीने गंभीरपणे तर कित्येकदा विनोदचातुर्याने उत्तरे देत. ते इंग्लिश व मराठी या दोन्ही भाषांमध्ये भाषणे करून श्रोत्यांवर व सभांवर छाप पाडीत असत. हिंदी भाषिक श्रोतृवर्गावरही हिंदी भाषणाने त्यांची पकड बसत असे. त्यांच्याशी चर्चेत भाग घेणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांना युक्तिवादाने गप्प बसवीत. याचा परिणाम उलट न होता त्याचे रूपांतर मैत्रीत झालेले मी पाहिले आहे. मी भारतीय तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी असल्यामुळे मला वादाचे बाळकडू मिळाले आहे आणि याच कारणास्तव माझ्या व पारीख यांच्यामध्ये १९३७ च्या मे आणि जूनमधल्या चर्चेच्या बैठकीत ज्या झटापटी झाल्या, त्याच्यातच आमची पक्की मैत्री झाली; वादाने दूर गेलो नाही, याचे कारण विचारक्षेत्रात सर्वांना संपूर्ण स्वातंत्र्य आहे व हे वैचारिक स्वातंत्र्य अत्यंत पवित्र तत्त्व आहे, असा उदारमतवादी सिद्धांत विद्यार्थी दशेतच त्यांच्या जीवनात उतरला होता. हा उदारमतवाद त्यांच्या जीवनातही तेव्हापासूनच भिनलेला असल्यामुळे दैनंदिन व्यवहारातही त्याचे प्रत्यंतर शेवटपर्यंत येत होते; कारण मैत्री ही मानवी जीवनाची आध्यात्मिक संपत्ती आहे, असे ते मानत आणि त्याचमुळे कोणीही अतिथी अभ्यागत त्यांच्याकडे आला, की त्याला खाणे-पिणे, सल्लामसलत या बाबतीत ते यथाशक्ती कधीही उणे पडू देत नसत.

वैचारिक दृष्टीने आमची दोघांची वाढ भिन्न दिशेने झाली. मी जुन्या धार्मिक, वैदिक व शास्त्री यांच्या परंपरेत विद्यार्थिदशेत वाढलो; नंतर गांधीवादी झालो. महात्मा गांधींच्या राजकीय आंदोलनात १९२० साली सामील झालो; आणि १९३७ साली मानवेंद्रनाथ रॉय

यांच्या मार्क्सवादी विचारसरणीचा अंगीकार केला. १९३० नंतर मी इंग्लिश साहित्य व तत्त्वज्ञान यांचे अध्ययन, वाचन आणि मनन करू लागलो. पारीख हे प्रथमपासून नव्या इंग्रजी शिक्षण पद्धतीत वाढले; प्रथम हिंदुत्ववादाचा संस्कार त्यांच्या मनावर फार खोल झाला होता. विद्यापीठीय शिक्षण घेत असताना आधुनिक विचारांकडे ते वळले आणि एकदम रॉय यांच्या विचारसरणीचा त्यांनी स्वीकार केला.

१९३० साली रॉय हे गुप्तपणे भारतात आले त्या वेळी मुंबई, कलकत्ता, मद्रास इ. राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे केंद्रस्थान असलेल्या मोठमोठ्या शहरांत रॉयना अनेक मित्र मिळाले. व. भ. कर्णिक आणि त्यांचे बंधू हे रॉय यांचे निष्ठावंत मित्र म्हणून त्याच वेळी कार्य करू लागले. मध्यंतरी रॉय यांना सहा वर्षांची राजद्रोहाच्या आरोपाखाली कारावासाची शिक्षा झाली. १९३६ साली सुटका झाल्यावर रॉय हे भारतात मोकळेपणाने संचार करू लागले. १९३७ साली रॉय यांचे काही काळ पुणे येथे वास्तव्य झाले. त्यातच पारीख हे आपल्या अनेक पदवीधारी मित्रांसह रॉयवादी बनले. पारीख एम्. ए. पदवीपरीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत पुण्यातच राहिले. इतर समाजवादी नेत्यांचे पुणे येथे समाजवादाचे अभ्यासवर्ग चालत. पारीख यांनी आपले स्वतंत्र अभ्यासवर्ग मार्क्सवादाच्या शिकवणीकरता सुरू केले. त्या वेळी पुणे, मुंबई, नागपूर, अमरावती इत्यादी शहरांत समाजवादी अभ्यासवर्गाला पुष्कळ बहर आला होता; कारण बरेचसे समाजवादी काँग्रेसच्या आंदोलनात भाग घेतलेले होते. गांधीवादाशी समन्वय करून ते समाजवादाचे समर्थन करीत. संपूर्ण मार्क्सवादाची मांडणी त्यामुळे समाजवादी करू शकत नसत; गांधीवाद हा अध्यात्मवादावर आधारला असल्याने अध्यात्मवादाशी सुसंगत असा समाजवाद मांडण्याची पद्धती त्यांनी स्वीकारली होती. इतर सुप्रसिद्ध भारतीय समाजवादी जयप्रकाश नारायण, लोहिया, नरेंद्र देव हे त्यांचे नेते मानले जात. इतिहासाची भौतिक व आर्थिक मार्क्सप्रणित उपपत्ती लक्षात घेऊनच पारीख यांची अभ्यासवर्गाची मांडणी असे. त्यामुळे अध्यात्मवादाशी समाजवादी आर्थिक क्रांती कशी विरोधी आहे, याचे बिनतोड समर्थन पारीख करीत असल्यामुळे, त्यांच्या अभ्यासवर्गाला उत्कृष्ट बुद्धिवादी स्वरूप येत असे.

पुणे येथील आधुनिक वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी इतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच या अभ्यासवर्गास उपस्थित असत. डॉ. इंदुमती (रणदिवे) पारीख या आपल्या मित्रांसह नियमाने यात भाग घेत असत आणि त्यात पारीख यांची व त्यांची मैत्री जमून आली व त्याचे पर्यवसान त्यांच्या विवाहात झाले. या विवाहाला रॉय यांनी आशीर्वाद दिला. त्या विवाहाला अनेक अडचणी आल्या. पारीख यांचे वृद्ध पिताजी हे सनातनी परंपरेचे होते. हा आंतरजातीय विवाह होता. पारीख यांच्या वडिलांनी माझ्याशी खूप चर्चा करून या विवाहाला उशिरा कशीबशी संमती दिली. परंतु कालांतराने या दोघांचा सुंदर संसार पाहून त्यांचे वडील प्रसन्न झाले. आंतरजातीय विवाह झाल्यामुळे या दोघा पती-पत्नींना भावी संततीचा प्रश्न मनाला त्रास देत होता. माझा असा कयास आहे, की भावी

संततीला समाजात वावरताना त्रास होऊ नये म्हणून संततिनियमन कायम ठेवले; काळ इतका बदलेल याची त्या वेळी कल्पना येऊ शकली नाही. आता मिश्र जातीय विवाहाची संतती पांढरपेशा वर्गात व ब्राह्मणांतही एकरूप होऊन, मोकळेपणाने व आनंदाने वावरू लागली आहे. त्याचे प्रमाण मात्र अजून फार अल्प आहे.

पारीख यांना वाक्चातुर्याची व तर्कबुद्धीची जन्मसिद्ध देणगी मिळली होती. त्याबरोबरच विचारात रस होता; आणि प्रतिवाद करण्याकरता आवश्यक असलेली प्रत्युत्पन्न मतीही त्यांना लाभली होती; अर्थशास्त्राची एम. ए. ची पदवी मिळाल्यानंतर ते रॉय यांनी सुरू केलेल्या 'इंडिपेंडंट इंडिया' या साप्ताहिकात तिवारी या टोपणनावाखाली भारतीय व आंतरराष्ट्रीय राजकारणावर समीक्षात्मक लेख लिहू लागले. ते लेख अजूनही त्या वेळच्या परिस्थितीचा अर्थ समजण्यास उपयुक्त ठरतील. मराठीतही प्रसंगविशेषी ते लेखन करीत. पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक सभेत १९४० मध्ये किंवा त्याच सुमारास डॉ. पुणतांबेकर (नागपूर विद्यापीठ) यांचे मार्क्सवादाचे कालबाह्यत्व व अध्यात्मवादी इतिहासतत्त्वाचे श्रेष्ठत्व या विषयावर भाषण झाले. त्याचा संक्षिप्त सारांश पुणे येथील 'केसरी' दैनिकात प्रसिद्ध झाला. त्यावर मी मुंबई येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'चित्रा' साप्ताहिकात समीक्षात्मक लेख लिहिला. त्यानंतर डॉ. पुणतांबेकर यांनी प्रत्युत्तरात्मक लेख लिहिला. या वेळी मी 'चित्रा' साप्ताहिकात संपादकीय अग्रलेख लिहीत असे. कै. बांदेकर हे विनोदी लेखक 'चित्रा'चे त्या वेळी संपादक होते. पुणतांबेकरांच्या प्रत्युत्तरात्मक लेखाला उत्तर म्हणून पारीख यांनी पुन्हा प्रत्युत्तरात्मक चार लेख लिहिले.

पारीख यांची मुंबई येथील रामरक्षा महाविद्यालयात अर्थशास्त्राच्या प्राध्यापक पदावर नेमणूक झाली. १९४० च्या दुसऱ्या जागतिक युद्धाच्या प्रारंभी रॉय यांनी फासिझमविरुद्ध निर्माण झालेल्या दोस्त राष्ट्रांच्या आघाडीला मान्यता देऊन फासिझमविरुद्ध चालू झालेल्या जागतिक आंदोलनात ते आपल्या अनुयायांसह सामील झाले. या वेळी रॉय यांनी काँग्रेसमध्ये १९३७ सालापासून स्थापन केलेल्या 'लीग ऑफ रॅडिकल काँग्रेस मेन' या रॉयवादी गटाने काँग्रेसचा राजीनामा देऊन रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टी स्थापन केली. या पक्षाच्या वरिष्ठ कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून पारीख हे काम करू लागले. या पक्षाच्या कामगार संघटनेमध्येसुद्धा महत्त्वाचे कार्य ते करू लागले. कामगारांचे अभ्यासवर्ग त्यांनी चालविले. रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टीच्या बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब, गुजरात, महाराष्ट्र, मुंबई, आंध्र, कर्नाटक, दिल्ली इत्यादी ठिकाणी शाखा निघाल्या. दुसऱ्या जागतिक महायुद्धात फासिझमविरोधी आशिया खंडातील सर्वांत मोठी वैचारिक आघाडी रॉय यांनीच उघडली. या आघाडीचे नेतृत्व करणारे व्ही. एम. तारकुंडे, शिवनारायण रे, अमलान दत्त, व. भ. कर्णिक, मणिबेन कारा यांच्यासारखे जे मोठे विचारवंत रॉय यांना लाभले ,त्यांत पारीख यांची गणना होते.

फासिझमचा जागतिक आघाडीवर पराभव झाला तरच भारताच्या लोकशाही स्वातंत्र्याला

भवितव्य आहे; कारण या महायुद्धाच्या अखेरीस फासिझमचा पराभव झाल्यास जगातील पश्चिमी साम्राज्यशाह्यांच्या विसर्जनास प्रारंभ होईल; हा रॉय यांचा भविष्यवाद एखाद्या प्रेषिताच्या भविष्यवादासारखा आम्हा सर्व रॉयवाद्यांना वाटला. परंतु म. गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या देशव्यापी राजकारणाची भारतीय जनमनावर विलक्षण पकड होती. फासिझमचा विरोध काँग्रेसला मान्य नव्हता. वैकुंठवासी राजगोपालाचार्य, कै. पंडित जवाहरलाल नेहरू आणि इतर काही काँग्रेसचे नेते हे मात्र फासिझमविरोधीच विचारसरणीचे होते. नेहरूंनी तत्पूर्वीच्या स्पेनमधील फासिझमच्या उठावाला विरोध केला होता. तरी म. गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने फासिझमविरोधी लढ्याला सरळ पाठिंबा देण्याचे नाकारले; त्या वेळी राजगोपालाचार्य स्वस्थ बसले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आपली फासिझमविरोधी भूमिका बदलून म. गांधींचेच अनुयायित्व मान्य केले. भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा १९४२ सालापर्यंत म्हणजे रशियावर हिटलरचे आक्रमण होईपर्यंत दोस्तराष्ट्रांची फासिझमविरोधी आघाडी ही साम्राज्यशाही आघाडी म्हणून काँग्रेसबरोबरच होता. या सर्व राजकीय घडामोडींबद्दल पारीख हे 'इंडिपेंडन्ट इंडिया' मध्ये अनेक समीक्षात्मक लेख लिहीत होते. मराठीमध्ये मुंबई येथून 'संग्राम' नावाचे दैनिक, रॉयवादी श्री. द्वा. भ. कर्णिक हे प्रसिद्ध करीत होते. त्यातही मराठीमध्ये मधून मधून पारीख यांचे लेख प्रसिद्ध होत. या दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात भारतीय जनतेमध्ये काँग्रेसचाच प्रभाव फार मोठा होता. १९४१ साली कलकत्ता येथे रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टीच्या वरिष्ठ कार्यकारी मंडळाची बैठक झाली. त्या वेळी पारीख, व. भ. कर्णिक, व्ही. एम. तारकुंडे, मी स्वतः इ. मंडळी उपस्थित होतो. बैठक संपल्यावर तेथील कॉफी हाउसमध्ये आम्ही रॉय व इतर सर्व मंडळी जमून कॉफीपान होताना प्रचलित विषयांची चर्चा करीत होतो. या चर्चेत मी रॉय यांना म्हटले, की भारतीय जनता ही आपल्या बाजूला नजीकच्या काळात येणार नाही. लोकशाही जीवनमूल्यांच्या संदर्भात विचार करता भारत हे राष्ट्र नापीक भूमी आहे हे मान्य करावे लागते (द इंडियन रिॲलिटी इज बॅरन). रॉय यांनी माझे हे विधान एक प्रकारे आश्चर्यचकित होऊन मान्य केले; परंतु ते पुढे म्हणाले, शास्त्रीजी, मार्क्सवादाच्या द्वंद्वात्मक विकासवादानुसारे नापीक (बॅरन) भारतीय भूमी सुपीक बनू शकेल, हे तुम्ही मार्क्सवादी असूनही का लक्षात घेत नाही? माझे भारतीय नापीकतेचे विधान कालांतराने रॉय यांनीही मान्य केले ते दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या अखेरीस आणि त्यानंतरदेखील माझे वरील विधान मधून मधून निराशेच्या मन:स्थितीत उच्चारत असत. पारीख यांना हे विधान खूपच पटले होते व ते अखेरपर्यंत रॉय यांचे हे विधान आहे, असे सांगून भारतीय लोकशाहीच्या संदर्भात मलाही गप्प बसवीत. हे विधान मूळचे माझे आहे, हे त्यांच्या स्मरणात राहिले नव्हते. मीही माझेच हे विधान आहे, अशी आठवण त्यांना कधीही करून दिली नाही.

१९३७-३८ च्या सुमारास काँग्रेसच्या नेतृत्वाखाली भारताची मुंबई योजना प्रसिद्ध झाली. रॉय यांना ही योजना अयोग्य वाटली. म्हणून बॅ. व्ही. एम. तारकुंडे व पारीख यांना भारताच्या

आर्थिक विकासाच्या गरजा लक्षात घेऊन योजना तयार करण्याचे काम रॉय यांनी सोपविले. मुख्य योजना लिहिण्याचे काम चालू असता टंकलिखित मजकूर पारीख हे मला दाखवीत. एकदा ही घटना रॉय यांच्या देखत घडली. रॉय म्हणाले, की शास्त्रीजींचा अर्थशास्त्र हा विषय नाही; अशा स्थितीत पारीख तुम्ही शास्त्रीजींना जनतायोजनेचा आराखडा दाखविता, हे कसे? शास्त्रीजींना यात काय समजते? पारीख यांनी रॉय यांना सांगितले, की मी व तारकुंडे आम्ही दोघांनी शास्त्रीजींची फासिझमविरोधी भाषणे ऐकली आहेत. त्यात ते लेनिनच्या साम्राज्यशाहीवरील प्रबंधाचे विवेचन समर्थ रीतीने करताना आम्ही ऐकले आहे; म्हणून त्यांना या विषयात बरेचसे काही समजते, असे आम्हांस वाटते. हे ऐकून रॉय याना समाधान वाटले.

१९४६ साली अखिल भारतीय घटना समितीच्या सदस्यांचे निर्वाचन झाले. त्यात रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टीनेही आपले उमेदवार उभे केले. रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टीचे उमेदवार निवडत असताना मी व. भ. कर्णिक यांना म्हटले, की आपल्या पक्षाचे उमेदवार निवडून येणार नाहीत; काँग्रेसचेच उमेदवार निवडून येतील, हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे. पारीख व कर्णिक माझ्या या विधानाने त्रस्त झाले. त्यांनी रॉय यांच्याकडे माझा हा निराशावादी विचार बोलून दाखविला. रॉय यांचे म्हणणे पडले, की २०-२५ उमेदवार निवडून आले, तरी काही हरकत नाही. आपला विचार घटना समितीमध्ये प्रभावीपणे मांडला गेला पाहिजे. २०-२५ निवडून आलेले उमेदवार हे कार्य करू शकतील. सगळ्या भारतात एकदोनच रॅडिकल उमेदवार निवडून आले व जे आले त्यांचा आवाज घटनासमितीत ऐकूही आला नाही.

सातारा जिल्ह्यात या निर्वाचनसमयी मी स्वतः रॅडिकल उमेदवाराच्या प्रचाराकरता गावोगावी हिंडत होतो. माझ्या गटावर जबरदस्त हल्ले झाले. माझ्या प्रत्येक सभेत दगडफेक व शेणफेक होत होती. सातारा शहरात राजवाड्यासमोर आमची सभा झाली. त्या सभेत कै. ह. रा. महाजनी, कै. आत्माराम पाटील, मिरजेचे कै. आप्पासाहेब देशपांडे इ. आमचे मित्र व्यासपीठावर भाषणे करू लागल्यावर जोरात दगडफेक झाली. मी भाषण करावयास उभा राहिलो तेव्हा काँग्रेसच्या स्वयंसेवकांनी आमची सभा दगडफेकीने उधळून लावली. मला लाठीकाठी घेतलेल्या स्वयंसेवकांनी घेराव घालून बदडून काढले. चपला मारल्या. मी जखमांनी आजारी झालो, ही बातमी पारीख यांना त्याच दिवशी रात्री मुंबईस कळली. लगेच रात्री पारीख यांनी भाड्याने मोटार काढून माझ्या समाचारास ते वाई येथे धावून आले. या निवडणुकीत उमेदवाराच्या प्रचाराकरता लागणारी आर्थिक मदत पारीख यांच्यातर्फेच येत होती. ही मदत माझ्याकडे मुंबईतील कामगार कार्यकर्ते श्री. आबा फाटक यांच्यातर्फे पोहोचविण्यात आली; परंतु पैशांचा विनियोग मी स्वतः करीत नसे. पैशाचा विनियोग योग्य व्हावा म्हणून कोणत्याही एका व्यक्तीच्या हाती पैसे पारीख सोपवत नसत. सार्वजनिक पैशाच्या बाबतीत पारीख हे फार काळजीपूर्वक व्यवस्थापन करीत. ही गोष्ट ते मुंबई विद्यापीठाचे

मुख्य सचिव (रेक्टर) झाल्यावर अधिक चांगल्या रीतीने सिद्ध झाली. सार्वजनिक पैशाचा विनियोग अत्यंत प्रामाणिकपणे करण्याच्या बाबतीत पारीख हे आदर्शभूत होते.

श्री. यशवंतराव चव्हाण व पारीख यांची दाट ओळख व मैत्री होती. ही ओळख पारीख हे पुणे येथे विद्यार्थी दशेत अभ्यासवर्ग चालवीत असता प्रथम झाली. मध्यंतरीच्या काळात श्री. चव्हाण व पारीख यांच्या गाठीभेटी विशेष होत नव्हत्या. यशवंतराव चव्हाण द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर गाठीभेटी व चर्चा होऊ लागल्या. मैत्रीला उजाळा मिळाला आणि मुंबई विद्यापीठाच्या मुख्य सचिवपदी (रेक्टरपदी) पारीख यांची चव्हाणांच्या सल्ल्यानेच नेमणूक झाली. पारीख हे उत्तम शिक्षक होते. राम रुइया महाविद्यालयात त्यांची तशी प्रसिद्धी होती. ते नुसते उत्तम शिक्षक नव्हते, तर आदर्श शिक्षणसंस्था कशा असाव्यात याबद्दल त्यांनी पुष्कळ चिंतन-मनन केलेले होते. शिक्षण गुणात्मक असेल तरच ते शिक्षण होय व शिक्षणानेच माणूस हा सुसंस्कृत नागरिक बनू शकतो, शिक्षणामुळेच नवा माणूस निर्माण होऊ शकतो; शिक्षण गुणात्मक नसेल तर ते शिक्षणच नव्हे; ती फसवणूक असते; या सिद्धांतावर त्यांची श्रद्धा होती. त्यामुळे या नितान्त श्रद्धेनेच त्यांनी मुंबई विद्यापीठाचा कारभार सक्षम रीतीने चालविला. मुंबईत गरीब मध्यम वर्ग व कामगार वर्ग यांना नोकरी करून महाविद्यालयीन शिक्षण देता यावे म्हणून सकाळी दहा वाजण्याच्या आत विद्यापीठीय शिक्षण घेऊन आपल्या नोकरीवर सकाळी विद्यार्थ्यांना हजर राहता यावे म्हणून सकाळची महाविद्यालये चालू होती. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर फार वाईट होत असे, हे पारीख यांना आढळले. विद्यार्थी महाविद्यालयात हजेरी लावून पसार होत, म्हणून सकाळची महाविद्यालये बंद करावी, असा निर्णय मुंबई विद्यापीठास पारीखांनी घ्यावयास लावला. या बाबतीत मुंबई विद्यापीठाच्या दोन्ही मंडळांचे सदस्य माजी उच्चतम न्यायाधीश श्री. प्र. बा. गजेंद्रगडकर याचा पारीख यांना पूर्ण पाठिंबा होता. पारीख हे मुंबई विद्यापीठामध्ये रेक्टर म्हणून काम करीत असता क्रमाने दोन कुलगुरू झाले. त्यांनीही पारीख यांचीच बाजू उचलून धरली. पारीख यांच्या कारकिर्दीत अखेरीस श्री. गजेंद्रगडकर कुलगुरू झाले व त्यांनी सकाळची महाविद्यालये सुरू करावी असा निर्णय घेतला; याचे कारण महाराष्ट्र राज्याचे जे अनेक शिक्षणमंत्री झाले त्यांनाही सकाळची महाविद्यालये पुन्हा सुरू करावी असे फार वाटत होते. पारीख यांच्यावर या शिक्षणमंत्र्यांनी अप्रत्यक्षपणे खूप दडपण आणले. त्याचा पारीख यांच्या मनावर फार ताण पडत होता. अनेक वर्षे हा ताण सोसत असताना पारीख यांनी आपला हट्ट सोडला नाही. पारीख म्हणत की, श्री. यशवंतराव चव्हाण हे जोपर्यंत मला शिक्षणमंत्री म्हणतात तशा प्रकारचा सल्ला देत नाहीत, तोपर्यंत मी माझा मुद्दा सोडणार नाही; परंतु डॉ. श्री. गजेंद्रगडकर कुलगुरू झाल्यानंतर सगळीच परिस्थिती बदलली. सहकारी व मित्र म्हणून गजेंद्रगडकरांचे जे पाठबळ मिळत होते, ते नाहीसे झाले एवढेच नव्हे, तर गजेंद्रगडकरांची पारीख यांच्या विरुद्ध दिशेने पावले पडू लागली. पारीख यांचा अपमानही होईल अशी कृती गजेंद्रगडकरांच्या हातून झाली. कारण मुंबई विद्यापीठात पारीख यांच्या

विरुद्ध कायम कारवाया करणारी अनेक मंडळी गजेंद्रगडकरांच्या पाठीशी उभी राहिली. या संदर्भात एकच उदाहरण दिले म्हणजे गजेंद्रगडकरांच्या धोरणाचा अर्थ स्पष्ट होतो. डॉ. गजेंद्रगडकर ज्या दिवशी कुलगुरू पदावर आले त्या दिवशी पारीख यांना बोलावून घेऊन गजेंद्रगडकरांनी विद्यापीठाच्या इमारतीत ज्या खोलीत बसून पारीख कार्यवाही करीत असत, ती खोली मला पाहिजे, ती तुम्ही सोडा, असा हुकूम सोडला. पारीख यांनी ती खोली सोडली. रेक्टरपदी पारीख नकोत, असे गजेंद्रगडकरांनी ठरविले होते. गजेंद्रगडकरांच्या या दिशेने हालचाली सुरू झाल्या, हे पारीख यांच्या लक्षात आले व त्यांनी रेक्टरपदच आवश्यक नाही, असा प्रस्ताव विद्यापीठाकडून संमत करून घेतला. हा ठराव संमत होईपर्यंत सुमारे १ वर्षपर्यंत पारीख विद्यापीठाचा कारभार पहात होते. गजेंद्रगडकरांचा खूप जाच होत होता. वस्तुतः पारीख मला व अनेक मित्रांना एक हिंदी म्हण वापरून नेहमी सांगत, की 'ऐसी जगह बैठ जहाँ कोई न कहे ऊठ.' मी त्यांना त्यावर उत्तर देत असे, की मला हा विचार मान्य नाही. कारण मी कोठेही, कोणत्याही आसनावर स्थिर बसण्यास उत्सुकच नसतो. पक्षी हे माझे जीवनाचे प्रतीक मानतो. थोडी चाहूल लागली तरी पक्षी बसलेल्या जागेवरून उडून जातो. पारीख यांना जबरदस्तीने आपल्या पदावरून उठून जावे लागले. डॉ. गजेंद्रगडकरांचा नूर पहिल्याच दिवशी पारीख यांना कळला होता. त्यांनी तेव्हाच विद्यापीठ सोडले असते, तर दीर्घकालपर्यंत मनोवेदना सहन करावी लागली नसती व प्रकृती भराभर ढासळत गेली तशी ढासळली नसती.

विद्यापीठ सोडल्यानंतर पारीख यांच्या मनातून विद्यापीठ लवकर उठले नाही; कारण विद्यापीठ ही संस्था त्यांना आपल्या उच्च ध्येयवादाच्या पूर्तीचे अद्वितीय साधन वाटत होते आणि त्यांचा हा जीवनाचा दृष्टिकोन उपनिषदकार व प्लेटोपासून तो आधुनिक तत्त्वज्ञ व्हाईटहेड बर्ट्रँड रसेल, जे. आर्टेगा ई गॅसेट इ. तत्त्ववेत्त्यांनी स्वीकारलेला आहे.

विद्यापीठ सोडल्यावर पारीखांची प्रकृती सारखी ढासळत होती, तरी ते महत्त्वाच्या सार्वजनिक कार्यामध्ये मोठ्या साक्षेपीपणे भाग घेत, सल्लामसलत करीत. त्यांची सल्लामसलत अत्यंत मूल्यवान असे. उच्च ध्येयवाद कार्यवाहीत कसा आणावा, यासंबंधी ते जे मार्गदर्शन करीत, ते फार अचूक असे. मुंबई, दिल्ली, कलकत्ता, मंगळूर, हैद्राबाद, मद्रास येथूनही शिक्षणतज्ज्ञ त्यांची भेट घेऊन सल्ला मागत असत. त्यांनी 'बेनेट कोलमन अँड कंपनी' व बँक ऑफ इंडिया येथे डायरेक्टर म्हणून यशस्वी रीतीने नंतर कामे केली. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय या संस्थेचे ते उपाध्यक्ष म्हणून अनेक वर्षे होते. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे ते प्रथमपासूनचे सदस्य होते. या मंडळाची सर्व कार्यवाही अध्यक्ष म्हणून मी पहात होतो. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा सबंध प्रकल्प (प्रॉजेक्ट) प्रथम पारीख आणि प्रा. अ. भि. शाह या दोघांनी तयार केला. या सर्व संस्थांमध्ये अनेक पेचप्रसंग उत्पन्न झाले, की संस्थाचालकांना बिनतोड रीतीने त्या पेचप्रसंगातून सोडविण्याची कामगिरी पारीखांकडे सोपविलेली असे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्थेचे अध्यक्ष

श्री. स. का. पाटील यांनी पारीख यांना श्रद्धांजली देताना असे म्हटले, की चांगल्या चांगल्या कायदेपंडितांना ज्या संस्थाविषयक संकटातून मार्ग काढणे अशक्य झाले, त्या संकटातून आम्हाला पारीख यांनी मार्ग दाखविला. अखेरच्या २ वर्षांत पुणे येथे पारीख सहकारी मुद्रणालय ही संस्था पारीख यांनी स्थापन केली. त्या संस्थेच्या संचालक मंडळामध्ये अनेक सहकारी चळवळीचे नेते सदस्य म्हणून समाविष्ट झालेले आहेत. सध्याचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील हे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा फार मोठा व्याप निर्माण करणारे गृहस्थ आहेत. त्यांनाही पारीख यांचे या संबंधातले कार्यक्रमविषयक विचार नवे व मोलाचे वाटले.

इंदिरा गांधी भारत संघराज्याच्या प्रधानमंत्रिपदावर आल्या. नंतर पारीख हे फार अस्वस्थ झालेले दिसले. इंदिरा गांधींनी काँग्रेसचे दोन तुकडे करून नवी काँग्रेस स्थापन केली तेव्हा मी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये समीक्षात्मक लेख लिहून इंदिरा गांधींची प्रतिमा ही राजकीय पुरोगामित्वाची दर्शक आहे, असे म्हटले. तेव्हा एकदा संध्याकाळी आम्ही दोघे चर्चा करीत असता पारीख म्हणाले, की एक अशिक्षित महिला भारताच्या प्रधानमंत्रिपदावर येते हे काही भारताच्या राजकीय भवितव्याचे शुभसूचक चिन्ह नाही. मी त्यावर त्यांच्या विरुद्ध बाजूने असे म्हटले, की अहो पारीखसाहेब, इंदिरा गांधी औपचारिक शिक्षण घेऊन विद्यापीठीय पदवीधर झालेल्या नसल्या, तरी त्या नेहरूंच्या राजकीय विद्यापीठाच्या डॉक्टरेट घेतलेल्या महिला आहेत. म्हणजे असे की, पंडित जवाहरलाल नेहरूंबरोवर त्या अनेक वर्षे सहायक म्हणून राहिल्या आहेत; त्यांच्याबरोबर देशोदेशी फिरल्या; देशी व विदेशी राजकीय मुत्सद्यांच्या नेहरूंबरोबर चाललेल्या अगणित खलबतांच्या वेळी उपस्थित राहिल्या. त्यामुळे त्यांना फारच मोठा अनुभव मिळाला, पुष्कळच ऐकावयास मिळाले. अशी संधी जगामध्ये फारच थोड्या व्यक्तींना मिळू शकते.

इंदिरा गांधींनी आणीबाणी पुकारून एक महिना झाला होता. १९७५ च्या जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मी नेहमीप्रमाणे संध्याकाळी पारीख यांच्या निवासस्थानी गेलो. मी विचारले, की आज स्वारी खूप प्रसन्न दिसते. काही महत्त्वाचे अनुकूल असे घडले का? ते म्हणाले :- आता सगळा आनंदीआनंद आहे. आपले गुरू रॉय हे मोठे राजकीय भविष्यवादी होते याचे पुन्हा प्रत्यंतर आले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तुम्ही म्हणत होता, की रॉय साहेबांचे इंडियन नॅशनल काँग्रेसबद्दलचे भविष्य खोटे ठरले; कारण काँग्रेस ही फासिस्ट पद्धतीचे राज्य निर्माण करील, असे त्यांनी म्हटले होते. पण त्याऐवजी सगळ्या वयात आलेल्या नागरिकांना मतदानाचा हक्क मिळाला आणि मूलभूत नागरिक हक्कांच्या आधारावर निर्माण झालेले संविधान अमलात आले. जगातील सर्वांत मोठ्या लोकसंख्येची लोकशाही स्थापित झाली, पण आता या आणीबाणीपासून काय घडत आहे? अधिकारशाहीची पावले गुपचूप रीतीने पुढे पडत आहेत. रॉयसाहेबांची विचारपद्धती अखेरपर्यंत मार्क्सवादीच होती असे फिलीप स्प्रॅट म्हणत होते; परंतु तुम्हाला रॉयसाहेब एकदा म्हणाले, की 'मी मार्क्सवादी असलो, तरी

मी हेगेल सोडलेला नाही. हेगेल अजून मार्क्सनंतरदेखील पायावरच उभा आहे.'

मानवी जीवनात अमलात येत असलेल्या विचारसरणीचा व तत्त्वज्ञानाचा परिपाक होऊन इतिहास कसा बदलतो, हे रॉय पहात होते. या प्रकारच्या विचारसरणीत हेगेल एका अर्थी अंतर्भूत आहेच. महात्मा गांधींची विचारसरणी फासिझमकडे नेईल, असे रॉय दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या संदर्भात आवेशाने सांगत. काँग्रेसचे तात्त्विक मार्गदर्शन गांधीवादच करीत आहे. त्यामुळे भारताची लोकशाही गांधीवादाच्या पार्श्वभूमीवर उभी राहिल्याने तिचे रूपांतर हळूहळू अधिकारशाहीमध्ये होणारच आणि तसेच आता होऊ लागले आहे. रॉयसाहेबांचा भविष्यवाद खरा ठरला आहे. रॉय साहेबांसारख्यांचा भविष्यवाद हा ऋषिमुनींसारखा नसला, तरी इतिहासाच्या अपरिहार्य क्रमात सावकाश परंतु निश्चितपणे जे घडून येते, त्याचे लक्षण रॉय यांना आगाऊच दिसले. वैयक्तिक जीवनातील कालक्रम आणि मोठमोठ्या राष्ट्रांच्या जीवनातील कालक्रम याचे मान भिन्न असते; हे लक्षात ठेवूनच रॉयसाहेबांच्या भविष्यवादाचा अर्थ करावा लागतो. या पारीख यांच्या विधानाने मी थोडा खूश झालो.

मी पुन्हा विचारले, की आजची ही तुमची दिसणारी प्रसन्नता एका आठवड्यापूर्वी दिसत नव्हती. मध्यंतरी काय झाले ते सांगा. ते म्हणाले: अहो शास्त्रीजी, माझ्या एका मित्राने कालच दिल्लीहून वार्ता आणली. तो म्हणाला, की ही वार्ता इंदिराजीच्या स्वप्नाची वार्ता आहे. इंदिराजींना आणीबाणी पुकारल्यानंतर एके दिवशी स्वप्न पडले; ''प्रथम इंदिराजींचे पिताजी जवाहरलाल नेहरू लगबगीने इंदिराजींपुढे स्वप्नात आले आणि म्हणाले, की तू प्रधानमंत्रिपद स्वीकारून राजकारणात प्रवेश केला आहेस. मी तुला बजावले होते की समाजसेवा करीत रहा; पण राजकारणाच्या जंजाळात शिरू नको. त्यावर लगेच इंदिराजीनी उत्तर दिले, की पिताजी, तुम्हीच नेहमी सांगत होता, की परिस्थिती पूर्ण बदलली म्हणजे व्यक्तीने आपला जीवनक्रम परिस्थितीला अनुसरून बदलणे शहाणपणाचे असते. मी शहाणपणा केला आहे. हे इंदिराजींचे उत्तर ऐकल्यावरोबर पंडितजी दिसेनासे झाले. लगेच काठी टेकीत टेकीत, वाकलेले म. गांधी समोर आले व म्हणाले, की इंदिरे, तुला पंडितजींच्या जवळ पाहून मी फार खूश होत असे; कारण मला लहान मुले फार आवडतात, तूही, खूप आवडत होतीस; परंतु त्या वेळेस तू आता राजकारणात जे करीत आहेस, ते तू करशील हे जर लक्षात आले असते, तर मी ब्रिटिश राज्याविरुद्ध जे आंदोलन, माझ्या ईश्वरोपासनेला मर्यादा घालून, चालविले होते, ते चालविलेच नसते. कारण ब्रिटिशांनी जेवढे नागरिकस्वातंत्र्य जनतेला बहाल केले होते तेवढेही ठेवले नाहीस. इंदिराजींच्या उत्तराची वाट न पाहताच म. गांधी झपाट्याने परत फिरले व दिसेनासे झाले.''

ही पारीख यांनी सांगितलेली इंदिराजींच्या स्वप्नाची वार्ता पारीख यांची स्वकपोलकल्पित वार्ता होती, असे माझ्या ताबडतोब लक्षात आले आणि मी त्यांना हसत-हसत म्हटले, की हे तुमच्या सद्यःस्थितीबद्दलच्या चिंतनाचे चित्रमय स्पष्टीकरण आहे. नंतर यावर काही उत्तर न

देता ते म्हणाले, की इतिहासाच्या शक्तींची वेगवान गती अडविणे हे मोठे कठीण काम असते. शास्त्रीजी, तुम्ही काँग्रेसमध्ये १९५२ साली पुनः प्रवेश केला तेव्हा ते तुमचे कृत्य रॉय यांच्या मानवतावादाच्या विरुद्ध म्हणून मला नापसंत होते; कारण तुम्हांस हे पटलेले आहे, की पक्षीय राजकारण हे सत्तापिपासूंचे राजकारण असते. कोणताही राजकीय पक्ष स्वतःची सत्ता कायम राखण्याचा प्रयत्न करतो. ते करीत असता नागरिक संघटित रीतीने जागृत नसले, तर विरोधी पर्यायी पक्षाच्या अभावी सत्ताधारी पक्षाचे अधिकारशाहीत रूपांतर होते. या देशात पर्यायी पक्ष म्हणून काँग्रेसविरोधी असा कोणताच पक्ष आतापर्यंत ३० वर्षांत संघटित होऊ शकला नाही; आणि ब्रिटन व अमेरिका यांच्याप्रमाणे प्रबल पर्यायी पक्ष उभे राहिले, तरी खरीखुरी मूलगामी (रॅडिकल) लोकशाही दुबळीच राहते. पारीख यांनी सांगितलेले हे स्वप्न १९७५ च्या ऑगस्ट १ ला टिळक विद्यापीठाच्या पुणे येथील समारंभात मी त्यांचे नाव न घेता सांगितले. अध्यक्षपदी माजी न्यायमूर्ती वि. अ. नाईक हे होते आणि प्रसिद्ध समाजवादी श्री एस. एम. जोशी हे श्रोतृवर्गात उपस्थित होते. एस. एम. जोशी हे माझे आणीबाणीबद्दलचे विचार काय आहेत, हे समजावून घेण्याकरताच मुद्दाम या समारंभास उपस्थित होते. त्यांची माझ्याबद्दलची शंका या स्वप्ननिवेदनाने नष्ट झाली. समारंभ संपल्यावर मी एस. एम.ना सांगितले, की हे स्वप्न पारीख यांनी कल्पिलेले स्वप्न आहे.

इंदिरा गांधींनी आणीबाणी पुकारल्यानंतर ते सारखे मला म्हणत, की आशिया खंडाला लोकशाही राज्यपद्धती पचत नाही, हे याने सिद्ध होते. आशियाई सुलतानशाही (एशियॅटिक डेस्पटिझम) हेच एक कायमचे ऐतिहासिक राजकीय सत्य आहे. १९७५ साली इंदिरा गांधींनी आणीबाणी अमलात आणल्यानंतर कऱ्हाड येथे मराठी साहित्य संमेलनाचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी मी जे भाषण केले, त्यात आणीबाणीच्या संदर्भात वृत्तपत्रीय स्वातंत्र्य आणि विचारप्रचाराचे स्वातंत्र्य नष्ट झाल्याबद्दल टीका केली आणि असेही सांगितले, की आज जे उपाय दिसतात, ते अखेरीस अपाय ठरतील आणि लोकशाहीचा कायम संकोच होऊन सत्तेचे केंद्रीकरण होईल. एकदा केंद्रीकरण झाले म्हणजे ते कायम तसेच दृढमूल होण्याचा प्रयत्न करील. हे माझ्या छापील भाषणातील वक्तव्य वाचून पारीख फार अस्वस्थ झाले होते. साहित्य संमेलन आटोपल्यानंतर एक दिवशी संध्याकाळी ९ वाजता मी पारीख यांना त्यांच्या निवासस्थानी अचानक भेटलो. ते आपल्या आतल्या खोलीत शय्येवर काही वाचत पडले होते. ते खोलीतून बाहेर आले, तेव्हा त्यांचा चेहरा मला फार गंभीर दिसला. थोडा वेळ काहीच बोलले नाहीत. मी किंचित अस्वस्थ झालो. तेव्हा ते स्वतः होऊनच म्हणाले, 'काय संमेलन संपवून आलात?' 'होय', मी म्हटले. 'तुमचे संमेलनाचे छापील भाषण मी वाचले. त्यातील एक परिच्छेद माझ्या मनाला फारच खटकला. श्री. यशवंतराव चव्हाण स्वागताध्यक्ष असताना तुम्ही आणीबाणीवर टीका करावी हे योग्य नव्हते. चव्हाण हे तुमचे मित्र आहेत. तुमच्या भाषणामुळे त्यांना तुम्ही संकटात आणले असावे.' मी यावर उत्तर दिले, की 'मी माझी लोकशाही निष्ठा काही

झाले तरी विसरू शकत नाही.' त्यावर पारीख उत्तरले, की 'तुमच्या वक्तव्याने भारतीय लोकशाहीचे भवितव्य यत्किंचित तरी सुधारणार आहे काय? मुळीच नाही. तुमचे भाषण म्हणजे पालथ्या घड्यावरील पाणी होय. असले व्यर्थ उद्योग न करता तुम्ही आपले वैचारिक लेखन स्वस्थ बसून व्यावहारिक राजकारणात वेळ न दवडता चालू ठेवा!' पारीख हे भारतीय लोकशाहीबद्दल अत्यंत निराशावादी होते. भारतीय भूमी ही लोकशाही मूल्यांच्या बाबतीत वांझ भूमी आहे, अशी इंदिरा गांधींच्या प्रचंड विजयामुळे त्यांची खात्री झाली होती. त्यामळे हे ध्येयवादी गृहस्थ शरीरप्रकृतीने जसे खचत गेले, तसे मनानेही खचले. याचा अनिष्ट अंतिम परिणाम फार लवकर दिसून आला.

मुंबई विद्यापीठ सोडल्यानंतर पारीख मधुमेह व हृदयविकार यांनी जर्जर झालेले होते, परंतु सकाळी उठल्यापासून झोपी जाईपर्यंत निरोगी व समर्थ व्यक्तीप्रमाणे कार्यात निरंतर मग्न असत. प्रवासही खूप करत. त्यांच्या निधनाच्या अगोदरच्या दिवशी संध्याकाळी सचिवालयात 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळा'च्या संबंधात वार्ताहरांची बैठक भरली होती. त्यात त्यांनी भाग घेतला होता. ही बैठक संपल्यावर मी डेक्कन क्वीनने वाईस येण्यास निघालो तेव्हा ते आग्रहाने म्हणाले, की आज जाऊ नका. दोन दिवस थांबा. मला पूर्वी त्यांनी असा आग्रह केला नव्हता. पुढचे दोन दिवस कसे जातील याबद्दल त्यांना काही चाहूल लागली असावी, म्हणून त्यांनी मला असा आग्रह केला असावा. मी त्यांच्या आग्रहाच्या मुळाशी काय भावना होती हे जाणू शकलो नाही व डेक्कन क्वीनने रात्री पुण्यास गेलो व दुसऱ्या दिवशी सकाळी वाईस पोहोचलो. सकाळी ११ वाजता मुंबईहून मंत्रालयातून तातडीचा फोन आला, की पारीख या जगातून निघून गेले. मी त्यांच्या अखेरच्या दर्शनाकरता टॅक्सी-मोटार शोधली; परंतु ती लवकर मिळू शकली नाही. म्हणून त्यांचे अंत्यदर्शन मला होऊ शकले नाही. त्या दिवशी मी रात्री १० वाजता त्यांच्या निवासस्थानी मुंबईस येऊन दाखल झालो व दुःखसमुद्रात बुडून गेलो. या आदर्श मित्राची स्मृती मला अखंड मार्गदर्शन करीत राहील, याबद्दल मला धन्यता वाटते. मी माझे हे मोठे भाग्य समजतो, की मला इतका प्रज्ञावंत व ध्येयवादी मित्र मिळाला.

(नवभारत, १ डिसेंबर, १९७७ पृ. ७ ते १५)

ooo

६७

मूलगामी मानवतावादी विचारक : प्रा. अ. भि. शहा

वाईच्या प्राज्ञपाठशाळा मंडळाचे एक संचालक व प्रमुख कार्यकर्ता आणि प्राज्ञपाठशाला मंडळाच्या पुणे येथील 'इन्स्टिट्यूट फॉर स्टडी ऑफ इंडियन ट्रॅडिशन्स' या विभागाचे संचालक प्रा. अ. भि. शहा यांचे ११ ऑक्टोबर (१९८१) रोजी वयाच्या ६२ व्या वर्षी पहाटे ४ वाजून १० मनिटांनी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. हा ५ महिन्यांत दुसऱ्यांदा झटका आला.

त्यांच्या पाठीमागे त्यांच्या पत्नी श्रीमती जशोदताई, मुलगा यतिन व मुलगी सौ. इला रेड्डी असा परिवार आहे. श्री. यतिन शहा यांचा विवाह, २ वर्षांपूर्वी सातारा येथील शैक्षणिक क्षेत्रात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संस्थेत काम करणारे श्री. अख्तार यांच्या मुलीशी झाला. हा आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह दिवंगत अ. भि. शहा यांच्या जीवितकार्याशी सुसंगत असाच झाला आहे. त्यामुळे अ. भि. शहा यांचे एक धीराचा कर्ता सुधारक म्हणून नाव मान्यता पावले आहे.

अ. भि. शहा यांचा जन्म २ सप्टें. १९२० रोजी गुजरातमध्ये झाला. मॅट्रिकच्या परीक्षेत ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. गणित विषयामध्ये एम. एस्सी. च्या दोन पदव्या त्यांनी मिळविल्या. १९४५ पासून प्राध्यापक या नात्याने पुण्यातील एस. पी. कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज व जळगावचे कॉलेज यांमध्ये अध्यापनाचे काम केले. मुंबईच्या एस. आय. इ. एस. कॉलेजचे पहिले प्राचार्य म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली, आणि कॉलेजची शिक्षणव्यवस्था आदर्शभूत व्हावी म्हणून या संस्थेची उभारणी केली. १९६२ मध्ये 'काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम' या पॅरिस येथील आंतरराष्ट्रीय संघटनेच्या आशिया विभागाचे ते संचालक झाले. या संस्थेमध्ये काम करीत असता लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्याशी त्यांची मैत्री जमली. जयप्रकाश नारायण यांना पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पुकारलेल्या आणीबाणीमध्ये कारागृहाची शिक्षा झाली. या शिक्षेच्या कालावधीत जयप्रकाश यांनी

आपली दैनंदिनी लिहून काढली होती, त्या दैनंदिनीची गुप्तपणे संपादणी करून व छपाई करून ती दैनंदिनी प्रकाशात आणली. श्री. पु. ल. देशपांडे यांच्याकरवी या दैनंदिनीचा मराठी अनुवाद 'स्वगत' म्हणून करून घेतला व तो प्रसिद्धीस आणला.

विद्यार्थी दशेतच १९४० सालच्या सुमारास प्रा. शहा हे भारतातील श्रेष्ठ मानवतावादी क्रांतिकारक एम. एन. रॉय यांच्या प्रभावाखाली आले. त्यानंतर आतापर्यंत एम. एन. रॉय यांच्या भारतव्यापी समविचारी मंडळींमध्ये शहा यांचे स्नेहसंबंध सतत कायम राहिले. इहवादी तत्त्वज्ञानाची आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची व्यापक बैठक भारतीय विचारवंतांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना प्राप्त व्हावी, म्हणून १९६७ मध्ये 'इंडियन सेक्युलर सोसायटी' या संस्थेची कोनशिला घातली. तत्पूर्वी आंतरराष्ट्रीय मान्यता पावलेल्या 'क्वेस्ट' या नियतकालिकाचे यशस्वी संपादक म्हणून शहा यांस मान्यता प्राप्त झाली होती. आणीबाणीच्या काळात 'क्वेस्ट'वर संकट आले म्हणून 'न्यू क्वेस्ट' हे नवे इंग्लिश मासिक सुरू केले व त्याचे संपादन व प्रकाशन अखेरपर्यंत चालते ठेवले.

१९७० मध्ये 'मुस्लीम सत्यशोधक समाज' या संस्थेची स्थापना शहा यांनी कै. हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली केली. भारतीय मुसलमानांमध्ये कै. हमीद दलवाईंसारखे धर्मसुधारक व समाजसुधारक निर्माण व्हावे आणि जागतिक मुसलमान समाजामध्ये व मुसलमान राष्ट्रांमध्ये बुद्धिप्रामाण्यवादी व इहवादी आंदोलन निर्माण व्हावे या उद्देशाने शहा यांनी हिंदुधर्माबरोबरच मुसलमान धर्म व कायदा, मुसलमानांचा इतिहास, त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांच्या चालीरीती, रूढी यांचे परिशीलन मोठ्या साक्षेपीपणे केले. भारतातील हिंदू समाजामध्ये सुमारे गेली दोनशे वर्षे धर्मसुधारणा आणि सामाजिक परिवर्तन या दृष्टीने बुद्धिवादी वा इहवादी नेते निर्माण झाले. राजा राममोहन रॉय, जोतीराव फुले, दयानंद सरस्वती, लोकहितवादी, महादेव गोविंद रानडे, आगरकर यांच्यासारखे हिंदू समाजाच्या परंपरागत धार्मिक आणि तात्त्विक विचारसरणीला कलाटणी देणारे सुधारक निर्माण झाले. असे सुधारक भारतीय मुसलमानांच्यामध्ये निर्माण झाले तर ते जगातील अनेक मुस्लीम राष्ट्रांमध्ये नवजागृती निर्माण करतील, त्यामुळे विश्वमानवसमाजाला आशावादी भविष्यकाल निर्माण करता येईल, अशा तऱ्हेचा अत्यंत व्यापक व मूलगामी मानवतावादी विचार हृदयाशी बाळगून अ. भि. शहा अविश्रांत काम करीत होते. ते विद्वान आणि मोठे विद्याव्यासंगी पुरुष होते; या त्यांच्या विद्याव्यासंगाच्या प्रेरणेमध्ये आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या अधिष्ठानावर एकात्मक मानवसमाज निर्माण करण्याचा ध्येयवादही होता. शहा हे आपल्या ध्येयवादाच्या सांगोपांग अभिव्यक्तीकरिता गेली ३०-३५ वर्षे सतत लेखन आणि प्रकाशन करीत राहिले. विज्ञान, शिक्षण, नियोजन व धर्म या विषयांशी संबद्ध पुस्तकरूपाने व संकीर्ण विपुल लेखन त्यांनी केले आहे. त्यांची अनेक स्वतः लिहिलेली व संपादित केलेली पुस्तके गाजली आहेत. 'एन्काउंटर' या जागतिक कीर्तीच्या नियतकालिकात त्यांचे लेख प्रसिद्ध

झाले आहेत. अनेक परिसंवाद व चर्चासत्रे त्यांनी घडवून आणली आहेत किंवा त्यांमध्ये त्यांनी प्रमुख वक्ते म्हणून भाग घेतला आहे. त्यांची प्रमुख पुस्तके 'रिलीजन अँड सोसायटी इन इंडिया', 'सायंटिफिक मेथड', 'प्लॅनिंग अँड डेमॉक्रसी', 'ट्रॅडिशन अँड मॉडर्निटी', 'चॅलेंजेस टू सेक्युलॅरिझम', 'सेक्युलॅरिझम इन इंडिया' ही होत. पंडिता रमाबाई यांची पत्रे संपादित करून त्या पुस्तकाला इंग्लिशमध्ये विस्तृत उद्बोधक प्रस्तावना त्यांनी बुद्धिप्रामाण्यवादाचा निकष लावून या मंडळाचा अनुदान व इतर कार्यक्रम अमलात आणण्यास अमोल साहाय्य केले.

कै. जे. पी. नाईक यांनी अलीकडे पुणे येथे स्थापन केलेल्या विद्याभारती (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन) या संस्थेच्या संचालक मंडळाचेही शहा हे सदस्य झाले होते. पदवीधर झाल्यानंतर आयुष्याच्या पहिल्या उमेदीत त्यांनी अनेक वर्षे अध्यापनाचे कार्य केले होते. त्यामुळे त्यांना भारताच्या शिक्षणक्षेत्रातील, विशेषतः उच्च शिक्षणक्षेत्रातील अवघड समस्यांची सखोल माहिती झाली होती. त्या समस्या किती दुर्लंघ्य आहेत याचीही खूप जाणीव होती. विद्याभारतीसारख्या संस्थेचा कार्यक्रम कार्यवाहीत नीट रीतीने आल्यास कोणत्या समस्या प्रथम सोडविण्यास प्रारंभ केला पाहिजे, याची दखल घेणे शक्य आहे, असे ते म्हणत. शहा यांना फार मोठी उमेद होती. मानवी भवितव्याची चिंता होती. त्या भवितव्याचा अर्थ समजण्यास आवश्यक असलेली विशाल प्रज्ञा त्यांना लाभलेली होती. या प्रज्ञेशी संतुलन साधणारी धीरताही त्यांच्या हृदयात होती. व्यक्तिशः फार मोठा देशव्यापी मित्रपरिवार त्यांनी मिळविला होता. मित्रांकरिता खस्ता खाण्याची त्यांना सवय होती. मित्रांना शहा हे मोठा आधार म्हणून वाटत होते; असा थोर सहृदय मानवतावादी मित्र हरपला. आणखी १० / १२ वर्षे ते जगते तर भारतातील व मुस्लीम जगतातील प्रबोधनाला चांगली धार त्यांनी आणली असती यात शंका नाही.

(नवभारत, नोव्हेंबर, १९८१, संपादकीय, पृ. १ व २,
मूळ शीर्षक - दिवंगत प्रा. अ. भि. शहा)

ooo

साहित्य

६८

बंगाली कवी व तत्त्वज्ञः सुधीन्द्रनाथ दत्त

नामवन्त बंगाली कवी, पंडित, पत्रकार व तत्त्वज्ञ सुधीन्द्रनाथ दत्त यांच्या आकस्मिक निधनाने बंगाली साहित्यकारांच्या जगात दुःखाची छाया पसरली आहे. दिनांक २५ जून १९६० रोजी पहाटेस मेंदूतील रक्तस्त्रावाने सुधीन्द्रदत्तांना देवाज्ञा झाली. त्याच दिवशी संध्याकाळी कलकत्ता आकाशवाणीने आणि इंग्लिश व बंगाली वृत्तपत्रांच्या विशेष अंकांनी ही शोकवार्ता प्रसृत केली. वयाला ६० वे वर्ष चार महिन्यांनी लागावयाचे होते. प्रकृती सुदृढ होती. निरंतर प्रसन्न मनाचे होते. म्हणून त्यांच्या निधनाच्या वार्तेवर प्रथम कोणाचाच विश्वास बसला नाही.

यांचे जीवन भौतिक व मानसिक अशा दोन्ही बाजूंनी सुसंबद्ध होते. जन्मकालीच अनेक भाग्यदेवतांनी मंगलाशीर्वाद सुधीन्द्रदत्तांना दिला असावा. सूक्ष्म बुद्धी, विशाल मन, निरंतर अतृप्त राहणारी जिज्ञासा, निरोगी व सुंदर देह, सुसंस्कृत, शुची व श्रीमंत कुलांत जन्म या गोष्टी हेच सुचवितात. कलकत्ता येथील प्रमुख सॉलिसिटर हिरेन्द्रनाथ दत्त हे यांचे वडील होत. हिरेन्द्रनाथ दत्त प्रख्यात संस्कृत पंडितही होते. सुधीन्द्र यांचे चुलते म्हणजे प्रसिद्ध बंगाली नट अमरेन्द्रनाथ दत्त हे होत; यांनी एका सबंध जमान्यात बंगाली नाट्यमंच गाजविला होता, १९०१, ऑक्टोबर ३० दिनांक सुधीन्द्रनाथ दत्त यांचा जन्म झाला. माध्यमिक शिक्षण बनारस येथील 'ॲनी बेझंट' विद्यालयात झाले. कलकत्त्याच्या स्कॉटिश चर्च कॉलेजमध्ये त्यांनी उच्च शिक्षण घेऊन १९२२ साली ते बी. ए. झाले.

शिक्षणाच्या वयात त्यांच्यावर बंगालमधील नवजीवनाच्या विविध आन्दोलनांचे संस्कार झाले. त्यातल्या त्यात त्यांच्यावर मुख्य प्रभाव कविश्रेष्ठ रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या प्रतिभासंपन्न साहित्यकृतींचा पडला. त्या वेळी रवीन्द्रनाथांची प्रतिभा नव्या नव्या उन्मेषांनी भारतीय व विशेषतः बंगाली मनाला चकित करून रंजवीत होती. त्या वेळी रवीन्द्रनाथ -बंगाली संस्कृतीला काव्य, गद्यलेखन, संगीत आणि चित्रकला इत्यादी विविध अंगांना

नवे वळण देऊन सुंदर रूप देत होते. समान मनांचे आकर्षण क्षणांत घडून येते तसे झाले. रवीन्द्रनाथ ठाकूर यांनी १९२९ साली जपान आणि अमेरिका या देशांच्या विजयी यात्रा केल्या. त्या वेळी सुधीन्द्रनाथ यांना बरोबर घेतले होते. त्यानंतर सुधीन्द्रनाथ हे साहित्य विषयक ज्ञान वाढविण्याकरिता युरोपमध्ये राहिले. त्यांनी अनेक युरोपियन भाषांचे व त्यातील साहित्याचे अध्ययन केले. निरंतर विद्याव्यासंग व कलेची आराधना यामुळे सुधीन्द्रदत्तांच्या ज्ञानाचा व्यास वाढत गेला आणि व्यक्तिमत्त्व विशाल बनले.

अंदाजे असे म्हणता येईल की, त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वास १९३० साली प्रारंभ झाला. त्याच वेळी त्यांनी 'परिचय' हे त्रैमासिक सुरू केले. हे त्रैमासिक सुरू होण्याअगोदर १९२६ मध्ये 'परिचय' नामक साहित्यिकांचे एक मित्रमंडळ कलकत्ता येथील प्रतिष्ठित गृहस्थ सर धीरेन्द्रमित्र यांच्या आश्रयाखाली सुधीन्द्रदत्तांनी स्थापन केले होते. त्यात हिन्दी व युरोपियन असे दोन्ही प्रकारचे लोक सभासद म्हणून सामील झाले होते. 'स्टेट्समन' पत्राचे एक संपादक माल्कम मुगेरिज हेही या मित्रमंडळाच्या कार्यास साहाय्य करीत असत. त्या पुढील दहा वर्षांत सुधीन्दत्तांच्या प्रतिमेचे वैशिष्ट्य बंगाली साहित्यिकांत मान्यतेस पावत गेले; सुधीन्द्रदत्तांच्या कविता अगदी वेगळे स्वरूप घेऊन रसिकांच्या मनाला वश करू लागल्या व विवशपणे चोखंदळ साहित्यिकांना परामर्श घेण्यास भाग पाडू लागल्या. या कवितांचा संग्रह सहा भागांमध्ये क्रमाने प्रसिद्ध झाला. युरोपियन कवितांचाही त्यांनी वेळोवेळी बंगालीत अनुवाद केला. तो त्यांनी 'प्रतिध्वनी' या नांवाने प्रसिद्ध केला. त्यांच्या निबन्धाचे दोन संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. कवी व विचारवंत या दोन्हीही नात्यांनी बंगाली साहित्यास चिरस्मरणीय असे कार्य ते करून गेले आहेत. तरुण पिढीच्या ओठांवर त्यांच्या कवितांच्या ओळी आणि समर्पक शब्दाली संध्या खेळताना दिसतात. आधुनिक पाश्चात्त्य संस्कृतीचे हृद्गत बंगाली मनाला भिडविण्याचे कार्य प्रथम सुधीन्द्रनाथ दत्तांनीच केले, असेही त्यांचे अनेक चाहते सांगतात. आधुनिक बंगाली कवितेत उच्चतम मानाचे स्थान आपल्या छोटेखानी कवितासंग्रहाच्या योगाने सुधीन्द्रनाथ दत्तांनी मिळविले आहे. शिस्त, संयम यांचा नितांतप्रेमाशी संगम झालेला त्यांच्या कवितेत मिळतो. बुद्धी आणि अंतःकरण किंवा संप्रदायवाद आणि अद्भुतरम्यतावाद किंवा सुभगपदलालित्य आणि दैनंदिन व्यवहारातील वाक्प्रयोग यांच्यातील विरोध नाहीसा झालेला सुधीन्द्रदत्तांच्या कवितेत सापडतो. बंगाली सुप्रसिद्ध कवी समरसेन यांनी सुधीन्द्रांबद्दल असे लिहिले आहे की, "उत्स्फूर्त लेखनामध्ये नीटनेटकेपणा वा सुसंबद्धता संभाळली जाणे कठीण असते, असे म्हणतात; परंतु सुधीन्द्रदत्तांनी आपल्या कृतींनी हे मत बाधित ठरविले आहे. सुधीन दत्तांच्या कवितेत पूर्वपरंपरा आणि आधुनिकता, तर्क व उत्कट भावना यांचा सुरेख मिलाफ झालेला मिळतो; सामान्य भाषेतील वाक्प्रचार प्रतिष्ठित शैलीशी एकरूप झालेले दिसतात. विशेषतः बंगाली वाङ्मयात जी गोष्ट दुर्लभ आहे ती गोष्ट म्हणजे बुद्धिनिष्ठा होय. सुधीनदत्तांच्या प्रतिभेत तत्त्वदर्शनाला अढळ

स्थान असल्यामुळेच ही गोष्ट घडू शकली.''

सुधीन्द्रनाथदत्त हे रवींद्रनाथ ठाकुरांच्या परंपरेतले असूनही वेगळेपणा दाखवू शकले याचा परिणाम सुधीन्द्रनाथ दत्तानंतरच्या कविवृंदावर झाल्याशिवाय राहिला नाही. इंग्लिश साहित्यातही नावाजलेली अशी कविता सुधीन्द्रनाथदत्तांनी लिहिलेली आहे. इंग्लंड व अमेरिकेमधील अनेक नियतकालिकांनी सुधीन्द्रनाथदत्तांच्या कवितेला आदराने प्रसिद्धी दिली आहे. इंग्लिश भाषेवरीलही त्यांच्या प्रभुत्वाला मान्यता मिळाली आहे, असे यावरून म्हणता येते. रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या शतसांवत्सरी- जयंती निमित्ताने भारत सरकारने महत्त्वाचा कार्यक्रम आखला आहे. त्या वेळी सुधीनदत्त यांनी 'रवीन्द्रनाथ ठाकूर' म्हणून लिहिलेला निबंध प्रसिद्ध होणार आहे. तो निबंध त्यांनी नुकताच पुरा केला आहे.

वृत्तपत्रकार म्हणून सुधींद्रदत्तांचे स्थान महत्त्वाचे होते. कलकत्ता येथील 'स्टेट्समन' पत्राचे सहायक संपादक म्हणून पुष्कळ वर्षे त्यांनी काम केले. इ. स. १९४९ साली संपादकपदाचा त्याग करून त्यांनी 'दामोदर व्हॅली कार्पोरेशन' वार्ताधिकारी हे पद स्वीकारले, दामोदर दरी धरण बरेचसे पुरे झाल्यावर हेही पद त्यांनी सोडून दिले. अखेरीस इ. स. १९५६ साली जादवपूर विद्यापीठात तुलनात्मक साहित्यविद्या या खात्याचे ते प्रमुख झाले. इ. स. १९५७-५८ साली शिकॅगो विद्यापीठाने त्यांना निमंत्रित प्राध्यापक म्हणून नेमले होते. जादवपूर विद्यापीठाचे उच्चशाखेचे विद्यार्थी त्यांच्या व्याख्यानांचे श्रवण करण्याकरिता नित्य उत्सुक असत. मोजून, मापून, तोडून व तपासून विषय तयार करावयाचा आणि नंतर आपल्या प्रतिभासंपन्न समीक्षणाने सजवून मांडावयाचा अशी त्यांची पद्धती होती. ते अप्रतिम वादकुशलही होते. तर्काच्या शस्त्राची सूक्ष्मता व भेदकता त्यांनी अभ्यासिली होती; त्यामुळे मार्क्सवादाचा सखोल अभ्यास करूनही त्याची मोहिनी त्यांच्यावर पडू शकली नाहीं. मार्क्सचा द्वंद्वात्मक विकासवाद व ऐतिहासिक भौतिकवाद यांची त्यांनी उत्कृष्ट छाननी केली होती. ते स्वतः मार्क्सवादी नव्हते, परंतु मार्क्सवादाचा विवेचकपणे एके काळी अंगीकार केलेले सुप्रसिद्ध क्रांतिकारक मानवेन्द्रनाथ रॉय हे त्यांचे परममित्र बनले, याचे कारण कसलाच सांप्रदायिक आग्रह सुधीन्द्रदत्तांना बाधला नव्हता.

सुधीन्द्रदत्तांच्या जीवनातली निष्ठा त्यांच्या उदार मानव्यात प्रकट होत असे. मित्रसंपदा त्यांनी अपार संपादिली होती. इ. स. १९२६ पासून अखेरपर्यंत त्यांना विविध क्षेत्रांत परिचित झालेले अगणित मित्र लाभले. स्वतःच्या विचारांवरील निष्ठा न सोडता अन्य विविध निष्ठा असलेले अनेक मित्र त्यांच्या संगतीकरिता लोभावलेले होते. मानवेन्द्रनाथ रॉय आपल्या अखेरच्या पर्वात सुधीन्द्रदत्तांचे जिवश्च कण्ठश्च स्नेही बनले. याचे कारण सुधीन्द्रदत्तांची विशाल बुद्धिमत्ता, उदार अंतःकरण, आदरातिथ्य इत्यादी गुण होत. सार्वजनिक सभा सम्मेलनांमध्ये पुढे येऊन भाग घेणे त्यांना आवडत नसे; परंतु क्वचित प्रसंगी तीही गोष्ट त्यांना टाळता आली नाही. मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या दुखवट्याच्या सभेचे ते अध्यक्ष झाले

होते. त्या प्रसंगी त्यांचे जे उद्गार बाहेर पडले, त्यात त्यांची गाढ मैत्रीची भावना व्यक्त झाली. ते म्हणाले, "रॉय यांच्या मृत्यूमुळे माझ्या जीवनातील काही एक महत्त्वाचा अंश निघून गेला आहे. आता त्याची कशानेही भरपाई होणार नाहीं. तो अत्यानंद मी कायमचा गमावला आहे.''

सुधीन्द्रनाथदत्त यांना पारलौकिक जीवनाबद्दल व सृष्टीच्या सहेतुकतेबद्दल जबर शंका होती. अनंत विश्वात माणसाचे भवितव्य काय याला काही महत्त्व नाही; विश्वाच्या दृष्टीने हे जीवन उपेक्षणीयच आहे; असे त्यांना वाटत असल्यामुळे येथील अल्पकालीन वस्तीत मैत्री आणि कला हेच सारसर्वस्व म्हणून मानण्यासारखे आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. यालाच मानव्यावरील श्रद्धा म्हणतात. सुधीन्द्रनाथदत्त हे एक थोर मानवतावादी कवी होते, बंगाली साहित्य त्यांचे निरंतर ऋणी बनले आहे.

(नवभारत, ऑगस्ट, १९६०, पृ. ६-८

मूळ शीर्षक: सुधीन्द्रनाथ दत्त)

ooo

६९

मायावादी भाष्यकर, आचार्य पुरुषोत्तम : पु. ल. देशपांडे

पश्चिमी साहित्यशास्त्रात ललितकला किंवा ललितसाहित्य यासंबंधी जे अनेक सिद्धांत सांगितलेले आहेत. त्यांतील मला पटलेला एक सिद्धान्त, 'काव्य किंवा ललितसाहित्य हे जीवनाचे भाष्य असते' हा होय. काव्य किंवा ललितसाहित्य वाच्यार्थाने भाष्य नसते, त्याचा भाष्य हा ध्वनितार्थ असतो.

पु. ल. देशपांडे यांनी आपल्या एका ललित लेखसंग्रहाला एक प्रास्ताविक पत्र जोडले आहे. ते असे -

''फ आणि ह

जन्म आणि मृत्यू ह्या दोन टोकांच्या मध्ये पकडून नियतीने चालविलेली आपणा सर्वांची फसवणूक एकदा लक्षात आली की त्यातून सुटायला आपली आणि आपुलकीने भोवताली जमणाऱ्या माणसांची 'हसवणूक' करण्यापलीकडे आणखी काय करायचं?''

शांकर वेदान्तातील माया शब्दाची व्याख्या साध्या साध्या शब्दांत या पत्रात सांगितली आहे. पकडणारी आणि फसविणारी नियती म्हणजे माया होय. या मायेचे कलात्मक आविष्करण पु.लं.च्या प्रथितयश साहित्यकृतीत आढळते. फसवणुकीने बहुश: आसूच येतात. परंतु हसू प्रसवणे ही कलाकाराची मोठीच किमया पाहिजे.

शंकराचार्यांच्या शारीरिक भाष्याच्या प्रस्तावनेत, जीवन हे सत्यावताचे मिथुन होय, असा सिद्धान्त मांडला आहे. अनृत म्हणजे संस्कृतमध्ये माया आणि मराठीत फसवणूक- हे खोटे मायाजाल आहे, ही फसवणूक आहे, हे फसणाऱ्या पात्रांच्या लक्षात जेव्हा येते तेव्हा फसणारी पात्रे बहुशः हसत नसतात, तर प्रेक्षक हसत असतात. 'तुझे आहे तुजपाशी' (परी तू जागा चुकलासी) हे गंभीर सत्य 'आचार्यां'च्या लक्षात ज्या क्षणी येते तेव्हा त्यांचे मन विव्हळ होते. तेव्हा प्रेक्षकाचेही मन विव्हळ व्हावयास पाहिजे, काही थोड्यांचे विव्हळ होतेसुद्धा; परंतु सामान्य प्रेक्षकांच्या मनाची दीर्घकालिक विनोदी संदर्भाने फसवणूक होते व ते हसतच राहतात.

या भाष्यकाराने आपल्या स्वतःच्या साहित्याबद्दल वर निर्दिष्ट केलेल्या पत्राच्या प्रास्ताविकामध्ये 'सौंदर्यवाचक विधान' केले आहे. ते सबंध पत्रच सौंदर्यवाचक विधान आहे; व पु. लं. च्या साहित्याचे 'व्यवच्छेदक लक्षण आहे.' भारतीय काव्यशास्त्राच्या परिभाषेत म्हणावयाचे तर या सौंदर्यवाचक विधानातून पु. लं.च्या साहित्याचा स्थायिभाव सूचित होतो. नैतिक सत्यांची ओढ हा पु. ल. तथा साहित्याचा स्थायिभाव आहे, ही गोष्ट ध्वनित होते. हा ध्वनितार्थ विश्लेषणात्मक पद्धतीने निघतो. कांटने वाक्यांचे किंवा विधानांचे दोन प्रकार सांगितले आहेत. (१) विश्लेषणात्मक व (२) संश्लेषणात्मक. उद्देशपदाच्या पृथक्करणातून विवेचन निघते त्या विधानास विश्लेषणात्मक म्हणतात. उदा. गाय हा सस्तन प्राणी आहे. या विधानातील सस्तन प्राणी हा अर्थ गाय या पदाच्या व्याख्येत असतो व विश्लेषणात स्पष्ट होतो. 'वासुदेव व्याकरणशास्त्री आहे' हे विधान संश्लेषणात्मक आहे; कारण 'वासुदेव' या उद्देशपदाच्या व्याख्येत व्याकरणशास्त्री हे पद अंतर्भूत नसते. वरील पत्रातील 'फसवणूक' या पदाच्या व्याख्येतच 'सत्याच्या विपरीत' असा अर्थ नियमाने अंतर्भूत आहे. काहीतरी वास्तव किंवा सत्य आहे, हे गृहीत धरण्याशिवाय फसवणुकीची कल्पना करताच येत नाही. रज्जूवर सर्पाचा भास होतो म्हणजे फसवणूक होते. ही गोष्ट रज्जू ही वस्तुस्थिती गृहीत धरल्याशिवाय मानताच येत नाही. शिंपल्यावर रूप्याचा भास होतो म्हणजे फसवणूक होते असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा शिंपले ही वस्तुस्थिती सापडावी लागते.

पु. लं. च्या साहित्यातील सत्य हे शांकरभाष्यातील परमार्थ सत्य किंवा ज्ञान विज्ञानातील सत्य आहे की नाही याबद्दल वाद होऊ शकेल, परंतु जीवनातील नैतिक सत्याबद्दल वाद होणार नाही. उदा. पु. लं. चे 'गणगोत' हे गाजलेले पुस्तक घ्या किंवा 'व्यक्ती आणि वल्ली' हे पुस्तक घ्या. 'गणगोत'मध्ये वास्तव्य व्यक्तिचित्रे आहेत व 'व्यक्ती आणि वल्ली' यात काल्पनिक व्यक्तिचित्रे आहेत. त्या दोन्हींमध्ये माणुसकीचा जिव्हाळा ओतप्रोत भरला आहे. त्या त्या वास्तव किंवा काल्पनिक व्यक्तींच्या जीवनातील मूल्यांचा किंवा नैतिक रहस्यांचा आविष्कार आहे. त्यात साधीभोळी सांसारिक माणसे आहेत; काही व्यवहारी यशस्वी माणसे आहेत. ज्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित आहे अशाही व्यक्ती आहेत; काहींच्या ठिकाणी तर भगवद्गीतेतील विभूती सत्त्वही प्रकट झाले आहे. 'मला दिसलेले विनोबा' आणि 'दया छाया घे' या दोन व्यक्तिचित्रांतून या साहित्यकाराच्या अंतिम निष्ठेचे दर्शन होते. विनोबांच्या पदयात्रेचे चित्रण अशी ग्वाही देते की 'तुझे आहे तुजपाशी' यामधील मुख्य आशय गांधीवादाचे विडंबन हा नव्हे. गांधींची तीन आंदोलने आणि विनोबांचे भूदान या सर्व गोष्टींनी या कलाकाराच्या हृदयाचा कायम ठाव घेतलेला आहे. वैयक्तिक सामाजिक नैतिक आदर्शांची विलक्षण ओढ या कलाकाराला लागली आहे, याची साक्ष निरनिराळ्या संदर्भात तर मिळतेच; परंतु विनोबांच्या पदयात्रेवरील या लेखात संपूर्णपणे मिळते. परंतु या निष्ठेचा अर्थ बालगंधर्वांवरील 'दया छाया घे' या व्यक्तिचित्रणात पूर्ण स्पष्ट होतो. कलात्मक सौंदर्य ही त्यांची अंतिम निष्ठा आहे आणि या कलामूल्यांचा आशय नैतिक सत्य होय हे ठरते.

वास्तवव्यक्तिविषयक अनेक लेखांत वर्ण्यव्यक्तींच्या दोषांकडे काना (णा) डोळा पु. लं. नी केलेला दिसतो, असा त्यांच्यावर काहींचा आक्षेप आहे. परंतु त्या आक्षेपांचे निरसन कल्पित व्यक्तींच्या, त्यांनी केलेल्या दोषदर्शनाने होते. वास्तव व्यक्तिविषयक लेखनात त्यांचा भर गुणग्राहकतेवर असतो. कल्पित व्यक्तींची मने दुखविली तरी चालतात; परंतु वास्तव व्यक्तीची व ज्यांच्यासंबंधी जनांची अंतःकरणे राखणे किंवा न दुखवतील अशी खबरदारी घेणे हेच योग्य अशी त्यांची धारणा असावी असे दिसते. 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकातला आचार्य कल्पित की वास्तवातला? रंगभूमीवरील आचार्य भूमिका घेतलेल्या पात्रानं एका तत्कालीन विद्यमान आचार्यांचा अभिनय वा हावभाव उचलल्यामुळे त्या आचार्यांचे मित्र व संबंधी रागावले, परंतु हा पु. लं. चा दोष नव्हे, हे ते नाटक वाचणाऱ्या वाचकास सांगण्याची आवश्यकता नाही.

नव्या भारताचे व आधुनिक मानवसमाजाचे नैतिक आदर्श हे पु. लं. चे कलेच्या मूल्यात रूपांतर पावलेले निकष होते. आधुनिक मराठी साहित्यात विनोदी साहित्यकारांच्या तीन पिढ्या झाल्या, ही चौथी. विनोदी साहित्याला प्रतिष्ठा प्रथम श्रीपाद कृष्णांनी दिली. तत्पूर्वीचा विनोद एक तर विदुषकी तरी असायचा किंवा तमाशाचा तरी असायचा. श्रीपाद कृष्णांनी त्याच्यात सामाजिक टीकेचा आशय ओतून शिष्ट म्हणजे सुशिक्षित वर्गाची मान्यता मिळवून दिली. दुसरी पिढी गडकरी व तिसरी पिढी अत्रे यांची. त्यांनी सुशिक्षितांना विनोदाचे वेड लावले. परंतु या दुसऱ्या व तिसऱ्या पिढीच्या विनोदाला सामाजिक टीकेचा विसर पडला. कारण गडकरी किंवा अत्रे यांच्या श्रद्धा परंपरागत रूढीशी एकरूप झालेल्या होत्या. गुरू श्रीपाद कृष्ण हे सुधारकांचे पाठीराखे तर शिष्य व प्रशिष्य सनातनी कर्मठांच्या पाठीशी उभे. पु. लं. नी विनोदाला श्रीपाद कृष्णांचा मागोवा घेत त्यांच्याही फार पुढे नेऊन अधिक उच्च पदवीवर नेऊन बसविले. त्यांनी नव्या बदलत्या स्वतंत्र भारताच्या व आधुनिक मानवी समाजाच्या आदर्शांकडे आकर्षित केले आहे.

एकच व्यक्ती बहुरूपी बनते या बाबतीत पु. लं. चे यश हे अप्रतिम आहे. एकच बहुरूपी बनतो. 'एकं सत्' हा मायावादाचा सिद्धान्त आहे. त्यांनी यशस्वी नट व नाटककार म्हणून जेवढी माया जमविली तेवढी परत केली, त्यानी समाजाकडून जेवढे मिळविले तेवढे त्यांनी समाजाला परत केले आहे. याच्या सौंदर्यनिष्ठेचा आशय नैतिक आहे हे यावरूनही सूचित होते. काही मंडळी खाजगी रीतीने त्यांना घट्ट मुठीचा म्हणतात, परंतु ती झाकलेली मूठ खरोखरच सव्वा लाखाची असते. ती वेळोवेळी मोकळी करतात समाजाकरिता, त्यातल्या त्यात विशेष म्हणजे समाजातील रंजल्यागांजल्यांकरता, आंधळ्या-पांगळ्यांकरिता. त्यांचा पाचापात्रविवेक विवेक चोख असतो.

(महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै - डिसेंबर,१९७४,
पृ. १३ ते १६, पु. ल. देशपांडे विशेषांक)

○○○

चित्रकला

७०

युरोपातील कीर्तिशाली थोर चित्रकार : फ्रान्सिस्को जोशे द गोया

नवयुगाची प्रतिनिधिभूत कला

नवी पाश्चात्त्य संस्कृती आणि सुधारणा जन्म घेत होती. या संस्कृतीचे जन्मस्थान म्हणजे पश्चिम यूरप होय. पिरिनीज पर्वतांच्या अलीकडे म्हणजे फ्रान्स देशात या क्रांतीचे केंद्रस्थान होते. या क्रांतीचा वारा यूरोपखंडभर पसरून देणारा वादळी देव म्हणजे नेपोलियन होय. या वादळाच्या पराक्रमी देवाच्या आक्रमणाबरोबर नव्या विचारांनी आणि भावनांनी सगळा यूरप भारला जात होता. अगदी नव्या भावना, नव्या प्रकारची अनुभूती विचारवंतांत संचारू लागली. परंतु या विचारांचे, भावनांचे आणि स्फूर्तीचे आविष्कार पिरिनीज पर्वताच्या पलीकडे पडलेल्या स्पेनमधील एका चित्रकाराच्या चित्रांमध्येच प्रतिबिंबित झाले. त्या युगाची म्हणजे नवजीवनाची प्रतिनिधिभूत चित्रकला निर्माण करणारा अद्वितीय कलाकार अठराव्या शतकाच्या शेवटी स्पेनच्या जीर्ण संस्कृतीच्या परिसरात उदयाला आला. पिरिनीज पर्वतांच्या पूर्वेस वाढीस लागलेली क्रांती त्या पर्वताच्या पश्चिमेस असलेल्या चित्रकाराच्या रंगांत रंगविली गेली. तो चित्रकार म्हणजे फ्रान्सिस्को जोशे द गोया हा होय. याच्या जन्माच्या वेळी स्पेनमध्ये कलेचा मागमूसही राहिला नव्हता. गोयाने तिला नवजन्म दिला; नवजीवनाची म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीची प्रतिनिधिभूत कला त्यानेच जन्माला आणली.

यौवनाचा उन्माद

१७४६ साल मार्चच्या ३० तारखेस स्पेनमधील एका खेड्यातील शेतकऱ्याच्या झोपडीत गोया जन्मला. तो १०-१२ वर्षाचा होता, तेव्हा मेंढरे हाकीत असताच मेंढरांची चित्रे स्वयंस्फूर्तीने तो पेन्सिलीने काढीत असे. हा शेतकऱ्याचा मुलगा एका हौशी चित्रकाराच्या लक्षात भरला आणि त्याला त्याने सारागोसा येथे १४ व्या वर्षीच कलेच्या शिक्षणासाठी पाठविले. तेथे शिकत असता त्या शहरी वातावरणात त्याने कित्येक वर्षे काढली. भर जवानीत आला असता तो जोमदार, सुंदर, भावुक आणि मादक दिसू लागला. तो फार

नादी तरुण होता. त्याचे लैंगिक जीवन शेकडो साहसांनी भरलेले होते. त्या बाबतीत त्याने आपल्या प्रतिस्पर्ध्याशी नेहमी मारामाऱ्या केल्या; कित्येकांची डोकी फोडली व जायबंदी केले. एके दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास त्याने आपल्या प्रेयसीच्या भूषागारात अनेक तरुणांशी ठोकाठोकी केली आणि दिवस उजाडावयाच्या आत त्याने शहरातून पोबारा केला. माद्रिद शहरात तो रहावयास गेला. तेथेही तो फार दिवस टिकला नाही. तेथे केलेल्या दंगलीत त्याला जखम झाली होती आणि पोलिसांचा ससेमिरा त्याच्यामागे लागला होता. शेवटी त्यास इटलीत पळून जावे लागले. तेथेही त्याचे उसळणारे तारुण्य व उपभोगतृष्णा त्याला थोडीच स्वस्थ बसू देतात? यौवनोन्मादाच्या भरात, अंगसंगाच्या प्रमत्त लालसेने एके दिवशी त्याने अत्यंत पवित्र अशा तरुण योगिनींच्या आश्रमात रात्रीच्या अंधारात प्रवेश केला. योगिनींच्या आश्रमात जाऊन त्यांच्या ब्रम्हचर्याचा भंग करणारास देहांत शासन तत्कालीन कायद्यात सांगितलेले होते. या धाडसी युवकावर फासावर जाण्याची वेळ येणार होती; परंतु तो एका योगिनीच्या शिताफीने फार थोडक्यात निसटू शकला. शेवटी हिंडता हिंडता हा तरुण वयाच्या २६ व्या वर्षी पुन्हा मातृदेशात परतला.

गोया व माजा

त्याच्या दुहेरी जीवनास प्रारंभ झाला. एक सभ्य गृहस्थ म्हणून तो समाजात वावरू लागला. एका प्रतिष्ठित चित्रकाराच्या मुलीशी त्याचे लग्न झाल्यामुळे राजदरबारात त्याला प्रवेश मिळाला. राजदरबारातील प्रतिष्ठित चित्रकार म्हणून त्याची जिकडे तिकडे वाखाणणी झाल्यामुळे मोठमोठ्या विलासी सरदारांच्या घराण्यात त्याचा स्वरसंचार सुरू झाला. त्याच्या उन्मादी विकारांच्या लीलांना मुबलक क्षेत्र सापडले. सुकुमार व लावण्यवती युवतींच्या पतींना या दरबारी कलाकाराचा मत्सर वाटू लागला. एवढेच नव्हे, तर धाकही वाटू लागला; कारण त्यांच्या प्रेयसींच्या गळ्यात याचा बाहुपाश केव्हा पडेल याचा नेम नाही अशी त्यांची खात्री झाली. सरदारांचा चित्रमहाल कित्येक वेळा गोयाच्या मदनक्रीडेचा रंगमहाल बनू लागला. एका ड्यूकची गोष्ट अशी सांगतात, की त्याची पत्नी माजा ही गोयावर अनुरक्त झाली होती. ड्यूकला ती गोष्ट माहीत नव्हती. तिच्याकडून त्याच्या रंगविलासाचे वर्णन त्याने पुष्कळदा ऐकले असल्यामुळे त्याला गोयाचे चित्रभवन पहाण्याची उत्सुकता उत्पन्न झाली. ही गोष्ट गोयास कळल्याबरोबर त्याने तो ड्यूक येण्याच्या आत माजा हिचे त्याने काढलेले नग्नचित्र लपवून घाईघाईने दुसरे सवस्त्र चित्र बनवून टाकले. माजाचे एक चित्र गोयाने रंगविले आहे ही गोष्ट ड्यूकला माहीत होती. डयूक आल्याबरोबर गोयाने माजाचे पेहराव चढविलेले चित्र पुढे केले. परन्तु चित्रांचे रसिक समीक्षक असे ओळखू शकतात की हे चित्र पेहरावात देखील नग्नच आहे. गोयाने माजा हिच्या अंगावर चढविलेले वस्त्र इतके उलम आणि शिरशिरीत आहे, की त्याच्यातून तिचे मदनाला आवाहन देणारे सगळे अवयव मनात भरतात. माजास आलेला खोंड शरदऋतूत बहरलेल्या, गोंडेदार, डोलणाऱ्या भरीव

कणसांच्या पिकांवर कुंपणावरुन उड्या टाकीत जातो त्यात जी जीवनशक्ती किंवा जीवनाची उन्मत्त हाव प्रकट होते तीच उन्मत्त लालसा माजा हिच्या नग्न, पहुडलेल्या, इंद्रिय वासनांना बेफाम करणाऱ्या, विवेकाला बधिर करणाऱ्या बेहोश चित्रांत दिसते. गोयाच्या तारुण्यातील उन्मादाचा तो अनुवादच दिसतो.

स्पेनचा विनाशोन्मुख राजदरबार

गोया ज्या राजदरबाराचा आश्रित होता, तो राजदरबार स्पेनच्या पतनाचा निदर्शक होता. चवथा चार्ल्स गादीवर आला होता. बदफैली राणीच्या कक्षात तो पूर्णपणे गेला होता. तोंडपुजे, डुकरासारखे मस्त झालेले, मद्दड व ढोंगी लोक दरबारात खालपासून वरपर्यंत भरलेले होते. त्यांच्या अनैतिक, घाणेरड्या वर्तनाची दुर्गंधी देशभर पसरून देश दुर्दैवी बेबंदशाहीने गांजला होता. राणीच्या मर्जीतला गोडाय हा बेअक्कल असूनही दरबारचा मुख्य वजीर झाला होता. वशिलेबाजांनी सगळ्या अधिकाराच्या जागा काबीज केल्या होत्या. अधिकाराच्या जागांचा जणू काय लिलावच होत असे. १८ हजार पुरोहितांनी व धर्मोपदेशकांनी धनशोषण करून प्रजेला दीन करून सोडले होते. त्यांच्या आधिपत्याखाली विचार व बुद्धी बंदिखान्यात पडली होती आणि कला नामशेष झाली होती. गोयाला या परिस्थितीचे पूर्ण आकलन झाले होते. तो आणि त्याच्या काळातील काही मोजके विचारशील लोक या स्थितीच्या विनाशकालाची आतुरतेने प्रतीक्षा करीत होते.

गोयाने राजघराण्याची कुटुंबचित्रे (Group Portraits) त्यांना सुखविण्याकरिता काढली. परंतु ती अशा रीतीने रंगविली की त्यामुळे त्या वेळच्या अधःपाती जीवनाची सगळी छटा ध्यानात भरावी. राणी मराया लुइसा हिचे चित्र पाहिल्याबरोबरच ही म्हातारडी बदमाश असावी असे चटकन लक्षात येते. राजपुत्राचे चित्र म्हणजे घृणास्पद, ढोंगी, लुच्चा माणूस कसा असतो याचेच चित्र होय. घोड्यावर बसलेल्या चवथ्या चार्ल्सचे चित्र जर पाहिले तर असेच दिसते की हा दमा लागलेला लठ्ठ माणूस बावळट आणि लोकांच्या रक्तावर पोसलेला आहे. आणि घोडादेखील तसाच वर्षानुवर्षे ठाणबंद व व्यायाम न मिळाल्यामुळे अगडबंब पोसलेला आणि राजासारखाच दमा लागलेला असावा. एखाद्या वेळी नशिबाने हात द्यावा आणि लॉटरीत लक्षावधी रुपये मिळून जावे अशा स्थितीत एखाद्या किराणा माल विकणाऱ्या वाण्याचे कुटुंब जसे सजते तसे स्पेनचे राजघराणे गोयाच्या चित्रात दिसते. अशी चित्रे गोयाने राजाला आणि सरदारांना अर्पण केली, परंतु त्या मूर्खांना त्याचे रहस्य कळले नाही.

NADA!

गोयाला देवाधर्माच्या नावाने पुष्ट झालेल्या ऐतखाऊ धर्मगुरू व पुरोहितांची मिजास अत्यंत तिरस्कार्य वाटत होती. राजे, सरदार आणि धर्मगुरू लोकांना अज्ञानाच्या अंधकारात चाचपडत ठेवून, अमरत्वाची आश्वासने देऊन, स्वर्गाची आशा निर्माण करून, दैन्य आणि

यातना बिनतक्रार सहन करावयास लावीत. या मरणोत्तर अमरत्वाचे आणि स्वर्गाचे खंडन करणारे चित्र गोयाने रेखाटले आहे. एक प्रेत थडग्यातून डोके वर काढून अंगुलीने एक संदेश लिहून दाखवीत आहे. तो म्हणजे Nada. ''इकडे सगळे शून्य आहे.'' राजाचा आणि धर्माचा कायदा कष्ट सोसून जन्मभर पाळला. कशाकरिता? मोक्षाकरिता; स्वर्गाकरिता. परंतु पुढे काय? सगळे खोटे. इकडे काही नाही! जे काही केले ते सगळे फुकट गेले!! Nada!!! या चित्राने क्रांतियुगाचा आवाज सुनविला. मूर्खांच्या दरबाराला मात्र त्याचा अर्थ कळला नाही.

झपाटलेला धर्मगुरू

यापेक्षाही सूक्ष्म अर्थाचा ध्वनी असलेले एक चित्र गोयाने काढले आहे. ते म्हणजे "The Bewitched'' (झपाटलेला) हे होय. एक धर्मगुरू दिव्याची ज्योत प्रज्वलित ठेवण्यासाठी लगबगीने, भीतिग्रस्त स्थितीत दिव्यात तेल ओतीत आहे. त्याचे डोळे भीतीने अगदी फाटून गेले आहेत. अर्धवट कसाबसा वाकून, जीव मुठीत आणून तो तेलपात्रातील तेलाची धार दिव्यात सोडीत आहे. दिवा मात्र एका दांडग्या बोकडाचे रूप धारण केलेल्या भुताने हातात धरलेला त्याला दिसत आहे. अंधारातून त्याच्या सभोवार पाठीमागच्या पायावर उभी राहून नाचत असलेली प्रचंड गाढवांची शरीरे धारण करणारी पिशाचे त्याला भेदरून सोडीत आहेत.

धर्मगुरू आणि धर्मग्रंथ अज्ञात, इंद्रियापलीकडच्या जगावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न करीत असतात. त्या प्रयत्नाचे हास्यास्पद स्वरूप गोयाने प्रकट केले आहे. जो धर्मज्ञानाचा दिवा पाजळून, प्रकाश पाडून पलीकडचे जगत दाखविण्याचा बहाणा तुम्ही करता तो बहाणा सर्वस्वी फुकट आहे. त्याच्याने तुम्ही मिथ्याभास तेवढे निर्माण करता. कल्पनांच्या पिशाचांनीच तो धर्मज्ञानाचा दीप हाती धरला आहे. ती कल्पनांची पिशाचे मानवी जीवनापेक्षा अधिक श्रेयस्कर आणि मंगल अशा निराळ्या विश्वाचे स्वरूप दाखवू शकणार नाहीत. मनुष्याच्या जीवनाच्या सरहद्दी संपल्या म्हणजे पलीकडे उच्चतर असे काहीच शिल्लक राहात नाही. मानवी जीवनाच्या मर्यादा ओलांडण्याचा प्रयत्न केल्यास तुमचे पाऊल एक तर काल्पनिक भूत-पिशाचांच्या जगात पडेल किंवा जनावरांच्या तरी जगात पडेल. धार्मिक विचार म्हणजे केवळ काल्पनिक तंद्रामय, असत्य, खोट्या भीतीने निर्मिलेले भ्रांतिमय जगत, दुसरे काही नाही. हेच गोयाला या चित्राच्या वातावरणात ध्वनित करावयाचे आहे.

प्रकाश कधी पोचणार?

फर्निनांड राजा गादीवर आल्यानंतर गोयाला दरबारी जीवनाचा वीट आला; नव्हे, शिसारी बसली. तो लवकर म्हातारा झाला. त्याचे अंतःकरण व्यथित होते. कारण दरबारातील ढोंगी जीवन आणि दिमाखबाज राजांगणगतखल यांचा तो मनापासून धिक्कार करीत होता. त्याने राजदरबारचा परित्याग केला. त्याच्या दुर्दैवी व एकाकी आयुष्याला सुरुवात झाली. पत्नी

आणि पुत्र दोघेही निवर्तले. कान बहिरे झाले. त्याला एकच सोबतीण राहिली. ती म्हणजे त्याची कला. काळ त्याला ग्रासावयास जवळ आला खरा; पण त्याच्या काळचे विदारक घृणित स्वरूप चित्रद्वारे उघडकीस आणून काळाला त्याने शरमावयास लावले. धर्मगुरूंना त्याच्या कुंचल्याचा प्रहार जिव्हारी लागला. त्याला तेथील जीवन असह्य करून टाकण्याचा त्यांनी चंग बांधला. प्रकृतिस्वास्थ्याच्या निमित्ताने त्याने देशत्याग केला आणि उन्हाळी झऱ्याचे स्नान घेण्यासाठी तो फ्रान्समध्ये बोदो येथे येऊन राहिला. डोळेही जवळजवळ आंधळे झाले. अशा स्थितीतही आयुष्याच्या शेवटच्या श्वासोच्छवासांत त्याने फ्रान्समध्ये जे खोदकाम केले त्यावरून असे दिसते की या विपन्न म्हाताऱ्याच्या हृदयातील उदयोन्मुख भविष्यकाळावरील श्रद्धा ढळली नाही. त्याने जगाचा निरोप घेता घेता जे चित्र काढले, त्यात पृथ्वीच्या एका काळोखात बुडालेल्या प्रदेशावर प्रकाशाचा झोत सोडला आहे. त्याबरोबर डोमकावळे, घुबडे आणि पुरोहित हे घाबरून पळ काढीत आहेत असे दाखविले आहे. हा काळोखात बुडालेला प्रदेश म्हणजे स्पेन होय. गोयाचा प्यारा स्पेन अजूनही फासिस्ट फ्रँकोच्या काळोखात कण्हत आहे. गोयाचा प्रकाश त्याच्यावर अजून पोहोचावयाचा आहे.

(दैनिक संग्राम, मुंबई, रविवार आवृत्ती, सन १९३९ ते १९४५)

❍❍❍

योग व अध्यात्म

७१

*महायोगी अरविंद

व्यक्तित्वविकास

हा आत्मा प्रवचनाने, बुद्धिसामर्थ्याने किंवा पुष्कळ शास्त्राभ्यासानेही प्राप्त होत नसतो. तो ज्याची निवड करतो त्यालाच तो प्राप्त होत असतो; व त्याला तो आपले स्वरूप खुले करून दाखवितो.

मुण्डकोपनिषद् ३, २, ३

उज्ज्वल कुलपरंपरा

अरविंदबाबूंचा जन्म ता. १५ ऑगस्ट १८७२ रोजी कलकत्ता मुक्कामी एका सुशील, सुविद्य आणि प्रगतिप्रवण अशा बंगाली ब्राह्मण कुलात झाला. त्यांचे पिताजी डॉ. कृष्णधनबाबू हे प्रख्यात तसेच लोकप्रिय सिव्हिल सर्जन होते. त्यांच्या मनावर पाश्चात्त्य संस्कृतीची अतोनात छाप होती तथापि आपल्या समाजाबद्दलची आपुलकी ते मुळीच विसरले नव्हते! किंबहुना बंकिमबाबूचे ग्रंथ त्यांना मनापासून आवडत. त्यांच्या निवासस्थानी बंगाली नि युरोपीय समाज अशा दोहोंचा गंगा जमुना संगम दृग्गोचर होत असे. म्हणून सुएझ

---

*महायोगी अरविंद घोष यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कै. सदानंद सुंठणकर यांच्या "अरविंद दोहन धार १ ली अध्यात्मविकास" या पुस्तकातला दुसऱ्या प्रकरणातील चरित्रभाग आम्ही येथे उद्धृत केला आहे. कै. सदानंद सुंटणकर हे प्रथम राष्ट्रवादी होते. नंतर एम. एन. रॉय यांच्या साम्यवादी विचारसरणीकडे वळले व अखेर अध्यात्मचिंतनात रममाण होऊन अरविंदांच्या ग्रंथांचे मनन करू लागले. अरविंदांचे समग्र तत्त्वचिंतन मराठीत आणण्याचा त्यांचा उद्देश होता. परंतु दोनच पुस्तके प्रसिद्ध केल्यावर ते कृष्णपदी विलीन झाले. प्रयत्न अपुरा राहिला.

का. संपादक

व्यक्तीमध्ये वेदान्त, महंमदीय आणि युरोपीय अशा तीनही संस्कृतीचा त्रिवेणी संगम दृष्टीस पडत होता. अरविंदबाबूंची मातृपितृपरंपरा अशी उज्ज्वल आणि सोज्ज्वल होतो.

आपल्या तिन्ही चिरंजिवांना पाश्चात्त्य धर्तीचे शिक्षण आणि त्यांच्या शिस्तीचे वळण मिळावे म्हणून बाल अरविंदासह आपल्या सर्व मुलांना कृष्णधनबाबूंनी दार्जिलिंग येथील युरोपीय शिक्षणसंस्थेत पाठविले. त्या वेळी अरविंदाचे वय पाच वर्षांचे होते. दार्जिलिंग येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण तर झालेच, शिवाय त्यांना हिमप्रदेशातील सृष्टिसौंदर्याशी तादात्म्य पावण्याची सुसंधीपण मिळाली. या त्याच्या निसर्गानुभूतीचे पडसाद त्यांच्या पुढील निसर्गकाव्यातून ऐकू येतात.

बालपण नि विलायत शिक्षण

इ. स. १८७९ मध्ये अरविंदबाबूंच्या वयास सात वर्षे पुरी होतात न होतात तोच कुरणधनबाबूंनी आपल्या सर्व कुटुंबासह विलायतेस प्रयाण केले. तेथे गेल्यावर लागलेच त्यांनी आपली तिन्ही मुले मँचेस्टर येथील ड्युएट कुटुंबाच्या स्वाधीन केली. अरविंद हे सर्वांत लहान म्हणून त्यांना ड्युएट यांनी स्वतःच घरी शिक्षण देण्यास सुरुवात केली व लॅटिन भाषेत प्रवीण बनविले. वयाच्या तेराव्या वर्षी अरविंदांना लंडनच्या सेंटपॉल शाळेत पाठविण्यात आले. त्या ठिकाणी त्यांचे सभ्य वर्तन आणि बुद्धीची तडफ पाहून शाळेचे मुख्याध्यापक त्यांच्यावर खूश झाले व त्यांनी अरविंदांना ग्रीक भाषेत तरबेज बनवून वरच्या वर्गात त्यांचे नाव दाखल केले. लॅटिन आणि ग्रीक अशा दोन्ही युरोपीय गीर्वाण भाषांमध्ये ते विशारद बनल्यामुळे त्यांना सालिना ८० पौंडांची छात्रवृत्ती मिळू लागली. त्यामुळे केंब्रिजच्या किंग्ज कॉलेजात पुढील शिक्षण संपादन करणे त्यांना सुलभ झाले. त्या कॉलेजात नाव दाखल झाल्याच्या एकाच वर्षात त्यानी ग्रीक व लॅटिन भाषांमध्ये ठेवण्यात आलेली सर्व पारितोषिके पटकाविली. एकंदरीत, आपल्या वयाला वीस वर्षे पूर्ण होण्याच्या आत अरविंदानी ग्रीक, लॅटिन, इंग्रजी नि फ्रेंच या युरोपमध्ये महत्त्वाच्या गणल्या गेलेल्या चारी भाषांवर स्वामित्व प्राप्त करून घेतले. शिवाय जर्मन आणि इटालियन या भाषांचे जरुरीपुरते ज्ञान हस्तगत केले. पाश्चात्त्य विद्या आणि संस्कृती यांचे माहेरघर अशा वरील युरोपीय भाषा आत्मसात केल्यानंतर अर्थातच सर्व पाश्चात्त्य ज्ञानभांडार लुटण्यास त्यांना पूर्ण मोकळीक मिळाली यात नवल नाही. याप्रमाणे त्यांच्या पुढील जीवनातल्या गाढ आणि अगाध विद्वत्तेचा भरीव पाया विलायतेत त्यांच्या बालपणीच रचिला गेला.

मध्यंतरी आपल्या वयाच्या अठराव्या वर्षी आय. सी. एस. परीक्षेला बसून ते उत्तीर्ण झाले, व ग्रीक आणि लॅटिन भाषांमध्ये गुण मिळविण्यात त्यांनी अभूतपूर्व असा उच्चांक गाठला. पण एकीकडे ब्रिटिश सनदी नोकर बनून आपल्या हस्तपायात त्यांना दास्यशृंखला अडकवून घ्यावयाच्या नव्हत्या आणि दुसरीकडे आपल्या घरच्या वडील मंडळींच्या भावनाही पण दुखावयाच्या नव्हत्या. अशा प्रेचप्रसंगी त्यांनी मोठ्या शिताफीने अश्वरोहण परीक्षा टाळली

आणि आपल्या मानगुटीवर बसू पाहणारे ब्रिटिश नोकरीचे जू झुगारून दिले. पुढे सुदैवाने सयाजीराव गायकवाड विलायतेला गेल्यावेळी त्यांच्याशी अरविंदबाबूंचा परिचय झाला. या परिचयाचे फळ म्हणजे अरविंदांना बडोदे संस्थानात बहुमानाची नोकरी मिळाली.

बडोद्यातील वाङ्मयीन जीवन

१८९३ मध्ये अरविंदबाबूंनी विलायत सोडली व ते बडोद्यात येऊन दाखल झाले. येथपासून १९०६ पर्यंतची तेरा वर्षे त्यांनी बडोदा मुक्कामी कंठिली. बडोदे सरकारच्या वेगवेगळ्या खात्यात नोकरी करता करता ते सेक्रेटरिएटपर्यंत चढले. नंतर काही काळ बडोद्याच्या कॉलेजात फ्रेंच व इंग्रजी या दोन भाषांचे प्राध्यापक या नात्याने त्यांनी काम केले व शेवटी ते त्या कॉलेजचे व्हाइस प्रिन्सिपाल झाले, काही काळ ते हंगामी प्रिन्सिपालही होते. बडोद्यामध्ये माधवराव जाधव, केशवराव देशपांडे, विष्णु भास्कर लेले आदीकरून महाराष्ट्रीय मंडळींशी त्यांचा घनिष्ट संबंध आला. या मंडळींच्या सहवासामुळे त्यांचा जीवनाला नवीन वळण मिळू लागले. बडोदा मुक्कामाच्या आरंभकाळात त्यांना तत्त्वज्ञानाची आवड नव्हती. तत्त्वज्ञानातील तर्ककर्कश वादविवाद त्यांना गहन नि अनिश्चित स्वरूपाचे वाटत, ते म्हणजे अमूर्त कल्पनांचे केवळ जाळे असे मानत! या काळात प्लेटो, एपिस्टेटस आणि एपिक्युरस यांचे त्यांनी थोडेबहुत अवलोकन केलेले होते. जीवनाला क्रियाशील नि गतिमान (Dynamic) बनविणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या कल्पना तेवढ्याच त्यांना मान्य होत्या. त्यांच्या अध्यात्मविद्येचाही अभ्यास झालेला नव्हता! सर्वसाधारण हिंदी शिक्षितांना पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाची जेवढी माहिती असते तेवढी अर्थात त्यांना होती. भारतीय तत्त्वज्ञानाच्या काही मूलभूत सिद्धांतांची त्यांना ओळख होती. अध्यात्मतत्त्वज्ञानाचा त्यांना प्रथम परिचय श्रीरामकृष्ण आणि विवेकानंद यांचे ग्रंथ वाचून झाला. स्वामी विवेकानंदांबद्दल त्यांच्या हृदयात अत्यंत आदर वास करीत होता व श्रीरामकृष्णावर तर त्यांची निस्सीम भक्ती होती. आत्तापर्यंत त्यांना काही आध्यात्मिक साक्षात्कारही झालेले होते.

बडोद्यास असताना त्यांनी संस्कृत, बंगाली, मराठी आणि गुजराथी या देशी भाषांचे चांगलेच ज्ञान करून घेतले. विशेषत: संस्कृत व बंगाली या भाषांवर प्रभुत्व प्राप्त करून घेतले आणि वेद, उपनिषदे, कालिदासाच्या उत्कृष्ट कलाकृती, बंकिमचंद्रांच्या कादंबऱ्या, मधुसूदन दत्तांचे काव्य वगैरे संस्कृत नि बंगाली वाङ्मयाचा कसून अभ्यास केला. १८९३ पासूनच, अरविंदबाबू हे तत्कालीन राजकारणावर प्रच्छन्न लेखमाला लिहीत असत. १८९४ मध्ये 'इंदुप्रकाश' नावाच्या मुंबई येथील वृत्तपत्रात 'जुन्या ऐवजी नवे विवे' या मथळ्याखाली एक इंग्रजी लेखमाला लिहून त्यांनी न्या. रानड्यांचे धाबे दणाणून सोडले. बडोद्यात प्रवेश केल्यापासून भारतीय विषय आणि वातावरण यांपासून त्यांना अभिनव काव्यस्फूर्ती होऊ लागली. भर्तृहरीचे 'नीतिशतक' या संस्कृत काव्यावर त्यांनी इंग्रजीत 'जीवनाचे शतक' या नावाचे काव्य रचिले, कालिदासाच्या 'विक्रमोवंशीय' या नाटकाचे

त्यांनी इंग्रजीत 'नरवीर आणि स्वर्गांगना' या नावाखाली काव्यांतर केले. 'मेघदूता'वरही त्यांनी इंग्रजीत कविता बनविली होती पण ती त्यांच्या इतर काव्याबरोबर नष्ट झाली. या व्यतिरिक्त बडोदे मुक्कामी त्यांनी रचलेल्या पण नाव घेण्याजोग्या आणखी काही कलाकृती म्हणजे 'पर्स्यूज दि डिलिव्हरर' हे पद्यनाटक, 'बाजी प्रभू' हे वीरकाव्य व 'विदुला' ही भावपूर्ण कविता इत्यादी होत.

राजकारणात प्रवेश

१९०६ जुलैमध्ये बाबू अरविंद घोष यांनी राजकारणात पदार्पण करण्याच्या हेतूने आपल्या वैभवशील नोकरीवर पाणी सोडले आणि कलकत्त्यास प्रयाण करून उघड रीतीने राजकारणात भाग घेण्यास आरंभ केला. या वेळी इतिहासप्रसिद्ध वंगभंग चळवळीने आपल्या कर्तृत्वाची शीग गाठून ब्रिटिश नोकरशाहीला 'दे माय धरणी ठाय' करून सोडले होते. यानंतरच्या साडेतीन वर्षांत म्हणजे १९०६ जुलैमध्ये बडोदा सोडल्यापासून तो १९१० फेब्रुवारीत, फ्रेंच हद्द गाठल्यापर्यंतच्या कालावधीत त्यांची देदीप्यमान लेखणी ही 'वंदे मातरम', 'युगांतर', 'नवशक्ती' इत्यादी नियतकालिकांतून एकसारखी बिजलीप्रमाणे चकाकत होती. त्याचा सुपरिणाम म्हणजे शेकडो वर्षे निद्रांकित झालेला भारत खडबडून जागा झाला आणि आपल्या अस्तन्या सारून ब्रिटिश साम्राज्यशाहीशी दोन हात खेळण्यास पुढे सरसावला! अर्थात ब्रिटिश नोकरशाहीचे धाबे दणाणले व ती अरविंदबाबूंचा काटा काढून टाकण्याचा मार्ग शोधू लागली. या काळात लो. टिळकांच्या तोडीचा राजकीय पुढारी म्हणून त्यांची देशभर ख्याती झाली. टिळकांचा नि अरविंदांचा अन्योन्य संबंध एकदिलाचा किंबहुना परम जिव्हाळ्याचा होता असेही म्हणण्यास हरकत नाही. सुरतेला लो. टिळकांनी अध्यक्षांच्या निवडणुकीला जो विरोध केला व काँग्रेस भंग पावली त्यामागे अरविंदांचीच प्रेरणा होती असे अरविंदांचेच अलीकडचे उद्‌गार आहेत. लो. टिळकांचे इंग्रजी लेख व भाषणे या ग्रंथाला श्रीअरविंदांनी प्रस्तावना लिहिलेली आहे, तीत टिळकांचे गाढ विद्वत्त्व नि अलौकिक नेतृत्व याबद्दल त्यांनी कमालीचे धन्योद्‌गार काढलेले आहेत. श्रीअरविंदांचा प्रत्यक्ष आत्मानुभूतीचा भाग विचारात न घेतल्यास भगवद्‌गीतेच्या रहस्याबद्दल दोघांच्या विचारसरणीत बरेचसे साम्य असलेले आढळून येते.

अलिपूर बॉम्ब खटला

अरविंदबाबूंच्या प्रखर नि प्रकाशमान लेखणीचा दाह आणि प्रकाश तत्कालीन नोकरशाहीला इतका जाणवला की, त्यांना अलिपूर बाँबच्या खुनी खटल्यामध्ये गोवण्यात आले. या खटल्यात अरविंदबाबूंच्या वतीने बॅ. देशबंधू दास हे काम पाहात होते. त्यांनी अहर्निश परिश्रम घेऊन अरविंदांना त्यातून पूर्ण दोषमुक्त ठरवून घेतले. बचावाच्या भाषणाचा समारोप करताना दासबाबू हे अरविंदांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल जी भविष्यवाणी उद्‌गारली ती

आजमितीस सत्य ठरलेली आहे. ती वाणी म्हणजे -

"माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, सरकार आणि जनता यामधील सध्या चालू असलेला विचारसंघर्ष विराम पावेल, आजचा संक्षोन आणि चळवळ यांची आवश्यकता हीही नाहीशी होईल. आरोपी अरविंद हेही निजधामाला जातील; परंतु त्यानंतर कित्येक वर्षांनी मात्र, अरविंदाची कीर्ती दिगंत पसरू लागेल आणि स्वदेशाभिमानाचा कवी, राष्ट्रवादाचा द्रष्टा आणि मानवजातीचा जिवलग सखा म्हणून त्यांचा सर्वत्र गौरव होत असलेला दृष्टीस पडेल; इतकेच नव्हे, तर त्यांच्या वचनांचा प्रतिध्वनी केवळ भारतातच नव्हे, तर सप्तसमुद्र आणि सर्व खंडे दुमदुमून सोडील. म्हणून मी म्हणतो की, अशा योग्यतेची व्यक्ती ही केवळ या न्यायासनापुढेच उभी आहे असे नसून ती इतिहासाच्या वरिष्ठ न्यायासनापुढेही उभी आहे."

तुरुंगात श्रीकृष्णसाक्षात्कार

अरविंदबाबूवर खटला भरल्यानंतर त्यांना अलिपूर येथील तुरुंगात पाठविण्यात आले. तेथे त्यांना श्रीकृष्णाचा मूर्तिमंत साक्षात्कार झाला. तुरुंगातल्या यच्चयावत वस्तू कैदीसुद्धा श्रीकृष्णरूप आहे, असे त्यांच्या दृष्टीला भासू लागले. कारावासातून मुक्तता झाल्यानंतर उत्तरपारा येथे त्यांनी खुल्या दिलाचे जे भाषण केले, त्यात त्यांनी आपले हृदयपरिवर्तन कसे झाले, आपण प्रथम संशयवादी, अज्ञेयवादी किंबहुना निरीश्वरवादही असता पुढे कालांतराने पण क्रमशः अध्यात्मनिष्ठ आणि योगप्रवण बनलो, वेद आणि उपनिषदे यांवर आपली भक्ती उत्पन्न होऊन ती दृढ होऊ लागली आणि शेवटी अलिपूरच्या तुरुंगात आपल्याला कोणते ईश्वरी आदेश मिळाले या सर्व गोष्टींचे हृदयंगम वर्णन केलेले आहे. त्या भाषणाचा काही भाग यानंतर उद्धृत करणे आवश्यक आहे. अरविंद म्हणतात:

''त्या वेळी जेव्हा मी ईश्वराविषयी विचार केला, तेव्हा माझी ईश्वरावर अढळ श्रद्धा नव्हती, इतकेच नव्हे, तर अज्ञेयवाद; निरीश्वरवाद आणि संशयवाद हे माझ्या हृदयात सारखे डोकावून पाहात होते. ईश्वराचे अस्तित्व तरी आहे काय, याबद्दलसुद्धा मला बिलकूल खात्री नव्हती! त्याचे मला अस्तित्वही भासत नव्हते. तथापि काहीतरी वेदातील सत्याकडे, गीतेतील सत्याकडे, हिंदुधर्मातील सत्याकडे मला ओढून नेत होते; वेदप्रणित धर्मामध्ये, राजयोगामध्ये, कोठेतरी विलक्षण सत्य असले पाहिजे असे माझ्या हृदयाला वाटत होते."

पुढे त्याच भाषणात, आपल्या भारत नि भारतीय जनता यावरील भक्तीमुळे आपण परमेश्वराकडे ओढले गेल्यामुळे त्यांच्या उद्धारासाठी अहोरात्र परिश्रम घेण्याची आणि कष्ट करण्याची शक्ती आपल्याला प्राप्त व्हावी अशी आपण परमेश्वरापाशी प्रार्थना केली वगैरे हकिकत ते पुढीलप्रमाणे निवेदन करतात.

"जर तू आहेस, तर तुला माझ्या अंतःकरणात काय चाललेले असते हे माहीत आहे. तू जाणत आहेस की मी मुक्तीसाठी तुझ्यामागे लागलेलो नाही. ज्या गोष्टी इतर लोक तुझ्याकडे

मागतात त्या मला नको आहेत, हे राष्ट्र उद्धरण्यासाठी मल शक्ती दे एवढेच माझे तुजपाशी मागणे आहे. भारतीय जनतेवर माझी प्रीती आहे. तिच्यासाठी माझे जीवनसर्वस्व वाहावे, तिच्यासाठी जगावे आणि काम करावे एवढीच माझी इच्छा आहे. ती तू पुरी कर असे मी विनवितो.''

परमात्मा संदेश

उत्तरपारा भाषणात अरविंद हे, अलिपूरच्या तुरुंगात आपण योगाश्रय केला असता आपल्याला परमात्म्याने, ऋषिमुनी, साधुसंत आणि ईश्वरी अवतार यांनी वाढवून पूर्णत्वास आणलेल्या सनातन धर्माचे लोण जगभर पोचविले जावे म्हणून भारतीय स्वातंत्र्याचा लढा आपल्याच प्रेरणेने चाललेला असून जगाच्या कल्याणासाठी आपण भारत बंधमुक्त करण्याच्या क्रियेला चालना दिलेली आहे इत्यादी संदेश दिला वगैरे वर्णन करतात, तो संदेश असा :

''या वर्षाच्या एकान्तवासात तुला काही सत्यवस्तुस्थितीचा प्रत्यय आणून दिलेला आहे, त्या वस्तुस्थितीबद्दल तुझे मन साशंक होते, ती वस्तुस्थिती अर्थात हिंदुधर्माबद्दलची होय. हा धर्म सर्व जगापुढे मी उद्धृत करीत आहे, तो मी ऋषिजन, साधुसंत आणि अवतार यांच्याकरवी विकास घडवून आणून पूर्णत्वास आणलेला आहे आणि तो धर्म आता माझे कार्य करण्यासाठी जगातल्या राष्ट्रामध्ये प्रसार पावणार आहे. हिंदुस्थानचा उद्धार, मी माझी वाणी जगभर पसरावी म्हणून करीत आहे. ती वाणी म्हणजे सनातन धर्म होय; तो शाश्वत धर्म आहे; त्याचे तुला पूर्वी ज्ञान नव्हते पण त्याचा साक्षात्कार तुला मी आता प्राप्त करून दिलेला आहे; तुझ्यामधल्या अज्ञेयवादाला आणि संशयवादाला उत्तर देण्यात आले आहे; अंतर्बाह्य प्रत्यक्ष मूर्तस्वरूपात प्रमाणे दाखवून तुझ्या शंकेचे मी निरसन केलेले आहे, त्यामुळे तुझे समाधानही झालेले आहे. तू येथून ज्या वेळी बाहेर पडशील त्या वेळेपासून तू तुझ्या जनतेला सांगण्यास प्रारंभ कर की, तिच्यामध्ये आज जी जागृती दृष्टीस पडते आहे, ती सनातन धर्माच्या उद्धारासाठी, त्या धर्माच्या जगभर प्रसारासाठी व तिच्या स्वतःच्याही उद्धारासाठी होय. तेव्हा भारताचा उत्कर्ष म्हणजे सनातन धर्माचा उत्कर्ष होय. भारत हा महत्त्वाला चढणार याचा अर्थ सनातन धर्म महत्पदाला चढणार; भारताचा. विस्तार आणि विकास होणार. सनातन धर्मासाठी आणि सनातन धर्मामुळे भारताचे जिणे आहे. मी तुला प्रत्यय आणून दिलेला आहे की, मी सर्व ठिकाणी आहे, प्रत्येक वस्तूमध्ये आहे, प्रत्येक इसमामध्ये आहे, मी या राष्ट्रीय चळवळीमध्ये आहे, जे देशाकरता धडपडत आहेत, केवळ त्यांच्यामधूनच मी कार्य करीत आहे असे नसून, जे कोणी त्यांना विरोध करीत आहेत आणि त्यांच्या मार्गाआड येत आहेत, त्यांच्याद्वाराही मी कार्य करीत असतो. मी प्रत्येकामध्ये कार्य करीत आहे. आणि लोकांना काहीही वाटो आणि ते काहीही करोत, ते माझाच हेतू साध्य होण्यास मदत करीत असतात, तेसुद्धा माझेच काम करीत असतात, ते माझे शत्रू नव्हेत, तर

ती माझी साधनयंत्रे (Instruments) होत. तुमच्या सर्व कृतींमध्ये तुम्ही पुढे वाट चालत आहात, पण कोणत्या दिशेने तुम्ही वाट चालता हे तुम्हाला कळत नसते. तुमच्या मनात एक गोष्ट करावयाची असते पण तुम्ही करता दुसरीच. अमुक एक फळ म्हणून तुम्ही कार्य हाती घेता, पण तुमच्या प्रयत्नाला निराळेच फळ प्राप्त होत असते. आता चिच्छवित ही पुढे सरसावलेली आहे. आणि तिनेच जनतेमध्ये संचार केलेला आहे. फार पूर्वीपासून या उठावाची मी तयारी करीत आहे आणि आता समय येऊन ठेपलेला आहे, की तो उठाव यशाप्रत नेण्याची जबाबदारी मी पत्करलेली आहे.''

अलिपूर बाँब खटल्यामधून सुटका झाल्यानंतर वर दिलेल्या संदेशांतर्गत विचारसरणी जनतेस पटवून देऊन तिचा फैलाव करण्याचे उद्दिष्ट पुढे ठेवून अरविंदबाबूंनी ''कर्मयोगिन'' आणि ''धर्म'' ही साप्ताहिके सुरू करून, ''पुनश्च हरिः ॐ'' म्हणून राष्ट्रीय चळवळ ताज्या दमाने पण अनुभवजन्य नव्या दृष्टिकोनाने चालू केली.

ब्रिटिश भारतास शेवटचा प्रणाम

पण पुढे लगेच म्हणजे एका वर्षाच्या आतच अरविंदाना राजसंन्यास घेणे अवश्य झाले. मध्यंतरी सरकारही त्यांना हद्दपार करणार असल्याची गुप्त वार्ता त्यांना विवेकानंद शिष्याभगिनी निवेदिता यांनी प्रथम दिली होती. पण ''माझे शेवटचे मृत्युपत्र'' हा लेख त्यांनी आपल्या सहीनिशी प्रसिद्ध केल्यानंतर सरकारने अरविंदांना हद्दपार करण्याची कल्पना सोडून दिली. ही बातमी निवेदिता त्यांनी त्यांना नंतर दिली. भारताचा निरोप आपण का व कसा घेतला यासंबंधी श्री अरविंद हे खुद्द प्रतिपादन करतात :

''मी कर्मयोगिनच्या कार्यालयात उपस्थित असता, कार्यालयाची झडती घेण्यात येऊन मला पकडले जाणार असा, एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, निरोप मला कळविण्यात आला. त्याप्रमाणे कार्यालयाची झडती झालीच, पण मला पकडण्यात आले नाही. नंतर माझ्या सभोवतालच्या मंडळींची आगामी घटनेबद्दल उत्साहपूर्ण चर्चा चालू असलेली मी ऐकत असता, अकस्मात माझ्या चांगल्याच परिचयाच्या आवाजात ''चंद्रनगरचा मार्ग धर'' ''या तीन शब्दांत मला वरून आदेश आला. ताबडतोब दहा मिनिटे होतात न होतात तो मी चंद्रनगरच्या बोटीवर चढलो आणि संपण्यापूर्वीच चंद्रनगर येथे येऊन दाखल झालो. चंद्रनगर येथे अज्ञात राहून पूर्णपणे माझ्या योगसाधनेमध्ये अभिरत होऊन राहिलो आणि त्या वेळेपासून दोन्ही वृत्तपत्राशी माझा असलेला कार्यसंबंध सुटला. काही काळानंतर म्हणजे ४ एप्रिल १९१० रोजी वरीलप्रमाणेच मला पुनः आदेश मिळाल्यावरून मी चंद्रनगर सोडले व पांदिचरी गाठली.''

पांदिचरीस पोहोचल्यावर अरविंदांनी प्रारंभी काही दिवस शंकर चेट्टीच्या घरी मुक्काम केला; नंतर तेथून स्वतः वसविलेल्या श्वेतनगरात (White Town) त्यांनी पदार्पण केले व पूर्ण योगसिद्धीचा मार्ग आक्रमण करण्यास आरंभ केला. देशातील परिस्थिती निवळताच

पुनः राजकारणात प्रत्यक्ष भाग घेण्याचा त्यांचा सुरुवातीला विचार होता, पण पुढे जेव्हा राजनैतिक अगर भौतिक विक्रमापेक्षा, आध्यात्मिक विक्रमांची मातब्बरी विशेष असून तेच आपले ललाटलिखित आहे, अशी त्यांची खात्री झाली तेव्हा त्यांनी राजकारणाचा नाद, अजिबाद सोडून दिला आणि योगसाधनसिद्धीला स्वतःला पूर्णपणे वाहवून घेतले.

श्री अरविंदांची योगसाधना

१९०४ मध्ये अरविंदांचे चित्त योगाकडे प्रथम वळले. ते वळण्यास मुख्य कारण म्हणजे त्यांचे राजकारण होय. त्यांना असे वाटले की, आपण जर योगाचा आश्रय केला तर आपल्याला आध्यात्मिक बलाची जोड मिळून राजकारणात आपल्याला यथोचित मार्गदर्शन करता येईल आणि सर्व दृष्टींनी आपले सामर्थ्य वृद्धिंगत होऊन राजकारण यशस्वी होईल. किंबहुना योगाने त्यांचे चित्त आकर्षून घेण्यापूर्वीच त्यांना वेगवेगळ्या प्रसंगी, मिळून चार वेळा निर्गुण आणि सगुण ब्रह्माचे असे विविध साक्षात्कारही पण झालेले होते. ते म्हणजे-

१ मुंबईच्या अपोलो बंदरावर पाय ठेवताक्षणीच त्याना अकस्मात शांती प्राप्त झाली व ती कित्येक महिने टिकली;

२ काश्मीरमधील तख्त-इ-सुलेमानच्या डोंगरपठारावरून चालून जात असता निर्गुण ब्रह्माचा एकाएकी साक्षात्कार झाला;

३ नर्मदातीरावरच्या एका मंदिरामधील काली माता जागरूक असल्याचा एकदम प्रत्यय आला.

४ बडोद्यात वास्तव्य केल्याच्या पहिल्याच वर्षी आगगाडीतून प्रवास करीत असताना ते एका अपघातात सापडले, त्या वेळी आपला अंतर्यामी ईश्वर हाच आपल्या दृष्टीच्या कक्षेतून सर्व घटनांचे अर्थात सर्व परिस्थितीचे नियमन करीत असल्याचे दृक्प्रत्ययास आले. तथापि हे सर्व साक्षात्कार म्हणजे त्यांच्या योगसाधनेची फलश्रुती, नव्हे हे आरशाइतके स्पष्ट आहे. ते त्यांना सहजगत्या त्यांच्या ध्यानी मनी स्वप्नी नसता प्राप्त झालेले असे होत.

१९०४ मध्ये श्री अरविंदांनी बडोद्यात योगसाधनेचा जो उपक्रम केला तो कोणाही गुरूकडून दीक्षा न घेता केला. गंगामठातील ब्रह्मानंद स्वामींचे शिष्य बॅ. केशवराव देशपांडे यांच्याकडून अल्पस्वल्प माहिती घेऊन ते प्राणायाम करू लागले. कालेकरून प्राणायामास ते सहा तासांपेक्षा जास्त वेळ बसू लागले. प्रथम राजकारण आणि योगसाधना यांमधील द्वंद्व त्यांच्या लक्षात आले नाही; म्हणून दोन्हीही त्यांनी सारख्या दमाने चालू ठेवली. तरीसुद्धा सृष्टी नि परमेश्वर यांच्यापासून आपल्याला ज्ञान आणि सामर्थ्य प्राप्त करून घेण्याची आपल्यामध्ये पात्रता निर्माण करू शकणाऱ्या सद्गुरूंच्या शोधात ते होतेच! म्हणून एका नाग संन्याशाचा त्यांनी परिचय करून घेतला; त्या संन्याशाने मंत्रिलेले पाणी प्यायला देऊन

बारींद्र कुमारांचा भयंकर ज्वर एका क्षणात नाहीसा केला, त्यामुळे योगावरील अरविंदांची श्रद्धा दृढ झाली. तथापि त्या नाग संन्याशाला त्यांनी आपला गुरू केले नाही. पुढे त्यांना प्रत्यक्ष ब्रह्मानंद स्वामीही पण भेटले. अरविंदाच्या मनावर त्यांच्या योग्यतेची छाप चांगलीच बसली. परंतु योगसाधनेमध्ये प्रगती या दृष्टीने ब्रह्मानंद स्वामींचा त्यांना म्हणण्यासारखा उपयोग झाला नाही.

अखेरीस बडोद्यातील महाराष्ट्रीय, योगी श्री. विष्णु भास्कर लेले यांच्याकडून त्यांनी योगाचे काही धडे घेतले, त्यामुळे त्यांना चित्तवृत्तिनिरोध अवघ्या तीन दिवसांत साधला, त्यांना मन संकल्पविकल्परहित म्हणजे निश्चल नि प्रशांत असे ठेवता येऊ लागले, त्यांच्या अहंकाराचा पूर्ण विराम झाला. अकल्पितपणे निर्गुण ब्रह्माचा त्यांना साक्षात्कार झाला, खुद्द लेले यांना या सर्व घटनांचे आश्चर्य वाटले. अर्थात परमेश्वराच्या संचारात योग्य अशी त्यांची मनोभूमिका बनली. याचा सुपरिणाम म्हणजे यानंतरचे त्यांचे सर्व लेख आणि भाषणे परमात्मप्रेरित अशी बनू लागली, त्यांचे मन, बुद्धी इत्यादी निमित्तमात्र म्हणजे परमात्म्याचे केवळ साधनयंत्र बनली. पांदिचरी हे त्यांचे नित्याचे निवासस्थान बनल्यावर, अर्थात, राजकारणादी बाह्य उपाधीमधून त्यांची पूर्णपणे सुटका झाली. व पूर्वी बडोद्यात चालू केलेल्या योगसाधनेकडे त्यांनी अहोरात्र आपले चित्तसर्वस्व लाविले. बडोदे मुक्कामी लेले यांच्या मार्गदर्शित्वाखाली त्यांना निर्गुण ब्रह्माचा साक्षात्कार झाला होता, याचा निर्देश वर करण्यात आलेला आहेच आणि त्याचप्रमाणे अलिपूरच्या बंदिखान्यात "वासुदेवः सर्वमिति" अशी भगवान श्रीकृष्णाच्या सर्वव्यापित्वाची म्हणजे सगुण ब्रह्माची प्रतीती हीही त्यांना प्राप्त झालेली होती हेही पण वर विदित करण्यात आलेले आहे. हे सगुण आणि निर्गुण परमात्म्याचे साक्षात्कार अर्थात परस्परपूरक आहेत. सारांश, परब्रह्माच्या स्थिर, निश्चल (Static) व क्रियाशील, गतिमान (Dynamic) अशा दोन्ही अंगांचे म्हणजे गीतेच्या १५ व्या अध्यायात वर्णिलेल्या क्षराक्षरातीत पुरुषोत्तमाचे संपूर्ण संदर्शन लाभलेले होते. तसेच अलिपूर तुरुंगात असताना अध्यात्मप्राप्तीच्या कामी मार्गदर्शन करणारा स्वामी विवेकानंदांचा ध्वनी त्यांना सारखा पंधरा दिवस ऐकू येत होता आणि त्यांच्या उपस्थितीचाही पण भास होत होता. याप्रमाणे योगसाधना पूर्णत्वाप्रत पोचण्यास अवश्य असणारी पार्श्वभूमी त्यांच्या बाबतीत सर्वथैव तयार बनलेली होती.

योगसाधनेची फलश्रुती

निरुपाधिक आणि प्रशांत वातावरण आणि विविध अनुभूती यांमुळे पांडिचरी येथे त्यांच्या योगसाधनेला स्वाभाविकतः द्रुत गती प्राप्त झाली. तेव्हा त्यांच्या त्या अखंड योगसाधनेला सुंदर आणि मधुर फळ प्राप्त झाले यात नवल नाही. ते फळ म्हणजे प्रज्ञेपलीकडच्या आणि परमप्रज्ञेकडे घेऊन जाणाऱ्या अशा मध्यंतरीच्या ज्ञानश्रेणीचे त्यांना दर्शन घडले. तेव्हा पांडिचरी येथे पहिल्या चार वर्षांत योगद्वारा हस्तगत झालेल्या सर्वज्ञानाचे आणि अनुभवांचे

समीकरण करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले व ते यशस्वितेने तडीस नेले. या कार्यातूनच त्यांच्या समग्र योगतंत्राचा (Integral Yoga) उदय झाला. या अरविंदप्रणित अभिनव योगतंत्रामध्ये जडतत्त्व आणि चित्तत्व (Matter and Spirit) आणि परमार्थ साधनाचे परंपरागत असे तीन मार्ग म्हणजे कर्म, भक्ती आणि ज्ञान यांचे संश्लेषण (Syntbests) दृक्प्रत्ययास येते. या समग्र योगतंत्राचे उद्दिष्ट म्हणजे भूतलावर प्रत्यक्ष परमात्म्याचा अवरोह (Supramental Descent) घडवून आणणे हे होय. पृथ्वीवर परमेश्वर अवतरल्याने सृष्टीची परमसृष्टी, पृथ्वीचे नंदनवन आणि मानवाचा देव असे परिवर्तन होणे अपरिहार्य आहे असे अरविंदांचे मत आहे. श्री अरविंदांना प्रथम वाटत होते की, एका व्यक्तीच्या प्रयासाने सध्याच्या काळीसुद्धा वरील उद्दिष्ट गाठणे शक्य आहे व त्याप्रमाणे त्यांनी हरप्रयत्नांची पराकाष्ठा करून पाहिली. पण शेवटी या बाबतीत त्यांच्या पदरी संपूर्ण निराशा पडली आणि तशी कबुलीही देऊन ते मोकळे झाले आहेत. दिलीप कुमार रॉय यांना ते एका पत्रात लिहितात:-

"मानव समाजाच्या उद्धारार्थ एकाही व्यक्तीची तपश्चर्या पुरी आहे असे केवळ माझ्या अज्ञानामुळे मला प्रथम वाटत होते, पण पुढे मला आत्मसिद्धी प्राप्त होऊन अभिनव योगज्ञान उपलब्ध झाले, त्यामुळे माझा दृष्टिकोन बदलला व मला आढळून आले की, एक व्यक्ती ही- मग ती कितीही ओजस्वी असो- मानव समाजाची अंतिम समस्या सोडविण्यास केवळ एकाकी अशी असमर्थ आहे. त्यासाठी मानव जात परिपक्व बनणे हेदेखील अगत्याचे आहे."

याप्रमाणे परमात्मपुरुष (Supremental Being) पृथ्वीवर आणण्यात अरविंदांना अपयश आले तरी योगद्वारा अगाध ज्ञान संपादन करून ते ग्रंथरूपाने जगास सादर करण्यात जगाला त्यांनी कायमचे ऋणी करून ठेविलेले आहे, ही सुद्धा काही सामान्य नव्हे.

श्री अरविंदांची ग्रंथसृष्टी

वरील चार वर्षे योगसाधना करून अचाट असे अनुभवजन्य ज्ञान प्राप्त करून घेतल्यानंतर त्या ज्ञानाचा जगात प्रसार करण्यासाठी एखादे साधन हवे असे त्यांना वाटू लागले. कर्मधर्मसंयोगाने या सुमारास पॉल रिचर्ड नावाच्या एका फ्रेंच सद्गृहस्थाशी त्यांचा परिचय झाला. रिचर्ड व सध्या माताजी म्हणून प्रसिद्ध असलेल्या त्यांच्या पत्नी ही उभयता जगद्गुरूच्या शोधार्थ पृथ्वी प्रदक्षिणा करीत असता त्यांना पांदिचरी येथील श्रीअरविंद हे जगदगुरू असल्याचा प्रत्यय आला. यासंबंधी स्वतः पॉल रिचर्ड हे जपानी श्रोतृवृंदापुढे उद्गारतात :

''महत्त्वाच्या घटना घडून येण्याची, तसेच आशियातील महात्मे किंवा देवपुरुष उदयास येण्याची घटिका जवळ येत आहे. त्या महात्म्यांच्या शोधार्थ मी अख्खी पृथ्वी धुंडाळलेली आहे; असे पुरुष पृथ्वीच्या पाठीवर अस्तित्वात असले पाहिजेत असे मला माझी मनोदेवता आयुष्यभर सांगत आहे. महात्मे पृथ्वीवर नसते तर जग नाश पावले असते. कारण, ते म्हणजे,

जगाची ज्योत तशीच ऊब आणि जीवन होत. अशा महात्म्यांचा महात्मा आशिया खंडात मला दृष्टीस पडला. तो हिंदू आहे. त्याचे नाव अरविंद घोष होय.''

विशेषतः श्रीमती रिचर्ड यांच्या मनावर अरविंदांच्या दर्शनाचा अत्यंत परिणाम झाला. कारण ईश्वरी साक्षात्कार आणि गूढवाद (Occultism) यामध्ये त्यांचीसुद्धा पुष्कळ प्रगती झालेली होती. अर्थात, श्री अरविंदांना योगद्वारा उपलब्ध झालेल्या ज्ञानाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने या तिघांनी मिळून ''आर्य'' नावाचे मासिक काढण्याचे निश्चित करून ते श्री अरविंदांच्या त्रेचाळिसाव्या जन्मदिनी सुरू केले. श्री अरविंदांची बहुतेक सर्व महत्त्वाची ग्रंथनिष्पत्ती या मासिकातून झाली. त्यांना ''लाइफ डिव्हाइन'' हा ग्रंथराज प्रथम याच मासिकामध्ये क्रमशः प्रसिद्ध करण्यात आला. या ओजस्वी ग्रंथाव्यतिरिक्त ''गीतेवरील निबंध'', ''वेदातील गुपित'', ''मानवी युगचक्र'' (The Human Cycle), योगसंश्लेषण (The Synthesis of Yoga), ''भारतीय संस्कृतीने समर्थन'', ''मानवी ऐक्याचे ध्येय'', ''भारतातील पुनरुज्जीवन'' इत्यादी लहानमोठे ग्रंथ ''आर्य'' मासिकाच्या वेगवेगळ्या अंकांतून प्रथम प्रकाशन पावले. याशिवाय अरविंदांचे 'आर्य'मधले लिखाण विपुल आहे.

१९२१ मध्ये ''आर्य'' स्थगित झाल्यानंतर अरविंदांनी पुष्कळ लिखाण केलेले आहे. किंबहुना अखेरपर्यंत त्यांचा लेखनव्यवसाय अखंड चालू होता. विशेषतः आपल्या अनुयायांशी त्यांनी केलेला पत्रव्यवहार अपरंपार आहे; आतापर्यंत त्या पत्रव्यवहाराचे पाच खंड प्रसिद्ध झालेले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी रचलेले काव्यही अमंचळ आहे. बडोद्यात त्यांनी लिहिलेल्या काव्याचा निर्देश यापूर्वी करण्यात आलेला आहेच. त्यांचे सर्वोत्कृष्ट काव्य म्हणजे ''सावित्री'' हे होय. महाभारतातील सत्यवान-सावित्री या कथानकावर ते काव्य आधारलेले आहे. त्या काव्यात श्रीअरविंदांनी वरील कथानकद्वारा आपले सर्व तत्त्वज्ञान ओतलेले आहे. जगातल्या अमर काव्यांत त्याची गणना करण्यास हरकत नाही. त्यांचे नष्ट झालेले गद्यपद्यात्मक लेखन हेसुद्धा विपुल होते.

(नवभारत, सप्टेंबर, १९७२, पृ. १ ते १२)

ooo

पत्रकारिता

७२

वृत्तपत्र संपादक : कै. श्रीपाद शंकर नवरे

६ डिसेंबर १९७८ रोजी मुंबई येथे सकाळी शिवाजी पार्कजवळील 'रामदास भुवन' या त्यांच्या निवासस्थानी श्री. शं. नवरे हे दिवंगत झाले. गेली ३२ वर्षे ते वाई येथील प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या चालक मंडळाचे सदस्य होते. त्यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९०० मध्ये झाला. मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात उच्च शिक्षण झाले. परंतु बी. ए. चे प्रथम वर्ष पुरे झाल्याबरोबर महाविद्यालय असहकारिता आंदोलनात त्यांनी सोडले. १९२१ साली महात्मा गांधींनी चालविलेल्या असहकारिता आंदोलनात ज्या शेकडो महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ब्रिटिश सरकारच्या आश्रयाने चाललेल्या शिक्षण संस्थांचा त्याग करून राष्ट्रीय शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश केला, त्यांच्यापैकी श्री. शं. नवरे हे एक होत. १९२१ मध्ये ते प्राज्ञपाठशाळेत धर्म व वेदान्त शिकण्याकरिता येऊन दाखल झाले. त्या वेळी प्राज्ञ-पाठशाळा मंडळाने राष्ट्रीय शिक्षणाचे माध्यमिक विद्यालय स्थापन केले होते. या शाखेमध्ये शंभरापेक्षा अधिक विद्यार्थी प्राज्ञपाठशाळेच्या राहून शिक्षण घेत होते. कै. नारायणराव गोगटे व कै. राजारामबापू देसाई यांनी क्रमाने या विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून काम केले. त्या वेळी इतरही अनेक अध्यापक या राष्ट्रीय विद्यालयामध्ये अध्यापन करीत होते, त्यांच्यामध्ये श्रीपाद शंकर नवरे यांचाही समावेश झाला होता. इतिहास, निबंध, साहित्य, कविता आणि मैदानी खेळ हे विषय नवरे शिकवीत होते. मैदानी खेळांमध्ये विद्यार्थ्यांचे संघसंचालन नियमितपणे नवऱ्यांच्या नेतृत्वाखाली चालत असे. प्रत्येक आठवड्याच्या सुटीच्या दिवशी विविध विषयांच्या चर्चा व त्यावरील भाषणे यांची सभा दुपारी दोन ते साडेपाचपर्यंत भरत असे. त्याचीही व्यवस्था नवरे यांच्याकडे सोपविली होती. नवरे यांच्या संचालनाखाली विद्यार्थ्यांची प्रकृती दोन वर्षांत लक्षात भरण्यासारखी सुधारली; अनेक विद्यार्थी क्रीडापटू झाले; अनेकांना वक्तृत्वाची कला साधली. १९२२ सालच्या प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या इतिवृत्तात नवरे यांच्यासंबंधी असे म्हटले आहे की, कृतविद्य श्रीपाद शंकर नवरे यांच्या

देखरेखीखाली विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारले; शिस्त आली; निबंधलेखन करण्याची पात्रता आली. या आठवड्याच्या ज्या सभा भरत, त्यांत धर्म, समाजकारण व राजकारण या विषयांवर जी भाषणे आणि चर्चा होत, त्यांच्यामध्ये एकांगी दृष्टिकोन मांडला जाऊ नये; धार्मिक, सामाजिक व राजकीय पक्षोपपक्षांची मते आणि नेते यासंबंधी सर्व बाजू विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी समजावून घ्याव्यात; या गोष्टींवर नवरे यांचा कटाक्ष होता. कोणी गांधीवादी विचारसरणी ठासून मांडली तर सशस्त्र क्रांतिवादी विचारसरणीचाही परामर्श घेतला जावा म्हणून नवरे स्वतः ती बाजू मांडत असत. धार्मिक अधिष्ठान असल्याशिवाय भारताची राजकीय स्वातंत्र्याची चळवळ यशस्वी होणार नाही; असे जर 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे। परंतु तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।।' या रामदासस्वामींच्या प्रसिद्ध उक्तीच्या आधारे मांडले तर नवरे या मुद्द्याला असे उत्तर देत असत, की 'ज्ञानदेव नामदेवांनी वा सूरदास, तुलसीदास यांनी भागवत धर्माचे अधिष्ठान भारताला व महाराष्ट्राला दिले तरी शिवाजी महाराजाच्या उदयापर्यंत भारत प्रायशः परकीय दास्याखालीच राहिला. परकीय आक्रमणाला तोंड देऊन पराभूत करायचे तर राष्ट्रीयत्वाची भावना व राष्ट्रीय ऐक्य, सर्वस्व अर्पण करण्याची तयारी अणि शौर्य लागते; राष्ट्रीयत्व, त्याग व शौर्य हाच भगवंत होय.' नवरे हे चिकित्सक वृत्तीचे होते त्यामुळे नेत्यांच्या विचारांवरही टीका करण्यास कधी कचरले नाहीत.

उदाहरणार्थ, स्वतः असहकारितेच्या आंदोलनात विल्सन महाविद्यालय सोडून सामील झाले. त्या आंदोलनाच्या प्रारंभी गांधींनी म्हटले होते, की 'एका वर्षात स्वराज्य मिळवून देईन' परंतु तसे घडले नाही. या गोष्टीवर नवरे निर्भीडपणे टीका करीत. आणि असहकारितेच्या आंदोलनावर भारतातील अनेक राजकीय विचारवंत जी खरमरीत टीका करीत असत, त्यांची बाजू विद्यार्थ्यांपुढे मांडीत असत. प्राज्ञपाठशाळेचे मुख्य संस्थापक नारायणशास्त्री मराठे (केवलानंद सरस्वती) हे, प्रचलित हिंदू धर्मात फार महत्त्वाच्या सुधारणा व्हावयास पाहिजेत, जाती-उपजातींचे शेकडो भेद मावळले पाहिजेत, धर्माचा ऐतिहासिक दृष्टीने विचार करून देश-काल-परिस्थितीप्रमाणे जुन्या तथाकथित धार्मिक रूढी बंद केल्या पाहिजेत, अशा मतांचे पुरस्कर्ते होते. प्रातपाठशाळेचे इतरही संस्कृत शास्त्रांचे शिक्षण घेतलेले धर्मशास्त्रपारंगत संचालक व शिक्षक मराठेशास्त्री यांची मते मान्य करून महाराष्ट्रात त्याचा प्रचार करीत असत. याही धार्मिक व सामाजिक सुधारणांच्या मतांचा ध्येयवादी निष्ठेने श्री. नवरे पुरस्कार करीत होते. हिंदू धर्माची आमूलाग्र सुधारणा व्हावयास पाहिजे, हा विचार नवरे यांनी प्राज्ञपाठशाळेतच आत्मसात केला.

१९२४ साली नवरे यांनी प्राज्ञपाठशाळा सोडली, आणि सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात अर्थशास्त्र आणि इतिहास हे विषय घेऊन बी. ए. पदवी त्यानी संपादन केली. १९२७ साली ते मुंबई येथे जाऊन स्थायिक झाले. लोकमान्य, प्रभात, गोमंतवाणी या वृत्तपत्र संस्थांमध्ये संपादक म्हणून काम करीत असता निर्भीडपणे आपली मते प्रतिपादन

करण्याकरिता आणि निःपक्षपाती वृत्ते प्रकाशित करण्याकरिता निराळे वृत्तपत्र काढावे असे त्यांनी ठरविले. दत्तोपंत सावरकर व श्री. रा. टिकेकर या मित्रांच्या साहाय्याने 'प्रभात' हे साप्ताहिक काढले. त्या वेळी मुंबई येथे 'मौज' व 'विविधवृत्त' ही साप्ताहिके सुशिक्षित लोकांत विशेष वाचली जात असत. विनोद-थट्टामस्करी करीत अनेक सार्वजनिक व्यक्तींच्या व्यंगांवर बोट ठेवून ही पत्रे वाचकांची करमणूक करीत होती. 'विविधवृत्ता'त महात्मा गांधींच्या नेतृत्वाची आणि टिळकपंथीय भक्तांची टिंगलही केली जात होती. 'प्रताप' पत्र उपरोधिक व्यंग वाङ्मयाला हतबल करण्याकरिता गंभीरपणे योग्य बाजूची तरफदारी करीत असे. वृत्तपत्र चालविणे हे नैतिक जबाबदारीचे कार्य आहे; मिस्किलपणे लिहिणे किंवा चारित्र्य खंडन करणे, कोणत्याही सार्वजनिक कार्यकर्त्याला डाग लागेल किंवा अशा कार्यकर्त्याचा हिरमोड होईल, असे भडक वृत्त वा विवेचन प्रसिद्ध करणे हे सामाजिक जीवन गढूळ करते हे जाणून याबद्दल नवरे हे अत्यंत खबरदार राहून संयमाने संपादक व्रत पाळीत असत. एखाद्या सार्वजनिक संस्थेमध्ये काही एक घोटाळा आहे म्हणून त्या घोटाळ्याला प्रसिद्धी द्यावी म्हणून जर कोणी नवरे यांच्याकडे आले तर ते त्या सार्वजनिक संस्थेला स्वतः जातीने भेट देत; इत्थंभूत माहिती करून घेत आणि नंतरच लेखणी उचलत असत. एखाद्या स्त्रीचे किंवा पुरुषाचे चारित्र्य खराब आहे, ही गोष्ट वृत्तपत्रात आली म्हणजे ज्या वृत्तपत्रात येते त्या वृत्तपत्राला एकदम मागणी येते. संस्थांची, नेत्यांची काही खरीखोटी कुलंगडी प्रसिद्ध करण्यानेही त्या त्या वृत्तपत्राचा खप वाढतो. त्यामुळे अशा प्रक्षोभक, सनसनाटी बातम्या देऊन अनेक वृत्तपत्र संपादकांना आपल्या वृत्तपत्राचा भाव वधारावा याचा मोह होत असतो. असे अनेक वृत्तपत्रकार अशा मार्गाने जनमनाच्या आकर्षणाचे विषय होतात. परंतु नवरे यांच्या मनाला अशा प्रकारचा वृत्तपत्र व्यवसाय हे एक सामाजिक पाप आहे, याची खोल जाणीव होती. एखादी स्त्री वा पुरुष यांच्या पतनाची सत्यवार्ता कोणी घेऊन आले तर ते त्यांना बजावीत, की ही वार्ता खरी असली तरी मी देणार नाही. कारण त्या व्यक्तीच्या चारित्र्याला डाग लागला म्हणजे ती निराशाग्रस्त व पराभूत मनाची होते आणि तिला भविष्यकाळी जीवन सुधारण्याची हिंमत राहात नाही. साहित्य संघामध्ये नवरे यांना आम्ही अध्यक्ष पदावरून श्रद्धांजली वाहिल्यानंतर परत जात असता प्रा. श्रीकृष्ण भागवत यांनी आम्हांस असे सांगितले की, 'नवरे यांना आम्ही अनेक वर्षे जवळून पाहिले आणि त्यांची वृत्तपत्र संपादकाची अगदी वेगळी वरील प्रकारची पद्धतीही वारंवार आमच्या निदर्शनास आली. कारण पत्र मुद्रणालयात छापून प्रकाशित होत असे. आमच्या असेही लक्षात आले की नवरे हे बालकाप्रमाणे निरागस मनाचे गृहस्थ आहेत. प्रा. भागवत पुढे म्हणाले, की नवरे स्वतःला गांधीवादी म्हणून कधीही म्हणवत नव्हते. परंतु ते खरेखुरे गांधीवादी होते. हिंदू श्रद्धानंद अनाथ महिलाश्रमाचे संस्थापक, सदस्य आणि १९२७ पासून १९६९ पर्यंत त्या संस्थेचे कार्यवाह म्हणून त्यांनी निर्वेतन काम दिवसाचे ५ ते ७ तास आश्रमात बसून केले. त्यांनी एका पैशालाही स्पर्श केला नाही. याचे कारण दुःखित, पतित, अपंग आणि निराधार

यांच्याबद्दल त्यांच्या हृदयात कळवळा होता. या संस्थेच्या आश्रयदात्यांमध्ये मोठमोठे श्रीमंत हजारो रुपयांच्या देणग्या देणारे होते; परंतु त्यांच्या मनाला लोभ यत्किंचितही शिवला नाही. शेकडो कुमारी, विधवा, परित्यक्ता आणि अनाथ अशा स्त्रिया आणि बालके यांचे माहेरघर म्हणजे श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम होय, अशी ख्याती त्या संस्थेची झाली याचे कारण नवरे यांनी श्रद्धापूर्वक केलेली सेवा होय. महाराष्ट्राच्या वृत्तपत्र व्यवसायामध्ये नवरे यांनी ज्याप्रमाणे आदर्श घालून दिला, त्याचप्रमाणे समाज सेवेच्या क्षेत्रातही तितकाच मोठा आदर्श स्वतःच्या रूपाने समाजापुढे ठेवला.

मराठी पत्रकार परिषद, मुंबई मराठी संघ, पुण्याची महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मराठी साहित्य महामंडळ इ. कितीतरी संस्थांशी पदाधिकारी म्हणून अगदी जवळचा संबंध आला होता. अशा संस्थांमध्ये अनेक वेळा मतभेद, संघर्ष उत्पन्न होतात. अशा वेळी नवरे अशा मतभेदांमधून आणि संघर्षांमधून न्याय्य मार्ग काढून सामंजस्य स्थापन करीत असत. मराठी साहित्य संमेलनांमध्ये संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न निघण्यापूर्वी राजकीय प्रश्नाला वाव नसे. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची मुहूर्तमेढ मराठी साहित्य संमेलनामध्ये नवरे यांनी रोवली आणि तिचा खंबीरपणे पाठपुरावा केला. १९५४ साली आम्ही दिल्ली येथील मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होतो, त्या वेळी आम्हास नवरे यांनी पत्र लिहिले की, 'संयुक्त महाराष्ट्राच्या संबंधी जो प्रस्ताव येईल त्याला तुम्ही यात्किंचितही विरोध दर्शविता कामा नये.' आम्ही त्या वेळी, मुंबई राज्य द्विभाषिक आहे ते तसेच राहणे चांगले, अशा मताचे होतो. परंतु नवऱ्यांचा आदेश मनात कसलाही किंतु न ठेवता मान्य केला.

प्राज्ञपाठशाळा मंडळाचे नवरे इत्यादी कार्यकर्ते हे आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते होते; त्याप्रमाणे नवरे यांनी स्वतः ब्राह्मणांतील एका वेगळ्या पोटजातीतील अमरावती येथील सुलक्षणी महिलेशी फेब्रु. १९२९ मध्ये विवाह केला. ब्राह्मण पोटजातीतील परस्पर विवाहास काही सनातनी मंडळींचा त्या वेळी विरोध असे. गुरुवर्य मराठेशास्त्री यांच्यापाशी जाऊन नवरे यांनी आपला हा आंतरजातीय विवाहाचा बेत कळविला व त्यांना विवाहाचे आमंत्रण दिले. गुरुवर्य म्हणाले, की 'मी स्वतः या समारंभास उपस्थित राहू शकणार नाही. परंतु कोणी सनातनी मंडळी तेथे उपस्थित राहून शंका घेऊ लागली तर लक्ष्मणशास्त्री जोशी धर्मशास्त्राच्या आधारे चर्चा करून विघ्न निवारण करील.' आम्ही त्यांच्या विवाहास उपस्थित होतो. त्यांच्या पत्नीचे नाव इंदिरा. इंदिराबाईंचा ससार नीटनेटका होत असलेला आम्ही पाहिला. नवऱ्यांची शिस्त, निग्रही स्वभाव, ध्येयनिष्ठा आणि एक प्रकारची अनासक्त वृत्ती यांचा प्रभाव त्यांच्या पत्नीवर पडून त्यांचा प्रपंच यशस्वी झाला. नवरे यांच्या वडील मुलीने स्त्रिश्चन पुरुषाशी आणि दुसऱ्या मुलीने कुलवंत मराठा पुरुषाशी प्रेमविवाह केला. बाकीच्या दोन मुलांनीही असेच स्वतःचे आंतरजातीय विवाह केले. त्या सर्व विवाहांना त्यांनी मान्यता दिली. सांपत्तिक स्थिती बरी होती; काटकसरी स्वभाव होता; विवाह समारंभ

थाटात करण्याची शक्यता होती, परंतु मुंजी, लग्न इ. समारंभ थाटात करणे ही गोष्टही त्यांना मान्य नव्हती. धार्मिक कर्मकांडावर किंचितही श्रद्धा नव्हती. त्यामुळे निधनानंतर स्वतःची धार्मिक अंत्यक्रिया करू नये, अशा तऱ्हेचा आदेश त्यांनी आपल्या कुटुंबीयांना दिला होता.

गेली ५०-५५ वर्षे आमचा-त्यांचा स्नेहसंबंध कायम राहून अत्यंत दृढ झाला. आमचे काही मतभेद होते, परंतु त्यामुळे मैत्रीत खंड पडला नाही. ते प्राज्ञपाठशाळेत १९२१ साली दाखल झाले आणि १०-१५ दिवसांतच आमचा स्नेह जमला. प्रथमदर्शनी लक्षात आले, की पंत नवरे यांचे व्यक्तिमत्त्व काही वेगळे आहे. करारी स्वभाव परंतु स्नेहाला अत्यंत पात्र अशा या व्यक्तीशी मैत्री व्हावी, असे परिचयानंतर वाटले. त्यांना आम्ही 'पंत' म्हणत होतो. हे नावही नंतर सार्वजनिक झाले. मुंबई मराठी साहित्य संघात आम्ही अध्यक्षपदावरून जी श्रद्धांजली वाहिली, त्यात सांगितले, की 'पंत हे संत होते.' श्रद्धांजलीचा जो प्रस्ताव मांडण्यात आला त्यात आम्ही 'त्यांच्या पुष्पस्मृतीच श्रद्धांजली वाहत आहोत' ही शब्दावली घातली. 'त्यांना सद्‌गती लाभो' ही शब्दावली समर्पक वाटली नाही; कारण अशा सत्पुरुषाला सद्‌गतीच लाभते. सद्‌गती लाभावी अशी प्रार्थना करण्याची आवश्यकता नसते.

(नवभारत, फेब्रुवारी, १९७९, पृ. ४५ ते ४८,
मूळ शीर्षक - कै. श्रीपाद शंकर नवरे)

ooo

ड)

आत्मपर लेख

७३

मी रॉयवादी का झालो?

या प्रश्नाचे संपूर्ण उत्तर मला देता येईलच, असे मी सांगू शकत नाही. कारण माझ्या जाणिवेच्या क्षेत्रात प्रकट न झालेली अशी मी रॉयवादी बनण्याची अनेक कारणे असूं शकतील. परंतु मी उत्तर देणार आहे. त्यात महत्त्वाची कारणे मला सांगता येतील, असे मी वाचकाला आश्वासन द्यावयास तयार आहे. मी रॉयवादाचा स्वीकार केला ही गोष्ट प्रवाहप्राप्त म्हणून झालेली नाही किंवा योगायोगानेही घडलेली नाही; त्याकरता मला फार मोठा वैचारिक झगडा अनेक वर्षे करावा लागला. मी तत्पूर्वी लहानपणापासून किंवा जन्मतःच म्हटले तरी चालेल सनातनधर्मीय होतो. माझा सनातनधर्म मात्र रूढीवादी नव्हता! तो तात्त्विक स्वरूपाचा होता. सनातनधर्मी, वेदान्ती, वेदशालांच्या पठडीत वाढलेल्या मनाचा मानव्यवादी, सर्वगामी चिकित्सकतेने भरलेल्या अशा वैज्ञानिक दृष्टीशी तो झगडा होता.

अंतर्मनात विवेचनाच्या येरझारा

आपल्या देशात सनातनधर्म व वेदान्त यांचा तात्त्विकदृष्ट्या स्वीकार केलेले अनेक श्रद्धावंत आहेत; परंतु त्यांना माझ्यासारखा झगडा करावा लागत नाही व कित्येकांना करावा लागला तरी त्याचे स्वरूप बहुधा आत्मसमर्थनात्मकच असते. आपल्या जीवनमूल्यांचा पाया बळकट आहे, अशी खोल श्रद्धा मनात असल्याशिवाय सुसंस्कृत मनुष्यास समाधान लाभत नसते; किंबहुना तशी श्रद्धा नसेल तर मानसिक अधःपातही होण्याचा संभव असतो. हा अधःपाताचा धोका टाळण्याकरिता मनुष्य आपल्या श्रद्धेचा आधार बळकट करण्याचा प्रयत्न साधकबाधक चर्चेच्याद्वारे करीत असतो. कित्येक वेळा ही चर्चा केवळ जुजबी किंवा तांत्रिक स्वरूपाची असते.

माझा झगडा मात्र फार दूरवर जाऊन पोहोचला होता. कौरव-पांडवांप्रमाणे सर्वस्व पणाला लावून मी हा झगडा चालविला होता. मला समजू लागल्यापासून मी या देशातील धार्मिक,

समाजिक व राजनैतिक चळवळीत भाग घेऊ लागलो आणि त्याचमुळे अनेक विचार-प्रवाहांबरोबर रॉयवादाशीही माझी गाठ पडली. मी जर सामाजिक व राजकीय चळवळीत प्रथमपासून भाग घेतला नसता आणि परंपरागत धार्मिक व्यवसायात गर्क होऊन अलग राहिलो असतो, पांडित्याच्या व्यवसायात व श्रद्धेच्या समाधानात निमग्न झालो असतो, तर जीवनाला स्थैर्य किंवा समाधी प्राप्त झाली असती. मग हाच झगडा नव्हे, तत्पूर्वीचे अनेक वैचारिक संग्राम टळले असते. आता स्थैर्य किंवा समाधी यांचा मार्ग दृष्टीच्या पथात राहिला नाही. आता नित्य जागरण असते. रात्रीच्या गाढ अंधारात आणि समुद्राच्या निळ्या पाण्यावर वरुणाचा किंवा रुद्राचा जागरुक पहारा असतो, त्याप्रमाणे गाढ निद्रेच्या आवरणातदेखील अंतर्मन अविश्रांतपणे विवेचनाच्या येरझाऱ्या घालीत असते; विवेचकता आणि चिकित्सा यांचा अखंड प्रवाह वाहात असतो, हे रॉयवादामुळे घडले आहे.

मूलत: विरोधी विचारसरणी

मी रॉयवादाचा विचार प्रथम विरोधी भूमिकेतून करावयास लागलो, याचे कारण रॉयवादाचे ठिकाणी वसत असलेली मौलिक विलक्षणता हे होय. त्यामुळेच मी त्याचा प्रामुख्याने विचार करू लागलो. मी इ. स. १९१९ पासून ते १९३९ पर्यंत काँग्रेसमध्ये होतो. या वीस वर्षांचे अवधीत काँग्रेसमध्ये रॉयवादाइतका मूलगामी फरक असलेला कोणताच विचार पुढे आला नाही. या गोष्टींचे सत्यत्व एकाच गोष्टीने सिद्ध करता येईल. ते असे- त्रिपुरी काँग्रेसमध्ये एम. एन. रॉय यांनी एक उपसूचना मांडली. त्या उपसूचनेत त्यांनी स्वतःचा राजकीय कार्यक्रम ग्रथित केला होता.

तेव्हा काँग्रेसमधील इतर डाव्या गटांनीही आपापल्या उपसूचना मांडल्या होत्या. मांडलेल्या उपसूचनांचा परामर्श घेण्याकरता श्री. राजेंद्रप्रसाद व पं. जवाहरलाल नेहरू यांनी भाषणे केली. रॉय यांच्या उपसूचनेस विरोध करताना राजेन्द्रबाबू म्हणाले, 'रॉय यांचा दृष्टिकोन स्वतंत्र असून त्यांचा कार्यक्रम काँग्रेसच्या आजपर्यंतच्या परंपरेच्या विरोधी आहे, म्हणून आम्ही त्यांची उपसूचना स्वीकारू शकत नाही. पं. नेहरू म्हणाले की, 'एम. एन. रॉय साहेब यांच्या व काँग्रेसच्या तत्त्वज्ञानात मौलिक फरक आहे. ही दोन विरोधी तत्त्वे एकत्र कशी राहू शकतील?' पंडितजींनी हिंदुस्थानात भाषण केले, तेव्हा त्यात 'बुनियादी फरक' हा काव्यप्रयोग केला. रॉय यांच्या विचारसरणीत केवळ राजकीय बाबतीतच वैलक्षणा नाही, तर ते सामाजिक व सांस्कृतिक प्रमेयांनाही लागू आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाची बैठकच अगदी पृथक आहे. या वैलक्षण्यामुळेच माझ्या विचारांत प्रथमदर्शनीच क्षोभ उत्पन्न झाले.

मूलतःच विरोधी असलेली विचारसरणी माझ्या विचारपथात आल्याबरोबर क्षोभ उत्पन्न करून मला विचारास प्रवृत्त करते, असा माझा फार जुना अनुभव आहे. संस्कृत तत्त्वज्ञानांचा मी अभ्यास करावयास लागलो, तेव्हा अशा तऱ्हेचा अनुभव अनेक वेळा आला आहे. उदा. सनातन वैदिकधर्म विरुद्ध बौद्ध तत्त्वज्ञान. सनातन धर्मात स्थिर व शाश्वत कल्पनांना

व तत्त्वांना फार महत्त्व आहे. अनादी व शाश्वत : जीवात्मा, देवता, धर्म व परमात्मा हे सगळे शाश्वत. याच्या अत्यंत विरोधी बौद्धमत आहे. त्या मतात सर्वक्षणिक आणि सर्व शाश्वत कल्पना मिथ्या होत. शून्य हे परमार्थिक सत्य होय. अशा तऱ्हेच्या परस्परविरोधी विचारसरणींनी माझ्या विचारांना वेळोवेळी फार गती दिली आहे.

गांधीवादी विचारांचा प्रभाव हिंदुस्थानावर जेव्हा पडू लागला तेव्हाच माझ्याही मनावर त्याचा प्रभाव पडल्याशिवाय राहिला नाही. त्यामुळे माझ्यात सनातन धर्मीय श्रद्धेचा परिपोषच झाला. कारण गांधीवाद हा त्या श्रद्धेशी अनुरूप व सुसंगत असाच विचार आहे. मार्क्सवाद किंवा रॉयवाद यांचे तसे नाही. हे वाद सगळ्याच विचारांची पुनर्तपासणी मुळापासून करावयास लावतात.

रॉयवादाची मौलिक विलक्षणता

रॉयवादाचा मी विचार का करू लागलो, याचे वर सांगितलेले मौलिक विलक्षणता हे एक कारण आहेच. हे वैलक्षण्य विचारप्रवर्तकतेस पुरेसे कारण आहे, असे म्हणता येत नाही. त्या वैलक्षण्याच्या पोटी एक वैशिष्ट्य असावे लागते, ते रॉय यांचे विचारांतून दिसून येते. रॉय यांचे विचार स्फटिकाप्रमाणे स्वच्छ, करतलामलक व स्पष्ट आणि क्ष-किरणांप्रमाणे भेदक आहेत. हेच वैशिष्ट्य तत्त्वजिज्ञासूंना उत्तेजित व उद्दीपित करण्यास समर्थ असते.

मी रॉयवादाचा विचार करू लागलो, याचे दुसरे कारण असे की, माझ्यापुढे तत्पूर्वी हिंदी समाज आणि संस्कृती आणि त्याचप्रमाणे मानवी समाज आणि संस्कृती यांच्यासंबंधी महत्त्वाचे प्रश्न उभे होते. समाजकारण व राजकारणात भाग घेण्यास देशभक्ती व भारतीय संस्कृतीचा अभिमान या दोन भावना कारणीभूत झाल्या, परंतु त्याबरोबरच हिंदी समाजाच्या सामाजिक व राजकीय उन्नति-अवनतीच्या कारणांची मीमांसा करण्याची प्रवृत्ती हे एक बलवत्तर कारण माझ्या ठिकाणी होते. ही प्रवृत्ती आपल्या देशातील गेल्या शतकातील दोन विचार धारणांमुळे झाली. राजा राममोहन रॉय, भांडारकर, रानडे, फुले, आगरकर इत्यादी समाजसुधारकांच्या विचारांची एक धारा व दुसरी चिपळूणकर, टिळक, गांधी इत्यादिकांची राजकीय विचारधारा. या दोन विचारधारांच्या आश्रयाने भारतीय समाजाच्या सद्यःस्थितीचा व ऐतिहासिक पतनाचा अर्थ व कार्यकारण भाव नीट रीतीने उलगडला जात नाही, असे मला वारंवार वाटत होते. मार्क्सवादाच्या आधाराने ऐतिहासिक, सामाजिक परिस्थितीचा तात्त्विक अर्थ उलगडण्यास मदत होते, ही गोष्ट मला मार्क्सवादाच्या अभ्यासाने लक्षात येऊ लागली. परंतु हिंदी परिस्थितीसंबंधी व इतिहासासंबंधी माझ्या मनात उत्पन्न झालेले अनेक महत्त्वाचे प्रश्न मार्क्सवादाच्या आधाराने सोडविण्यास मला अनेक अडचणी उत्पन्न झाल्या. रॉय यांच्या मदतीने मार्क्सवादाचा खुलासेवार उपयोग मला करता आला. माझ्या मनात जे प्रश्न होते त्यांची सम्यक व विस्तृत मांडणी रॉय यांनी विचारपूर्वक केलेली मला दिसून आली. रॉय यांनी हिंदी समाजाच्या भूत व वर्तमान परिस्थितीचे सम्यक आलोचन व निदान

वाय १८१-३९

केलेले आढळून आले. रॉय यांच्या विचारांचे साहाय्य मला मिळाले नसते तर मी मार्क्सवादी विचारसरणी जितक्या मोठ्या प्रमाणात स्वीकारतो तितक्या प्रमाणात मी स्वीकारली असती की नाही याची मला शंका आहे. बहुतेक मी गांधीवादी मार्गानेच आतापर्यंत चालत राहिलो असतो.

पाशवी प्रवृत्तीचा राष्ट्रवाद

मला माझ्या सनातन धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या प्रकाशात गांधीवाद हा फारच रम्य व वन्द्य दिसत होता. म. गांधींच्या विभूतिमत्वाशी सनातन धर्माचे खोल संवादित्व माझ्या प्रत्ययास येते. म. गांधींच्या अलौकिक कर्तृत्वशक्तीने माझ्या श्रद्धेला प्रचंड बळ लाभले होते. पर्यायाने ही श्रद्धा अगाध बनली होती. कारण पस्तीस कोटी लोकांच्या खंडप्राय असलेल्या कुम्भकर्णाप्रमाणे दीर्घ काळपर्यंत निद्रित असलेल्या या देशात वर्षाऋतूच्या प्रारंभी प्रकट होणाऱ्या मेघांच्या संघातील, विद्युत शक्तीच्या कडकडाटातील, झंझावातातील किंवा समुद्राच्या तुफानातील ताकदीशी स्पर्धा करणारी आंदोलने निर्माण करणारी शक्ती म. गांधी या एका व्यक्तीतच केंद्रित झालेली मी पाहिली. म. गांधींच्या ठिकाणी लहान मोठ्या लोकांना या कार्यात एकत्रित करण्याची विलक्षण हातोटी मला दिसली. (सनातन धर्माची पारमार्थिक, नैतिक व सामाजिक तत्त्वेच परिस्थितीप्रमाणे उजाळा देऊन म. गांधींनी स्वीकारल्यामुळे त्यांच्या संप्रदायांत किंवा नेतृत्वात सत्य संशोधनापेक्षा किंवा बौद्धिक मीमांसेपेक्षा श्रद्धेलाच स्वाभाविकरीत्या महत्त्व प्राप्त झालेले मी पाहिले.) श्रद्धा परंपरेलाच तत्त्वतः धरून राहते. या संप्रदायात माझे मन विश्रांती घेण्याचा प्रयत्न करू लागते न लागते तोच मार्क्सवाद व त्यातून निघालेला रॉयवाद यांनी माझ्या श्रद्धेला व तन्मूलक-शांतीला धक्का दिला.

गांधीवादाने ज्या प्रश्नाला सगळ्यांत वरिष्ठ स्थान दिले, त्या प्रश्नाचे उत्तर गांधीवादात न सापडता रॉयवादात सापडण्याचा संभव आहे, असे मला दिसू लागले. मनुष्यसमाजाचा नैतिक म्हणजेच आध्यात्मिक अधःपात टाळणे आणि त्या समाजाला नीतीच्या उच्चतम भूमिकेकडे नेणे हाच प्रश्न गांधीवादाला सोडवावयाचा आहे, असे जेव्हा माझ्या मनाला पटले तेव्हा मी म. गांधींना इतिहासकालातील किंवा पौराणिक काळातील सगळ्या विभूतींपेक्षा श्रेष्ठ समजू लागलो. परंतु (गांधींच्या नेतृत्वाखाली गांधीवादाच्या कक्षेच्या बाहेर दिसणारा राष्ट्रवाद परिपुष्ट होत आहे, असे जेव्हा प्रत्ययास येऊ लागले, तेव्हा म. गांधींच्या उच्चतम नैतिक भूमिकेस ग्रस्त करणारा हा असुर आहे असे मला दिसू लागले.) हा हिंदी राष्ट्रवाद फारच ओबडधोबड, आडमुठ्ठा, पाशवी प्रवृत्तींची बीजे असलेला, मनुष्यत्वास आणि व्यापक मानवसंस्कृतीस धोक्यात केव्हा तरी टाकणारा आहे, असे याचे पृथक्करण व निदान मला कळू लागले. प्रथमतःच त्यात विरोधी कल्पनांची व्यामिश्रता (गलत) दिसते. या राष्ट्रवादास यांत्रिक सुधारणा पाहिजेत परंतु त्याबरोबर भांडवलशाही पद्धतीही राखावयाची आहे. या पद्धतीमुळे यंत्रवाद फॅसिझमचा हस्तक बनतो. या राष्ट्रवादास भारतीय संस्कृतीच्या

आध्यात्मिक श्रेष्ठतेचा गर्व आहे. परंतु आध्यात्मिक श्रेष्ठतेचा शत्रू असलेला वंशद्वेष, आक्रमणशीलता आणि युद्धाभिमुखता यांच्या योगाने तो भारला जाऊ लागला आहे. गांधीवादाला नैतिक भूमिकेवरून मानवजातीचेच प्रश्न महत्त्वाचे वाटतात. परंतु व्यवहारात राष्ट्रवादी राजकारणच त्याचा आधार आहे. त्यामुळे गांधीवादी नैतिकता हळूहळू कल्पनेतच शिल्लक राहून व्यवहारात हिंदी समाजाच्या व मनुष्यसमाजाच्या उच्च भवितव्याचा शत्रू राष्ट्रवादच प्रबळ होणार आहे. ही वस्तुस्थिती डोळ्यांसमोर येऊ लागल्यामुळे हिंदी समाजाचा व मनुष्यजातीचा सामाजिक-राजकीय प्रश्न मूलतः एकच आहे, असे समजणारा रॉयवादच मला उच्च नीतितत्त्वांच्या दृष्टीने श्रेष्ठ दिसला; आणि त्यामुळे रॉयवादी विचारांचे मी अधिक मनन करू लागलो.

रॉयवादाची वैशिष्ट्ये

(मी रॉयवादी का बनलो याच्या कारणाची पूर्वपीठिका मी वर निवेदन केली. रॉय हे जर मार्क्सवादाचे सांप्रदायिक पद्धतीने समर्थन करणाऱ्या मास्को येथील काही आचार्यांप्रमाणे असते, तर मी रॉय यांचा सहकारी बनलोच नसतो. वेदशास्त्र, पुराणे व गीता या देववाणीवरील श्रद्धा टाकावी व नवीन श्रद्धा अंगीकारावी, ही गोष्ट मला अशक्यप्राय आहे. श्रद्धा ठेवायची तर दिव्य दृष्टीवरच ठेवावी. दिव्यदृष्टी व देवाचा संदेश जर मिळत नसेल तर स्वानुभव व बुद्धिवाद यांचाच आश्रय करणे सर्वांत श्रेयस्कर होय.) रॉय यांस मी पहिल्यांदा जेव्हा भेटलो, तेव्हा त्यांनी मला सांगितले की, मी मार्क्सवादी आहे; परंतु मार्क्सवादाच्या बाबतीत सांप्रदायिक श्रदा किंवा आग्रह अयोग्य होय, असे मी मानतो. त्यांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे ते (Non-Conformist Marxist) आहेत. मी त्यांना म्हटले की, मग तुम्ही स्वतःस मार्क्सवादी म्हणण्याची काही जरुरी नाही. इतिहासशास्त्रात किंवा समाजगतिशास्त्रात (Social Dynamics) काही मूलभूत सिद्धान्त सांगितले अथवा तत्त्वज्ञानांत विशिष्ट दृष्टी दिली म्हणून त्यांचा स्वीकार केल्याबरोबर मार्क्सवादीच मनुष्य होतो, असे नाही. उदाहरणार्थ- भौतिकशास्त्रात न्यूटन, आइन्स्टिन किंवा प्लांक यांनी मौलिक संशोधन केले. यास्तव त्यांचे नाव भौतिकशास्त्राला दिले जात नाही. सध्या रॉय यांना मार्क्सवादी म्हणवून घेण्याची गरज फारशी भासत नाही.

रॉयवादाची जी अनेक वैशिष्ट्ये आहेत, त्यांपैकी महत्त्वाच्या चार कारणांस्तव मी रॉयवादी झालो. पहिले कारण असे- हिंदी जनतेच्या स्वातंत्र्याचा झगडा हा लोकसत्तात्मक स्वातंत्र्याचा झगडा व्हावयास पाहिजे; ब्रिटिश साम्राज्यशाहीचा नाश हा इतिहासक्रमानेच अगदी नजीकच्या काळात अपरिहार्य आहे, म्हणून ब्रिटिश साम्राज्यशाहीचा नाश हिंदी राजकारणाचा मध्यस्ती प्रश्न मानणे हे जनतेशी प्रतारणा करणे होय. जर या प्रश्नाला फाजील महत्त्व दिल्यामुळे ब्रिटिश साम्राज्य नाशाबरोबर हिंदी स्वराज्य स्थापन झाले तर ते जनतेच्या मूलभूत हक्कांवर उभारलेले लोकसत्तात्मकच स्वातंत्र्य असेल, असे सांगता येणार नाही.

२- हिंदी समाजाची हल्लीची रचना बदलून नवी रचना करण्यास समर्थ असे लोकसत्तात्मक राज्य हिंदुस्थानात स्थापन व्हावयास पाहिजे. चालू समाजरचनेस कायम राखणारे स्वराज्य हिंदी जनतेचा पूर्वीपेक्षाही अधिक अधःपात केल्याशिवाय राहणार नाही. म्हणून सामाजिक क्रांतीचे राजकारण आवश्यक आहे. ही सामाजिक क्रांती व्यक्तिस्वातंत्र्य आणि धनिक सत्तेचा नाश या दोन पायांवर उभारली पाहिजे. येथील इतर अनेक समाजवादी पक्ष हे ध्येय मान्य करीत असले, तरी ते पक्ष राष्ट्रवादी चळवळीलाच व राष्ट्रवादी पक्षांनाच सर्वस्वी उचलून धरतात. आधी ब्रिटिश सत्तेचा नाश होऊन सामाजिक क्रांतीचा प्रश्न सोडवू, अशी त्यांची वंचक दृष्टी आहे. राष्ट्रवाद हा विद्यमान समाजरचनेत लोकसत्तात्मक व समाजवादी क्रांती होण्यास संपूर्णपणे विरोधी आहे. म्हणून राष्ट्रवादी पक्षांच्या हाती राजकीय सत्ता प्राप्त झाल्यावर क्रांतीच्या सगळ्या शक्ती समूळ निर्दालन करण्याच्या मार्गाला ते लागतील. सध्या हिंदी राजकारणातील रॅडिकल पक्षाशिवाय बाकी सगळे पक्ष हिंदी राष्ट्रीय स्वातंत्र्याला वरिष्ठ स्थान देत असल्यामुळे प्रतिगामी राष्ट्रवादाचे ते सगळे हस्तक बनले आहेत; त्यामुळे हिंदी जनतेचे लोकसत्तात्मक समाजवादी स्वातंत्र्य धोक्यात आले आहे.

३- सद्यःकाली मानवजातीची श्रेष्ठ संस्कृती, नैतिकता आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांचा प्रलय होण्याचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे; म्हणून हिंदी जनतेचे स्वातंत्र्य, सांस्कृतिक विकास व नैतिक सामर्थ्य यांचा प्रश्न नवजातीच्या प्रश्नाहून निराळा नाही. याच दृष्टीने रॅडिकल पार्टीने गेल्या महायुद्धात राष्ट्रवादी संकुचित कल्पनांना झुगारून देऊन मानवी स्वातंत्र्याचा शत्रू असलेल्या फॅझिझमशी सुरू झालेल्या निकराच्या लढ्यात भाग घेतला. रॉयवादाप्रमाणे हिंदी जातीचे स्वातंत्र्य व मानवी किंवा हिंदी संस्कृती व मानवी संस्कृती यांचे हितसंबंध अविभाज्य आहेत; म्हणून वरिष्ठ नैतिक मूल्यांचाच आश्रय घेण्याची आज आवश्यकता उत्पन्न झाली आहे.

४- हिंदुस्थानात किंवा आशिया खंडात मानवी मूलभूत हक्कांकरिता लोकांनी चालविलेल्या चळवळीचा विकास झाला नाही, राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ म्हणजे मूलभूत मानवी हक्कांकरिता निर्माण झालेली चळवळ नव्हे. राष्ट्रीय स्वातंत्र्यात जनता परतंत्र राहून हुकूमशाही राजवट उत्पन्न करू शकते; यासच फासिझम म्हणतात. अशा स्थितीत व्यक्तीच्या स्वतंत्र आत्मविकासाला अवसर राहात नाही. अशा आत्मविकासाच्या अभावी उच्चतर संस्कृती निर्माण होत नाही. मानवी मूलभूत हक्कांकरता झगडा निर्माण होऊन या हक्कांची स्थापना व्हावयास हिंदुस्थानात व रशिया खंडात वैचारिक क्रांतीची चळवळ निर्माण व्हावयास पाहिजे. ही वैचारिक क्रांतीची किंवा नवजीवनाची चळवळ (Renaissance) युरोपात दृढमूल झाल्यावर तेथील मनुष्यांना स्हणजे व्यक्तींना आत्मविकासाची जाणीव झाली व तद्नंतर तदर्थ त्यांनी मानवी हक्कांकरिता गेली तीनशे वर्षे अव्याहत संग्राम चालविला आहे. सगळ्या जीवनाची मूलभूत समीक्षा म्हणजेच वैचारिक क्रांतीची चळवळ होय.

आम्ही रॉयवादी मंडळी स्वतःस रॉयवादी म्हणवून न घेता रॅडिकल म्हणवून घेतो. आमच्या विचारसरणीस आम्ही रॉयवाद न म्हणता रडिकॅलिझम (Radicalism.) म्हणतो. या शब्दाचा इंग्रजी अर्थ 'मूलगामी दृष्टी' असा होतो. अनुभव, संशोधन, मनन व वर्तन यांच्या योगे परिस्थितीचे ज्ञान करून घेऊन सामाजिक व राजकीय कार्यक्रम अमलात आणणे हे आमचे तत्त्व आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि मानव्य हे आमचे जीवनाचे निकष आहेत. राष्ट्रवाद हा राष्ट्रनाशक आहे, असे आमचे निदान आहे. सगळ्या मानवजातीची एकता राजकारणात, समाजकारणात आणि संस्कृतिसाधनांत प्रस्थापित करणे या आमचा एकमेव उद्देश आहे. त्याकरिता झगडणाऱ्या सर्व देशांतील वीरांचे आम्ही सहकारी बंधू आहोत.

(धनुर्धारी, दिवाळी, ऑक्टोबर, १९४६,

पृ. १३१ ते १३६)

ooo

७४

कृष्णातीरावरील प्राज्ञमठात मी

आश्रमीय जीवन

आश्रमीय जीवनाची शिस्त माझ्या वडिलांनी मला ८व्या वर्षापासूनच लावण्यास प्रारंभ केला. उष:काली उठणे, लगेच प्रातः स्तोत्राचे पठन, शीतोदकस्नान, स्वतःचे कपडे स्वतःच्या हातांनी धुणे, सायं प्रात: ईश्वरोपासना किंवा संध्योपासन नियमितपणे करणे, भोजनसंबंधी विविध निर्बंधांचे पालन करणे इत्यादी आचारधर्मांचे वळण मला लहानपणापासूनच मिळाले आहे. अशी पूर्वतयारी असल्यानंतर आश्रमीय जीवनाचे, त्यातील पावित्र्याचे, त्याच्या पावित्र्य माहात्म्याचे आकर्षण वाटणे स्वाभाविक होते. मला प्राचीन गुरुकुल पद्धतीबद्दल प्राचीन पुराणग्रंथांच्या प्राकृत आवृत्ती वाचून फार औत्सुक्य वाटत होते. मी वयाच्या १४व्या वर्षी आश्रम प्रवेश केला. वाई येथे कृष्णातीरावर ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वतींनी वयाच्या बाविसाव्या वर्षापासून एक आश्रम चालविला होता. स्वधर्म व स्वदेश यांच्या सेवेची दीक्षा घेतलेले अपरिग्रही स्नातक देशास मिळावे, म्हणून प्राचीन गुरूकुलपद्धतीची पाठशाळा चालविण्याकरिता त्यांनी प्राज्ञ मठाची स्थापना केली. त्यांच्या या मठात तळेगाव येथील समर्थ विद्यालय राजद्रोहाच्या संशयाने इंग्रज सरकारने बंद पाडल्यावर अनेक शिक्षक व प्रौढ विद्यार्थी येऊन राहिले. माहुली येथील कृष्णानंदस्वामी या देशभक्त संताचे शिष्यही या मठात येऊन अध्ययनार्थ राहिले. या आश्रमात मी १९१४ साली येऊन दाखल झालो. यास प्रथम 'प्राज्ञमठ' म्हणत. पुढे त्यास 'प्राज्ञपाठशाळा' असे अभिधान प्राप्त झाले.

वाईच्या या आश्रमाचा परिसर व वाईची प्राचीन संस्कृत व वेदविद्येची परंपरा आश्रमीय जीवनास परिपोषक होती. विद्यार्थी व साधक येथे स्वाभाविकपणे रमतात. येथील कृष्णकाठचे घाट टुमदार बांधले आहेत. या घाटांच्या जवळ ब्रह्मचारी, संन्यासी किंवा धार्मिक प्रवृत्तीचे गृहस्थ अशांना राहण्याकरिता सोयीच्या इमारती आहेत. या इमारतींतून नदीचे पात्र, तीरावरील वृक्ष व भोवतालचे डोंगर सहज दृष्टीस पडतात. ऐन उन्हाळ्यातही

भर दुपारी नदीच्या पात्रावरून वाहणारा वारा शीत-स्पर्शाने उल्हास उत्पन्न करतो. मी ज्या काळात वाईच्या आश्रमात प्रविष्ट झालो, त्या काळात तेथील मठामध्ये वेदपठनाच्या व शास्त्राध्ययनाच्या अनेक पाठशाळा होत्या. सबंध वेद मुखोद्गत असलेले अनेक तरुण व वृद्ध पढिक पंडित आपल्या छात्रांसह वेदांचा व उपनिषदांचा घोष मंद्र, मध्यम व उच्च स्वरांत करीत असताना दिसत. सूर्योदयापूर्वी कोंबडा आरवायच्या सुमारासही प्रातः स्तवने मधुर स्वरात म्हणत घाटाच्या पायऱ्या उत्तरत असलेले ब्रम्हचारी व संन्यासी नित्य आढळत. संध्याकाळीही अनेक मंदिरांमध्ये भारत व भागवत यांतील कथांची प्रवचने श्रवणपंथावर नित्य येत असत.

या अशा धार्मिक वातावरणात राष्ट्रीय वृत्तीने व देशभक्तीने प्रेरित झालेल्या काही व्यक्ती काम करू लागल्या. परंपरागत धार्मिक जीवनात राष्ट्रीय भावनेच्या स्फूर्तीची बीजे रुजविण्याची लो. टिळक, गांधी इत्यादिकांची कल्पना फलित होऊ लागली. राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना याच दृष्टीने प्रसृत होत होती. प्राचीन गुरुकुल पद्धतीचा पुनरुद्धार व्हावा व तिच्याद्वारे मातृभाषेचे माध्यम धरून नव्या व जुन्या विद्यांच्या शिक्षणाचा प्रसार व्हावा, भारतीय आध्यात्मविद्येची महती वाढावी, स्वदेशाच्या स्वाभिमानपोषक इतिहासाची मांडणी व्हावी व उत्तम धर्मनिष्ठ सेवकांची निर्मिती व्हावी असा विचार प्रभाव गाजवू लागला. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेने स्वभाषेचा अभिमान उत्पन्न केला होता. लो. टिळकांनी राष्ट्रीयत्वाची प्रेरणा उत्पन्न केली होती, आणि बाबू अरविंद घोष, विवेकानंद व रामतीर्थ यांनी भारतीय अध्यात्मविद्येचा महिमा वाढविला होता. या सर्व गोष्टींचा संकलित प्रभाव आमच्या आश्रमावर पडला होता. स्वधर्म व स्वदेश यांच्या सेवेची दीक्षा घेतलेले लोक पाहिजेत, अशी अपेक्षा त्या वेळच्या राजकीय चळवळीत निर्माण झाली होती.

या अपेक्षेला एका ऐतिहासिक कल्पनेची पुष्टी मिळाली होती. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नांना श्रीरामदासस्वामींच्या मठांनी फार मोठी गुप्त मदत केली, असे अनेक मराठी राज्याचे इतिहास संशोधक सांगत होते. याही कल्पनेचे प्रतिबिंब वाईच्या प्राज्ञमठात पडले होते. ब्रिटिश राज्याशी विरोधी चाललेल्या अनेक गुप्त संघटनांचे अप्रत्यक्ष धागेदोरे या आमच्या आश्रमातील अनेक महत्त्वाच्या व्यक्तींशी येऊन पोचले होते. या प्रवृत्तीच्या विरोधी असलेली सत्याग्रही तत्त्वज्ञानाचीही प्रवृत्ती श्री विनोबा भावे यांच्या काही महिन्यांच्या तेथील निवासामुळे निर्माण झाली होती.

या आश्रमातील जीवनपद्धती उपनिषदातील एका प्रसिद्ध वचनाच्याद्वारे अशी सांगता येईल. "सहनाववतु सह नौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै। तेजस्विनावधीतमस्तु, मा विद्विषावहै।" म्हणजे "आम्ही गुरुशिष्यांनी एकत्र वास करावा, एकत्र भोजन करावे, एकत्र सहकारितेने काम करावे, आमची विद्या तेजस्वी राहावी, एकमेकांचा द्वेष आमच्यात नसावा" हा आदर्श दृष्टीसमोर ठेवून गुरुजन व विद्यार्थी एकत्र राहू लागले. सर्व कामे शक्य तितक्या स्वावलंबनाने

पार पाडावी असे साधारण सर्वांचे धोरण होते आश्रमातील सर्व विद्यार्थ्यांनी विद्यासमाप्तीपर्यंत अविवाहित असले पाहिजे असा दंडक होता. दिवसाचे चोवीस तास विविध कार्यक्रमांनी बांधून टाकलेले होते. पहाटेपासून रात्री साडेनऊ वाजेपर्यंत सगळा वेळ कार्यक्रमात विभागून गेलेला होता. प्रत्येक कार्यक्रमाची घंटा पडत असे. पहाटेची पाच वाजताची घंटा दोन मिनिटेपर्यंत घणघणत असे. सर्वांनी या वेळी निद्रा संपवून अंथरूण गुंडाळून प्रातःस्तवनास एकत्र यावयाचे. या प्रातःस्तवनास ऋग्वेदातील भगदेवतेच्या सूक्तापासून तो स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'हे घनश्याम श्रीराम' या स्वातंत्र्याच्या भूपाळीपर्यंतची अनेक संस्कृत, हिंदी, मराठी गीते अंतर्भूत केलेली होती. पहाटेस इतक्या लवकर उठून नियमाने उपस्थित राहणे अनेकांच्या जिवावर येई. त्यामुळे कोणाच्या तरी अनुपस्थितीची वाच्यता त्या वेळी व्हायचीच. त्यामुळे त्यांचा वारंवार खरपूस समाचार घेतला जाई. ही गोष्ट अनेकांच्या अंगवळणीही पडली. पहाटेची पाच वाजताची प्रात:स्मरणाची वेळ निभावल्यावर अनेक प्रौढ विद्यार्थीदेखील मधल्या वेळी व्यवस्थापकांची दृष्टी चुकवून सकाळची साखरझोप काढीत. प्रातःस्नान झाल्यावर सात वाजता पुन: एकदा सामुदायिक प्रार्थनेची घंटा वाजे. घंटेचे टोल ऐकत असतानाच काहीजण मुखमार्जन करून कपडे बदलून स्नान केल्याची बतावणी करीत उपस्थिती दाखवीत.

मी स्वतः मात्र या चोवीस तास करकचून बांधलेल्या कार्यक्रमास स्वतःस अपवादभूत म्हणून समजून वागत असे, त्यामुळे टीकेस अधिक पात्र झालो होतो. १९२१ साली गांधींच्या बार्डोली येथील आश्रमात काही महिने मी होतो. तेथे पहाटेची साडेचारची प्रार्थना आटोपल्यावर मी पुन्हा निद्रेचा कार्यक्रम करीत असे. ही गोष्ट म. गांधींच्या कानांवर गेल्यावर त्यांनी मला 'वाईच्या आश्रमात असेच करता काय?' असा खोचक प्रश्न विचारला. मी म्हटले की, "जुलमाचा रामराम करण्याची सवय मला लागली नाही. माझा नाइलाज आहे." किरकोळ गोष्टी सोडल्यास मी आश्रमीय महत्त्वाची शिस्त मनापासून पाळीत होतो. स्वदेशीव्रताचे परिपालन रसनेवर विजय मिळवून पाळीत आलो. स्वदेशी व्रत हे भारतीय अर्थशास्त्राच्या तत्त्वावर आधारलेले टिळक-गांधींच्या लिखाणांवरून मला पूर्ण पटलेले होते. पहिल्या महायुद्धाच्या सुमारास व नंतरही पुष्कळ वर्षे स्वदेशी साखर फार दुर्मीळ होती. जी स्वदेशी साखर म्हणून मिळे, तीदेखील अनेकदा खात्रीलायक नसे. आमच्या प्राज्ञमठात स्वदेशीचा महिमा मोठा मानला जात होता. म्हणून स्वदेशी साखरेचे व्रत पुष्कळ जण पाळीत. सण, उत्सव, उपनयन, विवाहादी समारंभ इत्यादी खासगी व सार्वजनिक मिष्टान्न भोजनाचे प्रसंग वर्षातून पुष्कळ येत. काही यजमान स्वदेशी साखरेचा बेत आमच्याकरिता मुद्दाम ठेवत असत. फसवणूक होऊ नये म्हणून मी व माझ्या आश्रमीय मित्रांनी साखरेचे खाणे अनेक वर्षे सोडले होते.

आमच्या आश्रमीय जीवनात ब्रह्मचर्याच्या तत्त्वाला केवळ धार्मिकच नव्हे तर राष्ट्रीय

महत्त्व आले होते. स्वातंत्र्यप्राप्तीकरिता प्रयत्न करावयाचा तर गृहस्थाश्रमाची बेडी न अडकविणेच बरे, असा आदर्श आमच्यापुढे ठेवला होता. म. गांधींच्या आश्रमपद्धतीचे यावज्जीव ब्रह्मचर्य हे प्रमुख अंगच म्हणून मानले गेले होते. याचाही बराच प्रभाव आमच्या आश्रमीय वातावरणावर होता. या बाबतीत ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वतींचा दृष्टिकोन मध्यममार्गी होता. अध्ययनकाळी ब्रह्मचर्य पाळणे होय. अध्ययनकाळ संपल्यानंतर प्रौढ दशेत ज्याने त्याने आत्मनिरीक्षणपूर्वक काय करायचे ते ठरवावे, असे ते सांगत. ब्रह्मचर्याचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी संस्कृतच्या अभ्यासक्रमात काही सुधारणा केली. कालिदास, भारवी इत्यादी कवींच्या काव्य-नाटक प्रबंधातील शृंगारप्रधान सर्ग किंवा अंक वगळून बाकीचे भाग ते शिकवीत असत. परंतु माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांनी संस्कृत चांगले समजू लागल्यानंतर ते गुरुवर्यांनी वगळलेले भाग कोणास कळू न देता वाचून काढले.

१९१६ सालची गोष्ट मला आठवते. लो. टिळकांचे 'गीतारहस्य' नुकतेच प्रसिद्ध झालेले होते. यावर वृत्तपत्रांत, मासिकांत व सार्वजनिक सभांमध्ये वाद सुरू झाले होते. आमच्या आश्रमात त्याचे समग्र पठन गुरुवर्यांनी व इतर अनेक शिक्षकांनी केले. वाईतील सुप्रसिद्ध धर्मशास्त्रज्ञ पंडित काशिनाथशास्त्री लेले हे 'गीतारहस्य'च्या विरुद्ध प्रचार करत होते आणि प्राज्ञपाठशाळेतील श्री. दिनकरशास्त्री कानडे गीतारहस्याचे समर्थन सार्वजनिक सभांमधून करीत होते. आमच्या पाठशाळेतील वादविवादही रंगू लागले. गीतारहस्यात कर्मजिज्ञासा प्रकरणात ब्रह्मचर्याची चर्चा आली आहे. त्यावर वाद सुरू झाला. ब्रह्मचर्याचे मर्यादित प्रमाणात समर्थन टिळकांनी केले आहे. ब्रह्मचर्य अमर्यादपणे सर्वांनीच पाळले तर लवकरच समाज संपेल, असा आक्षेप टिळकांनी घेतला आहे. त्या वादाचे सुमारास श्री. विनोबा भावे आमच्या आश्रमात काही महिने राहिले होते. विनोबा इत्यादी मंडळींनी टिळकांच्या कोटिक्रमावर असे उत्तर काढले की, जन्मभर ब्रह्मचर्य पाळणाऱ्या लोकांचाच पूर्ण भरणा असलेला मानवी समाज खरोखर मुक्तावस्थेपर्यंत पोहोचलेला समजला पाहिजे. अशा स्थितीत ब्रह्मचर्य व्रतामुळे समाजच समाप्त झाला, तर तो सर्व समाज मुक्त होईल. समाजाचे कामच संपले. त्याच्या उलट आमच्यातील काही जणांचे म्हणणे असे होते की, संपूर्ण ब्रह्मचर्य ही काल्पनिक अवस्था आहे. मर्यादित अर्थाचे ब्रह्मचर्यच माणसास शक्य आहे. सर्व इंद्रियांना विषयापासून विरक्त होणे हे पूर्ण ब्रह्मचर्य होय. चक्षु, कर्ण, घ्राण, मन, त्वचा इत्यादी सर्वच इंद्रियांना स्वविषयाची विरक्ती आली आहे, असा अनुभव निरोगी स्थितीत माणसास येणे कसे शक्य आहे? उष:कालची व वनाची शोभा कोणत्या निरोगी माणसाच्या चक्षूस आकर्षित करणार नाही?

आमच्या आश्रमात असा एक नियम होता की, अविवाहितासच अध्ययनार्थ प्रवेश मिळेल. आमचे एक स्नेही बालविवाहित होते. त्या वेळी कोकणात पांढरपेशांत तशी चाल पूर्ण रूढ होती. आमच्या या स्नेह्याने आपण अविवाहित आहोत, अशीच अनेक वर्षे

बतावणी केली, परंतु योगायोगाने त्याच्या एका भोळ्या नातलगाने एकदा एक उघडे पत्र पाठविले. व त्यात आमच्या मित्राच्या पत्नीसंबंधी हकिकत लिहिली होती. मी ते गुरुवर्यांना दाखविले. त्यांना ते वाचून प्रतारणा केल्याबद्दल आमच्या मित्राचा यत्किंचितही राग आला नाही. त्या गोष्टीची मला अगाऊ कल्पना होती, म्हणून मी गुरुवर्यांना ते पत्र दाखविले.

आश्रमातील आमचे एक मित्र मधूनमधून अनेक दिवसपर्यंत मौन पाळीत. त्यांना मी म्हणत असे की जरूर तेवढेच अल्प भाषण करणे ठीक, मौन पाळणे आपणास पटत नाही. त्यांना मौनातील दोष एके दिवशी पटला. एकदा ते मौनव्रती असताना नदीवर संध्यावंदनास बसले होते. एक नवखा मनुष्य नदीच्या पाण्यात बुडलेल्या घसरड्या पायरीवर पाऊल टाकणार तोच आमच्या मित्रांनी हुंकाराने निवारणार्थ इशारा केला. परंतु इशाऱ्याचा अर्थ न समजल्यामुळे पाऊल खाली पडलेच व ते गृहस्थ घसरून पाण्यात पडले. या वेळी मौन मोडले असते तर असा प्रसंग टळला असता.

आश्रमीय जीवनात मला प्रामुख्याने काय दिसले? याचे उत्तर असे की राष्ट्रसेवेच्या दीक्षेची आतुरता व आध्यात्मिक जीवन जगण्याची महत्त्वाकांक्षा हे आमच्या आधुनिक आश्रमीय जीवनातील प्रभावी मनोभाव होय. परंतु त्यातील आत्मसंयमाच्या प्रयत्नांच्या मुळाशी नकळत दंभ किंवा आत्मवंचनाही काही प्रमाणात दिसून आली.

माझे गुरू

काही थोडे वेदाध्ययन झाल्यावर मी तेरा-चौदा वर्षांचा असताना कांगडी येथील आर्यसमाजाच्या गुरुकुलात पुढील संस्कृत विद्येच्या अध्ययनाला जावे, असे मला वाटू लागले. माझ्या वडिलांनी मला गुरुकुलात पाठविण्याची तयारी दाखविली. मी ज्या खेडेगावात राहत होतो, तेथे वनविभागाचे एक अधिकारी राहिले होते. योगाभ्यासाकडे त्यांचा कल होता ते माझे गुरू केवलानंद सरस्वती यांचे मित्र होते. त्यांनी माझ्या वडिलांना सुचविले की अगोदर काही वर्षे महाराष्ट्रातच वाई येथे असलेल्या प्राज्ञमठात मी शिक्षण घ्यावे व अधिक शिक्षणार्थ प्रौढ वयात कांगडी येथे जावे, ही सूचना माझ्या वडिलांना व मला पसंत पडली. मी रेल्वेने पुणे मार्गे पुणे-बेंगळूर रेल्वे मार्गावरील वाठार स्टेशनपर्यंत पहाटेस येऊन पोहोचलो, व तेथून वीस मैल बैलगाडीने वाईस आलो. कृष्णा नदीवर ११-१२ च्या सुमारास प्रथम स्नान केले. लांब रेल्वे प्रवासाचा शीण ह्या शीतोदकाच्या स्नानाने बराचसा गेला. कृष्णास्नानानंतर संध्यावंदनादी धार्मिक कर्मकांड उरकून मी गुरुदर्शन घेतले. गुरुदर्शनाबरोबरच यात्रा सफल झाली असे वाटले.

गुरुमूर्ती प्रसन्न, तेजस्वी, उंच, गौरकाय व आरोग्यसंपन्न अशी दिसली. गुरूंचे गांभीर्य कळण्याइतके ते वय नहते. गुरूंचा वेष अगदी साधा म्हणजे दोन स्वच्छ धूत वस्त्रे, एक खांद्यावर एक कंबरेला अशी होती. कृष्णेच्या काठावर गंगापुरीच्या घाटावर असलेल्या तीन खणी लहानशा घरकुलात गुरू बसले होते. दर्भासन, हरिणाजिन व त्यावर एक ऊर्णावस्त्र

अशा आसनावर गुरूंची मूर्ती विराजमान झाली होती. ज्या खोलीत ते बसले होते त्या खोलीत चारी बाजूंस प्रकाश शिरलेला होता. पश्चिमेकडून वारा शिरून पुस्तके व कागद उडू नये म्हणून कृष्णेच्या घाटाच्या बाजूच्या खिडक्या काचेच्या तावदानाने बंद केल्या होत्या. त्या खोलीत साध्या लाकडी घडवंचीवर वेदवेदांगे व षड्दर्शन यांच्या पोथ्या व बांधलेली पुस्तके नीट रचून ठेवलेली होती. गुरूंच्या आसनासमोर एक लहानशी बैठी लाकडी तिवई होती. त्यावर लेखनसामग्री व अध्ययन-अध्यापनाची पाच- दहा पुस्तके व पोथ्या एकावर एक ठेवलेल्या होत्या. त्या तीन खणी खोलीत बारीकसे अंथरूण-पांघरूण, दांडीवर धोतर-उपरणे, दोन पाट, दोन-तीन आसने, एक लहानशी तांब्याची घागर, एक गडवा, दोन फुलपात्रे, एक पातेली, व एक ताटवाटी एवढीच सामग्री होती. पन्नास वर्षे गुरू त्या खोलीत राहिले. परंतु या त्यांच्या उपकरणांमध्ये वाढ वा घट केव्हाही झाली नाही. फक्त वस्त्रांचा रंग तेवढा बदलला, शुभ्र होती ती भगवी झाली.

आचार्यांचे हे असे दर्शन झाल्यावर मी त्यांच्या संमतीने दुसऱ्या दिवशी त्यांच्या राहत्या घरकुलाजवळच्या विद्यार्थी- वसतिगृहात येऊन राहिलो. माझे संस्कृत अध्ययन सुरू झाले. अगदी प्राथमिकपासून तयारी करावी लागली. प्राथमिक किंवा प्रवेश शिक्षणाच्या माझ्या वर्गात दहा-बारा सहाध्यायी होते. गुरूंचे अध्यापनकार्य प्रतिदिन आठ तास चाले. त्यात प्राथमिक शिक्षणापासून उच्च पांडित्याच्या शिक्षणापर्यंतचे ते पाठ घेत असत.. मी एका वर्षात रूपावली समासचक्रापासून महाकाव्यातील महत्त्वाचे सर्ग संपवण्यापर्यंत मजल मारली. अर्थात या वेगामध्ये माझ्याबरोबर इतर एक किंवा दोघे जण टिकले, बाकीचे मागे पडले. गुरूंच्या जवळ प्रस्थानत्रयी, सिद्धांतकौमुदी व तर्कशास्त्र यांचेही अध्ययन करणारे प्रौढ विद्यार्थी या वेळी होते. कै. दिनकरशास्त्री कानडे, विनोबा भावे व त्यांचे सहाध्यायी शांकरवेदांताची प्रस्थानत्रयी शिकत होते. महादेवशास्त्री दिवेकर पाणिनी सूत्रावरील काशिकावृत्ती पढत होते. आम्ही सर्व लहान व प्रौढ विद्यार्थी शेजारी शेजारी मठात राहत होतो.

श्री केवलानंद सरस्वती यांची विद्यार्थ्यांवर निरंतर देखरेख असावयाची. विद्यार्थ्यांची विद्या व त्यांचे चारित्र्य या दोन्ही गोष्टींचे तुल्य महत्त्व जाणून विद्येइतकेच चारित्र्याचे संवर्धन आणि संरक्षण व्हावे म्हणून, विद्यार्थ्यांच्या उठल्यापासून निजेपर्यंतच्या सर्व वर्तनावर त्यांचे लक्ष असे. सर्व वर्तनक्रम विद्यार्थ्यांनी त्यांच्यापासून आखून घेतलेला होता. विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे म्हणून नमस्कार व इतर प्रकारचे व्यायाम ते नियमितपणे करवून घेत. स्वतःच्या आचरणाने स्वावलंबनाचे धडे देत. आजारी पडलेल्या विद्यार्थ्याची ते मातपित्यांप्रमाणे सर्व प्रकारची शुश्रूषा ममतेने करीत. आजाऱ्याच्या मलमूत्रविसर्जनापासून तो अंथरूण घालणे, कपडे धुणे, दीर्घ आजारात दिवसपाळी-रात्रपाळी करून सेवा करणे, औषध वेळच्या वेळी देणे, खाण्यापिण्याची काळजी घेणे इत्यादी गोष्टी ते स्वतः करीत व

इतरांनी स्वेच्छेने कराव्या असा यत्न करीत. झाडणे, सारवणे, कपडे धुणे, भांडी घासणे, स्वयंपाक करणे, शौचकूप साफ करणे इत्यादी सर्व कामे ते स्वतः करीत व करवून घेत. आठवड्याच्या सुटीचा दिवस हा स्वच्छता व झाडसारव करण्याचा दिवस होता. पंडिताने अंगमेहनतीची कामे न करण्याची परंपरा त्यांना मान्य नव्हती. आपल्या समाजातील प्रतिष्ठितपणाची ही खूण पुसून टाकण्याकरिता ते प्रयत्न करीत. अस्पृश्यता निवारण्याच्या म. गांधींच्या चळवळीचा त्यांनी पुरस्कार केला, याचे बीज त्यांच्या शिक्षणशास्त्रात होते. त्यांचा एक सूतशिष्य महारढोर चांभारांचीही गलिच्छ समजली गेलेली कामे करतो म्हणून बहिष्कृत मानलेला हा बाबा फाटक नावाचा त्यांचा शिष्य गांधीवादी परंपरेचे एक मोठे भूषण आहे. गावाच्या स्वच्छतेचे धंदे करणारे लोक अपवित्र मानू नये, या समाजसुधारणेला पाठबळ देण्याची गुरुवर्य स्वामीजींची प्रवृत्ती ही त्यांच्या शिक्षणशास्त्रात प्रतिबिंबित झाली होती.

मी त्यांच्याकडे संस्कृत विद्येचे पांडित्य संपादन करण्याकरिता आलो. ते पांडित्य होते, परंतु ते इतर शास्त्रीपंडितांप्रमाणे नव्हते. शास्त्री पंडितांचा सन्मान आणि दक्षिणा इकडे ओढा असतो. सुखी जीवनाची लालसा असते. परंतु गुरुवर्य स्वामी केवलानंद हे संन्यास आश्रम घेण्यापूर्वीच संन्यासी होते. जन्मसिद्धच विरक्तात त्यांच्या ठिकाणी प्रतीत होत होती. निंदकाचे घर असावे शेजारी, अशी वर्तनाची खूण त्यांच्या आयुष्यात अनेक वेळा मिळालेली आहे. ते बालब्रह्मचारी होते. त्यामुळे आपल्या वर्तनावर जगाचा कडक पहारा नसावा हे ते मानापासून चाहत होते. म्हणून त्यांच्या निंदकांनी केलेली निंदा वा कुचाळकी त्यांच्या कानांवर वारंवार पडली तरी निंदकांबद्दलची घृणा त्यांच्या वर्तनात व बोलण्यात कधीही दिसत नसे. परनिंदावर्जन, अमात्सर्य व अपरिग्रह यांचे उदात्त प्रतीक म्हणजे स्वामीजींचे जीवन. देवपूजेचा पसारा ते मांडीत नसत. 'कोणाही भूताचा न घडो मत्सर' या संतोक्तीप्रमाणे सद्भावनेनेच ते ईश्वराची पूजा करीत. भजनपूजनाचा डामडौल नव्हता, परंतु निरंतर सोहंच्या अजपाजपामध्ये त्यांचे मन निमग्न होते. संचयाची वासना मनास कधीच शिवली नाही, कारण ते संशयमुक्त झाले होते. भक्तजनांनी पायापुढे ठेवलेली दक्षिणा, फळे, वस्त्रे वगैरे पदार्थ ते लगेच कोणास तरी देऊन टाकीत. त्या पदार्थांची विल्हेवाट लागण्यास कधीही दुसरा दिवस उजडला नाही. ते न्याय, व्याकरण, मीमांसा, वेदांत, साहित्य यांत पारंगत होते. परंतु त्यासंबंधाची त्यांना अहंता नव्हती.

ते स्वतः वक्तृत्वसंपन्न नव्हते. परंतु वक्तृत्व व वादचातुर्य शिकविण्यात त्यांचा हातखंडा होता. वादविद्येचा वर मला त्यांच्याच कृपाप्रसादाने मिळाला. काशी, कलकत्ता येथे प्रसिद्ध असलेल्या प्रचंड पंडितांशी निर्भयपणे मी वाद केले व कित्येकदा जिंकलेही. कित्येकदा कारण नसताना मी जिंकले. माझी बाजू लंगडी असताही मी जिंकले. माझ्या बाजूचा लंगडेपणा वादोत्तरकाली माझे गुरू मला दाखवून देत. तुझा अमुक एक मुद्दा टिकण्यासारखा नाही असे ते मला बजावीत. ते स्वतः वादपंडित का झाले नाहीत याचे उत्तर त्यांच्या जीवनमूल्यांच्या

कल्पनेत मिळते. तारुण्यातच त्यांनी प्रपंचाकडे पाठ फिरविली, ते मोक्षमार्गाचे पथिक बनले. त्या मार्गाचे मौन हे साधन आहे. ते मानवी प्रपंच सुखाचा व्हावा असे मानणारे होते. टिळकांच्या कर्मयोगाचे ते समर्थन करीत. परंतु स्वतः ते विरक्त होते. यज्ञादी गृहस्थकर्मे गृहस्थाश्रमाच्या अभावी त्यांना करावयास मिळाली नाहीत. म्हणून संन्यासाश्रम घेतल्यानंतर यज्ञविद्येचे म्हणजे चारी वेदांचे चिंतन करण्यात त्यांनी काळ घालविला. त्यांनी प्रचंड मीमांसा कोश संन्यासाश्रमातच लिहिला. पूर्वमीमांसेचे आधारग्रंथ म्हणजे यज्ञाचे विवरण करणारे चार वेद व श्रौतसूत्रेच होत. प्रत्यक्ष यज्ञ केले नाहीत तरी यज्ञांचे फळ यज्ञांचे मनन केल्याने म्हणजे यज्ञज्ञानाने मिळते, असे वेद सांगतात. गुरुवर्य केवलानंद स्वामी यांनी यज्ञाचे व संन्यासाचे, कर्मयोगाचे व ज्ञानयोगाचे असे द्विविध फळ संन्यासआश्रमातच प्राप्त करून घेतले. "गुरोस्तु मौनं व्याख्यानम्"अशा गुरू परंपरेतील ते गुरू होते. त्यांच्या दैनंदिन वर्तनात अहिंसा-सत्यादी महाव्रतांचे विवेचन सापडत होते. निर्मम, निर्भय व अपरिग्रही संन्यासी परंतु कर्मयोगी, असे ते वर्तमानकाळातील गुरू होते. तो आचार्यपदाचा अस्सल आदर्श होता.

गुरुस्वामींना शास्त्रीय गायन अवगत होते. ते शास्त्रीय संगीतात अनेक श्लोक विविध रागात आळवून म्हणत. पुढील श्लोक हा भर्तृहरीच्या वैराग्यशकातील आहे. ते म्हणत, "यावत्स्वस्थमिदं शरीरमरुजं यावज्जरा दूरत:। यावच्चेन्द्रियशक्तिर प्रतिहता यावत्क्षयोनायुष:। आत्मश्रेयसि तावदेव विदुषा कार्यप्रयत्नो महान् संदीप्ते भवनेतु कूपखननं, प्रत्युद्यम: की हश:।" मोक्षमार्गाचे ते पथिक आता कायम दृष्टिआड झाले. माणसाची दृष्टी इतक्या लांब पोहोचत नाही.

(सत्यकथा, सप्टेंबर, १९६०.

वर्ष-२७, अंक ११, पृ. ३३.

मूळ शीर्षक: कृष्णातीरावरील प्राज्ञमठात)

○○○

७५

माझ्या शब्दात मी

माझ्या शब्दात मी कसा सापडणार? माणूस समोरून पाहिल्यास अधिक चांगला कळतो. माझे यथार्थ वर्णन मला जो समोरून नेहमी आयुष्यभर पाहतो, आयुष्यभर पाहतो, त्यालाच अधिक चांगले करता येणार. मी मला पाहतो, ते माझे प्रतिबिंब असते. मी मला पाहतो ते पाण्यात किंवा आरशात. आत्मा, शरीर व मन मिळून मी आहे. माझे मन इतरांना कळते की नाही, असा प्रश्न उत्पन्न होतो. आधुनिक वर्तनवादी मानसशास्त्राप्रमाणे मन म्हणजे जिवंत शरीराचे एक प्रकारचे वर्तन किंवा व्यापार. मन म्हणून शरीराहून निराळे नाही, असे या शास्त्राचे प्रतिपादन आहे. शरीर व्यापार आत व बाहेर घडत असतात. मन ही ज्याला संज्ञा आहे, तो अंतस्थ शरीरव्यापारांचा समुदाय होय, असे या शास्त्राप्रमाणे म्हणता येते. जाणिवा अंतस्थ शरीरव्यापारच होत. मन हे शरीराहून भिन्न किंवा अभिन्न असे काहीही मानले तरी त्याचा थोडासा भाग कळू शकतो. माझ्या शरीराचे बाहेर दिसणारे व्यापार इतरांना कळू नये, म्हणून जाणूनबुजून तशी लक्षात घेतो. ते लपवितो ते लपविण्याकरिता खरेखोटे प्रयत्न करतो असे करण्यात मी माझी वंचनाही करतो.

'मी' कसा आहे हे सांगण्याकरिता अनेक लोकांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत. आत्मचरित्र लिहिणे हे मोठे साहस आहे. या साहसाची ज्यांना जाणीव नसते, त्यांच्या आत्मचरित्रात त्यांचा आत्मा दिसत नसतो. ते असतात निराळे, दिसतात निराळे. 'माझ्या शब्दात मी' कसा आहे हे सांगण्याचा प्रयत्न करीत असता मी माझे यथार्थ दर्शन व्हावे म्हणून जे साहस करायला पाहिजे ते करणार नाही, हे मी सांगितले पाहिजे. असे साहस ज्यांच्यात असते त्यांच्यात 'वाङ्मयीन महात्मता' असावी लागते ती माझ्यात नाही. मोठमोठ्या मराठी सिद्धहस्त लेखकांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत. त्यांना जे साधले नाही, मला कसे साधणार?

धुळे जिल्ह्यातील धुळे शहराच्या पाश्चमेस ४६ मैलांवरील पिंपळनेर या गावी १९०१

च्या जानेवारी २७ तारखेस माझा जन्म झाला. माझे वडील बाळाजी कृष्ण जोशी. ते जोशपणाचा व्यवसाय करीत होते. आई मी दोन वर्षांचा असतानाच निवर्तली. माझे संगोपन माहेरी परतलेल्या मोठ्या बहिणीने मातेप्रमाणे केले. माझी बहीण व माझे वडील भक्तिमार्गी होते. माझ्या घरासमोर देशमुखांचा वाडा आहे. वाड्याचे मालक कै. बाबासाहेब देशमुख यांना देवासचे सिद्ध प्रभावी शीलनाथ महाराज यांचा अनुग्रह झालेला होता. हे विरक्त गृहस्थ पूजा व भजन ह्यांमध्ये निरंतर रंगलेले असत. त्यांच्या ओट्यावर सिद्ध वेदांत चर्चा चाले. कै. बाबासाहेब देशमुख संतांचे अभंग व कविता मधुर व उच्चस्वराने गात असत .त्या माझ्या कानावर नेहमी पडत असत. माझे उपनयन झाल्यावर धर्मशास्त्रोक्त पद्धतीने वेदाध्ययनार्थ ब्रह्मचर्य व्रताचा मी स्वीकार केला व घरीच वेदाध्ययन केले. पिंपळनेरला त्या वेळी सावरकर आणि टिळकांचे अनेक भक्त होते. ह्या मंडळींचा अड्डा माझ्या घरी रोज पडत असे. मला १९०८ सालापासूनचे आठवते. आमच्या ओसरीवर ही मंडळी साप्ताहिक 'केसरी'चे वाचन करीत. क्रांतिकारकांच्या कथाही त्या वेळी सांगितलेल्या आठवतात. लो. टिळकांना १९०८ साली सहा वर्षांनी राजद्रोहाच्या आरोपाखाली शिक्षा झाली, तेव्हा सगळा गाव शोकाकुल झाला. याचा माझ्याही बालमनावर खोल परिणाम झाला.

या गावची जमीन सुपीक. शेकडो वर्षांपूर्वी पांझरा नदीला ठिकठिकाणी पाटबंधारे काढलेले. दक्षिणेस सह्याद्रीची उंच शिखरे आणि समशीतोष्ण जोमदार हवा ह्यांचा प्रभाव येथील ग्रामीण जीवनावर चांगला पडलेला होता. ब्रिटिश अमदानीपूर्वी हा भाग बागलाण प्रांतात होता. ४०० वर्षांपूर्वी ह्या बागलाण प्रांतावर बागल आडनावाच्या राजाचे अनेक शतके राज्य होते. हे राज्य आर्थिक दृष्टीने भरभराटीस आले होते व राजे शूर होते, असे जहांगीर बादशहाने या काबीज केलेल्या बागलाण प्रांताच्या वर्णनात लिहिले आहे. 'राष्ट्रौढवंशकाव्यम्' हे पुस्तक बडोदे येथील 'गायकवाड ओरिएंटल सेरिज'मध्ये प्रसिद्ध झाले होते. ह्या या राजवंशाचे चरित्र वर्णन केले आहे. त्यांच्याशी जहांगीरने केलेले वर्णन जुळते. या लहानशा गावात आठरापगड जातींची वस्ती आहे. लहान गावात तट पडलेले असतात. तसे या गावातही पडलेले होते. गावात सुखवस्तू लोकांचा त्या वेळी चांगला भरणा होता व आजही आहे. गावात तट पडलेले होते तरी जतिद्वेषमूलक भांडणे नव्हती. ब्राह्मणांची २५ - ३० घरे व त्यात भिक्षुकीने जगणारी कुटुंबे पुष्कळ होती, परंतु ब्राह्मणांची सांपत्तिक स्थिती इतर जातीजमातींच्या मानाने डोळ्यांत खुपण्यासारखी नव्हती.

१९१४ च्या फेब्रुवारी महिन्यात संस्कृतच्या अध्ययनाकरिता माझ्या वडिलांनी मला वाई येथे ब्रम्हीभूत केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे) यांच्या पायाशी आणून सोडले. माझा विचार हरिद्वारच्या गुरुकुलात जायचा होता. परंतु ते जमले नाही. संस्कृतमधील खऱ्या काव्याचे अध्ययन पहिल्या दोन वर्षांतच पूर्ण झाले. नारायणशास्त्री मराठे हे ब्रह्मचारी होते. त्यांचा कृष्णाकाठचा आश्रम म्हणजे प्राज्ञमठ हाही प्राचीन पद्धतीचे गुरुकुल होते. येथे त्या

वेळी ३०-३५ विद्यार्थी संस्कृत साहित्य, न्यायव्याकरणादी शास्त्रे, वेदवेदांगे व वेदांत ह्यांचे अध्ययन करीत होते. गुरुवर्यांची मठावर चोवीस तास देखरेख असे. दर आठवड्याच्या शेवटी म्हणजे प्रत्येक सोमवारी सुटी असे. सुटीत सकाळपासून दुपारपर्यंत अंगमेहनतीची कामे विद्यार्थी व शिक्षक करीत. त्यात सारवणे, शौचकूप साफ करणे इत्यादी कामे व्हायची. सायंकाळी ४ ते ६ पर्यंत व्याकरणे व पुराण प्रवचने चालत. संध्याकाळचे सुमारास दोन तास मंत्रपुष्प व शास्त्रचर्चा चाले. ही शास्त्रचर्चा संस्कृतमध्ये होई. मी न्यायवैशेषिक दर्शनाचे अध्ययन करू शकलो, तेव्हा म्हणजे १९२३ झाली या शास्त्रचर्चेत भाग घेऊ शकलो. व्याख्यानामध्ये मला क्रमांक मला गुरुवर्यांनी बराच काळ शेवटून पहिला दिला. परंतु शास्त्रचर्चेत वरून पहिला दिला. व्याख्यानामध्ये कै. दिनकरशास्त्री कानडे, कै. महादेवशास्त्री दिवेकर, श्रीपाद शंकर नवरे इत्यादी मंडळी फार चमकत असत. संस्थेचे वातावरण आधुनिक, अध्यात्मवादी, सुधारणावादी, सशस्त्र क्रांतिवादी यांनी पार बदलून टाकले होते. अध्यात्मवाद व सशस्त्रक्रांतिवाद योगी अरविंदप्रणित विचारसरणीवर आधारलेला होता. या सशस्त्र क्रांतिवादाला १९१७ साली संत विनोबा भावे प्राज्ञपाठशाळेत आले तेव्हा जबरदस्त धक्का बसला. प्राज्ञपाठशाळेच्या विद्यार्थ्यांत व शिक्षकांत गांधीवादी व टिळकवादी अशा दोन कक्षा अनेक वर्षे होत्या. त्यांच्यात वादविवाद होई. परंतु बराचसा सुखसंवादही होई. १९३० सालच्या सत्याग्रहाच्या चळवळीत प्राज्ञपाठशाळेच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी उडी टाकली, त्यात मीही होतो.

१९२२ साली मी कलकत्ता संस्कृत महाविद्यालयाची तर्कतीर्थ ही पदवी मिळविली. तेव्हापासून १९३० सालपर्यंत माझा सर्व काळ प्राज्ञपाठशाळेत अध्ययन व अध्यापन यात गेला. वेदांतादी षट्दर्शने विशेषतः तर्कशास्त्र ह्याचे अध्ययन व अध्यापन करीत असतानाच मी स्वत: कुणाही अध्यापकाचे साहाय्य न घेता इंग्रजीचे अध्ययन केले.

युरोपियन तत्त्वज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच्या अध्ययनाची गोडी मला हर्बर्ट स्पेन्सरच्या मराठीतील अनुवादित ग्रंथांनी लावली. राष्ट्रीय वृत्तीच्या क्रांतिकारक मंडळींच्या सहवासात मी समाजसुधारक व धर्मसुधारक विचारसरणीचा पुरस्कर्ता बनलो. हिंदुधर्मशास्त्रामध्ये धर्मसुधारणेस अनुकूल असे शेकडो आधार मी शोधून काढले व शास्त्राद्वारे धर्मसुधारणेचा व समाजसुधारणेचा प्रचार करू लागलो. त्या वेळी महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळीला चांगली धार चढली होती. कै. भास्करराव जाधव ह्यांच्याशी ह्या कालखंडात माझा स्नेहसंबंध जुळला. १९३० साली काशी येथे अखिल भारतीय संस्कृत पंडितांची परिषद भरली. त्या परिषदेत मी शुद्धीकरण, अस्पृश्यता निवारण, प्रौढ महिला विवाह इत्यादी सुधारणांची बाजु मांडण्यास धजावलो. मी ह्या हजार-बाराशे पंडितांत एकटाच सुधारणांच्या बाजूने लढलो. १९३२-३३ च्या हरिजन आंदोलनात महात्मा गांधींना वरील परिषदेतील वादविवादाची माहिती मिळाल्यामुळे येरवडा जेलमध्ये धर्मशास्त्राच्या आधारे हरिजन प्रश्नांचा सांगोपांग

विचार करण्याकरिता निमंत्रित केले. येरवडा जेलमधील ही चर्चा अनेक महिने चालली होती. ह्या चर्चेचा निष्कर्ष महात्मा गांधींनी असा काढला की, हिंदुधर्माचे मूलभूत तत्त्वज्ञान अहिंसा, सत्य व मानवी समता ह्यांच्यावर आधारलेले असले तरी प्रत्यक्ष शास्त्रवचने परस्परविरोधी व त्यामुळे त्यांत गोंधळ असल्यामुळे शास्त्रवचनांच्या आधारे अस्पृश्यता निवारण व अस्पृश्यांचा देवालय प्रवेश समर्पित करता येत नाही. मी दिलेल्या शास्त्राधारांना त्यांनी खूप महत्त्व दिले. मी अशी बाजू मांडली की, शैवसिद्धांत न वैष्णवसिद्धांत हे मूलत: समतावादी आहेत. जातिभेद व अस्पृश्यता मानवाच्या प्राचीन न स्पृश्य पंडितांनी शैवसिद्धांत व वैष्णवसिद्धांत आपल्या जातिभेदाने कलंकित केला आहे. महात्मा गांधींनी असे मत मांडले की मनुष्य मूलतः शुद्ध आहे व असा सिद्धांत धरूनच हरिजन आंदोलन चालविले पाहिजे. परंतु शैव व वैष्णव सिद्धांतांप्रमाणे ईश्वरभक्तीनेच सर्व मानवांना शुद्धता व समता येते.

जन्मभर अविवाहित व पवित्र राहण्याचा माझा विचार होता, परंतु गुरुवर्यांनी मला हा विचार सोडून देण्याचा सल्ला दिला व मी तो क्षणभरही विचार न करता मानला. मी मोहपाश टाळू शकणार नाही, याची त्यांना खात्री, म्हणून त्यांनी तसा सल्ला दिला. सर्व एका आठवड्यात झाले. १९२७ साली मी विवाहबद्ध झालो. माझा प्रपंच गरिबीचा. पिंपळनेरला एक घर होते, तेही मुलाच्या शिक्षणाकरिता विकले. माझे वडील बंधू प्रख्यात आयुर्वेदज्ञ वेणीमाधवशास्त्री जोशी, त्यांनी घरात वाटा घेतला नाही. एवढेच नव्हे तर मी स्वातंत्र्याच्या आंदोलनात अनेक वर्षे बाहेर काढली तेव्हा माझा प्रपंच आत्मीयभावनेने त्यांनीच सांभाळला. पत्नी सौ. सत्यवतीने कुरकुर न करता 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' अशा वृत्तीने माझा गरिबीचा संसार चालविला. दोन मुली न दोन मुलगे यांचे उच्च शिक्षण झाले व ते योग्य मार्गास लागले. काँग्रेसच्या व मानवतावादी आंदोलनात शेकडो स्त्री-पुरुषांशी मैत्रीचे संबंध निर्माण झाले. मी प्राज्ञपाठशाळा मंडळाचा अध्यक्ष म्हणून ४० वर्षे काम करीत आहे. त्या निमित्ताने अनेक स्नेही, सहकारी मिळाले.

भारतातील अनेक महनीय व्यक्तींच्या गाठी पडत, परिवार व स्नेहही वाढत गेला. विनोबा भावे, सयाजीराव गायकवाड, काका कालेलकर, वल्लभभाई पटेल, महादेवभाई देसाई, गंगाधरराव देशपांडे, महात्मा गांधी, मानवेंद्र रॉय, प्राचार्य मणीशंकर ध्रुव, सरोजनी नायडू, बाबू भगवानदास, स्वातंत्र्यवीर सावरकर, मंगलाचार्यभाई, घनःश्यामदास बिर्ला, दादासाहेब मावळणकर, म. म. पांडुरंग वामन काणे, लक्ष्मणशास्त्री द्रविड, रामेश्वरशास्त्री द्रविड इत्यादी कितीतरी व्यक्तींचा जवळून परिचय झाला.

१९३० सालापासून मी राजकारणाच्या रिंगणात उतरलो. त्या वर्तुळातून कधीच बाहेर पडू शकलो नाही. मी १९३५ सालापासून मार्क्सवाद व रॉयवाद यांचा अभ्यास करू लागलो व जागतिक साम्यवादी क्रांतीचा उपासक बनलो. १९४० साली मी काँग्रेसमधून बाहेर पडलो. त्या वेळी दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले. जागतिक क्रांतिकारक एम. एन. रॉय

यांची विचारसरणी मला मान्य झाली होती. त्यामुळे हे युद्ध फॅसिझम विरुद्ध लोकशाही अशा स्वरूपाचे असल्यामुळे या युद्धास पाठिंबा दिला पाहिजे असे माझे मत बनले. मी रॉयवादी बनल्यामुळे महात्मा गांधी व माझा जो जिव्हाळ्याचा संबंध अनेक वर्षे होता तो तुटला. त्यामुळे माझे मन व्यथित झाले. विचार व आध्यात्मिक भावना यांचा संग्राम झाला. विचाराची बाजू मी पकडली. बुद्धिवाद व आध्यात्मिक अनुभव, त्यांचा अंतर्विरोध मिटणे अशक्य असते, माझ्या बाबतीत तरी अजून मिटला नाही.

१९५० झाली मी पुन: काँग्रेसप्रवेश केला. श्री. किसनवीर व विशेषतः श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याशी माझा स्नेहसंबंध १९३० पासूनचा. ह्या मित्रमंडळींच्या ध्येयवादी निष्ठेचा कस अनेक वेळा लागलेला असल्यामुळे मी त्याच्याबरोबरच सहकार्य करण्याचे ठरविले. राजकीय लोकशाहीच्या अधिष्ठानावर झालेली समाजवादी क्रांतीच अंतिम साम्यवादाकडे द्रुतगतीने यात्रा करू शकते, अशी धारणा झाल्यामुळेच भारतीय लोकशाहीचा पाया घालणाऱ्या काँग्रेसमध्ये जाणे हे मला प्राप्त कर्तव्य वाटले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत श्री. यशवंतराव चव्हाण यांचे व माझे विचार व आचार समान होते म्हणून त्यांचा-माझा स्नेहसंबंध घट्ट झाला.

भारतात समाजवादी क्रांती होईल काय व त्या क्रांतीचे साधन म्हणून काँग्रेसचा उपयोग होईल काय, या प्रश्नाचे उत्तर बुद्धिवादाने देणे कठीण आहे. साम्यवादी पक्षांनी रशियात, पूर्व युरोपात आणि चीनमध्ये तथाकथित साम्यवादी क्रांती केली आहे, परंतु व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेला समाजवाद व साम्यवाद तेथे उभारला जात आहे काय, ह्या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर मिळत नाही. बंधमुक्त मानवाचे साम्यवादी जग हा आदर्श ह्या पृथ्वीपासून, ह्या मानवी जगापासून, अनंत अंतरावर असलेला दिसतो. बलाढ्य राजकीय सत्तांच्या बंधनात मानव समाज अडकून पडला आहे. तो आदर्श अंतिम नैतिक ध्येय आहे. हे ध्येय म. गांधींनी, योगी अरविंद घोषांनी व एम. एन. रॉय यांनी आपापल्या विशिष्ट शब्दावलीत प्रकट केले आहे. त्या ध्येयाकडे जाणारी माणसे नैतिक स्वातंत्र्याच्या निष्ठेची पाहिजेत. नैतिक स्वातंत्र्यनिष्ठा ही ऐहिक सत्ता व संपत्ती ह्यांच्या भोगवासनेपासून मुक्त असलेल्या मानवालाच लाभते.

माझी जीवनदृष्टी ही बुद्धिवाद व आध्यात्मिक अनुभववाद ह्यांनी घडलेली आहे. आधुनिक विज्ञाने ही बुद्धिवादावर अधिष्ठित आहेत. इंद्रियांनी येणारे अनुभव या बुद्धिवादाचा आधार आहे व तर्कशुद्ध विचार हे तिचे स्वरूप आहे. आत्मा, परमात्मा, अमरत्व इत्यादी विषय हे विज्ञानाचे विषय नव्हेत, वैज्ञानिक दृष्टीचे हे विषय नव्हेत. वैज्ञानिक दृष्टीचा व त्यांचा काहीही संबंध नाही व विरोधही नाही. हे आध्यात्म दृष्टीचे विषय आहेत: आध्यात्मिक अनुभव शब्दाने व वाक्याने सांगता येत नाही, तो सूचित होतो. तो अनुभव अनिर्वचनीय आहे. ह्या इंद्रियगम्य विश्वाच्या आकर्षणातून म्हणजे वैषयिक वासनेतून मुक्त मनालाच आध्यात्मिक अनुभव येण्याची शक्यता आहे. परंतु हे विधानसुद्धा बुद्धिवादाच्या दृष्टीने विवाद्य ठरते.

बुद्धिवादाला विवाद्य काय नाही? नैतिक दृष्टीने नैतिक आत्मस्वातंत्र्य हे ज्याला प्राप्त झाले, त्यालाच आध्यात्मिक अनुभवाची पात्रता येते. हे आध्यात्मिक नैतिक स्वातंत्र्य अंतिम जीवनमूल्य होय. विश्वासंबंधी बुद्धिवादी दृष्टिकोन स्वीकारणाऱ्यांनाही हे स्वातंत्र्य अंतिम मूल्य होय; असा सिद्धांत स्वीकारण्यास काही अडचण पडू नये.

(पाक्षिक रुद्रवाणी, १५ जानेवारी, १९७२. पृ. ७ ते ९ व १७)

❍❍❍

७६

माझी पत्नी सौ. सत्यवतीची जीवनयात्रा

(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांच्या पत्नी, सौ. सत्यवती जोशी ह्यांचे दि. १२।८।७८ ला वाई येथे आकस्मिकपणे निधन झाले. तर्कतीर्थांनी आयुष्यभर अज्ञ आणि अज्ञानामुळे दुष्कर्मसंगी असलेल्या जनांचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न केला असला तरी त्यांचा लोकसंग्रह विलक्षण, विस्तृत आणि समाजातील सर्व थरांना व्यापणारा असा आहे. ह्या संग्रहात समाविष्ट असलेल्या सर्व व्यक्तींच्या, प्राज्ञपाठशाळेत तर्कतीर्थांच्या घरी वेळी अवेळी हक्काने उतरणाऱ्या पाहुण्यांच्या आणि विश्वकोशाचे कार्य सुरू झाल्यावर 'अभ्यागत-निवासात' मुक्काम करणाऱ्या विद्वान अभ्यागत संपादकांच्या स्मरणात एक ममताळू, आतिथ्यशील, प्रसन्नमुख गृहिणी म्हणून 'सतीकाकू' कायमच्या राहतील. पण वाईच्या सर्वसामान्य जनतेत सतीकाकूंचे जे स्थान होते ते तर्कतीर्थांची पत्नी म्हणून नव्हते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे व आचरणामुळे त्यांनी स्वतंत्रपणे हे स्थान प्राप्त करून घेतले होते. जे सामाजिक तत्त्वज्ञान तर्कतीर्थांनी, अभ्यासाच्या आणि तार्किक विचारांच्या बळावर हस्तगत केले ते सतीकाकूंनी आपल्या स्वतंत्र अंतःप्रेरणेने उत्स्फूर्तपणे आजन्म आचरिले. माणूस असण्यातील प्रतिष्ठा रूसोने आपल्याला शिकविली असे कांटने म्हटले आहे. विश्वाची व्यवस्था लावणाऱ्या तत्त्ववेत्त्यालाही कठीण जाणारा हा घडा सतीकाकूनी कधी आणि कसा आत्मसात केला, हे आता कुणी सांगू शकणार नाही. पण आपल्या संबंधात आलेल्या प्रत्येक माणसाच्या, लहान थोर, सन्मानित-उपेक्षित, भल्या-बुऱ्या माणसाच्या प्रतिष्ठेची कदर ह्या आधुनिक सतीने केली. एका मनस्वी आणि प्रतिभावंत विचारवंताची, विचाराच्या आणि कृतीच्या प्रवाहात स्वतःला झोकून देणाऱ्या विचारवंताची जन्मभर साथ केली आणि अंतसमयी अधिकाराने आणि कृतकृत्यतेने पतीकडे पाण्याचा घोट मागून आणि तो पिऊन तृप्ततेने निघून गेली. पण ती पतीची सावली कधी बनली नाही. आपल्या स्वतंत्र प्रभेने आपल्या सहवासात आलेल्या प्रत्येकाचे जीवन तिने उजळले. 'नवभारता'तर्फे

आम्ही त्यांना श्रद्धांजली वाहतो.

सौ. सत्यवती जोशी आणि त. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या सहजीवनातील काही महत्त्वाच्या प्रसंगांच्या स्मृती ह्या लेखात तर्कतीर्थांनी नमूद केल्या आहेत.)

दिनांक १२ ऑगस्ट १९७८ ला संध्याकाळी ५ वाजता तिने आपली जीवनयात्रा आकस्मिक रीतीने संपविली. सत्यवतीला 'सती' म्हणून पहिल्यांदा आमचा ज्येष्ठ मुलगा बालपणी म्हणू लागला; तेव्हापासून इतर घरची दारची मंडळीही बहुतेक 'सती' किंवा 'सतीकाकू' म्हणू लागली. मधुकर जन्मल्यानंतर सतीसह पहिली दोन वर्षे माझे वडीलबंधू वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी व त्यांच्या पत्नी कै. सौ. शांताबाई यांच्या छत्राखाली होता. १९३० ते ३३ सालपर्यंत मी महाराष्ट्रात सत्याग्रहाच्या आंदोलनाचा प्रचार करीत होतो; त्यात दोनदा कारावास भोगला. १९३० साली मी धुळ्याच्या कारावासात असताना माझे वडील बाळंभटजी स्वर्गवासी झाले. माझे वडीलबंधू व वडील भावजय हे दोघे सत्यवतीला 'सत्यवती' म्हणून संबोधीत. मधुकरही त्यांचेच अनुकरण करून एवढा मोठा शब्द बोलता न आल्यामुळे त्याचा संक्षेप करून सती म्हणू लागला. १९३१ साली मी कारागृहातून परत आल्यावर मधुकरचे हे संबोधन ऐकून आनंदित झालो. कारण, दक्षकन्या शिवपत्नी देवीचे पूर्वजन्मीचे सती हे नाव. ती हिमालयाच्या पोटी जन्मली, नंतर तेव्हा तिला पार्वती म्हणू लागले. ही कथा मला आठवली.

सत्यवतीचा जन्म नाशिक जिल्ह्यातील मुल्हेर येथे १९१२ साली झाला. वडिलांचे नाव वासुदेवबुवा पंडित. आणि आईचे नाव भागीरथी. तिचे शिक्षण म्हणजे प्राथमिक ५ वी पर्यंतचे. ती १३ वर्षांची असतानाच १९२६ साली जूनमध्ये तिचा माझ्याशी विवाह २६ व्या वर्षी झाला. त्या वेळी संस्कृत विद्येचे बरेचसे शिक्षण होऊन मी प्राज्ञपाठ शाळेत स्वामी केवलानंद यांच्या देखरेखीखाली शास्त्रांचे अध्यापन करू लागलो होतो. सामुद्रिक शास्त्राचाही थोडासा अभ्यास केला होता. माझे वडील गुरुवर्य यांनी मला आता विवाहाचे वय आहे म्हणून विवाह केलाच पाहिजे अशी आज्ञा केली. मी माझ्या जन्मगावी म्हणजे धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे कन्या-संशोधनाकरिता गेलो. अगोदर निरनिराळ्या गावी दोन मुली पाहिल्या; पण निर्णय झाला नाही. माझ्या वडिलांचे मित्र कै. रामदासपंत आणि कै. कृष्णाजीपंत करमरकर यांनी स्वतः पुढाकार घेऊन मला मुल्हेर येथील त्यांचेच मित्र वैकुंठवासी वासुदेवबुवा पंडित यांच्याकडे नेले. व त्यांची कन्या कावेरी या कन्येशी मी विवाह करावा असे सांगितले. मी म्हटले, की या मुलीचा हात पाहून मग काय ते ठरवीन. माजघरातून कावेरी मान किंचित खाली घालून माझ्यापुढे येऊन बसली. नाकाडोळ्याने नीटस, तरतरीत, गव्हाळ्या रंगाची, साधे पातळ नेसलेली, अंगावर यत्किंचितही अलंकार नसलेली लंकेची पार्वतीच माझ्यापुढे बसलेली दिसली. घरच्या आणि भोवतालच्या १५-२० स्त्री-पुरुषांचा जमाव मला पाहण्याकरिता तेथे आला होता. या मुलीचा हात मी पाहिला

व लगेच सांगितले की या मुलीच्या हस्तरेषा चांगल्या आहेत; परंतु आताच निर्णय सांगत नाही कारण माझ्या वडिलांनी सांगितल्याप्रमाणे एका बड्या गृहस्थांची मुलगी पहावी असे माझ्या मनात आहे. रामदासपंत (धर्मशास्त्री) व कृष्णाजीपंत (सेनापती बापटांचे भक्त व अप्पासाहेव रणदिवे यांचे मित्र) यांनी मला सांगितले, की 'शास्त्रीबुवा; तुम्ही ह्या मुलीचे पाणिग्रहण इतक्या मंडळींदेखत तिच्या मातापित्यांसमोर केले आहे. आता तुम्हांस दुसरा पर्याय शिल्लक नाही.' त्यांचे म्हणणे लगेच मो मान्य केले. आपस्तंब धर्मसूत्रातले वाक्य मला आठवले:- 'यस्था मनःश्चक्षुषोर्निबन्धः, तस्यां ऋद्धिः'- 'पाहिल्या बरोबर जिच्यावर मन व डोळे खिळून राहतात; तिच्यात उत्कर्षाचे वीज असते.' पिंपळनेरला परत आलो व माझ्या वडिलांना झालेली हकिकत सांगितली. माझ्या वडिलांना मुल्हेर येथील ब्राह्मण व पांढरपेशा वर्गातील घराण्यांची बारीकसारीक सगळी इत्यंभूत माहिती होती; कारण वेदशास्त्रांच्या अध्ययनार्थ ते प्रथम मुल्हेर येथे व नंतर नाशिक येथे राहिले होते. ते म्हणाले, 'अरे, तू गरीब मध्यम वर्गांतील मुलगी पसंत न करता सुखवस्तू, चांगल्या घराण्यातील मुलगी पसंत करणे मला आवडले असते. इतकी घाई कशाकरिता केलीस.' मी लगेच त्यांना म्हटले, की 'मीही गरीबच आहे.' द्रुपद राजाने द्रोणाचार्यास म्हटले होते की 'ययोरेव समं वित्तं ययोरेव समं 'कुलम्। तयोर्मैत्री विवाहश्च-'- 'ज्यांचे वित्त व कुल समान असते, त्यांचीच मैत्री जमते व विवाहही त्यांच्यातच जमतो.' 'ठीक आहे' वडील म्हणाले. परंतु पुन्हा म्हणाले, की 'तुला एका वर्षात प्रपंच मांडावा लागेल. बेन्या (वेणीमाधवशास्त्री) तुला मदत करील. पण तुझ्यापाशी काय आहे?' मी लगेच उत्तर केले, की ''माझ्यावर गुरुकृपा फार मोठी आहे. त्यांनीच मला म्हटले की तू अविवाहित राहू नकोस. गृहस्थाश्रमच एकपत्नीव्रताने चालविणे हे ब्रह्मचर्यं आहे. अलीकडे देशभक्तांमध्ये जन्मभर ब्रह्मचारी राहण्याची प्रतिज्ञा करण्याची प्रथा सुरू होऊ लागली आहे. कारण ते म्हणतात, की इंग्रजी राज्यात मुलास जन्म देणे म्हणजे गुलामास जन्म देणे होय; परंतु हे देशभक्त जन्मठेपेची किंवा फाशीची शिक्षा भोगण्यास तयार होत असले तरी त्यांना ब्रह्मचर्य पाळण्यात अपयशच येते. आजन्म ब्रह्मचर्य ही वस्तऱ्याची प्रखर धार आहे, तिच्यावरून कोण चालू शकेल?''

मी वाईस परत न येता १५ दिवसांत विवाह मुहूर्त ठरविला. पिंपळनेरहून मुल्हेर १८ मैलांवर आहे. पिंपळनेरहून ११ बैलगाड्या भरलेला सकाळी निघालेला जानोसा मुल्हेरला संध्याकाळी पोचला. मंगल कार्यालय अगोदर ठरलेले नव्हते. तेथे गेल्यावर मित्रमंडळींनी गावालगतच्या संत उद्धव महाराजांच्या समाधी भोवताली बांधलेल्या प्रशस्त सराईपर्यंत जानोसा नेऊन त्यात वऱ्हाडी मंडळींची उतरण्याची व लग्न समारंभाची व्यवस्था केली. आतापर्यंत येथे लग्नासारखी मंगलकार्ये झाली नव्हती. रामानंद संस्थानच्या ताब्यातली ही जागा; संस्थानाधिपतींनी त्वरित मान्यता दिली. पहिल्या दिवशी समावर्तन (सोडमुंज): दुसऱ्या दिवशी विवाह व तिसऱ्या दिवशी सकाळी उरलेले कर्मकांड संपवून संध्याकाळी

पिंपळनेरला जानोसा परतला. घरी लक्ष्मीपूजन झाले. वधूचे 'सत्यवती' हे नाव ठेवले. मुल्हेर येथे हजार बाराशेंना लग्नाची मेजवानी दिली. सुमारे २ हजार रुपये खर्च आला; तो सगळा वडील वंधू वेणीमाधवशास्त्री यांनीच केला. सर्व सोहळा परंपरागत संपूर्ण पद्धतीने झाला. वैदिक पद्धती म्हणजे अलीकडे प्रचारात आलेले संक्षिप्त कर्मकांड १ वा २ तासांत उरकण्यासारखी पद्धती अनुसरली नाही. ही वैदिक पद्धत म्हणजे गृह्यसूत्रोक्त पद्धती होय. उपनयन, विवाह इत्यादी संस्कार गृह्यसूत्रांप्रमाणे केल्यास तास दोन तासांपेक्षा जास्त वेळ लागत नाही. त्या वेळीही गृह्यसूत्रोक्त पद्धतीच अनुसरावी, असे माझे मत होते. परंतु त्याप्रमाणे कर्मकांड करण्यास त्या वेळची पुरोहित मंडळी तयार झाली नसती. म्हणून माझे मत मी बाजूस ठेवले.

१९२७ मध्ये लग्नानंतर एक वर्षांनी मी माझे बिऱ्हाड मांडले. तेव्हा वडील ७५ वर्षांचे वृद्ध होते; त्यांनाही पिंपळनेरहून वाईस आणले. मुहूर्त - ज्योतिष व याज्ञिकी यांत त्यांची चांगली तयारी होती. ते वाईस आल्यावरही माझ्यावर केवळ अवलंबून न राहता स्वावलंबनाने राहू लागले. १९३० च्या सत्याग्रहात मी भाग घेतला व मला कारावासाची शिक्षा झाली; धुळे येथील कारागृहात माझी रवानगी झाली. तेथे असतानाच माझे वडील वयाच्या ७८ व्या वर्षी स्वर्गवासी झाले. वडिलांच्या ३ महिन्यांच्या आजारपणात वेणीमाधवशास्त्री, सौ. वहिनी व सत्यवती यांनी त्यांची सर्व प्रकारची सेवा केली. १९३१ मध्ये माझी सुटका झाली. पुन: १९३२ साली सत्याग्रह करून मी कारागृहवास पत्करला. तेव्हाही धुळे कारागृहात पुनः रवानगी झाली. या वेळी धुळ्याच्या कारागृहात शेट जमनालाल बजाज, गुलजारीलाल नंदा, संत, विनोबा भावे, साने गुरुजी, पुरुषोत्तम त्रिकम, अण्णासाहेब दास्ताने, भय्यासाहेब मुधोळकर इत्यादिकांच्या सहवासात माझे दिवस सुखात गेले. तेथे मी कलकत्त्याचे सत्याग्रही शेट माधवजी यांना दशोपनिषदे शिकविली.

१९३३ साली फेब्रुवारीत माझी सुटका होऊन वाईस घरी परतलो. सत्यवतीने माझे आनंदाने स्वागत केले; गप्पाटप्पा झाल्या. त्यात ती म्हणाली, 'तुम्ही पुरुष फार स्वार्थी! तुम्ही सर्वत्र प्रचार करून शेकडो लोकांना सत्याग्रहात सामील करून घेतले; ते जेलमध्ये गेले. त्यात मला का घेतले नाही?' 'गेली दोन वर्षे मधुकरसह तुझे अण्णांनी (वेणीमाधवशास्त्री यांनी) पालन कर्तव्य बुद्धीने केले; यात सत्याग्रहाचे पुण्य तुम्हा सर्वांनाच मिळाले.'

येथे परतल्यावर १५ फेब्रुवारीस दुपारी २ च्या सुमारास माझे लहानपणचे मित्र कै. धुंडिराज देव हे महत्त्वाचा निरोप घेऊत आले. निरोप होता तो येरवडा जेलमधून म. गांधींचा; पुणे येथील वृद्ध देशभक्त कै. हरीभाऊ फाटक यांच्यातर्फे आला. निरोप असा होता की, हिंदुधर्मशास्त्र व अस्पृश्यता या विषयासंबंधी चर्चा करणे आहे. हे निमंत्रण मला का व कसे आले याचा डोक्यात एकदम प्रकाश पडला. आठवले की, धुळे जेलमधून मी सर्व सत्याग्रह्यांचा निरोप घेऊन निघालो तेव्हा श्री. जमनालाल बजाज यांनाही भेटलो, तेव्हा

ते म्हणाले की, 'मी बापूजींना तुमच्यासंबंधी पत्र लिहीत आहे. तुम्हांस बापूजींचे निमंत्रण येईल; तरी हे लक्षात ठेवून फिरतीचा कार्यक्रम ठरवा.'

मी दुसऱ्या दिवशी पुण्यास निघणार म्हणन सत्यवतीने माझी बॅग भरली, व मला म्हणाली मीही महात्माजींच्या पाया पडण्याकरिता येते. मी सांगितले की, जेलमध्ये केवळ निमंत्रितांनाच प्रवेश करण्याची परवानगी मिळते. तुलाही महात्माजींचे दर्शनाचा यापुढे लवकरच योग येईल, ही खात्री बाळग; म्हणून माझ्यावर रुसून बसू नकोस.

१९३३ च्या फेब्रुवारी मध्यापासून जून अखेरपर्यंत आपसातल्या, भारतातून व परदेशातून येणाऱ्या अस्पृश्यतानिवारणाचे समर्थन करणाऱ्या आणि विद्वान वा कार्यकर्त्यांच्या वा पुराणमतवादी परंपरावादी शास्त्री पंडितांच्या मधल्या चर्चांच्या प्रसंगी म. गांधी मला राहण्यासाठी बोलावीत. त्याच सुमारास महात्माजींनी २१ दिवसांचा निर्जली उपवास पापाचे प्रायश्चित्त म्हणून जाहीर केला. लगेच कै. महादेवभाई देसाई अत्यंत चिंताक्रांत व परमदुःखी झाले. मला भेटीसाठी निरोप आला; मीही एकदम गडबडून गेलेलो. परंतु खूप विचार केला. माझ्या गुरूंचा सल्ला घेतला. ते म्हणाले, "महात्म्याला उपवासात कसला ही उपद्रव होत नसतो; कारण उपवासकाली त्याची परमात्मोपासना शांतपणे चालू राहते. आत्मचैतन्याचे सामर्थ्य एकदम वाढते." असेच महादेवभाईंना सांग, धीर दे, तू सुद्धा फार विषण्ण झालेला दिसतोस; हे बरे नव्हे. सतीदेखतच स्वामी मला हे सांगत होते. मी तडक येरवड्यात प्रातःकाली १० वाजता गेलो. महादेवभाईंच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. त्यांना मी स्वामींचे हे म्हणणे सांगितले; त्वरित शांत व समाधानी झाले. लगेच ५ मिनिटांतच महादेवभाईंनी मला म. गांधींपाशी नेले. गांधी म्हणाले की, स्वामीजींची पुनः गाठ पडली तर बरे होईल. त्यांचा विचार महादेवाला एकदम पटला. हे फार चांगले झाले.

२१ दिवसांच्या उपवासाच्या कालात म. गांधींची जेलमधून मुक्तता झाली. ते येरवड्याजवळील, प्रमिलाबाई ठाकरसींच्या टेकडीवरील पर्णकुटीवर राहावयास गेले. तेथेच उपवास सुटल्यावर काकासाहेब कालेलकरांनी मला तेथे बोलावून घेतले. लक्ष्मी-देवदास विवाहाच्या सूक्तासूक्ततेसंबंधी माझे मत विचारले. लक्ष्मी-देवदासचा विवाह तीन वर्षांपूर्वीच व्हावयाचा; परंतु का लांबणीवर टाकला, यासंबंधाची सर्व इत्थंभूत हकिगत स्वतः महात्माजींनी मला सांगितली. त्यानंतर श्री. राजगोपालाचार्यांशी चर्चा झाली. या विवाहाचे पौरोहित्य मीच करावे, असे ठरले. मी या विवाहसमारंभास सत्यवतीस बरोबर नेले; तिने कस्तुरबांची भेट घेऊन त्यांना पद्धतीप्रमाणे प्रणाम केला. तिची अपेक्षापूर्ती झाली.

म. गांधींवरील तिची श्रद्धा अखेरपर्यंत दृढमूल राहिली होती. गांधींचा खून झाला त्या दिवशी मी कलकत्त्यास एम. एन. रॉय यांनी योजलेल्या भाषणमालेत माझे भाषणपुष्प गोवण्यास गेलो होतो. माझे भाषण आदल्या दिवशी उरकले होते. संध्याकाळी अखेरचे पुष्प गोवण्यास कै. सुधीन्द्रदत्त उभे राहिले व गांधीखुनाची हृदयद्रावक भयंकर बातमी येऊन

थडकली. रॉयनी सभा विसर्जित केली. इकडे वाईस त्याच दिवशी संध्याकाळी सातारच्या साहित्य संमेलनाकरिता जाणारे महाराष्ट्रातील कै. मामा वरेरकर, आचार्य अत्रे, प्रभाकर पाध्ये, पां. वा. गाडगीळ इत्यादी नामवंत आमच्या निवासस्थानी उतरले होते. त्यांच्या भोजनाची तयारी सत्यवतीने केली होती. जिलबीचा बेत होता. ही भयंकर बातमी ऐकून दोन तीन साहित्यिकांनी भोजन घेतले नाही; नुसते दूध घेतले; एक जणाने दुधाबरोबर जिलबीही घेतली. दुसऱ्या दिवशी सकाळी ही मंडळी साताऱ्यास गेली. आचार्य अत्र्यांनी आत्मचरित्रात सत्यवतीचा उल्लेख आवर्जून करून ही हकिकत दिली आहे. कलकत्त्याहून मी ३ दिवसांनी घरी परतलो. सत्यवतीने साहित्य संमेलनाच्या पाहुण्यांची तिने केलेल्या पाहुणचाराची कथा सांगितली. त्यानंतर म्हणाली की, गांधीचा खून संध्याकाळी झाला. परंतु मला अगोदर पाहटेस स्वप्न पडले की, महात्माजी एका ज्योतीबरोबर आकाशातून वर वर जात आहेत; त्यांच्या गळ्यात ७ फुलांची माळ होती; त्यातील एक फूल त्यांच्याकडे मागितले; ते त्यांनी मला प्रसन्नपणे दिले.

सत्यवतीला महात्माजींच्या दर्शनाचा १९३४ मध्ये पुणे येथेच दुसरा अत्यंत पुण्यकारक अपूर्व योग आला. हरिजन आंदोलनास व मंदिरप्रवेशाचे समारंभास या वेळी देशभर भरती आली. पुण्याच्या नगरपालिकेतर्फे व्हावयाच्या मानपत्र समारंभाकरिता म. गांधींचा मुक्काम पुण्यास होता. मुक्काम ज्या बंगल्यात होता, त्याच्या भोवती पोलीस संरक्षण भक्कम होते. आत कोणासही अपरिचित व्यक्तीस प्रवेशाचा मज्जाव होता. मी सकाळी सत्यवतीस घेऊन शिरण्याचा प्रयत्न केला. बंगल्याच्या माडीवरून राजाजींनी मला दुरून पाहिले. तोच पोलिसांनी मला हाकलून दिले. राजाजींनी त्वरित मी कोठे उतरलो, याची भारत सेवक संघ, चित्रशाळा, इत्यादी ठिकाणी चौकशीकरिता माणसे पाठविली. मी माझे मित्र कट्टर पुराणमतवादी कै. गो. म. जोशी यांचेकडे अलीकडे उतरतो, हे चित्रशाळेच्या मालकांना माहीत होते. तेही गांधींचे अनुयायी होते. त्यांनी मला दुपारी ११ च्या सुमारास गाडी पाठवून सत्यवतीसह गांधींच्या निवासस्थानी पोचते केले. सत्यवतीने महात्माजींच्या चरणावर डोके ठेवून हातातील १ तोळ्याची अंगठी अर्पण केली. महात्माजींनी तिचा उजवा हात पकडून पाठीवर हात फिरविला. सत्यवती अत्यंत गहिवरली; माझ्यापाशी येऊन म्हणाली, माझे जीवन पूर्ण सफल झाले; माझे केवढे भाग्य!

मी हरिजन आंदोलनात देशभर भटकत होतो. म. गांधींच्या सांगण्यावरून प्रयाग, बिहार प्रांतातील देवधर इत्यादी तीर्थक्षेत्रांमध्ये अस्पृश्यतेच्या शास्त्रार्थाकरिता पुराणमतवादी पंडितांनी आव्हान देऊन भरविलेल्या सभात मी वाद केले. देवघर येथील वैद्यनाथ मंदिरात कै. विनोदानंद झा (गांधीवादी माजी मुख्यमंत्री) यांनी शास्त्रार्थांच्या सभेचे ५ दिवसांचे अधिवेशन भरविले. आमचा शास्त्रार्थ ऐकण्यास ५-६ हजार जनसमूह जमत असे. या यात्रा करीत असता मधूनमधून मी काही दिवस वाईस मुक्कामास येत होतो. ह्या प्रसंगी सत्यवती

वारंवार फार रुसत होती. मला म्हणे, की मला तुम्हीच अशिक्षित ठेवले: मला तुमच्यासारखे भाषण करता येत नसले म्हणून काय झाले? हरिजन आंदोलनाकरिता मी घरोघरी फिरून महिलांची मने बदलू शकेन. मी वाईस राहून हेच करीत आहे.- "शिक्षण न घेताच तू बंधमुक्त झालीस. हाच तुझ्या अस्पृश्यांच्याबद्दल असलेल्या भावनांचा अर्थ आहे. मोठमोठ्या बहुसंख्य आधुनिक पदवीधर महिला, मग त्या ब्राह्मण वा ब्राह्मणेतर कोणत्याही वर्गातील असोत, अंधश्रद्धेच्या जाळयात तशाच अडकून पडल्या आहेत. त्यांना उच्च शिक्षणाचे फ़ळ मिळाले नाही; परंतु तुला अगोदरच मिळाले आहे" "माझे कसेतरी समाधान करता तुम्ही; तुम्ही लुच्चे आपमतलबी; खरं की नाही?" तिने उत्तर केले. मी खर सांगू का? की नको? तुझ्या शिक्षणाच्या वयात तुला शिक्षित करावे, हे मला सुचले नाही; कित्येकदा वाटत असे की, तुला संस्कृत विद्या द्यावी; परंतु त्याही विचाराच्या मुळाशी माझ्यापाशी तितकी इच्छाशक्ती नव्हती. आता २ मुले झाली आहेत, तिसरे होणार आहे, आपला प्रपंच म्हणजे हातातोंडाशी गाठ! प्राज्ञपाठशाळेचा कारभार नीट चालला तरच माझे अधिष्ठान पक्के राहील. त्यावर तुझी देखरेख आहे. व इतरही सहकारी प्रामाणिकपणे झटत आहेत.

स्त्री जातीच्या परावलंबित्वाबद्दल विचार आला, की ती अतिशय विषण्ण होत होती. हा विषय निघाला, की माझ्याशी व मुलींशी काकुळतीस येऊन दैन्यात जीवन कंठणाऱ्या स्त्रियांची तिने पाहिलेली उदाहरणे देऊन बोलत असे. विधवेच्या भवितव्याबद्दल तिला भय वाटत असे. अनाथ वा विधवा स्त्रियांचा कसा कोंडमारा चाललेला असतो. त्या त्या अनाथ वा विधवा वा गरीब स्त्रिया हालअपेष्टा कशा निमूटपणे सोसतात याचे वास्तव वर्णन करताना सांगे की परक्यांच्या घरी राबावे लागते. वाटेल तशी बोलणी खावी लागतात; आजारपणात वा म्हातारपणी कोणी विचारीत नाही; म्हणून आई बापांनी मुलींना स्वावलंबी होण्याकरिता प्रथमपासून विचार करावा; उच्च शिक्षण, कला शिक्षण दिल्याशिवाय राहू नये. परंतु मुलगा व मुलगी यांच्यात फरक करतात; सुशिक्षित पुरुष काय वा सुशिक्षित महिला काय या बाबतीतील अजून तशाच पक्षपाती दृष्टीने वागतात.

तिची स्वावलंबनाची कल्पना वेगळी होती. विशेष प्रसंगी ती वारंवार म्हणे, स्वतःच्या श्रमाने जे मिळेल तेच आपले. आई, बाप, भाऊ, बहीण यांचे धन आपले नव्हे; ते देतात, त्यांच्याकडून वारसा हक्काने मिळते, तो उपकार असतो; म्हणून तो एक प्रकारचा बोजाच असतो; नवऱ्याची मिळकतही आपली नव्हे; त्याच्यावर बायकोच्या पोषणाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी असते हे जरी खरे असले तरी त्यात ज्या बायका समाधान मानतात त्यांच्याबद्दल मला कीव वाटते. तिच्या ह्या भावनेचा मला व माझ्या सुस्थळी दिलेल्या मुलींना नेहमी अनुभव आला आहे; माझ्या चांगल्या सुस्थितीत असलेल्या मुलाला ही तिची भावना माहीत आहे की नाही हे मला माहीत नाही; व त्याला माहीत असेलही. मी माझी सर्व प्राप्ती तिच्याच स्वाधीन शेवटपर्यंत करीत होतो; त्या पैशांचा विनियोग कसा,

किती व का करते हेही मी तिला कधी विचारले नाही. पैशांचा विनियोग ती योग्य तऱ्हेनेच करते, असा माझा अनुभवजन्य विश्वास होता. तरी ती वारंवार म्हणे की, तुमचा पैसा मला नको आहे; परंतु करू काय? तुम्ही मला शिक्षण देऊन स्वावलंबी केले नाही.

आमचा देण्याघेण्याचा सर्व व्यवहार तिच्यावर सोपवला असल्यामुळे कित्येकदा दुकानदारांची देणी वा बाकी देण्यास एकदोन महिने लांबणीवर पडले तर देणी वा बाकी देईपर्यंत तिचे मन स्वस्थ राहात नसे; देणी पुरती दिली की तिचे मन स्वस्थ होई. आमची अनेक चतुर्थ श्रेणीची माणसे किंवा इतरही अनेकदा मोठी रक्कम जवळ बाळगायला नको म्हणून तिच्याकडे सुपुर्द करत. त्या रकमा निरनिराळ्या छोट्या पाकिटांत जपून ठेवी. याबद्दल माझ्याशी बोलताना म्हणे की, मला हा भार वाटतो. परंतु माणसे विश्वास ठेवतात त्यामुळे नाही म्हणवत नाही. ती अकस्मात गेली. जाण्याच्या अगोदर तिने अर्धा तासच अगोदर कपाटाची किल्ली माझ्या हातात ठेवली; व म्हणाली पैसे देऊन टाका. शेवटच्या क्षणार्धापर्यंत भान स्वच्छ होते. शेवटच्या क्षणी 'पाणी' एवढेच शब्द बोलली.

माझी संमती न विचारता किंवा मला न सांगता कोणता खर्च करावा वा न करावा हे तीच ठरवे. एक उदाहरण असे. २२ वर्षांपूर्वी दोन घरे सोडून आमच्या आळीतील केशव सकुंडे एकदम जेवता जेवता वारले. दुपारची वेळ होती. ४-५ तासांनी तिला कळले की, सकुंड्यांचे शव पडून आहे. घरात लहान मुले व बायको होती. ती तडक त्यांच्या घरी गेली. सकुंड्याच्या बायकोजवळ दीडशे रुपये दिले व सांगितले की कोणास सांगू नको. नंतर माणसे आली व अंतक्रिया झाली.

देवदेवता, परलोक, पुनर्जन्म इत्यादींसंबंधी संदर्भ निघाला तर माझा तसा काही विश्वास नाही, असे सांगे. परंतु कथाकीर्तन, भजन यांची तिला खूप गोडी होती. देवदेवतांच्या पूजाअर्चा, भजन, कीर्तन उत्सव इत्यादी प्रसंगी आवश्यक तेथे पुढाकारही घेत असे. कृष्णेच्या घाटावर पाच दिवस चालणाऱ्या उत्सवांची प्रतिवर्षी एक दिवसाची खिरापत तयार करी आणि वर्गणी देत असे; ज्येष्ठ महिन्यात होणाऱ्या दशहरात एक दिवसाचा प्रसाद पाठवीत असे. प्रसाद भरपूर असे. प्राज्ञपाठशाळेत अनेक धार्मिक समारंभ वेळोवेळी होतात. त्यांस लागणारे पूजासाहित्य व प्रसादाचे पदार्थ तयार करण्याचे काम मोठ्या आस्थेने स्वतःवर घेत असे. मात्र हे सर्व करीत असता तिला कोणी विचारत; सतीकाकू तुमचा या गोष्टींवर विश्वास नाही; मग कशाला ही मेहनत करता? तिचे एक ठरावीक उत्तर मिळे: मला असे करण्यात आनंद वाटतो.

शकुन-अपशकुनांवर तिचा विश्वास मुळीच नव्हता. उदा. घुबड हा पक्षी हिंदुंना अपशकुनी वाटतो; तिला तो पाहण्यास खूप आवडत असे. मी राहतो त्या वाड्याच्या चांदयीच्या विवरांमध्ये अनेक पारवे बसतात, त्याप्रमाणे एखादे वेळी घुबडही येऊन बसते. गेली ३-४ वर्षे घुबडाचे जोडपे येऊन बसले, हे तिच्या नजरेस आले व रोज संध्याकाळी व

सकाळी ती त्याच्याकडे कौतुकाने पाहू लागली. त्या पक्ष्याचे डोळे, शांत बैठक व पंखांचा विस्तार मनात भरला. जो आमच्याकडे येईल त्याचे त्या पक्ष्याकडे लक्ष वेधीत असे. चि. सौ. मालती अमेरिकेतून २-३ वेळा या सुमारास आली तेव्हा तिला या घुबडाच्या जोडप्याचे फोटो काढावयास सांगितले, फोटो निघाले की नाही, हे मात्र मला माहीत नाही. एकदा एक घुबडाचे पिल्लू सकाळी १० च्या सुमारास आमच्या अंगणातील वेलाच्या मंडपावर तिला दिसले; तेथे अडकून फडफडत होते; लगेच तिने त्याला युक्तीने मोकळे केले. लोक तिला सांगू लागले की, काकू घुबड अशुभ असते. त्यावर तिने सांगितले की, ही खोटी समजूत आहे.

सकेशा विधवेने केलेला स्वयंपाक धार्मिक कार्यात चालत नाही; अशी भावना जुन्या पुराण्या मंडळींची असते. गेल्या ९ तारखेस म्हणजे तिच्या देहांताच्या तीन दिवसांपूर्वी ती तिच्या मुलीच्या सासरी म्हणजे वाईजवळ असलेल्या केंजळ या गावी श्राद्धानिमित्त गेली होती. ९० वर्षांचे वृद्ध श्री. नाना कुलकर्णी यांच्या मातुःश्रीचे श्राद्ध होते. आमची कन्या सौ. चि. मालतीने तिला विचारले की, या इंदिराबाईच्या हातचा सैपाक नानांना आज चालणार नाही. एखादी विकेश विधवा वा सवाष्ण बाई सैपाकास मिळेल काय? मालतीला झिडकारून सत्यवतीने सांगितले की, काय तरी विचारते. इंदिराबाईंचा सैपाक स्वच्छ व चांगला असतो. न चालायला काय झाले? आपण अशा खुळ्या कल्पनांना थारा कशाला द्यावा?

माझ्या घरात परंपरागत देव्हाऱ्यातील अनेक प्रकारच्या मूर्तींचा संच होता. १९२९ पर्यंत मी नित्यनेमाने सकाळी संध्यावंदन व देवपूजा करी व दुपारी भोजनापूर्वी पंचमहायज्ञ केल्याशिवाय अन्न ग्रहण करीत नसे. सत्यवती माझ्या संध्यावंदनाची, देवपूजेची व पंचमहायज्ञाची सर्व यथासांग चोख तयारी करून ठेवी. मी १९३० पासून राजकीय आंदोलनात हिंडू लागलो व नित्यकर्मकांड संपले. घरी जेव्हा जेव्हा येई, ८-१५ दिवस राही, तेव्हा प्रातःकाळी ५ वाजता कृष्णेत स्नान करून लगेच अध्ययन, वाचन, व नंतर अध्यापन करी. २ वर्षे देवपूजा न झालेले पारोसे देव राहिले. सत्यवतीने १९३३ मध्ये कृष्णेस महापूर आला असता देवाचा सर्व संच चंडी, गणेश, लंगडा बाळकृष्ण, महाविष्णूचा शाळिग्राम, महादेवाचे बाण, माझ्या कुटुंबात ५-६ पिढ्यांतील सतींचे टाक वगैरे माझ्यापुढे ठेवले व म्हणाली की, आज देवांच्या महापूजेची अपूर्व पर्वणी आली आहे, कृष्णेच्या महापुरात हे सर्व देव सोडून अखेरची महापूजा करा. देवपूजा करायची तर ती नित्यनेमाने करावी, नाहीतर देव पारोसे होतात. त्यावर मी म्हटले, की तू म्हणतेस ते खरे आहे, आता मी केवळ मानसपूजाच करू शकतो, बाकीच्या कार्यांच्या व्यापापुढे मला कसलेही धार्मिक कर्मकांड झेपणार नाही. उत्तम, ती म्हणाली.

१९३३ पासून माझे अखेरपर्यंतचे सहकारी कै. मधुकर शंकर साठे यांना माझ्या कुटुंबात मी सामावून घेतले. सत्याग्रहाच्या चळवळीत ते माझ्याबरोबर होते. सत्यवतीची त्यांच्यावर

अपार माया होती. त्याचे लग्न १९४५ साली झाले. नंतर ते माझ्या शेजारीच निराळा प्रपंच मांडून राहू लागले. ते तडफदार होते. सत्यवतीचा स्वभाव काटेकोरपणे व कडक शिस्तीने सर्व व्यवहार पार पाडावा असा होता. तिच्या स्वभावाला दोन बाजू होत्या. सज्जन व दुर्जन या सर्वांबद्दलच तिला सहानुभूती होती. दुर्जनांना दुरून नमस्कार करी, ज्यांच्याशी आपला स्वभाव जुळत नाही, असे दिसून येई, त्यांच्यापासून ती अलिप्त असे; परंतु त्यांच्या सुखदुःखाच्या प्रसंगी उपस्थित राही. ती खूप अभिमानी होती; परंतु तो अभिमान माझ्या शिवाय दुसऱ्या कोणाच्याही क्वचित लक्षात आला होता. एखाद्याबद्दल कडक शब्दात तीव्र नापसंती माझ्यापाशीच व्यक्त करी; परंतु त्याच एखाद्या प्रसंगी कोणी तशी व्यक्ती अचानक समोर येऊन उभी राहिली तर ती हसतमुखाने त्या व्यक्तीचे स्वागत करीत असे. प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या कोणत्याही पदावर तिची नेमणूक कधी झाली नाही, परंतु मी हजर असो वा गैरहजर असो. विद्यार्थी वसतिगृह, पाठशाळा, छापखाना, नंतर स्थापलेला हातकागद कारखाना, त्याही नंतर स्थापन झालेले मराठी विश्वकोशाचे कार्यालय, अभ्यागत संपादक निवास, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि कामगार या सर्वांच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवीत असे. वेळच्या वेळी उपस्थिती आणि कार्ये चालतात की नाही, यावर तिची बारीक नजर असे. माझ्याशी सगळ्यांचे खरे खोटे गुण-दोष बोलून दाखवी, परंतु मीही तिचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करीत असे. कित्येकदा आमचा मतभेद होई, तेव्हा मला निक्षून सांगे, की तुम्हाला काही गोष्टी मुळीच समजत नाहीत. तुमचा फजितवाडा झाला, तर तुमचा नालाज होईल. तिचा स्वभाव खर्चिक होता. उद्याचे काय? हा प्रश्न गेल्या दहा बारा वर्षांतच उतार वयामुळे तिच्यापुढे उभा राहिला. तरी त्यामुळे ती कधीही अस्वस्थ झाली नाही. ती दृढनिश्चयी होती तशी हळवीही होती. तिच्या स्वभावात खूपच अंतर्विरोध होते; परंतु त्यामुळे कोणालाही कधीही त्याचा उपद्रव झाला नाही.

१९३६ साली महाराष्ट्राच्या हरिजन सेवकसंघाचे अध्यक्ष सपत्नीक सकाळी दहाच्या सुमारास घरी येऊन उतरले. मी परगावी गेलो होतो. प्रथमपासून अभ्यागतांना उतरण्याची भरपूर सोय होती. माझे अनेक सहकारी म्हणजे संस्कृतचे उत्तम पंडित ऋजुस्वभावी विठ्ठलशास्त्री गणेश जोशी, प्रवचनपटू कै. वासुदेवशास्त्री विष्णु कोनकर, कै. बाबाशास्त्री (शं. वि.) लेले, प्रचारक कै. शंकरराव जोशी, कै. मधुकर साठे, स्वातंत्र्यवीर कै. भैयाशास्त्री वाटवे इ. मंडळी आतिथ्यशील होती. हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष माझ्याच निवासात शिरले व उतरले. त्यांच्याबरोबरची ५-६ मंडळी अभ्यागत गृहात उतरली. सर्वांचे सत्यवतीने मनःपूर्वक स्वागत केले आणि सांगितले, की हे घरी नसले तरी संकोच मानू नका. हे हरिजन सेवक आल्याची वार्ता मांग जमातीच्या वस्तीत पोहोचली व त्यातील एक कार्यकर्ताही अतिथींच्या भोजनाचे वेळी उपस्थित झाला. सत्यवतीने ७-८ पाने पाट ठेवून पाने एका ओळीत मांडली. त्या ओळीत अध्यक्षांच्या शेजारी त्यांच्या पत्नीचा पाट मांडला होता.

सर्वांना बसण्याची विनंती केली. अध्यक्षांच्या पत्नीने सत्यवतीची क्षमा मागून सांगितले, की आमच्या घरी अस्पृश्यमंडळी ओसरीपर्यंतच येतात, स्वयंपाकघरात नव्हे. मी माग़ाहून निराळी तुमच्याबरोबर बसेन. सत्यवतीने उत्तर केले, की माझे तुमच्या उलट आहे. सवर्ण व अस्पृश्य हे सवर्णांच्या स्वयंपाकघरात मनात कसलाही किंतु न बाळगता एकत्र भोजन करू लागले तरच हा सामाजिक प्रश्न नीट उलगडेल. नवरी-नवरदेव एकमेकांना घास घालतात; खरे ऐक्य होते.

ही मंडळी दोन दिवस वाईत गाठी-भेटी व सभा घेऊन साताऱ्यास गेली. सत्यवतीच्या मैत्रिणी तिने अनेकदा केलेला पाहुणचार, अनेक वेळा पाहिलेली पाहुण्यांची सरबराई आठवून माझ्या देखत सांगू लागल्या, की तुझी ही सरबराई फार वाढू लागली आहे. आपले उत्पन्न किती आणि खर्च किती? यांचा अदमास घेऊन सत्कार करावयाचा असतो. तुला आता तीन मुले आहेत. त्यांचा काही विचार करशील की नाही? त्यावर तिने उत्तर दिले, की हे असेच चालायचे. मुलांचे नशीब असेल तर त्यांचे शिक्षणही पुरे होईल. माझ्याकडे बोट दाखवून म्हटले, की ह्यांचे संबंध खूप पसरत आहेत. माझ्या घरी बाहेर गावाहून आलेल्या मंडळींचे नुसते तोंडदेखले कोरडे स्वागत केले तर ह्यांच्या कार्याला मर्यादा पडतील. हे काशी कलकत्त्यास जाऊन शिकले, त्या वेळेस त्यांच्यापाशी काय होते? मुलांच्या मध्ये ईर्ष्या असेल तर त्यांचेही शिक्षण पुरे होईल.

१९३७ साली कै. डॉ. वा. गो. परांजपे ह्यांच्या आर्यसंस्कृती मुद्रणालयात धर्मकोशाच्या पहिल्या खंडाच्या छपाईस सुरुवात झाली. वाईस धर्मकोश कार्यालय ठेवून हे काम वेळेवर उरकणार नाही हे लक्षात घेऊन पुण्यास टिळक पथावरील चिमणबागेतील आपटे यांच्या वाड्यात मी माझे बिऱ्हाड केले आणि धर्मकोश कार्यालयही तेथे आणले. वाड्यासमोर चौक होता. आम्ही तळमजल्यावर राहात असू. वरच्या मजल्यावर सुभद्राबाई चव्हाण ह्या कॉलेज तरुणी आपल्या पोलीस ऑफिसर असलेल्या भावाजवळ राहात होत्या. सुभद्राबाईशी हिची मैत्री जमली व ती आतापर्यंत टिकली. माझ्या ह्या पुण्यातील मुक्कामात विविध राजकीय पक्ष, सामाजिक व शैक्षणिक संस्था यांच्याशी घनिष्ठ संबंध निर्माण झाला. मी पुणे येथे असताना राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांचे बौद्धिक वर्ग घेत असे. तेव्हा मी जागतिक क्रांतिकारक व तत्त्वज्ञ एम. एन. रॉय यांच्या विचारसरणीचा व ध्येयवादाचा अंगीकार केला होता. १९३२ सालापासून मी मार्क्सवादाचे अध्ययन करू लागलो होतो, त्याची ही परिणती होय. पुण्यास असताना कै. प्रा. गोवर्धन पारीख, श्री. व. भ. कर्णिक व त्यांचे दोघे बंधू, प्रा. नि. वि. सोहनी, कै. आबासाहेब वाघोलीकर, कै. गोपाळराव खरे इ. मंडळींशी घनिष्ठ परिचय व मैत्री झाली. यातील बहुतेक सर्व मंडळींशी सत्यवतीचाही परिचय झाला होता.

१९३८ पर्यंत माझी वेषभूषा एखाद्या शांकरमठातील शास्त्राध्यापकाप्रमाणे होती, परंतु पगडी, पागोटे, टोपी, अंगरखा, सदरा अशासारखा वेष नव्हता. डोक्यावर शेंडी, खांद्यावर

उपरणे, कमरेस धोतर व पायात वहाणा असा होता. माझी राजकीय विचारसरणी अत्यंत आधुनिक व क्रांतिवादी व राहणी पुराणमतवादी. एम. एन. रॉय व त्यांच्या पत्नी एलन रॉय हे या वेळी पुणे येथील मुक्कामात माझे पाहुणे होते. भारत सेवक संघाच्या डेक्कन जिमखान्यावरील इमारतींपकी एका लहानशा इमारतीत मी त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली होती. या मुक्कामात त्यांना मी माझ्याकडे दुपारी भोजनास बोलाविले. त्यांच्या बरोबर इतर ७-८ मित्रांनाही बोलाविले होते. सत्यवतीने श्रीखंड पुरीचा बेत केला होता. रॉय पतिपत्नीचे स्वागत आम्ही दोघांनी केले. पाट मांडून पात्रांभोवती रांगोळ्या काढून पंगत मांडली. बैठकीच्या दालनात गाद्या व लोड तक्ये लावले होते. जेवण झाल्यावर पानदानाभोवती मंडळी बसली. बातचीत इंग्लिशमध्ये चालली होती. एम. एन. रॉय सहज म्हणाले, की आपल्या शास्त्रीजींची ही साधी बावळी राहणी पाहून शास्त्रीजींची पत्नी कशी असेल याची मी जी कल्पना केली होती ती निराळीच होती. शास्त्रीजींना कशी सुरेख बायको मिळाली आहे. माझे मित्र डॉ. र. भ. कर्णिक थट्टेच्या सुरात म्हणाले- सुंदर स्त्रीला खूश कसे करावे याचे शास्त्र शास्त्रीजींना धर्मशास्त्रापेक्षा अधिक अवगत आहे. मंडळींत हशा पिकला. पाहुणे मंडळी गेल्यावर सत्यवतीने मला विचारले, की एकदम हशा का पिकला? मी उत्तर दिले की मंडळी तुझ्याबद्दलच बोलत होती. तू सुरेख आहेस हे मला त्यामुळे प्रथमच पटले. 'बायकांबद्दल अशी चर्चा करायची नसते.' सत्यवती म्हणाली. तिचा गैरसमज नाहीसा करण्याकरता मी म्हणालो, पश्चिमी देशांत चांगली बडदास्त ठेवणाऱ्या यजमानाच्या पत्नीची अशी स्तुती करून आभार मानण्याची पद्धती आहे.

या पुण्याच्या आमच्या मुक्कामात एक विलक्षण प्रसंग माझ्यावर गुदरला. एका सशस्त्र क्रांतिकारक गटाशी माझा संबंध आहे असा वहीम येऊन पोलिसांनी माझ्या या निवासस्थानावर धाड घातली होती. त्याची थोडक्यात हकिकत अशी: सशस्त्र क्रांतिकारक व अकोल्याच्या राष्ट्रीय शिक्षण शाळेचे संस्थापक कै. बापुसाहेब सहस्रबुद्धे हे सेनापती बापट व क्रांतिवीर सावरकर यांचे अनुयायी होते. ते १९१७ साली प्राज्ञपाठशाळेत अनेक क्रांतिकारक वेदांती बनले होते, त्यांच्याच पैकी हे एक होत. त्या वेळपासून अनेक वर्षे क्रांतिकारक तरुण मिळविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न सुरू होता. अकोल्यास असतानाही प्राज्ञपाठशाळेशी त्यांनी संपर्क ठेवला होता. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद यांचे षड्यंत्र प्राज्ञपाठशाळेपर्यंत पसरले होते. आमच्यातील भैय्याशास्त्री वाटवे, कै. श्रीराम सावरगावकर इ. तरुण त्यात सामील झाले होते. श्रीराम सावरगावकरांवर सत्यवतीची खूप माया होती. माझ्या ज्येष्ठ पुत्राचे मधुकर हे नामकरण श्रीरामने केले. श्रीराम राजगुरूंबरोबर पुणे येथे पकडला गेला. लाहोरच्या तुरुंगात दोन वर्षे होता, परंतु त्याला इतरांबरोबर देहान्त शिक्षा होऊ शकली नाही. याचे कारण तो कोण, कुठला इ. माहिती पोलिसांना मिळू शकली नाही. माहिती मिळवण्याकरिता पोलिसाने त्याला लाहोरच्या जेलमध्ये खूप मारझोड वारंवार

केली. परंतु त्याच्या तोंडून माहिती मिळू शकली नाही. राजगुरूंना श्रीराम व भैयाशास्त्री वाईस प्राज्ञपाठशाळेत गुप्तपणे लपवून ठेवणार होते. ही हकिगत मुंबईतील प्राज्ञपाठशाळा मंडळाशी गेली ६० वर्षे संबंधित असलेले ज्येष्ठ वृत्तपत्रकार श्रीपाद शंकर नवरे यांना माहीत आहे.

१९३६ मध्ये बापूसाहेब सहस्रबुद्धे यांनी निर्माण केलेल्या षड्यंत्राचा सदस्य असलेला अकोटचा राजाराम व्यास १९३७ च्या मार्चमध्ये माझ्यापाशी येऊन राहिला. बापूसाहेबांनी त्याला माझ्याकडे आश्रयास पाठविले होते. मी त्याला सदाशिव पेठेतील नातूबागेत एका झोपडीवजा जागेत ठेवले होते. सत्यवतीकडे येऊन एखाद्या वेळी तो जेवून जाई किंवा अडीअडचणीच्या वेळी पैसे घेऊन जाई. मधुकर साठेही या कटात सामील होते. वऱ्हाडमध्ये पोलीस खात्याला या कटाचा सुगावा लागला. ह्या संबंधात मुंबईचे कामगार कार्यकर्ते अ. बा. फाटक व व्यास यांना अटक झाली. अनेक पोलीस ऑफिसरांनी ऑगस्टमध्ये एके दिवशी दुपारी दोन वाजता माझ्या पुण्याच्या निवासस्थानावर अचानक धाड घातली. शस्त्रास्त्रे व कागदपत्रे त्यांना शोधायची होती, कारण अकोले व अकोट येथे सापडलेल्या कागदपत्रांमध्ये माझ्या नावाचा उल्लेख होता. माझ्या निवासस्थानाची दोन तास झडती चालली होती; परंतु काहीही सापडले नाही. निराश झालेले पोलीस अधिकारी नंतर माझ्याशी उर्मटपणे व धाकदपटशा दाखवून बोलू लागले. माझ्या शेजारी सत्यवती अचल व शांतपणे ऐकत उभी होती. तिने आपल्या ओच्यामधून एक पत्र काढून पोलीस अधिकाऱ्यांना वाचावयास दिले व ते अधिकारी सर्द झाले. पत्र त्या वेळचे मुंबईचे प्रधानमंत्री बाळासाहेब खेर यांचे होते. त्यात त्यांनी माझ्या धर्मकोशकार्याची प्रशंसा करून पाहुणचाराबद्दल आभार मानले होते. अधिकारी लागलीच उठले व नम्रपणे माझा निरोप घेऊन निघू लागले. मी सत्यवतीस म्हटले, यांना चहा दे. तिने उत्तर दिले, की या वेळी नाही. पुढच्या वेळी जर ते आले म्हणजे त्यांचा सत्कार जरूर करीन. दुसऱ्या दिवशी या धाडीचा वृत्तान्त पुण्याच्या दैनिकांमध्ये जाड ओळींमध्ये प्रसिद्ध झाला.

कठीण प्रसंगी ती यत्किंचितही डगमगली नाही. याची पुष्कळ उदाहरणे आहेत. १९३३ साली ऑक्टोबरमध्ये आम्ही गंगापुरीच्या घाटावरील भानूंच्या वाड्यात दक्षिण भागात राहात होतो. एका क्रांतिकारक षड्यंत्राचे सदस्य कै. जनार्दन बापट हे माझ्याकडे संध्याकाळी आले. दुसऱ्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास माझ्या बैठकीच्या पहिल्या मजल्यावरील दालनात आम्ही दोघे त्या षड्यंत्राच्या संबंधात चर्चा करीत बसलो. त्यांच्यापाशी एक जर्मन मॉसर पिस्तुल होते. ते त्यांनी मला दाखविले आणि नंतर मी ज्या खुर्चीवर बसलो होतो, त्या खुर्चीसमोर ४-५ फुटावर खुर्ची ठेवून त्यांनी पिस्तुल साफ करण्याकरिता सुरुवात केली. ते पिस्तुल ९ बारी होते. त्यांना वाटले, की त्याचे चेंबर मोकळे आहे. साफ करण्याकरिता त्यांनी चाप ओढला दणदिशी भडका उडाला, आणि त्यातून सट्दिशी गोळी बाहेर पडून

माझ्या रोखाने कमरेच्या अगदी जवळून गेली. माझ्या धोतराच्या निरीमध्ये पैशाचे पाकीट होते. बार उठाल्याबरोबर मी दचकलो. पाकिटाचे टोक माझ्या बेंबीखाली रुतले. मला वाटले की, ते काडतूस माझ्या अंगात शिरले. बापट अत्यंत गर्भगळित होऊन अवाक झाले. मी त्यांना तत्क्षणी सांगितले, की तळमजल्यावरील स्वयंपाक घरातून सत्यवतीला घेऊन या, मला अखेरची भेट घेऊ द्या. बापट जिन्याकडे जाऊ लागले आणि माझ्या लगेच लक्षात आले, की गोळी अंगात गेली नसावी; म्हणून मी जमिनीकडे पाहिले. माझ्या खुर्चीच्या उजव्या पायाशी भगदाड पडलेले दिसले आणि बापटांना परत बोलाविले. मी खाली पाहिले ती गोळी विटेत शिरलेली दिसली. मी बापटांचे सांत्वन केले व स्वयंपाक घरात जाऊन ओढवलेल्या प्रसंगाची तिला माहिती दिली. ती तडाख्याने माडीवर आली आणि बापटांना तिने सांगितले, की आबांचा, तुमच्या ह्या भानगडीशी काही संबंध नाही, हे लक्षात घेऊन तुम्ही ह्यापुढे कोणीही शस्त्रे आमच्याकडे घेऊन यावयाचे नाही. आणि तुमच्या कटासंबंधी ह्यांच्याशी चर्चा करावयाची नाही हे तुमच्यातले नाहीत, अशी माझी खात्री आहे. इतके बोलल्यानंतर बापटांना म्हणाली, झाले ते झाले. स्वयंपाक तयार आहे जेवून जा. तुमचे दुसरे सहकारी ग. र. वैशंपायन हेही माझ्या चांगल्या ओळखीचे आहेत. त्यांनाही माझा हा निरोप सांगा. पिस्तुलाचा दणका मोठा होता. जवळच घाटावर सत्यवतीच्या ओळखीच्या काही महिला धुणी धूत होत्या. त्या १५ मिनिटांत सत्यवतीकडे आल्या व म्हणाल्या की तुमच्या इमारतीकडून बार ऐकू आला असे आम्हांस वाटले. जवळच्या वड पिंपळांवरील पक्षी उडाले व सर्व बाजूंनी वेगाने पळाले. तुम्ही बार नाही का ऐकला? सत्यवती म्हणाली, येथे स्वयंपाक करताना मोठा आवाज ऐकला परंतु कुठून आला हे कळले नाही.

१९४० साली प्राज्ञपाठशाळा मंडळाने वाईत नवा छापखाना धर्मकोशाच्या छपाईकरिता स्थापला. आमचे पुण्याचे बिऱ्हाड धर्मकोश कार्यालयासह पुन्हा वाईस आले. कै. मधुकर शंकर साठे यांची या छापखान्याचे व्यवस्थापक म्हणून आम्ही नेमणूक केली. प्राज्ञपाठशाळा मंडळाचे चिटणीस व संस्कृतचे उत्तम शिक्षक म्हणून श्री. विठ्ठलशास्त्री जोशी आपली सर्व कर्तव्ये चोख रीतीने पार पाडीत. आमची संस्कृतची पाठशाळा त्या वेळी भरभराटीस होती. विद्यार्थी वसतिगृहही चांगले चालले होते. दुसऱ्या महायुद्धात आणि त्यानंतर अनेक वर्षे विद्यार्थ्यांना लागणारे अन्नधान्यादी सामान रेशनच्या दुकानातच घ्यावे लागे. पुष्कळ वेळा या दुकानांवर वाईट किंवा घाणेरडा माल मिळायचा. आणलेले सामान सत्यवती नीट तपासून ठेवीत असे. वाईट धान्य असले, तर स्वतःच्या खाजगी कोठीतील चांगली ज्वारी, गहू, बाजरी, तांदूळ यांची भरती करीत असे, आणि वाईट असलेल्या मालाचा कोणत्यातरी मार्गाने निकाल लावी. कित्येकदा स्वतःच्या खाजगी कोठीतील माल थोडा किंवा असला तर साठवून ठेवलेले बटाटे, रताळी यांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या अन्नाची पूर्ती करीत असे. आमच्या खाजगी कोठीतील चांगली अन्नधान्ये ही आम्ही अन्य मार्गाने मिळवत

होतो. मी धर्मकोशाचा संपादक, मला आपत्काली आत्मरक्षण अशा कोणत्याही मार्गाने करावे याचे शास्त्र माहीत होते.

१९४६ ते १९५७ च्या कालखंडात माझा ज्येष्ठ पुत्र मधुकर व सौ. सुमन व सौ. मालती ह्या दोन कन्या यांचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाले. त्यांना मी पुणे येथील क्रमाने फर्ग्युसन महाविद्यालय, सर परशुरामभाऊ महाविद्यालय आणि महिला महाविद्यालय यांच्या वसतिगृहात ठेवले होते. असे ठेवण्याच्या अगोदर माझ्या मनात आले होते की एकट्या ज्येष्ठ पुत्राचे उच्च शिक्षण पुरे करावे आणि सुमन व मालती यांचे शालान्त परीक्षेनंतर शिक्षण बंद करावे. कारण आर्थिक परिस्थिती जेमतेम होती. महाविद्यालयातील तिघांच्या शिक्षणाचा खर्च परवडणे अशक्य होते. माझा हा विचार सत्यवतीस सांगितला तेव्हा ती माझ्यावर एकदम भडकली. कर्ज काढा, वाटेल ते करा परंतु मुलींचे उच्च शिक्षण झालेच पाहिजे. मी मुळापासून कर्ज काढण्याच्या अगदी विरुद्ध. मी विवंचनेत पडलो. माझी विवंचना वडील बंधू ती. अण्णा (वेणीमाधवशास्त्री जोशी) यांच्या लक्षात आली. मला पेचप्रसंगातून सोडवण्याकरिता एकदम निर्णय घेतला. पिंपळनेर येथील आमचे घर विकायचे आणि मुलांच्या शिक्षणाकरिता तो पैसा खर्च करायचा. घर विकले, परंतु बंधूंनी आपला अर्धा वाटा घेतला नाही.

१९४६ सालच्या निवडणुकीत रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीतर्फे विठ्ठलराव जगताप हे माझ्या पक्षाचे उमेदवार म्हणून उभे राहिले. त्या वेळी काँग्रेस पक्ष अत्यंत जबरदस्त होता. माझ्या सभा बहुतेक ठिकाणी उधळल्या जात. सातारा शहराजवळील अनेवाडीच्या बाजारात सभा भरविण्याकरिता शिरल्याबरोबर दगड-माती, शेण यांचा मारा सुरू झाला. तेथे सभा करणे अशक्य दिसल्यावर वाई तालुक्यातील हुमगाव खोऱ्यात सभा भरविण्याकरिता माझी मोटार शिरली. हुमगावपर्यंत गेलो. तेथील काही नागरिकांना एका मित्राच्या घरी बोलावून चर्चा केली आणि माझी मोटार परतू लागली. रस्त्यावरील कोणत्याही खेड्यात शिरल्याबरोबर शेण-मातीचा मारा सोसावा लागत असे. त्यानंतर २ दिवसांनी सातारा येथील राजवाड्यासमोर सभा घेतली. त्या सभेतही १५ ते २० मिनिटांच्या अवधीत आरडाओरडा सुरू झाला. दुरून लगोरीने मारा सुरू झाला. बसता बसता मी वाक्य बोललो : महात्मा गांधींच्या अहिंसेचे सुरेख आचरण माझे काँग्रेसवाले मित्र करीत आहेत. एवढे वाक्य बोलून खाली बसतो तोच काँग्रेसच्या युवक पथकाने मला घेरले आणि लाथा बुक्क्यांनी माझा समाचार घेऊ लागले. पथकपती तुषार पवार हे माझ्या राजकीय अभ्यासवर्गास उपस्थित रहात. त्यांनी युवकांना कसेबसे बाजूला केले व माझ्यावर चिडलेल्या जमावापासून माझा बचाव करण्याकरिता एका जवळच्या दुकानात मला दडविले. रात्री अकराच्या सुमारास मी वाईस घरी परतलो. सत्यवतीला सर्व वृत्त सांगितले. वेदनाशामक तेलाने माझे अंग हळूहळू चेपले. गरम पाण्याने आंघोळ घातली आणि सांगितले की, जनता एवढी विरुद्ध आहे आणि

तुमच्या भाषणाने त्यांचे डोके फिरते, तर भाषण न करणे योग्य होय. ऐकू इच्छित असेल त्यालाच सांगावे. अशा बाबतीत हेकेखोरपणा करू नये. मी म्हटले, बरोबर आहे. अति सर्वत्र वर्जयेत्.

१९५२ मध्ये भारताच्या उत्कृष्ट लोकशाही संविधानाप्रमाणे निवडणुका झाल्या. माझा रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्ष माझ्याच अध्यक्षतेखाली चार वर्षांपूर्वी विसर्जित झाला होता. काँग्रेसने भारतास उत्तम लोकशाही संविधान प्राप्त करून दिले, म्हणून मला काँग्रेसबद्दल आपुलकी वाटू लागली. श्री. यशवंतराव चव्हाण हे माझे १९३० सालापासूनचे मित्र, त्यांच्या निवडणुकीमध्ये मी त्यांच्या बाजूने प्रचार केला. स्वामी केवलानंद सरस्वती यांचे मित्र पुणे, लॉ कॉलेजचे संस्थापक कै. ज. र. घारपुरे यांच्या प्रयत्नांनी मला १९५० पासून १९५४ पर्यन्त पुणे विद्यापीठातर्फे ओळीने चार वर्षे इचलकरंजीकर व्याख्यानमालेत चार व्याख्यानमाला गोवण्याची संधी मिळाली. या सुमारास स्वामी केवलानंद सरस्वती ह्यांनी सत्तरी ओलांडिली होती. त्यांचा शरीरबांधा भक्कम होता, तरी जरेची कळा दिसू लागली होती. १९४९ साली स्वामींचे एक शिष्य गंगाधरशास्त्री सोहनी हे एकदम हृदयविकार होऊन वारले. काही वर्षे स्वामीजी त्यांच्याकडेच भोजनभिक्षा घेत होते. गंगाधरशास्त्री वारल्यावर सत्यवती म्हणाली, की स्वामीजींना आपण आपल्या घरीच भोजनभिक्षा देऊ. माझे थोर विद्वान मित्र प्रा. न. र. फाटक हे दरवर्षी आश्विन महिन्यात प्राज्ञपाठशाळेच्या वार्षिक सरस्वती उत्सवाकरिता वाईस येत असत. त्यांना बरोबर घेऊन मी स्वामीजींकडे गेलो. प्रणिपात करून आम्ही दोघांनी त्यांची प्रार्थना केली, की आपण यापुढे माझ्याकडेच भोजनभिक्षा घ्यावी. त्यांचे व्रत फार कडक होते. वयाच्या बावीस वर्षांपासून त्यांनी ते चालविले होते. त्यामुळे कोणी काहीही देऊ केले तर प्रथम ते 'कशाला?' असे म्हणून सौम्यपणे नकार देत. तसाच नकार त्यांनी मलाही दिला. मी पुढे म्हटले की, ही माझी विनंती म्हणजे सत्यवतीची विनंती आहे. हे ऐकल्याबरोबरच त्यांनी होकार दिला.

१ मार्च, १९५५ ला समाधी घेईपर्यंत स्वामींचे भोजन माझ्या घरीच व्हावयाचे, सत्यवतीला माझ्याबरोबर प्रवास करण्याची फार हौस होती. पण ती हौस मी तोपर्यंत पुरी करू शकलो नव्हतो. वर्षातले ४-६ महिने गेली ४५ वर्षे मी प्रवासीच आहे. स्वामी होते तोपर्यंत तिने माझ्याबरोवर एकदाही प्रवास केला नाही. १९५५ जानेवारीत स्वामींना हृदयविकार उद्भवला. तोपर्यंत स्वामी गंगापुरीच्या कृष्णाघाटावरील एका लहानशा मठात म्हणजे मारुतीच्या छोट्या मंदिराच्या वरच्या मजल्यावर राहात होते. हृदयविकार उद्भवल्यावर त्याच दिवशी सत्यवतीने आग्रह करून आमच्या लगतच्या प्राज्ञपाठशाळेच्या इमारतीत राहण्याचा त्यांना आग्रह केला व ते तेथेच समाधिस्थ झाले. उषा साठे इ. सहकारिणींसह स्वामींच्या शुश्रूषेकरिता ती रात्रंदिवस झटली. घरकाम उरकल्याबरोबर स्वामींच्या सन्निध निरंतर बसून राही. १९६० साली डिसेंबरमध्ये मुंबई मंत्रालयात महाराष्ट्र राज्य साहित्य

संस्कृती मंडळाची आणि १९६२ साली वाई येथे केवलानंद स्मारक मंदिरात मराठी विश्वकोश कार्यालयाची स्थापना झाली. प्राजपाठशाळा मंडळाच्या दोन इमारतीत अभ्यागत संपादकांच्या राहण्याची व भोजनाची सोय केली. उषा साठेने वरील गृह चालविण्याची जबाबदारी स्वीकारली. सत्यवतीने शेवटपर्यंत अभ्यागत संपादकांच्या सकाळ दुपारच्या चहाची व्यवस्था ठेवली. सत्यवतीला अभ्यागत संपादकांच्या स्वास्थ्याची खूप काळजी होती. कारण त्यातील बरेचसे उतारवयाचे. त्यांच्या गरजा समजून घेई आणि शक्य ती मदत त्वरित पोहोचवीत असे. एखाद्या अभ्यागताची प्रकृती ठीक नाही असे कळल्याबरोबर त्यांच्याकरिता जे काही करता येईल ते करण्यास ती कधीही चुकली नाही. याचे प्रत्यंतर माझ्या ७५ व्या वर्षाच्या अमृतमहोत्सवात मिळाले. फार आवर्जून तिच्याबद्दल अनेकांनी लिहिले आहे व अनेक अमृत महोत्सवाच्या सभांमध्ये बोललेही आहेत. तिला श्रद्धांजली वाहणारी अभ्यागतांची आणि अन्य संबंधितांची शेकडो पत्रे आली आहेत व येत आहेत. त्यात काहींनी उदा. कलकत्ता महाग्रंथालयाच्या ना. बा. मराठे यांनी तिला आई म्हणून व काहींनी उदा. दापोलीचे बाबा फाटक यांनी भगिनी म्हणून निर्देशिले आहे. यशवंतराव चव्हाणांनी वहिनी म्हणून आदराने उल्लेखिले आहे. यशवंतराव चव्हाणांच्या दिल्ली येथील निवासस्थानी आम्ही दोघे अनेकदा एकेक आठवडा राहिलो होतो. त्यात सौ. वेणूताईंशी तिचा घनिष्ठ परिचय झाला. त्यांच्या येथे दिल्लीच्या निवासस्थानी एक मुसलमान जमातीचा माणूस स्वयंपाकी म्हणून सहकुटुंब राहतो. त्याच्याही मुलांबद्दल तिला जिव्हाळा निर्माण झाला होता. गेली २-३ वर्षे कित्येकदा यशवंतरावांचे व माझे राजकीय मतभेद झाले. माझ्या घरी वारंवार येणारे काही मित्र यशवंतरावांवर टीका करू लागले, म्हणजे त्यांना ती बजावून सांगे, की माझ्या घरात यशवंतरावांवर तुम्ही टीका करता, हे मला मुळीच सहन होत नाही. त्यांचे व ह्यांचे काहीही मतभेद असले तरी ते आमचेच आहेत.

वाईतील सर्व धर्मांच्या आणि सर्व जाति-जमातींच्या शेकडो कुटुंबांशी तिची आपुलकी होती. याची कल्पना ती या जगातून जाईपर्यंत मला फारशी आली नव्हती. मला एवढेच माहीत होते, की बौद्ध, मुसलमान, ख्रिश्चन किंवा सवर्ण हिंदू यांच्या कुटुंबीयांशी अनेक प्रसंगांनी तिचा परिचय झाला होता. त्यांच्या विवाहादी अनेक समारंभांस ती वारंवार जाते, हेही मला माहीत होते. त्यांचे व त्यांच्या मुलामुलींचे काही महत्त्वाचे प्रश्न सोडविण्याकरता त्यातील बरीचशी मंडळी अगोदर तिला भेटत आणि मग त्यांना घेऊन ती माझ्याकडे येई. उदा., वाई गावाच्या वायव्य कोनावर १०-१५ घरांची बौद्ध वस्ती आहे. त्या वस्तीतील एक मध्यमवयीन महिला वाई महाविद्यालयात शिकणाऱ्या शिवाजी जगताप या मुलास घेऊन आली. ती म्हणाली, माझ्या झोपडीत या मुलास अभ्यासाकरिता निवांत जागा नाही, तर काय करू? सत्यवतीने लगेच मी राहतो त्या इमारतीतील माडीवरील एका मोकळ्या दालनात राहण्याची व्यवस्था करून दिली. तो आपल्या घरी जेवत होता. संध्याकाळी

अभ्यास करून तेथेच झोपत असे. सकाळी आमच्या जागेत स्नान करून महाविद्यालयास जाई. माझ्या घरी तिला हाताशी मदत करणारी बाई पाहिजे होती. येथून दीड मैल असलेल्या मेणवलीची मध्यमवयीन बौद्ध महिला सावित्री तिला पसंत पडली. सावित्री ही गेली १८ वर्षे तिच्या देखरेखीखाली आमच्या स्वयंपाकघरातील अनेक प्रकारची कामे करते. झाडणे, भांडी विसळणे, पाणी भरणे, भाजी निवडणे व चिरणे, जरूर पडल्यास स्वयंपाकास मदत करणे अशा प्रकारची कामे करते. तीन महिन्यांपूर्वी न्हावी जमातीतील माझ्या एका मित्राच्या घरी मेणवली येथे लग्न सोहळा झाला. त्यात भोजनाच्या अनेक पंक्ती उठल्या. निरनिराळ्या जातिजमातीचे लोक, स्त्रिया-पुरुष-मुले एका पंक्तीत जेवत होती. आम्ही आमच्या मित्राच्या लहानशा जागेत थांबलो होतो. सत्यवती मला म्हणाली की, आपण पंक्तीत फेऱ्या मारून येऊ. आम्ही बरोबर सावित्रीला घेतले, फेरी मारून आलो. नंतर तिने सावित्रीला विचारले, की मराठे, माळी, धनगर, चांभार, बौद्ध, मुसलमान इ. सर्व जमातींतील मंडळी पंक्तिभेद न करता बसली होती, असे मला वाटले तुला कोण कोठे बसले हे लक्षात आले असेल. पंक्तिभेद न करता सगळे बसले हे लक्षात आले असेल. पंक्तिभेद न करता सगळे बसले होते ना? सावित्री म्हणाली, होय. माझ्याकडे पाहून सत्यवती म्हणाली, आपल्या वाई तालुक्याची परिस्थिती चांगली आहे असे म्हणावे लागते.

स्वत: वरच्या अत्यंत कठीण प्रसंगी सत्यवतीचा धीर कधीही सुटलेला दिसला नाही. तिचे वडील वासुदेवबुवा तिच्या लग्नानंतर चार वर्षांत वैकुंठवासी झाले. तिच्या मातोश्री पंधरा वर्षांपूर्वी निवर्तल्या. गेल्या दहा वर्षांत तिचा एक भाऊ व दोन बहिणी स्वर्गवासी झाल्या. या प्रत्येक प्रसंगी तिने आक्रोश केला नाही. हुंदके दिले नाहीत, डोळ्यांतले अश्रू आणि स्फुंदन एवढाच दु:खाचा मूक आविष्कारही सर्वांनी पाहिला. परंतु अन्य दु:खितांचे हुंदके आणि आक्रोश पाहून तिला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटत असे. मृत्यू हा अपरिहार्य आहे, याची उत्कट जाणीव तिला होती आणि असे प्रसंग पडले म्हणजे ही अशी जाणीव ती व्यक्त करीत असे.

तिच्या अंत्यसंस्कारांचे धार्मिक कर्मकांड तिच्या कनिष्ठ पुत्राने केले. कारण धर्मशास्त्राप्रमाणे पुत्र हाच मुख्य अधिकारी होय. या प्रसंगी धार्मिक कर्मकांड करावे की नाही याबद्दल खूप भवति न भवति झाली आमची ज्येष्ठ कन्या प्रा. चि. सौ. सुमन खंडकर हिने व आमच्या परिवारातील सहकारिणी उषा साठे यांनी मला सांगितले की, अंत्यसंस्कार किंवा कोणतेही धार्मिक कर्मकांड यावर सत्यवतीचा विश्वास नव्हता. परंतु त्या उलटही तिच्या बाबतीतली अनेक उदाहरणे सांगण्यात आली. उदा. वाईतील कृष्णेच्या उत्सवाच्या प्रसंगी कृष्णेची पालखी आमच्या दारावरून रात्री दोनच्या सुमारास जाते. दोनपर्यंत जागून ती कृष्णाबाईची ओटी भरत असे. अनेक सौभाग्यवती स्त्रियांचे अंत्यसंस्कार कसे करावे हे ती तपशीलवार सांगत होती. उदा. आमचे मित्र पुण्याचे दत्तात्रयशास्त्री तांबे यांच्या

पत्नी लक्ष्मीबाई नुकत्याच ९ ऑगस्टला निवर्तल्या. तेव्हा तांबेशास्त्री यांच्याकडे जाऊन सत्यवतीने धार्मिक संस्कार करावे याचा तपशीलवार कार्यक्रम सांगितला आणि स्वत: आपण उपस्थित राहून लक्ष्मीबाईंच्या दहाव्या दिवशी करावयाच्या संस्कारांचे मार्गदर्शन करीन, असे आश्वासन ती दि. ११ ला देऊन आली. परंतु दि. १२ लाच ती स्वर्गवासी झाली. चि. वासुदेव मृत्यूनंतरचे धार्मिक संस्कार करीत आहे.

सती! दिनांक १२ ऑगस्टला संध्याकाळी तुझा देहान्त व दि. १३ ला सकाळी १० वाजता अग्निसंस्कार हे मी वेदनांनी भरलेल्या डोळ्यांनी पाहिले, तरी तू अनंत काल टिकणारे मौन धरून स्थिरावली आहेस, असे वाटते. परंतु आपल्या घरातील ज्या ज्या ठिकाणी बागेत फुलझाडांची निगा करण्याकरिता इकडे तिकडे वावरत, बोलत, विश्रांती घेत, काम करत, स्नान करून वस्त्र नेसत दिसत होतीस, तेथे तू कुठेही दिसत नाहीस. तू आहेसच असे सारखे वाटते परंतु कोठेही दिसत मात्र नाहीस. तू आहेस याचा काय अर्थ हेही सांगता येत नाही. असा हा अनुभव मला येतो, तसाच प्रियेचा चिरविरह झालेल्या इतरांना येतो काय? मला माहीत नाही. का माहीत नसावा? सर्व धर्म सांगतात की देहान्तानंतर आत्मा राहतोच; आत्मा अमर असतो. माणूस या पृथ्वीवर अस्तित्वात येऊन वस्ती करू लागला तेव्हापासूनच माणसाला माणसाचे व्यक्तितत्त्व (= आत्मा) मरत नाही, असे वाटते. मी तर भौतिकवादी नास्तिक; मला असे वाटू नये; पण वाटतेच. माझ्यावर लहानपणापासूनच वेद, उपनिषदे, भगवद्गीता, भागवत इत्यादिकांच्या विचारांचा आणि आध्यात्मिक काव्याचा सतत संस्कार झाला आहे, त्याउलट भौतिकवाद व वैज्ञानिक विचारपद्धती यांचाही गेली ६० वर्षे माझ्यावर संस्कार झाला आहे. त्यामुळे तुला सूक्ष्म शरीरही नाही. तरी तू आहेसच, असा एक प्रकारचा निर्विकल्पक अनुभव येत आहे. हा साक्षात्कार म्हणावा की विरहवेदनेमुळे जाणिवेच्या स्तरावर तरंगत राहणारा पूर्वीचा संस्कार म्हणावा? मरणोत्तर अस्तित्व सिद्ध करण्यास कसलेही प्रमाण नाही; असे मी ३५ वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'जडवाद' या पुस्तकात सयुक्तिक मांडले आहे. मरणोत्तर आत्मा आहे, असे म्हणणारे भ्रमात राहतात; असे म्हणणारी काही माणसे वेदकालापासून आतापर्यंत झालेली दिसतात. त्या माणसांमध्ये बृहस्पती, चार्वाक, विरोचन असुर (छांदोग्य उपनिषद), कर्णिक भरद्वाज (कौटिलीय अर्थशास्त्र व महाभारत), भादुरी (व्याकरण महाभाष्य) अजित केशकंबळी (त्रिपिटक) इत्यादी तत्त्वज्ञ अतिप्राचीन काळी, भारतात आणि ग्रीस, रोम इत्यादी देशात होऊन गेले. अलीकडे युरोप, अमेरिका, इत्यादी पश्चिमी देशात व भारतात गेल्या दोनशे वर्षांच्यापेक्षा अधिक कालावधीत होत आहेत. त्यात शाश्वत नीतितत्त्वांचे समर्थन करणारे मानवतावादी पुष्कळच आहेत. भारतात पं. के. ल. दप्तरी, प्रज्ञानेश्वर यती, यांच्यासारखे संत व स्वातंत्र्यवीर विनायकराव सावरकर, एम. एन. रॉय, अनेक मार्क्सवादी व मानवतावादी दिसतात. जडवादी वा भौतिकवादी हे केवळ स्वार्थी व इंद्रियांच्या भोगांनाच प्राधान्य देणारे असतात, हे खरे नव्हे. त्यांच्यात अत्यंत

त्यागी, मानवाच्या उद्धारार्थ जीवन समर्पित करणारे कितीतरी दिसतात.

मातीचाच (मॅटरचाच) चैतन्य हा आविष्कार आहे; आणि हा महान चमत्कारच आहे; असे हर्बर्ट स्पेन्सर म्हणतात. नैसर्गिक विश्व हे महान आश्चर्य आहे; या आश्चर्याची जाणीवच मोठमोठ्या विज्ञानवेत्त्यांना संशोधनाची प्रेरणा देते; असे अल्बर्ट ऐनस्टाईननी म्हटले आहे. प्राणिविश्वातील चैतन्य वा आत्मा हे विश्वातील अत्यंत महान आश्चर्य आहे. त्यासंबंधी भगवद्गीतेत म्हटले आहे की याच्याबद्दल कोणी आश्चर्यचकित होऊन पाहातो; कोणी आश्चर्यचकित होऊन बोलतो; तर कोणी आश्चर्यचकित होऊन ऐकतो, परंतु कोणालाही हा कळत नाही. मी तर पूर्ण जड (अज्ञ) आहे, म्हणून अवाक राहणेच शहाणपणाचे. वेद, बायबल, त्रिपिटक, कुराण इत्यादी धर्मग्रंथ गेली ६५ वर्षे मन लावून सारख्याच श्रद्धेने वाचत आहे. परंतु यासंबंधी उलगडा मला मुळीच झाला नाही.

सत्यवती गेली (१२ ऑगस्ट १९७८). आता तिचे गुणस्मरणच होत आहे. तिचे दोष ती असताना त्या त्या प्रसंगी क्वचित लक्षात येत होते; पण क्षणभरच. आता ते लक्षातही येत नाहीत आणि असे प्रसंगही तात्पुरते असत. सिनेमातील प्रसंग जसे झरझर बदलतात तसे. तशा प्रसंगी तिची चूक ध्यानात आली की मी रागावत होतो. परंतु तिचा अपमान होईल असा शब्द मनातही आला नाही; उर्मटपणे बोललो नाही; आवाज मात्र क्वचित चढत होता.

मी आता एकटाच एकान्तात असताना रडत आहे. तिच्यातील शाश्वत दिव्यतत्त्वाचा भास होत आहे. ती सदेह होती तेव्हा ती माझी सहचारिणी म्हणजे शाश्वत दिव्य तत्त्वाची मूर्तीच होती; तिच्या सहजीवनात अनेक प्रसंगी असेच भासत होते. तिचे यौवन आता सरले होते; तरी मला ती युवतीच भासे; दिवसाचे १४ तास उभी राहून सर्व प्रकारची कामे उरकायची; थोडा वेळच बसायची वा खाटेवर आडवी व्हावयाची, एवढीच विश्रांती. उतारवयाचा परिणाम तिच्या मनावर झाला नव्हता. मन चिरतरुण राहिले. तिच्या सहवासात ५२ वर्षे निघून गेली.

माझा विवाह झाल्यावर १ वर्षाने तिच्या १५ व्या वर्षी तिने माझ्याबरोबर प्रपंचास प्रारंभ केला. दोन तीन वर्षांत लक्षात आले की, माझ्या सहचारिणीचे व्यक्तिमत्त्व असाधारण आहे; मन, वाणी, शरीर यात पावित्र्य भरून राहिले आहे. कोणाचाही द्वेष मत्सर करीत नाही. माझ्या मनातून जात पात भेद पुरा पुसला गेला नव्हता. परंतु तिच्या मनाला हा भेद शिवला नाही. हे सर्व तिच्या वर्तनातच प्रकट झाले होते; शब्दात नव्हे तिचे हे मानसिक पावित्र्य लक्षात आल्यावर मी पूर्ण बदललो; मी समतावादी बनलो.

तीन मुले झाल्यावर आणखी लक्षात आले की, तिची निवड केली ती योग्यच होती. त्यामुळे माझ्या प्रपंचात शांती व सुख नांदू लागले आहे. प्रथम निवड करताना त्याबद्दल विचार असा केला नाही. मी तिला प्रथम पाहिले व लगेच मी माझ्या मनातही डोकावले तो स्वच्छ, प्रसन्न प्रकाश दिसला; का कुणास ठाऊक?

आता मी एकटाच एकान्तात तिच्याशी बोलत आहे; अश्रू हुंदके आवरता येत नाहीत. तुझी ही मौन मुद्रा किती शान्त आहे. तू मला देहाने सोडलेस, तत्पूर्वी या लोकच्या कितीतरी मोठ्या मंगल भवितव्याची अपेक्षा तुझ्या बोलण्यावरून वारंवार माझ्या प्रत्ययास येत होती. मग तू हा लोक का सोडलास?

मला क्षमा कर. मनात आता येते की, मी वेळीच तुझी अधिक काळजी घ्यावयास पाहिजे होती, गेली ६-७ वर्षे रक्तदाबाचा त्रास तुला मधूनमधून होत होता; त्यावरचे उपायही तुला उपलब्ध होत होते. माझ्या मनात आणखी एक उपाययोजना होती, तेलाचे नित्य मालिश व गरम पाण्याचा टबबाथ सक्तीने रोज द्यावा. तसे केले असते तर इतक्या लवकर तू माझी साथ सोडली नसतीस. परंतु नकळत मी अळंटळं केली; सक्ती करण्याची बुद्धी सुचली नाही. तशी केली असती तर तू नेहमीच्या हसऱ्या मुखाने मला तुझा पावन सहवास आणखी दिला असतास.

परंतु आता अशा कल्पना करणे व्यर्थ आहे. या वेळी तुझे मूर्त स्वरूप माझ्या मनःचक्षूंसमोर येत नाही; मात्र तुझे शुद्ध चैतन्य माझ्या अस्तित्वाला व्यापून राहिलेले भासते. तू मला विरह वेदनांतून मुक्त का करीत नाहीस? करू नको; बिलकुल करू नको. ह्या वेदना पवित्र आहेत. त्या मला शुद्ध करीत आहेत; माझ्या पावित्र्याला तू सदेह असताना खूप जपले आहेस, तशी मला दिसणारी तुझी अव्यक्त सत्ता यापुढेही मोक्ष मार्गापासून च्युत होऊ देणार नाही. भावी जीवन किती आहे हे कोणास ठाऊक.

मला शेकडो लोक सांगता आहेत व लिहीत आहेत की, धीर सोडू नका, परंतु मी 'निर्बोध' झालो आहे!

(नवभारत, सप्टेंबर, १९७८, पृ. ३७ ते ५१
मूळ शीर्षक: सौ. सत्यवतीची जीवनयात्रा)

ooo

७७

महत्त्वाकांक्षा प्रशंसनीय नाही असे कोण म्हणेल?

माझ्या अध्यक्षतेखाली साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना दिनांक १९ नोव्हेंबर १९६० रोजी झाली. त्या वेळचे मुख्यमंत्री मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी दिनांक १ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी शासनाची जो धोरणविषयक प्रमेये जाहीर केली, त्यात महाराष्ट्र राज्याच्या मराठी साहित्य, कला व संस्कृती या क्षेत्रांतील कार्यकर्त्यांच्या कार्याची उपेक्षा होणार नाही, एवढेच नव्हे, तर त्या कार्याची प्रगती व विकास होईल या दृष्टीने पावले निश्चितपणे टाकण्यात येतील असे आश्वासन दिले होते. या आश्वासनाच्या पूर्तीकरिता या मंडळाची स्थापना झाली. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी मंडळाने काही योजना क्रमाक्रमाने हाती घेतल्या. काही योजना विशिष्ट कालमर्यादेत संपण्यासारख्या व काही योजना कार्यवाहीत आल्यानंतर सतत चालवाव्यात अशा होत्या. त्यातील बऱ्याचशा कार्यवाहीत आल्या आहेत.

ज्या ज्या योजना माझ्या अध्यक्षतेखाली मंडळाने आयोजित केल्या, त्यातील एक-दोन सोडल्यास सबंध कार्यवाहीत आल्या आहेत. त्यातील बऱ्याचशा फलद्रूप होतील यात शंका नाही. हाती घेतलेल्या या सगळ्या योजनांना चांगल्या व्यासंगी विद्वानांचे संपूर्ण वेळ साहाय्य लागते. मराठी भाषा इतर भारतीय साक्षर भाषांपैकी चांगल्या विकसित झालेल्या भाषांच्या श्रेणीमध्ये अत्यंत उच्च स्थानी असलेली भाषा म्हणून मान्यता पावलेली आहे. हे जरी खरे असले तरी आधुनिक ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या अभिव्यक्तीचे उत्कृष्ट सामर्थ्य तिला अजून प्राप्त व्हावयाचे आहे. इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, रशियन, इटालियन इत्यादी पश्चिमी भाषांच्या तुलनेने मराठी भाषा अजून मागासलेलीच आहे असे म्हणावे लागते. तिचे अभिव्यक्तीचे सामर्थ्य अपरंपार आहे असे मान्य केले तरी या सामर्थ्याला म्हणजे या ऊर्जेला कार्यक्षम करण्याकरिता माझ्या अध्यक्षतेखाली ज्या योजना आखण्यात आल्या त्या योजनांच्या पाठीमागे अद्ययावत भाषिक तत्त्वज्ञान व विज्ञान आहे. मराठी विश्वकोश हा पूर्ण

प्रकाशित झाल्यावर आधुनिक वैज्ञानिकांना परिभाषेची अडचण पडणार नाही. आज मोठे मोठे शिकलेले मराठी भाषिक संवर्ग व वैज्ञानिक आपली विद्या मराठीत मांडण्यात फारसे उत्सुक नसतात, याचे कारण त्यांची भाषिक अडचण होय. ही अडचण मराठी विश्वकोश संपूर्ण प्रकाशित झाल्यावर पुष्कळ कमी होईल.

मी या मंडळावर जोपर्यंत होतो तोपर्यंत शासनाच्या नियंत्रणामुळे अडसर असा क्वचितच निर्माण होत असे किंवा तो जाणवत असे. याचे कारण मुख्यमंत्र्यांचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता. कित्येक वेळा अडचणी आल्या, त्यामुळे कार्यविलंबही होऊ लागला; परंतु प्रयत्नांती अडचणी कमी झाल्या. मुख्यमंत्र्यांना नावडणाऱ्या गोष्टीसुद्धा माझ्या अध्यक्षतेखाली घडल्या. कारागृहामध्ये बद्ध असलेल्या एका साम्यवाद्याच्या अणुविद्येवरील पुस्तकाला मंडळाने अनुदान दिले. कै. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना त्यांच्या एका मित्राने लिहिलेल्या 'वसंतराव नाईक- बहुजन समाजाचे थोर नेते' या चरित्राला अनुदान देण्याचे मंडळाने नाकारले, परंतु त्यामुळे वसंतराव नाईकांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने केव्हाही नाखुशी दाखविली नाही. परंतु हा सर्व अपवाद होय.

हे मंडळ स्वायत्त केले तर शासनाच्या नियंत्रणाने आलेली बंधने वा अडसर उत्पन्न होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, परंतु मंडळाच्या अधिकारपदावर व सदस्य पदावर असलेल्या मंडळींची बौद्धिक पात्रता आणि ध्येयधोरणाचा आवाका किती आहे. यावरच कामकाज अधिक प्रभावी व परिणामकारक होणे न होणे अवलंबून असणार.

साहित्य संस्कृती मंडळातर्फे नवोदित लेखकांसाठी शिबिरे भरविण्याचा उपक्रम सुरू झाला आहे. अन्यही काही उपक्रम हाती घेण्यात येणार असल्याचे प्रसिद्ध झाले आहे. लेखक नवोदित असोत अथवा जुने नाणावलेले असोत, त्यांची शिबिरे घेणे, त्यांच्या चर्चा घडवून आणणे, चर्चा होत असताना गरमागरमी होणार नाही याची दक्षता घेणे आणि एकंदरीत परिचयाचा व स्नेहाचा सोहळा साजरा करणे असे शिबिराचे स्वरूप राहिल्यास ते स्वागतार्हच आहे. परंतु त्याच्या योगाने नवी दिशा मंडळाच्या कार्याला प्राप्त होईल की नाही हे सांगता येणार नाही. कारण माझ्या अध्यक्षतेखाली २० वर्षे चाललेल्या मंडळाने उद्देश व निश्चित योजना यांच्या या प्रकारच्या शिबिरांशी कसलाही अन्वय लागणे शक्य नाही. या नव्या मंडळाचे काही निराळेच उद्देश व योजना असाव्यात; किंबहुना पूर्वीपेक्षा अत्यंत व्यापक, धाडसी व धडाडीच्या योजना कार्यवाहीत आणण्याचा मनोदय असावा असे दिसते. त्यांना जिल्हानिहाय सांस्कृतिक केंद्रे स्थापावयाची आहेत. हा उद्देश अतिशय स्तुत्य आहे. परंतु सांस्कृतिक केंद्रांचा कार्यक्रम काय हे मात्र ठरवावे लागेल. प्रत्येक जिल्ह्यात अद्ययावत रंगमंच, संगीतकारकक्षा, चित्रकारकक्षा, पदार्थसंग्रहालय, इतिहाससंशोधन-कक्षा, काव्यादी वाङ्मय निर्मिती-कक्षा, ऐतिहासिक स्थानांचे उत्खनन, ऐतिहासिक कागदपत्रांचे व अप्रकाशित पुस्तकांचे संग्रहालय वगैरे कितीतरी वैविध्यपूर्ण कार्यक्रम या सांस्कृतिक केंद्राच्यातर्फे

आखता येतील. या संबंधाची त्या त्या जिल्ह्यातील पूर्वप्राथमिक तयारी काय आहे, याचाही शोध घेतला पाहिजे. हे सर्वकाही करता येईल. परंतु कल्पनेमध्ये अत्यंत भव्य चित्र निर्माण करणे फार सोपे आहे, परंतु कार्यवाहीत आणण्याकरिता लागणारे मनुष्यबळ व अर्थबळ निर्माण करणे फार कठीण आहे. जिल्हावार अनेक सांस्कृतिक केंद्रे निर्माण करण्याची योजना फार महत्त्वाकांक्षी आहे. महत्त्वाकांक्षा प्रशंसनीय नाही असे कोण म्हणेल?

(पुस्तक पंढरी, दिवाळी अंक, १९८१, पृ. ३६-३७)

○○○

७८

माझी आयुष्याची संध्याकाळ

वयाचे ८१ वे वर्ष सुरू आहे. मनुष्याचा आयुर्दाय शंभर वर्षांचा असतो असे गृहीत धरतात; परंतु नेम नाही. आयुष्याचा भरवसा नसतो. शंभर वर्षांचा आयुर्दाय गृहीत धरला तर आता सुमारे २० वर्षे राहिली आहेत. आता आयुष्य थोडे राहिले म्हणून मनाचा विरस होत नाही. आयुष्याची ही संध्याकाळ असली तरी ती निरामय वाटते. मृत्यू कोठे आहे व केव्हा आहे हे जोपर्यंत कळत नाही तोपर्यंत मृत्यूची तशी भीती वाटत नाही. मृत्यूची अजाण भीती जिवाच्या स्वभावातच भरलेली असते. त्याला मी अपवाद कसा असणार? परंतु आयुष्याच्या अंती चिरंतन शांती आहे हे निश्चित!

काळ फार वेगाने निघून जातो, असे म्हणतात. परंतु माझी गेली ८० वर्षे खूप संथपणे निघून गेली आहेत, असे मला वाटतं. कारण ह्या माझ्या आयुष्याच्या छोट्याशा कालखंडात माझ्या खाजगी जीवनाच्या, सार्वजनिक जीवनाच्या आणि जगाच्या फार मोठ्या घडामोडी मी पाहिल्या आहेत. विविध घटनांनी भरगच्च भरलेला इतिहास माझ्यासमोर घडला आहे, माझ्या भोवतालच्या जगात अनेक सामाजिक व राजकीय स्थित्यंतरे झाली आणि खाजगी आयुष्यही अशाच अनपेक्षित स्थित्यंतराने गजबजलेले मी अनुभवले आहे,

माझे सगळेच आयुष्य आशा व उत्साह यांनी भरलेले दिसते; परंतु आर्थिक स्वास्थ्य कधीच लाभले नाही. वयाच्या साठाव्या वर्षापर्यंत उद्याचे काय हा प्रश्न कायम राहिला; तरी मनाला विवंचनेने घेरले नाही. आयुष्यात आनंद टिकला याचे कारण वात्सल्य, स्नेह आणि प्रेम यांनी भरलेल्या जगात मी आतापर्यंत जगलो आहे. माता, पिता, गुरू, बंधू, भगिनी, मित्र, नातेवाईक, पत्नी, मुले, मुली, जावई, सुना, नातवंडे इ. स्वरूपात जी जी माणसे आयुष्यात आली त्यांनी प्रेमाचे व स्नेहाचेच विश्व निर्माण केले. मतभेद वारंवार होत होते; संघर्षाचेही प्रसंग अनेक आले; परंतु शिल्लक जे राहिले ते सहानुभूतीने भरलेले खाजगी व सार्वजनिक जीवन होय. लहानपणी जन्मगाव सोडले आणि वाई येथे शिक्षणाकरिता आलो व तेथेच

जन्मभर स्थिरावलो. येथे गुरू, सहाध्यायी आणि सहकारी मित्र यांच्याशी चिरंतन स्नेहाचे नाते निर्माण झाले. वाईच्या नागरिकांनी सतत अखंडपणे आदरानेच माझ्याकडे पाहिले. वाई हा मूळचा रूढीनिष्ठ मध्यमवर्गीयांचा गाव. माझी मूळची जीवनपद्धती ही सनातनी रूढीवरच आधारलेली होती. तरी माझ्यात बदल फार व लवकर झाला. माझ्या सामाजिक क्रांतिकारक विचारांच्या उमेदीच्या कालखंडात सामाजिक संघर्षही उत्पन्न झाले. वाईतील तरुण पिढीने मला साथ दिली, त्यामुळे कालांतराने हे संघर्ष शमले.

माझ्या मनावर लहानपणापासूनच सार्वजनिक घडामोडींचे खोल ठसे उमटू लागले. त्यामुळे माझे सबंध खाजगी जीवन हे सार्वजनिक जीवनाचाच एक अंश बनला. खाजगी जीवन त्यातच बुडून गेले. त्यात खाजगीपणा फार थोडा राहिला आहे. उदा., १९०८ साली लोकमान्य टिळकांना दीर्घकालीन कारागृहवासाची शिक्षा झालेली आणि त्यामुळे जनमनावर दुःखाची छाया पसरलेली आठवते. त्यानंतरच्या गेल्या ७२ वर्षांतले ठळक सामाजिक, राजकीय व धार्मिक प्रसंग आठवायचे म्हटल्यास ते सहज आठवतात व मनःचक्षूंपुढे सरकत जातात.

१९१४ सालचे जागतिक युद्ध अचानकपणे भडकलेले वाचण्यात आले आणि त्या वेळी ब्रिटिशांचे शत्रू असलेल्या जर्मनांच्या एकापाठीमागून एक सरसावणाऱ्या विजयी आक्रमणांच्या कथा रोज वाचू लागलो. पुणे येथे गुळगुळीत चमकदार कागदावर प्रसिद्ध होणाऱ्या मोठ्या आकाराच्या 'चित्रमय जगत' नावाच्या मासिकात एका प्रसिद्ध सिद्धहस्त लेखकाच्या लेखणीतून उतरलेल्या त्या रोमहर्षक युद्धकथा अधाशीपणे वाचत होतो. दोस्तांच्या पराभवाने व जर्मनांच्या विजयाने मन उल्हसित होत होते. चित्रमय जगतचे ते सिद्धहस्त लेखक म्हणजे महाराष्ट्राचे नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर होते. १९१४ साली लो. टिळकांची मंडालेहून सुटका झाली व त्यामुळे सबंध देश आनंदाने भरून गेला याची कधीही न बुजणारी आठवण अजूनही ताजीच वाटते.

१९१५ साली गीतारहस्याची पहिली आवृत्ती निघाली. टिळकांच्या स्वाक्षरीने गीतारहस्याची एक प्रत भेट म्हणून गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे (ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती) यांच्याकडे आलेली मी पाहिली. या वेळी मी षड्दर्शने व प्रस्थानत्रयी शिकत होतो. प्राज्ञपाठशाळेत त्या वेळी प्राचीन शास्त्रांचा अभ्यास करणारे अनेक प्रौढ वयाचे विद्यार्थी होते. गीतारहस्यात शंकराचार्यांच्या संन्यासवादाचे खंडन केलेले असल्यामुळे त्यावर वादविवाद सुरू झाले. या प्रसंगाने मी गीतारहस्याची दोन पारायणे एका महिन्यात पुरी केली आणि पंडितांनी, चालविलेल्या साधक-बाधक चर्चेत सामील झालो. १९१७ साली विनोबा भावे प्राज्ञपाठशाळेत शांकरवेदान्ताच्या अध्ययनाकरिता आले होते. त्यांच्याशीही मी गीतारहस्यातील वादग्रस्त मुद्द्यांवर चर्चा केलेली मला आठवते. प्राज्ञपाठशाळेचे वातावरण राजकारण आणि समाजकारण यांच्या विचाराने पूर्णपणे भरून राहिले होते. कारण

या विद्यार्थ्यांमध्ये अनेक क्रांतिकारक विचारांचे विद्यार्थी होते. "भारत अनेक वेळा परतंत्र का झाला? भारत पाश्चात्त्यांच्या पाठीमागे का राहिला?" या प्रश्नांना तेथे त्या वेळी मूलभूत महत्त्व आले होते; हे प्रश्न नीट सुटत नव्हते; अत्यंत जाचक वाटत होते आणि अजूनही ते तसेच जाचक व कधीही न सुटणारे वाटतात. या प्रश्नांची छाननी सर्वांगीण रीतीने सुरू होती. हे प्रश्न सामाजिक व राजकीय परिवर्तनाशी संबद्ध होते. त्यामुळे मी आणि माझ्याबरोबरचे अनेक विद्यार्थी सामाजिक सुधारणा व राजकीय स्वातंत्र्यांचे आंदोलन यांच्यामध्ये सक्रिय भाग घेऊ लागले.

असहकारिता (१९२०-२१) व सविनय कायदेभंग (१९३०-३२) या दोन्ही चळवळींमध्ये आम्ही भाग घेत असताना सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या आंदोलनाची तात्त्विक शास्त्रीय बैठक शोधत राहिलो. मी गांधीवादाशी काही काळ एकरूप राहून काम करीत होतो. त्यानंतर एम. एन. रॉय यांची भेट झाली आणि गांधीवादी विचारसरणीच्या बंधनातून बाहेर पडलो. सामाजिक व राजकीय साम्यवादी क्रांतीचा ध्येयवाद माझ्या विचारांचे कायमचे प्रेरणासूत्र बनले. या प्रेरणासूत्रामुळेच मी हिंदू धर्म व हिंदू संस्कृती यांची मौलिक समीक्षा करण्याचे धाडस केले. भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला जे अनेक मूलगामी धोके आहेत त्या धोक्यांतून भारत बाहेर पडल्याशिवाय भारतीय एकात्मता स्थिरावणार नाही. हे धोके परंपरागत संस्कृती व समाजरचना यांच्या मौलिक रचनेतच सोवळे ओवळे, जातिसंस्था, अस्पृश्यता, चातुर्वर्ण्य इत्यादी तत्त्वांच्या रूपांनी भरलेले आहेत.

भारत स्वतंत्र झाल्यावर भारतामध्ये सामाजिक व राजकीय समतेवर आधारलेली संपूर्ण क्रांती होईल अशी अपेक्षा मात्र मी इतर अनेकांप्रमाणे कधीही मनाशी बाळगलेली नव्हती. आता ही आशा तर फारच दुरावलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळ जसजसा पुढे जात आहे तसतसा भारताच्या राजकीय नेतृत्वाचा नैतिक अधःपात फार वेगाने घडून येत आहे. नैतिक जीवनाशी फारकत झालेले राजकीय नेतृत्व आज प्रभाव गाजवू लागले आहे. ४० वर्षांपूर्वी जागतिक समाजवादी क्रांतीच्या भव्य आशावादाने माझे मन भरून गेले होते; परंतु जगात जेथे जेथे समाजवादी क्रांती झाली आहे असे म्हणतात तेथे तेथे मानव स्वातंत्र्य गमावून बसला आहे, असे दिसते. त्यामुळे एकंदरीत जगाचे किंवा भारताचे राजकीय भवितव्य निराशा व विषाद उत्पन्न करते. त्यामुळेच माझ्या आयुष्याची ही संध्याकाळ मला भयाण वाटावी असे कोणी म्हणेल. परंतु वैज्ञानिक दृष्टिकोनाने मी जगाकडे नेहमीच पाहात आलो. आहे. त्यामुळे मानवी भवितव्य घडविणाऱ्या इतिहासाच्या शक्तींकडे तटस्थतेने मी पाहू शकतो. दुसरे असे की, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यात अव्याहतपणे प्रचंड स्फोटक पद्धतीने प्रगती होत आहे. या सतत प्रगत होत असलेल्या विज्ञानाच्या व तंत्रज्ञानाच्या अंतरंगातच मानवमुक्तीच्या शुभशक्ती वावरत असाव्यात अशी कल्पना मी करू शकतो; व त्या भव्य कल्पनेने माझे मन भारावून जाते.

माझे हातपाय अजून चांगले धडधाकट आहेत. अजूनही आडरानात, जंगलात, चढउतारांच्या पर्वतप्रदेशांमध्ये आठ-दहा मैल फेरफटका मोठ्या उत्साहाने मी करू शकतो. कृष्णा नदीमध्ये पुरात उडी टाकून पोहण्याचा उत्साह अजून मावळलेला नाही. मी आठ तास शांत झोपतो. अनेक तास वाचन व विद्याव्यासंग करतो. विज्ञानाच्या क्षेत्रात रोज नवे नवे लहानमोठे शोध लागत आहेत. त्यांचेही जिज्ञासेने वाचन करतो; विशेषतः जीव विज्ञानाचे! जीवविज्ञानच मी अधिक का वाचतो? याचे कारण जीवात्मा म्हणजे काय हे कळले तर त्याच्या अंतरंगात परमात्म्याचाही वास असण्याची शक्यता आहे. असे आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या जन्मभर केलेल्या अभ्ययनावरून वाटत राहते. जीवात्मा व परमात्मा यांचा सांधा सापडेल काय? असा प्रश्न आहे. हा प्रश्न सुटण्याची शक्यता असेल तर ती जीवविज्ञानातूनच. परंतु निश्चितपणे काहीच म्हणता येत नाही. माझे मन शांतपणे चाचपडत आहे.

हा आयुष्याचा संध्याकाळ! ज्यांनी मला प्रेमाने उपकृत केले असे अनेक मित्र व सहकारी माझ्यापुढे निघून गेले आहेत. त्यांच्या पुण्यस्मृतीने पवित्र झालेल्या जीवनाचा अनुभव मन घेत आहे. गृहजीवनात व सार्वजनिक जीवनात जे जे भेटले, दीर्घकाल संगतीत राहिले त्यांच्यामुळे मानवी जीवनाचा महिमा मला खूप पटला आहे. ह्या अनन्त आश्चर्यमय दृश्यविश्वातील मानवी जीवनच भव्य आहे, त्यात विस्मयजनक नाट्य आहे, त्यातच दिव्यता आहे. पण, पलीकडे काय आहे कोणास ठाउक? यतो वाचो निवर्तन्ते!

(ललित, दिवाळी अंक, नोव्हेंबर-डिसेंबर, १९८१

पृ. ३१, ३२ व २३७.

मूळ शीर्षक: आयुष्याची संध्याकाळ)

○○○

७९

माझी तीन प्रेरणास्थाने

ग्रामीण भागात गरीब मध्यमवर्गात मी जन्मलो. घरचे आणि भोवतालचे वातावरण मात्र उच्च ब्राह्मणी संस्कृतीचे. वडिलांचा व्यवसाय ज्योतिष आणि पौरोहित्य. याज्ञिक, वैदिक, पुराणिक, शास्त्री, पंडित, कीर्तनकार, प्रवचनकार अशा मंडळींचे आमच्याकडे वारंवार येणे-जाणे असे. रामायण, महाभारत, कालिदास, भवभूती इत्यादिकांसंबंधी चर्चा लहानपणी कानांवर पडत होती. 'केसरी' व 'सुधारक' ही वृत्तपत्रे आमच्या घरच्या बैठकीवर वाचली जात होती. महाराष्ट्रात चांगले नावाजलेले निजामपूरकर बुवांसारखे कीर्तनकार अनेक आठवडे आणि महिनेदेखील माझ्या जन्मगावी म्हणजे धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे ठिय्या देऊन असत. मी ज्या ब्राह्मण गल्लीत राहत होतो, त्या गल्लीत माझ्या घरासमोर देवासच्या शीलनाथ या साधूचे भक्त बाबासाहेब देशमुख संतांची पदे सुरेलपणे मोठ्याने म्हणत, भजनांत रमत असत. वाई येथून प्रसिद्ध होणाऱ्या पं. काशिनाथ वामन लेले यांच्या 'धर्म' मासिकाचा अंक आमच्या ओटीवर वाचला जात असे व त्यावर भिक्षुक पेशाची मंडळीही वादविवाद करीत. 'धर्म' मासिक हे सुधारकांच्या विचारांवर धारदार टीका करणारे मासिक होते.

मी वयाच्या आठव्या वर्षी प्राथमिक शाळा सोडून माझ्या वडिलांपाशी माझी मुंज झाल्यावर वेदाध्ययन करू लागलो. शास्त्रोक्त पद्धतीने प्रातःकालापासून रात्री अंथरुणात आडवा पडेपर्यंत कर्मकांडाचे आचरण करीत होतो. सकाळी सूर्योदयाच्या आत प्रातर्विधी उरकून प्रात: स्मरण, समंत्र स्नानविधी आटोपून संध्या व अग्निपूजा नित्य करीत असे.

हा माझा कार्यक्रम अगदी जगावेगळा होता. माझ्या वयातली मुंज झालेली मुले संध्या, अग्निपूजा, वेदाध्ययन अशा तऱ्हेच्या कर्मकांडांत गुंतत नसत. भिक्षुकांची मुलेदेखील अशा तऱ्हेच्या शास्त्रोक्त कर्मकांडापासून अलिप्त राहत. १३ व्या वर्षी मी वेदाध्ययन संपविले आणि माझ्या वडिलांच्या सांगण्यावरून चांगल्या एका प्रसिद्ध पाठशाळेमध्ये संस्कृत शास्त्रांचा

अभ्यास करण्याकरिता जाण्याचे ठरविले.

हरिद्वार येथील स्वामी श्रद्धानंदांनी चालविलेल्या गुरुकुलाची कीर्ती माझ्या कानांवर अनेक वेळा आली. मी वडिलांना म्हटले, की मला हरिद्वारला जायचे आहे. वडिलांच्या मित्रमंडळींमध्ये माझ्या विचाराबद्दल चर्चा सुरू झाल्या. वनखात्याचे एक कर्मचारी वाई येथील प्रसिद्ध देवकुळे घराण्यातील दादासाहेब हे आमच्या वडिलांच्या मित्रपरिवारातील धर्मनिष्ठ गृहस्थ माझा विचार ऐकल्यामुळे अस्वस्थ झाले. ते माझ्या वडिलांना म्हणाले,

'लक्ष्मणला इतक्या दूर हरिद्वारला पाठविण्याऐवजी वाईला पाठवा. वाई येथे पंचवीस-तीस उत्तम वेदपाठी आणि याज्ञिक, तसेच विद्वान शास्त्री आणि पंडित आहेत. अनेक वेदशास्त्राच्या पाठशाळा आहेत. त्या सर्वांच्यामध्ये नैष्टिक ब्रह्मचारी नारायणशास्त्री मराठे यांची पाठशाळा चांगली आहे. एक प्रकारे ते गुरुकुलच आहे. लक्ष्मणची तेथे चांगली काळजी घेतली जाईल. नारायणशास्त्री मराठे आमचे मित्र आहेत. ते विद्यार्थ्यांच्या नित्य जीवितक्रमावर देखरेख ठेवतात; अभ्यास नीट करून घेतात; सुरेख वळण लावतात; आजारी विद्यार्थ्यांची शुश्रूषा करतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता यत्नशील असतात.'

मी १९१४ सालच्या माघ मासी म्हणजे फेब्रुवारीत वाईस येऊन प्राज्ञमठात दाखल झालो. माझ्याबरोबर वडील होते. गुरूंच्या पायांवर मी लोटांगण घातले. गुरूंनी थोडी विचारपूस केली आणि गंगापुरीतील कृष्णेच्या घाटावरील एका मठातील खोलीचा ताबा मला दिला. संस्कृतच्या अध्ययनास मी प्रारंभ केला. गुरुजी पाठशाळेतील विद्यार्थ्यांना शिस्तीने वागवत. गुरुजनांची विद्यार्थ्यांवर देखरेख होती. अनेक कार्यक्रम गुरू आणि शिष्य यांचे सारखे होते. प्रात:काळची प्रार्थना संघशः म्हटली जात असे. दर सोमवारी म्हणजे अनध्यायाच्या दिवशी झाडलोटीचा कार्यक्रम झाल्यावर व आठवड्याची इतर कामे उरकल्यावर दुपारच्या भोजनानंतर दोन वाजता विद्यार्थी आणि गुरुजन यांची एकत्र बैठक भरत असे. ती तीन तास चाले. या बैठकीत गुरू वा शिष्य व्यासपीठावर बसून प्रवचन देत असत; कोणी सुरेल आवाजात पुराणातील संस्कृत श्लोक म्हणून कथा सांगे. रामायण, महाभारत, विष्णुपुराण, भागवत, इ. ग्रंथातील निवडक कथा सांगत असत. कित्येक वेळा प्रवचन किंवा पुराण न होता प्रचलित सामाजिक व राजकीय किंवा तात्त्विक विषयांवर भाषणे होत असत. जुन्या पद्धतीच्या पाठशाळांमध्ये अशा तऱ्हेचा प्रचलित विषयांचा ऊहापोह चालत नसे. ह्या पाठशाळेत मात्र ह्या नव्या प्रकारचा कार्यक्रम सुरू झाला. संस्कृत वेदशास्त्राध्ययनाची ही पाठशाळा होती; परंतु त्यात इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, प्रचलित सामाजिक व राजकीय सुधारणा यांचाही अध्ययनामध्ये समावेश झाला. नव्या विचारांचा, नव्या सामाजिक व राजकीय प्रश्नांचा ऊहापोह करणारे शास्त्री, पंडित, पुराणिक व कीर्तनकार निर्माण व्हावे, असा दृष्टिकोन या संस्थेचे प्रधान आचार्य नारायणशास्त्री मराठे यांनी स्वीकारला.

त्यांचे व्यक्तिमत्त्व पाहिल्याबरोबर आकर्षित करीत असे. सहा फूट दणकट शरीरबांधा,

गुलाबी कांतीचे गोरेपण, मधुर व संयमित असे मुद्यांचे बोलणे, वाणीला निंदेचा विटाळ कधीही होऊ द्यायचा नाही असे व्रत, पठडीचे संगीत शिकविण्याची पात्रता, परंतु भिक्षाव्रताने निर्वाह करून अध्ययन-अध्यापनात रत होण्याचे दृढ संकल्प इत्यादी गोष्टींचा सहवासात आलेल्या व्यक्तीच्या मनावर खोल प्रभाव पडत होता. त्यांची कीर्ती ऐकून महात्मा गांधींच्या साबरमती आश्रमात नुकतेच प्रविष्ट झालेले आचार्य विनोबा भावे वेदांताच्या अध्ययनाकरता १९१७ साली वाईस येऊन एक वर्षापर्यंत शांकरभाष्य शिकून परत गेले.

मला नारायणास्त्री मराठे आणि आचार्य विनोबा भावे या दोघांचाही निकटचा सहवास लाभला. मराठेशास्त्री यांनी मला साहित्य, भारतीय प्राचीन तत्त्वज्ञान म्हणजे दर्शने आणि विशेषतः नव्य न्यायदर्शन हे विषय शिकविले. मराठेशास्त्री हे ध्येयवादी जीवन जगत होते. त्यांची अद्वैत शांकर वेदान्तावर श्रद्धा होतो. म्हणून त्यांनी त्या श्रद्धेच्या अनुसराने आयुष्याच्या उत्तरार्धात संन्यासाश्रमाचा स्वीकार केला; केवलानन्द हे अभिधान धारण केले. गृहस्थाश्रम केलाच नाही.

समाजसुधारकांचे विचार त्यांना हळूहळू मान्य होऊ लागले. देशकालपरिस्थितीप्रमाणे धार्मिक आचार-विचारांमध्ये मौलिक बदल आवश्यक असले तर ते केलेच पाहिजेत, अशा निर्णयापर्यंत ते पोचले. या त्यांच्या विचारयात्रेत मी स्वतः आणि महाराष्ट्रातील अनेक शास्त्री मंडळी व अनेक विद्याविभूषित उदा. ना. गो. चापेकर, म. म. पां. वा. काणे, नागपूरचे के. ल. दप्तरी, लोणावळे येथील तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे इत्यादी मंडळी सामील झाली.

१९३० साली म. गांधी यांनी सविनय कायदेभंगाचे देशव्यापी आंदोलन सुरू केले, त्या आंदोलनात मी स्वतः सहभागी झालो. मी सुमारे आठ-दहा वर्षे प्राज्ञपाठशाळेत केवलानंद स्वामींच्या देखरेखीखाली भारतीय तत्त्वज्ञानाचे अध्यापन करीत होतो. राजकीय पारतंत्र्यातून देश मुक्त झाला, तरच समाजाची सर्वांगीण प्रगती होऊ शकते, अशा प्रकारची विचारसरणी मी नारायणशास्त्री मराठे (संन्यासाश्रमात केवलानंद सरस्वती) यांच्यापाशी शिकलो. विचार आणि आचरण यांच्यात मेळ असणे आवश्यक, हे केवलानंद सरस्वतींच्या जीवनातील सूत्र माझ्या जीवनाला मार्गदर्शक ठरले. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेऊ लागलो. अध्यापन करताना मी दोन-चार विद्यार्थ्यांना शिकवीत होतो. चळवळीत सामील झालो व मोठ्या जनसमुदायपुढे भाषण करू लागलो. चळवळीत स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान आणि मानवी स्वातंत्र्याचा व राष्ट्रवादाचा इतिहास सामान्यजनांना, विशेषत: ग्रामीण जनांना सांगून सत्याग्रहाच्या चळवळीत तरुण मंडळींना खेचून घेऊ लागलो. माझे भाषण ऐकण्यास शेकडो लोक जमायचे. कित्येक वेळा दोन-तीन हजारांपर्यंतही जनसमुदाय गर्दी करू लागला. तेव्हा माईक नसे, तरी माझा आवाज दोन-तीन हजारांना रोखून धरत होता. कऱ्हाड येथे दांडी मार्चच्या काळात मी संध्याकाळच्या वेळी कृष्णेच्या तीरावरील वाळवंटात ओळीने सात दिवस भाषणे दिली. कऱ्हाडमधील सुशिक्षित, अर्धशिक्षित व निरक्षर अशा तऱ्हेचा सगळ्या

थरांतला श्रोतृवृंद जमत होता. मी तत्त्वज्ञानाचा अध्यापक होतो, त्यामुळे माझ्या भाषणामध्ये जो युक्तिवाद असे, त्यात नीट व सुबोध मांडणी येऊ लागली. यशवंतराव चव्हाण, आत्माराम पाटील यांच्यासारखी विद्यार्थिदशेतील तरुण मंडळी माझ्या भाषणाकडे आकर्षित झाली. सुमारे तीन वर्षे चाललेल्या या चळवळीत माझ्या भाषणामुळे आकर्षित झालेली शेकडो नागरी व ग्रामीण तरुण मंडळी सामील झाली. खेडेगावांतील श्रोते उद्‌गार काढीत,

"काय नाटकावानी बोलतोय!"

मी ऐतिहासिक उदाहरण किंवा दाखले देत असताना नाटकातील संवादासारखे संवाद रंगवून सांगत असे.

या चळवळीत मी दोनदा कारागृहवास भोगला. दोन्ही वेळा धुळे येथील कारागृहात माझी रवानगी झाली. तेथे १९३२ सालच्या चळवळीत शिक्षा झालेले अनेक देशभक्त एकत्र आले होते. त्यात विनोबा भावे, जमनालाल बजाज, पंजाबचे गुलजारीलाल नंदा, साने गुरुजी, दास्ताने इ. मंडळी होती. याच ठिकाणी विनोबा भावे यांच्या गीताप्रवचनांचा मला लाभ झाला. त्यांची प्रतिपादनशैली सुरेख व परिणामकारक होती.

तेथे मी स्वत: कलकत्त्यातील एका व्यापारी गृहस्थांना दशोपनिषदे शिकविली. ते गृहस्थ मी शिकविलेले नीट रीतीने टिपून घेत. ही टिपणे विनोबा भाव्यांसारख्या तज्ज्ञांच्या दृष्टीखालून रोज जात असत.

जमनलाल बजाज यांना समजले, की लक्ष्मणशास्त्री जोशी या नावाचे वेदशास्त्रज्ञ धर्मसुधारणा व समाजसुधारणा यांचे पुरस्कर्ते आहेत. त्यांनी माझी एके दिवशी संध्याकाळी भेट घेतली. थोडा वेळ चर्चा केली आणि म्हणाले,

''तुमची सहा महिन्यांची शिक्षा संपत आली आहे. तुम्ही येरवडा जेलमध्ये म. गांधींना भेटून तुमचे हे विचार सांगणार असाल, तर मी त्यांना तुम्हाला भेट देण्यासंबंधी पत्र लिहितो.''

मी एकदम होकार दिला.

कारागृहातून सुटका झाल्यानंतर पुण्यातील वृद्ध देशभक्त हरिभाऊ फाटक यांचा निरोप घेऊन माझे लहानपणाचे मित्र व सेनापती बापटांचे सहकारी चिंचवडचे बाळासाहेब देव हे मला भेटले आणि म्हणाले,

''महात्मा गांधींच्याकडे तुम्ही उद्या सकाळी दहा वाजता गेले पाहिजे. तेथे भारतातील अनेक शास्त्री-पंडित 'अस्पृश्यता निवारणाच्या विरुद्ध धर्मशास्त्र आहे,' असे गांधींना सांगत आहेत, तुम्ही गांधींच्या पुढे धर्म सुधारणेचे समर्थक हिंदू धर्मविषयक तत्त्वज्ञान मांडावयास पाहिजे.''

मी बाळासाहेब देवांचे म्हणणे त्वरित मान्य केले. येरवडा कारागृहात म. गांधींच्या भेटीस वारंवार जाऊ लागलो. म. गांधींची आणि माझी चर्चा वारंवार होऊ लागली. दोघांच्या विचारांमध्ये अनेक मौखिक प्रश्नांवर ऐकमत्य दिसू लागले. येरवडा कारागृहातील आंब्याच्या झाडाखाली गांधी खाटेवर कलते बसून चर्चा करीत. बाबू भगवानदास, प्राचार्य

आनंदशंकर ध्रुव, वाराणसी येथील तर्कभूषण आणि तर्करत्न अशी आधुनिक व प्राचीन विद्याविभूषितांशी गांधींची चर्चा सुरू होती, पंचानन तर्करत्न भट्टाचार्य गांधींना म्हणाले,

'तुमची हिंदू धर्मावर श्रद्धा आहे. परंतु अशा स्थितीतही तुम्ही हिंदू धर्माविरुद्ध अस्पृश्यता निवारणाचे महापाप करीत आहात. त्यामुळे तुम्हाला परलोकी दुर्गती प्राप्त होण्याचे भय आहे.'

यावर गांधींनी उत्तर दिले, की

'हिंदू धर्माप्रमाणे प्रत्येक मनुष्याच्या हृदयात परमेश्वर वसत आहे. त्यामुळे प्रत्येक मनुष्य देवाचे देऊळ आहे, अशी माझी श्रद्धा आहे. त्यामुळे मला दुर्गती कशी प्राप्त होईल?'

गांधींच्या या धार्मिक मानवतावादी विधानाचा त्या सनातनी परंपरानिष्ठ पंडितांच्या मनावरही एकदम खोल परिणाम झाला. ते पंडित लगेच म्हणाले,

'अशी तुमची श्रद्धा आहे. मग तुम्हाला दुर्गती कशी प्राप्त होणार?'

गांधींच्या अशा अनेक तात्त्विक विधानांच्यामुळे मी पूर्ण भारावून गेलो. अनेक वर्षे माझ्या व म. गांधींच्या गाठीभेटी होत.

दे. भ. काकासाहेब कालेलकर यांच्या सांगण्यावरून गांधींचा पुत्र देविदास आणि राजगोपालाचार्य यांची कन्या लक्ष्मी यांच्या विवाहाचे पौरोहित्य माझ्याकडे आले. हा आंतरजातीय विवाह खूप गाजला.

अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न चर्चिला जात असताना अस्पृश्य हा दलित वर्ग या देशात हजारो वर्षे अनन्यगतिक होऊन दारिद्र्यात निपचित पडला आहे, याची मीमांसा समाजवादी दृष्टिकोनातून अनेक मंडळी करू लागली. मार्क्सवादाचा संबंध भारतीय अर्थव्यवस्थेशी कसा पोहोचतो, याचे चिंतन सुरू झाले. या संदर्भात भारतातील श्रेष्ठ मार्क्सवादी आणि भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील सशस्त्र क्रांतिवादी एम. एन. रॉय यांचे लेखन मी बारकाईने वाचू लागलो.

१९३६ च्या अखेरीस एम. एन. रॉय यांची दीर्घ कारावासाच्या शिक्षेतून सुटका झाली. त्यांच्या विचारसरणीचेही एकंदर समालोचन मी करीत होतो.

त्यांच्या भेटीकरिता अत्यंत उत्सुक होतो.

पुणे येथे कै. डॉ. अ. भ. कर्णिक यांच्या घरी एम. एन. रॉय यांची भेट झाली. त्यांचे धिप्पाड शरीर, चेहऱ्यावरील प्रगल्भता यांची छाप पडली. वयाच्या सतराव्या वर्षापासून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनातील त्यांचे जिवाचा पण लावून लढलेले लढे, राष्ट्रवादाकडून मार्क्सच्या साम्यवादाकडे चालू असलेली त्यांची विचारयात्रा, चिंतनशील मन या सगळ्या गोष्टी त्यांच्या भेटीत माझ्या मनश्चक्षूंपुढे उभ्या राहिल्या.

जवळजवळ चार-पाच वर्षे मी मार्क्सवादाचे अध्ययन करीत होतो. एम. एन. रॉयना भेटल्यानंतर त्यांना मी पहिला प्रश्न विचारला. तो असा, की

'वेदस्मृतिपुराणे ही ईश्वराने व त्रिकालज्ञ ऋषी यांनी निर्मिलेली आहेत, अशी मी श्रद्धा बाळगत होतो, ती सोडली आहे. वेदस्मृतिपुराणे हीसुद्धा मानवरचितच आहेत, म्हणून मानवी ज्ञानाच्या मर्यादा त्या ग्रंथांनाही लागू आहेत; हे लक्षात घेऊन चिकित्सक दृष्टीने बुद्धिप्रामाण्यवादाचा अंगीकार करून त्यातील ग्राह्य काय व अग्राह्य काय, याचा विचार करू लागलो आहे. पुराणमतवादी श्रद्धेतून मी माझे मन मुक्त केले आहे. ते आता मार्क्सवादावरील श्रद्धेतून कसे बद्ध होऊ शकेल? मार्क्सचाही विचार तपासलाच पाहिजे. त्याच्याही मर्यादा ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे.'

'तुमचे म्हणणे लक्षात आले. मीसुद्धा मार्क्सवादाची बौद्धिक चिकित्सा करूनच ग्राह्य काय नि अग्राह्य काय, हे ठरवावे, अशा मताचा आहे.' एम. एन. रॉय म्हणाले.

या डॉ. कर्णिक यांच्या निवासस्थानी झालेल्या चर्चेनंतर मी मार्क्सचा भौतिकवादावर आधारलेला मानवतावाद मान्य केला.

एम. एन. रॉय हे माझे प्रज्ञावंत मित्र व गुरू म्हणून मला मान्य झाले. त्यांची माझी मैत्री अखेरपर्यंत टिकली. त्यांनी मार्क्सवादातून पुढे प्रवास केला; नव्या मानवतावादाची सूत्रबद्ध, तर्कशुद्ध मांडणी केली. या सर्व वैचारिक जीवनात एम. एन. रॉय यांचा मी सहकारी म्हणून सतत राहिलो आहे.

(दीपावली, दिवाळी अंक, १९८६, पृ. ११८, ११९, १९६, १९७,
मूळ शीर्षक: तीन प्रेरणास्थाने)

○○○

८०

साहित्य संस्कृती मंडळ आणि मी

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर महाराष्ट्राच्या भवितव्याची व्यापक अशी मांडणी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिभासंपन्न मनाने चालविली. ते व्यावहारिक राजकारणी पुरुष होते, तरी भारताची व राज्याची नवरचना व्हावी आणि इथल्या माणसाच्या सृजनशीलतेला प्रेरक वातावरण निर्माण व्हावे म्हणून महाराष्ट्राची मानवी स्वातंत्र्य व समता ह्या ध्येयाकडे वेगाने, अखंडपणे प्रगती होत राहावी याकरिता येथील ग्रामीण भागातील, नगर भागातील अर्थव्यवस्था नव्या तंत्रज्ञानावर उभारली जावी आणि ती उभारण्याची कामे येथील सामान्य मनुष्य, कुशल कामगार करू शकेल असे शिक्षण त्याला मिळावे, त्याकरिता महाराष्ट्रातील साहित्यिक आणि निरनिराळ्या भौतिक व सामाजिक शास्त्रांमध्ये प्रवीण असलेल्या नागरिकांचे नेतृत्व लाभावे आणि हे नेतृत्व मातृभाषेतच सामान्य माणसाला ज्ञानविज्ञान संपन्न करू शकेल तरच महाराष्ट्र विकासाच्या अनंत मार्गावर वेगाने गतिमान होऊ शकेल असा यशवंतराव चव्हाण यांचा साहित्य संस्कृती मंडळाच्या स्थापनेमागे उद्देश होता.

त्यांनी मला विद्वान कार्यकर्त्यांचा एक गट म्हणजे मंडळ सुचवा असे सांगितले. मी भौतिक, सामाजिक शास्त्रे आणि ललित साहित्य व कला ह्या क्षेत्रांतील काही निवडक व्यक्तींचे मंडळ त्यांना सुचविले. १६ माणसांची नावे त्यात दिली होती. तेव्हा यशवंतराव म्हणाले, "अहो तुम्ही १६ माणसे देता. हे एवढे विद्वान एकत्र आल्यावर वादविवादात वेळ जाईल. कामे बाजूला पडती." तेव्हा मी म्हटले, ''त्यांनी वादविवाद करावा हे मी गृहीत धरतो. 'वादे वादे जायते तत्त्वबोध:.' त्यातून काही तात्त्विक प्रश्न, मौलिक प्रश्न ह्यांचा उलगडा होऊ शकेल. परंतु अध्यक्ष या नात्याने मी त्यांच्या वादाला त्यांचा प्रक्षोभ होणार नाही अशा पद्धतीने मर्यादा घालू शकतो. त्यामध्ये माझी कसोटी लागते. विद्वानांना एका विशिष्ट तऱ्हेच्या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी मार्गदर्शन करणे हे अध्यक्षाचे काम आहे. ते मी करू शकलो नाही तर पण अशा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा नवा पाया घालण्याचा तुमचा

हेतू कार्यवाहीत कसा येणार?

निरनिराळ्या क्षेत्रांतल्या तज्ज्ञांच्या समित्या स्थापन करणे, त्यांच्यातर्फे कार्यक्रम आखणे आदी कामे प्रारंभी हाती घेण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञान किंवा आधुनिक विज्ञान ह्यासंबंधी मराठीत फार एकांगी व त्रोटक साहित्य आहे. मराठी विद्वान माणसे आधुनिक तंत्रज्ञान व विज्ञानात प्रवीण आहेत, परंतु त्यांचे लेखनकार्य प्रतिभा तर इंग्रजीमध्ये चालते. मराठीत त्यांनी लेखनकार्य केले पाहिजे. अभियांत्रिकी म्हणजे इंजिनीयरिंग या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आम्ही मोजदाद केली. त्यात ७५ पेक्षा अधिक शाखांत असे साहित्य निर्माण करायला पाहिजे, ज्यायोगे कुशल कामगार त्याचा उपयोग करू शकेल. जीवशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भौतिकी, रसायन ह्यासंबंधी सामान्यज्ञान वाचकास मिळणे आणि माध्यमिक व उच्च महाविद्यालयातील शिक्षकांना त्याचा उपयोग व्हावा या उद्देशाने ग्रंथनिर्मिती करता येईल आणि मार्गदर्शक पुस्तिका लिहिता येतील. महाराष्ट्रातील तंत्रज्ञ मंडळींना ह्या दृष्टीने आवाहन करण्यात आले आणि हळूहळू मंदगतीने प्रतिसाद मिळू लागला.

मानवी ज्ञानाच्या शाखांमध्ये जे नवे ज्ञान आज आले आहे ते सर्व ज्ञान मराठीत एकत्रित मांडण्यात यावे ह्यासाठी मराठी विश्वकोश हा महत्त्वाचा प्रकल्प साहित्य संस्कृती मंडळाने १९६२ मध्ये हाती घेतला आणि तो कार्यवाहीस येऊ लागला. निरनिराळ्या ज्ञान व कलांच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील व्यक्तींची नोंदणी शोधपूर्वक होऊ लागली.

महाराष्ट्राच्या सुशिक्षितांना, साहित्यिकांना विद्यापीठीय विद्वानांना मराठी भाषेच्या इतक्या विकासाच्या पायरीवर असलेल्या १४, १५ भाषा त्यांच्यामध्ये जी काही सारखी नवनिर्मिती होते त्याची माहिती नसते. म्हणून आंतरभारतीचा कार्यक्रम आखण्यात आला. कानडी, तामिळी, मल्याळम, तेलगू, गुजराथी, बंगाली इत्यादी भाषांची अध्ययने मराठीत जिज्ञासूंना करता यावी म्हणून द्विभाषेत कोश, भाषाप्रवेश, साहित्यपरिचय अशा तीन प्रकारची पुस्तकरचना त्या त्या भाषेच्या संदर्भात करण्यास प्रारंभ झाला. परंतु हा कार्यक्रम मागे पडला. तंत्रज्ञानाच्या ग्रंथरचनेचे कामही मागे पडले. आधुनिक ज्ञानविज्ञानासंबंधी महत्त्वाच्या ग्रंथांचे अनुवाद करण्याचे काम मागे पडले.

१९६२ साली यशवंतराव दिल्लीला गेल्यावर साहित्य संस्कृती मंडळ हा यशवंतरावांचा कार्यक्रम कन्नमवार व वसंतराव नाईक यांनी पाठिंबा देऊन पुढे नेण्याचा प्रयत्न केला. अडचणी उत्पन्न केल्या नाहीत. परंतु हे कार्य कितपत उपयुक्त आहे आणि खरोखर काही महत्त्वाच्या घटना घडवीत आहेत काय ह्याबद्दल वसंतराव नाईक यांना शंका आली. ते यशवंतरावाच्या नंतर ११ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी माजी मुख्य सचिव राजवाडे यांचे एकसदस्य चौकशी मंडळ नेमले. राजवाडे यांनी त्यासंबंधी काम केले. मंडळातील सदस्य, बाहेरचे विद्वान व संबंधित कार्यकर्ते यांच्या मुलाखती घेतल्या आणि आपला

अहवाल सादर केला. तो अहवाल शासनाने कधीच पुढे आणला नाही; तसाच मागे ठेवला. परंतु राजवाडे यांच्या चौकशी मंडळाने साहित्य संस्कृती मंडळाच्या कार्याची भलावणच केली होती, असे माझ्या आणि त्या वेळच्या विद्वान सदस्यांच्या लक्षात आले. हा अहवाल प्रतिकूल असता तर मंडळाच्या कामात अनेक प्रश्न उपस्थित झाले असते. पण तसे घडले नाही. नंतर वसंतदादा मुख्यमंत्री झाल्यावर त्यांचाही ह्या प्रकल्पाला पाठिंबा होता.

ह्या मंडळाच्या एकंदर कार्यकक्षा पहिल्या योजनेप्रमाणे खूपच विस्तारायला पाहिजे होत्या. पण विस्तारण्याऐवजी अलीकडे संकुचित होत गेलेल्या दिसतात. ह्याचे कारण दर तीन वर्षांनी जे मंडळ नेमले जाते, त्या मंडळाचे सदस्य व अध्यक्ष यांना मूळचे कार्याचे विशिष्ट उद्देश पटलेले असावेत तसे पटलेले दिसत नाहीत. परंतु महाराष्ट्राच्या मराठी भाषेच्या दृष्टीने ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात प्रभावी असा कार्यक्रम मूर्त रूपात आला नाही तर माध्यमिक व उच्च शिक्षण या क्षेत्रात मराठी विद्यार्थी-विद्यार्थिनींची प्रगती होणे अशक्य होईल. कारण इंग्लिश भाषेचे शिक्षण त्यांना चांगल्या रीतीने मिळू शकेल असे वाटत नाही. इंग्लिश भाषेचे निरनिराळ्या विषयांचे चांगले शिक्षण, सखोल शिक्षण देण्याकरिता आवश्यक अशी विद्यावंतांची मोठ्या संख्येची पुरेशी अशी मागणी पुरविता येईल, असे मुळीच म्हणता येत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रातील बहुजन समाज हा विचार करता शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला राहण्याचा धोका मोठा आहे.

(लोकप्रभा, दिवाळी, १९८८, पृ. १०९ व ११०)

○○○

८१

‘ऐ गोरख, तूने मच्छिंद्र को भी जीता है’

फार जुनी हकिकत मी सांगतो. १९१७ साल उजाडले. वाई येथील प्राज्ञपाठशाळेत वेदान्ताचे अध्ययन करण्याकरता स्वातंत्र्य चळवळीतील अनेक कार्यकर्ते येऊ लागले. त्यात जानेवारीच्या अखेरच्या आठवड्यात महात्मा गांधींच्या साबरमती आश्रमातून आलेले विनोबा भावे हेही होते. ते त्यांच्या अजोबांनी बांधलेल्या घरात उतरले. आजोबांचे नाव शंभूराव. हे घर वाईच्या ब्राह्मणशाही या आळीत कोटेश्वर मंदिराजवळ आहे. कोटेश्वर हे भाव्यांच्याच मालकीचे मंदिर. जाड्याभरड्या खादीच्या वेषात विनोबा भावे हे प्राज्ञ पाठशाळेच्या मुख्य आचार्यांकडे प्रात:काली आठच्या सुमारास उपस्थित झाले. भावे यांनी ‘‘शंकराचार्यांची प्रस्थानत्रयी शिकण्याकरिता आलो,’’ असे मुख्य अचार्य नारायणशास्त्री मराठे यांना सांगितले. प्रस्थानत्रयी म्हणजे उपनिषद्भाष्य, गीताभाष्य आणि ब्रह्मसूत्रभाष्य. आवश्यक ती चौकशी व प्राथमिक चर्चा झाली. प्रात:काली आठ वाजता शांकरभाष्याचे पाठ सुरू झाले. वीस ते बावीस वर्षे वयाच्या मर्यादीत असलेले प्रौढ विद्यार्थी शांकरभाष्याचा पाठ घेत होते. दीड-दोन महिन्यानंतर वाईत प्लेगचा उपद्रव सुरू झाला. प्राज्ञ पाठशाळेची शिक्षक व विद्यार्थी मंडळी प्लेगचा उपद्रव टाळण्याकरता नदीच्या पैलतीरावर पर्णकुट्या बांधून राहू लागली. तेथेच पाठ व त्यानंतरची चर्चा होत असे. पाठाच्या पूर्वी पूर्वावलोकन व पाठांतर झालेल्या विषयाची आवृत्ती विद्यार्थी एकत्र बसून करीत. विनोबा भावे त्यात सामील होत नव्हते. या प्लेगात बांधलेल्या कुटी लहानशा आमराईत उभारल्या होत्या. विनोबा या आमराईमध्ये शांकरभाष्याचे मुक्तकंठाने पठण करीत असत. आचार्य नारायणशास्त्री मराठे यांना त्यांचे ते पठण फार रोचक वाटत असे. विनोबांची पठणशैली सुरेख व अनुकरणीय आहे, असे ते इतर विद्यार्थ्यांना सांगत असत. थंडी गेली, प्लेग गेला. वस्ती पुन्हा गावात परतली. विनोबा आजोबांचे घर सोडून प्राज्ञ पाठशाळेच्या शेजारी असलेल्या एका मित्राच्या घरी माडीवर राहावयास आले. पहाटेस विनोबा स्वत:ची बाजरी, जोंधळा किंवा गहू दळून

काढत. मित्राची आई विनोबांना भाकरी किंवा चपाती भाजून देई.

ब्रह्मसूत्रभाष्यातील महत्त्वाचे असे संदर्भ शिकून झाल्यावर विनोबांना शांकरभाष्याचे आकलन गुरूच्या साहाय्यावाचून होऊ लागले. प्रस्थानत्रयीचा बराचसा भाग त्यांनी अभ्यासिला. साबरमती आश्रमातून महात्मा गांधींच्या संमतीने ते वाईस आले होते. आणि एका वर्षात परत आश्रमात परतायचे, असे त्यांनी ठरविले होते. त्याप्रमाणे वाई येथील अध्ययनाचा संपवलेला कार्यक्रम महात्मा गांधींना पत्राने कळवला. विनोबांचे हे पत्र वाचून म. गांधी आश्चर्यचकित झाले. शंकराचार्यांची प्रस्थानत्रयी एका वर्षात संपविणाऱ्या या प्रज्ञावंताने म. गांधींना चकित करून सोडले. गांधींनी 'आश्रमात वाट पाहत आहे' असे पत्रात कळवून म्हटले की, 'ऐ गोरख, तूने मच्छिंद्र को भी जीता है'. नवनाथांमध्ये पहिले नाथ प्रत्यक्ष पार्वतीपती शिव. त्या शिवाला आदिनाथ म्हणतात. त्याचा शिष्य मच्छिंद्रनाथ. मच्छिंद्रनाथाचा शिष्य गोरखनाथ हा तिसरा नाथ होय. याने सगळ्या विषयवासनांवर विजय मिळविला होता. त्यामुळे मच्छिंद्रनाथ हे गोरखनाथाच्या जितेंद्रियाला पाहून चकित झाले. त्या वेळचे मच्छिंद्रनाथांचे वरील उद्‌गार होत.

(दैनिक सकाळ, पुणे; दि. ४ नोव्हेंबर, १९८८)

○○○

८२

स्वातंत्र्य चळवळीतील माझा कारावास

स्वातंत्र्य संग्रामात मुख्यतः तरुणवर्ग व स्त्री-पुरुषांनी मोठ्या संख्येने सामील व्हावे अशी म. गांधींनी विनंती केली. त्या वेळी सदर चळवळ अहिंसात्मक असावी अशी त्यांची अट होती. मी त्या वेळी पक्का अहिंसवादी नव्हतो. परंतु गांधीजींचे नेतृत्व आम्ही मान्य करून, त्यांची अट मान्य करून, प्रचार करू लागलो. पहिल्यांदा २००/२५० कार्यकर्त्यांचे शिबिर संगमनेरला भरविले. प्रचार करताना काय काय सांगायचे हे मी त्यांना समजावून सांगत असे. परंतु ते शिबिर कलेक्टरनी मोडले. हे शिबिर दीड महिना चालू होते. त्या काळात तेथील व्यापाऱ्यांनी लोकांना जेवण पुरविले. त्यानंतर नासिक जिल्ह्यातील बागलाण जवळील नामपूर नावाच्या मध्यम वस्तीच्या गावात आम्ही हे शिबिर संघटित केले. त्या शिबिराला शंकरराव देवांसारखी बाहेरची नेतेमंडळी उपस्थित होती. नासिकच्या नेत्यांनी सतत भेटी दिल्या. तेथील व्यापाऱ्यांनी सैनिकांना जेवण वगैरे सर्व मदत केली. ही १९३० सालची गोष्ट आहे. मग मला सक्तमजुरीची शिक्षा देऊन धुळे जेलमध्ये पाठविले. नंतर ही चळवळ गांधीजींनी बंद केली. मग सरकारने सर्व बंदींना मुक्त केले. नंतर गांधीजी व आयर्विन यांची चर्चा झाली परंतु एकमत झाले नाही. म्हणून गांधीजींनी पुन्हा सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. त्या वेळच्या धरपकडीमध्ये मीही पकडला गेलो व पुन्हा मला धुळे जेलमध्ये पाठविले. तेथे १५० सत्याग्रही होते. कायदेभंग करून आलेले जमनालाल बजाज, विनोबा भावे इ. मंडळी तेथे होती. विनोबांची गीतेवर प्रवचने झाली. ती प्रसिध्द आहेत. तेथे सत्याग्रहाचा सिध्दांत त्यांनी भगवद्गीतेच्या माध्यमातून सांगितला. जमनालाल बजाज यांना सक्तमजुरीची शिक्षा होती. पंजाबचे एक मोठे नेते आमच्याबरोबर होते. तेथे साने गुरुजींनी विनोबांची प्रवचने लिहून काढली. मला पुन्हा ६ / ६ महिन्यांची शिक्षा झाली होती. गांधीजींनी सत्याग्रह मागे घेतल्याबरोबर सत्याग्रहींची सुटका झाली. अशा रीतीने दोनदा मी जेल भोगला आहे. भारत छोडो चळवळीच्या वेळी मी जेलमध्ये नव्हतो. गुलझारीलाल नंदा

तसेच गुजराथेतील काही प्रमुख नेते आमच्याबरोबर धुळे येथे होते. बजाज यांची कंबर, पाठ दुखायची, परंतु पाणी ओढण्याची शिक्षा ते खुशीने भोगत होते.

सातारा जिल्ह्यामध्ये या चळवळीतून ग्रामीण नेते निर्माण झाले. परंतु त्यांच्यापैकी काही लोकांच्या मनातून हिंसक भावना प्रकटत होती. पत्री ठोकणे वगैरेखाली काही लोकांच्या पायांना इजा केल्या.

शंकर विठ्ठल लेले त्या काळात प्राज्ञ पाठशाळेचे व्यवस्थापक होते. त्यांनी सातारा जिल्ह्यात फार मोठा प्रचार केला. त्यांच्यावर उठावाचे आरोप ठेवण्यात येऊन खटला भरला परंतु ते आरोप सिध्द झाले नाहीत. ते सिद्ध झाले असते तर जन्मठेपेची शिक्षा त्यांना खचित झाली असती.

स्वातंत्र्य सैनिक येथे सारखे आश्रयासाठी यायचे. त्यांना इथे जेवण पुरविले जायचे. चळवळीत काम करणाऱ्या मंडळींना प्राज्ञपाठशाळा हे मोठे आश्रयस्थान होते. भैय्याशास्त्री वाटवे हे तेथील मोठे कार्यकर्ते होते. ते शिक्षक मंडळींना जिवाभावाने सांभाळीत होते.

मी शहरी कार्यकर्ता नसून ग्रामीण कार्यकर्ताच आहे. माझी कराडला सात व्याख्याने झाली. त्याच काळात गांधींजींचा दांडी मार्च होता. 'कृष्णाकाठ' या पुस्तकात यशवंतराव चव्हाणांनी माझ्या व्याख्यानांचा उल्लेख केला आहे. सातारा येथील राष्ट्रीय शाळेने या काळात फार मोठी मदत केली. भावे, लिमये, नाथ, घाणेकर वगैरे सातारच्या मंडळींनी स्वातंत्र्य युध्दात हिरिरीने भाग घेतला होता.

(स्वातंत्र्य चळवळीतील सातारा जिल्हा, संभाजीराव पाटणे
सुशीला प्रकाशन, सातारा, १५ ऑगस्ट, १९९२, पृ. ७३-७४)

ooo

८३

बालपणीचं माझं वेदवाचन

जुन्या धार्मिक परंपरेत मी जन्मलो. त्यामुळे जन्मल्यापासून किंवा आधीपासून कर्मकांडातील मंत्र माझ्याभोवती व माझ्या मातेच्या भोवती उच्चारले जात. हे मंत्र वेदशास्त्रातले म्हणजे अतिप्राचीन पुस्तकातले होत. माझे उपनयन झाल्यावर मला यजुर्वेद शिकविला. यजुर्वेदातील संहिता आणि शतपथब्राह्मण ह्यांतील काही भाग शिकविण्यात आले. मला उपनयन झाल्यावर वेद शिकविले, त्याचबरोबरच अमरकोश पढविला. म्हणजे तोंडपाठ करवून घेतला. संस्कृतविद्येमध्ये मला विशेष गती प्राप्त व्हावी, याकरिता संस्कृतमधील महाकाव्ये शिकविली. कालिदासचे रघुवंश हे काव्य शिकविले. सबंध नव्हे, त्यातील काही सर्ग. गोरक्षण करणारा सम्राट दिलीप याची कथा या दुसऱ्या सर्गात आहे. शाकुंतल हे सुंदर संस्कृत नाटक मी शिकलो. त्यानंतर स्वतःच रामायण आणि महाभारत वाचले. श्रीमतभागवत दशमस्कंध वाचला. या दशमस्कंधात भगवान श्रीकृष्णाचे चरित्र आहे. असा हा संस्कृत ग्रंथांचा वेढा माझ्याभोवती पडला.

ज्या गुरूंपाशी मी उच्च संस्कृत ग्रंथ, म्हणजे शास्त्रे शिकलो, ते ज्या लहानशा घरात राहत, ते घर वाईत कृष्णेच्या घाटावर आहे. ते मारुतीचे मंदिर आहे. त्याच्या छोट्या माडीवर माझे गुरू नारायणशास्त्री मराठे राहत. त्या माडीत सातआठ काचेचे दरवाजे असलेली पुस्तकांची कपाटे होती. मी विनोबा भावे यांच्यापाशी इंग्लिश शिकलो आणि इंग्लिश ग्रंथ विकत घ्यायला लागलो. इंग्लिशमधील भारतीय तत्त्वज्ञानाचा मोठा इतिहास माझ्या कपाटात आला. एन्सायक्लोपीडीआ ब्रिटानिका माझ्या एका चाहत्याने मला दिला. नावाजलेली चौदावी आवृत्ती मला मिळाली, परंतु तीसुद्धा जुनी झाली होती. इंग्लिशमध्ये ग्रंथांची भर झपाट्याने पडत असते. तेव्हापासून ग्रंथांचा संग्रह मी वाढवीत आहे. महामहोपाध्याय पांडुरंग वामन काणे यांचा 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र' हा जाड्याजुड्या प्रचंड अनेक ग्रंथांचा संग्रह आहे. तो माझ्याजवळ ठेवावाच लागतो. संस्कृतमधील भारतीय दर्शनांची म्हणजे

तत्त्वज्ञानांची जाडीजुडी ग्रंथमाला माझ्या कपाटात जपून ठेवली आहे.

मी मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या ध्येयवादाशी चांगले जमवून घेतले. तद्‌निमित्त ध्येयवादाच्या चर्चा असलेले ग्रंथ ठेवू लागलो. अद्ययावत विचारसरणी म्हणून मी मार्क्सवादी ग्रंथ जवळ ठेवू लागलो. परंतु अलीकडे मार्क्सवादाला बांधून घेणे माझ्या बुद्धीला परवडेनासे झाले. आधुनिक भौतिक विज्ञान फार वेगाने नवी नवी विचारांची क्षितिजे आक्रमित आहे. पारितोषिकवाले तत्त्ववेत्त्यांमध्ये चमकू लागले आहेत. रिचर्ड फिनमन याचे 'QED' (The Strange Theory of Light and Matter) फिजिक्स म्हणजे भौतिकशास्त्र हे पौर्वात्य आध्यात्मिक अनुभवाच्या चक्रात कळत नकळत पाऊल टाकते, असे आधुनिक महान भौतिकशास्त्रज्ञ आइन्स्टाईनचे मत आहे. फार मोठी खोल गूढता आधुनिक विज्ञानाच्या व्यासंगी शास्त्रज्ञांना अनुभवास येते. मी त्यांचे ग्रंथ अलीकडे वाचत असतो. त्यातील एका मोठ्या शास्त्रज्ञाने आपल्या प्रौढ विद्यार्थ्यांना बजावले आहे, की "विषय नीट कळत नाही म्हणून ढळू नका, हटू नका."

मी मराठीमध्ये विश्वकोशाचे चौदा खंड आतापर्यंत प्रकाशित केले. त्यांचा खप भराभर होतो. एक एक खंड हजार ते दीड हजार पृष्ठांचा आहे. प्रत्येक खंडाची किंमत रु. शंभर आहे. परंतु दहा हजार प्रती काढल्या तरी त्या संपतात. पुस्तकविक्रेत्यांची तक्रार असते, की लोक लोकांचे ग्रंथ वाचतात, स्वतःचे ग्रंथ घेत नाहीत. हे जरी खरे असले, तरी मराठी विश्वकोशाचे ग्रंथ खपतातच. जाडे जाडे संस्कृतमधील शास्त्रग्रंथ निर्णयसागर नावाच्या मुंबईच्या छापखान्यात सुंदर लिपीत छापले जात. तेही खपत. आता निर्णयसागर छापखाना बंद झाला आहे.

मराठीमध्ये संतवाङ्मयाचा खप चांगला होतो. ज्ञानेश्वरीचा भाषांतरासह भक्तजनांमध्ये खूप प्रसार आहे. ज्ञानेश्वरीची पारायणे भाविक लोक करतात. ज्ञानेश्वरी सातशे वर्षांच्या पूर्वीच्या भाषेत आहे. परंतु श्रद्धेमुळे त्याचे पठण पवित्र समजून करत असतात. वारकरी संप्रदायात 'तुकारामाची गाथा' घेणारे भाविक लोक आहेत. कथा, गोष्टी वाचण्यात मन रमते, म्हणून लघुकथा, गोष्टी, कादंबऱ्या चांगल्या खपतात. परंतु संतवाङ्मयसुद्धा खपत राहते. संदर्भ ग्रंथ म्हणून इंग्लिशमधला 'वैदिक इंडेक्स' हा दोन हजार पृष्ठांचा ग्रंथ अभ्यासू मनुष्याला आवश्यक आहे. मॅक्डोनेल व किथ या दोघांनी अत्यंत परिश्रमपूर्वक 'वैदिक इंडेक्स' संपादित केला. या इंडेक्सवरून या दोघांची संस्कृत साहित्यावरील व्यापक आणि सूक्ष्म विद्वत्ता निदर्शनास येते. गेल्या शतकात महामहोपाध्याय भीमाचार्य झळकीकर हे प्राचीन शास्त्राचे पंडित होऊन गेले. त्यांनी तर्कशास्त्राच्या ग्रंथांचे अवलोकन करून न्यायशास्त्राचा कोश तयार केला. मराठी साहित्यात अत्यंत महत्त्वाचे जे संदर्भग्रंथ झाले आहेत, त्यातील 'गाथापंचक' अर्थात 'सकलसंत गाथा' हा ग्रंथ त्र्यंबक हरी आवटे यांनी अनेक वेळा प्रसिद्ध केला. त्यात ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि निळोबा यांचे अभंग समाविष्ट केले

आहेत. सांप्रदायिक श्रीनानामहाराज साखरे- ज्ञानेश्वरीचे भाषांतरकार- यांनी गाथापंचक ग्रंथ संशोधनपूर्वक प्रसिद्ध केला आहे. मराठी प्राचीन साहित्याचे संशोधक, विशेषतः महानुभाव साहित्यात विशेष अधिकार असलेले डॉ. वि. भि. कोलते यांनी 'लीळाचरित्र' हा म्हाइंभट संकलित ग्रंथ मोठ्या आस्थेने प्रसिद्ध केला आहे. त्याला उत्कृष्ट मार्गदर्शक टिपण्या दिल्या आहेत. हा जवळजवळ सहस्त्र पृष्ठांचा ग्रंथ आहे.

पुण्यातील विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव हे मोठे चतुरस्त्र विद्वान होते. त्यांनी व्याकरण महाभाष्याचा शब्दकोश तयार केला. त्याहीपेक्षा अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, 'प्राचीन चरित्रकोश' बाराशे पृष्ठांच्यापेक्षा मोठा संपादून प्रसिद्ध केला. या चरित्रकोशामुळे श्रुतिस्मृतिपुराणांच्यामध्ये ज्या व्यक्तींचा निर्देश आला आहे, त्या सर्व व्यक्तींचे उपलब्ध असलेले चरित्र दिले आहे. अशा हजारो व्यक्ती या चरित्रकोशात नोंदलेल्या आहेत. व्यक्तीच नव्हे, तर शहरे आणि गावे यांचीही माहिती दिली आहे. उदा. वाल्मिकी रामायणात मैनाक नावाचा पर्वत आहे, याचीही कथा आहे. इंद्राने पर्वताचे पंख तोडले. पृथ्वीवरील सगळ्या पर्वतांना एकेकाळी पंख होते. या पर्वताचे भय सगळ्या जगाला होते. म्हणून इंद्राने जगाला संकटातून मुक्त करण्याकरिता पर्वताचे पंख तोडले. ही कथा या चरित्रकोशात मिळते. सगळ्या प्राचीन लहानमोठ्या कथा या बाराशे पृष्ठांच्या चरित्रग्रंथात मिळतात.

मी ग्रंथांच्या भरलेल्या कपाटांमध्ये माझी अभ्यासिका ठेवली आहे. माझेच ग्रंथालय सुमारे ६० हजार पुस्तकांचे असून छापखाना निघण्यापूर्वी लिहिलेल्या सुमारे २० हजार हस्तलिखित पोथ्या माझ्या ग्रंथालयात आहेत. छापखान्यापूर्वी विद्यार्थ्यांना आणि वाचकांना लेखकांकडून लिखित पुस्तके मिळत. पुस्तक लेखन हा त्या वेळी धंदा होता.

('ग्रंथांच्या सहवासात,'
संपा. सारंग दर्शने, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई,
५ मे, २००९, पृ. ११२ ते ११५,
मूळ शीर्षक: बालपणीचं वेदवाचन)

○○○

इ)

प्रवासवर्णनपर लेख

८४

रंगून सांस्कृतिक स्वातंत्र्य परिषद

गेल्या महिन्यात, फेब्रुवारी १७, १८, १९ व २० या दिनांकी रंगून येथे आशियाई राष्ट्रांच्या प्रतिनिधींची संस्कृतिविषयक विचारविनिमय करण्याकरिता परिषद भरली होती. या परिषदेस अत्यंत निवडक असे ६० प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेची तयारी आशियाच्या संस्कृती स्वातंत्र्य समितीचे कार्यवाह श्री. प्रभाकर पाध्ये व श्री. व. भ. कर्णिक यांनी केली होती. ब्रह्मदेशातील संस्कृती स्वातंत्र्य समिती व ब्रह्मी राज्यसरकार दोघांच्या सहकारामुळे व उदार आतिथ्यामुळे ही परिषद चांगली पार पडली. या परिषदेच्या यशाची उत्तम दोन गमके होत. संस्कृतीसंबंधी मूलगामी चर्चा थाटात करण्यास आधारभूत म्हणून उपयोगी पडतील असे २४ निबंध आशियातील मोठमोठ्या विचारवंतांकडून परिषदेस सादर केले होते. उदाहरणार्थ प्राचार्य गोकाक "भारतातील आधुनिक कला व सौंदर्यशास्त्र'', प्रा. गोवर्धन पारीख यांचा ''आशियातील राष्ट्रांचे पुनःरुत्थान", ईस्टर्न इकॉनमिस्टचे दिल्ली येथील संपादक कॉस्टा यांचा "आशियाना आर्थिक विकास", टोकिओ विश्वविद्यालयाचे प्रा. नाकामुरा यांचा ''आशियातील धर्मांची जीवनशक्ती'' मायकल पोलान्वी यांचा ''स्वातंत्र्याचे भविष्य'', इंडोनेशियाचे तगदीर अलिस जबाना यांचा "आपल्या संस्कृतीतील आधुनिक व परंपरागत मूल्ये", फिलिप्स स्प्रॅट यांचा "आशियातील सांस्कृतिक स्वातंत्र्याला हुकूमशाहीचा धोका", टोकिओ विश्वविद्यालयाचे ताकेयाझा यांचा "बुद्धिजीवी वर्ग व कम्युनिझम" इत्यादी निबंध अत्यंत विचारप्रवर्तक होते. निबंधांच्या प्रती प्रतिनिधींना पहिल्या दिवशी वाटल्या होत्या. त्यामुळे प्रतिनिधींना यावर वाचन करण्यास अवसर मिळाला होता. परिषदेचे काम प्रतिदिन एकंदर ७ तास चालत असे. तरी प्रतिनिधी कंटाळलेले दिसले नाहीत. रंगून येथील एका सुंदर सरोवराच्या तीरावरील 'युनियन क्लब'च्या विशाल महालात परिषदेची अधिवेशने व चर्चा झाल्या. हवा समशीतोष्ण होती. खाद्यपेयांची चंगळ होती. आणि रोज संध्याकाळी नृत्य, नाट्य, गायन, वादन इत्यादी करमणुकीचे कार्यक्रम झाले. त्यामुळे सर्व गोष्टी संस्मरणीय अशा झाल्या. प्रतिनिधींचा निवास एकत्रच असल्यामुळे थोडक्याच अवधीत आपसांत

परिचय होऊन खेळीमेळीच्या चर्चांनी व प्रसंगोपात्त संवादांनी तो दृढ झाला. मैत्रीचे वातावरण टिकल्यामुळे भावनांना स्निग्धता आली.

श्री. मिनू मसानी, जयप्रकाश नारायण, प्रभाकर पाध्ये व कर्णिक यांच्या सौजन्याची छाप सर्व प्रतिनिधींच्या मनावर चांगली पडली. जयप्रकाश यांना ओळीने चार दिवस जवळून पाहण्याचा योग आल्यामुळे त्यांचा साधेपणा व गंभीर व्यक्तिमत्त्व आशियातील प्रतिनिधींना संस्कृतीचे थोर प्रतीक म्हणून आकर्षक वाटले. या परिषदेवर अर्थशास्त्रज्ञ या नात्याने दिल्लीचे डी. कॉस्टा यांचा प्रभाव चांगला पडला. पाकिस्तानचे कायदेपंडित ए. के. ब्रोही यांचे अस्खलित वक्तृत्वही श्रोत्यांना अनेक वेळा ऐकावयास मिळाले. जपानच्या प्रतिनिधींमध्ये एकापेक्षा एक सवाई अशी अनेक चमकदार रत्ने होती. प्रा. नाकामुरा हे संस्कृतचे उत्कृष्ट पंडित; प्रा. ताकेयामा जर्मन वाङ्मयाचे पंडित व मानसशास्त्र सूक्ष्मदर्शी प्रज्ञावंत; त्याचप्रमाणे वातानाबे हे इंग्लिश वाङ्मयाचे व राज्यशास्त्राचे अनुभवी विद्वान; म्हणून हे प्रतिनिधींच्या ध्यानात कायम राहिले. जपानी मंडळींत एक बडे पत्रपंडित व साहित्यकारही होते. ब्रह्मदेशचे काही प्रतिनिधी फार मोठ्या योग्यतेचे होते. उच्चतम न्यायालयाचे न्यायाधीश ऊ चान् तून हे बुद्धधर्मी थोर तत्त्वचिंतक तर खरेच; परंतु त्यांच्या औदार्यामुळे, वैचारिक मार्गदर्शनामुळे व विनयाने परिषदेला साफल्य आले.

या परिषदेत ठरावांना विशेष महत्त्व नव्हते. विचार विनिमय व तत्त्वचर्चा हेच या परिषदेचे वैशिष्ट्य होय. या परिषदेत कम्युनिस्ट राष्ट्रांचे प्रतिनिधी निमंत्रित केले नव्हते. याची मुख्य दोन कारणे होत. एक कारण असे की, मानवी संस्कृतीची प्रेरक शक्ती वैचारिक स्वातंत्र्य होय, हा सिद्धान्त या सांस्कृतिक परिषदेचा आधारभूत सिद्धान्त होता. वैचारिक स्वातंत्र्याचा सिद्धान्त कम्युनिझमला मान्य नाही. दुसरे कारण असे की, जगातील परंपरागत विद्यमान संस्कृती व त्यांचे वैचित्र्य मानवी प्रगतीस वर्तमान व भविष्यकाळीही उपकारक होऊ शकतील, त्यांच्यात परिवर्तन होणे आवश्यक असले तरी त्यांचा मूलतः नाश होण्याची आवश्यकता नाही असा परिषदेचा मूलभूत सिद्धान्त होता. हाही सिद्धान्त कम्युनिझमला मान्य नाही. कम्युनिझमला एकाच प्रकारची संस्कृती सगळ्या जगात स्थापन करावयाची आहे. जगातील विद्यमान भिन्नभिन्न संस्कृतीच्या स्वातंत्र्याला व वाढीला पूरक अशी परिस्थिती व विचार शोधून काढण्याकरिता ही परिषद भरविली होती. कम्युनिस्ट विचारसरणीशी व ध्येयवादाशी मूलतःच विरोध असल्यामुळे त्या राष्ट्रांचे प्रतिनिधी निमंत्रित केले गेले नाहीत.

चर्चेचे लहानमोठे मुद्दे एकंदर तीन विषयांमध्ये वर्गीकरण करून समाविष्ट केले होते. चर्चा भरघोस झाली. परंतु चार दिवस चर्चा होऊनही तपशिलातील अनेक महत्त्वाचे मुद्दे स्पर्श न करताच राहून गेले, असे वाटले. सर्व चर्चा इंग्लिशमधूनच झाली; त्यामुळे अनेकांना अभिप्राय सफाईने व्यक्त करण्यास गैरसोय वाटली. हिंदुस्थान, पाकिस्तान, ब्रह्मदेश व फिलिपाईन या चार देशांतील प्रतिनिधींच्याशिवाय बाकीच्या प्रतिनिधींना इंग्लिश बोलण्याचा सराव फारच कमी दिसला; परंतु आलेले सगळे प्रतिनिधी इंग्लिश उत्तम प्रकारे जाणणारे होते, यात शंका नाही.

आशियातील नवजागृतीचा अर्थ, आशियातील संस्कृतीच्या अधोगतीची कारणे, सांस्कृतिक स्वातंत्र्याची वाढ करण्यास उपयुक्त साधने आणि कम्युनिस्ट किंवा अन्य प्रकारच्या हुकूमशाहीच्या प्रभावाची मीमांसा- या मुद्द्यांचा विस्तृत खल करण्यात आला. त्याबरोबर आर्थिक नियोजन व विकास यांचेही समालोचन उद्‌बोधक रीतीने करण्यात आले.

'ईस्टर्न इकॉनमिस्ट', दिल्ली या साताहिकाचे संपादक डी कॉस्टा यांनी आर्थिक नियोजन व लोकशाही स्वातंत्र्य यांचा परस्परविरोध मानण्याचे कारण नाही, असा मुद्दा आग्रहाने प्रतिपादिला. त्यांनी आर्थिक नियोजनासंबंधी एक महत्त्वाची सूचना अशी केली की, आशिया खंडातील जापानशिवाय अन्य बहुतेक राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या मागासलेली असल्यामुळे सद्यःपरिस्थितीच्या संदर्भात आर्थिक नियोजन केल्याशिवाय त्यांची औद्योगिक प्रगती होणार नाही; त्यांचे दैन्य व उपासमार टाळण्याचा दुसरा उपाय नाही. आशियातील हिंदुस्तान व पाकिस्तानसारखी राष्ट्रे आपापले नियोजन स्वतंत्रपणे करीत आहेत. ही राष्ट्रीय नियोजने स्वतंत्रपणे अलग चालल्यास आशियाई राष्ट्रांची आर्थिक प्रगती सुसंवादीपणे होणार नाही. आशियाई राष्ट्रांचे नियोजन परस्परावलंबी असेच आखले पाहिजे. ब्रह्मदेशात सध्या फार महागाई आहे. हिंदुस्थानाचा पक्का माल विकत घेण्यास लागणारा मोबदला ब्रह्मदेशापाशी नाही; केवळ तांदूळ त्यांच्यापाशी आहे. तो तर हिंदुस्थानास नको आहे. अशा प्रकारची विसंगती टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय नियोजनच करणे आवश्यक आहे. डी कॉस्टा यांनी उपस्थित केलेल्या या चर्चेत भाग घेत असताना पाकिस्तानचे सर्वार हसन यांनी प्रा. गोवर्धन पारीख यांच्या निबंधातील नियोजनसंबंधी सूचनांकडे प्रतिनिधींचे लक्ष वेधून घेतले. श्री. जयप्रकाश नारायण यांनी भूदान चळवळ, मानवी स्वातंत्र्य व आर्थिक प्रश्न यांचे कोडे उलगडू शकते, असे आश्वासन दिले. परंतु जयप्रकाश नारायण यांचा ग्रामोद्योगप्रधान अर्थशास्त्रसंबंधीचा आग्रह विद्यमान जागतिक भौतिकशास्त्रीय प्रगतीशी विसंगत असल्यामुळे अव्यवहार्य आहे अशी विचारवंत प्रतिनिधींची प्रतिक्रिया खाजगी चर्चेत पुन:पुन: प्रकट झाली. भूदान चळवळीचे नैतिक मूल्य मात्र बहुतेकांना पटलेसे दिले.

हुकूमशाही प्रवृत्तीचा फार मोठा धोका आशियातील लोकशाहींना व संस्कृतींना कसा आहे या बाबतीत अत्यंत विचारप्रवर्तक असे मुद्दे तेथे सादर केलेल्या निबंधांत व प्रतिनिधींच्या भाषणांत मांडले गेले. हिंदुस्थानातील जातिसंस्था ही व्यक्तिस्वातंत्र्याची व लोकशाही समतेची बीजे नीट रुजू देणार नाही; पाकिस्तानातील इस्लामी हेका हा धार्मिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक स्वातंत्र्य व विशेषत: विचारस्वातंत्र्य यांना घातक ठरण्याचा संभव आहे; जपानमधील राजनिष्ठा व लष्करी इभ्रतीची भावना साम्राज्यशाही महत्त्वाकांक्षेचे गुप्त परंतु जबरदस्त असे मूळ आहे; आशियातील राष्ट्रांमधील रूढिप्रियता, अंधश्रद्धा व पारलौकिक विचारसरणीची परंपरा लोकशाही संस्कृतीला व ऐहिक प्रगतीला बाधक आहे- अशा प्रकारचे विचार अनेक प्रतिनिधींनी व निबंधांनी व्यक्त केले.

परिषदेस उपस्थित असलेले जपानचे प्रतिनिधी प्रा. नाकामुरा यांनी एक मजेदार मुद्दा

आपल्या निबंधात असा मांडला की, "हिंदुस्तान व जपानपर्यंतची बुद्धधर्मीय राष्ट्रे यांची धार्मिक परंपरा विचारस्वातंत्र्याला पोषक आहे. विचारस्वातंत्र्य आणि लोकशाही राज्य यांचाच अभेद्य सांधा असतो असे म्हणण्याचे कारण नाही. प्राचीन हिंदुस्थानात राजसत्ता असताना धार्मिक स्वातंत्र्य किंवा वैचारिक स्वातंत्र्य हे कळसास पोचले होते; धार्मिक स्वातंत्र्य ही प्राचीन हिंदूंनी जगाला दिलेली एक मोठी देणगी आहे. धर्मविषयक चर्चेच्या या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अशी समस्या उपस्थित केली की, विद्यमान आशियाई राष्ट्रांच्या ऐहिक प्रगतीच्या महत्त्वाकांक्षांचा, मोक्षाच्या वा निर्वाणाच्या अंतिम ध्येयवादाशी तर्कदृष्ट्या मौलिक विरोध आहे. मोक्षाच्या ध्येयाच्या पोटात ऐहिक आकाक्षांचे विसर्जन अभिप्रेत असते." या समस्येचे तर्कशुद्ध उत्तर कोणासच देता आले नाही.

जर्मन वाङ्मयाचे महापंडित असलेले जपानी प्रतिनिधी ताकेयामा यांनी "कम्युनिझम आणि जपानी बुद्धिजीवी वर्ग" या निबंधात एक अत्यंत मूलगामी सिद्धान्त मांडला. त्यांनी त्यात असे प्रतिपादिले आहे की, मनुष्यप्राणी या भौतिक विश्वात वावरत असताना जे जे वर्तन करतो त्या त्या सर्व वर्तनाच्या पाठीशी प्रेरक व मार्गदर्शक काय असते? विश्वाबद्दलचे त्याने निर्मिलेले मानसिक चित्र! आपआपल्या मानसिक विश्वाच्या अनुसारेच मानवी वर्तन घडत असते. प्राचीन व मध्ययुगीन मानवाचे विश्वविषयक चित्र धर्मग्रंथांनी व प्रचलित लोककथांनी निर्मिलेले होते. आधुनिक युगातील मानवाचे विश्वविषयक मानसचित्र विज्ञानाने व तर्कशास्त्राने निर्मिलेले आहे. तसाच कम्युनिझम ध्येयवाद हा होय. तो विज्ञानपूजक आहे, परंतु कम्युनिझमच्या विचारसरणीत व अंमलबजावणीत विज्ञानविरोधी व तर्कदुष्ट असे पुष्कळ मुद्दे शिरलेले असतात. कम्युनिझमचा यशस्वी प्रतिकार करण्याचा सर्वश्रेष्ठ उपाय एकच आहे. तो म्हणजे, कम्युनिझमने निर्मिलेले विश्वाचे मानसचित्र विज्ञानाला व तर्कशास्त्राला विरोधी कसे आहे, हे दाखविता आले पाहिजे; व ते तसे दाखविता येणे फारसे कठीण नाही. कम्युनिझमने निर्मिलेले विश्वाचे मानसिक चित्र ढासळून टाकणे, हेच एक कम्युनिझमच्या प्रतिकाराचे सर्वोत्कृष्ट अस्त्र होय.'' प्रा. ताकेयामा यांनी परिषदेत मौनच पत्करले होते. कारण त्यांना इंग्लिश बोलणे जमत नव्हते. परंतु त्यांच्या निबंधाची छाप फारच चांगली पडली.

परिषदेच्या प्रतिनिधींना इरावती नदीच्या परिसरातले ब्रह्मदेश हे राष्ट्र भौतिक वैभवाने संपन्न होईल अशी आशा त्या महानदीच्या अपार जलवैभवाने व भूमीच्या सुपीकतेमुळे जशी उत्पन्न केली, तशीच तेथे सादर केलेल्या निबंधांच्या विचारसंपत्तीने आशियातील विद्यमान संस्कृतींना मोठे भवितव्य आहे, अशी आशा उत्पन्न केली. आम्ही आशियातील सर्व प्रतिनिधी मोठ्या उत्साहाने आकाशमार्गे जमलो व विशाल विचारांचा प्रकाश घेऊन आकाशमार्गे परतलो.

(नवभारत, एप्रिल, १९५५, पृ. ५१-५३
मूळ शीर्षक: रंगून येथील सांस्कृतिक परिषद)

○○○

८५

मास्को प्राच्यविद्या विशारद विश्वपरिषद

या परिषदेचे २५ वे अधिवेशन मास्को येथे ९ ते १६ ऑगस्ट १९६० या तारखांना भरले होते. या परिषदेस भारतातील सुमारे ४० प्राच्यविद्यापंडितांना सदस्य या नात्याने उपस्थित रहाण्याकरिता निमंत्रणे आली होती. मला हे निमंत्रण गेल्या १७ फेब्रुवारीला मिळाले. हे आमंत्रण मला काहीसे अनपेक्षित वाटले. मी स्वतः प्राच्यविद्येचा दीर्घकालपर्यत अध्ययन करणारा विद्यार्थी असलो तरी मी भारतीय प्राच्यविद्या परिषदेला क्वचितच उपस्थित राहिलो असेन, म्हणून मला हे आमंत्रण अनपेक्षित वाटले. धर्मकोशाचे ८ भाग मास्को-लेनिनग्राडच्या प्राच्य-विद्या पंडितांपर्यंत जाऊन पोचले असावेत याचीच पोच म्हणजे हे आमंत्रण होय, असे मास्कोला गेल्यावर नंतर माझ्या लक्षात आले. मार्क्सवादाचे कट्टर धर्मक्षेत्र असलेल्या मास्कोमध्ये ही परिषद भरली जाणार याचे मला आश्चर्यच वाटले. कारण प्राच्यविद्येचे देशोदेशीचे बरेचसे विद्यमान पंडित हे काही मार्क्सवादी नाहीत, निदान त्यातील बहुसंख्य पंडित मार्क्सवादी नाहीत. या बिनमार्क्सवादी पंडितांच्या बरोबरीने कट्टर मार्क्सवादी पंडित चर्चा करण्यास व विचारविनिमयास तयार झाले, हे तर मला विशेष सूचक वाटले. प्राच्यविद्या म्हणजे प्रामुख्याने इतिहास-विद्याच होय. प्राची ही अतिप्राचीन विविध संस्कृतींचे माहेरघर होय. गेल्या सहा हजार वर्षांचा अनेक प्रगल्भ संस्कृतींचा इतिहास प्राच्यदेशातच घडला. या इतिहासाचे अध्ययन व संशोधन गेली १५० वर्षे प्रामुख्याने पाश्चात्त्य व विशेषतः युरोपीय पंडितांनी चालविले आहे व प्राच्यदेशीय पंडित पाश्चात्त्यांचा मागोवा घेत त्यात मागाहून शिरले आहेत. यात मुख्य भरणा बिनमार्क्सवाद्यांचा आहे.

ही परिषद मास्को येथे भरविण्याचे सोविएटच्या प्राच्यविद्या विशारदांच्या संस्थेने ठरविल्यानंतर या परिषदेसंबंधी अपेक्षा व्यक्त करणारे दिग्दर्शक-लेख सोविएट देशांच्या पंडितांनी प्रसिद्ध केले. त्यात बी. जी. गफुराव् या प्राच्यषिया विशारद सोव्हिएट पंडिताने आपल्या लेखात असे एक महत्त्वाचे विधान केले की, "पाश्चात्त्यांचे प्राचीच्या बाबतीत

दोन विरुद्ध प्रकारचे दृष्टिकोन आहेत. पहिला दृष्टी कोण म्हणजे निःस्वार्थ बुद्धीने व मानवी सहानुभूतीने प्राचीच्या सांस्कृतिक मूल्यांचे अध्ययन करण्याचा होय; दुसरा दृष्टिकोन म्हणजे प्राच्य देशातील भौतिक समृद्धीवर डोळा ठेवून विचार करावयाचा. १८ व्या, १९ व्या, व २० व्या शतकांमध्ये या दोन दृष्टिकोनांचा संघर्ष निरंतर झालेला जागतिक प्राच्यविद्येच्या परिसरात आढळून येतो. वर्तमान काळी आशिया आणि आफ्रिका या खंडांतील देश ज्या क्रमाने व ज्या प्रमाणात जीवनाच्या सर्व क्षेत्रांत स्वातंत्र्य प्राप्त करून घेत आहेत त्या प्रमाणात प्राचीमध्ये नवजीवनाचा आविर्भाव झालेला दिसून येत आहे.''

गफुरॉवने आपल्या लेखात अखेरीस असें म्हटले की, ''ही विश्वपरिषद एक महत्त्वाचे कार्य साधणार आहे; त्यामुळे जगातील निरनिराळ्या देशांतील विद्वान लोक व सोव्हिएट शास्त्रज्ञ यांचा संबंध घनिष्ठ बनेल. परस्परांच्या संशोधनाचा अधिक निकटच्या सहकार्याने अभ्यास होऊ लागेल. या परिषदेत आमची मार्क्स-लेनिनवादी पद्धती कोणाही पंडितावर लादण्याचा प्रयत्न होणार नाही. तसा आमचा मुळीच उद्देश नाही. परंतु हेही तितकेच खरे की, मार्क्स-लेनिनवादी पद्धती हीच एकमेव निर्दोष पद्धती होय. आमचे संशोधक याच पद्धतीने प्राच्यविद्येचे अवगाहन करीत रहाणार आहेत. पूर्वी कधीही ज्यांना या परिषदेत वाव मिळाला नाही असे आशियातील व आफ्रिकेतील देश या परिषदेत आपले प्रतिनिधी मोठ्या संख्येने पाठवून ही परिषद यशस्वी करतील.''

चीन या विषयाचा प्रसिद्ध सोविएट पंडित प्रा. एस. एल. टिखविन्स्की याने आपल्या लेखात अशी अपेक्षा व्यक्त केली होती की, ''या परिषदेत चीनविषयक विद्येला महत्त्वाचे स्थान प्राप्त होणार आहे. चीनमधील वा विद्येचे पंडित उपस्थित राहून लाल क्रांतीनंतर चीनमध्ये इतिहास, भाषा, साहित्य, प्राचीन संशोधन, कायदा व कला यासंबंधी झालेल्या विलक्षण प्रगतीचे निदर्शक असे निबंध वाचतील.''

वर निर्देश केलेल्या गफुरॉवच्या लेखातील अपेक्षा या परिषदेच्या अधिवेशनाने काही अंशी सफल झाल्याचे किंवा निदान तसा भास झाल्याचे निदर्शनास जरी आले तरी लाल चीनमधील प्रतिनिधींच्या संपूर्ण बहिष्काराने प्रा. टिखविन्स्कीच्या अपेक्षा पूर्ण निष्फळ ठरल्या. चीनचे प्रतिनिधी किंवा चीन विद्येचे पंडित उपस्थित होते. पण ते चीनच्या बाहेरचे होते. चीनच्या बहिष्काराचे गूढ उलगडण्याचा प्रयत्न परिषदेच्या समाप्तीनंतर व परिषदेचे अधिवेशन साक्षात चालू असतानाही अनेकांनी केला. लंडन येथील ''फोरम सर्व्हिस'' या नियतकालिकाच्या सप्टेंबर १० (१९६०) च्या अंकात प्रा. वाल्टर लॅकर या परिषदेस उपस्थित असलेल्या पंडिताने या बहिष्काराचा अर्थ असा सांगितला आहे की, ''आता लालचीन व सोव्हिएट रशिया यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील मतभेद केवळ धोरणापुरते मर्यादित राहिले नाहीत. मार्क्सलेनिनवादाचे खरेखुरे श्रद्धाशाली व क्रांतिकारक नेतृत्व लालचीनच करू शकतो, सोव्हिएट रशिया नव्हे, असा दावा लालचीन सांगू लागला आहे.

आता हे चीनरशियांमधील मतभेद ध्येयवादाच्या पातळीवरही झगडा करू लागले आहेत. चीनचा बहिष्कार या ध्येयवादी झगड्याचे एक उदाहरण होय.'' माझ्या मते संयमपूर्वक विचार केल्यास इतकाच मर्यादित अर्थ या बहिष्कारावरून निघतो की, चीनमधील कट्टर मार्क्सवादी पंडित हे बिनमार्क्सवादी पंडितांना प्रतिगामी समजत असल्यामुळे प्राच्यदेशांच्या इतिहासाची योग्य मीमांसा करण्याची पात्रताच त्यांच्या ठिकाणी नाही म्हणून चीनमार्क्सवादी पंडितांबरोबर समान आसनावर बसून चर्चा करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही; अशा धारणेने चीनने बहिष्कार टाकला असावा. मार्क्सवाद्याची अशा प्रकारची मनोवृत्ती असूं शकते, असे आमच्यासारख्या एका काळी मार्क्सवादी असलेल्या व्यक्तींना स्वानुभवावरून वाटते.

इंटरनॅशनल काँग्रेस ऑफ ओरिएंटॅलिस्ट ही जागतिक विद्वानांची एक पुरातन संस्था आहे. तिचे २५ वे अधिवेशन मास्कोत मास्को-राज्य विद्यापीठाच्या ३३ मजली दिमाखदार महालात भरले. बरेचसे प्रतिनिधी या भव्य इमारतीच्या विद्यार्थी वसतिगृहाच्या 'इषे' विभागात उतरले होते. काही थोडी निवडक प्रतिनिधी मंडळी मात्र स्वेच्छेने मास्को नगरीतील युक्रेन हॉटेलमध्येही उतरली होती. मी स्वतः बादशाही थाटाच्या युक्रेन हॉटेलपेक्षा मास्को विद्यापीठाचे विद्यार्थी वसतिगृहच पसंत केले. कारण मास्को-विद्यापीठाच्या या नव्या इमारतीतच परिषदेचे अधिवेशन नियोजित केले होते. त्यामुळे जाण्यायेण्याचा वेळ वाचला व विद्यापीठाचे जवळून अवलोकन करण्याची संधी मिळाली. परिषदेच्या कार्याव्यतिरिक्त राहिलेल्या वेळात तेथे उतरलेल्या अनेक देशांतील पंडितांशी परिचय करून घेण्यास व गप्पागोष्टी करण्यासही अवसर मिळाला.

हे २५ वे अधिवेशन होते. हे जरी खरे असले तरी ही परिषद १५ वर्षांपेक्षा फार जुनी आहे. या परिषदेचे पहिले अधिवेशन सन १८७१ मध्ये पॅरिसला भरले होते. सुमारे ८४ वर्षांनी हे २५ वे अधिवेशन मास्कोत भरले. या पूर्वीचे २४ वे अधिवेशन जर्मनीत म्युनिक येथे सन १९५७ मध्ये भरले होते. आतापर्यंत बहुतेक अधिवेशने युरोपमध्ये भरली. अपवादादाखल दोन अधिवेशने स. १९०५ मध्ये आफ्रिकेत 'आलूजिर्स' येथे आणि स. १९५१ मध्ये आशियात 'इस्तंबूल' येथे भरली होती. हे २५ वे अधिवेशन रशियातले दुसरे अधिवेशन म्हणता येते. स. १८७६ मध्ये ''सेंट पिटर्सबर्ग (सध्याचे लेनिनग्राड)'' येथे भरले होते.

मास्को विद्यापीठाच्या नव्या इमारतीतील संगमरवरी चमकदार विशाल महालात या अधिवेशनाची पहिली व अखेरची सर्व सदस्यांची बैठक भरली होती. सोविएटच्या बाहेरील देशांतील सुमारे ६०० पंडित आणि कम्युनिस्ट देशांतील १२०० पंडित मिळून २००० सदस्य अंदाजे उपस्थित होते. उद्घाटनाचे भाषण उपप्रधानमंत्री मिकोयान यांचे रशियन भाषेत झाले. नंतर परिषदेचे अध्यक्ष गफुरॉव आणि यूनोचे एक प्रतिनिधी यांची भाषणे झाली. परिषदेत जगातील विविध भाषा बोलणारे सदस्य उपस्थित असल्यामुळे एकमेकांची

भाषणे समजण्याकरिता लगेच अन्य भाषेत अनुवाद ऐकविण्याची सोय केलेली होती. ३०-३५ भाषांचे सदस्य उपस्थित होते. परंतु इतक्या सर्व भाषांचा अनुवाद करविणे दुरापास्त असल्यामुळे रशियन, इंग्लिश, फ्रेंच व जर्मन या चार भाषांमधूनच अनुवाद ऐकविण्याची सोय या परिषदेने केली होती. सर्वांना त्या-त्या इष्ट भाषेत अनुवाद ऐकू यावा म्हणून 'कर्णयंत्रांचा' पुरवठा केला होता. कर्णयंत्रातील बटण इष्ट बिंदूवर नेऊन ठेवले की इष्ट भाषेत अनुवाद ऐकू येई. मिकोयान व गफुरॉव यांच्या भाषणांत मान्य विद्येच्या प्रश्नांपेक्षा प्राच्यदेशांतील साम्राज्यशाहीच्या विरोधी चाललेल्या मुक्तिसंग्रामांचाच अधिक ऊहापोह होता! अध्यक्षांचे उपसंहाराचे भाषणही याच मासल्याचे झाले. त्यामुळे बिनकम्युनिस्ट देशातील प्राच्यविद्या पंडितांना काही वेळ असा भास झाला की, आपण प्राच्यविद्या परिषदेत बसलो नसून साम्राज्यशाही-विरोधी जागतिक परिषदेत बसलो आहोत. माझ्या शेजारी, मागे-पुढे बसलेल्या भारतीय, युरोपीय व अमेरिकन पंडितांच्या चेहऱ्यांकडे मी या क्षणी दृष्टिक्षेप केला असता असे दिसून आले की, हे प्रचारकी थाटाचे भाषण ऐकून त्यांना गंमत वाटत असावी, दोन चार जणांनी तर डोळे मिचकावून उपरोधिक स्मितही केले, परंतु असा राजकीय प्रचारकी प्रकार मधल्या विभागीय बैठकीत नंतर फारसा कोठेही घडला नाही, ही समाधानाची गोष्ट होय.

सोविएट देशांच्या मुख्य राजधानीत हे अधिवेशन भरविण्याची इतर अनेक राजकीय कारणे असतील. सहजीवनाचा प्रयोग विचारक्षेत्रांतही आम्ही प्रामाणिकपणे करीत आहोत हे दाखविण्याचा तर उद्देश असावाच. त्याचप्रमाणे आपआपल्या हस्तिदंती महालात रमणाऱ्या अनेक विद्वानांना आपलेसे करावे, सहप्रवासी निवडावे; किंवा आपल्या सहप्रवाशांना वा कम्युनिस्ट विद्वानांना प्रसिद्ध व नामवंत विद्वानांना प्रवेश मिळवून द्यावा; इत्यादी अनेक उद्देश साधणे हाही हेतू असावा.

विशेष लक्षात भरण्यासारखी गोष्ट अशी दिसली की, सोव्हिएट देशांत क्रांतीनंतरच्या काळात विशेषतः दुसरे महायुद्ध संपून सगळीकडे स्थिरस्थावर झाल्यावर प्राच्य विद्याशास्त्रांचे अध्ययन सुरू झाले आणि त्यात मोलाची भर टाकणारी संशोधने होऊ लागली आणि त्याचबरोबर संशोधक विद्वानही निपजू लागले. ही गोष्ट जगातील प्राच्य विद्यापंडितांच्या निदर्शनास आणावी असाही एक महत्त्वाचा हेतू ही परिषद भरविण्याच्या मुळाशी असावा. याहीपेक्षा आणखी एक खोल हेतू या परिषदेच्या संघटकांच्या मनात होता असे परिषदेच्या पूर्वी त्यांनी प्रसिद्ध केलेल्या लेखांवरून आणि परिषदेत निरनिराळ्या विभागांत वाचले गेलेल्या लेखांवरून दृष्टोत्पत्तीस आले. तो असा की, आतापर्यंत प्राच्यविद्यापरिषदेतील संशोधनविषयक निवेदने साधारणपणे भूतकाळातील म्हणजे विशेषतः मध्ययुगातील वा प्राचीन युगांतील प्राच्य संस्कृतींच्या विविध अंगांचा बारीक तपशीलवार परामर्श घेणारी असत, परंतु या परिषदेत विद्यमान प्राच्य राष्ट्रांच्या वर्तमानकाळातील आर्थिक, सामाजिक,

साहित्यिक, भाषिक, कलाविषयक, तंत्रविषयक, घडामोडी व परिवर्तने यांचा ऊहापोह करणारी निवेदनेही वाचण्यात आली. चालू आर्थिक, राजकीय व एकंदरीत सांस्कृतिक परिवर्तनाची मीमांसा या विषयाला सोव्हिएट निमंत्रकांनी महत्त्व दिले. परंतु त्याबरोबर या उद्देशास सुसंगत म्हणून या विषयांचे अन्यदेशीय पंडित मात्र निमंत्रित केले नव्हते. पंडित बोलाविले होते ते सर्व प्राचीन विद्येतच पारंगत होते. उदाहरणार्थ: डॉ. दांडेकर, सुनीतिकुमार चटर्जी, इत्यादी मंडळी बरोबरच दिल्ली विद्यापीठाचे डॉ. राव, धनंजयराव गाडगीळ, डॉ. चंद्रशेखर इत्यादी मंडळींनाही प्राच्यविद्या परिषदेचे निमंत्रण जाणे तितकेच आवश्यक व योग्य ठरले असते. कारण विषय तसे ठेविले होते. ही विसंगती आतापर्यंत कोणाच्याच लक्षात आली नाही म्हणून आम्ही येथे त्याचा निर्देश केला.

कोणतीही गोष्ट मनास पटली किंवा कोणताही विषय मनाने घेतला की मध्ये अर्धवट सोडावयाचा नाही वा अर्धवट करावयाचा नाही; त्याचे टोक गाठावयाचे वा त्याला परिणामकारक, प्रभावी रूप द्यावयाचे, हे रशियन मनाचे वैशिष्ट्य आहे. असे करीत असतांना काही महत्त्वाच्या अन्य गोष्टींची उपेक्षा होते किंवा काही बाबतींत अन्याय होतो याची फिकीर अशा वेळी रशियन मन करीत नाही; असे मार्मिक रीतीने अवलोकन करणाऱ्या परदेशी समीक्षकांच्या लक्षात तेथे प्रत्यक्ष पाहिल्यावर येते. प्राच्यविद्यांच्या प्रगतीसंबंधी हेच सोविएट देशांत आढळून आले. सन १९५५ पासून प्राच्यविद्यांच्या अध्ययनाला व संशोधनाला महत्त्व देण्याचे रशियनांनी ठरविले आणि तेव्हापासूनच या संबंधांत मोठेच परिवर्तन घडून यावयास लागले. या बाबतीत सध्याचे दुय्यम प्रधानमंत्री मिकोयान यांच्याकडेही श्रेयाचा वाटा जातो. प्राच्यविद्या संशोधन संस्थांच्या विस्तारांना रशियात आता बहर आल्यासारखा दिसतो. मास्को, लेनिनग्राड, कीव, बाकू, टिफ्लिस, ताश्कंद या ठिकाणी नव्या प्राच्यविद्याविषयक संशोधनसंस्था स्थापल्या आहेत. अलताई, तुर्की, इराणी, मंगोली व अन्य मध्य आशियातील भाषा, साहित्य व संस्कृती या संबंधी अध्ययनात रशियनांनी पूर्वीपासून प्रगती केली आहे. चीन व भारत या संबंधीही अध्ययनाचे थोडे थोडे प्रयत्न पूर्वीपासून रशियनांनी केले आहेत. परंतु आता त्याला भर येत आहे. मध्य आशियाचे अध्ययन करणे हे तेथे त्यांचे साम्राज्यच असल्यामुळे क्रमप्राप्त आहे. आता मध्यपूर्वेतील असीरिअन, हिटिट, सेमेटिक, इजिप्शिअन वगैरे प्राचीन अस्तंगत संस्कृतींचाही अभ्यास तेथे अधिक तपशीलवार व खोल होऊ लागला आहे. प्राच्यविद्येत जर्मन, फ्रेंच, डच व इंग्लिश यांची प्रगती आदर्शभूत आहे. त्यांची बरोबरी करण्याचा हेतू रशियनांनी बाळगलेला दिसतो. चीन, जपान, कोरिया इत्यादी पूर्व व दक्षिण आशियातील देशांच्याही इतिहासाचे व भाषांचे अध्ययन व चिंतन यांस प्राधान्य मिळू लागले आहे. आफ्रिकाविषयक अध्ययनाला अलीकडेच महत्त्व येऊ लागले आहे. त्याकरिता अध्ययन करणाऱ्या संस्था त्यांनी काढल्या आहेत. त्याबरोबरच आपले विद्यार्थी व विद्वान अधिक संशोधनार्थ ते बाहेर देशी पाठवू

लागले आहेत. आधुनिक, प्रगत, पाश्चात्त्य भाषांचा विशेषतः इंग्लिश, फ्रेंच व जर्मन या भाषांचा अभ्यास, प्रगतीत आपण मागे राहू नये म्हणून, रशियन लोक अधिक कसोशीने करीत आहेत व त्यातील अपार ग्रंथसंपत्ती अविश्रांत परिश्रम करून रशियन भाषेत अनुवाद करून आणीत आहेत. हे जसे स्पष्ट दिसते तसेच हिंदी, बंगाली, उर्दू, अरेबिक व पर्शिअन भाषांच्याही अध्ययनाला ते महत्त्व देऊ लागले आहेत. आता त्यांचे शेकडो विद्यार्थी भारत, चीन, आफ्रिका आणि मध्यपूर्व देशांत अध्ययनार्थ येऊ लागले आहेत. हे करण्यात त्यांचा उद्देश केवळ भाषाशास्त्री व प्राचीन विद्याविशारद तयार करणे एवढाच नाही. त्यांना जगातील सर्व राष्ट्रांत आपली तज्ज्ञ माणसे पाठवून त्यांच्याशी घनिष्ठ संबंध स्थापित करावयाचा आहे.

प्राच्य विद्या परिषेदच्या प्रसंगाने वर निर्दिष्ट केलेल्याप्रमाणे त्यांच्या प्रयत्नांचे फळ दिसून आले. उर्दू, हिंदी वगैरे भाषा सफाईने बोलणारे नव्या उमेदीचे रशियन पंडित अन्य देशीय पंडितांत मिळूनमिसळून संबंधित विषयांच्या बाबतीत चर्चा करीत असलेले पाहून गंमत वाटली. या मंडळींमध्ये बोल्शेव्हिक क्रांतिकारक फारच थोडे असतील. निदान काही बोटावर मोजण्यासारखी मंडळी सोडल्यास बाकीचे तरी राजकारणाशी अलिप्त असल्यासारखे वाटले. निदान वरवर तरी तसे दिसले. वरवर म्हणण्याचे कारण एवढेच की, सोव्हिएट देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला मॅट्रिक, बी. ए., किंवा त्यापुढील परीक्षेत मार्क्सवाद, लेनिनवाद व कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास या विषयांचे सक्तीने अध्ययन करावे लागते. ''पुनः पुनः तेच ते एरंडाचे गुऱ्हाळ कशाला!'' अशी तक्रार मनातल्या मनात उच्च विद्यांचा विद्यार्थी करीत असतो तरी त्याला हा विषय टाळता येत नाही.

या परिषदेत, एकंदर इजिप्त, असीरिया, अरबी, भारत, चीन, जपान, आफ्रिका, सेमेटिक, अरबदेश, इराण, मध्य आशिया, तुर्क, मोंगोल, कॉकेशस, हिटिट, अल्ताई, अफगाण, दक्षिणपूर्व आग्नेय आशिया, कोरिया आणि मंगोलिया यांच्यासंबंधी विद्यांचे २० विभाग होते आणि या प्रत्येक भागाची अलग बैठक रोज सकाळ-संध्याकाळ चार पाच दिवस होत होती. त्यातील प्रत्येक विभागात सोव्हिएट देशांतील विद्वानांचे किंवा अभ्यासूंचे अध्ययन-निष्कर्षावरील लेख इतर पंडितांच्या बरोबरच सादर केले गेले. रशियनांनी मुख्यतः रशियन भाषेमध्ये लेख लिहिले होते तरी जर्मन, फ्रेंच व इंग्लिशमध्येही त्यांनी सादर केलेले लेख फारसे कमी नव्हते. प्राचीन, मध्ययुगीन व वर्तमान अशा त्रैकालिक विषयांवर त्यांचे लेख होते. काही लेखांचा दर्जा खरोखर चांगला होता. वर्तमान काळाशी किंवा नजीकच्या भूतकाळाशी संबंधित असलेल्या विषयांवरील त्यांचे प्रतिपादन मात्र मार्क्स-लेनिनवादाच्या बंधनांत जखडून लिहिले गेल्यामुळे एकांगी किंवा काही मुद्द्यांच्या संबंधात उथळ असे दिसून आले. प्रत्येक विभागातील लेखाचे व चर्चेचे महत्त्वमापन हे प्रस्तुत लेखकाच्या कुवतीबाहेरचे आहे; किंवा विशेषतः भारतविद्याविभागाच्या शिवाय अन्य विभागात जाण्यास अवसर न राहिल्यामुळे त्या अन्य विभागांतील लेख व चर्चा या संबंधी विशेष

सांगता येणेही शक्य नाही. दिग्दर्शनार्थ, भारतविद्याविभागाच्या बैठकीत काय घडले याचे थोडक्यात निवेदन करून हा परामर्श आटोपता घेतो.

भारतविद्या विभागाचे दोन उपविभाग होते (१) इतिहास व तत्त्वज्ञान आणि(२) भाषाशास्त्र व कला. प्रथम या दोन्ही उपविभागांची तारीख ९-८-६० ला दुपारी ३ वाजता संयुक्त बैठक झाली. बैठकीत सुनीतीकुमार चटर्जी यांचे लांबलचक भाषण झाले. त्यांनी कालमर्यादेपेक्षा दुप्पट वेळ घेतला. त्यांचे भाषण चांगले, मनोरंजक होते. अशा पंडित सभेस सर्वसाधारण उपयुक्त माहिती देणारे भाषण आवश्यक नसते. विशेष नवा संशोधित मुद्दा सांगण्याकरिताच भाषण करणे योग्य दिसते. सुनीतीकुमारांचा ''चीन व भारतीय यांची सांस्कृतिक देवघेव'' हा विषय होता. बाकीचे मामुली मुद्दे सोडल्यास त्यांचा एक मुद्दा खूप मार्मिक वाटला. भारतातील वाममार्ग हा धार्मिक संप्रदाय ''चीनाचार'' म्हणून उल्लेखिला जातो. वाममार्ग हा चीन देशातून भारतात आला, ही गोष्ट त्यांनी उलगडून दाखविली. एका जर्मन पंडिताचे त्यानंतर भाषण झाले. त्याने असा मुद्दा मांडला की, ट, ठ, ड, ढ, ण, हा जो 'ट' वर्ग या वर्गातील अक्षराने सुरुवात होणारे संस्कृत शब्द संस्कृत भाषेत द्रविड भाषेतून आले असा जो समज आह तो खरा नाही. द्रविड भाषेतही हे ट वर्गापासून प्रारंभ होणारे शब्द अत्यल्प आहेत. असे शब्द द्रविडपूर्व भाषेतील असावेत. त्यानंतर डॉ. घोष यांनी भारतातील अतिप्रचीन मोहोंजोदारो संस्कृती आणि तत्कालीन अन्य भारतीय संस्कृती यांच्या संबंधावर चर्चा करणारा निबंध वाचला. पाच दिवसांच्या बैठकीत भारतविद्या विभागात तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, अर्थशास्त्र, धर्म, राजकारण, साहित्य, संस्कृत, पाली, तामिळ, तेलगु इत्यादी भाषा अशा विषयांवरील लेखवाचन व चर्चा झाल्या. मी स्वत: माझा लेख संस्कृतमध्ये लिहून आणला होता. परंतु परिषदेच्या अधिकृत भाषा चारच होत्या. त्यामुळे माझ्या लेखाचा सारांश मी इंग्लिशमध्ये सांगितला. त्यावर रशियन संस्कृत पंडित कल्यानोव व डॉ. रामभाऊ दांडेकर यांनी आक्षेपात्मक प्रश्न विचारून चर्चेत भाग घेतला. माझ्या लेखाचा विषय ''संस्कार व यश यांची एकता'' असा होता. मी त्यात असे सिद्ध केले की, यज्ञ संस्थेला वेदकाली विस्तृत रूप येण्याच्या अगोदर तिचे मूळ स्वरूप अत्यंत साधे असे होते. 'पाकयज्ञ' नामक यज्ञ हाच वेदपूर्व आर्यांचा अविकसित स्वरूपाचा मूळ यज्ञधर्म होय. सुप्रसिद्ध सोळा संस्कार हे पाकयज्ञच होत, असे बौधायन वगैरे प्राचीन धर्मशास्त्रकारांचे मत आहे. सर्व यज्ञांना संस्कार अशी संज्ञा गौतम या धर्मसूत्रकाराने दिली आहे. संस्कारांचा मूळ उद्देश जन्मजात पातकाचे (original sin चे) परिमार्जन होय. ख्रिश्चन धर्मातील जन्मजात पातक कल्पनेचे मूळ ख्रिस्तपूर्व वैदिक धर्मात संस्कारविषयक तत्त्वज्ञानात प्रथम आढळते. आदिमनूने प्रथम जो धर्म आचरला व प्रजा निर्मिली तो धर्म पाकयज्ञ होय, असे शतपथ ब्राह्मणातील जलप्रलयाच्या कथेत सांगितले आहे. ही जलप्रलयाची कथा जगातील अनेक प्राचीन धर्मांच्या पुराणकथांपैकी एक महत्त्वाची कथा आहे.

रशियन पंडितांनी इंग्लिशमध्ये निवेदन केलेल्या संशोधनात लक्षात ठेवण्यासारखी चारपाच निवेदने होती. त्यातल्या त्यात अधिक महत्त्वाची अशी दोन निवेदने ठरतात. ओरान्स्की याचे मध्य एशियामध्ये आढळलेल्या एका भारतीय बोलीबद्दलचे आणि दुसरे ऋग्वेदातील क्रियापदांबद्दलचे एलीझाबेन्कोवा या विदुषीचे निवेदन होय. या परिषदेचे मुख्य चिटणीस ड्याकोव् यांनी "भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाचा विकास" यावरील निवेदन वाचले. ते बरेच विवादग्रस्त व फारच अपुरे वाटले. त्यांनी असे प्रतिपादन केले की, भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनावर राष्ट्रीय भांडवलर वर्गाचा बराच प्रभाव होता. हा प्रभाव अखेरपर्यंत टिकला. मध्ययुगीन सरंजामी अवशेष जी संस्थानिक राज्ये ती लयास नेली. परंतु कामगारवर्ग वा जनता यांचे प्रभावी नेतृत्व न राहिल्यामुळे या आंदोलनाला जनता क्रांतीचे परिपूर्ण फळ प्राप्त झाले नाही.'' या निवेदनानंतर मी स्वत: उठून काही आक्षेप घेतले. माझा पहिला आक्षेप असा होता की, या भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात भारतीय समाजातील सर्व वर्गांतील लोक कमीजास्त प्रमाणात सामील झाले होते. कारण सर्व जनतेला पटेल असेच स्वातंत्र्य हे ध्येय होते. त्यामुळे राष्ट्रीय भांडवलदारही त्यात सामील होता. परंतु या चळवळीचे नेतृत्व राष्ट्रीय भांडवलदार वर्गाला प्राप्त झाले नाही. दुसरा आक्षेप असा की, "राष्ट्रीय भांडवलदार वर्ग"(National Bourgeoisie) हा मार्क्सवादी प्रयोग अतिव्याप्त, अस्पष्ट व संदिग्ध अर्थाचा आहे. मागासलेल्या देशांतील अर्थव्यवस्थेत व समाज संस्थेत अत्यल्प संपत्तीचे मालक (Bourgeois) फार असतात. व ते आर्थिकदृष्ट्या अत्यंत दुर्बळ असतात. म्हणून त्यांना लोकशाही समाजवादाचे आकर्षण खूप असते. ते क्रांतीचे मदतगारच असतात. तिसरा आक्षेप असा की, या निवेदनात बुद्धिजीवी वर्गाच्या नेतृत्वाची दखल घेतली गेली नाही. मी स्वतः तीन वर्षे या स्वातंत्र्य संग्रामात निरंतर संपूर्णपणे भाग घेतला आहे. माझा अनुभव असा आहे की, या चळवळीचे नेतृत्व बुद्धिजीवी वर्गानेच केले आहे व या बुद्धिजीवी वर्गाच्या पाठीशी भारतातील ८० टक्के ग्रामीण जनता व शेतकरी वर्ग उभा राहिला होता. हे जनतेचे अस्सल आंदोलन आहे व हेच भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे खरेखुरे स्वरूप होय. म्हणून हे आंदोलन लोकशाही मार्गाने व व्यक्तिस्वातंत्र्याच्या अनुरोधाने समाजवादी क्रांतीतच अनिवार्यपणे पर्यवसित होणार आहे. कम्युनिस्ट मार्क्सवाद्यांनी या आंदोलनाचा नीट व सावधपणे अभ्यास केला तरच त्याच्यातील प्रगतिशीलता समजू शकेल. या माझ्या म्हणण्यातील शेतकरी वर्गाबद्दलचा मुद्दा मान्य करून ड्याकोव यांनी बाकीच्या मुद्द्यांना बगल दिली. इतर रशियन निवेदने छापून वाटली गेली होती; त्याला अपवाद ड्याकोव यांचेच निवेदन होय. मी नंतर त्यांच्यापाशी त्यांच्या लेखाची प्रत मागितली, परंतु तो लेख वेळेवर छापता आला नाही म्हणून प्रत द्यावयास शिल्लक नाही असे मला त्यांनी सांगितले. असेच विवादग्रस्त दुसरे निवेदन जी. जी. कोटोवस्की याचे होते. त्यांनी आपल्या निवेदनात ''१९ व्या शतकात मोडकळीस आलेल्या भारतीय ग्रामीण जमाती'' या विषयाची मीमांसा

केली आहे. हे निवेदन छापून वाटण्यात आले होते. जमीन मालकीची मिरासदारी पद्धती १९ व्या शतकात ग्रामीण जमातींच्या अवनतीस कारण झाली, असे या निवेदनाचे तात्पर्य होते. त्यात त्यांनी सावकारी व ब्रिटिशांचा सुधारलेल्या पद्धतीचा व्यापार या दोन गोष्टी भारतीय ग्रामीण समाजाच्या अवनतीन कारण झाल्या याची दखल घेतली नाही, असा मी त्यावर आक्षेप घेतला. हा आक्षेप त्यांनी मान्य केला. मला अशा प्रकारच्या निवेदनांमध्ये असा दोष आढळून आला की, इतक्या व्यापक स्वरूपाचे विषय छोटेखानी लेखांचे विषय केल्यामुळे त्यात एकांगीपणा व काटकुळेपणा रहातो. म्हणून अशा प्रसंगी थोड्या, मोजक्या शब्दांत सांगण्यासारखेच विषय होणे बरे.

परिषदेची समाप्तीची बैठक होण्याच्या अगोदर काही निवडक तत्तद्देशीय नेत्यांची बैठक सामान्य स्वरूपाचे ठराव करण्याकरिता अखेरच्या दिवशी भरली होती. त्यात पुढील अधिवेशन कोणत्या देशात भरावे याबद्दल प्रथम ऐक्यमत्य होईना. अमेरिकन प्रतिनिधींची मागणी होती की पुढील अधिवेशन न्युयॉर्कला भरावे. रशियन प्रतिनिधींचा आग्रह होता की, ते कैरो येथे भरावे. वाद टाळण्याकरिता अखेरीस सर्वानुमते भारत मान्य झाला. चीनचेही आमंत्रण होते, असे अधिवेशनापूर्वी लोक म्हणत होते. चीनने बहिष्कार टाकल्यामुळे पुढील अधिवेशन भारतात येणार आहे.

हे अधिवेशन भरण्याच्या अगोदर जी पूर्वतयारी लागते ती भारतात अत्यंत अपुरी आहे. पूर्वतयारी म्हणजे प्राच्यविद्यांच्या विविध शाखांचे सविस्तर अध्ययन केलेले व अधिकाराने बोलणारे किंवा लिहिणारे पंडित व तशा संस्था भारतात आहेत काय? याचे "आहेत!" असे विधायक उत्तर देता आले पाहिजे. भारतात भारतविद्येचे निष्णात पंडित आहेत; परंतु इजिप्त, असीरिया, अरब राष्ट्र, आग्नेय राष्ट्रे व अतिपूर्वेकडील देश यांचे अध्ययन करणारे नामवंत पंडित किंवा तशा संस्था भारतात कोठे आहेत? रशियातल्या या गेल्या अधिवेशनात प्रत्येक विभागात अधिकारयुक्त वाणीने प्रतिपादन करण्यास समर्थ असे अनेक पंडित व विभागाध्यक्षपद विभूषित करणारे विद्वान रशियाने पुरविले. भारतास हे सामर्थ्य आहे काय? त्याकरिता पुढील अधिवेशन चारपाच वर्षे लांबले तरी चालेल परंतु आपले विद्याविषयक दारिद्र्य दिसता कामा नये. यासंबंधी फार काळजी घ्यावयास पाहिजे.

(नवभारत, १ ऑक्टोबर, १९६०, पृ. ५२ ते ५९
मूळ शीर्षक: मास्को येथील प्राच्यविद्या विशारदांची परिषद)

○○○

८६

मास्को-दर्शन
(भाग १)

प्राच्यविद्या विशारदांच्या विश्वपरिषदेकरिता मी जाण्यास निघालो तेव्हा प्रथम मनात अशी खूणगाठ बांधली की तेथे गेल्यावर सगळे काही मनात आढी न ठेवता पहावयाचे. मी एका काळी मार्क्सवादी व रशियन लालक्रांतीचा पुरस्कर्ता होतो व अलीकडे मार्क्सवादाचा टीकाकार बनलो आहे; रशियन लालक्रांतीबद्दलच्या माझ्या अनेक अपेक्षा विफल झाल्या आहेत. या दोन्ही गोष्टींचा अवलोकन करीत असता उपयोग होणार आहे असे माझ्या मनात आले. वस्तुवादी दृष्टिकोनातूनच सर्व काही पाहिले पाहिजे असा माझा आग्रह आहे. मास्कोला जाण्याची कधी काळी संधी मिळेल असे मला स्वप्नातही वाटले नव्हते, फार महत्त्वाच्या अनेक गोष्टी योगायोगाने व अनपेक्षित रीतीने माझ्या आयुष्यात घडल्या आहेत. त्यापैकीच हे मास्कोचे दर्शन होय.

तारीख ६ ऑगस्ट १९६० रोजी प्रातःकाली ५॥ वाजता माझे दिल्लीचे मित्र श्री. गिरिलाल जैन यांनी पालम विमानतळावर स्वतःच्या मोटारीतून, मला पोचविले. तेथे प्राच्यविद्या परिषदेस माझ्याप्रमाणेच निघालेले भांडारकर-ओरिएंटल इन्स्टिट्यूटचे डॉ. रामभाऊ दांडेकर भेटले. आम्हांस निरोप देण्याकरिता भारत सरकारच्या संस्कृती व संशोधन खात्याचे काही अधिकारी उपस्थित होते. त्यात माझ्या ओळखीच्या श्री. कपिला वात्स्यायन याही आल्या होत्या. विमानाकडे निघताना त्यांनी आम्हा सर्वांचा म्हणजे भारत सरकारच्या वतीने जाणाऱ्या प्रतिनिधींचा फोटो काढला. त्यात दिल्ली, हैद्राबाद, अलिगड, कलकत्ता, मद्रास, येथील अरबी, फारसी, उर्दू, तमिळ, संस्कृत इत्यादी भाषांचे आणि पुरातत्त्वाचे पंडित होते. त्या दिवशी एअर इंडियाचे विमान मिळण्याऐवजी आम्हांस रशियन एरो फ्लोट कंपनीचे सरकारी जेट विमान मिळाले, हे विमान हिमालयाच्या उंच शिखरांवरून जवळच्या मार्गाने निघाले. भारतीय विमान लांबच्या मार्गाने काबूल-कंदाहरावरून जाते व त्याला दुप्पट वेळ लागतो. एरोफ्लोटचे विमान अर्ध्या तासात हिमालयतील चिरंतन बर्फाच्छादित शिखरांवरून

जाऊ लागले. हिमालय उल्लंघित असताना पूर्वपश्चिम पसरलेली सहस्रावधी हिमाच्छादित शिखरे दृष्टिपथात सामावलेली दिसत होती. पावसाळा असल्यामुळे या वेळी सगळा हिमालय मेघमालांनी झाकून टाकलेला असतो; परंतु आम्हांला अचानकपणे हिमालयाच्या सर्व रांगा स्वच्छ उघड्या दिसल्या. गौरीशंकराची बरोबरी करू पाहणाऱ्या शिखरांना सात-आठ हजार फूट खाली घालून आमचे विमान भरारी मारीत चालले होते. विमानातील रशियन परिचारिकांना इंग्रजीतून आपण सध्या कोठून चाललो आहोत, असे विचारले. त्यांना माझा प्रश्न समजला नाही. थोड्या वेळात रशियन पायलेट माझ्या जवळ आला अन् त्याने माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले. त्याने मला सांगितले की, आपण चीनच्या हद्दीत शिरलो आहोत. थोड्या वेळात आपण पामीरवर जाऊ. आपण ११ हजार मीटरवर (३५ हजार फुटांवर) आहोत. नंतर अर्ध्या तासात आम्हांस हिंदकुशची रांग व पामीरवरील पर्वतांची अर्धी बर्फाच्छादित व अर्धी उघडी शिखरे दिसू लागली. त्यात सर्वोच्च स्तालिन शिखरही दिसत होते. त्यानंतर लवकरच मध्य आशियातील सपाट प्रदेशांच्या अंतराळात आम्ही शिरलो. इकडे तिकडे पाहतो, तोच आमचे विमान ताश्कंद विमानतळावर उतरू लागले.

आम्ही ताश्कंद विमानतळावर एक तासभर वेळ घालविला. विमानतळावरील इमारतीचा घाट व इमारतीच्या भिंतींवरील नक्षीकाम मध्य आशियातील स्थापत्यपद्धतीचे होते. मध्य आशियातील संस्कृतीची भारताशी फार जुनी देवाणघेवाण आहे, याची आठवण मला तेथे झाली. या विमानतळावर स्थानिक विमानवाहतुकीचेही ठाणे आहे. त्या ठाण्यातील उतारूंची ये जा मी निरखून पाहात होतो. हे ठाणे मुंबई राज्यातील एखाद्या उंब्रज-बोरगावसारख्या एस. टी. स्टँडसारखे जुजबी व भकास दिसले. ताश्कंद रेडिओवर हिंदुस्थानीत वार्ताक्षेप करणारा एक गृहस्थही मला तेथेच भेटला. त्याच्याशी गप्पा मारण्यात विमान सुटेपर्यंतचा वेळ मी घालविला. त्याच्याशी बोलताना मला एक महत्त्वाची गोष्ट कळली ती ही की, या मुसलमानी प्रांतातील शिक्षित लोक स्वत:ची उज्बेकी भाषा जशी बोलतात तशीच रशियन भाषाही बोलू लागले आहेत. तेथील जनता हळूहळू दुभाषी बनत आहे. मी मनात म्हटले, सगळेच जीवन भाषेसह रशियन बनविण्याची ही पहिली पायरी दिसते.

ताश्कंदहून सुमारे दोन अडीच तासांत आम्ही मास्को विमानतळावर येऊन पोहोचलो. भारतीय वेळेप्रमाणे ३ वाजले होते. मास्कोच्या घड्याळात १ चा सुमार होता. दिल्लीहून मास्कोपर्यंत उडण्यास जेट विमानास ५॥ तास लागतात. आम्ही उतरल्यावर आमच्या स्वागताकरिता आलेला भारतीय दूतावासातील एक अधिकारी आम्हास भेटला. त्यामुळे भाषेची अडचण असूनही आमचे सामान तपासून ते परत मिळण्यास दोन तासांपेक्षा जास्त वेळ लागला नाही. प्राच्य-विद्या-परिषदेचा स्थानिक प्रतिनिधी आम्हांस तेथे फार उशिरा भेटला. नाहीतर आमचा किती खोळंबा झाला असता याची कल्पना करवत नाही. आमच्यातील काही मंडळी युक्रेन होटेलकडे रवाना झाली. आम्ही मात्र परिषदेचे जेथे अधिवेशन व्हावयाचे

होते, तेथेच उतरावयाचा बेत केला होता. परिषदेचे अधिवेशन मास्को विद्यापीठाच्या नव्या इमारतीत भरण्याचे ठरले असल्यामुळे आमची बस मास्को विद्यापीठाकडे निघाली.

आमची बस मास्को शहराकडे जाणाऱ्या रूंद रस्त्यावरून मास्को शहरात शिरली. ही वेळ मास्को घड्याळाप्रमाणे ४॥ वाजण्याची होती. दुतर्फा ६ ते १२ मजल्यापर्यंतच्या प्रचंड इमारती व हमरस्ता १०० ते १५० फूट रूंदीचा पसरलेला. ट्रॉली, बस व मोटारी या वाहनांच्या जाणाऱ्या येणाऱ्या रांगा आणि फूटपाथवर स्त्रीपुरुष नागरिकांच्या रांगा दिसू लागल्या. या सर्वांमध्ये लगबग व घाई असूनही शिस्त व शांतता दिसत होती. गर्दी असूनही गोंगाट ऐकू येत नव्हता; दुकाने दुतर्फा दिसत होती; जाहिरातींच्या पाट्यांनी व लहानमोठ्या चित्रविचित्र अक्षरांनी व लेबलांनी सुरेख व भव्य इमारती विद्रूप झालेल्या दिसत नव्हत्या. रस्त्यांच्या कडेला मधूनमधून उभ्या केलेल्या फलकांवर तेवढ्या सिनेमा नाटकांच्या जाहिराती अपवादादाखल दिसत होत्या. जाहिराती नव्हत्या याचे कारण खाजगी उद्योग व खाजगी दुकाने यांना शहरात अवसर नाही; म्हणून माल विकण्यात स्पर्धा नाही; हेच होय.

आमची बस विमानतळापासून १२ मैलांवर असलेल्या लेनिन टेकडीजवळ आली. लेनिन टेकडीवर मास्को विद्यापीठाची नवी इमारत बांधली आहे. ही टेकडी मास्को शहराच्या एका टोकवर आहे. ही टेकडी मास्को शहराच्या एका टोकावर आहे. या टेकडीवर मास्को विद्यापीठाची प्रचंड इमारत १९५३ साली बांधून पुरी केली. स्टॅलिनच्या योजनेप्रमाणे ही इमारत बांधली गेली आहे. या ३५ मजली इमारतीच्या प्रवेशद्वारावर आमची बस येऊन थांबली. या इमारतीला चारी दिशांना चार महाद्वारे आहेत. त्यात मुख्य महाद्वारे दोन आहेत. एक प्रवेशद्वार व एक निर्गमनद्वार, प्रवेश द्वाराच्या दोन बाजूंना हातात पुस्तक घेतलेल्या व वाचनात मग्न असलेल्या एक विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या भव्य मूर्ती दिसल्या. आणि निर्गमनद्वारात दोन्ही बाजूला पुस्तक वाचनात गढलेल्या दोन जोडप्यांच्या भव्य मूर्ती ठेवलेल्या दिसल्या. प्रवेशद्वाराजवळील भव्य दालनाला संगमरवरी पाषाणांचे विशाल स्तंभ आहेत. या विद्यापीठाच्या इमारतीत अनेक विद्यार्थी-वसतिगृहे आहेत. एका विद्यार्थ्यास एक खोली, अशा ८ हजार खोल्या बांधल्या आहेत. या वसतिगृहाच्या एका शाखेत प्रतिनिधींच्या निवासाची सोय केली होती. या शाखेला १४ मजले आहेत. ७ व्या मजल्यावरील २४ क्रमांकाच्या खोलीत मी उतरलो, प्रत्येक खोलीत रबरी गादीचा कोच, पलंग, उशी, दोन चादरी, एक रग, दोन खुर्च्या, दोन टेबले, भिंतीला तीन कपाटे, बाथरूम, संडास, थंड व उष्ण जल-नलिका, एक टॉवेल, जल-बेसिनला आरसा व लाल साबण वडी अशी सजावट होती.

आठ हजार विद्यार्थ्यांची या वसतिगृहांकरितां चार भोजनगृहे जोडलेली आहेत असे मला तेथील मार्गदर्शकाने सांगितले. मार्गदर्शक दुभाषी होता, माझे नाव गाव नोंदवून राहण्याचे दहा दिवसांचे भाडे भरून पोटापाण्याच्या तजविजीस मी लागलो. आठ हजार विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाला चारच भोजनगृहे आहेत हे ऐकून मी सर्दच झालो. भोजनगृह

वाटाड्याने दाखविले. एका वेळी जास्तीत जास्त ४००-५०० माणसे बसून जेवू शकतील एवढ्याच मापाचे एकेक भोजनगृह दिसले. या भोजनगृहात कूपन काढून स्वतःच्याच हाताने पात्रे उचलून जेवण वाढून घ्यावयाची व्यवस्था आहे. न्याहारी, चहा, दुपारचे व संध्याकाळचे जेवण या वेळी गर्दी उसळणार व क्यूमध्ये उभे रहावे लागणार, म्हणून मी किंचित सचिंत झालो. परंतु खाण्यापिण्याची चिंता व विवंचना करण्याचा माझा स्वभाव नाही. मिळाले तरी वाहवा; नाही मिळाले तरी वाहवा. पंचप्राणाहुती एकदोन दिवस नाही दिल्या तरी फिकीर नाही. वाटाड्याने सांगितले की उन्हाळ्याची सुट्टी असल्याने विद्यार्थी थोडेच आहेत. म्हणजे किती? असे मी विचारले. १००० ते १५०० तो म्हणाला. एकच भोजनगृह चालू होते. प्रत्यक्ष पाहून, चौकशी करून, त्या प्रचंड इमारतीच्या सुंदर चक्रव्यूहातून दालनापाठीमागून दालने व जिने ओलांडत मी स्वस्थानाकडे परत येत होतो. वाटेत अनपेक्षितपणे जाणाऱ्या येणाऱ्या गौरकाय विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये शामल तनुचे प्रौढ हिंदी विद्यार्थी चार-पाच दृष्टीस पडले. माझे लक्ष नव्हते. त्यांनीच प्रणामपूर्वक मला वाटेत शोधले व विचारले: "आपणा सर्वांची आम्ही वाट पहात होतो; सामान कोठे ठेवले आहे!" "झोनाझे मध्ये" मी उत्तरलो. "आम्ही चाळीस भारतीय या विद्यापीठात आसपास आहोत." असे हिंदीमध्ये त्या विद्यार्थ्यांपैकी स्वामिनाथन व मुखर्जी यांनी सांगितले, "आम्ही आपल्या सेवेस हजर आहोत," असे चंद्रदत्त धारियाल, स्वामिनाथन, भट्टाचारजी व भादुरी म्हणाले. "तुम्हा सर्वांना रशियन भाषा शिकावी लागली असेल" अशी मी त्यांना पृच्छा केली. ते म्हणाले, "अलबत! रशियन भाषा सहा महिनेपर्यंत लिहिता, वाचता, बोलता येईल इतकी शिकल्याशिवाय आमच्या मुख्य विषयाच्या शिक्षणास प्रारंभच होत नाही." श्री. सुंदरेशन म्हणाला की, "येथे बहुतेक आम्ही विद्यार्थी विद्यापीठाच्या उच्च शिक्षणाकरिता किंवा उच्च ज्ञानाकरिता आलेले आहोत. त्यांत एक महाराष्ट्रीयही आहे. श्री. एम. एस. हुजूरबाजार, बनारस विद्यापीठाचे गणित प्राध्यापक उच्च गणित विद्येच्या अध्ययनार्थ गेली तीन वर्षे येथे राहिले आहेत." "मला आता कसलीच भाषाविषयक अडचण पडणार नाही. रशियन दुभाष्यांनी दाखवलेल्या व सांगितलेल्या माहितीत येथील भारतीय विद्यार्थ्यांच्या साहाय्याने अधिक भर पडेल. मिळालेली माहिती तपासून घेता येईल." असा दिलासाच मला या विद्यार्थ्यांच्या भेटीमुळे मिळाला. मास्को विद्यापीठाचे व रशियन शिक्षण पद्धतीचे अत्यंत जवळून ज्ञान करून घेण्याची अपूर्व संधी मिळाली असे वाटून मला हर्ष झाला.

प्राच्यविद्या परिषदेच्या अधिवेशनास तीन दिवस अवकाश होता. तारीख ९ ऑगस्टला सकाळी अधिवेशनास प्रारंभ होणार होता. एवढ्या वेळात मनमुराद फिरता येईल, असे मनात घोळत असता मी माझ्या खोलीत झोपी गेलो. पहाटेस चार वाजता खिडकीबाहेर, विद्यापीठाच्या परिसरावर दृष्टिक्षेप टाकला. चक्क उजाडले होते. विस्तृत मैदान व विशाल मास्को नगरी व विशेषतः मास्को नदीचे भरलेले संथ पात्र नजरेत भरले. सगळीकडे

सामसूमच होती. इकडे उन्हाळ्यात रात्र फार लहान असते असे वाचले होते, त्याची आठवण झाली. मास्को वर्णनाचे पुस्तक वाचावयास काढले व ते दोन अडीच तासांत संपविले. जे पहावयाचे ते अगोदर वाचलेले असले म्हणजे ते पाहिल्यावर बारकावा लक्षात भरतो. आठ वाजता प्रातःकृत्ये आटोपून अनेक हिंदी परिचित विद्यार्थ्यांना फोन केला. त्यांच्याबरोबर विद्यापीठाच्या भोजनगृहात न्याहारी उरकली. न्याहरीच्या वेळी दूध, चहा, कॉफी, दही, लोणी, ब्रेड, अंडी, फळे, फळांचे रस, काकडी (रशियात काकडी मुबलक मिळते), खीर, भात, वगैरे अन्नखाद्य पदार्थांच्या किमती विचारल्या व त्यांची रशियन नावे दैनंदिनीत टिपून घेतली. शिष्टाचाराची दर्शक रशियन वाक्ये शुद्ध उच्चार करता यावा म्हणून देवनागरी लिपीत भाषांतरासह लिहून घेतली. श्री. हुजूरबाजार या मराठी गृहस्थांना नंतर फोन करून भेटावयास गेलो. ते व्ही. झोन मध्ये १५ व्या मजल्याच्या ४८ क्रमांकाच्या खोलीत होते त्यांना भेटलो. हे गृहस्थ विनयशील, हुशार, रसिक व मोकळ्या मनाचे दिसले. रशियन भाषा केवळ आपल्या स्वतःच्या गणित विषयापुरतीच उपयोगी पडावी म्हणून शिकले नाहीत तर रशियन साहित्यही त्यांनी अभ्यसिले आहे; उत्कृष्ट समीक्षण असल्यामुळे रशियन नाट्य रंगमंच व चित्रपटही चोखंदळपणाने त्यांनी अवलोकिलेला आहे, असे त्यांच्या सहवासात लक्षात आले. त्यांच्याबरोबर मास्को शहराचा दोनदा फेरफटका केला व रशियन दुभाष्याच्या बरोबर पाच वेळा मॉस्को शहरातील प्रेक्षणीय स्थळे पाहण्याकरिता हिंडलो. दिल्ली येथील सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. जैनेन्द्र कुमार यांनी स्वतःबरोबर मास्को शहराची वारी दोनदा करविली. ते परिषदेकरता आले नव्हते. त्यांना सांस्कृतिक भेटीचे निमंत्रण होते. हुजुरबाजारांबरोबर ७ तारखेचा संपूर्ण दिवस हिंडून काढला.

श्री. हुजूरचाबाजारांबरोबर मी मास्कोची विश्वप्रसिद्ध भूगर्भ रेल्वे पाहिली. हिला 'मेट्रो' म्हणतात. ५० लक्ष वसतीच्या मास्को शहरातील वाहतुकीची गर्दी ह्या रेल्वेमुळे खूप सुसह्य झाली आहे. ही रेल्वे बांधण्यास प्रारंभ सन १९२८ च्या सुमारास झाला. तिचा एक भाग १२ किलोमीटर सन १९३५ मध्ये पुरा झाला व त्या वेळीच वाहतूक प्रथम सुरू झाली. आतापर्यंत ८१ किलोमीटर रस्ता बांधून झाला आहे. मुंबईसारखीच दुहेरी लाईन आहे व ३२ स्टेशने आहेत. काही स्टेशनांना एस्केलेटर म्हणजे चक्राकार फिरते असे १०० पासून २०० पायऱ्यांपर्यंतचे चढते उतरते चव्हेरी जिने आहेत. प्रत्येक स्टेशनची इमारत व चार फलाटांवरील सभामंडप वैशिष्ट्यपूर्ण रीतीने बांधलेले आहेत. प्रत्येक स्टेशनची स्थापत्यरचना वेगळी आहे. प्रत्येक स्टेशन संगमरवरी पाषाणांचे घडविलेले आहे. प्रत्येक स्टेशनच्या आवारातील स्तंभांवरील, प्राकारांवरील व आढ्यांवरील नक्षी, खोदकाम आणि चित्रे यांची सजावट भिन्न प्रकारची आहे. संगमरवरी पाषाणाचे शुभ्र, लाल, पिवळे, काळे, हिरवे, जांभळे, काबरे व संमिश्र असे प्रस्तर वापरून विचित्र रंगसंगती निर्माण केली आहे. उराल पर्वत हा विविधरंगी संगमरवरी पाषाणांचा विशाल व अनंत समुच्चयच आहे, असे

म्हणतात की, उराल पर्वतांतील संगमरवरी पाषाणांच्या टेकड्याच खणल्या व हनुमानाने द्रोणागिरी आणला त्याप्रमाणे स्टॅलिन व क्रुश्चेवच्या रशियाने त्या आणून स्टेशनचा आकार देऊन उभारल्या आहेत. विशेषतः ह्या रेल्वेतील बराचसा भाग १९४३ ते १९५४ सालापर्यंत बांधून पुरा केला आहे. भूगर्भात १०० ते २०० फूट खोल जाऊन भूभाराचा धोका नष्ट करण्याकरिता सामर्थ्यशाली पक्के बोगदे व भुयारे मैलोंमैल तयार करण्याचे प्रचंड कार्य दुसऱ्या महायुद्धाच्या मध्यात केले, हे वाचून माझ्या मनास आश्चर्य वाटले व धक्काही बसला. मी ते अद्भुत स्थापत्याचे ऐश्वर्य पाहून पुनःपुनः थक्क होत होतो. परंतु त्या अद्भुत दर्शनाच्या आनन्दात विषादाचेही भाव अनावरपणे मिसळत होते. मी मूळचा मार्क्सवादी असल्यामुळे माझी मानवतावादी दृष्टी रमण्याच्या ऐवजी दुःखाने सचिंत झाली. हे जनतेचे महाल या साम्यवादी राज्यशक्तीने केव्हा निर्माण केले? याचे उत्तर माझ्या मनाला तलवारीप्रमाणे कापत होते. हिटलरने दोन हजार लांब व एक हजार मैल रुंद एवढा सोव्हिएट देशाचा भाग ज्या युद्धात जिंकून उध्वस्त केला होता. कोट्यवधी सोव्हिएट प्रजाजन घरे, दारे, गावे मालमत्ता, गुरेढोरे, शेते, दुकाने, कारखाने यांना सोडून सैरावैरा मागे हटत होते. ५० लाख लष्कर नाझी शत्रूला छातीचा कोट करून टक्कर देत, शिस्तीची माघार घेत होते त्या वेळी ही बादशाही थाटाची रेल्वे सोव्हिएट राज्यकर्ते बांधून घेत होते. ज्या वेळी हिटलरच्या सैन्याला बर्लिनपर्यंत पिटाळणे अन् नष्ट- भ्रष्ट झालेल्या स्वदेशाला स्वतःच्या पायावर उभे करणे असा प्रचंड प्रश्न दोस्त राष्ट्रे सोडवीत होती, अशा वेळी सुलतानांनाही हेवा वाटविणारी मास्कोची व लेनिनग्राडची दिमाखदार रेल्वे स्टेशने क्रांतिकारक कामगार वर्गाकडून सोव्हिएट राज्यकर्ते उभारीत होते. रेल्वे स्टेशने अशा रंगेल महालांचे रूप देऊन बांधावी, अशी कल्पना आजच्या भारतातील लोकशाहीत कोणी मंत्री सांगू लागला तर येथील सर्व पक्ष विशेषतः कम्युनिस्ट त्याची कुतरओढ करतील. रेल्वे स्टेशन ही केवळ उपयोगी वस्तू आहे, हा रंगमहाल नव्हे. विशेषतः अन्नवस्त्राची जेथे अजून तूट आहे- क्रांतीला ४३ वर्षे झाली तरी अजून तूट आहे- अशा रशियात असली रंगेल स्टेशने बांधली जावीत हे पाहून मला फारच सखेद चमत्कार वाटला. सत्ताधारी अखेर आपल्या सत्तेच्या दिमाखास प्राधान्य देतो. मग तो साम्यवादी का असेना; असा सत्तेच्या राजकारणाचा विषादकारक वास्तववाद रशियातील मेट्रोकडे पाहून पुनःप्रत्ययास आला.

(पुढे चालू)

(नवभारत, नोव्हेंबर, १९६० पृ. ३६ ते ४०)

ooo

८७

मास्को- दर्शन
(भाग २)

ता. ८ ऑगस्ट रोजी रशियन दुभाष्यांबरोबर मी मास्को विद्यापीठाचे म्हणजे इमारतीचे आतून अवलोकन केले. या नव्या इमारतीत विज्ञानशाखांचेच अध्ययन व अध्यापन चालते. साहित्य, कला व सामाजिक विज्ञान यांचे शिक्षण जुन्या झारशाहीच्या कारकिर्दीत शहराच्या मध्यवस्तीत बांधलेल्या इमारतीत चालते. मास्को विद्यापीठाच्या या दोन शाखांशिवाय विद्यापीठाचा दर्जा असलेल्या तन्त्रविद्येच्याही खाणी, पाणी, कोळसा, पोलाद इ. धातू, वीज, बागबगीचा, भूस्तर, शेतकी, इत्यादी विषयांचे तंत्रज्ञान देणाऱ्या पुष्कळ शिक्षणसंस्था मास्कोत व अन्यत्र सोविएट देशामध्ये आहेत. विज्ञानशाखेच्या स्टॅलिनच्या कारकिर्दीत बांधलेल्या या इमारतींतून विचारपूस करीत व जागोजागी थांबत फेरफटका करण्यास आठ तास अपुरे पडले. या वेळी मला सहज आठवण झाली की, इन्साईड रशिया या पुस्तकाच्या चौकस व मार्मिक लेखकाने लिहिले आहे की मास्को विद्यापीठाचे समग्रदर्शन व माहिती घ्यावयास तीन महिनेही पुरायचे नाहीत. हा फेरफटका करताना त्या त्या विज्ञानशाखेस उपयुक्त वस्तुसंग्रहालये व प्रयोगशाला या विद्यापीठास जोडलेल्या पाहिल्या; फिरता फिरता माझ्या पायांना जशी उसंत नव्हती तशी वाणीलाही नव्हती. मी अनेक प्रश्न विचारले; त्यांतील काही प्रभावी उत्तरे दुभाषी देऊ शकला, व काही प्रश्नांची उत्तरे त्या त्या स्थानी भेटलेल्या जाणकार व्यक्तींकडून मिळविली, पुष्कळ प्रश्नांची उत्तरे मिळू शकली नाहीत. काही प्रश्न जिभेवर येऊ पाहणारे मी आवरले. एकंदरीत मास्कोतील अकरा दिवसांच्या अवधीत शेकडो सोविएट नागरिकांशी वार्तालाप करण्याची संधी मला मिळाली. एकंदरीत असा अनुभव आला की, स्वतःच्या विशिष्ट व्यवसायाबाहेरची माहिती असलेले किंवा ती जाणून घेण्याची उत्सुकता बाळगणारे सुशिक्षितांतही फार थोडे आढळले. त्यामुळे असा भास होतो की आपल्या विशिष्ट क्षेत्राबाहेरच्या व्यवसायाबद्दल वा जगाबद्दल सोविएट देशचा नागरिक उदासीन वृत्ती बाळगणारा असावा. या गोष्टीस एकच अपवाद दिसतो, तो म्हणजे धंदेवाईक

राजकारणी होय. सरकारी राजकारणी प्रचार मात्र रात्रंदिवस कानावर आदळत असल्यामुळे त्या प्रचारातून मिळालेली माहिती व निर्माण केलेली भावना यांचा एकांगी संस्कार तेवढा नागरिकांत दिसून येतो.

विनामूल्य शिक्षण ही घोषणा सोविएट राज्यशासनाने तंतोतंत पाळली आहे. बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण यापासून तो अत्युच्च विद्यापीठीय शिक्षणापर्यंतचे सर्व शिक्षण पूर्ण मोफत मिळविण्याचा हक्क सर्व देशवासीयाना येथे मिळाला आहे व तद्नुरूप योजनाही अमलात आणल्या आहेत. सर्व शिक्षण मोफत व पुस्तके अत्यंत स्वस्त हे सोविएट देशाचे वैशिष्ट्य आहे. मास्को विद्यापीठाच्या दोन प्रवेशद्वारांवरील उभय कक्षांवर दिसणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हातांतील पुस्तकात रमलेल्या संगमरवरी पाषाणांच्या भव्य मूर्तीचे दर्शन सोविएट देशातील पुस्तकमहिमा सूचित करते. हातोडाकोयत्यांचे प्रतीक कर्ममहिमा सूचित करते. कर्म आणि ज्ञान यांची सांगड घालणारे राष्ट्रच उत्कर्षास पोहोचते. उत्कृष्ट कागदावर सुरेख छापलेली सुबक चाचणीची पुस्तके इतर देशांशी तुलना करता निम्मेपेक्षा कमी किमतीत येथे मिळतात. बाजारातून घरगुती जिनसांची खरेदी करून परतणाऱ्या वीस थैल्यांमध्ये एखादी विकत घेतलेल्या पुस्तकांचीही थैली दिसते. रेलगाड्या, बसगाड्या वगैरे वाहनांतून प्रवास करणाऱ्या गर्दीत पुस्तक वाचनात गर्क झालेले नागरिक वारंवार दिसतात. गर्दीच्या ठिकाणी लोक गोंगाट करत नाहीत व सार्वजनिक वाहनातून प्रवास करणारे घोळके आपसांत बोलत किंवा गप्पा छाटत नसतात, त्यामुळे वाचन निर्वेधपण होऊ शकते. सर्वसामान्य सुशिक्षित स्त्रीपुरुषांना व लहान मोठ्यांना वाचनाची आवड फार आहे. याचे निदर्शन लोकांच्या खाजगी बिऱ्हाडाच्या जागांमध्ये मिळते. बहुतेक शिक्षितांच्या बिऱ्हाडी वाचनीय पुस्तकांची अलमारी आढळते. हे पाहून मला एक संस्कृत सूत्रवाक्य सुचले- 'साम्यवादिनि देशेऽस्मिपुस्तकं मस्तके धृतम्।'

मास्को- विद्यापीठात व लेनिनग्राड विद्यापीठात शिष्यशिक्षक संख्येचा अनुपात काय आहे, म्हणजे विद्यार्थ्यांच्या संख्येशी शिक्षकांच्या संख्येचे प्रमाण काय पडते, याची मी चौकशी केली. त्यात असे समजले की १२ विद्यार्थ्यांस १ शिक्षक किंवा संशोधक कार्यकर्ता असे सरासरी प्रमाण मास्को विद्यापीठात किंवा लेनिनग्राड विद्यापीठात आढळते. शिक्षक नसलेले संशोधक सोडल्यास १६ विद्यार्थ्यांस १ शिक्षक असे प्रमाण बसत असावे, असे मी धरून चालतो. कारण शिक्षकापेक्षा संशोधन करणारे साहजिकच थोडे असतात. संशोधन करणाऱ्यातही काहींना अध्यापन करावे लागते. येथे परीक्षापद्धती अत्यंत कडक आहे. परीक्षेचे स्वरूप मुख्यतः मौखिक म्हणजे तोंडी असते. परीक्षा म्हणजे शिक्षक व विद्यार्थी यांची प्रश्नोत्तररूप किंवा पूर्वोत्तरपरूप चर्चा होय. अध्यापनामध्येसुद्धा उलटसुलद तपासणी चालते. शिक्षकाने बोलत रहावे व विद्यार्थ्यांनी नुसते ऐकत रहावे असे क्वचित चालते. विद्यार्थी विषय तयार करतो याचा अर्थ साधकबाधक रीतीने तपासून ध्यानात ठेवतो. असे

सांगतात की, सोविएट देशातील कामगाराकडून व्यवस्थापक चोपून जास्तीत जास्त काम घेतो. तीन गोष्ट शिक्षणक्षेत्रासही लागू आहे. कच्च्या शिक्षणाला तेथे क्षमा नाही.

मॅट्रिक किंवा शालान्त परीक्षांमध्ये ६५ टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांनाच विद्यापीठीय व्यापक शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये प्रवेश मिळतो, त्यापेक्षा कमी गुण मिळवणाऱ्यांना लहानमोठ्या विशिष्ट उद्योगांचे शिक्षण घेण्याकरता पाठवितात. ६५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवण्याची जबाबदारी, विद्यापीठातील प्रत्येक श्रेणीमधून वरील श्रेणीत जाताना, पार पाडावी लागते. काही विषयांत आवश्यक तितके गुण व काही विषयांत कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना राहिलेल्या विषयांची तयारी पुनः करण्यास अवसर मिळतो. त्यास सहामाही किंवा वर्ष अशा अवधीची मर्यादा नसते. दोन तीन महिन्यांतही तयारी झाल्यास वरच्या श्रेणीत प्रवेश मिळण्यास हरकत नसते. शालान्त परीक्षा झाल्यानंतर विशिष्ट विषयात, विशिष्ट तंत्रविद्येत किंवा विशिष्ट बौद्धिक शाखेत प्रवेश मिळतो. त्याकरिता त्या त्या विषयास अनुसरून आवश्यक असलेली विशिष्ट प्रवेश परीक्षा घेतली जाते. भिन्न विद्यार्थ्याच्या ठिकाणी भिन्न योग्यता असते. एका विषयात ज्याचे डोके चालत नाही त्याचे दुसऱ्या एखाद्या विषयात चांगले चालू शकते हा सिद्धांत लागू केला जातो असे वाटते. 'सब बारा टक्के' असे घडत नाही, त्यामुळे प्रत्येकाला आपापल्या विशिष्ट योग्यतेचा प्रत्यय येतो. त्यामुळे लायक व्यक्तींची लायकी वाया जात नाही. विज्ञान व तंत्रविद्या यांची महती सोविएट देशात फार आहे, त्यामुळे गणिताच्या प्रावीण्याला प्रधानपद दिले आहे. तेथे गणिताची व आधुनिक तर्कशास्त्राची कदर अत्यंत आहे. गणित व तर्कशास्त्र हाच विज्ञान व तंत्रविद्या यांचे मूलभूत अधिष्ठान होय. याची जाणीव ही आधुनिक पाश्चात्त्य संस्कृतीची महान प्रेरक शक्ती आहे, सोविएट देशातील शिक्षणपद्धतीत ही जाणीव भिनली आहे, हे प्रत्ययास येते.

शिक्षणक्षेत्रात विशिष्ट वर्गातील विद्यार्थ्यांना विशेष सवलती सोविएट शिक्षण पद्धतीने दिल्या आहेत. कामगार, सैनिक, कम्युनिस्टपक्षीय, क्रांतिकालात १९१७ पासून तो १९२३ पर्यंतच्या अवधीत हुतात्मे झालेल्यांचे आप्तवर्गीय अथवा दुसऱ्या महायुद्धात कामास आलेल्या लोकांचे निकटसंबंधी यांच्या कुटुंबीयांना शिक्षणविषयक सवलती प्रथम उपलब्ध करून दिल्या जातात.

प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षणाच्या सर्व श्रेणी यांच्यामध्ये कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास व मार्क्स-लेनिनवाद यांचे शिक्षण सक्तीचे केलेले आहे, व त्याच्या परीक्षाही पुनःपुनः द्याव्या लागतात. उच्च विद्यापीठीय विद्यार्थ्यांना पुनःपुनः तेच तेच घोकावे लागते. त्यामुळे अनेक सुशिक्षित विद्यार्थी या कंटाळवाण्या काथ्याकुटाबद्दल आपसांत कुरकुरत असतात. कित्येकांना तर पक्षपुराणांच्या पुस्तकांकडे पाहून अखेरीस शिसारी येऊ लागते. विज्ञान, तंत्रविद्या व मानवजातिशास्त्र यांच्या विद्यार्थ्यांना या पोपटपंचीचा काही उपयोग आहे, हेच पटत नाही. आधुनिक इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र, संस्कृतिचिंतन, धर्म आणि

तत्त्वज्ञान यांच्यासंबंधांत मार्क्सलेनिनवादाच्या कल्पनांचा संदर्भ धरून सक्तीने विचार करावा लागतो. त्यामुळे या विषयांतील वैचारिक स्फूर्तीला व संशोधनाला मार्क्सलेनिनवादाच्या काटेरी कुंपणांतून अंग बचावून मार्ग काढावा लागतो.

सर्व सोविएट राष्ट्रसंघामध्ये रशियन भाषा सक्तीने सर्वांना शिकावी लागते. भारत जसा भिन्न प्रांतांचे संघराज्य आहे तसा सोविएट देश भिन्न संस्कृतीच्या व विविध भाषांच्या राष्ट्रांचे संघराज्य आहे. त्यातील अनेक राष्ट्रांच्या भाषा क्रांतीनंतरच साक्षर व ग्रंथनिविष्ट भाषा झाल्या. या सर्व भाषांना विद्यालयांत व विश्वविद्यालयांत शिक्षणाचे माध्यम म्हणून मान्यता मिळाली आहे. परंतु युरोपियन सोविएट राष्ट्रे सोडल्यास आशियातील राष्ट्रांच्या बहुतेक भाषा साहित्य व ज्ञान यांत अत्यंत मागासलेल्या आहेत. त्यामुळे रशियन भाषा सर्व सोविएट राष्ट्रांमध्ये शिक्षणाचे माध्यम म्हणून अत्यंत मान्यतेस पोहोचलेली आहे. इंग्लिश, जर्मन व फ्रेंच या पाश्चात्त्य भाषा जशा ज्ञानविज्ञानसंपन्न व साहित्याने समृद्ध आहेत तशीच व तितक्याच तोलाची रशियन भाषा आहे. रशियन भाषेचे हे थोर वैशिष्ट्य असल्यामुळे आणि ती संघराज्याची राज्यव्यवहारभाषा असल्यामुळ सोविएट देशातील सर्व राष्ट्रांचे विद्यार्थी रशियन भाषेला मातृभाषेपेक्षा अधिक महत्त्व आपोआप देऊ लागले आहेत. मास्को येथील प्राच्यविद्यापरिषदेस सोव्हिएट देशातील भिन्नभाषिक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्यातील पुष्कळांचे मत असे दिसले की शैक्षणिक उन्नतीचे एकमेव त्यांना उपलब्ध असलेले श्रेष्ठ साधन रशियन भाषाच आहे. रशियन भाषेतील ग्रंथसंपत्ती इतकी विशाल आहे व तिची वाढ अद्ययावत पद्धतीने इतकी झपाट्याने होत आहे की तिच्याशी तुलना करता आशियाई सोविएटच्या भाषा तिच्या पासंगालाही पुरणार नाहीत. रशियाची राजकीय पकड अत्यंत जबरदस्त आणि भाषाही अत्यंत प्रभावी असल्यामुळे नजीकच्या भविष्यकाळात आशियाई सोविएट राष्ट्रे द्विभाषी बनणे अनिवार्य आहे. सर्व सोविएट आशिया भाषेने व संस्कृतीने रशिया बनण्याची पूर्वचिन्हे दिसू लागली आहेत.

रशियन भाषा झारशाहीच्या कारकिर्दीतच वैज्ञानिक परिभाषेने संपन्न होऊन आधुनिक विज्ञानाचे वाहन बनली. एकोणिसाव्या शतकातील अग्रेसर साहित्य रशियन कलाकारांनी निर्मिले आहे. गेल्या शतकातील रशियन साहित्यकार जगातील साहित्यकारांत श्रेष्ठ ठरले आहेत. गोर्कीची प्रतिभासुद्धा क्रांतिपूर्वकालातच भरास आली होती. क्रांतीनंतरच्या काळात रशियाने विज्ञानात व विशेषत: तंत्रज्ञानात जरी आघाडी मारली असली तरी साहित्याच्या व ललितकलेच्या क्षेत्रात पूर्वीच्यासारखा एकही नामवंत तेथे निपजला नाही. हे काहीही असो; क्रांतीनंतरच्या काळात रशियन भाषा विश्वसंस्कृतीची वाहन बनावी अशा तऱ्हेचे भाषिक अभिवृद्धीचे अफाट कार्यक्रम अमलात आणले जात आहेत. इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, इटालियन इत्यादी पाश्चात्त्य भाषांतील आणि चिनी, जपानी, बंगाली, तमीळ, हिंदी, फारसी, अरबी, संस्कृत, पाली इत्यादी पूर्वेकडील भाषांतील ललितसाहित्याचा व शास्त्रीय

साहित्याचा अनुवाद व भाषांतर करण्याचा रशियनांनी सपाटा चालविला आहे. बालझाक्, खोला, व्हिक्टर-ह्यूगो, थॉमसमॅन वेल्स, शॉ इत्यादिकांच्या समग्र ग्रंथालयांनी रशियन भाषेत पुन: अवतार धारण केले आहेत. इतर भाषांतील शास्त्रीय किंवा वैज्ञानिक ग्रंथच नव्हेत तर नियतकालिकेही प्रतिवर्षी दश सहस्त्रांपेक्षा अधिक संख्येने भाषांतरित होत आहेत.

साहित्य व ज्ञान यांच्या क्षेत्रात डोळे दिपवण्यासारखी कार्ये चाललेली दिसत असली, तरी वृत्तपत्र सृष्टीत बाहेरच्या जगाबद्दल अंधारात ठेवण्याची प्रवृत्ती खिळलेली दिसते. माझ्या अनेक हिंदी परिचितांना यासंबंधी मी विचारले. वृत्तपत्रे ही वृत्तपत्रे नव्हेतच, असे ते म्हणाले; ती मतपत्रे आहेत. येथे अनेक वर्षे राहिलेले हिंदी लोक भारतातून आलेल्या नव्या अभ्यागतांशी किंवा स्वतंत्र युरोपातून आलेल्या यात्रिकांपाशी पहिले मागणे मागतात ते ताज्या वृत्तपत्राचे, आठवडा पंधरा दिवसांचे शिळे असले तरी त्यांना ते ताजेच वाटते. भारत व चीन किंवा नेपाळ व चीन यांच्यासंबंधात खरोखर काय घडत आहे, यासंबंधी जाणण्याची स्वाभाविक उत्सुकता त्यांच्यामध्ये असते. चौकस व सुशिक्षित विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या एका गटात मी एकदा बराच वेळ बसलो होतो. पॅरिसची शिखर परिषद कशी उधळली या संबंधाची पृच्छा ते करीत होते. शिखर परिषद उधळली एवढीच बातमी त्यांना होती व ती त्यांनी सहस्त्र वेळा ऐकली होती, तरी क्रुश्चेवच्या भाषणाशिवाय दुसऱ्या कोणाचेही भाषण एका अक्षरानेही त्यांना ऐकावयास किंवा वाचावयास मिळाले नव्हते. स्वतंत्र जगातील रेडिओ मधून मधून स्वत:च्या मालकीच्या रेडिओपेटींतून ऐकावयास मिळतो, परंतु त्यांतहि रेडिओ विक्षेपक (जॅमिंग) पुष्कळ वेळा होते. घरगुती पत्रे मिळतात, परंतु मिळण्यास कडक तपासणीमुळे फार उशीर लागतो.

मास्को विद्यापीठात पूर्वेकडील देशांतील विद्यार्थ्यांची संख्या या वेळी चौदाशे आहे. बरेचसे विद्यार्थी विज्ञान व तंत्रविद्या शिकण्याकरिता आले आहेत. चिनी विद्यार्थ्यांची संख्यासुद्धा बरीच आहे. हे विद्यार्थी इतरांमध्ये मुळीच मिसळत नाहीत. इतरांशी बोलणे टाळतात, एकलकोंडे राहतात. त्यामुळे त्यांना कोणत्या विद्याशाखेमध्ये किती अवसर मिळतो, हे समजणे कठीण. परंतु भारतीय विद्यार्थ्यांचा अनुभव असा आहे की, इंग्लंड, अमेरिका किंवा युरोपातील स्वतंत्र देश यांच्यामध्ये भारतीय विद्यार्थ्यांचा तंत्रविद्येत जितका अवसर मिळतो तितका रशियात मिळत नाही. अनेक विद्यार्थ्यांना याकरिता विषय बदलावे लागले आहेत किंवा देश बदलावे लागले आहेत. तेथे पिलाची येथील श्री. वार्ष्णेय या विद्यार्थ्याची गोष्ट कळली. तो मास्कोला आयुर्विद्येकरता आला होता. निराश होऊन अखेरीस त्याने डेन्मार्क येथील कोपेन् हॉगेनच्या विद्यापीठात प्रवेश मिळविला. मी असताना तो कोपेनहॉगेनहून भारताकडे परतताना मास्को येथे उतरला होता. तो म्हणाला, 'रशियांत तिकडे जिकडे सुक्षतेचे बंड फार आहे. विशेषत: वैज्ञानिक व तांत्रिक शास्त्रांमध्ये ते बेसुमार माजले आहे.'

मास्को विद्यापीठातील कँटीनकडे मी रोज सकाळ संध्याकाळ उदरभरणार्थ जात असे. कँटिन व जाण्यायेण्याचा मार्ग विद्यार्थिनी यांनी फुललेला असावयाचा. स्त्रिया व पुरुष यांच्यामध्ये आरोग्य, क्रांती व खणखणीत प्रकृती सारखीच छान दिसून येई. विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची संख्याही जवळजवळ सारखी दिसली. तरुण व प्रौढ विद्यार्थी-विद्यार्थिनी एकमेकांत निःसंकोचपणे खुल्या दिलाने मिसळत होते. विद्यापीठाच्या लहान-मोठ्या सर्व प्रकारच्या सेवाकार्यांत स्त्रियांची संख्या अधिक आहे. उपकरणांची व पुस्तकांची दुकाने यांत व आहारगृहांत केवळ स्त्रियाच होत्या. कारकुनाची व क्रयविक्रयाची कार्ये प्रामुख्याने स्त्रिया करतात. विद्यापीठातील वसतिगृहांतील पुरुषविद्यार्थ्यांच्या व महिला विद्यार्थ्यांच्या खोल्या व दालने एकमेकांना लागून आहेत. स्त्रियांच्या वेशभूषेत विशेषतः केशरचनेत वैचित्र्य आढळते. भारतातील स्त्रियांच्या केशरचनेचे जुने नवे सर्व प्रकार मास्को विद्यापीठातील महिलांच्या केशरचनेतही दिसून आले.

मला विशेष गोष्ट दिसली ती ही की, महिला व पुरुष विद्यार्थी यांच्या राहण्याच्या खोल्या एकमेकांस लागून होत्या; परंतु एका आठवड्याच्या अवधीत या संबंधांत परिवर्तन घडवून आणण्याचा विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी प्रयत्न करीत आहेत, असे दिसले. वसतिगृहांतील डाव्या बाजूच्या जिन्यांच्या रांगांमध्ये प्रत्येक मजल्यावर दीड फूट रुंदीची जाडी भिंत रचली जात होती. अगदी प्रथम त्या ठिकाणी बांधकामाचा माल तेवढा पडलेला होता. भिंत रचली जात असता माझा मुक्काम संपत आला होता. तेथील मुकादमाला दुभाष्यातर्फे मी विचारले की या डाव्या-उजव्या समांतर जिन्यांच्या मध्ये भिंती उभारून या सुंदर महालाची शोभा का बिघडवीत आहात? त्याने उत्तर दिले की, आता येत्या वर्षापासून विद्यार्थिनी व विद्यार्थी यांच्या राहण्याच्या खोल्या वेगळ्या गटांत विभागावयाच्या आहेत आणि तरुण-स्त्री पुरुषांनी विद्यापीठाच्या आवारात एकत्र मिसळू नये. म्हणून या जिन्यांच्या तोंडावर पहारेकरी बसवायचे आहेत. विद्यापीठातून मी मुक्काम हलविला, त्या वेळी या भिंती जुन्या झाल्या होत्या. मी मनातल्या मनात 'सनातन धर्म की जय' असा घोष केला.

(नवभारत, डिसेंबर, १९६०. पृ. ५५ ते ५९)

○○○

८८

रशियातील सर्वधर्म परिषद

राशियात विद्यमान चार धर्म आहेत. ख्रिश्चन, यहुदी, मुसलमान व बौद्ध. या सर्व धर्मांच्या प्रतिनिधींची मुख्यतः ही परिषद होती. रशियातील झागोर्स्क या नगरीत दि. १ ते ४ जुलै, १९६९ असे चार दिवस सोविएत युनियनमधील सर्व धर्मांच्या प्रतिनिधींची परिषद आंतरराष्ट्रीय सहकार्य व 'प्रावदा' (रशियन वृत्तसंस्था) यांच्या स्थापनेच्या उद्देशाने भरली होती. रशियाच्या मध्ययुगीन इतिहासातील एका महत्त्वाच्या यशस्वी घटनेकरिता प्रसिद्ध असलेली झागोस्की ही नगरी मॉस्कोपासून ८० किलोमीटरवर आहे. या नगरीतील प्राचीन संत-सर्ज-त्रिमूर्ती धर्मपीठ हे एक रशियातील भव्य व सर्वांगसुंदर स्थान परिषदेकरिता निवडले होते. येथूनच मंगोल आक्रमकांना अनेक शतकांपूर्वी धर्मगुरूंच्या प्रेरणेने प्रेरित झालेल्या रशियन वीरांनी प्राणपणाने कायमचे पिटाळून लावले होते.

अष्ट दिशांचे प्रतिनिधी

या परिषदेत सोविएत युनियनचे १८१ प्रतिनिधी होते. तसेच या परिषदेत बाहेरच्या जगातील अष्ट दिशांतील बहुतेक राष्ट्रातील निमंत्रित ११८ धर्मप्रमुख उपस्थित होते. हे नुसते धर्मप्रमुख नव्हते, तर प्रचलित राजकारणाचा विचार करणारे निवडक लोक होते. यात भारतातील आठ जण (२ हिंदू, ३ ख्रिश्चन, १ बौद्ध, १ जैन, १ मुसलमान), नेपाळातील बौद्ध धर्मगुरू अमृतानंद व सिलोनचे (श्रीलंका) २ धर्मगुरू होते. या परिषदेत बाहेरच्या जगातील निमंत्रितांना भाषणाचा व चर्चेत भाग होण्याचाही अधिकार होता, परंतु मतदानाचा नव्हता. मतदान होण्याच्या अगोदर मतभेद व उपसूचना मांडल्या जात होत्या.

या परिषदेचे निमंत्रण मला आयत्या वेळी म्हणजे सात दिवस अगोदर तारेने मिळाले. ती तार मुंबई येथील रशियन दूतावासाच्या राजदूताने वाईस स्वतः येऊन माझ्या हाती दिली. तारेवरून मुख्य विषय काय काय येणार याची स्पष्ट कल्पना नसल्यामुळे भाषण तयार करून व लिहून नेता आले नाही. तशी संधी पुष्कळांना मिळालेली दिसली. मी परिषदेच्या

दिवशीच सकाळी ६.३० वाजता मास्कोला विमानाने पोहोचलो. व लगेचच झागोर्स्कला गेलो. परिषदेस प्रथमपासून अखेरपर्यंत उपस्थित होतो.

मुख्य अधिवेशन धर्मोपदेश-मंदिराच्या क्रॉसचा आकार असलेल्या सभागृहात झाले. या सभागृहाचे शिखर म्हणजे घंटा लोंबकळत असलेला चतुरस्र व उत्तुंग असा चार मजली मनोरा आहे. स्थापत्य कलेचे हे एक रमणीय व अप्रतिम प्रतीक आहे. त्याच परिसरात ७-८ रमणीय प्रासाद आहेत; व प्रत्येक प्रासादाला लागून उद्याने आहेत. या रमणीय प्रासादांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण व उत्कृष्ट प्रार्थना मंदिरे आहेत: मुस्लीम स्थापत्याच्या शैलीचा स्पर्श असलेले नाजूक, टुमदार, नारळाकार, सोनेरी व चित्रविचित्र अनेक घुमट या प्रार्थना मंदिरांवर स्थिरावून आकाशातील पित्याच्या कृपेकरिता मुनिवृत्तीने ध्यान करीत आहेत. मध्ययुगातील सामान्य मानवातील चैतन्यशक्तीच पिळून व निपटून काढलेली व विशाल कालेच्या रूपाने पुनः प्रकट झालेली येथे दिसते. ती माणसे दीन श्रमिकांचे उदास जीवन जगून थडग्यात गेली. ह्या असामान्य, भव्य व सुंदर कलेच्या रूपात मात्र त्यांचे ते चैतन्य स्थिरावून राहिले आहे.

स्वागताध्यक्ष रशियाचे मुख्य धर्मगुरू ॲलेक्सी होते. या परिषदेला सोविएट युनियनचे पंतप्रधान कोसिजिन यांचा शुभसंदेश आलेला होता. स्वागताध्यक्षांचे पूर्ववृत्तनिवेदक भाषण, व्यवस्थापकांचे भाषण व कोसिजिन यांचा संदेश ऐकल्यावर या परिषदेचे उद्दिष्ट मला स्पष्ट काळले. ही सर्व धर्मांच्या प्रतिनिधींची आंतरराष्ट्रीय राजकीय परिषद आहे, हे माझ्या लक्षात आले. प्रथम अधिवेशन समाप्त झाल्यावर पाच विषयांवर चर्चा करून पाच ठरावांचे मसुदे तयार करण्याकरिता एक एक विषयाची एक एक समिती अशा पाच समित्या नेमल्या गेल्या. ते विषय असे - (१) व्हिएतनामचे व आशियातील देशांचे प्रश्न (२) युरोपच्या संरक्षणाचे प्रश्न, (३) मध्यपूर्वेतील विग्रह, (४) वसाहतवाद व नववसाहतवाद (५) निरनिराळ्या राष्ट्राराष्ट्रांमध्ये सहकार्य व शांतता निर्माण करण्याच्या उद्देशाने निरनिराळ्या धर्मांचे संयुक्त प्रयत्न घडवून आणण्याकरिता आवश्यक असलेली पार्श्वभूमी, कृती व संभवनीयता.

या समित्यांमध्ये आतील प्रतिनिधी व बाहेरील अभ्यागत या सर्वांची वाटणी करण्यात आली. मला 'मध्यपूर्वेतील विग्रह' या विषयाच्या गटात घातले. मी अध्यक्षांना निरोप पाठवला की मला धर्म या विषयावर चर्चा करण्याची अधिक उत्सुकता व रस आहे. मला पाचव्या गटात घातले तर बरे होईल. त्यांनी माझी विनंती मान्य केली. त्यांना माहीत होते की, मी धर्मकोशाचा संपादक म्हणून निमंत्रित केलेला अभ्यागत आहे. त्या वेळी माझ्याभोवती गोळा झालेले भारतीय व पूर्व युरोपीय काही अभ्यागत म्हणाले की, "अहो, हे पाच गट बसून जी चर्चा करतील व ठरावांचा मसुदा ठरवतील ते ठराव अगाऊच ही परिषद भरण्यापूर्वीच पक्के तयार झालेत. गंमत म्हणून चर्चा करायच्या." मी उत्तर दिले की, 'मोकळेपणाने चर्चा करता येते हे काय थोडे आहे?' मला इतर चारी गटांत जाण्याची व तेथे बसून ऐकण्याची मधून मधून संधी मिळाली.

राजकीय धोरणाचाच अक्षरशः पाठपुरावा

तिन्ही मुख्य अधिवेशनांमध्ये राशियन, इंग्लिश, फ्रेंच, जर्मनी व अरबी या पाच भाषांमध्ये भाषणे झाली. त्या भाषणांची दुभाष्यांनी केलेली एका वाक्यापाठीमागून दुसरे वाक्य अशी भाषांतरे कानाला व गळ्याला अडकविलेल्या इयर-फोनच्या लोढण्यातून ऐकू येत होती. बहुसंख्य भाषणे रशियन भाषेत झाली. इंग्लिश भाषेला दुसरा क्रमांक होता. बाहेरील जगाच्या प्रतिनिधींची बहुतेक भाषणे पाच-दहा अपवाद सोडल्यास इंग्रजीतून झाली. सध्या जगाची आंतरराष्ट्रीय भाषा प्रामुख्याने इंग्लिशला म्हणून स्थान मिळालेले आहे, ही गोष्ट या परिषदेच्या निमित्ताने पुनः शाबीत झाली. महत्त्वाच्या धर्मनेत्यांची महत्त्वाची भाषणे इंग्रजीतही टंकलिखित केलेली आम्हांस मिळाली. ही टंकलिखिते अरबीखेरीज चार भाषांमध्ये आधिक्याने मिळाली. दोनच भाषणे अरबीत टंकलिखित झालेली मी पाहिली.

पाचही विषयांवरील ठरावांवर चर्चा सविस्तर झाल्या. मतभेदाचे मुद्दे फार थोडे आणि फार थोड्या लोकांनी मांडले. राशियन सरकारचे आजचे जे आंतरराष्ट्रीय राजकारणातील धोरण आहे, त्याचाच अक्षरशः पाठपुरावा करणारे सर्व ठराव अखेरच्या अधिवेशनात संमत झाले. त्यांचे तात्पर्य -

(१) व्हिएतनामच्या आपत्तीस व गोंधळास अमेरिकन साम्राज्यशाही जबाबदार आहे. अमेरिकन वसाहतवाद्यांनी व्हिएतनाममधून संपूर्ण लष्करासह परत फिरावे; तसेच दक्षिण व्हिएतनाममधील नव्या क्रांतिकारक सरकारला जगातील सर्व राष्ट्रांनी पाठिंबा द्यावा.

(२) युरोपच्या संरक्षणाकरिता युरोपात कायम शांतता नांदावी अशी सर्व युरोपियन जनतेची मागणी आहे. युरोपियन शांततेचा खरा शत्रू पश्चिम जर्मनी. पश्चिम जर्मनी अणुयुद्धाची भक्कम तयारी करीत आहे. या तयारीच्या पाठीमागे पश्चिम व पूर्व जर्मनीची पुनः राजकीय एकता स्थापन करणे हे पश्चिम जर्मन नव्या नाझीवादी सत्ताधाऱ्यांचे मनोगत आहे. युरोपातील स्पेन न पोर्तुगालमधील हुकूमशाही हा एक युद्ध निर्माण करणारा धोका होय. युनायटेड स्टेट्सची आर्थिक साम्राज्यशाही युरोपात आपल्या आर्थिक वसाहतवादाचे पाश पसरीत आहे; हाही एक प्रकारे तिसऱ्या महायुद्धाचा धोका ठरणार आहे. या सर्व धोक्यांपासून युरोपचे संरक्षण करण्याकरिता सर्व युरोपियन जनतेने एकजूट करावी.

३) पश्चिमी आशियातील विग्रहास व अशांततेस मुख्य कारण आक्रमक इस्त्रायल हे होय. या इस्त्रायली राष्ट्राला पश्चिम युरोपातील जुनी साम्राज्यवादी राष्ट्रे व युनायटेड स्टेट्स यांचे उत्तेजन आहे. जगातील सर्व राष्ट्रांनी, शांतताप्रिय जनतेने व जगातील धर्मांनी आग्रह धरावा की इस्त्रायलने आपल्या इ. स.१९६७ च्या युद्ध पूर्व सीमेवर सर्व लष्करी शक्तीनिशी परतावे. या संबंधात सर्व शांतताप्रिय जनतेने एकजूट करावी.

(४) आफ्रिकेत गोऱ्या वंशवाद्यांनी हुकूमशाही स्थापन केलेली आहे व ते काळ्या कातडीच्या आफ्रिकन जनतेला सर्वथा छळीत आहेत, नागवीत आहेत व त्यांच्यात फूट पाडीत आहेत. हा आफ्रिकेतला व युनायटेड स्टेट्समधील काळा-गोरा असा वंशभेद नष्ट केला पाहिजे. धर्माची उच्च मानवतावादी तत्त्वे या वंशवादाच्या विरुद्ध आहेत. दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रे राजकीयदृष्ट्या स्वतंत्र असली तरी त्यांच्यावर आर्थिक व सांस्कृतिक स्वरूपात युनायटेड स्टेट्सचे आक्रमण सतत चालू आहे. हा आर्थिक वसाहतवाद म्हणजेच ननवसाहतवाद होय. या नववसाहतवादातून दक्षिण अमेरिकेतील, आशियातील व आफ्रिकेतील जनतेला मुक्त केल्याशिवाय जगातील राष्ट्राराष्ट्रांमधील निरंतर सहकार्य व शांततेचे संबंध स्थापित होणे शक्य नाही. सर्व मानवाच्या बंधुत्वाचे धार्मिक तत्त्व या सहकार्याला व शांततेला पूरक आहे.

(५) जगातील सर्व उच्च धर्म मानवाचे बंधुत्व, स्वातंत्र्य व व्यक्तिमत्त्व ह्यांना अग्रस्थान देतात. जगातील वंशद्वेष, सामाजिक उच्च-नीच भाव, आर्थिक विषमता, वर्गीय शोषण पद्धती व सशस्त्र युद्ध यांचा अंत केल्याशिवाय सर्व धर्मांचे उद्दिष्ट असलेली शांतता स्थापन होऊ शकणार नाही. समाजवादी नीतिशास्त्राची आणि समाजवादी समाजसंस्थेची तत्त्वे धर्माच्या मानवतावादाशी सुसंगत आहेत. जगातील मोठमोठी राष्ट्रे शस्त्रास्त्रांची वाढ करून तिसऱ्या जागतिक युद्धाचा संभव नजीक आणीत आहेत. जागतिक तिसरे महायुद्ध झाले तर मानवजातच या पृथ्वीवर राहणार नाही व राहू शकणार नाही. शस्त्रास्त्र वाढीकरिता जो अपरिमित धनव्यय होत आहे तो टाळण्याकरिता जगातील प्रमुख राष्ट्रांनी शस्त्रास्त्रांचे साठे क्रमाक्रमाने कमी करण्याचा प्रयत्न आंतरराष्ट्रीय सहकार्याने करावा व संपूर्ण निःशस्त्रीकरणाचे ध्येय गाठावे. याकरिता भांडवलशाही शोषणपद्धती बंद करावी. सर्व धर्मांच्या लोकांनी व सर्व राष्ट्रांतील जनतेने संघटित होऊन आंतरराष्ट्रीय शांततेच्या व सहकार्याच्या धोरणाची अंमलबजावणी करावी.

अनपेक्षित छाप

या ठरावाच्या अनुषंगाने जी भाषणे झाली, त्यांत ख्रिश्चन धर्माच्या पवित्र ग्रंथाच्या आधारे शांततेचे विवरण परिषदेच्या प्रथम अधिवेशनात लेनिनग्राडच्या निकोदिम या नगर धर्मपित्याने उत्कृष्ट रीतीने केले. बायबलच्या नव्या करारातील अनेक वचने त्याने उद्धृत केली. धर्मवचनांच्या बरोबरच गेल्या वीस वर्षांत रशियातील धर्मोपदेशक व धर्मतत्त्वज्ञ यांनी वेळोवेळी व्यक्तिश: वा संघशः प्रसिद्ध केलेल्या निवेदनांचा व नियतकालिकातील लेखांचा आधार दिला. हा असा आधार देत असता त्या सोविएत युनियनच्या वरिष्ठ सत्तास्थानावरून प्रसिद्ध झालेल्या शांततेविषयक उद्घोषणांचाही समावेश केला. सोविएट युनियनमध्ये चार कोटी मुसलमान राहतात. त्यांचे अनेक धर्मगुरू आलटून पालटून या परिषदेतील अध्यक्षीय

मंचावरील अध्यक्षपदे विभूषित करीत होते. त्यांनीही कुराणातून शांततासार्थक वचनांचा शांततेच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाला परिपोषक म्हणून उपयोग केला. अनेक बौद्ध धर्मगुरू मंगोलियातून आले होते. बौद्ध धर्म हा अहिंसाप्रधानच असल्यामुळे सार्वत्रिक युद्धनिषेधाची घोषणा त्यांनी केली. ती सुसंगत दिसली. हिंदू धर्माचे अनेक प्रतिनिधी होते. दक्षिण अमेरिकेतील गयाना या छोट्या राज्याचे संसदीय सदस्य व तेथील हिंदू महासभेचे मुख्य सचिव परस्ताद यांनी हिंदू धर्मातील शांततावादाचे रहस्य सांगून अनपेक्षितपणे छाप मारली.

ते म्हणाले, "वैचित्र्यात एकता पाहणे व अनुभवणे हे हिंदू धर्माचे रहस्य आहे. भारतात ब्रिटिश येण्यापूर्वी कधीही धर्माधर्मांमधील सशस्त्र युद्धे झाल्याची घटना भारताचा इतिहास सांगत नाही. जगातील सर्व धर्म हे अंतिम, पवित्र व पूर्ण सत्याकडेच जातात. प्रत्येक धर्म हा सत्याकडे जाणारा एक मार्ग आहे. म्हणून अंतिम ध्येयवादाच्या स्थापनेकरिता आपलाच ध्येयवाद आला पाहिजे, असा हट्ट धरून सशस्त्र युद्धाचा मार्ग धरण्याची प्रवृत्ती पसरविणे निषिद्ध होय, असेच एका परीने हिंदू धर्म सूचित करतो. इतर उच्च धर्मांना मान्यता देणारा हा एकच धर्म आहे. याचे अनुकरण इतर धर्मांनी करावे." हे भाषण ऐकल्यावर मी श्री. परस्ताद यांना धन्यवाद दिले व त्यांची सर्व चौकशी केली. चौकशीअंती असे कळले की, हे एक उत्साही सामान्य कार्यकर्ते आहेत. रामकृष्ण, विवेकानंद व राधाकृष्णन यांचे निवडक वाचन त्यांनी केले आहे. ते विद्वान खास नव्हेत. स्वभाव विनयशील दिसला. असा कार्यकर्ता असावा.

मी स्वतः धर्माच्या शांतताप्रधान पार्श्वभूमी ठरविणाऱ्या पाचव्या गटात तिसऱ्या दिवशी इंग्रजीत भाषण केले. प्रत्येक वाक्याचे रशियन भाषेत भाषांतर होत होते. मी म्हटले, "गेल्या ५० वर्षांच्या सोविएत युनियनच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना म्हणजे ही सर्वधर्म परिषद होय. माझ्या मित्रांना जेव्हा कळले की मी रशियास धर्म परिषदेकरिता जात आहे, तेव्हा त्यांचा विश्वास बसेना. रशियात धर्मपरिषद? हे कसे संभवते? तेव्हा मी त्यांना निमंत्रणाची तार दाखविली. व मग त्यांचा विश्वास बसला."(श्रोत्यांच्या चेहऱ्यावर ही खोच लक्षात आलेली दिसली.) मी पुढे म्हणालो, "अणुयुद्धाने भयभीत झालेल्या जगाला वस्तुत: एकच मार्ग आहे. माझ्या देशाने साम्राज्यशाहीविरोधी निःशस्त्र, प्रतीकात्मक, शांततामय आंदोलनाचा मार्ग अनुसरला, एका अद्वितीय नेत्याने तो लढा यशस्वी करून दाखविला. तो अद्वितीय नेता एक सर्वश्रेष्ठ धर्मसुधारक व समाजसुधारक होता. तो म्हणजे महात्मा गांधी. गांधींच्या तत्त्वज्ञानाचा व राजकारणी धोरणाचा उगम ख्रिस्ताच्या व बुद्धाच्या अहिंसावादात झाला. या वादाचा लिओ टॉलस्टॉय या विश्वविख्यात साहित्यिकाने प्रथम राजकीय अर्थ सांगितला. टॉलस्टॉयच्या विचारांचे सूत्र भाषणरूपाने गांधीजींनी विवरिले आणि मानवी इतिहासातील एक अपूर्व असा निःशस्त्र क्रांतीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला. युद्धाचा अंतिम शेवट युद्धाने कधीच होत नाही. धर्म हा जेव्हा दोन्ही स्वामींची म्हणजे ईश्वराची व

ऐहिक भौतिक संपत्तीची सेवा करू लागतो. तेव्हा धर्म हा अफूची गोळी बनतो. अन्यथा नव्हे. धर्म जेव्हा अंतिम ईश्वरी सत्य हाच एक स्वामी मानून त्याची सर्वथा शरण जाऊन सेवा करतो, तेव्हा तो शुद्ध मंगलमय प्रकाशाचा मार्ग बनतो. ख्रिश्चन धर्माचा मध्ययुगीन इतिहास या धार्मिक, अवनीतीचे एक स्पष्ट उदाहरण आहे. पवित्र शास्त्र व घातकशास्त्र यांची युती हे मानवी अवनीतीचे एक कुलक्षण आहे. राष्ट्रांतर्गत व आंतरराष्ट्रीय सहकाऱ्यांचा व शांतीचा मार्ग म्हणजे गांधी मार्गच होय. सामाजिक शोषण व विषमता यांचा अंत गांधींच्या अहिंसा मार्गानेच होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय चिरंतन शांततेची व सहकार्याची धार्मिक पार्श्वभूमी व दृष्टी महात्मा गांधींनी निर्माण केली आहे. ही दृष्टी जे स्वीकारत नाहीत, त्यांची आंधळ्याची मालिका विश्वसंहाराच्या अनंत अंधकारात मानवास नष्ट करील असे भय आहे व ते भय जगात भेडसावीत आहे. मार्क्सचे हे लेनिनचे साम्यवादी ध्येय आणि समतेचा व व्यक्ती स्वातंत्र्याचा आदर्श हा गांधी मार्गानेच जगाला गाठता येईल.''

हे वरील प्रकारचे माझे भाषण संपल्यावर कीव्हच्या अर्थाडॉक्स चर्चचे नगर धर्मपिते यांनी अध्यक्षपदावरून आभार मानताना मला विनंती केली की ''भारतात जाऊन असे सांगा की सोविएट युनियनमध्ये धर्मस्वातंत्र्य आहे.''

धर्मसंस्था व धार्मिक जनता यांनाही आपल्या पाठीशी उभे करण्यास सोविएट सरकारचे आंतरराष्ट्रीय शांततेचे राजकारण सरसावले आहे. आंतरराष्ट्रीय धर्मसंस्था व धार्मिक जनता यांचा पाठिंबा मिळविण्याच्या राजकारणाला चांगलाच रंग भरत आहे. गेल्या मे महिन्यातच बर्लिनच्या पूर्व भागात युरोपियन कॅथलिक ख्रिश्चनांची धर्म परिषद भरली असताना या सर्व धर्म परिषदेच्या ठरावांच्या पाठीमागे असलेली विचारसरणी मांडण्यात आली. झागोर्स्कच्या आमच्या धर्म परिषदेत न्यूयॉर्क येथील वर्ल्ड कौन्सिल ऑफ नॅशनल चर्चेस या संस्थेचे उपाध्यक्षही उपस्थित होते.

ही परिषद समाप्त झाल्यानंतर पाचव्या दिवशी आम्ही पहाटेस मास्कोला जाण्यास निघालो. झागोर्स्कच्या धर्मपीठाच्या रमणीय आकाराच्या भव्य दरवाजातून आमच्या मोटारी बाहेर पडल्या. मागे पुन: पुन: पाहात आम्ही बरेच पुढे गेलो व ती सोनेरी शिखरे दृष्टिआड झाली.

(दैनिक महाराष्ट्र टाइम्स, मुंबई, दि. २० जुलै, १९६९)

○○○

८९

आमची अमेरिकेची यात्रा- १
(दैनंदिनी)

१९७७ मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात एसेक्सजंक्शन, बर्लिंटन (व्हर्मांट राज्य) हून चि. मधूची तार आली की, तुमची एअर इंडियाची परतीची (डॉलर - ८५६) तिकिटे पाठविली आहेत; राम व विजय यांच्या स्कूल ग्रॅज्युएशनच्या समारंभाला तुम्ही या. समारंभ १० जूनला आहे. उशिरा आलात तरी चालेल. मी व सौ. सती मुंबईस चौकशीकरिता नरिमन पॉईंटवरील एअर इंडिया कार्यालयात चि. सौ. सुमनबरोबर गेलो. तिकिटे आली आहेत,असे कळले. आम्हा दोघांचे पासपोर्ट (पारपत्रे) गेल्या वर्षी पुणे येथील विमान एजंट श्री. गाडगीळ यांच्याकडे देऊन ठेवले होते. त्यांना राम कोल्हटकरनी कळविले की, विमानतिकिटे घेऊन विसा तयार ठेवा. जून ता. ८ प्रातःकाळ ३ वाजताचे १०५ नंबरचे विमान ठरवून ता. ३ जूनला गाडगीळ यांनी विसासह सर्व कागदपत्रे आमच्या स्वाधीन केली.

आम्ही यात्रेच्या तयारीस लागलो. थंड हवापाण्याच्या देशात जाणे आहे; कपडे कोणते व किती घ्यायचे, इतर सामान व अमेरिकेच्या परिवारातील मंडळीना द्यावयाच्या बारीक सारीक देणग्या काय घ्यायच्या, हापूस आंबे न्यावे असे वाटे; परंतु अमेरिकन कस्टम इकडील फळे फेकून देते, म्हणून तपशील ठरविण्यास ३-४ दिवस लागले. कारण ठरावीक वजनच (म्हणजे प्रत्येकी २० किलो) बरोबर नेता येते. त्यामुळे तपशील ठरविताना फार वेळ लागला. आमचे मित्र प्रा. रंगनाथ कुलकर्णी व पोपटराव देशपांडे यांनी सामान भरण्याचे काम व्यवस्थित केले. साड्या, मसाले, देणगीदाखल न्यायची मिठाई अशा दोन बॅगा भरल्या, वर बरेच किरकोळ सामान उरले. ते हातबॅगांमध्ये घातले. मुंबईस चि. सौ. सुमनकडे ता. ६ ला गेलो. ता. ७ ला संध्याकाळी आम्ही सर्व जण (कुलकर्णी व देशपांडेसह) सुमनकडे जेवलो. राम कोल्हटकरनी सर्व बाबतींत दक्षता व व्यवस्था ठेवली. आम्ही सर्व जण मुंबई विमानतळावर (विमानपत्तनावर) ता. ८ रात्री १ ला गेलो. ६ वर्षाच्या अजेयला आम्हास पोचविण्यास यायचे होते. त्याला वेळेवर जावई चि. चंद्रशेखरपंतांनी उठवले, तोही बरोबर होता.

चि. अशोक खंडकर व अनिल साठेही आयत्या वेळी उपस्थित झाले. तिकिट व सामान घेऊन आम्ही पत्तनमहालात शिरलो. इतरांना परवानगी नव्हती. परंतु पोपट देशपांडे युक्तीने प्रवेश करून आमच्या मदतीकरिता आमच्या संन्निध तेथे उपस्थित झाले. आमच्या हातबॅगांतले सामान नियमाबाहेर वजन असलेले. धाकधूक वाटत होती की, हातबॅगा मोजल्या तर अधिक सामान काढून टाकावे लागणार. परंतु हातबॅगा वजनावर घातल्याच नाहीत. मी विचारले, याचे काय करायचे? क्लार्कने सांगितले त्यांचे वजन करण्याची गरज नाही. मन एकदम स्वस्थ झाले होते. बॅगा पुन: विमानतळाबाहेर आणून पाहिजे तेवढे सामान जादा घेतले. कस्टममधून ५ मिनिटांत हँडबॅगा व शरीर यांची चाचणी होऊन विमानयात्रेकरूंच्या दालनात जाऊन बसलो. विमानाची सुटण्याची ठरलेली वेळ ३ वाजताची. तोपर्यंत आमंत्रणाचा इशारा आलाच नाही. ३ ला आला. विमान बसमध्ये बसलो. विमानात जाऊन ३६ व ३७ क्रमांक खुर्चीत आम्ही दोघे बसलो. पहाटे ४ ला विमान चालू झाले. विमान रोम, पॅरिस येथे एक-एक तास व लंडनला २ तास थांबले. रोम व लंडन विमानतळावर तास अर्धा तास फिरण्याची परवानगी होती. फिरून आलो.

जून ता. ८ ला संध्याकाळी ५ ला न्यूयॉक विमानतळावर 'एअर इंडिया १०५' उतरले. केनेडी विमानतळावरून निघून लांबलचक आवृत पथातून आम्ही दोघांनी अवजड, हातबॅगा घेऊन कस्टमच्या दालनात प्रवेश केला. ५ मिनिटांत सामान न उघडता आमची सुटका झाली. उतारू-पत्रकाची एक प्रत (कार्बन) ज्या अधिकाऱ्याजवळ दिली त्याने मात्र आदरपूर्वक तक्रार केली की, उतारू-पत्रकाची कार्बनप्रत नीट उमटली नाही. परंतु त्यानेच पुनः नीट लिहून घेतली. आमचे सामान सुटसुटीत व आम्ही दोघे उतारू उतारवयाचे भारतीय सद्गृहस्थ म्हणून बहुतेक आमची सहज न तपासता सुटका झाली असावी. सहज सुटका झाल्यावर मनात आले की २-३ डझन हापूस आणले असते, तर मुले ते पाहून नाचली असती.

बाहेर पडलो तोच चि. मधू, सौ. मालू, मुरलीधरपंत, राम व विजय स्वागतास उभे असलेले दिसले. त्यांनी लगेच पुढे येऊन आमचे हातातील सामान घेतले. मधूने मोठ्या दोन बॅगा वाहून आणणाऱ्या हमालाला पैसे देऊन बॅगा ताब्यात घेतल्या. जावई चि. मुरलीधरपंतांच्या मोटारीत मी व मधूच्या मोटारीत त्याची आई सौ. सती बसून सुमारे ८० मैलांवरील मुरलीधरपंत राहतात त्या फिशकिल या गावी २ तासांत येऊन पोचलो. सर्वच मार्ग ऐसपैस, सुरेख व एकतर्फी म्हणजे वन वे; भोवताली वसंताची कोवळी घनदाट वनश्री बहरलेली. मुरलीधरपंतांचा बंगला टेकडीच्या उतारावर; तळघर व वरचा एक मजला; भोवती बाग; व दूरदूर सुरेख बंगले. फळ्या, तुळया व खांब सर्वच बहुतेक बांधकाम इमारती लाकडाचे. आधुनिक यांत्रिक जीवनोपकरणांनी सजलेले हे निवासस्थान पाहून सौ. सतीस धन्यता वाटली. मुरलीधरपंतांच्या आदरयुक्त सौजन्याने आमचे दोघांचे मन प्रसन्न झाले.

चि. सौ. मालतीच्या सुखी जीवनाचे प्रत्यंतर आले. ढगाळ हवा; पाऊस मधून मधून पडत होता. येथे उन्हाळा सुरू झाला म्हणतात. परंतु आम्हाला उबदार कपडे उतरावेसे वाटले नाही.

चि. मधूचा गाव एसेक्सजंक्शन (बर्लिंटन) व्हर्मांट राज्य, अमेरिका. जून १० तारखेस सौ. मालतीच्या फिशकिल गावाहून तिच्याच मोटारीने चि. मधूच्या एसेक्सजंक्शन गावी दुपारी आलो. चि. सौ. इंदूने - आमचे स्मितपूर्वक स्वागत केले. अडीचशे मैल प्रवास. तीन तीन गल्ल्यांचे वन वे (एकतर्फी) रस्ते; रस्ते रुंद, समोरासमोर वाहन येत नाही. ५५ मैलांचा नियम असूनही इतरांप्रमाणेच नियम न मानता ६०-६५ मैल वेगाने मुरलीधरपंतांनी मोटार आणली. सर्व प्रदेश डोंगराळ, वृक्षवनस्पतींनी भरलेला हिरवागार; बर्च, पाइन (देवदार), मेपल, एल्म इत्यादी उंचउंच वृक्ष; वसंतऋतूमुळे पालवी कोवळी; थोडा थोडा पाऊस; हवा ढगाळ; मधूनमधून सुंदर व सुरेख घरे असलेली गावे लागली. बहुतेक घरे म्हणजे लाकडी फळ्यांच्या भिंती असलेले निरनिराळ्या शैलीचे बंगले. बहुतेक दुमजली; घराभोवती हिरवळ व फुलझाडे; बहुतेक सगळी वस्ती गोऱ्या अमेरिकनांची. येथे सु. शेकडा एकच काळा माणूस. रस्त्यांवर घराबाहेर माणसांची गर्दी कोठेही दिसली नाही.

मधूचा बंगला ३६ शे चौरसफूट; दुमजली; तळघर व तळघरावरील मजला, त्याला जोडून सज्जा; सज्जा दोन पुरुष उंचीवर. भोवताली १ एकर मालकीचा परिसर. भोवती घनदाट वनात एकमेकांपासून अंतरावर बांधलेल्या बंगल्यातली वसती. मोठी शहरे सोडली तर सर्व गावे अशीच; एकाला जोडून दुसरे घर अशी ५०-६० वर्षांपूर्वीची वस्ती, बंगला व भोवती उपवन अशीच सर्व गावे. मधूच्या बंगल्यात खालच्या वरच्या मजल्यांवर गालिचे अंथरलेले. स्वयंपाकघरही चांगले ऐसपैस. यांत्रिक जीवनोपयुक्त उपकरणांनी सुसज्ज, लाकडी मजबूत काळ्या कुळकुळीत कपाटांवर भांडीकुंडी व यांत्रिक शेगड्या. टोस्ट भाजण्याचे विजेचे पात्र, मोठा फ्रीजर, मायक्रोवेव्ह नावाची काचेचे दार असलेली चूल (पेटी) ; या पेटीत ४८ सेकंदांत दूध, पोळ्या, भात इत्यादी पदार्थ चांगले गरम करता येतात. २० मिनिटांत भात, उसळ, वरण शिजून तयार होते. टेलिफोन, दूरदर्शन, दूरवाणी वगैरे साधने आहेतच. चि. लक्ष्मी पियानो वाजवते. राम, विजय, लक्ष्मी व शीला यांना मराठी नीट बोलता येत नाही. त्यांचा सर्व व्यवहार अमेरिकन इंग्लिशमध्ये चालतो. राम व विजय स्कूल ग्रॅज्युएटची परीक्षा उत्तीर्ण झाले. राम, विजय व लक्ष्मी यांना कसलेही कामे करण्याची लाज वाटत नाही. आईवडिलांची परवानगी आहे म्हणून राम रात्री एका हॉटेलमध्ये ८ तास खरकटी भांडी धुण्याच्या यंत्रात धुण्याचे काम करतो. विजयने पुढील दोन महिने येथून ८० मैलांवरील सरोवराच्या तीरावरील एका मोठ्या हॉटेलमध्ये भांडी घासण्याची नोकरी पतकरली आहे. लक्ष्मीने एका कुटुंबात बेबीसिटिंगची नोकरी धरली आहे. बंगला मोठा व बराच भाग लाकडी; त्यामुळे सुतारकाम मधूनमधून निघते; ते घरीच मधू, राम, विजय,

इंदू, लक्ष्मी हे करतात. वाकस-करवतीचे नाना प्रकार, भोके पाडण्याचे यंत्र, हातोडा इत्यादी साधने ठेवलेली आहेत. सौ. इंदूचा संसार ६ माणसांचा, आधुनिक उपकरणांची जोड आहे; तरी खूप १० तास घरकामात राबावे लागते. हाताने कसलेही परिश्रम करण्यात कमीपणा कोणासच वाटत नाही; हीच अमेरिकन संस्कृतीची देणगी.

आमचे अमेरिकेस येण्याचे मुख्य निमित्त म्हणजे राम व विजय यांच्या हायस्कूल ग्रॅज्युएशन समारंभास उपस्थित होणे. हा समारंभ १० जूनला संध्याकाळी हायस्कूलच्या विशाल सभागृहात झाला. समारंभ २ तास चालला. २ हजार प्रेक्षक ऐसपैस दोन कक्षात बसतील असे मध्ये अंगण असलेले हे सभागृह. सव्वातीनशे विद्यार्थ्यांना उत्तीर्णपत्रक मिळाले. भारतातील विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभासारखा हा समारंभ झाला. विशिष्ट पोशाख केलेले विद्यार्थी मिरवणुकीने सभागृहात आले. प्रारंभी वृंदवादन व गीतगान झाले. (डिप्लोमा) उत्तीर्णतापत्रकांचे वितरण झाले. राष्ट्रगीत होऊन समारंभ समाप्त झाला. समारंभ चालू असता उत्तीर्णतापत्रक घेताना काही विद्यार्थी वा विद्यार्थिनींचे मित्र वा मैत्रिणी टाळ्या वाजवून व उच्च घोष करून अभिनंदन करीत होते. राम व विजय यांच्या वेळी मी एकट्याने टाळ्या वाजविल्या; बाकीचे स्वस्थपणे पाहत होते.

जून १७: न्यूयॉर्क संस्थान, व्हर्मांटसंस्थान व कॅनडा यांच्यामध्ये शाम्प्लेन सरोवर १०८ मैल पसरलेले. सबंध व्हर्मांटमधून गोड्या स्वच्छ पाण्याचे हे सरोवर जाते. काही ठिकाणी १२ मैल रुंद व ३९९ फूट खोल. ठिकठिकाणी त्याची बंदरे व उल्लंघन करणारे सुरेख पूल त्याला बांधले आहेत. व्हर्मांट ह्या फ्रेंच नावाचा अर्थ हिरव्या पर्वताचा प्रदेश. वृक्षवल्लींनी निरंतर भरलेली छोट्यामोठ्या पर्वतांची राजी. अमेरिकेतील सुंदर संस्थान म्हणून या संस्थानची प्रसिद्धी. मधू राहतो तो गाव एसेक्सजंक्शन. कॅनडाकडे जाणाऱ्या-येणाऱ्या आगगाड्यांचे हे जंक्शन, शाम्प्लेन सरोवरापासून १० मैलांवर आहे. या सरोवरातून आम्ही ता. १७ ला बोटीतून बसून यात्रा केली. बोट म्हणजे बार्ज. व्हर्मांटहून न्यूयॉर्कला जाणारे लोक आपआपल्या मोटारी वा बसेस घेऊन या बार्जने जा-ये करतात.

येथून (जून ता. १९) आम्ही कॅनडामध्ये असलेली आफ्रिकनसफरी (पशुसंग्रहालय) पहावयास दुपारी ८० मैलांवर गेलो. सिंह, वाघ, तरस, लांडगे, हत्ती, शहामृगे, हरणे, जिराफ, झेब्रा, उंट, माकडे, वनगाई, म्हशी, गेंडे इत्यादी हिंस्र व अहिंस्र वन्य व ग्राम्य पशूंजवळून आमची मोटार सावकाश, हळूहळू फिरली. सर्व प्राण्यांना हिंडण्यास भरपूर वाव. हिंस्र प्राण्यांसाठी उंचउंच कुंपणे केलेली आहेत. अहिंस्र प्राणी कुंपणांच्या बाहेर हिंडत असतात. ह्या पशुविहार प्रवेशाची फी प्रत्येकी साडेतीन डॉलर. अनेक पशुविहारांमधील वाघ, सिंह इत्यादी हिंस्रप्राणी लहान जागेत कोंडलेले असतात. त्यामुळे त्यांच्यातली तरतरी व तेज मंदावलेले दिसते, तसे येथे दिसले नाही. कारण त्यांना हिंडण्यास बराच वाव असलेले आवार तयार केलेले आहे. तरी अभयारण्यातील प्राण्यांचा जोम यापेक्षा वेगळाच असतो

हे मात्र निश्चित. हिंस्र वा अहिंस्र वन्य प्राण्यांची मुक्तिविहारस्थानातच ताकत, तेज व तडफ टिकते.

जून, २१-१९७७; आज सबंध दिवस घरीच वाचण्यात घालविला. बर्लिंटन एक्स्प्रेस व न्यूयॉर्क टाईम्स ही दैनिके चाळली. भारताच्या बातम्या नव्हत्या. भारताच्या बातम्यांना अमेरिकेतील वृत्तपत्रात फार कमी जागा असते. न्यूयॉर्क टाईम्समध्ये मधून मधून भारताची बातमी अगदी महत्त्वाची तेवढीच दिलेली असते. श्री. राम कोल्हटकर यांची श्री. वसंतदादा पाटील विधानपरिषदेवर निवडून आल्याची तार मला मिळाली. अमेरिकेतील वृत्तपत्रांत यूरोप व सोविएट रशिया, चीन, इझ्राएल, विएटनाम, कोरिया इत्यादिकांना अनुक्रमाने स्थान असते. अपवाद म्हणून येणाऱ्या इतर बातम्यांत भारतादी इतर राष्ट्रे येतात. राष्ट्रीय, विदेशीय व जागतिक जीवनातील सर्वच अत्यंत महत्त्वाच्या वार्तांना व राजकीय वार्तांना प्राथम्य जितके, तितकेच तंत्रज्ञान व विज्ञानविषयक संशोधन व महत्त्वाचे प्रकल्प यांनाही असते. उदा. ८९९ मैल लांबीचा गॅसोलिन तेलनळ अलास्का येथे सुरू झाला; येथील भारतीय व अमेरिकन जीवविज्ञानवेत्त्यांनी जीवविज्ञानातील पेशीरचनेच्या डी. एन. ए. रासायनिक सूत्रानुसारे अत्यंत खोलात जाऊन नवपेशीची निर्मिती केली; सूर्यशक्तीचे प्रयोग यशस्वी होऊ लागले आहेत, कुटुंबनियोजनात स्त्रियांची गर्भधारणा थांबविण्याची शस्त्रक्रिया नव्या प्रकारे करून आवश्यक वाटेल तेव्हा पुनः गर्भधारणा करण्याकरिता स्त्रीबीजनलिका पुनः मोकळ्या करण्याची शस्त्रक्रिया नॉर्थ कॅरोलिना विद्यापीठाच्या डॉ. जॅरोफ्लाव हल्का यांनी शोधून यशस्वी रीतीने पार पाडली. इकडचे काही सामाजिक प्रश्न भारतापेक्षा वेगळे आहेत. तत्संबंधी बातम्याही कित्येकदा मोठ्या सजवून दिल्या जातात. उदा. समसंभोगी तरुण स्त्रिया व तसेच तरुण पुरुष यांना नोकऱ्या व सामाजिक संस्थांमधील पदे देण्यात कायद्याने पक्षपात केला आहे. अशा स्त्रिया व पुरुष यांनी असे कायदे रद्द करण्याची चळवळ येथे चालविली आहे. त्यांच्या निषेधदर्शक मिरवणुकांचे फोटो व परिषदांतील ठराव यांची प्रसिद्धी गेल्या आठवड्यात शिष्टमान्य दैनिकांत व नियतकालिकांत अनेकदा वाचावयास मिळाली. 'गे' वा 'क्विअर' असे या स्त्रीपुरुषांना संबोधिले जाते. दारू पिणे विशेषतः दारूचे अतिरेकी व्यसन यासंबंधीही मजकूर येत असतो. अल्कोहोलिक म्हणजे दारुडा व्यसनमुक्त कसा करता येणे शक्य आहे याची पाश्चात्त्य देशांना व सोविएट रशियाला काळजी लागली आहे. तत्संबंधी बातमीलाही खूप प्रसिद्धी दिलेली दिसते. एक एक दारुडा वेगवेगळा स्वतःपुरता व्यसनमुक्त होणे फार कठीण; परंतु सामुदायिक रीतीने दारुड्यांनी प्रयत्न केल्यास थोड्या प्रमाणात यश येते; मात्र व्यसनमुक्तांनी पुन: दारूला शिवता कामा नये. थोडी थोडी घ्यावी, काय हरकत आहे? असे म्हणून पुनः पिणे सुरू करणारे पुन: दारुडे बनतातच; अशा आशयाचा मजकूर काल माझ्या एका मित्राने वाचलेला मला सांगितला. त्यावर तो असेही म्हणाला की दारुड्या (अल्कोहोलिक) माणसाची शारीरद्रव्येच दारू मागतात. तहान,

भूक, लैंगिक संभोग, वासना, झोप, इत्यादी क्रिया ज्याप्रमाणे शारीरद्रव्यांच्या स्वाभाविक प्रक्रिया असतात तशी दारुड्याची दारूची तहान असते. ही दारुड्याची तहान कायम शांत होणे म्हणजे शारीरप्रक्रिया पार बदलून जाणे होय. दारूच्या उपयुक्ततेबद्दलही माहिती प्रसिद्ध झालेली आज माझ्या वाचण्यात आली. अबर्डीन (एम.डी) येथील डॉ. रोनाल्ड सी. पीटर्सन यांनी येथील २८ विद्यार्थी सैनिक स्वयंसेवकांवर प्रयोग केला. ह्या विद्यार्थ्यांनी पुस्तकांचा अभ्यास करीत असता बिअर पिण्यास सुरवात केली. अभ्यास पुरा झाल्यावर त्यांची परीक्षा घेतानाही बिअर पिण्यास दिली. त्यात असे आढळून आले की, बिअरमुळे स्मरणशक्ती चांगली सतेज राहिल्यामुळे ते उत्तरे चांगली बिनचूक देऊ शकले. मात्र जावई डॉ. मुरलीधरपंत कुलकर्णी यांचा या बातमीवर विश्वास नाही. ते म्हणाले, मद्यपानासंबंधी एक संशोधन असे प्रसिद्ध झाले आहे की, मद्यपान गर्भवती स्त्रियांनी केल्यास बालक बहुतेक अल्पायुषी, व्यंग असलेले, वेडे, निर्बुद्ध, रोगी वा मृतावस्थ जन्मते.

आज संध्याकाळी साडेसात वाजता एसेक्सजंक्शन येथील श्री. पद्माकर गंगातीरकर यांजकडे 'इंडिया क्लब' तर्फे माझे इंग्रजीत 'भारतीय लोकशाहीचे भवितव्य' या विषयावर भाषण झाले. भाषण सुमारे ४५ मिनिटे व चर्चा प्रश्नोत्तरे २५ मिनिटे झाली. इंडिया क्लबचे ४०-४५ भारतीय सुशिक्षित स्त्रीपुरुष सदस्य उपस्थित होते. भारताचे स्वातंत्र्य आंदोलन, विशेषत: म. गांधींच्या आंदोलनाचे पर्व, स्वातंत्र्योत्तर काली लगेच झालेली घटना (संविधान) निर्मिती, तिचे लोकशाहीविषयक सिद्धांत व मूलभूत स्वरूप आणि इंदिरा गांधींनी पुकारलेल्या आणीबाणीत झालेल्या घटना दुरुस्तीने केलेला लोकशाहीचा संकोच व अधिकारशाही उपक्रम या मुद्द्यांवर बोललो. १९६९ च्या सुमारास झालेल्या काँग्रेसभंगापासूनच मी भारतीय लोकशाही भवितव्याबद्दल सचिंत बनलो होतो. महाराष्ट्र टाईम्समध्ये ही चिंता मी तेव्हाच व्यक्त केली होती. नंतर, आणीबाणी अपायकारक आहे हे मी कराड येथे १९७५ मध्ये झालेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी स्पष्टपणे सांगितले होते. १९७७ च्या प्रारंभी आणीबाणी शिथिल झाली व समाप्त झाली. जनता पक्ष लोकसभेत बहुमताने निवडून आला. जनता पक्षास अधिकारशाही निर्माण करणारी ४२ वी घटनादुरुस्ती बाद करायची आहे. त्याकरिता जनता पक्षास दोन तृतीयांश बहुमत संसदेमध्ये मिळणे जरूर आहे. राज्यसभेत अधिकारशाहीकडे झुकलेल्या काँग्रेसचे बहुमत आहे. यामुळे ४२ वी घटनादुरुस्ती बाद करण्यास अडचण येणार. अशा स्थितीत नाइलाजाने जनता पक्षाला ४२ व्या घटनादुरुस्तीचेच हत्यार काँग्रेसवर उपसावे लागणार; हे सर्व मी या भाषणानंतरच्या चर्चेत सांगितले. काँग्रेसने ४२ वी घटनादुरुस्ती बाद करण्यास जनता पक्षास भाग पाडावे; नाहीतर काँग्रेसचा अस्त अटळ आहे, असेही बोललो.

ता. २२ जून, १९७७. आज सर्व दिवस मी वाचनलेखनात घालविला. संध्याकाळी बाहेर पडलो. मोठमोठी प्रचंड ३-४ दुकाने पाहिली. नंतर (जॉ) जवडा हा सिनेमा पाहिला.

शॉर्क माशाची शिकार हा मुख्य विषय. या सिनेमाने दीडशे ते दोनशे मिलियन डॉलर नफा आतापर्यंत मिळविला असे म्हणतात. उत्तर अमेरिका, युरोप व जपान या देशांत यंदाचा हा अत्यंत लोकप्रिय सिनेमा होय.

ता. २३ जून, १९७७- येथील मधूचे कौटुंबिक जीवन निराळेच दिसते. तो भारतात राहिला असता तर तसे दिसले नसते. आजपासून चि. रामने येथून ८ मैलांवरील हॉटेलमधील रात्री १२ ते ७ पर्यंत भांडी घासण्याची नोकरी ८ दिवस करून सोडली. त्याने संध्याकाळची ४ ते ८ पर्यंतची अर्धवेळेची नोकरी पतकरली. मला त्याची उत्तररात्रीची नोकरी पसंत नव्हती. रात्री अवेळी माणसाने जागून नोकरी करणे प्रकृतीला अपायकारक ठरते. अगदीच आपत्तिकाल असेल तर नाइलाज म्हणून करावी. त्याचे वडील चि. मधुकर जोशी हा माझा मुलगा आय. बी. एम. मध्ये उच्चश्रेणीचा संशोधन व्यवस्थापक आहे; अशा स्थितीत इतका कष्टाचा स्वावलंबनमार्ग पतकरण्याची गरज नाही. उत्तर अमेरिकेतील मध्यमवर्गीय तरुण-तरुणी विद्यार्थी सुस्थितीत असूनही मधल्या सुट्यांत स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारून पडेल ते काम करतात व पैसे मिळवतात. त्यात कमीपणा मानत नाहीत. ही मधुकरची मुले, मुलगे व मुली कसलेही घरकाम हौसेने करतात. सुतारकाम, लोहारकाम, बागकाम, स्वयंपाक, धुणे, भांडी घासणे, झाडणे करीत असतात. दर आठवड्याला घरातील निरनिराळ्या बंद भांड्यात साठविलेला केरकचरा १०-१५ मैलांवर जाऊन टाकतात.

मधुकरकुटुंब व इतर भोवतालची गोरी अमेरिकन कुटुबे यांच्यामधे चांगला स्नेहसंबंध निर्माण झाला आहे. लक्ष्मी (वय १४) व शीला (वय १२) यांच्या अमेरिकन मैत्रिणी यांचा घरोबा दिसतो. एकमेकांच्याकडे कित्येकदा रात्री वस्तीत राहतात; एकत्र खेळ, अभ्यास, गप्पागोष्टी यांत अमेरिकनांबरोबर रमतात. चि. सौ. इंदू (मधुकरची पत्नी) हिने अमेरिकन नागरिकतेचा हक्क मिळविला आहे, ही गोष्ट अमेरिकन गोऱ्या समाजाची संस्कृती व भारतीय मध्यमवर्गीय संस्कृती यांची सांधेजोड चांगली जमते, याची सूचक आहे. चि. सौ. इंदू ही वाई (सातारा) येथील गंगापुरीतील ७ पिढ्या उच्च प्रतिष्ठित म्हणून राहिलेल्या दातार कुटुंबातील मुलगी व माझा मुलगा यांचे लग्न १९५६ साली वाईत झाले. दातार कुटुंब काटकसरी, घरकामाची शिस्त असलेले सुशिक्षित. परंतु डॉ. वासुदेवराव दातार यांचे आजोबा रावबहादुर बापूसाहेब दातारांपर्यंत अत्यंत जुन्या वळणाचे, सोवळेओवळे व व्रतवैकल्यांचे नियम पाळणारे होते. त्यानंतरच्या तीन पिढ्या डॉक्टरी व्यवसायाच्या; वासुदेवरावांचे वडील, ते स्वतः, बंधू व इंदूचे दोन्ही बंधू डॉक्टर आहेत. आधुनिक सुधारकी विचार-आचार ह्या मंडळीनी आत्मसात केलेले. मी धुळे जिल्ह्यातून लहानपणी वाईस येऊन शास्त्रीपंडितांच्या परंपरेत नाव मिळविलेला असलो तरी समाजसुधारणा, धर्मसुधारणा व राजकीय समाजवादी आंदोलन यांतही निश्चित स्थान मिळविलेला. माझी आर्थिक परिस्थिती जेमतेम असली तरी मधुकरने एंजिनिअरिंगची उच्च पदवी मिळविल्यामुळे इंदूने मधुकरशी लग्न स्वखुषीने

केले. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली म्हणजे इंदूने अमेरिकन पश्चिमी संस्कृतीशी सहज जुळवून कसे घेतले ते कळते. इंदूचे वडील अत्यंत आधुनिक विचारांचे, परंतु व्यावहारिक समतोल दृष्टिकोनाचे आहेत. हिची आई सौ. कृष्णाबाई मात्र सनातनी संस्कारांच्या असल्या तरी त्यांनी इंदू अमेरिकन नागरिक बनल्याबद्दल काहीच प्रतिक्रिया, खंत किंवा समाधान प्रकट केले नाही. चि. मधुकरने मान्यता दिली ती व्यावहारिक दृष्टीने. चि. राम इंदूचा वडील मुलगा; त्याने यासंबंधी तेव्हा मौन पत्करले. चि. विजय इंदूचा धाकटा मुलगा, चि. लक्ष्मी व शीला यांनी इंदू अमेरिकन नागरिक बनल्याबद्दल तिचे अभिनंदन केले. लक्ष्मी व शीला या अमेरिकेत जन्मल्यामुळे त्या जन्मतःच अमेरिकन नागरिक झाल्या आहेत. चि. मधुकर हा भारतीय संस्कृतीचा उत्तम वारसा घेऊन येथे आला. येल विद्यापीठाची अभियंत्याची डॉक्टरेट मिळविल्यावर आय. बी. एम. मध्ये अभियंतापदाची नोकरी त्याने १९६४ साली मिळविली. आता संशोधन-व्यवस्थापक म्हणून व्हर्मांट राज्यातील बर्लिंटन नगरातील आय. बी. एम.च्या स्मृतिसंशोधन संस्थेत गेली काही वर्षे उच्च अधिकारपदावर तो आहे. त्याने विशेष संशोधनाची दोन पारितोषिके मिळविली आहेत. अमेरिकेतील हिंदू भारतीयांच्याकडे धार्मिक संस्कारांचे वैदिक पद्धतीने पौरोहित्य व धर्मावर भाषणेही करतो.

श्री. वसिष्ठ शर्मा हे योगी अरविंदांचे भक्त त्याचे मित्र आहेत. ते परवा मधुकरला सांगत होते की, योगी अरविंदांच्या तत्त्वज्ञानाचे अध्ययन करून त्यावर प्रवचने तू करावयास पाहिजेत. त्यावर मधुकरचे म्हणणे असे की, अरविंदांची इंग्लिश शैली उत्कृष्ट आहे, परंतु त्यांचे विचार डोक्यात शिरत नाहीत. त्यावर शर्मांचे म्हणणे असे पडले की, तुमच्यासारख्या विद्वानांना अरविंदांचे विचार समजणे अशक्य नाहीत. या वसिष्ठ - मधुकर संवादाच्या प्रसंगी मी उपस्थित होतो. मी अरविंदांच्या तत्त्वज्ञानाचे अत्यंत सूत्रबद्ध निवेदन माझ्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या पुस्तकातील अखेरच्या प्रकरणात दिले आहे. त्यात मी असे म्हटले आहे की, अरविंदांची तत्त्वज्ञाननिवेदन पद्धती ही लौकिक–अनुभवनिष्ठ व तार्किक प्रमाणसरणीने बांधलेली नाही. म्हणजे देकार्त, लॉक, कांट, रसेल यांची पद्धती लौकिक-अनुभवनिष्ठ तार्किक युक्तिवादावर आधारलेली आहे. तशी अरविंदांची नाही. अरविंदांची शैली आविष्कारात्मक (एक्स्प्रेशन स्टाईल) आहे. उच्च काव्य ज्या पद्धतीने वाचताना अनुभवावयाचे असते; वैचारिक पद्धतीने समजावयाचे नसते; तसेच काहीसे अरविंदांचे लेखन आहे. अरविंदांची विचारांची रचनाच अलौकिक अनुभूतिस्वरूपात परिणत झाली आहे. त्यात तर्कसंगती आहे; परंतु विचार्यपदार्थ मानवी सामान्य अनुभवविश्वाच्या पलीकडचे आहेत. विशिष्ट धार्मिक अनुभूती श्रद्धेने ज्यांना येऊ शकते किंवा अरविंदांनी निर्मिलेल्या अलौकिक संकल्पना कल्पिता येतात, त्यांनाच त्यातील तर्कसरणी मान्य होते, तार्किक विचारात गुंफलेल्या अलौकिक संकल्पना मनात अवतारता येतात, अनेक वेळा पुन: अरविंदांच्या तत्त्वज्ञानाचे अवगाहन करावे, असे माझ्या मनात येऊन जाते, परंतु

सवड सापडत नाही; किंवा सवड काढण्याइतका तिकडे ओढा नाही, असेही असेल. मला ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम व विशेषतः रामदास हे संत धार्मिक तत्त्वज्ञानात्मक अनुभूतीला पुरेसे वाटतात. विशेषत. गौडपादांच्या तुर्येने मला वेढले आहे. त्यातून मी कधी बाहेर पडू शकेन असे दिसत नाही. रसेलमध्येही ही तुर्या म्ह. विश्वात्मक अनंत अद्वैताची जाणीव आढळली. तुर्या तरी काय म्हणावे? काही म्हणता येत नाही. सामान्य माणसे, प्राणी, वृक्षवनस्पती वा अणुरेणू यांच्या स्वरूपस्थितीतच ती आहे. परंतु वास्तव दृष्टीने मी वैज्ञानिक दृष्टिकोनच मान्य केला आहे.

आधुनिक भारतीय आध्यात्मिक तत्त्ववेत्त्यांत योगी अरविंदांची बरोबरी कोणी करू शकत नाही, हे मात्र तितकेच सत्य आहे. डॉ. एस. राधाकृष्णनशीसुद्धा अरविंदांची तुलना होऊ शकत नाही; कारण अरविंदांनी भारतीय वेदान्ताला जागतिक, विशेषतः पश्चिमी तत्त्वज्ञान आत्मसात करून ऐतिहासिक नव्या तत्त्वज्ञानाच्या व विकासवादाच्या अधिष्ठानावर नेले आहे. भावी मानवी संस्कृती म्ह. विशाल व अमर्याद मानवी स्वातंत्र्याचा आदर्श त्यांनी दाखविला आहे. नव्या बंधमुक्त मानवी समाजाच्या निर्मितीची प्रक्रिया सांगितली आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचा लोकशाही सिद्धांत अरविंदांनी या प्रक्रियेत अंतर्भूत केला आहे. अरविंद हे एका अर्थी भारतीय नवे प्रेषित आहेत. म. गांधींचा ध्येयवाद व अरविंदांचे आध्यात्मिक दिव्य जीवन यांचा सुंदर समन्वय होऊ शकतो. आधुनिक औद्योगिक भौतिक जीवनाचा आधुनिक भौतिक विज्ञानाच्या आधारे विकास होणे आवश्यक आहे, हे अरविंदांच्या आध्यात्मिक संपूर्ण योगाचे अंगच आहे.

इंदु-मधूच्या सर्वच मुलांची अमेरिकन इंग्लिश मातृभाषा झाली आहे. लक्ष्मी व शीला यांच्याबद्दल प्रश्नच नाही. कारण त्यांचा जन्म इथला; परंतु राम व विजय वयाच्या ८-९ वर्षापर्यंत वाईत होते. शुद्ध सुरेख मराठी बोलत होते. आता पाहतो तर तेही मराठी नीट बोलत नाहीत. राम सगळे बोलतो परंतु हेल अमेरिकन. विजय प्रयत्नच करीत नाही. लक्ष्मी मात्र काही काही मराठी वाक्ये ऐटीत छान बोलते. यांचे सर्वच आहार विहार अमेरिकन आहेत; इंग्लिश गाणी गुणगुणतात; लक्ष्मी पियानो वाजवीत असते. मोझार्ट, बाख, बेथोवेन यांच्या संगीताची प्राथमिक पुस्तके लक्ष्मीच्या पियानोवर मांडलेली असतात. रोमिओ व ज्युलिएटच्या प्रेमगीताचे सूर मी एकदा ऐकले व विचारले की, बाखचे सूर दाखव. तिने त्वरित अंगुली भरभर फिरवून मला चकित केले. मला बाख हा मोठा संगीतकार म्हणून माहीत. संत श्वाइटझरचा बाखवरचा महत्त्वाचा ग्रंथ मला माहीत आहे.

आम्हा दोघांना सौ. इंदूच्या या अमेरिकन संसारात पावले टाकून दोन आठवडे होत आले. आम्ही बारीक बारीक तपशील निरखून पाहात आहोत. सौ. सती मधुकरची आई व इंदूची सासू या दोन्ही नात्यांनी पाहात आहे. मी वात्सल्यवृत्तीने व सौ. सती संयमित परंतु खोल मातृवात्सल्याने; संयमित म्हणण्याचे कारण गेली १६-१७ वर्षे आम्हांपासून हा पुत्रपरिवार

वेगळा झालेला; म्हटले तर येथे सत्ता नाही म्हटले तर सत्ता आहे. त्यामुळे सौ. सती जपून जणू पाहुणी म्हणूनच राहिली आहे. मी या जगातच पाहुणा व परका. अलिप्ततेची शिकवण मला जगापासून दूर ठेवते. त्यामुळे माझे वात्सल्य कर्तव्यापुरते आहे. सौ. सतीचे वात्सल्य अथांग. त्या वात्सल्यात खोलपणे रुजलेली सत्ता पाहुणेपणाच्या भावनेखाली दडपलेली आहे. ही गोष्ट २-४ दिवस गेल्यानंतर चि. मधुकरच्या लक्षात आल्यासारखी दिसते.

काल मी मधूला म्हटले की, मी युरोप पाहिला आहे. परंतु सतीने पाहिला नाही. एअर इंडियाच्या परतीच्या तिकिटाने रोमला २-३ दिवस उतरता येईल काय? तो म्हणाला- मी चौकशी करतो. परंतु प्रत्येकी ५ डॉलरची युरोपच्या यात्रेच्या ८-१० दिवसांची दोघांची तिकिटे मिळतील. त्याची चौकशी करतो. मिळत असल्यास तुम्ही दोघे फिरून या. सौ. सतीने आज सकाळी उठताना मला सांगितले की, मधूने आपणाला अमेरिकेची यात्रा घडविली हे काय थोडे झाले? त्याच्या मुलांचे शिक्षण पुरे व्हावयाचे आहे. येथे शिक्षण फारच महाग आहे. ही युरोपच्या यात्रेची कल्पना मला पसंत नाही. मधूला आणखी खर्चात पाडू नका. इंदू स्वतः सर्व घरकामे करते; काटकसरीने वागते; सर्व मुले अंगमेहनतीने कामे करतात; इंदूने व मधूने फार चांगले वळण लावले आहे; मुलांची प्रकृती निरोगी, सुदृढ ठेवली आहे. आता मुलांचे शिक्षण पुरे झाले की, सर्व काही मिळाले! ही युरोपच्या यात्रेची कल्पना सोडून द्या.

मधुने आमची अमेरिकेची परतीची तिकिटे काढली असे कळले तेव्हाच सतीला वाटले की, हा खर्च फार आहे. मधूची तार मला आली, त्यात म्हटले होते की, तुमचे तिकिट पाठविले आहे. 'तिकिटे' असे अनेक वचन नव्हते. तेव्हा शंका आली की, सतीचे तिकिट काढले नसावे. सती म्हणाली की, माझे तिकिट नाही काढले ते बरे झाले. मला येथे राहण्यात समाधान आहे; परंतु दोघांची तिकिटे मुंबईच्या एअर इंडिया कार्यालयाने पाठविली. आम्ही यात्रेची तयारी करून आनंदात येथे पोचलो.

सती ही जन्मतः स्वभावतःच अपरिग्रहव्रती. तिला कोणाहीपासून काहीही घ्यावेसे वाटत नसते. मुलापासूनही नव्हे. एवढेच नव्हे तर मी लग्न केल्यापासून आजपर्यंत गेली ५१ वर्षे पैसे मिळविले ते तिच्या स्वाधीन करीत गेलो. परंतु आजपर्यंत सतीला ते पैसे स्वतःचे आहेत असे वाटत नाही. स्वतःच्या श्रमाचेच घ्यावे, तेच आपले असे ती नेहमी म्हणते. माझा घरप्रपंच खस्ता खाऊन चणचण सोसून केला; उद्याचे काय? असा प्रश्न लग्न झाल्यापासून १९६० पर्यंत होता, तरी तिचा उत्साह कायम टिकला. तोपर्यंत आमच्या मुलामुलींचे पदवी परीक्षेपर्यंत शिक्षण आम्ही पुरे करू शकलो. चि. मधुकर अभियंता पदवीधर झाला. सौ. सुमन तत्त्वज्ञानाची एम. ए. होऊन ती सुस्थळी म्हणजे कै. श्री. बाबूकाका खंडकरांच्या चिरंजिवाना चंद्रशेखरांना दिली. सौ. मालती बी. ए. होऊन केंजळच्या श्री. वासुदेवराव कुलकर्णी (वय वर्षे ९०) यांचे चि. मुरलीधरपंत (येल विद्यापीठाची डॉक्टरेट) यांना दिली. दोन्ही मुलींना मागण्या आल्या. चि. वासुदेव (धाकटा मुलगा) याचे ठीक चालले आहे;

त्याची चिंता मात्र कायम अजून आहे. अतिथी अभ्यागतांचे यथाशक्ती स्वागत करण्यात सौ. सतीने काही कमी केले नाही. मी अनेकदा कारावास पत्करला. स्वातंत्र्याच्या चळवळीत अनेक वर्षे हिंडलो. सतीने साथ मनापासून दिली. १९६० डिसेंबरपासून आतापर्यंत आर्थिक परिस्थिती काहीशी बरी, पूर्वीपेक्षा बरी आहे. सतीचे समाधान पहिल्यापासून अचल राहिले आहे. ती मूळची मुल्हेर येथील पंडितांच्या कुळातली. तिच्या वाडवडिलांची वृत्ती रामानंदी संप्रदायाप्रमाणे ठरलेल्या भजनपूजनाच्या व्यवसायाची. निर्वाहापुरते अन्नआच्छादन; ही अत्यंत समाधानी माणसे.

सतीला मधुकरच्या मुलांचे शिक्षण पुरे व्हावे, अशी उत्कट इच्छा असल्यामुळे मधुकरकडून आर्थिक मदत स्वतःस घेण्यास बरे वाटत नाही. त्यानेच आग्रहाने आम्हांस राम व विजय यांच्या ग्रॅज्युएशनच्या समारंभाकरिता आणले, म्हणून ती व मी येथे आलो.

येथे अमेरिकेत बऱ्याच शिक्षणसंस्था उच्च दर्जाच्या आहेत. परंतु उच्च दर्जाच्या शिक्षणसंस्थांतील फी व इतर शिक्षणाला लागणारा पैसा मिळून खर्च खूप चढा आहे. हार्वर्ड, येल, प्रिन्स्टन इत्यादी विद्यापीठांत विद्यार्थ्यापाठीमागे डॉलर १२ हजार वार्षिक खर्च. हे वाचून माझा जीवच दडपला. गरीब, होतकरू विद्यार्थ्यांचे काय? असा प्रश्न मी मधुकरला विचारला; तो म्हणाला गरिबाला शिक्षण मोफतच असते. शासनाने ती जबाबदारी घेतली आहे. येथे एकंदर शिक्षणपद्धती कसदार गुणविशेषनिष्ठ; म्हणून चांगली शिक्षणसंस्था म्हटली की त्यात चांगले शिक्षक, संख्यामर्यादित वर्ग, शिक्षणसाधने व उपकरणे यांनी संपन्न, दर आठवडा म्हणजे परीक्षेचाच आठवडा किंवा प्रत्येक दिवस म्हणजे परीक्षेचाच दिवस; त्यामुळे खर्च खूप करावा लागतो. विद्यार्थी उत्तीर्ण झाला की, त्याच्या जीवनातील भावी यशाची पायरी तो चढला; असाच अर्थ होतो. तो विशिष्ट परीक्षाक्रम संपविल्यावर बेकार रहातच नाही. राहिला तर त्याचा दोष; पालकाचाही दोष असू शकतो. राजकीय परिस्थिती त्याच्या मदतीला संनद्ध असते.

मधुकरला म्हटले की, तुम्ही दोघे पतिपत्नी मुलांना योग्य मार्गदर्शन करीत आहात त्यामुळे मला काळजी नाही. त्यावर मधुकर म्हणतो :– अबा! मी किंवा इंदू मुलांच्यावर सामान्यपणे लक्ष ठेवतो. परंतु मार्गदर्शन करण्याच्या भानगडीत पडत नाही; ते आम्हांस आवडत नाही. आम्ही त्यांना पोहायला नेतो; किंवा जाऊ देतो; साधने पुरवितो; परंतु पोहणे तेच शिकतात. बुडायचे की तरायचे, परतायचे की पैलतीर गाठायचे, या गोष्टींची जबाबदारी त्यांची. मुलामुलींनी मित्रमंडळी स्वतःच निवडावी, तेच निवडतात. लक्ष्मी (वय १४) वयात येत आहे. आम्ही तिला प्रथमपासूनच मुक्त ठेवले आहे. राम परिश्रमाने चांगली प्रगती करीत आहे. विजय हा तुमच्या घराण्यातला तत्त्वज्ञ; शास्त्राची पुस्तकेच निवडतो व वाचण्यात रमतो. त्याच्या विचारांत पृथक्करण व स्पष्टता असते. विजयला रेखा व चित्रकलेचीही आवड आहे. हा विषय त्यानेच निवडला आहे. त्याची भूप्रदेशाची ५-६ रंगीत चित्रे या

बंगल्यात भिंतीवर लागली आहेत. शीला फ्ल्यूट वाजविते; पाककलेत कौशल्य दाखविते; बागेची व्यवस्था ठेवते; वेळोवेळी एक एकर हिरवळीची कापणी करते. लक्ष्मी इंग्लिश, फ्रेंच व मराठी बिनचूक लिहिते. गतवर्षी तिने इंग्लिशचा शाळेतला नेमलेला अभ्यास एक वर्ष अगोदर पुरा केला व वैशिष्ट्यपूर्णतेचा शेरा मिळविला. यंदा सामान्यपणे उत्तीर्ण झाली, कारण बाहेर इतर गोष्टींत वेळ घालविला. म्हणून यंदा बाहेर जाण्यावर मर्यादा तिच्या आईने घातली. शीतऋतुत पर्वतारोहण (हायकिंग) व बर्फावरची घसरणी (स्केटिंग) करिता आम्ही सर्व बाहेर पडतो. हा हिमवृष्टीचा ऋतू व्हर्मांट राज्यात ४ महिने चालतो. राम, विजय, लक्ष्मी व इंदू पर्वतारोहण व बर्फघसरणी करण्यात खूप रस घेतात. अमेरिकेतील भारतीय कुटुंबांत असा या विषयात रस घेणारे फारच थोडे, त्यांच्यात आमची गणना होते. विजय तर रानावनात २४ वा ३६ तास काढतो; तेथेच स्वतःचे भोजन तयार करतो. आई कित्येकदा बाहेर बराच वेळ कामाकरिता गेल्यास या मुलांपैकी कोणीही वेळ पडेल त्याप्रमाणे स्वतःच अन्न शिजवून जेवण आटपतात. घरात व बागेत पडेल ते काम करतात.

(पुढे चालू)

(नवभारत, ऑक्टोबर, १९७७, पृ. ५ ते १३)

ooo

९०

आमची अमेरिकेची यात्रा -२
(दैनंदिनी)

ता. २४ जून, १९७७: आज श्री. राम कोल्हटकरांचे वाईहून विस्तृत पत्र आले. पुणे येथील एका सहकारी गृहमंडळाच्या अध्यक्षाने आम्हा अनेक सदस्यांचे पैसे ६ वर्षांपूर्वी घेऊन फसवले त्याकरिता न्यायालयाकडे फिर्याद आम्ही गुदरली. त्यासंबंधी आणि विश्वकोश, धर्मकोश, हातकागद निर्माण केंद्र, साहित्य संस्कृती मंडळ यांच्यासंबंधी व्यवस्थित वृत्त त्यात आले.

आज इंदू व सौ. सती दिवसभर संध्याकाळच्या कार्यक्रमाकरिता झटत होत्या. कारण आज संध्याकाळी चि. मधुकरकडे कॉकटेल पार्टी राम व विजय यांच्या ग्रॅज्युएशननिमित्त झाली. टेबलावर पुष्पपात्रे सजविली. त्यावर सुरेख पेले ठेवले. बिअरचे कॅन ठेवले. त्या टेबलावर एक मोठे अर्धगोल काचपात्र इंदूने स्कॉच, जिन, वर्मूर्थ व त्यात एकदीड किलो आइस्क्रीम मिसळून ठेवले. काही मंडळी मांसाहारी व काही थोडे शाकाहारी या पार्टीला होती. इंदूने बटाटा-मटार सामोसे तळून टेबलावर भरून ठेवले होते. प्रत्येक जण आपणास पाहिजे ते पेय पेल्यात भरून घेत होता. कॉकटेलला बऱ्याच स्त्रियांनी हात न लावता निराळ्या प्रकारची गोड लागलेली मद्येच संपविली. ४०-४५ भारतीय व अमेरिकन स्त्रीपुरुष त्यात उपस्थित होते. ८-१२ पर्यंत कार्यक्रम चालू होता. काहींनी या मुलांना देणग्याही दिल्या. ईस्टमन, कौशल, शर्मा इत्यादी जोडप्यांनी माझ्याशी काही प्रश्नांवर चर्चा केली. कौशल पतिपत्नींचा मुख्य प्रश्न होता की, या अमेरिकेत भारतीय सुशिक्षित कुटुंबे अनेक वर्षे कायम विसा किंवा नागरिकत्व स्वीकारून घरे बांधून राहिली आहेत. त्यांच्या मुलांच्या धार्मिक शिक्षणाचे काय करावे? येथे सर्वत्र ख्रिश्चन धर्माचे वातावरण. ख्रिश्चन मुलामुलींत मिसळून आमची मुले राहतात; प्रसंगी ख्रिश्चन चर्चमध्येही ख्रिश्चन सवंगड्यांबरोबर रविवारी प्रार्थनेस उपस्थित राहतात. परंतु हिंदू धर्माचे प्रत्यक्ष आचरण कसे शिकवावे? मी म्हणालो, मला याचे उत्तर एकदम सुचत नाही. यावर कौशल म्हणाले की, सामान्य धोरण आपण सांगू शकाल.

प्रत्यक्ष कार्यक्रम एकदम सांगणे कठीण, हे खरे. मी सांगण्यास सुरुवात केली. ख्रिश्चन, यहुदी इस्लाम इत्यादी जागतिक धर्म एका विशिष्ट प्रेषितावर निष्ठा ठेवतात; त्या धर्माबाहेरचे अन्य मानव प्राणी खऱ्या धर्मापासून दुरावले आहेत; आपल्या धर्माचा स्वीकार (धर्मांतर) केल्याशिवाय त्यांना सद्गती प्राप्त होणार नाही; अशी त्यांची प्रखर श्रद्धा आहे. हिंदू धर्माचे तसे नाही. हिंदू धर्म हा एकच असा जागतिक धर्म आहे की त्याच्या धार्मिक तत्त्वज्ञानाप्रमाणे इतर धर्मांचे सर्वच मानव आपआपल्या निष्ठेने सद्गतीस प्राप्त होतात; ईश्वराची किंवा सिद्धाची वा देहाभिमानापासून मुक्त संताची जे अनन्यभावे भक्ती करतात, त्यांचे आदेश मानतात, त्यांना सद्गती आहेच. हा सिद्धांत आपल्या मुलामुलींना शिकवा व वेद, उपनिषद, भगवद्गीता आणि मध्ययुगीन ज्ञानदेव, नामदेव, कबीर, तुलसीदास, दक्षिणी अलवार संत इत्यादिकांची अत्यंत निवडक वचने, श्लोक, स्तोत्रे, पदे म्हणवून घ्यावी. इतर धर्मांतील चांगली अन्य धर्मांशी अविरुद्ध वचनेसुद्धा शिकवावी. नीतिपर, शौर्यपर उत्कृष्ट अशा जागतिक उच्च धर्मातील पौराणिक कथाही ऐकवाव्या. ध्यान व भजन कौटुंबिक समुदायाने वा एकाएकाने एकांतात करावे. प्राणिमात्रावर दया व विश्वमैत्री हे हिंदू, बौद्ध व जैन धर्मातील तत्त्व मूलभूत धर्म म्हणून शिकवावा व हाच खरा धर्म होय. परलोक व पुनर्जन्म ही तत्त्वे काल्पनिक आहेत. तशाच देवता, कथा व पुराणे. या माझ्या सांगण्यावर कौशल म्हणाले की, सर्वधर्मसमभाव हे हिंदु-बौद्ध धर्मांचे तत्त्व यहुदी, ख्रिश्चन व इस्लाम धर्मांना मान्य नाही. म्हणजे विग्रह अटळ ठरतो. मी उत्तर दिले की, "या नव्या यांत्रिक युगात जागतिक एकात्मक मानवसमाज निर्माण होत आहे, त्याशिवाय मानवाचे पृथ्वीवरील अस्तित्वच धोक्यात येईल. आशिया, युरोप, अमेरिका व आफ्रिका ही खंडे व त्यांतील राष्ट्रे राजकीय व आर्थिक दृष्टीने एकमेकांशी निगडित होत आहेत. म्हणून म. गांधींचे सर्वधर्म समानत्व हे नव्या जागतिक परिस्थितीमुळेच मान्य करणे भाग झाले आहे."

"सामान्य हिंदू माणसाला इतका उच्च दृष्टिकोन असणे कठीण आहे, हे मात्र खरे. त्याचे सामाजिक जीवन पिढ्यानपिढ्या अगदी संकुचित जाति-पोटजातींच्या कोंडीत कोंडलेले. त्यातून तो युरोप-अमेरिकेसारख्या संपूर्ण वेगळ्या जगात अगदी परका असतो व कुटुंबासह जगण्याचा प्रयत्न करतो. एकलकोंडेपणाच्या दडपणातून निसटण्याकरता स्वाभाविकपणे धडपडतो. स्वतःचा खोल धार्मिक संस्कार व अगदी परक्या परंतु उच्च आधुनिक संस्कृतीच्या ख्रिश्चनधर्मी समाजाशी आलेला संपर्क यांच्या कचाटीत सापडलेला असतो. येथे जन्मलेली स्वतःची मुलेबाळे या समाजाशी तद्रूप होण्याचा प्रयत्न स्वाभाविकपणेच करताना स्वतःचा धर्म गमावून बसण्याचे भय व खंत मनाला जाचते. भयातून व खेदातून धर्मसंगीतच बाहेर काढू शकते. सर्व धर्मांना संगीताची जोड असतेच. ख्रिश्चन धर्माचे चर्चसंगीत प्रसिद्ध आहे. परंतु भारतीय संगीतात हिंदू धर्म सामावला आहे. पश्चिमी संगीताचा प्रभाव हिंदी संगीतावर पडत आहे. त्याप्रमाणे भारतीय संगीताची शैली व स्वर, ताना व मेणा आता पाश्चात्त्य

संगीतावर नकळत प्रभाव करीत आहेत. हे धार्मिक भारतीय संगीत, उच्च दृष्टिकोन असो नसो, मनाला प्रसन्न व उल्हसित करते. भारतीय भजन हे पश्चिमी जगातील भारतीयांचे धार्मिक जीवन सुरक्षित ठेवीलच.''

ता. २६ जून, १९७७ एसेक्सजंक्शनला १ जुलै पर्यंत राहावयाचे ठरले होते. आज बेत बदलला. एसेक्सजंक्शन- बर्लिंटन (बर्मांट राज्य) हून चि. सौ. मालतीच्या मोटारीने दुपारी १२ वाजता तिच्या राहत्या गावी फिशकिल (न्यूयॉर्क राज्य) ला जावयास निघालो. येथून अडीचशे मैलांपेक्षा अधिक अंतरावर हा गाव; न्यूयॉर्कएक्सप्रेस रोडने मुरलीधरपंतांनी मोटार हाकली व साडेपाच तासांत प्रवास पूर्ण केला. भोवताली शेकडो गावे मार्गाच्या दुतर्फा रानावनात छोट्या छोट्या डोंगरांच्या परिसरात उतरणीवर पसरून बसलेली दिसली. सध्या वसंतऋतू, रुक्षता कोठेही नाही. लहानमोठी सरोवरे, झरे, प्रदीर्घ पाट, नद्या ही जलसंपत्ती या वनांचे अखंड वैभव. प्रत्येक गावातील घरे एकमेकांपासून अंतरावर बांधलेली. भोवती सुरेख उद्याने. दोन गावांच्या मध्यंतरीची व भोवतालची वनराजी योजनाबद्ध रीतीने राखलेली व वाढविलेली. ओक, देवदार, मेपल इत्यादी वृक्ष शिखरांपर्यंत वल्लीनी वेढलेले. काही ठिकाणी नाना जातींचे वृक्ष एकत्रित तर काही ठिकाणी एकाच जातीची वृक्षराजी वेगवेगळी वाढविलेली. प्रत्येक गावात खाण्याच्या व दुधाच्या गाईंची खिल्लारे शांतपणे चरत व रवंथ करीत बसलेली, कित्येकांच्या कुरणात सुरेख उमदे २-४ घोडे हळूहळू हिंडत बसलेले. गुरांच्या वैरणीचे उंच सायलो दिसले. मधून मधून डोक्यावर आडवे पूल व त्यावरून मोटारी धावत असलेल्या पाहिल्या. प्रत्येक १०-१५ मैलांवरच्या टप्प्यांवर मोटेले व हॉटेले खाद्यपेयांनी भरलेली; एका ठिकाणी उतरून आम्ही सर्वांनी आइसक्रीम घेतले.

फिशकिलला ६ वाजता संध्याकाळी पोचलो. १ तासाने मुरलीधरपंत व मी पायी फेरफटका सुमारे दीडतास केला. येथील वृक्षवल्लींच्या वैभवाची चर्चा करीत चालत होतो. मुरलीधरपंत रसायनविज्ञानाचे पंडित; शेतकी व बागायत यांत त्यांना खूप रस; केंजळ (वाई) येथे त्यांची परंपरागत शेती आहे. महाबळेश्वरच्या वनश्रीचा व महाराष्ट्रातील शेतकीचा विषय काढला. 'महाबळेश्वरची वृक्षराजी बुटक्या वृक्षांची का असावी?' त्यांनी प्रश्न विचारला. मी म्हटले ''सह्याद्रीच्या पश्चिम रांगेवर वारा जोरदार वाहतो; विशेषत मे महिन्यापासून, हे याचे महत्त्वाचे कारण असावे; मुळांपाशी खडकही जवळ आहे. वृक्षांची जातही मोठ्या वृक्षांची नाही.'' यावर मुरलीधरपंत म्हणाले, ''जुन्या वृक्षराजीच्या ठिकाणी नवी मोठ्या वृक्षांची लागवड करावी.'' ''महाराष्ट्राचे जंगलखाते महाबळेश्वरची वनराजी मोठ्या प्रमाणात खच्ची करण्यात चांगले यशस्वी झाले आहे; त्यामुळे काही वर्षांत महाबळेश्वरला कच्छच्या रणाचे व वैराणभूमीचे रूपही येईल, यात शंका नाही. परंतु नवे भव्य वनश्रीरोपण जंगलखात्यास साधले नाही,'' मी म्हणालो. मुरलीधरपंत पुढे म्हणाले, ''त्यावरही थोडे संशोधन करून उपाय निघू शकतो, सहज निघेल. मीच सांगतो उपाय. अमेरिकेतले यशस्वी प्रयोग मी पाहिले

आहेत, त्यावर वाचले आहे. कोणत्या वृक्षवल्लींना हवापाणी जमीन मानवते हे पहावे. ते विरळविरळ थोडक्या जागेत आणि वाऱ्याचा मारा बसणार नाही व हजारो वर्षे निसर्गाने खतावलेली महाबळेश्वरची माती वाहून जाणार नाही इतक्याच परिसरात नव्या वृक्षवल्लींची लावणी मूळच्या वृक्षांच्या सान्निध्यात हवा प्रकाश खेळेल एवढ्या जागेत करावी. तरच महाबळेश्वरचे ब्रह्मारण्य जगेल व भरभराटीस येईल.''

नंतर मुरलीधरपंतांनी महाराष्ट्राच्या शेती विकासाबद्दल एक मुद्दा सुचविला की, शेती स्वत: कसणाऱ्यांची विनायास वसती स्वतःच्या शेतात होईल, अशी शेतजमिनीच्या कायद्यात सुधारणा त्वरित व्हावी. कायद्याची अडचण या संबंधात फार येते ती दूर करावी. वाईची जी मंडळी शेतात घरे करून राहतात, उदा. माळी मंडळी; त्यांची शेती इतरांपेक्षा अधिक भरभराटीस येते; हे मला माहीत आहे.

ता. २७ जून, १९७७ : आजचा दिवस माझा धर्मशास्त्र वाचन-चिंतनात गेला. टिपणे लिहिली. संध्याकाळी दोन मैल भोवतालचा सुंदर प्रदेश पहात सहल केली. वाईस पत्र लिहिले. संध्याकाळी श्री. शरद गुप्ते व सौ. आशा गुप्ते पतिपत्नी भोजनाचे निमंत्रणास आली. दोघेही उच्चपदवी विभूषित; गुप्ते मूळचे बडोद्याचे; आशाबाई जबलपूरच्या. शरदरावांची भव्य शरीरयष्टी; आशाबाई लहान चण व सडपातळ; येथे भारतीय कुटुंबे सुमारे ६५०; आशा ह्या बॅडमिंटनमध्ये अत्यंत पटू. या दोघांनी अमेरिकन नागरिकता मिळविली आहे. भारतीय बुद्धिजीवी उच्च विद्याविभूषित मंडळींनी भारताची नागरिकता सोडून या परक्या संस्कृतीच्या जगाशी तन्मय व्हावे, ही गोष्ट मन अस्वस्थ करते. परंतु उपयोग काय? त्यांना स्वतःची व येथे जन्माला आलेल्या पुढील पिढीची भवितव्यता येथेच ठीक व सुरक्षित दिसते. महाभारतात म्हटले आहे 'स्वदेशो यत्र जीवति' जेथे जीवन तोच स्वदेश, राष्ट्रवाद मागे पडतो; मानवतावाद पुढे येतो.

ता. २८ जून, १९७७: येथील सर्व वृत्तपत्रांत अजून निक्सनचे वॉटरगेट संपले नाही, वारंवार येतेच आहे. राष्ट्रपती कार्टरबद्दलच्या विलक्षण आदरास व प्रेमास भरती आलेली अजून ओसरत नाही. निक्सन व कार्टर हे ध्येयवादी आदर्शाची दोन टोके. निक्सन उच्च नैतिक मूल्यांना पायदळी तुडविणारा पक्का व्यवहारी व कार्टर शुद्ध ध्येयवादी. अमेरिकन जनतेची मने नागडा व्यवहारवाद व शुद्ध उदात्त ध्येयवाद यांच्या द्वंद्वात गेली दोनशे वर्षे सापडली आहेत. कार्टरच्या ध्येयवादी आंतरराष्ट्रीय व जागतिक राजकारणाने त्यांना कार्टरमध्ये पहिल्या जागतिक महायुद्धाच्या अखेरीस पुढे आलेल्या राष्ट्रपतीचे प्रतिबिंब दिसते. परंतु ध्येयवादाबरोबर प्रत्यक्ष व्यवहार किती यशस्वीपणे पार पाडता येतो, ही कसोटीही राष्ट्रपतीला नागरिक सतत लावत असतात.

लोकशाही राज्यपद्धती ग्रामनगरसंस्थांमध्ये गेली चारशे वर्षे दृढमूल झाली आहे; प्रत्येक नागरिकाला शस्त्र बाळगण्याचा हक्क आहे. दोनशे वर्षांची राजकीय क्रांती या मूलगामी

लोकशाहीची परिणती होय. अमेरिकेतील सामान्य नागरिकाला लोकशाही जीवनपद्धतीचे बाळकडू अनेक शतके मिळाले आहे; त्याचे राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक जीवनाची मूल्ये मानवी स्वातंत्र्याच्या व सामाजिक न्यायाच्या तत्त्वांवर आधारलेली आहेत. जो जो गरिबीच्या पातळीवर जगणारा नागरिक स्त्रीपुरुष आहे, त्याची सर्व जबाबदारी राज्यसंस्थेने घेतली असून ती प्रत्यक्ष कार्यवाहीत पूर्णपणे गेली ४० वर्षे आणली आहे. रूझवेल्ट राष्ट्रपती झाल्यानंतर येथील मुक्त भांडवलशाहीचे दिवस संपले. शिक्षण व आर्थिक जीवन यांसंबंधी येथील गरीब नागरिकाची सर्व जबाबदारी शासनच सांभाळते. ते त्यामुळे ध्येयवादी व मानवतावादी राष्ट्रपतीला उचलून धरतात आणि नीती अनीतीचे सोयरसुतक नसलेल्या राष्ट्रपतीला खाली ओढतात. भारताच्या नागरिकांनीही अशा प्रकारची झलक नुकतीच दाखविली आहे. परंतु हुकूमशाहीचा गाभा असलेल्या ४२ व्या संविधान दुरुस्तीला तिलांजली मिळण्यावरच भारताच्या नागरिकाची गुलामी की स्वतंत्रता याचा अखेरचा निर्णय अवलंबून आहे.

येथे ६ टक्के नागरिक बेकार भत्त्यावर जगत आहेत. गरिबीची जी पातळी येथे ठरली आहे, म्हणजे १ हजार डॉलर माणशी उत्पन्न, त्याच्यापेक्षा अधिक बेकारभत्ता मिळतो. काळा-गोरा पक्षपात ही वांशिक समस्या सोडविण्यात येथील केंद्र सरकार व वरिष्ठ न्यायालय ही पिढ्यानपिढया यत्नशील आहे. गोऱ्यांची विद्यालये निराळी व काळ्यांची विद्यालये निराळी; विद्यार्थ्यांना नेणे आणणे करणाऱ्या बसा निराळ्या; हॉटेले निराळी; इत्यादी सर्व भेदभाव व पक्षपात दर्शविणाऱ्या गोष्टी कायद्याने संपूर्ण बंद होऊन २०-२५ वर्षे झाली. परंतु प्रत्यक्ष कार्यवाहीत अडचणी येतातच; काळ्यांच्या आर्थिक व सांस्कृतिक जीवनाची पातळी फार खालची आहे. त्याबद्दलही आंदोलनापाठीमागून आंदोलने सुरू आहेत. गोऱ्या नागरिकांपैकी ६० टक्क्यांपेक्षा अधिक नागरिकांचा समानता व एकीकरण यास पाठिंबा आहे. येथील नभोवाणी, दूरदर्शन, लहानमोठी शेकडो वृत्तपत्रे व नियतकालिके समानता व एकीकरण यांच्या प्रचारात कसूर करीत नाहीत. जरी समानतेचे ध्येय दृष्टिपथात आले असले, तरी वस्तुस्थितीपासून फार मोठ्या अंतरावरच त्याचे दर्शन होते. अवघड प्रचंड पहाडाच्या पायथ्यापासून शिखराचे दर्शन व्हावे तसे.

राष्ट्रपती कार्टरने आंतरराष्ट्रीय राजकारणात मानवी हक्कांचा मूलभूत धोरण म्हणून पुरस्कार चालविला आहे. गेली ४०-५० वर्षे ह्या धोरणाची अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धोरणात पिछेहाट झाली होती. त्यामुळे ध्येयांच्या स्वप्नात रमणारा अवास्तववादी आपला राष्ट्रपती आहे की काय, अशीही शंका अनेक अमेरिकन राजकारणी मुत्सद्दी व्यक्त करू लागले आहेत. काहींना वाटते की, कार्टरना अमेरिकेच्या सैनिक, आर्थिक व तंत्रवैज्ञानिक सामर्थ्याबद्दल पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे सोविएट रशिया व त्याची अंकित पूर्वयुरोपची राष्ट्रे यांच्यात नागरिक हक्कांची गळचेपी चाललेली कमी करण्यास रशियाला भाग पाडायचे

आहे. वरील सामर्थ्ये रशियापेक्षा कितीतरी पटीने मोठी असली, तरी खड्या सैनिकी शक्तीत रशिया अमेरिकेच्या पुढे आहे; म्हणून काही राजकारणी कार्टरला अवास्तववादी म्हणू लागले आहेत. भारताच्या केंद्रशासनाने गेल्या ३० वर्षांत अमेरिकेकडून फार मोठे आर्थिक अनुदान मिळविले; इतके की ते जगातील इतर राष्ट्रांकडून मिळालेल्या अनुदानापेक्षा कितीतरी पटीने मोठे आहे. तरी भारताचे सत्ताधारी रशियाच्या हुकूमशाहीची मनधरणी व अमेरिकेची उपेक्षा करीत राहिले. अजूनही तेच धोरण चालू ठेवल्यास भारताच्या प्रगतीची गती अधिक मंदावेल यात शंका नाही.

येथे वृत्तपत्रांत व नियतकालिकांत लैंगिक प्रश्नाची सर्वांगीण चर्चा चालू असते. समलिंगी संभोगाचे समर्थन करणारी बाजू पुरुषांप्रमाणे स्त्रियाही मांडताना दिसतात. अविवाहितांचे लैंगिक संबंध ही येथील सर्व सामाजिक स्तरांवर पसरलेली गोष्ट आहे. अविवाहितांच्या लैंगिक संबंधाना अपरिहार्य म्हणून उघड विरोध दिसत नाही. विवाहितांचा विवाहबाह्य संबंध शिष्टसंमत व विधिसंमत नसला, तरी एखाददुसऱ्याचा संमतीदाखल लेखही प्रसिद्ध होत असतो. उदा. एका स्तंभलेखिकेने पुकिप्सी शहरात प्रसिद्ध होणाऱ्या एका साप्ताहिकात गेल्या आठवड्यात एक हकिकत दिली आहे. एका मोठ्या शासकीय कार्यालयातील व्यवस्थापकाच्या सेक्रेटरी विवाहित महिलेची ती हकिकत आहे. ती अशी: "व्यवस्थापकाचे मन विचलित होऊन तो भोगभुकेला झाला; प्रणययाचना केली; ती म्हणाली, विचार करावा लागेल. तिने पतीस विचारले. पतीने उलट विचारले की, तात्पुरता प्रश्न की कायमचा? तिने सांगितले की, तो कोणाशीच कायम राहू इच्छित नाही. संमती न दिल्यास त्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम होईलसे दिसते. पतीने संमती दिली. त्यानंतर या पतिपत्नींचा संसार अधिक सुखाचा चाललेला आहे." परंतु मला हे कल्पित वाटले. या देशात काडीमोडाचे प्रकार फार वाढले आहेत असे म्हणतात. परंतु कायमच्या स्थिर संसाराच्या आकडेवारीवरून २५ टक्क्यांपेक्षा काडीमोडीचे प्रकार अधिक नाहीत. लग्नानंतरच्या १०-१२ वर्षांच्या आतच बरेचसे काडीमोडीचे प्रसंग घडतात, पुढे हे प्रमाण खूप घटते. ही स्वातंत्र्यप्रधान संस्कृती आहे; त्यामुळे स्वैराचार हा त्याचा आनुषंगिक परिणाम आहे. ही गोष्ट मात्र या संदर्भात ध्यानात धरावी लागते की, पतिपत्नी प्रेम व बालक-वात्सल्य यांचा फार मोठा महिमा या संस्कृतीत दिसतो. या संयुक्त संस्थानांच्या अत्यंत सुधारलेल्या अमेरिकेत म्हणजे उत्तर अमेरिकेत संतति-नियमन फार मोठ्या प्रमाणात रूढ झाले आहे. त्याबद्दलच्या प्रचाराची गरजच उरली नाही. प्रजावाढीचे प्रमाण जवळ जवळ शून्यावर आले असल्यामुळे वृद्ध स्त्रीपुरुषांचे प्रमाण वाढू लागले आहे. कार्यक्षमतेच्या उमेदीच्या वयोगटाची संख्या घटेल की काय, असाही प्रश्न चर्चेला क्वचित येऊ लागला आहे. कार्यक्षम वयोगटात शेकडा ५ टक्के बेकारीचा प्रश्न उत्पन्न झाला आहे. तो येथील राजकारणातली एक महत्त्वाची डोकेदुखी झाला आहे. हाच शेकडा ६ टक्के प्रमाणातला प्रश्न पश्चिम जर्मनीत नुकताच उत्पन्न झाल्यामुळे तेथील

राष्ट्रपतीचे आसन अस्थिर बनले आहे. प्रजावाढीचा प्रश्न कोणतीही राज्यपद्धती असलेल्या राष्ट्रातील वरिष्ठ सत्ताधाऱ्यांचे सिंहासन हादरून टाकणाराच आता झाला आहे; हे लोकशाही राज्यांनी तर विसरून चालणार नाही. जेथे लोकशाही नाही, तेथेही हा प्रश्न बिकट झाल्यास राज्यक्रांतीही अटळ ठरेल. भुकेलेल्या जनतेच्या डोळ्यांतील क्रोधाग्नीत राज्ये भस्मसात होतात, असे भीष्मांनी युधिष्ठिराला शांतिपर्वात सांगितले आहे.

२९ जून, १९७७ : आज संध्याकाळी मुंबईजवळील गणेशपुरीच्या मुक्तानंदाचे शिष्य व प्रचारक डॉ. विजेसिंग (अमेरिकेत राहिलेले आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ) व त्यांच्या अमेरिकन पत्नी विवेका (मूळचे अमेरिकन नाव रिबेका) यांनी मला येथून ४० मैलांवर न्यूवर्ग शहराजवळील हॅरिमन महाविद्यालयाच्या वसतिगृहात ३ आठवडे चाललेल्या योगशिबिरात नेले. सौ. विवेका कुंकू लावतात; गळ्यात तुळशीची माळ घालतात. ज्या कार्यात पडतात त्यात रात्रंदिवस खपतात. त्यांनी हिंदू धर्माची दीक्षा घेतली आहे. मुंबईजवळील गणेशपुरीतील ब्रह्मीभूत स्वामी नित्यानंदांचे शिष्य मुक्तानंद यांच्या सिद्धयोगधामातर्फे हे योगशिबिर भरविले आहे. सुमारे दोनशे अमेरिकन स्त्रीपुरुष येथे जमलेले आहेत. अमेरिकेत या पंथात ४-५ हजार गोऱ्या अमेरिकनांचा भरणा झालेला आहे. त्यात काहींनी संन्यासदीक्षा घेतली आहे. संध्याकाळी ५ पासून साडेनऊपर्यंतचा कार्यक्रम मी पाहिला. जवळजवळ निम्मे पुरुष व निम्म्या महिला. बहुतेक २०-५० च्या वयोगटातले. शिबिरात या वेळी मंत्रमाहात्म्याने मोठी शस्त्रक्रिया यशस्वी रीतीने कशी पार पडते, यावरील एका रुग्णमहिलेच्या विस्तृत पत्राचे अर्धा तास वाचन झाले. 'ओम नमः शिवाय' मंत्राचा सामुदायिक जप सुरू झाला. या वेळी पाच तंबोरे महिलांनी लावलेले; हार्मोनियम व पखवाजही त्याबरोबर चालू; तरुण महिला व पुरुष उच्च स्वरांत मंत्रोच्चार करीत होते; त्यांना बाकीचे साधक साथ देत होते. अर्धा तास मंत्रघोष झाल्यावर अर्धा तास डोळे मिटून ध्यान सुरू झाले. या वेळी काही तरुण स्त्रीपुरुष अंगात आल्यासारखे घुमू लागले. काहींनी योगमुद्रा-आसन घालून जमिनीवर डोके टेकले व तसेच ते स्थिरावले. दोन-तीन तरुण मान व सबंध अंग जोरात घुसळून जोरात भस्त्रिका करू लागले. काही सताड आडवे पडले. या सभामंडपात प्रणवाचा उच्चार घोंगावत होता. अर्धा तास ध्यान झाल्यावर मध्यभागी असलेल्या उच्च मखमली सिंहासनावरील स्वामी मुक्तानंदांच्या तसबिरीची आरती झाली. ७-८ वाजता भोजन झाले. साधकांनी मद्य व मांसाहार वर्ज्य करून शाकाहाराचे व्रत स्वीकारले आहे; ही गोष्ट या वेळी विजेसिगांनी मला सांगितली. भोजनोत्तर साडेआठ ते साडेनऊ महिम्नस्तोत्र व इतर काही संस्कृत, हिंदी व मराठी पदे सामुदायिक रीतीने म्हणण्यात आली. संस्कृतच्या उच्चारपद्धतीत ऱ्हस्वाचे दीर्घ बरेच वेळा होते. संयुक्त व्यंजनांच्या अगोदरच्या ऱ्हस्व स्वरावर आवश्यक असलेले गुरुत्व न येता ढिले उच्चार होत होते. संस्कृत उच्चार नीट घटविलेले शिक्षक न मिळाल्यामुळेच हे प्रमाद होत आहेत हे माझ्या ध्यानात आले. उच्चार करणाऱ्यांची वाणी स्वच्छ होती.

रात्री हे सर्व पाहिल्यावर मी विजेसिंगांच्या मोटारीने परत मुरलीधरपंतांच्या घरी आलो. वरीलप्रमाणे वर्णन केले. त्यावर मुरलीधरपंत म्हणाले : आबा, अमेरिकन संस्कृती ही आविष्कार प्रधान(एक्स्प्रेसिव) आहे. म्हणून हा असा प्रकार दिसला. आपल्या भारतीय भजनात असे फारसे घुमणे, ओरडणे वगैरे दिसत नाही; कारण सामाजिक दडपण फार! आपल्या लोकांत येथल्यापेक्षा मनोरोगी अधिकच सापडतील. येथील समाजात आपल्यासारखे दडपण कमी, म्हणून मनोरोगीही कमी!

या अमेरिकेत हिंदू धर्मपंथाचा प्रसार करणारे अनेक योगी, साधुसंत गेली काही वर्षे येत आहेत. त्यांचे बस्तान बरे बसलेले दिसते. योगविद्येचा महिमा पंथाबाहेरच्या अमेरिकन विद्वानांनाही पटू लागल्याची उदाहरणे बरीच दिसतात. ट्रान्सेंडेंटल मेडिटेशन किंवा उन्मनध्यानयोग या विषयावरील व्याख्यानसत्र आयबीएम या एका अमेरिकेतील वरिष्ठ उद्योगसंस्थेच्या व्यवस्थापकांकरिता आयोजित केल्याचे मला या संस्थेतील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यात दोघे माझे साक्षात नात्याचे आहेत, मुलगा व जावई. ट्रान्सेंडेंटल मेडिटेशनच्या एका अमेरिकेत प्रकाशित पुस्तकाच्या मुखपृष्ठावर असे म्हटले आहे की, या ध्यानयोगाला ईश्वर, धर्म व तत्त्वज्ञान यांची आवश्यकता नाही.

भारतीय संप्रदाय बौद्ध, सुफी इत्यादी ख्रिश्चनेतर व यहुदीतर सर्व संप्रदायांपैकी हरेकृष्ण इत्यादी संप्रदायांचा प्रभाव अलीकडे उत्तर अमेरिकेत अधिक वाढत आहे. उत्तर अमेरिकेतील राज्यपद्धती धर्मस्वातंत्र्याच्या तत्त्वावर आधारलेली असल्यामुळे ख्रिश्चन धर्माबाहेरच्या आंतरराष्ट्रीय धर्मांना येथे वाव व मोकळीक मिळाली आहे. ज्या हिंदू धर्मीय संप्रदायांमध्ये व्यक्तिपूजक प्रवृत्ती आहे त्यास मात्र एक मोठा धोका दिसतो. विद्यमान जिवंत व्यक्तीला देव मानून पूजा करण्याने संप्रदायाची विटंबना होऊन समाजात छीथू होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. व्यक्ती जिवंत आहे तोपर्यंत, ती व्यक्ती कितीही अध्यात्मात प्रगत झालेली असली तरी, ती केव्हा पतन पावेल याचा नेम नसतो. कठोपनिषदात म्हटले आहे हा मार्ग म्हणजे वस्तऱ्याची लखलखीत कठोर धार आहे, हा मार्ग दुरत्यय पार पडण्यास कठीण आहे.

ता. ३० जून, १९७७ : फिशकिल : सकाळी आठ वाजता प्रातःकाळचे सगळे आन्हिक उरकले. आज आकाश निरभ्र, सूर्यप्रकाशाने सर्व प्रदेश उजळून निघालेला; कालच पावसाच्या जोरदार सरींनी प्रदेश न्हाऊन निघालेला असल्यामुळे भोवतालची गगनचुंबी वृक्षांनी भरलेली वने वसंतऋतू असल्यामुळे तरारली. तेथून ३९ मैलांवरील ऑबोस्टी सरोवराभोवती फिरण्याकरिता मुरलीधरपंतांनी आपली मोटार बाहेर काढली. सरोवरापासून ४ मैल अलीकडेच मोटार ठेवून पुढील ४ मैलांचा डोंगर चढणीचा प्रवास आम्ही दोघांनी पायी केला. रस्त्याच्या दोन्ही बाजूला वृक्षवल्लींनी भरलेल्या जंगलाची शोभा पहात चालत होतो. जांभळ्या बेरीच्या दाट झुडपांनी वृक्षांच्या मध्यंतरीची जमीन आच्छादिलेली,

जांभळ्या बेरीवर फिकट गुलाबी झुपकेदार फुलांचा मोहर बहरलेला; डोंगर माथ्यावरचे हे सरोवर एक मैल लांब व काही ठिकाणी कमीतकमी १२ शे फूट व काही ठिकाणी जास्तीत जास्त ३ हजार फूट रुंद. ५ फुटांपासून सुमारे दीडशे फुटांपर्यंत खोल असलेला हा जलाशय भोवतालच्या हिरव्या घनदाट वृक्षांची छाया प्रतिबिंबित झालेला दुरून हिरवा-निळा दिसला. काळ्या, निळ्या व पांढुरक्या चुनखडीच्या उंच प्रस्तरांनी बनलेल्या डोंगरांच्या मध्यभागी असलेली लहानमोठी शेकडो सरोवरे उत्तर अमेरिकेत आहेत. काहींची लांबी शंभर ते साडेतीनशे मैलांपर्यंत आहे. अशी ही सुंदर व भव्य सरोवरे कशी निर्माण झाली? मी मुरलीधरपंतांना विचारले. ''संबंध उत्तर अमेरिका सुमारे १० कोटी वर्षांपूर्वी पूर्ण बर्फाच्छादित होती. ते बर्फ वितळून वनस्पतीच्या व प्राण्यांच्या जाती हळूहळू निर्माण झाल्या. मऊ सपाट जमिनीवर व पर्वतमय प्रदेशात बर्फाच्या घसरणाऱ्या प्रचंड राशींनी लांबलचक भगदाडे व खोलगट भाग जेथे जेथे तयार झाले होते, तेथे तेथे सरोवरे नद्या झाल्या. खडकाळ टणक प्रस्तरांचे भाग डोंगराळ झाले. उत्तर अमेरिकेतील काही महानद्या ह्या पूर्वीच्या बर्फनद्याच होत.'' मुरलीधरपंतांनी भूविज्ञानाच्या आधारे अशी बरीच माहिती दिली.

आम्ही उंचावरच्या पांढऱ्या कातळावर बसून निरीक्षण व चर्चा करीत न्याहारी केली. पुनः परत चार मैल अधिक वेगाने म्हणजे ५४ मिनिटांत मोटार जेथे ठेवली तेथे येऊन मोटारीने फिशकिलला पाउण तासात १२ वाजता पोचलो. न्यूयार्क संस्थानात 'किल' हे उपपद असलेली गावे पुष्कळ आहेत 'किल' उपपदाचा अर्थ मुरलीधरपंतांना विचारला. ''किल ह्या शब्दाचा रेड इंडियन भाषेत निर्झर असा अर्थ आहे,'' मुरलीधरपंत म्हणाले

(पुढे चालू)

(नवभारत, नोव्हेंबर, १९७७, पृ. १ ते ७)

○○○

९१

आमची अमेरिकेची यात्रा - ३
(दैनंदिनी)

२ जुलै(१९७७) - चि. सौ. मालू, मुरलीधरपंत, मधू व मी असे फिशकिल (पुकिप्सी) हून मोटारीने न्यूयॉर्क शहराचा फेरफटका करावा असे ठरविले. सकाळची न्याहारी करून सुमारे सकाळी १०च्या सुमारास या अवाढव्य व प्रचंड शहराच्या वस्तीत शिरलो. हजारो मोटारी, मालट्रक व बसेस शहरात शिरतात व हजारो परतताना दिसतात. प्रत्येक एक किलोमीटर वा अर्धा किलोमीटरवर नवे नवे रस्ते फुटतात. रस्त्याच्या वळणाच्या तोंडावर माहिती सांगणाऱ्या पाट्या व अनेक प्रकारचे क्रमांक. चि. मधूने मुरलीधरपंतांच्या हातात मोटारीचे चाक सोपविले. कारण येथील शहरांचा नकाशा तपशीलवार लक्षात ठेवण्यात मुरलीधरपंत तरबेज. हे शहर ते एकटे अनेकदा पाहून आलेले. रस्त्यांच्या अनेक चक्रव्यूहांतून इष्ट स्थानी पोचण्यात त्यांच्या हातून चूक होणार नाही अशी सर्वांची खात्री. आडवे तिडवे रस्ते ओलांडत गगनचुंबी इमारतींच्या परिसरात मुरलीधरपंतांनी, स्टॅच्यू ऑफ लिबर्टीचे डोके सहज दिसेल, इतक्या जवळ मोटार आणली. हा स्टॅच्यू येथे सागरास मिळणाऱ्या नदीच्या मुखात आहे. त्यांनी नदीच्या तीरावरील बागेजवळील मोटारस्थानकादर शेकडो मोटारींच्या रांगेत सोयीस्कर जागा हेरून मोटार अवचित आणून थांबविली. स्वतंत्रता देवीचा म्हणजे लिबर्टीचा हा उंच स्टॅच्यू नदीमुखातील एका बेटावर उभारला आहे. १८८६ मध्ये स्थापन झालेला हा स्टॅच्यू (१५१ फूट उंचीचा) अमेरिकनांना फ्रेंचांनी बक्षीस दिला. फ्रेंचांना मोठी क्रांती करूनही लोकशाहीची स्थापना करणे प्रथम जमले नाही. अमेरिकनांनी मात्र 'एक घाव दोन तुकडे' करून स्वतंत्रता देवीची स्वदेशात स्थिरपणे स्थापना केली, याचे कृतज्ञतादर्शक हे प्रतीक आहे. ही देवी आपले तत्त्व विश्वमानवामध्ये मूर्त रूपात आणून मानवमात्रास कायम बंधमुक्त करील, स्वातंत्र्याच्या दिव्य प्रकाशाखाली मानवजात कायम नांदेल, अशा अदम्य मानवी धारणेचे हे प्रतीक आहे. या मूर्तीकडे दिवसभर येरझारा घालणाऱ्या असंख्य दर्शनेच्छूंची ने आण करणाऱ्या एका बोटीतून आम्ही या मूर्तीच्या पायाशी जाऊन पोचलो.

तिच्या पोटातील जिन्यातून जाता येईल त्या वरच्या ठिकाणापर्यंत पोचलो. सर्व विशाल शहर निरखून पाहिले; व सावकाश उतरून परतलो. माझ्या मनात आले की, ख्रिश्चन प्रॉटेस्टंट धर्म मूर्तिपूजकतेचा निषेध करतो. अव्यक्त देवतेला मूर्तिरूपाने भजणे पाप मानतो. परंतु मूर्तिपूजक कॅथलिक फ्रान्सने मात्र या मूर्तिविरोधी जगाला मूर्तीचे उपासक बनविले! कोणी म्हणेल की ही मूर्ती म्हणजे प्रत्यक्ष देवता नव्हे; ते केवळ प्रतीक आहे. अगदी बरोबर! परंतु हिंदूही मूर्तीस प्रतीकच मानतो. प्रतीकाचे आलंबन करूनच अव्यक्त तत्त्वाला भावनेने भजतो. मतभेद कोठे आहे? आम्ही संध्याकाळी १०१ मजली एंपायर स्टेट बिल्डिंग चढलो. त्या इमारती शेजारच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या नव्या, त्यापेक्षा उंच दोन इमारती दुरून पाहिल्या व नंतर उतरलो. संयुक्त राष्ट्रांच्या इमारती जवळ फेरफटका करून पुनः फिशकिलला परतलो.

३ जुलै (१९७७)- सकाळी ९ च्या सुमारास न्यूयॉर्कच्या क्वीन्स या उपनगरातील हिंदू मंदीर पहावयास गेलो. ह्या हिंदू मंदिराचा प्राणप्रतिष्ठा विधी गेले ४ दिवस चालला आहे. या मंदिराचा प्राकार पुरा व्हायचा आहे. हे गणेशपंचायतन मंदिर आहे. या मंदिराच्या उभारणीत मद्रासकडील मंडळींचा विशेष पुढाकार आहे. उत्तर अमेरिकेतील हिंदूंनी अडीच लक्ष डॉलर गोळा केले असून पूजाअर्चा व मंदिररक्षण यांची कायम तरतूद केली आहे. मंदिराला दोन मजले. वरच्या मजल्यावर पंचायतन व खालच्या मजल्यात सभागृह व भोजन गृह आहे. या दाक्षिणात्य शैलीच्या सुरेख मूर्ती असून मध्यभागी गणेश मूर्ती स्थापली आहे. होमहवन, अभिषेक, पूजा, मंत्रपुष्प, भजन इत्यादी विधी सकाळ संध्याकाळ गेले चार दिवस सुरू आहेत. उद्या समाप्ती आहे. परंतु, येथे एक गोष्ट खटकली. दोन्ही मजल्यांवर फुलांच्या पाकळ्या व दूर्वांची थोडकी पसरलेली, हळद कुंकू गुलाल कोठे कोठे सांडलेला आढळला. मंदिरात प्रवेश केल्यावर माहिती सांगणारा कोणी आढळला नाही. शेंडी राखलेली, मळकी उपरणी व धोतरे नेसलेली, गंध टिळा लावलेली चारपाच टोकी दिसली. या हिंदुमंदिरांची भारतात जी हेळसांड व उपेक्षा दिसते तीच या उच्चशिक्षित हिंदूंच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या अमेरिकेतील मंदिराची गत पाहिली. स्थापनेच्या दिवसापासूनच ही स्थिती दिसावी? यामुळे मन खिन्न झाले. मी माझी ही मनःस्थिती माझ्याबरोबर असलेल्या चि. मुरलीधरपंतांना दिसू दिली नाही कारण, त्यांनी फार मोठ्या उत्साहाने मला येथे आणले व सविस्तर माहिती प्रत्यक्ष दिली. दिवसाचे चार वाजले होते. न्यू हेवन या शहराकडे निघालो. येल विद्यापीठाच्या (कॅम्पस) परिसरात आमची मोटार शिरली. १३ वर्षांपूर्वी १९६४ साली या शहरात आलो होतो. त्या वेळी चि. मधुने डॉक्टरेटचे अध्ययन पुरे करत आणले होते. मुरलीधरपंताना एक वर्ष अवकाश होता. आता कित्येक वर्षांनी आम्ही या सुंदर स्थानाला भेट दिली. येल विद्यापीठ तीनशे वर्षांपूर्वी स्थापन झाले त्या वेळपासून या विद्यापीठाची सुरेख मांडणी होत आली आहे. पांढऱ्या दगडांच्या चिरेबंदी इमारतींच्या रांगांचे अनेक चौक; विविध विद्याशाखांच्या टोलेजंग इमारतींच्या आसपास विद्यार्थी वसतीगृहे, अध्यापकगृहे,

अध्ययनगृहे यांची व्यवस्थित मांडणी मन आकर्षून घेते. प्रत्येक विद्याशाखांची पृथक ग्रंथालये, प्रयोगालये व वस्तुसंग्रहालये. त्याचप्रमाणे सर्वसाधारण व दुर्मीळ पुस्तकांची अशी दोन ग्रंथालये. या विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या हजारो पुस्तकांचे भांडागारही आहे. सर्व परिसर हिंडलो. मात्र येथे सर्वत्र शुकशुकाट दिसला. कारण उन्हाळ्याच्या सुटीत लोक दुसरीकडे गेले आहेत. एका रेस्टॉरांमध्ये संध्याकाळचा फराळ केला. नंतर न्यू हेवनच्या एका हिरव्यागार टेकडीवरील एका स्वातंत्र्यवीराच्या स्मारकास भेट दिली व घरी फिशकिल येथे परतलो.

४ जुलै (१९७७) - आज अमेरिकेचा स्वातंत्र्य दिन. बॉस्टनहून चि. अशोक जोशी, सौ. सुरेखा व मुले ही मंडळी फिशकिल येथे भेटण्यास आली. दिवसभर मजेत गेला. छोटा २ वर्षांचा सोपान व ५ वर्षांची राधा या दोघांनाही मराठी येत नाही, समजत नाही. राधा व सोपान हे गालिचा घातलेल्या जिन्यांच्या पायऱ्यांवरून सारख्या घसरगुंड्या खेळत होते. संध्याकाळ झाली. श्री. शरद गुप्ते व सौ. आशा गुप्ते यांच्याकडे भोजनास गेलो. भोजनाच्या अगोदर गप्पागोष्टी झाल्या. सौ. आशा गुप्ते यांनी बॅडमिंटनमध्ये पटकावलेल्या १०-१२ ट्रॉफींकडे लक्ष गेले. त्यासंबंधी हकिकती ऐकल्या. ८-९ वर्षांचे छोटे दोघे मुलगे समीर व निखिल यांनी व्हॉयोलिन वादन थाटात व तालात करून आमची शाबासकी मिळविली. १० च्या सुमारास रात्री आमच्या १० मैलांवरील निवासस्थानी परतलो.

५ जुलै (१९७७)- आज सकाळी येथून ३७० मैलांवरील अमेरिकेच्या राजधानीला वॉशिंग्टन डी. सी. ला जाण्यास सौ. सती, चि. सौ. इंदू, मालती, लक्ष्मी, शीला, मुरलीधरपंत, मधू व मी निघालो, दिवसभर प्रवासात गेला. वॉशिंग्टन शहराभोवती ५५-६० मैलांचा चक्राकार महामार्ग आहे. त्या चक्राला शहरात शिरणारे आऱ्यांसारखे शेकडो उपमार्ग आहेत. एका हॉलिडे इनमध्ये खोल्या आमच्या नावे सुरक्षित अगोदरच टेलिफोनद्वारा केल्या होत्या. कोणत्या उपमार्गाने, हेलपाटे न पडता, आत नेमके संकेतित स्वस्थानी पोचायचे, हा प्रश्न मुरलीधरपंतांनी व मधूने शहराचा नकाशा अभ्यासून सोडविला. साधकबाधक चर्चेशिवाय प्रश्न सुटला नाही. ही मंडळी अनेक वेळा वॉशिंग्टनला जाऊन आली तरी शेकडो मार्गउपमार्गांच्या जाळ्यांतून न घोटाळता कसे आत शिरायचे हे कोडे उकलावे लागले. मुरलीधरपंतांनी अचूक रीतीने ठरलेली हॉलिडेइन गाठली. एकदम हायसे वाटले. प्रवास दीर्घ होता, तरी कंटाळा आला नाही. कारण फारच अफाट विस्ताराने वैचित्र्याने भरलेली रानेवने, कारखाने, प्रचंड बांधकामे, गगनचुंबी विशाल महाल, लहान मोठी गावे, नगरे, उपनगरे पहात व ओलांडत येथे येऊन ठेपलो. हे अमेरिकन मानवनिर्मित विश्व मानवी विश्वकर्म्यांनी ४ शे वर्षे सतत उद्योगांनी व पराक्रमांनी उभारले आहे.

येथील माणूस निसर्गावर विजय मिळविण्याकरिता संन्नद्ध झालेला आहे. येथील माणूस अंतरिक्ष यानांच्या योगाने चंद्रावर जाऊन व राहून आला आहे. आकाशाच्या

अनन्त पसाऱ्याचा अंत शोधत आहे; अगणित भयंकर, धोक्यांमध्ये न डगमगता, न डरता जिवाला झोकून देत आहे! याचे प्रत्यंतर व प्रतीक हे महानगर आहे. अतिक्षुद्र मानवी विश्व व अनन्त बाह्य विश्व यांची ही स्पर्धा आहे! संध्याकाळी हॉलिडे इनमधील एका भोजनालयात सर्वांनी यथेच्छ खाणेपिणे उरकले, खोलीतील 'दूरदर्शन' पहात झोपी गेलो. सकाळ झाली. घड्याळाकडे पाहिले तो चारच वाजले होते. म्हणून ६ वाजेपर्यंत तसेच पडून राहिलो. ८ वाजता प्रातःकालचे सर्व आन्हिक उरकून बाहेर पडलो.

६ जुलै १९७७- वॉशिंग्टन, जेफर्सन, लिंकन यांची भव्य स्मारके असलेल्या मैदानाकडे प्रथम गेलो. वॉशिंग्टन मनोऱ्याजवळ आलो. येथे प्रेक्षकांच्या रांगा एका मागून एक या उंच मनोऱ्यात शिरण्याकरिता थांबल्या होत्याः आम्हांसही तासभर थांबून शिरकाव मिळाला. वर टोकापर्यंत जाऊन भोवतालचे जग पाहिले. खाली उतरल्यावर संगमरवरी लिंकन स्मारकावर गेलो. लिंकनच्या विशाल पुतळ्याजवळ उभे राहून आमचे फोटो निघाले. संगमरवरी फलकांवरील लिंकनच्या स्वातंत्र्य व लोकशाही या विषयांवरील उक्तींचे एकाग्र चित्ताने श्रद्धेने मी पठण केले. मन भारावून गेले. भारताच्या भवितव्याबद्दल मन सचिंत झाले!

चि. मधूने या मैदानाच्या उत्तरेस व पूर्व दिशेला असलेल्या अमेरिकन संघराज्याची मुख्य सफेत इमारत दाखविली. आत प्रवेश मिळविण्यास अनुमती पत्र लागते, ते मिळाले नाही. म्हणून नुसती प्रदक्षिणा घालून समाधान मानले. वॉटरगेट इमारतही त्याच मैदानात दाखविण्यात आली. वॉटरगेट प्रकरण गेले वर्षभर गाजत आहे, ते आठवले. माजी अमेरिकन अध्यक्ष निक्सनने युक्त्या प्रयुक्त्या योजून डेमोक्रॅटिक पक्षाची कागदपत्रे कशी लांबविली व फसवाफसवी केली, न्यायालयापुढे निक्सनच्या काय काय भानगडी आल्या, याचे मधूने सरस वर्णन केले. निक्सनने नीतीअनीतीचे सर्व संकेत बेदरकारपणे मोडल्याची अनेक उदाहरणे सांगितली. अमेरिकेतील जनमानसात लोकशाहीची अंतिम नैतिक मूल्ये रुजलेली असल्यामुळेच निक्सनचा निकाल लागू शकला; हे या सर्व कथनाचे सार होते.

नंतर आम्ही श्रेष्ठ वैज्ञानिक आइनस्टाईनचे स्मारक पाहिले. तंत्र व विज्ञान यांच्या विकासाचे चिरंतन प्रदर्शन या विशाल महालात भरविलेले आहे. शेकडो प्रेक्षक यामध्ये प्रदर्शनातल्या वस्तू व नमुने पाहात हिंडत असतात. येथील एका मोठ्या प्रेक्षागारात आधुनिक अंतरिक्ष विज्ञानाचे प्रात्यक्षिक व्याख्यानद्वारा दिवसातून ४-५ वेळा तास तास दाखवितात. त्यात आम्ही सर्वजण तासभर रमलो. संध्याकाळ झाली व स्वस्थानी परतलो.

७ जुलैला वॉशिंग्टन डी. सी.हून निघालो. दिवसभर प्रवास करून फिशकिलला परतलो. ८ जुलैला घरीच गाठीभेटी व चर्चा यात वेळ गेला. श्री. शशीधर मालवीय व सौ. स्नेहलता मालवीय हे जोडपे संध्याकाळी एका विशेष प्रश्नाच्या चर्चेकरिता आले. शशीधर हे आयबीएम मध्ये वरच्या हुद्द्यावर आहेत. त्यांचे मित्र डॉ. श्री. विजेसिंग होत. विजेसिंग हे स्वामी मुक्तानंदाच्या नादी लागले आहेत. सगळा राहिलेला वेळ विजेसिंग व त्यांच्या पत्नी

मुक्तानंदाच्या आश्रम कार्यात घालवितात; भजन-पूजन-ध्यान-धारणा, भक्तांची शिबिरे, मेळावे इत्यादी गोष्टींत अमोल वेळ दवडतात, याची त्यांना फार खंत लागलेली आहे. मला त्यांनी विचारले, 'शास्त्रीजी, या भानगडीतून माझा मित्र कसा सुटू शकेल? यावर काही उपाय आहे काय? असल्या कर्मकाण्डात वेळ व्यर्थ न दवडता अधिक उच्च दर्जाच्या आध्यात्मिक जीवनाचा मार्ग विजेसिंगना दाखवू शकाल काय?' यावर मी म्हटले की, 'मी कोण? मी अशा विद्वानाला अशा गोष्टीपासून कसा परावृत्त करू शकेन?' यावर मालवीयांनी विचारले की, या पेक्षा अधिक उच्च आध्यात्मिक जीवनपद्धती तुम्ही सांगू शकता. मी म्हटले, होय. भजन-पूजन-ध्यान धारणा यांपेक्षा उच्च आध्यात्मिक जीवन संतांनी सांगितले आहे. परंतु विजेसिंगना त्यामुळे समाधान मिळणार नाही. त्याकरिता अध्यात्मविद्येचे सांगोपाग अध्ययन व्हावयास पाहिजे. अध्यात्मतत्त्वाचा गंभीर विचार करावयास लावणारा माणूस विजेसिंगना भेटावयास पाहिजे. या संदर्भात मी महाभारतातील तुलाधार जाजली संवादांतील धर्म चिंतनविषयक श्लोक म्हणून दाखविलेले मालवीयजींना फार उद्बोधक वाटले.

९ जुलै (१९७७) : आज सकाळी फिशकिलहून दुपारी २ च्या सुमारास सिरक्यूजला आलो. बरोबर मुरलीधरपंत, चि. मधू, सौ. सती. ट्रेडवेइनमध्ये प्रा. श्री. अगेहानंद भारती यांनी आमची उतरण्याची सोय केली. प्रा. अगेहानंद भारती येथील युनिव्हर्सिटीमध्ये मानवविद्या विभागाचे मुख्य; एम. एन. रॉय यांचे मित्र; रॉय यांनीच माझी ओळख भारतींशी करून दिली होती. नंतर अनेक वेळा भेटलो होतो. त्यांना अमेरिकेत आता आल्यानंतर भेटावे असे ठरविले. चि. मधूने फोन करून आज भेटण्याचे ठरविले, म्हणून आलो.

संध्याकाळी ४ वाजता श्री. भारती स्वामी आपली शिष्या रिता नारंग हिला बरोबर घेऊन युरोपियन गृहस्थीवेषात भेटले. भारतात त्यांना मी काषाय वस्त्रांत पाहिले होते. त्यांनी भारतात संन्यास दीक्षा घेऊन काही वर्षे काढली. संस्कृत, वेदवेदान्त, धर्मशास्त्रे यांचे अध्ययन केले. हिंदी उत्कृष्ट बोलतात. मातृभाषा जर्मन. इंग्लिशमध्ये भाषण व लेखन चांगले करतात. भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान व तंत्रमार्ग यावर पुस्तके लिहिली आहेत. काषाय वस्त्र(ओरब्र रोब) असे अभिधान असलेले आत्मचरित्र त्यांनी प्रसिद्ध केले आहे. अमेरिकेत सध्या पसरत असलेल्या भारतीय योग-भक्तिसंप्रदायाच्या संदर्भात अध्यात्म गूढानुभवावर पुस्तक लिहिले आहे. माझ्या खोलीचा दरवाजा त्यांनी ठोठावला व मी दरवाजा उघडला. ही प्रचंडमूर्ती ६ फूट उंचीची पाहिली व स्वागत केले. काषायवस्त्रे अंगावर नव्हती म्हणून म्हटले की, "संन्यास सोडला काय? संन्यास सोडता येत नाही!" त्यांनी लगच म्हणले की "अलिंगो धर्मवर्जितः यतिः" यतीला वस्त्रादी चिन्हे, धर्मकर्म वगैरे काही असू नये. असले तरी ठीक, नसले तरी ठीक! यावर आम्ही थोडेसे हसलो. इतर विषयांवर हिंदीत चर्चा सुरू केली. मी त्यांना विचारले की, अमेरिकेत भारतीय हिंदुधर्म संप्रदाय, योग व कृष्ण-भक्ती यांचा प्रसार होत आहे. हे आंदोलन स्थिरावू शकेल काय? त्यावर ते म्हणाले, "येथे ख्रिश्चन

धर्माची लोकसंख्याच प्रचंड. हे हिंदू संप्रदाय बारीक बारीक गट करून राहू शकतील. फार जोराची पकड घेऊ शकणार नाहीत. शाकाहारी संप्रदाय फारसे वाढणार नाहीत. युरोपियन पद्धतीची टापटीप त्यांच्यात कमी आहे. ही केवळ थोड्या तरुण मंडळींतील उत्पन्न झालेली अमेरिकतील भौतिक सुख समृद्धीची प्रतिक्रिया आहे. भ्रमनिरासही होण्यास वेळ लागणार नाही. मूर्तिपूजा, पौराणिक कथा या विज्ञानयुगात टिकाव धरण्यासारख्या नाहीत. हिंदूधर्मातील ध्यानयोग, सूक्ष्मविचार आणि कलात्मक आविष्कार यांचे मात्र प्रभावी स्वरूप ज्यांना नीट रीतीने प्रकट करता येईल ते येथे काही प्रमाणात प्रभाव गाजवू शकतीत. अमेरिकन संस्कृती ही व्यापारी लोकांची संस्कृती आहे; त्यांच्या सहवासात हिंदू संत, भक्त व योगी हेही धर्माचा व्यापार चांगल्या रीतीने करू लागले आहेत. म्हणून हा धार्मिक व्यापारी वैश्यवर्ग म्हणून एक लहानसा सामाजिक गट म्हणून टिकेलही. परंतु हेही ध्यानात घेतले पाहिजे की ख्रिश्चन चर्चची शक्ती मात्र फार मोठी आहे. ती फार असहिष्णू असते.'' अशी अनेक विषयांवर बातचीत झाली. ६ वाजता बैठक उठली. संध्याकाळी ७ ला काषायवेषात श्री. भारती पुनः आमच्याकडे आले आणि एका चिनी भोजनालयात आम्हा सर्वांना घेऊन गेले. सौ. सती पूर्ण शाकाहारी असल्यामुळे भारती व सौ. सती यांनी शाकाहार घेतला. चिनी भोजन आम्हा सर्वांना फार स्वादिष्ट वाटले. मी नेहमीपेक्षा अधिकच घेतले. आम्ही दोघे उपनिषदांवर चर्चा करीत होतो. तैत्तिरीय उपनिषदातील पंचात्मविद्येवर बोललो. कठोपनिषदाचाही संदर्भ आला. बृहदारण्यकोपनिषदातील ब्रह्मवेत्त्यांच्या सभेतील चर्चेचे देहात्मवादात पर्यवसान झाले, असे मी म्हटल्याबरोबर भारती खूप जोराने हसले. तैत्तिरीय उपनिषदातील पंचात्मविद्येतील अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय या आत्म्याच्या पंचपुटीवर बोलताना मी म्हटले की, स्वामीजी, अन्नमय आत्माच खरा असे या अध्यायाच्या अखेरच्या खंडावरून सूचित होते. हे ऐकून भारती म्हणाले की, तुमचे हे भाष्य नवे आहे; धक्का देणारे आहे. या चर्चेत आम्ही दोघे एका सुरात उपनिषदातील वचने व श्लोक म्हणत होतो. श्री. मुरलीधरपंत म्हणाले की, 'अबा, तुम्ही पाठ म्हणता, हे ठीकच आहे. परंतु हे युरोपियन स्वामी तुमच्याइतक्याच आत्मविश्वासाने ठेक्यात बिनचूक उच्चारशास्त्रानुसारे म्हणतात, त्यामुळे आमचा श्री. भारती स्वामींबद्दल आदर फारच वाढला.'

जुलै १० - मी १९६४ मध्ये ३ महिने अमेरिकेत होतो; अमेरिकेतील ११ संस्थाने फिरलो. परंतु नायगारा धबधबा पाहित नाही. तसे म्हटले तर भव्य, सुंदर व चमत्कृतिपूर्ण स्थाने व संस्था अगणित पहावयाच्या राहिल्या आहेत. मी भारतात तर पुष्कळच प्रवास केला आहे. परंतु तरी प्रेक्षणीय असे शिल्लक राहिले आहे. जमेल त्यात समाधान मानावे लागते. १० जुलै १९७७ ला सकाळी 'नायगारा' पाहण्यास मी, सौ. सती, मधुकर, मुरलीधरपंत मोटारीने निघालो, दुपारी १.३० ला हॉलिडे इनमध्ये उतरलो. माझे मित्र प्रा. अ. भि. शाह यांची कन्या सौ. इला व तिचे पती शेखर रेड्डी यांची ३ वाजता भेट झाली. हे दोघे डेट्रॉयमिशिगन

येथे वैद्यकीय व्यवसाय करतात. शाह कुटुंबाशी आमचा पंचवीस-तीस वर्षांचा स्नेहसंबंध. म्हणून सौ. इलाची भेट घेण्याची खूप इच्छा होती. तिने आम्हाला डेट्रॉयला खूप आग्रहाचे आमंत्रण टेलिफोनवरून दिले, परंतु मला वेळ नव्हता. म्हणून नायगारा या मध्यवर्ती ठिकाणी या पति-पत्नींना बोलावून घेतले. येथे या ऋतूत दिवस खूप मोठा असतो, ८ वाजता सूर्य मावळतो. नायगारा धबधबा ५ वा. पाहण्याचे ठरविले आणि या दोघांशी बोलत बसलो. इलाला आम्ही भेटलो त्यामुळे ती खूपच खूश झाली. वादविवाद व गप्पागोष्टी दिलखुलास चालू झाल्या व रंगल्या. इंग्रजीत व मधून मधून मराठीत आम्ही बोलत होतो. शेखरपंत आरामखुर्चीत स्वस्थ बसून ऐकत व मधून मधून मोजक्या शब्दांत भर घालत. इला अत्यंत वादपटू, युक्तिवादात सहसा हार जाणारी नव्हे. इतके असूनही शेखरपंत तिलाही एखादे वेळी मुद्दा नीट समजावून देऊन गप्प करीत होते. चर्चेचे विषय सारखे बदलत होते. भारतातील आणीबाणीची कथा, अमेरिकेचे राजकारण, न्यायसंस्था व समाजकारण, प्रा. शाह यांनी चालविलेली इंग्रजी 'क्वेस्ट' व 'सेक्युरॅलिस्ट' ही नियतकालिके, अमेरिकेतील भारतीय कुटुंबे, अमेरिकेतील वा पश्चिमी देशातील लैंगिक जीवनातील कुटुंबनियोजन, स्वैराचार व लैंगिक भावनातिरेक, अमेरिकेतील श्रीमंती व गरिबी इत्यादी विषय निघाले. अमेरिकेत येऊन राहिलेली भारतातील ८-१० वर्षांची लहान मुले ८-१० वर्षांत मातृभाषा विसरतात व अमेरिकन इंग्लिशच त्यांची मातृभाषा बनते, ही गोष्ट मी इलाला माझ्या अनुभवावरून सांगितली. त्यावर ती म्हणाली की, ती स्वतःच २० व्या वर्षाच्या सुमारास अमेरिकेत येऊन राहिली व ७-८ वर्षे झाली तरी आता विचार मनात इंग्लिशमध्येच चालतात. एवढेच नव्हे तर स्वप्नेही इंग्लिश भाषेतच पडतात; मराठी माणसाशी बोलताना व लिहिताना योग्य मराठी वाक्यप्रयोगही कित्येकदा सुचत नाही. संध्याकाळी ५ वाजता आमची बैठक उठली. श्री. शेखर व इला यांनी आमचा निरोप घेतला. निरोप घेताना सौ. सतीने इलाला सांगितले की, कुटुंबनियोजन योग्यच. परंतु एकतरी अपत्य पाहिजे. इलाने हसतमुखाने हा आशीर्वाद स्वीकारला.

अमेरिकन संयुक्त संस्थाने व कॅनडा यांच्या सीमेवर नायगारा शहर व धबधबा आहे. हे लहान व मोठा असे दोन धबधबे आहेत. लहान अमेरिकेचा व दुसरा मोठा कॅनडाचा. दोन्ही धबधब्यांच्या तळापाशी प्रेक्षकांस ल्हान नौकांमधून जाता येते. दोन्ही धबधब्यांचे ढगांच्या आकाराचे तुषारांचे लोंढे अंतरिक्षात वाऱ्याच्या झोतांच्या दिशांनी फवारत असतात व ते फवारे नायगारा नदीच्या काठावर फिरणाऱ्या प्रेक्षकांच्या झुंडीना ओलेचिंब करतात. पश्चिमेकडे कललेल्या कासराभर वर असलेल्या सूर्याच्या किरणांचे फवाऱ्यांवर विराजमान होणारे अर्धचंद्राकार इंद्रधनुष्य निरनिराळे आकार घेताना प्रेक्षकांना आकर्षून घेते. आम्ही मोठ्या धबधब्याच्या पाठीशी असलेल्या खडकावर त्यात खोदलेल्या भुयारात शिरून उभे राहिलो. पाण्यांचे लोट अविरत गर्जत व कोसळत असलेले स्तंभित होऊन पाहात

राहिलो. भिजून जाऊ नये म्हणून मेणकापडाचे पोशाख आम्ही स्त्रीपुरुषांनी केले होते. हे सर्व दृश्य पाहून अंधार पडल्यावर चारशे फूट उंचीच्या एका मनोरा-हॉटेलवर जाऊन त्याच्या निरनिराळ्या मजल्यांवरून हे दोन्ही धबधबे पाहात शिखरापर्यंत चढत गेलो. सर्व बाजूंनी हा देखावा पाहिला. या धबधब्यांवर निरनिराळे चित्रविचित्र रंगांचे सोनेरी विद्युतझोत आलटून पालटून क्रमाने पडत होते. त्या रंगांमध्ये रंगून हे धबधबे चमकत होते. ह्या चमत्कृतीत आम्ही दीर्घकाळ रमलो. रात्री ९-१० च्या सुमारास आमच्या हॉटेलमध्ये परतलो.

भोजनोत्तर विश्रांती घेत असता चि. मधू व मुरलीधरपंत यांनी भूस्तरशास्त्राच्या आधारे मला सांगण्यास सुरवात केली, हा नायगारा धबधबा कसा बनत गेला? नदीच्या प्रवाहाने उंच सपाट पातळीवरून वेगाने युगानुयुगे वाहत असताना खडक फोडून लांबलचक खोल दरी कशी केली? यापुढे अनेक कोटी वर्षांमध्ये काय बदल संभवतात? इत्यादी प्रकारची भूविज्ञान कथा वर्णिली.

११ जुलै (१९७७) : नायगाराहून सकाळी चि. मुरलीधरपंतांच्या गाडीने अलबनीला अालो. मुरलीधरपंतांना विश्रांती देण्याकरिता चि. मधूने गाडीचा ताबा घेतला. वाटेत सिरक्यूज येथील मुक्कामात ट्रेड वे इनमध्ये विसरून राहिलेला कोट मधूने ट्रेड वे इनमधून घेतला. तो कोट सुरक्षितपणे ठेवलेला जसाचा तसाच इनवाल्यानी मधूच्या स्वाधीन केला. कोटात अडीचशे डॉलर होते, तेही मिळाले. हे पाहून मला हॉटेलमालकाबद्दल विशेष आश्चर्य वाटले. वाटेत आम्ही अनेक विषयांवर चर्चा करीत होतो. वन वे असल्यामुळे मुरलीधरपंतांबरोबर मधूही चर्चेत भाग घेत होता. अमेरिकेने न्यूट्रन बॉम्ब तयार करण्याचे अभिनव तंत्र शोधून काढले आहे, यावर चर्चा झाली. त्याचे उत्पादन सुरू करावे, असे राष्ट्रपती कार्टर सांगत आहेत. उलट भारताचे प्रधानमंत्री मोरारजी देसाईनी भारत ॲटमबाँब तयार करू इच्छित नाही, जगातील जवळच्या दूरच्या राष्ट्रांनी केला तरी आम्ही करणार नाही; असे म्हणाले; यावर मधू व मुरलीधरपंत यांनी दोघांनी टीका केली श्री. देसाईंसारखेच माझे मत आहे, असे मी म्हणालो. वरील दोघे म्हणाले की, कार्टर व देसाई या दोघांना अॅटमबाँबचे युद्ध नको आहे; त्याकरिताच अमेरिका सर्व प्रकारच्या अद्ययावत शस्त्रास्त्रांनी सज्ज रहात आहे; भारतानेही युद्ध टाळण्याकरिताच तसेच सज्ज व्हावयास पाहिजे. श्री. देसाई ॲटमबाँबने सज्ज राहण्यास नकारतात, याचा अर्थ भारताच्या सद्य:स्थितीत असलेल्या आर्थिक परिस्थितीत तसे करणे परवडणार नाही; आणि अॅटमबाँब व त्याला लागणारी इतर बाँब फेकण्याची साधने भारत तयार करू लागल्यास भारताच्या प्रस्तुत आर्थिक दुरवस्थेत भरच पडेल; अंतर्गत शांतता बिघडली आहे ती अधिक बिघडेल, व लोकशाहीकडून हुकूमशाहीकडे जावे लागेल. ही सर्व स्थिती लक्षात घेऊनच भारताचे आर्थिक क्लैब्य झाकण्याकरिता देसाई अहिंसावादाचा पुरस्कार करीत आहेत, असे म्हणा, पाहिजे तर. उलट इंदिरा गांधींचे ॲटमबाँब तयार करण्याचे धोरण असल्यामुळेच त्यांनी

तथाकथित समाजवादाच्या व लोकशाहीच्या रक्षणार्थ हुकूमशाहीकडे जाण्याचा उपक्रम सुरू केला होता. सध्याच्या जनतापक्षाच्या केंद्रीय सरकारला आर्थिक शांतता राखता आली नाही, तर पुनः आणीबाणी आणणे भाग पडेल. इंदिरा गांधींच्या राजकारणाची मीमांसा आणखी वेगळ्या प्रकारे मी करू शकेन. परंतु, देसाई यांच्या अजाण (अन्‌कॉन्शस) मनात आर्थिक परिस्थितीचाही संस्कार असेल, नाही असे नाही. परंतु देसाई हे गांधीवादी ध्येयवादी प्रवृत्तीचे गृहस्थ आहेत. उदाहरणार्थ, भारताची भावनिक एकात्मता राहावी म्हणून त्यांना भाषिक प्रदेश राज्य रचना नको होती. त्यात त्यांचा पराभव झाला व तो त्यांनी पतकरला. ते राजकारणी मुत्सदी आहेत, हे खरे. राजकारणी मुत्सदी पण व आत्यंतिक नैतिक ध्येयांची निष्ठा यांच्यात पक्का विरोध असतो. म्हणून आत्यंतिक ध्येयवाद आचरण करणारा साधू राजकारणात अयशस्वी होतो. स्वतः व्यक्तिशः शुद्ध व साधू राहून राजकारण यशस्वी करायचे तर ध्येयवादाला मुरड घालावी लागते. राजकारणी माणूस समाजाला उच्च नैतिक जीवनाकडे नेऊ लागला तर तो एक प्रकारे व्यवहारशून्य ठरतो व राजकारण गमावतो. कारण समाजाला उच्च नैतिक जीवनाची शिकवण देणारा कायदा समाजास नैतिक अधःपातापासून वाचवू शकत नसतो. उदा. क्रांतीनंतर रशियामध्ये आणि अमेरिकेमध्ये सार्वत्रिक दारूबंदी कायद्याने केली. त्यामुळे पोलीस शासनयंत्रणाच भ्रष्टाचारी बनली आणि सुसंस्कृत नागरिकांची शिकॅगो, न्यूयॉर्क, बॉस्टन, वॉशिंग्टन शहरे गुंड, दरवडेखोर इत्यादिकांचे अड्डे बनले. हातभट्टयांचा मोठा व्यापार खेडोपाडी सुरू झाला. भारतात देसाई दारूबंदी सर्वत्र अमलात आणू इच्छितात. इतरत्र जे जसे यामुळे घडले त्यापेक्षा भारतात अधिक प्रमाणात घडेल. कारण भयंकर दारिद्र्य!

ॲटमबाँबच्या बाबतीत मात्र मी देसाई यांची बाजू बरोबर आहे असे मानतो. त्याची कारणे दोन:- एक, भारताची आर्थिक परिस्थिती त्या दृष्टीने फार कमकुवत; दुसरे, भारत ॲटमबाँब करो न करो; ॲटमिक युद्ध केव्हा व कसे भडकेल याचा नेम नाही; कोठेही ते सुरू होवो; जी राष्ट्रे ॲटमसज्ज असतील ती युद्धखोर राष्ट्राला धडा देणारच, आणि त्यात मानवजातीचेच अस्तित्व धोक्यात येईल. मानवजात पुरी खतम होईल वा जी काही राष्ट्रे वाचतील त्यातील मानव जिवंतपणी मरणयातना भोगतील. म्हणून ॲटमबाँबच्या निर्मिती स्पर्धेत जे राष्ट्र उतरणार नाही, त्याला नैतिक श्रेय, महापुण्य तरी लाभेल. त्याच्या योगाने या जगातील नरकात खितपत पडावे लागले तरी त्या राष्ट्राला स्वर्गाची प्राप्ती होईल. मुरलीधरपंत यावर म्हणाले की, "अमेरिकेचा ॲटमबाँब माणसे मारतो. परंतु कोठेही हा बाँब पडला तर इमारती, रस्ते व कारखाने वाचतील, जमीन नापीक होणार नाही." "माणसे मारणार परंतु इमारती, रस्ते व कारखाने राहतील याचा अर्थ हा बाँब भांडवलदार आहे; माणसांची फिकीर न करणारा व भांडवल वाचविणारा." असे त्यावर मी म्हटले.

दिवसभर प्रवास करून चि. मुरलीधरपंत कुलकर्णी यांच्या घरी संध्याकाळी येऊन

पोचलो.

१२ जुलै (१९७७) - फिशकिल (पुकिप्सी) हून व्हर्माट-बर्लिंग्टन-एसेक्स जंक्शनला चि. मधूच्ची घरी आलो. आज विश्रांतीच्या वेळी माझ्या मनात घोळत असलेला, अमेरिकेतील भारतीय व येथील गोरी जनता यांच्या संबंधांबद्दलचा विषय चर्चेत आला. माझा नातू चि. राम हा काळा आहे. याला न्यूयॉर्क (पुकिप्सी) येथे असताना हायस्कूलमधील गोरे विद्यार्थी कसे वागवीत असा प्रश्न मी चि. मधू व चि. सौ. इंदू यांना विचारला. ते दोघे म्हणाले की, गोरे विद्यार्थी रामला हिणवीत व फार भेदभावाने वागवीत, त्यामुळे आम्हाला अमेरिकेच्या ज्या प्रदेशात गोरे व काळे यांचा संघर्ष त्या न्यूयॉर्कसारख्या प्रदेशातून स्थलांतर करण्याची उत्कंठा लागली. ह्या व्हर्माट संस्थानात काळे लोक फार थोडे, तुरळक, शेकडा ३-४ असतील. येथे काळ्यांबद्दल गोऱ्यांच्या मनात वैषम्य नाही; उलट सहानुभूती व बंधुभावही दिसतो म्हणून 'आय. बी. एम.' या उद्योगसंघटनेने आम्हांस येथे पाठविण्याचे ठरविल्याबरोबर पडत्या फळाची आज्ञा समजून येथे आलो. येथे ४ महिने बर्फवृष्टी चालते. थंडी ९ महिने असते; परंतु सामाजिक संबंध सुखाचे आहेत. राम-विजय-लक्ष्मी ज्या हायस्कूलमध्ये शिकले त्यात काळा-गोरा संघर्ष नाही.

१३ जुलै (१९७७)– चि. सौ. इंदू, मधू व सौ. सती यांच्याबरोबर आम्ही लाँगवुड गार्डन्स (चेस्टर काउंटी, पेनसिल्वानिया) ही सहस्र एकरांमध्ये विस्तारलेली बाग पाहण्यास निघालो. सौ. सतीला फुलझाडे व बागा यांची फार आवड किंवा वेडच म्हणा ना! घरातून मोटार काढली व अर्ध्या तासात आकाश ढगांनी सर्व बाजूंनी भरू लागले. मनात आले की, परतावे; लाँगवुड गार्डन्समध्ये काहीच पाहता येणार नाही. परंतु येथे उन्हाळ्याचे दिवस; पाऊस येतो व जातो. सारखा अहोरात्र पडत नाही; त्यामुळे मनातला विचार बोलून दाखविला नाही. तासा-दीडतासात सर्वत्र सरीवर सरी कोसळू लागल्या. पुढे जातच राहिलो. मध्येच उघडीप आली. वाटेत एका खेड्यातील रसरशीत फळफळावळीने भरलेल्या दुकानापाशी गाडी थांबविली. पीच, सफरचंद व काकड्या घेतल्या; ४ तासांत लाँगवुड गार्डनचा भव्य देखावा दृष्टीस पडला. पावसाची एखादी सर मधूनच यायची व जायची. बागेच्या सुंदर स्वागत कार्यालयापाशी पोचलो. टोपीसह रेन कोट घेतले.

पीर डु पाँट या गृहस्थांनी शंभर वर्षांपूर्वी एक सहस्र एकरांत ही बाग निर्माण करण्यास प्रारंभ केला. आताही जगातील वनस्पतिविश्वाचा एक आदर्श नमुना म्हणून या बागेची जागतिक कीर्ती झाली आहे. अमेरिकेत कोलंबसाच्या शोधापासून गेली ४ शे वर्षे युरोपातील सर्व राष्ट्रांतील प्रजा सारख्या वसतीकरिता येत आहेत. अलीकडे शंभर वर्षांत तर जगातील सर्व खंडांतील प्रजा या देशात कायम वसती करून राहू लागल्या आहेत. त्यामुळे गेल्या ४ शे वर्षांच्या अवधीत येणारे लोक आपल्या देशातील वृक्ष-वनस्पती, धान्ये व फळे, पशुपक्षी, हत्यारे-अवजारे, विद्याकला, इत्यादी निसर्गनिर्मित व मानवनिर्मित पदार्थही आणून त्यांची

परंपरा राखण्याचा प्रयत्न करीत आहेत. जगात इतरत्र जे जे दिसेल व येथे आणता येईल ते ते सर्व येथे आणावयाचे व कायम ठेवायचे असा ध्यासच उत्तर अमेरिकेतील लोकांना लागलेला आहे. त्याचेच प्रत्यंतर लाँगवुड गार्डन्स मध्ये मिळते. सर्व प्रकारच्या हवामानातील वा वायुजलभूमीतील वृक्षवेली वनस्पती मुळासह वा बीजरूपाने वा कलमे करून या बागेत रोवून वाढविण्याचे सहस्र प्रयत्न या बागेत शतकभर चालू आहेत. सहस्रावधी पुष्पजाती, विशेषतः भारतातील पुष्पजाती पाहून सौ. सती या बागेत रमत, बोलत, सांगत तीन तास, विश्रांती न घेता, न बसता हिंडत होती. सौ. इंदूही तशीच. जगाच्या सर्व खंडांतील कमळांच्या कळ्या व विकसित पुष्पे पाहून आम्ही सर्व जण विस्मित झालो. उष्ण कटिबंधीय किंवा हिमवृष्टी न सोसणाऱ्या वृक्षवनस्पतींकरिता बेताची समशीतोष्ण विस्तृत १०-११ दालने दिसली. नारळी, पोफळी, फणस, पपया, कोकम, आंबा, शेवगा इत्यादी झाडे पाहून, घरचीच माणसे भेटावी, असे सर्वांना वाटले. पुढे गेलो. लहान मोठ्या कारंजांच्या विचित्र आकारांच्या रांगा फवारत होत्या. निरनिराळ्या वेलांच्या सुरेख कुटींमध्ये थोडा थोडा वेळ थांबावेसे वाटले. जुने तसेच राखलेले, गगनचुंबी वृक्ष व त्यांना वेढून शिखरापर्यंत पोचलेले वेल उंच माना करून अवलोकिले. गुडघ्याइतक्या छोट्या फुलांच्या झाडांचे लांब-रुंद पसरलेले गालिचे न्याहाळले. ३-४ तास निघून गेले. फारच थोडे पाहिले आणि पुष्कळ राहिले असे वाटले. एक आठवडाभर मुक्काम केल्याशिवाय सर्व नीट पाहता येणार नाही असे वाटले.

संध्याकाळ मोठी, अंधार पडेल अशी काळजी न करता आम्ही या सुंदर भव्य उद्यानातून बाहेर पडलो, रात्री घरी पोचलो.

(पुढे चालू)

(नवभारत, जानेवारी - फेब्रुवारी, १९७८ पृ.४० ते ४७)

○○○

९२

आमची अमेरिकेची यात्रा - ४

(दैनंदिनी)

१४ जुलै १९७७:- आज मुक्काम चि. सौ. मालतीकडे पुकिप्सी उपनगर फिशकिल येथे आहे. चि. डॉ. अशोक जोशी माझा पुतण्या बॉस्टन (बर्लिंग्टन) हून स्वतःच्या मोटारीने आम्हा सर्वांना बॉस्टनला नेण्याकरिता आला. तो बॉस्टन येथील सर्व प्रकारच्या विजेऱ्यां (बॅटऱ्या)ना लागणारे विविध प्रकारचे आतले भाग सेल्स बनविणाऱ्या जगातल्या सर्वांत मोठ्या मॅलरी कंपनीच्या कारखान्यात तंत्रज्ञ म्हणून गेली तीन वर्षे काम करीत आहे. त्याचा डॉक्टरेटचा निबंध नॉटोच्या तंत्रज्ञांना पसंत पडला, म्हणून या कारखान्याच्या कंपनीने खूप खटपट करून कायम विसा, या देशी राहण्याचा परवाना मिळवून दिला. अलीकडे भारतासारख्या श्यामवर्णी वा कृष्णवर्णी देशातील नागरिकांना येथे राहण्याचा परवाना मिळविणे कठिण झाले आहे. अधिक बंधने शासकीय कामगार संघटनेने लादली आहेत. बॉस्टन मी पूर्वी १९६४ साली पाहिले होते. परंतु पुनः पाहण्याचे ठरविले. हे अमेरिकेच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे.

एक-दोन आठवडे उशिरा बॉस्टनला जाण्याचा बेत ठरविला होता. परंतु महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील व भारताचे प्रधानमंत्री श्री. मोरारजी देसाई यांचा निरोप तारेने आला की, मराठी विश्वकोश (पहिले ५ खंड) प्रकाशनाची ता. २४ जुलै ठरली आहे. श्री. राम कोल्हटकर माझे स्वीय सहायक यांचाही टेलिफोन दोनदा आला. पहिल्यांदा आला तो चि. मुरलीधरपंतांनी घेतला. त्यात पाहिजे तो खुलासा मला नीट कळला नाही. दुसऱ्यांदा आलेला टेलिफोन मीच रात्री २॥ च्या सुमारास घेतला. २० प्रयाणाची तारीख ठरली. आणखी अधिक तीन आठवडे येथे राहणार होतो. ठरलेला सर्व कार्यक्रम आता आटोपता घ्यावा लागला. बॉस्टनला त्वरित जाण्याचे ठरविले. मुरलीधरपंत, चि. सौ. मालती व मधुकरचा सर्व परिवार असे आम्ही दोन मोठ्या मोटारी काढून अशोकबरोबर बॉस्टनला उद्या ता. १५ जुलैला निघण्याचे ठरविले.

१५ जुलै १९७७ - चि. अशोकची इंपाला व मधूची बडी फोर्ड या दोन्ही मोठ्या मोटारींत आम्ही सर्व जण मावलो. सर्वांनी विमानातल्याप्रमाणे पट्टे आवळले. पट्टे आवळलेच पाहिजेत; असे आम्हांस मधूने सुनावले. मी म्हटले की, आम्ही न चुकता बसल्याबरोबर पट्टे आवळतो, इतके निक्षून दर वेळी पुनःपुनः कशाला सांगतोस? मधू म्हणाला, त्या संबंधी काही विशेष माहिती तुम्हांस माहीत नसल्यास सांगावी, असा या सांगण्यामागचा उद्देश आहे. भारतातल्या मोटारींना पट्टे नसतात याचे कारण, भारतात मोटारी विशेष वेगाने चालविल्या जात नाहीत. भारतातले रस्ते अरुंद, एकतर्फी, एकमुखी गल्ल्या असलेले मार्ग क्वचित. काही महामार्गांनाच मोठ्या शहरांजवळच एकमुखी एकतर्फी गल्ल्या असतात - बहुतेक मार्गामध्ये समोरून येणारी वाहने चुकवून, टक्कर होऊ नये म्हणून, गाड्या जपून, हळू चालवाव्या लागतात, तसे येथे नाही. ताशी ५५ मैलीच वेग ठेवण्याचा नियम असला तरी बहुतेक गाड्या ६० ते ७० मैली वेगाने भरधाव जातात; महामार्गांना देशभर ४-६ गल्ल्या असतातच. त्यामुळे समोरून येणाऱ्या गाड्यांच्या टकरींचे भय नसते. वेग एकदम आवरण्याची पाळी केव्हा येईल याचा नेम नसतो. एखादी गाडी नादुरुस्त झाली, आडवी कोसळली तर गाड्यांच्या मैलोनमैल रांगा लागून वाहतूक बंद पडते. गाडी एकदम थबकली तर बैठकीवर बसलेल्या स्वाऱ्या धक्का बसून उसळतात, हबका बसतो; हातापायांना व डोक्याला मार बसून अपघात होतो. तो टाळण्याकरिता या पक्क्या पट्ट्यांचा उपयोग होतो, शरीराला इजा पोचत नाही. विशेषतः मागच्या स्वाऱ्यांपेक्षा पुढे म्हणजे एंजिनच्या जवळ बसणाऱ्या स्वाऱ्यांच्या अपघातांचे प्रमाण सुमारे तिप्पट असते. समोर बसलेल्या, पट्टे बांधणाऱ्या स्वाऱ्यांच्या अपघातांचे प्रमाण पट्टे न बांधणाऱ्यांपेक्षा फारच कमी म्हणजे सात दशांश इतके कमी असते. हा हिशेब भारतातल्या मंडळींना माहीत नसतो. म्हणून मी ही माहिती सांगण्याकरिता मुद्दाम इशारा प्रत्येक वेळी देतो.

सुमारे दीडशे मैल अंतरावर बॉस्टनपर्यंत गप्पागोष्टी करत सहा तासांत पोचलो. मध्ये दोनदा उतरलो. रस्त्याच्या बाजूला असलेल्या सुरेख उपाहारगृहांमध्ये चहा, कॉफी व इतर पदार्थांचे सेवन केले. वनविहार केला.

बर्लिंग्टनला (बॉस्टन) दुपारी एक वाजता पोचलो. येथे अशोकचे बिऱ्हाड एका उपवनात आहे. सौ. चि. सुरेखाने स्वयंपाक तयार ठेवला होता. राधा व सोपान बाहेरच्या हिरवळीवर खेळत होते. राधा व सोपान ही बालके अशोकला पाहिल्याबरोबर पपा! म्हणून, धावत व हसत येऊन चिकटली; पापा घेतला. अशोकने दारावरची बेल दाबली, सुरेखाने दार उघडले. सुरेख गालिच्यावरील सोफा व खुर्च्यांवर टेकलो. नंतर थोड्या वेळात अमेरिकन भारतीय साग्रसंगीत भोजन झाले.

दुपारनंतरचा सगळा दिवस विश्रांती व चर्चा यांमध्ये गेला. हार्वर्ड विद्यापीठ बॉस्टनला लागून आहे. मला तेथील संस्कृतचे प्रधान प्राध्यापक डॉ. एंगॉल्सना भेटण्याची इच्छा होती.

ते नव्यन्यायाचे प्रख्यात पश्चिमी पंडित व त्यांचे शिष्य डॉ. मतिलाल नव्यन्यायाचे बंगाली पंडित; या दोघांना मी १९६४ च्या अमेरिकेच्या भेटीत भेटलो होतो. डॉ. एंगॉल्सची भेट तत्पूर्वी भारतात ते असताना पुणे येथे भांडारकर ओरिएंटल इन्स्टिट्यूटमध्ये झाली होती; ही भेट डॉ. दांडेकरांनी नव्यन्यायाच्या चर्चेकरिता घडवून आणली होती. चर्चेत मतभेदही झाले ते केव्हाच मिटले नाहीत. परंतु त्याचा आम्हा दोघांना चांगलाच फायदा झाला. १९६४ साली न्यूयॉर्क येथे अमेरिकन ओरिएंटल सोसायटीची वार्षिक बैठक होती. या बैठकीत डॉ. मतिलालनी 'अवच्छेदकत्वाचे ६ अर्थ' हा निबंध वाचला होता; त्याचप्रमाणे पेन्सिल्वानिया विद्यापीठाचे डॉ. नॉर्मन क्राऊन यांनी ऋग्वेदाच्या नासदीय सूक्तावर निबंध वाचला होता. मी या दोन्ही निबंधांवर माझे मत व मतभेद या बैठकीत मांडले होते. ही सर्व आठवण मला या वेळी झाली. या वेळी चौकशी केली तेव्हा कळले की, डॉ. एंगॉल्स आता उद्योगधंद्यात गर्क झाले आहेत; त्यांनी २५ लाख डॉलर धंद्यात गुंतवले आहेत; खूप श्रीमंत झाले आहेत. डॉ. मतिलाल यांना इंग्लंडच्या ऑक्सफोर्ड विद्यापीठात भारतीय तत्त्वज्ञानाच्या स्पॅल्डिंग आसनावर मुख्य प्राध्यापक म्हणून नेमले आहे. याच जागी माजी राष्ट्रपती कै. प्रा. राधाकृष्णन यांची नेमणूक झाली होती, हे ऐकून मला आनंद झाला. परंतु डॉ. एंगॉल्ससारखे संस्कृत संशोधक संशोधनाबाहेरच्या लक्ष्मीपतिपदाकडे आकर्षित झाले, हे ऐकून किंचित खिन्नताही मनाला स्पर्शून गेली. भगवान विष्णूचे 'मोहिनी' हे स्वरूप पुराणे वर्णितात; लक्ष्मी हेच भगवंताचे खरेखुरे 'मोहिनी' हे स्वरूप होय! हे चटकन मनात आले व मन शांत झाले. हेच मोहिनीरूप मोठमोठ्या बलाढ्य असुरांना, त्यागी स्वातंत्र्यवीरांना किंबहुना साधुसंत योग्यांना भुलविते, तेथे आमच्यासारख्या पामरांचा काय पाड!

डॉ. एंगॉल्सना भेटण्याच्या पाठीमागे त्यांच्याशी एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा करावी हा एकच उद्देश होता. त्यांनी १९६४ साली हार्वर्ड विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात वाचलेल्या लेखाची छापील प्रत मला दिली होती. त्यात त्यांनी अत्यंत महत्त्वाचा पण त्या वेळी अगदी न पटणारा मुद्दा असा मांडला होता की, "आशियातील भारतासारख्या देशात आज संसदीय लोकशाही स्थापित झालेली दिसत असली तरी ती फार काळ टिकणार नाही. सबंध आशियातच राजकीय लोकशाहीस अनुकूल सांस्कृतिक परंपरा नाही. हजारो वर्षांच्या इतिहासात केवळ वंशपरंपरागत राजसिंहासनावरील निष्ठा हीच जनतेच्या असंज्ञ मनात खोल रुजली आहे. कोणी वंशपरंपरागत राजवट निर्माण केली तर जनतेच्या मनोभूमीशी ती अधिक संवादी ठरेल." मी एंगॉल्सना भेटलो तेव्हा त्यांचा हा भविष्यवाद मला पटला नव्हता, परंतु आता पटू लागला आहे. ''इंदिरा गांधींना पहिल्या झटक्यात एकदम लोकप्रियता व प्रचंड पाठिंबा लाभला; डावे-उजवे लोकशाहीवादी, समाजवादी तरुणतुर्क, भारतीय कम्युनिस्ट, भांडवलदार इ. झाडून सगळे प्रधानमंत्रिपदावर इंदिराजी चढल्याबरोबर डोक्यावर उचलून धरू लागले. आणीबाणी व अधिकारशाहीकडे नेणारी ४२ वी दुरुस्ती हे त्याचेच पर्यवसान

होय. कै. पं. जवाहरलाल नेहरूंना या खोल भारतीय राजनिष्ठेच्या संस्काराचा मनोमनी नीट अंदाज आला असावा. म्हणून इंदिराजींना त्यांनी महत्त्वाची अधिकारपदे, वरिष्ठ सहकाऱ्यांचा विरोध लक्षात असतानाही तो न जुमानता, बहाल करण्याचा सपाटा लावला.'' हे सर्व मी एंगॉल्ससशी बोलणार होतो व याबद्दल बधाई देणार होतो.

छोटया ५ वर्षांच्या राधेची, ती समोर दिसेना म्हणून मी चौकशी केली. २ वर्षांचा सोपान तेथेच आमच्याभोवती लक्ष्मी व शीला यांच्या जवळ हसत खेळत उड्या मारत होता. त्याला मी 'राधा कोठे आहे' हे इंग्रजीत विचारले. त्याने 'कोणास ठाऊक!' असे नाजूक हातवारे करून उत्तर दिले. सुरेखाने राधेला तिच्या मैत्रिणीकडून शोधून आणले आणि हात धरून जबरदस्तीने आणून आमच्यापुढे उभे केले; आणि सुरेखा म्हणाली, ''ही पोर अशीच एकदा या भोवतालच्या बंगल्यांच्या ओळीने लागलेल्या रांगांमध्ये आम्हास सापडेनाशी झाली. जवळच्या रांगेतील बंगले सोडून पाठीमागच्या बंगल्यांच्या ओळीत कधीच जात नाही म्हणून या ओळीतील बंगले झाडून शोधले; पण सापडली नाही. आम्ही दोघे चिंतेत पडलो. पोलिसांना फोन केला. चार पोलीस एक कुत्रा घेऊन आले. त्या कुत्र्याला पोलिसांनी राधेच्या कपड्यांचा वास दिला. त्या कुत्र्याने दोनतीन वेळा हुंगले व लगेच निसटला. मागच्या एका रांगेतील बंगल्यात शिरला. त्याच्या पाठीमागे एक पोलीस गेला. १५ मिनिटांत कुत्र्याने राधेचा सुगावा काढला. शिपायाने कडेवर घेऊन राधेला आमच्यापुढे उभे केले! असली ही भटकणारी पोरगी आहे.''

१६ जुलै १९७७- सकाळ पासून संध्याकाळपर्यंत पाहता येईल तितकी बॉस्टनची सुंदर व भव्य स्थळे पाहात हिंडलो. दोन विशेष स्थळे ध्यानात कायम राहतील अशी पाहिली. ती म्हणजे स्थलजल संचारी माशांचे क्रीडासरोवर व समुद्रातील जिवंत प्राण्यांचा सहा मजली विहारमहाल. हा एक एक उभय संचारी मासा ३ शे ते ६ शे किलो वजनाचा. या माशांच्या खेळाचे मोठे प्रेक्षागार येथे आहे. त्यात प्रत्येक वेळी हजार प्रेक्षक दोन्ही बाजूला बसतील अशा शिड्यांची उतरण्ड आहे व मध्ये या माशांच्या क्रीडेच्या तळयाजवळ त्यांना खेळविणाऱ्या मदाऱ्यांना उभे राहण्याकरिता तक्ते. एक मदारी पुढे येतो, इशारा देतो, जवळच्या विहारजलाशयातून खळबळ ऐकू येते; दोन मासे या छोट्या तळयात शिरतात. मदाऱ्याने दिलेल्या निरनिराळ्या इशाऱ्यांबरहुकूम अंतरिक्षात सरळ उंच उड्या, १० ते १५ हात उंचावर धरलेले भक्ष्य पकडण्याकरिता घेतलेल्या बिनचूक उड्या, कोलांट्या उड्या, पाण्यातल्या सुरकांड्या व डुबक्या, एकमेकांचा पाठलाग इत्यादी क्रीडाप्रकार पाहिले. हे स्थलजलचर चांगले शिकतात. मनुष्येतर अनेक प्राणी चांगले शिकतात, हे आपणास सर्कशींच्या जगभर चाललेल्या, भरभराटीस आलेल्या धंद्यावरून लक्षात येते. मानवाबाहेरच्या जाणिवेच्या क्षेत्राचा विशाल विविध विस्तार व स्तर ध्यानात भरतात. प्राणी व वनस्पती सृष्टीतील प्रत्येक व्यक्तीत चैतन्य भरून राहिलेले प्रत्ययास येते. त्या बाहेरच्या तथाकथित अजीव सृष्टीत,

समष्टीत चैतन्याचा विलक्षण भास होतो.

सर्व जण तिसऱ्या प्रहरी ३ वाजता सागरसंचारी जिवंत प्राण्यांच्या सहा मजली गोल महालात शिरलो. रंगीबेरंगी छोट्या भिन्न भिन्न आकारांच्या प्राण्यांचे थवे काचेच्या मोठमोठ्या लोखंडी कपाटांत खालीवर येथे संथ विहार करीत आहेत. ही कपाटे कडेच्या भिंतीत बसवलेली आहेत. मधल्या गोल गोल तळ्यांमध्ये मध्यम आकाराचे शेकडो जातीचे मासे व निरनिराळ्या प्रकारचे कासव. खालीवर संचार करीत आहेत. येथे आमचा परिवार ही रमणीय दृश्ये पहात, फलकांवरची माहिती वाचत पांगला होता. लक्ष्मी व छोटी शीला कोणत्या मजल्यावर आहे हेही पाहण्यास आम्ही विसरलो. लक्ष्मी व शीला येथे अनेक वेळा ही दृश्ये पाहून गेल्या तरी त्या येथे ही दृश्ये पुनः पाहण्यात आमची संगत सोडून हिंडत होत्या. संध्याकाळ झाली तेव्हा आम्ही या मुलींना शोधू लागलो. सौ. इंदू म्हणाली, काळजी करू नका; त्या आता लवकर भेटतील. आम्ही सहाव्या मजल्यावरून खाली उतरत असता या मुली चौथ्या मजल्यावर दिसल्या. त्या त्वरित परतण्यास नाखूश होत्या. मी म्हटले, तुम्ही पुनः येथे या; पण आता आमच्याबरोबर परता. आम्ही ७ वाजता संध्याकाळी घरी परतलो.

१७-२० जुलै १९७७ :- मला २० जुलैला संध्याकाळच्या विमानाने भारताकडे परत फिरायचे होते. म्हणून आणखी दुसरीकडे जाण्याचा बेत रहित केला. फिशकिल न्यूयॉर्क विमानपत्तनाला जवळचे, म्हणून फिशकिलला मालतीच्या घरीच येऊन राहिलो.

१९ जुलैला चि. अशोक सर्व परिवारासह मला निरोप देण्यास आला. दोन्ही कुटुंबांतली मंडळी एकत्र जमली. चि. मधूने व अशोकने निरनिराळ्या प्रश्नांवर माझ्याशी चर्चा केली. मधू भगवद्गीतेवर येथील भारतीय समाजात भाषणे करतो. त्याने मला प्रश्न विचारला- ''अबा, भगवद्गीतेतील एक श्लोक मला खूप खटकतो. तो म्हणजे 'कर्मण्येवाधिकारस्ते' हा श्लोक, ही किती रूक्ष आज्ञा आहे. त्यात मनाला बोध देऊन समजावून पटवून देण्याचे मार्दव नाही. लोकमान्य टिळकांनी तर हा श्लोक गीतेचे सार म्हणून गौरविलेला आहे.'' मी त्वरित क्षणभरही न थांबता सांगितले की, ''रणांगणावर हुकूमाची भाषा असते. तेथे युक्तिवाद व खुलविणारे विवरण करणे यास वेळ नसतो, एवढेच नव्हे; तर तेथे केवळ जबरदस्त जोमदार इशारा देणारा हुकूमच आवश्यक व युक्तिसंगत ठरतो. इस्लामचा धर्मग्रंथ असाच आहे. आक्रमक लष्करी धर्मसंघटनांचे ते आदेश असतात. लोकमान्य टिळक हे स्वातंत्र्यसंग्रामाला प्रवृत्त करणारे ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातले पहिले महापुरुष होत. त्यांना हा श्लोक सारभूत वाटला, याचे कारण त्यांचा आक्रमक बाणा होय. त्यांचे मन लढाऊ वृत्तीने भरलेले व भारलेले होते.'' इंदू आमचा हा संवाद खूप लक्ष देऊन ऐकत होती. माझे हे समर्थन तिला एकदम पटले व तिने संमतीदर्शक मान चटकन हलविली.

या चर्चेच्या वेळी अशोकने दुसराच मुद्दा उपस्थित केला. अशोक म्हणाला, ''आबा, तुम्हाला मी येथे कितीतरी वेळा सकाळ, दुपार, संध्याकाळ, त्रिकाळ पाहतो. तुम्ही आता

७७ वर्षांचे; पण केव्हाच थकलेले दिसले नाहीत, विश्रांती घ्यावीशी तुम्हांस वाटत नाही, प्रवासात आम्हा तरुणांच्या बरोबरीने चालता, कामे करता, याचे रहस्य सांगाल काय?'' 'रहस्य असे काही नाही,' मी म्हटले. 'अशोक, अशा प्रश्नाचे उत्तर नेमके सांगता येत नसते. तुम्ही मला तुमच्या बालवयापासून पाहात आहा. तुम्ही विचार केलात तर काहीसे उत्तर तुम्हांस सापडेल. एक गोष्ट अशी की, माझ्या वडिलांनी म्हणजे तुझ्या आजोबांनी माझे पालनपोषण अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने केले, हे याचे एक कारण असू शकेल. घरची अगदी मध्यम स्थिती, हलाखीची नव्हे. घरात गाईचे दूधदुभते भरपूर व कायम होते. तेव्हा घरी चहा होत नव्हता. हातकांडीचे तांदूळ व हातदळणाचे पीठ, सगळे पेय भक्ष्य आस्वाद्य अन्नपदार्थ. यंत्रस्पर्शावाचूनचे ताजे होते. बंद बाटल्यातले पदार्थ आम्होस माहीत नव्हते. दुसरे असे की, ९ व्या वर्षी वेदाध्ययनास प्रारंभ होण्यापूर्वी दिवसभर सवंगड्यांबरोबर आमच्या खेड्यातील उघड्या मैदानात, प्राथमिक शाळेतील वर्गाची वेळ सोडून, खेळत होतो. मौजी बंधन झाल्यावर ४-५ तास वेदपठण चाले. तो एक चांगला व्यायाम असतो. सूर्य नमस्कार, आसने व प्राणायाम या गोष्टी वडिलांनी शिकविल्या व माझ्या हातून या बाबतीत चुकारपणा होणार नाही, याबद्दल दक्ष राहिले. १४ व्या वर्षी वाईस प्राज्ञ पाठशाळेत येऊन दाखल झालो. या पाठशाळेच्या कार्यक्रमात सूर्यनमस्कार, आसने, आखाडा व इतर मैदानी खेळ अंतर्भूत होते. मैदानी खेळात व आखाड्यात माझा क्रमांक, पोहण्याचा कार्यक्रम सोडल्यास, खूप खालचा असे. मलखांब आला नाही वा कुस्ती जमली नाही. परंतु पोहण्यात कृष्णेच्या पुरात पोहणाऱ्या मी मी म्हणणाऱ्या वाईकरांस एक-दोनदा मी चकित केले. कृष्णेच्या पुरात (पहिले लहान पूर येऊन गेल्यानंतर) ५ मैलांवरच्या धोमच्या डोहात उडी घालून दोनदा अथकपणे पोहत आलो. यात श्रम कमी परंतु धाडस फार लागते. वाईस आल्यापासून ५-६ मैल माझे फिरणे मधूनमधून असतेच. मानसिकदृष्ट्या महत्त्वाचा मुद्दा असा की, माझ्या वडिलांनी रामविजय, हरिविजय, भक्तलीलामृत, महाभारत, रामायणाची भाषांतरे व इतर धार्मिक साहित्याची गोडी लावली. ती वाईस आल्यावर वाढली. नंतर संस्कृतमधील शास्त्रीय ग्रंथांचे अध्ययन व पठण केले. त्याची रुची आतापर्यंत टिकली. त्यामुळे मन निरोगी राहिले. योगाभ्यास अजून चालू आहे.

अशोक पुढे म्हणाला, 'मला योग शिकवाल - काय?' 'जरूर शिकवीन;' मी उत्तर दिले. यावर मधूने विचारले की, तुमच्या योगासनांचे फोटो आज घेऊ का? त्याने चलत् कॅमेरा लावून माझ्या आसनांचे फोटो घेतले; परंतु मुरलीधरपंत म्हणाले की, मधूला कॅमेरा पद्धतशीर रीतीने लावता आला की नाही ही शंका आहे.

२० जुलै १९७७ - आज अमेरिकेहून निघायचे म्हणून सौ. चि. मालती व सासुसुनांनी चारी ठाव उत्तम स्वयंपाक केला. जेवण झाले. संध्याकाळी केनेडी विमानपत्तनावर आलो. सामान माहीत असलेल्या ठरावीक वजनापेक्षा अधिक होते. परंतु ते विमान कारकुनांनी

आक्षेप न घेता रुजू केले.

सर्वच परिवार माझ्यापेक्षा लहान वयाचा. सर्वांनी पाया पडून नमस्कार केला. फोटोचा कार्यक्रम झाला. माझ्या छोट्या नाती चि. लक्ष्मी व शीला यांना मी आंगाशी पट्ट धरले; फोटो झाले. माझी पत्नी सौ. सती इतक्यात माझ्याबरोबर येणार नसल्यामुळे तिने स्मित करून निरोप दिला. त्या वेळी इंदू व मालती यांच्यापाशी लक्ष्मीने आजी (सती) बद्दल हळूच तक्रार केली की आजी किती कठोर आहे; आजोबांचे चुंबन घेतले नाही! मालती डोळे वटारून हळूच लक्ष्मीला म्हणाली, की मूर्ख मुली, निरोपाच्या वेळी चार चौघांदेखत नवऱ्याचे चुंबन घेण्याची प्रथा पश्चिमी आहे. भारतात असे केले तर लोक हसतील; छचोर म्हणतील.

मी सर्वांचा निरोप घेऊन ओळखीच्या अनेक भारतीय यात्रेकरूंसह विमानपत्तनाच्या प्रतीक्षागारात प्रवेश केला. हे भारतीय विमान १ तास उशिरा सुटले. २४ तासांनी तारीख २२ ला दिल्लीमार्गे मुंबईच्या विमानतळावर सकाळी आलो. विमानपत्तनाच्या सामानतपासणी कार्यालयातून दीड तासाने बाहेर आलो. अमेरिकेस जाताना निरोप ज्यांनी दिला, तीच बहुतेक मंडळी येथे स्वागतास उपस्थित होती. त्यांच्यात पोपट देशपांडे, रंगोपंत कुलकर्णी, सौ. चि. सुमन, चि. चंद्रशेखरपंत व चि. अशोक खंडकर हे होतेच.

(समाप्त)

(नवभारत, एप्रिल, १९७८ पृ. १ ते ५)

ooo

फ)

भाषांतरित लेख

९३

नवमानवतावादाची बावीस सूत्रे

- मानवेंद्रनाथ रॉय

रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीने गेल्या वार्षिक अधिवेशनात पुढील नवमानवतावादाच्या विचारसरणीचा अधिकृत स्वीकार केलेला आहे. रॅडिकल पार्टीने या पूर्वी हिंदी स्वराज्याच्या राज्यघटनेचा आराखडा जनतेपुढे मांडला आहे. त्याच्या मुळाशी असलेले तत्त्वज्ञान पुढील मसुद्यात सूत्ररूपाने सांगितले आहे. रशियातील समाजवादी किंवा कम्युनिस्ट राज्यसंस्थेचा प्रयोग आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीची गेल्या शंभर वर्षांतील जागतिक आंदोलने यांचा ऐतिहासिक निष्कर्ष ध्यानात घेऊन या विचारसूत्रांची निष्पत्ती केली आहे. या पक्षाचे प्रस्थापक श्री. एम. एन. रॉय यांनी या विचारसूत्रांची मांडणी आपल्या मित्रांच्या सहकार्याने केली आहे. आशिया खंडातील व युरोपातील मार्क्सवाद्यांत त्यांचे उच्चस्थान अढळ आहे. त्यांनी मार्क्सवादाची समीक्षा करून त्यातील दुर्बल स्थाने व हेत्वाभास विचारांत घेतले आहेत. मार्क्सवादाच्या मूळ प्रमेयांशी विसंगत अशी धार्मिक श्रद्धा मार्क्सवादाचा आधार बनल्यामुळे कम्युनिझमच्या जागतिक प्रमेयांत मानवी स्वातंत्र्यास धोका उत्पन्न करणारी विकृती उत्पन्न झाली आहे. ती टाळण्याकरता मार्क्सच्या मार्गाने मार्क्सच्या पुढे गेले पाहिजे, ही गोष्ट एम. एन. रॉय सूचित करीत आहेत. कम्युनिझमप्रमाणेच पाश्चात्त्य समाजातील प्रतिनिधिप्रधान लोकसत्ताक राज्यसंस्थेतही अवनतीची बीजे वाढीस लागून हुकूमशाही प्रवृत्ती बळावल्या आणि समाजाच्या सांस्कृतिक प्रलयास कारणीभूत झगडे निर्माण झाले. त्यामुळे मानवी समाज दुर्धर व अनुल्लंघनीय अशा संकटांच्या चक्रात सापडला आहे. त्याचीही मीमांसा करून प्रतिनिधिप्रधान लोकसत्तेचा दोष कसा निरसावा याचेही मार्गदर्शन रॉय यांनी या विचारसूत्रांत केले आहे. गेल्या पंचवीस वर्षांत, विशेषतः दुसऱ्या महायुद्धाच्या वातावरणात जे नवविचारांचे प्रवाह राजकीय तत्त्ववेत्त्यांचे निर्माण झाले आहेत, त्यांचाही पूर्ण पडसाद या नवमानवतावादात उमटला आहे. किंबहुना, त्याचाच हा निर्भयपणे व मोकळ्या वृत्तीने काढलेला निष्कर्ष आहे. मानवी स्वातंत्र्य हे सगळ्या मानवी प्रयत्नांचे

सार असले पाहिजे, आणि याच ध्येयानुसार मानवी संस्थांची व समाजाची रचना करणे हे ज्या राजकारणाचे ध्येय असेल तेच राजकारण मानवी अस्तित्वाचा आधार आहे, असे या प्रबंधाचे रहस्य आहे.

१) मानव हाच समाजसंस्थेचा मूळ आदर्श आहे किंवा मूळ मूस अथवा प्रथम प्रतीक आहे. सामाजिक सहकार्याचे संबंध, व्यक्तीच्या प्रसुप्त शक्तीचा विकास करतात हे खरे, परंतु, व्यक्तिविकास हाच समाजप्रगतीचा खरा मापक असतो. 'समुदाय, समुदाय' असे म्हणावयाचे तर त्याच्या आधी व्यक्ती असल्या पाहिजेत. सामाजिक विवेचन व प्रगती ही साधताना जर स्वातंत्र्य आणि स्वास्थ्य यांचा अनुभव व्यक्तीव्यक्तीला मिळत नसेल तर विमोचन व प्रगती ही अभासमयच आहेत. ती कधीच साध्य व्हावयाची नाहीत. ज्याला स्वास्थ्य म्हणतात ते जर खरे खरे असेल तर ते व्यक्तीला भोगता आले पाहिजे. मानवसमाजाच्या राष्ट्र, वर्ग अशा कोणत्याही सामुदायिक संघटनेला आत्मा असतो हे म्हणणे अयोग्य आहे. कारण या तत्त्वाच्या पोटी व्यक्तीच्या बलिदानाचे तत्त्व गर्भित आहे. व्यक्तीच्या हिताच्या साधनेतच सामुदायिक हिताची निष्पत्ती होत असते.

२) स्वातंत्र्याची अन्वेषणा आणि सत्याचा शोध ही मानवी प्रगतीची पायाभूत प्रेरक प्रमेये होत. स्वातंत्र्याची अन्वेषणा ही काय आहे? तर बुद्धी व भावना; आणि जगावे म्हणून शरीरपिंडाची चाललेली झटापट यांचे उंचावरून चालू असलेले ते एकरूप होय. आणि सत्याचा शोध हे काय आहे? तर यातूनच निघणारे ते एक प्रमेय आहे. निसर्गाचे ज्ञान ज्या मानाने वाढते त्या मानाने मनुष्य निसर्गाच्या जुलमांतून आणि भौतिक व सामाजिक बंधनांतून क्रमाक्रमाने मुक्त होत जातो, सत्य हाच ज्ञानाचा गाभा होय.

३) व्यक्तिगत किंवा सामुदायिक अशा तर्कशुद्ध मानवी प्रयत्नांचा हेतू हाच असतो की स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावे व ते दिवसे दिवस वाढवीत न्यावे. व्यक्तीच्या ठायी वसत असणाऱ्या शक्तीच्या विकासावरील बंधनांचा सतत वाढत जाणारा निरास म्हणजेच स्वातंत्र्य होय. व्यक्ती म्हणजे मानवी प्राणी आहेत हे ओळखले पाहिजे. तू काही सामाजिक संस्थेच्या महायंत्रातील खिळे किंवा ठोकळे नव्हेत. म्हणूनच व्यक्तीचे समाजातील स्थान हे, कोणत्याही प्रकारच्या सामाजिक संस्थेच्या आणि सामुदायिक प्रयत्नांच्या प्रगतीचे व स्वातंत्र्य प्रवणतेचे सत्यस्वरूप मोजण्याचे साधन होय. समाजघटकांच्या प्रत्यक्ष हितावरूनच कोणत्याही सामुदायिक प्रयत्नाचे यश मोजले पाहिजे.

४) मनुष्य स्वभावतःच बुद्धिवादी आहे. कारण नियमबद्ध निसर्गाच्या कुशीतूनच तो अवतरला आहे. बुद्धी हाही पिंडधर्मच असल्यामुळे माणसाची इच्छाशक्ती या पिंडधर्माशी मुळीच विरोधी नाही. बुद्धी आणि भावना यांचा उद्गम एकाच समान जिवाच्या अवस्थेतून झाला आहे, असे जीवशास्त्रदृष्ट्या म्हणता येते. म्हणून ऐतिहासिक नियतिवादाचा इच्छास्वातंत्र्याच्या सिद्धांताशी विरोध नाही; तो त्याच्यातच अंतर्भूत होऊ शकतो. एवढेच नव्हे तर मानवी इच्छाशक्ती हा इतिहासाचा एक अत्यंत प्रभावी आणि निर्णायक भाग आहे.

तसे नसते तर नियमबद्ध अशा इतिहासक्रमात मनुष्यनिर्मित क्रांत्यांना स्थानच रहाणार नाही. इतिहासाचा क्रम परमेश्वरी संकेतानेच पूर्वनिश्चित झालेला असतो या धार्मिक सिद्धांताशी बुद्धिवादी व शास्त्रशुद्ध अशा नियतिवादाची गल्लत करता कामा नये.

५) इतिहासाची आर्थिक उपपत्ती भौतिकवादाच्या (materialism) चुकीच्या अर्थावर आधारलेली आहे. भौतिकवाद हे अद्वैती तत्त्वज्ञान आहे आणि वरील उपपत्तीत तर द्वैतवाद सूचित होतो. (मार्क्सवाद हा भौतिकवादी आहे. परंतु तो आर्थिक उपपत्तीला वरिष्ठत्व देतो. ही विसंगती आहे. कारण भौतिक वादाप्रमाणे मन व बुद्धीसुद्धा भौतिकच होत. इतिहासाच्या क्रमात त्याची ही परिणामकारकता मानलीच पाहिजे. केवळ आर्थिक परिस्थितीच परिणामकारक मानल्यास मन व बुद्धी या वस्तू भौतिक शक्तीपेक्षा भिन्न आहेत असे मानल्यासारखे होते. म्हणजे भौतिक शक्ती व आत्मशक्ती असे दोन भाग किंवा तत्त्वे मानावी लागतात, व त्यामुळे भौतिकवादाचे खंडनच होते आणि द्वैत मानावे लागते, मार्क्सचा भौतिकवाद अद्वैती असल्यामुळे त्याच्या विचारसरणीतील इतिहास शास्त्रावर हा दोष येतो- जोशी.) इतिहासाचा क्रम कार्यकारणांच्या नियमांनी बद्ध आहे. परंतु तो अनेकविध कारणांनी घडत असतो. या कारणांमध्ये मानवी इच्छाशक्ती हा एक महत्त्वाचा भाग आहे. आणि आर्थिक हेतूंशी तिचा साक्षात संबंध नेहमीच जोडता येत नाही.

६) शरीरइंद्रियसंस्थेत परिस्थितीच्या जाणिवेतून कल्पनांची निर्मिती होत असते. परंतु एकदा कल्पना अथवा विचार निर्माण झाले म्हणजे ते पृथकपणे राहतात; आणि त्यांचा व्यापार त्यांच्या स्वतंत्र नियमांनीच चालतो. विचारांचा विकास क्रम सामाजिक विकासक्रमाबरोबरच पावले टाकतो; आणि त्यांचा परस्परांवर परिणाम घडत असतो. परंतु ऐतिहासिक घटिते आणि विचारांचे आंदोलन यांचा प्रत्यक्ष कार्यकारणभाव, मानवाच्या सकल विकासक्रमाच्या कोणत्याही विशिष्ट बिंदूवर किंवा पेऱ्यावर प्रस्थापित करता येत नाही (कल्पना किंवा विचार या शब्दांचा अर्थ तत्त्वज्ञान किंवा विचारसरणी असा येथे गृहीत धरला आहे.) आर्थिक व्यवस्थेच्या प्रस्थापित सांगाड्यावर उभारलेला वैचारिक डोलारा म्हणजेच संस्कृतीचे बनाव आणि नैतिक मूल्ये होत हे खरे नव्हे, संस्कृती व नैतिक मूल्ये यांनाही ऐतिहासिक नियम आहेत. आणि त्यांचा इतिहास विचारांच्या ऐतिहासिक तर्कशास्त्राने बद्ध असतो.

७) समाजाची केवळ आर्थिक पुनर्घटना केली म्हणजे क्रांतीचा उद्देश सफल झाला असे म्हणता येत नाही. स्वातंत्र्याचे नवे निर्माण करण्यासाठी क्रांतीने याच्या पलीकडे गेले पाहिजे. दलित आणि पिळलेल्या वर्गाच्या नावाने राजकीय सत्ता हस्तगत करून उत्पादनांच्या साधनांची खाजगी मालकी नष्ट केली म्हणजे स्वातंत्र्ययुगाचे आगमन आपोआपच होते असे नाही.

८) कम्युनिझम किंवा समाजवाद हे स्वातंत्र्यध्येयसिद्धीचे साधन होऊ शकते अशी कल्पना करावयास हरकत नाही. परंतु त्यामुळे ते कितपत साध्य होते ही गोष्ट मात्र अखेरीस

अनुभवानेच पडताळून पाहिली पाहिजे. राष्ट्र किंवा वर्ग या नावाचा एखादा सामुदायिक स्वरूपाचा अहं श्रेष्ठ मानून हाडामांसाच्या मानव प्राण्याला जर डावलून टाकले तर जी राजकीय कैची आणि जो आर्थिक प्रयोग केल्याने साधते त्या कैचीने किंवा प्रयोगाने स्वातंत्र्य सिद्धीचे सोयस्कर साधन उपलब्ध झाले असे होत नाही. कारण एकतर स्वातंत्र्याच्या नाशातून स्वातंत्र्य निर्माण होते असे म्हणणे मौर्ख्य आहे; आणि दुसरे असे की केवळ 'काल्पनिक अशा सामुदायिक "अहं" देवतेच्या स्थंडिलावर व्यक्तीचा बळी देणे म्हणजे स्वातंत्र्य खास नव्हे. स्वातंत्र्याचे ध्येय ही एक पोकळ तात्त्विक कल्पना आहे असे मानणारे आणि व्यक्तीचे सार्वभौमत्व अमान्य करणारे जे कोणचे सामाजिक तत्त्वज्ञान असेल किंवा सामाजिक पुनर्घटनेची जी कोणची योजना असेल तिच्या अंगी प्रगतीचे किंवा क्रांतीचे बल अत्यंत अल्पच राहणार; याहून तिला जास्त किंमत नाही.

९) राज्यसंस्था म्हणजे समाजाची राजकीय संघटना होय. अर्थात कम्युनिझममध्ये ही राज्यसंस्था क्रमाक्रमाने आपोआप विरून जाते व लोपते हे आदर्श स्वप्न अनुभवांती भंग पावले आहे, मिथ्या ठरले आहे. सामाजिक मालकीच्या उद्योगधंद्यावर अधिष्ठित अशा आर्थिक नियोजनास जबरदस्त राजकीय यंत्राची आवश्यकता असते हे खरे. पण या यंत्रावर लोकसत्तेचेच नियंत्रण पाहिजे. नाहीतर या नव्या समाजव्यवस्थेत स्वातंत्र्याची हमी कोणीही देऊ शकणार नाही. लोकांच्या गरजा भागविण्यासाठीच उत्पादन करण्याचे आर्थिक नियोजन लोकसत्ता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांच्याच पायावर उभे करता येणे शक्य आहे.

१०) धंद्याची मालकी राजसत्तेकडे ठेविली आणि आर्थिक नियोजन अमलात आणिले म्हणजे कामगारांची पिळवणूक आपोआप थांबते किंवा त्यामुळे संपत्तीची समविभागणी होते असे नाही जर आर्थिक लोकशाही चालू नसेल तर ज्याप्रमाणे राजकीय लोकशाही प्रस्थापित व्हावयाची नाही, त्याप्रमाणेच जर राजकीय लोकशाही अमलात नसेल तर आर्थिक लोकशाहीही अमलात यावयाची नाही.

११) एकदा हुकूमशाही प्रस्थापित झाली म्हणजे ती कायमच राहू पाहते. राजकीय हुकूमशाहीच्या छत्राखाली झालेले आर्थिक नियोजन हे कामाचा उरक, सामुदायिक प्रयत्न, आणि सामाजिक प्रगती यांच्या सबबीवर व्यक्तिस्वातंत्र्याची अवहेलना करते. त्याचा परिणाम असा होतो की, आज ज्या समाजाला समाजवादी समाज असे समजतात त्यात उच्च प्रकारची लोकशाही प्रस्थापित होणे अशक्य बनते. हुकूमशाही ही स्वतःच्याच घोषित ध्येयांना स्वतः हरताळ फासते.

१२) प्रतिनिधिप्रधान लोकसत्तेची म्हणजे पार्लमेंटरी डिमॉक्रसीची वैगुण्येदेखील अनुभवांनी उघड झाली आहेत. सत्ता प्रतिनिधींच्याकडे सोपविल्यामुळे ही वैगुण्ये उद्भवतात. लोकसत्ता खरी खरी प्रभावी व परिणामकारक करावयाची तर, सत्ता ही नेहमी निरपवादपणे जनतेच्या हातीच स्थिरावली पाहिजे; व सार्वभौम सत्ता जनतेलाच, अधूनमधून नव्हे तर सतत व दैनंदिन, वापरता यावी यासाठी उपाययोजना झाली पाहिजे. कणाकणाप्रमाणे

एकमेकांपासून विलग असलेल्या नागरिक व्यक्ती बहुधा नेहमीच फलतः निरुपाय होऊन राहिलेल्या असतात. आपले सार्वभौमत्व अमलात आणण्याचे व राज्ययंत्रावर प्रत्यक्ष ताबा चालविण्याचे आवश्यक असे कोणचेच साधन त्यांच्यापाशी नसते.

१३) प्रतिनिधिप्रधान लोकशाहीत उदारमतवादाचे विडंबन होत असते, त्याला नकलीपणा येतो. व्यक्तिगत कारभारात राज्यसंस्थेने हस्तक्षेप करू नये हे उदारमतवादी तत्त्व, माणसांनी चालवलेली माणसांची जी पिळवणूक, तिच्यावर शिक्कामोर्तब करते. अर्थ हा मानवाचा एकमेव पुरुषार्थ आहे ही कल्पना व्यक्तित्ववादाच्या विमोचकतत्त्वाला निष्प्राण करते. अर्थप्रधान मनुष्य एकतर गुलाम तरी असतो किंवा गुलामांचा धनी तरी असतो. ''अर्थ हा एकच पुरुषार्थ'' ही ग्राम्य कल्पना बुडविली पाहिजे, आणि तिच्या जागी पुरुष हा स्वभावतःच बुद्धिवादी आहे ही प्रत्ययास येणारी कल्पना रूढ केली पाहिजे; पुरुष हा बुद्धिवादी असतो म्हणून तर नीतिविचारी असतो. नीती म्हणजे विवेक बुद्धीला आवाहन होय; आणि सद्सद् विवेकबुद्धी म्हणजे सहज प्रेरणेने होणारी परिस्थितीची जाणीव आणि त्या परिस्थितीला अनुसरून होणारी प्रतिक्रिया होय. जाणिवेचा प्रादुर्भाव असला तर विवेक बुद्धीची क्रिया म्हणजे, जिवाच्या ठिकाणी केवळ पिंडतः घडलेले कार्य होय. आणि म्हणूनच विकेकबुद्धी बुद्धिवादास धरून आहे.

१४) प्रतिनिधिप्रधान लोकसत्तेचा विकल्प म्हणजे (Alternative) हुकूमशाही मात्र खास नव्हे. तुटक अतएव दुर्बल अशा आधुनिक समाजपद्धतीतील नागरिक व्यक्तींच्या प्रतिनिधिप्रधान लोकसत्तेच्या स्थानी ही संघटित लोकसत्ता स्थापणे हाच तो विकल्प होय. देशभर गावोगावी स्थापिलेल्या जनसमित्यांचे जाळे विणून सुसंघटित लोकसत्ता अस्तित्वात आणली पाहिजे, व या लोकसत्तेच्या पायावर पिरॅमिडच्या धर्तीवर निमुळता होत जाणारा मनोरा उभारून त्या सुस्थिर मनोऱ्याचे शिखर या दृष्टीने प्रतिनिधिसभा अस्तित्वात आली पाहिजे. अशा रचनेने समाजाची राजकीय संघटना सर्व समाजाशी एकरूप होईल आणि याचाच परिणाम म्हणून राज्यसंस्थेवर लोकसत्तेचे निरंतर नियंत्रण स्थापित होईल.

१५) मानव हाच स्वतःच्या विश्वाचा शिल्पकार आहे, या मूलमूत ऐतिहासिक सत्यावर भर देणे हे क्रांतिकारक व विमोचक सामाजिक तत्त्वज्ञानाचे मुख्य कार्य आहे. मानव हा विचारप्रवण प्राणी आहे व ही विचारप्रवणता, तो व्यक्तित्वसंपन्न राहिला तरच दिसून येईल, मेंदू हे एक उत्पादनाचे साधन असून ते अत्यंत क्रांतिकारक माल निर्माण करते. रूढ कल्पनांचा विध्वंस-विचार अगोदर निर्माण झाल्याखेरीज क्रांत्या होऊच शकत नाहीत. ज्यांना आपल्या सृजनशील आत्मशक्तीचा प्रत्यय आलेला आहे, विश्वाची नवरचना करण्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीने जे प्रेरित झाले आहेत, साहसी विचारांनी जे गतिमान झाले आहेत, आणि स्वतंत्र मानवांचा बनलेला स्वतंत्र समाज निर्माण करण्याच्या ध्येयाच्या ध्यासाने जे चेतले आहेत ते संख्येने सतत वाढत असलेले लोकच, लोकशाही नांदेल अशी परिस्थिती निर्माण करू शकतात.

१६) सामाजिक प्रगतीचे मूलभूत तत्त्व पुनः ठामपणे मांडून त्याच्या पायावरच सामाजिक क्रांतीची पद्धती व कार्यक्रम यांची उभारणी केली पाहिजे. खंबीर आणि व्यापक प्रयत्न करून लोकांना तत्त्व आणि बुद्धिवादी सहकार्यप्रधान राहणी यांचे शिक्षण देणे हाच सामाजिक नवजीवन निर्माण करण्याचा मार्ग आहे. क्रांतीनंतर जी व्यवस्था निर्माण करावयाची तिचा सामाजिक व राजकीय पाया घालण्यासाठी जनतेच्या कार्यक्षम अशा लोकशाही संघटना तयार कराव्या लागतील. नवजीवनाचे रहस्य आत्मसात केलेल्या लोकांच्या संख्येत त्वरेने वाढ करणे आणि जनता-समित्यांचा जलद प्रसार करणे, तसेच या दोहोंत सजीव एकसूत्रीपणा निर्माण करणे; या गोष्टींची सामाजिक क्रांतीला आवश्यकता आहे. याचप्रमाणे स्वातंत्र्य, बुद्धिवाद आणि सामाजिक संपादित्व या तत्त्वांवर क्रांतीच्या कार्यक्रमाची उभारणी झाली पाहिजे. सामाजिक जीवनाच्या नियंत्रणांत सर्व प्रकारची मक्तेदारी, मिरासदारी यांचे निर्मूलन करणे हा या कार्यक्रमाचा अर्थ आहे.

१७) मनुष्वाने मनुष्याची पिळवणूक करणे अशक्य करण्यासाठी समाजाची आर्थिक पुनर्घटना करणे हे मूलगामी लोकसत्तेत अर्थात गृहीत धरावेच लागते. समाजातील घटक व्यक्तीच्या बौद्धिक व इतर सूक्ष्म शक्तींचा होण्याकरिता अगोदर त्यांच्या भौतिक गरजांची चढत्या प्रमाणात तृप्ती करणे ही आवश्यक गोष्ट आहे. राहणीचे मान सतत वाढत राहील, याची हमी घेणारी आर्थिक पुनर्घटना हा रॅडिकल लोकसत्तेचा पाया आहे. आर्थिक बंधनांतून जनतेची मुक्तता करणे हे तिला स्वातंत्र्याच्या ध्येयाप्रत आवश्यक साधन आहे.

१८) उत्पादन हे उपयोगासाठीच करावयाचे आणि त्याची वाटणी मानवी गरजा भागविण्याच्या दृष्टीने करावयाची या तत्त्वावर नव्या समाजरचनेचे अर्थशास्त्र उभारले पाहिजे. या समाजरचनेच्या राजकीय संघटनेत प्रतिनिधींच्या हाती सत्ता सुपुर्द करण्यात येणार नाही. कारण तसे केल्याने लोकांना सत्तेचा वापर इष्ट त्या रीतीने करता येत नाही असा अनुभव आहे. जनता-समित्यांच्या द्वारा वयात आलेले सर्व लोक राज्यकारभारात प्रत्यक्ष भाग घेऊ शकतील, अशा पद्धतीवरच ती राज्यघटना आधारली पाहिजे. ज्ञानाचा सार्वत्रिक प्रसार आणि कमीत कमी नियंत्रणे ठेवून वैज्ञानिक सृजनशील प्रवृत्तींना व प्रयत्नांना अधिकाधिक वाव देणे, या गोष्टीवर नव्या समाजरचनेची संस्कृती उभारली जाईल. हा नवा समाज बुद्धी व विज्ञान यांवर आधारलेला असल्यामुळे त्यात नियोजन हे अपरिहार्यपणे येतेच. परंतु व्यक्तीचे स्वातंत्र्य हा मुख्य उद्देश ठेवूनच हे नियोजन केले जाईल. हा नवसमाज राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या लोकसत्ताप्रधान राहील आणि म्हणूनच स्वतःचे संरक्षण करण्यास पूर्णपणे समर्थ अशीच लोकसत्ता निर्माण करील.

१९) बुद्धीवरील बंधने तोडून टाकून आत्मिकदृष्ट्या स्वतंत्र झालेली माणसे स्वातंत्र्याचे जग निर्माण करण्याच्या दृढ निश्चयाने एका राजकीय पक्षात जेव्हा एकत्रित होतील तेव्हाच त्यांच्या सामुदायिक प्रयत्नांनी रॅडिकल लोकसत्तेचे ध्येय साध्य होईल. या पक्षाचे सभासद भावी काळाचे राज्यकर्ते म्हणून नव्हे तर जनतेचे मार्गदर्शक, मित्र व तत्त्वज्ञ या नात्यानेच

कार्य करतील. या पक्षाचे राजकीय वर्तन व कार्य बुद्धिवादी आणि म्हणूनच नैतिकही राहील, कारण त्या खेरीज ते स्वातंत्र्याच्या ध्येयाशी सुसंगत राहाणार नाही. ज्या प्रमाणाने जनतेची स्वातंत्र्याकांक्षा वाढीस लागेल, त्या प्रमाणातच या पक्षाची वाढ होईल. आणि सुजाण लोकमत व लोकांचा ज्ञानयुक्त प्रयत्न यांच्या साहाय्याने हा पक्ष सत्तारूढ होईल. सत्तेचे केंद्रीकरण आणि स्वातंत्र्य यांच्यात विसंगती आहे, याची जाणीव असल्यामुळे सत्तेचे सर्वत्र वितरण करणे हा या पक्षाचा उद्देश राहील. पक्षाला सत्ता-संपादनात यश मिळणे हा या मार्गातील एक टप्पा होय. आणि ज्या नियमावर पक्षाचे अस्तित्व अवलंबून, त्याच नियमानुसार हाती आलेल्या सत्तेचा उपयोग, ती सत्ता आणखी सर्वत्र पसरून टाकण्यासाठी हा पक्ष करील. अखिल समाज व राज्यसंस्था ही दोन्ही एकरूप होईपर्यंत पक्षाचे हे कार्य चालू राहील.

२०) अगदी तळाशी जाऊन पाहिले तर दिसून येईल की व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्रमण न करता सर्वांची प्रगती व भरभराट करणारी सामाजिक रचना ही नागरिकाला सुशिक्षण देण्यावरच अवलंबून असते. रॅडिकल लोकसत्ताक राज्य हे नागरिकांच्या नागरिकत्वाच्या आणि राजकारणाच्या शिक्षणाचे विद्यालयच होईल. त्याची रचना व कार्यपद्धती अशीच असेल की ती अनासक्त अशा व्यक्तींना समाजकार्याची धुरा वाहण्यास समर्थ करील. अशा अनासक्त व्यक्तीच्या हाती असलेले राज्ययंत्र हे एका विशिष्ट वर्गाच्या हाती सापडलेले, इतरावर जुलूम करण्याचे, साधन म्हणून राहणार नाही. ज्यांच्या बुद्धीवरील व आत्म्यावरील बंधने छिन्न झाली आहेत ती सत्तारूढ माणसेच गुलामगिरीच्या शृंखला उच्छिन्न करून सर्वांना स्वातंत्र्याचा लाभ करून देऊ शकतील.

२१) हा रॉडिकॅलिझम-मौलिकतावाद- विज्ञानास समाजसंघटनेचे अंग बनवितो, व्यक्ती आणि समाज यांतील विसंगती नष्ट करतो, आणि स्वातंत्र्याच्या कल्पनेत नैतिक बुद्धिवादाचा आणि समाजपरायणतेचा आशय भरतो. विचारांची गतिमीमांसा (Dynamics of Ideas) आणि आर्थिक नियतिवादाचा विरोधविकास (The Dialeaties of Economic Determinism) यांचा योग्य परामर्श ज्यात घेतलेला आहे, अशा प्रकारचे सामाजिक तत्त्वज्ञान रडिकॅलिझम- मौलिकतावाद– पुढे ठेवितो. याच तत्त्वज्ञानातून वर्तमानकालातच घडावयाच्या समाजक्रांतीची पद्धती आणि कार्यक्रम यांची निष्पत्ती होते.

२२) 'मानव हाच हरएक गोष्टीचा मानदंड आहे' (प्रोटॅग्रॉरस्) किंवा 'मानव हाच मनुष्य जातीचा उगम आहे' (मार्क्स) या सिद्धांतापासून रडिकॅलिझमला-मौलिकतावादाला- प्रारंभ होतो, आणि आध्यात्मिकदृष्ट्या विमुक्त आणि नीतिशील मानवांच्या सामुदायिक प्रयत्नांनी जगाची "स्वतंत्र मानवाचे लोकराज्य व बंधुभावाने भरलेला समूह" या स्वरूपात पुनर्घटना झाली पाहिजे, असे तो प्रतिपादन करतो.

(रोहिणी, १ ऑगस्ट, १९४७, पृ. ३७ ते ४० व ४२)

○○○

९४

गिंपेलची गोष्ट

-आयझॅक बेहाविस सिंगर

मीच तो वेडसर गिंपेल, मी मात्र स्वतःला वेडसर समजत नाही; पण लोक मला तसे म्हणतात. मी शाळकरी होतो तेव्हाच लोकांनी मला हे नाव दिले. माझी एकंदर सात नावे होती; नेभळट, गाढव, रेम्याडोक्या, गंजड, मेंगळट, बावळट, नि वेडसर. शेवटचं नाव कायमचं चिकटलं. माझा वेडसरपणा कशात होता, तर मला कोणीही बनवावं. एकदा मुलं म्हणाली, 'गिंपेल, तुला कळलं का? गुरुजींची बायको बाळंतीण झाली.' झालं. मी तडक शाळेतून धावलो. नंतर कळलं, की ती थाप होती. मला तरी कसं माहीत असणार? तिचं पोट मोठं दिसत नव्हतं खरं, पण मी तिच्या पोटाकडे कधीच पाहात नसे. हा खरोखर वेडेपणा होता का? शाळेतलं ते टोळकं फिदीफिदी हसे, हुर्यो-हुर्यो ओरडे, गिरक्या मारी, नाचे, 'छान छान! वाहवा वाहवा!' म्हणून गाई. एकदा तर बाळंतिणीला देतात त्या मनुकांच्याऐवजी माझ्या हातांत त्यांनी शेळीच्या लेंड्या कोंबल्या. मी काही दुबळा नव्हतो. एखाद्याच्या मुस्कटात मारली असती, तर त्याला क्रॅकोचा रस्ताच दिसला असता. पण माझी वृत्ती खरोखरच कठोर नाही. मी विचार करतो, 'जाऊ द्या.' तेव्हा लोक माझ्या या वृत्तीचा गैरफायदा घेतात.

एकदा मी शाळेतून घरी येत असता कुत्रं भुंकताना ऐकलं. मी कुत्र्यांना भीत नाही; त्या वाटेला जाणेही मला नको असतं. एखादं कुत्रं पिसाळलेलं असलं नि त्यानं चावा घेतला तर कुणीदेखील तुम्हाला वाचवायला समर्थ नाही. म्हणून मी पळ काढला. नंतर मी मागं वळून पाहिलं तर सगळ्या बाजारपेठेत हशा पिकलेला. ते कुत्र नव्हतं त तो चोर वुल्फ लावून होता. पण तो होता हे मला कसं कळावं? एखाद्या कुत्रीच्या केकाटण्यासाख्याच तो आवाज होता.

मला बनवणं सोपं आहे हे जेव्हा थट्टेखोर नि खोडकर लोकांना समजलं, तेव्हा प्रत्येक जण माझ्यावर आपली करामत चालवून पाहू लागला. ''गिंपेल, आपल्या फ्रामपोल गावाला झार भेट देणार आहे. गिंपेल, टरबिन गावात चंद्र पडला. गिंपेल, त्या गिड्ड्या हॉड्ल फरपीसला न्हाणीघराच्या मागे मोहरांचा हंडा सापडला.'' आणि मी प्रत्येकावर विश्वास ठेवी. एकतर,

काहीही घडणं शक्य आहे असं आपल्या पुराणात लिहूनच ठेवलं आहे. आता ते कसं घडतं हे मात्र मला आठवत नाही. दुसरं म्हणजे, सगळं गाव जेव्हा एखादी गोष्ट सांगू लागे, तेव्हा त्यावर विश्वास ठेवणं भागच पडे! मी जर एखादे वेळी, ''तुम्ही बनवताय नाही का मला' असं म्हणायचं धाडस केलं, तर मी गोत्यात आलोच म्हणून समजा. ''म्हणजे रे काय? प्रत्येकाला तू थापेबाज म्हणतोय होय?'' असं म्हणून लोक माझ्यावर रागावू लागायचे. मग मी काय बरं करावं? मी त्यांच्यावर विश्वास ठेवी आणि मला वाटतं, त्यामुळं त्यांना जरा बरं वाटायचं.

मी पोरका होतो. ज्यांनी मला वाढवलं, ते आजोबा मरायला टेकले होते. लोकांनी मला एका पावरोटी तयार करणाऱ्याच्या स्वाधीन केलं. तिथं तरी लोक माझा पिच्छा सोडतात की काय? छे! भाजण्यासाठी ताटात पाव घेऊन येणारी किंवा सांडगे सुकविण्यासाठी आणणारी प्रत्येक बाई किंवा पोरगी मला निदान एकदा तरी बनविल्याखेरीज राहात नसे. ''गिंपेल, स्वर्गात जत्रा भरली आहे; गिंपेल, गुरुजी सातव्या महिन्यातच बाळंत होऊन त्यांना वासरू झालं; एक गाय छपरावरून उडत गेली नि तिनं पितळेची अंडी घातली.'' येशिवाचा एक विद्यार्थी पाव विकत घेण्यासाठी एकदा आला होता. तो म्हणाला, ''अरे, गिंपेल, तू इथं उलथन्यानं खरवडत बसला आहेत नि तिकडे प्रेषिताचा अवतार झालाय. मेलेली माणसं जिवंत होऊन उठली आहेत.'' मी म्हटलं, ''काय, म्हणता तरी काय? मी तर कोणी शिंग वाजवलेलं ऐकलं नाही!'' तो म्हणाला, ''काय बहिराबिहिरा आहेस का काय?'' आणि जो तो ओरडू लागला, ''आम्ही ऐकलं, आम्ही ऐकलं!'' नंतर मेणबत्या लावणारी रिट्स आत आली व आपल्या घोगऱ्या आवाजात म्हणाली, ''गिंपेल, तुझे आईबाप थडग्यातून उठून उभे राहिले आहेत आणि तुला शोधीत आहेत.'' खरं सांगू का? असला काहीही प्रकार घडलेला नाही हे मला चांगलं माहीत होतं. पण तरीदेखील मी माझा लोकरीचा कोट घातला व बाहेर गेलो. न जाणो, काहीतरी घडलेलं असायचं. नुसतं जाऊन पाहिलं तर त्यात माझं काय खर्चणार होतं? झालं. त्याचा एकच कल्लोळ उठला आणि नंतर मी शपथ घेतली, की आता अशा गोष्टींवर विश्वास ठेवायचा नाही. पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. लोक मला इतका गोंधळून टाकीत, की मला खरं काय ते कळेनासंच होऊन जाई.

मी गुरुजींकडे सल्ला विचारण्यासाठी गेलो. ते म्हणाले, ''आयुष्यभर मूर्ख राहाणं बरं, पण घटकाभरही दुष्ट होऊ नये असं शास्त्रात लिहूनच ठेवलं आहे. तू काही वेडा नाहीस. लोक वेडे आहेत. शेजाऱ्याला शरम वाटावयास जो लावतो, तो स्वत:च स्वर्ग गमावतो.'' तरीदेखील गुरुजींच्या पोरीनं मला बनवलंच. मी गुरुजींच्या अंगणातून बाहेर पडत होतो तेव्हा ती म्हणाली, ''तू अजून त्या भिंतीचा मुका घेतला की नाही?'' मी म्हटलं, ''नाही बुवा, का?'' तिनं उत्तर दिलं, ''तशी शास्त्राज्ञाच आहे. प्रत्येक भेटीच्या वेळी तसे करावे लागतं.'' बरं बुवा. मुका तर मुका. त्यात काय बिघडणार होतं? आणि ती पोरगी खदाखदा

हसू लागली. छानच बनवलं तिनं मला. ठीक आहे.

ते गाव सोडून दुसऱ्या गावी जाण्याचं माझ्या मनात होतं. पण जो तो माझं लग्न जुळवण्याच्या खटपटीत लागला. सर्व जण माझ्या खनपटीलाच बसले. त्यांचं बोलणं ऐकून ऐकून माझे कान किटले. त्यांनी माझ्यासाठी आणलेली बाई नीतिमान नव्हती. पण ते म्हणाले की ती अगदी शुद्ध कुमारिका आहे. ती लंगडत चाले, पण ते म्हणत, लाजाळूपणाने ती तशी मुद्दामच चालते. तिला एक अनौरस मुलगा होता, पण लोक म्हणत, तो तिचा धाकटा भाऊ आहे. मी ओरडलो, ''तुम्ही तुमचा वेळ फुकट दवडीत आहा. मी त्या वेसवेशी कधीही लग्न करणार नाही.'' पण ते रागावून म्हणाले, ''अरे काय बोलतोस हे! तुझी तुला लाज कशी वाटत नाही? त्या बाईला शिवी दिल्याबद्दल तुला गुरुजींकडे आम्ही देऊ व दंड ठोठावयास लावू.'' या लोकांच्या तावडीतून सहजासहजी सुटका होणार नाही असं मला कळून चुकलं आणि मी विचार केला, ''यांनी मला थट्टेचा विषय बनविण्याचं ठरवलेलंच दिसतंय. पण एकदा लग्न झालं की नवराच मालक होतो. आणि हे तिला चालत असेल तर मलाही ते मान्य आहे. शिवाय जीवनात सगळंच सुरळीत जमणं शक्यच नसतं आणि तशी अपेक्षाही करणं बरोबर नाही.''

मी तिच्या रेताडात बांधलेल्या मातीच्या घरी गेलो. आणि ते सगळं टोळकं खेकाळत, गात गात माझ्या मागं आलं. आपल्याला फशी पाडणाऱ्या शिकाऱ्यांसारखे ते वागत होते. पण आम्ही विहिरीपाशी येताच ते थांबले. एलकाशी भांडण सुरू होण्याची त्यांना भीती वाटली. एकदा तिनं तोंड उघडून जिभेचा भयंकर पट्टा सुरू केला, की काही विचारू नका. मी घरात शिरलो या भिंतीपासून त्या भिंतीपर्यंत दोऱ्या बांधलेल्या होत्या व त्यावर कपडे वाळत होते. ती अनवाणीच टबपाशी उभी राहून धुणं धूत होती. तिनं एक विटलेला सैल चिटाचा झगा घातला होता. केसांच्या वेण्या घालून त्या पिनांनी डोक्यावरच अडकून टाकल्या होत्या. तिथल्या घाणीच्या भपकाऱ्याने माझा जीव गुदमरून गेला.

मी कोण हे तिला माहीत होतं असं दिसलं. तिनं माझ्यावर नजर टाकली व म्हटलं, ''अगंबाई, हे पहा कोण आलं. बस तिथं.''

मी तिला सगळं काही सांगितलं. काहीही नाकारलं नाही. मी म्हटले, ''मला खरं सांग, तू खरोखरच कुमारिका आहेस का? आणि तो द्वाड वेचिल तुझा भाऊच ना खरोखरी? माझ्याशी प्रतारणा करू नकोस, कारण मी पोरका आहे.''

''मीदेखील पोरकीच आहे'' तिनं उत्तर दिलं. ''जे तुला त्रास देतात, त्यांचं नाक मुरगळलं जावो. पण माझा गैरफायदा घेता येईल असे त्यांना वाटत असेल तर ते चूक आहे. मला पन्नास गिल्डर हुंडा हवा आहे. करू दे त्यांना पैसे गोळा.'' ती फारच स्पष्ट बोलणारी होती. मी म्हटलं,

''नवऱ्या मुलीनं हुंडा द्यायचा असतो, नवऱ्या मुलानं नव्हे.'' तेव्हा ती म्हणाली,

''माझ्याशी हुज्जत घालू नको. स्पष्ट हो म्हण किंवा नाही म्हण. नाही तर आलास तसा चालता हो.'' मी विचार केला, इथं काही कोणाची डाळ शिजायची नाही. पण आमचं गाव काही दरिद्री नव्हतं. लोकांनी सर्व काही कबूल केलं आणि ते लग्नाच्या तयारीला लागले. त्या वेळी गावात पटकीची साथ चालू होती. लग्नाचा समारंभ स्मशानभूमीच्या दारात, जेथे प्रेतांना स्नान घालतात त्या छोट्याशा झोपडीत झाला. सगळे बेटे दारू पिऊन धुंद झाले. लग्नाचा करार लिहिला जात होता तेव्हा एका धार्मिक वृत्तीच्या अधिकाऱ्यानं विचारलेलं मी ऐकलं, ''नवरी मुलगी ही विधवा आहे की काडीमोड केलेली आहे?'' मुलीच्या वतीनं धर्मगुरूच्या बायकोनं सांगितलं, की ''दोन्हीही. विधवाही व काडीमोड केलेलीही.'' मला तो क्षण काळाकुट्ट वाटला. पण काय करणार? लग्नमंडपातून मला पळून थोडंच जाता येणार होतं!

गाणं आणि नाच चालू होता. एक बुढ्ढी आजी एक पांढरा विणलेला पट्टा कवटाळून माझ्यासमोर नाचत होती. नवऱ्या मुलीच्या आईबापांच्या स्मरणार्थ समारंभाच्या व्यवस्थापकानं प्रार्थना म्हटली. शाळकरी मुलांनी 'टिशा बाव्ह' उपवास-दिवशी फेकतात तशी चक्रं फेकली. उपदेश संपल्यावर अहेर म्हणून पुष्कळ देणग्या आल्या. पाटा, पोळपाट, बादली, कुंचे, पळे अशा कितीतरी संसारोपयोगी वस्तू होत्या. नंतर मी पाहिलं, तो दोघे तरुण एक पाळणा घेऊन आलेले दिसले. मी विचारलं, ''या पाळण्याचा काय उपयोग आम्हाला?'' ते म्हणाले, ''व्यर्थ डोकं शिणवू नको. वेळेला तो हाताशी असलेला बरा. उगाच धावपळ नको.'' मी चांगलाच नागवला जाणार मला कळून चुकलं, दुसऱ्या बाजूनं पाहिलं तर असं वाटलं, की माझं त्यात काय नुकसान होणार आहे?

मी विचार केला, ''बघू काय निष्पन्न होतंय ते. सगळ्या गावालाच वेड लागलं असेल हे शक्य वाटत नाही.''

रात्री, माझी बायको पहुडली होती तिथं मी गेलो, पण ती मला जवळ येऊ देईना. मी म्हटलं, ''हे काय? यासाठीच का आपलं लग्न लावून दिलं?'' तेव्हा ती म्हणाली,, ''मला शिवायचं नाही.'' ''पण काल तर तुला न्हायला घातलं. पाळीनंतरच न्हायला घालायचं असतं ना!''

ती म्हणाली, ''आज म्हणजे काल नव्हे आणि काल म्हणजे आज नव्हे. तुला पसंत नसेल तर तू खुशाल निघून जा.'' थोडक्यात, म्हणजे मी वाट पाहात राहिलो.

चार महिने होतात न होतात तो ती बाळंत झाली. तोंडावर हात ठेवून गावकरी आपलं हसू दडवू लागले. पण मी तरी काय करणार? बाळंतपणात तिला असह्य वेदना झाल्या, इतक्या, की ती भिंतीला ओरबाडू लागली. ''गिंपेल'' ती ओरडली. ''मी चालले, मला क्षमा कर.'' घर बायकांनी गजबजून गेलं होतं. त्यांनी पराती भरभरून पाणी उकळलं, तिच्या किंकाळ्यांनी आकाश भेदून गेलं. चर्चमध्ये जाऊन स्तोत्रपठण करणं एवढंच माझ्या हाती

होतं, तेवढं मी केलं.

गावकरी लोकांना तीही एक गंमतच वाटली. मी कोपऱ्यात स्तोत्र व प्रार्थना म्हणत उभा राहिलो. माना वेळावून ते म्हणाले, ''चालू दे, चालू दे प्रार्थना. प्रार्थनेनं काही कोणतीही बाई कधी गर्भार राहिली नाही.'' एकानं माझ्या तोंडात गवताची काडी घातली व म्हटले, ''गाईला चारा.. ''

तिला मुलगा झाला. शुक्रवारी वेदीजवळच्या टेबलावर हातोडी आणून चर्चच्या व्यवस्थापकाने जाहीर केलं, ''गिंपेलशेटजींनी आपल्याला मुलगा झाला म्हणून इथं जमणाऱ्या सर्वांना भोजनाचं आमंत्रण दिलं आहे.'' जमलेल्या लोकांत एकच हशा पिकला. माझा चेहरा लाल झाला. पण काहीच करता येण्याजोगे नव्हते. मुलाची सुंता होण्याच्या वेळचे मानपान आणि इतर सगळे धार्मिक विधी बाप म्हणून करण्याची जबाबदारी काही झालं तरी माझ्यावरच होती.

मेजवानीसाठी अर्धा गाव लोटला. माणसांची गर्दी इतकी झाली, मुंगीला रीघ मिळेना. बायकांनी पीजचा मसालेदार चिवडा आणला. गावच्या गुत्त्यांतून बीरच पिंप आलं. इतरांच्याप्रमाणेच मीही चिक्कार खाल्ले व प्यायलो. सर्वांनी माझं अभिनंदन केलं. त्यानंतर सुंता करण्याचा विधी झाला. मी मुलाला माझ्या वडलांचे नाव ठेवले- त्यांच्या आत्म्याला शांती मिळो! सगळे लोक गेले व मी एकटाच बायकोजवळ राहिलो, तेव्हा तिने मच्छरदाणीतून डोकं बाहेर काढून मला जवळ बोलावलं. ''गिंपेल'', ती म्हणाली, ''तू गप्प का असा? अगदी होडी बुडून नाहीशी झाल्यासारखं का वाटतंय तुला?''

''काय बोलू?'' मी उत्तर केलं, ''फार चांगलं बक्षीस दिलंस तू मला. माझ्या आईला हे कळलं असतं तर दुसऱ्यांदा मेली असती ती.''

''काय वेडबीड लागलंय की काय तुला?'' ती म्हणाली.

''जो मालक आणि स्वामी असायला पाहिजे, त्याला तूं अगदी गाढव कसा बनवून टाकतेस?'' मी म्हटले.

''तुला झालंय तरी काय?'' ती म्हणाली. ''कुठली काहीतरी कल्पना तू मनात भरवून घेतलीयस?''

आता मात्र स्पष्ट नि साफ बोललं पाहिजे असं ठरवून मी म्हटलं, ''एखाद्या पोरक्या माणसाचा असा उपयोग करून घेणं तुला बरं वाटतं का? हे मूल माझं नाही.''

तिनं उत्तर दिलं, ''हा मूर्खपणाचा विचार डोक्यातून काढून टाक. मूल तुझंच आहे.''

तिचं म्हणणं खोडून काढण्यासाठी मी म्हटलं, ''माझं कसं असेल? लग्नानंतर १७ आठवड्यांनी ते जन्मलं.''

तिनं सांगितलं, की मूल अपुऱ्या दिवसांचं आहे. तिच्या आजीला असंच मूल झालं होतं आणि त्या आजीत व तिच्यात अगदी तंतोतंत पाण्याच्या दोन थेंबांत असतं तसं,

साम्य आहे. एखादा शेतकरी जत्रेच्या वेळी जशा आणाशपथा घेतो, तशा तिनं घेतल्या. खरं सांगायचे म्हणजे माझा तिच्यावर विश्वास बसला नाही. पण दुसऱ्या दिवशी गावातल्या शाळा मास्तराजवळ मी या गोष्टीची चर्चा केली तेव्हा तो म्हणाला, ''अगदी अशीच गोष्ट ॲडॅम आणि ईव्ह यांच्या संबंधांत घडली. रात्री झोपताना ती दोघंच होती. अंथरूण सोडताना दोहोंचे चार झाले. जगातल्या सगळ्या स्त्रिया म्हणजे ईव्हच्या नातीच आहेत.''

अशी ही परिस्थिती. वादात लोकांनी मला गप्प बसवलं, पण पाहिलं, तर या गोष्टी कशा घडतात हे समजतं तरी कोणाला?

मी माझं दुःख विसरू लागलो. मी त्या मुलावर आत्यंतिक प्रेम करू लागलो व त्यालाही माझा लळा लागला. मला पाहाताच चिमुकले हात हलवी व मी त्याला घ्यावे असे सुचवी. पोटात दुखू लागून ते रडू लागले, तर मीच त्याला उगी करू शके. दात येण्याच्या वेळी मी त्याला हस्तिदंती बांगडी आणली. जरीची टोपी आणली. त्याला नेहमी कोणाची तरी दृष्ट लागे आणि मग त्याला उतार करण्यासाठी दृष्ट काढायला नेण्याची धावपळ मीच करी. मी मान मोडून काम करीत असे. घरात लहान मूल असलं म्हणजे खर्च कसे वाढतात तुम्हाला माहीतच आहे.

मला एलका आवडत नव्हती असे नाही. ही गोष्ट मी दडवून ठेवू इच्छित नाही. मी तिच्याजवळ गेलो, की ती शिव्या देऊ लागे. तिच्याकडून मला पुरेसं शरीरसुख मिळत नसे. ती जबरदस्त बाई होती. तिच्या एका नजरेनंच तुमची दातखीळ बसली असती. आणि ती बोलू लागली तर आगीचाच वर्षाव. पण त्यातही एक प्रकारची आकर्षकता होती. तिचा प्रत्येक शब्द मला आदरणीय व आवडीचा वाटे. तथापि तिच्या अनेक शब्दांनी माझ्या वर्मी घुसून मला घायाळ केले.

संध्याकाळी येतांना मी तिच्यासाठी सफेत व काळा पाव आणि मी स्वतः भाजलेली पॉपीच्या बियांची मुटकुळी आणीत असे. तिच्यासाठी मी चोऱ्याही करीत असे. बिस्कीट, मनुका, बदाम, केक जे सापडेल त्यावर मी हात मारीत असे. भट्टीत भाजून घेण्यासाठी बायका दर शनिवारी भांड्यात घालून जे पदार्थ आणीत ते चोरल्याबद्दल मला देव क्षमा करील अशी आशा वाटते. मांसाचे तुकडे, पुडिंगचा लचका, कोंबडीची तंगडी किंवा डोकं, जे जे मिळेल ते ते झटदिशी मी उडवी. एलका सर्व खाऊन चांगली गुबगुबीत व सुंदर दिसू लागली.

मला आठवडाभर रात्री घरापासून दूर बेकरीतच झोपावे लागे. शुक्रवारी रात्री जरी घरी आलो तरी ती काही तरी सबब सांगून मला दूर ठेवी. छातीत जळजळतंय, बरगडीत चमक निघतेय, उचकी लागलीय, डोकं दुखतंय, एक ना दोन. बायकांच्या सबबी कशा असतात हे तुम्हाला माहीतच आहे. मला या परिस्थितीचा खडतरपणा जाणवू लागला. तशात तिचा तो लहान भाऊ, अकरमाशा, आता मोठा झाला होता. तो माझ्याशी मस्ती करी व मी

त्याला थप्पड देण्यासाठी हात उगारला, की ती आपलं तोंड सोडून अशा शिव्या देऊ लागे, की माझ्या डोळ्यांसमोर काजवे चमकू लागत. दिवसातून दहा वेळा ती मला काडीमोड करण्याची धमकी देई. माझ्याजागी दुसरा माणूस असता तर त्यानं पोबारा केला असता व पुन्हा तोंड दाखवलं नसतं. पण माझी जातच वेगळी. न बोलता सगळं सोसायचं. करणार तरी काय? देवानं खांदे दिले तशीच वाहण्यासाठी ओझीही दिली.

एका रात्री बेकरीत अनर्थ झाला. भट्टीचा स्फोट झाला व जवळ जवळ आगच लागली. घरी जाण्याखेरीज उपायच नव्हता म्हणून मी घरी आलो. मी म्हटलं, आठवड्याच्या मधल्या दिवशी बिछान्यावर निजण्याचा आनंद उपभोगू या. बाळाची झोपमोड होऊ नये म्हणून चोर पावलांनी घरात शिरलो. घरात आल्यावर घोरण्याचे एकाऐवजी दोन सूर ऐकू येतात असा मला भास झाला. एक बारीक आवाजातला दुसरा कत्तल होताना बैल घरघरतो तसा. मला हे कसंसंच वाटलं. मी बिछान्यावर जाऊन पाहिलं तो डोळ्यांसमोर अंधारी आली. एलकाजवळच एक पुरुषाकृती झोपलेली होती. माझ्याजागी दुसरा कोणी असता तर त्याने बोंबाबोंब केली असती. सगळा गाव जागा होईल असा आवाज केला असता. पण माझ्या मनात विचार आला, की आपण आरडाओरड केली तर बाळाची झोपमोड होईल. त्या चिमण्या पाखराला कशाला घाबरून सोडायचे, असा विचार केला व बेकरीत परत जाऊन पिठाच्या पोत्यावरच अंग टाकलं. सकाळ होईपर्यंत डोळ्याला डोळा मात्र लागला नाही. हिवताप आल्यासारखा मी कापत होतो. ''हे गाढव बनून राहणं बस्स झालं.'' मी स्वतःशीच म्हणालो, ''हा गिंपेल आयुष्यभर असाच अर्धवट राहाणार नाही. गिंपेलसारख्या वेड्याच्या गाढवपणालादेखील काही मर्यादा आहेच.''

सकाळी मी सल्ला विचारण्यासाठी गुरुजींकडे गेलो आणि त्यामुळे गावात एकच खळबळ उडाली. त्यांनी ताबडतोब एलकाला बोलवणं पाठवलं. ती मुलाला घेऊन आली. तिनं काय केलं असावं अशी तुमची अटकळ आहे? तिनं सगळ्या गोष्टी साफ नाकारल्या. ती म्हणाली, ''याचं डोकं ठिकाणावर नाही. स्वप्नांवर माझा विश्वास नाही.'' अधिकारी तिच्यावर ओरडले, तिला धमक्या दिल्या, टेबलावर हातोड्यानं ठोठावलं, पण तिनं आपलं म्हणणं सोडलं नाही. ती म्हणाली, ही सर्व तोहमत आहे.

खाटकांनी व लमाणांनी तिची बाजू घेतली. खाटिकखान्यातील पोरगा पुढे येऊन म्हणाला, ''याद राख. आमची नजर आहे तुझ्यावर. आमच्या यादीत तुझं नाव घातलं आहे.'' इतक्यात बाळानं तिथं विधी करून कपडे भरवले. यहुदी न्यायसभेत पवित्र कायद्यांचं एक कपाट असतं, तिथं असे प्रकार चालू देत नाहीत. म्हणून त्यांनी एलकाला घालवून दिलं.

मी गुरुजींना म्हटलं, ''मी काय करावं?''

ते म्हणाले, ''तिच्याशी ताबडतोब काडीमोड कर.''

मी विचारलं, ''आणि तिनं नाकारलं तर?''

ते म्हणाले, ''तू काडीमोड झाल्याप्रमाणं वाग. एवढंच तुझ्या हाती आहे.''

मी म्हणालो, ''ठीक आहे. मला यावर विचार करू द्या!''

''त्यात विचार करण्यासारखं काही नाही.'' ते म्हणाले, ''तिने व तू परत एकत्र राहता कामा नये.''

''आणि मला बाळाला भेटावेसे वाटलं तर?'' मी विचारलं.

''मसणात जाऊ दे ती वेसवा आणि तिचं ते अकरमाशी लेंढार.'' ते म्हणाले.

मी तिच्या घराचा उंबरठा चढता कामा नये असा त्यांनी निर्णय दिला. पुन्हा मी जिवंत असेतो कधीही तिच्याकडे जाता कामा नये.

दिवसा या गोष्टीचा माझ्या मनाला तेवढा त्रास झाला नाही. मी विचार केला. ''हे कधी ना कधी होणारच होतं. गळू हे फुटलंच पाहिजे.'' परंतु रात्री बेकरीतील पोत्यावर अंग टाकलं, तेव्हा ती गोष्ट मला फार लागली. तिची व बाळाची मला ओढ लागली. तिच्यावर संतापावं असं मला वाटलं. माझं दुर्दैव नेमकं हेच होतं, की खरोखर रागावणं हे माझ्या रक्तातच नव्हतं. माझ्या विचारांची गाडी अशी चालली, ''पहिली गोष्ट अशी की केव्हा केव्हा चूक ही होणारच. चुका केल्यावाचून तुम्ही जगूच शकत नाही. तिच्याजवळ सापडलेल्या पोरग्यानेंच तिला नादी लावलं असेल. तिला भेटी पाठवल्या असतील. एक ना दोन. बायकांचे केस लांब असतात पण अक्कल आखूड असते. आणि म्हणून अखेर तिला फशी पाडलं असावं. आणि ज्या अर्थी ती नाकारते आहे त्या अर्थी कदाचित मला भासही झाला असेल. माणसाला पुष्कळदा भ्रम होतो. एखादे वेळी मनुष्याची आकृती किंवा दुसरं काही दिसतं, पण जवळ जाऊन पाहाता तिथं काहीच खरोखरी नसतं. असं जर असेल, तर मी तिला अन्याय करीत आहे.'' माझ्या विचारांची मजल इथवर जाताच मला रडू आलं. हुंदके आले. त्यामुळे मी निजला होतो तिथलं पीठ भिजून गेलं. सकाळी मी गुरुजींकडे गेलो व त्यांना सांगितलं की माझी चूक झाली. त्यांनी माझं म्हणणं लिहून घेतलं व म्हटले की असं जर असेल तर या सर्व प्रकरणाचा पुनर्विचार केला पाहिजे. हा पुनर्विचार असल्याखेरीज बायकोजवळ जायचं नाही; पण कोणाच्या तरी हाती पाव व पैसे तिच्याकडे पाठवण्यास हरकत नाही, असा त्यांनी तात्पुरता निर्णय दिला.

सगळ्या गुरुजनांचा एकमतानं निर्णय होईतो नऊ महिने लोटले. त्यांच्यात पत्रापत्री चालू होती. मला कल्पना नव्हती, की अशा गोष्टींबाबत इतकं पांडित्य खर्च करावं लागतं!

मध्यंतरीच्या काळात एलकाला आणखी एक मूल झालं. या खेपेला मुलगी झाली. रविवारी चर्चमध्ये जाऊन मी तिच्यासाठी आशीर्वाद घेतला. सासूचं नाव ठेवलं. बिचारीच्या आत्म्याला शांती मिळो! गावातले गुंड, बडबडे लोक बेकरीत आले व त्यांनी मला बोलून घेतले. माझ्या संकटामुळे व दुःखामुळे गावात उत्साहाचे नवे वारे विचारले. परंतु आता मी ठरवले की यापुढं नेहमी दुसरे माणूस जे जे सांगेल त्यावर विश्वास ठेवायचा. विश्वास न ठेवून

काय फायदा? आज अविश्वास दाखवला, उद्या प्रत्यक्ष परमेश्वराचीही तुम्ही कदर करणार नाही.

बेकरीत उमेदवार म्हणून असलेला एक जण तिचा शेजारी होता. त्याच्यासाठी रोज मी धान्य, पाव, मिठाई किंवा संधी मिळेल तेव्हा पुडिंगचा, केकचा तुकडा, लग्नाची मिठाई पाठवावी. जे काय हाती लागेल ते. तो उमेदवार पोरगा चांगल्या दिलाचा होता. पुष्कळदा तो त्या पदार्थांत स्वतःची भर घाली. पूर्वी तो मला फार त्रास देई. माझं नाक ओढी, कोपरखळ्या देई, पण तो माझ्या घरी जाऊ लागला तेव्हापासून तो दयाळू व सहनशील बनला, तो एकदा म्हणाला, ''वा, गिंपेल, तुला छान बायको मिळाली आहे, आणि दोन गोंडस पोरंही, तुझी लायकी नसताना.''

''पण लोक तिच्याबद्दल काहीतरीच बोलत असतात.'' मी म्हटलं.

''त्यांना आहेत लांब जिभा आणि त्या जिभांना बडबडण्याखेरीज दुसरा काय उद्योग आहे! गतवर्षीची थंडी जशी आपण विसरतो तशी त्यांची बडबडही विसरून गेलं पाहिजे.''

एके दिवशी मला गुरुजींनी बोलावून घेतलं आणि म्हटलं, ''गिंपेल, तुझ्या बायकोसंबंधी तू जे सांगितलंस ते चुकीचं होतं, याबद्दल तुझी खात्री झाली आहे काय ?''

मी म्हटलं, ''होय, माझी तशी खात्री झाली आहे.''

''पण हे बघ, तू तर ते प्रत्यक्ष पाहिलं होतंस.''

''ती कदाचित सावली असेल.''

''सावली? कशाची सावली?''

''मला वाटतं, एखाद्या तुळईची सावली असेल ती.''

''मग तू आता घरी जाऊ शकतोस. यानोव्हर गुरुजीचे तू आभार मानले पाहिजेस. तुला अनुकूल असं एक वाक्य मायमोनिडेसच्या ग्रंथात त्यांनाच सापडलं.''

मी गुरुजींचा हात धरला व त्याचं चुंबन घेतलं.

मला ताबडतोब घरी जावंसं वाटत होतं. बायको व मूल यांच्यापासून इतका दीर्घकाळ वेगळं राहणं ही काही साधी गोष्ट नव्हे. पण मी विचार केला, ''आता बेकरीत कामाला जाणं हेच बरं. संध्याकाळी जावं घरी.'' माझ्या मनाचा विचार करता हा दिवस मला एखाद्या पवित्र दिवसासारखा होता, तरी मी कोणाला काही बोललो नाही. बेकरीत येणाऱ्या बायकांनी रोजच्याप्रमाणे आजही मला चिडविलं व टोमणे मारले. पण मी मनात म्हटलं, ''चालू दे तुमची बडबड, सत्य काय, पाण्यातील तेलाप्रमाणे वर आलं आहे. मायमोनिडेसच्या मते जे बरोबर आहे, ते बरोबर असलंच पाहिजे.''

रात्री मी तिंबलेली कणीक नीट फुगावी म्हणून झाकून ठेवली. माझ्या वाट्याचा पाव आणि पिठाची पिशवी घेतली व घराकडे निघालो. चंद्राचे पूर्ण बिंब आकाशात होते व ताऱ्यांची लुकलुक हृदयात कशाची तरी भीती निर्माण करीत होती. मी घाईत पुढे चाललो.

माझी लांबलचक सावली पळत होती. ते थंडीचे दिवस होते व बर्फ नुकतेच पडले होते. गाणं गावं असं माझ्या मनात आलं, पण आता उशीर झाला होता आणि घरात स्वस्थ झोपलेल्या लोकांची झोपमोड करू नये असे मला वाटलं. एकदा वाटलं, शीळ घालावी, पण आठवण झाली, की रात्री शीळ घातली तर पिशाच गोळा होतात. म्हणून मी गप्प राहिलो व शक्य तितक्या वेगाने चालत राहिलो.

जाताना माझ्यावर ख्रिश्चन वस्तीतली कुत्री भुंकू लागली. पण मी मनात म्हटले, ''खुशाल दात विचकून भुंका. कुत्रीच तुम्ही. पण मी माणूस आहे. एका सुंदर बाईचा नवरा आहे. उजळ नशिबी मुलांचा बाप आहे.''

मी घराजवळ येऊन ठेपलो आणि माझी छाती एखाद्या गुन्हेगाराच्या छातीप्रमाणे धडधडू लागली. मला भीती वाटत नव्हती, पण हृदयात मात्र धप्, धप्!...ठीक, आता मागं फिरणं नाही. मी हलकेच दार उघडून आत गेलो. एलका झोपली होती. मी बाळाच्या पाळण्याकडे पाहिलं. खिडकीची झडप बंद होती तरी फटीतून चांदणं आत शिरलं होतं. मला पाळण्यात त्या नवजात बालकाचा चेहरा दिसला व तत्काळ वात्सल्यानं माझं हृदय भरलं. अगदी तत्काळ, त्या बाळाच्या अंगप्रत्यंगावर माझं प्रेम जडलं. नंतर मी बिछान्याजवळ आलो. मी काय पाहिलं तिथं? एकलाशेजारी तो उमेदवार पोरगा झोपलेला. क्षणात चंद्र मावळला. पूर्ण काळोख पसरला आणि माझं अंग कापू लागलं. माझे दात वाजू लागले. माझ्या हातातील पाव खाली पडला व माझी बायको जागी झाली आणि म्हणाली, ''कोण आहे? अं?''

मी पुटपुटलो, ''मी आहे...''

''गिंपेल? तू इथं कसा आलास? मला वाटलं, तुला इथं येण्याची मनाई आहे.' ती म्हणाली.

''गुरुजींनी सांगितलं मला जायला.'' मी उत्तर दिलं व हिवताप भरल्याप्रमाणे थरथरलो.

''हे पहा गिंपेल,'' ती म्हणाली, ''पडवीत जाऊन पाहा बरे आपली बकरी ठीक आहे ना. ती आजारी आहे असं मला वाटतं.''

आमच्यापाशी एक बकरी होती हे सांगायचं मी विसरलो. ती आजारी आहे हे कळताच मी अंगणात गेलो. ती छोटी बकरी म्हणजे एक छान प्राणी होता. एखाद्या माणसावर असावं तसं माझं तिच्यावर प्रेम होतं. मी छपराकडे गेलो व दार उघडलं. बकरी चारी पायांवर उभी होती. मी तिचं सर्व अंग चाचपून पाहिलं, तिची शिंगे ओढली, आचळं तपासली. ठीक होती ती. काही नव्हतं झालं तिला. कदाचित तिनं जास्त पाला खाल्ला असावा. ''अच्छा, बछडे,'' मी म्हटलं, ''चांगली राहा.'' त्या छोट्या जनावरानं जणू माझे आभार मानण्यासाठी उत्तर दिलं, 'मांऽऽआं''

मी परत आलो. तो उमेदवार पोरगा नाहीसा झाला होता.

''कुठंय तो पोरगा?'' मी विचारलं.

''कुठला पोरगा?'' माझ्या बायकोने उत्तर दिलं.

''म्हणजे? असं काय विचारतेस? तो उमेदवार पोरगा. तुझ्याजवळ झोपला होता तो.'' मी म्हटलं.

''आज रात्री नि काल रात्री मला ज्या गोष्टींची स्वप्नं पडली, ती खरी होऊन तुझं तळपट उडो.'' ती म्हणाली. ''कोणा समंधानं तुला पछाडलं आहे व तुझ्या दृष्टीला बाधा केली आहे.'' ती ओरडली, ''हलकट माणसा ! खुळचटा! भुता! रानगटा, चालता हो इथून, नाही तर किंचाळून मी सगळा गाव जागा करीन.''

मी तेथून हालणार तोच तिच्या छोट्या भावाने चुलीच्या मागून उडी मारली व माझ्या मानेवर एक रट्टा मारला. माझी मानच मोडली असं मला वाटलं. माझ्यातच काही बिघाड झाला असावा असं मला वाटलं. आणि मी म्हटलं, ''गावात कंडी उठवू नको. मी भुतं नि पिशाच्चं उठवतो एवढा आरोप लोकांनी एकदा केला, की संपलंच.'' तिचा उद्देश तोच होता. ''तसं झालं तर मी केलेल्या पावाला कोणी हात लावणार नाही.''

थोडक्यात सांगायचं म्हणजे मी तिला कशीबशी शांत केली. ''ठीक आहे.'' ती म्हणाली, ''बस्स झालं एवढं. आता जरा पड. जा तडफड तिथं.''

दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्या उमेदवाराला बाजूला बोलावून म्हटलं, ''हे बघ, यार, माझ्या बोलण्याकडे लक्ष दे'' असं म्हणून त्याला बरंच सांगितलं व अखेर विचारलं, ''मग काय म्हणणं आहे तुझं?''

तो माझ्याकडे अशा रीतीने पाहू लागला, की मी जणू काय छपरातूनच एकाएकी त्याच्यापुढे येऊन आदळलो होतो.

''मी शपथपूर्वक सांगतो.'' तो म्हणाला, ''तू एखाद्या जडीबुटीवाल्या वैद्याकडे जावं हे बरं. मला वाटतं, तुझा एखादा स्क्रू ढिला आहे, पण मी याची वाच्यता कोणाजवळ करणार नाही.'' परीस्थिती ही अशी होती.

माझी ही लांबलचक कहाणी थोडक्यात सांगायची तर असं, की मी माझ्या बायकोबरोबर वीस वर्षे काढली. तिला चार मुली व दोन मुलगे मिळून एकंदर सहा मुलं झाली. अनेक भानगडी झाल्या, पण मी डोळे व कान मिटून घेतले होते. मी सगळ्या गोष्टींवर विश्वास ठेवला. बस्स. गुरुजी मला अलीकडेच म्हणाले, की ''श्रद्धा ही हितकारकच असते. संत हा श्रद्धेवरच जगतो, असं लिहून ठेवलं आहे.''

एकाएकी माझी बायको आजारी पडली. क्षुल्लक कारणानंच सुरुवात झाली; म्हणजे तिच्या छातीवर एक फोड आला. पण ती फार दिवस जगणार नाही असं स्पष्ट दिसू लागलं. मी तिच्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला. या सुमारास माझ्या मालकीची बेकरी होती व मला फ्रॅमपोल गावातील सधन गृहस्थ म्हणून लोक समजू लागले होते, हे सांगायचं राहिलंच होतं. रोज वैद्य येई व पंचक्रोशीतील प्रत्येक पंचाक्षरी मी बोलवून आणला. त्यांनी जळवा

लावण्याचं ठरविलं, तुंबड्याही लावल्या. लब्लिनहून डॉक्टरला आणलं. पण आता फार उशीर झाला होता. मरणापूर्वी तिनं मला आपल्या बिछान्याजवळ बोलवून म्हटलं, ''गिंपेल, मला क्षमा कर.'' मी म्हटलं, ''क्षमा करण्यासारखं काय आहे? तू चांगली व पतिव्रता बायकोप्रमाणे वागलीस.'' ''हाय, गिंपेल, मी तुला आतापर्यंत एकसारखं ठकवीत आले. फार वाईट झालं माझ्या हातून. आता स्वच्छ होऊन मला देवाकडे जायचं आहे आणि म्हणून तुला सांगावं लागतं, की ही मुलं तुझी नाहीत.''

माझ्या डोक्यावर एकाएकी दंडुक्याचा प्रहार झाला असता, तरीदेखील मी इतका गोंधळून गेलो नसतो.

''मग कोणाची आहेत ती?'' मी विचारलं.

''मला माहीत नाही.'' ती म्हणाली, ''पुष्कळ येऊन गेले... पण मुलं तुझी नाहीत.'' हे बोलणं होताचं तिचं डोकं लडबडू लागलं, तिनं डोळे फिरविले व एलकाचा अवतार संपला. तिच्या फिकट ओठांवर मात्र हसू रेंगाळत होतं.

मला वाटलं, मेल्यानंतरही ती म्हणत आहे, ''मी गिंपेलला फसवलं. माझ्या आयुष्याचं हेच सार होतं.''

सुतकाचा काळ संपल्यावर. एका रात्री पिठाच्या पोत्यावर मी निजलो असता मला स्वप्न पडलं. पापाचं मूर्तिमंत पिशाच माझ्यापुढं प्रकट झालं व मला म्हणालं, ''गिंपेल, असे झोपतोस काय?''

''मग मी काय करावं म्हणतोस?'' मी विचारलं.

''अरे, सगळं जग तुला ठकवीत आहे;'' ते म्हणालं, ''आता तू उलट सगळ्या जगाला ठकविलं पाहिजेस.''

''मी सगळ्या जगाला कसा फसवू शकेन !'' मी त्याला विचारलं.

''तूं बादलीत दिवसभर आपली लघवी जमा कर, आणि ती रात्री कणकेत ओत. फ्रॅमपोलच्या पवित्र लोकांना खाऊ दे ती घाण.'' ते म्हणाले.

''मी परलोकात गेल्यावर मला शासन होईल त्याची काय वाट ?'' मी म्हणत.

''परलोक वगैरे काही अस्तित्वातच नाही.'' ते म्हणाले, ''त्यांनी तुला बनवले व बोलून बोलून तुझ्या पोटात मांजर आहे असं तुला वाटायला लावलं, काय हा मूर्खपणा!''

''ठीक आहे.'' मी म्हटलं, ''ईश्वर तरी आहे ना?''

''ईश्वरदेखील नाहीं.''

''मग आहे तरी काय?''

''एक दलदल.''

बकऱ्याची दाढी व शिंगं, लांब सुळे व शेपूट असलेला हा पापाचा प्रतिनिधी माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला होता.

त्याचे हे शब्द ऐकल्यावर त्याची शेपूट पकडून त्याला खेचावं असं मला वाटलं; पण प्रत्यक्ष झालं काय, तर मी पिठाच्या पोत्यावरून खाली कोसळलो व माझी एक बरगडी चांगलीच दुखावली. त्याच वेळी मला लघवीला लागली होती व त्यासाठी जाताना वाटेत मला फुगत चाललेली कणीक दिसली. ती मला जणू म्हणत होती, ''हं, होऊ दे.'' थोडक्यात म्हणजे मी ती गोष्ट केली.

पहाटेस हाताखालचा नोकर आला. त्याने व मी कणीक तिंबली, तीवर क्युमेल शिंपडले व पाव तयार करून भाजण्यासाठी भट्टीत घातले. त्यानंतर नोकर निघून गेला व मी एकटाच भट्टीशेजारच्या खड्ड्यात चिरगुटांच्या ढिगावर बसलो. "छान, गिंपेल,'' मी मनाशी म्हटलं,

''लोकांनी तुला लज्जास्पद बनविलं त्याचा तू चांगला सूड घेतलास.'' बाहेर बर्फ चमकत होतं, पण आत भट्टीच्या जवळ चांगली ऊब होती. जाळाने माझा चेहरा गरम झाला होता. मी छातीवर डोकं वाकवलं आणि मला डुलकी लागली.

लगेच मला स्वप्न पडलं व दफनाच्या कपड्यात गुंडाळलेली एलका मला दिसली. ती म्हणाली, ''हे तू काय केलंस, गिंपेल?''

मी तिला म्हणालो, ''हे सर्व तुझ्यामुळे'' आणि मी रडू लागलो.

''मूर्खा! वेडप्या!'' ती म्हणाली, ''अरे, मी लबाड असले, तर बाकी सर्वही लबाडच आहेत की काय? मी स्वतःखेरीज कोणालाही कधी फसवलं नाही, त्यासाठी मी इथे शासन भोगीत आहे. इथं कोणालाही क्षमा मिळत नाही.''

मी तिच्या चेहऱ्याकडे पाहिलं. तो काळाठिक्कर होता. मी दचकून जागा झालो व बसून राहिलो. सर्व काही ताजव्यात हेलकावत आहे असं मला जाणवलं. एकच चूक आणि शाश्वत जीवन गमावण्याचा प्रसंग. पण परमेश्वरानं मला मदत केली. मी लांब झाऱ्याने भट्टीतले पाव काढले, ते बाहेर अंगणात नेले व बर्फाच्छादित जमिनीत खड्डा खणू लागलो. तेवढ्यात नोकर परत आला व त्यानं विचारलं, ''मालक, हे काय करता आहा?'' त्याचा चेहरा प्रेतवत पांढराफटक झाला होता.

''मी काय करतो आहे हे मला पूर्णपणे समजतंय.'' मी म्हटलं व त्याच्यादेखत ते पाव जमिनीत गाडून टाकले.

नंतर मी घरी गेलो. जमवलेली पुंजी बाहेर काढली व मुलांच्यात वाटून टाकली.

''मी तुमच्या आईला रात्री पाहिलं. बिचारी अगदी काळी होत चालली आहे.'' मी म्हटलं.

ते आश्चर्याने इतके स्तंभित झाले, की त्यांच्या तोंडून एकही शब्द फुटेना.

''चांगले राहा व गिंपेल म्हणून कोणी होता हेहि विसरून जा.'' मी कोट घातला, बूट चढविले, प्रार्थनेच्या वेळी पांघरावयाची शाल असलेली बॅग एका हातात घेतली व दुसऱ्या हातात काठी घेतली. लोकांनी मला रस्त्यात पाहिलं, तेव्हा त्यांना मोठं आश्चर्य वाटलं.

''कुठे निघालास?'' त्यांनी विचारलं.

''जगात.'' मी उत्तर दिलं आणि अशा रीतीने मी फ्रॅमपोल गाव सोडला.

मी देशभर भटकलो. चांगल्या लोकांनी माझी उपेक्षा केली नाही. पुष्कळ वर्षांनी मी म्हातारा झालो. केस पांढरे झाले. मी पुष्कळ ऐकलं. खोट्या गोष्टी व थापा. पण मी जितका जास्त जगलो तितकं मला कळत गेलं, की खरोखर जगात खोटं असं काही नाही. जे प्रत्यक्षात घडत नाही ते रात्री स्वप्नात दिसतं; एकाच्या बाबतीत जे घडत नाही, ते दुसऱ्याच्या बाबतीत घडतं; आज नाही, तर उद्या; पुढल्या वर्षी नाही, तर शंभर वर्षांनंतर. त्यामुळे काय फरक पडणार! पुष्कळदा मी गोष्टी ऐकाव्या व म्हणावं, ''अं: असं घडणं शक्यच नाही; पण वर्ष संपण्याच्या आत ऐकू यायचं, की तसं कुठंतरी खरोखरच घडलं. निराधार व काल्पनिक गोष्टींतही एक प्रकारचं सत्य असतंच.''

या ठिकाणाहून त्या ठिकाणी जात असता, अनोळखी लोकांबरोबर जेवत असता असं पुष्कळदा घडतं, की मी पिशाच, जादूगार, पवनचक्क्या वगैरेंबद्दल अशक्यप्राय अशा काल्पनिक गोष्टी सांगत असतो. मुलं माझ्या मागं धावतात व म्हणतात, ''आजोबा, आम्हाला एक गोष्ट सांगा.'' कधीकधी ती मला विशिष्ट गोष्टी सांगायला सांगतात व मीही त्यांना नाखूश करीत नाही. एक बोधल्या पोरगा मला एकदा म्हणाला, ''आजोबा, पूर्वी सांगितलेली गोष्टच आज पुन्हा तुम्ही सांगितलीत.'' त्या लुच्च्या पोरानं बरोबर पकडलं मला!

हीच गोष्ट स्वप्नांची. फ्रॅमपोल सोडल्याला आतां खूप वर्षे झाली. पण डोळे मिटताच मी तिथं जातो. आणि मला कोण दिसतं असं वाटतं तुम्हाला? एलका. आमच्या पहिल्या भेटीच्या वेळी उभी होती, तशीच ती धुण्याच्या टबपाशी उभी आहे. पण तिचा चेहरा तेजस्वी आहे व डोळे एखाद्या साधुपुरुषाच्या डोळ्याप्रमाणे चकाकत आहेत. ती कुठलेतरी अनोळखी शब्द माझ्याशी बोलत आहे व मला दूरदेशींच्या गोष्टी सांगत आहे. जागा झालो, की या सर्व गोष्टी मी विसरतो, पण जोपर्यंत स्वप्न चालू असतं तोवर माझ्या मनाला आराम वाटतो. ती माझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं देते आणि सगळ्यांचा निष्कर्ष हा, की सर्व काही ठीक आहे. मी रडतो व याचना करतो, की ''मला तुझ्यापाशी येऊ दे गं.'' ती माझं सांत्वन करते व धीर धरण्यास सांगते. म्हणते, आता ती वेळ जवळ आली आहे; दूर नाही. ती मला कुरवाळते, माझं चुंबन घेते आणि माझ्या चेहऱ्याला आपला चेहरा भिडवून, अश्रू ढाळते. मी जागा होतो तेव्हा तिच्या ओठांचा स्पर्श व तिच्या आसवांच्या खारटपणाची चव मला जाणवत राहाते.

खरोखर, हे जग पूर्णपणे काल्पनिक आहे यात शंकाच नाही. पण खऱ्या जगापासून ते फक्त एका टप्प्यावर आहे. मी ज्या खोपटात राहतो, तेथे एक फळी उभी करून ठेवली आहे. तीवरून मेलेल्या लोकांना नेण्यात येतं. त्या खड्डा खणणाऱ्या यहुद्याचं फावडं तयार आहे.

थडगे माझी वाट पाहात आहे व जमिनीतले किडे भुकेलेले आहेत. प्रेतावर आच्छादण्याचे कापडही तयार आहे व ते नेहमी मी माझ्या भिक्षेच्या झोळीत वागवितो. माझ्या जीर्ण चटईवर आणखी एका भिकारड्याची नजर आहे. वेळ आली, की मी आनंदानं जाईन. तिथं जे असेल खरंखुरं, साधंसुधं, हास्यास्पद नसलेलं आणि फसवाफसवीचं नसलेलं असं असेल. परमेश्वराचं स्तवन केलं पाहिजे; एवढ्यासाठी, की तिथं गिंपेलचीदेखील फसवणूक होणार नाही.

(आयझॅक बेहावीस सिंगर, विशाखा, दिवाळी, १९५३)

○○○

९५

श्वाईट्झरचे संस्कृतीविषयक तत्त्वज्ञान

-निसिम ईझेकील

श्वाइट्झर (Schweitzer) हा एक विद्यमान जर्मन तत्त्वज्ञ व संत आहे. इ. स. १९३२ मध्ये 'संस्कृतीचे तत्त्वज्ञान' (Philosophy of Civilization) या त्याच्या पुस्तकाचा प्रथम भाग इंग्लिशमध्ये अनुवादरूपाने प्रसिद्ध झाला. या पहिल्या भागात 'संस्कृतीचा अपक्षय व उद्धार' (Decay and the Restoration of Civilization) हा विषय आला आहे. या विषयावरील अत्यंत सुलभ, गंभीर आणि प्रेरणाशील निबंधांपैकी हा एक निबंध आहे. श्वाइट्झर हा साधा, गंभीर व प्रेरणाशक्तीने संपन्न असलेला माणूस असून याने आपले जीवितही ध्यानात भरण्यासारखे घालविले आहे. वयाच्या चोविसाव्या वर्षी हा तत्त्वज्ञानात पीएच. डी. झाला आणि नंतर लगेच दोन वर्षांनी 'ऐतिहासिक येशूचा शोध' या विषयावर संस्मरणीय प्रबंध लिहून धर्म या विषयावरील पीएच. डी. ही पदवी त्याने मिळविली. त्यानंतर त्याने सेंट पॉलवरील दोन ग्रंथ, बाखचे प्रमाणशुद्ध चरित्र आणि वाद्यांवरील निबंध लिहिले. युरोपातील एक श्रेष्ठ वाद्यनिपुण म्हणून तो प्रसिद्ध आहे. शिवाय आत्मचरित्र, गटेवरील निबंध आणि भारतीय तत्त्वज्ञानाचे समालोचन ही पुस्तके त्याने लिहिली आहेत.

ही त्याची कामगिरी महत्त्वाची आहेच. परंतु याहीपेक्षा चमत्कृतिजनक अशी गोष्ट त्याच्यासंबंधी नमूद करण्यासारखी आहे. त्याने तिसाव्या वर्षी वैद्यकीय शिक्षणाकरिता पुनः महाविद्यालयात प्रवेश केला. ७ वर्षे वैद्यकीय शिक्षण घेऊन विषुववृत्तावरील फ्रेंच आफ्रिकेत येऊन राहिला. तेथे तेव्हा एकही डॉक्टर नव्हता. या निबिड जंगली प्रदेशात त्याने एक रुग्णालय भूतदयेच्या आजीव व्रताने चालविले आहे. समाजाने केलेल्या पापाकरिता हा स्वतः प्रायश्चित्त आचरीत आहे. तो म्हणतो: 'काळ्या माणसांवर गोऱ्या जातींनी जे अत्याचार करून अनाचार केले, त्यांची ही निष्कृती होय.' याच ठिकाणी संस्कृतीविषयक तत्त्वज्ञानाचा चौथा अखेरचा भाग लिहून तो पुरा करीत आहे.

आफ्रिकेत त्याने जे परिश्रम चालविले आहेत, त्याची कथा मी सांगू इच्छीत नाही

किंवा त्याचे मूल्य आणि मर्महीही सांगत नाही. जिज्ञासूंनी त्याकरिता त्याच्या आत्मचरित्राचे सुप्रसिद्ध चार ग्रंथ वाचावेत. श्वाइट्झरच्या भारतीय तत्त्वज्ञानाच्या समालोचनाचे पुस्तक कोणीतरी भारतीयाने पुनः जरूर प्रसिद्ध करावे. त्याच्या लॅम्बन येथील रुग्णालयाचे सुरस चित्रण करणारे वृत्त अत्यंत सुप्रसिद्ध आहे.

त्याने लिहिलेले संस्कृतीचे तत्त्वज्ञान, डॉक्टर होण्याचा त्याचा निर्धार आणि आफ्रिकेतील त्याचे सेवेचे व्रत या तीन गोष्टींच्या संबंधात येथे दोन मुद्दे लक्षात ठेवले पाहिजेत. पहिला मुद्दा असा की, वयाच्या २१ साव्या वर्षीच तत्त्वज्ञानासंबंधी चिंतन करण्याचा त्याने निर्णय घेतला, वैद्यक शिकत असताच तत्त्वज्ञानातील महत्त्वाच्या विषयांचा अभ्यास पुरा केला. या अभ्यासात नंतर व्यत्यय येऊ नये म्हणून त्याने अगोदरच खबरदारी घेतली. त्याच्या विचारांवर गटेच्या जीवनाचा फारच परिणाम झाला होता. गटेच्या जीवनाचे अनुकरण तो करीत आहे, हे तो विनयाने कबूल करतो. तो लिहितो: "गटेचे असे सांगणे आहे की, प्रत्यक्ष कामावाचून शुद्ध बौद्धिक व्यासंग करताच येणे शक्य नाही. प्रत्यक्ष काम आणि बौद्धिक व्यासंग यांचा साक्षात स्वाभाविक संबंध नसला आणि साम्य नसले तरी या अगदी पृथक गोष्टींचा सांधा व्यक्तीच्या जीवनात जुळलेला असतो." श्वाइट्झर म्हणतो की "डोक्यात बौद्धिक कार्याच्या प्रचंड योजना चालत असताच शहराच्या कारभाराचे हिशेब गटे तपासीत असे; शहराच्या सांपत्तिक उलाढालीत सुव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न तो करीत असे; नवे रस्ते आणि पूल तयार करण्याकरिता रेखाटलेल्या योजना तपाशीत असे; आणि प्रतिवर्षी निरुपयोगी झालेल्या खाणी पुनः सुरू कराव्या म्हणून झटत असे."

प्रत्यक्ष काम करण्याकरिता श्वाइट्झरने आफ्रिकाच का निवडली यासंबंधी फार थोडे सांगता येईल. जर्मनीतील कोलमर या गावी मूर्तिकार बार्थोल्डी याने आफ्रिकन निग्रोची तयार केलेली प्रतिमा त्याच्या लहानपणीच पाहण्यात आली. त्या वेळी ज्या भावना त्याने अनुभविल्या त्यांच्यात या गोष्टीचे मूळ आहे. हा केवळ योगायोगही म्हणता येईल. अशाच तऱ्हेच्या भावना चिनी जनतेच्या यातना किंवा तांबड्या इंडियनांच्या दुर्दैवाचा विपाक पाहूनही उत्पन्न झाल्या असत्या. परंतु असे म्हणता येते की, खिश्चन संस्कृतीने आफ्रिका खंडावर जो पद्धतशीर अत्याचार केला, तोच श्वाइट्झरच्या आफ्रिकेतील चळवळीचे मूळ होय. किंवा असेही म्हणता येईल की, सेवेच्या दृष्टीने आफ्रिका हे अत्यंत नवे क्षेत्र आहे. अथवा काळ्यागोऱ्यांचा जो विशिष्ट संबंध तेथे आढळतो तो या सेवेचे महत्त्वाचे कारण ठरतो.

श्वाइट्झरच्या संस्कृतीविषयक कल्पना

बाकी काही का असेना, आपणांस येथे श्वाइट्झरच्या संस्कृतीसंबंधीच्या कल्पना आणि त्याचं आधारभूत सामान्य तत्त्वज्ञान एवढ्याशीच कर्तव्य आहे. जीवनाची पूज्यता हे त्याचे तत्त्वज्ञान होय.

येथे त्याचे बाखवरील लेखन आणि धर्मनिबंध संदर्भ म्हणून निर्दिष्ट केलेले नाहीत असे वाचकांनी समजावे.

त्याच्या विचारसरणीचे सार सांगणे कठीण आहे. कारण त्याने ती अत्यंत साररूपाने सांगितली. त्याने आधारग्रंथ घेतले नाहीत किंवा कसलीही सजावट केली नाही. तो म्हणतो: "नैतिक अधिष्ठानाशिवाय संस्कृती अस्तित्वातच राहू शकत नाही. हे अधिष्ठान तत्त्वज्ञानच निर्माण करू शकते. विश्वविषयक सिद्धांत रचीत असता किंवा विश्वाचे सत्य चित्र रेखाटीत असता त्यातच नैतिक आदर्शाप्रत येऊन पोचते, असे नैतिक आदर्शाप्रत पोचणे हे तत्त्वज्ञानाचे अंतिम कार्य होय. हे कार्य करीत असता तत्त्वज्ञानाला यश आले तर जगाची प्रगती होते. अपयश आले तर जगाचा अपक्षय होतो. परंतु वर्तमानकाळी तत्त्वज्ञानाने अशी मौलिक विचारशक्ती गमावली आहे. तत्त्वज्ञानाचा इतिहास, हेच स्वरूप तत्त्वज्ञानाला आले आहे. म्हणून त्याच्यापासून सर्वत्र निश्चयात्मक बुद्धी उत्पन्न होत नाही. अठराव्या शतकात याच्या उलट होत होते. तशी परिस्थिती पुष्कळ ठिकाणी न राहिल्यामुळे संस्कृती जगणे अशक्य होत आहे."

आज तत्त्वज्ञान विश्वविषयक सामान्य सिद्धांत सांगत नाही; परंतु तसा सिद्धांत तत्त्वज्ञानाने शोधलाच पाहिजे; त्या बाबतीत विश्रांती उपयोगी नाही; निदान नैतिक आदर्श देण्याकरिता तरी त्याने झटलेच पाहिजे. नैतिक आदर्शांची जी स्वाभाविक शक्ती आहे, तिचे पोषण त्याने केले पाहिजे. तत्त्वज्ञानाने असा सतत आग्रह धरला पाहिजे की, नैतिक आदर्श हे समाजाच्या बाह्य संघटनेला आवश्यक आहेतच. निरंतर चालावयाचे नैतिक प्रयत्न वर्तमानकाळात तुरळक होत चालले आहेत. भौतिक प्रगतीच्या स्पर्धेत स्वतंत्र जीवन जगणाऱ्या माणसांची संख्या घटत चालली आहे, हे त्याचे कारण होय. मनुष्य कसा असावा, यासंबंधाची कल्पना संकुचित होऊ गेली आहे. समाजाची बाह्य रचना हेच सर्वस्व बनल्यामुळे व्यक्तीचे महत्त्व फार थोडे शिल्लक राहिले आहे. अमानुषता पूर्णतेस पोचण्याला कालावधी थोडा उरला आहे.

श्वाइट्झर म्हणतोः ''व्यक्तित्वाकडे दुर्लक्ष कराल तर स्वतंत्रतेचे व विचाराचे मोल नाहीसे कराल आणि संघटनेचा पराभव होईल, वैयक्तिक निर्णय आणि नीतिमत्ता सामुदायिक निर्णयात आणि नीतिमत्तेत बुडून जाईल. सुसंस्कृत दिसणाऱ्या परंतु आतून रानटी असलेल्या आधुनिक राज्यांतील बहुसंख्य नागरिक 'आपण स्वतः नीतिसंपन्न व्यक्ती आहोत की नाही', या गोष्टीचा विचारच करावयास तयार नाहीत. त्यांना असे भय वाटत असते की, असे केल्याने भोवतालच्या माणसांशी सारखा विरोध होत राहील. बुद्धिवाद आणि तत्त्वज्ञान यांचा जेव्हा जमाना होता तेव्हा, बुद्धी आणि नीती यांच्यावर समाजाचा विश्वास होता; त्यामुळे समाज व्यक्तीला मदत व मान्यता देत असे. सामान्य जनता आणि विशिष्ट व्यक्ती यांच्यामध्ये मेळ होता. या बाबतीत सध्या कुचंबणा होत आहे. सामान्य जनतेला आपण

शरण जात आहोत; आपला मतभेद दाबून टाकीत आहोत. जनतेला पूर्णतेकडे नेणारी शक्ती, या नात्याने आपण वागत नाही.''

''श्वाइट्झरला वाटते की, आपली सत्यावरची श्रद्धा उडाली आहे आणि मजबूत मूल्ये शिल्लक नाहीत म्हणून हा गोंधळ उडत आहे. ही परिस्थिती अधिक बिघडत आहे. याचे कारण संबंधांचा व्यत्यास किंवा उलटापालट होय. भौतिक आणि आध्यात्मिक यांच्या संबंधाचा व्यत्यास होय, असे तो म्हणतो. परिस्थिती निर्माण केली म्हणजे त्यातून आध्यात्मिक संबंध निर्माण होतो, असे आपल्या काळात समजले जाते. वस्तुतः मूल्यवान् आध्यात्मिक तत्त्वच वस्तुस्थितीवर प्रभाव गाजवते आणि स्वतःस पूरक अशी परिस्थिती निर्माण करते. ही श्रद्धा श्वाइट्झरच्या जीवनाची आणि लेखनाची संतत प्रेरणा बनली आहे.

विवक्षित प्रकारचा तथाकथित कार्यक्रम ज्यात नाही अशा एक प्रकारच्या क्रांतीला श्वाइट्झर आवाहन देतो. ''जेव्हा सर्वसामान्य जनसमुदायाच्या मनःस्थितीपेक्षा स्वतंत्र अशी मानसिक संवेदना अनेक व्यक्तींच्या ठिकाणी निर्माण होईल तेव्हा ती संवेदना जनसमुदायावर प्रभाव गाजवू लागेल आणि जनसमुदायाच्या मनाला अखेरीस नवा आकार देईल.'' रानटीपणाचा आपणांवर जो हल्ला सुरू आहे, त्याच्यापासून ही नैतिक चळवळच आपला बचाव करील. नैतिकता केवळ व्यक्तींच्या ठिकाणीच उगम पावते, असे श्वाइट्झर घोषित करतो. वस्तूविषयक सामान्य तत्त्वज्ञानातूनच ही चळवळ अखेरीस सामर्थ्य मिळविते, अशा तत्त्वज्ञानावाचून वैयक्तिक आणि सामाजिक जीवन अस्वस्थ व आजारी बनते. आत्म्याला ज्या शक्तीकडून मार्गदर्शन होत असते त्या शक्तीच्याच ठिकाणी हे रोगट अस्वास्थ्य उत्पन्न होते.

श्वाइट्झरचे असे मत आहे की, विश्वविषयक सिद्धांत हे केवळ विचाराचे कार्य असते, ते ऐतिहासिक शक्तीचे नसते किंवा आर्थिक परिस्थितीच्या दडपणाचेही नसते. अठराव्या शतकाला मानवेतिहासात तो उच्च स्थान देतो. कारण विचारांवरील विश्वास आणि सत्याविषयी पूज्यता हे भाव त्यात होते. भावनेची श्रेष्ठता गाणाऱ्या भावनावादा (Romanticism) ने बुद्धिवादाच्या अतिरेकावर टीका करून उपयुक्त कामगिरी केली आहे. परंतु बुद्धीचे रहस्य समजण्याला त्या वादाच्या योगाने अडथळा येता कामा नये. कोरडा बुद्धिवाद आंतरिक जीवनाची विविध आंदोलने थांबवितो, हा बुद्धिवाद खरा बुद्धिवादच नव्हे. बुद्धी ही आत्म्याच्या सर्व सजीव कार्यांचा स्वतःमध्ये समावेश करते; बुद्धीत विचारशक्ती आणि इच्छाशक्ती यांचा चमत्कारपूर्ण संगम होत असतो; त्याच्या योगाने आध्यात्मिक जीवन विशिष्ट तऱ्हेने आकारास येते.

बुद्धिवादातील वैगुण्ये

बुद्धिवादाने जेवढे यश संपादन केले तेवढे इतर कोणत्याही मानवेतिहासातील चळवळीने संपादन केले नाही, असे सांगून श्वाइट्झर पुढे म्हणतो की, विश्व व माणूस यासंबंधी

बुद्धिवादाची दृष्टी अपुरी आहे. विश्व व मनुष्य या संबंधावरील विचारसरणीपेक्षा विश्व व समाज यांच्या संबंधाची विचारसरणी हीच विश्वविषयक विचारसरणी म्हणून बुद्धिवाद देतो. उलट आध्यात्मिक अनुभववाद योग्य तऱ्हेने निश्चित करून सांगतो की, चिंतनद्वाराच विश्वदृष्टी प्राप्त होते. या चिंतनात मनुष्य एकटाच विश्वाशी व स्वतःशी संलग्न राहतो. या विश्वदृष्टीत नीतितत्त्वाचा अभाव असतो. श्वाइट्झरचे मत असे आहे की, विश्वाच्या ज्ञानापासून नीतिशास्त्र निष्पन्न होत नाही. आणखी तो असेही म्हणतो की, मनुष्यासंबंधीचे ज्ञान नीतिशास्त्राचा आधार आहे. परंतु विश्वाच्या नियमाशी मनुष्यविषयक ज्ञान सुसंगत आहे, असे दाखविता येणे अशक्य आहे. त्याच्या तत्त्वज्ञानाचा एक मूलभूत मुद्दा असा आहे की, फक्त विचार करणारी बुद्धी जीवनज्ञानाचे साधन आहे, असे म्हणता येत नाहीं. जीवनज्ञान हे इच्छाशक्तीचे कार्य आहे. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य दोन्ही तत्त्वज्ञानांचा प्रश्न व उद्देश आध्यात्मिक अनुभव प्राप्त करून घेणे हा आहे. नीती आणि जीवनाचा महिमा यांची मिळणी त्यात असते.

बुद्धिवाद ही केवळ ऐतिहासिक चळवळ किंवा घटना नाही. सर्व आध्यात्मिक जीवनाचा तो आविष्कार आहे, असे श्वाइट्झरचे मत आहे. परंतु पुढे जाऊन तो असेही म्हणतो की, आध्यात्मिक अनुभववाद हाही वैचारिकतेचा आवश्यक भाग आहे. आतापर्यंत बुद्धिवाद - (Rationalism) आणि आध्यात्मिक अनुभववाद(Mysticism) हे परस्परांचे प्रतिपक्षी म्हणून राहिले आहेत; परंतु वस्तुतः तो प्रत्येक वाद स्वभावतःच अपुरा आहे. ते अन्योन्याश्रित आहेत. तत्त्वज्ञानाने नवी सफर प्रारंभिली पाहिजे, वाटेल ते झाले तरी ते सहन करण्यास तयार असले पाहिजे. बुद्धिवाद व आध्यात्मिक अनुभववाद यांच्यातील मौलिक सत्यांना धक्का बसणार नाही अशी काळजी घेणारी विश्वदृष्टी निर्माण करण्याकरिता प्रयत्न केला पाहिजे.

मूलभूत अशा तीन आवश्यकतांची परिपूर्ती करण्याकरिता विश्वदृष्टी घडविली पाहिजे : जगत आणि जीवन यांच्या आस्तिक्यबुद्धीवर ती आधारली पाहिजे; ती नैतिक असली पाहिजे; आणि आध्यात्मिक अनुभव व बुद्धी या दोहोचेही रक्षण तिच्यात व्हावयास पाहिजे. अगदी सोप्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे अस्तित्व हे नास्तित्त्वापेक्षा अधिक चांगले असा जग व जीवन याविषयीच्या आस्तिक्यबुद्धीचा अर्थ आहे. भारतीय तत्त्वज्ञानात ही आस्तिक्यबुद्धी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सतत विद्यमान आहे. पण ती क्वचितच प्रभावी असते. विश्व आणि जीवन यांचे नास्तित्व मांडणारा दृष्टिकोन अव्यवहार्य असून अस्तित्वबुद्धीला पदोपदी सवलत देण्यास तो तयार असतो. भारतीय तत्त्वज्ञानातील या दोन्ही प्रवृत्ती आध्यात्मिक अनुभववादाला चिकटतात, असे श्वाइट्झरने मान्य केले आहे. या दोन विरोधी प्रवृत्तींतील शाश्वत विग्रह हे भारतीय तत्त्वज्ञानाचे असमान्य वैशिष्ट्य असून त्यामुळे त्याची वाढ झाली आहे, असे श्वाइट्झर प्रदर्शित करतो. राधाकृष्णन यांनी श्वाइट्झरवर जी टीका केली आहे, त्यातून हा मुद्दा सुटला आहे, असे वाटते.

श्वाइट्झरचे भारतीय तत्त्वज्ञानाचे समालोचन फार आकर्षक आहे. त्याचा परामर्श मी येथे

घेऊ शकत नाही. या समालोचनात आश्चर्य वाटावे इतका अद्ययावत आढावा त्याने घेतला आहे. त्यात राजा राममोहन रायपासून गांधी व टागोर यांच्यापर्यंतचे आधुनिक भारतीय विचारवंत आले आहेत. तत्संबंधी त्याचे निर्णय अंतर्भेदी, विवेकयुक्त आणि नावीन्यपूर्ण आहेत. इतर कोणत्याही पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्याने इतका अलिप्तपणे भारतीय विचारांचा परामर्श घेतला नसेल. तो ही गोष्ट स्वच्छपणे सांगतो की, 'माझी त्यावरील टीका म्हणजे त्यांच्या माहात्म्याचा गौरव होय, नकार नव्हे. तुलनात्मक तत्त्वज्ञानाचा अंतिम उद्देश समन्वय हा असतो; एका परंपरेचे समर्थन करून दुसऱ्या परंपरेचे खंडन करणे, हा नव्हे.'

जीवनाचे पूजन

श्वाइट्झरने आपल्या तत्त्वज्ञानास 'जीवनाचे पूजन' असे अभिधान दिले आहे. विश्व आणि जीवन यांच्याविषयी आपणांमध्ये नैसर्गिकपणे असलेली आस्तिक्य बुद्धी हा त्याचा पाया आहे. कारण जगण्याच्या स्वाभाविक वासनेशी ती सुसंगत आहे, असे तो म्हणतो. ती नीतीला जितका जितका अवसर देते, तितका तितका शून्यवादाचा ती पराभव करते. नीतिशास्त्राची अशी मागणी असते की, माणसाने या जगाची आस्था बाळगून ते सुधारण्याचा प्रयत्न करावा. निवृत्तिवादी नीतिशास्त्राच्या विरोधी असलेली सक्रिय प्रेमरूपी नीती स्वानुभूतीने जेव्हा भरलेली असते, तेव्हा प्रेमाच्या कार्याची भरभराट आपोआप होऊ लागते, ती टाळता येत नाही.

श्वाइट्झरच्या कल्पनांचा काटेकोर मोजता येणारा अभिप्राय जितका आहे, त्याच्यापेक्षा त्यातील भावार्थ अधिक व्यापक आहे. कारण प्रत्यक्ष कृतीचे पाठबळ त्या कल्पनांना मिळाले आहे. आफ्रिकेतल्या जंगलात प्रगत झालेली ही मानवमूर्ती त्या कल्पनांशी अविभाज्यपणे संलग्न आहे. या मानवमूर्तीच्या भोवती काही गोऱ्या थोड्या सेविका आणि डॉक्टर आणि स्वतः सेवेस वाहून घेतलेल्या काळ्या माणसांचा छोटासा गट आहे. हा माणूस रोज उषःकाली संस्कृतीविषयक चिंतनाच्या वंदनीय तजोवलयात स्थिरावलेला दिसतो; त्या उष्ण प्रदेशांतील त्याची रात्र बाखच्या सुरेख संवादी स्वरांच्या संगीतलहरींनी भरून राहिलेली असते.

श्वाइट्झरच्या लिखाणावरून केवळ त्याच्या विचारांचीच उच्चता ठसत नाही तर विचार ही वस्तुच किती थोर आहे, हे ठसते, याबद्दलची त्याला खोल जाणीव आहे. विचार हा कठीण व माहात्म्यशाली असतो, याची त्याला खोल जाणीव आहे. वास्तविक रूपाने विचार खराखुरा म्हणून जेव्हा अस्तित्वात यतो तेव्हा त्याचा विषय काय आहे हा प्रश्न नसतो, तो स्वतःच महत्त्वाचा असतो, याची त्याला खोल जाणीव आहे. विचार माणसाला एक तर कष्टी बनवितो किंवा आनंद देतो, याची त्याला खोल जाणीव आहे. एके ठिकाणी तो असे विलक्षण वाक्य लिहितो: 'विचार हा विचारशून्य असतो.' विचारामुळे आत्म्यावर संकटे ओढवतात, असा या विलक्षण वाक्याचा अर्थ आहे.

बाह्यतः परस्परविरोधी दिसणाऱ्या प्रवृत्ती हे श्वाइट्झरच्या विचाराचे एक अंग होय. उदाहरणार्थ, त्याचा असा दावा आहे की, ज्ञान हे स्वतः त्याला निराश करते; परंतु इच्छा आणि आशा उत्साहित करतात. त्याच्या विश्वविषयक ज्ञानाचा कठीण गाभा म्हणजे सार्वत्रिक संशयवाद होय. ज्यांचा आशामय कर्मयोग, विश्वाला व मानवी इतिहासाला उद्देश आहे, प्रयोजन संशयवाद होय. आहे, सार्थकता आहे, असे मानतो, त्यांच्यात हा तत्त्वज्ञ नास्तिक ठरतो. संशयवाद्यांच्यामध्येसुद्धा हा नीट बसत नाही. कारण ज्ञान, विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांच्यातून निघणारा त्याचा निराशावाद त्याच्या नैतिक व अत्यंत भावनाशील अशा आध्यात्मिक अनुभववादाशी मेळ धरून राहतो. जीवनाचे पूजन हाच त्याचा आध्यात्मिक अनुभववाद होय. संशयवादी दृष्टिकोनापासून तो किती दूरवर भटकत जातो व फारकत करून घेतो, हे त्याच्या पुढील विधानांवरून निश्चित होते. तो म्हणतो- ''जो सूर्यकिरणात चमकणाऱ्या बर्फाच्या स्फटिकाला धक्का लागू नये म्हणून जपतो, झाडाचे एकही पान हिसकीत नाही, किंवा एकही फूल खुडत नाही, तोच मनुष्य खरोखर नीतिमान होय.''

जीवन-पूजन या शब्दाने सूचित केलेले सत्य इतक्या अतिरेकाला श्वाइट्झरने नेले आहे की, मनुष्याचे वैयक्तिक आणि सामाजिक अस्तित्वच, ते सत्य उलंघिल्याशिवाय, अशक्य ठरते. यामुळे या गृहस्थाची कीव करावीशी वाटते. तो आत्मचरित्रात म्हणतो, ''येथील रहिवाशांनी वाळवंटी किनाऱ्यावर पकडलेला छोटा पाणकोंबडा मी विकत घेतला; नाहीतर क्रूरपणाने तो गेला असता. आता असा प्रश्न पडला आहे की, त्याला जगवायचे तर मासे खाऊ घातले पाहिजेत; नाहीतर त्याला उपाशी राहू द्यावा लागेल! म्हणून मी त्याला मासे खावयास देऊ लागलो. माझ्या मनाला मात्र हे आवडत नाही. एकाला जगविण्याकरिता रोज पुष्कळसे मासे मारावयाचे!'' हा नैतिक आध्यात्मिक अनुभव खरा; परंतु ही केवळ थट्टा होते. निसर्ग ओळखून जीवदया जर चालत नसेल तर तिची कीव केली पाहिजे. श्वाइट्झरसारख्या नैसर्गिकतेला मान्यता देणाऱ्या तत्त्ववेत्त्याच्या बाबतीत यामुळे किंचित आश्चर्य वाटते.

श्वाइट्झर हा नैतिक बुद्धिवादाचा पुरस्कर्ता आहे; वरील नैतिक अनुभववाद त्यापेक्षा वेगळा केला पाहिजे. नैतिक बुद्धिवादाप्रमाणे वस्तुस्थितीपुढे वाकायचे नाही. वस्तुस्थितीला शरण जाण्याची कल्पना, माणसाने ध्येयाप्रमाणे वस्तुस्थिती बदलली पाहिजे, या विचारास तिलांजली देते. आज बहुतेक लोकांचा असा विश्वास आहे की माणसाच्या कह्यात नसलेल्या शक्तीनेच परिस्थिती बनत असते. म्हणून नैतिक ध्येय व कर्मयोगी बुद्धी इतिहासाचा प्रवाह बदलण्याच्या बाबतींत असमर्थ ठरते. या असामर्थ्याच्या विचाराने दुबळेपणा आणला आहे; जे घडते ते मान्य केले जाते. परंतु श्वाइट्झरचा असा पक्का दृष्टिकोन आहे की, ध्येयवाद परिस्थितीवर अंमल गाजवू शकतो. श्वाइट्झर आणखी असेही म्हणतो की, शरणागती निर्माण करणारा विचार हेगेलने प्रथम केला. इतिहासाची गती कसलाही अडथळा न जुमानता आगाऊच ठरलेल्या उद्देशाकडे वळलेली असते, सर्व काही तदर्थ असते हा तो

विचार होय. या विचाराने आधुनिक जगात बिघाड झाला आहे. त्यानेच आधुनिक जगाचा नाश होणे संभवनीय आहे. श्वाइट्झर पुढे असे म्हणतो की, नीतीचे प्राथम्य मान्य करणारी धार्मिक विचारसरणी आज कोठेच आढळत नाही. नव्या प्रकारच्या विचाराची आज गरज आहे. ज्याच्याने नैतिक ध्येये सिद्ध होतात, तोच खराखुरा विचार. त्याची अशी श्रद्धा आहे की, नीतिशास्त्र हे अखेरीस येशूच्या धर्माकडेच जाऊन पोहोचते.

त्याच्या विचारांचा मध्यबिंदू

त्याच्या विचारांचा मध्यबिंदू अशा रीतीने सहज सापडतो. येशू ख्रिस्ताच्याद्वारे ईश्वरमय होणे हीच गोष्ट शेवटी विचाराने साधावयाची असते, अशी त्याची श्रद्धा आहे. रविवारच्या त्रिमूर्ति-पूजेपेक्षा निराळा असा दुसरा जीवनमार्गच तो कल्पू शकत नाही. तत्त्वज्ञानाचे प्रश्न सोडविण्याकरिता नव्या मार्गाने जाऊन नवी विश्वदृष्टी निर्मिली पाहिजे, असे जरी तो म्हणत असला तरी ख्रिस्ताच्या बायबलमध्येच सर्व उत्तरांतील श्रेष्ठ उत्तर आहे, असे तो समजतो. हे बंधन स्वीकारावे की नाही, हे आपले आपणच ठरविले पाहिजे. श्वाइट्झरने जे अंतिम ध्येय विचारार्थ मांडले आहे ते आपणांस कोणत्याही स्थितीत स्वीकारले पाहिजेच. परंतु ईश्वराशी एकरूप होणे हे अंतिम ध्येय अमान्य केल्यास ख्रिस्ताच्या बायबलचा आश्रय करण्याची जरुरीच राहात नाही, मग विचारमार्गच बदलतो.

श्वाइट्झरच्या तत्त्वज्ञानामध्ये अमान्य करण्यासारखे फार थोडे आहे. आध्यात्मिक अनुभववाद्यांमध्ये त्याचे वेगळेपण असामान्य आहे. बुद्धिवादाची त्याने सांगितलेली महती त्याचा वेगळेपणा दाखविते. पौर्वात्य परंपरेकडे आकर्षिलेल्या पाश्चात्त्य बुद्धिवंतांमध्ये तो एकटाच असा आहे की, जो आध्यात्मिक अनुभवावर विशिष्ट प्रकारची टीका करून त्याची समीक्षा करतो. आधुनिक मनुष्य म्हणून मिरवणारे जे शून्यवादी आणि यंत्रवादी आहेत, त्यांना संस्कृतीचा नैतिक पाया दाखवून उत्कृष्ट उत्तर देण्याचे कार्य, त्याने केले आहे.

श्वाइट्झर मनुष्यजातीची प्रत्यक्ष सेवा करून नैतिक ध्येये अमलात आणतो, म्हणून त्याचे आकर्षण विशेष वाटते. त्याने सेवेमध्ये चैतन्य आणि स्थैर्य आणले आहे. सहज थकणारा, दररोजच्या कचेरीतल्या कामात ठरावीक चक्रांत फिरणारा, यंत्राने दाखविलेले करमणुकीचे खेळ शेळपटपणे पाहात बसणारा शहरी मनुष्य या गोष्टीकडे लक्ष देईल तर चांगले. सीव्हर या लेखकाने त्याच्या जीवनाचे सार असे सांगितले आहे, "जीवनाच्या चमत्काराचे रहस्य बौद्धिक जाणिवेत नव्हे, तर गूढ अनुभूतींत, स्वार्थत्यागाने केलेल्या सेवेतच प्रकट झाले आहे." वयाच्या ७७ व्या वर्षात श्वाइट्झर आहे. परंतु आधुनिक विचाराच्या क्षेत्रात त्याला मिळावयास पाहिजे तेवढे मोठे स्थान मिळाले नाही. अलीकडे दरवर्षी त्याच्या जीवनावर व कार्यावर मासिकांमध्ये पुष्कळ लेख येत आहेत व बहुत पुस्तकेही लिहिली जात आहेत परंतु त्याचा आवश्यक तेवढा प्रभाव पडलेला दिसत नाही. तो अगदी दूर एकांतवासात राहिला आहे, हे त्याचे एक कारण असावे. परंतु अधिक महत्त्वाचे कारण असे दिसते की,

आज माणसांना जे प्रशंसनीय वाटते, ते अमलात आणण्याचे सामर्थ्य त्यांच्यात राहिलेले नाही. श्वाइट्झर म्हणतो, "या युगाचा महिमाच असा आहे की, उच्चार, आचार आणि विचार यांतील विसंगतीची आवड असावी. योग्य विचारापासून दुरावल्याचे हे लक्षण आहे. सुसंगती हे योग्य विचाराचे स्वरूप होय.

अंदाधुंदी व गोंधळ एका मर्यादेबाहेर गेला म्हणजे पुरी अव्यवस्था माजून अखेरचा स्फोट होतो. आधुनिक जगास हे लागू पडत आहे. आलबर्ट श्वाइट्झरच्या कृतीपासून आणि उक्तीपासून मार्गदर्शन मिळून तरणोपाय सापडू शकेल.

संदर्भ :

१. डॉ. आल्बर्ट श्वाइट्झर यांना 'शांतता'विषयक नोबेल पारितोषिक मिळाल्याचे काही दिवसांपूर्वी जाहीर झाले. त्या निमित्ताने डॉ. श्वाइट्झरवरील प्रस्तुत लेख वाचकांस समयोचित व उद्बोधक वाटेल. श्री. ईझेकील यांचा मूळ इंग्रजी लेख दिल्लीच्या 'Thought' या साताहिकात प्रसिद्ध झाला. प्रस्तुत अनुवाद त्यांच्या संमतीने येथे दिला आहे – का. सं.

1. Schweitzer's Autobiographical Volumes: *Memoirs of Childhood and Youth, My Life and Thought, From My African Notebook and On the Edge of the Primaeval Forest.* The publishers : Adam and Charles Black, Soho Square, London. George, Allen and Unwin. *Indian Thought and its Development*. *The Africa of Albert Schweitzer*, published by Adam and Charles Black.

(नवभारत, जानेवारी, १९५४ पृ. ५९ ते ६४)

❍❍❍

९६

मानवतावादी राजकारण

- मानवेंद्रनाथ रॉय

लोकशाहीपेक्षा अधिक चांगली राज्यपद्धती आजपर्यंतच्या राज्यपद्धतींत माणसास सापडलेली नाही. समाजाच्या राजकीय संघटनेचे जे काही प्रकार आहेत त्यांत तत्त्वतः सर्वोत्तम असलेला प्रकार हाच होय. म्हणून लोकशाहीची कल्पना पुनः स्थिरावली पाहिजे हीच वर्तमान जगाची वरिष्ठ गरज आहे. खरीखुरी लोकशाही वस्तुतः शक्य आहे काय अशा प्रकारचे आव्हान समाजाच्या कारागिरांना व राज्यशास्त्रज्ञांना अस्वस्थ करीत आहे. परंतु, उलट याच वेळी हुकूमशाहीच्या पुरस्कर्त्यांना लोकशाहीच्या कल्पनेस साधारण मान्यता देणे भाग पडत आहे. आधुनिक समाजविषयक अनुभवाच्या सांस्कृतिक प्रगतीच्या व राजकीय विचाराच्या परंपरेवर जी सार्वत्रिक व चिवट निष्ठा आहे, ती यास कारण आहे. स्वसामर्थ्याची धुंदी चढलेले हिट्लर-मुसोलिनीसारखे थोडे गर्विष्ठ लोकच राज्यविषयक तत्त्वज्ञानाच्या या मूलभूत कल्पनेस धुडकविण्याचे धाष्ट्र्य करितात. बाकीच्या लोकशाहीच्या टीकाकारांनी ज्या काही दुरुस्त्या सुचविल्या आहेत त्या एकाच सबबीवर, लोकशाही व्यवस्थेमध्ये कार्यक्षमतेचा अभाव राहू नये ही ती सबब होय. कामगार-हुकूमशाहीसही लोकशाहीच्याऐवजी पाठिंबा बराच मिळत आहे; परंतु हा पाठिंबासुद्धा का मिळतो? तर अस्सल लोकशाहीचे कामगार-हुकूमशाही हे साधन आहे, असे सांगितले जाते म्हणून. आर्थिक समतेच्या पायावर राजकीय स्वातंत्र्याची उभारणी अस्सल लोकशाही करते; ही कामगार - हुकूमशाहीच्या बळावर उभी करावयाची असा या समर्थनाचा अर्थ आहे. तात्पर्य, लोकशाही नाकारावयाची नाही, हे स्पष्ट आहे. आता हुकूमशाहीतून लोकशाही पुनः निर्माण होऊ शकेल काय, असा प्रश्न आहेच; परंतु तो अलाहिदा आहे. एवंच मुद्दा असा की, लोकशाहीचे टीकाकारदेखील लोकशाहीस मान्यता देतात. समाजाची सर्वोत्तम व व्यवहार्य संघटना म्हणजे लोकशाही- या कल्पनेस साधारण मान्यता आहेच; फुकट गेलेल्या ध्येयाकरिता झगडा म्हणजे लोकशाहीचा झगडा असे म्हणता येणार नाही, ती यशस्वी होण्याकरता कणखर, मूलगामी, प्रामाणिक आणि

आत्मविश्वासपूर्ण यत्नाची गरज आहे.

राज्य आणि व्यक्ती यांचा संबंध काय आहे, हा जुना प्रश्न नव्या पद्धतीने सोडवून लोकशाही दृढमूल केली पाहिजे. हा प्रश्न पुढे ठेवून आणखी एक पायरी मागे जाऊन संशोधन केले पाहिजे; म्हणजे असे की, माणूस आणि समाज यांचा मूलत:च संबंध कशा प्रकारचा आहे याचे संशोधन केले पाहिजे. मानवी समावाची राजकीय संघटना म्हणजे राज्य होय. म्हणून असे म्हणावे लागते की, समाजाचा आणि माणसाचा संबंधच राज्य व माणूस यांचा संबंध होय. सुसंस्कृत समाजासंबंधी ज्या ऐहिक उपपत्ती आहेत त्यांच्यामध्ये मनुष्याचा संबंध हा मुख्य होय हे मान्य केले आहे. माणसांनी प्रथम आपसांत जे सहकार्य केले त्यातून समाजसंस्था उद्भवली. हे सहकार्य माणसांनी रानटी अवस्थेतील जीवनाचा झगडा यशस्वी चालविण्याकरिता निर्माण केले असा शोध मानवजातिशास्त्राने केला आहे. एवंच समाज ही मनुष्यनिर्मित संस्था आहे, असेच सिद्ध होते. प्रत्यक्षसिद्ध वस्तुस्थितीवरून मनुष्यव्यक्ती व राज्य यांचा काय संबंध आहे, हे तर्कतः निश्चित करता येते. राज्य ही मनुष्याची कृती आहे; कारण राज्य म्हणजे समाजाचीच राजकीय संघटना होय. म्हणून व्यक्ती ही राज्यापेक्षा कमी लेखता कामा नये, तसे केल्यास निर्माता हा स्वतःच्या कृतीचा दास होय असा विपर्यास केल्याची आपत्ती येते.

लोकशाही तत्त्वज्ञानाने माणसाला आत्मोन्नतीबद्दल जी आश्वासने दिली आहेत ती कृतीत अजूनपर्यंत आली नाहीत याचे कारण, 'लोकशाही राज्य हे माणसांकरिता आहे, माणूस हा त्या राज्याचा घटक आहे' याची अंमलबजावणीच्या वेळी विस्मृती होते. राजकीय तत्त्वज्ञानाच्या मूलभूत प्रश्नाची सोडवणूक जीवनविषयक मानवतावादी दृष्टिकोनानेच होऊ शकेल. लोकशाहीची कल्पना दृढमूल व्हावयास आणि ती आचरणात उतरविण्यास याशिवाय दुसरा उपाय असू शकत नाही.

मानवीसमतेचे ध्येय ही एक पोकळ श्रद्धा आहे, तिचा उपयोग केवळ कायद्यापुरता, न्यायासनासमोरील समता एवढाच आहे, असे समजण्याची गरज नाही. जीवशास्त्राप्रमाणे सर्व माणसांना प्रत्येक बाबतीत समान सामर्थ्यांची देणगी लाभली आहे, असे सिद्ध झाले आहे. म्हणून समतेची वाढत्या प्रमाणात अंमलबजावणी करणे अत्यंत शक्य आहे. समाजसंस्थेचे हेच मुख्य कार्य आहे की, माणसाच्या सुप्त सामर्थ्याचा सतत बंधनरहित आविष्कार होण्यास मदत पोचवायची. व्यक्तिस्वातंत्र्याला कसलेही बंधन पडणार नाही, अशी काळजी घेऊन समान हिताची साधना करण्याकरिता सार्वजनिक संबंधांचे नियंत्रण करणे हेच राज्याचे मुख्य कार्य होय असा सिद्धान्त तर्कतः वरील समाजविषयक प्रमेयातून निघतो. लोकशाहीचा कायदा सामाजिक सहकार्याची व्यवस्था राखण्याकरिता निर्माण होत असतो. या सामाजिक सहकार्याने व्यक्तीच्या सुप्त सामर्थ्यांचा आविष्कार करावयाचा असतो. म्हणून व्यक्तिस्वातंत्र्य हे सामाजिक संघटनेच्या विरुद्ध असूच शकत नाही. व्यक्तीव्यक्तीना स्वातंत्र्याची साधना

करता यावी, म्हणून स्वेच्छाप्रेरित, समंजसपणाचे व हेतुपुरःसर घडून येणारे सहकार्य हाच लोकशाही समाजसंस्थेचा पाया होय. मानवतावाद ही त्याची संघटना करणारी मानसिक शक्ती होय.

लोकशाहीचे यश लोकशिक्षणावरच अवलंबून असते. राज्य व शिक्षण यांचा हा अभेद्य संबंध हजारो वर्षांपूर्वी प्लेटोच्या ध्यानात आला. येथे शिक्षण याचा एक विशिष्ट अर्थ आहे. आत्मस्वातंत्र्य व आत्मसामर्थ्य यांचा वाढता प्रत्यय समाजघटक व्यक्तींना मिळत राहील अशी समाजघटक व्यक्तींची बौद्धिक आणि सांस्कृतिक उन्नती होणे, हा या शिक्षणाचा अर्थ आहे. आधुनिक विज्ञानाची अशी घोषणा आहे की, बुद्धी आणि सर्जनशीलता हे माणसाचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. म्हणून माणसांना असे शिक्षण देण्याची गरज आहे. मानवी समतेचे ध्येय त्याशिवाय प्रत्यक्ष वस्तुस्थितीत उतरविता येणार नाही.

लोकशाही राज्याकरिता माणसाचीही वाढ नव्या प्रकाराने व्हावयास पाहिजे. माणसाच्या ठिकाणी सार्वभौम सत्ता आहे, तो समाजाचा निर्माता आहे, हे प्रत्यक्ष अनुभवात येण्याकरिता समाज व राज्य यांची निराळीच संघटना करणे जरूर आहे. सत्तास्पर्धेत गुंतलेल्या काही व्यक्तींना व काही पक्षांना केवळ मतदान करून स्वस्थ बसणाऱ्या मतदारांचा गण म्हणजे लोकशाही नव्हे! ज्या स्त्रीपुरुषांना स्वत:च्या ठिकाणी असलेल्या सार्वभौम सत्तेचा प्रत्यय येत आहे आणि ती सत्ता स्वतःच वापरण्याची ज्यांच्या ठिकाणी लायकी आहे, अशा स्त्रीपुरुषांचा समाज म्हणजे लोकशाही समाज होय. धंदेवाईक राजकारणी लोकांचा वर्ग किंवा मतदानपद्धतीच्या जोरावर राजकीय सत्तेची ठेकेदारी करणारा कायदेमंडळातील प्रतिनिधींचा गट हेच जेथे राज्य चालवितात तो खराखुरा लोकशाही समाज नव्हे. वर्तमान परिस्थितीतली संसंदेवर म्हणजे कायदेमंडळावर आधारलेली लोकशाही ही विसकळीत अशा परावलंबी वृत्तीच्या मतदारांनी निर्मिलेली आहे. तिच्या ऐवजी वर्तमानकालीन प्रचंड व गुंतागुतीच्या सामाजिक व्यवस्थेतही प्रत्यक्ष लोकशाही निर्मिली पाहिजे. वरिष्ठ विधिमंडळाच्या अधीन असलेल्या या अप्रत्यक्ष लोकशाहीत सत्तेचे केंद्रीकरण होते व जनतेची वास्तविक सत्ता नष्ट होते. स्वतःच्या व्यक्तिस्वातंत्र्याचे सतत संरक्षण करणाऱ्या व निरपवाद समता भोगणाऱ्या स्वतंत्र माणसांचे सहकारी राज्य (Co-operattive Commonwealth) हेच लोकशाही राज्य होय, ज्यात मनुष्य हाच अंतिम मूल्य आहे, हे मूलभूत तत्त्व सिद्ध होते असे मानवतावादी तत्त्वज्ञान स्वीकारल्याशिवाय माणसांची अशा सहकारी राज्याच्या निर्मितीकडे निखालस प्रवृत्ती होणार नाही. अन्यथा, वैचारिक गोंधळ माजून लोकशाही राज्यासंबंधी, असलेली निष्ठा विचलित होण्याचा धोका कायम राहील. वर्ग किंवा राष्ट्र या कल्पनेच्या आश्रयाने किंवा गूढ धार्मिक कल्पनेच्या आश्रयाने सुरुवात होणारे तत्त्वज्ञान लोकशाही निष्ठेला विचलित करण्याचे कार्य करील. जे तत्त्वज्ञान मनुष्याला प्राथम्य व प्राधान्य देते, तेच लोकशाही निर्माण करते.

सध्या जे ठरावीक ठशाचे राजकारण सुरू आहे त्या सर्वांतला पुरोगामीपणा संपला आहे. ज्या एका परिस्थितीला गृहीत धरून या राजकारणाची विचारसरणी आचारसरणी ठरली ती परिस्थितीच बदलली आहे. ती परिस्थिती म्हणजे भांडवलशाही होय. भांडवलशाही समाजव्यवस्था कायम राहणारी आहे असे तिचे पुरस्कर्तेही मानीत नाहीत. तिला नैतिक पाठिंबा देणारे कोठेच उरले नाहीत. समाजव्यवस्था भांडवलशाही डबघाईस आल्यामुळे निर्माण झालेली नवी परिस्थिती सामाजिक अस्वास्थ्याच्या युगात शिरली आहे. या अस्वास्थ्याच्या जाणिवेचा विपरीत परिणाम जनतेच्या मनावर झाला आहे. वर्गविग्रहाच्या किंवा राष्ट्रवादाच्या नावाने आवाहन देणारी हुकूमशाही जनमनाची पकड घेत आहे. आपले विचारस्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य गमावून समुदायवादामध्ये स्वतःला बुडवून घेण्यास जनता तयार होत आहे. भांडवलशाहीची अवनती झाल्यामुळे भांडवलदारांकडून पुढारीपण हिसकावून घेणारे राजकीय पक्षांचे नेते पुढे आले आहेत. त्यामुळे सत्तास्पर्धेचे राजकारण वरचढ होऊन बसत आहे. या राजकारणाला तिसरे एक कारण मदत करू लागले आहे. भांडवलशाही स्पर्धेचा अंत झाल्यामुळे, खुल्या व्यापाराच्या तत्त्वाच्या ठिकाणी राष्ट्रीय आर्थिक नियोजनाने आपली बैठक बांधली आहे. हे आर्थिक नियोजन राज्यसंस्थेची शक्ती व परीघ वाढवीत आहे. जे राज्याचे नियंत्रण करतात तेच केंद्रीभूत सत्ता बळकावून बसतात, सत्तास्पर्धेच्या राजकारणाची किंमत प्रचंड हुकूमशाहीच्या स्थापनेने पदरात पडते.

भांडवलशाहीचे युग संपले असून सत्तास्पर्धेच्या राजकारणाचे युग अवतरले आहे असे जर म्हटले तर त्यात अतिशयोक्ती नाही. हुकूमशाही शक्तींच्यामधील आपसांतील स्पर्धेने राजकारणी विश्व दोन विरुद्ध टोकांमध्ये विभागले गेले आहे. भांडवलशाहीचे पुरस्कर्ते गट आणि भांडवलशाहीशी विरोधी असलेले गट अशी ही दोन टोके नव्हेत. सत्तेची तृषा लागलेले हे दोन निराळेच गट आहेत. ते डाव्या गटात मोडतात की उजव्या गटात मोडतात या मुद्द्यात काहीच तथ्य राहिले नाही. ते डावे असोत अथवा उजवे असोत, कोणीही असले तरी पर्यवसान एकच. कोणाचाही विजय झाला तरी लोकशाही, मानवी हित आणि स्वातंत्र्य यांना सारखाच धोका पोचतो. म्हणून तात्पर्य असे की भांडवलशाही विरुद्ध- समाजवाद हा आता खरा वादाचा मुद्दाच राहिला नाही. सत्तास्पर्धेच्या राजकारणातून उत्पन्न होणारी हुकूमशाही की खरीखुरी लोकशाही हाच विचाराचा खरा मुद्दा आहे. या परिस्थितीत ठरावीक ठशाच्या राजकारणातून बाहेर पडले पाहिजे. लोकशाही राजकारणाचा विचार निराळ्याच प्रकाराने केला पाहिजे.

समाजवादी कार्यक्रम घेऊन पुढे येणारे व लोकशाहीचा अंगीकार करणारे डावे पक्ष प्रस्तुत उत्पन्न झालेल्या संकटातून उत्तीर्ण होण्याचा मार्ग दाखवू शकत नाहीत, उत्पादन, वाटणी व विनिमय यांच्या साधनांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा कार्यक्रम लोकशाही अस्तित्वात आणत नाही. याचे तात्पर्य असे निघते की, सद्य:स्थितीत उजव्या पक्षाच्या कार्यक्रमापेक्षा

निखालस निराळा कार्यक्रम डाव्यांच्यापाशीही नाही. कारण खाजगी भांडवलशाही व खुल्या व्यापाराचे अर्थशास्त्र असमर्थनीय आहे असे उजव्या पक्षांनाही मान्य झाले असल्यामुळे राष्ट्रीय नियोजन तेही स्वीकारू लागले आहेत. राज्यांनी उत्पादन, वाटणी व विनिमय नियंत्रित करण्याची कल्पना त्यांनाही मान्य झाली आहे. डावे किंवा उजवे, सत्तेचे केंद्रीकरण कसे टाळता येईल, यासंबंधी कार्यक्रम निखालसपणे देऊ शकत नाहीत. याचे कारण राज्यसंस्थेचे नियंत्रण त्या दोघांनाही मान्य आहे. दोघेही विधिमंडळाच्या लोकशाहीशी म्हणजे अल्पसंख्याकांच्या सत्तेशी लग्न लावून बसले आहेत. म्हणून 'जनतेची सार्वभौम सत्ता' हा केवळ वाङ्मयाचा अलंकार म्हणूनच वापरण्याची मुभा त्यांनी घेतली आहे! जोपर्यंत राज्यसत्ता प्रत्यक्षपणे लोक वापरणार नाहीत, तोपर्यंत राज्यसंस्थेने चालविलेल्या आर्थिक नियोजनात मानवी स्वातंत्र्याचा अभावच राहणार. अशा स्थितीत समाजवाद म्हणजे राज्यसंस्थेची भांडवलशाही होय, असेच जनतेच्या अनुभवास येणार. डाव्या व उजव्या पक्षांच्या कार्यक्रमांमध्ये जे अर्थपूर्ण साम्य आहे, त्यापेक्षा त्यांच्या राजकीय वर्तनतील साम्य अधिक अर्थपूर्ण आहे. सत्ताप्राप्तीच्या झगड्यात सापडून ते अशी साधने वापरू लगतात की ती साधने लोकशाही ध्येयाच्या नेमकी विरुद्ध असतात, लोकप्रियता मिळविण्याच्या प्रयत्नात लोकांच्या मूर्खपणाच्या भावनांना ते गोंजारू लागतात. लोकांच्या सांस्कृतिक व राजकीय मागासलेपणाचे लक्षण असलेल्या हुकूमशाही परंपरेचे स्तुतिपाठक बनून ते तिला दृढ करतात. हुकूमशाही भावनांना दृढ करण्याचे कार्य करीत असता डावे गट उजव्यांच्या मागे नसतात. वस्तुतः स्वावलंबी विचार व विवेकाला महत्त्व देणारी, व्यक्तित्वाचा महिमा जाणणारी जनता लोकशाहीचा आधार होय, हेही ते विसरतात, व्यक्ती त्याचा बळी घेणाऱ्या वर्ग व राष्ट्र या दोन्ही समुदायनिष्ठ भावनांना ते सारखेच आवाहन देऊ लागतात. कार्यक्रम व राजकीय आचरण या बाबतीत पक्षा पक्षांचा भेद लुप्तसा होऊन जातो! शुद्ध सत्तास्पर्धेचे राजकारण हेच रूप सर्व पक्ष धारण करतात, पुरोगामितेचे सामर्थ्य संपुष्टात येते. लोकशाहीची सांस्कृतिक मूल्ये विनाश पावतात. प्रलयाकडे नेऊ पाहणाऱ्या लष्करी संग्रामाच्या कडेवर जग यांनीच आणून सोडले आहे! यांनीच देशोदेशींच्या हुकूमशाही शक्तींच्या वाढीला कळत नकळत मदत केली आहे.

सत्तेच्या विकेन्द्रीकरणाचे ध्येय धरून स्थापन केलेला पक्षदेखील सत्तेच्या साधनेत गुंतला तर साधनशुचितेचा विवेक विसरतो. अंधश्रद्धा आणि वीरपूजा ही हुकूमशाहीची साधने तोही वापरू लागतो. कोणत्याही ध्येयाचा पक्ष असो, त्याने एकदा सत्ता काबीज केली की तो विकेंद्रीकरणाच्या कल्पनेला दुरूनच रामराम ठोकणार! लोकांच्यामध्ये राज्य चालविण्याबद्दल आत्मविश्वास उत्पन्न करण्याच्याऐवजी पक्षनिष्ठेचा बडेजाव या ना त्या कारणास्तव त्यांना करावाच लागतो. लोकांच्या ठिकाणची असहायतेची भावना नष्ट करण्याचा विचार त्यांना आवडेनासा होतो. महापुरुषपूजा, गूढ अध्यात्मवाद, ऐतिहासिक

नियतिवाद यांच्या योगाने ती असहायतेची भावना अधिक गंभीर बनून जनता पक्षांच्या सत्तास्पर्धेच्या खेळाचे क्षेत्र बनते.

जनतेतील असहायतेच्या भावनेस कारण होणारी अंधश्रद्धा नष्ट करणे व बुद्धिवादी विचारसरणी निर्माण करणे हे लोकशाहीतील लोकशिक्षणाचे कार्य आहे. सत्तास्पर्धेच्या राजकारणातून बाहेर पडून व पक्षविषयक आसक्तीची बंधने तोडून टाकून लोकांना स्वत:च्या आचरणाने स्वावलंबन शिकविणारा नागरिकच लोकशिक्षण देण्यास पात्र होऊ शकतो. मानवतावादी चळवळीतील एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे बुद्धिवादाची शिकवणूक जनतेस देणे, हा होय. मनुष्याचा स्वसामर्थ्यावरील विश्वास ज्या ज्या तत्त्वज्ञानांनी ढासळतो, ती ती तत्त्वज्ञाने बुद्धिवादास नाकारीत असतात. हिंदुस्थानसारख्या देशात बुद्धिवादाच्या विरोधी असलेली तत्त्वज्ञाने जनमनावर अंमल गाजवीत आहेत. बुद्धीच्या व अनुभवाच्या पलीकडे असलेल्या पारलौकिक कल्पनांच्या समर्थनाकरिता गूढ अनुभववाद म्हणून नावाजलेली विचारसरणी पुरस्कारली जाते. माणसाच्या असहायतेचेच एक प्रकारचे समर्थन त्यात खराखुरा आत्मनिष्ठ मानव अस्तित्वात येण्यास हे तत्त्वज्ञान प्रतिबंध करते. असा मानव अस्तित्वात येण्याकरिता वैचारिक नवजीवनाचा कार्यक्रम हाती घेण्याची जरूर आहे. असहायतेच्या भावनेतून बाहेर पडण्याकरिता जनतेला स्वतःचे जीवनविषयक प्रश्न स्वतःच कसे सोडवावेत, याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन करणे जरूर आहे. जनतेने आपले राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रश्न स्वतःच सोडविण्यास प्रारंभ करावा. त्यातूनच त्यांना स्वातंत्र्य, बुद्धिवाद व ऐहिक नीतिशास्त्र यांची प्रेरणा मिळेल, जीवन म्हणजे शिक्षण असा लोकजीवनाचा अर्थ त्यामुळेच उत्पन्न होईल.

एका बाजूस नफेबाजीचे अर्थशास्त्र आणि दुसऱ्या बाजूस केंद्रीकरणास महत्त्व देणारे अर्थशास्त्र या पेचातून बाहेर पडण्याकरिता सहकारितेचे अर्थशास्त्र आधारभूत धरून नवसमाजाची बांधणी केली पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिहित ही सामाजिक हिताशी विरुद्ध नाहीत, ही गोष्ट सहकारी अर्थशास्त्रातच प्रत्ययास येते. व्यापक प्रमाणांतले उद्योग धंदेदेखील सहकारितेच्या तत्त्वावर चालविता येतात. आधुनिक विज्ञान आणि तंत्र यांचाही योग्य प्रमाणात वापर सहकारी तत्त्वाशी विसंगत नसतो. नफेबाज व सरकार या दोघांचे हात शिरल्यामुळे होणारे दुष्परिणाम टाळता येऊन पिळवणुकीचे सामाजिक पाप या अर्थशास्त्राने नष्ट होते.

व्यक्तीचे स्वेच्छाप्रेरित यत्न आणि सहकार्य यांच्या वातावरणातच जनतेच्या राजकीय संघटना मुळापासून तयार करणे जरूर आहे. लोकशाही राज्याचे प्राथमिक घटक म्हणून जनसमित्यांची निर्मिती करणे जरूर आहे. लोकांना प्राथमिक समित्या नीट चालविता येऊ लागल्या. लोकशाही दृष्टिकोन त्यांना लाभला, म्हणजे सरकारसंस्थेचे नियंत्रण करण्याची पात्रता त्यांना प्राप्त होईल. जनसमित्यांचे देशव्यापी जाळे खेड्यांतून व नगरांतून निर्माण

झाले म्हणजे पक्षोपपक्षांचा सत्तास्पर्धेचा खेळ संपुष्टात येऊ लागेल. पक्षांच्या प्रतिनिधींपेक्षा जनसमित्यांत लोकहिताचे कार्य करीत असता कार्यक्षम झालेले जनतेचे वास्तविक प्रतिनिधीच जेव्हा जनसमित्यांच्या वतीने निवडणुकीकरिता उभे राहू लागतील, तेव्हाच मूलगामी लोकशाहीचा काल क्षितिजावर उदयाला येईल व मानवी स्वातंत्र्याचे खरेखुरे युग अवतरू शकेल.

संदर्भ :

नेहरूंच्या अभिनंदन ग्रंथांतील रॉय यांच्या Humsnist Politics (१५ मार्च, १९४९) या लेखावरून, आणि रॉय यांच्या 'Pratice of New Humanism' (२१ डिसेंबर, १९४९) या पुस्तिकेवरून महत्त्वाचे अंश एकत्र करून हा लेख तयार केला आहे.

(नवभारत, एप्रिल, १९५४, मानवेंद्रनाथ रॉय विशेषांक, पृ. २९ ते ३४)

ooo

९७

भारतीय नवजीवनाची चळवळ

-मानवेंद्रनाथ रॉय

भारतीय नवजीवनाची चळवळ (Renaissance Movement) किंवा भारतीय नवजीवनाची कल्पनाच म्हणा ना, मला फार दिवसांपासून प्रिय झाली आहे. राजकीय चळवळींपेक्षा हिचे क्षेत्र पुष्कळच व्यापक असते. माझ्या आयुष्यातला बराच भाग प्राधान्याने राजकीय चळवळींशी निगडित झाला आहे; म्हणून नवजीवनाच्या ठोकळ गोष्टींकडे जरी माझे लक्ष तीव्रतेने वेधले गेले, तरी त्या बाबतीत भरीव कामगिरी करावयाला मला फारसा वेळ मिळाला नाही.

आपल्या राजकारणात विचारांपेक्षा भावनांना प्राधान्य अधिक असते, या गोष्टीचा मी वारंवार उल्लेख केलेला आहे. भावना मानवी स्वभावाचा अंशच असल्यामुळे मानवी कृतीच्या कोणत्याही विभागातून ती बहुधा संपूर्णपणे वगळता येणे शक्य नाही, हे जरी खरे असले तरी ही दुसरी गोष्टही तितकीच खरी आहे की, मनुष्याला जेव्हा मूलगामी प्रश्न सोडवायचे असतात तेव्हा बुद्धी व चिकित्सा यांनाच प्रथम महत्त्व द्यावे लागते, भावनेस बाजूला सारावे लागते. एकदा विचार निश्चित करण्याकरिता अडचणीतून बाहेर पडण्यास मदत करणारे मार्ग सापडले म्हणजे मग प्रत्यक्ष कृती घडविण्याकरिता, कार्याचा उठाव करण्याकरिता, अंतःकरणे काबीज करण्याकरिता भावनांच्या भांडाराचा उपयोग करावयाचा असतो.

आपल्या सार्वजनिक जीवनात गेल्या पन्नास वर्षांत राजकीय चळवळीला महत्त्वाचे स्थान लाभले आहे. परंतु राजकारण हे साध्य नव्हे. भारत मागासलेला देश आहे, त्याला प्रगतिपथावर आणावयाचे आहे. भारताच्या मागासलेपणाकडे कानाडोळा करून चालणार नाही. असे करणे शहामृगी खेळ खेळण्यासारखे आहे. भारताचा मागासलेपणा परकीयांच्या स्वाऱ्यांनी व दीर्घकालीन पारतंत्र्यामुळे निर्माण झाला आहे हे जितके सत्य आहे त्यापेक्षा उलट मागासलेपणामुळे परकीयांच्या खाऱ्या झाल्या व वारंवार पारतंत्र्य आले, हे अधिक

वाय १८१-५०

महत्त्वाचे सत्य आहे. एखादा लहानसा देश मोठ्या शक्तीच्या पुढे हार खाऊन परतंत्र होऊ शकतो, परंतु हा फार मोठा देश परकीयांच्या खाऱ्याच्या पुढे वारंवार हार खात गेला, याची मीमांसा आगंतुक कारणे दाखवून पुरेशी होत नाही. त्याकरिता अंतरंगातील खोल कारणांचा शोध करून अर्थ लावणे जरूर आहे. प्रत्येक वेळी संघटित व अल्पसंख्य धाडसी लोकांनीच भारताला जेरीस आणून आपल्या कबजात घेतले ही गोष्ट इतिहास वारंवार दाखवितो. भारताची प्राचीन संस्कृती शक्तिसंचार संपल्यामुळे अधिक पुढे प्रगती करू शकली नाही, म्हणून देश दीर्घकालीन जीर्णदशेत सापडला. प्रगती करणाऱ्या सामाजिक शक्ती खुरटल्या हे या पुनःपुनः घडणाऱ्या पराभवाचे कारण होय.

प्रगती करणाऱ्या शक्तींची वाढ जर खुंटली नाही, तर वारंवार पराभव होत नसतो व अवनत दशा चिरकाल टिकत नाही. प्रगतिकारक शक्ती आपले अस्तित्व शाबीत केल्याशिवाय राहात नाहीत. नवे विचार व नवी ध्येये त्यात येऊ लागतात. लोकांच्या या ठिकाणी नव्या प्रेरणा त्या शक्ती निर्माण करितात व इतिहासाच्या नव्या प्रकरणाचे पृष्ठ उघडले जाते. अवनत दशा संपली असे दर्शित करणाऱ्या अवस्थेला 'नवजीवन' असे म्हणतात. नवजीवन म्हणजे पुनर्जन्म. नवजीवन ही संज्ञा ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाची आहे. मध्ययुगीन अंधारातून उत्तीर्ण होऊन बाहेर पडण्याकरिता झगडणाऱ्या युरोपच्या त्या विशिष्ट कालखंडाला नवजीवन ही संज्ञा आहे. युरोपच्या मानवजातीला असे नवजीवन लाभले म्हणून आधुनिक संस्कृती व विशेषतः विज्ञान प्रादुर्भूत झाले.

आपण जेव्हा 'भारतीय नवजीवनाची चळवळ' असा शब्दप्रयोग करतो, तेव्हा काहीसा असाच अर्थ मनापुढे येतो. परंतु आपल्या देशात ही गोष्ट घडून येणे अवघड आहे. जीर्णोद्धाराच्या चळवळीने आपल्या देशाचे मानसिक वातावरण भारलेले व भारावलेले आहे. भूतकाळची महती गाऊन भूतकाळातील कल्पित सुवर्ण युगाची कल्पना आपल्या देशाच्या प्रगतिशील बुद्धीची द्वारे बंद करून बसली आहे. जीर्णोद्धारवादाला त्या भूतकालीन सुवर्ण युगाने स्वप्न खरे करून दाखवावयाचे आहे. इतिहासाचे पुरावे खरे की खोटे, याची तमा न बाळगता वासनावश होऊन मिथ्या अहंतेच्या धुंदीत हे स्वप्न रचले गेले आहे. उदाहरणार्थ, विक्रमादित्याच्या युगप्रारंभाचा दिन नुकताच साजरा झाला. ऐतिहासिक सत्याच्या बाबतीत आपण किती बेफिकीर आहोत हे त्या वेळच्या पुढाऱ्यांच्या भाषणांनी सहज सिद्ध झाले आहे. विक्रमसंवत् स्थापणारा विक्रमादित्य होता हे सिद्ध करणारा पुरावाच उपलब्ध नाही!

अशा प्रकारचा हा जीर्णोद्धारवाद निरुपद्रवी म्हातारचळ म्हणून उपेक्षणीय मानावा असे असे कोणी म्हणेल, परंतु या चळवळीची वाढ भलत्या दिशेने होत आहे, यात मोठा धोका आहे. प्रतिगामी कल्पना व ध्येये दृढ करण्याकरिता नैतिक पाठिंबा मिळविणे असा या चळवळीचा उद्देश आहे. सामाजिक व सांस्कृतिक मागासलेपणाचे गटारपाणी या चळवळीचे पोषण करीत आहे. भारतीय नवजीवनाच्या चळवळीला व पुरोगामी शक्तीला विरोध

करणाऱ्या हुकूमशाही राष्ट्रवादाचा उद्देश सफल करणे हा या काल्पनिक सुवर्णयुगाच्या पुरस्काराचा हेतू आहे.

ज्यांना नवजीवनाची चळवळ विचारात घ्यावची आहे, त्यांना भारताच्या प्राचीन संस्कृतीचा परामर्श घेण्याची आवश्यकता आहेच. जुन्या जगाने दिलेला वारसा नीट रीतीने तपासून घेणे नवजीवन चळवळीचे एक अंग आहे. मागे पाहूनच पुढे जाणे योग्य असते. युरोपातील नवजीवनाच्या चळवळीची कल्पना अशाच प्रकारची होती. प्राचीन ग्रीक संस्कृतीचा व विशेषतः प्लेटोच्या विचारांचा पुनरुद्धार यास त्यात प्राधान्य होते. या चळवळीचा अभ्यास केल्यावर असे दिसून येते की, युरोपियन नवजीवनाच्या चळवळीतील माणसे भूतकाळाकडे दृष्टी फिरवून चाललेली जरी दिसतात, तरी असे करीत असता वस्तुतः त्यांनी उलट्या दिशेचाच दृष्टिकोन युरोपियन मानवजातीला दिला. भारताला असेच करावे लागेल. ही गोष्ट नुसती शक्य नाही तर आवश्यक आहे. नवजीवन ही हिंदुस्थानची ऐतिहासिक अपरिहार्य अशी गरज ज्यांना भासत आहे, त्यांना याची जाणीव आहे की, मनुष्यजातीचा जो थोर वारसा आहे त्यामध्ये प्राचीन भारताच्या विचारवंतांनी मूल्यवान भर टाकली आहे. मानवी विचाराची दोन स्वरूपे असतातः त्यातील एक तात्पुरते प्रमाण असते हे तात्पुरते असलेले स्वरूप विशिष्ट ऐतिहासिक युगापुरतेच प्रमाण असते. सामाजिक परिस्थितीत बदल होऊन जन्माला आलेल्या नव्या कालखंडात तेच स्वरूप असमर्थ बनून अप्रमाण बनते, दुसरे स्वरूप जे असते ते चिरंतन सामर्थ्याचे असते. ते मानवी विचाराच्या इतिहासात टिकाव धरू शकते. त्याच्या अभावी तर संस्कृती, प्रगती किंवा सुधारणा होणे अशक्य ठरेल! मनुष्य जाती जेथे वाटच संपलेली असते अशा टोकाला येऊन जेव्हा जेव्हा पोचते अशा वेळी पाठीमागे पाहू लागते, त्या वेळी तिचा प्रयत्न भूतकालीन परंपरेतील चिरंतन अंशातून धैर्य व स्फूर्ती मिळवावी असा असतो. प्राचीन भारताच्या सांस्कृतिक विचारप्रवाहांत असे कोणते चिरंतन अंश आहेत हे शोधून काढणे आवश्यक आहे. हे त्याकरिता त्या पडिक जगातील पर्वतप्राय टाकाऊ अवशेषांच्या ढिगाऱ्याखाली खोल खणणे जरूर आहे. हा पर्वतप्राय उद्वेगपूर्ण ढिगारा आपल्या दीर्घकालीन जाड्याचे अधिष्ठान होय. आपण आज त्याला आपला वारसा समजून त्याच्याकडे पाहून फार खूश होतो! जे असे खूप खूश झालेले असतात, त्यांना त्याच्याखाली दडलेल्या प्राचीन संस्कृतीच्या चिरंतन संपदेचे ज्ञान मुळीच नसते. त्या चिरंतन मूल्यांचा शोध व संग्रह करून ती टिकविणे हा भारतीय नवजीवनाच्या कार्यक्रमातील एक मुख्य मुद्दा आहे. ग्रीस देशातील ऋषींनी जशी मानवी विचारसंपदेत एक महत्त्वाची भर घातली आहे त्या प्रकारची ही भर आहे. परंतु जीर्ण अवशेषाच्या गोंधळात ती लुप्तप्राय झाली आहे. हे जुने टाकाऊ अवशेष म्हणजे ब्राह्मणांस प्राधान्य दिलेल्या अशा जीर्ण व अवनत समाजसंस्थेचे अंश होत. त्या अंशांना भारतीय संस्कृती म्हणून मिरविणे हा भयानक प्रमाद होय!

नवजीवन-चळवळीने दुसरे एक कठीण काम हाती घेतले पाहिजे. भारताचा प्रमाणशुद्ध

इतिहास लिहिणे हे ते काम होय. प्राचीन इतिहासापासून स्फूर्ती खरोखर मिळवावयाची झाली तर इतिहास म्हणजे काय याची कल्पना बरोबर असली पाहिजे. इतिहासाचे विशिष्ट तत्त्वज्ञान असते आणि विज्ञानशुद्ध इतिहास कसा लिहावा याची विशिष्ट पद्धती असते. भारताचा इतिहास लिहिण्याचे काम जी माणसे अंगावर घेतील त्यांनी जर इतिहासाचे विज्ञान व तत्त्वज्ञान दुर्लक्षिले, तर इतिहासलेखनाची विज्ञानशुद्ध पद्धती ते गमावून बसतील व त्यामुळे भारतेतिहास म्हणजे एक पौराणिक कथा निर्माण करतील. भविष्यकालीन भारताच्या कारागिरांना विज्ञानशुद्ध इतिहासाची गरज आहे. आपल्या पूर्वजांच्या चिरंतन यशाच्या ज्ञानाने मिळालेल्या स्फूर्तीने त्यांना अधिक चांगला व मोठा भविष्यकाल रचता येईल.

भारताचा इतिहास लिहिण्याच्या कामात आणखी एक महत्त्वाची अडचण आहे. पुराव्याच्या तपासणीच्या आधुनिक कसोटीला उतरेल असा नोंदलेला भारतेतिहास किंवा विश्वासार्ह अशी विविध प्रकारची लिखित नोंद बुद्धयुगाच्या अंतापर्यंत सापडत नाही. बौद्धक्रांतीने तत्पूर्वीच्या नोंदी नष्ट केल्या आहेत व बौद्धक्रांतीचा पराभव करणाऱ्या ब्राह्मणी प्रतिक्रांतीने बौद्धक्रान्तीच्या नोंदी नष्ट केल्या आहेत. म्हणून लिखित प्रमाणांवर आधारलेला भारतीय इतिहास १५०० वर्षांपूर्वीच्या कालखंडांत पोचत नाही. स्वैर कल्पनातरंगांनी इतिहास निर्माण करावा व पाच सहस्र वर्षांपूर्वी काय घडले याचे स्वप्न रचावे, यात काही अर्थ नाही. श्रीरामचंद्राने अनेक सहस्रकांपूर्वी वैमानिक यात्रा केली, वानरगण म्हणजे एंजिनिअरांचे पथक होते, त्यांनी समुद्रावर पूल बांधले- अशा अद्भुत कल्पित कथांच्या आधारावर इतिहास बनविण्यात अर्थ नसतो.

अशा परिस्थितीत इतिहासलेखनाची वैज्ञानिक पद्धती आपणांस मदत करील. महान दार्शनिक हेगेल याने असा सिद्धांत सांगितला आहे की, तत्त्वज्ञानेतिहास म्हणजे विश्वेतिहास होय. हाच सिद्धान्त उलटा मांडला म्हणजे बरोबर होतो. तत्त्वज्ञानेतिहास मानवेतिहासाच्या इतर शाखांच्या समांतर रेषेत घडत असतो, हा सिद्धांत बरोबर आहे. कारण सामाजिक विकासावर मनुष्याच्या आत्म्याची वैचारिक यशस्विता म्हणजे तत्त्वज्ञान अवलंबून असते, या सूत्राप्रमाणे उलटा क्रम अनुसरून आपणांस भारतीय विचारांचा इतिहास निर्माण करता आला तर प्राचीन भारताच्या सामाजिक विकासाचा इतिहास रचता येईल. विशिष्ट प्रकारचा विचार हा विशिष्ट सामाजिक संबंधांशी संलग्न असतो, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे,

आपणांस भारताच्या विशिष्ट प्राचीन कालखंडांत विशिष्ट प्रकारचा विचार प्रबल होता, असे जर दिसून आले तर तत्कालीन सामाजिक परिस्थिती कशा प्रकारची होती, हे विचारसाम्यावरून योग्य रीतीने निश्चित करता येईल. कारण, इतर देशांमध्येसुद्धा विशिष्ट प्रकारच्या सामाजिक विकासाशी अनुरूप स्वरूपात वाढलेली तशाच प्रकारची तत्त्वज्ञानपद्धती रूढ होती, असे तुलनात्मक अभ्यासाने दाखविता येते.

भारतीय नवजीवनाच्या चळवळीचे तिसरे एक जबाबदारीचे काम आहे. वरील दोन कामे नीट रीतीने पार पडावयास हे तिसरे काम तुम्ही आधी हाती घ्यावयास पाहिजे. भारताचा सामान्य इतिहास लिहिण्याच्या अगोदर भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिणे आवश्यक आहे. येथे नेहमी तत्त्वज्ञान या नावाने जे निर्दिष्ट केले जाते ते तत्त्वज्ञान (Philosophy) नसून धर्मशास्त्र (Theology) असते, परंतु अत्यंत प्रगल्भ असे तत्त्वज्ञान भारतापाशी पूर्वी होते. आपले सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानाचे उपदेशक व प्रचंड ग्रंथांचे लेखक ही गोष्ट जाणतात, असे दिसत नाही. ते तत्त्वज्ञानाचा उपदेश म्हणून धर्मोपदेश करीत असतात. ते जे लिहितात ते धर्मावर लिहिलेले असते, तत्त्वज्ञानावर नव्हे.

आणखी असे की, तत्त्वज्ञानेतिहास धर्मेतिहासावरून अनुमानाने काढता येतो. आपली जी सुप्रसिद्ध परंपरागत सामग्री आहे ती म्हणजे धार्मिक विचारांची पंचभेळ होय. पूर्वग्रह, कल्पनातरंग, मतिभ्रम व लोकभ्रम यांची सरभेसळ होऊन तयार झालेला गठ्ठा तो आहे. हा गठ्ठा हेच अभ्यासाचे साधन होय, जगाच्या इतर भागांच्या इतिहासात सापडणाऱ्या साधनांच्या तुलनेने आपणांस याचे पृथक्करण करता येईल, त्यावरून सामाजिक संबंध आणि विचार यांचे सांधे जुळविता येतील आणि त्यावरून बिननोंदलेला इतिहास काही अंशी पुनः रचता येईल. तेव्हाच भूतकालाच्या अवशेषाखाली दडलेला तेजस्वी निधी आपल्या हाती येईल. त्याकरिता वर्तमानकाळापासून प्रारंभ करणे जरूर आहे. वैज्ञानिक पद्धतीच्या विदारक प्रकाशाने भूतकाळाच्या काळोखात दडलेली रत्ने चमकून उठतील. त्यांचा संग्रह करून भविष्याचा मार्ग आक्रमावयास लागू या.

भूतकालाच्या स्मृतीच्या भांडवलावर आपण जगू शकणार नाही. भूतकालाच्या महिन्याच्या आकर्षणापासून आपण आपणांस मुक्त केले पाहिजे. भूतकाल मृत आहे. त्याचे दफन करण्याचे धैर्य आपणांस असावयाला पाहिजे. ते जितक्या लौकर करता येईल तितके अधिक बरे. नाहीतर आपले सगळे वातावरण बिघडून जाईल. भूतकाळाकडे तोंड करून जर पुढे जाण्याचा प्रयत्न केला तर प्रगती होणार नाही, झालीच तर अत्यल्प होईल. भूतकाळाकडे कायम पाठ केली पाहिजे. पुढे जाण्यास उपयोगी होईल तेवढेच त्यांतून घेतले पाहिजे. त्याला आदर्शवत मानण्याची प्रवृत्ती मात्र उपयोगी पडणार नाही. टीकात्मक दृष्टीने भारतेतिहास तपासला तरच त्यातील उपयुक्त तेवढे निवडता येईल. या करिता वैचारिक क्रांतीची चळवळ आपण निर्माण करू या.

पुरातन मूल्यांचे पुनः मापन केल्याने वैचारिक नवजीवनाची प्रक्रिया राष्ट्रांत सुरू होऊ शकते. जुन्या परंपरा आणि संस्था यांची वैचारिक तपासणी करण्याची गरज प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासात उत्पन्न होत असते. नाहीतर जुनी परंपरा प्रगतीच्या पायातील शृंखला बनते व राष्ट्र मागेच राहते.

गेल्या दोनशे वर्षांच्या ब्रिटिश राजवटीत आपला पाश्चात्त्य संस्कृतीशी जो संबंध आला

तो अगदी वरपांगी होता. आणि पुनः त्यातही न्यूनगंडाने पराभूत होऊन आपण आधुनिक विचारपद्धतीचा स्पर्शदोष टाळला. भारतीय विद्वानांनादेखील पश्चिमेपासून काही अधिक शिकण्यासारखे आहे याची जाणीव राहिली नाही. काही बाबतीत जे काही अनुकरण केले ते अगदी उथळपणाचे दर्शक होते. त्यामुळे खरीखुरी विचारक्रांतीच या ठिकाणी जन्माला आली नाही. असा बहाणा करण्यात आला की, प्राचीन काळी सर्वोच्च मानवी संस्कृती या देशात नांदत होती. देशकालाच्या बंधनाच्या पलीकडे असलेले अध्यात्मवादाचे नितांत वैशिष्ट्य भारताच्या ठिकाणी आहे, असे येथील बौद्धिक नेते बोलू लागले. पश्चिम ही भौतिकवादी आहे व भारत हा अध्यात्मवादी आहे - असा एक सिद्धांत भारतीय राष्ट्रवादाचा आधार बनविला गेला.

हा अत्यंत वादग्रस्त मुद्दा आहे. त्याच्या चर्चेत मी येथे शिरत नाही. परंतु एक वस्तुस्थिती नाकारता न येण्यासारखी अशी लक्षात ठेविली पाहिजे, आधुनिक पाश्चात्त्य संस्कृती ज्या वैज्ञानिक विचारपद्धतीच्या आश्रयाने निर्माण झाली त्या प्रकारची विचारपद्धती भारतास वाढविता आली नाही. त्यामुळे भारतास सामाजिक जाड्य आणि आर्थिक मागासलेपण प्राप्त होऊन तो दुःस्थितीत रुतून राहिला. आपणांस वैज्ञानिक विचारपद्धत स्वीकारल्याशिवाय प्रगती करता येणार नाही. वैज्ञानिक विचारपद्धती ही जीवनदृष्टी आहे. केवळ विश्वविद्यालयीन ग्रंथपठनाने ही प्राप्त होत नाही. विचारावरील अंधश्रद्धेचे बंधन केवळ विज्ञानाच्या अध्ययनाने नष्ट होऊ शकत नाही. त्याकरिता बौद्धिक संस्कृतीच प्राप्त व्हावी लागते, तत्त्वज्ञानाची बैठक बदलावी लागते, बौद्धिक समीक्षा करून मौलिक प्रमेये तपासावी लागतात. बुद्धधर्माच्या नाशानंतर भारतात आजपर्यंत अशी वैज्ञानिक समीक्षा करणारी व्यापक प्रवृत्तीच उत्पन्न झाली नाही. पाश्चात्त्यांच्या संसर्गात बौद्धिक नवजीवन निर्माण होण्याची शक्यता होती. परंतु आमच्या वैचारिक नेत्यांनी सगळ्या जगाच्या उद्धाराचा मार्ग प्राचीन भारतच दाखवू शकेल अशी हास्यास्पद भावना, अहंता निर्माण केली असल्यामुळे, नवा भविष्यकाळ निर्माण करणारी स्फूर्तीच त्या योगाने उत्पन्न होणे अशक्य झाले आहे. जुन्या जगाचे पाये खणल्याशिवाय हे डबघाईस आलेले प्रचंड ओझे ढासळणार नाही आणि नव्या जीवनाला जागा देणार नाही.

माझे मागणे एवढेच आहे की, सत्याचा शोध करण्यास आवश्यक असलेली अनिर्बंध प्रेरणा तुमच्या ठिकाणी उत्पन्न व्हावी असे वाटत असेल तर बौद्धिक चिकित्सा करण्यास आवश्यक असलेले धैर्य हृदयात बाळगा. विचारपूस न करता श्रद्धा ठेवू नका. शब्दप्रामाण्याच्या विरुद्ध बंड करण्याचे धैर्य जर तुमच्यात नसेल तर निदान शब्दप्रामाण्य कशावर आधारलेले आहे, हे समजून घेण्याचा तरी प्रयत्न करा. अज्ञात व अज्ञेय शक्तींना सहज स्वेच्छेने शरण जाण्याची प्रवृत्ती जोपर्यंत तुमच्यामध्ये राहील तोपर्यंत या भूलोकावरील मुक्ती तुम्हास लाभणार नाही. ज्यांच्या मनावरील व बुद्धीवरील बंधने साफ तुटली आहेत,

तेच क्रांती घडवू शकतात. सुशिक्षित मन हे वैचारिक स्वातंत्र्य भोगणारे असते, ते वैचारिक दृष्ट्या अशुद्ध असलेल्या मताचे समर्थन करण्याचा प्रयत्न करीत नाही. असल्या अर्धवट बुद्धिवादाला त्वरित राम राम ठोका.

अंधश्रद्धा आत्मप्रगतीचे सर्वांत मोठे बंधन होय. जोपर्यंत भारतवर्ष अंधश्रद्धेला आध्यात्मिकतेच्या उच्च पीठावर राज्याभिषेक करीत राहील तोपर्यंत दुर्गती, दैन्य, अपमान, अवनती व अधःपात यांतून बाहेर पडण्यास तो समर्थ होणार नाही. शब्दप्रामाण्याच्या विरुद्ध बुद्धिवाद, श्रद्धेच्या विरुद्ध ज्ञान, परंपरेच्या विरुद्ध बंड असा पर्याय स्वीकारल्याशिवाय भारताला नवजीवन लाभणार नाही. भूतकाळ - कितीही आकर्षक असला तरी त्याचे प्रेत थडग्यात पुरलेले तसेच राहू द्या. कवी रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या कवितेतील आदर्श पुढे ठेवू या. रवीन्द्रनाथ जेव्हा गूढवादी धार्मिक द्रष्टे म्हणून पुढे आले नव्हते तेव्हाची ती कविता आहे. धार्मिक गूढवादी म्हणून नव्हे तर ते कवी म्हणून चिरंजीव होणार आहेत. गूढवादी रवीन्द्रास जरी आपण हसलो तरी कवी रवीन्द्रापासून आपण शिकू या...

"Let us go forward, forward,
Brothers !
To lag behind is to live for
nothing!
What is the use of living a life
which is death? "

संदर्भ :

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'Indian Renaissance Movement'(७ एप्रिल १९४४) या पुस्तिकेतून उद्धृत.

(नवभारत, एप्रिल, १९५४, मानवेंद्रनाथ रॉय विशेषांक,
एप्रिल, १९५४, पृ. ३४ ते ३९)

○○○

९८

मार्क्सवादाच्या पुढे!

- फिलीप स्प्रॅट

मार्क्सवादाचा सिद्धान्त असा आहे की, संस्कृती (Civilisation) जगात एकच आहे आणि भारत, चीन, इस्लाम, ख्रिश्चनत्व इत्यादी ज्या संस्कृती समान दर्जाच्या म्हणून आपण समजतो त्यात विकासक्रम आहे व एका संस्कृतिमालेतीलच ते भाग होत; ख्रिश्चनत्व ही त्या मालेतील सर्वांत प्रगत अवस्था आहे. यावरून असे निघते की, भारत, चीन इत्यादिकांनी एकतर युरोपचे अनुकरण तरी करावे किंवा अवनत अवस्थेत कुचमत पडावे!

मार्क्सवादाचा आणखी एक सिद्धान्त असा आहे की, सामाजिक प्रगतीची प्रक्रिया सुरू व्हावयास मौलिक परिवर्तन सुरू व्हावे लागते. विशेषतः सांस्कृतिक 'डोलारा' ('Superstructure') म्हणून ज्यास म्हणतात तोही बदलावा लागतो. उदाहरणार्थ, सगळे मार्क्सवादी असे मानतात की, आधुनिक जगात धर्म निरुपयोगी झाला आहे आणि शक्य तितक्या लवकर तो नष्ट व्हावा अशी वेळ येऊन ठेपली आहे. जगाबद्दलचे धर्मविरोधी तत्त्वज्ञान भौतिकवाद होय. तोच आता खरा म्हणून स्वीकारण्याची वेळ आहे. मार्क्सवादाच्या दृष्टीने भौतिकवादही सापेक्षतयाच खरा आहे.

आर्थिक व सामाजिक अधिष्ठानाच्या योगाने सांस्कृतिक डोलारा नियंत्रित होत असतो, या सिद्धांतावरूनच सापेक्षतावाद सिद्ध होतो. त्याप्रमाणे असे मानावे लागते की, विज्ञान व तत्त्वज्ञान यांतील विचार खरे किंवा खोटे आहेत, असे म्हणता येत नाही. ते विशिष्ट सामाजिकतेस सोईचे आहेत की नाहीत, एवढेच पाहावयाचे असते. यावरून विरोधविकासवाद आणखी असे सुचवितो की, राजकीय पक्षांना तात्त्विक व वैज्ञानिक वादांचा निर्णय करण्याचा अधिकार आहे, आणि सर्व प्रकारचे वाद वस्तुतः राजकीयच असतात.

मार्क्सवादातील दोन प्रवृत्ती

मार्क्सवाद दोन विरुद्ध टोकांच्या स्वरूपात अस्तित्वात दिसतो आणि या दोन प्रकारांची

अवांतर विविध संमिश्रणेही आढळतात. एका टोकाला मार्क्सवाद हे एक शुद्ध तत्त्वज्ञान म्हणून साधारणपणे दिसून येते. हे तत्त्वज्ञान विद्यापीठास शोभणारी अलिप्त वृत्ती कमीजास्त प्रमाणात ठेवून समाजिक परिवर्तनाचा अभ्यात करते. येथेही एवढे मात्र ध्यानात ठेवले पाहिजे की, पुरोगामितेच्या कल्पनेला असलेली आपली सहानुभूती मार्क्सवादी लोक कधीही झाकू शकत नाहीत.

ही पुरोगामिता आणि आधुनिक युगाच्या प्रभात कालापासून पाश्चात्त्यांच्यामध्ये सर्वत्र आढळून येणारी पुरोगामितेची कल्पना यात खूप साम्य आहे. म्हणजे असे की, भौतिक समृद्धी, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक व आर्थिक समता, राजकीय लोकशाही इत्यादी दिशेने प्रगती म्हणजे पुरोगामिता होय. ही अशा दिशांनी होणारी प्रगती 'नैसर्गिक' पद्धतीने होते, असाही या तत्त्वज्ञानाचा भावार्थ आहे. 'नैसर्गिक' म्हणजे 'अनिवार्य' असेच नाही.

आता दुसऱ्या विरुद्ध टोकाला जो मार्क्सवादाचा प्रकार दिसतो, त्यात केवळ व्यावहारिक राजकरण येते. जोपर्यंत आपण असे समजतो की, मार्क्सवादी राजकारणापासून वस्तुतः लोकशाहीचे तत्त्व अलग करता येत नाही, तोपर्यंत शुद्ध तत्त्वज्ञान व व्यवहारी राजकारण ही दोन परस्परविरोधी टोकाची आहेत असे लक्षात येत नाही. क्रांतीची कल्पना धरून राजकारण पाहिले म्हणजे दोन विरुद्ध टोके उघडकीस येतात.

लेनिनच्या उदयानंतर, वाटेल त्या प्रकाराने राज्य बळकावण्याचे एक तंत्र म्हणून मार्क्सवाद पुढे आला. स्टालिनला महत्त्व आल्यानंतर याचीच तार्किक परिणती झाली. मार्क्सवादाची शुद्ध तात्त्विक बाजू व्यावहारिक व संधिसाधू राजकारणाचे अंग बनली. पूर्वीचे मार्क्सवादी म्हणत होते, की मार्क्सवादी तत्त्वज्ञान ज्या पुरोगामितेचा पुरस्कार करते, ती पुरोगामिता म्हणजे उदारमतवादाचे स्थिरावलेले व सफल झालेले स्वरूप होय. स्टालिनवाद या गोष्टीची उपेक्षा करू लागला आणि काही थोडी पावले टाकल्यानंतर उदार व मानव्यप्रधान अशा या पूर्वपरंपरेचा तो कडवा शत्रू बनला.

जुने मार्क्सवादी स्वतःस समाजाचे नागरिक समजत, लेनिनवादी व स्टालिनवादी पक्के समाजविरोधी बनून समाजाचे अंतक बनले, समाजाच्या विनाशाला त्यांनी वाहून घेतले,

जेव्हा एम. एन. रॉय मार्क्सवाद शिकले तेव्हा रशियन व जर्मन कम्युनिस्टांमध्ये ज्यांनी जुनी मार्क्सवादी परंपरा राखली होती, अशी पुष्कळ माणसे होती. ते स्टालिनवादी नव्हते. रॉय यांनी ही पूर्वपरंपरा आत्मसात केली होती. वाटेल त्या प्रकाराने राज्य बळकावण्याचे एक तंत्र म्हणून जो मार्क्सवाद पुढे आला, त्यामध्ये रॉय यांना विशेष गंमत कधीच वाटली नाही. अगदी सामान्यपणे मार्क्सवादाच्या चौकटीत बसणाऱ्या राजकीय व आर्थिक परिवर्तनाचे जे ढोबळ परिणाम घडतात, त्यांच्यावर रॉय यांची मदार होती.

निर्वसाहतीकरण

लेनिनशीं रॉयचा जो पहिलाच स्नेहपूर्ण मतभेद झाला, तेव्हापासूनच हा विशेष उघडकीस

येतो. लेनिनला भांडवलशाही जग नष्ट कसे करावे, याचीच मुख्यतः काळजी होती. त्याकरिताच त्याने आपली अशी समजूत करून घेतली होती की, हिंदुस्थानातील भांडवलदार राष्ट्रवादी बंडाचा ब्रिटनविरोधी उठाव करू शकेल, निदान तशा तऱ्हेच्या कारस्थानात त्याला ओढता येईल. रॉय यांचे निराळेच मत होते. त्यांनी आपले मत वस्तुस्थितीचे यथार्थ ज्ञान करून बनविले होते. ब्रिटनच्या विनाशापेक्षा भारताच्या प्रगतीची काळजी त्यांना अधिक होती. रॉयनी लेनिनला सांगितले की, भारतीय भांडवलदार राष्ट्रवादी बंडाचा उठाव कधीच करणार नाही, तो खरीखुरी सत्ता क्रमाक्रमाने हस्तगत करील. 'निर्वसाहतीकरणा'चा मुद्दा रॉयचे एक पांखंड म्हणून निंदेचा विषय झाला होता. या पाखंडाचा हाच अभिप्राय होता. इतिहासाने रॉयचे म्हणणे खरे करून दाखविले आहे.

रॉय यांच्या या दूरदर्शित्वातूनच घटनासमितीची कल्पना निघाली. हिंदी राष्ट्रवाद्यांच्या पुढे ही कल्पना मांडून त्यांनी असे सांगितले होते की, यामुळे आपले उद्देश ब्रिटनला नीट समजतील आणि घटना समितीच्या निर्मितीने ब्रिटनवर जास्तीत जास्त दडपण पडेल. रॉयना माहीत होते की, ब्रिटनमधील उदारमतवाद्यांना घटनासमितीस विरोध करणे फार जड जाईल.

इ. स. १९२८ साली रशियाचे सत्तास्पर्धेचे राजकारण फारच वाढले; स्टालिन डाव्या बाजूला खूपच झुकला. सत्ता बळकावण्याच्या तंत्राचे माहात्म्य त्याने अधिक वाढविले. रॉयने त्याला विरोध केला, रॉयचा मार्क्सवाद व्यापक होता. राज्य बळकावण्याचे तंत्र हे फॅसिस्टांत मान्यता पावलेले साधन होय, हे ध्यानात घेऊन या डोळ्यांसमोर घडणाऱ्या राजकारणी घडामोडींचा इत्यर्थ लक्षात घेऊनच रॉयनी स्टालिनला विरोध केला. रॉयला बहिष्कृत व्हावे लागले.

इ. स. १९३४ साली स्टालिनने धोरण बदलले. त्याने माघार घेतली. निदान तोंडदेखलेपणाने तरी 'संयुक्त आघाडीचे' धोरण अंगीकारून उदारमतवादी परंपरेचे मूल्य मान्य केले. हे पाहून रॉय यांनी स्टालिनला पाठिंबा दिला. स्टालिनबद्दल रॉयना आदर होता; म्हणून त्या हुकूमशहाला त्यांनी आपले आशास्थान बनविले होते. दुसऱ्या महायुद्धानंतर हा हुकूमशहा आपल्या पूर्वपदावर येईपर्यंतच ही आशा टिकली.

इ. स. १९३० साली हिंदुस्थानात येण्याच्या पूर्वी रॉय यांची पुष्कळ वर्षे मुख्यतः जर्मनीत गेली. त्यांनी नाझी चळवळीच्या प्राथमिक अवस्था प्रत्यक्ष अवलोकिल्या होत्या; हिटलरचीहह भेट झाली होती; हिटलरचा व त्यांचा एकदा एकत्र खाना झाला होता; तेव्हा घडलेली एक चमत्कारिक गोष्ट ते कित्येक वेळा सांगत असत.

हिंदी राष्ट्रवाद्यांबद्दल साशंकता

सत्ताप्राप्तीनंतर नाझी आणि कम्युनिस्ट चळवळी एकाच दिशेनें वाहू लागल्या. पूर्वी जेव्हा त्या परस्परविरोधी गतीने जात होत्या, तेव्हा त्या फार निराळ्या दिसत होत्या. वरवर पाहिले तर कम्युनिस्ट चळवळ राजकीय प्रचारावर भर देते, असे दिसते. नाझी लोक तर प्रथमपासूनच

विरोधी लोकांचा काटा काढण्याकरिता मारामाऱ्या व खून यांनाच चटावले होते. त्यांनी या गोष्टी मोठ्या प्रमाणात केल्या. या गोष्टी न झाकता त्या गोष्टींबाबत ते बढाया मारीत.

रॉय यांना याचा फार वीट आला, यामुळे तर राष्ट्रवाद हा प्रतिगामी आहे, या मार्क्सवादाच्या सिद्धान्तावरील त्यांची श्रद्धा दृढावली. गांधींचं अनुयायित्व पत्करलेल्या राष्ट्रवादाबद्दलसुद्धा ते साशंक झाले. त्यांना असे वाटू लागले की, खादीवालेदेखील ब्राउन शर्टवाल्यांसारखे बनण्याची शक्यता आहे. हिटलरच्या विरोधी सुरू झालेले युद्ध रॉयना पवित्र धर्मयुद्ध वाटत होते. तेव्हा काँग्रेसने तटस्थतेचेच धोरण पत्करल्यामुळे गांधीवाद व नाझीवाद यांच्यातल्या वैचारिक सहानुभूतीचा तो परिणाम असावा, असही त्यांना वाटले. दुसरी गोष्ट अशी की, युद्धकाली ब्रिटनमध्ये जे सामाजिक बदल होऊ लागले त्यांचाही रॉयच्या मनावर अनुकूल परिणाम झाला. त्या वेळी हिंदुस्थानात जे ब्रिटिश अधिकारी त्यांना भेटले त्या अधिकाऱ्यांच्या उदारमतवादी दृष्टिकोनाकडे पाहून तर ते विस्मितच झाले. रॉय यांना युद्धाच्या अखेरच्या काळात ब्रिटन हिंदी राष्ट्रवादापेक्षा अधिक पुरोगामी वाटू लागले. नेहरू किंवा जिना यांच्या हाती ॲट्लीने हिंदुस्थान सोपविला; यापेक्षा ॲट्लीला अधिक चांगला पुरोगामी मार्ग सापडला नाही, याबद्दल रॉय यांना वाईट वाटत होते.

परंतु अमेरिकेबद्दल रॉयचा ग्रह वाईट होता. रॉय १९९६ च्या सुमारास अमेरिकेत होते. तेव्हा विल्सनने निवडणुकीतील आपले आश्वासन मोडून युद्धात शिरण्याची तयारी चालविली होती. या लहानशा मुक्कामात त्यांना जे प्रत्यक्ष निरीक्षण करावयास मिळाले त्यापेक्षा मार्क्सवादी पांडित्याचा परिणाम होऊन अमेरिकेबद्दल त्यांचे वाईट मत बनले. मार्क्सवादास धरून असे म्हटले जाते की भांडवलशाही हे युद्धाचे कारण होय. या कल्पनेस अनुसरून रशियन राष्ट्रवादी हितसंबंधाच्या दृष्टिकोनांतून मार्क्सवादी बड्या प्रस्थांनी रॉयचा असा ग्रह करून दिला होता की, हिटलरच्या जर्मनीप्रमाणे जागतिक प्रतिगामी शक्तींचे केंद्र अमेरिका बनली आहे किंवा बनणारच!

रुझवेल्ट पंडित नव्हता हे दुर्दैव म्हणायला पाहिजे. तो अनुभवाने चालणारा साधा अमेरिकन होता. त्यामुळे रशियन व जर्मन डाव्या गटाच्या बुद्धिवादी पांडित्यात मुरब्बी बनलेल्या व सुशिक्षित अशा रॉयच्या मनावर त्याचा प्रभाव पडू शकला नाही. अमेरिकेबद्दलचा रॉयचाविरोधी ग्रह कधीही बदलला नाही. अगदी अलीकडे मात्र त्यांना वाटू लागले होते की, रशियन गट व अमेरिकन गट या दोघांपैकी अमेरिका गटाच्या हातात विश्वप्रभुत्व गेले तर त्यात कमी अनर्थ होईल.

कम्युनिझमशी संबंधविच्छेद

स्टालिनच्या डाव्या राजकारणाचे संकट कशा प्रकारे आहे, हे ध्यानात आल्यावर युद्धाच्या समाप्तीनंतर रॉय यांनी कम्युनिझमच्या ध्येयवादाशी असलेला संबंध तोडून टाकला. या वेळी त्यांना स्टालिनच्या एका बोलण्याची आठवण होऊ लागली. एकदा स्टालिन, रॉय

व इटालिअन कम्युनिस्ट पुढारी तोग्लेत्ती (Togliatti) हे तिघेच एकत्र असताना स्टालिनने म्हटले की, सगळेच कम्युनिस्ट पक्ष निरुपयोगी आहेत; कम्युनिझमचे विश्वराज्य स्थापन करावयास केवळ लाल लष्कर हे साधनच समर्थ होईल!

हा सिद्धांत स्टालिनला हुबेहुब शोभणारा आहे. राज्य किंवा सत्ता वाटेल त्या साधनाने बळकावण्याची कल्पना अमलात आणणारा मार्क्सवादी नेता स्टालिनच होय. रॉयनी असे सिद्ध केले आहे की, रशिया युरोपपेक्षा फार मागासलेला देश आहे; कम्युनिझमचा ३० वर्षे प्रयोग झाल्यानंतरही तो तसाच मागासलेला राहिला आहे म्हणून रशियाने युरोपवर अधिराज्य स्थापले तर युरोपची अधिक पिछेहाट होईल.

परंतु याच सुमारास रॉय यांचा स्वतःच्या उदारमतानुसारी मार्क्सवादावरीलही विश्वास ढासळू लागला. आर्थिक-सामाजिक अधिष्ठानाच्या अधीन सांस्कृतिक महालाचे अस्तित्व असते या सिद्धान्ताचे किंवा मार्क्सने अधिक सूक्ष्मार्थी पदांनी सांगितलेला 'वस्तूच्या अधीन जाणीव असते' या सिद्धान्तांचे त्यांनी खंडन केले. त्यांनी सांगितले की, मानवी मन स्वतंत्र व सर्जनशील असते. ही नवी अंतर्दृष्टी मार्क्सच्या 'मनुष्य हा मूळ आहे' या अर्धवट विसरलेल्या परिभाषेने व्यक्त करता येते. या परिवर्तनाचा परिणाम असा झाला, "मनुष्यास सत्याची प्राप्ती होऊ शकत नाही, म्हणून आणि सत्याची मातबरी वाटण्याचे कारण नाही, प्रत्यक्ष व्यवहारात काय फळ मिळते यालाच महत्त्व आहे," अशा प्रकारचा मार्क्सचा सापेक्षतावाद रॉयनी अजिबात टाकला. ज्यांच्या योगाने जीवन सार्थ होते, व्यवहारात ज्यांची पूर्ण गरज आहे, अशा महान अंतिम ध्येयांपैकी सत्य हे एक आहे, असे म्हणून रॉय यांनी सत्यावर पूर्ण भर दिला.

या परिवर्तनाने दुसऱ्या एका निर्णयाला रॉय येऊन पोहोचले. तो असा : मानवी समाजाच्या भविष्यकालीन विकासाचा जो आराखडा मार्क्सवादाने सांगितला त्यापेक्षा दुसऱ्याही अन्य मार्गांनी व प्रकारांनी सामाजिक विकास होऊ शकतो. उदाहरणार्थ, हिंदुस्थानपुढे मार्क्सवादाप्रमाणे दोनच मार्ग मोकळे आहेत: एक तर भांडवलशाहीचा भयंकर परंतु धोपट मार्ग. किंवा दुसरा, रशियात अवेळी घडलेल्या क्रांतीचा मार्ग. ही तिरस्करणीय क्रांती जगावर लादण्याची रशियाची इच्छा आहे. हिंदुस्थान, हे दोन्ही प्रकार टाळून, प्रगती करू शकेल. रॉयनी मार्क्सच्या नियतीपासून स्वतःची सुटका करून घेतली; लेनिनच्यापूर्वी प्रसिद्ध असलेल्या मार्क्सवादाची उदार तत्त्वांनी पूर्ण असलेली अशी पार्श्वभूमी ध्यानात धरली; आणि अशी योजना सांगितली की भारतीय समाजाची नवरचना केली तर ती उदारमतवादी तत्त्वांच्या परंपरेतील मूल्यांचे रक्षण करून उच्चतर भौतिक जीवनमान व समता निर्माण करू शकेल. मार्क्सवादी परिभाषेप्रमाणे हिंदुस्थानात भांडवलदारी लोकशाही तांत्रिक रूपाने आली असली तरी समाजिक दृष्टीने भारतीय मन मध्ययुगातच वावरत आहे. भांडवलशाहीत ज्या प्रकारची लोकशाही क्रांती होते तिची सुलक्षणे प्रकट होतील असा बदल हिंदुस्थानात

व्हावयास पाहिजे. त्यामुळेच भारताची खरी सुधारणा होईल. इ. स. १९१७ सालापर्यंत रशिया मध्ययुगातच होता. लेनिनने भांडवलदारीतील लोकशाही क्रांती व समाजवादी क्रांती या दोहोंचा संयोग घडवून आणण्याचा प्रयत्न केल्यामुळे भांडवलदारी लोकशाही क्रांतीतील मानवी प्रगतीची शुद्ध मूल्ये गमवावी लागली. ही प्रगतीची शुद्ध मूल्ये भारतास संपादन करता येतील. परंतु इ. स. १९१७ सालचा रशिया किंवा इ. स. १७९३ सालचा फ्रान्स ज्या दुर्दैवाच्या हाती सापडला, त्या दुर्दैवाला शरण जाण्याचे कारण पडणार नाही, असे रॉय यांना वाटत होते.

मनुष्य स्वतंत्र आहे

रॉय यांनी भारताचा जो निराळा मार्ग ठरविला त्यात मार्क्सच्या नियतिवादाच्या पोलादी चौकटीतील योजने संबंध तोडून टाकला. एवढेच नव्हे तर त्याप्रमाणे या मार्गाने जगालाही अधिक उन्नतीचा मार्ग सापडेल, असेही त्यांनी आश्वासन दिले. भांडवलदारी लोकशाही क्रांतीनंतरच हा नवा मार्ग खुला होतो व त्यात तत्त्वतः धर्मसंस्थेला स्थान राहात नाही. मार्क्सवादातील धर्मसंस्थाविरोधाची कल्पना रॉय यांनी शेवटपर्यंत सोडली नव्हती.

राष्ट्रवादाशी असलेला रॉयचा विरोध मार्क्सवादाचेच फळ होते. तो शेवटपर्यंत कायम राहिला. रॉयना जे अगदी निराळ्या प्रकारचे शिक्षण मिळाले त्याचीच ही विकृती होय, असे म्हणता येत नाही. जगातील दोन (फ्रेंच व रशियन) राज्यक्रांत्या डागाळल्या गेल्या. त्याचे मुख्य कारण, राष्ट्रवादाचे संरक्षण व वाढ त्या क्रांत्यांनी केली, हे होय. वस्तुतः त्या क्रान्त्या विश्वव्यापी तत्त्वांच्या नावाने सुरू झाल्या होत्या. वर्तमानकालातही युद्धोत्तर युरोपमध्ये विलक्षण सामाजिक प्रगती घडून येऊ शकेल इतकी अनुकूल परिस्थिती तयार झाली होती. परंतु संकुचित राष्ट्रवादामुळेच मुख्यतः अशा परिस्थितीचा फायदा मिळू शकला नाही. मुळात कम्युनिझम राष्ट्रवादाच्या विरोधी होता. परंतु हल्ली कम्युनिझमने ढोंगीपणाने राष्ट्रवादाचा अंगीकार केला आहे. राष्ट्रवादी लढायांच्या ललकाऱ्या चेतवून कम्युनिझमच्या छायेखाली आशियातली अनेक राष्ट्रे येऊ लागली आहेत. रॉय यांचे असे म्हणणे आहे की, ह्या राष्ट्रवादरूपी चिकटलेल्या पूर्वग्रहाच्या तावडीतून मनुष्य बाहेर पडू शकतो, असे हिंदुस्थान दाखवू शकेल.

"आपण प्रगतिपथात सारखे पुढे जात राहण्याच्या योगाने आपल्याशी मत्सराने स्पर्धा करणाऱ्याची बाधा आपणांस होऊ शकत नाही" हे मार्क्सवादी तत्त्व, राष्ट्रवादाची माणसांना गरज नाही, अशा निर्णयाच्या मुळाशी आहे. हे तत्त्व स्पष्ट रीतीने क्वचितच सांगितले जाते. परंतु हे तत्त्व खरे नाही. मात्र ते मार्क्सवाद्याला वादविवादात वापरण्याचा मोह उत्पन्न करील असे आहे. सामाजिक व्यवहारात युद्धाला स्थान असावे, ही गोष्ट अणुस्फोटाचा शोध लागल्यानंतरच्या काळातील समाजस्थितीत अत्यंत संशयास्पद झाली आहे. अशा वेळी राष्ट्रवादाची गरज नाही हे मोहक तत्त्व उपयोगी पडते. या मुद्द्यावर मार्क्सवादी

रॉय शुद्ध भूमिकेवरूनच गांधीवाद्यांशी हस्तांदोलन करीत असताना दिसतात. मार्क्सवाद नेहमी राजकारणपरायणच दिसतो. त्याचे हे स्वरूप लेनिनच्या व स्टालिनच्या राज्यसत्ता बळकावण्याच्या धोरणात अधिक प्रकट होते व लोकशाहीस प्राधान्य देणाऱ्या मार्क्सवादात कमी प्रकट होते. रॉय हे या दुसऱ्या प्रकारालाच महत्त्व देत होते. जीवनाच्या अखेरच्या वर्षांत तर ते अधिक पुढे गेले. त्यांनी राजकारणाचा त्याग केला. आपल्या मित्रांना पक्षविसर्जनाची कल्पना त्यांनी पटविली आणि विचार प्रसाराच्या कामालाच वाहून घेण्याचा उपदेश दिला.

रॉयची ही अखेरची कृती त्यांच्या मनुष्यप्राण्यावरील श्रद्धेची खूण आहे. राजकीय पक्षांचे अस्तित्व असे सूचित करते की, माणसांना योग्य मार्गावर वळवून आणण्याकरिता त्यांना भावनांनी विवश केले पाहिजे आणि फायद्याची लालूच दाखविली पाहिजे. हुकूमशाही पक्षांचे अस्तित्व असे ध्वनित करते की, माणसांना योग्य मार्गावर जबरदस्तीनेच आणणे शक्य आहे. पक्षनिष्ठ राजकारणाच्या त्यागाच्या मुळाशी एक श्रेष्ठ मानवनिष्ठ श्रद्धा आहे : माणसे स्वतःच्या विवेकाने मार्ग निवडू शकतात व त्या मार्गाने क्रमणा करू शकतात. त्यांना बुद्धिद्वारा प्राप्त झालेला समान मानवी हिताचा साक्षात्कार आणि तद्रुरूप निष्ठा सन्मार्ग शोधण्यास प्रवृत्त करते, असा त्या श्रद्धेचा अर्थ आहे.

अशा प्रकारे रॉय यांचे विचार जरी साधारणपणे मार्क्सवादी दिसत असले तरी रॉय यांची विकास पद्धतीसंबंधी, इतिहासासंबंधी व मानवी भवितव्यासंबंधी असलेली विचारसरणी प्रथमपासूनच मार्क्सहून किंचित भिन्न होती व ती पायरीपायरीने मार्क्सपासून फार दूर गेली. बोल्शेविक लोकांच्या मार्क्सवादापासून तर ती आणखी अधिक दूर गेली आहे. रॉय यांचे विचार फार व्यापक होत गेले. ही व्यापकता गतिशीलतेमध्ये विसर्जन पावणार काय? हे अजून कळावयाचे आहे.

(नवभारत, एप्रिल, १९५४. मानवेंद्रनाथ रॉय विशेषांक, पृ. ४८ ते ५२)

ooo

९९

आंतरराष्ट्रीय सद्भावनेचे साधन : विज्ञान

- वर्नर हाइसेनबर्ग

विज्ञान राष्ट्रीय की आंतरराष्ट्रीय

प्रिय प्रौढ विद्यार्थ्यांनो, असे नेहमी म्हटले जाते की विज्ञान हे भिन्न राष्ट्रांना जुळविणारा सेतू बनला पाहिजे व ते आंतरराष्ट्रीय सद्भावना अधिक चांगली बनण्यात साहाय्यक व्हावयास पाहिजे. ही गोष्ट वारंवार सप्रमाण ठासून सांगितली जाते की विज्ञान हे आंतरराष्ट्रीय असते; जे विषय सगळ्या लोकांना सांगतात त्या विषयांकडे विज्ञान माणसाचे विचार वेधून घेते आणि त्या विषयांचा उलगडा करण्यात भिन्न भाषांचे, वंशांचे किंवा धर्मांचे वैज्ञानिक भाग घेत असतात. या विशिष्ट प्रसंगी विज्ञानाच्या या कार्यविशेषांबद्दल तुमच्याशी बोलताना महत्त्वाची बाब अशी आहे की, हा मुद्दा फार सोपा आहे असे आपण समजू नये. आपण, विज्ञान हे राष्ट्रीय असते व भिन्न वंशांच्या कल्पना भिन्न असतात, ही विरुद्ध बाजूही विचारांत घेतली पाहिजे; ही आपल्या कानांत अजून ताजी आहे.

असे मानले जात होते की, आपल्याच लोकांची सेवा प्रामुख्याने विज्ञानाने केली पाहिजे आणि आपली राज्यशक्ती सुरक्षित ठेवण्याकरिता मदत केली पाहिजे; कारण विज्ञान हे सर्व तांत्रिक विकासांचा पाया असते म्हणूनच ते सर्व प्रगती व सर्व सैन्यशक्ती यांचा पाया बनते. आपल्या शुद्ध विज्ञानाची व तत्त्वज्ञानाची मोठी जबाबदारी म्हणजे परंपरा व श्रद्धा यांना बळ देणे ही होय, असेही मानले जात होते. पुनश्च असे मानले जात होते की या गोष्टी आपल्या लोकांमधील राजकीय सत्तेचे होत. या दोन विचारांपैकी कोणता विचार आणि त्यांच्या समर्थनाच्या पुराव्यांची तौलनिक मूल्ये काय आहेत, यांची चर्चा करण्याची माझी इच्छा आहे.

(१) या पक्षाचे स्पष्टीकरण होण्याकरिता प्रथमतः आपणास हे शोधले पाहिजे की, विज्ञानाचे कार्य कसे चालते, वैज्ञानिक प्रमेयाशी व्यक्तीचा संबंध कसा प्राप्त होतो आणि ही प्रमेये त्याची जिज्ञासा कशी उत्तेजित करतात. मी जर प्रथम अणुविज्ञानासंबंधी बोललो आणि जर माझ्या विद्यार्थी या नात्याने आलेल्या अनुभवांची स्मरणे सांगितली तर तुम्ही माझ्यासंबंधी गैरसमज

करून घेणार नाही, कारण मला माझ्या स्वत:च्या विज्ञानाचेच ज्ञान चागले आहे.

अणु ही एक ग्रहमाला

म्युनिच विद्यापीठात दाखल होण्याकरिता मी जेव्हा १९२० साली विद्यालय सोडले तेव्हा आपल्या तरुणांच्या नागरिकत्वाची स्थिती आजप्रमाणेच होती. जी ध्येये त्या युद्धात वापरली आणि त्यांच्यामुळे आपण ते युद्ध गमावून बसलो त्या सर्व ध्येयांसंबंधी आपल्या त्या युद्धातील पराभवाने अंधश्रद्धा निर्माण केली. तेव्हा ती ध्येये पोकळ दिसू लागली; आणि या जगात मूल्यवान काय आहे आणि काय नाही, हे आपण स्वत:च पाहण्याची गरज वाटू लागली; कारण आपल्या वडिलांवर किंवा उपदेशकांवर भरवसा ठेवणे आपणांस नकोसे झाले. इतर बहुत मूल्यांखेरीज विज्ञानही या क्रमात पुन: हुडकून काढले. सर्वसामान्यांच्या उपयोगाची काही पुस्तके वाचून काढल्यावर अणूच्या विषयाशी संबद्ध असलेल्या विज्ञानशाखेत मी मन रमवू लागलो; आणि सापेक्षता सिद्धान्तातील दिक् व काल या विषयांच्या विशिष्ट निवेदनांवर आपला विचार तयार करण्याचे ठरविले. या रीतीने मी माझ्या शिक्षकाची म्हणजे सॉमरफेल्डची व्याख्याने एकेण्यास येऊ लागलो. त्याने माझ्यातील ही जिज्ञासा वाढविली व रॉटेग्जन, प्लँक, रूदरफोल्ड व बोर यांनी केलेल्या संशोधनाच्या प्रभावाने अणूचे नवे व सखोल ज्ञान कसे वाढीस लागले आहे. हे त्या अवधीतच मी त्याच्यापासून शिकलो. मला असे कळून आले की, डेन्मार्कचा नील्स बोर (Niels Bohr) आणि इंग्लंडचा रूदरफोर्ड यांनी कल्पनेने असे ठरविले की, अणू हा लहानशी ग्रहमाला आह; आणि विद्युरेणूंच्या ग्रहांसारख्या कक्षांचा उपयोग करून बोरच्या सिद्धांताने तत्त्वांच्या रासायनिक धर्मांचे अनुमान करता येईल. परंतु त्या वेळी हे साधले नाही. हा शेवटचा मुद्दा स्वाभाविकपणे मला अत्यंत आकर्षक वाटला आणि बोरचा प्रत्येक नवा निबंध म्युनिच येथील चर्चापरिषदेत जोरात व आवेशाने चर्चिला गेला. सॉमरफेल्डने मला जेव्हा अणुसिद्धांतावरील नील्स बोरच्या व्याख्यानमालेच्या श्रवणार्थ १९२१च्या उन्हाळ्यात गॉटिंजेनला बरोबर येण्याकरिता बोलाविले, तेव्हा त्याचा माझ्यावर काय परिणाम झाला असेल याची तुम्हास कल्पना चांगली येऊ शकेल. याच दालनात ती माला मी गुंफली जिचा त्यानंतर 'बोरचा महोत्सव' म्हणून निर्देश होत राहिला. त्या गॉटिंजेनच्या व्याख्यानमालेने माझ्या भावी विज्ञानविषयक व विशेषत: अणुपदार्थ विद्याविषयक प्रवृत्तीचे स्वरूप ठरले गेले.

श्रद्धेचा वा परंपरेचा विषय नव्हे

सर्वांत प्रथम असे की, ज्याने गांभीर्यपूर्वक या मुद्द्यांची पकड घेतली व सर्व जगात दुसऱ्या कोणाहीपेक्षा त्याचे अधिक चांगले ज्ञान करून घेतले, त्या माणसाच्या म्हणजे बोरच्या विचारांच्या सामर्थ्याची बोरच्या व्याख्यानात आम्हांस जाणीव होऊ शकली. दुसरे असे की, त्यात असे काही मुद्दे होते की, त्यासंबंधी मी पूर्वी ज्या प्रकारचे मत बनविले होते ते बोरच्या विवेचनापेक्षा भिन्न होते. रॉनच्या व हेनबर्गच्या दीर्घ सहलींत त्या प्रश्नावर मला खूप लढावे लागले.

या संवादांचा माझ्यावर खोल ठसा उमटला आहे. प्रथम ही गोष्ट मी शिकलो की, अणुरचना समजून घेण्याचा प्रयत्न करीत असता अमुक एक जण जर्मनीचा, डेन्मार्कचा की, इंग्लंडचा आहे, हे गैरलागू आहे. यापेक्षा अधिक महत्त्वाचे एक हे मी शिकलो की, विज्ञानात काय सत्य व काय असत्य, या संबंधाचा निर्णय नेहमी करावा लागतो. हा काही श्रद्धेचा, परंपरेचा किंवा गृहीत कृत्याचा प्रश्न नसतो; एक विशिष्ट निवेदन हे एकतर केवळ सत्य असू शकते व दुसरे निवेदन केवळ असत्य असू शकते. जन्म किंवा वंश यांच्याने हा प्रश्न सुटत नसतो; वस्तुस्वभावाने किंवा तुम्हास पाहिजे तर म्हणा, देवाने केव्हाही याचा निर्णय लागतो; माणसाच्या योगाने नव्हे.

बोरच्या प्रयोगशाळेत

या अनुभवांनी खूप संपन्न होऊन मी म्युनिचला परतलो व सॉमरफेल्डच्या निर्देशाखाली अणुरचनेचे प्रयोग चालू केले. मी माझी डॉक्टरेटची परीक्षा पुरी करून नंतर मी कोपेनहेगेनला १९२४ मध्ये शरदऋतूत बोरच्या बरोबर काम करण्याकरिता रॉकफेलर-दक्षिणेच्या मदतीने गेलो. तेथे मी अत्यंत भिन्न भिन्न राष्ट्रांतल्या- इंग्लिश, अमेरिकन, स्वीडिश, नॉर्वेजियन, डच, जपानी लोकांच्या मंडळत राहिलो. त्यांनाही त्याच मुद्द्यावर, बोरच्या अणुसिद्धांतावर काम करावयाची इच्छा होती. सहली, खेळ, संमेलने, सामने याकरिता ती सर्व मंडळी एखाद्या बड्या कुटुंबासारखी नेहमी बहुश: एकत्र जगत. या पदार्थविद्यांच्या मंडळीत इतर राष्ट्रांतील लोक व त्यांची विचारपद्धती जाणण्याची मला खरोखर संधी मिळाली. यांच्या योगाने दुसऱ्या भाषा शिकण्याची व बोलण्याची गरज पडली; जीवनाच्या अन्य पद्धती, परकीय वाङ्मय व परकीय कला यांच्याशी परिचित होण्याचा हा उत्तम मार्ग होता. जेव्हा एखादा कठीण वैज्ञानिक मुद्दा जाणून घेण्याकरिता समान यत्न सुरू होतो तेव्हा राष्ट्र व वंश यांचे वैचित्र्य हे अकिंचित्कर ठरते, हे मला अधिकाधिक स्वच्छ दिसत गेले. कलेत स्पष्ट दिसणारे वैचारिक वैचित्र्य हे विघटक कारण बनण्यापेक्षा कोणाच्याही शक्तीस संपन्नत्व आणते हे हि चांगले दिसले.

केंब्रिज येथील व्याख्यान

१९२५ च्या ग्रीष्मात मी केंब्रीजला येऊन पोचलो; आणि रशियन पदार्थविज्ञ कॅफ्ट्झा याच्या अध्ययनशाळषत एका महाविद्यालयातील सिद्धांताच्या मंडळापुढे मी भाषण केले. उपस्थितांच्या मध्ये वयाची २३ वर्षेही पुरी न केलेला, असामान्य नैसर्गिक देणगी असलेला एक विद्यार्थी होता; त्याने माझे मुद्दे घेतले व थोड्याच महिन्यांत अणुकवचाचा व्यापक सिद्धांत रचला. त्याचे नाव डिरॅक; उच्च गणित-सामर्थ्य असलेला तो विद्यार्थी होता. त्याच्या विचाररीती माझ्यापेक्षा फार भिन्न होत्या, गॉटिंजेनमध्ये आम्हांस परिचित असलेल्यांपेक्षा त्याच्या गणितरीती अधिक सुरेख व अधिक विलक्षण होत्या. असे होते तरी बॉर्न, जॉर्डन व मी ज्या निर्णयाप्रत आलो त्याच निर्णयाप्रत निदान महत्त्वाच्या सर्व मुद्द्यांच्या बाबतीत तरी तो आला. हे त्याचे निर्णय इतके सुंदर रीतीने परिपोषक ठरले हे प्रमाण व ही वस्तुस्थिती, विज्ञानाच्या 'वस्तुनिष्ठे'चा आणि भाषा, वंश

व श्रद्धा यांच्यावर अवलंबून विज्ञान नसते याचा अधिक पुरावा होय.

कॉपेनहेगेन व केंब्रिज प्रमाणेच गॉटेन्जेनही पदार्थज्ञांच्या आंतरराष्ट्रीय कुटुंबाचे केंद्र बनून राहिले आहे. त्या कार्याचे मार्गदर्शन फॅन्क, बॉर्न व पॉहल यांनी व ज्याच्या संबंधी तुम्ही वृत्तपत्रात अणुबाँब संबंधात नाव वाचले आहे त्या ओपेहायमर, ब्लॅकेट व गॉटिन्जेनला अध्ययन केलेला कवी यांनी केले आहे.

ह्या व्यक्तीविषयक आठवणी मी विज्ञानाची सार्वजनिक मालकी ही आंतरराष्ट्रीय आहे याचे उदाहरण दर्शित करण्याकरिता दिल्या आहेत. ही अशी मालकी इतर पुष्कळ विज्ञानात कित्येक शतके चालू आहे, व अशी ही अणुविज्ञांची कौटुंबिकताही काही निराळा प्रकार नाही. विज्ञानेतिहासाच्या आधारे मी, राष्ट्रांच्या सीमा ओलांडून समान कार्यामुळे संलग्न झालेल्या पुष्कळ पंडितांचे आंतरराष्ट्रीय गट उद्धृत करू शकेन.

१७ व्या शतकातील उदाहरण

युरोपात ज्यांनी १७व्या शतकात गणितविज्ञानाचा पाया रचला त्या वैज्ञानिकांच्या एका दुसऱ्या गटाचाही निर्देश करू शकतो. हे उचितही आहे. कारण या वर्षी लाइब्नीझचा स्मृत्युत्सव व वैज्ञानिक विद्यापीठांच्या पायाभरणीचा उत्सव साजरा होत आहे. त्या युगाच्या (Dilthey) डिल्थेने केलेल्या वर्णनातील काही थोडी वाक्ये येथे उद्धृत करणे मला पसंत वाटते....

''ज्यांनी या नव्या विज्ञानाला आपली आयुष्ये वाहिली त्या थोड्या व्यक्तींना भाषा व राष्ट्र यांच्या कसल्याही मर्यादांचा अडथळा न येता एका बंधनाने एकत्रित केले. पूर्वीच्या नवजीवनाच्या दिवसातल्या प्रमाणे त्यांनी एक नवा श्रेष्ठ वर्ग निर्मिला व त्याबद्दल त्यांना जाणीवही होती. मानवतावादी व कलाकार यांनाही आपण श्रेष्ठवर्गीय आहोत, अशी भावना होती. लॅटिन भाषा व नंतर फ्रेंच भाषा यांनी शक्य तितकी परस्परांबद्दल अत्यंत सहज सद्भावना निर्मिली व त्या वैज्ञानिक विश्ववाङ्मयाचे साधन बनल्या. सतराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास पॅरिस हे तत्त्वज्ञ व वैज्ञानिक यांच्या सहकार्याचे केंद्र बनले. गॅसेडी, म्हासेन व हॉब्ज यांच्यात विचारविनिमय झाला आणि अभिमानी व एकान्ती डेकार्टही या मंडळात सामील झाला. हॉब्जवर व नंतर लाइब्नीझवर त्याच्या उपस्थितीचा अविस्मरणीय ठसा उमटला; कारण, ते दोघे तेथे गणिताचे भक्त बनले. नंतर लंडन दुसरे केंद्र झाले.

सर्व इतिहासात नेहमी या मार्गाने विज्ञानाचे कार्य चालत आले आहे आणि 'ऋषींच्या स्वराज्या'ने युरोपच्या जीवनात महत्त्वाचा भाग घेतला आहे. हीही गोष्ट स्वयंसिद्ध मानली गेली आहे की, अशा आंतरराष्ट्रीय मंडळाच्या आश्रयाने व्यक्तिश: वैज्ञानिकांना स्वत: लोकांच्या भक्तिपूर्वक सेवेपासून व त्यांच्याशी असावयाच्या एकरूपतेपासून वंचित केले नाही. एवढेच नाही. उलट आपले क्षितिज असे व्यापक केल्याने आपल्या स्वदेशाच्या जीवनाच्या उत्कृष्ठ कक्षांचा आदर पुष्कळदा वाढतो. माणसाला त्याच्या भक्तीचे शिक्षण मिळते. आपल्यावरील त्याच्या ऋणाची जाणीव राहते.

(२) इतके सर्व म्हटल्यावर मी याही प्रश्नाची चर्चा आता केली पाहिजे; तो म्हणजे हे सर्व वैज्ञानिक सहकार्य, हे सर्व खरे मानव्यपूर्ण संबंध, द्वेषाचे व युद्धाचे निवारण करण्याच्या बाबतीत फारसे काही करू शकत नाहीत, हा होय.

विज्ञान व राजकारण

सर्वांत ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, विज्ञान हे सार्वजनिक जीवनाच्या लहान भागाचे प्रतिनिधिभूत असते व प्रत्येक देशातील फार थोडे लोक विज्ञानाशी खरेखुरे निगडित असतात. राजकारणे अधिक समर्थ शक्तींनी आकारास आणलेली असतात. राजकारणात जनतेचे मोठे पुंज, त्यांच्या चळवळी, आर्थिक स्थिती आणि परंपरेचा पाठिंबा असलेल्या व आनुकूल्य असलेल्या लहान गटांची सत्तेची धडपड लक्षात घ्यावी लागते. विवाद्य प्रश्न वैज्ञानिक रीतीने म्हणजे वस्तुनिष्ठेने भावनेची बाधा टाळून व एकमेकांबद्दल सद्भावना ठेवून चर्चिण्यास जे उद्यत असतात अशा अल्पसंख्याकांवर या शक्तींची कुरघोडी नेहमी होत असते. विज्ञानाचा प्रभाव राजकारणावर नेहमी अल्पच होत आला आहे, आणि याचा अर्थ समजू शकतो. परंतु राजकारण इतर कोणत्याही माणसांच्या गटापेक्षा अधिक अवघड परिस्थितीत वैज्ञानिकास ठेवते. कारण जनतेच्या जीवनावर विज्ञानाचा व्यावहारिक प्रभाव फार महत्त्वाचा असतो. विज्ञानाच्या स्थितीवर भरभराट व राजकीय सत्ता अवलंबून असते. वैज्ञानिकाचे विज्ञानावरील प्रेम हे कमी व्यावहारिक स्वरूपाचे असले तरी त्याच्या व्यावहारिक परिणामांची उपेक्षा तो करू शकत नाही. या रीतीने व्यक्तिश: वैज्ञानिकाच्या कृतीचा परिणाम त्याच्या इच्छेच्या कक्षेबाहेर अधिक होत असतो. म्हणून त्याला एखादा उद्देश योग्य की अयोग्य यासंबंधी विवकेबुद्धीच्या अनुसाराने निर्णय घ्यावा लागतो. जेव्हा राष्ट्राराष्ट्रांमधील मतभेद मिटण्याचा संभव नष्ट होतो तेव्हा पुष्कळदा त्याला अत्यंत यातना देणाऱ्या निर्णयास तोंड द्यावे लागते; एकतर आपल्या लोकांशी तरी किंवा दुसरे आपल्या समान कार्यातील मित्रांशी तरी संबंध तोडणे भाग पडते. भिन्न विज्ञानांच्या बाबतीत काहीशी भिन्न परिस्थिती उद्भवते. वैद्यक तज्ज्ञ राष्ट्रभेद लक्षात न घेता लोकांना मदत करतो. राज्याच्या व विवेकाच्या आज्ञेच्या अनुसाराने त्याला आपली कृती पदार्थज्ञापेक्षा अधिक सौलभ्याने जुळवून घेता येते; कारण पदार्थज्ञाच्या शोधांनी विध्वंसक शस्त्रे निर्माण होतात. परंतु सर्वसामान्यपणे हा ताण कायम राहतो; एका बाजूस राज्याच्या अपेक्षा अशा असतात की, विज्ञानाने आपल्या स्वत:च्या लोकांच्याच विशेषकरून उपयोगी पडावे व आपलीच राजकीय सत्ता बळकट करावी. दुसऱ्या बाजूस वैज्ञानिकांचे आपल्या कार्यासंबंधी एक कर्तव्य असते; त्या कार्याने इतर राष्ट्रांतील लोकांशी त्याला निगडित केलेले असते.

गेल्या काही दशकांत वैज्ञानिक व राज्य यांच्यातील संबंधांत फरक पडला आहे. पहिल्या जागतिक युद्धात वैज्ञानिक हे राज्याशी इतके बांधले गेले होते की, विद्यापीठांनी इतर परदेशी वैज्ञानिकांना वारंवारे बडतर्क केले. किंवा इतर राष्ट्रांच्या हितविरोधी असलेल्या व स्वत:च्या राष्ट्रीयहिताशी संबद्ध असलेला ठरावावर सह्या केल्या दुसऱ्या सबंध जागतिक युद्धात असे

क्वचितच घडले. वैज्ञानिकांचा आपसांतील दुवा खूपच बळकट होता त्यामुळे पुष्कळ देशांत त्यांच्यामध्ये व स्वदेशीय राज्यांमध्ये वांधे उत्पन्न झाले. वैज्ञानिकांनी आपल्या सरकारांची धोरणे स्वतंत्रपणे व ध्येयवादी एककल्लीपणा सोडून बरी वाईट ठरविण्याचा हक्क वापरला. वैज्ञानिकांच्या आंतराष्ट्रीय संबंधाकडे राज्ये दाट शंकेने स्वत:च्या बाजूने पाहू लागली, त्यामुळे परिणाम असा झाला की कित्येकदा ती वैज्ञानिकांना स्वदेशातच कैद्याप्रमाणे वागवू लागली व त्याचे आंतरराष्ट्रीय संबंध जवळजवळ अनैतिक मानले जाऊ लागले. उलट, ही गोष्ट क्रमानेच आता प्राप्त झाली आहे की, त्यांचे सहकारी शत्रुदेशातले असले तरी त्यांना वैज्ञानिक शक्य तेथे मदत करू लागतील. ही घटना राष्ट्रीय संबंधांच्याऐवजी भाग्यशाली असलेले आंतरराष्ट्रीय संबंध घडवील, परंतु याच्या योगाने, मोठ्या जनसमुदायांच्या ठायी प्रत्यक्ष अविश्वास व शत्रुत्व यांची भयजनक लाट उत्पन्न करण्याचे साधन ही गोष्ट बनणार नाही, याची खबरदारी विज्ञानव्यवसायासंबंधी घेतली जावी.

जेव्हा पूर्वी काही शतकांत वैज्ञानिक माणसे सहिष्णुतेचे तत्त्व आणि प्रस्थापित राज्यसत्तेचा विरोध करून शब्दप्रामाण्यापासूनचे स्वातंत्र्य यांच्या रक्षणार्थ उद्युक्त झाली तेव्हा असे वांधे उभे राहिले होते. आपण केवळ गॅलिलिओ व गिऑर्डोनो ब्रूनो याचा विचार करावा. आज या वांध्यांना जास्त महत्त्व आले आहे. कारण कोट्यवधी माणसांचे भवितव्य, विज्ञानाचे व्यावहारिक परिणाम प्रत्यक्ष ठरवू शकतात.

विज्ञानाची जबाबदारी

या गोष्टीमुळे मी आपल्या वर्तमान अस्तित्वाच्या भयदायक बाजूकडे वळतो, ती त्वरित लक्षात घेणे जरूर आहे. त्यामुळेच आपण योग्य उपाय योजू शकू. ज्या नव्या शक्तिस्थानांवर पदार्थ विज्ञानाने आपला गेल्या वर्षी अधिकार स्थापन केला आहे व अकल्पनीय विनाश हा ज्याचा परिणाम होऊ शकतो, केवळ त्याबद्दल मी बोलत नाही. हे खरे आहे की, या गेल्या युद्धात जिवाच्या नाशाची साधने असलेली रासायनिक द्रव्ये जवळजवळ वापरलीच नाहीत; तरी निसर्गामध्ये हस्तक्षेप करणाऱ्या नव्या शक्ती इतर बहुत क्षेत्रांत आपणास भिववीत आहेत. जीवविज्ञानातही आनुवंशिक प्रक्रियांमध्ये व श्वेतीय व्यूहाणु (Albuman Molecule) रसायन व रचना यांच्यात अशी अंतर्दृष्टी आपणांस लाभली आहे की त्यामुळे कृत्रिम रीतीने संसर्गजन्य रोग उत्पन्न करण्याची व्यवहार्य शक्यता निर्माण झाली आहे. आणि किंबहुना याहीपेक्षा वाईट असे आहे की, पूर्वनिश्चित असे निवडक बीजाधान करावयाचे, या एका विशिष्ट उद्देशाने माणसाची जीवमय वाढ प्रभावित करणे शक्य होईल. अखेरची गोष्ट ही आहे की, लोकांची मानविक व आध्यात्मिक अवस्थाही प्रभावित करता येईल. हे जर वैज्ञानिक दृष्टिकोनास धरून केले तर मोठ्या लोकसमुदायाच्या भयानक मानसिक विरूपतेस कारण होईल. याचा मनावर असा ठसा उमटतो की, विज्ञान अशा एका प्रदेशाच्या विस्तृत आघाडीकडे वळले आहे की त्यात लोकांच्या एका फार लहान गटांच्या कृतींवर सबंध मानवजातीचे जीवन व मरण अवलंबून राहू

लागेल. आतापर्यंत ह्या गोष्टी नियतकालिकीय व सनसनाटीच्या रीतीने वृत्तपत्रात चर्चिल्या गेल्या आहेत. परंतु पुढे सरकणाऱ्या वैज्ञानिक विकासाचे परिणामभूत भयंकर संकट बहुतेक लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आलेले नाही. या संकटांचा सामना करणे व मानवजातीने राष्ट्रीय व ध्येयवादी दृष्टीला बाजूस ठेवून या आपत्तींचा सामना करण्यास एक होणे जरूर आहे हे सांगण्याची मोठी कठीण जबाबदारी विज्ञानावर येऊन पडली आहे; हे करण्यापेक्षा बोलून दाखविणे सोपे आहे; परंतु या जबाबदारीतून आपणांस सुटका शक्य नाही.

व्यक्तिश: वैज्ञानिकांस विवेकास धरून व सर्व लाग्याबांध्यातून मुक्त होऊन हे ठरविणे जरूर आहे की कोणते उद्दिष्ट योग्य आहे, निदान अनेक उद्दिष्टांपैकी कोणते कमी वाईट आहे. मोठे जनसमुदाय त्यांच्याबरोबर सरकारी सत्ता ताब्यात असलेले लोक बहुतेक अविचाराने व अंध पूर्वग्रहाने वागतात या वस्तुस्थितीतून आपण सुटू शकत नाही. त्यांना विज्ञानबोध अर्पण करून काय उपयोग? शिलरने केलेले हे वर्णन येथे बरोबर लागू पडते: ''जो शाश्वत अंध आहे त्याच्यावर स्वर्गीय प्रकाश जे टाकतात त्यांच्याबद्दल शेकच करावा! त्या टाकलेल्या प्रकाशाचा त्याला काय फायदा? त्याने कोळसा होतो, देश व नगरे काळवंडतात.''

जेव्हा अशी परिस्थिती विज्ञानाच्या समोर उपस्थित होते तेव्हा विज्ञान भिन्न राष्ट्रांच्या मध्ये सद्भावना उत्पन्न करण्यास समर्थ होते काय? मोठी सामर्थ्ये मोकळी सोडण्याची शक्ती विज्ञानात आहे; पूर्वी कधी काळी माणसांच्या कह्यात होती त्यापेक्षा मोठी; परंतु ही सामर्थ्ये जर विचाराने वापरली नाहीत तर ती बेबंदशाहीकडे नेतील.

एक स्वाभाविक महाकर्तव्य

(३) ही गोष्ट विज्ञानाच्या खऱ्या स्वाभाविक महाकर्तव्यापुढे माझे लक्ष वेधते. आताच विज्ञानाचा विकास मी वर्णिला; मनुष्य ज्या शक्तींचे नियंत्रण करतो. त्याच त्याच्याविरुद्ध नेमक्या सुटतात व भयंकर महाविनाशाकडे ओढून नेतात; म्हणून हा विकास आपल्या युगातील आध्यात्मिक प्रक्रियांशी निश्चितपणे अत्यंत संबद्ध असला पाहिजे. म्हणून त्यासंबंधी संक्षेपाने बोलणे आवश्यक आहे.

आपण थोडी शतके मागे दृष्टिक्षेप करू या. दिव्य संदेशाभोवती केंद्रित असलेल्या ख्रिश्चनधर्मोक्त विश्वतत्त्वाशिवाय दुसरे एक भौतिक अनुभवांतील विश्वतत्त्व मनुष्यास मध्ययुगाच्या अखेरीस गवसले. ते 'वास्तविक' विश्वतत्त्व होते, ते आपणांस आपल्या इंद्रियद्वारा किंवा प्रयोगाने अनुभवता येते. परंतु या नव्या क्षेत्रातील प्रगतीत विचारपद्धती न बदलता तशीच राहिली. कार्य-व-कारण-संबंधानुसारे कालक्रमात ज्याच्यात बदल होतो त्या दिग्गत वस्तूंचा निसर्ग तेव्हा दिसत होता. याशिवाय, एखादा साधारणपणे उत्तम आरसा असावा त्याप्रमाणे असलेले आध्यात्मिक जगत म्हणजे बाह्य जगाचे प्रतिबिंब घेणारे असे आपल्या स्वतःच्या मनोच अस्तित्व होते. ख्रिश्चनधर्मीय विश्वतत्त्वाहून विज्ञानाने निश्चित झालेले विश्वतत्त्व भिन्न होते; ख्रिश्चनधर्माच्या पक्क्या पायावर आधारलेले दिव्य विश्व मानवी कर्मासहित वर्णिलेले होते; व जीवनाच्या

उद्दिष्टासंबंधी त्यात संशय नव्हता. (विज्ञानाने निश्चित केलेले) जगत दिक्कालबद्ध व अनंत होते, त्याने परमेश्वराचे स्थान घेतले होते, निदान ते अनंतत्त्वामुळे देवाचे लक्षण बनले होते.

परंतु हे निसर्गविषयक दर्शनही आपल्या या शतकात आतून ढासळले आहे. प्रत्यक्ष क्रिया अधिकाधिक जशी जगताच्या गाभ्यापर्यंत (अणूपर्यंत) शिरू लागली तशी विचाराच्या मौलिक प्रवृत्तीची संपूर्ण महती गमावली जाऊ लागली आहे. काल व दिक् हेसुद्धा अनुभव विषय बनले व त्यांचा वैशिष्ट्यपूर्ण गाभा गमावला. विज्ञानात आपण हे अधिकाधिक पहात आहोत की एक विशिष्ट निश्चित ज्ञान आधार धरून आपला निसर्गाचा बोध सुरू होत नाही; अशा खडकासारख्या पायावर तो बोध उभारता येत नाही; उलट सर्व ज्ञान एका अगाध अशा गव्हरावर तरंगत पडले आहे.

ही विज्ञानाच्या विकासाची पायरी व मानवी जीवनातील मूल्यांचा वाढत असलेला परस्पर साक्षेप तारतम्य विचार यांच्यात साम्य उत्पन्न होत आहे. तारतम्य विचार कित्येक दशके सुरू झालेला दिसत आहे. 'कोणत्या ध्येयाकरिता' या निर्वाणीच्या प्रश्नाने वेढलेली संशयी प्रवृत्ती हीच त्याची परिणती होय. अशा रीतीने, ज्यास आपण 'शून्यवाद' म्हणतो त्या प्रकारची अश्रद्धेची प्रवृत्ती वाढू लागली आहे. या दृष्टिकोनाने जीवन ध्येयशून्य दिसू लागते; किंवा फार तर, ज्यात आपले काही नाही चालत म्हणून आपणास निमूटपणे सहन करावे लगणारे असे ते एक साहस होय, असे दिसू लागते. ही प्रवृत्ती जगाच्या पुष्कळ भागात आपणांस आढळते. आणि व्ही. वाइझेकरने नुकतेच म्हटल्याप्रमाणे आभासमय शून्यवाद असा त्याचा अत्यंत विषादमय आकार होय. आभास व आत्मवंचना यांच्या बुरख्यातला हा शून्यवाद होय.

प्रत्येक शून्यवादी प्रवृत्तीची वैशिष्ट्यपूर्ण खूण म्हणजे भरीव श्रद्धेची उणीव होय; भरीव श्रद्धा व्यक्तीच्या सर्व प्रतिक्रियांना दिशा व बल देऊ शकते. काय योग्य व अयोग्य आहे, किंवा आभास काय आहे व यथार्थ काय आहे, याच्या प्रमादरहित स्वाभाविक जाणिवेच्या उणिवेमुळे शून्यवाद व्यक्तीच्या जीवनात आपोआप व्यक्त होतो. राष्ट्रांच्या जीवनात याच्या योगाने दिशा बदलते; त्यातील एका विशिष्ट ध्येयाच्या सिद्ध्यर्थ संहत झालेल्या शक्तींवर विरुद्ध परिणाम घडतो, त्यांच्या योगाने मोठा विनाश ओढावतो. जनसमुदाय द्वेषाने इतके अंध होतात की ते हा बदल उपेक्षावृत्तीने बघत राहतात व नुसता खांदा उडवून त्याला उडवून लावतात.

मी थोडे अगोदर म्हटले की, माणसांच्या दृष्टीत पडलेला हा फरक वैज्ञानिक विचारांतील फरकाशी संबद्ध आहे. म्हणून, विज्ञानाच्याही भरीव श्रद्धा नष्ट झाल्या आहेत काय, असा प्रश्न आपण विचारला पाहिजे. ही गोष्ट अगदी स्पष्ट करण्यास मी उत्सुक आहे की असा प्रश्नच येथे नाही. वस्तुस्थिती याच्या उलट आहे. जगाच्या महान प्रश्नाचे अधिक आशावादी प्रवृत्तीस पूरक असे आपल्यापाशी असलेले बहुधा बलवत्तम उत्तर म्हणजे वर्तमानकालीन विज्ञानाची स्थिती होय.

कारण या विज्ञाच्या शाखांच्यामध्ये आम्हाला असे आढळून आले की आपले ज्ञान अधांतरी

लोंबकळत आहे. त्याच विज्ञानाशाखांत संबद्ध विषयाचे स्फटिकसंकाश ज्ञान आम्हांस प्राप्त झाले आहे. हे ज्ञान इतके पारदर्शक आहे आणि इतके निर्णयसामर्थ्याचे जनक आहे की अत्यंत भिन्न लोक व वंश यांतील वैज्ञानिकांनी ते भावी सर्व विचाराचा व ज्ञानाचा निश्चित पाया म्हणून स्वीकारले आहे; अर्थात आम्हीसुद्धा विज्ञानांत चुका करतो; आणि त्या चुका सापडावयास व दुरुस्त करावयास वेळही लागू शकतो. परंतु आपण निश्चितपणे खात्री बाळगू शकतो की, काय खरे व काय खोटे यासंबंधी अखेरचा निर्णय लागणार आहे. श्रद्धा, वंश किंवा वैज्ञानिकांचा जन्म यावर अवलंबून हा निर्णय लागणार नाही; तो एका उच्चतर शक्तीला सापडणार आहे, नंतर तो सर्व काळच्या सर्व मानवांना लागू पडेल. जरी राजकारणी जीवनात मूल्यांमध्ये सतत परिवर्तन होत राहणे आणि एक प्रकारचा भ्रम व गैरमार्गी विचार यांचा एक गट व दुसऱ्या प्रकारचा भ्रम व गैरमार्गी विचार याचा दुसरा गट यांमध्ये मारामारी होत राहणे हे आपणास टाळता येणार नाही, परंतु विज्ञानांत नेहमी 'खरे व खोटे' हे राहीलच. आपल्या इच्छांनी प्रभावित न होणारी एक उच्चतर शक्ती आहे ती अखेरीस निर्णय करते व योग्यायोग्य ठरवते. माझ्या मते प्रत्यक्ष व्यवहाराशी असंबद्ध अशा शुद्ध विज्ञानांनी विज्ञानाचा गाभा तयार केला आहे. निसर्गाची झाकलेली संवादित्वे उघडकीस आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या शुद्ध विचाराच्या शाखा आहेत. आज मानवजातीस हे सर्वांत आतले वलय सापडू शकेल; यांत विज्ञान व कला यांच्यात भेद पाडणे कठीण होईल; यातील शुद्ध सत्याची मूर्ती मानवी ध्येयवादांनी व वासनांनी झाकून टाकणे कठीण आहे.

यावर तुम्ही असा आक्षेप घेऊ शकाल की, मोठ्या जनसमुदायांना या सत्याजवळ प्रवेश नाही, म्हणून ते लोकप्रवृत्तीवर अल्पच प्रभाव करू शकेल. या केंद्राजवळ प्रवेश मोठ्या जनसमुदायांना कोणत्याही काळी नव्हता, असेही शक्य आहे; लोकांना आज यामुळे समाधान असे मिळेल की, द्वार सर्वांना मोकळे नसले तरी दरवाजाच्या आत काही फसवणूक असणे शक्य नाही. तेथे आपली शक्ती चालत नाही, निर्णय उच्चतर शक्तीने घेतले जात आहेत. या 'केंद्रा'बद्दल भिन्न काली भिन्न शब्द लोकांनी वापरले आहेत. ते त्याला 'चैतन्य' किंवा 'देव' म्हणत, किंवा ते उपमांच्या रूपाने किंवा ध्वनी वा चित्र यांच्या प्रकारांच्या रूपाने त्याबद्दल बोलत. या केंद्राकडे जाणारे अनेक मार्ग आजही आहेत, विज्ञान हा त्यांपैकी एक होय. त्याविषयी आपला अभिप्राय ज्ञात व्हावा अशी सामान्यपणे संमत असलेली भाषा आता आपल्यापाशी नाही. पुष्कळ माणसांना त्याचे दर्शन होत नाही; हेच कारण असावे परंतु ते नेहमी जेथे होते तेथे ते आज आहे. त्यांच्यावर आधारलेली जगताची रचना कोणतीही असू शकते. तद्विषयक दृष्टी ज्यांनी गमावली नाही, त्या माणसांनी ती जगताची रचना चालविली पाहिजे.

सद्भावनेचे साधन

राष्ट्रराष्ट्रांमधील सद्भावनेस विज्ञान मदत करू शकते. ते मदत करू शकते याचे कारण त्याच्यापासून रोगग्रस्तास तरणोपाय मिळतो हे नव्हे किंवा एखाद्या राज्यशक्तीला त्याच्या

साहाय्याने सार्वत्रिक दहशत बसविता येते, हेही नव्हे; तर सर्व जगात ज्याच्या योगाने सुव्यवस्थेची स्थापना होऊ शकते अशा त्या (विश्वाच्या) 'केंद्रा'कडे व बहुतेक केवळ, जगत सुंदर आहे, या मुद्द्याकडे लक्ष विज्ञान वेधून घेईल म्हणून. विज्ञानाला इतके महत्त्व देणे हे फाजील विश्वासाचे दिसेल; मी ही गोष्ट तुमच्या ध्यानात आणून देतो की पूर्वीच्या युगाचा जीवनसंबंधी अनेक कक्षांच्या बाबतीत हेवा वाटावा यास आपल्यापाशी पुरावा आहे; परंतु आपले युग हे वैज्ञानिक यशस्वितेत प्रकृतीच्या विशुद्ध ज्ञानात सर्वांत अग्रेसर आहे.

काहीही होवो, ज्ञानाची केवळ अभिरुची ही मानवजातीत एक अंतस्थ शक्ती म्हणून पुढील काही दशके राहणार आहे. जरी ही विज्ञानाची अभिरुची विज्ञानाच्या व्यावहारिक परिणामाखाली व सत्तेच्या लढ्याखाली काही काळ झाकली गेली तरी अखेरीस ही अभिरुचीच विजयी होईल व सर्व राष्ट्रांच्या व सर्व वंशांच्या लोकांना एका साखळीत आणील. जगातील सर्व भागांतले लोक- हे नवे ज्ञान जेव्हा प्राप्त होईल तेव्हा- सुखी होतील, व ज्याने हे ज्ञान प्रथम प्रकट केले त्याच्याबद्दल कृतज्ञता प्रकट करतील.

प्रिय विद्यार्थ्यांनो, तुमच्या मंडळाकडून राष्ट्राराष्ट्रांमधील सद्भावनेस साहाय्य व्हावे याकरिता तुम्ही येथे जमलेले आहात. दुसऱ्या राष्ट्रातील जनांच्या विचारांच्या व भावनांच्या पद्धतींचे ज्ञान तारुण्यास शोभणाऱ्या स्वयंस्फूर्त व स्वैर, रीतीने संपादण्यास सिद्ध होण्याशिवाय अधिक चांगला मार्ग नाही. तुमच्या वैज्ञानिक कार्यातून विचाराची गंभीर व अदृश्य रीती स्वीकारा, ती पसरण्यास मदत करा, त्याशिवाय कसलीच योग्य जाणीव उत्पन्न होऊ शकत नाही. विज्ञानाच्या पैलतीरावरील वाणीने वर्णन करण्यास कठीण व खऱ्या महत्त्वाच्या वस्तूबद्दल पूज्यबुद्धी बाळगा...*

* Philosophie Problems of Nuclear Science या पुस्तकातील ८ वे व्याख्यान- 'Seience as a means of International understanding.'

(नवभारत, एप्रिल, १९५७ पृ. ११ ते १८)

○○○

१००

मार्क्सवादाची जादू
- डॉ. मायकेल पोलॅनी

- १ -

मार्क्सवादाचा प्रचारकीय प्रभाव हे अत्यंत विचारणीय असे अनैतिकतेमधील नैतिक शक्तीचे उदाहरण आहे, असे म्हणता येईल.

इसाया बर्लिनने मार्क्सच्या चरित्रात मार्क्स अशा स्वरूपात दाखविला आहे की, मार्क्स हा स्वतः भविष्यदर्शी असलेल्या ध्येयवादाचा पुरस्कार करतो, परंतु ते करीत असता त्यात ध्येयविषयक सर्व निर्देशांचा तिरस्कार अन्तर्भूत करतो. त्याचा ध्येयवाद म्हणजे अन्तर्विरोधाने भरलेले दूषित तत्त्व आहे. याच तत्त्वाचा हत्यार म्हणून उपयोग करताना मार्क्सचे प्रचारकीय अलौकिक कौशल्य व्यक्त होते- "मार्क्सच्या नावाने जे लेखणीचे फटकारे दिसून येतात आणि भयानक असे जाता जाताना केलेले टीकात्मक निर्देश आढळून येतात, त्या सर्वांचा रोख शाश्वत न्याय, मानवी ऐक्य, संग्राम अशा प्रकारचे वाक्यप्रयोग साफ नष्ट करण्याकडे दिसून येतो. हे वाक्यप्रयोग त्या वेळच्या लोकशाही चळवळीचे कायम वापरावयाचे भांडवल होते. मार्क्सला असे वाटत होते की, ही व्यर्थ लबाडी आहे, विचारांचा गोंधळ आणि निरुपयोगी यत्न यांचे दर्शक ते वाक्यप्रयोग आहेत."

न्याय, समता व स्वतंत्रता यांच्याबद्दल तिरस्कार असूनही सोविएट रशिया हा याच ध्येयांचा खरा पुरस्कर्ता म्हणून अनेकांनी पत्करला आहे असे नव्हे तर, रशियाकडून तसा तिरस्कार व्यक्त केला जातो या कारणामुळे त्या ध्येयांचा पुरस्कर्ता म्हणून तो आहे की, "बोल्शेविकांचे रशियात व इतरत्र असे आग्रहाने सांगणे असते की, आम्ही सामान्य नैतिक मर्यादांना मान्यता देत नाही". हे सांगणे कम्युनिस्ट प्रचाराचा मुख्य आधार आहे: हा प्रचार बरोबर ह्याच नैतिक भावनांना व नैतिक मर्यादांना आवाहन देतो.

विरुद्ध अशा ह्या सिद्धान्तात इतकी श्रेष्ठ श्रद्धोत्पादक शक्ती का असावी? याचे उत्तर माझ्या कल्पनेप्रमाणे असे आहे की, नैतिक तत्त्वांबद्दल स्वतःमध्ये असलेल्या शंकेने व्यथित असलेल्या

आधुनिक मनाला नैतिक भावनांचा उपभोग व कठोर वस्तुवादाबद्दलची तृष्णा या दोन्हींचे समाधान करणारी शैली या सिद्धान्तात अन्तर्भूत आहे. 'विरोधविकासयुक्त भौतिकवादी' तत्त्वज्ञानाच्याद्वारा मार्क्सवाद आपल्या युगातील उच्च नैतिक गतिशीलता व मानवी व्यवहार म्हणजे वस्तुवादानुसारे चालणाऱ्या यांत्रिक प्रक्रिया होत असे मानण्यास लावणारी विवेचक दृष्टी यांच्यामधील विरोधास खुबीने दृष्टिपथाच्या बाहेर नेतो. ज्या वदतो व्याघातांनी (Dilemmas) उदारमतवादी मन पांगुळते आणि अडखळते ते व्याघातच मार्क्सवादाचा आनंद व शक्ती होय; आपल्या नैतिक वासना जितक्या अधिक उधानास येत असतील व आपली वस्तुनिष्ठ दृष्टी जितकी अधिक नीतिनिरपेक्ष बनलेली असेल तितकी या परस्परविरोधी तत्त्वांची सांगड अधिक प्रभावी बनते; या सांगडीमध्ये ही विरोधी तत्त्वे एकमेकांस दृढ बनवू लागतात.

हा गुण समजावून घ्यावयाचा असेल तर मार्क्स जसा समाजवादाच्या तृष्णेने व पुंजीवादाच्या भयाने भारलेला होता तसे तुम्ही भारलेले आहात अशी स्वतःबद्दल कल्पना करा. स्वतंत्रता, न्याय व बंधुता या ध्येयांकडे या दृष्टीने बघताना तुम्हांस उदाहरणार्थ असे दिसेल की, या ध्येयांवर आधारलेला नेपोलियनचा विधिग्रंथ सामंतशाहीचा विनाश करण्यात व युरोपभर खाजगी उद्योगांच्या पद्धतीत अनुकूल असा मार्ग पुंजीशहास मोकळा करण्यात अत्यंत यशस्वी झाला. तुमच्या हेही लक्षात येईल की, तो विधिग्रंथ त्या काळापासून आतापर्यंत पुंजीवादी व्यवस्थेचा प्रतिपालक बनला. त्या व्यवस्थेने ज्या सामंतशाहीची नियमसंस्था उखडली त्या सामंतशाहीचा व ज्या कामगार वर्गाचे दास्य चालू ठेवले त्या वर्गाचा विरोध करणाऱ्या त्या पुंजीशाहीचे बाह्यरूप म्हणून ही ध्येये आहेत, असे तुम्हांस दिसेल व पुंजीशाहीच्या नैतिक ध्येयांमध्ये पुंजीशाहीचे हितसंबंध गर्भित आहेत, असेही दिसेल. पुंजीवादाच्या अनैतिक रूपाचे आविष्करण हा वैज्ञानिक समाजवादाचा अभावात्मक अंश आहे.

आता दुसरी गोष्ट म्हणजे समाजवादी क्रांतिकारक कृतीचा विचार करा. कामगारवर्गाने एके दिवशी पुंजीशाहीचा निःपात केला आहे आणि स्वतंत्रता, न्याय व बंधुता यांचे राज्य स्थापन केले आहे, असे घडवून आणण्याच्या उत्कंठेने तुम्ही भारलेले आहात. परंतु स्वातंत्र्य, न्याय व बंधुता यांच्या नावाने ही मागणी तुम्ही मागू शकत नाही; कारण तुम्हास अशा भावनाप्राधान्याचा तिरस्कार आहे. म्हणून तुम्ही समाजवादाच्या ध्येयाचे अद्भुत भावरम्य रूप बदलून विज्ञान बनविता. सध्या पुंजीशाहीने बंधनात ठेवलेल्या संपत्तीचा व सुखाचा नवा प्रवाह कामगारवर्गाने उत्पादनसाधने काबीज केल्यामुळे मोकळा सुटतो, ही गोष्ट ठासून सांगण्याच्या योगाने तुम्ही त्याचे विज्ञान बनविता. हे ठासून सांगण्याने समाजवादाच्या नैतिक आकांक्षांचे समाधान होते. आशाआकांक्षांनी भरलेले लोक त्याचा वैज्ञानिक सत्य म्हणून स्वीकार करतात. ह्यामुळे नैतिक आकांक्षांना वैज्ञानिक निर्णयाचा आकार मिळतो; हा दुसरा विधायक गर्भित अंश होय. ही मार्क्सवादाची दुसरी शाखा होय. वैज्ञानिक मुखवट्याच्या योगाने, ही केवळ भावना-विवशता होय म्हणून व्हावयाच्या निंदेपासून नैतिक भावनांचे रक्षण होते; आणि त्याच वेळी, याच्या योगाने

भौतिक, ऐहिक ध्येयांच्या पोटात नैतिक भावनांचा उत्साह भरता येतो.

अबाध्य दोष

आता ही गोष्ट कोणासही दिसून येईल की, मार्क्सवादाच्या या दोन्ही (अभावात्मक व विधायक) शाखा, नीतीला काही स्वगतशक्ती असते हे नाकारून काम करतात; व इतके करूनही नैतिक वासनांना आवाहन देतात. पुंजीशाहीचे दोषदर्शन करणे हा या पृथक्करणाचा अंतस्थ हेतू असल्यामुळे ह्या पृथक्करणाचे पर्यवसान पुंजीशाहीचे ढोंग उघड करण्यात होतो. असे मानता येईल की, नैतिक उद्देशांचे भौतिक, ऐहिक हितसंबंधांच्या स्वरूपात केलेले पृथक्करण हे सामान्यतः कोठेही लागू पडते म्हणून जे कोणी त्याच्या योगाने ढोंग उघडकीस आणतात त्यांचेही नैतिक उद्देश त्यामुळे हिणकस ठरतात. परंतु हे उद्देश स्पष्टपणे उद्घोषित झाल्यामुळे त्यांचे ढोंग बाहेर न येता ते शाबूत राहतात. पुंजीशाही ध्येयवादांचे ढोंग उघडकीस आणण्याच्या पद्धतीने ते त्यात कोणताही नैतिक निर्णय जाहीर न करता, इतरांमध्ये सामर्थ्यशाली नैतिक भावनांचे उत्थापन करतात; परंतु हे ढोंग उघडकीस आणण्याचे काम शुद्ध वैज्ञानिक परिभाषेत चालवितात. त्यामुळे प्रचाराचे असे फळ त्यांच्या पदरात पडते, त्या कारणामुळे नैतिक रूप आणण्याची शंकाही स्पर्श करू शकत नाही.

अर्थात ही 'वैज्ञानिक' विधाने मान्य होतात याचे कारण, त्यांच्या योगाने काही विशिष्ट नैतिक भावनांचे समाधान होते, हे होय. पुंजीशाही ध्येयवादांच्या संबंधाची मीमांसा आणि आवृत्त उद्देशांचे ढोंग उघडकीस आणण्याच्या प्रवृत्तीच्या मुळाशी असलेले आच्छादित उद्देश यांच्यामध्ये स्वसमर्थनार्थ चाळवाचाळव सुरू असलेली येथे आपणास दिसते. नैतिक आकांक्षांचे समाधान करतात, म्हणून मान्य केलेली जी वैज्ञानिक म्हणून स्वीकारलेली विधाने असतात ती त्या नैतिक आकांक्षांना अधिक उत्तेजित करतात; त्यामुळे त्या आकांक्षा तथाकथित वैज्ञानिक विधानांचे समाधान करण्याची शक्ती वाढवितात; असे हे सारखे चालत असते. आणखी असे की, ह्या गतिशीलता व वस्तुनिष्ठा यांच्या संयोगात नेहमी आत्मरक्षणाचे सामर्थ्य असते. त्याच्या वैज्ञानिक अंशावरील आक्षेपांचे निरसन त्याच्या पाठीशी असलेल्या नैतिक भावनांनी केले जाते आणि त्यावरील नैतिक आक्षेपांचे निरसन त्यांतील वैज्ञानिक शोधांच्या अबाधित निर्णयाच्या आवाहनाने थंडपणे पार पाडता येते. गतिशीलता व वस्तुनिष्ठा या दोन अंशांपैकी प्रत्येक अंश दुसऱ्यावरील आक्षेपाच्या वेळी आपल्याकडे लक्ष खेचून घेतो.

मार्क्सवादावरील पांडित्यपूर्ण टीका करणाऱ्यांनी उघडकीस आणलेल्या तर्कदोषाला हीच रचना आधार देत असते ही गोष्ट आपणांस दिसून येईल. कामगारवर्ग पुंजीशाहीचा नाश करणार ही गोष्ट अपरिहार्य आहे, हे मार्क्सवादी भविष्य खरे मानले तर, त्याच्या आधारावर कोणताही अमलात आणावयाचा राजकीय कार्यक्रम निष्पन्न होऊ शकणार नाही, असे टीकाकार सांगतात. कारण, ज्या युद्धाचा निर्णय अगोदर ठरून गेला आहे, त्याकरिता योद्ध्यांची भरती करण्याचा प्रयत्न निरर्थक ठरतो; आणि जर युद्धाचा निर्णय ठरलेला तर त्या युद्धाचा परिणाम काय होईल

याबद्दल अनुमान करणे चुकीचे होय. परंतु गतिशीलता व वस्तुनिष्ठा यांच्या संयोगाच्या क्षेत्रात इतिहासाचा एक विशिष्ट परिणाम घडून यावा म्हणून युद्धार्थ सज्ज होण्यास आवाहन करणारे ऐतिहासिक भविष्य सांगण्यावर तर्कदोषाचे उद्भाव करता येत नाही. कारण, समाजवादी उद्दिष्ट न्याय्य आहे अशी आपली श्रद्धा आहे म्हणून आपण भविष्य मान्य करतो; समाजवादी चळवळ योग्य आहे, असा याचा अभिप्राय आहे. भविष्यकथन म्हणजे चळवळीस आवाहन होय.

परंतु येथे हे एक अतिरिक्त सांगावयाचे आहे. आपल्या विकृत श्रद्धेने प्रौढ समाजशास्त्राच्या विद्वत्तापूर्ण परिभाषेच्या मुखवट्यामध्ये आपली पावित्र्याची तृष्णा लपविण्यास लावले असेल तर तो मुखवटा करुणास्पद होय. वैज्ञानिक विधानांच्या रूपाने रंगविलेल्या नैतिक भावनांत परिवर्तन घडून दुर्दैवाने त्याचे निराळेच पर्यवसान होते. मार्क्सवादी चळवळीवरील कोणताही नैतिक आक्षेप, ती चळवळ वैज्ञानिकदृष्ट्या योग्य आहे, या उत्तराने निरस्त करता येतो, असे सांगताना मी ही गोष्ट मागेच सूचित केली आहे. यामुळे काय होते ते आपण पाहू या– समाजवादाचा नैतिक उद्देश वैज्ञानिक पर्यायांनी युक्त अशा विधानांच्यामध्ये रूपान्तरित केला तेव्हा तो मूलभूत नैतिक संदर्भांपासून विभक्त झाला. नैतिक भावना दूर लोटणारी अशी आकांक्षा ती बनली. हाच धर्मोन्माद (Fanaticism) होय; मुळातील नैतिक आंकाक्षांचे जे भौतिक पर्याय तयार केले त्यांच्यावर केंद्रित झालेला धर्मोन्माद होय; हे भौतिक पर्याय म्हणजे कामगार वर्गाचे हितसंबंध; किंवा अधिक यथार्थपणे म्हणावयाचे तर, कामगारवर्गाच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारे म्हणून मानले गेलेल्या लोकांच्या हातातील जुलमी सत्ता. हा सत्तेचा उन्मादपूर्ण संप्रदाय होय; म्हणजेच नैतिक शीलाच्या माणसाची बंधनात पडलेली उडी होय.

अनैतिकतेचे नैतिक आवाहन

आधुनिक सर्वाधिकारवादातील जाणूनबुजून पत्करलेली विवेकहीनता कशी आहे याचा आणि अविवेकाने उघडपणे वागण्याच्या त्यातील निर्धारात नैतिक आवाहन का आहे याचा उलगडा यामुळे होतो. कारण, हा निर्धार असे दाखविण्याकरिता केलेला असतो की, त्यातील शक्ती पावित्र्याचे मूर्तरूप आहे, म्हणून त्याचे काहीही करून श्रेष्ठत्व स्थापित करणे व त्याचा बचाव करणे याशिवाय अधिक मोठी कोणतीही जबाबदारी नाही. या निर्धाराने जे प्रशासन करतात ते दया व सचोटी यांचा तिटकारा करतात असे गृहीत धरलेले असते; ते केवळ विशिष्ट अनिवार्य परिस्थितीमुळे असे वागत नाहीत (-मॅकिवेलीने त्यांना अशा स्थितीत अनुमती दिली असती-) तर त्यांच्या नीतिवादी प्रतिस्पर्ध्यांमधील भावनावशता, ढोंग व सामान्यतः गबाळेपणा जो असतो या बाबतीत त्यांचा नैतिक वरचढपणा असल्यामुळे. म्हणून जे संशयवादी सर्व नैतिक उद्दिष्टांची सत्यता तिरस्कारपूर्वक नाकारतात ते अशा नग्न सत्तेला पाठिंबा देण्याकरिता धर्मोन्मादाने एकत्रित येतात.

मार्क्सवाद एकदा अंगीकारिला म्हणजे नीतीचा सार्वभौम महिमा आणि तिचे सत्तेवरील व भौतिक परिस्थितीवरील वास्तविक परावलंबित्व यांमधील शाश्वत विसंगती मार्क्सवाद काढून

टाकतो. मार्क्सवाद असे करू शकतो याचे कारण, तो नैतिकतेचा बहाणा सोडून देतो, परंतु लगेच एका विशिष्ट प्रकारच्या राजकीय चळवळीच्या परिघात गर्भित स्वरूपाची नैतिकता अर्पित करतो. मार्क्सवाद हा स्वाभाविक रीतीने पवित्र असलेल्या चळवळीने अनिवार्य विश्वविजय संपादून त्याच्याद्वारा सार्वभौम नैतिक महिमा साध्य करतो.

मार्क्सवाद हा भौतिकवाद आहे असा चुकीचा आरोप केला जातो. त्याचा भौतिकवाद हा त्याच्या नैतिक उद्दिष्टाचा बाह्य मुखवटा आहे. हे मात्र खरे आहे की, भौतिकवादी आवरणाच्या योगाने समाजवादासंबंधी आकांक्षाना नैतिक संदर्भापासून अलग करता आले आहे व त्यामुळे भौतिक इतमाम व राजकीय हिंसा करण्यात त्यांचा पूर्ण उपयोग करता येत आहे. परंतु त्याच्या योगाने त्यांच्या मुळाशी असलेली समाजवादी गतिशीलता नष्ट होत नाही. कम्युनिस्ट राज्याचे भावनात्मक समर्थन म्हणजे सामाजिक प्रयत्नवादाचा उत्साह हा कायम टिकला आहे. म्हणूनच सर्व आर्थिक प्रयत्नांत नैतिक अर्थ भरण्याचा त्यांचा खटाटोप असतो; म्हणूनच जनतेच्या तातडीच्या गरजा उदाहरणार्थ- सुधारलेली राहती घरे वगैरेंची उपेक्षा करून गगनचुंबी सुबक इमारती, भूमिगत संगमरवरी महाल इत्यादी भव्य महिमाशाली गोष्टींचा हव्यास त्यांना चालू शकतो; म्हणूनच त्यांची विलक्षण आर्थिक पद्धती निभावू शकते; म्हणजे उत्पादनावर सारखा भर असतो, परंतु जीवनाच्या गरजांचा कायम तुटवडा राहतो. आम्ही पश्चिम युरोपातील लोक सोविएट रशियात भौतिकवादाची लक्षणे केव्हा दिसतील याची आशेने वाट पाहात आहोत. कारण एकदा का ही राजवट भौतिक सुखसोयींचा पाठपुरावा करू लागली की, तिच्यातील धर्मोन्मादच नष्ट होईल. सुखसोयींचे प्रेम गर्ह्य असेल, परंतु त्यात जुळवून घेण्याची वृत्ती असते असा कोणासही विश्वास वाटू लागतो.

आपल्या काळातील इतर जनता चळवळीतही अनैतिकतेचे नैतिक आवाहन प्रभावी झाले आहे. मायनेक (Meinecke)ला याचा प्राथमिक आकार सर्व जर्मनांच्या एकत्वाच्या चळवळीत आढळला; आणि हिटलरच्या उत्कर्षाने हे पृथक्करण प्रतारकरूपाने शब्दश: खरे ठरले आहे. बोल्शोविकांच्या उदाहरणाचा हिटलरला उपयोग खूप झाला; परंतु त्याच चळवळीने प्रथमतः भावनारम्य जर्मन विनाशवादामध्ये मूळ धरले होते. या वादाने असे उपदेशिले होते की, असाधारण महत्त्वाची व्यक्ती, 'हम करे सो कायदा,' या रीतीने वागते, आणि मुत्सद्दी या नात्याने स्वतःची इच्छा बाकीच्या जगावर अविवेकीपणे लादत असते; त्याचप्रमाणे एखाद्या राष्ट्रास आपले 'ऐतिहासिक भवितव्य' नैतिक जबाबदारीची पर्वा न करता सिद्ध करणे हा हक्क व कर्तव्य असते. मार्क्सवादाचे चित्रिलेले यांत्रिक मानवी चित्र ज्याप्रमाणे करते त्याप्रमाणे नीतीच्या सार्वभौम अधिकारांचा असे उपदेश विरोध करतात; एका विशिष्ट व्यक्तीची वा राष्ट्राची परिपूर्ती म्हणजेच नीती असे ते उपदेश सांगतात. यामुळे आपल्या या युगातील अमर्याद सामाजिक आकांक्षांचा भयंकर देशभक्तीशी सांधा निर्माण होऊ शकतो; आणि हिटलरच्या जर्मन विश्व राज्याच्या रूपाने या दोन्ही गोष्टी आकारास येऊ लागल्या असल्या.

हिटलरच्या कार्यक्रमात मोठ्या नैतिक भावनांचा अन्तर्भाव होता म्हणून त्यातील बेदरकारपणातून जबरदस्त नैतिक आवाहन निघत होते, अशी उपपत्ती लागते. जेव्हा जेव्हा बेदरकारपणाचा धर्मोन्मादाशी संयोग होतो तेव्हा तेव्हा आपणास गतिशीलता-वस्तुनिष्ठा हे द्वंद्व त्यात आहे अशी शंका आलीच पाहिजे. हिटलरचा मद हा मुळात पापमय होता, परंतु त्याच्यातील जर्मन तरुणांस मिळणारे आवाहन नैतिक होते; त्यांनी पापमय वृत्तींचा नैतिक कर्तव्य म्हणून स्वीकार केला होता. मार्क्सच्या मताने सार्वजनिक जीवनातील नैतिक हेतूंच्या स्वरूपासंबंधी जे निर्णय ठरले तेच निर्णय त्या तरुणांच्या प्रवृत्तीचे कारण झाले. त्यांचा असा विश्वास होता की, असे नैतिक हेतू केवळ सत्तेची बौद्धिक समर्थने होत, सत्ता हेच मूळ सत्य आहे. म्हणूनच नैतिकरूप देण्याचा त्यांना तिरस्कार होता; आणि विवेकशून्य हिंसेबद्दल त्यांना नैतिक ओढा होता.

काही वर्षांपूर्वी मी यासंबंधी जे प्राथमिक विवेचन प्रसिद्ध केले त्यात या सिद्धान्ताला 'नैतिक विपर्यास' असे नाव दिले. हा विपर्यास प्रत्यक्षात पूर्णतेस कधीच जात नाही. कारण, कोणतेही राज्य कितीही धर्मोन्मादवश असले तरी काही स्पष्ट नैतिक मर्यादा मानल्यावाचून चालूच शकत नाही. मन वळविण्याचा प्रयत्न करण्याचे बंधन नग्नतेसही पाळावे लागते. काही स्पष्ट नीतिनियमांना प्रसंगी अवसर द्यावा लागतो एवढ्यानेच 'नैतिक विपर्यासाचे' सिद्धान्त लागू पडत नाहीत असे नव्हे.

- २ -

सुशिक्षितांचे प्रलोभन

नैतिक विवेकाच्या उघड तिरस्कारातील नैतिक आवाहनाने आणखी एक कोडे उलगडते; हे कोडे म्हणजे स्टालिनच्या राजवटीत त्या राजवटीस धन्यवाद देणाऱ्या लेखकांच्या व चित्रकारांच्या कृतींना दूषण देण्यात येऊन त्यांना दडपून टाकले. 'बंधनातले मन' या पुस्तकात झेस्लॉ मिलोझने म्हटल्याप्रमाणे आधुनिक कला व वाङ्मय यांबद्दलच्या सर्व विदित घृणेमुळे अंशतः व सर्व सांस्कृतिक यत्न राज्याच्या सेवेकरिता करावयाचे या निर्धारामुळे हे आवाहन प्रभावी झाले. मिलोझने स्वतःच्या पोलंडमधील अनुभवांवरून असे नोंदून ठेवले आहे की, मार्क्सवादाने पोलंडमधील सुशिक्षितांना लावलेल्या प्रलोभनाचा भाग ह्या भावना व धोरणे बनली आहेत.

ही गोष्ट कळण्याकरिता पुंजीशाहीतून समाजवादाकडे होणाऱ्या स्थित्यंतरामधील विचाराच्या प्रत्येक स्वरूपात मार्क्सवादाची विधायक व विध्वंसक, अंतःप्रवेश व ढोंग उघडे पाडणे ही प्रक्रिया लागू करता येते, हे आपण प्रथम विचारात घेतले पाहिजे. ज्याप्रमाणे पुंजीशाहीच्या ध्येयात स्वातंत्र्य व लोकतंत्रता यांचे ढोंग असते असे उघडकीस आणायचे व त्याच वेळी पक्षाच्या हुकूमशाहीत स्वभावतःच स्वातंत्र्य व लोकतंत्रता हे गुण असतात असे दाखवायचे असते त्याचप्रमाणे पुंजीशाहीच्या कलेत व वाङ्मयात ढोंगीपणा असतो असे दाखवावयाचे असते

आणि समाजवादाच्या अंध स्तुतिपाठात कला व वाङ्मय यांच्या मूल्यांची संपत्ती असते, असे प्रतिपादावयाचे असते. सर्व सांस्कृतिक जीवनात अशा प्रकारचे रूपान्तर घडवून आणले जाते. समाजवादी राज्याच्या हितसंबंधांच्या बंधनात सर्व जीवन हुकूमशहांच्या इच्छेप्रमाणे बंदिस्त केले जाते हीच सर्वव्यापी हुकूमशाही होय; स्वतंत्र देशांतील सुप्रसिद्ध सुशिक्षितांना त्यांच्या व्यवसायाला दडपून व दूषित करणाऱ्या ह्या हुकूमशाहीचे आकर्षण का वाटावे हाच प्रश्न आहे.

'ढोंगाचा परिस्फोट' या शब्दांत या कोड्याच्या उत्तराची खूण सापडते. १९ व्या शतकातील पुंजीशाही वर्चस्वाच्या विरुद्ध केवळ समाजवाद बंड करीत नव्हता किंवा पुंजीशाहीच्या ध्येयांवर हल्ला करण्याचे हत्यार केवळ वैज्ञानिक प्रवृत्तीच नव्हती. सुशिक्षित वर्गाचे एकंदरीत दूरत्व हेही त्याबरोबर होते. भावनारम्यतावादाच्या व वैज्ञानिक चळवळींच्या संयुक्त परिणामांपासून आधुनिकांचा सांस्कृतिक शून्यवाद उत्पन्न झाला व त्याने मार्क्सवादाइतकाच संपूर्णपणे वर्तमान समाजव्यवस्थेचा निषेध केला. जेव्हा आधुनिक मानवाच्या अतिशायी नैतिक आकांक्षांचा माणसांच्या निर्धास्तपणाने, स्वार्थाने व ढोंगाने आशाभंग केला तेव्हा हे घडले. नीती म्हणजे टाळता येत नाही म्हणून लोकांनी मान्य करावयाची एक गोष्ट, असा अर्थ केला तरच या न्यूनांची उपपत्ती लागते; असे त्यांना दिसले. आणखी असे की, मार्क्सवादासारखेच विलक्षण अशा दृढ नैतिक आकांक्षांचे लक्षण म्हणजे त्यांच्या ठिकाणचा नैतिक शून्यवाद होता; टुर्गेनी (Turgenev) याचे चित्रण (Bazarov) या विद्यार्थ्याच्या रूपाने केले; हा विद्यार्थी, तात्त्विक शून्यवादाचा साहित्यातील मूळ साचाच होय.

आम्ही हेही मान्य करतो की, व्यक्तीसंबंधी शून्यवाद (Personal Nihilism) हा एक शतकभर साहित्याचा व तत्त्वज्ञानाचा प्रेरक बनला; या वादाने स्वतः आणि विरुद्ध प्रतिक्रिया प्रक्षुब्ध करून हे काम केले. युरोपखंडात १९ व्या शतकाच्या मध्यापासूनच्या काळात ललितकथा, काव्य व तत्त्वज्ञान याचे सार्वत्रिक विषय पुंजीशाही समाजाची घृणा, अनीती व निराशा हेच बनले. क्षुद्र जीवन जगणाऱ्या माणसांशी विरोधी असलेल्या विचारसरणीने आधुनिक स्वैराचारी माणूस निर्मिला, आणि त्याच्या ठिकाणी बंडखोरीची नवनिर्माणशक्ती उत्पन्न केली; त्यामुळे भूतकाळातील कोणत्याही ऐतिहासिक युगाला साधल्या नाहीत अशा उच्चतम कृतींची निर्मिती करून ललित कलांना नावीन्य आणिले.

परंतु या विजयांनी कलाकर्त्यांना आत्मशंकेमुळे निर्माल्यवत बनविले. मान्यता पावलेल्या ध्येयांच्याबद्दल त्यांच्या ठायी असलेल्या द्वेषाने (मार्क्सवादाप्रमाणे) मानवाचे महत्त्व व मानवी विचार यांवरच प्रत्यक्ष आघात केला. पीर गिंट (Peer Gynt) ने अनेक वेषवेषांतरे केली व शेवटी स्वतःची त्याला ओळख कांद्याच्या रूपकाने अशी पटली- प्रत्येक नाटकी रूपाचा पापुद्रा एका पाठीमागून एक एक असा काढून टाकून शेवटी गाभ्यात काही शिल्लक राहात नाही. विश्वकोशकर्ते बोवर्ड (Bouvard) आणि पेक्युके (Pecuchet) व्यर्थ गोष्टींच्या गुंतागुंतीत सापडून नष्ट होतात. मुसिलचा (Musil) 'संपत्तिहीन मनुष्य' (Man Without Properties)

अस्तित्व गमावतो, कारण तो जीवन जगण्यापेक्षा जीवनाचा विचार करीत राहतो. सार्त्र (Sartre) च्या 'बुद्धियुग (L'Age de Raison) मधील 'माथ्यु (Matheu)' विचार, विचाराबद्दल विचार, विचाराबद्दलच्या विचाराचा विचार, करीत शिणून जातो; उलट कॅमू (Camus) चा 'परका' (Stranger) माणूस संपूर्णपणे विचारपराङ्मुख असतो; तो इतका वस्तुस्थितीपासून विभक्त झालेला असतो व स्वतःच्या खाजगी जीवनाच्या बंदीखान्यात अडकतो.

एवंच आपण सद्भावनेने काहीही सांगू शकत नाही, व सर्व विवेकयुक्त क्रिया व्यर्थ मामुली गोष्टी बनतात; हिंसाच केवळ प्रामाणिक होय; स्वैर हिंसा हीच महत्त्वाची मान्य क्रिया होय, या अवस्थेपर्यंत पोचल्यावर आधुनिक माणूस नैतिक व सांस्कृतिकदृष्ट्या व्यर्थ असलेल्या वर्तमानकाळाबद्दलच्या बीभत्स घृणेच्या विषयात स्वत: चा अन्तर्भाव करील. हे विश्व केवळ अर्थशून्य ठरल्यावर तो वैश्विक वैराण प्रदेशात स्वतः विरून जातो.

या स्थितीत ढोंग उघडकीस आणण्यास टपलेल्या मार्क्सवाद्याने जर सुशिक्षित वर्गावर आघात केला, त्याला पुंजीशाही वर्गाच्या माळेत गोवले, तर त्याची अवस्था कठीण होते. त्याच्या वैराण जीवनाच्या वाढत्या जाणिवेत स्वतःच्या कलेचे व विज्ञानाचे मार्क्सवादी विवेचन प्रतिध्वनित होऊ लागते. मार्क्सवादी विवेचनाप्रमाणे कला व विज्ञान ही निंद्य अशा पुंजीशाहीची (Superstructures) बाह्यरूपे होत. यावर आणखी असे की, या मार्क्सवादी टीकेच्या कसल्याही विरोधाने त्या टीकेचे न्याय्यत्वच सिद्ध केले जाते; कारण, त्या विरोधाने तो सुशिक्षित जबरदस्तीने पुंजीशाहीचा भागीदार ठरविला जातो; त्यामुळे ज्या पुंजीशाहीविरोधी स्थानावर त्याचा स्वाभिमान आधारलेला असतो ते स्थानही त्याच्यापासून हिसकले जाण्याचा धोका उत्पन्न होतो. सार्त्र (Sartre), पिकॅसो (Picasso) आणि बर्नाल (Bernal) यांच्यासारखे लोक, ज्या तत्त्वज्ञानाने त्यांच्या बौद्धिक व्यवसायाला धोका पोचतो त्यास का शरण जातात, याची उपपत्ती लावण्यास ही उभयतः आपत्ती (Dilemma) पूर्ण उपयुक्त ठरते.

राजकीय प्रयत्न हा जर शून्यवादी गृहीत कृत्यावर आधारलेला असेल तर त्या प्रयत्नाला तात्त्विक शून्यवाद्याच्या आवृत्त नैतिक आकांक्षांचा उपयोग नेहमीच होतो. विवेकशून्य अशा क्रांतिकारक सत्तेचे अन्तर्गत पावित्र्य मान्य करून तो आपल्या नैतिक आकांक्षांमध्ये निर्वेधपणे रंगून जाऊ शकतो. त्याच्या नैतिक आकांक्षा हिंसेच्या एंजीनमध्ये ओतल्यावर विस्तार पावू शकतात व त्यांना आत्मशंकेचा धोका राहात नाही. अशा न गंजणाऱ्या गुणाच्या सामाजिक गृहांमध्ये त्याची सर्व व्यक्तिमत्ता आनंदाने व्यवहार करू लागते. हे मात्र मान्य करावे लागते की, असे असताही कलाकार या वैज्ञानिक माणसास आपल्या व्यवसायाची खरी परिपूर्ती म्हणून कम्युनिस्ट हुकूमशाहीचे रूक्ष सांस्कृतिक उद्देश मान्य करणे कठीण जाते. परंतु अत्यंत हीन नसलेल्या काही उद्देशाकरिता तो आपल्या ठिकाणच्या घृणेस बाजूस करण्याचा प्रयत्न करू शकतो. कारण, त्याच्या योगाने तो कुजक्या समाजाच्या कुजक्या संस्कृतीच्या संबंधापासून किंवा कोणत्याही समाजाच्या संबंधापासून मुक्त होतो. त्याला असे वाटणे शक्य आहे की, कम्युनिस्ट

समाजसंस्थेतील त्याचे सेवकत्वाचे नाते काही काळापुरतेच आहे. कारण अखेरीस, ऐतिहासिक नियतीचा विजय झाला म्हणजे तो विजय शरीराच्या व मनाच्या गरजांची पूर्ती करणारच; आणि काही झाले तरी, मध्यंतरी सरकारी सांस्कृतिक धोरणास प्रासंगिक तोंडी पाठिंबा देण्यापेक्षा त्याच्यापासून जास्त काही अपेक्षा केली जाणार नाही.

- ३ -

मार्क्सवाद व विज्ञान

१९३० च्या सुमारास नव्या मार्क्सवादाच्या विज्ञानोपपत्तीस महत्त्व आले; आणि नंतरच्या दशकात स्टालिनच्या कारकिर्दीत यू. एस. एस. आर. च्या सरकारची मान्यता तिला लाभली. प्रथम ही उपपत्ती विज्ञानेतिहासाचा अर्थ लावण्याकरिताच स्वीकारण्यात आली होती; तिच्या योगाने असे दाखविण्यात आले की, विज्ञानाची प्रत्येक प्रगतीची पायरी ही व्यावहारिक गरजांची पूर्ती करण्याकरिता अस्तित्वात आली. शुद्ध विज्ञानाला स्वतंत्र स्थान असते, ह्या गोष्टीचा पोकळ पांडित्य म्हणून उपहास करण्यात आला. विज्ञान हे मुळात तंत्रपद्धतीच (Technology) होय, ही गोष्ट विज्ञानाचा बुरखा बाजूस सारून दाखविल्यानंतर तंत्रपद्धतीच वास्तविक विज्ञान होय असा तंत्रपद्धतीचा महिमा गाण्यास प्रारंभ झाला. तंत्रपद्धतीने भौतिक प्रगती होते म्हणून ती प्रगतीचा व समाजवादाचाच भाग म्हणून मान्यता पावली; म्हणून विज्ञानाची साधना शेवटी समाजवादाच्या प्रगतीचे मूर्तरूप बनली.

हे येथपर्यंत निरर्थक परंतु निरुपद्रवी झाले. परंतु लवकरच बुरखा बाजूस करण्याची किमया तडाखेबाज बनली. 'पुंजीशाही विज्ञाना'च्या आधुनिक संशोधनावर म्हणजे सापेक्षतेचा सिद्धान्त, परिमाणनिष्ठ यांत्रिकता (Quantum Mechanics), ज्योतिष व मानसविज्ञान यांच्यावर विखुरलेली गोलंदाजी सुरू झाली व मेंडेलकृत सिद्धान्त (Mendelism) विरोधी आक्रमणापर्यंत त्याची परिणती झाली. जेव्हा १९४८ ऑगस्टमध्ये लायसेंको (Lysenko) ने विजयीवृत्तीने विज्ञान विद्यापीठापुढे असे घोषित केले की, कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीने माझे जीवविज्ञानसंबंधी विचार मान्य केले, तेव्हा सर्व सदस्यांनी एकदिलाने अभ्युत्थान देऊन त्यास धन्यवाद दिले; ह्या समयी विज्ञानासंबंधी विशिष्ट बाजू पक्की झाली.

आता विज्ञानाची सर्वव्यापिता निश्चितपणे खंडित झाली. पुंजीशाही विज्ञानाचे सर्वव्यापितेचे दावे मनस्वी विचारसरणी म्हणून उघडे पडले; आणि सोविएट विज्ञानाच्या प्रामाण्याचा आधार पक्षपातीपणा किंवा वर्गलक्षण म्हणून स्पष्टपणे स्वीकारला गेला. मार्क्सवादामध्ये दुहेरी योजना असल्यामुळे सर्व विज्ञान हे वर्गीय विज्ञान असते ह्या सिद्धान्ताने पुंजीशाही विज्ञानाचे मूल्य उतरविले व समाजवादी राज्याच्या विज्ञानाचे मूल्य चढविले. असा एकदम दुहेरी उपयोग ह्या सिद्धान्ताचा झाला. पक्षीय विज्ञानास मदत करून नव्या अर्थाने पक्षीय विज्ञानाचा सर्वव्यापितेवरील अधिकार स्थापित केला; म्हणजे स्वभावतः पवित्र व म्हणूनच ऐतिहासिकदृष्ट्या अपरिहार्य असलेला भावी

कम्युनिस्ट विश्वराज्याचा विजय हा सर्वव्यापी सत्याच्या स्थानी आणून बसविला.

सोविएट विज्ञानाचे मूल्य चढविण्याच्या या पद्धतीतील वस्तुनिष्ठा व पक्षपातिता हे दुहेरी अर्थ स्वयं-सुसंगत आहेत. वस्तुनिष्ठा व सर्वव्यापी प्रामाण्य या बाबतींतील पुंजीशाही विज्ञानाचे अधिकार हे खोटे देखावे आहेत हे सिद्ध केले आहे; हे सिद्ध करण्याचा आधार म्हणजे कोणतेही विज्ञान, इतिहास वा तत्त्वज्ञान वस्तुनिष्ठ असू शकत नाही, आणि वस्तुतः ती विशिष्ट वर्गाची हत्यारे असतात; हा सिद्धान्त होय. याबरोबरच असेही प्रतिपादिले आहे की, मार्क्सवादाच्या हाताखाली चालणारी राजनीती हे विज्ञान असून त्याचे आचरण ज्या सामाजिक परिस्थितीत करावयाचे असते त्या परिस्थितीचे पक्के वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून त्यावरच ते आधारलेले असते. म्हणून मार्क्सवादी विज्ञान एका मर्यादेपर्यंत वस्तुनिष्ठ असते; ही मर्यादा म्हणजे कामगार वर्गाच्या राजकारणाचे हत्यार म्हणून उपयुक्तता असणे. हे लक्षात ठेवा की, 'वस्तुनिष्ठा' किंवा 'पक्षपातिता' ही युक्त नाही वा अयुक्तही नाही. समाजवादच युक्त (म्हणजे वाढीस लागलेला) असतो व पुंजीशाही अयुक्त (म्हणजे नाशोन्मुख झालेली) असते. स्टालिनच्या राजवटीची सोविएट विद्वानांच्या बाबतीत अशी मागणी होती की, त्यांनी वस्तुनिष्ठेस (म्हणजे सर्वव्यापी प्रामाण्यास) टाकावे व त्याऐवजी समाजवादी पक्षपातीपणाच्या अनुरोधाने जावे; ही मागणी मार्क्सवादाच्या वस्तुनिष्ठेच्या दाव्याशी अगदी सुसंगत अशीच होती.

तथ्याचा त्याग

नैतिक विपर्यासाच्या प्रक्रियेने तथ्यांच्या कल्पनेची तथ्यासंबंधी सर्वसाधारण सामग्रीच्या कल्पनेची हेळसांड होते. खरे पाहता, आपला तथ्यावरील विश्वासाचा मोठा भाग इतरांवरील भरवशाने अप्रत्यक्ष रीतीने तयार झालेला असतो; पुष्कळशा उदाहरणांत विशिष्ट व्यक्तींना त्यांच्या सार्वजनिक स्थानामुळे किंवा ते आपले बौद्धिक नेते आहेत म्हणून प्रमाण मानून चालावे लागते. विज्ञानाच्या क्षेत्राबाहेरील सार्वजनिक तथ्ये (Public Facts) स्वतंत्र समाजसंस्थेतील वृत्तपत्रांवर, संसदांवर किंवा न्यायालयांवर भरवसा ठेवूनच स्वीकारावी लागतात. त्यातील तथ्यसंशोधन समाजशास्त्रज्ञांच्या, इतिहासज्ञांच्या व विज्ञानपंडितांच्या कार्याशी संलग्न असते; त्यात अशी काही विवाद्य उदाहरणे असतात की, त्याविरुद्ध असलेली विधाने सामाजिक मान्यतेकरिता स्पर्धा करीत असतात, तरी सर्व समाज त्यांना महत्त्व आहे असे गृहीत धरून चालतो; विज्ञानाप्रमाणेच विश्वासाच्या देवघेवीची ही पद्धती एकमेकांत गुंतलेल्या क्षेत्रांच्या मालिकेवर अवलंबून राहते; या प्रत्येक क्षेत्रात काही थोडी अधिकारसंपन्न माणसे एकमेकांच्या सचोटीवर देखरेख ठेवतात, त्यांचा विचार महत्त्वाचा असतो. अशा प्रकारचे परस्परांवरील विश्वासाचे जाळे बाळगणाऱ्या समाजात हन्ना अॅरेटने म्हटल्याप्रमाणे तथ्यानुसारितेची विशिष्ट कसोटी टिकविली जाते.

ज्यावर स्वतंत्र समाजातील तथ्यांवरील ऐकमत्य अवलंबून असते, ते हे परस्परांवरील विश्वासाचे विस्तृत जाळे कच्चे असते. ज्या विग्रहाने समाजात स्पष्ट फाटाफूट निर्माण होते, त्याच्या योगाने परस्परांवरील विश्वास नष्ट होऊ लागणार; आणि त्यामुळे विग्रहाशी संबद्ध अशा

तथ्यांसंबंधी सार्वत्रिक ऐकमत्य साधणे दुर्घट होणारच. फ्रान्समधील तृतीय गणराज्याच्या पायाला धोका पोचला तो तथ्यविषयक प्रश्नावरच; प्रश्न असा होता की, कॅप्टन ड्रेफसने पुरावापत्रक लिहिले होते काय? अमेरिकेतील ॲलजर हिसच्या खटल्याप्रमाणे ब्रिटनमध्ये झिनोक्विच्या पत्राव्या अस्सलपणाबद्दल वाद उत्पन्न झाला; या विषयातील तथ्यासंबंधी लोकांत इतका वाद माजला की, सार्वत्रिक ऐकमत्य होणेच अशक्य झाले.

राजकीय भावनाविवशतेचा तात्पुरता अतिरेक म्हणून अशा प्रकारचे तथ्यानुसारितेचे तत्कालिक व मर्यादित अपयश क्षम्य ठरू शकेल. परंतु एखादे आधुनिक क्रांतिवादी राज्य सर्व समाजाचा कायापालट करण्याचा उद्देश ठेवून तथ्यसंशोधनाच्या प्रक्रियेचा आधार असलेली सर्वसंमतीने निष्पन्न होणारी श्रद्धा नष्ट करते; कारण विरुद्ध मतवाद्यांशी सर्व प्रकारचे संबंधच तोडून टाकते. त्याला बिनशर्त मान्यता जो देत नसतो तो त्या राज्याचा भयंकर शत्रू गणला जातो. हुकूमशाही अशी एक प्रकारची परिस्थिती उत्पन्न करते की, त्यात कोणीही मतभेद बाळगणारा वस्तुतः तिचा शत्रूच बनतो; त्यामुळे अमर्याद संशयाचे वातावरण निर्माण होणे प्राप्त ठरते. जेव्हा उघड मतभेदाला वाव राहात नाही तेव्हा अप्रीती ही काही मामुली गोष्टींत व्यक्त होऊ लागते; त्यामुळे गुप्त पोलिसाला मामुली घटनांचा खोटा बनाव कटाच्या गोष्टींची पूर्वतयारी म्हणून दाखविण्यास मुभा मिळते.

मज्जाविकारी माणसांच्या परीक्षेत फ्राईडची पद्धती अंगीकारली असता ज्याप्रमाणे काही गृहीत कृत्यांवर आधारलेली तपासणी चालते त्या प्रकारची विशिष्ट गृहीत कृत्यांवर आधारलेली तपासणी या राज्यात चालते. पितृद्वेष-गंड (Oedipus-Complex) आहे असे गृहीत धरून रोग्याचा उच्चारित व अनुच्चारित प्रत्येक शब्द व रोग्याची आचरलेली व न आचरलेली प्रत्येक कृती (किंबहुना सहज योगायोगाने ज्या घटनेत तो सापडलेला असतो ती घटना) हे सर्व सुप्त पितृद्वेषाचे आविष्करण होय, असा अर्थ फ्राईडच्या पद्धतीने केला जातो. त्याचप्रमाणे, कोणत्याही मामुली घटनेचा अप्रीतीची खूण म्हणून अर्थ करता येतो असे गृहीत धरल्यावर, त्यापुढे जाऊन, ती घटना राजद्रोहाचे कृत्य म्हणूनही ठरविणे शक्य होते; मग स्टालिनच्या कारागृहात तथ्याविष्कारार्थ वापरलेल्या पद्धती उद्दिष्टांशी सर्वथा अनुरूपच दिसतील. ख्रिश्चन धर्मन्यायालयांच्या दृष्टीने यातना देणे ज्या कारणाकरिता अपरिहार्य ठरले त्याच कारणास्तव शारीरिक यातनांचे उपायही अपरिहार्य दिसतील. कारण जोपर्यंत मनुष्याच्या गुप्त उद्देशासंबंधी केलेले आरोप पक्के सिद्ध झाले असे म्हणता येणार नाही, आणि जो कबुलीजबाब जबरदस्तीने काढून घेतलेला असतो त्याचा जे कबुलीजबाब देत नाहीत व त्याकरिता अनुनयात्मक प्रतिकार जोरात करीत राहतात त्यांच्याशी विरोध सुरू होतो; अशा कबुलीजबाबाने दडपशाहीच्या धाकाने मान्य झालेले सार्वजनिक तथ्यांचे काल्पनिक जग वाढीस लागते.

राजकीय हत्यार म्हणून निर्मिलेली विद्यापीठे, अशा प्रकारची सार्वजनिक तथ्ये मान्यता पावण्याच्या प्रक्रियेस, राज्याच्या हितार्थ मदत करतात. आरोपीच्या कृतींवरील विघातकतेच्या

आरोपाच्या पुष्ट्यर्थ इतिहासकार आरोपीच्या इतिहासाच्या पूर्वभागातील कृत्यांचा नवीन अर्थ लावून दाखवितात. ज्या कथा एरवी असंभवनीय म्हणून वाटाव्या त्याच सत्ताधारी पक्षाच्या कट करण्याच्या अवस्थेतील अनुभवाशी जुळू शकतात असे दाखवून शक्य कोटीतल्या ठरतात. एखाद्या श्रेष्ठ कम्युनिस्टावर तो पोलिसाकडून नेहमी पगार घेत असे असा आरोप खरा मानण्यात काही चूक नसते. कारण, उदाहरणार्थ, मेलिनोस्कीच घ्या. मॉलिनोस्की लेनिनच्या अत्यंत विश्वासातला कटात सामील असलेला साथी होता, व तो डूमा सभेतील बोल्शेविक गटाचा नेताही होता; परंतु नंतर तो नेहमीच गुप्त पोलीस होता असे ठरले.

आधुनिक क्रांतिकारक पक्षातील निवडक लोकांना अत्यंत पक्षपाती राजकीय दृष्टिकोन वापरण्याचे शिक्षण दिलेले असते. हन्ना ॲरेंटने लिहिले आहे की, सत्य व कल्पित यांतील फरकच ओळखता येऊ नये, असेच शिक्षण पक्षाच्या सदस्यांना दिले जाते. तथ्यासंबंधी केलेले प्रत्येक विधान विशिष्ट गर्भित हेतूचे निदर्शन असते असे त्वरित दाखविण्याची योग्यता हीच त्यांच्या मोठेपणाचे लक्षण मानले जाते. धाक व गुप्तता यांचा प्रभाव वगळला तर हा प्रचार पाहिजे तितक्या प्रमाणात परिणामकारक होणार नाही; धाक व गुप्तता यांच्या योगाने संशयास्पद गोष्टींना रंग भरणारी परिस्थिती तयार होते, अशा स्थितीत राजकीय तथ्यांचा लोप होतो; म्हणजे माणसाने अशा स्थितीत सर्वच तथ्ये कुचकामाची म्हणून टाकायची किंवा स्पष्ट सबळ प्रमाणे नसताना मनास वाटतील ती तथ्ये मान्य करावयाची.

- ४ -

मार्क्सवादोत्तर उदारमतवाद

कोणत्याही राजकीय सत्तेला आधुनिक सर्वाधिकारशाहीची गतिशीलता तिच्या तर्कसिद्ध मर्यादांपर्यंत अमलात आणता आली नाही. सत्तेच्या एका विशिष्ट केंद्राच्या सेवेकरिता सर्व प्रकारच्या विचाराला संपूर्णपणे जुंपण्यापर्यंत मजल मारणे ही गोष्ट वस्तुतः अगदी अव्यवहार्य दिसते. सरकारी शब्दजंजालाच्या दालनात उभारलेल्या कृत्रिम जगाला सामान्य भाषेत व्यक्त केलेल्या नैसर्गिक मानवी भावनांची जोड द्यावी लागते; प्रसंगविशेषी त्या सर्वांचे पुंजच पुनः उभारावे लागतात. हे असे १९३० मध्ये तेव्हा रशियाच्या ऐतिहासिक जाणिवेच्या गाभ्यात राष्ट्रीय भावनांची व परंपरागत वीरांची मांडणी पुन्हा करावी असे क्रेमलिनने ठरविले; त्याकरिता एम. एन. पोकोवस्की (१८६८-१९३२)चा न खंडिलेला सिद्धान्त टाकावा लागला; पोकोवस्कीने मार्क्सवादी पद्धतीने केलेल्या समाजशास्त्रीय पृथक्करणात इतिहासरचना बसविली होती. दुसऱ्या एका प्रसंगी १९५० मध्ये स्टालिनने एन. वाय. मार (१८६४-१९३४)चा चुकीचा सिद्धान्त खंडिला. त्या सिद्धान्ताप्रमाणे सर्व भाषा ही वर्गीय भाषा असते; त्या हुकूमशहाने उदारमतवादी परिभाषा मुक्तपणे वापरून या सांप्रदायिक सिद्धान्ताने सोविएट भाषाशास्त्र कसे पायदळी तुडविले आहे याचे स्पष्ट चित्रण केले; त्या हुकूमशहाने उदारमतवादाची तत्त्वे समर्पक रीतीने वापरून

हुकूमशाहीच्या विचारनियंत्रणाचा निषेध केला; त्या क्षणापर्यंत असले विचारनियंत्रण त्याने स्वतःच लादले होते.

स्टालिनच्या मृत्यूनंतर विचाराला हळूहळू स्वातंत्र्य मिळू लागले; हे होण्याचे कारण, मार्क्सवादाच्या हिंसक शस्त्रागाराखाली जिवंत गाडलेल्या उदारभावना पुनः पाझरू लागल्या, हे असणे संभवते. हा पावित्र्याचा बंधनस्थ उत्साह विकृत निग्रहांतून मुक्त केलेला असेल, आणि जाणूनबुजून घोषित केलेल्या नैतिक आकांक्षांच्या जोडीस जाऊन बसेल.

किंवा बहुधा सर्वाधिकारशाहीच्या जुलमाची प्रेरक असलेल्या नैतिक भावनेला ओहोटी लागली आहे, हेही आपणास दिसू लागेल. मोठे द्वेष व मोठ्या आशा यांचा परिणाम ज्यांच्यावर कमी होतो अशी एक नवी पिढी सुखसोयींकडे आकृष्ट होणे शक्य होईल. धर्मोन्मादापासून युक्त होण्याकरिता सुखाळूपणाची अपेक्षा आपण करावी ही गोष्ट करुणास्पद असेल; परंतु इंद्रियभोगाधीन माणूस आपल्याबरोबर माणसांवर प्रेम करू शकतो; आणि धर्मोन्मादाला त्यांचा द्वेषच करावा लागतो. बौद्धिक बंडखोरी उद्भवण्याचीही आपणांस आशा वाटू लागते. ज्या राज्याच्या रुक्ष क्षुल्लक गोष्टींचा धडधडीत असत्याचा पाठ-पुरावा माणसाच्या श्रेठ विवेचक बुद्धीच्या प्रयत्नांनी चालतो, त्याचा जो तर्कसिद्ध परिणाम घडतो त्याच्याविरुद्ध अखेरीस माणसाच्या विवेचक शक्तीचे बंड चिथवले जाणे शक्य आहे. एकदा अस्पष्ट व अप्रामाणिक म्हणून ज्यांची निंदा झाली ते ध्येयवादी वा भाववादी (Idealistic) भाषाप्रयोग, त्यांचा अर्थ पुनः सापडला अशा जाणिवेने, माणसांच्या ओठावर पुनः येऊ लागतील. स्वातंत्र्याने स्वतःचा घात करून घेऊन जी पडझड झाली त्यातच पुनः स्वातंत्र्याचा शोध लागेल आणि स्वातंत्र्याच्या या मौलिक मागणीच्या आधारावर खऱ्या श्रद्धांचे संपूर्ण विश्व पुनः उभारले जाईल.

भविष्यकाळात आपण कसलीही प्रगती केली तरी २० व्या शतकातील क्रांत्यांच्यामुळे या युगातील वैचारिक अस्थिरता उघडकीस येईल; यानंतरच्या कोणत्याही घटना ही गोष्ट खोटी ठरवू शकणार नाहीत. ही अस्थिरता प्रत्यक्ष आचरणात आणून अनुभविल्याशिवाय तिची चिकित्साही आपण करू शकत नाही. स्वतंत्र समाजात विज्ञान, कला व नीती यांची स्वतंत्ररीत्या वाढ होण्यास मिळणारी मान्यता हे दर्शित करते की, त्याकरिता अधिकारसंपन्न तज्ज्ञांच्या विशिष्ट संघाने प्रदान केलेली व वाढविलेली विशिष्ट वैचारिक परंपरा परिपुष्ट व्हावी म्हणून समाजाने वाहून घेतले आहे; हा विशिष्ट संघ नवीन नवीन भरतीने चालू ठेवावा लागतो. अशा समाजाचे वैचारिक स्वातंत्र्य राखून ठेवावे म्हणून एक प्रकारच्या श्रद्धामय प्रवृत्तीस उत्तेजन द्यावे लागते; या श्रद्धामय प्रवृत्तीत मात्र विशिष्ट श्रद्धेय तत्त्वे नसतात; स्वतंत्र समाजाच्या विशिष्ट सांस्कृतिक नेतृत्वाने नावीन्याच्या प्रक्रियेवर लादलेल्या मर्यादांच्या योगाने हे वैचारिक स्वातंत्र्य अबाधित राहते. परंतु ही श्रद्धामय प्रवृत्ती व आदरणीय सांस्कृतिक अधिकारसंपन्न व्यक्ती यांना राज्याच्या दमनशक्तीचा पाठिंबा लागतो, आणि संपत्तिशाली मंडळींचा पैसा लागतो. त्यांच्या अधिकाराची ज्या संस्थांच्या योगाने अंमलबजावणी होते त्या पाठशाला, विद्यापीठे, धर्ममठ, अकादम्या, न्यायालये, वृत्तपत्रे

आणि राजकीय पक्ष ह्या संस्था त्याच पोलीस शिपायांच्या व सैनिकांच्या नियंत्रणात असतात की, जे जमीनदारांच्या पुंजीशाहीच्या संपत्तीचे रक्षण करतात. स्वतंत्र समाजाचे निवासस्थान म्हणून ही अशी संस्थांची रचना मान्य केली पाहिजे काय? न्याय व बंधुता यांच्या स्थापनेकरिता आवश्यक अशा मौलिक प्रयत्नांपासून दूर राहूनच राजकीय स्वातंत्र्य नैतिक स्वयंनिर्णयाच्या ज्या संपूर्ण हक्कावर आधारलेले असते तो संपूर्ण हक्क सुरक्षित राहील हे खरे आहे काय? सध्या अस्तित्वात असलेल्या विषमतांच्या बंधनांना शिथिल करणे, पार तोडणे नव्हे, यापेक्षा आपल्या हयातीत अधिक काही करू नये, असे जर मानले नाही तर, लोकांना गर्हणीय गुलामगिरीत लोटणे आपणांस भाग पडणार काय?

माझ्या दृष्टीने मी म्हणेन की, होय. माझी खात्री आहे की, ह्या मर्यादा पाळणे पूर्ण आवश्यक आहे. अन्याय्य विशेषाधिकार सावधपणे पायरीपायरीनेच कमी करीत गेले पाहिजेत; जे त्यांचा नाश एका रात्रीत करतील. ते त्याऐवजी त्या ठिकाणी अधिक मोठ्या अन्यायाची उभारणी करतील सर्वव्यापी राजकीय सत्तेलाच समाजाचे सर्वव्यापी नैतिक नवीनीकरण करता येणे शक्य आहे, परंतु त्यामुळे मानवी नैतिक जीवनाचा अनिवार्यपणे नाशच होईल.

(प्रा. मायकेल पोलॅनी, मँचेस्टर विश्वविद्यालयातील समाजशास्त्राचे प्राध्यापक, यांनी The Magic Of Marxism हा निबंध 'Committee On Science and Freedom' या संघटनेच्या वतीने स्वतंत्र पुस्तिकेच्या रूपाने प्रसिद्ध केला. त्याचा हा शब्दश: अनुवाद आहे.)

(नवभारत, जून १९५७, अंक ९ वा, पृ. ६३,
पुनर्प्रकाशन: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड - १)
पृ. ९५ ते १०५.)

○○○

१०१

भ्रातृभाव

(रशियन राज्यक्रांतीच्या संदर्भात)

- फिलीप स्प्रॅट

'सोशॅलिझम' व 'कम्युनिझम' हे शब्द प्रथम इ. स. १८२७ मध्ये रॉबर्ट ओवेनने वापरले आणि समाजवादी आंदोलनाचा प्रारंभ त्या दिनांकी झाला असे म्हणण्याची प्रथा आहे; परंतु पहिल्या समाजवाद्यांनी गॉडविनसारख्या पूर्वीच्या विचारवंतांना विरोध करण्याच्याऐवजी फ्रेंच राज्यक्रांतीकडे आपल्या प्रेरणेचे उगमस्थान म्हणून पाहिले. अद्भुतरम्य कल्पनानिर्मित विश्व प्लेटोइतके प्राचीन असले तरी समाजाच्या तात्त्विक आदर्शाला व्यावहारिक स्वरूप देण्याचा अत्यंत मोठा प्रयत्न म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीच होय. पहिल्या समाजवाद्यांचे यासंबंधी ऐकमत्य झाले असते, ते असे की, फ्रेंच राज्यक्रांती जे स्वतःचे घोषित केलेले ध्येय साध्य करण्यात अयशस्वी ठरली तेच स्वातंत्र्य, समता व भ्रातृभाव साध्य करणे हेच त्यांचे प्रधान उद्दिष्ट होते. १७५ वर्षांच्या पूर्वी पॅरिसच्या धर्ममंदिराच्या भिंतींवर कोरलेल्या अक्षरांमध्ये ती घोषणा अजून पाहावयास मिळते. समाजवादी ध्येयाचे अत्यंत सूत्ररूप व यथार्थ असे निवेदन आतापर्यंत तेथे पहावयास मिळते.

तात्त्विक चर्चेमध्ये भ्रातृभावापेक्षा स्वातंत्र्य व समता यांना अत्यंत अधिक महत्त्व आलेले आहे. ती ध्येये दृश्य व लक्षणीय आहेत; कायद्याने ती अमलात आणता येतात; भ्रातृभाव ही मानसिक स्थिती असल्यामुळे कायद्यात बसू शकत नाही. स्वातंत्र व समता शिक्षितांना व नेत्यांना प्रिय असतात तर सामान्यांना भ्रातृभावाचे आकर्षण अत्यंत असते. आदर्श समाजसंस्थेचे स्वातंत्र्य व समता अधिष्ठान होय; त्यात विकासणारे सुंदर पुष्प भ्रातृभाव होय, त्या ध्येयांचे सत्त्व त्यात अधिक व्यक्त करते. भ्रातृभावाचा धर्म ख्रिस्ताच्या दोन आज्ञांमध्ये सामावला आहे- 'ईश्वरावर प्रेम कर आणि तुझ्या शेजाऱ्यावर स्वतःप्रमाणे प्रेम कर.' इंग्लिश समाजवाद्यांना आपले ध्येय, ईश्वर पिता होय व मानव हा बंधु होय, असे मांडलेले आवडते. ते त्यांच्या सभांमधे ब्लेकच्या पंक्ती गातील; इंग्लंडच्या हिरव्या व मधुर भूमीवर जेरूसलेमची उभारणी करावी असे त्या पंक्तींमध्ये म्हटले आहे. ते बर्नचेही गीत गातील. त्यात असे शब्द

आहेत की, "ते येत आहे; त्याच्याकरता जगातील प्रत्येक माणूस दुसऱ्या माणसाचा बंधु बनावा, त्याकरिताच जीवन जगा."

अद्भुतरम्य ध्येयवाद्यांपैकी बहुतेक सर्व असे मानतात की त्यांच्या आदर्श समाजांमध्ये बंधुभाव हा श्रेष्ठ सद्गुण ठरेल. गॉडविनने अशी विश्वसमाज व्यवस्था कल्पिली आहे की, "त्यात स्वार्थाची तत्त्वे नष्ट होतील. कोणताही मनुष्य शेजाऱ्याचा शत्रू बनणार नाही. कारण भांडण्याचा विषयच राहणार नाही. परिणामी, बुद्धीने निर्माण केलेले औदार्याचे साम्राज्य निर्माण होईल." ओवेनने असा न्याय्य दावा केला आहे की, त्या समाजसंस्थेत पक्ष, स्वदेश, वंश हा भेदभाव न जुमानता मनुष्यजातीला औदार्य व्यापून राहील. ही औदार्याची प्रेरणा कायम राहील. संत सायमनने नव्या ख्रिश्चन धर्माची मांडणी केली आहे. हा धर्म इहलोकाचा सर्वस्वी असणार आणि त्यामध्ये प्रत्येकजण दुसऱ्याचा भाऊ आहे, याच तत्त्वाची अंमलबजावणी होणार. फोरियरने विश्वप्रेमाची महती गायिली आहे. या विश्वप्रेमाच्या विश्वात योग्य शिक्षणाच्या द्वारे अशी माणसे निर्माण होतील की त्यांच्या मस्तकात शांती व हृदयात ऊब राहील, आणि अशा जाणिवेने भरलेले ते तसेच वर्तन करतील. मार्क्सने युरोप खंडातील अद्भुतरम्य ध्येयवाद नष्ट केला. परंतु इंग्लंड व अमेरिका येथे तो भरभराटत राहिला. विलियम मॉरिसच्या भविष्यदर्शनांमध्ये बंधुभाव भरून राहिला आहे; एच. जी. वेल्स हा जरी पोटामध्ये मानवाच्या स्वभावाबद्दल संशय बाळगत होता तरी कल्पनाविलास करीत असताना त्याने असे म्हटले आहे की, "जगाला हादरा देणाऱ्या उलथापालथी जगाला होतील आणि अखेरीस माणसांचा आक्रमणशील स्वभाव आणि सत्तेचे प्रेम नष्ट होईल."

परंतु समाजवाद्यांच्यामध्ये सर्वांत मोठा व प्रभावी जो कार्ल मार्क्स त्याने हे सर्व खोडून काढले. त्याच्या तत्त्वप्रणालीप्रमाण फ्रेंच राज्यक्रांती भांडवलशाही राज्यक्रांती ठरली. त्या क्रांतीने भांडवलशाहीप्रधान लोकशाही समाज अस्तित्वात आणला. त्याचा नाश कामगारांची समाजवादी क्रांती घडवून आणील. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांचा त्याला तिटकारा होता. सॉर्गे नामक अनुयायाला लिहिलेल्या पत्रात त्याने या घोषणेची उघड थट्टा केली आहे. त्याने आपल्या अनेक ग्रंथांमध्ये सर्व कल्पनावादी ध्येये आणि नैतिक तत्त्वे बाजूला सारली. त्याने असे समर्थन केले आहे की, इष्ट म्हणून नव्हे तर अपरिहार्य म्हणून समाजवाद अस्तित्वात येईल. भविष्यकालीन समाजाबाबतीत कसलाही विधायक तपशील सांगणे वैज्ञानिक दृष्टीने अयोग्य होईल असे तो म्हणतो. एवढे मात्र खरे की त्या संबंधात त्याने एकदा दोनदा काही वाक्ये लिहिली आहेत; मानसिक स्वास्थ्याकरिता काम करण्याची प्रशंसा केली आहे. आणि असे चमत्कारिक अनुमान केले आहे की, साम्यवादामध्ये प्रत्येक जण पडेल ते प्रत्येक काम करत राहील.

त्याच्या लेखनामधील कल्पनावादी ध्येयांचे निराकरण फार जोरदार आहे. त्यामुळे तात्त्विक भूमिकेकडे अधिक कललेले त्याचे सर्व अनुयायी हा मुद्दा मान्य करतात.

१९३० पर्यंत मार्क्सवादी प्रमुख लेखकांमध्ये हा त्यांच्या आचार्यांचा 'नैतिक अधिष्ठान समाजवादाला नाही' असे मानणारा विचार अथवा समाजवादी समाजरचनेची तपशीलवार मांडणी करण्याचा प्रयत्न नाकारणारा विचार प्रतिबिंबित झाला आहे. "कामगारांना अमलात आणावयाची कसलीही ध्येय नाहीत" हे मार्क्सचे विधान १८९९ मध्ये बर्नस्टाइनने खंडिले. बर्नस्टाइन असे मानत होता की समाजवादी विचारसरणीला नैतिक गृहीतकृत्याची आवश्यकता आहे. बर्नस्टाइन हा पाखंडी व पहिला पुनरालोचनवादी (Rovisionist) होय.

परंतु हा अनैसर्गिक मार्ग सर्वसामान्य मार्क्सवादी प्रचारकांनी अनुसरला असे मात्र मानू नये. अगणित पृच्छकांनी बिस्मार्कचा प्रश्न अशा तऱ्हेने विचारला असला पाहिजे: "बेबेल आणि त्याचे भाई यांच्या मनात भावी राज्य कशा प्रकारचे असणार, हे मला नीट कळेल काय? आम्हाला फटीमधून काही तुरळक दृश्ये दिसतात; परंतु या सदृहस्थांना विधायक कार्यक्रम सांगण्याची मुळीच इच्छा दिसत नाही." बिस्मार्कने समाजवाद्यांच्या प्रसिद्ध झालेल्या कार्यक्रमांवरून असा निष्कर्ष काढला की, "समाजवादी राज्य म्हणजे एक कारागृह असणार. त्या कारागृहात कैदी शिपायांच्या कृपाकटाक्षाखाली प्रत्येक जण जीवन जगणार." प्रश्न आणि निष्कर्ष दोन्हीही अत्यंत सयुक्तिक आहेत. जो नेता क्रांतीचे आवाहन देतो त्याच्यावर अशी जबाबदारी पडते की त्याने जनतेला आपण कोणत्या परिस्थितीमध्ये परिणामी जाणार आहोत, हे सांगायला पाहिजे. अगणित वक्त्यांनी आदर्श समाजांमध्ये पूर्ण स्वातंत्र्य, पूर्ण समता आणि विश्वबंधुता नांदणार, असेच चित्र रेखाटून उत्तरे दिली आहेत. मार्क्सनेसुद्धा एकंदरीत असे म्हटले आहे की, "जगाच्या कामगारांनो, एकजूट करा!"

मार्क्सने काहीतरी समाजवादाचा नैतिक पाया दाखविणारे सगळे वक्तृत्व आणि समाजवाद आकर्षकपणे मांडण्याचे सर्व प्रयत्न निंद्य ठरविले आहेत. अद्भुतरम्यवाद्यांपासून आपण वेगळे कसे आहोत, हे दाखविण्याच्या इच्छेने असे सांगण्यास तो प्रवृत्त झाला असे मुख्यत: दिसते. इतके असूनही वर्तमानकालीन वाचकाला मार्क्सचा हा विचार घोटाळ्यात टाकतो. त्यामुळे त्यावर खूप चर्चा चालते. याचे कारण असे दिसते की, मार्क्सच्या वेळी अपरिहार्य प्रगतिवादाचा सिद्धांत सर्वमान्य झाला होता, हे बहुशः पुरतेपणी लक्षात घेतले जात नाही. हा सिद्धांत मार्क्सने पूर्णपणे स्वीकारला होता. त्याने त्या सिद्धांताला विरोधविकासवादाचा आकार दिला. हेगेलशी स्वतःचे मौलिक मतभेद आहेत, असे जरी तो मानत होता तरी, हेगेलची जबरदस्त छाप त्याच्यावर बसली होती. चित्-तत्त्व विश्वप्रक्रियेच्या द्वारा पूर्णतेस प्राप्त होत आहे आणि जगातील सर्व मूर्त घटना या अंतिम ध्येयाकडे होत असलेली प्रगती साधत आहेत, ह्या हेगेलच्या सिद्धांताची त्याच्यावर पूर्ण छाप पडली होती. प्रत्येक जण जे जे काही करतो त्याच्या योगाने ही प्रक्रियाच साधत असतो. ही प्रक्रिया साधणे हे कर्तव्य आहे. हेगेलच्या नीतिशास्त्राप्रमाणे हे मूलभूत कर्तव्य आहे. हेगेल इतर ऐहिक कर्तव्यांचे विवरण करतो, परंतु त्याच्या शास्त्रात त्यांना जुजबी स्थान असून तोही त्यांना कमी किंमत देतो.

क्रांतीचे संवर्धन करणे माणसाचे मूलभूत कर्तव्य होय असे मार्क्सने कोठेही म्हटले नसले तरी त्याचा तसा अभिप्राय दिसतो. तो जेव्हा विवेकबुद्धीच्या पवित्र शब्दावलींनी व्याप्त प्रश्नांच्या भाषेतील सामाजिक प्रश्नांच्या चर्चेचा हेटाळणीपूर्वक निर्देश करतो तेव्हा व्यक्तीच्या विवेकबुद्धीचा हेगेलकृत तिरस्काराचाच तो प्रतिध्वनी असतो.

मार्क्सचा ज्या प्रक्रियेवर विश्वास होता ती मानवी क्षेत्रातील होती, वैश्विक नव्हती. परंतु त्याने दिलेल्या काही अभिप्रायांवरून हा फरक जितका वाटतो तितका महत्त्वाचा आहे असे सूचित होत नाही. प्राथमिक साम्यवादी स्थितीतून भविष्यकालीन कम्युनिझमकडे जाणारी प्रक्रिया ही विरोधविकासी प्रक्रिया होय; खाजगी संपत्तीच्या निर्मितीमुळे सामाजिक वर्गभेद आणि राज्यसंस्था यांच्यामुळे मनुष्य आपल्या मूळ स्वभावापासून अलग पडला आहे; भविष्यकालीन साम्यवादामध्ये तो आपल्या मूळ स्वभावाकडे परतेल, असे तो म्हणतो. १८४४ च्या तत्त्वज्ञानात्मक हस्तलिखितात आणि अर्थशास्त्रात त्याने लिहिले आहे की खाजगी संपत्ती व मानवाची स्वभावच्युती यांचे विधायक उल्लंघन साम्यवाद होय. म्हणून मनुष्य स्वतःकरिता आपल्या स्वत्वाला प्राप्त करून घेईल. म्हणून मनुष्याचे आत्मस्वरूपाकडे सामाजिक म्हणजे मानवी स्वरूपात परत येणे हाच साम्यवाद होय. पूर्वी झालेल्या विकासाच्या संपूर्ण वैभवाच्या परिसरात झालेले हे निवर्तन जाणीवपूर्वक पडलेले असेल.

त्याच लेखात तो म्हणतो- "सामाजिक प्रयत्न आणि सामाजिक उपभोग म्हणजे केवळ प्रत्यक्ष सामाजिक प्रयत्न व प्रत्यक्ष सामाजिक उपभोग या स्वरूपाचे नव्हेत. जेव्हा मी वैज्ञानिक दृष्टीने प्रयत्नशील असतो तेव्हा मी इतरांबरोबर प्रत्यक्ष सामुदायिक रीतीने काम करतो असे क्वचित घडते. मनुष्य या नात्याने मी प्रयत्न करतो म्हणूनच मी सामाजिक ठरतो. माझी सामाजिक कृती म्हणजे माझे स्वतःचे अस्तित्व होय. माझे जे प्रयत्न होतात ते समाजाकरिताच होत असतात, कारण सामाजिक प्राणी अशी जाणीव त्या वेळी माझ्यामध्ये असते." ह्या उताऱ्यावरून असा अंदाज येतो की मधुर अशा सहकारी सामाजिक जीवनाचे कल्पनारम्य ध्येयवाद्यांचे बालस्वप्न मार्क्स पहात नव्हता. हे त्याला कळून चुकले होते की स्वातंत्र्य व बंधुभाव यांच्यात विरोध येऊ शकतो.

तो लेख असेही सांगतो- "इतिहास हा निसर्गेतिहासाचा वास्तविक भाग आहे. निसर्गेतिहास म्हणजे निसर्गाने माणूस बनणे होय. ज्याप्रमाणे माणसाचे विज्ञान निसर्गविज्ञानामध्ये केव्हातरी अंतर्भूत होईल. त्याप्रमाणे माणसाचे विज्ञान निसर्गविज्ञानात अंतर्भूत होईल. तेव्हा विज्ञान एकच राहील." फायरबाखवरील मुद्द्यांचे टाचण प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणे त्यात आणि इतर एक दोन ठिकाणी मानवकेन्द्रित आणि जवळजवळ आत्मनिष्ठ दृष्टिकोन मार्क्स सूचित करतो. हा दृष्टिकोन त्याच्या ऐतिहासिक प्रक्रियेला हेगेलच्या विश्वप्रक्रियेजवळ नेऊन सोडतो.

परंतु येथेही पृच्छक असा प्रश्न विचारील की, मार्क्सला ही प्रक्रिया स्वीकारणे का

भाग पडले? मार्क्सचे प्रकाशित झालेले ग्रंथ आणि त्याची राजकीय चळवळ लोकांना या प्रक्रियेमध्ये भाग घेण्याकरिता उत्तेजित करते. असे असूनही त्याने नैतिक उत्तरदायित्व तिरस्कारले आहे, आणि साम्यवाद हे ध्येय नव्हे, हा धर्म नव्हे, असेही त्याने समर्थित केले आहे.

त्याने जीवविज्ञानातील परिभाषा कित्येकदा वापरली आहे. ती असे सूचित करते की त्याच्या मते समाज म्हणजे सेंद्रिय संस्था आहे. त्या संबंधात अमुक एक कर्तव्य आहे व अमुक एक कर्तव्य नाही अशी चर्चा करणे व्यर्थ आहे. हे एवढ्यावरच थांबत नाही हे उघड आहे. हर्बर्ट लूथीने असा युक्तिवाद केला आहे की मार्क्सला केवळ कवी म्हणूनच महत्त्व दिले पाहिजे; त्याने एक प्रभावी नाटक लिहिले असून त्या नाटकातील उच्चांक म्हणजे सामान्य मानवसमूह आणि सद्गुणी कामगारवर्ग गर्विष्ठ व दुष्ट भांडवलशाहीला उलथून पाडतो. परंतु नाटक सहानुभूती निर्माण करीत असते, कृतीस प्रवृत्त करीत नाही. अतएव रॉबर्ट टकर मार्क्सला धार्मिक लेखक म्हणून संबोधितो आणि त्याचे नाटक हे नव्या मानवतावादी धर्माचे कर्मकांड होय, असे सांगतो. प्राथमिक टोळीतील माणूस टोळीच्या कर्मकांडात का भाग घ्यावा असे विचारत नसतो. जर कोणी कर्मकांडात का भाग घ्यावा याचे समर्थन करणारे नीतिशास्त्र आवश्यक आहे असे म्हटले तर बहुतेक टोळीवाले मार्क्सप्रमाणेच उत्तर देतील. मार्क्सने स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांच्या घोषणेबद्दल जसे म्हटले तसे म्हणतील. क्रांतीच्या प्रसूतिवेदना कमी करणे एवढेच काम होय, असे म्हणून मार्क्स स्वस्थ बसला. क्रांतीतले एवढेच कर्तव्य असा त्याचा दावा होता.

मार्क्सवाद ही धार्मिक विचारसरणी आहे. याचे समर्थन करताना मार्क्सवाद्यांच्या एका श्रद्धेवर भर दिला आहे. ती अशी की त्यांचे आदोलन यशस्वी होणे अपरिहार्य आहे आणि त्या आंदोलनाचे संवर्धन करणे सर्व कामगारांचे व सर्व माणसांचे वास्तविक कर्तव्य आहे. धर्म ह्या शब्दाने त्याचे उद्दिष्ट युक्त आहे, अशी भावना सूचित होते. आपले उद्दिष्ट केवळ निसर्गतः व व्यवहारत: युक्त नाही व्यवहारत: व निसर्गत: युक्तकर्तव्य वैकल्पिक असू शकते, तसे हे नव्हे. परंतु व्यवहार व निसर्ग यांच्याशीही ते सुसंगत आहे. धार्मिक अर्थानेच त्याची युक्तता ते मानतात. वैकल्पिक अन्य मार्ग संभवत नाहीत अशा अर्थी निःसंदिग्ध शुद्ध कर्तव्य म्हणून ते स्वीकारतात. नैतिक पाया नाकारल्यामुळे साम्यवादी आंदोलनात नैतिकतेपेक्षा अधिक गुण आहे हे स्थापित करण्यात मार्क्सला यश आले.

समाजवाद नैतिकदृष्ट्या कल्याणकारक आहे असे त्याने मांडले नाही हे जरी खरे असले तरी भांडवलशाही वाईट, अत्यंत वाईट, असे मात्र त्याने मांडले आहे. सर्वसामान्य प्रचारकांनी हे काम पुरे केले व त्यांनी समाजवाद अत्यंत कल्याणकारक आहे, अशा प्रकारची मांडणी केली. परंपरागत धार्मिक भ्रमाप्रमाणे बालिश स्वरूपात समाजवादाच्या कल्याणमयतेची त्याने मांडणी केली आहे. येथे फ्राइडचे सुखतत्त्व सर्वस्वी लागू पडते. समाजवाद म्हणजे अद्भुतरम्य

कल्पनावाद्यांचा पूर्ण समाज होय, त्यात स्वातंत्र्य व समता आकारास येते आणि, ख्रिस्ताने उपदेशिलेला बंधुभावाचा मुकुट त्यावर चढविलेला असतो. केवळ सामान्य अनुयायीच असे म्हणत नाहीत. व्यवहारी व रुक्ष दृष्टीचा लेनिनही यावर श्रद्धा ठेवतो. त्याने रशियात जेव्हा सत्ता काबीज केली तेव्हा आणि त्यानंतरही काही वर्षे साम्यवादाची स्थापना करणे साधी गोष्ट आहे असे तो मानत होता. त्याने मार्क्सचा भविष्यवाद पुनःपुनः अनुवादून सांगितला की प्रत्येक जण कोणतेही काम करील व विशिष्ट काम विशिष्ट माणसेच करू शकतील अशी परिस्थिती राहणार नाही. सत्ता काबीज करीत असण्याच्या काळात लिहिलेल्या 'राज्य व क्रांती' या पुस्तकात त्याने म्हटले आहे की, "सगळे साक्षर कामगार समाजवादी राज्य चालविण्यात प्रत्यक्ष भाग घेतील. या अद्भुतरम्यवादी ध्येयाच्या अंमलबजावणीकरता त्याने असा दंडक घातला. कुशल कामगारापेक्षा अधिक वेतन कोणत्याही पक्षसदस्याने घ्यावयाचे नाही. तीन वर्षांनंतर यंग कम्युनिस्ट लीगला त्याने सांगितले की, "दहा किंवा वीस वर्षांत साम्यवाद प्रस्थापित झालेला त्यांना दिसेल." या भाषणात साम्यवादी नीतिशास्त्र विस्ताराने मांडण्याचा त्याने खूप यत्न केला-

"जुन्या भांडवलशाही समाजात प्रत्येक जण केवळ स्वत.पुरते काम करीत होता. असा कोणी विचार केला नाही की कोणी म्हातारे किंवा आजारी आहेत. किंवा सर्व गृहकृत्याचा भार बायकांच्या खांद्यावर पडला आहे. यूथ लीगने पथके तयार करावीत, त्या पथकाने स्वच्छता ठेवावी आणि अन्न वाटावे; त्यांनी पद्धतशीर घरोघरी चौकशी करीत राहावे; त्याने सर्व समाजाला उपयुक्त ठरेल अशा पद्धतीने कामे संघटित करावीत." आपल्या घराची चौकशी करणारी यंग कम्युनिस्ट लीगची पथके मार्क्सला आवडली असती, याबद्दल कोणालाही शंका उत्पन्न होईल.

आदर्श समाजाची दहा किंवा वीस वर्षांत स्थापना होईल असा हा लेनिनना आशावाद लक्षात ठेवण्यासारखा आहे. कारण त्याला माहीत होते की मार्क्सवादाप्रमाणे रशिया समाजवादाकरिता आवश्यक असलेल्या परिपक्वावस्थेस आलेला नाही. एंगेल्सने असा जोरदार इशारा लिहून ठेवला आहे की समाजवादी पक्ष योग्य काळ येण्याच्या अगोदर सत्तेवर आला तर पुष्कळ संकटे अनुभवास येतील. लेनिनने एवढेच अनुमानिले की त्याचे सरकार लष्करीदृष्ट्या असमर्थ राहील. त्याला अशी शंका आली नाही की जर पक्षाच्या हाती सत्ता टिकून राहिली तर लोक योग्य साम्यवादी बनतील की नाही?

रशियन क्रांतीची परिस्थिती फारशी शुभसूचक नव्हती. मार्क्सवादाप्रमाणे आर्थिक व तांत्रिक पाया समाजवादाच्या स्थापनेकरता भक्कम असावा लागतो, एवढेच नाही तर सांस्कृतिकदृष्ट्या जनतेचीही तयारी झालेली असावी लागते. रशियन साम्राज्यातील जनतेचा मोठा भाग प्राथमिक अवस्थेतला गणला गेला होता. त्यात पुन्हा तेथील अर्थव्यवस्था युद्धाने फार खचली होती, आर्थिक परिस्थिती पुष्कळ वर्षे वाईट राहील, याची कल्पनाही लेनिनला

येऊ शकली नाही. १९५० पासूनच १९१३ च्या पातळीच्यावर जनतेचे जीवनमान जाऊ लागले. मध्यंतरीच्या काळात ते अनेक वेळा फार खाली गेले होते. लेनिनच्या वेळीदेखील समतेची प्रेरणा मंदावली, स्टालिनच्या अमलाखाली समतेचे ध्येय नष्ट झाले आणि व्यवहारामध्ये इतर पंरपरागत समाजांप्रमाणेच विषमता आत्यंतिक टोकाला गेली. राजकीय परिस्थिती तितकीच विरुद्ध बनली! प्रथमपासूनच पक्षाने हुकूमशाही पद्धतीने अंमल सुरू केला, व स्थानिक लोकशाही लगेच अस्ताला गेली. १९२८ साली सुरू झालेल्या नियोजनाच्या काळात सत्ता खूप प्रखर बनली. सुमारे १९३० सालापासून केवळ जगण्यापुरते वेतन देऊन मोठ्या प्रमाणात सक्तीची मजुरी सुरू झाली. १९३४ साली किरोव्हच्या खुनानंतर गुप्त पोलिसांच्या हाती प्रभावी सत्ता आली. संघटित प्रतिकाराचा बंदोबस्त करणे हा त्या सत्तेचा हेतू होता. अशा प्रकारच्या बंधुभावाच्याऐवजी प्रत्येक व्यक्तीला एकटे जीवन जगणे भाग पाडले. स्वतःच्या बायकोशी आणि मुलांशीसुद्धा आपले विचार बोलून दाखविणे धोक्याचे ठरले. स्टालिननंतर आलेल्या सत्ताधाऱ्यांनी ही पद्धती सौम्य केली तरी राजकीय दृष्टीने ती हुकूमशाहीच राहिली आहे.

(१९२१-२८) नवे आर्थिक धोरण अमलात आणण्याचा कालखंड सोडल्यास आर्थिक स्पर्धा कायद्याने बंद केली आहे; आणि अजूनही प्रत्यक्ष व्यवहारात तिला प्रतिबंध घातला आहे. मार्क्सवादी सिद्धांताप्रमाणे आर्थिक स्पर्धा स्वार्थाचे मूळ असून ती समाजविरोधी कृती होय. तेथील जीवन इतर क्षेत्रात स्पर्धामयच राहिले आहे. जेव्हा अन्न, वस्त्र, आसरा व शिक्षण ही तुटीची असतात तेव्हा जे काही उपलब्ध होते त्यासंबंधी लोक स्पर्धाशील राहतात. किंबहुना जेव्हा अशा तुटी राहात नाहीत तेव्हादेखील ज्या इष्ट गोष्टींची समृद्धी नसते, त्यांच्या संबंधात लोक स्पर्धा करीत राहतात. उदाहरणार्थ, उच्च पदे यासंबंधात इतर देशांतील जीवनाप्रमाणेच रशियन जीवन स्पर्धाशील बनले आहे आणि ते तसेच राहील यात शंका नाही.

हुकूमशाही असूनही बोल्शेव्हिकांची सत्ता मान्यता पावली आहे. जनतेला लोकशाहीचे वळण नव्हते. १९१७ साली मात्र जनतेने निरनिराळ्या समाजवादी पक्षांना घटनासमितीच्या निवडणुकीत मते दिली होती, परंतु आता ती बोल्शेव्हिकांच्या बाजूला वळली आहे. काही वर्षेपर्यंत या नव्या राजवटीला समाजवादाच्या विषयी व्यापक प्रमाणात उत्साह निर्माण करण्यात यश मिळाले. रशियाला या बाबतीत अभिमान वाटतो की त्यांच्या कुटुंबसंस्थेतील घटकांना गोड ममतेच्या बंधनांनी बांधलेले असते. लॅडिमीर वीडल (Wladimir Weidle) खात्रीने सांगतो की कुटुंबापेक्षाही मोठ्या वर्तुळात असे प्रेम नांदते- "सेवकवर्ग, अभ्यागत, मित्रमंडळींचा सबंध समुदाय, सेवानिवृत्त, आपल्या सुयिणी, दाया यांच्यासंबंधाची भावना सर्वथा कौटुंबिक भावनेसारखीच असते. अशी भावना फार विस्तृत नसलेल्या सामाजिक गटातही निर्माण होते. या अनुकूल सामाजिक साधनसामग्रीवर बोल्शेव्हिकांच्या उत्कट

प्रचाराचा प्रभाव पडला. इतका उत्कट प्रचार इतर कोणत्याही समाजात झालेला माहितीत नाही. या प्रचाराला विसंगत भावनेचा विरोध झाला नाही. पक्षाने आपला प्रचाराचा सवतासुभा लवकरच स्थापित केला. नागरिक विद्यालयात प्रवेश करतो तेव्हापासून प्रत्यक्ष उपदेश, सिनेमा, कादंबरी आणि सगळ्या प्रचारकी कला यांच्याद्वारे दिले जाणारे नैतिक शिक्षण पक्षाच्या नव्या कार्यक्रमात अन्तर्भूत केले. क्रुश्चोवच्या देखरेखीखाली त्याची आखणी केली व तो १९६१ च्या २२ व्या काँग्रेसमध्ये मान्य झाला:-

- "पक्षाचे असे मत आहे की साम्यवादाची उभारणी करणाऱ्याच्या नीतिनियमसंहितेत खालील तत्त्वे अन्तर्भूत होतात:-
- साम्यवादाच्या उद्दिष्टावरची निष्ठा; समाजवादी मातृभूमीवर व अन्य समाजवादी समाजांवर प्रेम.
- समाजहिताकरिता जाणीवपूर्वक यत्न; जो काम करीत नाही त्याला खायला मिळणार नाही.
- प्रत्येकाने सामाजिक संपत्तीच्या रक्षणाची व वृद्धीची काळजी वाहणे.
- सार्वजनिक कर्तव्याची उच्च जाणीव; सार्वजनिक हितास घातक कृतींबद्दल असहिष्णुता.
- समुदायवाद व बंधुभावनेने परस्परांना साहाय्य, प्रत्येकजण सर्वांकरिता, सर्व प्रत्येकाकरिता.
- मानव्यपूर्ण संबंध व व्यक्तींमध्ये परस्परांबद्दल आदर म्हणजे माणूस माणसाचा मित्र, सहकारी व बंधू.
- प्रामाणिकता व सत्यनिष्ठा, नैतिक पावित्र्य, विनय आणि सामाजिक व खाजगी जीवनातील अदांभिकता.
- कुटुंबात परस्परांबद्दल (आदर आणि संगोपनाची बालसंगोपनाची) काळजी वाहणे.
- अन्याय, परोपजीवीपणा, अप्रामाणिकता, बढती सतत मिळण्याचा हव्यास आणि पैशांची हाव हे सहन न करण्याची वृत्ती.
- सोविएट संघराज्यातील सर्व लोकांमध्ये मैत्री व भ्रातृभाव; अन्य राष्ट्रांचा व वंशांचा द्वेष असह्य असणे.
- साम्यवाद, शांतता व राष्ट्रांचे स्वातंत्र्य यांच्या शत्रूंबद्दल जमते न घेण्याचा आग्रह.
- जगातील सर्व कामगार जनता व सर्व लोक यांच्याशी भ्रातृभावपूर्ण ऐक्य.

कार्यक्रम पुढीलप्रमाणे:-

कामगारांच्या आंतरराष्ट्रीयवादाची जाणीव बाणण्याकरिता पक्ष सोविएट जनतेला शिक्षण देण्याचे अविश्रांत परिश्रम करील आणि कामगारांमध्ये आंतरराष्ट्रीय ऐक्य जोराने वृद्धिंगत करील. भांडवलशाही राष्ट्रवाद, वंशवाद व विश्वसमाजवाद यासंबंधी असलेल्या प्रतिगामी ध्येयवादाशी पक्ष सतत लढत राहील. साम्यवादी स्थित्यंतर घडत असलेल्या

या कालखंडात नव्या माणसाला शिक्षित करण्याची अधिक संधी आहे, त्याच्यामध्ये मानसिक संपत्ती, नैतिक पावित्र्य व उत्कृष्ट शरीरप्रकृती यांचा सुरेख मेळ बसेल. ऐतिहासिक सामाजिक परिवर्तनाचे फायदे म्हणजे पिळवणूक, बेकारी व दारिद्र्य यांतून सुटका, लैंगिक, जन्मसंबंधी, राष्ट्रीयता किंवा वंशीय कारणास्तव होणाऱ्या पक्षपातापासून मुक्तता हे होत; यांच्यामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास शक्य झाला आहे. समाजाच्या प्रत्येक सदस्याला शिक्षण व सर्जनशील श्रम यांची समान संधी प्राप्त करून दिली आहे. सार्वजनिक व्यवहारातून वा कौटुंबिक जीवनातून परावलंबिता व विषमता हे संबंध लुप्त झाले आहेत. प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक महती समाजाने रक्षित केली आहे. समाजाचे हितसंबंध नीट ध्यानात ठेवून प्रत्येकास कामधंद्याची समान व अनिर्बंध निवड करण्याची हमी दिली आहे. भांडवलशाही ध्येयवाद व नीतिनियम, खाजगी मालकीच्या मानसशास्त्राचे, लोकभ्रमाचे व दुराग्रहाचे अवशेष यांच्या आविष्कारांचा प्रतिकार करणे हा साम्यवादी शिक्षणाचा अखंड भाग आहे, असे पक्ष समजतो. व्यक्तिवाद व स्वार्थ यांचे आविष्कार व भूतकाळाचे अवशेष प्रतिकाराकरिता सामान्य जनता, जनमत, सविस्तर आलोचना व आत्म-टीका यांचा मोठा उपयोग असतो. भांडवलशाही दृष्टिकोन, रूढी व सवयी यांचे आविष्कार निरस्त करण्याचे प्रधान साधन म्हणजे समाजविरोधी वर्तनाचा भाईकृत निषेध हाच कालान्तराने बनेल. सश्रद्धाच्या भावनाना न दुखविता धार्मिक दुराग्रहातून मुक्त करण्याकरिता वैज्ञानिक भौतिकवादी विश्वकल्पना जनतेत बिंबवणारे ध्येयवादी माध्यम पक्ष वापरील. साहित्य, कला व संस्कृती भरभराटावी, प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या योग्यतेचा उपयोग करण्यास संपूर्ण अवसर मिळावा, जनता सौंदर्यशास्त्रदृष्ट्या शिक्षित व्हावी व तिची सुरेख कलाभिरुची व सांस्कृतिक संस्कार या गोष्टींच्या निश्चिती याकरिता पक्ष अविरत उद्योग करील- आशावाद व गतिशील साम्यवादी कल्पना यांनी भरलेले सोविएट साहित्य व कला सोविएट जनतेमध्ये ध्येयवादी शिक्षणाच्या प्रसाराची व नवे जग निर्माण करणाऱ्यांमध्ये गुण निर्माण करण्याची मोठी साधने आहेत. कोट्यवधी जनतेच्या आनंदाचे व स्फूर्तीची ती उगमस्थाने झाली पाहिजेत; जनतेच्या आकांक्षा, भावना व कल्पना त्यांनी व्यक्त केल्या पाहिजेत; त्यांनी जनतेला ध्येयवादाने संपन्न करावे व नैतिक शिक्षण द्यावे. जनतेच्या जीवनाशी निगडित असलेला संबंध दृढ करण्यातून, समाजवादी वास्तवाची संपन्नता आणि वैविध्य यांच्या अतिशय कलात्मक व विश्वसनीय अशा वर्णनातून, जे काही नवे आणि खरोखर साम्यवादसंबद्ध असे असेल त्याच्या स्फूर्तिमय व सुस्पष्ट चित्रणामधून आणि समाजाच्या प्रगतीला जे जे अडथळा करते त्या सर्वांचे चित्र चव्हाट्यावर आणण्याच्या क्रियेतून हा कलेचा व साहित्याचा राजमार्ग जातो. जनतेशी भागीदारी आणि रक्तसंबंध यांच्या तत्त्वांवर आधारलेल्या समाजवादी वास्तववादाच्या कलेमध्ये जीवनाच्या कलात्मक चित्रणातील धिटाईचे अग्रगामित्व हे, जागतिक संस्कृतीच्या परंपरांचे प्रगतिशील संगोपन व विकास यांच्या हातात हात घालून,

जात असते.''

गटाच्या बाहेर असलेल्यांचा द्वेष गटामध्ये असलेल्यांच्यामधील प्रेम अधिक सुलभतने उत्पन्न करतो. परंतु भांडवलदारी समाजांमधील सामान्य माणसापेक्षा (समाजवादी समाजातील) सामान्य मनुष्य स्वतःच्या बांधव-नागरिकांशी अधिक भ्रातृभावाचे वर्तन करतो अशी माहिती मिळत नाही. मार्क्सवादी दृष्टीप्रमाणे भांडवलदारीतील विरुद्ध परिस्थितीमुळेच गुन्हा, व्यभिचार इत्यादी घडतात. आणि समाजवादामध्ये ते नाहीसे झाले पाहिजेत. समाजवादामध्ये तसे झाले नाही. तसे घडण्याची प्रवृत्ती दिसत नाही. सोविएट गुन्ह्याच्या कायद्यात राज्याविरुद्ध गुन्ह्यांना अत्यंत कडक शिक्षा ठेवल्या आहेत. त्यात राज्यसंपत्तीची चोरी समाविष्ट आहे. सामान्य गुन्ह्यावरील उपाययोजनेसंबंधी क्रांतीनंतर लगेच मान्य केलेला गुन्ह्यांचा कायदा सौम्य आहे. परंतु काही वर्षांनंतर तो अधिक कडक करण्यात आला आहे. भांडवलशाहीच्या नाशाबरोबर गुन्हा नाहीसा होईल अशी अद्भुतरम्य ध्येयवादी अपेक्षा निराशाजनक ठरल्यामुळे असे करावे लागले यात शंका नाही. स्टालिनच्या निधनापासून गुन्ह्याचा कायदा पुनः शिथिल करण्यात आला परंतु अलीकडच्या वर्षामध्ये ही प्रवृत्ती पुनः बळावलेली आहे. राज्यसंपत्तीच्या मोठ्या प्रमाणातील अफरातफरीकरता आणि खोट्या चलनाचा वा खोट्या ठेवरोख्यांचा विक्रय वा निर्मिती करण्याच्या सवयीबद्दल मत्यूचा शिक्षा १९६१ साली वैध केली.

रशियाचे शत्रू नसलेल्या पूर्व युरोपातील राष्ट्रांमध्ये सोविएट संघराज्यातील सर्व भागांमधून आलेल्या बहुसंख्य सेनापथकांनी दुसऱ्या महायुद्धानंतर कायमचे ठाण मांडले. ठाण मांडणाऱ्या अधिकाऱ्यांचे धोरण काहीही असले तरी व्यापलेल्या राज्यातील सामान्य जनतेशी सैनिकांचे वर्तन पाशवी व अत्याचारी होते. या सैनिकांना भ्रातृभावाचे शिक्षण सतत दिले गेले होते तरी ते असे वागले.

सोविएट संघराज्यामध्ये बिन युरोपियन अल्पसंख्य जमाती पुष्कळ आहेत, तुर्कांशी सदृश असलेले मुसलमान प्रामुख्याने त्यात आहेत. त्यांच्या त्वचेचा रंग फार काळा नाही. आणि रशियनांना त्यांच्याशी सामाजिक संबंध व लग्नसंबंध ठेवणे आक्षेपार्ह केव्हाही वाटत नाही. परंतु त्या अल्पसंख्याकांनी आपले पृथक वैशिष्ट्य राखावे म्हणून रशियनांचा नैसर्गिक वंशमिश्रणाशी विरोध असतो. हे वंशमिश्रण दीर्घकालीन साम्यवादी धोरणानुसार संबंधित केले जात आहे. वंशमिश्रणाने मानवजात एक करणे हा धोरणाचा हेतू आहे. आता उलट असे झाले आहे की गेल्या दहा वर्षांमध्ये इतिहासामध्ये प्रथमच रशियन लोक मोठ्या प्रमाणात निग्रो लोकांच्या संपर्कात आले आहेत. आफ्रिकेतील हजारो विद्यार्थ्यांनी रशियन विद्यापीठांमध्ये शिक्षण घेतले आहे. परंतु इतर युरोपियन लोकांप्रमाणेच रशियन जनतेचीही प्रतिक्रिया झालेली लक्षात येते. त्या प्रकारची वृत्ते वेळोवेळी मिळत आहेत. उच्चवर्गीय व शिक्षित जनता सौम्य आहे. परंतु आंतरविवाह घडेल अशा प्रकारचे सामाजिक संबंध

खुबीने टाळण्याचा प्रयत्न करतात. कामगारवर्गातील लोक विशेषतः रशियन मुलीबरोबर चाललेला निग्रो पाहिल्याबरोबर वैर व्यक्त करतात आणि त्यामुळे मारामाऱ्या व खूनही होतात. (त्वचेच्या लक्षात भरणाऱ्या भिन्न रंगाबद्दल जनतेत वैरवृत्ती उत्पन्न होणे ही गोष्ट सार्वत्रिक आहे; भिन्न संस्कृतींच्यामध्ये या वैरवृत्तीचे प्रमाण भिन्न असते; विचारपूर्वक स्वीकारलेल्या श्रद्धेचा त्यावर थोडा परिणाम होतो. मी असे पाहिले आहे की, अत्यंत हुशार व पूर्णपणे प्रशिक्षित गोरा बिन-रशियन कम्युनिस्ट, अकल्पितपणे प्रसंग आला असता, काळ्या कम्युनिस्टाच्याबरोबर टेबलाशी बसण्यास नाकारतो. इतरत्र वर्णविषयक असलेला किंवा माहीत असलेला विपरीत ग्रह लक्षात घेतला असता वैचारिक प्रचार चाळीस वर्षे चालूनही त्या संबंधातील रशियनांचे वर्तन बदललेले नाही, हे पाहताना आश्चर्य वाटत नाही.)

ही गोष्ट नोंदणे जरूर आहे की रशियामध्येही ज्यू-विरोधवादाची रग कायम असून तो चालू असलेला दिसून येतो; इतके असूनही साम्यवादी राज्यकर्त्यांची वृत्ती डळमळीत दिसते. ख्रिश्चन पार्श्वभूमी असलेल्या सर्व देशांमध्ये ज्यू-विरोधवाद अस्तित्वात आहे, आणि तो जुन्या रशियामध्ये फार होता अशी कुप्रसिद्धी आहे. समाजवादी पक्षांमध्ये पुष्कळ ज्यू लोक होते. बोल्शेव्हिक नेत्यामध्ये व पहिल्या सोविएट सरकारांमध्ये त्यांची संख्याही मोठी होती. त्यानंतरच्या काळात राजकीय नेत्यांमधील ज्यूंची संख्या घटत गेली. अर्थात अजूनही सुशिक्षित वर्गांमध्ये कमीजास्त सामावलेल्या ज्यूंची संख्या लक्षात भरण्यासारखी आहे. सोविएट राजवटीच्या पहिल्या वर्षांमध्ये यहुदी धर्मासह सर्व धर्मांना दाबून टाकण्याचे धोरण प्रचलित होते. त्या धोरणात ज्यू-विरोधवाद नामोहरम करणे परंतु यहुदी संस्कृतीस उत्तेजन देणे या गोष्टींचा समावेश होता. १९३० पासूनच्या दशकात यहुदी संस्कृती दाबून टाकण्यात आली आणि प्रमुख ज्यू लोकांना फासावर लटकाविण्यात आले. जर्मनीविरोधी युद्धाच्या काळात हे धोरण स्थगित करण्यात आले. त्यानंतर पुन: त्याला जोर चढला. १९५२ मध्ये ज्यू संस्कृतीचे शेकडो नेते फासावर लटकाविले. स्टालिनच्या निधनानंतर नरमाईचा काळ आला तेव्हा हे धोरण शिथिल झाले तरी यहुदी धर्मासह सर्व धर्मांचा छळ करण्यास लवकर सुरुवात झाली आणि यहुदी संस्कृती परिणामकारकपणे दाबून टाकण्याचे काम सुरू झाले. या सरकारी धोरणास बहुशः राजकीय दृष्टी कारण आहे; त्याबरोबरच सामान्यपणे ज्यू-विरोधवादही पुष्कळ आहे. १९६० मध्ये एका प्रादेशिक पत्रामध्ये म्हटले होते की, "जो ज्यू मसलमानाचे रक्त प्रतिवर्षी एकदा तरी प्राशन करीत नाही तो खरा धार्मिक मानला जात नाही." बराच विरोध झाल्यानंतर हे विधान परत घेण्यात आले परंतु लेखकाने आपला गैरसमज झाला असे म्हटले व त्याची सुटका झाली. त्याच सुमारास ज्यूंची परंपरागत पद्धतीची नालस्ती करणारे एक रशियन पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याविरुद्ध विदेशी साम्यवाद्यांनी निषेध व्यक्त केला. नाझीनी सर्व ज्यू नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याची जाणीव पश्चिम युरोपात झाल्यानंतर ज्यू-विरोधवादाच्या विरोधी भावना सामान्यपणे पसरल्या, त्यापैकी हे लोक

होते. असे शक्य आहे की रशियन जनतेमध्ये या भावना विशेष पसरल्या नाहीत. म्हणून रशियातील प्रचारयंत्रणा या विषयासंबंधी मुग्ध राहिली. काही वर्षांपूर्वी असे प्रसिद्ध झाले होते की रशियामध्ये नाझी आंदोलनाचा गंभीर अभ्यास मुळीच प्रकाशित झालेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे अजूनही तशीच स्थिती आहे.

स्वतःच्या नागरिकांशी भ्रातृभावनेन वागावे असे नव्या सोविएट मनुष्याला दीर्घकालपर्यंत विशेष प्रयत्नपूर्वक शिक्षण दिले असूनही त्याचा फार थोडा परिणाम झालेला दिसतो. सहानुभूतीने म्हणायचे तर हे पुनः सांगितले पाहिजे की अनेक प्रकारे परिस्थिती अजून अनुकूल बनलेली नाही, आर्थिक सुस्थिती असमाधानकारक आहे. प्रचारयंत्रणा विसंगतीपासून मुक्त नाही हे स्पष्ट आहे. विश्वबंधुत्व व रशियन राष्ट्रवाद यांमधील ती विसंगती होय. स्वतः प्रचारकच बंधुत्व-भावनाशून्य पद्धतीने वागत आले आहेत. वॅक्लॉ मॅकेस्की या पोलीस पक्षसदस्याने साठ वर्षांपूर्वी पूर्व युरोपातील समाजवाद्यांवर खूप दोषारोप केला; त्याने असा सिद्धान्त मांडला की वर्गीय सर्व सत्ता नष्ट करण्याकरिता निर्माण झालेली कामगारवर्गाची चळवळ म्हणजे समाजवाद हाय, हे म्हणणे बरोबर नाही. उलट ही चळवळ शिक्षित वर्गाची आहे. जनतेवर स्वत:ची सत्ता स्थापन करण्याकरिता व भांडवलशाहीचे स्थान घेण्याकरिता त्यांची ही चळवळ आहे. मिलोवन जिलास याने स्वत:च्या प्रत्यक्ष अनुभवानुसारे लिहीत असता साम्यवादी आंदोलनाचा असाच अर्थ हुबेहूब सांगितला आहे. रुक्ष बुद्धिवादी मनुष्य असेही समर्थन करू शकेल की क्रुश्चोव्हच्या कार्यक्रमातील ध्येयवादी घोषणा म्हणजे निराळ्या प्रकारची जनतेकरिता तयार केलेली अफू आहे.

मानवजातीचा सामान्य अनुभव उपेक्षित केला तरी नैतिक घोषणांना मर्यादितच अर्थ असतो असा अनुभव येतो. परंतु ह्याला क्वचित अपवादही सापडतो. नैतिक घोषणांमध्ये जर बौद्धिक सुसंगती आणि भावनात्मक आवाहन असेल तर त्या पद्धतशीर रीतीने मांडल्यास जनता नैतिक तत्त्वे स्वीकारू शकतात व प्रत्यक्ष जीवनात उतरवू शकतात. साम्यवाद्यांच्या नैतिक प्रचारामध्ये एक महत्त्वाची उणीव असते. कारण उथळ व अवास्तव सिद्धांताचा तो एक भाग असतो.

हा उथळ सिद्धांत हे विशेषतः मार्क्सचे काम आहे. मार्क्स हा स्वतःच्या युगाचे अपत्य आहे. एकोणिसाव्या शतकातील आशावाद व बुद्धिवाद याचे ते युग होय. समकालीन विज्ञानाच्या यांत्रिक उपपत्तीच्या वातावरणाचे त्याच्या विचाराने समर्थन होते. हेगलचा प्रभाव त्यात कमी दिसतो. हे खरे आहे की यांत्रिक भौतिकवाद त्याने धिक्कारला आहे आणि त्याने असा दावा केला आहे की, भौतिक विरोधविकास वादामध्ये यांत्रिकवादाचे दोष टळतात. परंतु तो व त्याचे अनुयायी यांना स्वसिद्धांत बुद्धिग्राह्य रीतीने मांडण्यात अपयश आले आहे. त्याला स्वतःच्या भौतिकवादाशी विरोधविकासवादाचा मेळ बसविता आला नाही. जग ही एक यांत्रिक संघटना आहे अशी त्याने कल्पना केली. या यांत्रिक संघटनेवर हेगेलीय

डेमिअर्ज-(चैतन्यशक्ती) चे सतत नियंत्रण असते, हे मात्र त्याने त्यातून वगळले आहे.

हेगेलची अशी धारणा होती की वस्तूचे वर्तन त्यांच्या अंतर्गत स्वभावधर्माप्रमाणे स्वतत्त्वाप्रमाणे घडत असते. एंगल्सने दाखवून दिल्याप्रमाणे भौतिकवाद स्वतत्त्वाची कल्पना मान्य करीत नाही, आणि वस्तूंचा स्वभाव त्यांच्या परिस्थितीवर अवलंबून असतो. मार्क्सने मानवी स्वतत्त्वाची वा स्वभावधर्माची कल्पना वापरली आहे. आणि ती दोन प्रकारे वापरली आहे. मनुष्य स्वभावधर्मापासून किंवा स्वतत्त्वापासून च्युत झाला असून साम्यवादात तो तिकडे परतणार आहे. याच्या उलट मानव जेव्हा एका वर्गात समाविष्ट होतो तेव्हा वर्गाच्या लक्षणानुसार म्हणजे वर्गस्वभावानुसार वागतो; मग तो वर्ग भांडवलशाही असो किंवा कामगारांचा असो. मानव आर्थिक प्राणी आहे या सिद्धांताचा स्वीकार यात केला आहे. तात्पुरत्या आर्थिक नमुन्यांच्या रचनेला हा पुरेसा ठरतो परंतु मार्क्सच्या अधिक महत्त्वाकांक्षी उद्देशाला पुरणे कठीण आहे. परंतु मार्क्स जेव्हा भावी परिणतीचा विचार करू लागतो तेव्हा तो भौतिकवादी पद्धतीने स्वभावधर्माचा इन्कार करतो. लोक म्हणतात की समाजवाद मानवी स्वभावाशी विसंगत आहे, मार्क्स मानवी स्वभावाची कल्पना नाकारतो आणि असे प्रतिपादितो की मनुष्य अनंत प्रकारे बदलू शकतो व पूर्णतेस पोहोचू शकतो. मार्क्सचा चरित्रकार मेहरिंग असे म्हणतो-

"बकुनिनला मनुष्य हा विशेषत; इतिहासाचा कर्ता दिसला; मनुष्यामध्ये त्याच्या शरीरात एक दैत्य आहे म्हणून मनुष्य अकल्पितपणे क्रांतिकारक बनतो आणि स्वतःची बंधने तोडण्याची गरज त्याला भासते.'' परंतु मार्क्सने माणसाला इतिहासाचा विषय मानले आहे. तो हळूहळू कृती करण्याकरता तयार केला जातो त्यामुळे वर्गीय प्रयत्नांकरिता निश्चित पकडला जातो, तो इतिहासाचे घटक म्हणून आपली घटना झालेली कामगिरी बजावतो. क्रांतीनंतरही माणसाला हाच मुद्दा लागू पडतो. नव्या क्रांतीकरिता धीमेपणाने त्याला प्रशिक्षित करून शिस्तीत नव्या कामाला प्रवृत्त करावयास पाहिजे.

सामान्यपणे माणसाचा जो स्वभाव मार्क्सने ठरविला त्यापेक्षा त्याचा स्वतःचा स्वभाव अगदी निराळा होता. स्वतःबद्दलचे विचार खेळीमेळीने बोलत असता त्याने स्वतःचा स्वभाव वर्णिला; मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ध्येयनिष्ठा; झगड्यात आनंद अशी कल्पना; शरणागती हेच दैन्य अशी कल्पना; सर्वांत तिरस्करणीय दुर्गुण म्हणजे गुलामी; शेक्सपियर, एसकिलस, गटे हे आवडते कवी; 'प्रत्येक मुद्दा संशयित केला पाहिजे' हे आदर्श वाक्य. मोठ्या मोठ्या शोकांतिका तो नेहमी पुन्हा वाचीत असे. एंगेल्सने प्रकाशित केलेल्या तत्त्वज्ञानापेक्षा मानसिक अद्वैतवादाकडे असलेला कल त्याने सूचित केला आहे. त्याचे विवरण मात्र त्याने केव्हाही केले नाही. त्याच्या संक्षिप्त टिप्पणी त्याच्या मृत्यूनंतर उघडकीस आल्या. प्रत्येक गोष्टीबद्दल संशय घेतला पाहिजे या त्याच्या दाव्याकडे पाहून त्याच्या ग्रंथाचे वाचक त्याला हसतील, परंतु ही गोष्ट खरी आहे की त्याने कॅपिटलचे दोन भाग (दुसरा व तिसरा) कच्च्या

खर्ड्याच्या रूपाने अठरा वर्षे (१८६५-१८८३) तसेच ठेवले, केव्हाही पुरे केले नाहीत किंवा एंगेल्सला दाखविले नाहीत. प्रकृती वाईट होती परंतु वेळही पुष्कळ होता. असे ध्वनित केले जाते की स्वतःच्या सबंध सिद्धांताबद्दल शंका वाटू लागल्यामुळे त्याने ते पूर्ण करण्याची टाळाटाळ केली.

त्याने सिद्ध केलेला सिद्धांत आणि त्याचे सार्वजनिक जीवन पाहता दोन्ही बाबतींत तो संकुचित, आग्रही व असहिष्णू होता. वर सांगितलेली गोष्ट याहून वेगळी आहे. त्याचे खाजगी विचार काहीही असोत; त्याने आपल्या अनुयायांकरिता वस्तूंचे संपूर्णपणे दर्शनी स्वरूप मांडले आहे. एंगेल्स व लेनिन या बहिर्दर्शी मंडळींनी त्याला जोराचा पाठिंबा दिला आहे आणि काहींनी तर पॅवलोच्या सोपाधिक सिद्धांताच्या शोधावरून काढलेल्या अतिशयोक्तिपूर्ण निष्कर्षाच्या साह्याने तो दृढ केला आहे. जी माणसे मनःपूर्वक भांडवलशाहीशी लढली, परंतु स्वतःचा चिडखोरपणा ज्यांच्या केव्हाही लक्षात आला नाही त्या साध्या भांडखोर माणसांना त्याचा सिद्धांत पटला. त्याच भांडखोर माणसांनी क्रांतीनंतर निःशंकपणे असे मानले की, मनुष्यजातीला त्यांना पाहिजे त्या स्वरूपात शिक्षणद्वारा, प्रचारद्वारा व संस्कृतद्वारा पाहिजे तसा आकार देता येईल परंतु जेव्हा कोणता आकार द्यावा हा त्यांना प्रश्न पडला तेव्हा त्यांना असे आढळून आले की मार्क्सने अगदी अस्पष्ट स्वरूपात मार्गदर्शन केले आहे. हे आंदोलन अर्धधार्मिक स्वरूपाचे असल्यामुळे त्यांना जुजबी नैतिक उपदेशांचा आधार घ्यावा लागला. लेनिनने या संबंधात असे म्हटले आहे की असले नैतिक उपदेश "हजारो वर्षे सर्व धार्मिक प्रवचनांमध्ये उपदेशिलेले आढळतात."

क्रुश्चोव्हच्या कार्यक्रमातील साधे काळे पांढरे, समाजवादी वास्तववादाच्या आणि आशावादी कलेने साधावयाच्या उन्नतीचा पोकळपणा यांना मार्क्सच्या सार्वजनिक व्यक्तिमत्त्वच जबाबदार आहे. अलीकडच्या काळातील घटनांच्यामुळे मिळालेल्या मनुष्यविषयक अधिक ज्ञानाच्या प्रकाशात, रशियातील सामान्य माणसास, सर्व माणसांशी बंधुभावाने वागावे, ही गोष्ट पटविण्यासंबंधात साम्यवाद्यांना आलेल्या अपयशाबद्दल आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही.

(नवभारत, नोव्हेंबर, १९६७, पृ. १ ते १०)

○○○

ग)
वृत्तांत व विचार

१०२

काशी येथील अखिल भारतवर्षीय ब्राह्मण महासम्मेलन

गेली ८ वर्षे हिंदू समाजात प्रचंड संक्रमण घडून येत आहे. मोपल्यांचे बंड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, हिंदू-मुसलमानांचे दंगे, इंग्रजांची झोडफोडीच्या तत्त्वाने राज्य करण्याची नीती इत्यादी आपत्तींनी हिंदू समाज जागा झाला आहे. जगात हिंदू मनुष्य अभिमानाने कसा जगेल? जगाच्या स्पर्धेत हिंदू समाज स्वसंस्कृती व आदर्श न सोडता कसा टिकाव धरील? असा प्रश्न हिंदू समाजधुरिणांपुढे उभा आहे. त्याकरिता हिंदू सभा, सनातन धर्मसभा, ब्राह्मण परिषद, इत्यादी नवीन नवीन संस्था व शुद्धिसंघटन, अस्पृश्योद्धार, पोटजातींचे एकीकरण इत्यादी चळवळी उत्पन्न झाल्या आहेत. एका टोकाला धर्म व संस्कृती झुगारून देणारा, वर्णसंकरास प्रवृत्त झालेला, संस्कार, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादिकांस थोतांड म्हणून समजणारा पक्ष उभा आहे व दुसऱ्या टोकाला जुने तितके सोने मानणारा, वेदांपासून तो बाबा पाध्यांच्या धर्मसिंधूपर्यंत उत्पन्न झालेल्या संस्कृत वाङ्मयाला ईश्वरवाणी समजणारा, देशकाल परिस्थितीशी उदासीन, रूढीला चिकटून राहिलेला जीर्णमतवाद्यांचा पक्ष उभा आहे. हल्ली समाजात हिंदू समाजाचे भवितव्य ठरविण्यामध्ये पाच पक्ष उत्पन्न झाले आहेत. १. श्रुती, स्मृती, पुराणे यांतील विचार अंधार युगातील आहे, शेकडो व हजारो वर्षांपूर्वी झालेल्या माणसांच्या शिळ्या विचाराकडे आजच्या पुढारलेल्या व सुधारलेल्या जगाने लक्ष देऊन कालक्षेप काय म्हणून करावा? जातिभेद, समाजभेद, विवाहमर्यादा, श्राध्द, मूर्तिपूजा, अवतार, गुरू, धर्मग्रंथ इत्यादी वेडे संपविण्याचा काळ आलेला आहे, असे म्हणणारा नागड्या सुधारकांचा पंथ. २. ग्रंथ मनुष्याचीच कृती असल्यामुळे ती सदोष असणार, जुन्या लोकांना नव्या लोकांच्या अडचणी कळणे शक्य नाही, त्याकरिता जसजशी नवीन अडचण उपस्थित होईल, तसतशी हळूहळू सुधारणा करावी, असे म्हणणारा धर्म व संस्कृती याबद्दल उदासीन असलेला प्रागतिक पक्ष. ३. श्रुती, स्मृती व पुराणे हे ग्रंथ पूज्य आहेत यात शंका नाही; पण आजच्या परिस्थितीत ते पूर्ण प्रमाण नाहीत. त्यातील पटतील ते विचार ग्राह्य धरून पुढील मार्ग सुधारावा, असे म्हणणाऱ्या धर्मविषयक सहानुभूती बाळगणाऱ्या विचारकांचा सांप्रदाय,

४. श्रुति, स्मृति, भारतादी इतिहासग्रंथ व पुराणे यांत भारतीय संस्कृतीचे सार साठविलेले आहे; समाजाच्या धारणेचे सत्य सिद्धांत त्यात ग्रथित आहेत; ते सिद्धांत पारखून भिन्न भिन्न देशकाल परिस्थितीला योग्य रीतीने लागू केले पाहिजेत. म्हणून त्या त्या परिस्थितीत नवीन नवीन विवरणे, भाष्ये व टीका व्हावयास पाहिजेत. १०-१२ हजार वर्षांचा भारतीय लोकांचा समाजशास्त्रविषयक अनुभव बाजूला सारून सुधारणा करणे आत्मघातकीपणाचे होय, असे म्हणणारा श्री. चिंतामणराव वैद्य, श्री. नारायणशास्त्री मराठे, 'ब्राह्मण' पत्रिकाकार इत्यादिक संस्कृतिनिष्ठांचा वर्ग, ५. श्रुती, स्मृति व पुराणे, त्यांच्यावरील टीका, उपटीका, निरनिराळे निबंधग्रंथ व रूढी हे सर्व पूर्णप्रमाण; त्यात काडीचाही बदल होता कामा नये. शास्त्रात न सांगितलेली रूढीदेखील लुप्तशास्त्रमूलक म्हणून प्रमाण, वरील सर्व ग्रंथांतील विचार अनादिसिद्ध होत; देशकाल परिस्थितीच्या अनुसाराने त्यातील कोणताही विचार उत्पन्न झालेला नाही; परिस्थिती बदलेल; पण वरील ग्रंथात प्रतिपादिलेला धर्म यत्किंचितही बदलणार नाही. परिस्थिती बदला, धर्मातील कोणताही आचार किंवा विचार बदलू नका, असे म्हणणारा म. म. लक्ष्मणशास्त्री द्रवीड, म. म. अनंत कृष्णशास्त्री, शिरोळकर शंकराचार्य वगैरे मंडळींचा कट्टर पक्ष.

वर सांगितलेल्या पाच पक्षांपैकी शेवटच्या पक्षाने काशी येथे कार्तिक कृष्ण १ (टिळक पंचांग) ता. २९-१०-१९२८ पासून ते का. कृ. ११ (टिळक पंचांग) तारीख ७-११-१९२८ पर्यंत अखिल भारत वर्षीय ब्राह्मण महासंमेलन भरविले होते. या संमेलनाचे २ भाग होते. एक विचारसभा व दुसरे मुख्य अधिवेशन. त्यापैकी विचारसभेत धर्मशास्त्राशी साक्षात संबद्ध असलेल्या प्रश्नावर वादविवाद झाले. हे प्रश्न हल्ली समाजात सुरू असलेल्या चळवळीतील प्रमुख विषयासंबंधाने होते. हिंदूसभा अकोला (१९३१), ब्राह्मण परिषद (१९२८) व मालवीयांची सनातन धर्मसभा (१८ ते २४ जानेवारी, १९२८) यांनी हाती घेतलेल्या विषयांवरच विचारसभेत प्रामुख्याने चर्चा झाली. विचारसभेपुढे आलेले प्रश्न संमेलनाच्या चालकांनी अगोदर ३ महिने जाहीर केले होते व त्यांवर अखिल भारतवर्षातील संस्कृततज्ज्ञ पंडितांचे निबंध मागितले होते. संमेलनापर्यंत या प्रश्नावर स्वागत मंडळाकडे चारशे पंडितांचे निबंध आले होते. निबंधांची संख्या १४६ होती. काही निबंध अनेक पंडितांनी मिळून लिहिले होते. एकंदर १७ प्रश्नांवर विचार झाला. ते प्रश्न असे :

१. स्त्रियांच्या व पुरुषांच्या विवाहकालाची मर्यादा कोठपासून कोठपर्यंत शास्त्रसंमत आहे?, २. चालू परिस्थितीस व शास्त्रास अनुसरून विवाहकालमर्यादेचे नियमन (कायदा) करणे किती वर्षांपर्यंत योग्य होईल?, ३. स्त्रीला ऋतू प्राप्त झाल्यानंतर होणारा विवाह हा मुख्य, गौण की आपद्धर्म म्हणून समजावयाचा?, ४. कन्येस ऋतू प्राप्त झाला असता वृजस्वल सांगणाऱ्या वचनाचा आशय काय समजावयाचा?, ५. ब्राह्मणादी जातींमध्ये असलेल्या पोटजातीत परस्पर विवाहसंबंध होणे शास्त्रसंमत आहे किंवा नाही?, ६. धर्मज्ञ कोण व ते कशा प्रकारचे धर्मपरिवर्तन करू शकतात? (पूर्वधर्माचा संकोच अथवा नवीन धर्मप्रवर्तन?), ७. विधवा विवाह व काडीमोड

शास्त्रदृष्ट्या योग्य आहे की अयोग्य आहे अथवा निंद्य आहे?, ८. अस्पृश्य वर्गाचे अस्पृश्यत्व हे जातीतः आहे की कर्मतः आहे, ९. म्लेंच्छ व अंत्यज ह्यांचा स्पर्श, सभेत प्रवेश, विहिरीचे पाणी घेणे, देवळात प्रवेश या गोष्टींत इतरांपेक्षा तारतम्य राखणे योग्य की अयोग्य? जर ते योग्य असेल तर ते कोणत्या रीतीने राखावे?, १०. भागवतधर्मदीक्षेने याच जन्मी उच्चजाती प्राप्त होते की नाही?, ११. यवनादी जाती जन्मसिद्ध आहेत की कर्मसिद्ध आहेत?, १२. भागवतधर्मदीक्षेचा अमुक एका जातीला अधिकार नाही असे म्हणता येईल काय?, १३. शूलपाणी वगैरे ग्रंथकारांनी केलेल्या व्यवस्थेप्रमाणे देवलस्मृतीला प्रामाण्य मानावयाचे किंवा नाही?, १४. म्लेंच्छ संसर्गाने झालेला पतित किती काळाने शुद्ध होऊ शकतो?, १५. एक संवत्सरपर्यंत म्लेंच्छांशी संसर्ग करणाऱ्यांच्या व त्यापेक्षा अधिक काळ म्लेच्छांबरोबर सर्व प्रकारचा संसर्ग करणाऱ्यांच्या प्रायश्चित्तात व नंतर त्यांच्याशी होणाऱ्या व्यवहारात काही फरक आहे की नाही?, १६. व्रात्यसंस्कार किती पिढ्यांपर्यंत शास्त्रदृष्ट्या करता येतो?, १७. जाती या जन्मातील कर्माने प्राप्त होते व ती बदलते असे मानावे की जन्मतःच जाती प्राप्त होते व ती बदलू शकत नाही असे मानावे?

वरील प्रश्नांचे वर्गीकरण करून विचारसभेत विचारार्थ खालील सात विषय ठेवले होते. १. स्त्री-पुरुषांच्या विवाहकालाचे समालोचन व पोटजातीतील विवाह, २. भागवतधर्मदीक्षेच्या स्वरूपाचा व अधिकाराचा निर्णय, ३. पतितपरावर्तन ऊर्फ शुद्धी, ४. स्पर्शास्पर्शविचार, ५. व्रात्यसंस्कार, ६. विधवा विवाह, ७. चातुर्वर्ण्यव्यवस्था.

स्वागतसभेत अध्यक्ष महाराजा काशी आणि प्रभू नारायणसिंह बहादूर हे होते. व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष म. म. पंचानन तर्करत्नभट्टाचार्य, उपाध्यक्ष म. म. वामाचरण भट्टाचार्य व म. म. लक्ष्मणशास्त्री द्रवीड संमेलनाचे चिटणीस म. म. अनंत कृष्णशास्त्री, न्यायाचार्य राजेश्वरशास्त्री, ताराचरण भट्टाचार्य आणि श्रीजीव भट्टाचार्य हे होते. संमेलनाकरिता निरनिराळ्या पीठाधीश आचार्यांनी, कलकत्त्याच्या मारवाडी समाजाने, रावबहादूर रामेश्वरनाथ दुदवेवाला यांनी व शशिशेखर राव यांनी हजारो रुपयांची मदत केली.

संमेलनास वर्गीय ब्राह्मण सभेच्या वतीने १५० पंडित उपस्थित होते. मद्रास, कर्नाटक, आंध्र, पंजाब, राजपुताना इत्यादी दूरदूर स्थलचे निरनिराळ्या संस्कृत महाविद्यालयांचे अध्यापक महामहोपाध्यायादी पदवीभूषण पंडित उपस्थित होते. संमेलनचालकांचा हेतू अखिल भारतवर्षीय ब्राह्मणांचे संमेलन भरविण्यापेक्षा अखिल भारतवर्षीय संस्कृत पंडित संमेलन भरविणे हाच होता. ही गोष्ट संमेलनाच्या पहिल्या प्रसिध्दिपत्रकाच्या तिसऱ्या नियमात स्पष्ट सांगितलेली आहे. संस्कृतविद्येत पारंगत अशा ब्राह्मण पंडितांनाच सभेचे प्रतिनिधी होता येते, असे त्यात स्वच्छ लिहिले आहे.

ह्या संमेलनात मुख्य अधिवेशनापेक्षा विचारसभेलाच अधिक महत्त्व होते. महासंमेलनाच्या मुख्य अधिवेशनाला त्या दृष्टीने विशेष किंमत नव्हती. वर उद्धृत केलेल्या १७ ही प्रश्नांचा खल विचार सभेतच झाला. विचारसभा एकंदर सात दिवस चालली. वरील १७ प्रश्नांचा निकाल

प्रतिनिधींच्या बहुमतावर करावयाचा नाही, असे सभेच्या चिटणीसांनी पहिल्या प्रथमच जाहीर केले. विचारसभेत केवळ पंडितांनाच प्रवेश होता; पण पंडितांच्या बहुपदावरदेखील वरील प्रश्नांचा निर्णय करावयाचा नाही, असा स्वागत मंडळाने ठराव केला आहे, ही गोष्ट सभेचे चिटणीस अनंत कृष्णशास्त्री यांनी अगोदरच जाहीर केली! पंडितांनी सभेत वाद-विवाद करावा व तेथे असलेल्या तिघा धर्माचार्यांनी संमेलनाच्या मुख्य अधिवेशनाच्या प्रसंगी त्या प्रश्नावर स्वत:चे निर्णय जाहीर करावेत, असे सभानियामकांनी ठरविले होते. अर्थात हे संमेलन हल्लीच्या प्रातिनिधिक तत्त्वावर भरविले नव्हते. धर्मशास्त्राशी संबद्ध असलेल्या विषयांवर सामान्य जनतेच्या मताला वास्तविक किंमत नाही, खरी किंमत तज्ज्ञ पंडितांच्या बहुमताला आहे, असे म्हणून हिंदुधर्म परिषद, ब्राह्मण परिषद, इत्यादिकांवर अप्रयोजकपणाचा आरोप करणाऱ्या रूढीप्रिय जीर्णमतवाद्यांच्या दृष्टीने जरी विचार केला, तरी या संमेलनात पंडितांच्या बहुमताने निर्णय न केल्यामुळे या संमेलनास शास्त्रदृष्ट्याही खरे महत्त्व नव्हते. संमेलनाच्या विचारसभेत शिरोळकर शंकराचार्य सहा दिवस गैरहजर होते; पण त्यांनी वादविवाद न ऐकता निर्णय जाहीर केले.

विचारसभेच्या पहिल्या दिवशी श्री. शिरोळकर शंकराचार्य यांचे मुख्य भाषण झाले. या दिवशी जगद्गुरू रामानुजाचार्य, तिरुनारायणजी, वल्लभाचार्य श्रीदामोदरलालजी महाराज व मथुरेचे महाराज तसेच श्री. शिरोळकर शंकराचार्य असे चौघे धर्माचार्य उपस्थित होते. प्रथमतः श्रीराजेश्वरशास्त्री यांनी मंगलाचरण म्हणून संस्कृतमध्ये भाषण केले. नंतर शंकराचार्यांचे भाषण झाले. त्यांच्या भाषणात सदर मुद्दे होते : कलिकालामुळे सनातनधर्माचा अत्यंत ऱ्हास झाला आहे. पाश्चात्त्य विद्येने बुद्धिमान लोक मोहित झाले आहेत. अग्निहोत्र, स्नानसंध्या, जपजाप, तप, श्रौतस्मार्तक इत्यादिकांचा लोप झाला, लोक युक्तिवादी झाले, त्यामुळे शास्त्रावर श्रद्धा राहिली नाही, धर्मगुरूंचा मान राहिला नाही.

धर्माचरणामुळे प्राचीन राजे व ऋषी यांना अलौकिक सामर्थ्य प्राप्त झाले होते, ते आता राहिले नाही. त्याकरिता अशा सभा भरल्या पाहिजेत. धर्मात परिवर्तन करण्याचा कोणालाच अधिकार नाही अग्निहोत्र व स्वर्ग यांचा कार्यकारणभाव जसा अगम्य तसेच इतर धर्माचरणाचेही समजावे. आजपर्यंत सनातन धर्मात कोणीही केव्हाही परिवर्तन केले नाही, श्रुती अनादिसिद्ध अपौरुषेय असून सन्मूलक स्मृति, पुराणे व आचार हे प्रमाण होत; त्यात कधीही बदल होता कामा नये. याकरिता श्रुति, स्मृती, पुराणे व सदाचार यांच्या अनुसाराने सर्व आस्तिक समाजाने वागावे, भलतीकडे वाहवत जाऊ नये.''

अशा आशयाचे उत्कृष्ट संस्कृत भाषेत शब्दालंकार आणि अर्थालंकार यांनी पूर्ण गंभीर भाषण आचार्यांनी केले.

नंतर श्री. अनंत कृष्णशास्त्री यांचे भाषण झाले. ते म्हणाले, उद्यापासून विचारसभेतील वादविवादास प्रारंभ होणार आहे. विचारसभेत जय-पराजयाच्या दृष्टीने वादविवाद करावयाचा नाही. केवळ तत्त्वजिज्ञासेने प्रश्नोत्तररूपाने चर्चा व्हावयाची आहे. येथे निरनिराळ्या संप्रदायांचे

३-४ आचार्य आले आहेत. ह्या आचार्यांत मोक्ष व तत्त्वज्ञान या बाबतीत जरी वाद असला, मोक्षशास्त्र जरी यांचे भिन्न असले, तरी धर्मशास्त्र एक आहे. धर्माचरणाचे बाबतीत यांचे ऐकमत्य आहे. आपणांस येथे मोक्षाचा विचार करावयाचा नसून, धर्माचा करावयाचा आहे. आजच्या बिकट परिस्थितीत धर्मात बदल करावा असे म्हणणारे काही लोक आहेत; हे लोक प्रवाहाबरोबर वाहात जावे अशा विचाराचे आहेत; पण धर्मपरिवर्तन म्हणजे प्रवाहाबरोबर वाहात जाणे नव्हे. प्रवाहाच्या उलट पोहण्यात शौर्य व धैर्य आहे, त्याच्याबरोबर वाहण्यात नाही. विश्वामित्रादिकांच्या यज्ञात राक्षस विघ्न आणीत म्हणून विश्वामित्रादिकांनी यज्ञ करण्याचे बंद केले नाही. आम्हाला येथे संदिग्ध प्रश्नांचा विचार करावयाचा आहे. श्रुति, स्मृति, पुराणे, त्यावरील टीका व धर्मसिंधू, निर्णयसिंधूसारखे सर्व निबंधग्रंथ हे पूर्ण प्रमाण मानून ह्या विचारसभेत वादविवाद करावा. मीमांसापद्धती ही एकच राहावयाची असून युक्तिवादाला गौण स्थान आहे किंवा नाहीच असे म्हटले तरी चालेल.

अशा आशयाचे भाषण केल्यानंतर अनंत कृष्णशास्त्री यांनी विचारसभेची नियमावली वाचून दाखवली.

विचारसभेची नियमावली

१. त्या त्या देशातील निरनिराळे ५ किंवा १ मध्यस्थ धर्माचार्य निवडतील.
२. सर्व सभेचा कोणी तरी नियामक नेमला जाईल व तो ज्यांना प्रश्नोत्तरांस परवानगी देईल, त्यांनीच प्रश्नोत्तरे करावी.
३. प्रश्नोत्तरे होत असताना ती लिहून घेतली जातील व त्यावर वादी-प्रतिवादींचे हस्ताक्षर असेल.
४. दोन्ही पक्षांतील वादी-प्रतिवादींची संख्या सारखी राहील.
५. वादी-प्रतिवादींशिवाय इतरांस बोलण्याचा अधिकार नाही.
६. वादी-प्रतिवादींमध्ये एक बोलत असताना दुसऱ्याने बोलू नये.
७. स्वयंसेवक सांगतील त्याच ठिकाणी त्या त्या मताच्या प्रतिनिधी असलेल्या लोकांनी बसावे; त्यांना बोलण्याची परवानगी नाही.
८. नागरिकांना बसण्यास स्वतंत्र जागा व स्वतंत्र प्रवेशपत्रक मिळेल.
९. निबंध ग्रंथापर्यंत सर्व ग्रंथांचे प्रामाण्य स्वीकारून मीमांसक पद्धतीनेच वादविवाद होईल.
१०. प्रश्नोत्तर पध्दतीने वादविवाद करावा; व्याख्यान पध्दतीने नव्हे.
११. वादी-प्रतिवादींनी मांडलेल्या प्रमाणांचा तारतम्याने विचार करून स्वतःचा आशय धर्माचार्यांना निवेदन करणे एवढेच मध्यस्थांचे काम, दुसरे नाही.
१२. निर्णय सांगण्याचे काम धर्मांचार्यांचेच होय. अर्थात ते प्रमाण देऊन.
१३. प्रवेशपत्रावाचून विचारसभेत कोणाचाही प्रवेश होणार नाही.
१४. प्रस्तुत विषय सोडून दुसऱ्या विषयावर कोणी बोलू नये.

वरील नियमावली वाचून दाखविल्यानंतर पुढील दिवशी विवादाचा विषय कोणता याचे स्पष्टीकरण अनंत कृष्णशास्त्री यांनी करण्यास सुरुवात केली. तेव्हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (वाई) यांनी विचारसभेच्या नियमावलीवर प्रतिनिधींची संमती का घेत नाही? असा प्रश्न विचारला. तेव्हा अनंत कृष्णशास्त्री म्हणाले की, हे स्वागतमंडळाने केलेले नियम असल्यामुळे त्यावर प्रतिनिधींचे मत घेण्याची जरुरी नाही. नंतर लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पहिल्या, नवव्या, दहाव्या आणि अकराव्या नियमावर महत्त्वाचा खुलासा विचारला. श्री. लक्ष्मणशास्त्री द्रवीड यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांस खुलासा विचारण्यासही प्रथमतः आडकाठी केली; पण नियम मला समजले नाहीत म्हणून खुलासा पाहिजे, असे तर्कतीर्थांनी सांगितल्यामुळे त्यांस परवानगी मिळाली. त्यांचा प्रश्नांचा आशय असा होता : प्राचीन न्यायशास्त्राच्या ग्रंथात वादी-प्रतिवादींना संमत जो तोच मध्यस्थ होऊ शकतो, असे मध्यस्थाच्या व्याख्येत सांगितले आहे. आजपर्यंत शास्त्री-पंडितांच्या वादात उभयसंमत मध्यस्थ निवडण्याची चाल आहे. म्हणून ह्या सभेचा पहिला नियम मध्यस्थाच्या शास्त्रशुद्ध व्याख्येच्या विरुद्ध होत नाही काय? मध्यस्थांनाच वादनिर्णयाचा अधिकार शास्त्रकारांनी दिला आहे, त्याच्या विरुध्द १० वा व ११ वा नियम नाही काय? मनुस्मृतीत आणि अन्यत्र कोठेही निबंधग्रंथ प्रमाण असे म्हटलेले नाही आणि आजपर्यंत निबंधकारांनीदेखील निबंधग्रंथाचे प्रामाण्य सांगितलेले नाही. निबंधकार परस्परांच्या विरुद्ध परस्परांचे खुशाल खंडण करतात, अशा स्थितीत निबंध ग्रंथांचे प्रामाण्य शास्त्रतः व युक्तितः विरुध्द नाही काय? यावर 'तुम्हांस वरील नियम मान्य नसल्यास सभेचा त्याग करा' असे लक्ष्मणशास्त्री द्रवीड व अनंत कृष्णशास्त्री यांनी सांगितले. यावर पुनः तर्कतीर्थांनी विचारले की, निबंधग्रंथांचे प्रामाण्य श्रुति-स्मृतीप्रमाणे उपदेश विधया मानावयाचे की इतर सज्जनांच्या मताप्रमाणे विचारविधया म्हणजे युक्तिसिद्ध असल्यास मानावयाचे? यावर अनंत कृष्णशास्त्री यांनी 'निबंधग्रंथाचे विचार विधयाच प्रामाण्य मानावयाचे' असे उत्तर दिले. असा संवाद झाल्यानंतर दुसऱ्या दिवसाचा विषय जाहीर केला व अगोदर ठरलेली सकाळी ७ ते १० आणि दुपारी २ ते ५ ही वेळ बदलून दुपारी १२ ते ५ ही वेळ ठरविली.

याच दिवशी संध्याकाळी बनारसच्या टाऊन हॉलमध्ये वरील नियमावलींचा निषेध करण्याकरिता प्रचंड जाहीर सभा भरली होती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी ज्या नियमांवर आक्षेप घेतले होते, ते नियम बनारस येथील हिंदू विश्वविद्यालयातील संस्कृत महाविद्यालयाचे प्रिन्सिपाल प्रमथनाथ तर्कभूषण, म. म. देवीप्रसाद कविचक्रवर्ती, धर्मशास्त्राचार्य राधाप्रसाद, व इतर ३२ पंडित यांना अमान्य होते. वरील ३२ पंडितांचा नियमावली बदलण्याचा अर्ज विचारसभेच्या अगोदर ३ दिवस व्यवस्थापकांकडे गेला होता. त्यांनी त्यास अमान्यता दर्शविल्यामुळे वरील निषेध सभा झाली.

विचार सभा दिवस दुसरा

श्री. अनंत कृष्णशास्त्री यांनी सर्व पंडितांना चर्चेस प्रारंभ करण्याची विनंती केली व ते म्हणाले:

सप्तमाद्वत्सरादूर्ध्वे विवाहः सार्ववर्णिकः।
कन्यायाः शस्यते राजन्नन्यथा दोष गर्हितः॥

या भारतवाक्यानुसाराने ८ वर्षांच्या आत कन्येचा विवाह करू नये, असा निर्बंध घातला तर तो शास्त्रविरुद्ध होणार नाही. म्हणून ८ वर्षांच्या आत विवाह करू नये अशी मर्मादा सर्वसंमत आहे, असे समजून १० वर्षांच्या आत कन्येचा विवाह करू नये, असा निर्बंध घालणे योग्य आहे की नाही, याबद्दल सर्वांनी विचारविनिमय करावा. मध्यस्थांची नेमणूक आचार्यांनी अशी केली आहे :- विरूपाक्षशास्त्री, चण्डीचरण तर्कतीर्थ, शशिनाथ झा, रामभवन उपाध्याय व नन्दकिशोर भट्ट.

हरणचन्द्रभट्टाचार्य यांनी '८ वर्षांच्या आत विवाह करू नये, असा निर्बंध घालणे शास्त्रविरुद्ध होय म्हणून त्यावरही पंडितांची चर्चा व्हावयास पाहिजे' असे सांगितले. म्हणून हरणचन्द्रभट्टाचार्यांच्या म्हणण्याप्रमाणे चर्चा सुरू झाली.

हरणचंद्र भट्टाचार्य म्हणाले :-

द्विवर्षात्प्राग्विवाहश्चेत्कन्याया मरणम् यदि।
खननं नैव कर्तव्यं मन्त्रसंस्कारमाचरेत्॥

या वचनानुसाराने २ वर्षे वयाच्या पूर्वीदेखील विवाह होऊ शकतो.

प्रियनाथ सांख्यतीर्थ : रघुनंदनभट्टाचार्यांनी 'शुध्दितत्त्व' या निबंधात २ वर्षांच्या व ५ वर्षांच्या पुढच्या वयाच्या विवाहित स्त्रीचे मरण झाल्यास पतीला आशौच किती दिवस या संबंधाने निर्णय केलेला आहे, तसेच उत्कलीय निबंध ग्रंथात जन्मापासून ११ व्या वर्षापर्यंत स्त्रियांच्या विवाहाची योग्यता वर्णिली असल्यामुळे त्यामुळे ८ वर्षांच्या पूर्वी विवाहनिषेध शास्त्रसंमत नाही. नग्निका विवाहास प्रशस्त आहे.

यावच्चौलं न गल्लानि यावत्क्रीडनि पांसुभिः।
यावद्दोषं न जानाति नावभ्द्रति नग्निका॥

अशी नग्निकेची व्याख्या पुराणात केली आहे. नग्निकाकन्या देणे हा उत्तमपक्ष. नग्निका म्हणजे जिला नवरा-बायकोचे नाते समजत नाही ती मुलगी.

एक बंगाली पंडित यावर म्हणाले : ज्योतिर्निबंध या ग्रंथांत

'पडदमध्ये नोद्दात्द्य कन्या'

असे म्हटले आहे, म्हणजे कन्येचा ६ वर्षांच्या आत विवाह करू नये. या वाक्यावरून ६ वर्षांच्या आत विवाह निषिद्ध आहे.

हरणचन्द्रभट्टाचार्य : ६ वर्षांच्या आत विवाह केल्यास कन्येला भार्यात्व येत नाही, असे

काही म्हणता येणार नाही. कारण, अगोदर उल्लेखिलेल्या वचनाशी विरोध येतो. म्हणून ६ वर्षांच्या आतला विवाह गौण आहे असे म्हणता येईल.

राजेश्वरशास्त्री-

जन्मतोगर्भधानाड्य पंचमाद्वात्परं शुभम्।
कुमारीवरणं दाने भेखलाबन्धनं तथा॥ अंगिरा:

'जन्मापासून किंवा गर्भाधानापासून ५ वर्षांनंतर विवाह व उपनयन शुभ होय.'

उत्कृष्टायाभिरूपाय वराय सदृशाय च।
अप्राप्तामपि तां तस्मै कन्या दद्याद्यथा विधि॥

'चांगला, अनुरूप व समान वर मिळत असल्यास मुलीला कन्यात्व प्राप्त होण्याच्या अगोदरही देण्यास हरकत नाही,' असे मनूचे म्हणणे आहे.

या दोन वाक्यांचा विचार केल्यास ५ वर्षांनंतर ८ वर्षांपर्यंत कन्येच्या विवाहाचा मुख्य काल होय असे म्हणता येते; पण ६ वर्षांच्या आत विवाह करू नये, अशा अर्थांच्या वचनानुसाराने ५ व ६ ही दोन वर्षे आपत्कालीन योग्य, ७ वर्ष गौण व ८ वे वर्ष उत्तम, असा समन्वय सिद्ध होतो.

इतका विवाद झाल्यानंतर अनंत कृष्णशास्त्री यांनी मीमांसादृष्ट्या वरील वचनांवर दोघा बंगाली पंडितांशी चर्चा केली व ''८ वर्षांच्या आत विवाह करू नये, असे जर समाजहितदृष्ट्या योग्य असे वा त्या प्रांतांतील लोकांस वाटत असेल, तर तसा निषेध करण्यास शास्त्रविरोध नाही, ही गोष्ट सर्वसंमत आहे,'' असे जाहीर केले. पुढे १० व्या वर्षाच्या आत कन्येचा विवाह करू नये, असा निषेध घालणे योग्य की अयोग्य, यावर चर्चा सुरू झाली. सभेत वादविवादाचा गोंधळ फार होऊ लागल्यामुळे कोणीतरी नियामक पाहिजे, असे वाटून अनंत कृष्णांनी पंचानन तर्करत्न भट्टाचार्यांचे नाव सुचविले; पण सभेचे नियमन अनंत कृष्णशास्त्री हे स्वतःच करीत होते. त्यामुळे कित्येक पंडितांनी त्यांना हरकत घेतली; पण तिकडे अनंत कृष्णांनी दुर्लक्ष केले. चर्चा पुढे चालू झाली.

विंध्येश्वरी प्रसादशास्त्री म्हणाले :

गौरी ददन्नाकपृष्ठं वैकुण्ठ रोहिणी ददत्।
कन्या ददद्ब्रम्हलोकं रौरवं तु रजस्वलाम्॥

'(गौरी म्हणजे) ८ वर्षांच्या मुलीचे दान केल्यास स्वर्गलोक, (रोहिणी म्हणजे) ९ वर्षांच्या मुलीचे दान केल्यास वैकुण्ठ व (कन्या म्हणजे) १० वर्षांच्या मुलीचे दान केल्यास ब्रह्मलोक अशी अनुक्रमे फळे प्राप्त होतात.'

ह्या मरीचिस्मृतीच्या अनुसाराने १० वर्षांच्या मुलीचे दान केल्यास सर्वांत अधिक फल सांगितल्यामुळे त्याच्या अलीकडचा काळ मध्यम होय. म्हणून १० वर्षांच्या अलीकडे निर्बंध घालणे योग्य होय.

राजेश्वरशास्त्री : हा श्लोक विन्ध्येश्वरीप्रसाद म्हणतात तसा नसून उलटा आहे.

गौरी ददद्विष्णुलोकं ब्रह्मलोकं तु रोहिणीम्।

कन्यां ददत्स्वर्गलोकं रौरवं च रजस्वलाम्॥

असे ८ वर्षांच्या मुलीच्या दानास अधिक फल सांगितले आहे. म्हणून ८ वे वर्ष हाच उत्तम काल होय.

निरनिराळ्या पंडितांनी वरील दोन्ही प्रकारचे श्लोक प्रमाण आहेत असे सांगितल्यामुळे राजेश्वरशास्त्र्यांचे म्हणणे पूर्ण सिद्ध झाले नाही. त्यावर ते म्हणाले :

सर्वेषामेव दानानामेकजन्मानुगं फलम्।

हाटकगृहगौरीणां सप्तजन्मानुगं फलम्॥

''इतर सर्व दानांचे फल एक जन्मपर्यंत पुरते, पण सुवर्ण, घर व गौरी म्हणजे ८ वर्षांची कन्या यांच्या दानाचे फल सात जन्मपर्यंत पुरते.''

ह्या वचनानुसाराने गौरीदानाचे फल अधिक असल्यामुळे ८वे वर्ष उत्तम होय.

हरणचन्द्रभट्टाचार्य व कुमुदचन्द्र व्याकरणतीर्थ म्हणाले :

विवाहो ऽष्टवर्षायाः कन्यायाश्च प्रशस्यते।

'८ वर्षांच्या कन्येचा विवाह प्रशस्त होय.' असे यमस्मृतीतील वाक्य आहे, तसेच स्त्रियांचा विवाहविधी हा मुलांच्या उपनयनस्थानी आहे, असे मनूचे वाक्य असल्यामुळे अतिदेशन्यायाने उपनयनाप्रमाणे ८ वे वर्ष विवाहास मुख्य काल असे प्राप्त होते. म्हणून १० वर्षांच्या आत कन्याविवाहनिषेध अशास्त्रीय होय.

शशिनाथ झा म्हणाले :

८, ९ व १० या वर्षी विवाह केल्यास अमुक अमुक फले प्राप्त होतात असे सांगितले असल्यामुळे हे विवाह काम्य होत, नित्य नव्हेत. विवाह हा संस्कार असल्यामुळे तो नित्य आहे. नित्यकर्म या नात्याने

तस्माद्विवाहयेत्कन्यां हृद्यां द्वादश वार्षिकीम्।

'बाराव्या वर्षाच्या कन्येचा विवाह करावा' या वाक्यानुसाराने १० वर्षांनंतरच विवाहाचा नित्यकर्म या दृष्टीने मुख्य काल होय. ऋतुदर्शन हा त्या काळाची शेवटची मर्यादा आहे.

राजेश्वरशास्त्री : काम्यकर्मदेखील नित्य होऊ शकते. उदाहरणार्थ : ५ व्या वर्षाचे उपनयन काम्य आहे म्हणून ५ व्या वर्षी उपनयन केल्यानंतर निराळे नित्य उपनयन करावे लागत नाही. नित्य अग्निहोत्रांत दह्याचा होम केल्यास सामर्थ्यप्राप्ती हे फल सांगितले आहे; पण त्यामुळे त्याचे नित्यत्व नाहीसे होत नाही.

बराच सूक्ष्मवादविवाद झाल्यानंतर हा विषय मध्यस्थाकडे सोपविला.

यानंतर विवाहाच्या पूर्वी कन्येला ऋतू प्राप्त झाल्यावर तिचा विवाह शास्त्रशुद्ध आहे की नाही, या विषयावर वाद सुरू झाला. राजेश्वरशास्त्री म्हणाले : १० व्या वर्षानंतर कन्येला गुप्त ऋतू प्राप्त होतो. याकरिता १० वर्षांनंतर प्रायश्चित्त देऊन विवाह करावा. रजोदर्शन प्रत्यक्ष दर्शनानंतर

प्रायश्चित्तानेदेखील त्या कन्येची शुद्धी होऊ शकत नाही, ती कन्या बहिष्कार्य व त्याज्य होय. यावर सर्व बंगाली पंडित व इतर शास्त्री रागावले. या सर्व पंडितांनी राजेश्वरशास्त्र्यांचे म्हणणे अत्यंत अशास्त्रीय, गर्ह्य व तिरस्करणीय आहे, असे स्पष्ट बजाविले, म्हणून सभाचालकांनी वादाची वेळ संपल्यामुळे हा विषय पुढल्या दिवसावर टाकला. याच दिवशी रात्री सर्व बंगाली पंडितांची सभा होऊन त्यांनी हे संमेलन द्राविड ब्राह्मणांच्या मिराशीचे आहे, यांत खरा शास्त्रनिर्णय व्हावयाचा नाही; पण वाद केला पाहिजे, असे ठरविले.

विचारसभा : दिवस ३ रा

या दिवशी सभेमध्ये व्यवस्थापकांनी प्रायश्चित्तपूर्वक ऋतुस्नात कन्येची शुद्धी होऊ शकते, असे म्हणणाऱ्या पक्षाकरिता एक बाजू व प्रायश्चित्त देऊनही ऋतुस्नात कन्येची शुद्धी होऊ शकत नाही; ती कन्या त्याज्य, बहिष्कार्य व अव्यवहार्य होय, असे म्हणणाऱ्यांकरिता दुसरी बाजू राखून ठेवली होती. विवाहापूर्वी ऋतुस्नात कन्येची प्रायश्चित्ताने शुद्धी होऊ शकते, ती सर्व धर्मकार्यात योग्य होय, असे म्हणणाऱ्या पक्षात सर्व बंगाली पंडित व इतरही बरेच विद्वान समाविष्ट होते. विवाहापूर्वी रजोदर्शन झालेली मुलगी प्रायश्चित्ताने शुद्धच होऊ शकत नाही, असा पक्ष श्री. राजेश्वरशास्त्री, गोपाळशास्त्री नेने इत्यादी ४-५ जणांनीच स्वीकारला होता. हरणचन्द्रभट्टाचार्य, शशिभूषण स्मृतितीर्थ, विध्येश्वरी प्रसादशास्त्री इत्यादिकांनी पहिल्या पक्षाचे समर्थन केले.

श्री. राजेश्वरशास्त्री :

अष्टवर्षा भवेन्दौरी नववर्षातु रोहिणी ।
दशवर्षा भवेत्कन्या अत ऊर्ध्व रजस्वला ॥

'८ वर्षांची मुलगी गौरी होय. ९ वर्षांच्या मुलीस रोहिणी म्हणतात. १० वर्षांच्या मुलीस कन्या व त्यानंतर रजस्वला म्हणावे.' इत्यादी आंगिरस व संवर्तस्मृतीतील वाक्ये आहेत. यात १० वर्षांच्या पुढील कन्येस रजस्वला म्हटले आहे. रजस्वला कन्या वृषली असे म्हणतात. वृषली म्हणजे शूद्रा किंवा चण्डाली होय.

अपरा वृषली ज्ञेया कुमारी या रजस्वला।

'रजस्वला कन्या आणखी एका प्रकारची वृषली होय' या वचनानुसाराने रजस्वला कन्या वृषली होय. वृषली कन्या विवाहास अयोग्य आहे. कारण, बृहस्पतीची व मार्कंडेयाची अशी वाक्ये आहेत.

पितृगेहेतु या नारी रजः पश्यत्य संस्कृता।
सा कन्या वृषली ज्ञेया तत्पतिर्वृपली पतिः॥
माता चैव पिता चैव ज्येष्ठो भ्राता तथेव च।
त्रयस्ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम्॥
उद्वदेवस्तु तां कन्यां ब्राह्मणो मदमोहितः।
असंभाष्यो ह्य पांक्तेयः स विप्रो वृषली पतिः॥
बृहस्पतिः।

या कन्या पितृवेश्मस्था यदि पुष्पवती भवेत।
असंकृता परित्याज्या न पश्येत्ता कदाचन॥
विवाहे च न योग्या स्माल्लोकद्वयविगर्हिता।
एतां परिणयन्तिप्रो न योग्यो हव्यकव्ययोः॥
स तस्यां जनयेत्पुत्रं कानीन इति कथ्येत।
माता पिता च पुत्रश्च त्रयस्ते वृषलाः स्मृताः॥
यदा पुष्पवती कन्या तदैव त्यक्तुमर्हति।
न तत्र दोषस्तस्मास्ति गेहस्थाचेत्स दोषभाक्॥
मार्कण्डेयः।

तात्पर्य : 'पित्याच्या घरी अविवाहित कन्या रजस्वल झाल्यास तिला वृषलीत्व येते व तिला वरणारा गूढ ब्राह्मण वृषलीपती झाल्यामुळे संभाषणास व हव्य-कव्य समयी पंक्तिभोजनास अयोग्य ठरतो. स्वगृही कन्या ऋतुमती झालेली पाहणारे आई, बाप व भाऊ हे तिघे वृषल ठरून नरकास जातात. अशा कन्येचा विवाह न करताच त्याग करावा. ती इहपरलोकी निंद्य ठरत असल्यामुळे विवाहाला अयोग्य होय. त्या मुलीच्या ठिकाणी होणारी संतती कानीन समजावी. अशा कन्येला घरी ठेवल्यास पिता दोषी ठरतो आणि तिला वरणारा बहिष्कार्य होतो.'

विन्ध्येश्वरीप्रसाद शास्त्री : ११ व्या वर्षी कन्या रजस्वला होतेच असे नाही. १२, १४, १६ ही वर्षेदेखील ऋतुप्राप्तीची आहेत. ११, १२ ही वर्षे अपवाद असतात. 'अत ऊर्ध्व रजस्वला' म्हणजे यापुढे ती केव्हातरी रजस्वला होते; ११ व्याच वर्षी होते असे नाही.

दद्यादृणवते कन्यां नग्निकां ब्रह्मचारिणे।

या बौधायनवचनानुसाराने नग्निका म्हणजे 'अनागतार्तवा' ऋतुप्राप्त न झालेली स्त्री विवाहास योग्य असे ठरते. मग तिचे वय किती का असेना! म्हणूनच मनूने १२ वर्षांच्या कन्येचे व महाभारतात १६ वर्षांच्या कन्येचे पाणिग्रहण विहित केले आहे.

ऋतुमती कन्येचा त्याग करावा, ती विवाहास अयोग्य होय, असे जर म्हटले, तर पुढील वाक्याची उपपत्ती लगणार नाही.

अतःप्रवृत्ते रजसि कन्यां दद्यात्पिता सकृत्।
महदेनः स्पृशेदेनमन्यथैप विधिः सताम्॥

'म्हणून ऋतुप्राप्त झाल्याबरोवर पित्याने कन्यादान ताबडतोब करावे; नाही तर पाप लागते. हाच सज्जनांचा मार्ग आहे,' असे नारदस्मृतीत म्हटले आहे.

कन्यामृतुमतीं शुद्धां कृत्वा निष्कृति मात्मनः।
शुद्धिंच कारयित्वा तामुद्दर्हदानृशंस्यधीः॥
आश्वलायनः।

'ऋतुमती कन्येला प्रायश्चित्त देऊन व स्वतः प्रायश्चित्त घेऊन सहृदय मनुष्याने तिच्याशी विवाह करावा,'

पिता ऋतून्स्वपुत्र्यास्तु गणयेदादितः सुधीः।
दानावधि गृहेयत्नात्पालयेच रजोवतीम्॥

आश्वलायनः।

'पित्याने कन्यादान करीपर्यंत मुलीचे ऋतुप्राप्त झाल्यानंतर परिपालन यत्नाने करावे आणि ऋतूंची संख्या (प्रायश्चित्ताच्या सोयीकरिता) ध्यानात ठेवावी.'

कुमारी ऋतुमती त्रीणि वर्षाण्युपासीत ऊर्ध्व त्रिवर्षभ्यः
पतिं विन्देत तुल्यम्।

वसिष्ठधर्मसूत्र॥

'ऋतुमती कन्येने ३ वर्षेपर्यंत पित्याची वाट पहावी. नंतर पिता लग्न करीत नसल्यास स्वतः योग्य पती वरावा.'

राजेश्वरशास्त्री :

वर्षाद्द्वादशकादुर्ध्व यदि पुष्पं बहिर्न हि।
अन्तःपुष्पं भवत्येव पनसोदुम्बरादिवत्॥

'१२ व्या वर्षानंतर जरी ऋतू बाहेर स्पष्ट दिसत नसला तरी ज्याप्रमाणे फणसाची व उंबराची पुष्पे दृग्गोचर होत नाहीत, त्याप्रमाणे आत रज उत्पन्न झालेले असते,' असे 'पीयूषधारा' या निबंधात वचन उद्धृत आहे. तद्नुसाराने ११ वे वर्षी जरी रजोदर्शन नसले तरी रजस्वलात्व असण्यास हरकत नाही, एवंच '१० वर्षानंतर रजस्वला होते' हे वाक्य उपपन्न होते. ज्या वाक्यात ऋतुमती कन्येस प्रायश्चित्तपूर्वक शुद्धी सांगितली आहे, ती प्रायश्चित्ते १० व्या वर्षानंतर रजोदर्शन होईपर्यंत रजस्वलात्व असल्यामुळे त्या वेळी कन्येकडून करवावी. प्रत्यक्ष रजोदर्शनानंतर वरील मार्कंडेयाच्या वचनाप्रमाणे ती मुलगी त्याज्यच ठरते. त्यावर बराच खल झाला. काशीतील धर्मशास्त्री पंडितांचे अग्रगणी शशिभूषण स्मृतितीर्थ यांनी राजेश्वरांच्या वरील म्हणण्याचे सप्रमाण खंडन केले.

शशिभूषण स्मृतितीर्थ :

त्रिंशदब्दः षोडशाब्दां भार्यां विन्देत नग्निकां।
अतोऽ प्रवृत्ते रजसि कन्यां दद्यात्पिता सकृत्॥

'रजःप्रवृत्ती होण्याच्या अगोदर १६ वर्षांची कन्या वरावी. पित्याने तिचे दान करावे. ऋतुप्राप्तीनंतर पित्यास पाप लागते,' असे महाभारतात म्हटले आहे.

क्षेत्रज्ञा पंच दशभिः षोडशे चाम्बिका स्मृता।
एवं कमेण संपूज्या यावत्पुष्पं न जायते॥

'१५ वर्षांच्या कन्येस क्षेत्रज्ञा व १६ व्या वर्षाच्या कन्येस अम्बिका म्हणतात. या कन्या

पवित्र होत; जोपर्यंत त्यांना ऋतू प्राप्त होत नाही तोपर्यंतच,' इत्यादी वचनांनी ऋतुप्राप्ती १६ वर्षांपर्यंतदेखील होत नाही, असे सिध्द होते. प्रायश्चित्त अंतःपुष्पवती कन्येस कोठेही सांगितले नाही. एका ऋतूस एक गोदान असे प्रायश्चित्त आश्वलायनांनी सांगितले आहे, ते अंतःपुष्पवती कन्येस जुळत नाही. आपस्तंबाने व अत्रीने विवाहात कन्या ऋतुमती झाल्यास प्रायश्चित्त सांगितले आहे. मनूने रजोदर्शन झाल्यानंतर ३ वर्षेपर्यंत कन्येस पित्याची वाट पाहावयास सांगितले आहे. तसेच

पितृवेश्मनि या कन्या रज: पश्यत्यसंस्कृता।
सा कन्या वृषली ज्ञेया हरंस्तां नैव दुष्यति॥

'पितृगृही ज्या कन्येस रजोदर्शन होते ती वृषली होय. तिच्याशी विवाह करणाराला दोष लागत नाही, असे म्हटले आहे.

राजेश्वरांनी दाखविलेल्या मार्कंडेय वाक्यात सांगितलेला कन्यात्याग व निंदा इतर बहुत वचनांशी विरुद्ध असल्यामुळे तो निंदार्थवाद होय. त्याच्या योगाने प्रायश्चित्ताच्या विधानाची स्तुती व प्रायश्चित्त न करण्याची निंदा व्यक्त केली आहे. महापातके, अतिपातके व अनुपातके घडल्यासच परित्याग धर्मशास्त्रदृष्ट्या योग्य होय. विवाहपूर्व रजोदर्शन उपपातक आहे, म्हणून वरील मार्कंडेय व बृहस्पती यांची वाक्ये अर्थवादरूप असल्यामुळे बाधक नाहीत व जरी बाधक मानली तरी ती प्रायश्चित्त न केल्यास मानावी; कारण, त्या वाक्यांत 'प्रायश्चित्त केले तरी त्याग करावा' असे म्हटले नाही; तर नुसता 'त्याग करावा' असे म्हटले आहे. इतर वाक्यांच्या अनुसाराने 'प्रायश्चित्त न केल्यास' अशी पुस्ती वरील वाक्यास जोडावी.

प्रियनाथ सांख्यतीर्थ व राजेश्वरशास्त्री :

साक्षात् रजोदर्शन होईपर्यंत जरी प्रायश्चित्त मानिले नाही तरीदेखील रजोदर्शनानंतर पित्याच्या अपराधाने किंवा इतर पालकांच्या अपराधाने अथवा योग्य वर न मिळाल्यामुळे विवाह राहिला असल्यास प्रायश्चित्तपर वाक्यांची उपपत्ती लागते व जेव्हा कन्या स्वेच्छेने अविवाहित राहते, तेव्हा प्रायश्चित्त न करताच वरील मार्कंडेय वाक्याप्रमाणे तिचा त्याग करावा. अशा रीतीने सर्व वाक्यांची उपपत्ती लागते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री :

त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कन्या ऋतुमति सती।

ऋतुमती झालेल्या कन्येने पित्याची ३ वर्षे वाट पाहावी, या मनुवाक्यानुसाराने कन्येच्या स्वेच्छेस ऋतुप्राप्ती झाल्यानंतर ३ वर्षांपर्यंत स्वतंत्र किंमतच नाही. कायद्याच्या भाषेत ती तोपर्यंत अज्ञान असते. म्हणून 'स्वेच्छेने अविवाहित राहिल्यास' ह्याला सार्थक्य राहात नाही. कारण, तोपर्यंत कायदेशीर दृष्टीने कन्या पित्याच्या अधीनच आहे.

श्री. राजेश्वरशास्त्री : तीन वर्षांनंतर पुढील कालाला आमचे वाक्य लागू पडेल.

श्रीलक्ष्मणशास्त्री : 'कामतो द्विगुणं भवेत्' स्वेच्छापूर्वक पातक झाल्यास दुप्पट प्रायश्चित्त

द्यावे,' या प्रायश्चित्त प्रकरणातील अंगिरस स्मृतीतील वाक्याप्रमाणे कन्या स्वेच्छेने अविवाहित राहिल्यास तिला दुप्पट प्रायश्चित्ताची प्राप्ती आहे; तिचा त्याग करणे उचित नाही. म्हणून अकृत प्रायश्चित्त कन्येच्या त्यागाबद्दलचे हे वाक्य आहे असे मानावे.

राजेश्वरशास्त्री :

चतस्रस्तु परित्याज्यः शिष्यगा गुरुगा च या।
पतिघ्नीच विशेषेण जुंगितांपगता च या॥

व्यासः।

'शिष्य, गुरू व अंत्यज यांच्याशी गमन करणाऱ्या व परिपात करणाऱ्या अशा ४ प्रकारच्या स्त्रिया त्याज्य होत. या वाक्यात ज्याप्रमाणे प्रायश्चित्त देऊनही वरील स्त्रिया शुद्ध न होता त्याज्य ठरतात; त्याप्रमाणे उक्त मार्कंडेय वाक्याच्या बाबतीत समजावे. कारण, ज्या त्या ठिकाणी प्रायश्चित्त न सांगता त्यात असे सांगितलेले असते, त्या त्या ठिकाणी प्रायश्चित्त देऊनही उपयोग होणार नाही असा नियम 'चतसस्तू' या वरील वाक्यावरून निघतो. या विषयावरील काही प्रतिवादी इरेस पडल्यामुळे व राजेश्वरशास्त्री अगदी ओढाताण करून 'आपलाच अर्थ खरा' असे म्हणू लागल्यामुळे विषय मध्यस्थांकडे सोपविला.

या पुढे 'पुरुषांचा विवाह वयोमर्यादा' या विषयावर चर्चा सुरू झाली.

लक्ष्मणशास्त्री द्रवीड म्हणाले, 'उपनयन झाल्यानंतर अध्यापनाचे विधान केले आहे. त्याची मर्यादा ५, ९ किंवा १२ इतकी वर्षे सांगितली आहे. त्यानंतर अथवा वेदाध्ययन संपल्यानंतर विवाह करावा, असे स्मृतीत सांगितले आहे. गृह्यसूत्रात ४८ वर्षे ब्रह्मचर्य व्रत धारण करण्यास सांगितले आहे. त्यानंतर म्हणजे ५६ व्या वर्षी विवाहालाच मुख्य काळ प्राप्त होतो. प्रजोत्पादनसामर्थ्य आहे तोपर्यंत पुरुषाची विवाहयोग्यता नाहीशी होत नाही. एकंदर विचार करिता शास्त्रदृष्ट्या पुरुषांच्या विवाहास वेदाध्ययन झाल्यानंतर अथवा उपनयन झाल्यानंतर मर्यादा घालता येत नाही.

महामहोपाध्याय तानसुब्बारावद्व शास्त्री :

पञ्चाछद्दत्सरादूर्ध्यं न कुर्यात्साछिपांडनम्।
कलेहि दोषमूषत्त्वाबद्लायबुष्ट्याच सर्वशः।।

''पन्नास वर्षांच्या पुढे कलियुगात पाणिग्रहण करू नये. कारण कलीमध्ये दोष फार व आयुष्य कमी असते, या वाक्याच्या दृष्टीने ब्रह्मसुत्रादिकांच्या द्वारे प्राप्त होणारा काल कधीतर युगात ग्राह्य मानावा, म्हणजे सर्व वाक्यांची उपपत्ती लागते.

काही बंगाली पंडितांनी १६ ते २४ हा काळ पुरुष विवाहास मुख्य म्हणून सांगितला.

त्यानंतर पोटजातींच्या विवाहासंबंधाने वादास सुरुवात झाली; पण वेळ थोडा राहिल्यामुळे चर्चेस फारसे तोंड न लागताच पुढील दिवसावर चर्चा ढकलली.

दिवस ४ था

त्या दिवशी प्रारंभी राजेश्वरशास्त्री यांनी ब्राह्मण पोटजातींमध्ये विवाहसंबंध अशास्त्रीय होय,

असा पक्ष मांडला. सामान्यतः अनंत कृष्णशास्त्री, लक्ष्मणशास्त्री द्रवीड, शिरोळकर शंकराचार्य इत्यादिकांच्या मताने उरलेला सिद्धांत सभेत राजेश्वरशास्त्री स्वतः मांडत असत. स्वतः मांडत असे म्हणण्यापेक्षा प्रश्नोत्तरावलींचे जे भाग छापिले होते, त्यातील काही भाग आमचा सिद्धांतपक्ष, असे म्हणून वाचून दाखवीत असत.

राजेश्वरशास्त्री :

भ्रातृणामेकजातान, मेकश्चेत्पुत्रवान्भवेत।

या मनुवचनावर विवरण केल्यानंतर दत्तकदीधिति, दत्तकतिलक, दत्तक सिद्धांतमंजरी इत्यादी निबंधग्रंथांत पंचद्रविड व पंचगौड हे जे ब्राह्मणाचे प्रकार त्यातील कोणत्याही एका श्रेणीने दुसऱ्या श्रेणीत आपला दत्तक देऊ नये असे मांडले असल्यामुळे त्यावरून ब्राह्मणांच्या अवांतर श्रेणीस दत्तकविधानाप्रमाणे परस्पर विवाहसंबंधही होऊ नये, असे अनुमान करता येते. सह्याद्री खंडातदेखील पंचद्रविड व पंचगौड असे ब्राह्मणांचे विभाग सांगून विवाहसंबंध योग्य जाती कोणत्या याचा विचार केला आहे. स्कंदपुराणांतर्गत नागरखंडांत असे सांगितले आहे,

चतुर्वेदा अपि त्याज्या अन्यस्थानसमुद्भवाः।
दैवे कर्मणि पित्र्ये च कन्यादाने विशेषतः।।

'दुसऱ्यास्थानी उत्पन्न झालेले असे ब्राह्मण चतुर्वेद पारंगत जरी असले तरी देवपितृकार्यात व विशेषतः कन्यादानप्रसंगी त्याज्य होत' अशा रीतीने स्थानभेदाने अवांतर श्रेणींचे परिपालन करणे योग्य आहे, असे म्हणता येते.

अध्वर्युन्दातृहोतृणां सन्ति सूत्राण्यनेकशः।
यास्तास्ते योनिसंबन्धः सूत्रज्ञातिकुलोचितः॥
विवाहे सोमश्राद्धेच अग्न्याधाने विशेषतः ।
एतैः सजातिभिः कुर्यादन्यथा पतितोभवेत् ॥

'यजुर्वेदी, सामवेदी व ऋग्वेदी याची अनेक सूत्रे आहेत. ह्या अनेक सूत्रांपैकी ज्या सूत्रात सूत्र ज्ञाति व कुल ह्यांना उचित असा योनिसंबंध घडत असेल, त्या सूत्राच्या सजातीयांशी विवाह, सोमयाग व विशेषतः अग्न्याधान ही कर्मे करावीत; नाहीतर पतित होतो.' असे बौधायनधर्मरहस्यांत म्हटले आहे. वरील वाक्यावरून स्वजाती शब्दाचा पोटजाती असा अर्थ होतो.

कन्यादाने तथा श्राद्धे कुलीनो ब्राह्मणः सदा।

'कन्यादान व श्राद्ध यामध्ये कुलीन ब्राह्मण हवा' ह्या वचनांत व कुमारिलभट्टांनी तंत्रवार्तिकांत वंशवृक्षांदिकांची जतन कुलीनत्वरक्षणार्थ करावी असे म्हटले आहे.

अन्येऽपि नागराः सन्ति वेदवेदांगपारगाः।
श्राद्धार्हा यज्ञयोग्याश्च कन्यायोग्या विशेषतः॥
प्रधानत्वेन सर्वेषां नागरैश्चापि कृत्स्नशः।
तेन ते गौरवं प्राप्ताः स्थानेऽत्रैव विशेषतः।

तस्माच्छ्राद्धं प्रकर्तव्यं विप्रैश्चाष्टकुलोद्भवैः।
अप्राप्तौ चैव तेषांतु कार्य नागरसंभवैः।

वेदवेदांगपारंगत, श्राध्दयोग्य, यज्ञयोग्य व कन्यायोग्य असेही नागर आहेत. म्हणून श्राद्ध अष्ठकुलोद्भव नागराशी करावे; ते जर मिळाले नाही तर इतर नागराबरोबर करावे.

एवं ज्ञात्वा प्रयत्नेन श्राद्धे यज्ञे च पार्थिव।
कन्यादाने विशेषेण योज्याश्चाष्टकुलोद्भवाः ॥

'श्राद्ध, यज्ञ व कन्यादान यांत विशेषतः अष्टकुलोद्भव नागराचा उपयोग करावा.' हे वाक्य अवांतर पोटजातींच्या परस्पर विवाहास प्रतिकूल आहे. 'स्मृतिसारसमुच्चय' नावाच्या ग्रंथात भिन्न भिन्न पोटजातींचा परस्पर विवाह झाल्यास दाक्षिणात्यांनी गंगास्नान किंवा रामेश्वरतीर्थ याचा अथवा समाजदंडरूप प्रायश्चित्ताचे आचरण करावे असे सांगितले आहे. म्हणून बहुत कालापासून चालत आलेला पोटजातीचा विवाह निर्बंध अवश्य परिपालनीय आहे. गत्यंतरच नसेल, तर निराळ्या जातीत विवाह करण्यास हरकत नाही; पण ती गोष्ट त्या त्या जातीच्या विचारावर अवलंबून आहे.

स्वशाखीचेद्वरो न स्यात्कस्मै देया तु कन्यका।
स्वगृह्योक्तविधानेन दद्यात्तां परशाखिने।।

'स्वशाखीय वर नसेल तर कोणाला कन्या द्यावी? स्वत:च्या गृह्यसूत्रात सांगितलेला विधी करून परशाखीय वराला द्यावी.' या वाक्यात स्वतःच्या शाखेत वर म्हणजे विवाहयोग्य पुरुषच जर नसेल, तर परशाखेचा वर करावा; पण असे असणे शक्यतर नाही म्हणून पोटजातीमध्ये परस्पर विवाह होणे योग्य नाही.

हरणचन्द्रभट्टाचार्य व विन्ध्येश्वरीप्रसादशास्त्री :

राजेश्वरशास्त्री यांनी सांगितलेल्या निबंधकारांनी जर पोटजातींचा विवाह का होऊ नये, याला श्रुतिस्मृती पुराणांतर्गत वाक्य आधारभूत म्हणून दिलेले नाही, तर बौधायनीय धर्मरहस्याच्या वाक्यातील स्वजातीय शब्दाचा अवांतर पोटजाती असा अर्थ करण्यास प्रमाण काय? दुसरे असे की, अवांतर पोटजाती ह्या खऱ्या शास्त्रशुद्ध जातीच नव्हेत, त्या कल्पित होत.

सारस्वताः कान्यकुब्जा गौडा मैथिलकोत्कलः।
पंचगौडा इतिख्याता विन्ध्यस्योत्तरवासिनः॥

ह्या श्लोकात सांगितलेली नावे व्युप्त दिली असता त्यातून निराळाच अर्थ निघतो. सारस्वत हा ज्यांच्या पूर्वजांनी सरस्वती नदीच्या तीरावर वस्ती केली होती असे ब्राह्मण. कान्यकुब्जदेशात ज्यांनी निवास केला होता ते कान्यकुब्ज. मिथिला देशात राहणारे ते मैथिल, उत्कल प्रदेशात राहणारे ते उत्कल असे सरळ दिसत असता हे पोटविभाग जाती नव्हेत असे सिद्ध होते. शाखाविभाग निराळे व पोटजातीचे विभाग निराळे. राजेश्वरशास्त्रींनी शाखा व पोटविभाग यांचा घोटाळा केला आहे. ज्या ब्राह्मणांतील अवांतर श्रेणीमध्ये शास्त्राविरुद्ध परस्पर विषम असे

आचार रूढ नसतील, त्यांच्यात व ज्यांचे परस्पर आचार समान असतील, अशा जातीतील विवाहास कोणतेही शास्त्रवचन विरुद्ध नाही.

वाईचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री :

सारस्वत, कान्यकुब्ज अथवा देशस्थ, कोकणस्थ इत्यादी जातिविभाग कल्पित असे हरणचन्द्रभट्टाचार्यांच्या म्हणण्याप्रमाणे म्हणण्याचे कारण नाही. हे जातिविभाग नसून उपाधिक विभाग आहेत. न्यायशास्त्रात जाती आणि उपाधी असे दोन तऱ्हेचे वस्तूचे धर्म सांगितले आहेत. घटत्व, वृक्षत्व, मनुष्यत्व, ब्राह्मणत्व इत्यादी जाती होत आणि काशीनिवासित्व, पाटलीपुत्रनिवासित्व, दण्डित्वउत्तरादी दिवस्यत्व इत्यादी उपाधी होत; तसेच सारस्वतस्थ कोकणस्थाकादी औपाधिक विभाग आहेत. जातिरूप नव्हेत म्हणून यांच्या विभागास प्रत्यवाव नाही. अकोला ब्राह्मण परिषदेतील पोटजातीच्या विवाहाचा ठराव पंचद्रविडांतर्गत केवळ महाराष्ट्र ब्राह्मणांच्या अवांतर विवाहापुरता होता. अकोला ब्राह्मण परिषदेला सह्याद्रीखंडाचे प्रामाण्य मान्य नाही. कारण, ते जातिमत्सराने कोणीतरी सामान्य मनुष्याने लिहिलेले आहे.

असे लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे भाषण सुरू असता अनंत कृष्णशास्त्री यांनी सभानियामक श्रीपंचाननतर्क रत्नभट्टाचार्य यांचेपाशी 'लक्ष्मणशास्त्री यांच्या भाषणास बंदी करा' अशी विनंती केली. कारण, लक्ष्मणशास्त्री यास सह्याद्री खंड हे प्रमाण नाही. सभेच्या नियमावलीत तर पुराण व निबंधग्रंथ ह्यांचे पूर्ण प्रामाण्य स्वीकारून वाद करावा, असा नियम आहे. सह्याद्री खंड हे स्कन्दपुराणांतर्गत आहे. म्हणून ते पुराणांना अप्रमाण म्हणतात असे सिद्ध होते. अनंत कृष्णशास्त्री यांच्या म्हणण्याप्रमाणे सभानियामकांनी लक्ष्मणशास्त्री यांस भाषण बंद करण्यास सांगितले.

लक्ष्मणशास्त्री : सह्याद्री खंडांतर्गत काही भाग प्रक्षिप्त आहे म्हणून तो भाग अप्रमाण असे माझे म्हणणे आहे, त्यामुळे नियमावलीचा भंग होऊ शकत नाही.

पण नियामकांनी यापुढे लक्ष्मणशास्त्री यांना भाषण करू दिले नाही.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्या भाषणास आरंभ होण्याच्या अगोदर मध्येच नागपूरचे श्री. दप्तरी यांनी मनुची नियमावली चुकीची आहे, असे दाखवून कूर्तकोटी शंकराचार्यांचे आम्ही सर्व प्रतिनिधी निषेधपूर्वक या सभेतून निघून जातो, अशा अर्थाचे पत्रक वाचून दाखविले, त्यामुळे सभेत बराच क्षोभ झाला होता. अनंत कृष्णशास्त्री यांनी दप्तरींना उत्तर दिले की, तुम्ही पहिल्या दिवशी येऊन विरोध का केला नाही? त्यावर लक्ष्मणशास्त्री यांनी उत्तर दिले की, मी स्वत: पहिल्याच दिवशी नियमावलीस विरोध केला होता; पण नियामक समितीने केलेली नियमावली विचारसभेच्या प्रतिनिधींना बदलण्याचा अधिकार नाही, असे तुम्ही मला उत्तर दिले. अशा स्थितीत जरी दप्तरी पहिल्या दिवशी आले असते, तरी काय विशेष घडणार होते?

वरील तऱ्हेची चकमक झाल्यामुळे सभेचे मुख्य नियामक पंचाननतर्करत्नभट्टाचार्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांस 'प्रच्छन्न सुधारक' असे सभेत दूषण दिले.

नंतर **पंडित काशिनाथ कर्मकांडी** यांनी 'पोटजातीमध्ये विवाह होण्यास, कोणतेही

शास्त्रवचन प्रतिकूल नसल्यामुळे, हरकत नाही' असे प्रतिपादिले, बराच वादविवाद झाल्यानंतर श्री. अनंतकृष्णशास्त्री यांनी मध्यस्थांकडे सर्वसंमत असा या विषयावरील सिद्धांत अशा रीतीने मांडला की, ज्या पोटजातींमध्ये समानाचार असतील व शास्त्रविरुद्ध अनाचार नसतील त्यांच्यात विवाहाचा निषेध मानण्याचे कारण नाही. असे मांडल्याबरोबर दिवेकरशास्त्री व लक्ष्मणशास्त्री यांनी 'आम्हांसही हा सिद्धांत पूर्ण मान्य आहे' असे म्हटले. त्याबरोबर द्रविडशास्त्री, अनंतकृष्णशास्त्री वगैरे मंडळींनी पगडी फिरविली व वरील ठरावाच्या भाषेत त्यांनी पुढील वाक्य घुसडले, 'त्या जातीत विवाहयोग्य पुरुषच जर नसेल तर,' असे शब्द घालून साऱ्या ठरावाची त्यांनी घाण केली. विजयानगरचे संस्कृत कॉलेजचे प्रिन्सिपाल तात सुब्बाराय शास्त्री महामहोपाध्याय यांनी आंध्र देशांतील अनेक पोटजातींच्या परस्पर विवाहांचे दाखले दिले व पोटजातींचे भाग शास्त्रमान्य नाहीत असे प्रतिपादिले.

पोटजातींच्या विवाहाचा विषय संपल्यानंतर भागवत धर्माच्या दीक्षेस अधिकारी कोण व त्या दीक्षेने जात बदलते की नाही? या विषयावर विचारास सुरुवात झाली.

अनंतकृष्णशास्त्री म्हणाले **:**

स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्ते ऽपि यांति परांगतिं।

"स्त्रिया, वैश्य व शूद्र हेसुद्धा भगवद्भक्तीने तरतात," इत्यादी वचनांनी भगवद्भक्तीचा अधिकार प्रत्येकाला आहे हे स्पष्ट आहे. ॐकारपूर्वक नारायणमंत्र, शिवमंत्र इत्यादिकांच्या जपाचा शूद्रादिकांनादेखील अधिकार आहे. कारण, पुराणपठनाचा अधिकार शूद्रांस आहे, असे पुराणामध्ये अनेक ठिकाणी सांगितले आहे. किंबहुना पुराणे विशेषतः स्त्रीशूद्रादिकांकरितांच झालेली आहेत.

'पठंश्च शुद्रो ऽ पि महत्वमीयात्'

'शूद्र देखील पठनाने महत्त्वाला प्राप्त होतो,' असे अनेक ठिकाणी पुराणांत म्हटले आहे.

स्त्री शुद्ध द्विजद्विजबंधूनां त्रयी न श्रुति गोचरा।
कर्मश्रेयसि मूढानां कथं श्रेयो भवेदिति॥
इति भारतमाख्यानं कृपया मुनिना कृतम्॥

'वेदश्रवणाचा अधिकार स्त्रिया, शूद्र व पतित यांस नाही. सत्कर्माचा निर्णय करण्यास अपात्र असलेल्या या लोकांचे कल्याण व्हावे म्हणून व्यासांनी महाभारत लिहिले.' यावरून शूद्रांना पुराणश्रवण व पठण यांचा अधिकार असल्यामुळे पुराणांतर्गत व महाभारतांतर्गत ओंकाराच्या उच्चाराचादेखील अधिकार अर्थात आहे.

उदाहरणार्थ : 'भगवद्गीतेत 'ॐ तत्सदिति निर्देशः'

असे आले आहे. 'सर्वप्रहरणायुध ॐ नम इति' असे विष्णुसहस्रनामाच्या शेवटी आले आहे, 'ॐ नमो नारायणाय' हा अष्टाक्षर मंत्र व 'ॐ नमो वासुदेवाय' हा द्वादशाक्षर मंत्र आहे. ह्यांतून

ओंकार काढून टाकल्यास अष्टाक्षरे किंवा द्वादशाक्षरे राहात नाहीत, या मंत्रांचा अधिकार स्त्री शूद्रादिकांना विष्णुधर्मोत्तर पुराणांत सांगितला आहे.

एकप्रोक्तं द्विजातीनां स्त्री शुद्रेषु च यच्छृणु।
द्वादशाष्टाक्षरौ मंत्रौ तेपां प्रोक्तौ महात्मनां॥
हितौ तौ च द्विजातीनां मंत्रश्रेष्ठौ नराधिप।

"द्विजातींना हे सांगितले, स्त्री शूद्रांना जे सांगितले आहे ते ऐक. द्वादशाक्षर व अष्टाक्षर मंत्र त्यांच्याकरिता आहेत. द्विजांनादेखील हे श्रेष्ठ मंत्र हितप्रद आहेत." शिवपंचाक्षर मंत्रदेखील ओंकारसहितच शूद्रादिकांनी म्हणावा. जरी शिव पंचाक्षराला ॐकार जोडल्यास तो षडक्षर होत असला तरी 'पंचाक्षर' अशी त्यास पारिभाषिक संज्ञा आहे. ब्रह्मोत्तरपुराणांत या बाबतीत आधार आहे.

महापातकदावाग्निः सो ऽ यं मंत्रः षडक्षरः।
तस्मात्सर्वप्रदो मंत्रः सो ऽ यं पंचाक्षरः स्मृतः॥

"हा षडक्षर मंत्र महापातकांचा दावाग्नी आहे; म्हणून सर्व इष्ट फल देणाऱ्या या मंत्रास पंचाक्षर असेही म्हणतात."

स्त्रीभिः शूद्रैश्च संण्कीर्णैर्धार्यते मुक्तिकांक्षिभिः।

"मुक्तीची आकांक्षा करणाऱ्या स्त्रिया, शूद्र व संकर जाती हा मंत्र स्वीकारतात. या वाक्यानुसाराने या षडक्षर शिवमंत्राचा सर्वांना अधिकार आहे असे सिद्ध होते. स्त्री शूद्रांना ॐकाराचा अधिकार नाही यास खालील श्रुती आधार आहे.

सावित्री प्रणवं यजुर्लक्ष्मी स्त्रीशूद्राय नेच्छन्ति।
नृसिंहतापनीयोपनिषद्।

"गायत्री मंत्र, ॐकार, यजुर्वेद, लक्ष्मीसूक्त ह्यांचा स्त्री शूद्रांना अधिकार नाही, असा शास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे." पण श्रुतीत वैदिक ॐकाराचा निषेध आहे. पौराण ॐकाराचा निषेध नाही, असा समन्वय केला पाहिजे. नाहीतर इतर शेकडो पुराणवाक्ये अनुदार होतील.

यावर **श्री. राजेश्वरशास्त्री** म्हणाले :

स्वाहाकारनमस्कारौ मन्त्रौ शूद्रे विधीयते।

''स्वाहा व नमः हे मंत्र शूद्राकरिता आहेत, ॐकार नव्हे,'' असे अनुशासनपर्वात म्हटले आहे. षडक्षर व पंचाक्षर एक नव्हेत.

षडक्षरेण वा देवि तथा पंचाक्षरेण वा।

"षडक्षर किंवा पंचाक्षर मंत्राने मनुष्यला सिद्ध प्राप्त होते" इत्यादी वाक्यांत षडक्षर व पंचाक्षर असे दोन प्रकार सांगितले आहेत. वैदिक प्रणव व पौराणिक प्रणव असे दोन प्रकारचे प्रणव मानण्यास प्रमाण नाही. कारण ॐकार हाच प्रणव होय. श्रुतीशी विरुध्द असलेल्या पुराणवाक्याला प्रामाण्य येत नाही. म्हणून द्वादशाक्षर किंवा अष्टाक्षर मंत्र ॐकारावाचून द्यावेत!

शूद्राचारशिरोमणीत शूद्रांना व स्त्रियांना संस्कृत भाषा उच्चारण्याचादेखील अधिकार नाही, अशा अर्थाची प्रमाणे उध्दृत केली आहेत.

स्वाहाप्रणवसंयुक्तं शूद्रे मंत्रं ददद् द्विजः।
शूद्रो निरयमाप्नोति ब्राह्मणोयात्यधोगतिम्॥

"स्वाहा किंवा प्रणव यांनी युक्त असा मंत्र शूद्राला देणारा व्दिज अधोगतीस जातो व शूद्र नरकास जातो." असे अनेक ठिकाणी म्हटले आहे. अष्टाक्षरी व द्वादशाक्षरी मंत्रास अष्टाक्षरत्व व द्वादशाक्षरत्व द्विजाच्या दृष्टीने सांगितले आहे; शूद्रांच्या दृष्टीने नव्हे. शूद्रांच्या दृष्टीने सप्ताक्षरत्व व एकादशाक्षरत्वच आहे. ॐकाररहितच जपण्यात शूद्रांचे हित आहे. अंत्यजांना प्राकृत मंत्राचाच अधिकार आहे. नारद पाचरात्रांत असे म्हटले आहे :

भाषाख्या लौकिका मन्त्राः प्रपत्यर्थविभावनाः।
सर्वेभ्यः प्रतिलोमेभ्यो देयाः कामं द्विजातिभिः॥

"प्राकृत भाषेतील भक्ती उत्पन्न करणारे लौकिक मंत्र प्रतिलोमसंरजन्य अन्त्यजादिकांना ब्राह्मणांनी खुशाल द्यावे" यावरून अंत्यजांना संस्कृत मंत्राचा अधिकार नाही असे सिध्द होते.

यापुढे उशीर झाल्यामुळे या विषयावरील वाद अपूर्ण राहिला.

दिवस ५ वा

या दिवशी श्री. श्रीधरशास्त्री पाठक हे काशी येथे संमेलनाकरिता आले; पण विचारसभेची नियमावली लोकविरहित व शास्त्रविरुद्ध असल्यामुळे शास्त्रीबुवांस सभेला हजर राहू नये असे वाटले. त्यांनी संमेलनाच्या चालकांकडे नियमावली अमान्य असल्यामुळे सभेस हजर राहता येत नाही, अशा अर्थाचे पत्रक पाठविले. श्री अनंतकृष्णशास्त्री यांनी हे पत्र वादास सुरुवात होण्यापूर्वी सभेत वाचून दाखविले. धर्माचार्यांचा मान राखण्याकरिता आम्ही सभेच्या निर्णयाचे काम धर्माचार्यांकडे सोपविले आहे, असे त्यांनी पत्र वाचून दाखविल्यानंतर सांगितले.

मंत्रदीक्षेच्या अधिकाराबद्दल पुनः सरासरी १॥ तास वाद झाला. रामानुजांच्या मठाचे पं. श्रीराम प्रपन्नाचार्य यांनी ॐकारपूर्वक मंत्रदीक्षा शूद्रादिकांना देण्यास प्रत्यवाय नाही, असा पक्ष स्वीकारला होता. हा वाद संपल्यानंतर यवनादी जाती जन्मसिद्ध आहेत की कर्मसिद्ध आहेत, ह्याविषयी विचारास सुरुवात झाली. श्री. राजेश्वरशास्त्री यांनी सांगितले की, म्लेंच्छत्व जाती जन्मसिद्ध आहे, ती जाती अंत्यजापेक्षा उच्च आहे. कारण, ती जाती अनुलोमसंकर आहे.

क्षत्रवीर्येण शूद्रायामृतुदोषेण पापतः।
बलवन्तो दुरन्ताश्च बभूवुर्म्लेच्छ जातयः।
ब्रह्मवैवर्तः।

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : हिंदुस्थानात सध्या असलेल्या म्लेंच्छामध्ये चारही वर्णांचे स्त्री-पुरुष समाविष्ट झाले आहेत. अंत्यजांचादेखील त्यामध्ये समावेश झाला आहे. त्यांच्यांत अनुलोम व प्रतिलोम अशा दोन्ही तऱ्हेचा संकर शेकडो वर्षांपासून होत आहे. प्रतिलोम-संकरजन्य

पुरुषापासून अनुलोमसंस्करजन्य किंवा उच्चजातीय स्त्रीच्या ठिकाणी जी संतती उत्पन्न होते,ती अंत्यजांनाही अस्पृश्य आहे, असे मनुस्मृतीत म्हटले आहे.

ते चापि बाह्यान्सुबइंजनयन्ति विगर्हितान्।
परस्परस्य दारेषु ततोऽप्याधिक दूषितान्।।

''संकरजन्य पुरुष परस्परांच्या स्त्रीच्या ठिकाणी स्वतःपेक्षा नीच व अस्पृश्य अशी संतती उत्पन्न करतात.''

राजेश्वरशास्त्री : अमुक एक म्लेंच्छ व्यक्ती अमुक तऱ्हेचा संकर आहे, हे जोपर्यंत निश्चित होत नाही, तोपर्यंत तो शुद्ध यवन आहे असे समजावे. कारण, संकरजन्य आहे असे ठरविण्यास प्रत्यक्ष पुरावा पाहिजे.

विंध्येश्वरी प्रसादशास्त्री : म्लेंच्छ जाती कर्मसिद्ध आहे, जन्मतः नाही. कारण, मनुस्मृतीमध्ये शक, हूण, चीन, यवन इत्यादी म्लेंच्छ जाती मूळच्या क्षत्रीय असून, ब्राह्मणांचा सहवास न राहिल्यामुळे व कर्मभ्रष्टतेमुळे या सर्व जाती 'वृषल' झाल्या, असे म्हटले आहे. वृषल म्हणजे म्लेंच्छ.

राजेश्वरशास्त्री : वृषल म्हणजे म्लेंच्छ नव्हे तर शूद्र, असा अर्थ करावा.

हरणचंद्रभट्टाचार्य : बौधायनाने म्लेंच्छाचे लक्षण पुढीलप्रमाणे सांगितले आहे व त्यावरून जाती ओळखावी.

गोमांसखादको यस्तु विरुद्धं बहुभाषते।
सर्वाचारविहीनश्च म्लेंच्छ इत्यभिधीयते।।

''जो गोमांसभक्ष्यक असून शास्त्राविरुद्ध बडबड करतो आणि शास्त्रशुद्ध अशा सर्व आचारांनी विहिन असतो, तो म्लेंच्छ होय.'' ह्या विषयाची बरीच चर्चा झाल्यानंतर देवलस्मृतीचे प्रामाण्य शूलपाणी या निबंधकाराने सांगितलेल्या व्यवस्थेप्रमाणे मानावयाचे की नाही, या विषयावर चर्चा सुरू झाली. अनंतकृष्णशास्त्री यांनी सांगितले की, आनंदाश्रमात छापिलेल्या देवलस्मृतींत ९० श्लोक आहेत. निबंधग्रंथातून देवलांच्या नावाने शेकडो वचने आलेली आहेत. छापिलेल्या देवस्मृतीतील ७ वचने शूलपाणी या निबंधकाराने व त्यांचे शिष्य रघुनन्दनभट्टाचार्य यांनी आपल्या प्रायश्चित्तविवेक व प्रायश्चित्ततत्त्व या निबंधांत उद्धृत केली आहेत, तर या ९० श्लोकांच्या स्मृतींचे प्रामाण्य व अर्थनिर्णय शूलपाणीप्रमाणे करावा किंवा नाही? यावर पंडितांनी चर्चा करावी.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : सर्व निबंधकारांचे व स्मृतींचे प्रामाण्य पूर्ण स्वीकारून चर्चा करावयाची असा नियम नियमावलीत आहे, त्याचा ह्या चर्चेने भंग होत नाही काय? सह्याद्री खंडातील काही भाग अप्रमाण आहे, असे मी म्हटले म्हणून आपण मला बोलू दिले नाही. अशा स्थितीत आपणांसही या विषयावर चर्चा करता येणार नाही.

अनंत कृष्णशास्त्री : मुद्रित देवलस्मृती प्रमाण मानून त्याचा अर्थ कसा लावावा, याबद्दलच चर्चा करावी, असा वरील म्हणण्याचा आशय आहे.

राजेश्वरशास्त्री : मुद्रित देवलस्मृतीतील शूलपाणीने उद्धृत केलेल्या ७ श्लोकांत पुढील आशय आला आहे. म्लेंच्छांनी बलात्कार केल्यामुळे अभक्ष्यभक्षण, अपेयपान, अगम्यागमन ज्यांच्या हातून घडले, ज्या ब्राह्मणांनी एक वर्षपर्यंत बलात्कारामुळे किंवा बंदीवासामुळे म्लेंच्छांशी सहभोजनादिरूप संसर्ग केला, त्यांना एक चांद्रायण प्रायश्चित्त द्यावे. क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांना कमी प्रायश्चित्त द्यावे. २ किंवा ३ वर्षे संसर्ग घडल्यास तारतम्य विचार करून प्रायश्चित्त द्यावे. त्यापुढे असे म्हटले आहे :

संवत्सरैश्चतुर्भिश्च तद्भावं सोऽ धि गच्छति।
ऱ्हासो न विद्यते तस्य प्रायश्चित्तैर्दुरात्मन:।।

''चार वर्षांनी म्लेंच्छांशी तद्रूपता प्राप्त होते, त्या दुरात्म्याच्या पापाचा प्रायश्चित्तांनी नाश होत नाही.'' या वाक्यानुसाराने ४ वर्षांपेक्षा अधिक संसर्ग घडल्यास प्रायश्चित्ताने शुद्धी होत नाही. त्यास मरणांत प्रायश्चित्तच द्यावे लागते, असे म्हणावे लागते. शूलपाणीने असाच अर्थ केला आहे. प्रायश्चित्तमयूख आपस्तंबाच्या नावाने हीच वाक्ये उद्धृत केली आहेत; पण त्यात ३ वर्षांची मर्यादा सांगितली आहे. म्लेंच्छाशी संग करून ज्या स्त्रीस गर्भ राहिला त्या स्त्रीचीही गर्भत्यागपूर्वक शुद्धी होते, असे देवलस्मृतीतील काही वाक्यांत सांगितले आहे; पण मनुस्मृतीत गर्भ राहिल्यास स्त्रीची शुद्धी होत नाही असे म्हटले आहे. म्हणून देवलस्मृतीतील वरील विधान कलियुगास लागू नाही, असे म्हणावे लागते. कारण, कलिवर्ज प्रकरणात बलात्काराने दूषित झालेल्या स्त्रीचा संग्रह करू नये असे म्हटले आहे. ब्राह्मणादिक चातुर्वर्ण्यातील लोकांचा म्लेंच्छ स्त्रीशी संग झाल्यास प्रायश्चित्त देवलाने सांगितले आहे, तेही कलियुगास लागू नाही. कारण, कलिवर्ज्य प्रकरणात असवर्ण स्त्रीशी संग घडल्यास प्रायश्चित्ताने शुद्धी होत नाही, असे म्हटले आहे. देवलस्मृतीत असे सांगितले आहे.

दशादि विंशतिं यावत्तस्य शुद्धिर्विधीयते।

''दहापासून वीस वर्षांपर्यंत त्याची शुद्धी होऊ शकते.'' हे वाक्य भोजनादी संसर्ग केलेल्या पतितांस लागू नाही; केवळ सहसंभाषण, सहासन इत्यादी लघुसंसर्ग करणाऱ्यालाच लागू आहे. कारण, त्या ठिकाणी भोजन, अभक्ष्यभक्षण इत्यादिकांचा उल्लेख नाही; केवळ म्लेंच्छांच्या अटकेत राहण्याचा उल्लेख आहे. एवंच देवलस्मृतीच्या आधाराने काल, संसर्ग इत्यादिकांचा विचार न करता शुद्धी करणे अत्यंत अशास्त्रीय आहे. म्लेंच्छांच्या ताटांत एकदा भोजन केल्यास एक चांद्रायण काही स्मृतीत सांगितले आहे.

४८ भोजनांस ४८ चांद्रायणे होतात. बुद्धिपूर्वक एका ताटात भोजन केल्यास एका भोजनास २ चांद्रायणे प्राप्त होतात. ४८ चांद्रायणापेक्षा अधिक चांद्रायणाची प्राप्ती असल्यास मरणांत प्रायश्चित्तावाचून दुसरी गती नाही. एका पंक्तीत १ वर्षपर्यंत म्लेंच्छांशी सहभोजन केल्यास १ वर्षानंतर शुद्धी होऊ शकणार नाही; त्याच्या अगोदर होऊ शकेल.

संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन्।

भोजनासनशय्यादि कुर्वाणः सार्वकालिम्।।

''पतिताशी भोजन, आसन, शयन, इत्यादी संसर्ग १ वर्षपर्यंत नेहमी केल्यास पातित्य येते.''

इतका विषय मांडल्यानंतर सभेचा काळ संपल्यामुळे शुद्धीविषयक विचार येथे संपविला.

दिवस ६ वा

प्रथमतः पतितांच्या संततीच्या शुद्धीबद्दल विचारास सुरुवात झाली. या विषयावर पतितसंततीची शुद्धी होऊ शकते, ही बाजू तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मांडली.

ते म्हणाले- बौधायनधर्मसूत्रांत ज्यांनी प्रायश्चित्त घेतलेले नाही किंवा ज्यांना प्रायश्चित्ताचा अधिकार नाही, अशा पतितांनी आपला निराळा संघ करून परस्परांत विवाह, अध्ययन, भोजन इत्यादी संसर्ग करावे व त्यांच्यापासून उत्पन्न झालेल्या पुत्रांनी संघाचा त्याग करून पूर्वीच्या शुद्ध जातीत जाऊन मिसळावे, असे म्हटले आहे.

अथ पतिताः समवसाय धर्माश्चरेयुरितरेतर याजका इतरेतराध्यापका मिथो विवाहमानाः। पुत्रान्सनिष्पाद्य प्रव्रूयुर्विप्रव्रजतास्मभ्य एवमार्यान्संप्रतिपत्स्यथेति।।

''पतितांनी संघ करून धर्माचरण करावे, परस्परांत यजन, अध्यापन, विवाह करावे. पुत्रांना उत्पन्न केल्यानंतर त्यांना असे म्हणावे, आमच्यापासून दूर जा म्हणजे आर्यांमध्ये मिसळून जाल'', अशा अर्थाचे वाक्य आपस्तंब व हिरण्यकेशी धर्मसूत्रांतही आले आहे. हारीत व वशिष्ठ यांच्या धर्मसूत्रांत पतितांचा पुत्र पतीत असतो; पण पतिताची मुलगी पतित नसते, असे म्हटले आहे.

पतितपुत्रः पतितो भवति अन्यत्र स्वियः सा

हि परगामिनी तामरिक्यामुपेयान्।

''पतिताचा मुलगा पतित असतो, मुलगी नव्हे. कारण, ती दुसऱ्याच्या घरी जावयाची असते. तिच्याशी पितृधन न घेता विवाह करावा.'' यज्ञवल्क्यानेही असेच म्हटले आहे. हारीत व वशिष्ठ यांच्या मताने जरी पतित पुत्र पतित असला तरी त्यास प्रायश्चित्तपूर्वक शुद्ध करून घेता येते, असे बौधायनाने म्हटले आहे.

अशुचिशुक्रोत्पन्नानां तेषामिच्छतां प्रायश्चित्तिः

पतनीत्वानां तृतीयोऽ शः।

''अपवित्र शुक्रापासून उत्पन्न झालेल्या त्या पुत्रांना इच्छा असल्यास पतित प्रायश्चित्ताच्या तृतीयांश प्रायश्चित्त द्यावे.''

अनंत कृष्णशास्त्री : देवलस्मृतीप्रमाणे ४ वर्षांपुढे शुद्धी होऊ शकत नाही, असे जर आहे, तर पतिताशी पतितसंततीचा ४ वर्षांपेक्षा अधिक संसर्ग घडल्यास पतिताच्या संततीची शुद्धी होऊ शकणार नाही, हे आपणास मान्य करावे लागेल.

लक्ष्मणशास्त्री जोशी : देवलस्मृतीचा आपण करता तसा अर्थ मला मान्य नाही. व जरी

मान्य केला तरी पतिताची संतती सज्ञान होईपर्यंत तिला देवलस्मृतीचा तुम्ही केलेला निर्णय बाधक होत नाही. कारण, उपनयनाच्या पूर्वी मुलाला व विवाहापूर्वी मुलीला कामचार, कामवाद व कामभक्षण या गोष्टींची परवानगी आहे; म्हणून त्यास संसर्गदोष नाही. बौधायनाने सांगितलेल्या पतितांनी पुत्रांना सांगावयाचा दोष समजण्याची बुद्धी उत्पन्न होईपर्यंत दोष नाही, असे म्हटले पाहिजे.

अनंत कृष्णशास्त्री : देवलस्मृतीचा आम्ही सांगितलेला अर्थ तुम्हांस का मान्य नाही, याचे कारण सांगाल काय?

लक्ष्मणशास्त्री : तो विषय तुम्ही कालच संपविल्यामुळे विषयांतर होणार नाही काय?

अनंत कृष्णशास्त्री : विषयांतर होणार नाही. कारण, कालचा व आजचा विचार एका दृष्टीने एकच आहे.

लक्ष्मणशास्त्री : देवलस्मृतीप्रमाणे ४ वर्षेपर्यंत म्लेंच्छाशी भोजनादी संसर्ग घडल्यास चार चांद्रायणे प्रायश्चित्त प्राप्त होते. आपस्तंबाने पतितास द्वादशवार्षिक व्रतरूप (बारा वर्षांचे व्रत) प्रायश्चित्त सांगितले आहे. ते ४ चांद्रायणांपेक्षा जवळ जवळ २० पटींनी मोठे आहे. त्याचे अनुष्ठान कोणीच करणार नाही. कारण, देवलस्मृतीतील थोड्या प्रायश्चित्ताने शुद्धी होऊ शकते, म्हणून आपस्तंबाच्या वाक्यास 'अननुष्ठान लक्षणा प्रामाण्य' नावाचा दोष लागतो. याकरिता आपस्तंबाने सांगितलेले प्रायश्चित्त ४ वर्षांपेक्षा अधिक काल संसर्ग घडल्यास प्राप्त होते, असे म्हटले पाहिजे. एवंच देवलस्मृतीतील ४ वर्षांनंतर प्रायश्चित्ताने पाप नाहीसे होत नाही; हे वाक्य निंदारूप अर्थवाद होय, असे सिद्ध होते. पतितांची संतती मागे सांगितलेल्या वचनांच्या आधारे शुद्ध होऊ शकते.

राजेश्वरशास्त्री : पतिताची मुलगी शुद्ध असते, यात शंका नाही; पण पतिताचा पुत्र प्रायश्चित्तानेही शुद्ध होऊ शकत नाही. नंद पंडिताने विष्णुस्मृतीवरील टीकेत लक्ष्मणशास्त्री यांनी सांगितलेल्या बौधायनाच्या वाक्याचा निराळा अर्थ केला व तोच अर्थ आम्हांस मान्य आहे. तो असा : अशुचि शुद्धोत्पन्नांना तेषांमिच्छता. अपवित्र शुक्रापासून उत्पन्न झालेल्या त्यांची इच्छता म्हणजे इच्छा करणाऱ्यांना (पतिताच्या संततीशी संसर्ग करू इच्छिणाऱ्यांना) तृतीयांश प्रायश्चित्त आहे.

लक्ष्मणशास्त्री : हा अर्थ अत्यंत वाकडा-तिकडा आहे. सरळ अर्थ टाकून इतका वाकडा अर्थ करण्याचे काही प्रयोजन नाही.

या विषयावर बरीच चर्चा झाल्यानंतर अस्पृश्यांबद्दल चर्चा सुरू झाली. अंत्यज म्लेंच्छ यांच्यात काही तारतम्य आहे की नाही? हा विषय प्रथमतः सुरू झाला.

श्रीराजेश्वरशास्त्री : अंत्यज प्रतिलोमसंकरजन्य आहेत. मनुस्मृतीत त्यांना गावात प्रवेश नाही, असे सांगितले आहे. यवनांना ग्रामप्रवेशाबद्दल निषेध कोठेही सांगितला नाही. पतंजलीने महाभाष्यांत 'म्लेंच्छयवनं' या प्रयोगाच्या विवेचनाच्या प्रसंगी यवन हे गावात राहण्यास योग्य

आहेत, असे म्हटले आहे.

पूर्णचन्द्रभट्टाचार्य व रामभवनशास्त्री : अंत्यजांना ग्रामप्रवेशाचा अधिकार नाही हे खरे; पण म्लेंच्छांना देशप्रवेशाचादेखील अधिकार नाही.

म्लेंच्छदेशे न च व्रजेत्। म्लेंच्छदेशस्त्वत: पर:।।

इत्यादी वाक्यांत म्लेंच्छदेश निराळा आहे, त्यात जाऊ नये, असे सांगितले आहे.

श्रीराजेश्वरशास्त्री : प्राचीन काळी हिंदुस्थानातदेखील म्लेंच्छ राहात होते व आजही राहात आहेत. महाभारतात पंजाबांत म्लेंच्छाप्रमाणे आचार करणाऱ्या लोकांचे वर्णन आलेले आहे. म्लेंच्छांचा धर्म वेदाप्रमाणे अनादिसिद्ध आहे. न्यायमंजरीकारांनी म्लेंच्छादिकांचे धर्म ईश्वरोक्त आहेत, असे म्हटले आहे. उपनिषदांमध्ये प्रेतपूजा करणे आणि प्रेतांना पुरणे, असा जो असुरांचा धर्म सांगितले आहे, तो म्लेंच्छांचा आहे.

या विषयावर राजेश्वरशास्त्री, अनंत कृष्णशास्त्री व त्यांचे दोघे-तिघे सहकारी यांच्याशिवाय सर्व पंडित अंत्यजापेक्षा म्लेंच्छ सर्वथा कमी प्रतीचे आहेत, हीच गोष्ट प्रतिपादित होते; पण अनंत कृष्णशास्त्री व राजेश्वरशास्त्री यांनी आपला हट्ट सोडला नाही. पतितसंततीच्या विचाराचे प्रसंगीदेखील सर्व बंगाली पंडित लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या बाजूस होते; पण सभेची सर्व सूत्रे एक-दोघा व्यक्तींच्या हातात असल्यामुळे व प्रतिनिधी म्हणून आलेल्या पंडितांच्या मतास कवडीइतकीही किंमत नसल्यामुळे विरोधाचा उपयोग झाला नाही.

दिवस ७ वा

हा विचारसभेचा शेवटचा दिवस होता. अंत्यजांच्याबद्दल विचार पुन्हा सुरू झाला. समाजात म्लेंच्छाशी हिंदू लोकांची ज्या तऱ्हेची वागणूक असते व सभेत, पाणवठ्यावर व इतर सार्वजनिक स्थळी मुसलमानांस जितकी परवानगी असते, तशा तऱ्हेची वागणूक अंत्यजांशी असावी, अन्त्यजांना कमीत कमी मुसलमानाइतके तरी अधिकार आणि सार्वजनिक स्थळी परवानगी असावी, असा विचार अनेक पंडितांनी मांडला. किंबहुना मुसलमानांपेक्षा अंत्यजास अधिक अधिकार असावेत, असेही पुरुषोत्तमशास्त्री वगैरे मंडळींनी प्रतिपादिले. यानंतर सार्वजनिक पाणवठ्यावर अंत्यजांना पाणी भरण्यास परवानगी शास्त्रतः विरुद्ध आहे की नाही, यासंबंधी चर्चा सुरू झाली.

महामहोपाध्याय दुर्गाचरण सांख्यवेदान्त तीर्थ : आड-विहिरी, तलाव, झरे, नद्या, नळ इत्यादी पाणवठ्यावर अंत्यजांनी पाणी भरण्यास हरकत नाही. वीरमित्रांदयांत असे वाक्य आहे.

नद्य: कूपतटाकानि सरांसि सरितस्तथा।
असंवृतान्यदोषाणि मनु: स्वयंभुवो ऽ ब्रवीत्।।

''नद्या, आड, तलाव, झरे, सरोवरे ही मोकळी असल्यास निर्दोष असतात, असे स्वायंभुव मनु म्हणतो.''

समन्ताच्च चर्तुहस्तो जलाशयो भेवद्यदि।
अन्त्यजैरपि संस्पृष्ट: पूतो भवति सर्वथा।।
वृद्धयाज्ञवल्क्य:।

''औरसरचौरस चार हात असलेल्या जलाशयाला अंत्यजांचा स्पर्श जरी झाला तरी तो सर्वस्वी शुद्ध असतो.''

चण्डालपतितादीनां पुष्करिण्यां ह्रदे ऽ पि वा।
जानुदघ्नाच्छुचि ज्ञेय मधस्तादशुचि स्मृतम्।।

''चण्डाल पतित इत्यादिकांच्या पुष्करणीत किंवा डोहांत गुडघ्यापेक्षा अधिक पाणी असल्यास ते शुद्ध असते. गुडघ्याखाली असल्यास मात्र अपवित्र असते.''

अनंत कृष्णशास्त्री :

चण्डालभाण्डसंस्पृष्टं पीत्वा कूपगतं जलं।
गोमूत्रयावकाहार स्त्रिरात्राच्छुद्धिमाप्नुयात्।।
धावक: ।

''चण्डालाच्या भांड्याचा स्पर्श होऊन अपवित्र झालेल्या आडातील पाणी प्याल्यास गोमूत्रांत शिजविलेले सातू ३ दिवसपर्यंत खाल्ल्याने शुद्धी होते.'' या वचनानुसाराने चण्डालांना सार्वजनिक जलाशयावर पाणी भरण्याचा अधिकार नाही.

दुर्गाचरणशास्त्री : वरील वक्यांतील कूप शब्दाने मोकळ्या ठिकाणी नसलेले किंवा ४ हातांपेक्षा कमी असलेले आड विवक्षित आहेत, असे म्हटले पाहिजे. कारण, त्याशिवाय आम्ही सांगितलेल्या वचनाशी योग्य समन्वय होणार नाही.

देवालय प्रवेशासंबंधी थोडा वाद झाला; पण बरीच शास्त्रवचने विरुद्ध असल्यामुळे वाद रंगला नाही.

यानंतर विधवा विवाहावर चर्चा झाली. विधवा विवाहाला बंगालमधील गिरिजाप्रसाद गोस्वामी यांच्याशिवाय सर्व पंडित प्रतिकूल होते. गिरिजाप्रसादशास्त्री यांनी विधवा विवाहास अनुकूल बरीच वचने सांगितली. अनंत कृष्णशास्त्री यांनी वरील शास्त्र्यांची सभेत बरीच टर उडविली व कलिवर्ज्य प्रकरणाच्या आधारे आणि मनुस्मृतीच्या अनुसाराने त्रैवर्णिकांना विधवा विवाहाचा अधिकार नाही असे प्रतिपादिले.

३ पिढ्यांपेक्षा अधिक पिढ्यांपर्यंत उपनयनसंस्कार न केलेल्या लोकांना पुनः उपनयनसंस्कारपूर्वक वेदोक्त कर्माचा अधिकार असतो की नाही, याबद्दल वाद झाला.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : आपस्तंबधर्मसूत्रांत १६ वर्षांचे आंत उपनयन न केल्यास द्वैमासिक प्रायश्चित्त सांगितले आहे. बाप व आजा अनुपनीत असल्यास एक वार्षिक व्रत सांगितले आहे व पुढे जितक्या पिढ्यांचे उपनयन झाले नसेल, एका पिढीस एक याप्रमाणे तितक्या वर्षांचे प्रायश्चित्त सांगितले आहे व त्यापुढे असे म्हटले आहे :

यस्य प्रपितामहादि नानुस्मर्यते तेषां द्वादश वार्षिकं।

''पणजा इत्यादिकांचे उपनयन झालेले आठवत नसेल, तर द्वादशवार्षिक प्रायश्चित्त घ्यावे.'' या वाक्यात प्रपितामहापासून वरच्या पिढ्यांचे उपनयन झाले नसेल, तर प्रायश्चित्त सांगितले आहे. म्हणून कितीही पिढ्या अनुपतीत असल्या, तरी प्रायश्चित्तपूर्वक शुद्धी होते, असे सिद्ध होते.

अनंत कृष्णशास्त्री : 'प्रपितामहादि' या पदांतील आदिपदाने प्रपितामहापासून खालच्या पिढ्या असा अर्थ निघतो. कारण, प्रपितामहाचे उपनयन झाले नसल्यास व पितामह आणि पिता यांचे उपनयन झाले असल्यास स्वतः पुत्राने प्रायश्चित्ताचरण करण्याची जरूरी नाही; पण लक्ष्मणशास्त्री यांचा अर्थ मान्य केल्यास तशी आपत्ती येते.

श्रीलक्ष्मणशास्त्री : आदिशब्दाने खालच्या व वरच्या दोन्ही पिढ्या घेण्यास हरकत नाही; म्हणून वरील आपत्ती येत नाही.

तात सुब्बारावशास्त्री, अमृतलालशास्त्री इत्यादिकांनी या विषयावर अनुकूल - प्रतिकूल चर्चा केली. नंतर धर्मज्ञ कोण व धर्मपरिवर्तनाचा अधिकार कोणास आहे, यासंबंधी वाद सुरू झाला. सभा संपण्यास अत्यंत थोडा अवधी होता. विषय अत्यंत गहन होता. इंदूरचे बाळशास्त्री भट यांनी श्रीलक्ष्मणशास्त्री जोशी यांस या वाहत्या गंगेत हात धुऊन घ्या, असे खोचून सांगितले; पण चर्चेस अवकाश फार थोडा होता. बंगालच्या गिरिजाप्रसाद गोस्वामींनी या विषयाचा उपक्रम केला. अनंत कृष्णशास्त्री यांनी सांगितले की, धर्माचे परिवर्तन आपत्काली सीतेने जर केले असते, तर रामायण झाले असते काय? धर्मराजांनी १२ वर्षे वनवास पत्करला नसता, तर त्यांना धर्मराज असे कोणी म्हटले असते? प्रल्हादाने आपत्काली हरिभक्तीचा धर्म सोडला नाही. हरिश्चंद्राने संकटाच्या प्रसंगी सत्यधर्माचे परिपालन केले, कोणत्याही प्रसंगी धर्मपरिवर्तन करण्याचा कोणासही अधिकार नाही. मन्वादिकांनी नवीन धर्म सांगितला नाही, तर वेदप्रतिप्राद्य धर्मच सांगितला. स्मृतिकारांनी नवीन धर्म सांगितला नाही, तर केवळ श्रुतीचा अनुवाद केला आहे.

विचारसभेचे काम आज संपले. अनंत कृष्णशास्त्री यांनी उपसंहार बहारीचा केला. गेल्या चार हजार वर्षांत एवढे पंडितांचे महासंमेलन कोठेही झाले नाही. अहिनकुलवत असलेले निरनिराळे धर्माचार्य येथे एकत्र जमलेले आहेत. ही विश्वेश्वराची मोठी कृपा आहे, अशा आशयाचे भाषण त्यांनी केले.

(*ब्राह्मण – मार्गशीर्ष, शके १८५०, वर्ष- ६, अंक- ९,
अर्थात जानेवारी-फेब्रुवारी, १९२९, पृ. ३ ते २३)

ooo

लेखांची संदर्भ सूची

अ) शोधनिबंध

1) **Material, Culture and Social Basis of Vedic Philosophis**
Printed Booklet, 1969

2) अ) **The Cosmic State and Collective Kingship of Vedic Gods**
L'ASIATHEQE, 6, Rue, Christine, Latin Qurter, Paris, France, 1973

ब) मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक, १९७५, संपा. सु. ग. जोशी, प्रकाशक- राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन, शिरूरताजबंद-४१३५१४, ता. अहमदापूर, जि. उस्मानाबाद, सन १९७५ (शके १८९७), किंमत- २० रुपये, पृ. १०५ ते ११४

ब) परिसंवाद मतसंग्रह

३) **१९४८ सालातील आपले भवितव्य काय?** : किर्लोस्कर, जानेवारी, १९४८

४) **जगातील दुष्टपणा व अन्याय आणि ईश्वरवादी विचारसरणी** : नवभारत, जून, १९७४

५) **वेदांतातील काही प्रश्न** : नवभारत, जुलै, १९५६

६) **आम्हा सुशिक्षितांच्या जीवनात ईश्वर अजून का रेंगाळत आहे?** : किर्लोस्कर, दिवाळी, नोव्हेंबर, १९५६

७) **साहित्य, साहित्यकार आणि सरकार** : सत्यकथा, नोव्हेंबर, १९५७

८) **उद्याचा महाराष्ट्र** : मौज, दिवाळी, १९५९

९) **भारताचे ऐक्य धोक्यात आहे काय?** : किर्लोस्कर, ५०० वा अंक, ऑगस्ट, १९६१

१०) **महाराष्ट्राची नीतिमत्ता** : शब्दरंजन, दिवाळी, १९६२

११) **अश्लील लेखन : मतप्रदर्शन** : महाराष्ट्र साहित्य पत्रिका, एप्रिल-मे, १९६७

१२) **आजचा विद्यार्थी :** कृष्णाई, १९६९

१३) **धर्मदास्य, लोकशाही विवेक आणि दलित मुक्ती** : अस्मितादर्श, दिवाळी, १९७२

१४) **प्राचीन भारतीयांचा कामविषयक दृष्टिकोन** : मोहर, दिवाळी, १९७२

१५) **अस्पृश्यतेचे सामाजिक तपमान**: धरती, नोव्हेंबर- डिसेंबर, १९७२

१६) **होय, आम्हाला क्रांती हवी आहे** : पूर्वा, दिवाळी अंक, १९७७

१७) **प्रबोधनाची शोकांतिका : उपोद्धात आणि उपसंहार** : पूर्वा, दिवाळी, १९८०

१८) **महाराष्ट्राची नवी अस्मिता** : किर्लोस्कर, हीरक महोत्सवी वर्ष विशेषांक, ऑगस्ट, १९८१

१९) **विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि महात्मा फुले** : महाराष्ट्र साहित्य पत्रिका, एप्रिल-मे, १९८२

२०) **भारताचे महासंघाद्वारा पुनर्एकीकरण** : पूर्वा, दिवाळी अंक, १९८५

क) व्यक्तिलेख

राजकारण

२१) **जागतिक कीर्तीचे पहिले हिंदी क्रांतिकारक : कॉम्रेड मानवेंद्रनाथ रॉय** : अग्रणी १८ डिसेंबर, १९३९

२२) **पंडित जवारलाल नेहरू यांचे थोर व्यक्तिमत्त्व** : 'नवभारत', नोव्हेंबर, १९४९

२३) **स्टॅलिन : कम्युनिस्ट क्रांतीचा कारागीर** : 'नवभारत', मे, १९५३

२४) **जुन्या जगाची बंधणे तोडणारा तत्त्वद्रष्टा : मानवेंद्रनाथ रॉय** - साप्ताहिक 'मौज', ३१ जानेवारी, १९५४

२५) **मानवेंद्रनाथ रॉय** : 'नवभारत', एप्रिल, १९५४

२६) **गुरुवर्य श्री विनोबा यांच्यासंबंधी स्मृतिशेष - १९५६** : 'नवभारत', ऑक्टोबर, २०००

२७) **ध्येयवादी विचारवंत : आचार्य शंकरराव जावडेकर** - 'नवभारत', जानेवारी १९५३

२८) **साठीच्या उंबरठ्यावरील तरुण : माधवराव बागल** - साप्ता. 'मौज', २७ मे, १९५६

२९) **वेदवेत्ते टिळक** : प्रतिष्ठान, ऑगस्ट, १९५६

३०) **समतोल, समंजस राज्यकर्ता : यशवंतराव चव्हाण** : साप्ता. 'मौज', १७ फेब्रुवारी १९५७

३१) **किसन वीर : खरा स्वातंत्र्यवीर** : पत्रक, १९५६-५८

32) **First philosopher of Modern India** : **M. N. Roy**- M. N. Roy : Philosopher-Revolutionary, Sibnarayan Roy, Ajanta Publication, Delhi-7, 1995, First Edition- 25 Jan. 1959.

३३) **प्रशांत आश्रमातील तपस्विनी : एलन रॉय** : 'नवभारत', फेब्रुवारी, १९६१

३४) **राजकीय सहयात्री : यशवंतराव चव्हाण** : श्री. यशवंतराव चव्हाण, अभिनंदन ग्रंथ, १२ मार्च १९६१

३५) **कै. श्री मारोतराव कन्नमवार** : 'नवभारत', जानेवारी, १९६४

३६) **दिवंगत लालबहादूर शास्त्री** : 'नवभारत', फेब्रुवारी, १९६६

३७) **स्वातंत्र्यवीर सावरकर** : 'नवभारत', एप्रिल, १९६६

३८) **'दास कॅपिटल'चा जनक : कार्ल मार्क्स** : दैनिक 'महाराष्ट्र टाईम्स', १३ ऑगस्ट, ११६७

३९) **आत्मबलसंपन्न वीर : किसन वीर** : कृष्णाई, १९६७

४०) **अनेक तेजस्वी पैलू असलेले व्यक्तिमत्त्व : भाऊसाहेब बांदोडकर** : आमचे भाऊसाहेब बांदोडकर षष्ट्यब्दीपूर्ती गौरव ग्रंथ, २६ ऑक्टोबर, १९७१

४१) **कै. किसन महादेव वीर** : 'नवभारत', जानेवारी, १९८०

४२) **भारतीय आदर्शवादाचा नवा अवतार : सेनापती बापट** : 'लोकराज्य', १ व १६ मार्च, १९८१

४३) **वऱ्हाडचे टिळक : लोकनायक बापूजी अणे** : 'ओंजळ', नोव्हेंबर, १९८१

४४) **शुद्ध चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी : यशवंतराव चव्हाण** : 'नवभारत', मार्च, १९८५

४५) **तत्त्वचिंतक राजकारणी : यशवंतराव चव्हाण** : दैनिक 'सकाळ', रविवार, २४ नोव्हेंबर, १९८५

४६) **यशवंतराव चव्हाण : संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आदर्श** : 'यशवंतराव : राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व', संपा. भा. कृ. केळकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती- २५ नोव्हेंबर, १९८५, पृ.३ ते ८

४७) **द्रष्टा क्रांतिकारक : स्वातंत्र्यवीर सावरकर** : स्वातंत्र्यवीर गौरवांक, २१ जुलै,१९८६

४८) **मानवेंद्रनाथ रॉय : तत्त्वज्ञ आणि राजकीय द्रष्टे** - साप्ताहिक 'साधना', रॉय शताब्दी अंक, २१ मार्च, १९८७

४९) **आदर्शाच्या प्रकाशात विकसित व्यक्तिमत्त्व : यशवंतराव चव्हाण** - 'मराठी मातीचे वैभव', स्मरणग्रंथ, जुलै १९८९

५०) **यशवंतराव चव्हाण : आधुनिक महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान** : 'सकाळ', २५ नोव्हेंबर, १९८९, ५ वा स्मृतिदिन

५१) **क्रांतिकारक समादेशक : स्वातंत्र्यवीर सावरकर** - 'मी पाहिलेले सावरकर', २९, १९९०

५२) **समाजभूषण बाबूराव घोरपडे** : दे. भ. बाबूराव घोरपडे गौरवग्रंथ, जून, १९९०

५३) जनसेवक श्री. बाबूराव धारवाडे : बाबूराव धारवाडे एकसष्ठी समारंभ ग्रंथ, १९५१

५४) **तत्त्वचिंतक रा. ना. चव्हाण** : अक्षर श्रद्धांजली, १९९४

समाजकारण

५५) **भारतरत्न अण्णासाहेब कर्वे** : 'नवभारत', मे, १९५८

५६) **मानव्याचा सेवक व संस्कृतीचा तत्त्वज्ञ : डॉ. अल्बर्ट श्वाईटझर** : 'नवभारत', ऑक्टोबर, १९६५

५७) **विश्वधर्माचा प्रज्ञा प्रवक्ता : कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे** : दै. 'महाराष्ट्र टाइम्स'

५८) **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : काही आठवणी** - वि. रा. शिंदे दर्शन भाग - १, २०१८ २२ एप्रिल, १९७३

धर्मकारण

५९) **ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती यांचे आत्मनिष्ठ व्यक्तिमत्त्व** : 'नवभारत', एप्रिल, १९५५

६०) **थोर समाजसुधारक : कै. महादेवशास्त्री दिवेकर** : 'नवभारत', सप्टेंबर, १९७१

६१) **कै. वासुदेवशास्त्री कोनकर** : 'नवभारत', जानेवारी, १९७७

इतिहास

६२) **प्रा. नरहर रघुनाथ फाटक** : नवभारत, मे, १९६३

६३) **इतिहास संशोधक कै. वि. का. राजवाडे** : 'नवभारत', ऑगस्ट, १९६४

६४) **इतिहास संशोधक व साहित्यनिर्माते कै. न. र. फाटक** : 'नवभारत', जानेवारी, १८८०

६५) **प्रा. न. र. फाटक : सार्वजनिक जीवनाशी एकरूप झालेला विद्वान**ः साहित्य, दिवाळी, १९८२

शिक्षण

६६) **माझे थोर मित्र कै. प्रा. गोवर्धनदास पारीख** : 'नवभारत', डिसेंबर, १९७७

६७) **मूलगामी मानवतावादी विचारक** : प्रा. अ. भि. शहा, 'नवभारत', नोव्हेंबर, १९८३

साहित्य

६८) **बंगाली कवी व तत्त्वज्ञ सुधीन्द्रनाथ दत्त** : नवभारत, ऑगस्ट, १९६०

६९) **मायावादी भाष्यकार, आचार्य पुरुषोत्तम : पु ल देशपांडे** : महाराष्ट्र साहित्यपत्रिका, पु. ल. विशेषांक, जुलै-डिसेंबर, १९७४

चित्रकला

७०) **युरोपातील कीर्तिशाली थोर चित्रकार : फ्रान्सिस्को जोशे द गोया** - दै. 'संग्राम', १९४२

योग व अध्यात्म

७१) **महायोगी अरविंद** : 'नवभारत', सप्टेंबर, १९७२

पत्रकारिता

७२) **वृत्तपत्र संपादक कै. श्रीपाद शंकर नवरे** : 'नवभारत', फेब्रुवारी, १९७९

ड) आत्मपर लेख

७३) **मी रॉयवादी का झालो?** : 'धनुर्धारी', दिवाळी, ऑक्टोबर, १९४६

७४) **कृष्णा तीरावरील प्राज्ञमठात मी** : 'सत्यकथा', सप्टेंबर, १९६०

७५) **माझ्या शब्दात मी** : पाक्षिक 'रुद्रवाणी', १५ जानेवारी, १९७२

७६) **माझी पत्नी सौ. सत्यवतीची जीवन यात्रा** : 'नवभारत', सप्टेंबर, १९७८

७७) **महत्त्वाकांक्षा प्रशंसनीय नाही असे कोण म्हणेल?** : 'पुस्तक पंढरी', दिवाळी,

७८) **माझी आयुष्याची संध्याकाळ** : 'ललित', दिवाळी, नोव्हेंबर - डिसेंबर, १९८१

७९) **माझी तीन प्रेरणास्थाने** : 'दीपावली', दिवाळी, १९८६

८०) **साहित्य संस्कृती मंडळ व मी** : 'लोकप्रभा', दिवाळी, १९८८

८१) **ऐ गोरख, तूने मच्छिंद्र को भी जीता है** : दैनिक सकाळ, पुणे; दि. ४ नोव्हेंबर १९८८

८२) **स्वातंत्र्यचळवळीतील माझा कारावास** : 'स्वातंत्र्यचळवळीतील सातारा जिल्हा', ९५ ऑगस्ट, १९९२

८३) **बालपणीचं माझं वेदवाचन** : 'ग्रंथांच्या सहवासात', ५ मे,२००९

इ) प्रवासवर्णनपर लेख

८४) **रंगून सांस्कृतिक स्वातंत्र्य परिषद** : 'नवभारत', एप्रिल, १९५५

८५) **मास्को प्राच्यविद्या विशारद विश्वपरिषद** : 'नवभारत', नोव्हेंबर, १९६०

८६) **मास्को दर्शन : भाग १** : 'नवभारत', नोव्हेंबर, १९६०

८७) **मास्को दर्शन : भाग २** : 'नवभारत', डिसेंबर, १९६०

८८) **रशियातील सर्वधर्मपरिषद** : महाराष्ट्र टाइम्स, २० जुलै, १९६९

८९) **आमची अमेरिकेची यात्रा : १**, (दैनंदिनी) - नवभारत, ऑक्टोबर, १९७७

९०) **आमची अमेरिकेची यात्रा : २**, (दैनंदिनी) - नवभारत, नोव्हेंबर, १९७७

९१) **आमची अमेरिकेची यात्रा :** ३, (दैनंदिनी) - जानेवारी- फेब्रुवारी, १९७८

९२) **आमची अमेरिकेची यात्रा : ४**, (दैनंदिनी) - 'नवभारत', एप्रिल, १९७८

फ) भाषांतरित लेख

९३) **नवमानवतावादाची बावीस सूत्रे** : मानवेंद्रनाथ रॉय, रोहिणी, ऑगस्ट, १९४७

९४) **गिंपेलची गोष्ट** : आयझॅक बेहावीस सिंगर, विशाखा दिवाळी, १९५३

९५) **श्वाइट्झरचे संस्कृतीविषयक तत्त्वज्ञान** : निसिम इझेकील, नवभारत, जानेवारी १९५४

९६) **मानवतावादी राजकारण :** मानवेंद्रनाथ रॉय : 'नवभारत', एप्रिल, १९५४

९७) **भारतीय नवजीवनाची चळवळ :** मानवेंद्रनाथ रॉय : 'नवभारत', एप्रिल, १९५४

९८) **मार्क्सवादाच्या पुढे! :** फिलीप स्प्रॅट : 'नवभारत', एप्रिल, १९५४

९९) **आंतरराष्ट्रीय सद्भावनांचे साधन : विज्ञान** : वर्नर हाइसेनबर्ग, 'नवभारत', एप्रिल, १९५४

१००) **मार्क्सवादाची जादू :** डॉ. मायकेल पोलॅनी : 'नवभारत', एप्रिल, १९५७

१०१) **भ्रातृभाव (रशियन राज्यक्रांतीच्या संदर्भात) :** फिलीप स्प्रॅट : 'नवभारत', नोव्हेंबर, १९६

ग) वृत्तांत व विचार

१०२) **काशी येथील अखिल भारतवर्षीय ब्राह्मण महासम्मेलन** : ब्राह्मण, मार्गशीर्ष, शके १८५०, (वर्ष ६, अंक-९) पृ. ३ ते २३, अर्थात जानेवारी-फेब्रुवारी, १९२९

परिशिष्टे

परिशिष्ट - १

ऋणनिर्देश

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पासाठी आवश्यक संदर्भ, माहिती, मार्गदर्शन, साधने, संपर्कसूत्र इ. चे साहाय्य करून खालील व्यक्ती व संस्थांनी मोलाचे सहकार्य केले. याशिवाय अनवधानाने नोंद घ्यावयाची राहिलेल्या इतरांचेही मी स्मरण करतो आणि सर्वांप्रती विनम्र कृतज्ञता व्यक्त करतो.

* मा. शरद पवार, अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* मा. राम नाईक, माजी राज्यपाल, उत्तर प्रदेश, लखनऊ.
* मा. मंत्री, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. सचिव, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. बाबा भांड, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. आणि संचालक, संस्थापक, साकेत प्रकाशन प्रा.लि., औरंगाबाद.
* मा. डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* मा. डॉ. सौ. मीनाक्षी पाटील, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, संपादक, समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. अरुंधती खंडकर, सिंगापूर.
* मा. वासुदेव जोशी, वाई, जि सातारा.
* मा. दिलीप करंबेळकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* मा. संजय कृष्णाजी पाटील, माजी सचिव, (अ.का.) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

* मा. प्रा. डॉ, राजा दीक्षित, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* डॉ. शामकांत देवरे, सहा. सचिव, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. रवीन्द्र घोडराज, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. सरोजकुमार मिठारी, विद्याव्यासंगी सहायक मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* डॉ. जगतानंद भटकर, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* मा. अध्यक्ष, लोकमान्य ग्रंथालय, वाई.
* मा. शरद साठे (भा. प्र. से.), सचिव, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* श्री. मोहनराव डकरे, सचिव, प्रादेशिक केंद्र, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कन्हाड.
* मा. अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि सातारा.
* श्री. अनिल जोशी, सचिव, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि. सातारा.
* मा. ग्रंथपाल, मराठी विश्वकोश ग्रंथालय, वाई, जि सातारा.
* मा. अध्यक्ष, करवीरनगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* मा. ग्रंथपाल, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
* मा. खासदार प्रा संजय मंडलिक, कोल्हापूर.
* श्री. दत्ता क्षीरसागर, संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालय, पुणे.
* मा. अध्यक्ष, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे.
* मा. प्रा डॉ प्रसाद जोशीं, कुलगुरू, डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* श्री. गोपाळ अवटी, संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे.
* श्री. श्रीराम पवार, समूह संपादक, सकाळ वृत्तपत्र समूह, पुणे.
* श्री सम्राट फडणीस, संपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* श्री. माधव गोखले, उपसंपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* मा. स्वप्नील पोरे, संपादक, दैनिक केसरी, पुणे.
* प्रा. डॉ. प्रकाश कांबळे, महावीर विद्यालय, कोल्हापूर.
* श्री. शाम जोशी, ग्रंथसखा वाचनालय, बदलापूर.
* प्रा. डॉ सौ आशाताई गुर्जर, पुणे.
* डॉ. एच व्ही देशपांडे, माजी प्राचार्य, आजरा महाविद्यालय, आजरा, जि कोल्हापूर.
* डॉ. दिनकरराव पाटील, प्राचार्य, भोगावती महाविद्यालय, कुरुकली, ता करवीर, जि. कोल्हापूर.
* सौ. मनीषा शेणाई, ग्रंथपाल, करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. पंडित टापरे, वाई जि. सातारा.
* श्री. रमेश रा. चव्हाण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, वाई, जि सातारा.

* प्रा. डॉ. रणधीर शिंदे, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठा कोल्हापूर.
* प्रा. डॉ. शिवाजी मोटेगावकर, राज्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.
* मान. विनोद शिरसाठ, संपादक, साप्ताहिक साधना, पुणे.
* श्री सुदाम सानप, महाराष्ट्र ज्ञानमंडळ, पुणे.
* श्री. समीर दिलावर शेख, साधना साप्ताहिक, पुणे.
* डॉ. राजेंद्र प्रभुणे, वाई, जि सातारा.
* श्री. भालचंद्र मोने, प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, जि सातारा.
* प्रा. सागर कांबळे, न्यू कॉलेज, कोल्हापूर .
* डॉ. आर. डी. पोतदार, अध्यक्ष, सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे मुंबई .
* प्रा. डॉ. प्रदीप देवी, सार्वजनिक वाचनालय, नाशिक.
* प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष, म.सा. प., पुणे.
* मा. ग्रंथपाल, पुणे मराठी ग्रंथसंग्रहालय, पुणे.
* मा. ग्रंथपाल, डॉ. भांडारकर प्राच्यविद्या संस्था, पुणे.
* मा. ग्रंथपाल डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* मा. ग्रंथपाल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.
* श्री. सुरेश रासकर व सौ. दिप्ती रासकर, मुंबई.
* डॉ. अशोक वेणीमाधवशास्त्री जोशी, अमेरिका.
* श्री. व. सौ. डॉ. शुभदा अरविंद पटवर्धन, मुंबई.
* प्रा. डॉ. व्यंकटेश कोटबागे, बेळगाव.
* श्री विजय एकशिंगे व श्री संजय कळके, कोल्हापूर,
* श्री श्रीकांत भागवत, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* डॉ. सौ. मोनिका गजेंद्रगडकर, संपादक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* श्री. मिलिंद जोशी, व्यवस्थापक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* Hon. Maxion Barlet, Bibliotheque de France, Paris.
* मा. ग्रंथपाल श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा जि. कोल्हापूर.
* मान.- संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, (मुंबई)
* प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे, प्रमुख, इंग्रजी विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर
* प्रा. डॉ. कृष्णा पाटील, अधिव्याख्याता, दूर शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
* सर्व कर्मचारी, सहयोगी, साकेत प्रकाशन प्रा .लि., औरंगाबाद
* श्री. अमेय जोशी, अक्षर दालन, कोल्हापूर
* सौ. / श्री. तनुजा व निहाल शिपूरकर, भारती मुद्रणालय, कोल्हापूर.
* श्री गौरीश सोनार, कोरिएंडर ग्राफिक्स, कोल्हापूर.

* श्री. अशोक पाटील, छायाचित्र विकासक, कोल्हापूर.
* श्री. विश्वनाथ यादव, दैनिक लोकमत, कोल्हापूर
* श्री. विवेक जोशी, दैनिक तरुण भारत, कोल्हापूर
* श्री. भरत बुटाले, उपसंपादक, दैनिक लोकमत, कोल्हापूर.
* सौ. वीणा पाटील, अक्षर दालन, कोल्हापूर.
* श्री. राजेश दुबे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* श्री. महेश मोधे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* सौ. यशवंती अरुण शिंदे, कोल्हापूर.
* सौ. शुभांगी मोहन भगत, विश्ववेद ग्राफिक्स, कोल्हापूर.

❍❍❍

परिशिष्ट - २

परिचय

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

(२७ जानेवारी, १९०१ - २७ मे, १९९४)

महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत, संस्कृत पंडित व मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक, धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे जन्म. वडिलांचे नाव बाळाजी आणि आईचे चंद्रभागा. त्यांचे वडीलबंधू वेणीमाधवशास्त्री आयुर्वेदाचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस आले. लक्ष्मणशास्त्री वयाच्या चौदाव्या वर्षी वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत दाखल झाले. तेथे केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी न्याय-वेदांतादी प्राचीन शास्त्रांचे अध्ययन केले. १९२३ मध्ये कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी त्यांनी संपादन केली. इंग्लिश भाषा व आधुनिक पश्चिमी ज्ञानविज्ञाने यांचा स्वप्रयत्नाने त्यांनी सखोल व्यासंग केला. १९२७ मध्ये मुल्हेरच्या (नाशिक जिल्हा) पंडित घराण्यातील सत्यवती यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना दोन मुले व दोन मुली असून, त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव मधुकर हे अमेरिकेत गणकयंत्रनिर्मिती करणाऱ्या 'इंटरनॅशनल बिझनेस मशिन्स' या उद्योग संस्थेत संशोधन व्यवस्थापक या पदावर होते. वाई येथेच राहून शास्त्रीजींनी प्राज्ञ पाठशाळेचे व मराठी विश्वकोशाचे कार्य आणि आपला व्यासंग अखंडपणे चालू ठेवला होता.

प्राज्ञ पाठशाळेचे वातावरण सनातनी पढीक पांडित्याचे नव्हते; ते पुरोगामी/चिकित्सेचे व राष्ट्रीय स्वरूपाचे होते. परिणामतः राष्ट्रीय व सामाजिक आंदोलनांत भाग घेण्याची प्रेरणा या वातावरणातून शास्त्रीजींना लाभली. म. गांधींच्या अस्पृश्यता निवारण कार्यास शास्त्रीजींनी हिंदू धर्मशास्त्राचे पूरक भाष्य तयार करून दिले. १९३० ते १९३२ साली कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना प्रत्येक वेळी ६-६ महिन्यांचा कारावासही तीनदा भोगावा लागला. १९३६ नंतर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीचे ते क्रियाशील सदस्य झाले. १९४८ मध्ये हा पक्ष विसर्जित होईपर्यंत ते त्याचे सदस्य होते. १९४० पर्यंत व पुन्हा स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस पक्षाशी ते एक विचारवंत भाष्यकर म्हणून निगडित होते.

तर्कतीर्थांच्या नेतृत्वाने प्राज्ञ पाठशाळेला एका व्यापक सांस्कृतिक कार्यकेंद्राचे स्वरूप लाभले. वाईमध्ये हरिजन विद्यार्थ्यांचे वसतिगृह, हातबनावटीचा कागद कारखाना, अद्ययावत मुद्रणालय इ. उपक्रम त्यांनी यशस्वीपणे अमलात आणले. वाईच्या महाविद्यालयाचेही ते संस्थापक-सदस्य होते. प्राज्ञ पाठशाळेतर्फे धर्मकोशाच्या संपादनाचे मौलिक कार्य त्यांनी हाती घेतले. या कोशाचे २५ खंड प्रसिद्ध झाले असून, त्यांत कुटुंबसंस्था, हिंदू संस्कार, जाती, विवाह, मालमत्ता त्याचप्रमाणे हिंदू धर्मविधी, नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान इ. विषयांसंबंधी प्राचीन शास्त्रांतील ग्रांथिक माहिती व्यवस्थितपणे संकलित केलेली आहे. पहिल्या १९ खंडांचे संपादन तर्कतीर्थांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सुरुवातीपासून म्हणजे १९६० पासून ते १९८० पर्यंत शास्त्रीजी अध्यक्ष होते. मंडळातर्फे भाषा-साहित्यविषयक अनेक योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यांपैकी प्रमुख प्रकल्प वीस खंडीय मराठी विश्वकोशाचा आहे. प्राचीन-अर्वाचीन सर्व ज्ञानविज्ञाने मराठीतून विशद करण्याचे हे मौलिक कार्य शास्त्रीजींच्या मार्गदर्शनाखाली चालू होते.

शास्त्रीजींनी व्याख्याने, परिषदा इ. निमित्ताने भारतभर प्रवास केला. अमेरिका, ब्रह्मदेश, रशिया तसेच युरोपीय, आशियाई आणि आफ्रिकी देशांनाही त्यांनी भारताच्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य म्हणून किंवा स्वतंत्रपणे निमंत्रित म्हणूनही भेटी दिल्या आहेत (१९५१). कुकुरमुंडे येथील सनातन धर्मपरिषद (१९२५) व वाराणसीचे अखिल भारतीय संस्कृत पंडितांचे संमेलन (१९२९) यांत भाग घेऊन शास्त्रीजींनी धर्मसुधारणेचे सभाष्य समर्थन केले. भारतीय संविधान संहितेचे संस्कृत भाषांतरही त्यांनी केले. हिंदी राष्ट्रभाषेच्या प्रचारकार्याशीही त्यांचा जवळचा संबंध आहे. दिल्ली येथील मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते (१९५४). याखेरीज अनेक विभागीय व प्रादेशिक मराठी साहित्य संमेलनांची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली.

शास्त्रीजींची ग्रंथसंपदा मोजकी; पण मौलिक आहे. शुद्धिसर्वस्वम् (१९३४), आनंदमीमांसा (१९३८), हिंदू धर्माची समीक्षा (नागपूर विद्यापीठात रा. ब. परांजपे व्याख्यानमालेत दिलेली तीन व्याख्याने, १९४१), जडवाद (१९४१), ज्योतिनिबंध (म. फुल्यांचे चरित्र आणि कार्य १९४७), वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१, द्वितीय आवृत्ती १९७४), आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत (१९७३) हे त्यांचे ग्रंथ मान्यता पावले आहेत. राजवाडे लेखसंग्रह (१९६४) आणि लो. टिळक लेखसंग्रह (१९६९) हे त्यांनी संपादिले आहेत. हिंदू धर्माची समीक्षा ऐतिहासिक व समाजशास्त्रीय पद्धतीने त्यांनी केली आहे. 'धर्मसमीक्षा हीच सर्व प्रकारच्या समीक्षेची जननी आहे' या कार्ल मार्क्सच्या तत्त्वाचा पुरस्कार त्यांनी या ग्रंथात केला आहे. आधुनिक काळात सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने पारंपरिक धर्ममूल्ये कितपत उपयुक्त आहेत, याची मूलगामी चिकित्सा या ग्रंथात

केलेली आढळते. या प्रबंधाचे इंग्रजी भाषांतर गोवर्धन पारीख यांनी 'ए क्रिटिक ऑफ हिंदुइझम' या नावाने प्रसिद्ध केले आहे (१९४८). 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा एक प्रचंड प्रबंध आहे. मुळात पुणे विद्यापीठात श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी-व्याख्यानमालेत दिलेली ही सहा व्याख्याने होत (१९४९). त्यांत वेदकालीन संस्कृती, इतिहास, पुराणे व रामायणाची संस्कृती, बौद्ध आणि जैन धर्माचे कार्य आणि आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलन या विषयांचा सखोल आणि ऐतिहासिक दृष्टीने घेतलेला परामर्श आहे. भारतातील वैदिक संस्कृती ही परिवर्तनक्षम आहे. आधुनिक विज्ञानदृष्टी व मानवतावाद यांच्या निकोप संवर्धनाचे तिच्यात आंतरिक सामर्थ्य आहे व म्हणून आधुनिक क्रांतियुग आणि वैदिक संस्कृतीतील मूलभूत अध्यात्मयोग यांची सांगड घातली पाहिजे, हा या ग्रंथाचा निष्कर्ष आहे. सर्वोत्कृष्ट भारतीय ग्रंथांना साहित्य अकादमी १९५५ पासून पुरस्कार देते. असा पुरस्कार लाभलेला हा पहिला मराठी ग्रंथ.

इतिहासाचार्य राजवाडे आणि लो. टिळक यांचे नमुनेदार लेखसंग्रह संपादित करून शास्त्रीजींनी त्यांना अभ्यासपूर्ण व अत्यंत विचारप्रवर्तक प्रस्तावना लिहिल्या आहेत. आधुनिक मराठी साहित्य व त्याची समीक्षा, संस्कृतातील रससिद्धांत, मराठी संतांचे कार्य यासंबंधीही त्यांनी अनेक लेखांतून नवा दृष्टिकोन मांडलेला आहे. रा. ग. जाधव यांनी शास्त्रीजींच्या निवडक लेखांचा संग्रह 'विचारशिल्प' या नावाने संपादित केला आहे (१९७५). गांधीयुगातील एक नमुनेदार कर्मयोगी विचारवंत या नात्याने त्यांच्या विचारकार्याची मीमांसा संपादकाने या लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत केली आहे.

महाराष्ट्रात बुद्धिवादी विचारवंतांची एक थोर परंपरा आहे. बाळशास्त्री म. जांभेकर, लोकहितवादी, फुले, न्या. रानडे, गो. ग. आगरकर, लो. टिळक, वि. दा. सावरकर, महर्षी शिंदे इ. विचारवंतांच्या परंपरेतच शास्त्रीजींचे कार्य मोडते. प्राचीन आचार्यपरंपरेची निःस्वार्थ लोकशिक्षणाची निष्ठा, तर्कशुद्ध दृष्टिकोन, पूर्व-पश्चिमी ज्ञान-विज्ञानांचा प्रचंड व्यासंग, स्पष्ट आणि निःस्पृह विचार प्रतिपादन व सामाजिक आणि राष्ट्रीय उद्धाराची कळकळ हे या परंपरेचे विशेष होत.

छोट्या शाळा-मंडळांपासून राष्ट्रीय संस्था-संघटनांपर्यंत सर्व प्रकारच्या व्यासपीठांवर दिलेली विचारप्रवर्तक भाषणे हा शास्त्रीजींच्या सामाजिक सेवाव्रताचाच एक अविभाज्य भाग होय. अशी कितीतरी मौलिक विचारांची भाषणे ग्रंथरूपात संग्रहित झालेली नव्हती. उदा. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत १९५३ साली भारतीय राष्ट्रीयत्वावर दिलेले भाषण किंवा पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेत १९७३ साली वाचलेला 'द कॉस्मिक स्टेट अँड कलेक्टिव्ह किंगशिप ऑफ वेदिक गॉड्स' हा शोधनिबंध. शास्त्रीजींनी शेकडो व्याख्यानांच्या रूपाने व लेखनद्वारा केलेले विचारकार्य प्रकाशात आल्यास हा महाराष्ट्राचा एक बहुमोल असा ठेवा मानला जाईल. १९७५ साली त्यांनी पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण

केले. त्यानिमित्त स्थापन झालेल्या अमृत महोत्सव समितीने त्यांच्या समग्र लेखनाचे खंड प्रसिद्ध करण्याची योजना आखली होती. पैकी एक लेखसंग्रह प्रकाशित झाला आहे. याच वर्षी मुंबई विद्यापीठाने एल.एल.डी. ही सन्माननीय पदवी देऊन त्यांच्या विद्वत्तेचा यथोचित गौरव केला. 'संस्कृत पंडित' म्हणून १९७३ मध्ये, 'पद्मभूषण' म्हणून १९७६ मध्ये, तर 'पद्मविभूषण' म्हणून १९९२ मध्ये भारत सरकारने त्यांना गौरविले. त्यांचा मृत्यू २७ मे १९९४ रोजी महाबळेश्वर येथे झाला. त्यांची अनेक चरित्रे व ग्रंथांची भाषांतरे उपलब्ध आहेत. तसेच त्यांच्या पश्चात त्यांची काही भाषणे संपादित करून प्रकाशित झाली आहेत.

(मराठी विश्वकोश खंड-६, पृ. ६०७, ६०८)

(**टीप :** वरील परिचय अद्यतन करून सुधारित संदर्भ म्हणून इथे देण्यात आला आहे.)

○○○

परिशिष्ट - ३

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा व संदर्भ ग्रंथ सूची

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा

१) आनंदमीमांसा
मराठी प्रबंध
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई/पुस्तकमाला, पुष्प ६वे
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०) मूल्य ६ आणे / पृष्ठे - ७०

२) शुद्धिसर्वस्वम्
संस्कृत प्रबंध
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०), मूल्य ८ आणे / पृष्ठे - ३७

३) भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्
संस्कृत निबंध
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - कर्नाटक प्रेस, ३/८, ए, ठाकूरद्वार, मुंबई.
प्रथमावृत्ती - १९३३ / पृष्ठे - १६

४) जडवाद अर्थात् अनीश्वरवाद
मराठी प्रबंध
प्रकाशक - य. गो. जोशी प्रकाशन, ६२३ / १५, सदाशिव पेठ, पुणे.
वादविवेचन माला, संपादक, श्री. पां. वा. गाडगीळ.
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई (जि. सातारा.)
प्रथमावृत्ती - २० ऑक्टोबर १९४१ / किं. सव्वा रुपया / पृष्ठे - १०३

५) हिंदुधर्माची समीक्षा

भाषणसंग्रह

श्री. श्रीधर गणेश परांजपे स्मारक व्याख्यानमाला, नागपूर विद्यापीठ,

नागपूर (१९४०), प्रकाशन प्रथम आवृत्ती, ऑक्टोबर, १९४१

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

द्वितीय आवृत्ती, १ मे १९४२ / मूल्य २ रुपये / पृष्ठे - १४०

६) ज्योति-निबंध

भाषण / प्रस्तावना - रा. ना. चव्हाण

मुद्रक व प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

प्रथमावृत्ती - १९४७, मूल्य १२ आणे, पृष्ठे - ३५

७) वैदिक संस्कृतीचा विकास

भाषणसंग्रह

श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी व्याख्यानमाला (१९४९)

पुणे विद्यापीठ, पुणे

प्राज्ञपाठशाळा मंडळ ग्रंथमाला

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा

प्रथमावृत्ती - आश्विन शुद्ध ६, शके १८७३ (१९५१), मूल्य ६ रुपये / पृष्ठे - २८६

८) भारतस्य संविधानम्

भारतीय राज्यघटना (१९५२) - संस्कृत भाषांतर.

प्रकाशक - प्रकाशन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई

प्रथमावृत्ती - १९५२ / मूल्य २ रुपये किंवा ३ शिलिंग. पृष्ठे - २९५

९) राजवाडे - लेखसंग्रह

लेखसंग्रह

प्रकाशक - साहित्य अकादेमीतर्फे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

मुद्रक - संगम प्रेस प्रा. लि., ३८३, नारायण पेठ, पुणे - २

प्रथमावृत्ती १९५८/मूल्य १२ रुपये / पृष्ठे - २९४

१०) लोकमान्य टिळक लेखसंग्रह

लेखसंग्रह

प्रकाशक - साहित्य अकादमी, नवी दिल्ली

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई

प्रथमावृत्ती - १ ऑगस्ट, १९६९ / मूल्य - १२ रुपये / पृष्ठे - ४५९.

11) Descriptive Catalogue of Sanskrit Manuscripts.

(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)

Catalogue of Sanskrit Manuscripts.

Edited by - Laxmanshastri Joshi

Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.

First Edition - 1st June 1970, Pages - 717 / Price - 50/-

12) Descriptive Catalogue of Sanskrit, Manuscripts - (Part II)

(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)

Catalogue of Sanskrit Manuscripts.

Edited by - Laxmanshastri Joshi

Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.

First Edition - 1st June 1970, Pages - 720-1361 / Price - 50/-

१३) आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत

भाषणसंग्रह

व्हीनस प्रकाशन, रौप्यमहोत्सव व्याख्यानमाला, पुष्प ८ वे, १९७२

प्रकाशन - व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या', ३८१ - क, शनिवार पेठ, पुणे - ३०

मुद्रक - किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकरनगर, पुणे - ९

पहिली आवृत्ती - सप्टेंबर १९७२ / मूल्य ६ रुपये / पृष्ठे - ११८

१४) सर्वधर्मसमीक्षा

भाषणसंग्रह

सेनापती बापट व्याख्यानमाला, मुंबई विद्यापीठ, मुंबई - (१९७६-७७)

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - गजानन प्रिंटिंग सर्व्हिसेस, कसबा पेठ, पुणे - १

प्रथमावृत्ती - १९८४ / रु.९५/- / पृष्ठे - ८८

१५) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड - १)

लेखसंग्रह (संकीर्ण)

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३

मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस,

४२, जी. डी. आंबेकर मार्ग, मुंबई - ३१

प्रथमावृत्ती - २० ऑगस्ट १९८२ / मूल्य-५५५/- / पृष्ठे - ५९०

१६) शिखांचा पंथ व इतिहास

भाषणसंग्रह

कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला, १९८४

प्रकाशक - गोपाळ मोकाशी, १७६, सदाशिव पेठ, पुणे - ३०

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा

प्रथमावृत्ती - ५ डिसेंबर, १९८४ / किंमत - ७ रुपये / पृष्ठे - ६०

१७) ज्योतिचरित्र

चरित्र

प्रकाशक - नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, ए-५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली - १

मुद्रक -

प्रथमावृत्ती - शके-१९१४ (१९९२) / किं. ३० रु. / पृष्ठे - १०७

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : संपादन कार्य

१८) धर्मकोश (खंड १ ते ५) (१९३७ ते १९८८)

व्यवहारकाण्डम् (भाग १ ते ३)

उपनिषदकाण्डम् (भाग १ ते ४)

संस्कारकाण्डम् (भाग १ ते ६)

राजनीतिकाण्डम् (भाग १ ते ६)

वर्णाश्रमधर्मकाण्डम् (भाग - १)

१९) मराठी विश्वकोश (खंड १ ते १५) (१९६५ ते १९९४)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९६५ - १९८०)

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई (१९८०-१९९४)

२०) श्री स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ (१९५२) (अमृत महोत्सव)

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (श्री गुरू स्वामी केवलानंद सत्कार समिती)

प्रकाशन - मार्गशीर्ष, शुद्ध ४ शके-१८७४ / पृष्ठे - २७२

२१) श्री ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती स्मारक मंदिर समारोह पुण्यस्मरण पुस्तिका

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

प्रकाशन - १३ डिसेंबर, १९६० / मूल्य १ रु. / पृष्ठे - २५

२२) श्री यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ

प्रकाशक - श्री यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती महाल, नागपूर

(अठ्ठेचाळिसावा जन्मदिन सोहळा सत्कार समारंभ ग्रंथ)

मुद्रक - मौज प्रिंटिंग ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४

प्रकाशन - २१ फाल्गुन, १८८२/१२ मार्च १९६१ / पृष्ठे - १००.

२३) मराठी विश्वकोश : परिचय ग्रंथ

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुद्रक - मौज प्रकाशन ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४
प्रकाशन - २ एप्रिल १९६५ (गुढीपाडवा) / पृष्ठे - १२१

२४) मराठी कुमार विश्वकोश : परिचय ग्रंथ

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
मुद्रक - शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे - १
प्रथमावृत्ती - २००३ / मूल्य-रु.१५०/- / पृष्ठे - २५८

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची भाषांतरे

25) A critique of Hinduism

By tarkteerth Laxmanshastri Joshi
Translated by- G. D. Parikh
Publisher - Modern Age Publication Navasari Chembers,
Outram Road, Fort, Bombay-1
Printer - N. E. Chinwalla, Manager,
British India Press, Mazagaon, Bombay
First Edition - Market, 1948 / Price- Rs.5/- / Pages-131

26) हिंदू धर्म की समीक्षा

मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - नथूराम प्रेमी
प्रकाशक - नथूराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय,
हिराबाग, गिरगाँव, बम्बई -4
पहली बार - दिसंबर 1948 / पृष्ठ संख्या - 172

27) जडवाद और अनीश्वरवाद

मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - सत्यदेव विद्यालंकार
प्रकाशक - नथुराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय,
हिराबाग, गिरगाँव, बम्बई - 4
मुद्रक - न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, 6, केलेवाडी, बम्बई - 4
पहली बार - मार्च 1950 / पृष्ठ संख्या - 112

28) वैदिक संस्कृति का विकास

मूल लेखक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादकर्ता - मोरेश्वर दिनकर पराडकर

प्रकाशक - साहित्य अकादमी, नई दिल्ली - 110001

प्रथम संस्करण - 1957. / पृष्ठ संख्या - 360.

मूल्य 200 रु.

29) राजवाडे लेखसंग्रह

मूल संपादक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादक - वसंत देव

प्रकाशक - साहित्य अकादमी की ओर से शिवलाल अग्रवाल एण्ड कंपनी (प्रा.) लि., आगरा

मुद्रक - युनिवर्सल आर्ट प्रेस, आगरा

प्रथम संस्करण - 1964 / मूल्य 12 रु.50 पै. / पृष्ठ संख्या - 224.

30) Jotirao Phule

Tarkteerth Laxmanshastri Joshi

Translator - Daya Agrawal

Publisher - National Book Trust, India

First Edition - 1996 / Price - Rs. 75/- / Pages - 94

31) Critique of Hinduism And Other Religions

Tarkteerth Laxmanshastri Joshi.

Translated by- Suman Oak.

Publisher - Popular Prakashan, 35, C,

Pandit Madan Mohan Malviya Marg, Popular Press Building, Tardeo, Bombay - 400 034. First Published - 1996 / pages - 205

32) Development of Indian Culture : Vedas to Gandhi

Tarkteerth Laxmanshatri Joshi

Translated by - S. R. Nene

Published by - Lok Vangmay Griha, Bupesh Gupta Bhuwan, 85, Sayani Road, Prabhadevi, Mumbai - 400 025

Printed by - New Age Printing Press, Mumbai - 2

First Edition - 2001/ Price - 200 Rs. / Pages - 555

33) Spiritual Materialism

Tarkteerth Laxmanshastri Joshi
Translated by - Arundhati Khandkar
Publisher - Lokvangmay Griha, Mumbai - 2
Printer - New Age Printing Press, Mumbai -
First Edition - November 2004 / Price - 250 Rs. / Pages - 171

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याचे संपादित ग्रंथ

३४) विचारशिल्प

निबंधसंग्रह/संपादक - प्रा. रा. ग. जाधव
प्रकाशक - कॉंटिनेंटल प्रकाशन, विजयानगर, पुणे - ३
मुद्रक - महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
प्रथमावृत्ती - १९७५ / किंमत ५० रु. / पृष्ठे - १४८

३५) आद्य शंकराचार्य - जीवन आणि विचार

भाषणसंग्रह/संपादक - डॉ. अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२,
जी. डी. आंबेडकर मार्ग, मुंबई - ३१
प्रथमावृत्ती - २७ मे १९९७ / किं. ८० रु. / पृष्ठे - ९५

३६) साहित्याचे तर्कशास्त्र

साहित्यिक भाषणांचा संग्रह
संपादक - सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे.
प्रकाशन - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई.
प्रथमावृत्ती - २०१२ / मूल्य-७५० रु. / पृष्ठे - ४३७

संदर्भ सूची

१. श्री सोमनाथ तीर्थ

लेखक - त्र्यंबक रघुनाथ (गौतमबुवा) पाठक
प्रकाशक - श्री यशवंतराव महाराज मंदिर, पिंपळनेर (धुळे)
मुद्रक - श्री गजानन छापखाना, कराड, उत्तर सातारा
प्रथमावृत्ती - जुलै १९५९ / किंमत- ५ रु. / पृष्ठे - १७२

२. **नवभारत मासिक / तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक**
फेब्रुवारी-मार्च, १९८१
प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई / किं. ५ रु. / पृष्ठे - ९५

३. **प्रज्ञांजली (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गौरव ग्रंथ)**
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३
मुद्रक - कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती, टिळक रोड, पुणे
प्रथमावृत्ती - २० जानेवारी १९८५ / किं. १२५ रु. / पृष्ठे - ३४७

४. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**
लेखिका - सौ. मालती देशपांडे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रथमावृत्ती - जानेवारी, १९९२ / किं. ५० रु. / पृष्ठे - ७५

५. **प्रज्ञानंद : अमृत महोत्सव स्मरणिका**
संपादक मंडळ - वसंतराव बोराटे (निमंत्रक) व अन्य
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रकाशन - २५ जानेवारी १९९४ / पृष्ठे - ९८

६. **शास्त्रीजी (चरित्र)**
लेखक - रा. ग. जाधव
प्रकाशक - प्रतिमा प्रकाशन, १३५९, सदाशिव पेठ, पुणे
मुद्रक - सुहास मुद्रणालय, २२, बुधवार पेठ, पुणे - २
प्रथमावृत्ती - २४ ऑगस्ट १९९४ / किं. ७० रु. / पृष्ठे - १५६

७. **तर्कतीर्थ : एक प्रज्ञाप्रवाह (चरित्र)**
लेखिका - अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई
प्रथमावृत्ती - २७ मार्च १९९५ / किंमत - २७० रु. / पृष्ठे - २६०

८. **तर्कतीर्थायन (गीत चरित्र)**
कवी - गोविंद नरहर कुलकर्णी
प्रकाशक - गो. न. कुलकर्णी, 'दवबिंदू', वाई
मुद्रक - प्रतिमा प्रिंटर्स, १९१०, रविवार पेठ, वाई
प्रकाशन - १ एप्रिल १९९५ / पृष्ठे - ५०

९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार

संपादन - वसंत पळशीकर

प्रकाशन - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रण - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०

प्रथमावृत्ती - फेब्रुवारी १९९६ / किं. २०० रु./ पृष्ठे - १६४

१०. प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा

संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी, के. ल. दप्तरी, मे. पुं. रेगे

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०

प्रथमावृत्ती - ऑगस्ट, १९९६ / किं. २५ रु. / पृष्ठे - २३८

११. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या बृहत् चरित्राची साधने

लेखक - अशोक भट

प्रकाशक - लोकमान्य टिळक स्मारक संस्था, मधली आळी,

मुद्रक - विजय मुद्रणालय, धर्मपुरी, वाई

प्रकाशन - १३ ऑक्टोबर, १९९९ / विनामूल्य / पृष्ठे - ४२

१२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक

कार्यकारी संपादक - यशवंत कळमकर

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी, वाई

मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०

प्रथमावृत्ती - २७ जानेवारी, २००१ / मूल्य - २०० रु. / पृष्ठे - ८४

१३. संवाद : तर्कतीर्थांशी (मुलाखत संग्रह)

लेखक - अनिल जोशी

प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, कृष्णा, पत्रकारनगर, पुणे

मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०

प्रथमावृत्ती - २६ मे, २००१ / किं-१५० रु. / पृष्ठे - १५८

१४. महाराष्ट्राचे शिल्पकार : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)

लेखिका - डॉ. अरुंधती खंडकर.

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

मुद्रक - स्नेहेश प्रिंटर्स, धनराज मिल आवार, लोअर परळ, मुंबई

प्रथमावृत्ती - एप्रिल, २००३/ किं. ४० रु./ पृष्ठे - ८४

१५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परंपरा, प्रबोधन व परिवर्तन
रा. ना. चव्हाण / संपादन - रमेश चव्हाण
प्रकाशक - रमेश चव्हाण, ७ अ / ६, पश्चिमा नगरी, कोथरूड, पुणे
मुद्रक - एस. जयकुमार ऑफसेट प्रा. लि., संगम प्रेस समोर, कोथरूड, पुणे
प्रथमावृत्ती - जुलै, २०१० / किं. २५० रु. / पृष्ठे - २६४

१६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र) (महाराष्ट्र चरित्र - ग्रंथमाला)
अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्री. गंधर्व - वेद प्रकाशन, १२८६, सदाशिव पेठ, पुणे
मुद्रक - एक्सेल प्रिंटिंग अँड पॅकेजिंग, १३१/५, एरंडवणे, पुणे
प्रथमावृत्ती - नोव्हेंबर, २०१० / किं. - १८० रु. / पृष्ठे - १७८

१७. प्राज्ञप्रबोध (प्राज्ञपाठशाळा मंडळ शताब्दी ग्रंथ)
संपादक - श्री. मा. भावे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - सन प्रिंटर्स, गणपती आळी, वाई
प्रथमावृत्ती - डिसेंबर, २०१६ / किं. २५० रु. / पृष्ठे - २४७

१८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : आठवणी आणि विचार
लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, 'कृष्णा', पत्रकारनगर, पुणे - ४११०१
मुद्रक - के. सागर ग्राफिक्स अँड प्रिंटर्स, वाई
प्रथमावृत्ती - ९ मार्च, २०१९ / किं.-२०० रु. / पृष्ठे - १७१

१९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारांचा तात्त्विक अभ्यास
संशोधिका - स्वाती बापूराव भोंगळे / • मार्गदर्शक - डॉ. सदानंद मोरे
संशोधन प्रबंध, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
जुलै, २०१९, पृष्ठे- ३१७

20. Swimming Upstream (Biography)
Author - Arundhati C. Khandkar/Ashok C. Khandkar
Publisher - Oxford University Press, India.
Printer - Nutech Print Services, New Delhi
First Edition - 2019 / Price-Rs.-1,195/- / Pages - 193

२१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन
लेखक / संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे
प्रकाशक - अक्षरदालन, २१४१ बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर - ४१६ ०१२
प्रथमावृत्ती - २७ जानेवारी, २०२३, पृष्ठे- ३२६, किं. ५०० रु.

ooo

परिशिष्ट - ४

परिचय

डॉ. सुनीलकुमार लवटे

जन्म ११ एप्रिल, १९५०ला वा. बा. नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर येथे. बालपण व इयत्ता तिसरी पर्यंतचं प्राथमिक शिक्षण तेथेच. नंतर चौथी ते पदवी शिक्षण डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन बालगृह (रिमांड होम), कोल्हापूरमधून. सन १९६७ला शालान्त परीक्षा उत्तीर्ण. उच्चशिक्षणार्थ श्रीमौनी विद्यापीठ, गारगोटीच्या 'कर्मवीर हिरे ग्रामभारती'मध्ये प्रवेश. तिथे सन १९६७ ते १९७१ या काळात 'डिप्लोमा इन रूरल सर्व्हिसेस (एज्युकेशन)' ही बी.ए.बी. एड. समकक्ष पदविका प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन भारतीय ग्रामभारतीत सर्वप्रथम. त्याप्रीत्यर्थ भारत सरकारचा 'रोल ऑफ ऑनर', 'बेस्ट सोशल वर्कर', 'सर्टिफिकेट ऑफ मेरिट' संपादनाची 'हॅट्-ट्रिक'.

पदवी संपादनानंतर 'आंतरभारती शिक्षण मंडळ'च्या विविध शाळांमधून विविध विषयांचे सन १९७१ ते १९७९ या काळात अध्यापन. समांतरपणे शिक्षण संघटना कार्य. एम.ए.,पीएच.डी. (हिंदी) शिक्षणाची पूर्तता. सन १९७९ ते २०१० या काळात हिंदी अधिव्याख्याता व सन २००५ ते २०१० या काळात प्राचार्य म्हणून महावीर महाविद्यालय, कोल्हापूर येथे अध्यापन, संशोधन, प्रशासन, मार्गदर्शन कार्य. सन १९८० ते २०१० या काळात समांतरपणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या हिंदी अधिविभागात एम. ए., एम.फिल., पीएच.डी. स्तरावर अध्यापन, संशोधन व मार्गदर्शन कार्य.

सन १९८० पासून आजतागायत अनाथ, निराधार, बालगुन्हेगार, बंदी बांधव, वेश्या, कुमारी माता, परित्यक्ता, वृद्ध इ. च्या संगोपन, संरक्षण, शिक्षण, सुसंस्कार, पुनर्वसन कार्याशी निगडित वंचित विकास कार्यास समर्पित. अशा संस्थांचं राज्यशासननियुक्त अध्यक्षपद कार्य, 'समाज-सेवा' त्रैमासिक संपादन. या संबंधीच्या राज्यस्तरीय, राष्ट्रीय वंचित विकास, मानवाधिकार कार्य संदर्भातील राज्यस्तरीय, राष्ट्रीय धोरण निर्धारण व योजना विकास कार्य

याचाच भाग म्हणून भारतीय शिष्टमंडळातून युरोप, आशिया, आफ्रिका खंडांतील १६ देशांचे अभ्यास दौरे (१९९० ते २०११).

महाविद्यालयीन जीवनापासून लेखन, वाचनात रुची. मराठी-हिंदीत समांतर लेखन, भाषांतर, समीक्षा, संशोधन, संपादन कार्य. आजवर शंभरहून अधिक ग्रंथ प्रकाशित. ग्रंथांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय शासन व अन्य संस्थांचे पुरस्कार. त्यात उत्तर प्रदेश सरकारच्या हिंदी संस्थान, लखनऊचा 'सौहार्द सन्मान' (रुपये दोन लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), महाराष्ट्र सरकारच्या राज्य हिंदी अकादमीचा 'जीवन गौरव महाराष्ट्र भारती सन्मान' (रुपये एक लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), राष्ट्रभाषा प्रचार/प्रसार कार्याचा 'अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार', (रु. पन्नास हजार, सन्मानपत्र); 'खाली जमीन, वर आकाश' आत्मकथेस महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिकेचा 'अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार', महाराष्ट्र शासनाचा 'लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार.' या आत्मकथेचे विविध आकाशवाणी केंद्रांवरून अभिवाचन प्रक्षेपण, विविध भाषांत अनुवाद, अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तक म्हणून अंतर्भाव व संशोधन.

वि. स. खांडेकर समग्र अप्रकाशित, असंकलित साहित्याचे संपादन. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय संपादन. डॉ. नरेंद्र दाभोळकर समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर आणि महाराजा सयाजीराव गायकवाड समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर प्रकल्पाचे प्रधान संपादक. वि. स. खांडेकर स्मृतिसंग्रहालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व शिरोडे; यशवंतराव चव्हाण स्मृतिसंग्रहालय, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृतिसंग्रहालय, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी येथे निर्मिती.

विविध सामाजिक, शैक्षणिक, सामाजिक कार्याची नोंद घेऊन 'कोल्हापूर भूषण', 'नागरी सत्कार', 'सुधारककार' गोपाळ गणेश आगरकर राज्यस्तरीय पुरस्कार, अंनिस डॉ. भीमराव कुलकर्णी साहित्यिक कार्यकर्ता पुरस्कार (मसाप), विविध सीमाभाग, पश्चिम महाराष्ट्र येथे आयोजित साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद. रेडिओ, दूरदर्शन, व्याख्यानमाला, आभासी संवाद इत्यादी माध्यमांतून अनेक मुलाखती, व्याख्याने, मार्गदर्शन, समुपदेशन कार्य.

वरील कार्य, पुरस्कार, लेखन, मानधन इत्यादींपोटी आजवर प्राप्त सर्व रक्कम समाज संकल्पित धन मानून विविध व्यक्ती, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक संस्थांना देणगी म्हणून समर्पित.

ooo

वाय १८१-११०० पु.-आर ८-७.२०२४

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

''युद्धाचा अंतिम शेवट युद्धाने कधीच होत नाही. धर्म हा जेंव्हा दोन्ही स्वामींची म्हणजे ईश्वराची व ऐहिक भौतिक संपत्तीची सेवा करू लागतो, तेव्हा धर्म हा अफूची गोळी बनतो, अन्यथा नव्हे. धर्म जेव्हा अंतिम ईश्वरी सत्य हाच एक स्वामी मानून त्याची सर्वथा शरण जाऊन सेवा करतो तेंव्हा तो शुद्ध मंगलमय प्रकाशाचा मार्ग बनतो. ख्रिश्चन धर्माचा मध्ययुगीन इतिहास या धार्मिक अवनीतीचे एक स्पष्ट उदाहरण आहे. पवित्र शास्त्र व घातक शस्त्र यांची युती हे मानवी अवनीतीचे एक कुलक्षण आहे. राष्ट्रांतर्गत व आंतरराष्ट्रीय सहकार्याचा व शांतीचा मार्ग म्हणजे गांधी मार्गच होय. सामाजिक शोषण व विषमता यांचा अंत गांधींच्या अहिंसा मार्गानेच होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय चिरंतन शांततेची व सहकार्याची धार्मिक पार्श्वभूमी व दृष्टी महात्मा गांधींनी निर्माण केली आहे. ही दृष्टी जे स्वीकारीत नाहीत त्यांची आंधळ्यांची मालिका विश्वसंहाराच्या अनंत अंध:कारात मानवास नष्ट करील असे भय आहे व ते भय जगास भेडसावीत आहे. मार्क्सचे व लेनिनचे साम्यवादी ध्येय आणि समतेचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर्श हा गांधी मार्गानेच जगाला गाठता येईल.''

– तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
(सर्वधर्म परिषद, झागोर्स्क, रशिया,
१ ते ४ जुलै, १९६९, मधील भाषणातून.)



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई